# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY

OU_184376

UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M928 K53 B1

Name of Book गानगोष्ठी

Name of Author केळकार

# गतगोष्टी

अर्थात्

## माझी जीवन-यात्रा

न. चिं. केळकर

सन १९३९

किम्मत पांच रुपये

प्रकाशक

**यशवंत नरसिंह केळकर,**

**१९६/३३ सदाशिव पेठ, पुणें**

**या पुस्तकाचे** पुनर्मुद्रण भाषांतर वगैरे संबंधीचे सर्व हक्क **यशवंत नरसिंह केळकर,** १९६/३३ सदाशिव, यांचे स्वाधीन आहेत.

प्रथमावृत्तीचे एकमेव विक्रेते

**आत्माराम रावजी भट,** सहव्यवस्थापक, **केसरी-मराठा कचेरी, पुणें २**

मुद्रक

**धोंडो वासुदेव विद्वांस,** ५६८ नारायण पेठ, गायकवाडवाडा, **केसरी प्रेस, पुणें**

मला केसरीचें काम तितक्या बेताचें द्यावें. किंवा ही व्यवस्था पसंत नसेल तर तुम्ही वेगळाच मनुष्य मराठ्याचा संपादक नेमा व त्याजकडून सर्व काम घ्या. मराठा सोडून जाणें ही गोष्ट मला सोपी किंवा सुखाची वाटत नाहीं. शिवाय बारा वर्षांच्या सहवासानें मलाहि त्या पत्राबद्दल एक प्रकारचें ममत्व वाटत आहे. पण अवश्य असेल तर तें मला सोडलेच पाहिजे व तें मी आनंदानें सोडीन. उभयतांचा स्वाभिमान राखला जावा याकरितांच मी हें सुचवीत आहे. कसल्याहि अडचणीतून तुम्ही मार्ग काढूं शकतां; व माझा संबंध सुटावा असें तुम्हालाहि सहसा वाटत नसेल. पण मी जें सुचविलें आहे त्यांतून ज्या कांहीं गोष्टी निघतील, ( मग त्या बऱ्या असोत वाईट असोत ) त्या स्वीकारण्याला माझी तयारी आहे. ''

या पत्राला टिळकांकडून ता. २३ नोव्हेंबरचें उत्तर मला आलें, त्यांत त्यांनीं खालीलप्रमाणें लिहिलें होतें:—" तुमचें ता. १२ चें पत्र पावलें. असलें कांहींतरी पत्र तुमच्याकडून येण्याच्या बेतांत असावें असें मनाला त्या पूर्वीपासून वाटतच होतें. पण तें प्रत्यक्ष आलेंच तेव्हां मात्र खेद झाल्याशिवाय राहिला नाहीं. प्रथम सहवास व सहकार्य होतांना ज्यांचीं माझीं मतें एक आहेत त्यांचींच मतें पुढें मजहून वेगळीं. व्हावीं हा दुर्दैवानें माझाच योगायोग दिसतो. बारा वर्षांपूर्वी तुम्ही इकडे येऊन मिळाला तेव्हां तुम्ही अगदीं तरुण म्हणून तुमचीं राजकीय मतें स्थिर झालीं होतीं असें म्हणतां आलें नसतें. आणि या बारा वर्षांत केसरींत प्रगट होणाऱ्या मताहून कांहीं भिन्न प्रकारचीं मतें तुमचीं परिणत होतील अशी मला मुळींच शंका आली नाहीं. पण तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें हा ज्याचा त्याचा स्वभाव व ज्याची त्याची विवेकबुद्धि यांचाच प्रश्न आहे. म्हणून या बाबतींत मी तुमच्या स्वाभिमानाच्या मार्गांत येऊं इच्छित नाहीं. केसरी व मराठा हीं दोन्हीं एका पक्षाचीं मुखपत्रें आहेत हें तुम्हीं जाणतांच. आणि ज्या अर्थी आम्ही आतां आपल्या पक्षाची संघटना करीत आहो त्या अर्थी त्यांचें तेंच स्वरूप पुढेंहि राखण्याचा माझा विचार आहे. किरकोळ गोष्टीसंबंधानें मी केव्हांहि दुर्लक्ष करीन व आजवर तसें केलेंहि आहे. पण विशेष महत्वाच्या प्रसंगीं दोन्हीं पत्रांनीं एकच मत व तेंहि सारख्याच नेटानें प्रतिपादन केलें पाहिजे. एवढें एक बंधन सोडून दिलें म्हणजे तुमचा संतोष व्हावा म्हणून मी इतर काय वाटेल तें करण्यास तयार आहे. तुमचें आमचें सहकार्य सुटावें व तुम्ही आमच्यांतून जावें ही गोष्ट मला अत्यंत दुःखकर वाटेल. कारण

तुमचा प्रेमळ स्वभाव,व स्वार्थत्यागानें तुम्ही स्वतःला आणलेली किंमत किंवा महत्त्व, यांची मला पूर्ण जाणीव आहे. इतकेंच नव्हे तर वर्तमानपत्राशीं तुमचा इतके दिवस इतका निकट संबंध आल्यामुळें मी त्याच्या आधारावर कांहीं आशा मनांत धरून बसलों आहे.त्या माझ्या आशा निराधार ठरूं नयेत अशी माझी इच्छा आहे.म्हणून माझी तुम्हाला पुनः विनंति आहे कीं मला सांगतां त्या ऐवजीं तुम्हींच या सर्व गोष्टींचा विचार करावा; व हल्लीं तुम्ही सुचविला त्याहून वेगळा असा कांहीं मार्ग सुचवावा. तुमच्या विषयीं मला बाहेरचा भलता कोणी भलतें कांहीं सांगून माझें मन तुमच्या संबंधानें कलुषित करील हें घडणार नाहीं. कारण मी तसा हलक्या कानाचा मनुष्य नाहीं. तुम्ही आम्ही एकमेकांना इतकीं वर्षें चांगलें जाणतों व एकमेकांचीं मतें एकमेकांना पूर्ण माहीत आहेत. तेव्हां पुढच्या आठवड्यांत तुम्ही सिंहगडावर याल तर आपण बसून त्या विषयीं बोलूं."

वरील पत्रानंतर मी सिंहगडावर गेलों. आणि टिळकांचें माझें या विषयावर बराच वेळ संभाषण झालें. त्यांचा मुख्य मुद्दा काय होता हे मला आजहि चांगलेंच स्मरतें. मतभेद होता तो सर्वसामान्य राजकीय विषयाबद्दल किंवा तात्त्विक जहालपणाच्या लेखनाबद्दल नव्हता. तर व्यक्तिविषयक टीकेसंबंधानें होता. माझें म्हणणें असे कीं, "आज नामदार गोखले व त्यांच्या पक्षांतील इतर व्यक्ति यांच्यावर 'हिंदू पंच' वगैरेसारख्या अत्यंत कमी प्रतीच्या वर्तमानपत्रांतून अतिशय अभद्र व निरर्गल टीका येत आहे, आणि तिच्यामुळें आपल्या पक्षाचें काम चांगलें होत आहे असें आपल्या पक्षांतील लोकांना वाटतें हे उघड आहे. अर्थात् त्यांची अपेक्षा मी मराठ्यांतहि इतकें टाकून लिहावें अशी असणार. केसरींत अगदीं हिंदुपंचादि वर्तमानपत्राइतकी वाईट व्यक्तीविषयक टीका असत नाहीं हें खरें. तथापि केसरींत जितकी व्यक्तिनिंदा येते तितकीहि मला योग्य वाटत नाहीं.केसरींत कृष्णाजीपंत खाडिलकर यांना आवडेल ती भाषा ते खुशाल वापरोत व ती लोकांना आवडो. पण तशी टीका व भाषा मराठ्यांत मजकडून लिहिली जाणें हें माझ्या स्वभावामुळें मजकडून होणें कठिण. पण त्यामुळें माझें या दृष्टीचें लिहिणें लोकांना पसंत पडत नाहीं; व दोन्हीं पत्रांनीं टीकेसंबंधीं सारखाच नेट दाखवावा अशी तुमची अपेक्षा असल्यामुळें तुम्हीहि नाराजच राहणार. तेव्हां त्यांत दुरुस्ती होणार कशी ?"

यावर वर्तमानपत्रांत लिहितांना व्यक्तींना राखून संभाळून लिहितां येणें शक्य नाहीं याविषयीं आमच्यामध्यें बराच वाद, उदाहरणें देऊनहि झाला. परंतु टिळकांनीं आपलें

मत असें सांगितलें कीं "व्यक्तींना संभाळून टीका करतां येणारच नाहीं असें नाहीं; पण राजकारण हा बोलूनचालून धकाधकीचा मामला आहे. त्यांतूनहि हल्लीं दोन्ही पक्ष हिंदी राजकारणाचे डाव प्रक्षुब्ध अशा गरम वातावरणांत उभे राहून खेळत आहेत. तेव्हां अशा वेळीं व्यक्तींवरहि सडकून टीका करावी लागणार; व त्यांत मागें पुढें पहात बसणें म्हणजे मनाचा फाजिल नाजूकपणा प्रगट करण्यासारखें होय." अर्थात् या वादाचा निकाल सिंहगडच्या थंड वातावरणांतहि लागला नाहीं. पण टिळकांनीं या वादांत मजविषयीं इतकें सौजन्य दाखविलें कीं, त्यांचेंच बोलणें आपल्या पदरांत घेऊन मला परत जावें लागलें तरी राजीनाम्याची गोष्ट मात्र फिरून काढूं नये !

पुढें नोव्हेंबरअखेर आली. नागपूरची राष्ट्रीयसभा रहित होऊन ती सुरतेस होण्याचें ठरलें. आणि तेथें काय काय प्रकार घडले याचें सविस्तर वर्णन मी टिळक-चरित्राच्या दुसऱ्या खंडांत केलें आहे म्हणून त्याचें वर्णन पुनः येथें करीत नाहीं. पण इतकेंच सांगतों कीं या सर्व प्रकारांनीं माझी मनःखिन्नता कमी न होता वाढल्यासारखीच झाली. टिळक सिंहगडाहून खालीं आल्यावर राष्ट्रीयसभेच्या वादांत अधिकच आवेशानें पडले. केसरीचा दर अंक असा निघे कीं, त्यांतील टीकेचा खडतरपणा पूर्वीच्याहून थोडा अधिकच. पण वर्तमानपत्रांत लिहिण्याच्या कामापेक्षां ते देशाच्या निरनिराळ्या भागांतून, म्हणजे खरोखरच कर्नाटकापासून बंगाल्यापर्यंत, आपलें सैन्य शिलेदार व सरदार गोळा करण्याच्या खटपटीस लागले होते. यामुळें केसरींत लिहिण्याचें काम मुख्यतः खाडिलकरांच्याच हातीं गेले, व या दिवसांत त्यांनीं आपल्या विशिष्ट लेखनपद्धतीची हौस पुरी करून घेतली. शिवाय कलकत्त्याची 'वंदेमातरम्' वगैरे इंग्रजी व कांहीं बंगालीं पत्रें असें काव्ययुक्त व करसून लिहीत कीं केसरीलाहि तुलनेंत आपण मागें पडूं नये असें सहजच वाटे. खाडिलकरांना अरविंदबाबूंची काव्यपूर्ण टीका साधण्यासारखी नव्हती. ते तत्त्वज्ञान म्हणून अरविंद बाबूसारखे थोडेंबहुत लिहीत पण खाडिलकरांच्या लेखणींत जो ग्राम्यपणा होता तो अरविंदबाबूंच्या लेखणींत कोठेंहि आढळणें शक्य नव्हतें. या बाबतींत त्यांची तुलना इतर कांहीं बंगाली वर्तमानपत्रांबरोबर झाली असती; म्हणजे मराठींतहि कोणी पंचकवडी बानर्जी अथवा पंडित कलिप्रसन्न काव्यविशारद होते असें फार तर यथार्थतेनें म्हणतां आलें असतें.

सुरतेस राष्ट्रीय पक्षाची नवी छावणी उभारली गेली तेव्हां, अगदीं शेवटीं, राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांच्या म्हणजे रास बिहारी बाबूंच्या निवडणुकीलाच हरकत घेणारी उपसूचना मांडून युद्धास सुरुवात करावी असें आमच्या पक्षांतील लोकांनीं ठरविलें. ही गोष्ट प्रथम टिळकांना स्वतःला पसंत नव्हती. पण राष्ट्रीय पक्षांतील इतर पुढाऱ्यांच्या सल्ल्यांत ते अधिकाधिक गुरफटले जात होते, व ती उपसूचना स्वतःच्या हौसेनें नसली तरी इतरांखातर त्यांना मांडणें प्राप्त झालें. आणि कोणतीहि गोष्ट एकदां पत्करल्यावर ती पुरी करण्यांत टिळकांचा हात धरणारा कोणीहि नव्हता. कार्याकार्याचा हा लढा राष्ट्रीयसभेच्या तारखेच्या आदल्या रात्रीपर्यंत सुरू होता. प्रसंगोपात्त बोलणें निघे तेव्हां ही गोष्ट करणें ठीक नाहीं असे मी आपल्याकडून म्हणत असे. पण नगाऱ्यापुढें टिमकीइतकीच माझ्या सल्ल्याची त्यावेळीं किंमत होती. त्या रात्रीं कोणालाच झोप नव्हती म्हटलें तरी चालेल. सर्व छावणीभर वादविवादाचा जागता पहारा सुरू होता. टाळमृदंग कोणी खालीं पडूं दिलाच नाहीं.

लोकांना पूर्वी परिचित नसलेले असे दोन स्मरणीय आवाज त्या सर्व दंगलींतून एकसारखे मधून मधून ऐकू येत होते असें मला चांगलें स्मरतें. एक आवाज डॉक्टर बाबासाहेब परांजपे यांचा. त्यांच्या चढ्या आवाजाची आणि आग्रही विधानांची सर कोणालाच करतां आली नाहीं. आणि दुसरा आवाज अच्युतराव कोल्हटकर यांचा. त्यांचा आवाज इतका चढा नव्हता, पण त्यांचा विनोद व हास्य यांचा उत्कटपणाहि तेथें कोणास हार जाण्याइतका नव्हता. सकाळीं उठल्यावर मला टिळक म्हणाले कीं, "उपसूचना मांडण्याचें मी अखेर निश्चित केलें आहे. त्याला तुम्ही सेकंडिंग करून दुजोरा द्याल काय?" तेव्हांहि मी पूर्वीचाच सल्ला दिला. तो टिळकांना तर आवडला नाहींच, पण दूर बसलेल्या कांहीं लोकांची आपापसांत माझ्या उत्तरावर अशी टीका झाली कीं, "केळकरांनीं ही गोष्ट करीत नाहीं म्हणणें हा एक प्रकारें प्रत्यक्ष लष्करी हुकूम तोडण्याचा गुन्हा होय. आणि खुद्द रणांगणावर अशा गुन्ह्याला गोळी घालून देहान्त प्रायश्चित्तहि देत असतात." माझ्या उत्तराचा टिळकांनाहि इतका राग आला कीं, त्या सबंध दिवसांत त्यांनीं माझ्याशीं भाषण करण्याचें वर्ज्य केलें! पण त्यांच्यांत व इतरांत फरक हा होता कीं इतरांनीं मला लष्करी हुकमाच्या अमान्यतेच्या गुन्ह्याबद्दल गोळी घालून मारलें असतें तसें

टिळकांनीं तिरस्कारानें मला कायमचा दूर करून मारलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर राष्ट्रीय सभा मोडल्यानंतर लगेच नव्या राष्ट्रीय पक्षाची सभा व संघटना झाली त्यांत त्यांनीं मला संघटनेंतील एक अधिकाराचें स्थान दिलें. आणि महाराष्ट्राचा व बंगालचा राष्ट्रीय पक्ष मिळून जी सभा झाली तिच्या चिटणीसाचें काम मजकडेच होतें !

सुरतेहून आम्ही पुण्यास आल्यावर अर्थातच राष्ट्रीय सभा मोडण्याचें पाप खरें कोणी केलें या विषयावर चौफेर मोठा कडाक्याचा वाद झाला. आणि सभेच्या अध्यक्षाचे अधिकार काय असतात याच्या तात्त्विक चर्चेची झोड अनेक दिवस उठत होती. "अध्यक्षाच्या निवडणुकीच्या ठरावाला उपसूचना टिळकांनीं मांडणें प्रसंगाला योग्य नव्हतें. तिनें विनाकारण क्षोभ उत्पन्न केला. ते केल्याशिवायहि राष्ट्रीयसभेच्या ठरावांत काय असावें काय नसावें हें आपलें मत मांडण्याला टिळकांना इतर रीतीनें संधि मिळण्यासारखी होती" असें मला वाटत होतें. पण टिळकांनीं जरी ही प्रास्ताविक चूक केली तरी त्यांना ती उपसूचना पुढें आणूंच देऊं नये अशा हेतूनें व्यासपीठावरच्या लोकांनीं जें कारस्थान केलें, व शेवटीं अध्यक्षांनीं चलाखी करून आपली निवडणूक झाली असा बहाणा करून टिळकांची मुस्कटदाबी करण्याचा जो प्रयत्न केला, तो खरोखरच अश्लाघ्य होता. आणि सुरतेच्या मंडपाच्या रणांगणावर उभय सैन्यें युद्धाला सज्ज असली तरी पहिला गोळा अध्यक्षांनीं आपल्या मूर्खपणानें, आणि दुसरा गोळा मुंबईच्या एका मवाळ पारशी सभासदानें खुर्ची उचलून फेकण्यानें टाकला अशी माझी खात्री समक्ष प्रकार पाहूनच झालेली होती. म्हणून या सर्व प्रकारावर मराठ्यांतून मी टीका केली ती अत्यंत समर्पक व ठसठशीत होती ती टिळकांनीं पाहिल्यावर त्यांना फार बरें वाटलें. म्हणजे केसरी व मराठा या दोन पत्रांच्या टीका एकाच धोरणाच्या व सारख्याच नेटाच्या असाव्या हें जें टिळकांचें ध्येय तें पुष्कळ महिन्यांनीं या प्रसंगीं टिळकांच्या अनुभवाला उतरलें.

तथापि माझ्या मनांतील मळमळ जाऊं शकली नाहीं. सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यामुळें उभयपक्षांतील वैर अधिकच तीक्ष्ण झालें आणि शिव्याशापांना ऊत आला. यामुळे मराठ्यांतून व्यक्तिनिंदेची झोड उठविण्याची जरुरी शिल्लकच राहिली. इतर लक्षणेंहि कांहीं ठीक दिसेनात. आमच्या पक्षांतील मंडळी मजकडे पूर्वीहून अधिक डोळे वटारून पाहूं लागली. जानेवारी अखेर मी वडील बंधूंकडे

मालेगांवास गेलों. त्यांचा सल्ला या कामीं घेतला. आणि तारीख २८ जानेवारी रोजीं टिळकांना खालीलप्रमाणें पत्र लिहिलें. "मी काल येथें आलों. पण प्रकृति अजून ठीक नाहीं. माझ्या बंधूंचा विचार स्वतंत्रपणें घेतला. त्यांचेंहि मत माझ्यासारखेंच पडलें; व पूर्वी ता. १२ नोव्हेंबर रोजीं आपणास पत्र लिहिलें त्याला धरूनच हें पत्र आहे असें समजावें. पूर्वी सिंहगडावर तुम्ही मला जो उपदेश केला. तो गेले दोन महिने अनुभवांत आणण्याचा प्रयत्न मी आपणाकडून केला. तथापि तें कांहीं परिस्थितीशीं जुळत नाहीं. माझा स्वभाव किंवा प्रकृतिधर्म जोंपर्यंत बदलूं शकत नाहीं तोंपर्यंत बहुधा हें असेंच चालणार. म्हणजे मी मराठ्याचा संपादक राहिल्यानें धड तुमच्या मनासारखें होऊं शकत नाही व धड माझ्या मनासारखें होऊं शकत नाहीं. मी माझ्या मतांचा आग्रह धरण्यास शोभण्याइतकें कर्तृत्व माझ्या अंगीं नसेल, किंवा माझीं मतेंच मुळीं चुकीचीं असतील. पण इतरहि अनेक विचार आहेत. तुमच्या निकट सान्निध्यांत असणाऱ्या मनुष्यावर तुमच्या पक्षाच्या लोकांचा जितका विश्वास असणें अवश्य आहे तितका त्यांचा मजवर नाही. हें पाहून मला रोज अधिकाधिक वाईट वाटतें. मी तुमचा अगदीं निकटचा मदतनीस असणें या गोष्टीनें तुमच्या कार्याला बळकटी न येतां कमकुवतपणा येतो असें या लोकांना उघड उघड वाटतें. पण उलट मला जें प्रामाणिकपणें वाटतें आणि या लोकांना मी मराठ्यांत जें लिहावें असें वाटतें याचा मेळ कसा घालावयाचा हेंच मला समजत नाहीं. तुमची गोष्ट वेगळी आहे. तुम्हाला तुमची संभाषणें व केसरींत येणारे लेख यांचा मेळ घालतां येतो. तात्पर्य, मराठा-पत्राचें डिक्लेरेशन तुम्ही यापुढें आपल्या स्वतःच्या नांवें करावें हें उत्तम. तसें झाल्यानें बाध न येणाऱ्या अशा पुष्कळ गोष्टी शिल्लक उरतात. झाला तर फरक इतकाच होईल कीं मग माझ्या स्पष्टोक्तीला, म्हणजे स्वतंत्र स्पष्टोक्तीला हल्लीहून थोडा अधिक मान आपल्या पक्षांत मिळेल. कृपा करून असें समजूं नका कीं मी हें वैतागानें किंवा केवळ खिन्नतेमुळें किंवा मुद्दाम होऊन कांहीं तरी वेडे वांकडें करून बसावें म्हणून करीत आहे. कोणी म्हणेल कीं, १९०५ सालीं बनारस काँग्रेसच्या पूर्वी "केसरी-मराठ्याचा कायम नोकर म्हणून मला तुम्ही विमा पॉलिसी करून द्यावी किंवा पॉलिसीच्या हप्त्यापुरता पगार वाढवावा" असें मी सुचविलें होतें, तें तुम्ही तेव्हां नाहीं म्हटलें आणि म्हणून तो राग मनांत ठेवून मी हल्लीं मराठा सोडीत आहे. पण असें कोणी म्हणेल तर तें मुळींच बरोबर नाहीं. तेंच

खरें कारण असतें तर मी यापूर्वीच राजीनामा दिला असता. हल्लीं मी जें योजिलें आहे त्याचें खरें कारण हेंच कीं माझी विवेकबुद्धि आणि मराठापत्राच्या पगारी संपादकाचें कर्तव्य यांचा मेळ मला घालतां येणें अशक्य झालें आहे. मी पुण्यास शुक्रवारीं परत येतों. दरम्यान मराठ्याकरितां पाठविलेला हा अग्रलेख धोंडोपंता-जवळ द्यावा. मी शुक्रवारीं आल्यावर इतर मजकूर पुरा करीन. ''

इतकें झालें तरीहि टिळक माझा राजीनामा स्वीकारीनात. मी त्यांना खरोखरच नकोसा झालों असतों तर त्यांनीं पडत्या फळाची आज्ञा म्हणून माझा राजीनामा स्वीकारून मला मोकळें केले असते व स्वतःहि मोकळें झाले असते. पण मी राजीनामा दिल्यानें आपणाला मोकळेपणापेक्षां अडचणच अधिक होईल असें त्यांना वाटलें असावें. यावेळीं केसरीकडे खाडिलकर व लिमये हे दोघे असिस्टंट होते. तेव्हां त्यापैकीं एखाद्याचें नांव मराठ्यावर घालतां आलें असतें तर त्यांनीं ती गोष्ट केलीहि असती. पण त्यांना हें पक्कें माहीत होतें कीं नुसतें नांव घालण्याला यापैकीं कोणीहि नाकबूल झाला नसता, तरी त्यांपैकीं एकाच्याहि हातून स्वतः मराठ्यांतील मजकूर लिहून मराठा चालविणें हें अशक्य होतें. असो, पण पुढें सुदैवानें इतर कामें निघालीं त्यांत माझ्या राजीनाम्याचें प्रकरण सहजच बाजूला पडलें.

पुण्यास पुणें–जिल्ह्याची परिषद भरविण्याचा बूट निघाला. तसेंच धुळें येथ प्रांतिक परिषद भरविण्याचेंहि घाटूं लागलें. काँग्रेस कंटिन्यूएशन कमिटीचें काम सुरू झालें. त्यामुळें जुन्या काँग्रेसची कन्व्हेन्शन बनवून ज्या प्रांतिक परिषदा इतर प्रांतांतून भरणार त्यांना हरकत आणणें वगैरे उलट्या हल्ल्याचें कामहि निघालें. त्याप्रमाणें अलाहाबाद येथें प्रांतिक परिषद भरणार अशी बातमी आली तेव्हां तिकडे जाऊन खासगी प्रयत्नानें विरोधाचें कोंबडें नाचविण्याचें काम टिळकांनीं मजकडे सांगितलें. त्याप्रमाणें मी अलाहाबादेस जाऊन बरीच खटपट केली. आणि तेजबहादूर सप्रू, मदन मोहन मालवीय यांच्या पक्षाविरुद्ध जे वकील बॅरिस्टर वगैरे कांहीं लोक होते त्यांच्या सह्या मिळवून कन्व्हेन्शनतर्फे भरणाऱ्या अलाहाबाद प्रांतिक परिषदेच्या सभेंत विरोध नमूद करतां येतो कां पहावा अशी खटपट केली. पण ती साधली नाहीं.

या प्रसंगाचा फायदा घेऊन मी अलिगड, लखनौ, मुरादाबाद व लाहोर एथपर्यंत गेलों. लाहोरला सरलादेवी चौधराणी ( पंडित रामभुजदत्त यांच्या

पत्नी ) यांचें मला निमंत्रण होतें. त्यांची सहानुभूति टिळकांकडे होती. लाला-लजपतराय यांनीं नेमस्तांच्या कन्व्हेन्शनवर ( उद्देश पत्रिकेवर ) सही केली होती व ते कन्व्हेन्शनला हजरहि राहिले होते. परंतु दोन्ही पक्षांकडे त्यांचा सारखाच ओढा असल्यामुळें, आणि त्यांचा व माझा पूर्वीचा परिचय असल्या-मुळें, त्यांचाहि पाहुणचार मी घेतला. याच दौऱ्यांत मी कांगडी येथील गुरुकुल पाहिलें. योगायोग असा कीं त्यावेळीं स्वामी श्रद्धानंद हे पूर्वाश्रमीचे लाला मुनशी-राम असून गुरुकुलाचे अध्यक्ष होते. मी गेलों तेव्हांच गुरुकुलाचा वार्षिक समारंभ होता. पंडित लजपतराय हे या समारंभाचे अध्यक्ष होते. आम्हा तिघांची पंगत त्या दिवशीं गुरुकुलांत झाली. लाला लजपतराय यांचें भाषण संध्याकाळीं झालें. तेव्हां गुरुकुलाला मिळालेल्या हजारों रुपयांच्या देणग्यांची तेथें नुसती रास पडलेली पाहून मला आश्चर्य वाटलें. आर्यसमाजी लोकांच्या दानशौर्याची ख्याति पूर्वी ऐकली होती पण प्रत्यक्ष प्रकार पाहिला नव्हता. लाला मुनशीराम हे घासपार्टीचे म्हणजे आर्यसमाजांतील निवृत्तमांसपक्षाचे पुढारी, लाला लजपतराय हे मासपार्टीचे म्हणजे प्रवृत्तमांस पक्षाचे पुढारी या नात्यानें त्यांच्यांत बराच मतभेद होता असें ऐकत होतों म्हणून हे दोघे एकत्र पाहून मला फार बरें वाटलें.

याच दौऱ्यांत डॉ. मनोहरलाल यांच्या निमंत्रणावरून मी अलिगड येथें गेलों. त्याची आठवण दोन प्रकारानें राहिली. एक प्रकार असा कीं अलिगड येथील टाऊन हॉलमध्यें माझें व्याख्यान झालें त्याचा रिपोर्ट वर सरकारकडे फार वाईट गेला. आणि माझ्यावर राजद्रोहाबद्दल खटला होण्याची शिफारस झाली ! पण मी तेथें दोन दिवसांचा पाहुणा होतों, कांहीं चळवळ करण्याकरितां कायमचा गेलों नव्हतों, म्हणून ही शिफारस अमलांत आली नाहीं, असें पुणें येथील 'डेक्कन हेरल्ड' नांवाच्या पत्रांत मी वाचलें तेव्हां एक आगंतुक संकट टळल्यासारखें वाटलें. कारण त्या सुमारास राजद्रोहांच्या खटाल्यांची प्रस्तावना झाली होती, व हा खटला मजवर झाला असता तर सहज वर्ष दीड वर्षांची शिक्षा भोगावी लागली असती.

अलिगडची आठवण राहण्याचा दुसरा प्रकार असा. तेथील किल्ला मी हिंडून पाहिला. तो पुण्याच्या शनवारवाड्यासारखा वाटला. गंगा-यमुना यांच्या दरम्यान मराठ्यांनीं पुष्कळ वर्षें आपलीं लष्करीं ठाणीं वसविलीं होतीं त्यावेळीं

त्यांनींच हा किल्ला बांधला असें म्हणतात. उत्तर हिंदुस्थानांत दिल्ली, पानपत व अलिगड हीं शहरें मी पाहिलीं तेव्हां तीन निरनिराळ्या प्रकारच्या भावना मनांत आल्या. दिल्लीस मराठ्यांचें स्मरणचिन्ह असतें तर तें भूषणभूत वाटावें अशी मराठ्यांची स्थिति महादजी शिंद्याच्या वेळीं दिल्लीस होती. पानपतचें मैदान पाहिलें म्हणजे पराभवाच्या दुःखाचीच एकजात भावना मनांत येते. पण अलिगडास हें विशेष वाटलें कीं दुआबांतील मराठ्यांचे पराक्रम मोठे होते व त्याचें एक दृश्य स्मरणचिन्ह अलिगडच्या या किल्ल्यांत पाहवयास मिळें. दुर्दैवानें दिल्लींत असें स्थान उरलेलें नाहीं. अलिगडच्या या आठवणीचा उल्लेख मी कांहीं वर्षामागें 'रत्नाकरां'त 'बुरुजांत पुरलेले देव' या नांवाची एक गोष्ट लिहिली तींत आलेला आहे.

असो. अलाहाबाद प्रांतांकडे हा दौरा करण्यास मला टिळकांनीं सांगितलें ते त्यावेळीं जसें त्यांना तसेंच मलाहि सोईचे होते. त्या दौऱ्यानंतर धुळें येथील प्रांतिक परिषद झाली, यामुळें त्या उद्योगांत माझ्या राजीनाम्याची आठवण टिळकांना झाली नाहींच पण मलाहि झाली नाहीं. शिवाय एप्रिलांत बंगल्यांतील गोलँडो येथील घाटावर क्रांतिकारकांनीं आपला पहिला बार उडविला व हे प्रकार आतां चोहोकडे असेच होणार अशी चिन्हें दिसूं लागलीं. नेमस्त व जहाल पक्षांतील शाब्दिक वादापेक्षां या नवीन प्रकारांनीं उद्भूत झालेल्या भावना व त्यांतून पुढें निर्माण होणारीं संकटें यांचीं कृष्णच्छाया पडून दोन्ही पक्षाचीं मनें बरींच व्यग्र झालीं होतीं. यामुळें शाब्दिक वादाच्या त्रासांतून आपण सुटलों, व व्यक्ति सोडल्या असतां सरकारविरुद्धच जेवढें लिहावयाचें त्यांत मी कांहीं कमी पडणार नव्हतों हे टिळकांना व मला सारखेंच माहीत होते. शिवाय संकटाचें दर्शन दुरून होत असतां मराठा वर्तमानपत्र सोडून जाणें हें सहजच वाईट दिसण्यासारखें असून मनाला न पटण्यासारखेंहि होते. या अनेक कारणांनीं मी टिळकांना नोव्हेंबरपासून राजीनामा देण्याच्या गोष्टी बोलूं लागलों होतों त्या पुढील एप्रिल पासून बंद पडल्या आणि त्या सालच्या उन्हाळ्याच्या अखेर प्रथम शिवरामपंत परांजपे यांच्यावर व नंतर खुद्द टिळकांवर खटले झाले तेव्हां तर त्या गोष्टी अजीबातच मागें पडल्या.

खटले सुरू झाल्यापासून केसरींतील व्यक्तिविषयक निंदा थोडी कमी झाली. यामुळें मराठ्यांत तितकीच कठोर निंदा आली आहे कीं नाहीं हें पाहण्याचें फारसें

कारण राहिलें नाहीं. किंबहुना खटले सुरू झाल्यापासून वर्तमानपत्रें कशी तरी भरून काढावयाचीं, व मुख्य लक्ष आम्ही संपादकांनीहि खटल्याच्या कामाकडे द्यावयाचें, असा प्रकार सुरू झाला. आणि भिन्न मताचे लोकहि सर्वस्वी एकजुटीनें वागूं लागले. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली तेव्हां दुसरें तिसरें दिवशीं केसरीचें डिक्लेरेशन करण्याचा प्रश्न निघाला. तेव्हां केसरींत लिहिणारे मुख्य उपसंपादक खाडिलकर यांनींच तें करावें ही गोष्ट ओघानेंच प्राप्त झाली. मी खाडिलकरांच्या आधीं संस्थेला येऊन मिळालेला वरिष्ठ मानाचा आणि म्हणून केसरीचा संपादक मी व्हावें ही गोष्ट कायदेशीर हक्काची होती. आणि पुढें ती तशा स्वरूपानें वादाला निघालीहि. पण या संकटाच्या वेळीं तसली गोष्ट काढणें योग्य नव्हतें. आणि टिळक जाग्यावर नसले म्हणजे मग केसरींत खाडिलकर जें लिहितील तें तसेंच मी मराठ्यांत लिहावें अशी अपेक्षा कोण करणार व आग्रह कोण धरणार? मी थोडा वडील असलों तरी किमानपक्ष आम्ही दोघे सारख्या दर्जाचे होतो. यामुळें गुरुशिष्यसंबंध उरला नाहीं. केवळ गुरुबंधुत्वाचेंच नातें उरलें. यामुळें केसरींत लिहिली तरी खाडिलकरांचीं मतें चूक आहेत व मराठ्यांत मी लिहिलीं तरी माझींच मतें बरोबर आहेत असें मला म्हणतां येण्यासारखें होतें. असो; अशा रीतीनें खाडिलकर केसरीचे संपादक बनले. पण लगेच अशी स्थिति उत्पन्न झाली कीं खाडिलकरांची लेखणी व्यक्तिनिंदेच्या कामीं पुन्हा भडकली. वादग्रस्त प्रश्नांविषयीं त्यांचें माझें धोरणहि जमेना. तेव्हां असें वाटूं लागलें कीं कोणी एकानेंच दोन्ही पत्रांचा संपादक व्हावें हाच खरा मार्ग योग्य होय. पण खाडिलकरांना मराठा ध्यावयाचा नव्हता व केसरी सोडावयाचा नव्हता. दोन्हीं पत्रें हातीं घेण्याची त्यांची इच्छा किंवा धमक नव्हती. मजमध्यें ह्या दोन्ही गोष्टी होत्या. पण खरी अडचण अशी होती कीं, खाडिलकरांनीं केसरी सोडावा व मला द्यावा हें त्यांना सुचवावयाचें कोणी? आणि मी त्यांना सुचविलें तरी ते नाहीं म्हणाल्यास माझा आग्रह सिद्धीला जाणार कसा? अशा विवंचनेंत मी पडलों. बाहेरगांवीं जावें तों लोक केसरींतील ग्राम्यपणाचा निषेध मजजवळ करीत, व आतां तरी शिमगा थांबवा असें म्हणत. पण त्यांच्या शिमग्याला जसा कांहीं अधिकमासच आला होता. गोखले पूर्वी फक्त स्वराज्यविरोधी होते ते आतां "टिळकांना कैदेंत घालणारे आगलावे" अशी कांहीं लोकांनीं आपली समजूत

करून घेतली व पुढच्या गणपति-उत्सवांतून ग्राम्य पदांचा कहर झाला. इतकेंच नव्हें तर पुढें नाशिकच्या कटाच्या खटल्यांत गुंतलेल्या लोकांपैकीं एका गृहस्थानें प्रत्यक्ष पिस्तुलें घेऊन गोखले यांचा आगगाडींत खंडाळ्या घाटांत खून करण्याचा प्रयत्नहि केला. अशा गोष्टींना मनांत ठेऊन मी मराठ्यांत लिहीत असें तें केसरी-च्या धोरणाला सोडून होतें तरी असें का लिहितां म्हणून विचारणारा कोणीच उरला नव्हता. पण या दिवसांत मजवर खरा कठिण प्रसंग येई तो संपादकाच्या टेबलाशीं बसण्याचा नव्हे, तर आपल्या पक्षाची चार मंडळी बसून कार्याकार्याची चिकित्सा होई, कार्यक्रम आंखले जात, अशा वेळीं. किंवा जाहीरसभांतून किंवा उत्सवासारख्या मजलशींतून ! पण सुदैवानें अशी एक गोष्ट घडली कीं तिजमुळें मला मनांतून जें हवें होतें तें अव्वल दर्जाचें नसलें तरी दुय्यम दर्जाचें पण साधलें. केसरी व मराठा हीं दोन्हीं पत्रें माझ्या हाती यावीं हें सर्वांत उत्तम. पण तसें न घडलें तरी निदान दोन्हीं पत्रें खाडिलकरांच्या नांवावर जावीं, व माझ्या नांवावर एकहि पत्र राहूं नये, हें त्या खालोखालचें उत्तम असें मी मनानें ठरविलें होतें आणि ही दुसरी गोष्ट मात्र साधली. तिचा प्रकार असा.

टिळकांना शिक्षा झाल्याबरोबर टिळकांच्या खटल्याचें पुस्तक काढण्याचें काम मजकडे आलें. त्यांत माझे दोन अडीच महिने गेले. इतक्यांत हायकोर्टाची बदनामी केल्याचा खटला मराठ्याचा संपादक म्हणून मजवर भरण्याची तयारी झाली. आणि खरोखरच योग असा कीं, टिळक-केसच्या या पुस्तकाचें अगदीं शेवटचें प्रुफ तपासून देऊन इंदुप्रकाश छापखान्याची शेवटची पायरी मी उतरलों तोंच वरील खटल्यांतील आरोपी म्हणून मजवर नोटिस बजावण्यांत आली. पुढें हा खटला चालून मला शिक्षा झाली त्याची हकीकत टिळक-चरित्राच्या दुसऱ्या खंडांत मी थोडीशी दिलीच आहे, व त्यासंबंधी आणखी कांहीं सांगावयाचें आहे तें मी या पुस्तकांत अन्य ठिकाणीं सांगितलेंहि आहे. पण प्रस्तुत ठिकाणीं सांगण्याची गोष्ट इतकीच कीं मजवरील खटल्याच्या शेवटच्या दिवशीं मी आपल्या मनांत एक कारस्थान जमवून डाव टाकला आणि तो बरोबर बसला !

माझ्या खटल्याचा निकाल न्यायाधीश आतां सांगणार तोंच मी खाडिलकरांना जवळ बोलावून घेऊन सांगितलें कीं, " मला कैदेची शिक्षा न झाली तर ठीकच; पण झालीच तर तुम्ही मराठ्याचे संपादक म्हणून डिक्लेरेशन करा." तेव्हां " शिक्षा

झाल्यावर मग पाहूं. आणि थोडीच शिक्षा झाली तर डिक्लेरेशन न बदलतांहि भागवूं" असें बोलणें खाडिलकर यांनीं काढलें. पण "संपादक तुरुंगांत असतां त्याच्या नांवें वर्तमानपत्र चालूं राहणें हा गुन्हा होईल; तरी तसें न करतां शिक्षा कितीहि झाली तरी तुम्ही मराठ्याचें डिक्लेरेशन कराच" असा आग्रह मी धरला. आणि "मी तुरुंगांत असतां माझ्या नांवावर मराठा चालणें हा गुन्हा होत असला किंवा नसला तरी, या मुदतींत भलत्यानें भलतें कांहीं तरी मराठ्यांत लिहिलें तर त्याची जबाबदारी तरी कायद्यानें मजवरच राहणार" असा युक्तिवाद मी केला, तेव्हां खाडिलकरांना नाहीं म्हणवेना. पुढें मला ऐनजिनसी चौदाच दिवसांची कैदेची शिक्षा हायकोर्टानें दिली तरी, ती मुदत भरल्यावर मी माफी मागणार, ती माफी कोर्टाला पसंत पडणार, व मग ती स्वीकारून कोर्ट माझी मुक्तता करणार, ही गोष्ट थोड्या कालावधीची होण्याचा संभव. म्हणून आमचें ठरल्याप्रमाणें मला शिक्षा झाल्यानंतरं खाडिलकरानीं मराठ्याचें डिक्लेरेशन केलें व त्यांच्या नांवानें मराठा निघूं लागला!

चौदा दिवसांच्या शिक्षेच्या अखेरीस मजकडून सॉलिसिटरनीं लिहून नेलेली माफी कोर्टानें स्वीकारली व मला सोडून दिलें. परत आल्यावर दोन आठवडे मराठ्यासंबंधानें कोणी कांहींच बोललें नाहीं. पण मग खाडिलकर यांनीं त्यांचे स्नेही वासुदेवराव जोशी यांच्या मार्फत हळूच गोष्ट काढली, व सुचविलें कीं पूर्वीप्रमाणें डिक्लेरेशन करून मी मराठा हातीं घ्यावा. या तगाद्याचें कारण माझ्या एकाद्या हक्काचा अपहार होत आहे ही सात्विक बुद्धि नव्हे. तर खरें कारण असें. मराठ्याचे संपादक झाल्यानें खाडिलकरांना असें संकट येऊन बसलें कीं, रस्त्याच्या उतारावर जसा कांहीं एखादा भरलेला गाडा अंगावर घसरत यावा. इंग्रजी मजकूर लिहिणें ही गोष्ट त्यांनीं पूर्वी जन्मांत कधीं केली नव्हती. आणि पुढेंहि ती कधीं करण्याची हौस किंवा उमेद त्यांना नव्हती! कोणाकडून कांहीं तरी लिहवून घ्यावें; मुंबईचा कोणी स्नेही कांहीं लिहून पाठवील तोच मजकूर दडपून द्यावा.

ओढघस्तीच्या अशा स्थितींत त्यांनीं महिना सव्वामहिना मराठा कसा तरी चालविला होता. आणि मी मराठा परत न घेणें ही गोष्ट थोडीशी सहेतुक आहे असें जेव्हां त्यांना दिसून आलें तेव्हां तर तें त्यांना फारच जड वाटलें. पण करतात काय! केसरीचें संपादकत्व त्यांना सोडावयास लावणें हें माझ्या हातचें नव्हतें. पण

मी फिरून मराठा हातीं न घेणें ही गोष्ट तरी माझ्या हातची होतीच कीं नाहीं ? तिला ते काय करणार ! त्यांनीं व त्यांच्या गटांतील मित्रांनीं मला परोपरीनें सांगून पाहिलें. आणि माझें मन वळविण्याचा मार्ग सुलभ व्हावा म्हणून, भाऊ भाऊ वांटण्या करतात त्याप्रमाणें, त्यांनीं मला आपण होऊन असें सांगितलें कीं, "ऑफिसाबाहेरचें राजकारण तुम्ही करा; तो वडीलकीचा मान मी तुम्हाला देतों; व फक्त केसरी लिहिण्याचें काम मी माझ्या हातीं ठेवतों." पण प्रसंगाचा फायदा घेऊन मी म्हणालों, "मी मराठ्यांत एक लिहावें, तुम्ही केसरींत दुसरें लिहावें हें कसें चालेल ! लोकांना ते कसें आवडेल ! आणि या दोन पत्रांतला बेबनाव आम्हापेक्षां आमच्या पक्षांतील लोकांनाच अधिक दुःसह होतो ! यामुळें तर पूर्वी, टिळक जाग्यावर असतां, एकदां सोडून दोनदां मराठ्याचा राजीनामा मी त्यांच्या हातीं दिला हें तुम्हाला माहीत नाहीं काय ? अर्थात् मला नुसतें बाहेरचें राजकारण सोंपवून दिल्यानें भागणार नाहीं. तो वडीलकीचा मान मला खराच द्यावयाचा असेल तर माझ्या बाहेरच्या धोरणाशीं जुळेल असेच मी मराठ्यांत लिहीत जाईन. आणि वर्तमानपत्रांतील दुःसह बेबनाव टळावा म्हणून मराठ्यांत मी लिहीन त्या धोरणानेंच तुम्ही केसरींत लिहीत गेलें पाहिजे ! ही गोष्ट तुम्हाला मान्य आहे काय ! पूर्वी टिळक जातीनेंच होते तेव्हां केसरीच्या घोड्यामागून मराठ्याच्या गाड्यानें चालावें अशी स्थिती होती तें योग्यच होतें. टिळक हे तुमचे माझे गुरु होते, पण तुम्ही आम्ही गुरुबंधु आहोत. म्हणून मला वडीलकीचा मान तुम्ही खराच देणार असाल तर आतां टिळक येईपर्यंत मराठ्याच्या गाड्यामागून केसरीच्या घोड्यानें चालले पाहिजे हें ओघानें प्राप्त होतें. तें तुम्हाला कबूल असेल तर होय म्हणा. मी मराठा पुनः हातीं घेतों."

खाडिलकरांना मराठापत्राची गोणी इतकी जड वाटत होती कीं, माझ्या वरील प्रश्नालाहि त्यांनीं होय असें उत्तर दिलें ! पण या बाबतींत ते स्वतःचे धनी नव्हते. त्यांना दुसरे दोन धनी होते. एक त्यांचा स्वभाव व दुसरे त्यांच्या कंपूंतील लोक. शिवाय लवकरच अनुभवाहि पदोपदीं असा येऊं लागला कीं, मी बाहेरगांवीं जाऊन कांहीं एक धोरणानें कांहीं करावें बोलावें तों इकडे खाडिलकर यांनीं केसरींत असें कांहीं लिहून ठेवावें कीं माझें तोंड नेमकें फुटावें! तात्पर्य, या स्वाभाविक अडचणी जसजशा अधिकाधिक दिसून येऊं लागल्या तसतसा मराठ्याचें डिक्लेरेशन न करण्याचा माझा आग्रह अधिकाधिक सयुक्तिक ठरूं लागला. पण मग माझ्या

मागचा तगादा सुटण्याकरितां, व इंग्रजी मजकूर लिहिण्याविषयीं खाडिलकरांची 'सत्वपरीक्षा' न व्हावी म्हणून, मी त्यांना हळूच सुचविलें कीं, "हवी तर मी एक गोष्ट करण्याला तयार आहे. ती अशी कीं, मी मराठ्याचा संपादक म्हणून डिक्लेरेशन न केलें तरी यापुढें मराठ्यांतील सर्व मजकूर पूर्वीप्रमाणें माझा मी लिहीत जाईन. त्याची तोशीस तुम्हाला लागूं देणार नाहीं. पण घेईन तेव्हां केसरी व मराठा हीं दोन्हीं एकदम हातीं घेईन, व तें घडत नाहीं तोंपर्यंत नुसत्या मराठ्याचें मात्र डिक्लेरेशन मी करणार नाहीं!" तेव्हां शेवटीं निरुपायानें पण बरेचसे निष्काळजी होऊन खाडिलकरांनीं ती गोष्ट मान्य केली.

अशा रीतीनें हा वाद त्या वेळेपुरता मिटला, व मराठा हातीं घेण्याबद्दलचा माझ्या मागचा तगादा वांचला खरा. पण इतर रीतीनें ही स्थिति मला समाधान वाटण्यासारखी नव्हती. कां कीं, दोहोंकडून सारखाच पेंच होता. टिळक तुरुंगांत गेले असतां त्यांच्या पश्चात् आपलें व खाडिलकरांचें बनत नाहीं म्हणून संस्था सोडून जाणें मनाला कसेसेंच वाटे. टिळक जाग्यावर असतां सोडून जाणें ही गोष्ट वेगळी होती. आणि कोणी जर असें म्हटलें असतें कीं, टिळकांनींच यांना जा म्हटलें तर मजजवळ तें खोडून काढण्यासारखा भक्कम लेखी पुरावा होता. म्हणून मी संस्था सोडली ती केवळ स्वाभिमानबुद्धीनें सोडली असें ठरलें असतें, व त्यांत मला फारसें दूषण आलें नसतें. असली संस्था सोडून बाहेर पडल्यावर माझें पुढें काय झालें असतें हा प्रश्न वेगळा. पण मतें जुळत नाहींत म्हणून टिळकांच्या समक्ष आपण होऊन सोडून गेल्यास नालायकीचा छाप डोक्यावर पडण्याची तरी भीति नव्हती. उलट टिळक तुरुंगांत गेले असतां संस्था सोडणें हें लोकांच्या दृष्टीनें मला खचित कमीपणाचें झालें असतें.

इतक्यांत एक संधि अशी आली कीं असला कमीपणा पदरीं न घेतां संस्था सोडून जातां येईल. ती संधि अशी कीं, मुंबईस टिळकांच्या खटल्यापूर्वी काढण्याचें योजिलेलें व टिळकांना शिक्षा होतांच सुरू झालेलें आमच्या पक्षाचें दैनिक पत्र 'राष्ट्रमत' हें त्याच्या चालकांच्या भांडणामुळें डबघाईस आलें होतें. हे चालक म्हणजे सिताराम केशव दामले, गणेश बळवंत मोडक व सरदेसाई. यांपैकीं पहिला भोळा सांब व दुसरे दोघे कूट कारस्थानें करणारे. यामुळें वर्तमानपत्राच्या कचेरींत मासलेवाईक चमत्कार रोज घडत. बिचाऱ्या दामल्यांनीं हीं कारस्थानें झेपत नाहींत म्हणून आपण होऊन अंग काढून घेतलें! पण वर्तमानपत्राच्या कंपनीच्या

डायरेक्टरांना तें यां इतर दोघांच्या हातीं देण्याची इच्छा नव्हती. यामुळें चिंतामणराव वैद्यप्रभृति डायरेक्टरांनीं मला मुंबईस बोलावून नेलें, व "हें टिळकांचेंच पत्र आहे तरी तुम्ही तें चालवा" अशी मला गळ घातली. पुण्यांतील असमाधानकारक स्थिति, आणि स्वतंत्र दैनिकपत्र हातीं असल्यास आपलीं मतें लोकांपुढें मांडण्याविषयीं होणारी सहज सोय, यांचा विचार मनांत येऊन मी होय म्हटलें. आणि फक्त पुण्यास येऊन धोंडोपंत विद्वांस यांची संमति घेऊन दोन दिवसांनीं मुंबईस जावें व राष्ट्रमत हातीं घ्यावें असें मी योजिलें. मौज ही कीं, पुण्यास येऊन खाडिलकर यांना विचारतां त्यांनीं रुकार दिला!!

पण धोंडोपंतापाशीं ही गोष्ट काढतांच त्यांनीं त्रागा आरंभिला. ते मला म्हणाले, "मी आज येथें फक्त तुमच्या आधारावर उभा आहे असें समजा. कारण एक दोन हितशत्रूंनीं, टिळकांचे चिरंजीव हातीं धरून, त्यांच्यामार्फत खरीं खोटीं गाऱ्हाणीं टिळकांच्या कुटुंबापर्यंत नेऊन घरांत सर्वांचीं मनें मजविषयीं कलुषित करण्याचा घाट घातला आहे. नानासाहेब देशमुख हे विचारी गृहस्थ. परंतु त्यांच्याहि डोक्यांत कांहीं गैरसमजुतीच्या गोष्टी या लोकांनीं भरवून दिल्या आहेत. बरें, इकडे केसरी-मराठ्याच्या कचेरींत पाहवें तर खाडिलकरांच्या स्वभावाशीं माझें एक दिवसहि पटावयाचें नाहीं. त्यांचा तापटपणा, अपमानास्पद टाकून बोलण्याची पद्धति, सोय-गैरसोय न पाहण्याची प्रवृत्ति, या सर्व गोष्टी मी कशातरी सोसून दिवस काढीत आहे. तुम्ही येथें आहां म्हणून जिवाची गोष्ट बोलण्याला थोडी जागा तरी आहे. चित्रशाळेंतून घरचा व केसरीचा कारभार काढून घेऊन तो मी घरीं आणला तो बळवंतरावांच्या मनांत नसतांना आणला, अशा समजुतीनें वासुदेवराव जोशांसारख्या तिऱ्हाइत मित्राचा राग मजवर आधींच झाला आहे. दर महिन्यास बळवंतरावांना पत्र लिहावयाचें काम व्यवस्थित झाले पाहिजे. खाडिलकरांच्या हातून ती गोष्ट मला हवी तशी सोईनें करून घेतां येणार नाहीं. म्हणून काय वाटेल तें झालें तरी मी तुम्हाला येथून जाऊं देणार नाहीं. हवें तर मराठ्याचे संपादक व्हा अगर होऊं नका. वाटेल तें लिहा अगर लिहूं नका. तुम्ही कचेरींत येऊन बसत जा, व तुमचा पगार पूर्वीप्रमाणें पोचविण्याची जबाबदारी मजकडे लागली. या विषयीं उद्यां टिळक परत आल्यावर कांहीं म्हणाले तर त्याचा जाब मी त्यांना देईन. शिवाय मुंबईस तुम्ही गेलां तर आगींतून निघून फोपाट्यांत पडल्यासारखें तुम्हाला होईल. तेथील कारस्थानी लोक तुमच्याशीं जरा बिनसलें कीं दामल्यां-

प्रमाणें तुम्हाला त्रास देऊं लागतील. तुमच्या सारख्या सरळ स्वभावाच्या मनुष्याचें तेथें राष्ट्रमतांत काम नाहीं. आणि सर्व गोष्टींतली गोष्ट अशी कीं, तुम्ही टिळकांना पत्र लिहून केसरी संस्था सोडून जाण्याला परवानगी त्यांची घेतली नाहीं."

हा सर्व युक्तिवाद मला बिनतोड वाटला. धोंडोपंतांना विचारल्याशिवाय मी मुंबईस जाऊन राष्ट्रमत हातीं घेण्याचें कबूल केलें ही खरोखरच माझी चूक झाली, असें वाटून "मी येऊं शकत नाहीं" असे तिकडे मुंबईच्या लोकांस कळविलें. पण पुण्यास पडलेल्या बिकट खोड्यांतून पाय काढण्याची ही एक संधि अशी गेली हे पाहून, मी हा खोडा जागच्या जागींच कसा उकलावा याचा अधिक काळजीनें विचार करूं लागलों. आणि "टिळकांना पत्र लिहून विचारल्याशिवाय जाणें बरें नव्हे" असें जें धोंडोपंतांनीं म्हटलें त्यांतूनच मला दुसरी एक कल्पना सुचली. टिळकांची शिक्षा वर्ष सहा महिन्याची असती तर गोष्ट वेगळी. तेव्हां अशा कुचंबणेच्या स्थितींत पांच वर्षें काढण्यापेक्षां, टिळकांनाच पत्र लिहून येथें पायांत पडलेला खोडा तरी काढावा, व तें न होईल तर मग मला संस्था सोडून जाण्याला सरळ मनानें परवानगी द्या असें लिहावें असें मी ठरविलें. धोंडोपंतांची या गोष्टीला संमति मिळाली. तेव्हां ते पुढच्या खेपेस ब्रह्मदेशांत जाऊन टिळकांना भेटणार त्यावेळीं मी एक खाजगी पत्र टिळकांना द्यावें, व इतर खुलासेवार मजकूर तशी संधि मिळाल्यास धोंडोपंतांनीं तोंडी सांगावा, अशी योजना करून ते निघाले तेव्हां त्यांचेजवळ मी पत्र दिलें. "हा वाद मी पुण्याहून इतका लांब तुरुंगांत येऊन पडलों तरी मला सोडीत नाही" या विचारानें टिळकांना थोडें वाईट वाटेल हें मी जाणून होतों. तसेंच खाडिलकर यांचें केसरींचें डिक्लेरेशन असतां त्यांना तें सोडून द्या म्हणून सांगणें टिळकांना फार अवघड वाटेल हेंहि मी जाणून होतों. म्हणून मी माझ्या पत्राचा झोक असा ठेवला कीं, खाडिलकरांनीं केसरी सोडण्याहून दुसराहि एक मार्ग अडचणींतून निघूं शकेल व तो असा—(१) खाडिलकरांनीं केसरी सोडल्यास तो हातीं घेऊन चालविण्याची माझी इच्छा आहे व उमेद आहे. केसरीच्या नोकरींत वडीलपणाचा मान मजकडे आहे. १८९७ साली ते व मी दोघेहि उपसंपादक असतां, व मजपेक्षां खाडिलकरच केसरींत अधिक लिहीत असतां, दोन्हीं पत्रांचें डिक्लेरेशन माझ्याच नांवानें सर्वानुमतें करण्यांत आलें होतें. व त्या योजनेला तुम्हीहि मान्यता दिलीत. आतां आज फिरून तोच प्रसंग आला आहे, व मी दोन्हीं पत्रें हातीं घेण्याची मागणी करीत आहे. तर ती मला कां न

मिळावी ! ( २ ) हे नको असेल तर मी नुसत्या मराठ्याचें डिक्लेरेशन करण्याला तयार आहे. पण मराठ्यानें केसरीचा अनुयायी म्हणून राहण्याची गोष्ट मला पसंत नसल्यानें, मी पूर्वी दोन वेळां राजीनामा देण्यास निघालों हें तुम्हास माहीतच आहे. शिवाय तुम्ही आतां येथें नाहीं. म्हणून मी पूर्वी मागत होतों ती मोकळीक तुम्ही मला स्पष्ट शब्दांनीं द्यावी. तुम्ही मला असें लिहावें कीं "केसरीच्या अनुयायित्वाचें बंधन मी तुमचेवर आतां ठेवीत नाहीं. तुमच्या विवेकशक्तीवर तुमचा विश्वास आहे म्हणून, मराठ्यांत काय लिहावें काय न लिहावें याविषयीं निर्णय करण्याची मोकळीक मी तुम्हाला देतों." आणि तुम्ही मला असें लिहिलें म्हणजे मग 'केसरींत असें कां व मराठ्यांत असें कां' असें म्हणणारांना मी परस्पर पाहून घेईन. ( ३ ) पण ही गोष्ट देखील तुम्हास मान्य नसल्यास फिरून अशी तोड सुचवितों कीं मी कोणत्याच वर्तमानपत्राचा संपादक म्हणून रहाणार नाहीं. दोघांचेहि संपादक खाडिलकरांनीं रहावें. मग मला मनाला पटेल तें हवें तितकें मी दोन्ही पत्रांत लिहीन आणि जबाबदार संपादक म्हणून खाडिलकर यांनीं काय वाटेल तें लिहावें. असें झालें असतां खाडिलकर व मी दोघेहि संस्थेंत राहूं. आणि दोन्हीं पत्रांत जी एकतानता असावी असा तुमचा स्वाभाविक आग्रह तोहि साधेल. पण संस्थेंत तर रहाच, मराठ्याचे संपादक तर व्हाच, आणि केसरींत खाडिलकर लिहितील तसेंच मराठ्यांत लिहा, असा तिंहरी आग्रह तुम्ही म्हणाल तर मात्र मला स्वच्छ नकार द्यावा लागेल."

सन १९०९ च्या मे महिन्यापासून मंडाले येथें टिळकांना दर महिन्यास इकडून पत्रें जात, त्यांत ही गोष्ट मी थोडथोडी सुचवीतच असें. पण धोंडोपंतांजवळ दिलेल्या पत्रांत सर्व खुलासा स्पष्टच केला होता. माझें पत्र वाचून व धोंडोपंतांकडून तोंडी हकीकत ऐकून टिळक बरेच बुचकळ्यांत पडले; व शेवटीं त्यांनीं स्वदस्तुरचें एक खासगी पत्र लिहून मला देण्याकरितां धोंडोपंताजवळ दिलें. त्यांत मला हवी तशी कबुली जरी टिळकांनीं स्पष्ट शब्दांत दिली नव्हती, तरी निदान मला जी पडत्या फळाची आज्ञा हवी होती तेवढी मिळाली, व तिच्या आधारावर मी आपलें कार्य करून घेतलें.

टिळकांचें पत्र ता. २१ ऑगस्ट १९०९ चें असून त्यांत खालील आशय आहे:—"धोंडोपंतांच्या मागच्या पत्रांत वर्तमानपत्रासंबंधानें मला कांहीं प्रश्न तुम्ही विचारले आहेत ते वाचून मला फार आश्चर्य वाटलें. कोणत्याहि वर्तमानपत्राच्या

धोरणांत सुसंगतता किंवा अखंडपणा रहाणें ही मुख्य गोष्ट असते. तिच्यावरच मुख्य लक्ष द्यावें लागतें आणि एखाद्या वर्तमानपत्राचा संपादक कांहीं काळ आपल्या जागेवरून दूर असला तर ही गोष्ट विशेषेंकरून संभाळावी लागते. ती संभाळावयाची तर आपल्या वर्तमानपत्रासंबंधानें खालील गोष्टी होणें अवश्य दिसते. (१) केसरींतील बराचसा मजकूर खाडिलकर यांनीं लिहावा. ते आज पुष्कळ वर्षे त्या पत्राकरितां लेख लिहीत आले आहेत म्हणून त्यांचा केसरीशीं त्यांतल्या त्यांत अधिक निकट संबंध सहजच येतो. (२) त्याच कारणाकरितां मराठ्यांतील पुष्कळसा मजकूर तुम्हीच लिहिला पाहिजे. एरवीं मराठ्याचें धोरण सुसंगत रहाणार नाहीं. (३) दोन्हीं वर्तमानपत्रें शब्दशः किंवा तंतोतंत एकच विचाराची न दिसली तरी चालतील. परंतु समांतर रीतीनें कां होईना, त्यांची गति एकाच दिशेकडे असली पाहिजे. या तिन्ही गोष्टी साधणें यांतच आपल्या संस्थेचें आज हित आहे.

"आतां मला हें समजतें कीं जर या दोन पत्रांत लिहिणाऱ्या दोन निरनिराळ्या व्यक्ति आहेत तर या सर्व गोष्टी साधणें किंचित् अवघड होईल. पण यंत्रशास्त्राच्या दृष्टीनें यांत असंबद्धता कांहीं नाहीं. यंत्रशाळेंत ताजवे असेच करितात कीं त्यांनीं सूक्ष्म फरक तर दाखवावेच, पण स्वतःचा काटा कायमचा ढळू देऊ नये व नित्य कर्तव्यापासून भ्रष्ट होऊं नये. या गोष्टी आपण आजवर करीतच आलों नाहीं काय? एकत्र नीट नांदलों नाहीं काय? मग आतांच अडचण कां भासावी हें कळत नाहीं. पाश्चात्य राजकारणांत कॉन्झर्वेटिव्ह व लिबरल हे आपापल्या पक्षाचीं धोरणें काय वाटेल तें करून अखंड अभंग ठेवतातच की नाहीं? मग आपणहि तोच नियम कां अनुसरूं नये? असो; या मुद्यावर मी येथून कितीसा युक्तिवाद करणार? पण तुम्ही समंजस आहां. संस्थेवर तुमचें प्रेम आहे. म्हणून तुम्हापुढें या गोष्टी मी विनंतिरूप आग्रहानें मांडतों. आणि मी ज्या अर्थी पुण्यास नाहीं त्या अर्थी तुम्ही माझी विनंति अधिक मानाल याविषयीं मला खात्री वाटते. तुम्हाला डिक्लेरेशनच पाहिजे असेल तर तें एका किंवा दोन्हीं पत्रांचें वाटल्यास करा. फक्त वर लिहिलेल्या तीन गोष्टी संभाळल्या गेल्या म्हणजे झाले. कोणच्या वर्तमानपत्राचा संपादक कोण आहे हा मुख्य प्रश्न नसून वर्तमानपत्रें पूर्वीच्याच धोरणानें चांगलीं चाललीं आहेत कीं नाहीं इतकाच प्रश्न आहे. ती गोष्ट साधली म्हणजे मग बाकी तुम्हाला आपआपसांत वाटेल तें वाटेल तसें करा. तुम्ही कराल ती योजना मला मान्य आहे.

"पण तुम्ही आम्हाला व आमच्या संस्थेला सोडून जाऊं नये. याविषयीं तुम्हाला ईश्वराचीच शपथ आहे! तुम्ही सोडून जाणें याहून अधिक दुःखद गोष्ट मला दुसरी वाटत नाहीं. मी झालों तरी असाच कांहीं तुरुंगांत कुजून मरत नाहीं. केव्हां तरी बाहेर येईनच. आणि मी फिरून तुम्हा मंडळींत येऊन मिसळलों म्हणजे सर्व कांहीं पूर्वीप्रमाणें ठीक होईल. पण मी आज तेथें नाहीं तेव्हां वरील गोष्टी संभाळून वर्तमानपत्रें चालणे, व त्यांच्या कामगिरींत कोणत्याहि प्रकारची हानि न होता तीं सुरळीत चालणें याविषयी दक्षता ठेवणें, हें वडीलकीच्या मानानें आतां तुमच्याकडेच ओघानें येत आहे. आतां माझ्याजागी तुम्ही क्रमानें आलां आहां. आणि तुम्हाला वर्तमानपत्राच्या कामांतील अडचणी सहजच कळून आल्या आहेत. पण तुमची कार्यकुशलता, तुमचा अनुभव, आणि तुमचा चांगुलपणा या गुणामुळें तुम्ही त्या सर्व अडचणीतून निभावून जाल याविषयीं मला खात्री वाटतें. तुम्हाला वाटेल तर हें माझें पत्र खाडिलकर यांना दाखवा, व माझी विनंति म्हणून त्यांना म्हणा कीं "आपण दोघे मिळून खऱ्या मनाच्या सहकारितेनें काम करूं या." कारण वेळ मोठी आणीबाणीची आहे व यावेळीं आपसांत फूट होणें चांगलें नाहीं.

"केसरी आपल्याच नांवावर रहावा असें खाडिलकर यांना कां वाटत असावें याची मला कल्पना होते. कारण केसरीवर एकदां सोडून दोनदां जे खटले झाले त्यांतील लेखांबद्दल खरोखर कोण जबाबदार आहे हें त्यांचें त्यांना माहीत आहे. पण केसरी आपल्या नांवानें व्हावा, व आपण त्याचें डिक्लेरेशन करावे, अशी तुमची आस्थेवाईक आग्रहाची मागणी आहे असें त्यांना कळल्यावर त्यांनीं तुमच्या इच्छेप्रमाणें करावयास पाहिजे होते. कारण केसरीचे संपादक तुम्हीं झालां तरी पुष्कळसा मजकूर खाडिलकरच लिहिणार म्हणून जुन्या धोरणांत खंड पडण्याची फारशी भीति नाहीं. तात्पर्य, तुम्ही दोघे मनानें अधिक जवळ या व एकमेकांविषयीं अधिक समजुतीनें घ्या, म्हणजे काम होईल. किंवा मी तिसरीहि एक तोड सुचवितों ती अशी की, तुम्ही व खाडिलकर यांनीं कोणत्याच पत्राचें डिक्लेरेशन करूं नये. केसरी रा. लिमये यांच्या नांवानें काढावा आणि तुमचे हल्लीचे असिस्टंट

रामभाऊ जोशी यांचें डिक्लेरेशन मराठ्याचें करावें. कारण मला इतकेंच पाहिजे कीं केसरींत अधिक मजकूर खाडिलकरांनीं व मराठ्यांत अधिक मजकूर तुम्ही लिहावा. कोणत्याहि एका पत्रानें दुसऱ्याचे अनुयायी होऊं नये तर दोघांनीं मिळून एकच व तें पूर्वीचें धोरण ठेवावें. शेवटीं तुम्हा दोघांना मी फिरून 'अपील' करतों आणि त्यांतल्या त्यांत तुम्हाला. कारण तुम्हा दोघांत तुम्हीच वडील आहांत. याहून अधिक कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं व लिहिण्यासारखेंहि नाहीं."

केसरी माझ्या नांवें करण्याची माझी इच्छा आहे असें मी खाडिलकर यांना पूर्वी दर्शविलें होतें. त्यावर त्यांनीं असें उत्तर दिलें होतें कीं दोन्हीं वर्तमानपत्रें टिळकांचीं आहेत तेव्हां ते सांगतील त्याप्रमाणें आपण करूं. मग मी त्यांना म्हटलें कीं "माझें म्हणणें त्यांच्यापुढें गेल्याशिवाय टिळक तरी काय सांगणार ? म्हणून ही हकीकत मी त्यांना पत्रद्वारें कळविणार आहे." या गोष्टीला खाडिलकर यांना हरकत घेतां येत नव्हती आणि त्यांनीं ती घेतलीहि नाहीं. नंतर मी पूर्वी सांगितल्याप्रमाणें १९०९ च्या मे जूनच्या सुमारास धोंडोपंताच्या नांवें जाणाऱ्या एका पत्रांत ही गोष्ट टिळकांना कळविली. व त्याला जेव्हां हल्लींचें हें उत्तर आलें तेव्हां मी तें खाडिलकर यांना दाखविलें, आणि म्हणालों कीं "माझ्या मनास येईल तर केसरीचें डिक्लेरेशन करण्याला टिळकांनीं या पत्रांत मला अनुज्ञा दिली आहे. तेव्हां तुमचा विचार काय आहे तो कळवावा." तेव्हां खाडिलकर म्हणाले कीं "त्याला आतां माझी हरकत नाही. या वर्षाअखेर ती गोष्ट आपण करूं."

अशा रीतीनें वाद मिटल्यावर आमचीं कामें पूर्ववत् सुरू झालीं. म्हणजे दोन्हीं पत्रांचें डिक्लेरेशन खाडिलकर यांच्या नांवचेंच राहिलें, पण मराठ्याचा सर्व मजकूर उपसंपादक रा. रामभाऊ जोशी यांच्या सहाय्यानें मी लिहू लागलों. इतकेंच काय, पण त्या वर्षी आयर्लंडच्या इतिहासावरचे सुमारें बारा तेरा लेख मी अग्रलेख म्हणून केसरींत लिहिले. माझा हेतु इतकाच होता कीं कोणत्याहि पत्राचें काम अडूं द्यावयाचें नाही. दोन्हीं पत्रांत वेळ पडल्यास मजकूर हवा तितका लिहावयाचा. पण अट इतकीच कीं डिक्लेरेशन करावयाचें तर केसरीचें करून मराठ्याचें करावयाचें ! नाहीं तर कोणत्याच पत्राचें करावयाचें नाहीं. अखेर हा माझा हेतू सिद्धीस गेला. त्याला कारण टिळकांची अनुज्ञा हें तर एक होतें, पण इतरहि कांहीं कारणें तशींच घडलीं.

गोपाळराव गोखले यांच्यासंबंधीं बदनामीचा कहर झाला तेव्हां त्यांनीं हिंदुपंचावर अब्रूनुकसानीचा दिवाणी दावा लावून तो जिंकला, व त्याचें तोंड बंद केलें. पुण्यांत सन्मित्रसमाज मेळ्यानें अशींच बेअब्रूकारक पदें केलीं, म्हटलीं व छापलीं. त्यावर गोखले यांनीं फौजदारी दावा केला. तेव्हां खाडिलकरांनीं नेट दाखवून मुंबईहून बॅरिस्टर बाप्टिस्टा यांना आरोपीच्या बचावाकरितां आणविलें. पण बॅरिस्टर दाखल होण्यापूर्वीच मेळ्याच्या पदांच्या प्रकाशकानें गोखले यांची सपशेल लेखी माफी मागितली ! त्यामुळें सर्व प्रकरण खाडिलकर यांच्या अंगलट आलें. या प्रकरणांत मी तटस्थ होतों. म्हणजे गोखले यांच्या निंदकांना माझी बिलकूल सहानुभूति नव्हती. मी उघडपणें या निंदकांची निंदा करी. यामुळें एकाच गायकवाड वाड्यांत या बाबतींत दोन धोरणांचे भांडण लागलें, व वर सांगितल्याप्रमाणें खाडिलकरांच्या धोरणाचा पाडाव झाल्यामुळें त्यांना फजित व्हावें लागलें.

१९०९ च्या अखेर नाशिक येथें जॅक्सनसाहेबांचा खून झाला, व तो कटाचा खटला इतका रंगला कीं महाराष्ट्रांतील सर्वच लोक गांगरून गेले. या स्थितींतच हिंदुस्थानसरकार प्रेस ॲक्ट करणार अशी वदंता निघून वर्तमान-पत्रांना आपल्या अस्तित्वावर गदा येणार अशी भीति वाटूं लागली. इतक्यांत कराराप्रमाणें १९०९ साल पुरें झालें. तेव्हां " आतां ठरल्याप्रमाणें मी केसरीचें डिक्लेरेशन करणार " असें मी खाडिलकरांना रीतसर कळविलें. खाडिलकरांच्या व माझ्या नव्या कराराप्रमाणें मी मॅजिस्ट्रेटकडे जाऊन मराठापत्राचें डिक्लेरेशन करून आलों, तेव्हां त्या कराराचा दुसरा भाग पुरा करण्याचा हक्क मला प्राप्तच झाला. आदल्या रविवारचा मराठा माझ्या नांवानें निघाला हें पाहून मी करार पदरांत पाडून घेण्याच्या उद्योगाला लागलों हें खाडिलकरांना समजून चुकलेंच होतें. पण दोन दिवसांनीं मी केसरीचें डिक्लेरेशन केलें ही गोष्ट त्यांना केसरीचीं प्रुफें वाचतांना समजलीं. आम्ही सर्व जण प्रुफें वाचीत बसलो होतों; इतक्यांत आठव्या पानाच्या शेवटच्या कॉलमचें प्रुफ वर आलें. त्यांत रीतीप्रमाणें जबाबदार संपाद-कांच्या डिक्लेरेशनचा उल्लेख असतो. तेथें खाडिलकर यांच्या जागीं माझें नांव घातलेलें त्यांच्या नजरेस आलें. तें येतांच, विंचू झाडून टाकावा किंवा हातावरून निखारा उडवावा त्याप्रमाणें खाडिलकर यांनीं हातातलें प्रुफ खालीं टाकून दिलें, व

डोक्याला रुमाल घालून ते जे एकदां जिना उतरले ते टिळक मंडालेहून परत पुण्यास येऊन दाखल होईपर्यंत फिरून केसरी कचेरीची पायरी चढले नाहींत !

अशा रीतीनें हा प्रश्न कायमचा सुटला. कारण १९१० पासून पुढें टिळकांच्या मृत्यूपर्यंत केसरी माझ्या नांवावर राहिला; व पुढें त्यांच्या मृत्यूनंतरहि मी मुद्दाम होऊन सोडीपर्यंत तो माझ्याच नांवावर राहिला. मी टिळकांबरोबर विलायतेस जाण्याला निघालों तेव्हां माझ्याजागीं केसरीवर संपादक म्हणून खाडिलकरांचें नांव घालण्यांत आलें. पण मी विलायतेहून परत आल्यावर पुनः स्थिरस्थावर झालें तेव्हां फिरून केसरीवर पूर्वीप्रमाणें माझेंच नांव घालण्यांत येऊन टिळकांनीं आपल्याच हातानें केसरी माझ्या हातीं दिला. अशा रीतीनें केसरीचें संपादकत्व माझ्या हातीं सुमारें पंचवीस वर्षें सतत राहिलें. मध्यंतरीं १९२८ सालीं मी रजेवर होतों, आणि पुढें मी संपादक न राहातां फक्त संचालक म्हणून राहिलों, तरी अखेर हुकमत माझ्याच हातीं राहिली. म्हणजे वीस वर्षें मराठ्याचा संपादक व पंचवीस वर्षें केसरीचा संपादक अशी महत्वाचीं सजोड कामें मला केसरी-मराठा संस्थेंतील एकेचाळीस वर्षांच्या नोकरींत करितां आलीं हें मी माझें सुदैव समजतों.

केसरी हातीं घेण्याचा आग्रह मी धरिला व तो सिद्धीस गेला. पण दोन वर्गांचे लोक दोन निरनिराळ्या कारणाकरितां मी केसरी हातीं घेण्याच्या विरुद्ध होते. एक खुद्द माझ्या स्नेह्यांचा वर्ग व दुसरा वर्ग माझ्या प्रतिपक्षीयांचा ! माझ्या मित्रांचें म्हणणें असें कीं "तुम्ही केसरी हातीं घेऊन सुखाचा जीव निष्कारण दुःखांत घालीत आहांत. मराठा लिहिण्याचा तुम्हाला चांगला सराव झाला आहे. तुमचें लिहिणें इकडेच काय पण परप्रांतांतील लोकांनाहि आवडत आहे. अर्थात् केसरी हातीं घेतल्यास मराठ्याकडे तुमचें दुर्लक्ष होईल, व तसें झालें असतां आज टिळकपक्षाची जी छाप मराठ्याच्याद्वारें इतर प्रांतांवर पडलेली आहे ती कमी होईल. कारण मतांप्रमाणेंच परप्रांतांत इंग्रजी भाषेकडेहि पहातात, व ती भाषा नीट साधली नाहीं तर मतांच्या उठावदारपणाला कमीपणा येतो. टिळक तुरुंगांत असल्याकारणानें इतर प्रांतांचें लक्ष महाराष्ट्राकडे लागलेलें आहे, व हें त्यांचें लक्ष वेधून ठेवण्याचें मराठा पत्र हें उत्तम साधन असल्यामुळें त्याच्यांत बिघाड होऊं देणें यांत टिळकपक्षाची एक प्रकारें हानीच आहे." त्याच मित्रांचें आणखी असेंहि म्हणणें कीं, "हल्ली प्रेस अॅक्ट झाला आहे किंवा होणार आहे तो टळत

नाहीं. अशावेळीं तुम्ही केसरी हातीं घेतला, पहिल्याखेपेस त्याचा जामीन सरकारानें घेतला, व दुसऱ्या खेपेस तो त्यांनीं बुडविला, तर तुमच्या पदरांत अपयश येईल तें विनाकारण कां घेतां? ते खाडिलकर आहेत त्यांनाच तो आपल्या हातीं ठेवूं द्या. कारण एरवीं त्यांना जबाबदारी चांगली कळणार नाहीं. स्वतःच्या नांवचें डिक्लेरेशन असले म्हणजे लेखक जरा जपून लिहितो. आणि डिक्लेरेशन दुसऱ्याच्या नांवचें असलें म्हणजे हाताला व लेखणीला मनाचें तितकें बंधन राहात नाहीं. खाडिलकरांच्या लेखांवरून टिळकांना दोनदां शिक्षा झाली. उद्यां केसरीबद्दल तुम्ही जबाबदार झाला, व खाडिलकर पूर्वीसारखें लिहीत राहिले तर फिरून तुमच्यावर तोच प्रसंग यावयाचा. मनुष्य लिहूनच गेला म्हणजे लेखाच्या प्रुफांत फारशी छाटाछाट करतां येत नाहीं. एकमेकाची भीड पडते. शब्द काढून टाकूं न टाकूं असा भ्रम पडतो. न कळत बुद्धीशीं वैर होतें. आणि नंतर पश्चात्ताप तर होतोच, पण नसतें वैर उत्पन्न होतें. शिवाय गेल्या दोन तीन वर्षांत इतकें तिखट लेख केसरींतून वाचण्याची लोकांना संवय लागली आहे कीं, तुमचें सारासारविचारयुक्त लिहिणें, मर्यादाबंद लिहिणें, हे त्यापुढें लोकांना मिळमिळीत वाटेल; व लोकांची अशी टीका ऐकूं येऊं लागली म्हणजे कदाचित् तुम्हालाहि स्वभाव सोडून तिखट लिहिण्याची बुद्धि होईल. तात्पर्य, दोन्ही प्रकारच्या कारणाकरितां तुम्ही केसरी हातीं न घ्यावा व फक्त मराठाच ठेवावा हें उत्तम होय."

याच्या उलट प्रतिपक्षीयांची दृष्टि. पण म्हणणें तेंच. आणि उलट बाजूचीं टोकें केव्हां केव्हां एके ठिकाणीं येऊन मिळतात ( Extremes meet ) हें कसें तें या ठिकाणीं पहावयास सांपडलें. प्रतिपक्षीयांचे म्हणणें असें कीं, "आज इतके दिवस टिळकांच्या हाताखालीं शिक्षण घेऊन खाडिलकर केसरीशीं एकजीव झाले आहेत, व त्यांना आतां ही एक संधि आपल्या नांवानें पुढें येण्याला मिळाली आहे. ती तुम्ही कां हिरावून घ्यावी ? बरोबरीच्या लोकांत वडीलकीचा मान कसला ? त्यांच्या हातीं एक पत्र, तुमच्या हातीं एक पत्र. तेव्हां ही वांटणी आपोआपच बरोबर होते. शिवाय मराठ्यांत लिहिण्याला तुम्हीच अधिक योग्य आहां. तेव्हां आहे त्याचा बिघाड करून फक्त वडीलकीचा मान सिद्धीस नेण्याकरितां तुम्ही केसरी घेण्याचा आग्रह धरूं नये. टिळकपक्षाच्या अंतरंगांतील भावना केसरींतून खाडिलकरांनाच अधिक उठावदार रीतीनें मांडतां येतील. त्यांच्या लिहिण्यांत प्रतिपक्षाविषयीं निष्ठुरपणा असावा तो आहे. तो तुमच्यांत नाहीं. तसेंच खाडिल-

करांच्या लिहिण्यांत जो आवेशाचा आवेग असतो तो तुमच्या लिहिण्यांत नसतो. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, खाडिलकरांचें डिक्लेरेशन टिळकांना शिक्षा झाल्याबरोबर पहिल्या तडाख्यांत होऊन गेलें आहे. तें आतां बदलण्याचें काय कारण झालें ? असें लोक सहजच विचारणार; यामुळें तें बदलणें म्हणजे त्यांच्यावर निषेधार्थक किंवा निंदाव्यंजक शेरा मारण्यासारखें होतें."

मौज ही कीं शत्रुमित्रांच्या भावना मजविषयीं वेगवेगळ्या पण दोघांच्या म्हणण्याचा मथितार्थ एकच. म्हणजे मी केसरी हातीं घेण्याच्या भानगडींत पडूं नये ! पण माझें म्हणणें तिसरेंच होतें. वर प्रतिपक्षीयांचें म्हणणें संभाषणाच्या स्वरूपानें 'तुम्ही' हा शब्द घालून दिलें आहे. परंतु खरी गोष्ट अशी कीं, मला समक्ष त्यांच्यापैकीं हें कोणी केव्हां बोललें नाहीं. त्यांना बोलण्याचा अधिकार नव्हता; व कोणी धिटाईनें तसें बोलले तर अशांना झाडून टाकण्याचा माझा स्वभाव त्यांना माहीत होता. पण मला कोणी प्रत्यक्ष तसें बोललें नाहीं तरी त्यांची चर्चा कर्णोपकर्णी मला ऐकूं येत होती. मी मात्र असें केलें कीं मुद्दाम संधि उकरून काढून प्रतिपक्षीयांशीं वाद केला नाहीं. पण सहानुभूतिनें मला नको म्हणणाऱ्या मित्रांशीं समक्ष चर्चा करून माझें म्हणणें मी त्यांना समजावून सांगितलें. मी त्यांना म्हणालों कीं " माझ्या आयुष्यांतील हा एक प्रसंग असा आहे कीं त्यावरून लोकच काय पण माझी मीहि परीक्षा करीन. कारण केसरी व मराठा हीं भावंडें म्हटलीं तरी त्यांत सरस निरस ही गोष्ट सिद्ध आहेच. परप्रांतांत मराठाच तेवढा वाचला जातो म्हणून त्याला मान असेल. पण मला आधीं आपल्या प्रांतांतील अब्रू मिळविली पाहिजे. नंतर परप्रांतांची गोष्ट. केसरी हा आपल्या पैशानें मराठा जगवितो. यामुळें मराठा हा उपजीवी व केसरीवर वाढलेल्या बांडगुळासारखा लोकांना वाटतो. म्हणून त्यांतल्या त्यांत जें मुख्य वर्तमानपत्र म्हणजे केसरी तें हातीं घेण्याचा हक्क वडीलकीच्या नात्यामुळें जर मला आहे, तर तो मी कां बजावूं नये ? पूर्वी १८९७ सालीं खाडिलकर जाग्यावर असतां व लिहित असतां जर केसरीचा संपादक मला करण्यांत आलें, तर आतांहि तसेंच करण्यांत खाडिलकरांनीं आपला अपमान झाला असें कां मानावें ? मी संपादक असतां त्यांना लिहिण्याची हौस फेडून घेण्याची संधि तेव्हां मिळाली तशी ती आतांहि मिळेल. हल्लीं खाडिलकरांचें डिक्लेरेशन झालें आहे तें अशा गडबडीच्या व संकटाच्या वेळीं झालें कीं, तेव्हां कोणी कोणताच आग्रह धरणें वाईट दिसलें असतें. म्हणून मी तो धरला

नाहीं. पण गोष्ट एखाद्या दुसऱ्या वर्षाची नाहीं. पुरी सहा वर्षे जावयाचीं आहेत. आणि आतां मी जर हक्क न बजावीन तर त्याला मी कायमचाच मुकेन. तेव्हां अशी पड खाऊन दुसऱ्याच्या तेजांत लपून जाऊन मेलेलें अन्न खात बसणें मला आवडणार नाहीं. मराठी लेखक या नात्यानें माझी परीक्षा जरी पूर्वी लोकांना देण्याचा प्रसंग फारसा आला नव्हता, तरी ती देण्याची धमक माझ्यामध्यें आहे. मी केसरी हातीं घेतला तर चांगला चालवीन असा मला पूर्ण आत्मविश्वास वाटतो. आपल्या मतांचा अभिमान धरणाराहि मी आहे. भाषेचें धोरण कसें असावें यांविषयीं मतभेद होऊन मी टिळकांशीहि हुजत घातली आहे. आपल्या तत्त्वांचा आग्रह न सोडतां मराठ्याचें संपादकत्वच सोडण्यापर्यंत माझी तयारी होती. टिळकांचा जन्म आतां गेलाच म्हणावयाचा. पण माझा जन्म अजून जावयाचा आहे; व वर्तमानपत्राचें संपादकत्व हाच मी जन्माचा व्यवसाय व उद्योगधंदा करून बसलों आहे. तेव्हां आतां पड न खातां मी धिटाईनें पुढें येऊन आपला हक्क बजावून केसरी हातीं घ्यावा. भाषा व मतें या संबंधाचीं आपलीं तत्त्वें लोकांना पटविण्याचीं, त्यांना शिकविण्याचीं, जी एक संधि प्राप्त झाली आहे ती मी गमावली तर मी नादान व कमकुवत ठरेन. जो काय सोक्षमोक्ष व्हावयाचा तो आतां यांतच होवो. मी संपादक या नात्याच्या कर्तृत्वाच्या परीक्षेला लोकांपुढें उतरलों तर जगेन, न उतरलों तर मरेन. मजमध्यें मतांचा आवेश किंवा भाषेची तीव्रता नाहीं असें कोणी म्हणेल तर ती गोष्ट कमीपणा आणणारी आहे असें मला वाटत नाहीं. या गोष्टींची मर्यादा व योग्यायोग्यता ठरविण्याचा अधिकार जसा खाडिलकरांना हवा तसा तो मलाहि हवा आहे. मी आपलें धोरण लोकांना पटवून दिलें व यशस्वी केलें तर माझें काम झालें. उद्यां टिळक आल्यावर ते काय वाटेल तें करोत. मी परीक्षेला न उतरलों तर टिळक परत आल्यावर आपोआप बाजूला सरेन. आणि मग ते स्वतः केसरीचे संपादक होतील किंवा वाटेल त्या दुसऱ्या कोणाला करतील. पण माझ्यामध्यें कर्तृत्व किंवा सामर्थ्य अमुक इतक्यापर्यंत आहे, मात्र त्यापलीकडे नाहीं, असेंच जर खरोखरी असले तर तें एकदां अशा जाहीर रीतिनें सिद्ध झालेलें बरें. आपल्या आकांक्षा मनांत ठेवून 'झुरत', किंवा अहंकारानें फुकट 'झुलत', गप्प बसावयाचें हें मला फार अवघड वाटतें."

तात्पर्य, अशा रीतीनें मित्रांच्या मनाविरुद्ध, प्रतिपक्षीयांच्या इच्छेविरुद्ध, व कांहीं अंशीं टिळकांना निर्णय करण्याच्या संकटांत घालून, केसरी हातीं घेण्याच्या निर्धाराचें जें कृत्य मी तेव्हां केलें, तितक्या निर्धाराचें कृत्य करण्याची दुसरी संधि मला माझ्या साऱ्या जन्मांत आली नाहीं ! माझा स्वभाव सामान्यतः आग्रही नाहीं. मग मला याच वेळीं इतका आग्रह कोठून सुचला सांगवत नाहीं. पण मराठ्याचा राजीनामा पूर्वी एक-दोन वेळां दिला तेव्हां संस्था कदाचित् सोडावी लागेल असा संभव दिसत असतां मी जर माघार घेतली नाहीं, तर टिळक तुरुंगांत जाऊन संस्थेंतील आम्ही इतर लोक समान दर्जाचे राहिल्यावर मी आपला आग्रह कसा न चालवीन ?

मौज ही वाटते कीं, १८९६सालीं घरच्या वडील माणसांना न विचारतां मी टिळकांकडे एकदम निघून आलों व सार्वजनिक कार्यांत पडलों, त्या वेळीं तंतोतंत हीच विचारसरणी मी एका पत्रांत आपल्या वडील बंधूंना लिहून कळविली. तें पत्र या ग्रंथांत छापलेंच आहे. आणि केसरीचा आग्रह धरतांना त्याच तत्त्वानुसार वागलों. तें पत्र आतां पुन्हां वाचल्यावर वाचकांच्या लक्षांत ही गोष्ट येईल कीं, तें माझें पूर्वीचें धोरणच आतांहि माझ्या उपयोगीं पडलें. " माझा अधिकारयोग " असा मथळा प्रस्तुत प्रकरणावर घातला आहे त्यांतील 'योग' शब्दाचा खुलासा या सर्व प्रकरणभर वाचकास पाहावयास मिळेल. तो योग १९१० सालीं मी साधला, पण तो बिघडण्यासारखें पुढें कांहीं मी घडूहि दिलें नाहीं. माझ्या उत्कर्षांत कांहीं गुण सोन्याचा तर कांहीं सोनाराचा असें जें मी अभिमानानें म्हणतों तें कां तें यावरून कळून येईल. मनुष्यानें अयोग्य अभिमान धरू नये हें ठीकच आहे. पण स्वतःचा झाला म्हणून योग्य तोहि अभिमान न धरील तर तो मनुष्य कसला ? इतर पुष्कळ थोर लोकांच्या मानानें मी लहान, कमी बुद्धीचा, कमी कर्तृत्ववान् असेन व आहेहि. पण टिळकांच्या केसरीशीं व टिळकांशीं इतकीं वर्षें अखंड सहवास मला लाभला, इतकेंच नव्हे तर, केसरी संस्था इतकीं वर्षें अबाधितपणें पूर्णाधिकारानें आपल्या हातीं मला ठेवतां आली, याहून माझ्यापुरतें पाहिलें तर अधिक यश व सुदैव तें आणखी कोणतें ? आणि त्यामुळें माझ्या जन्माचें सार्थक झालें असे मी कां मानूं नये ? मजमध्यें महत्त्वाकांक्षा नव्हती हें खरें; पण होती हेंहि खरें नव्हे काय ?

# दशवार्षिक सिंहावलोकन ( १ )

## १८९९-१९०९

सन १८९९ सालीं टिळकांनीं केसरी आपल्या हातीं घेतल्यानंतर फिरून तो मजकडे १९१० सालीं कसा आला, आणि तो आल्यानें केसरी संस्थेकडील माझें स्थान कसें स्थिर झालें, याची हकीकत एकत्र सुसंगत देणें सोईचे म्हणून मी ती मागील प्रकरणांत देऊन पुरी केली आहे. तथापि १८९९ ते १९०९ या दहा वर्षांत मी जे इतर कांही उद्योग केले त्यांचीहि थोडीशी माहिती द्यावयास पाहिजे ती आतां देतों.

**औरंगाबादच्या गमती**—ताईमहाराज प्रकरणाची सविस्तर हकीकत टिळक चरित्रांत मी दिलीच आहे. पण माझा विशेष संबंध आलेली एक हकीकत थोडीशी देतों. ती औरंगाबाद येथें या खटल्यांतील साक्षी घेण्याचें काम चालू होतें त्याविषयीं. पुण्याबाहेर एकाच गांवांत टिळकांबरोबर माझा बरेच दिवस मुक्काम पडला तो सगळ्यांत अधिक औरंगाबाद येथें. निरनिराळ्या खेपा मिळून हा मुक्काम एकंदरीनें चारपांच महिने तरी भरेल. कमिशनचें काम औरंगाबाद कँटोनमेंट येथील एका अँग्लो इंडियन मॅजिस्ट्रेटपुढें चालू होतें. औरंगाबाद हें निजामी राज्यांत मोडतें. तथापि तेथील कँटोन्मेंटमध्यें इंग्रज सरकारचा अधिकार चाले. या मॅजिस्ट्रेटला दिवाणी व फौजदारी असे दोन्ही अधिकार असत. त्याला या साक्षी घेण्याचा अधिकार देण्यांत आला होता. सरकारतर्फे बॅ. स्ट्रूँगमन् हे काम चालवीत होते.

टिळकांतर्फे एक वकीलपत्र मजबरोबर तांबे वकील यांना होतें. हेच तांबे वकील पुढें उमरावतीस वाकिली करूं लागले, नंतर नागपूरच्या कायदे-मंडळांत निवडून आलेले सभासद व अध्यक्ष झाले. आणि त्यानंतर एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर आणि दैवाच्या बळावर शेवटीं गव्हर्नरहि झाले. तांबे हे पुष्कळसे औरंगाबादेस गैरहजर असत. त्यांना कमिशनमध्यें फारसें काम नव्हतें. पण आम्ही औरंगाबादेस गेलों तेव्हां या प्रकरणांतील कांहीं कामें मामुली स्वरूपाचीं करावीं लागत. तीं करण्यांत त्यांच्या वकिलपत्राचा उपयोग होई. साक्षी घेण्याचें बहुतेक काम टिळकांच्या पढव-

णुकीप्रमाणें व यशवंतराव कुलकर्णी यांच्या सूचनेप्रमाणें मीच करीत असे. मला उलट-तपासणी झेपण्यासारखी नसेल तेथें तें काम स्वतः टिळक करीत. स्ट्रॅगमन्‌साहेब आपलें काम चांगलें करीत. मात्र तोंड टाकून एखादे वेळीं बोलण्याची खोड त्यांना असल्यामुळें टिळक बसल्या बसल्या हलक्या आवाजानें त्यांना उत्तरें देतच, पण औपचारिक पद्धतीनें उत्तरें देण्याचें काम मलाच करावें लागें. हें करतांना अर्थातच मला कायद्याच्या ज्ञानापेक्षां त्यांच्या स्वभावाच्या तापटपणाचा, आणि राग आल्यावर तोंडाला येईल तें बोलण्याच्या अवगुणाचा, भरपूर उपयोग करून घेतां येई. त्याप्रमाणें दोन तीन खटके मोठेच उडाले; व मॅजिस्ट्रेटच्या मध्यस्थीनें स्ट्रॅगमन्‌च्या तोंडून निघालेले अपमानाचे शब्द मी परत घेवविले. कमिशनपुढील साक्षीच्या कामांत इतर कायद्यापेक्षां पुराव्याच्याच कायद्याचा उपयोग अधिक. आणि हा कायदा टिळकांनीं लॉ क्लासांत शिकविला असल्यामुळें ते स्ट्रॅगमन साहेबाच्या तोडीस तोड देत. अँग्लो इंडियन मॅजिस्ट्रेट पोक्त वयाचा आणि सभ्य व शांत स्वभावाचा सुदैवानें लाभला होता. यामुळें कमिशनच्या कामांत कांहींहि उणेपणा उरूं न देतां, किंवा जुलमी हरकती न होता, काम संपवून परत येतां आलें.

ताईमहाराज खटल्यांत उभयपक्षी मुख्य भर तोंडीं साक्षीपुराव्यावरच होता. आणि दत्तक-विधान औरंगाबादेस झालेलें असल्यामुळें तेथलेच साक्षीदार पुष्कळ आणि तेच महत्त्वाचे असें तारतम्य सहजच प्राप्त झालें होतें. या साक्षींच्या बळावरच टिळकांवरील सर्व दोषारोपांची मुक्तता झाली आणि दत्तकाचा दिवाणी दावा त्यांना प्रिव्हिकौन्सिलांत जिंकता आला. औरंगाबादच्या मुक्कामांत रात्रंदिवस एकत्र बैठक पडल्यामुळें टिळक हातीं धरलेल्या कामीं एकाग्र कसे होतात आणि मेहनत किती करतात याचा अनुभव मला प्रत्यक्ष आला. साक्षीदारांच्या सर-तपासण्यांचे सारांश तेच प्रथम योजून कारकुनाकडून लिहिवींत, व त्या अनुरोधानें कोर्टात मी जबान्या घेई. या साक्षींच्या तयारींत निजामशाहींतील अस्सल जुन्या थाटाच्या अशिक्षित अर्धशिक्षित लोकांची खूप गम्मत पाहावयास सांपडली. हा लाभ मला मोठा झालासा वाटला. तात्पर्य माझें काम म्हटले म्हणजे उपाध्याच्या हाताखालीं वावरणाऱ्या खटपट्यासारखें होतें. उपाध्या हाच धर्मकृत्य चालवितो; परंतु त्यांतील किरकोळ कामें करण्याकरितां उठाबशा काढण्याला, फुंकणीनें होमाचा अग्नि फुंकायला, हाताखालीं खटपट्या लागतो. मात्र तो साधारण

इतक्या पात्रतेचा व शिक्षणाचा असतो कीं उपाध्या दमला किंवा त्याचा घसा बसला तर मंत्र म्हणण्यांत तो खळ पडूं न देईल. आणि तितकी पात्रता मला होती. आमच्या यशवंतराव कुलकर्ण्यांना फक्त इंग्रजी येत नाहीं आणि प्रत्यक्ष कायदा कळत नाहीं इतकेंच. बाकी ते पुरे बॅरिस्टरच. या माझ्या म्हणण्यांत विनोद आहे पण विरोध नाहीं. कारण दिवाणी मुकद्दम्यांत अवांतर म्हणून करण्याचें जें काम किती तरी असतें त्याची त्यांना पुरी माहिती. आणि ते त्यांत चूक करावयाचे नाहींत. नुसती मेहनतच नव्हे तर कारवाईहि करावयाचे व सुचवावयाचे. विशेषतः शिरस्तेदार कारकून यांच्यापर्यंत खाशांचा पल्ला पोंचणें कठिण असतें. तो पोचविण्याला ते अत्यंत उपयुक्त. शिवाय वेळ पडल्यास बॅरिस्टर किंवा मॅजिस्ट्रेट यांच्या इंग्रजी भाषणांतील कळतील तेवढे अर्धेमुर्धे मुद्दे घेऊनहि उत्तर देण्याइतके हुजरजबाबी. यंत्रशास्त्रांत 'युनिव्हर्सल जॉइंट' म्हणून एक प्रकारचा सांधा असतो. तो आपल्या जागीं पक्का खिळलेला, पण कामाप्रमाणें सोईप्रमाणें दाहीदिशांना तोंड फिरवून पडेल तें काम करणारा असा असतो. यशवंतरावांना देण्याला ही उपमा समर्पक वाटते. बाबा महाराजांचे नोकर म्हणून त्यांचा टिळकांशीं संबंध आला हें खरें, तथापि तो त्यांनीं टिळकांविषयींच्या आदरबुद्धीनें पक्का केला. आणि ते जरी कोणी फर्डे अकौंटंट किंवा हिशेबतपासनीस नव्हते तरी टिळकांच्या पश्चात् जगन्नाथ महाराजांची नोकरी सोडल्यावर आम्ही त्यांना केसरीकडे घेतले ते विश्वासाच्या व निष्ठावंतपणाच्या गुणामुळें. ताईमहाराज खटल्यांत टिळकांच्या बरोबरीनें चिंता वाहिली आणि श्रम केले ते एकट्या यशवंतरावांनींच. सांगितल्या कामाला त्यांनीं नकार दिलेला मी केव्हांच ऐकलेला नाहीं. आणि हाडाचे कुलकर्णी म्हणून एखादे ठिकाणीं टिळकांना न सुचणारी करामतहि त्यांनीं केली. असो. औरंगाबादेहून जबान्या कागदपत्र यांच्या सहीशिक्क्याचा नकला आम्ही आणल्या त्याबरोबर तेथील कोर्टाचे आमचे सोहेरसुतक संपले. मॅजिस्ट्रेटचे शिरस्तेदार निळकंठराव कर्वे म्हणून होते. पुण्यांतील शिक्षण प्रसारक मंडळींचे चिटणीस प्रो. कर्वे यांचे ते वडील होत. त्यांच्या मनांत टिळकांविषयीं परम आदर असल्यामुळें, केवळ कर्तव्यांत चुकेल तितकें वगळून, बाकी आम्हाला ते मनोभावानें मदत करीत.

औरंगाबादेस आमची राहण्या–जेवण्याची सर्व व्यवस्था एका क्लबाच्या जागेंत केली होती. औरंगाबादेच्या मुक्कामांत प्लेग आला तेव्हां झोंपड्यांतहि राहत होतों. सातारचे रा. ब. काळे यांचे वडीलबंधु गोविंदराव काळे,

शिक्षण तपासनीस, दोनशे रुपये पगाराचे, या क्लबाचे प्रमुख होते. त्यांच्याबरोबर पुण्याचे रहिवासी श्रीधरपंत जोगळेकर हेहि एक होते. ते औरंगाबाद कॉलेजमध्यें गणिताचे प्रोफेसर असत. मूळचे न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी. टिळकांचे कट्टे अभिमानी. औरंगाबादचें नांव प्रथम निघाल्याबरोबर टिळकांना श्रीधरपंतांची आठवण झाली. आणि टिळकांनीं एका शब्दानें पत्र पाठवून त्यांना जी मदत मागितली ती त्यांनीं मरेपर्यंत दिली. दुर्दैवानें ताईमहाराज कमिशनचें काम चालू असतांच मध्यंतरीं ते वारले. त्या क्लबाचे दुसरेहि दोन सभासद आठवतात. ते हरिरामशास्त्री व चुनीलाल. हे दोघे गुजराथी परंतु पुरे महाराष्ट्रीय बनलेले. त्यांच्याच घरांत क्लब व त्यांतच आमची राहण्याची सोय केलेली होती. हरिरामशास्त्री हे जुन्या पद्धतीचे शास्त्री इतकें त्यांचें वर्णन केलें म्हणजे त्यांत सर्व आले. चुनीलाल यांना मात्र अधिक तारतम्य होते. रा. सा. काळे हे मितभाषणी व किंचित् मान्यतेनें वागणारे. याच्या उलट भिक्षुकीवळणाचे लघळलोक व कांही मासलेवाईक वकील तेथें भेटत. त्यांतील राळे चांगले आठवतात. पुण्यांतील रा. ब. राळे यांचे ते बंधु. होस हो ठेवून देण्यांत राळे मोठे पटाईत. पण त्यांची साक्ष होत असता कसें काय निभावते या विचारानें टिळक थोडे चिंताग्रस्त दिसत. गांवची कांहीं शास्त्रीमंडळी येत व दत्तकाच्या वेळीं सत्काराला ते हजर असल्यामुळें त्यांचाहि साक्षीला उपयोग झाला. त्यांतीलहि कोणी दगा देईल अशी भीति वाटे.

पण या सर्वांपेक्षां अधिक स्मरणांत राहणारी औरंगाबादच्या मुक्कामांतील व्यक्ति म्हणजे पाध्ये या नांवाचे एक ड्रॉईंग मास्तर होते ते. त्यांच्या गप्पा अशा मजेशीर चालत कीं, त्यांच्या संगतींत तासनतास घालविता यावे. मात्र ते जितके तडतड बोलत त्यापेक्षांहि अधिक खदखदा असत. निजामशाहीतील गमती त्यांनीं आम्हाला सांगितल्या त्यांची संख्या शंभरहि भरली असती. या गमतींतील फक्त एकच नमुनेवाईक म्हणून गोष्ट सांगतो. इतरहि आठवतात पण विस्तारभय वाटते. गोष्ट अशी. हैद्राबादेमध्यें पिढीजाद, पण सगळ्या पिढ्यांची बेअकल शेवटीं ज्यांत उतरली असें, दोन बंधु उमराव होते. श्रीमंत होते. त्यांना एका वडिलार्जित रिकाम्या जागेवर नवा वाडा बांधण्याची इच्छा झाली. दोघांनी आपापल्या अभिरुचीप्रमाणें योजनेचे नकाशे करवावे असें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं कोणाकडून करवून घेतले. शेवटीं जागेवर जाऊन पक्का निश्चय करण्याची वेळ आली तेव्हां तेथें दोघांनीं ते नकाशे उघडले; व ते एकमेकाला लावून पाहतां त्यांत

असें दिसून आलें कीं एकाच्या नकाशांत ज्या ठिकाणीं गोषाची व इतर पवित्र म्हणून मानलेली इमारत दाखविली होती तेथेच दुसऱ्याच्या नकाशांत नक्की शौचकूप दाखविण्यांत आला होता. हें पाहताच एक भाऊ खवळून कट्यार काढून उठला व दुसऱ्याच्या अंगावर जाऊन म्हणाला "माझा जनानखाना म्हणजे शौचकूप आहे कीं काय!" पण दुसऱ्याहि नकाशांत तीच चूक उलट्या बाजूस झाली होती. तेव्हां "तूंहि माझ्या गोषाचा अपमान केलास" म्हणून त्यानेंहि कट्यार उपसली. अखेर कोणी तिऱ्हाईत शहाणा माणूस भेटला. त्यानें ते नकाशे फाडून टाकले व 'आतां ही जागा मोकळी आहे, यावर हवेतसे एकमेक मिळून बांधावयाचे ठरवा' असे म्हणाला.

या गोष्टींत बेअकलीपणाचा पुरावा तर आहेच. पण दुसरा एक ध्वनि असा कीं, सुखवस्तु मनुष्याला कोणत्याही कामाकरितां जागेवरून उठून न जातां परक्याच्या बुद्धीनें व परक्याच्या हातून काम करवून घेण्याची जडलेली संवय. पण हे मुसलमान उमरावच काय, आमच्या इकडील सरदार जहागिरदारांत ही खोड कोठें नाहीं! यांचेंहि प्रत्यंतर आम्हाला तेथेंच मिळालें. ते असें. महाराष्ट्रांतील कांहीं घराण्यांना निजामशाहींत उत्पन्नाचे गांव किंवा नेमणुकी असत. त्या वसूल करण्याचें काम ज्या स्थानिक मुखत्याराकडे सोपविलेलें असे त्याला वकील म्हणत. आणि वसूल करण्याचें उत्पन्न पन्नास पाऊणशें रुपयाचें असलें तरी तो स्वतःला 'दरबार' समजून आपला 'वकील' नेमावयाचाच. आधीच मोगलाई कारभार. कचेरीच्या हातून वकिलाच्या हातांत, आणि वकिलाच्या हातून दरबारच्या हातांत उत्पन्न पडताना वाटेंत गळती किती होत असेल याची कल्पनाच करावी. हा महाराष्ट्रीयांचा प्रकार पाहून टिळकांना राग आला, व ते म्हणाले 'निजाम सरकार आमच्या या ऐदी लोकांचीं उत्पन्नें खालसा करील त्या दिवशीं मी साखर वांटीन.'

**सातारची प्रांतिक परिषद**—१८९९ साली साताऱ्यास मुंबई इलाख्याची प्रांतिक परिषद भरली. तिला मी गेलों होतों, आणि त्या प्रसंगीं टिळकांचा एक हस्तक व अनुयायी म्हणून बरेंच मेहनतीचें काम केलें. मी सातारकर व पुणेकर या दोन्हीं नात्यांनीं वावरत होतो. या परिषदेला त्या वेळीं फार महत्त्व होतें, आणि मेथापक्ष व टिळकपक्ष यांच्यातला तो पहिला उघड सामना ठरला. म्हणून तिची थोडी हकीकत देतोः—

लॉर्ड हॅरिस यांच्याप्रमाणें लॉर्ड सँडर्स्ट यांचीहि कारकीर्द लोकांना अत्यंत आप्रिय झाली होती. तथापि पहिल्याप्रमाणें दुसऱ्याचेंहि स्मारक करण्याची खटपट झालीच. आणि दोन्ही खटपटी प्रायः एकाच लोकांकडून झाल्या. मुंबईतील गोरे व्यापारी व पार्शी बॅरोनेट वगैरे मंडळी अशा कामांत पडली तर त्यांना नांवें कोण ठेवील ? पण नारायणराव चंदावरकरासारखा एखादा प्रसिद्ध आणि लोकपक्षाकडील म्हणविणारा गृहस्थ अशा चळवळीत सामील असला म्हणजे कोणालाहि सहजच विषाद वाटतो. असो. मूळ चालकाचा विचार स्मारकाला सार्वजनिक स्वरूप देण्याचा होता. परंतु खुद्द मुंबईस वाच्छा, सेटलवाड, नारायणराव गोखले वगैरे लोकांनी विरोध केल्यामुळें त्याला खासगी स्वरूप देण्याचें ठरलें.

स्मारकाला सार्वजनिक स्वरूप नाही म्हटले तरी गव्हर्नराच्या मित्रांनी व भक्तांनीं खासगी स्वरूपांतच कां होईना पण स्मारकाच्या चळवळीला रंगरूप यावें असा प्रयत्न चालविला. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत सुमारें चारशे लोकांची एक सभा भरवून चळवळीला सार्वजनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला. आणि अखेर मेथा वाच्छा सेटलवाड वगैरे लोकहि औपचारिक रीतीनें सामील होऊ लागले. आतां ह्याहि बाबतीत मेथा ते मेथा, चंदावरकर ते चंदावरकर, व भालचंद्र ते भालचंद्र हा फरक दिसून आलाच. परंतु काँग्रेसमध्यें लॉर्ड रॉडर्स्ट यांच्या अपकृत्यांचें दोषाविष्करण करणें, आणि इकडे त्यांच्या स्मारकाविषयीं उपेक्षायुक्त कां होईना पण सहानुभूति दर्शविणें, या परस्पर विरुद्ध गोष्टीमुळे काँग्रेसवर परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाही असें टिळकांनी बजावले. केसरीवर खटला केला, म्हणून टिळक हे स्मारकाच्या विरुद्ध अशी व्यक्तिविषयक हेतुमीमांसा कांहीं लोकांनी या वेळी केली. पण डॉ. भालचंद्र यांना सर ही पदवी मिळाली, व चंदावरकर यांना हायकोर्टाच्या न्यायाधीशाची जागा मिळू घातली होती, म्हणून ते स्मारकाला अनुकूल होते असें त्याला प्रत्युत्तर सहजच देता येण्यासारखें होतें.

लॉर्ड सँडर्स्ट यांच्या स्मारकासंबंधीचा हा वाद आतापर्यंत पुण्यामुंबईत म्हणजे १२० मैलांच्या अंतरावर चालू होता. पण पुढें लवकरच म्हणजे मे महिन्यांत मुंबई प्रांतिक परिषद भरविली तेव्हां पुणेकर व मुंबईकर हे साताऱ्यास एकत्र आले. आणि त्यांच्यामध्यें मोठाच खटका उडाला. परिषदेचें अध्यक्षस्थान मुंबईचे सुप्रसिद्ध वकील गोकुळदास कहानदास पारेख यास देण्याचें ठरलें होतें. ही परिषद



औरंगाबाद कमिशनचं काम संपल्यावर टिळक व केळकर वेरूळची लेणीं पाहण्यास गेले त्यावेळीं श्री-घृष्णेश्वरच्या देवळाच्या चौथऱ्यावर बसून घेतलेले उभयतांचें छायाचित्र.

( पृ. ३३६ )

कराची येथील परिषदेनंतर आज चार वर्षांनी भरत होती. सातारकरांचे अत्यंत आस्थेवाईक निमंत्रण होते. आणि चार वर्षांच्या अवधीत, बऱ्याच उलाढालीच्या गोष्टी, प्रांतांतील जनतेने एकत्र येऊन मत व्यक्त करण्यासारख्या, घडल्या होत्या. पण प्रतिपक्षीयांचे मर्म परस्परास माहीत ! पुढे होणाऱ्या सामन्याचे स्वप्न टिळकांना आगाऊ पडले असल्यास नवल नाही. परिषदेचे अध्यक्ष हे मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या गटांतील असल्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ व सहाय्यार्थ सदर असोसिएशनच्या गटांतली ही वर नांवे लिहिलेली मंडळी हजर असावी हे स्वाभाविकच होते. ना. मेथा यांच्याकरिता आम्ही बंगला गाडीघोडा इत्यादि व्यवस्था उत्कृष्ट केली होती. पण त्यांचे येणे झाले नाही. पहिल्या दिवशी स्वागताध्यक्ष विठ्ठलराव पाठक यांनी भाषण केलें. त्यांत दुष्काळाची पीडा व ती निवारण्याचे उपाय या विषयावरच विशेष भर दिला होता. अध्यक्ष गोकुळदास पारेख यांनीहि याच विषयावर विशेष जोर दिला. कारण तो विषय त्यांचा आवडता होता व त्यासंबंधी त्यांनी अलीकडे परिश्रम चालविले होते. या भाषणानंतर विषयनियामक कमिटीच्या नेमणुकीसंबंधी थोडासा लढा पडला. ती कशी तरी निवडल्यावर निर्विवाद अशा विषयावरील ठरावांचे मसुदे पार पडले. पण लॉर्ड सडर्स्ट यांच्या कारकीर्दीचा विषय निघाला तेव्हां एकदम रण माजले. मुख्य मुंबईकर मंडळीचे मत असे की या परिषदेत लॉर्ड सेंडर्स्ट यांचें नांवहि बिलकूल काढू नये. या विचारसरणीस शक्य तितका मान देऊन प्रतिपक्षाने एक ठराव सुचविला. त्यांत लॉर्ड सडर्स्ट यांचे नांव अजिबात गाळले होते. पण त्यांच्या कारकीर्दीत घडलेल्या अनेक अप्रिय गोष्टींचा उल्लेख केला होता. याहि ठरावास मुंबईकरांनी हरकत घेतली. त्याचे कारण असे की अशा मुग्ध ठरावानेहि म्हणे लॉर्ड सडर्स्ट यांच्या नांवाच्या ध्वनि निघतो ! यावर बराच वादविवाद झाला. शेवटी अध्यक्षांनी असा धाक घातला की जर हा ठराव परिषदेपुढे आणण्याचें निश्चित झाले तर आपण राजीनामा देऊ ! तेव्हां तो ठराव सुचविणाऱ्या गृहस्थाने ठरावापेक्षां अध्यक्षच आपणाला विशेष ग्राह्य असे सांगून ठराव मागे घेऊन वादविवाद संपविला. पण ठराव आणण्याचा अधिकार जो एकाला तोच इतरांना. शिवाय अध्यक्षांनी आपलें अध्यक्षपद पणाला लावणे हा अधिकाराचा अतिक्रम होय असे पुष्कळांना वाटले. निरनिराळ्या बंगल्यावर प्रतिनिधी उतरले होते तेथें या विषयावर जोराचा वादविवाद सुरू झाला. उलट सुलट प्रयत्न होऊ लागले. सगळ्या रात्रींत कोणालाहि झोंप आली

नाहीं. एका बंगल्यावरून दुसऱ्या बंगल्यावर, दुसऱ्याहून तिसऱ्यावर, अशा पुत्रारी मंडळींच्या येरझारा सुरू झाल्या.

दुसरें दिवशीं सकाळीं परिषदेच्या कामाला सुरुवात होणार तोंच अध्यक्षांच्या हातीं दोन अर्ज देण्यांत आले. आणि कामास सुरुवात होण्यापूर्वी आधीं त्यांचा निकाल देण्यांत यावा अशी विनंति करण्यांत आली. एक तक्रार अशी होती कीं, विषय-नियामक मंडळांत अध्यक्षांनीं सभेला न विचारता आपल्या इच्छेनें अनेक नवीन गृहस्थ घातले ती चूक दुरुस्त व्हावी. आणि दुसऱ्या अर्जांत अशी विनंति होती कीं, मुंबईसरकारच्या राज्यपद्धतीविषयींच्या कांहीं सूचना करणारा ठराव विषय-नियामक मंडळात पसंत झाला नसला तरी तो स्वतंत्रपणें प्रांतिक परिषदेपुढें मांडण्याचा प्रतिनिधींना हक्क आहे, म्हणून तो पुढें मांडण्यास अध्यक्षांनीं परवानगी द्यावी. या ठरावांतील मुख्य भाग असा होता कीं, "गेल्या कांहीं वर्षांत मुंबईसरकारच्या हातून कांहीं गोष्टी घडल्या त्या, लोकांवर त्यांचा विश्वास नसल्यामुळें, त्यांचा पाडाव करण्याच्या हेतूनें सरकारनें केलेल्या होत्या; याबद्दल प्रांतिक सभेस मोठी दिलगिरी वाटत आहे. आणि सभेची अशी प्रार्थना आहे कीं ही राज्यपद्धति बदलून त्या ठिकाणीं लोकांवर विश्वास ठेवून त्यांच्या हिताकरिता झटण्याची इंग्रजी राज्याची जी उत्कृष्ट पद्धत आहे तिचा पुन्हा लवकरच स्वीकार करण्यांत यावा."

या दोन अर्जांवर १२४ प्रतिनिधींच्या सह्या होत्या. आणि एकंदर प्रतिनिधींची संख्या १७५ ते १८० होती. हे लक्षांत घेतले म्हणजे परिषदेंतील केवढें प्रचंड बहुमत त्या ठरावांना अनुकूल होतें हे दिसून येईल. पण टेबलावर अर्ज पडताच अध्यक्ष गोकुळदास पारेख हे कावरे बावरे होऊन, आतां अध्यक्षस्थान सोडून जातात कीं काय असा त्यांनीं बहाणा केला. सभागृहांतील चारहि बाजूंनीं आरडाओरड सुरू झाली. मुंबईची मंडळी व त्यांच्या मताचे पुण्यांतील कांहीं लोक यांनीं आपल्या संख्येचें वैगुण्य इतर रीतींनीं भरून काढलें. संकीर्ण युद्ध सुरू झालें. बसलेल्या दोन दोन चार चार लोकांत बाचाबाच व आरडाओरड सुरू होऊन सभागृहाला मंडईचें किंवा गुजरीचें स्वरूप प्राप्त झालें.

बिचारी सातारकर मंडळी मोठ्या संकटांत पडली. कोणतीहि सभा आपल्या गांवीं बोलावणाऱ्यांनीं सभेंतील कोणत्याही पक्षाला आपलें पाठबळ देऊं नये, तटस्थ रहावें, असा शिष्टाचाराचा सामान्य नियम आहे. स्वागतमंडळापैकीं कांहीं दुय्यम

प्रतीच्या गृहस्थांच्या सह्या ह्या ठरावाच्या अर्जावर होत्या. तथापि तटस्थपणाची जबाबदारी मुख्यतः सातारच्या पुढाऱ्यांवरच होती आणि ती त्यांनीं फार चांगल्या रीतीनें संभाळली. वादग्रस्त प्रश्नासंबंधानें स्वतः त्यांना कांहीं मत नव्हतें असें नाहीं. आणि उघड मत देण्याची वेळ येती तर त्यांच्यांतहि दुमत झालेले आढळून आले असते. परंतु करंदीकर, सहस्रबुद्धे, फणसळकर वगैरे गृहस्थांनीं मनाशीं असें ठरविलें कीं कसेंहि करून परिषदेचें काम तडीस न्यावे. ती उधळली जाऊ नये. आणि या दृष्टीनें त्यांनीं दोन्ही पक्षांना सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या. विरुद्ध बाजूच्या पक्षांत अर्थात् टिळक हेच प्रमुख होते. परंतु हा सर्व प्रकार स्वतः टिळकांनीं आणि त्यांच्या अनुयायांनीं खुनशीपणानें चालविला आहे अशी कांहीं लोकांनीं समजूत करून घेतली असल्यानें, या चळवळींत स्वतः टिळकांनीं पुढारीपण घेणें योग्य नव्हतें. आणि तें त्यांनीं घेतलेहि नाहीं. परंतु खरा प्रश्न तत्वाचा असतो. वरील प्रकारच्या आरोपाच्या झुकांडीनें फसून जाण्यासारखे आम्ही टिळकांचे अनुयायी नसल्यामुळें, आम्ही निरनिराळ्या कँपांतून हिंडून वरील ठरावावर प्रतिनिधींच्या सह्या घेण्याचें काम मोठ्या मेहनतीनें केलें. या कामाला रात्रीचे कांहीं तासच मिळणारे होते. कित्येक लोकांनी सह्या करण्यापूर्वी अनेक बाजूंनीं वाद करून बारीक मोठ्या गोष्टींचा अगदीं कीस काढला. यामुळें सह्या मिळविणारांना अलोचन जाग्रण झालें. तरी पण इतक्या सह्या मिळाल्या. सकाळीं सात वाजतां अध्यक्षाच्या टेबलावर ठराव मांडण्याची जय्यत तयारी झाली. ज्या मंडळींनीं अर्जावर सह्या दिल्या त्यांतील बहुतेक परिषदेत हजर होते. मतें घेण्याची वेळ आली असता काय होणार हे अध्यक्षांना दिसतच होते. म्हणून त्यांनीं प्रथमपासूनच असा आग्रह धरला कीं, 'विषयनियामक मंडळीच्या बैठकींत ज्या ठरावांचा स्वीकार झाला नाहीं ते भर परिषदेंत पुढें आणणें गैरशिस्त होय. म्हणून मी अर्जाना हातहि लावूं इच्छित नाहीं.' पण भर परिषदेंत असे ठराव मांडता येतात, आणि अर्जावरील प्रचंड बहुमत लक्षांत घेऊन तरी अध्यक्षांनीं भलताच आग्रह धरू नये, असें विरुद्ध पक्षाचें म्हणणें होतें. याचा निकाल कसा लावावा ?

टिळकांकडे या सकाळच्या बैठकींत एक ठराव मांडण्याकरितां देण्यांत आला होता तो त्यांनीं मांडावा म्हणून अध्यक्षांनीं प्रथम टिळकांना आज्ञा केली. ती मान्य करून टिळक बोलावयास उभे राहिले. अध्यक्षांना अशी आशा होती कीं, टिळकांना तरी बोलू देतील. दंडेली करणार नाहींत. पण टिळकांनीं बोलणें हें

बहुमताला घातक होतें म्हणून त्यांनाच कोणी पुढें बोलूं देईनात. शेवटीं सभेचें काम अर्धा पाऊण तास मुद्दाम थांबविण्यांत आलें. हेतु हा की, मंडळी खाजगी रीतीनें बसल्यावर कोणी कांहीं तोंड काढील. सभेला खासगी स्वरूप आल्यावर थोडी शांतता आली खरीच. १८९१ सालचा दाखला अध्यक्ष आणि त्यांची लेहीमंडळी यांना प्रत्यक्ष कागदोपत्री दाखविण्यांत आला. तथापि अध्यक्ष आपला हेका सोडीनात. शेवटी टिळकांनी मध्यें पडून अशी तोड सुचविली की, "अध्यक्षांनी ठराव आणण्यास परवानगी न दिली तरी चालेल; परंतु अर्ज सह्यानिशी उघड वाचून दाखवावा आणि तो दप्तरी ठेवण्याची संमति द्यावी. तसें झालें म्हणजे खुद्द ठराव पुढें मांडण्याचा आग्रह कोणी धरूं नये व नंतर परिषदेचें काम पुढें चालावें." ही तोड सर्वसंमत ठरली. त्याबरोबर विषयनियामक मंडळाच्या घटनेसंबंधी जो गैरकायदा प्रकार झाला होता तोहि दुरुस्त करून घेण्यांत आला. आणि अशा रीतीनें हे वादळ जागच्या जागीं जिरलें.

नऊ वाजतां फिरून परिषदेचें काम सुरू झालें. पहिलाच ठराव टिळक यांनीं मांडावयाचा होता तो त्यांनी मांडला. आणि मग अखेरपर्यंत सर्व काम सुव्यवस्थित व आनंदानें पार पडलें. टिळकांच्या स्वटल्याबद्दल जरी सभेंत ठराव नव्हता तरी नातूंच्या कैदेबद्दल ठराव होताच. आणि त्याबरील भाषणांत मुंबई सरकारच्या धोरणाचा निषेध व्हावयाचा तो प्रत्यक्ष झालाच. अशा रीतीनें मुंबईकर व पुणेकर यांच्यांतील ही चकमक झडली. फेरोजशहा मेथा हे स्वतः हजर असते तर काय प्रकार घडला असता हें सांगतां येत नाहीं. पण मेथा हे गोकुळदास पारेख यांच्या पेक्षा अधिक मानी व रगीट असले तरी यांच्यापेक्षा ते अधिक युक्तिवादीहि होते. ते समयज्ञहि होते. त्यांनीं प्रथमच कांहीं शक्कल लढविली असती, वक्तृत्व करून लोकांच्या मनावर परिणाम केला असता, थट्टा केली असती, मस्करी केली असती, डोळे मिचकावले असते. लडिवाळपणानें हट्टी मुलाला बागबिनात तसे खुद्द टिळकांना आपल्याजवळ बोलावून घेऊन बसविले असते, आणि त्यांच्याकडूनच आपल्या अनुयायांना शांत करविले असते. पण गोकुळदास यांच्यामध्यें वर सांगितल्या-प्रमाणें वृद्धपणाच्या गुणाहून दुसरा अधिक कांहीं गुण नसल्यानें बखेडा माजला. मेथा यांनीं नेहमींप्रमाणें आपल्या प्रभावळींतला मनुष्य परिषदेचा अध्यक्ष होण्यास पाठविला. पण तोहि असा पाठविला कीं ज्याला लोकांचा अनुनय करण्याची हातोटी बिलकुल नव्हती. टिळक तापट आहेत हे मेथा यांना प्रथमपासूनच

माहित होते. आणि या उभयतांच्या चकमकी पूर्वी घडल्याहि होत्या. पण तो प्रसंग व्यक्तिशः होता. साताऱ्यास उडलेल्या चकमकीत स्वतः मेथा हजर नव्हते. तथापि एका बाजूस त्यांचा बहुतेक कंपू, व दुसऱ्या बाजूस टिळकांचा कंपू म्हणजे नव्या वाढत्या राष्ट्रीय पक्षाचा कंपू, असा सामना होऊन पहिल्यां कंपूचा मोड झाला. पण माझ्याकरितां एवढी गोष्ट मान्य करा असे गोकुळदास यांच्या तोंडून वदवून घेतल्यावर नव्यानें जुन्याविषयीं जी भावना ठेवणें योग्य तीच पुन्हा प्रस्थापित होऊन सभा पार पडली. मात्र सातारची परिषद हा पुढे येणाऱ्या अशा अनेक प्रसंगांचा केवळ प्रारंभच होता.

या परिषदेच्या भानगडींत व वादांत सातारकर मित्रांच्या मदतीनें मी फार श्रम केले. सर्व रात्रभर जागून घरोघर हिंडून अध्यक्षांकडे देण्याच्या अर्जावर सह्या मिळविण्याचें काम मजकडे होतें ते मी चांगलें पार पाडलें. परिषदेच्या जागीं मेथापक्षीय अनेक लोकांशीं, विशेषतः चिमणलाल सेटलवाड यांच्याशी, माझे बरेच खटके उडाले.

**कायदेकौन्सिलची निवडणूक**—१८९९ मुंबई कायदेकौन्सिलची निवडणूक पुन्हा उपस्थित झाली. मी सातारच्या ऋणानुबंधाचा म्हणून त्या जिल्ह्यांतील कामावर टिळकांनीं माझी नेमणूक केली. हें काम करण्यास मला मुख्यतः सातारचे एक इनामदार तात्यासाहेब मुतालीक यांची मदत होती. पण सातारचे पुढारी करंदीकर व सहस्त्रबुद्धे यांनी या निवडणुकींत गोपाळराव गोखले यांना सहाय्य करण्याचे वचन दिलें असल्यामुळें त्यांची मदत व्हावी तशी झाली नाही. इतर कांही जिल्ह्यांतून तसाच अनुभव आला. तुरुंगवासामुळें टिळकांची लोकप्रियता वाढली, तथापि त्यामुळें सरकारचा ऋणानुबंध असणाऱ्या लोकांनीं या वेळीं सरकारच्या रागाची दहशत घेतली. शिवाय टिळक पूर्वी दोनदां निवडून आले, तेव्हां आतां गोखले यांनाहि एक वेळ संधि कां मिळूं नये असा प्रांजळ युक्तिवादहि ऐकूं येऊं लागला. तात्पर्य, या निवडणुकींत यश येणार नाहीं असें पाहून टिळकांनीं आपण होऊन माघार घेतली. आणि गोखले हे निवडून आले. या संबंधांत सातारचे दादासाहेब करंदीकर यांचें मला आलेलें पत्र येथें देतों त्यावरून त्या वेळची परिस्थिति लक्षांत येईल. हें पत्र असें:—

८ आक्टोबर, १८९९—"तुमचें ता. ३ चें पत्र पावलें. बाब जराशी नाजूक आहे. आणि स्पष्ट बोलल्यानें गैरसमज व्हावयाचा. तथापि तसा तो तुम्ही

करून घेणार नाहीं असें समजून आमचें कर्तव्य करतो. कौन्सिल निवडणुकीला उभें राहण्याचे टिळकांनीं निश्चित ठरविले आहेच असे कांही तुम्ही लिहिले नाहीं. त्यांच्या पुष्कळ स्नेहीमंडळीच्या मनांत असें असावेसें दिसतें कीं, शिक्षेमुळें टिळकांचें लोकांमधील वजन कमी झालेलें नाहीं, व राष्ट्रीय कार्याच्या दृष्टीनें टिळकांची निवडणूक हे सरकारला एक प्रकारचें आव्हानच आहे. म्हणनच ते टिळकांना उभे रहा म्हणत असतील. पण आम्हाला मात्र तसे वाटत नाहीं. उलट टिळक उशिरा पुढें आल्याने, आणि ते उभे राहात नाहींत अशा समजुतीवर, गोखल्यांना ज्यांनी पूर्वीच आश्वासनें देऊन ठेविलीं त्यांची स्थिति अवघड केल्याने, टिळक निवडून न येतां त्यांच्या यशाला व्यर्थ धक्का मात्र बसावयाचा. तरी इतक्या उशिरा तुम्ही उभे राहू नये असे टिळकांना आमच्यातर्फे तुम्ही कळवावे. राहतील तर निवडणुकीला एकटे टिळकच उभे राहावे, म्हणजे निवडणूक नामंजूर करण्याला सरकारला जागाच राहू नये अशी आमची कल्पना. पण दोघे उभे राहिल्याने ती गोष्ट साधत नाहीं. सरकारी अधिकारी गोखल्यांच्या बाजूनें खूप खटपट करणार. लोकांनींहि टिळकांना तितकीच जोराची मदत दिली असती. पण ते उशीरा पुढें आले. येथें विठ्ठलराव पाठक हे गोखल्यांच्या करितां खटपट करीत आहेत. ते आम्हाला म्हणतात 'माफीशिवाय गोखल्यांच्या मार्गांत दुसरी कांहीं तरी अडचण आहे काय?' विठ्ठलरावांनाहि आम्हीं उलट शह दिला असता. पण टिळक उशिरा पुढें आल्यानें आमच्यांत दुमत झाले आहे. कांहींना वाटते कीं लोकांचा आपणावर अशा रीतीनें विश्वास आहे असे दाखविण्याची टिळकांना मुळीच जरूरी नाहीं. हे वाचून तुम्हाला कदाचित् असे वाटेल कीं टिळकांना मार्गें घेण्याला सांगून गोखल्यांची निवडणूक बिनधोक करण्याचा आम्ही हा प्रयत्न करीत आहो. पण आम्हाला योग्य वाटते तेच लिहित आहो. त्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका." (र. पां. करंदीकर, सातारा)

**रायगडचा उत्सव**—टिळक कैदेंत जाण्यापूर्वी १८९६ सालीं रायगडावर पहिला उत्सव झाला होता. त्यानंतर टिळक सुटून आल्यावर झालेला उत्सव मोठ्या प्रमाणावर होता. तो फारच यशस्वी झाला. या उत्सवाला पुण्याहून आम्ही बरीच स्नेहीमंडळी बैलगाड्या करून भोर हिरडोशी वरंधा घाट या मार्गे महाडास गेलों. तेथून पाचाडच्या मार्गानें रायगडावर चढलों. या वेळी गडावरचा रस्ता फारच अडचणीचा होता. शेवटचा शे-दोनशें फूट रस्ता तर भयप्रद वाटे.

गडावर सर्व प्रकारचे कार्यक्रम झाले. रमणा झाला. मी एक वाढपी होऊन शेंकडों पानें वाढलीं. हें पाहून मला अंगमेहनतीबद्दल टिळकांनीं 'सर्टिफिकेट' दिलें! दुसरें दिवशीं संध्याकाळीं आम्ही परत शिवरामपंत परांजपे यांच्या घरीं आलों. त्या रात्रीं जेवण बिरवाडीस व्हावयाचें ठरलें होतें. पण गड उतरून दमून आलेली मंडळी बिरवाडीस जाण्याला हलेचनात. परांजपे यांच्या अंगणांतील मांडवांत तणावून लोळत पडली होती. या स्थितीत ८।९ वाजले. मग बैलगाड्या निघाल्या त्या रेरे करीत बिरवाडीस बाहेरच्या देवळांत रात्रीं दीड वाजतां पोंचल्या. मग तेथून वाजंत्र्यांच्या गर्दीत आणि उखळी बारांच्या धडाक्यांत टिळकांची मिरवणूक निघाली ती मुक्कामाच्या घरी अडीच वाजतां पोंचली. सुदैवानें स्नानें करण्याची टूम निघाली नाहीं म्हणून उजाडले नाहीं. पण सर्व मंडळी पात्रावर येऊन बसून भोजन सुरूं होण्यास पहाटेचे तीन वाजले. मेजवानीचा सर्व थाट यथास्थित होता. जेवणार सर्व मंडळी मुकटे कद नेसून सोवळ्यानें जेवीत होती. कपाळाला केशरी गंध साखळींनें लावण्यांत आलें. वाढणार बायका पितांबर नेसून सर्व शृंगार घालून वाढीत होत्या. जेवणाचे इतर पदार्थ निवाले होते. पण भात मात्र ऊन होता. अशा रीतीनें पहाटे तीन साडेतीन वाजतां झालेली ही मेजवानी माझ्या सगळ्या आयुष्यांत एकच म्हणून ती चांगलीच स्मरणांत राहिली आहे.

**दोन महत्त्वाचीं बिलें**—१९०१ सालीं दोन महत्त्वाचीं बिलें मुंबई कौन्सिलापुढें आलीं. एक मुंबई शहराबाहेरच्या म्युनिसिपालिट्यांच्या पुनर्घटनेचें, व दुसरें लँड रेव्हेन्यु कोडाच्या दुरुस्तीचें. पहिल्याचा हेतू म्युनिसिपालिट्यांत लोकमताचा प्रवेश थोडा अधिक करावयाचा, त्याच्या माथीं अवश्य खर्चांचीं अशी कांहीं खातीं लादावयाचीं, आणि म्यु. च्या मुख्य अधिकाऱ्यांना अधिक स्वतंत्रता द्यावयाची असा होता. या बिलाविषयीं फारसें रण माजलें नाहीं. परंतु दुसरें बिल अधिक आक्षेपार्ह ठरलें. या दुसऱ्या बिलाची योजना अशी होती कीं, जमिनीचे मालक सरकार असें प्रस्थापित करून कांहीं कांहीं जमिनी सरकारला त्यांना वाटेल त्याला कांहीं शर्तीवर देण्याचा अधिकार राहावा. ती जमीन खुंषें खरेदीनें विकतां येऊं नये किंवा सावकाराच्या कर्ज वसुलीकरितांहि विकली जाऊं नये. सरकारानें घातलेल्या अटी जोंपर्यंत खातेदार पाळील तोंपर्यंत त्यानें ती जमीन कसावी, पण कोणतीहि अट मोडतांच किंवा जमीन कसण्याची मुदत

संपतांच, कलेक्टरला ती जमीन त्याजकडून काढून घेतां यावी. या अटी मूळच्या सर्व्हे सेटलमेंटच्या कायद्याच्या विरुद्ध होत्या. पूर्वी सर्व्हे आक्टाप्रमाणें जमिनीचें एकदां खातें झालें म्हणजे खातेदार जोंपर्यंत ठरीव सारा देत राहील तोंपर्यंत ती जमीन त्याजकडे वंशपरंपराहि राही व ती त्याला विकतांहि येई. पण नव्या कायद्यानें कांहीं बाबतींत तो हक्क काढून घेतला. हें नवें तत्त्व लागूं करण्याला पडीक किंवा सरकारजमा झालेल्या जमिनी हव्या. अशा जमिनी पुष्कळच दुष्काळामुळें सरकाराच्या हातीं आलेल्या होत्या, व त्यांच्यावर हा प्रयोग करण्यांत येणार होता. सर्व्हे खातेदाराचा मुख्य हक्क म्हणजे खात्याची जमीन वेळ पडल्यास मालकाप्रमाणें विकण्याचा. पण नवीन अटीवर दिलेल्या जमिनी खातेदारास विकता येणार नाहींत ! तसेंच शेतजमीन शेतीखेरीज इतर कामाला कोणी लाविली तर बदलून सारा म्हणून नवीन प्रकारचा जमीनभाड्याचा कर तीवर बसणार. हल्लीं बदलून साऱ्याचा जो धुमाकूळ माजला आहे व जुलूम चालू आहे त्याचें बीजारोपण याच बिलांत झालें !

मराठ्याचा संपादक व केसरीचा उपसंपादक या नात्यानें या दुसऱ्या बिलाच्या विरुद्ध चळवळींत मी थोडासा भाग टिळकांच्या प्रोत्साहनानें घेतला. याच चळवळींत मी प्रथम वसई पाहिली, व तेथें या बिलाविरुद्ध व्याख्यान दिलें. म्युनिसिपल बिलाशीं माझा संबंध पुणें म्यु.चा सभासद या नात्यानें आला. त्या बिलाची छाननी करून त्यावर आपलें मत सरकारकडे कळविण्याकरितां पुणें म्यु.नें एक पोट कमिटी नेमली होती. तिचा एक सभासद मी असून चर्चेंत बराच भाग घेतला होता. तसेंच मुंबई येथें त्या साली, कराचीचें तैहलराम खेमचंद यांच्या अध्यक्षतेखालीं, अकरावी प्रांतिक सभा भरली होती तींत एक ठराव म्यु. बिलासंबंधानें पुढें आला होता त्याला अनुमोदन देऊन मी भाषण केलें. या ठरावांत असें म्हटलें होतें कीं, "म्यु.तून लोकनियुक्त सभासद ज्यास्त असावे या संबंधानें कायद्यांत कांहीं स्पष्ट कलमें नसून, शिवाय म्यु.त अधिक सभासद नेमावयाचे त्यांत जातींचा विचार करण्याचें नवीन तत्त्व पुढें आलें तें मान्य नाहीं." लोकनियुक्त सभासद असले तर म्यु.चें काम कसें चांगलें होतें याविषयीं रा. सा. मंडलीक, याज्ञिक, वगैरेंचीं उदाहरणें मी भाषणांत दिलीं होतीं.

**रँग्लर परांजपे:**—हे १९०० डिसेंबर अखेर मुंबईस व पुढच्या आठवड्यांत पुण्यास आले. त्या वेळीं पुण्यांत प्लेग असल्यामुळें मी गांवाबाहेर बळवंतराव

परांजपे यांच्या पडळींत राहात होतों. तेथेंच काशिनाथपंत केळकर, पूर्वीचे माझे राजाराम कॉलेजांतील अध्यापक, व या वेळीं पुणें जिल्ह्याचे डे. ए. इन्स्पेक्टर हे राहात असत. त्यांच्या माझ्या बोलण्यांत रँगलर परांजप्यांचा सत्कार करण्याची गोष्ट निघाली. पण हा सत्कार सुधारक नेमस्त पक्षाकडून होण्याची अपेक्षा स्वाभाविक होती. इन्स्पे. केळकर यांचे स्नेही त्या पक्षांत अनेक असल्यानें त्यांनी त्यांच्या जवळ ही गोष्ट काढून पाहिली पण ती मूळ धरीना. तेव्हां ते मला म्हणाले, 'नरसोपंत, तुम्ही मराठ्याचे संपादक म्हणून ही गोष्ट करणे योग्य होईल.' मी पूर्वी प्रिन्स रणजितसिंग यांच्या सत्कारांत पुढाकार घेतला होता. तो समारंभ मोठ्या प्रमाणांत होता. तो फर्ग्युसन कॉलेजच्या आवारांत झाला व त्याला सर चार्लस ऑलिव्हंट यांच्यासारखें सरकारी एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरहि आले होते. रँगलर परांजपे यांचा सत्कार साधा पुण्याच्या स्टेशनावर व्हावयाचा होता. त्याची व्यवस्था मी केली. प्रो. कर्वे वगैरे मंडळीहि त्यांच्या बाजूची आली होती. परांजपे यांच्या मनावर सनातनी पुण्याची छाप अजून होती. विशेषतः त्यांचे पालक प्रो० कर्वे व गुरु प्रो० गोखले यांच्या पोषाखाचा साधेपणा त्यांच्या डोळ्यांत भरलेला असल्यामुळें, परांजपे मुंबईस उतरतांच त्यांनीं पाटलोण टाकून देऊन धोतराचा आश्रय केला होता. आणि पुण्याच्या स्टेशनावर ते उतरले त एखाद्या नवऱ्या मुलाच्या थाटानें उतरले. म्हणजे धोतर नवें कोरें धुवट, पायांतील पुणेरी जोडा नवा म्हणून लालभडक, आणि नवऱ्या मुलाची विशेष खूण म्हणजे डोक्याला न बसणारी व केवळ उपचार म्हणून घातलेली पगडी ! परांजपे यांच्या धार्मिक मतांवर केसरींत अग्रलेख लिहून पुढें एकदां मी त्यांची हजेरी घेतली. पण त्यांचा पुण्यास प्रथम सत्कार करण्यांत मी प्रमुख होतों ही गोष्टहि खरी.

यासंबंधांत खालील पत्रावरून अधिक माहिती मिळेलः—

" रघुनाथ पुरुषोत्तम परांजप्यांच्या सन्मानाकरितां योग्य ती तजवीज नेमस्ताकडून झाली नाहीं याविषयीं तुम्ही टीका केली ती वाचली. ती वाचून बरें वाटलें. याविषयीं तुमच्या पक्षाकडून होणारी खटपट अधिक चांगली करा. येथें आम्ही सात हजार फंड जमविला. टिळकांना ही गोष्ट माहित आहे. हा फंड परदेशी विद्या शिकण्याला जाणाऱ्या हिंदु विद्यार्थ्यांकरितां आहे. हा फंड सहा

निरनिराळ्या सिव्हिल सर्व्हिस परीक्षांकरितां आहे. परांजपे रँगलर होऊन परत आले या गोष्टीने या हिंदु एज्युकेशन फंडाच्या कल्पनेला विशेष उत्तेजन मिळण्यासारखें आहे. किंबहुना मी म्हणतों तसें झालें तरच परांजपे यांचें खरें अभिनंदन केलें असें होईल. नुसते तोंडचे शब्द काय कामाचे ? या फंडासंबंधानें जहाल-मवाळ दोन्ही पक्षांत मतभेद दिसत नाही हें सुदैव म्हणावयाचें. महाराष्ट्रांतील मोठ्या शहरांवर तुम्हां लोकांचें जितकें वजन आहे तितकें नेमस्त पक्षाचें नाहीं. पण त्या पक्षातला एकादा गृहस्थ अध्यक्ष होण्याला मिळाला तर चांगलें होईल. इलाख्यांतील सर्व कॉलेजांकडून परांजप्यांचें अभिनंदन करून त्यांना एक सुंदर रुप्याची पेटी द्यावी अशा खटपटींत मी आहे. सिध कॉलेजनेंहि संमति पाठविली आहे. बहुधा न्या. मू. रानड्यांना सभेचे अध्यक्ष करूं आणि मेथा चंदावरकर यांना वक्ते म्हणून आणं. चिमणलाल सेटलवाड यांचीहि या कामीं मदत आहे. याच प्रसंगानें सरकारमागेहि असें टुमणें लावूं की १८६८ सालापासून, म्हणजे लॉर्ड लॉरेन्स यांच्या वेळेपासून, सरकारच्या मदतीनें हिंदी विद्यार्थी परदेशी पाठविण्याची योजना घाटत आहे ती आतां तरी पुरी करावी. हल्लीं लॉर्ड कर्झन यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी कोणी एक लॉरेन्सच आहे ! एल्फिन्स्टन कॉलेजांतील सभेनंतर फंडाची रकम जमविण्यास आम्हीं जोरानें लागूं. मद्रासेंतहि परांजप्यांच्या सत्काराचा ध्वनि उमटावा अशाविषयीं मी सेटलूर यांजकडून खटपट करवीत आहे. ( बाळकृष्ण नारायण भाजेकर, हायकोर्ट वकील, मुंबई. )

परांजपे यांच्या सुयशाची वार्ता इकडे १९०० च्या ऑगष्टांत आली तेव्हांच भाजेकर यांनी वरील पत्रांत उल्लेखिलेली उपयुक्त चळवळ सुरू केली. त्यानंतर चार महिन्यानीं परांजपे इकडे आले.

**मराठ्याचें रूपांतर:**—१९०२ सालीं टिळकांनी केसरीचीं पानें वाढविलीं. मात्र आकार तोच ठेवला. पुढच्या वर्षी मी मराठ्याचा आकार बदलून मोठा होता तो लहान करून त्याचीं पानें वाढविलीं. मराठ्याचा पूर्वीचा आकार साप्ताहिक पत्राच्या मानानें मोठा होता. म्हणून मुंबईतील इंग्रजी साप्ताहिकांचें धोरण डोळ्यापुढें ठेऊन मी मराठ्याचा आकार लहान व सोयीचा असा केला. नव्या स्वरूपाचा पहिला मराठा निघण्याला एक चांगला योग आला तो दिल्ली येथील दरबाराचा. या विषयावरील माझा अग्रलेख फारच चांगला उतरला होता. आणि मुंबईहून प्रि. द. ग. पाध्ये, संपादक 'इंदुप्रकाश', यांनीं आपण होऊन त्याबद्दल मला शाबासकी

लिहून पाठविली होती. मराठ्याचा आकार बदलावयाला टिळक मनांतून फारसे अनुकूल नव्हते. त्यांचे एक म्हणणें असें असे कीं वर्तमानपत्रानें आपलें अंतरंग हवे तितकें सुधारावें, त्याला मर्यादा नाहीं; पण आपलें बहिरंग शीर्षक इत्यादि गोष्टी होता होईतों जशाच्या तशा राखाव्या. त्यांच्या परंपरागतत्वामध्यें एक तऱ्हेचा सात्विक अभिमान असतो. याचें उदाहरण म्हणून त्यांनीं मला लंडन टाईम्सचें दिलें. तसेंच पीअर्ससोपच्या वड्यांच्या पेटीचें उदाहरणहि त्यांनीं दिल्याचें स्मरतें. ते म्हणाले, "हा श्रीमंतांचा साबू. आंतील वड्यांची किंमत बरीच असते. तथापि पेटीवरील कागद, त्यावरील रेखाचित्रण, पन्नास वर्षांपूर्वी होतें तसेंच्या तसें आज अगदी साधे आहे. यांतीरु प्रत्येक गोष्ट अधिक चित्ताकर्षक करण्याची कल्पना त्याच्या मालकाला काय सुचली नसेल ? पण नाही. जुनें तेंच सोनें या म्हणींतहि कांहीं तथ्य आहे." पण मराठ्याचा जुना आकार फाइली बांधण्याला ठीक नव्हता. विलायतेंत देखील साप्ताहिक वृत्तपत्रांचा आकार फ़ुलस्केपचा र असतो इत्यादि गोष्टी सांगून मी आकार लहान करून किंमत कमी करून आठ पानांचा मजकूर बारा पानांत बसविण्याचा आग्रह धरला तो टिळकांनीं शेवटीं चालू दिला. हा आकार परवांपर्यंत तसाच होता.

**सभा व परिषदा:**—यापुढें ज्या राष्ट्रीय सभा, प्रांतिक परिषदा, इत्यादिकांना मी प्रत्यक्ष हजर होतों व प्रत्यक्ष कार्यांत भाग घेतला व भाषणें केलीं त्यांची थोडीशी हकीकत एकत्र देतों:—

तारीख १४ सप्टेंबर १९०१ रोजीं मुंबई प्रांतांची ११ वी प्रांतिक परिषद मुंबई येथें सिंधचे पुढारी तेहेलराम खेमचंद यांचे अध्यक्षतेखालीं भरली. या परिषदेंत मुख्यतः नव्या लँड रेव्हेन्यु बिलाची चर्चा झाली. परिषदेतील तिसरा ठराव दुष्काळकोडासंबंधीचा होता. तो गोकुळदास पारेख यांनीं मांडला. टिळकांनीं त्याला अनुमोदन दिलें. दोन वर्षांपूर्वी साताऱ्यास या दोघांचा जो खटका उडाला होता तो आतां दोघेहि विसरून गेले होते. बाहेरचें संकट आलें म्हणजे घरांतील भांडण मिटते या सिद्धांताप्रमाणें हेहि झालें. मी म्युनिसिपल बिलावर भाषण केलें.

ता. २५ आक्टोबर १९०२ रोजीं बारावी प्रांतिक सभा सोलापूर येथें भरली. अध्यक्षस्थानीं चिमणलाल सेटलवाड हे होते. सोलापुरास ही सभा अगदीं आयत्या वेळी भरली. त्यामुळें तिचें स्वरूप बेताबाताचेच होते. या सभेला टिळक हजर

राहूं शकले नाहींत. कारण याच वेळी ताईमहाराज प्रकरणांत टिळकांवर झालेला फौजदारी खटला पुण्यास सुरू होता. सोलापूरची प्रांतिक सभा घाईने वेठीप्रमाणें उरकण्यांत आली याविषयीं केसरीनें वेळीच निषेध प्रकट केला होता.

१९०२ ची राष्ट्रीय सभा अहमदाबाद येथें भरली. या सभेस टिळक हजर राहूं शकले नाहींत. अहमदाबाद पुण्यापेक्षा श्रीमंत, तथापि नुकताच दुष्काळ होऊन गेल्यामुळें सभा कशी पार पडते याविषयीं चिंताच होती. पण मध्यम वर्गातील तरुण मंडळीच्या प्रयत्नानें सभा चांगली पार पडली. प्रतिनिधींची नेहमीची दहा रुपयांची फी वीस रुपये करण्यांत आली होती. आणि दिल्लीदरबाराकडे अनेक लोक गेल्यामुळेंहि प्रतिनिधींची संख्या बेताचीच होती. तथापि अध्यक्षस्थानीं बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी असल्यामुळें त्यांनीं ती वाण कांहींशी भरून काढली. सभेच्या बैठकींत महत्त्वाचे असे कांहींच झाले नाहीं. काँग्रेसचें काम सर्व वर्षभर चालावे अशी इच्छा एका पुढाऱ्यानें व्यासपीठावर प्रदर्शित केली. तेव्हां मी खालून आपल्या जागेवरून उठून म्हटले कीं, "तुमचा नुसता उपदेश नको, तुम्ही व्यासपीठावर बसलेले लोक वर्षात बाहेर पडून राष्ट्रीय सभेवर जितकी व्याख्यानें द्याल त्याच्या सहापट व्याख्यानें आम्ही व्यासपीठाखाली बसलेले गरीब लोक देऊं." यामुळें सभा संपल्यावर सुरेंद्रनाथ यांनीं मला आपल्या बंगल्यावर बोलावून घेऊन या मुद्याची चर्चा केली. यावर्षी राष्ट्रीय सभेला जोडून औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. हा नवा उपक्रम मात्र लोकांना फार पसंत पडला.

१३ वी मुंबई प्रांतिक परिषद तारीख २६ मार्च १९०३ रोजीं धारवाड येथें भरली. पांडुरंगराव आठवले वकील हे स्वागताध्यक्ष असून अध्यक्षस्थान दाजीसाहेब खरे यांना देण्यांत आले होते. या परिषदेला टिळक हजर होते याचें कारण तेथें जमिनबाबीच्या विषयाची चर्चा विशेष व्हावयाची होती. अध्यक्ष दाजीसाहेब खरे यांच्या भाषणांतील महत्त्वाचा बहुतेक भाग या विषयाकडेच दिला गेला होता. आणि टिळक व खरे या दोघांनीं बसून अनेक जुने रिपोर्ट व सरकारी ठराव वाचून, हल्लीची जमीनमहसूलपद्धति जुन्या पद्धतीपेक्षां जाचक कां व कशी आहे याचें सप्रमाण विवेचन लिहून काढलें होतें. हा विषय परिषदेच्या आठव्या नंबरच्या ठरावानें मांडण्यांत आला. तो दादासाहेब करंदीकर वकील यांनीं मांडला. आणि त्यावर टिळकांनीं विस्तृत भाषण केलें.

परिषदेला मुंबईची मंडळी आली नव्हती. पण फेरोजशहा मेथा यांच्या प्रभावळींतील दाजीसाहेब खरे हे असल्यानें मुंबईकर मंडळी हजर नव्हती असे भासले नाहीं. टिळक यंदाहि वास्तविक आपल्या खटल्याच्या कामांत पुष्कळसे गुंतले होते. तथापि दाजीसाहेब खरे यांच्या स्नेहाखातर, आणि त्यांच्या व धारवाडकरांच्या आग्रहावरून, टिळकांनी सवडींत सवड काढली व ते परिषदेला हजर राहिले. इतकेंच नव्हे तर वर सांगितलेले खरे यांचें भाषण तयार करण्यांतहि त्यांनीं बरीच मदत केली. जमीनमहसुलाच्या या विषयाला यापूर्वी दोन वर्षें एकसारखें महत्व आलेले असून मुंबई कायदेकौन्सिलच्या जुन्या इतिहासांत ज्या ज्या चळवळी झाल्या त्यांत जमीनमहसूलाची चळवळ ही अत्यंत स्मरणीय अशी झाली.

धारवाडच्या प्रांतिक परिषदेबरोबर प्रांतिक सामाजिक परिषदहि भरली होती. अध्यक्षस्थानी विष्णु मोरेश्वर महाजनी हे होते. महाजनी हे सुधारणावादी असले तरी त्यांच्या व इतर सुधारकांच्या वृत्तींमध्ये फरक होता. अर्थात् त्यांचें भाषण अशा परिषदेच्या अध्यक्षांच्या नेहमींच्या भाषणाहून थोडे वेगळे झाले. "जी कांहीं सुधारणा करणें असेल ती धिम्मेपणानें व कळकळीनें केली पाहिजे. स्वतःचें आचरण व हेतु शुद्ध असल्यास आपल्या खऱ्या स्वभावानें कोणाहि मनुष्यास आपल्या घरची माणसे वश करून घेता येतात. सुधारक म्हणविणारांपैकीं कित्येक लोक मद्याच्या व्यसनापासून अलिप्त नसल्यानें त्यांच्या आचरणाचे शिंतोडे सुधारणेच्या कार्यावरहि पडले" असें त्यांनी उघडपणे सांगितले. सार्वजनिक शिक्षणांत धर्मशिक्षण असले पाहिजे असेंहि त्यांनी मत दिलें.

१९०३ ची राष्ट्रीय सभा मद्रास येथें भरली. या सभेला टिळकांना हजर रहातां आलें नाहीं. कारण यापूर्वी ताईमहाराजांच्या खटल्यांत मॅजिस्ट्रेट क्रेमंट्स् यांनी त्यांना दीड वर्षाची शिक्षा दिली होती, आणि या शिक्षेवरच्या अपीलाची सुनावणी सेशनजज्ज मि. ल्युकस यांच्यापुढें डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यास होऊन फक्त निकाल सांगण्याचें काम तहकूब राहिलें होतें. पण बसल्या जागीं टिळकांचें लक्ष मद्रासच्या सभेकडे होतेच. आणि ते कसे काय होते हें ता. २९ डिसेंबरच्या केसरीतील अग्रलेखावरून वाचकांना दिसून आलें. या अग्रलेखावर टिळकांनीं ऋग्वेदांतील मंडूक सूक्तांपैकीं एका ऋचेचें अवतरण घेतलें होतें. तिचा अर्थ असा:—"एक जण बैलासारखा तर एकजण बेडकासारखा ओरडतो. एक

जण पिवळट तर एक टिपकेदार ! हे बेटे बेडूक देवानें नेमिलेल्या बाराव्या महिन्याची वेळ कशी अगदीं जपून पाळतात. कधींच चुकवीत नाहींत." हें अवतरण उपहाससूचक आहे यांत शंका नाहीं. ही उपहासबुद्धि सुचण्याचें कारण टिळकांनी पुढें लेखांत स्पष्ट केलें होतें. ते म्हणतात 'राष्ट्रीय सभेनें अठरा वर्षें खटपट करून सर्व न्यायाच्या मागण्या जोरानें सरकारपुढें ठेवल्या. पण पूर्वी एक वेळ स्वतः सरकारला या सभेचें जें भय वाटत होतें तेंहि त्यांना हल्लीं वाटत नाहीं. हें पाहून राष्ट्रीय सभावाल्यांनाहि आपलें कांहीं तरी चुकते आहे अशी शंका सहजच सुचते. सनदशीर चळवळ हाच राष्ट्रोन्नतीचा खरा मार्ग असेल तर तो आम्हाला फलद्रूप कां न व्हावा ? आणि तो मार्ग खरा नसेल तर तो सोडून देऊन दुसरा एकादा अधिक श्रेयस्कर मार्ग कां न स्वीकारावा ?'

मद्रासच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष लालमोहन घोस हे होते. घोसबाबू हे मोठे नामांकित वक्ते. किंबहुना त्यांच्या वक्तृत्वापुढें सुरेंद्रबाबूंचेहि वक्तृत्व फिकें पडें. याचें कारण त्यांचा आवाज गोड व मोहक असून भाषा सुरेंद्रबाबूंच्या भाषेहून अधिक सुटसुटीत व सुश्लिष्ट अशी असे. खुद्द विलायतेंत देखील त्यांच्याइतकें इतर कोणाहि हिंदी वक्त्याचें वक्तृत्व लोकांना पसंत पडत नसे असें म्हणत. पार्लमेंटमध्यें शिरण्यास ते सर्वस्वी लायक असल्यानें, व त्यांना ती महत्त्वाकांक्षाहि असल्यानें, त्यांनीं उमेदवारीची खटपट एक वेळ करून पाहिली होती पण ती फसली. मद्रास काँग्रेसच्या सुमारास घोसबाबू हे सर्व व्यवहार टाकून देऊन एकांतवास पत्करण्याच्या बेतांत होते. पण मेथा वगैरे नेहीमंडळींच्या आग्रहानें मद्रासचे अध्यक्षपद त्यांनीं स्वीकारलें. तथापि एक मुख्य भाषण करण्याखेरीज त्यांच्या हातून या सभेंत दुसरें कांहींच झालें नाहीं, व तें त्यांचें भाषणहि त्यांच्यावरील मद्याच्या गुंगीमुळें मधून मधून खंडित असेंच झालें. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचें काम करीत असतांहि ज्यांना मदिरामोह आवरला नाहीं त्यांच्याकडून मार्गदर्शकाचें काम कितपत होणार ! ही त्यांची उणीव त्यांच्याबरोबर परिचारक म्हणून आलेले त्यांचे जांवई डॉक्टर शरद् मलिक यांनीं आपल्या तरतरीनें थोडीबहुत भरून काढली. इतर रीतीनेंहि ही राष्ट्रीय सभा बेताचीच झाली. कारण मद्रासेकडे डिसेंबरच्या अखेरीच्या सुमारास पाऊस पडतो तो त्या सालीं फार पडला. प्रतिनिधींची गैरसोय झाली. सभेच्या मंडपांत व कँपांतून लहान लहान तळीं साचलीं. एका ठिकाणांहून दुसरें ठिकाणीं जाणें अतिशय कठिण झालें. आणि जेवणाच्या पंक्ति वाढाव्या

तों पाणी शिरून पानें पत्रावळी तरंगू लागाव्या असेंहि केव्हां केव्हां घडले. सभेचें काम पावसामुळें अर्धा एक दिवस बंद पडले. पण तें कसे तरी संपविलेच पाहिजे म्हणून सभा अखेर एका इमारतीच्या मुख्य दालनांत भरविण्यांत आली. सभेंत झालेल्या बहुतेक ठरावांचा कटाक्ष कर्झनशाहींतील अनेक दुष्कृत्यांवर होता. खुद्द मद्रासचें एक गाऱ्हाणें प्रमुखपणें मांडण्यांत आले तें मद्रास इलाख्याचा उत्तर भाग तोडून ओरिसा प्रांताला चिकटविल्यासंबंधाचे होतें. ही देखील एक प्रकारची फाळणीच होती आणि या गाऱ्हाण्याला बंगाली पुढाऱ्यांनीं आपला पाठिंबा दिला याचें कारण बंगाल प्रांताचीहि फाळणी पुढें लवकरच होणार असे दुःस्वप्न त्यांना पडूं लागले होते. या बड्या क्षोभकारक फाळणीची तयारी गुप्तपणें कर्झनशहाच्या दरबारच्या अंतरंगांत सुरू होती. आणि या कारस्थानाचें झिरपे थोडथोडे बाहेर येऊं लागले होते. तथापि या विषयावर स्वतंत्र ठराव करण्याइतकें परिणत स्वरूप या विषयाला अद्यापि आलें नव्हते असें आठवतें

१९०३ च्या राष्ट्रीय सभेच्या पूर्वी ए. ओ. ह्यूम व वेडरबर्न वगैरेंनीं हिंदुस्थानांत जागृति उत्पन्न होण्याकरितां एक पत्र इकडील पुढाऱ्यांना पाठविलें होतें. त्याचा उपयोग विशेष झाला नाहीं. यावेळीं मि. डिग्बी, प्रो. गोखले यांच्या सांगण्यावरून विलायतेंतील 'इंडिया' नामक काँग्रेसच्या मुख्य पत्राकरितां वर्गणीदार मिळविण्याचें पुण्यांतील बरेंच काम मी स्वतः घरोघर हिंडून केल्याचें स्मरतें. १९०४ सालीं मुंबईस राष्ट्रीय सभा भरण्याचे ठरले तेव्हां तिची वर्गणी जमविण्याच्या उद्देशानें मुंबईचे हायकोर्ट वकील व फेरोजशहा मेथा यांचे सहाय्यकारी, नारायण विष्णु गोखले यांनीं रुपयाफंडाची कल्पना काढली. ती पैसाफंडाच्या कल्पनेवरून निघाली. "एक रुपयाफंड काढून मुंबईच्या बैठकीला मदत होईल किंवा एकादा लहानसा कायमनिधीहि जमेल. पण सभेचें काम वर्षभर करण्यास कोणी तयार असल्याशिवाय फंडाचा तरी काय उपयोग !" अशी टीका त्यावर इतरांकडून झाली. वुइल्यम डिग्बी यांनीं राष्ट्रीय सभेचें काम अखंड चालण्याकरितां एक योजना केली. "फिलिपाईन बेटाप्रमाणें हिंदुस्थाननें जर प्रयत्न केला आणि आशियाखंडांतील जागृतीचा फायदा घेतला तर फिलिपाईन बेटाइतकें स्वातंत्र्य हिंदुस्थानाला मिळेल" असें मत मि. डिग्बी यांनीं व्यक्त केलें. त्या बेटांतील लोक हिंदी लोकांप्रमाणेंच परतंत्र होते ! पूर्वी ब्रॅडलासाहेब इकडे आल्यापासून विलायतेंत हिंदी वकिलात स्थापण्याची कल्पना निघाली होती. पण तें खर्चाचें काम हें एक. शिवाय आपला वेळ मोडून

काम करण्यास कोणी तयार नव्हता. अलाहाबादच्या 'इंडियन ओपिनियन' पत्रानेंहि असेच लिहिले. "हिंदुस्थानांत राजकीय चळवळीला यश न येण्याचें कारण हेच कीं पुढारी अंग मोडून मेहनत करीत नाहींत. उलट तेलंग, चंदावरकर, तय्यबजी, सुब्रह्मण्य अय्यर, शंकरन् नायर या काँग्रेस पुढाऱ्यांनीं पुढें सरकारी नोकरी पत्करली." हा वाद मुंबईच्या काँग्रेसपर्यंत मधून मधून असाच चालला होता. आणि त्याचा उच्चार ह्या सभेंत झालाहि. अद्यापि नेमस्त व जहाल यांतील भेद मात्र स्पष्टपणें व्यक्त झाला नव्हता. यामुळें 'काँग्रेसमध्यें राहून काँग्रेसला नांवें ठेवणारे' म्हणून जहाल पक्षाला कोणास नांवें ठेवतां येत नव्हती. उलट काँग्रेसच्या त्या वेळच्या पुढाऱ्यांना नांवें ठेवणारे गुरू उपगुरू ह्यूम वेडरबर्न हेच होते हे लक्षांत घेतले म्हणजे भांडणाचें खरें मूळ कशांत होतें हें कळून येईल.

२० वी राष्ट्रीय सभा मुंबईस ता.२४ डिसेंबर १९०४ रोजी भरली. स्वागताध्यक्ष सर फेरोजशाहा मेथा व अध्यक्ष सर हेन्री कॉटन हे होते. कॉटनसाहेब हे नुकतेंच सरकारी नोकरींतून सुटले असल्यामुळें, आणि राष्ट्रीय सभेला त्यांची प्रथमपासून सहानुभूति असल्यामुळे, त्यांना हौसेने अध्यक्ष निवडण्यांत आले. पूर्वीचा मुनित्रयांचा खलिता लिहिणाऱ्यांपैकी हे एक होते. बरोबर सर वुड्न्यम वेडरबर्न हेहि आले होते. या दोघांची मिरवणूक मुंबईत मोठ्या थाटाची निघाली. मद्रास राष्ट्रीय सभेच्या पूर्वी, टिळकांनी दर्शविल्याप्रमाणें, हिंदुस्थानांत व विलायतेत राजकीय स्वरूपाचे सभेचे काम सतत जोराने कसे चालावे हा मुख्य प्रश्न याहि सभेपुढें होता. त्याविषयीं टिळकांनीं या दोघांकडेहि जाऊन खासगी रीतीनें त्यांची चर्चा केली. मतभेद किंवा भांडणें उघडपणानें झालीं नाहींत. मात्र सर फेरोजशाहा मेथा यांच्यावर लाला लजपतराय यांनीं कांहीं आरोप केले होते. म्हणून त्या दोघांची थोडीशी खडाजंगी विषय-नियामक-मंडळांत झाली. नेमस्त व जहाल असे स्पष्ट पक्षभेद अद्यापि व्हावयाचे होते. याविषयीं कॉटनसाहेब आपल्या आठवणीच्या ग्रंथांत लिहितात "बाळ गंगाधर टिळक हेहि आपल्या अनुयायांसह तेथें आले होते. पण या वेळीं जहाल मवाळ हा भेद नव्हता. कारण एका अर्थानें सगळेंच या वेळीं नेमस्त किंवा मवाळ होते!" टिळक यांचें स्वागत मंडपात मोठ्या थाटानें झालें. मुसलमान काँग्रेस-भक्त अली महमद भिमजी यांनीं टिळकांचा जयजयकार करण्यांत पुढाकार घेतला. ज्यांना व्यक्तिशः टिळकांविषयीं स्नेहभाव वाटत नव्हता असेहि लोक या जयजयकारांत

सामील झाले. कारण त्या सालीं मुंबई हायकोर्टानें त्यांना फौजदारी खटल्यांतून दोषमुक्त करून सोडून दिले होते.

राष्ट्रीय सभेला घटना असावी असें पहिल्या पांचचार वर्षांतच लोकांना वाटूं लागले होते व तोहि एक विषय वादाचा होता. राष्ट्रीय सभेच्या दहाव्या वर्षी म्हणजे १८९५ सालीं पुण्यास ही सभा भरली तेव्हां या प्रश्नाला बराच रंग आला होता. कांहीं घटना कोणी कोणी तयार केल्या होत्या व त्यांचा विचार करण्याकरितां कमिटीहि नेमण्यांत आली होती. परंतु कॉंग्रेसचे पुढारी पुष्कळसे सर फेरोजशहा मेथा यांच्या मताचे होते. त्यांना राष्ट्रीय सभेला घटना अशी नको होती. वर्षांतून चार दिवस जमावे. कोणी ती चार दिवसांची धामधूम म्हणावी. कोणी शांतपणें चर्चा करण्याची परिषद म्हणावी. पण त्या चर्चेंत जे काय निघेल तितकाच जमलेल्या लोकांना किंवा राष्ट्राला फायदा. "आपापल्या प्रांतांत जे कोणी लोकमत प्रकट करतील त्यांचें एकीकरण करणारी सभा ही राष्ट्रीय सभा मानावी" हे सर फेरोजशहा मेथा यांचे मत १९०२ सालीं सोलापूर प्रांतिक परिषदेच्या वेळी चिमणलाल सेटलवाड यांनीं मुंबईचें मत म्हणून प्रकट केलें होतें. पण लाला लजपतराय वगैरे मंडळींना ही गोष्ट मान्य नव्हती. पंजाबांतील प्रतिनिधि १९०२ सालीं अहमदाबादेस आले नव्हतेच, पण विनवणी केल्यामुळें १९०३ सालीं कांहीं मद्रासेस गेले होते, तेहि निराश होऊन परत गेले; व राष्ट्रीय सभेला घटना असावी कीं नसावी यावरून १९०४ सालीं मेथा व लजपतराय यांचें मुंबईस भांडण झालें.

राष्ट्रीय सभेंत असले हें भांडण मी प्रथमच पाहिले. कार्यक्रमांत घटनेचा विषय निघाला तेव्हां, लाला लजपतराय हे कोठें दिसेनात असें फेरोजशहा मेथा यांना वाटून, "आयत्या वेळीं तोंड चुकवितात, आणि मग पाठीमागें टीका करितात" असें कायसेसे ते बोलले. खरोखर लजपतराय यांनीं तोंड चुकविले नव्हते. ते दूर अंतरावर कोणाशीं बोलत उभे होते, म्हणून त्यांना मारलेली हांक ऐकू गेली नाहीं. पण मेथा यांची टीका त्यांना कोणी जाऊन सांगताच लालाजी फणफणत दणदणत येऊन समोर उभे राहिले आणि "तुमचे काय म्हणणें आहे बोला!" असा सवाल त्यांनीं मेथा यांना केला. आणि "घटनेसंबंधीं तुमची काय तक्रार आहे ती सांगा" असे मेथा यांनीं म्हणतांच, लालाजींनीं सुमारें वीस मिनिटें जोराचें भाषण करून घटनेची आवश्यकता प्रतिपादिली व शेवटीं "तुम्ही मुंबईचे पुढारीच घटनेला विरोध करता" असा आरोपहि केला.

या मुंबई काँग्रेसच्या प्रसंगीं टिळकांबरोबर मी सर हेन्री कॉटन, मेथा इत्यादि लोकांना भेटलों. त्यांच्याशीं वाद करण्याचें, प्रश्नोत्तरें करण्याचें काम टिळकच करीत. तो अधिकार माझा नव्हता. तथापि मी त्यांच्याशीं बोलण्यांत मुळींच भाग घेत नसे असे नाही. मधून मधून आपलें म्हणणे, मात्र मोजक्या शब्दांनीं, मांडी. मी बरोबर असतां मला बाहेर बसवून टिळक एकटे आंत आऊन मोठ्या माणसाशीं बोलले असे बहुधा घडत नसे. ते थोरामोठ्याशीं माझी ओळख 'हे आमच्या मराठ्याचे संपादक' अशी मुद्दाम करून देत. कारण पुढें माझेहि अशा लोकांशीं दळणवळणाचे प्रसंग येणार हें त्यांस माहीत असे. हे बडे लोक मराठा पत्र नित्य वाचणारे नसले तरी माझे विशिष्ट लेख त्यांच्या नजरेला पडत, यामुळें माझी त्यांची मनोमन ओळख आधीच झालेली असे.

**करंदीकर–दीक्षित**—१९०१ सालीं मुंबई कायदे कौसिलची निवडणूक उभी राहिली तेव्हां दादासाहेब करंदीकर वकील आणि हरि सिताराम दीक्षित सॉलिसिटर असे दोघे उमेदवार होते. एका अर्थाने दोघे माझे स्नेहीच. पण मी पूर्वीचा सातारकर म्हणून माझ्यावर दादासाहेबांचा हक्क त्यांतल्यात्यांत अधिक. तार मास्तरांच्या संपांतील कामामध्यें दीक्षित व मी सहकारी होतों म्हणून त्यांनाहि मदत मागण्याचा हक्क होता. पण त्यांना माझ्या मदतीची फारशी अपेक्षा दिसली नाहीं. त्यांना गोपाळराव गोखले यांच्या पक्षाची सर्वस्वी मदत होती. तशीच मुंबईच्या मेथा कंपूचीहि. दादासाहेब करंदीकरांनी १८९९ च्या निवडणुकींत टिळकांना दगा दिल्यामुळें त्यांना टिळकांचें सहाय्य मागण्याचा हक्क त्या दृष्टीनें उरला नव्हता. तथापि ताई महाराज प्रकरणांतील वकीलपत्र दादासाहेबांकडे असे. यामुळें एक नवा वेगळा हक्क उपस्थित झाला होता. या दोन्ही नात्यांनीं मी धुळ्यास करंदीकरांच्या करितां खटपट करावयास गेलों होतों. तेथील स्नेही व खटपटीचे क्षेत्रोपाध्ये बहाळकर बंधू (नाना व तात्या) हे दोघे रा. सा. श्रीधर बाळकृष्ण उपासनी पेन्शनर सबजज यांचे भाऊ. धुळ्यास त्यांचें वजन फार. त्यांच्या सहाय्यानें बाबासाहेब गरूड यांना आपलेसें करून धुळें जिल्ह्यांतील सर्व मतें आम्हांस करंदीकर यांजकरितां मिळवितां आलीं. परंतु महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांतून मिळावीं तितकी मतें न मिळाल्यामुळें अखेर दीक्षित सॉलिसिटर हे विजयी झाले. निवडणुकीची खटपट म्हणून काय असते यांची कल्पना मला तेव्हां प्रथमच आली. ती अशी कीं जि. लोकलबोर्डाच्या एका सभेंत निवडणुकीचा निकालच लागे. कारण या सभेंत अंतिम मतदार निवडले

जातील त्यांनींच मतें द्यावयाची. आणि आधीं खासगी खटपटीनें आपलेसे झालेले लोक मतदार म्हणून निवडून आले म्हणजे मग त्यांच्याकडून मतपत्रिका भरून घेणें एवढेंच काम उरे. १९०१ सालीं मी भुळ्यास गेलों असतां माझें 'राष्ट्रीयत्व' या विषयावर टॉवर बागेंत व्याख्यान झालें. येथपासून माझ्या जाहीर व्याख्यानांना सुरुवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं.

**स्वदेशी कंपनीचा अनुभव** (१९०४)—यापूर्वी थोडे दिवस "स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स' या नांवाची एक कंपनी रजिस्टर झाली. तिचा मी डायरेक्टर व चेअरमन निवडलो गेलों. ग. वि. चिपळूणकर नांवाच्या एका गृहस्थाचें शिंप्याचें दुकान पुण्यास बुधवार पेठेंत होतें. त्यांना या कंपनीची कल्पना सुचली. मी अडीचशें रुपयांचे शेअर घेऊन डायरेक्टर झालों. स्वदेशीच्या नव-युगीन मतप्रसारास नुकतींच सुरुवात झाली होती. कंपनीचें दुकान बरें चालू लागलें. चार पैसे येऊन पेटींत पडू लागले. भागीदारांना नफा वांटलाच पाहिजे हे स्वदेशीच्या शास्त्रांत सहसा बसतच नाहीं! म्हणून पेटींतल्या पैशाला बाहेर पाय फुटले. चिपळूणकरमंडळींनीं त्या पैशाचा उपयोग प्रथम भारत भागवत या संस्कृत ग्रंथांच्या छपाईकडे केला. त्यांत त्यांना नफा झाला असें दिसतांच दुकान मागें पडूं लागलें. म्हणून दुकानाला नवी जागा ढमढेरे यांच्या वाड्यांत माडीवर घेतली. मग चिपळूणकर म्हणू लागले कीं "मला मुंबईस दुकानाची एक शाखा काढूं द्या." म्हणून काळबादेवी रस्त्यावर बिवलकरांच्या माडीवर दुकान घातलें. पण दुकानाकरितां नवा माल आणण्यांत भांडवल खर्च व्हावें तें भारत भागवत प्रकाशनांत गुंतून राहू लागलें. या गोष्टीला आम्ही हरकत घेतली. तेव्हां भागी-दारांच्या सभेंत बहुमत करून प्रॉक्सीच्या जोरावर चिपळूणकर यांनीं आम्हास डायरेक्टरच्या जागेवरून काढून आपले दुसरे साथीदार डायरेक्टर निवडून घेतले! ही गोष्ट केसरींत प्रसिद्ध होतांच कंपनी एकदम वसली. चिपळूणकर यांचें दिवाळें वाजण्याची वेळ आली. त्यांनीं मुंबईहून मला लिहिलें कीं "मला येऊन वांचवा नाहीं तर जीव देतों." मग मी माझे स्नेही गणपतराव साठे ऑडिटर यांना मुंबईस नेऊन, तेथील सर्व निरवानिरव करून, कंपनी आपखुषीनें लिक्विडेशनमध्यें काढण्याचा ठराव करून घेतला. फडके वकील यांना लिक्विडेटर नेमून भागीदारांस रुपयांत सुमारें तीन आणे मिळवून दिले. पण या कंपनीच्या घोळांत माझे निदान सहासातशे तास

व्यर्थ खर्ची पडले असावे असा माझा अंदाज आहे ! ही सर्व हकीकत चार-पांच वर्षांची आहे. पण सोईकरितां ती सर्व एकत्र सांगितली.

**कौटुंबिक आपत्ति**—१९०४ च्या ऑगस्ट महिन्यांत धुळें येथें माझे सर्वांत वडील बंधु नाना हे नवज्वरानें वारले. वडील व मातोश्री पूर्वीच कांहीं दिवस तेथें होतीं. पुण्यास नानांचें कुटुंब प्रसूत होऊन अवघे बारा दिवस झाले होते. मुलाचें बारसें रहित करून त्यांच्या अडीच वर्षांच्या थोरल्या मुलाला बरोबर घेऊन मी धुळ्यास गेलो. त्यानंतर दोन तीन दिवसांनीं ते वारले. त्या प्रसंगाचें मी वर्णन करूं शकत नाहीं. रडून रडून माझे डोळे दुखरे होण्याची वेळ आली. लगेच वडील-मातोश्रीना घेऊन मी पुण्यास आलों. कांहीं दिवसांनीं नानांच्या कुटुंबाला आमच्या वडील बंधूंनी आपल्या जवळ राहण्यास व थोरेपालट करण्यास नेलें. पण तीहि नंदुरबार येथें अवघ्या सहा महिन्यांनीं वारली. अशा रीतीनें आमच्या कुटुंबाचा एक खांब ढासळला. नानांच्या संबंधी सविस्तर माहिती मी या ग्रंथांत पूर्वी दिलीच आहे.

**गायकवाडवाड्याची खरेदी**—या नंतर कांहीं दिवसांनी टिळकांना गायकवाड सरकारांनीं पुण्यांतील गायकवाड वाडा खरेदी दिला. त्याची सर्व रक्कम देण्याला टिळकांजवळ नव्हती. त्यामुळें त्यांना दहा हजार रुपये कर्ज काढावें लागलें. यावरून त्यावेळीं त्यांची सांपत्तिक स्थिति काय होती हें दिसून येईल. कर्मधर्मसंयोगानें माझ्या बंधूंच्या विम्याची रक्कम याच सुमारास हातीं आली तीहि मला या कामीं लावतां आली. पुढें सहा महिन्यांनीं केसरी कचेरीनें ती रक्कम मला परत केली. खरेदीच्या सर्व रकमेचा चेक घेऊन मी बडोद्यास गेलों व ती सरकारी खजिन्यांत भरून पावती घेऊन आलों. तीच पावती पुढें पुण्यास रजिस्टर केली. दरबारशीं व्यवहाराचा संबंध असल्यामुळें मालकी हक्काला एवढा आधार पुरला म्हणून खरेदीखताची स्टँपडयुटि वांचली. हा वाडा खरेदी घेतला तेव्हां त्यांतील इमारत थोडी व फार जुनी होती. केसरीकडे असलेल्या या वाड्याच्या भागांतील आजच्या बहुतेक सर्व इमारती नवीनच बांधलेल्या आहेत.

**जुन्नरचा दौरा**—१९०४ च्या एप्रिलांत टिळक आम्हां अनेक मंडळीसह जुन्नरास गेले. घोड्याचा मोठा शिग्राम व टांगे केले होते. परंतु सर्व मजल संपण्याला बारा तासहि पुरले नाहींत. टिळकांचे दौरे ताई महाराज खटल्याचा निकाल लागल्यापासूनच खरे सुरू झाले. जुन्नरास सत्काराची शर्थ झाली. जुन्नरच्या आसपास यापूर्वी

नुकतेच कांहीं दरोडे पडले होते. त्यावरून टिळक सहज बोलतांना म्हणाले कीं "पुण्याहून जुन्नर इतकें दूर आहे ते बरेंच म्हणावयाचे. उद्यां कोणाला बंड करावयाचें झालें तर बंडवाल्याला दोन दिवस तरी निवांत मिळतील. पुढें लष्कर किंवा पोलीस येईल ते पहातां येईल." पण आतां मोटारीनें जुन्नरचा प्रवास दीड तासांतहि होऊं शकतो !

**वेदोक्त व ग्रामण्य**—१९०४ च्या जुलै महिन्यांत सयाजीराव गायकवाड पुण्यास आले तेव्हां त्यांनी इतर लोकांबरोबर मलाहि भेटीस बोलाविलें होतें. महाराजांची व माझी ही पहिलीच भेट. संभाषणांत महाराजांचा आवडता धर्मशिक्षणाचा, धर्मविधि चालविणाऱ्या उपाध्येपुरोहितांचा, ग्रामण्यांचा, व वेदोक्त कर्माचा इतके प्रश्न चर्चेला निघाले होते. त्यांत सार्वत्रिक धर्मशिक्षणाच्या योजनेविषयीं मी संमति दर्शविली. ग्रामण्याविरुद्ध सुशिक्षितांनीं बंड केलें पाहिजे असें मी सांगितलें. पुरोहित व उपाध्ये यांच्यासंबंधी कायदा करूं नये असें माझें मत होतें तें मी सांगितलें. आणि वेदोक्तासंबंधीं मी थट्टेनें म्हणालों कीं " ही चळवळ बडोद्याहूनच प्रथम सुरू झाली असें म्हणतात व कोल्हापूरकर महाराजांना लोक उगाच दोष देतात. मात्र क्षत्रियांना वेदाधिकार आहे हे कोणी कधींच नाकबूल करीत नाहीं." या सालीं पुण्यांत एक दोन ग्रामण्यें झालीं. माझ्यावरील ग्रामण्य चालूं होतें, व टिळकांनीं आपल्यावरील ग्रामण्याचा अनुकूल निकाल करून घेऊन पुण्यांत नवीन धर्मसभाच स्थापण्याचा उपक्रम करण्याचा विचार मनांत चालविला होता.

**पैसाफंड**—याच सालच्या डिसेंबर महिन्यांत मी व अंताजीपंत दामोदर काळे यांनी मिळून एक विनंतिपत्र केसरींत छापलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं, काळे हे जरी पैसाफंड जमवित असले व केसरी पत्र त्यांना उत्तेजन देत असले तरी, एखादी संघटित पैसाफंड कमेटी स्थापल्याशिवाय या कार्याला जोर येणार नाहीं. अंताजीपंत काळे हे माझ्याशीं कितीहि भांडोत, परंतु पैसाफंड कमेटीचा उगम त्यांच्याबरोबर माझ्यापर्यंतहि पोंचतो. आदलेवर्षी मी व अंताजीपंत काळे यांनीं काढलेल्या पत्रकाप्रमाणें मध्यवर्ती शाखा व पैसाफंड कमिट्या स्थापन होऊं लागल्या. त्यापैकीं मध्यवर्ती कमिटीचा एक सभासद तर मी नेमला गेलोंच, पण पुणें जिल्ह्याकरितां स्थापिलेल्या पैसाफंड कमिटीचा चिटणीसहि मला व्हावें लागलें. पुढें हे काम कवडेशास्त्री यांनीं आपणाकडे घेतले. मी पैसाफंडावर एक अष्टक पद्यात्मक रचलें व स्वतः घरोघर हिंडून पैसाफंड गोळा केला.

**टिळक व गोखले**—१९०५ सालापासून राष्ट्रीय चळवळीला बराच जोर चढला. वंगभंगाच्या चळवळीला बंगाल्यांत खरी सुरुवात झाली होती. नामदार गोखले विलायतेस जाऊन मोर्लेसाहेबांच्या गांठी घेऊन हिंदुस्थानांत परत आल्यावर बनारस येथें भरणाऱ्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान त्यांना द्यावें असें ठरलें होतें. गोखले हे टिळकांचे प्रतिपक्षी असले तरी, आणि त्यांचीं राजकीय मतें टिळकांना सौम्य अशी वाटत असली तरी, व्यक्तिशः गोखले हे एकनिष्ठेनें व परिश्रमपूर्वक कार्य करीत त्याविषयीं टिळकांची आदरबुद्धि मनांतून असे. याचें प्रत्यंतर पुण्यास गोखल्यांचा जो जाहीर सत्कार झाला त्यावरून दिसून आलें. या सत्कारांत टिळक स्वतः सामील झाले होते. मात्र प्रतिपक्षीयांच्या सलोख्याला उभयतांना साधारण असा कोणी सन्मान्य नेहमींच लागतो तो या ठिकाणीं नानासाहेब देशमुखांच्या रूपानें मिळाला होता. देशमुख हे पूर्ण राष्ट्रीय वृत्तीचे असले तरी त्यांची मनोभूमिका टिळकांहून पुष्कळच अधिक निर्विकार होती. स्वतः उघडपणें चळवळींत न पडण्यामुळें ही वृत्ति त्यांना साधली असेल. तथापि त्यांचा मूळ स्वभावच धिमा, शांत व सौजन्यपूर्ण असे. यामुळें त्यांनीं गोखल्यांजवळ टिळकांच्या गुणांचें वर्णन केलें, आणि टिळकांजवळ गोखल्यांच्या गुणांचें वर्णन केलें, तरी त्यांपैकीं कोणास राग येत नसे. नानासाहेबांनीं मुंबईस गोखल्यांच्या सत्कारांत भाग घेतला होता, तसाच तो पुण्यांतल्या सत्कारांतहि त्यांनीं घेतला. आणि त्यांच्या साक्षित्वानें गोखले व टिळक पुण्याच्या मंडईत एका सभापीठावर एकदाच आलेले दिसले ते या वेळीं ! गोखलेहि साऱ्या जन्मांत गायकवाडवाड्यांत दोनदांच येऊन गेलें असें मला वाटतें. पैकीं एक प्रसंग वाड्यांत सरतानसिंह यांचें निशाणबाजीचें प्रयोग चालूं असतां देशमुखांबरोबर गोखले गायकवाडवाड्यांत आले तेव्हांचा असावा.

**'सर्वंग लोकप्रियता'**—१९०५ सालीं मुंबईस कै. न्यायमूर्ति माधव रावजी रानडे यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ झाला. समारंभाचे अध्यक्ष मुंबई सरकारचे एक्झिक्यूटिव्ह कौंसिलर सर क्लॉड हिल्ल हे होते. त्यांच्या भाषणांत रानडे यांच्या स्तुतीबरोबर लोकपक्षाच्या पुढाऱ्यांची टवाळी करण्यासारखे कांहीं शब्द आले होते. ते त्यांनीं टिळकांना उद्देशून काढले असावे असा माझा समज झाला. हिल्ल साहेबांची व माझी चांगली ओळख असल्यामुळें मी त्यांना रागानें पत्र लिहून त्यांच्या या कृत्याबद्दल दूषण दिलें. त्याला त्यांजकडून खालीलप्रमाणें उत्तर मला आलें:—

(२७ एप्रिल, १९०५)—" तुम्ही मला लिहिले त्याप्रमाणें तुमचीं प्रामाणिक मतें आहेत हें मला पूर्णपणें माहीत आहे. म्हणून तुमचें समाधान व्हावें याकरिता मी तुम्हाला हें पत्र लिहीत आहे. रानडे यांचा पुतळा उघडण्याच्या वेळीं 'सवंग लोकप्रियतेला हपापलेले कांहीं लोक ' असे मी बोललों ही गोष्ट खरी. पण ते बोलतांना माझ्या मनांत टिळक नव्हते हे मी तुम्हांला निक्षून सांगतो. त्यांच्याहून फार हलक्या प्रतीचे आणि कमी प्रामाणिक असे वक्ते जीं भाषणें करितात त्यांनाच उद्देशून माझें बोलणें होतें. टिळकांच्या संबंधानें तुमचें व माझें बोलणें अगदीं मोकळ्या मनानें झाले. असे असता हे शब्द मी टिळकांना उद्देशून बोललों असे टिळकांच्या किंवा तुमच्या मनांत तरी कसे आले ? " ( सर क्लॉड हिल, मुंबई ).

या पत्रांत आपण बोललों तें टिळकांना उद्देशन नाही इतकाच खुलासा हिल साहेबांनीं केला. आणि त्यांना तो करता आला याचें कारण त्यांनीं टिळकांचें नांव प्रत्यक्ष घेतलें नव्हतें. ' पण सवंग लोकप्रियतेला हपापलेले ' हे शब्द उच्चारतांना टिळकांची व्यक्ति त्यांच्या डोळ्यापुढें नव्हतीच असें मला वाटत नाहीं. मात्र त्यांचा राग फेरोजशहा मेथा यांच्यावरहि असल्यामुळें, आणि समारंभ मुंबईतलाच असल्यामुळें, त्यांच्या मनांत त्या वेळीं मेथा हे नसतीलच असेंहि म्हणवत नाही. याचें प्रत्यंतर ' पुढील सालीं मेथा यांना मुंबई कॉर्पोरेशनमधील त्यांच्या मान्यतेच्या स्थानावरून खालीं ओढण्याचा (कॉकस) कट झाला त्यावरून मिळालेंच. असो. माझ्या तक्रारीपत्राला हिल साहेबांनीं उत्तर दिलें हीच मोठी गोष्ट. आणि जगापुरती, बाहेरच्या आवाजानें कां होईना, 'मी टिळकांना नांवें ठेवणारा नाहीं' येवढी कबुली मी काढविली याचें टिळकांनाहि बरें वाटलें.

**काशीयात्रा**—१९०५ सालीं बनारस येथील राष्ट्रीयसभेला मला जावयाचेच होते, व मी एरव्हीं बहुधा टिळकांच्याच बरोबर गेलो असतो. परंतु आमच्या घरच्या सर्व मंडळींनीं काशी प्रयागची कुटुंबयात्रा करावयाचे ठरविले. यापूर्वी पांच वर्षें वडील-मातोश्रींनीं आपणापुरती ही यात्रा केलीच होती. तथापि फिरून कुटुंबयात्रा म्हणून करावी असे त्यांच्या मनांत आले म्हणून आम्ही निघालों. दिवस थंडीचे होते. आणि यात्रेंत हें लागेल तें लागेल अशा हव्यासानें प्रत्येकानें इतकें सामान बरोबर घेतलें कीं, जळगांवास गेल्यावर त्या सामानाची भीतिच वाटूं लागली. म्हणून आम्ही त्यांतले निम्में सामान फालतु ठरवून खरोखरच जळगांवच्या मुक्कामाहून

गुड्स् करून पुण्यास पाठविलें ! तरी उरलें तेंहि पुष्कळच होतें असें अनुभवान ठरलें. आम्हा यात्रेकरू मंडळीत लहान मुलांची संख्या मोठ्या माणसांपेक्षां अधिक होती. सर्वांत मोठें मूल सात वर्षांचें असेल, व सर्वांत धाकटें मूल चारच महिन्यांचें होतें. त्यांना गंगेंत आपली आपण आंघोळहि करतां येत नव्हती. म्हणून प्रत्येकाला स्नानादाखल दंडाला धरून पाण्यांत बुचकळून काढावें लागलें ! अलाहाबाद येथें आम्ही दारागंजेस टिळकांचे जावई साने यांच्या घरीं उतरलों होतों. या प्रसंगाची माझी एक आठवण अशी कीं, सान्यांच्या घरीं पोंचतांच मी प्रथम सगळी कामें सोडून जिना चढून उघड्या माडीवरून गंगा नदी कशी दिसते हें पाहण्याकरितां उत्सुकतेनें गेलों. पण गंगा पाहून माझी निराशा झाली ! मात्र यांत चूक माझीच होती. कारण उत्तर हिंदुस्थानांत मोठमोठी मैदानेंच असतात हें भूगोलांतील ज्ञान मी विसरलों होतों, आणि वाल्मीकिकृत गंगास्तोत्रांतील 'एतत्तालतमाल' इत्यादि गंगेचें वर्णन माझ्या डोक्यांत होतें ! आम्ही प्रयाग काशी अयोध्या येथील यात्रा पुऱ्या केल्या. पण काशी येथें बंधु आप्पासाहेब यांना ज्वर येऊं लागल्यामुळें बनारसच्या राष्ट्रीय सभेकरितां थांबू शकलों नाही.

**ग्रंथकार संमेलन**—१९०६ सालीं माझ्या सार्वजनिक कार्याला भर येऊ लागला. मला व्याख्यानांचीं आमंत्रणें सर्रास येऊं लागलीं. आणि मी वक्ता नव्हतों तरी तीं निमंत्रणें स्वीकारू लागलों. या वर्षी गणपतिउत्सवांत तर मी अनेक व्याख्यानें दिलींच, पण स्वदेशी चळवळींत सामील होऊन त्या विषयावरहि अनेक व्याख्यानें दिलीं. मी स्वदेशी बरोबर बहिष्काराला‌हि संमति देत असे. पण परदेशी कपड्यांची होळी करण्याविरुद्ध असून ते कपडे गोरगरीबांना वाटावें असें म्हणत होतों. पुण्यांत शिवरामपंत परांजपे व सावरकर यांच्या व्याख्यानांच्या वेळीं होळ्या होत. पण त्यांना मी हजर रहात नसे. मुंबईपासून नाशिक व वाईपर्यंत अनेक ठिकाणीं जाऊन मी व्याख्यानें दिलीं. नाशकास मी अकबर जयंती या विषयावर व्याख्यान दिलें तें फार चांगलें वठलें असें मला अजून स्मरतें. पण व्याख्यानापेक्षां अधिक जबाबदारीचीं संघटनात्मक कार्येंहि करण्यास मला या वर्षी मिळू लागलीं. मे महिन्यांत पुण्यास मराठी ग्रंथकारांचें संमेलन झालें. त्याच्या चिटणीसांच्या जागेवर रा. हरि नारायण आपटे यांच्याबरोबर माझी नेमणूक झाली. या ग्रंथकारसंमेलनांतूनच साहित्य परिषदेची कल्पना प्रथम निघाली. आम्ही त्या परिषदेचा प्रारंभ साठ सभासद

मिळवून केला, आणि विनायकराव भावे, कृष्णाजीपंत खाडिलकर, व वासुदेवराव आपटे या त्रिवर्गांना त्या परिषदेचे चिटणीस नेमून घेतलें.

**ऐ. लेखांचा संग्रह**—याचवर्षी ऐतिहासिक लेखांचा संग्रह पुण्यांत करण्याची कल्पना निघाली. तिचा उगम ग्रंथकार संमेलनांतूनच झाला. त्याप्रमाणें प्रारंभ म्हणून वासुदेवराव मुंडले यांनीं खर्चाकरितां पन्नास रुपयांची वर्गणी देऊन कार्यास सुरुवात केली. परंतु कागदपत्र जमविले तरी ते ठेवावयाचे कोठे हा प्रश्न पडला. तेव्हां नटेशराव द्रवीड यांनीं असें सांगितलें कीं "माझे श्वशुर यवतमाळकर बाबूसाहेब द्रवीड यांचें घर शुक्रवार पेठेंत आहे. त्यांत मी रहातों, त्या घरांतला एक भाग अशा कागदपत्रांच्या संग्रहाकरितां मी देईन." इतक्यांत स्थिरपद होऊन भरभराटीस आलेल्या 'भारत इतिहास मंडळा'चा हा अदृश्य प्रारंभ होय. या उद्योगांत पडण्यास माझी इतिहासाच्या अभ्यासाची हौस ही तर कारणीभूत होतीच, पण हें घर या कार्याला मिळविण्याच्या कामीं द्रवीड यांचा व माझा स्नेह कारणीभूत झाला. नामदार श्रीनिवासशास्त्री प्रथम या द्रविडांच्या घरींच ब्रिऱ्हाड करून होते. या घरी शास्त्री, ज. रा. घारपुरे, द्रवीड, मी अशी मंडळी मधून मधून जमत असूं. शिवाय द्रवीड यांचें व माझें जातक त्या वेळीं तरी बरेंच जुळे. ते पुण्यास येऊन महाराष्ट्र कॉलेजांत इंग्रजीचे प्रोफेसर झाले तेव्हां इंग्रजी वाङ्मयाच्या आवडीमुळें त्यांचा माझा स्नेह जमला होता. आणि इंग्रजी लिहिण्याची आवड असल्यानें ते मराठा पत्रांत लिहून मला मधून मधून मदत करीत. तात्पर्य, ऐतिहासिक कागदपत्रांच्या संग्रहाला जागा मिळवून देऊन इतिहास संशोधनाच्या कार्याला पहिली एक मदत मी केली. मोठ्या गोष्टींचा उगम लहानांतच कसा असतो याचें हें एक उदाहरण म्हणून देण्यासारखें आहे. या उपक्रमानंतर पांच वर्षांनीं राजवाडे यांच्या स्फूर्तीनें, पोतदार यांच्या गुरुभक्तीनें, काशिनाथपंत साने यांच्या प्रोत्साहनानें, दत्तोपंत आपटे, शंकरराव जोशी, आबा चांदोरकर, पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांच्या इतिहास संशोधन-प्रेमानें, आणि तात्यासाहेब मेहेंदळे यांच्या अभिजात औदार्यानें, मेहेंदळे यांच्या वाड्यांत भारत इतिहास मंडळाची स्थापना झाली. पुण्यांत १९०५-०६ सालाइतक्या पूर्वीहि नव्या कल्पना निघत. पण तेव्हां त्या कल्पनांतर्गत कामाचा व्याप थोडा असे, आणि जागा इमारती वर्गण्या याहि थोड्या असत. वंगभंग, स्वदेशी अशा चळवळींतील टिळकांच्या व्याख्यानाला गर्दी किती झाली असें सांगावयाचें तर सार्वजनिक

सभेचा दिवाणखाना भरून गेला असे सांगून भागत असे. पण गुदस्तां नेहरु व सावरकर यांच्या व्याख्यानांना लाऊड स्पीकरहि अपुरे पडले !

**नाट्यसंमेलन**—१९०६ सालीं किर्लोस्कर नाटक गृहाच्या प्रवेशाचा आणि किर्लोस्कर नाटक मंडळीच्या ज्युबिलीचा असे दोन समारंभ चांगले झाले. त्यांत कांहीं प्रमुख भाग माझ्याकडे होता. तसेंच त्या साली नाशिक येथें भरलेल्या नाट्य संमेलनाचें अध्यक्षपदहि किर्लोस्कर मंडळीनें मलाच दिलें होतें. या प्रसंगाच्या भाषणाकरितां मी भरताचार्यांचें नाट्यशास्त्र मुद्दाम वाचलें असे स्मरतें. आणि नाट्य संमेलनाच्या अध्यक्षांचीं जीं एकंदर भाषणें आजवर झालीं त्यांत माझ्या भाषणाचा नंबर बराच वर लागेल असें मला वाटतें.

**विलायतेंतील चळवळ**—१९०४ पासून विलायतेंत लिबरल पक्षापुढें जाणारा मजूर पक्ष हळुहळू संघटित होत होता. लिबरल पक्षाला हा आपला प्रतिस्पर्धी असा वाटत असल्यामुळें तो या नवीन पक्षापासून फटकून रहात असे. पण विलायतेंत राजकारणामध्यें जो पक्ष अधिकांत अधिक पुढें जाणारा त्याच्याशीं ऋणानुबंध बांधल्यानेंच हिंदुस्थानचें झालें तर कल्याण होईल अशी दादाभाई प्रभृतींची समजून असल्यानें ते ॲमस्टरडॅम येथे भरलेल्या मजूरपक्ष परिषदेला लंडनहून गेले होते. ही गोष्ट सर विल्यम वेडरबर्न ( ते लिबरल पक्षाचे म्हणून ) यांनाहि मनांतून फारशी आवडली नाहीं असें म्हणतात. आणि एक वेळ प्रवाद असा होता कीं मेथाप्रभृति मुंबईच्या पुढाऱ्यांनींहि वेडरबर्न यांच्या सूचनेवरून दादाभाईंच्या धोरणाविषयीं नापसंती खासगी रीतीनें दर्शविली होती.

१९०४ च्या मुंबईच्या राष्ट्रीय सभेमध्यें हिंदुस्थानांत व विलायतेंत राष्ट्रीय सभेचें काम जोरानें करावें असे ठरले. त्याची अंमलबजावणी १९०५ च्या मे महिन्यांत कांहीं थोडी झाली. तारीख ३ मे रोजीं फेरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीरसभा भरून त्यांत इंग्लंडला शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरले. सर डब्ल्यु वेडरबर्न व टिळक यांनीं काँग्रेसमध्यें मांडलेल्या ठरावाअन्वयें हें डेप्युटेशन जावयाचे होते. सभेनें प्रोफेसर गोखले व बॅरिस्टर महमद अली जिना या दोघांना शिष्टमंडळाचे घटक म्हणून पाठवावे असा ठराव केला. विलायतेंतील राजकारणांत हिंदुस्थानचे हित पाहणारा असा एखादा वेगळा पक्ष निर्माण करावा असा हें शिष्टमंडळ पाठविण्याचा हेतु होता. पण हा पक्ष लिबरलपक्षाच्या अंतर्गत असला तरी

तसा असण्यास हरकत नाहीं असेंहि मत प्रगट करण्यांत आलें. गोखले यांच्या अंगची हुषारी, वक्तृत्व, सभ्यपणा, शील, त्यांचा कामकाजाचा अनुभव व कर्तृत्वशक्ति यांची स्तुति मुंबईकरांनीं केली तिचा उल्लेख टिळकांनीं केला व त्यांच्या निवडणुकीस संमति दिली. जिना यांच्या निवडणुकीबद्दल मात्र नापसंती दर्शविली. अखेर शिष्टमंडळ म्हणून गोखले व बॅरिस्टर जिना यांना विलायतेस पाठवावें असें ठरल्याप्रमाणें गोखले हे गेले. जिना हे जाऊ शकले नाहींत. लाला लजपतराय हेहि विलायतेस याच वेळीं गेले होते. त्यांची जोड गोखल्यांना चांगली मिळाली. लजपतराय हे स्पष्ट बोलणारे होते.

पार्लमेंटामध्यें प्रधानमंडळांत क्रांति होऊन लिबरल पक्षानें प्रधानमंडळ बनविलें ही गोष्ट हिंदुस्थानच्या फायद्याची झाली असे पुष्कळांना वाटले. इंडियन पार्लमेंटरी कमिटी पूर्वीच बनविण्यांत आली होती. तिच्या विनंतीवरून गोपाळराव गोखले पुन्हा विलायतेस गेले. कमिटीत १६० सभासद सामील झाले होते, आणि गोखल्यांच्या चळवळीकडे इंग्लंडांतील लोकांचें बरेच लक्ष यंदा लागले. मोर्ले आणि गोखले यांच्या गांठीभेटी होऊं लागल्या. आणि आपल्या अडचणी काय आहेत त्या मोर्ले यांनींहि गोखले यांस सांगितल्या. त्यामुळें गोखले यांच्या भाषणांत त्या अडचणींचा मधून मधून उल्लेख येऊं लागला. टिळकांना ही गोष्ट पसंत पडेना. विलायतेंतहि हिंदुस्थानाप्रमाणें पक्षभेद असत. आणि एखाद्या क्षेत्रांत एका उपाध्याच्या घरीं यजमान शिरला म्हणजे दुसऱ्या उपाध्याला जसा मत्सर वाटतो तसा हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनीं एका पक्षाचा आश्रय केला म्हणजे दुसऱ्यास त्याचें वैषम्य वाटे. वास्तविक गरीब बिचारे हिंदुस्थान. इंग्रज मुत्सद्यांवर त्याच्या हातून प्रत्युपकार कसला होणार ? प्रधान मंडळांत जागा राहोच, पण मतदार संघाकडून निवडणूक होण्यापुरताहि हिंदुस्थानच्या सहानुभूतीचा किंवा मदतीचा उपयोग इंग्रज मुत्सद्यांना होणें शक्य नव्हते. उलट जो उमेदवार निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत किंवा भाषणांत हिंदुस्थानचा उल्लेख प्रामुख्यानें किंवा कळकळीनें आणील त्याला विक्षिप्त म्हणून संबोधिले जाण्याचा संभव. तथापि रोमन साम्राज्यांत वकिलाची प्रतिष्ठा त्याच्या मिळकतीवरून न होता त्याच्याभोंवतीं फुकट्या गरीब कुळांचा गराडा केवढा मोठा असेल त्यावरून मोजीत. त्याप्रमाणें हिंदी मुत्सद्यांकडून होतकरू किंवा कर्त्या इंग्रज मुत्सद्याला लभ्यांश नसला तरी त्याच्या आश्रितगणांत मोठी भर पडे.

१९०३, १९०४, १९०५ या सालांत विलायतेंत हिंदुस्थानासंबंधानें चळवळ करण्याचें प्रयत्न ह्यूम, वेडरबर्न, लाला लजपतराय, गोखले वगैरेंनीं केले. पुढें कर्झनशाही संपून कॉझव्हेंटिव्ह पक्षाचा मोड होऊन लिबरलपक्ष अधिकारारूढ झाला. आणि पंडित मोर्लेसारखे गृहस्थ हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाले. तेव्हां आतां विलक्षण क्रांति विलायतेच्या धोरणांत होणार असे नेमस्त लोकांना वाटूं लागले होते. पण मोर्लेसाहेबानीं जें पहिले भाषण पार्लमेंटमध्यें केलें त्यांतच त्यांनीं भ्रमाचा भोपळा फोडला !

गोखले व लजपतराय हे दोघेहि एकच काम करून आले असता त्यांच्या मतांत व विचारसरणींत थोडासा फरक दिसलाच. पण तो रुचिभेदाचा व संस्कारभेदाचा परिणाम आहे असे म्हणून एकवाक्यता करितां आली. सूक्ष्म पहावयाचे तर गोखले यांची भिस्त शिष्टाई व वकिली यावर अधिक, तर लजपतराय यांची भिस्त स्वाधीनतेचे उद्योग करण्यावर अधिक. लजपतराय व गोखले यांच्या धोरणांतील भेद पुढें लवकरच दिसून येणार होता, व त्याची तयारी डिसेंबर महिन्यांत बनारस येथें होणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या तयारीबरोबरच चालू होती.

लजपतराय यांचीं पत्रें इकडे येत आणि त्यांच्या हालचालीच्या हकीकती विलायती पत्रांतून प्रसिद्ध होत, त्यावरून लजपतराय हें मजूर पक्षाशीं अधिक संबंध ठेवतात, आणि गोखले हे त्या नव्या पक्षाशीं फटकून वागतात, अशी माझी स्वतःची समजूत झाल्यामुळें मी मराठा पत्रांत तसें दर्शविलें. पण गोखले यांनीं त्या समजुतीचें निराकरण करण्याकरितां मला खालील पत्र पाठविलें:—

( ७ फेब्रुवारी १९०६.) "गेल्या रविवारचा मराठा वाचला. हिंदुस्थान आणि मजूरपक्ष या वरील तुमचा अग्रलेख वाचून आनंद झाला. खरी गोष्ट अशी आहे कीं लाला लजपतराय यांच्यापेक्षां मजूर कामकरी लोकांच्या दुप्पट सभापुढें मी स्वतः व्याख्यानें दिलीं आहेत. अर्थात् इतर कांहीं लोक मजूरपक्षाला धरून राहातात आणि आम्ही मात्र त्यांच्या पासून फटकून वागतो हें म्हणणें असंबद्ध आहे. मला वाटते ही कल्पना कोणातरी माणसाच्या सुपीक डोक्यांतून निघाली आहे. आणि त्याला कारण कदाचित् इतकेंच असेल कीं लाला लजपतराय यांच्या भाषणाची सरणी व माझ्या भाषणाची सरणी यांत कांहीं कांहीं फरक अगदीं उघड

पडतात. मी ता. १ मार्च रोजीं पुण्यास परत येणार आहे." ( गोपाळ कृष्ण गोखले, कलकत्ता. )

**कलकत्त्याची राष्ट्रीय सभा**—१९०६ सालची राष्ट्रीयसभा कलकत्त्यास झाली. अध्यक्ष महर्षि दादाभाई नौरोजी हे होते. आणि त्यांच्या मुखानें स्वराज्याची मागणी तेथें प्रथमच जाहीर झाली. राष्ट्रीय चळवळीची चतुःसूत्रीहि तेथेंच प्रथमतः निर्माण झाली. सुप्रसिद्ध अशीं जीं राष्ट्रीय सभेची अधिवेशनें त्यांतीलच कलकत्त्याचें हें एक आहे. या सभेची संपूर्ण हकीकत मी टिळक चरित्रांत दिली आहे ती मी स्वतः पाहिलेली अशी आहे. विषयनियामक कमिटींत मी एका मुद्यावर थोडेसें भाषण केलें. पण मोठा खडाजंगी वाद झाला त्यांत एकाबाजूनें मेथा गोखले, व दुसऱ्या बाजूनें टिळक विपिनपाल असें वीर झुंजले. यावेळीं चित्तरंजनदासापेक्षां विपिन बाबूंचें वजन कलकत्त्यास जास्त होतें.

कडाक्याचा वाद बहिष्कारयोगाच्या ठरावावर झाला. ठराव असा "ज्या अर्थी हिंदुस्थानच्या हल्लीच्या राजकीय कारभारांत लोकांचें म्हणणें ऐकलें जात नाही व लोकांनीं केलेल्या अर्जाचा योग्य विचार होत नाहीं, त्याअर्थी बंगाल्यामध्यें प्रथमतः वंगभंगानिमित्त सुरू झालेला बहिष्कारयोग कायदेशीर होता व आहे असें काँग्रेसचें मत आहे." हा ठराव केवळ बंगाल्यापुरता आहे, किंवा बहिष्कारयोगाचा सामान्य रीत्या कायदेशीरपणा प्रतिपादन करणारा आहे, याबद्दल सदर ठराव मंजूर होताना थोडीशी चर्चा झाली. आणि "बाबू बिपिनचंद्र पाल यांनी त्याचा सामान्य सिद्धांत म्हणून जो अर्थ केला तो बरोबर नाहीं, ज्यांना ही चळवळ मान्य असेल त्यांनीं निदान ती काँग्रेसच्या नांवाखालीं करू नये," असे प्रतिपादन करण्याकरिता मदनमोहन मालवीय व गोखले पुढे आले होते. पण त्यांच्या भाषणाचा सभेवर परिणाम झाला नाहीं. बहिष्काराचा ठराव जर सामान्य नव्हता तर त्यांचें सामान्य स्वरूप काढून टाकण्यासारखें शब्द तो ठराव पास होण्यापूर्वीच त्यांत घातले गेले असते. टिळक म्हणत 'जर हा ठराव सर्वानुमते मंजूर झालेला आहे तर त्याचा अर्थ अमुकच पक्षाच्या मताप्रमाणें आहे असे सांगण्याचा खुद्द काँग्रेसच्या सेक्रेटरीस किंवा अध्यक्षासहि अधिकार आतां राहिलेला नाहीं. इंग्रजी भाषा जर सर्वांस सारखीच अवगत आहे तर या ठरावाचा हा अमुकच अर्थ आहे असा शास्त्रार्थ कोणी कां सांगावा ? व इतरांनींहि तो कां मानावा ? बहिष्कारयोगाचा इतर प्रांतांतील लोकांनीं स्वीकार

केलाच पाहिजे अशी काँग्रेसची कोणावर सक्ति नाहीं हे खरे. पण ज्या प्रकारच्या परिस्थितींत बहिष्कारयोग कायदेशीर आहे असे काँग्रेसनें आपलें मत दिलें, ती परिस्थिति बंगाल्यासच नव्हे तर सगळ्या हिंदुस्थानास एकसारखी लागू आहे. अर्थात् बहिष्कारयोग कोणत्याहि प्रांतांत स्वीकारला गेला तरी काँग्रेसच्या मताप्रमाणें तो कायदेशीरच होय, एवढे काँग्रेसमध्यें सर्वानुमते निर्विवाद ठरले आहे."

बहिष्कार योगाचा बिपिन बाबूंनीं केलेला अर्थ आणि टिळकांनीं त्याला दिलेली संमति या गोष्टी गोपाळराव गोखले यांच्या स्मरणांतून जाण्यासारख्या नव्हत्या. म्हणून १९१४ सालीं मद्रास काँग्रेसच्यावेळीं टिळकांचा प्रवेश सभेंत होऊं देण्याच्या मार्गांत टिळकांचा 'बहिष्कार योग' हा आडवा आणण्यांत आला.

**स्वदेशी व बहिष्कार**—कलकत्त्यास राष्ट्रीय सभेनंतर पहिले राष्ट्रीय स्वदेशी संमेलन सभेच्या मंडपांतच भरलें. हैदर टिपूचे वंशज नवाब सय्यद महमूद बहादूर हे अध्यक्ष असून गोखले, भूपेंद्रनाथ बोस, सुरेंद्रनाथ बानर्जी, पाल, लजपतराय, अंबालाल, टिळक वगैरे बरोबर मीहि हजर होतों. अध्यक्षाची सूचना करण्याचें काम मजकडे आलें होतें, तेव्हां ती करतांना मी सांगितलें कीं स्वदेशीस मुसलमान प्रतिकूल आहेत हें म्हणणें साफ खोटें आहे. स्वदेशीच्या कार्यास व्यवस्थित स्वरूप देण्याकरितां लजपतराय वगैरे अनेक पुढाऱ्यांची भाषणें झालीं; आणि ज्या प्रांतांत स्वदेशी प्रांतिक कमिट्या स्थापन झाल्या नसतील तेथें त्या स्थापन करून स्वदेशी चळवळ वाढवावी असा ठराव टिळकांनीं मांडला व त्यावर त्यांचें जोरदार भाषण होऊन तो पसार झाला.

स्वदेशीची चळवळ १९०३ पासून १९०८ पर्यंत चालू होती. या चळवळींत तीव्रतेचे एकावर एक मजले होते. इतर कोणत्याहि चळवळींत देखील ते असेच असतात म्हणा. स्वदेशीच्या चळवळींतील मजले असे होते. १ साधा स्वदेशीचा प्रचार. २ स्वदेशी व बहिष्कार यांचा सजोडप्रचार. ३ स्वदेशी व बहिष्कार यांचे तीव्र भावनायुक्त प्रात्यक्षिक म्हणून परदेशी कापडांची होळी. १ मुंबई पुण्यांतील नेमस्तपक्ष फक्त साध्या स्वदेशीच्या प्रचाराला अनुकूल होता. २ टिळकांचा राष्ट्रीय पक्ष स्वदेशी बरोबर बहिष्कारालाहि समर्थन करी. ३ परांजपे सावरकर यांचा क्रांतिपक्ष परदेशी कपड्यांच्या होळीपर्यंत मजल नेई. यामुळें तिरंगी सामने होत. परांजपे सावरकर हे होळी न करणाऱ्यांना नांवें ठेवीत, तर राष्ट्रीयपक्ष नेमस्तांना

ते बहिष्काराला अमान्यता दर्शविणारे म्हणून नांवें ठेवी. या बाबतींत मुंबईचे नारायण विष्णु गोखले, हायकोर्ट वकील, व 'धी गुजराथी' पत्राचे इंग्रजी विभागाचे संपादक यांचा 'गुजराथी' पत्रांतून व माझा 'मराठा' पत्रांतून असा वाद होई. या विषयीं नारायणराव गोखले यांचें मला आलेलें एक पत्र देतों म्हणजे कळेलः—

(२० सप्टेंबर १९०३—)" माझ्या मताचा विपर्यास झाला आहे. म्हणून माझें हें पत्र छापा. कोणत्याहि हिंदी मनुष्याप्रमाणें मीहि स्वदेशीचाच भोक्ता आहे. मी गुजराथी पत्रांतून स्वदेशीचा पुरस्कार करीत असतों. ब्रोडस यांच्याबरोबर मीच मुंबईच्या सभेचे ठराव तयार केले. एखाद्या एकाकी देशाशींहि टक्कर मारणें कठिण; मग तीन किंवा चार देशाशीं एकदम झुंजून हिंदुस्थानचा निभाव कसा लागेल ! येवढ्याकरिताच मी बहिष्काराच्या विरुद्ध आहे. किंमती बेसुमार चढून आपले लोक त्याखाली अगदीं चिरडून जातील, आणि इतकेंहि करून स्वदेशी धंद्यांना दृढ असें अधिष्ठान मिळेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. आज ९९ टक्के कापड विलायतेहून येतें व एक टक्का इतर देशाहून येतें अशी स्थिति आहे. अजून इतर देशांना विलायती कापडाशीं टक्कर देता येत नाहीं म्हणून अमेरिका व युरोपखंड येथून पुष्कळसा माल येत नाहीं. त्या लोकांना आपलें हित कळते, तसेंच कोणाशीं स्पर्धा करतांना आपणाला किती यश येईल हेहि त्यांना चांगले कळते. म्हणून बहिष्काराची चळवळ ही व्यवहाराच्या दृष्टीनें अशक्य आणि राजकारणाच्या दृष्टीनें अयुक्तिक असे माझें मत आहे. मग तें बरोबर म्हणा अगर चूक म्हणा. पण मी स्वदेशीच्या विरुद्ध आहे असे जे भासविण्यांत येते ते बरोबर नाहीं. गेल्या वर्षाचे ताजे आंकडे वाटेल तर मी पाठवितों." ( नारा. वि. गोखले हायकोर्ट, मुंबई ).

पुढें स्वदेशी साखरेच्या प्रकरणी टिळक व मुंबईचे एक नेमस्त पुढारी सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांमध्यें असाच वाद झाला. त्यावर सर भालचंद्र यांजकडून मला आलेल्या खालील पत्रानें प्रकाश पडेलः—

(१८ सप्टेंबर १९०७—)" स्वदेशी परदेशी यासंबंधानें विद्याधिकारी यांच्याशीं माझा पत्रव्यवहार झाला त्याची प्रत त्यांजकडून मी मागविली आहे. मजजवळ मूळचे कांहीं कागद नाहींत. पण स्मरणानें सारांश लिहीत आहे. माझें म्हणणें असें कीं, हाडें ही वस्तू इतकी अपवित्र मानली जाते कीं, तिचा चुकून

स्पर्श झाला तरी विटाळ झालासा वाटतो. अर्थात् खाण्याच्या एखाद्या पदार्थाशीं संलग्न अशा रीतीनें तिचा उल्लेख झाल्यास धार्मिक भावना दुखविल्या जाणार. निदान वनस्पत्याहारी हिंदूंच्या तरी दुखविल्या जाणार. म्हणून लहान मुलांच्या हातीं जाणाऱ्या पुस्तकांमध्यें साखरेंत हाडांचा कोळसा घालतात असलें विधान नसावें. शिवाय हें विधान सर्वस्वी खरे आहे असेंहि नाहीं. औद्योगिक परिषद व कलकत्ता येथील प्रदर्शन यापुढें असे सांगण्यांत आलें कीं, प्रत्यक्ष उंसापासून जी साखर तयार करतात तिच्या कामीं हाडांचा कोळसा उपयोगांत आणावा लागतोच असें नाहीं. तात्पर्य माझा मुद्दा इतकाच की, हाडांच्या कोळशाविषयीचें विधान सर्वस्वी खरे नाहीं, व तें असलें तरी लहान मुलांच्या वाचण्यांत तें यावेंच असें नाहीं. निदान मी केलें तें चांगल्या हेतूनेंच केलें. स्वदेशीच्या कार्याला विरोध करावा म्हणन केलें नाहीं. लोकांचा बुद्धिभेद करावा असा यांत हेतू नाहीं. पण स्वदेशीच्या समर्थनांत जो युक्तिवाद करण्यांत येतो तो सर्व यथान्याय असावा इतकीच माझी इच्छा " ( भा. कृ. भाटवडेकर, मुंबई. )

**सुरतेची प्रांतिक परिषद**—तारीख २९ मार्च १९०७ रोजीं सुरतेस डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई प्रांतिक परिषद भरली होती. या सभेस सुमारें ६०० प्रतिनिधि अमून १५०० प्रेक्षक आले होते. टिळकांना या सभेस हजर रहाता आले नाहीं. ना. फेरोजशहा मेथा, अंबालाल साखरलाल वगैरे गृहस्थांनीं या परिषदेंत पुढाकार घेतला असून नेमस्त पक्षाची पूर्ण छाप या परिषदेवर पडली होती. महाराष्ट्राचा कल साधारणपणें नव्या पक्षाकडे असल्यामुळें प्रांतिक सभा भरविण्याची नेमस्तांकडून टाळाटाळच चालली होती. सुमारें १०–१२ वर्षात प्रांतिक सभेची बैठकच झाली नाहीं. आजपर्यंत असल्या सभांच्या उपयुक्ततेबद्दल लोकांतील औदासीन्य, प्लेग व दुष्काळ वगैरे इतर बऱ्याच अडचणी होत्या. तथापि वाढत्या नव्या पक्षाच्या मताची छाप परिषदेवर पडूं नये असा अलीकडे मेथा आदिकरून पुढाऱ्यांचा आग्रह होता हेहि प्रांतिक सभा वक्तशीर न भरण्यास एक कारण झालें होतें. पण वाढत्या जोरापुढें भीति व आळस दोन्ही हटली.

अध्यक्षांनीं भाषण केलें त्यांत नेमस्तपणाचा उपदेश ओतप्रोत होता. किंबहुना ती नव्या पक्षावर प्रच्छन्न टीकाच होती. त्यांनीं सांगितलें कीं, " सार्वजनिक काम करणारे लोक प्रामाणिक असावे. त्यांनीं भपका सोडून केवळ सत्यशोधनार्थ

झटले पाहिजे. अर्ज करावयाचे ते आटोपशीर व नेमस्तपणाचे अर्ज असले पाहिजेत. सरकारच्या चुका असतील. पण त्यांची न्यायबुद्धि व सहानुभूति जागृत करून हे दोष काढून टाकावे. हल्लीचें हिंदुस्थान सरकार उदार व मनमिळाऊ आहे. एवढेच नव्हे तर यांच्याहून जास्त उत्तम सरकार आपणास अजून पुष्कळ वर्षे मिळणें कठिण आहे. आपण नेटानें प्रयत्न केला पाहिजे. पण उतावीळपणा किंवा जहालपणा करून मध्येंच आपण घाण करितां कामा नये !"

या सभेंत मामुली ठराव पुष्कळच झाले. फक्त स्वदेशी व बहिष्काराचा विषय महत्त्वाचा होता. पण यावर अध्यक्षांनीं आपलें असें मत दिलें कीं, "स्वदेशी चळवळ हा विषय खरोखर प्रांतिक सभेपेक्षां औद्योगिक परिषदेचाच आहे !" लोकांनीं झीज सोसून स्वदेशी माल वापरावा हे कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंतच ठरलें असल्यामुळें परिषदेस त्याच्या पाठीमागें जातां आलें नाहीं, व फक्त औद्योगिक बहिष्कारास सभेनें संमति दिली. एकंदर सभेबद्दल केसरीनें आपलें मत असें दिलें कीं "सुरतेची प्रांतिक सभा मेगी झाली. डॉ. भालचंद्र यांचें भाषण वाचून असल्या पुढाऱ्यांच्या हातून देशकार्य तरी काय होणार ! असा उद्गार सहजगत्या निघाल्यावांचून रहात नाहीं."

राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रश्नासंबंधानें परिषदेंत बरीच घासाघीस झाली. राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव मेथा यांना नको तेव्हां तो आणूं नये असें प्रथम ठरलें. पण विषय-नियामक कमिटींत मी असा ठराव मांडला कीं "कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत पसार झालेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावाच्या अनुरोधानें त्या विषयाचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमावी." यावर फेरोजशहा मेथा यांनीं 'राष्ट्रीय शिक्षण' या शब्दाचा अर्थच आपणास कळत नाहीं, तेव्हां या विषयाचा विचारच करू नये" असें निक्षून सांगितलें. त्यावर विजापूरकर व चिंतामणराव वैद्य यांनीं कलकत्त्याच्या काँग्रेसचा ठराव वाचून दाखवून सांगितले कीं "राष्ट्रीय सभेच्या ठरावाच्या पाठीमागें जाणें इष्ट नाहीं. पुढें जाण्याची इच्छा नसेल तर वाटल्यास कलकत्त्याचाच ठराव मंजूर करा, पण पाठीमागें सरू नका." यानंतर वादविवाद होऊन माझ्या ठरावावर मते घेतली, तों बहुमत माझ्याच बाजूस दिसून आलें. तेव्हां राष्ट्रीय पक्षाच्या मंडळींनीं टाळ्यांचा गजर केला त्यानें सभास्थान दणाणलें. पण अध्यक्षांनीं मतें मोजण्याची फिकीर न करताच निकाल दिला कीं ठराव नापास झाला ! यावर

मी प्रश्न विचारता मेथा मला म्हणाले "तुम्ही अध्यक्षांचा निकाल मान्य करीत नाहीं काय?" मी म्हणालों "अध्यक्षांनीं निकाल दिला तो मान्य करू. पण आम्ही पोल मागतो." पण अखेर मेथा यांचीच अरेरावी चालून मतेंहि मोजलीं नाहींत व पोलहि दिला नाही.

विषयनियामक कमिटींत हा ठराव नापास झाला. तेव्हां आम्ही जाहीर सभेंत उपसूचना आणावयाचे ठरविलें. पण जाहीर सभेंत हा ठराव हटकून पास अगर नापास होईल याबद्दल दोन्ही पक्षांना खात्री नव्हती. मेथा यांना तो पास होईल ही भीति. विजापूरकर, चिंतामणराव वैद्य यांना सुरतेसारख्या ठिकाणीं तो नापास होईल अशी भीति. शेवटीं भालचंद्र यांच्या मध्यस्तीनें मेथा यांनीं "खासगी कमिटी नेमल्यास त्यावर आपण प्रत्यक्ष काम व विचारविनियम करू" असें वचन दिलें. आणि असे ठरले कीं केवळ पुनरुच्चाराचा आग्रह न धरिता कमिटी नेमून घेण्यापासून राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रश्नाचा झाला तर फायदाच होईल. म्हणून विजापूरकर, चिंतामणराव वैद्य, बोडस, दादासाहेब करंदीकर, अंबालाल व मी यांच्या विचारे जाहीर सभेंत उपसूचना मांडू नये असे ठरले.

अशा रीतीनें 'राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव समेपुढें मांडू नये' हे मेथा यांनीं मिळविले. उलट 'राष्ट्रीय शिक्षण' याचा अर्थच मला समजत नाहीं हे शब्द मागें घेऊन मेथा यांना प्रत्यक्ष कमिटीवर काम करण्यास यावे लागले हे राष्ट्रीय पक्षानें मिळविले. शिवाय राष्ट्रीय शिक्षणास कलकत्त्यास प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेनें मान्यता दिली असल्याकारणानें तो ठराव पुनः प्रांतिक परिषदेंत पास करण्याचा विशेष आग्रह धरण्यांतहि विशेष स्वारस्य नव्हते. टिळकांना हा आपल्या पक्षाचा पराभव वाटला. आणि कदाचित् टिळक स्वतः सुरतेस हजर असते तर झाला याहून कांहीं वेगळा प्रकार झाला असता.

या ठरावाला आम्ही भर परिषदेंत उपसूचना मांडावयास पाहिजे होती असें टिळकांचें मत होतें. म्हणून ती न मांडल्याबद्दल त्यांनीं मला व विजापूरकर यांना दोष दिला. यासंबंधीं टिळकांचें मला आलेलें एक पत्र सांपडलें तें असेः—

(२३ एप्रिल, १९०७)—"रंगारेड्डी यांच्या व्याख्यानाला मला येता येत नाहीं याबद्दल वाईट वाटते असे त्यांना कळवा. सुरत येथील परिषदेसंबंधानें तुम्ही वादांत विनाकारण पडला. एकटे विजापुरकरच होते ते बरे होते. तेथील

ठरावासंबंधानें तुमचें मत मला पसंत नाहीं. फेरोजशहा मेथा यांनीं तुम्हा लोकापेक्षा अधिक चलाखी दाखविली खरी. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचा शिक्षणविषयक ठराव सुरतेस पुनः प्रस्थापित होणें जरूर होते. त्याविषयीं आग्रह धरला असता तर बखेडा होण्याचा प्रसंग आला असता असे वाटत नाहीं. माझी प्रकृति मे अखेर सुधारेल असे वाटते." ( बा. गं. टिळक, सिंहगड. )

**केरहार्डी यांची भेटः**—विलायतेंत यापूर्वी दोन वर्षें चालू झालेल्या चळवळीला थोडेंबहुत फळ येऊं लागलें. हिंदुस्थानाच्या कामांत लक्ष घालणारें असें एक मंडळ खुद्द पार्लमेंटांतच बनलें. आणि मजूर पक्षाचे सभासद व इतर लिबरल लोक हिंदुस्थानास भेट देण्यास येऊं लागले. पैकीं नेव्हिनसन, केरहार्डी व रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचीं नांवें सांगण्यासारखीं आहेत.

१९०७च्या आक्टोबर महिन्यांत इंग्लंडांतील मजुरपक्षाचे पुढारी केरहार्डी हे पुण्यांतील पुढाऱ्यांच्या खास निमंत्रणावरून पुण्यास आले होते. जहाल व नेमस्त-पक्षाच्या सुमारें १६ प्रमुख पुढाऱ्यांनीं त्यास पुण्यास भेट देण्यास विनंति केली होती. स्टेशनावर शहरांतील सुमारें ४० प्रमुख लोक त्यांना सामोरे गेले होते. केरहार्डी हे जातीनें स्कॉच असून त्यांचा जन्म खेडेगांवांतील एका गरीब कुळांत झाला. आठव्या वर्षापासून ते एका कोळशाच्या खाणींत मजूर होते व रस्त्यावरील व दुकानांवरील जाहिराती वाचूनच ते वाचावयास शिकले. पण केवळ स्वकष्टानें जगांत पुढें येऊन ते पार्लमेन्ट सभेचे सभासद म्हणून निवडून आले. 'स्वतंत्र मजूरपक्ष' या संस्थेचे ते अध्यक्ष असून 'लेबर लीडर' या नांवाचें वर्तमानपत्रहि त्यांनीं चालविलें होतें. केरहार्डी हिंदुस्थानांत आले होते ते फक्त हिंदुस्थानांतील वस्तुस्थिति पाहून तिचा अभ्यास करण्याकरितां—गरिबींत दिवस काढलेल्यांनाच गरीब लोकांची सहानुभूति वाटते, या न्यायानें त्यांची हिंदी प्रजेच्या आकांक्षाबद्दल सहानुभूति होती. साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळणें हा हिंदुस्थानचा हक्क आहे असें त्यांनीं जाहीर रीतीनें बोलूनहि दाखविलें होतें. अर्थात् अशा पाहुण्यास कोण मुद्दाम बोलावून त्याचा सन्मान करणार नाहीं! म्हणूनच नेमस्त व राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं यावेळीं एकत्र मिळून व विनंतीपत्र पाठवून त्यांना मुद्दाम पुण्यास बोलाविले होते.

केरहार्डी यांनीं पुण्याच्या बहुतेक सर्व संस्थांना भेट देऊन पानसुपारी घेतली. नाना वाडा, आनंदाश्रम, केसरी ऑफिस वगैरे संस्था पाहिल्यावर सार्वज-

निक सभेमध्ये त्यांना सभेमार्फत मानपत्र देण्यांत आलें. अध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन असून चिटणीस म्हणून मी मानपत्र वाचून दाखविलें. त्यांत "इंग्लंडांतील लिबरल अगर कोणत्याहि पक्षावर मुख्यतः अवलंबून न बसतां स्वार्थत्याग व स्वावलंबन यांनींच राष्ट्रीय भवितव्याचा प्रश्न सुटेल असे हिंदी प्रजेस सध्या वाटूं लागले आहे" असे म्हटले असून, "हिंदी प्रजेच्या न्याय आकांक्षाबद्दल आपण इंग्लंडांतील मतदारांची खात्री करावी" अशी विनंती केली होती. केरहार्डी यांनीं मानपत्रास उत्तर दिलें त्यांत सांगितलें कीं, "हिंदुस्थानाबद्दल माझ्या मनांत सहानुभूति होतीच पण आतां ती शतपट अधिक वाढली आहे." "इंग्लंडांतील हजारांतील ९९९ माणसें हिंदुस्थानाबद्दल अज्ञानांत असतात. माझ्या पक्षाची परिषद् बोलावून तुमची हकीकत मी त्यास जरूर सांगेन" असेंहि त्यांनीं आश्वासन दिलें.

यानंतर हिराबागेंतील टाऊनहॉलांत उपाहार झाला. तेथें हिंदुस्थानांतील कारागिरीबद्दल आणि कौशल्याबद्दल संभाषण व चर्चा झाली. रविवारीं टिळक, मी व केरहार्डी असे पुण्याहून शिवापुरास गेलो. आसपासची खेडीपाडी व लोकस्थिति प्रत्यक्ष पाहून त्यांनी गरीब लोकांच्या स्थितीविषयीं बारीक रीतीनें व आस्थापूर्वक चौकशी केली.

केरहार्डी पुण्यास दोन दिवस होते. त्या दोन दिवसांत ज्यांचा त्यांच्याशीं यत्किंचितहि परिचय झाला त्यांना त्यांची साधी राहणी, सालस वागणूक, चौकस बुद्धि, आणि निगर्वी व खेळीमेळीचा स्वभाव यांची प्रचीति आल्याखेरीज राहिली नाहीं. सर्व लोकांस त्यांच्याबद्दल फार कौतुक वाटले. पण याहिपेक्षां तारीफ करण्याची गोष्ट म्हणजे पुण्याच्या पोलिसांची! त्यांनीं आपले टेहळे व नजरबाज ठेऊन या पार्लमेंटच्या सभासदाचाहि पिच्छा पुरविला! याचा इतरांस संताप आलाच इतकेंच नव्हे तर स्वतः केरहार्डी यांनाहि त्याची चीड आली. त्यांनीं पोलीस अधिकाऱ्यास सांगितलें कीं, "मी स्वतंत्र देशांतील मनुष्य आहे. माझ्या मागेंहि तुम्हीं हा ससेमिरा ठेवाल तर मी गव्हर्नरला हीं गोष्ट कळवीन व पार्लमेंटांतहि याचा निषेध करावयास चुकणार नाहीं!" केरहार्डी यांच्या भेटीनें पुणेकरांप्रमाणेंच स्वतः केरहार्डी यांनाहि समाधान वाटल्यावांचून राहिले नसेल. टिळकांचा मजूर पक्षाशीं हाच पहिला प्रत्यक्ष परिचय.

**मि. नेव्हिनसन**—मि. नेव्हिनसन हे लिबलरपक्षाच्या वर्तमानपत्रांचें उत्कृष्ट बातमीदार. मला वाटतें ते अजून हयात आहेत. ते पुण्यास आले ते मला एक ओळखपत्र घेऊन आले होते. हें पत्र मुंबईस निघणाऱ्या 'चॅपियन' पत्राच्या संपादकांनीं मला लिहिलें होतें. प्लेगमुळे मी त्यावेळीं गांवाबाहेर रहात होतों. प्रथम मी त्यांची व गोपाळराव गोखले यांची भेट करविली, कारण टिळक सिंहगडावर होते. सव्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटींत कांहीं जाहीर व कांहीं खाजगी अशी त्या दोघांची चर्चा झाली. एक दिवस रात्रीं नेव्हिनसन यांना सोसायटींत मेजवानीहि झाली तिला मी हजर होतों. जेवणाचा थाट सर्व देशी पद्धतीचा पाट मांडून केलेला होता. नंतर नेव्हिनसन व सोसायटीचें एक सभासद नटेशराव द्रवीड यांना घेऊन मी सिंहगडावर गेलों. रात्रीं मुक्काम गडावरच झाला. नेव्हिनसन यांजकरितां शेट नरोत्तमदास यांचा बंगला मागून घेतला होता. तेथें रात्रीं तीन तास पर्यंत टिळकांशीं त्यांचें बोलणें खाजगी रीतीनें झालें. नेव्हिनसन यांनीं आपल्या पुस्तकांत टिळक व गोखले यांचीं शब्दचित्रें फार सुरेख रंगविलीं आहेत. माझी त्यांची ओळख झाल्यामुळें सुरतेस राष्ट्रीय सभा मोडल्यावर त्यांनीं पहिली मुलाखत माझीच घेतली. कारण मंडपाबाहेर ओळखीचा असा मीच त्यांना प्रथम भेटलों. या मुलाखतीचा उल्लेख त्यांच्या पुस्तकांतील सुरत-प्रकरणांत आला आहे तो असा.

" टिळकांचे दुर्व्यम, केळकर यांच्याशीं मी बोललों. ते म्हणाले ' गडबड झाली ही अगदीं अभावित. कोणालाहि तिची कल्पना नव्हती. घोष यांच्या निवडणुकीला हरकत घ्यावयाचे आम्ही ठरविले होते हे खरे. पण असा गोंधळ करून नव्हे. आणि त्यांतून समेटाच्या चळवळीला नेमस्त लोकांचें उत्तर वेळेवर येते तर इतकाहि गोंधळ झाला नसता.' तेथून मी टिळकांच्या छावणींत गेलों. अंगावरील कपडे उतरून ते बसले होते. त्यांचा एक प्रकारें विजय झाला होता. पण तो विजय म्हणावा कीं नाहीं याची शंका होती. केळकरांप्रमाणें टिळकांनींहि मला सांगितलें कीं ' नेमस्तांनीं आपलें उत्तर फार उशिरा दिलें त्याचा हा परिणाम !' टिळक म्हणाले " गोखल्यांकडून मला आतांच ठराव मिळाले !! आणि किरकोळ दुरुस्त्या केल्या त्या काढून मूळचे कलकत्त्याचे ठराव तसेच ठेवले असते म्हणजे माझें समाधान होतें. पण उशिर झाल्यामुळें लोकांची खातरजमा करतां आली

नाहीं. किंवा असें करा, तसें करू नका, असें सांगून त्यांना वेळेवर गप्पहि बसवितां आले नाहीं."

**रॅम्से मॅक्डोनाल्ड**—यांच्या भेटीसंबंधानें खालील पत्रें आढळलीं:—( ९ सप्टेंबर १९०९ )—" या पत्रानें तुमची व रॅम्से मॅक्डोनाल्ड यांची ओळख करून देत आहे. ते मजूरपक्षाचे पुढारी आहेत. तुमच्या पक्षाचें जें कांहीं म्हणणें आहे तें सर्व त्यांना नीट समजावून सांगा व पूर्वी मला जशीं सर्व प्रकारें मदत केलीत तशी त्यांनाहि करा. टिळकांना पत्र पाठवाल तेव्हा स्मरणपूर्वक मी विचारले होते म्हणून लिहा. खापर्डे यांची वरचेवर गांठ पडते. पण त्यांच्या अपीलाचे नीट जुळेल असे मला वाटत नाहीं." ( हेन्री नेव्हिनसन, लंडन. )

( १७ नोव्हेंबर १९०९ )—" विलायतेहून तार आली तीत लिहिले आहे कीं विलायतच्या राजकारणांत मोठी गडबड आहे. आम्हाला लौकर परत बोलाविले आहे. म्हणून दक्षिण हिंदुस्थानांतील दौरा टाकून देऊन आम्ही परत जाणार. तथापि पुण्यास येऊन जाणार आहों. तरी मि. मॅक्डोनाल्ड यांनीं तुम्हाला असे लिहिण्यास सांगितलें आहे की, तुम्ही त्यांना पुण्यास जरूर भेटावें. त्यांना ताप आला म्हणून त्यांच्या सांगण्यावरून मी पत्र लिहीत आहे." ( मिसेस रॅम्से मॅक्डोनाल्ड, दरभंगा. )

( २० नोव्हेंबर १९०९ )—" आम्ही मुंबईला येत्या बुधवारी येतो व शनिवारीं पुढे निघू. गव्हर्मेंट हाऊसमध्यें उतरणार आहोत. तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे." ( रॅम्से मॅक्डानोल्ड, कलकत्ता. )

मॅक्डोनाल्ड यांना मी खडकी स्टेशनावर भेटलों. आमचें कांहीं वेळ भाषण झाल्यावर ते गव्हर्नर साहेबांचे पाहुणे म्हणून गणेशखिंडीकडे गेले.

**नवा राष्ट्रीय पक्ष**—सुरतेच्या राष्ट्रीय सभेचा वृत्तांत टिळक चरित्रांत व प्रस्तुत ग्रंथाच्या 'अधिकारयोग' या प्रकरणांत आला आहे, त्याहून येथें अधिक सांगत नाहीं. ती सभा मोडल्यानंतर घडलेल्या कांहीं ठळक गोष्टी मात्र सांगतों. सुरतेची राष्ट्रीय सभा मोडून टिळकांवर दुसरा राजद्रोहाचा खटला होईपर्यंत सुमारें सहा महिने गेले. तो कालावधी माझा फार उद्योगाचा गेला. टिळकांच्या अध्यक्षाच्या ठरावावरील उपसूचनेला अनुमोदन देण्याचें मी नाकारिलें

तरी दुसरें दिवसापासून मला नेहमींप्रमाणें कामें सांगण्यास त्यांनीं सुरुवात केली. सुरतेच्या सभेच्या आधीं दोन दिवस ( म्हणजे ता. २४ डिसेंबर १९०७ रोजीं ) राष्ट्रीय पक्षाची परिषद भरविण्यांत आली तिचें अध्यक्षस्थान अरविंद घोष यांना देण्यांत आलें तेव्हां चिटणीशीचें काम मजकडे होतेंच; पण राष्ट्रीय सभा मोडल्यावर जीं कामें सुरू झालीं त्यांतहि कांहीं कांहीं मजकडे होतीं. ता. २८ डिसेंबर रोजीं, ता. २४ प्रमाणेंच, राष्ट्रीय पक्षाची सभा भरविण्यांत आली. या सभेला येणाऱ्या अनोळखी लोकांची तपासणी करून त्यांना आंत येऊ देणें न देणें हें काम मजकडे होतें. आणि नव्या पक्षाचा जाहीरनामा म्हणून जो पुढें प्रसिद्ध झाला तो मला तोंडानें मजकूर सांगून टिळकांनीं प्रथम तयार केला आणि नंतर अरविंद बाबूंकडे नीटनेटका करण्याकरितां देण्यांत आला.

**पुणें म्युनिसिपालिटी**—१९०८ च्या फेब्रुवारींत राष्ट्रमत, कांचशाळा, समर्थ विद्यालय अशीं तीन विधायक कामें टिळकाच्या संमतीनें झालीं. यांत मजकडे कांहीं काम नव्हतें. राष्ट्रमताकरितां नॅशनल पब्लिशिंग कंपनी मुंबईस निघण्याचें ठरलें. त्यांत नानासाहेब देशमुख, चिंतामणराव वैद्य, व डॉ. साठ्ये हे प्रमुख होते. तळेगांवच्या कांचशाळेची योजना सर्वस्वी वासुदेवराव जोशी यांजकडे सोपविली होती. आणि समर्थ विद्यालयाची योजना विष्णु गोविंद विजापूरकर यांजकडे होती. राष्ट्रीय शिक्षणाकरितां द्रव्यनिधि जमवावयाच्या कामीं टिळकांनीं दौरे काढण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें सोलापूर बार्शीकडे त्यांचा पहिला दौरा झाला. पण पुणें जिल्हासभा, म्युनिसिपल निवडणूक, आणि मद्यपान निषेधाची चळवळ हीं कामें टिळकांकडून मजकडे तोडून देण्यांत आलीं होतीं. यापूर्वीच सार्वजनिक सभेचा चिटणीस या नात्यानें माझी निवडणूक झालेली होती; आणि वरील तीनहि कार्यांत सार्वजनिक सभेतर्फे मी काम करीत होतोंच. पण जिल्हासभेच्या कार्यकारी मंडळाचा व मद्यपान निषेधक मंडळाचाहि मी एक चिटणीस होतों. मावळ तालुका सभा फेब्रुवारींत झाली. म्युनिसिपल निवडणूक मार्चांत झाली. त्याच महिन्यांत पुणें जिल्हा सभेची बैठक झाली. त्याच महिन्यांत आधिकार विभागणी कमिशनची बैठक पुण्यास झाली. त्यापुढें टिळक व गोखले दोघांच्याहि साक्षी झाल्या. सबंध एप्रिल महिनाभर मद्यपान निषेधाची चळवळ गाजली. या चळवळींत कांहीं युरोपियन लोकहि आमच्याबरोबर सामील होते त्यांत मिशनरी डॉ. मॅकनिकल आणि डॉ. मॅन हे होते. मॅकनिकल हे बोलून चालून स्वतंत्र मिशनरी. त्यांना चळवळींत

भाग घेण्यांस कांहींच हरकत नव्हती. पण डॉ. हेरॉल्ड मॅन हे सरकारी शेतकी कॉलेजचे पगारी प्रिन्सिपॉल असतां या चळवळींत उघडरीतीनें सामील होत याचें लोकांना आश्चर्य वाटे. आमच्या कडील इतर कर्त्यांमध्यें प्रमुख म्हटले म्हणजे शंकरराव लवाटे व ल. र. गोखले वकील. त्यांचें व मॅकानिकल यांचें सूत जमें. तसेंच माझें व डॉ. मॅन यांचें जमें. कारण ते व मी दोघेहि म्युनिसिपालिटीचे सभासद होतों. असो. या तीनहि उद्योगासंबंधानें थोडक्यांत हकीकत देतों.

मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत पुणें शहरांतील म्युनिसिपालिटीची त्रैवार्षिक निवडणूक झाली. हा एक नवाच प्रसंग पुण्यांतील नेमस्त व राष्ट्रीय पक्षाचे बलाबल पाहाण्याचा उपस्थित झाला होता. या निवडणुकींतून टिळक हे स्वतः बाहेरच पडलेले होते. पण त्यांच्या पक्षाची मंडळी म्हणजे अण्णासाहेब पटवर्धन व मी हे निवडणुकीला नेहमीं उभे रहात असूं, व विशेष खटपटीशिवाय निवडूनहि येत असूं. यामुळें टिळकांना या कामांत फारसें लक्ष घालावें लागत नसे. पण या सालीं दोन कारणांनीं टिळकांना तें लक्ष घालावें लागलें. सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर राष्ट्रीय पक्षाचे पुण्यांतील वर्चस्व प्रगट होणें अवश्य होतें. शिवाय टिळकांचे स्नेही बाबासाहेब पेंडसे, आणि राष्ट्रीय पक्षास नवीनच येऊन मिळालेले विद्वान् गृहस्थ गणेश व्यंकटेश जोशी, यांना जनरल मतदारसंघातर्फे उभे करण्याचे टिळकांनीं योजिले. आणि चारहि जागांकरिता आपल्या पक्षाचे उमेदवार उभे करून निवडून आणावे अशी महत्वाकांक्षा टिळकपक्षानें धरली. पैकीं अण्णासाहेब पटवर्धन हे जुनेच उमेदवार होते. मी या पूर्वी नऊ वर्षें सतत निवडून आलों होतों म्हणून यंदा उभा रहाण्याची माझी इच्छा नव्हती. याकरिता पेंडसे व जोशी यांच्याबरोबर एक नवे उमेदवार म्हणून शिवराम महादेव परांजपे यांना उभे करण्यांत आले. नेमस्त पक्षानें आपला एकच उमेदवार उभा करून सर्व शक्ति त्यावर एकवटण्याचे ठरविले. ते हरि नारायण आपटे हे होत. तथापि आपटे निवडून न येता परांजप्यांसुद्धा चारहि उमेदवार टिळकपक्षाचेच निवडून आले. शहर म्युनिसिपालिटीला आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार १३।१४ वर्षें मिळाला असतां, आजवर तो एकाच घराण्यांत डांबून राहिला. सरदार दोराबजी पदमजी यांनीं अध्यक्षपदाचा मान बारा वर्षें भोगला. त्यांच्या मृत्यूनंतर फिरून त्यांचे बंधु शेठ नौरोजी पदमजी यांचीच खटपट सुरू झाली. म्हणून शक्य तर या परंपरेंत थोडाबहुत फरक करावा, आणि इतर जातींतील विद्वान् लोकांना यथाप्रमाण हा मान मिळावा असे टिळकांचें

म्हणणें असून, बाबासाहेब पेंडसे व जोशी यांना याच दृष्टीनें म्युनिसिपल निवडणुकीस उभें रहाण्याच्या भरीला त्यांनीं घातले होते. पण टिळकांचा तो बेत साधला नाहीं. कारण एक तर अध्यक्षाच्या निवडणुकींत सरकारनियुक्त सभासदांचें प्रस्थ बरेच माजतें. आणि जोशी किंवा पेंडसे हे टिळकांच्या भिडेखातर निवडणुकीला उभे राहिले तरी अध्यक्षाचें काम करण्याची हौस दोघांनाहि मनांतून नव्हती.

**पुणें जिल्हासभा**—तारीख २० मार्च रोजीं पुणें जिल्हासभेची पहिली बैठक झाली. स्वागताध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन यांनीं सभासदांचें स्वागत केलें. अध्यक्षस्थानीं गणेश व्यंकटेश जोशी यांची निवडणूक झाली. वक्त्यांमध्यें सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद वामनराव पटवर्धन, फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर केशवराव कानिटकर, तसेच गोपाळ कृष्ण देवधर, नटेश आप्पाजी द्रविड, हरि नारायण आपटे, तारकुंडे वगैरे इतर पक्षाची मंडळी होती. पुण्यास जिल्हा-सभा भरणार हे पुण्यांतील नेमस्त पक्षाला एक प्रकारचें कोडेंच पडलें होतें. तें असे कीं तींत सामील व्हावे तरी कठिण, सामील न व्हावे तरी कठिण. जिल्हा-सभा सार्वजनिक सभेसारख्या संस्थेनें भरविली, आणि प्रतिनिधि होण्याला कोणत्याहि प्रकारची अट किंवा प्रत्यवाय नव्हता. म्हणून आपण हजर न राहिलों तर जिल्ह्यांत टिळकांचें मत तेवढेच काय तें प्रचलित आहे असे दिसून येईल ! आणि सामील व्हावे तर आपण पडलो थोडे लोक ! तथापि सामील न होण्यापेक्षां सामील झालेले अधिक बरे, असा विचार करून नेमस्त पक्षाचे लोक प्रतिनिधि झाले होते. सामील झाल्यानें आपल्या पक्षाचें म्हणणें काय हें पुण्यासहि जनतेपुढें स्पष्ट शब्दांनीं मांडता येईल हा एक त्यांना फायदा होताच. सुदैवानें मद्यपान निषेध वगैरे विषयावर होणाऱ्या ठरावांत उभय पक्षांत मतभेद नाहीं, म्हणून पक्षभेदरहित शुद्ध सार्वजनिक अशा दृष्टीनें काम करण्याची संधि मिळते ती दवडूं नये, असाहि सुविचार या सामील होण्याच्या कल्पनेच्या मुळाशीं होता. स्वदेशी बहिष्काराच्या ठरावांत त्यांनीं आपल्या पक्षातर्फे कांहीं उपसूचना पुढें आणल्या, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

**मद्यपान निषेधक चळवळ**—जिल्हा सभेंत राष्ट्रीय शिक्षण व मद्यपान-निषेध या विषयावर एकंदरीनें विशेष जोर देण्यांत आला होता. मद्यपानासंबंधानें टिळकांचें भाषण कडक असें झालें. " परकी सरकार इकडे आले

त्यानें वाटेल तर शिस्त शांतता ठेवावी. पण आम्हाला नीति शिकविण्याच्या भानगडींत पड़ नये. मद्यपाननिषेध हें हिंदु लोकांचें एक विशेष नीतितत्त्व आहे, आणि तें अमलांत आणण्याच्या कामीं लाभहानीच्या दृष्टीनें सरकाराकडून येणारा अडथळा आपण मोड़न काढला पाहिजे. मद्यपानाची चीड ही तुरुंगवासाच्या दुःखापेक्षा अधिक दुःसह वाटली पाहिजे. एक दारूचें दुकान मी बंद केलें तर मला स्वर्ग मिळेल असे हिंदी तरुणाला वाटून त्यानें या चळवळींत जरूर तर मरण्यालाहि तयार झाले पाहिजे. आणि जर दारूबंदी करण्यासारखी साधी गोष्ट आपणाला करता आली नाहीं तर स्वराज्याला आपण नालायक आहो असेच मी समजेन" असे टिळकांनीं सांगितले! आणि याच त्यांच्या भाषणांतून पुढील माहिन्यांत झालेली पिकेटिंगची चळवळ निर्माण झाली.

नाकेबंदीच्या कारणानें आठ दिवसांत गुत्त्यांवर पुष्कळच परिणाम झाला. खरोखर हें स्वयंसेवक मंडळ स्वयंभू होतें! कारण टिळकांना आधी केव्हां विचारून सवरून, किंवा त्यांचा उपदेश किंवा हुकूम घेऊन, ते कामावर निघाले नाहींत. "हा स्वयंभू स्वयंसूचक संघ शनवार पेठेंतील गुत्यासमोर कांहीं स्फूर्तीनें देवाच्या उदरांतून एकाएकीं प्रगट झाला" असे त्याचें वर्णन एके ठिकाणीं करण्यांत आलें होतें. "वशिष्ठाच्या गरीब गाईच्या अंगातून जसे वीर बाहेर पडले तसेच पुण्याच्या गरीब जनतेच्या अंगांतून हे स्वयंसेवक निघाले" असेहि त्यांचें वर्णन करण्यांत आलें होतें. प्रारंभीं स्वयंसेवकांना स्वतःच्या भावनेशिवाय व संघशक्तीशिवाय दुसरें कोणतेंहि पाठबळ नव्हतें. चार पांच स्वयंसेवक एकत्र जुळत आणि इतर चार पांचांचें सहाय्य घेत. १०–१२ जणांची टोळी करून गुत्त्यापुढें उभे रहात. स्वतंत्र स्फूर्तीचें प्रत्यंतर हे कीं एकाच गुत्त्यापुढें एकाच हेतूनें प्रेरित झालेल्या दोन दोन टोळ्याहि अवचित भेटत. मात्र नाकेबंदी केली तरी दारू पिणारांच्या हातापाया पडण्यापेक्षा किंवा विनंति करण्यापेक्षा दुसरा कांहीं उपाय ते योजित नसत. त्यांना अवमानून किंवा लाथाड़न दारू पिणारांनीं खुशाल गुत्त्यांत जावे, दारू पिऊन बाहेर यावे, आणि नंतर स्वयंसेवकांना त्यांनीं शिव्या द्याव्या, त्यांच्या आयामाया उद्धराव्या, व चेष्टेनें अपमान करावा असेहि घडे. पण स्वयंसेवक सहनशीलता ठेवीत. ही सहनशीलता समक्ष पाहून मुंबई टेंपरन्स ॲसोसिएशनचे चिटणीस भाजेकर, रेव्हरन्ड मॅकनिकल व डॉ. मॅन वगैरे लोकांनीं शाबासकी दिली.

या कार्याला अधिक संघटित स्वरूप येण्याकरितां पुण्याच्या मद्यपाननिषेधक सभेनें पुढ स्वयंसेवकांना नियम घालून दिले. पेटापेठांतून व्याख्यानें, जादा सभा, आणि देवळांतून व मशिदींतून उपदेश सुरू झाले. गुत्त्याच्या घरवाल्यांनीं घरांतून दुकानें काढून नेण्याविषयीं गुत्तेवाल्यांस नोटीसा देण्यास आरंभ केला. कारण नव्या सालचे लिलाव लवकरच व्हावयाचे होते. हे पाहून अबकारी अधिकारी चडफड़ लागले. पोलीसांच्या तुकड्या गुत्त्यासमोर येऊन उभ्या राहू लागल्या. कांहीं नांवें टिपून घेण्यांत आलीं. आणि रस्ते अडविल्याबद्दल पहिला खटला एका प्रेक्षकावर होऊन त्याला सिटी मॅजिस्ट्रेट कारव्हालो यांनीं दहा रुपये दंड केला. गणेश पेठेंतील गुत्तेवाल्यांनीं असिस्टंट कलेक्टर मि. अँडरसन यांजकडे धांव घेतली. वास्तविक शहराशीं त्यांचा कांहीं संबंध नव्हता. पण उपद्व्यापीपणाबद्दल त्यांची प्रसिद्धी असल्यामुळें बाकीच्या अधिकाऱ्यांना सोडून त्यांच्याकडेच हे गुत्तेवाले धावले. आणि त्यांनींहि मनगटावर कायदा बांधून गुत्त्याजवळ येऊन स्वयंसेवकांना धक्काबुक्की केली. या गर्दीत वासुदेव कृष्ण भावे आणि वामन गंगाधर देशपांडे हे गृहस्थ सांपडले. त्यांनीं अँडरसन साहेबांना उलट गुरकावले एवढाच त्यांचा गुन्हा. पण त्यांना अटक करून कांहीं वेळ कैदेंत ठेविलें. मग रात्रीं दहा वाजतां जामीन घेऊन सोडले. दुसऱ्या एका गुत्त्यावर अँडरसन साहेबांना एका स्वयंसेवकानें विचारलें कीं 'मद्यपानाविरुद्ध उपदेश करणें हा गुन्हा आहे काय!' यावर साहेबानें उत्तर केलें कीं 'मूर्तिपूजा करू नका म्हणून देवळासमोर उभे राहून ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं उपदेश चालविला तर तुम्हाला तो मानवेल काय!' अँडरसन साहेबांनीं उपमा दिली पण ती फारशी उचित नव्हती हे कोणीहि कबूल करील!

स्वयंसेवकावर खटले भरले तसेच स्वयंसेवकांनींहि दहा पांच कलमें लावून अँडरसन साहेब यांजवर देखील उलट खटले भरले. पण ते कसचे टिकणार! पुणें मद्यपाननिषेधक सभेनें अजूनहि स्वयंसेवकांना आपला आधार कायम ठेवला होता. पण सभेशीं विशेष वाटाघाट न करिता चळवळीच्या गड्ड्यालाच हात घालावा या हेतूनें कलेक्टर मि. कारमायकेल यांनीं टिळकांनाच भेटीला बोलाविले. दुसऱ्या दिवशीं सभेतर्फे गोखले, टिळक, मी, मॅकनिकल, लक्ष्मणराव गोखले वगैरे मंडळी शिष्टमंडळ म्हणून त्यांच्या भेटीला गेलों. फिरून दुसऱ्या दिवशीं टिळक आणि मी हे दोघेच जाऊन कलेक्टरसाहेबांना भेटलो.

प्रथम कारमायकेल साहेबांनीं सामोपचाराचें धोरण ठेविलें होतें, आणि स्वयंसेवकांना नियम घालून दिले होते असे कळल्यावर त्याप्रमाणें ते वागतात कीं नाहीं हे पाहण्याकरिता स्वतः ते कांहीं ठिकाणीं हिंडून आले. पोलीस लोक स्फूर्तीनें स्वतंत्रपणें वागत असत. अधिकाऱ्यांनीं एका आठवड्यांत आणखी सात असामीवर खटले भरले. तिघांना तसेच सोडून दिले व चौघांना एक एक रुपया दंड केला. परंतु भावे आणि देशपांडे यांजवरील खटले लांबले. अखेर त्या दोघांना शंभर शंभर रुपये दंड करण्यांत आला. याचें कारण अँडरसन साहेबासारखे शिष्ट फिर्यादी होते, आणि आरोप बेकायदा मंडळ जमविण्याचा होता. इतर पांच पंचवीस खटल्यांत कमी अधिक प्रमाणानें दंड झाले. पण चळवळ थांबली नाहीं. क्रीडाभुवनांत तर मराठे लोकांची सभा होऊन तेहि या चळवळींत सामील झाले, यामुळें ब्राह्मण हेच तेवढे या कामीं चळवळ करितात हा आक्षेप निघून गेला. या खटल्याच्या कामीं लक्ष्मण जनार्दन आपटे व मी असे वकीलपत्रें घेऊन कोर्टांत कामें चालवीत होतों.

अखेर या चळवळीचें पर्यवसान कसें झालें हें मला त्यावेळीं आलेल्या खालील दोन पत्रावरून कळून येईल. कायदेशीर हक्क त्याच्या परिसीमेपर्यंत लढवावयाचा, पण सरकारानें जें कायदेशीर तें विशिष्ट हुकुमानें बेकायदेशीर ठरविलें तर कायदेभंगाचा सत्याग्रह करावयाचा नाहीं, असें त्यावेळचें टिळकांचें धोरण होतें. हीं पत्रें अशीः—

(८ एप्रिल १९०८)—"हल्लीं चाललेल्या पिकेटिंगच्या चळवळीसंबंधानें मी कारमायकेल साहेबांना आज भेटलों. चळवळीचा एक नियम असा आहे कीं पोलीस अडविण्यास आले तर त्यांच्याशीं बोलून त्यांची समजूत घालावी. पण हा नियम बदलून जर असा नियम केला कीं पोलिसांचे हुकूम प्रथम मानावें, त्यांच्याशीं कांहीं बोलणें चालणें करू नये, आणि मागाहून ज्या कायदेशीर गोष्टी करता येतील त्या कराव्या—असा नियम स्वयंसेवकांना घालून दिला तर ते या चळवळीला फारशी हरकत घेणार नाहींत असे त्यांच्या बोलण्यावरून दिसून आले. तरी तुम्ही हा नियम बदलून घेऊ शकाल काय! पोलिसाशीं बोलणारे लोक मुख्य व्हॉलंटियर असले तरी बोलाचालींत कांहीं कमजास्त होतेच. म्हणून मलाहि वाटते कीं हा नियम बदलून घ्यावा." (डॉ. हॅरोल्ड मॅन, पुणें.)

(१८ एप्रिल १९०८)—"तुमचें पत्र पोंचलें. काल पोलिसांनीं सांगतांच स्वयंसेवक बाजूला झाले असे समजते. ही गोष्ट बरी झाली. मद्यपाननिषेध चळवळीच्या सेक्रेटरींना मी वेगळें पत्र पाठविलें आहे. स्वयंसेवक लोकांनीं उभे राहून दारूच्या दुकानांशीं काम करणें याला बेकायदेशीर जमावाचें स्वरूप आहे असा स्पष्ट सरकारी हुकूम निघाल्यास स्वयंसेवक आपलें काम थांबवितील, असे कळल्यानें तसा स्पष्ट आतां हुकूम काढलेला आहे. तरी आता चळवळीचे चालक स्वयंसेवक मागें घेतील अशी मला आशा वाटते. ( जी. कारमायकेल, कलेक्टर, पुणें. )

**टिळकांवरील खटला**—पण या सर्व चळवळींना लवकरच पायबंद बसावयाचा होता. कारण १९०८ च्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत त्यांना सहा वर्षें हद्दपारीची शिक्षा झाली. या खटल्याची शक्य तितकी विस्तृत हकीकत मी टिळक चरित्रांत दिली आहे ती सर्व माझ्या समक्ष माहितीवरूनच दिली आहे. म्हणून येथें ती देऊन जागा अडवीत नाहीं. इतकेंच सांगतो कीं, या खटल्यानें व शेवटीं झालेल्या शिक्षेनें सर्व महाराष्ट्र तर हादरून गेलाच पण केसरी-मराठा संस्थेंतील आम्हां लोकांची मनःस्थिति कशी झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. चहूकडे अंधार दिसूं लागला ! १८९७ चा खटला आणि १९०८ चा हा खटला यामध्यें सर्वच बाजूंनीं महदंतर होतें तें असें.

दोन्ही खटले केसरींतील लेखांवरच झाले. पण दोन्ही खटल्यांतील आक्षिप्त लेख सर्वच कांहीं टिळकांनीं लिहिलेले नव्हते. १८९७ सालीं केसरीइतका खप दुसऱ्या कोणत्याहि मराठी पत्राचा नव्हता. १९०८ सालींहि तीच स्थिति कायम होती. दोन्ही खटल्याच्या पाठीमागें चित्रांतील भूमिकेप्रमाणें दडपशाही अत्याचार व असंतोष यांचा कृष्णवर्ण एकजात सारविलेला होता. पहिल्या खटल्याच्या वेळेस प्लेगच्या अधिकाऱ्यांचा जुलूम आणि दुष्काळपीडेनें गांजलेल्या लोकांचीं दुःखें यांनीं वातावरण भरून गेलें होतें, तर दुसऱ्या खटल्याच्या वेळीं कर्झनशाहीचे दुष्परिणाम लोकाच्या मनांत डाचत असून बंगालच्या फाळणीनें असंतोषाची शीग भरून गेली होती. सर्व देशांत लोकांच्या बाजूनें जागृति आणि ती शमविण्याकरिता सरकारच्या बाजूनें दडपशाही असे संकीर्ण युद्ध सुरू झालें होतें. प्लेगच्या अधिकाऱ्यांचा जुलूम ही बाब पुष्कळशी स्थानिक स्वरू-

पाची होती, पण १९०८ सालचा असंतोष सर्व देशभर सारखाच पसरला होता आणि क्रिया प्रतिक्रिया ही सर्व देशभर सुरू होती. पण या दोन्ही खटल्यांच्या परिस्थितीत मुख्य निर्णायक गोष्ट त्यापूर्वी झालेले खून हेच होय. रँड साहेबांचा खून न होता तर १८९७ सालचा टिळकांवरील खटला झाला नसता. तसेच बंगाल्यांत बाँबगोळ्यांचे अत्याचार न घडते तर १९०८ सालचा खटला झाला नसता. शाब्दिक राजद्रोहाकरिता सरकारानें इतक्या तातडीनें खटले भरले नसते. पण दारूच्या कोठारांत ठिणगी पडावी त्याप्रमाणें मनुष्याच्या रक्तबिंदूनें भडका उडविला.

या दोन खटल्यांतील साम्यतेच्या गोष्टी वर दिल्या आहेत. पण विषमतेच्या अशाहि कांहीं गोष्टी आहेत. पहिल्या खटल्यांत टिळकांना जामिनावर सोडण्यांत आले. पण दुसऱ्यांत जामिनावर सोडण्यांत आले नाहीं. पहिल्या खटल्यांत सुरुवातीला टिळकांशीं वागण्याचें सरकारचें धोरण किंचित् सौम्य होतें. दुसऱ्यांत प्रथम पासूनच तें उग्र असल्याचें दिसून आले. पहिल्या खटल्यांत प्रसिद्धपणें टिळकांच्या बचावाकरितां वर्गणी देशभर गोळा करण्यांत आली; पण १९०८ सालीं मुंबई इलाख्यांतहि जाहीर रीतीनें फंड उभारण्यांत आला नाहीं. याचें कारण असें कीं, टिळकांविषयीं मनांतून लोकांची सहानुभूति सामान्यपणें पूर्वीसारखीच असली तरी कांहीं कांहीं बाबतींत विशेष फरक पडला होता. पहिल्या खटल्याच्या वेळीं नेमस्त पक्षाच्या कांहीं थोड्या लोकांनींहि डिफेन्स फंडाला वर्गणी दिली होती. पण दुसऱ्या खटल्याच्या वेळीं त्यांनीं गुप्तरूपानेंहि वर्गणी दिली नाहीं. याचें मुख्य कारण या खटल्यापूर्वी दोनचार वर्षे नेमस्त व जहाल पक्षांतील वाद, भांडणें व शिव्यागाळी विकोपाला जाऊन अखेर सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यानें दोन्ही पक्ष कट्टे वैरी बनले होते. बंगाल्यांत अत्याचार सुरू झाल्यामुळें नेमस्त पक्षानेहि, सरकाराप्रमाणेंच, जहाल पक्ष व अत्याचारी पक्ष यांची साखळी मनांतून जोडली होती. आणि टिळकांवरील खटला हा अप्रत्यक्षपणें अत्याचारी लोकांवरीलच खटला असे मानून, वर्गणी देण्याच्या रूपानेंहि या खटल्याशीं संबंध ठेवणें म्हणजे अत्याचारांना सहानुभूति दाखविण्यासारखेच आहे असे त्यांनीं मानले. अशा रीतीनें टिळकांविषयीची सहानुभूति मुळांतच नष्ट झाल्यामुळें नेमस्तांनीं सरकाराला भिऊन या खेपेस वर्गणी दिली नाहीं असे म्हणण्यापर्यंत पाळीच आली नाहीं. कारण ही पाळी कांहीं अंशी जहाल किंवा राष्ट्रीय पक्षांतल्या कांहीं थोड्या लोकांवरहि आली होती. यामुळें दुसऱ्या खटल्यांतील खर्च टिळकांना

खासगत करावा लागला, व मदत झाली ती अगदीं जवळच्या स्नेहीमंडळीकडूनच झाली.

पहिल्या खटल्यांत टिळकांच्या बचावाकरिता बॅरिस्टर देण्यात आले होते. दुसऱ्या खटल्यांत टिळकांनीं आपला डिफेन्स आपणच दिला. १८९७सालीं टिळकांचा खटला आपणाला चालवावयाला मिळाला तर हवा असे अनेक तरुण देशी बॅरिस्टरांना व वकिलांना वाटत होते, व कांहीं अंशी त्याकरितां स्पर्धाहि सुरू होती. १८९७ सालीं देखील मुंबईच्या कोणत्याहि युरोपियन बॅरिस्टरानें टिळकांचा खटला चालविला नसतां असे वाटते, पण १९०८ सालीं याविषयीं संशय उरण्यास जागाच नव्हती. याचें प्रत्यंतर हेच कीं, १९०८ चा खटला चालविण्याला नामांकित असा हिंदी वकील बॅरिस्टरहि पुढें आला नाहीं. तरुण पिढीपैकीं कांहीं माणसें पुढें आलीं; आणि बॅ. बॅप्टिस्टा, सॉलिसिटर राघवय्या, वगैरे गृहस्थांनीं टिळकांच्या खटल्याचें काम पत्करून पुष्कळच धैर्य दाखविले यांत शंका नाहीं. परंतु एकंदर देशी बॅरिस्टर व वकील वर्ग भीतीनें गांगरून दडपून गेला होता यांतहि शंका नाहीं. दरोड्याच्या खुनाच्या खटल्यांत कोणी वकीलपत्र घेतलें तर आरोपीच्या दुर्गुणांचा वास त्याला अगाऊ लागलेला आहे, किंवा पुढें लावून घेण्याची त्याची इच्छा आहे, असे अधिकारी वर्ग समजत नाहीं. पण राजद्रोहाच्या खटल्यांत आरोपीच्या बचावाला जो वकील पुढें येतो तो द्रव्यलाभापेक्षा कांहीं अंशी कीर्ति-लाभाकारितां व कांहीं अंशी सहानुभूतीनें पुढें येतो असेच अधिकारी मानतात. आणि या पुरोगामी वकिलावर सरकारचींच काय पण न्यायाधिशांचीहि इतराजी होते असा अनुभव आहे. हें वर्म माहित असल्यामुळें, आणि १८९७ च्या राजद्रोहांत अत्याचारांच्या भूमिकेची भर पडल्यामुळें, या वेळीं कोणीहि देशी वकील बॅरिस्टर पुढें आला नाहीं. आणि बॅप्टिस्टा वगैरे जे पुढें आले त्यांना बरेच दिवस पर्यंत धंद्यांत नुकसान सोसावें लागलें. बॅरिस्टर बॅप्टिस्टा व टिळक यांचा पूर्वीचा परिचय फारसा नव्हता. तथापि संकटकाळीं ते टिळकांवरील भक्तिमुळें पुढें आलें. मुंबई हायकोर्टातील कामकाजांत त्यांनीं पुष्कळच मेहनत केली. इतकेंच नव्हें तर त्यांचें उतराई होण्याकरिता टिळक तुरुंगांत असता केसरी कचेरीनें त्यांना जी रक्कम पाठविली तीहि टिळकांच्या कुटुंबाच्या नांवानें त्यांनीं पुढें परत केली. बॅप्टिस्टा यांचें हे धैर्य व औदार्य पाहून टिळकांना त्यांच्याविषयीं प्रेमादर व टिळकांच्या पक्षाला त्यांच्याविषयीं कृतज्ञताबुद्धि वाटूं लागली. पुढें

टिळक सुटून आल्यावर त्यांनीं केलेल्या होमरूल लीगच्या चळवळींत बॅप्टिस्टा यांनीं प्रथम प्रथम प्रमुख भाग घेतल्यानें टिळकांचा व त्यांचा स्नेह वृद्धिंगत झाला. आणि विलायतेस चळवळ करण्याकरितां टिळकांनीं बॅप्टिस्टा यांसच प्रथम पाठविले.

वर्गणी देणें व वकिली मदत करणें एवढ्याच गोष्टींनीं या दोन खटल्यांच्या प्रसंगांत फरक पडला असे नाहीं. तर टिळकांशीं इतर रीतीनें वागण्यांतहि कांहीं लोकांच्या मनोवृत्तींत फरक दिसून आला. सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर टिळक मुंबईस गेले असतां त्यांचे परमस्नेही दाजीसाहेब खरे यांच्या घरीं पूर्वीप्रमाणें उतरे नासे झाले, व उतरण्याविषयीं खरे यांनींहि त्यांना आग्रह केला नाहीं ! टिळकांनीं तेथपासून सरदारगृहांत उतरण्याची सुरुवात केली. एका अर्थानें हें योग्यच होतें. कारण टिळकांनीं खासगी घरीं उतरावें तर त्यांच्याकडे गुप्त पोलिसांपासून अत्याचारी माथेफिरू लोकांपर्यंत हरएक पेशाचे, ढंगाचे, मताचे व स्वभावाचे लोक भेटीला येणार ! तसेच स्वतःच्या काय पण इतरावरील राजद्रोहाच्या खटल्यांतहि मदत करण्याला टिळक मुंबईस जाणार. अर्थात् असल्या लोकांचा व असल्या कामाचा उपसर्ग, खरे हे परम मित्र झाले म्हणून त्यांना किंवा इतर कोणा मित्रालाहि, कां लावावा अशा विचार टिळकांनीं केला. सरदारगृहांत उतरण्याला दोन गोष्टी अनुकूल. आधी एक तर ती जागा सार्वजनिक स्वरूपाची. तेथें कोण उतरला, आला गेला याला कोणताच विशेष अर्थ किंवा महत्त्व नाहीं. पोलिसांनीं सरदारगृहांत आल्यागेल्याची नोंद ठेवली व न ठेवली दोन्हीला किंमत सारखीच. इतका तो विधि नित्य क्रमांतला. शिवाय सरदारगृहाचे मालक विसुभाऊ साळवेकर हे मनाचे खंबीर असून सरदारगृहांत टिळकांनीं उतरण्यासंबंधीं त्यांनीं केव्हांहि यत्किंचितहि अनास्था किंवा नापसंती दर्शविली नाहीं. इतकेंच नव्हे तर, " सरदारगृह हे तुमचे व तुमच्या राष्ट्रीय पक्षाचे घरच आहे असे समजा आणि किंचितहि शंका किंवा भीड न धरतां येथें सर्रास उतरत चला," असे त्यांनीं टिळकांना आस्थापूर्वक कायमचेच सांगून टाकले होते. पहिल्या खटल्यानंतर, टिळक राजद्रोही म्हणून सरकारच्या इतराजीतले या त्यांच्या लौकिकामुळें, त्यांच्या घरीं मुलगी देणें किंवा त्यांच्या घरची मुलगी करणें या गोष्टीला नाक मुरडणारा किंवा मागें घेणारा एखादा सोवळा गृहस्थ आढळण्याइतकी मजल गेलेली होतीच. अर्थातच १९०८ च्या खटल्याच्या सुमारास अशा लोकांची संख्या फार वाढली होती.

दुसऱ्या खटल्यांत टिळकांनीं डिफेन्सचें काम स्वतः चालविलें याचें आणखीहि एक कारण असें कीं, बाहेरून कोणी मोठा बॅरिस्टर आणण्याइतके पैसे टिळकांजवळ यावेळीं नव्हते. १८९७ सालापेक्षां यावेळीं त्यांची सांपत्तिक स्थिति बरी होती. परंतु १९०१ पासून ताईमहाराज खटला सुरू झाला त्यांतच फौजदारी खटलाहि झाला. यामुळें केसरीच्या शिलकी पडणाऱ्या थोड्याशा पैशांपैकीं बराच भाग या कामीं खर्च झाला होता. आणि ज्या खटल्यांत सुटण्याची आशा नाहीं त्या खटल्यांत कर्ज काढून हजारो रुपये घालून बॅरिस्टर द्यावा आणि त्यानें कसा तरी डिफेन्स द्यावा यांत टिळकांना कांहींच स्वारस्य वाटलें नाहीं. राजकारणाच्या खटल्यांत वकिलानें आरोपीचा बचाव करावयाचा म्हणजे स्वतःच एका हातानें ढाल व एका हातानें तलवार न धरितां, यजमानानें तलवार व नोकरानें ढाल धरून लढावें असा प्रकार होतो ! राजकारणांतली तरवार आपण चालवावी तर न्यायकोर्टांतली ढालहि आपणच धरावी हेंच अधिक योग्य.

या खटल्याची दहशत लोकांना इतकी बसून गेली होती कीं, खटला चालूं असतां टिळकांचे कागदपत्र छापून देण्यालासुद्धां कोणी मदत करीना. १८९७ सालीं खटला चालू असतां केसरी-मराठ्याच्या आम्ही संपादक मंडळींनीं व मुंबईच्या मित्रमंडळींनीं मिळून एक दैनिक वर्तमानपत्र 'जादा केसरी' या नांवानें काढलें होतें. खटल्याची हकीकत लोकांना रोजच्या रोज समजण्याला मुंबईत आणि विशेषतः बाहेरगांवीं या पत्राचा फार उपयोग झाला. असें एक दैनिक पत्र या खटल्याचें वेळीहि काढण्याची टिळकांना आणि मित्रमंडळींना इच्छा होती. पण या खटल्याचें स्वरूप वेगळें असल्यानें ती गोष्ट घडून आली नाहीं. टिळकांची इच्छा अशी होती कीं, सर्व खटल्याची हकीकत नसली तरी त्यांचें रोज कोर्टांत जें भाषण होई तेवढ्याची छापील हकीकत रोज लोकांना वाचावयास मिळावी. आणि याकरितां एक युरोपिअन शॉर्टहँड रायटर या कामीं मुद्दाम खर्च करून नेमण्यांत आला होता. तो आपणाकडून तत्परतेनें भाषण उतरून घेऊन त्याप्रमाणें लिहून देई. पण रोजच्या रोज तें छापून मिळणें मुष्किलीचें झालें. मी हिंड हिंड हिंडलों. पण कोणी छापखानदार सवड नाहीं म्हणून सांगे, तर कोणी इतर कामाची सबब सांगे. आणि कोणी पैशांत मोडलें असें भासवितां यावें म्हणून फारच जबर आकार सांगे. नाहीं म्हणावयास गिरगावांतील जुन्या पोस्टाला लागूनच असलेल्या एका गुजराथी छापखानेवाल्यानें हौसेनें मदत करण्याचें कबूल केलें. पण तें काम त्याच्या

आवाक्याबाहेरचें ठरलें, आणि एका दिवसाच्या प्रयत्नानंतर ती कल्पना मला सोडून द्यावी लागली.

**खटल्याचें पुस्तक**—पण संकटांतच धैर्याची परीक्षा होते असें म्हणतात त्याप्रमाणें येथेंहि अनुभवाला आलें. आपणावरहि केव्हां खटला होईल याचा नेम नाहीं असें अहोरात्र वाटत असतां, मी व खाडिलकर हे आपलीं कामें अधिक उत्साहानें व दक्षतेनें करूं लागलों. माझ्या या कामापैकीं पहिलें काम टिळकांच्या या खटल्याच्या हकीकतीचें इंग्रजी पुस्तक काढणें हें ठरलें. कारण असें पुस्तक प्रसिद्ध होऊन, खटल्यांतील आपल्या बचावाच्या भाषणासह इत्थंभूत हकीकत कागद पत्रानिशी हिंदुस्थानांत व परदेशांत लोकांना वाचावयाला मिळावी अशी इच्छा, टिळकांना खटल्याच्या अखेरच्या दिवसांत मी भेटावयास गेलों असतां त्यांनीं मजजवळ प्रगट केली होती. आणि मोठ्या साडेचारशें पानाचें पुस्तक दोन महिन्यांत काढून ती मी पुरी केली. हें पुस्तक मी काढल्यानंतर लवकरच जप्त झालें. तथापि खासगी रीतीनें माझ्या संग्रहीं राहिलेली एक प्रत टिळक मंडालेहून परत आल्यावर, मी त्यांना दिली. त्या पुढें ती त्यांनीं आपल्याजवळच ठेवली. आणि पुस्तक जप्त झाल्यामुळें त्यांच्या प्रसिद्धीनें साधणारा टिळकांचा हेतु जरी फसला तरी, मी एवढें पुस्तक अशा अडचणीच्या दिवसांत इतक्या लवकर काढूं शकलो याबद्दल त्यांनीं मोकळ्या मनानें मला शाबासकी दिली ! या माझ्या कार्य-कुशलतेनें त्यांच्या मनावर कायमचा परिणाम झाला. त्यामुळेंच पुढें 'केस फॉर इंडियन होमरूल' हें पुस्तक काढण्याचें काम टिळकांनीं मजकडेच दिलें आणि तेंहि पण मी अशाच तडाख्याने पार पाडलें. 'टिळक केस'च्या इंग्रजी पुस्तका-वरील बंदी आतां उठली आहे, पण उलट इतक्या जुन्या काळांतील हकीकती विषयींची उत्सुकता कमी झाली आहे. तथापि माझ्या परिश्रम-पात्रतेचें एक उदाहरण म्हणून मी अभिमानानें या पुस्तकाकडे बोट दाखविलें तर तो माझा अभिमान अयथार्थ आहे असें कोणीहि म्हणेलसें वाटत नाहीं. असो. असलें पुस्तक छापण्याच्या मार्गांत अडचणी किती तरी ! पण टिळकांचा खटला चालू असतां छापखानेवाल्यांकडून जी मदत मिळाली नाहीं, किंवा मिळूनहि कदाचित् इतर कारणामुळें फुकट गेली असती, ती खटल्यानंतर खटल्याचें पुस्तक काढण्याचें बाबतींत इंदुप्रकाश छापखान्याचें मालक श्री. दामोदर सावळाराम यंदे यांजकडून मिळाली. पूर्वी १८९७ च्या खटल्याचें पुस्तक

बॅ. केशवराव देशपांडे व ॲडव्होकेट सेटलूर यांनीं प्रसिद्ध केलें, तशा तऱ्हेचें पुस्तक या खटल्याचेंहि प्रसिद्ध करावें असे मी ठरविलें. आणि यंदे यांनीं मला हें पुस्तक प्रथम छापखान्याच्या जबाबदारीवर खर्च करून छापवून देण्याचे कबूल केले. यंदे यांचे हे दोन प्रकारचे धाडस होते. पुस्तक राजद्रोहाच्या खटल्याचे असल्यामुळें सरकारची इतराजी होण्याचा संभव. आणि पुस्तक अदमासाप्रमाणें न खपले किंवा एकदम सरकारजमा झालें तर पैशाचें नुकसान ठेवलेलेंच. तरी टिळक-केळकरांचा स्नेह स्मरून त्यांनीं हे दोन्ही प्रकारचे धाडस आनंदानें केलें. खटल्याची हकीकत घेण्याकरितां युरोपिअन शॉर्टहँड रायटर केसरी कचेरीनें नेमला होता. ती हकीकत आणि कोर्टाकडून घेतलेल्या सहीशिक्क्याच्या नकला अशी पुस्तकाची सर्व तयारी सिद्ध होती. शॉर्टहँड रिपोर्टराकडून येवढा प्रचंड भारा आला कीं, तो जवळ जवळ निम्माअधिक छाटावा लागला व सांधेजोड करणें हें मोठें बिकट काम होऊन बसलें. तसेच वर्तमानपत्रांच्या अभिप्रायांचा मजकूर इतका पुष्कळ व इतका चांगला होता की, तो न छाटण्याचा मोहहि आवरेना. यामुळें या खटल्याचा ग्रंथ मोठ्या आकाराच्या साडेचारशें पानांचा झाला. तथापि यंदे यांच्या सहाय्यामुळें तो खटल्याच्या निकालापासून अवघ्या सात आठवड्यांत म्हणजे ता. १५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यांत आला ! या अल्पावधीत येवढा ग्रंथ प्रसिद्ध करणें हें काम संपादक व छापखानेवाले या उभयतांनाहि फार दगदगीचें झालें. पण खटल्याची हकीकत साधार व समग्र वाचण्याची लोकांना उत्कंठा फार यामुळें श्रमाकडे कोणीच पाहिले नाहीं. मात्र योगायोग असा कीं, पुस्तकाच्या मुखपृष्ठाचें म्हणजे एकंदर ग्रंथाच्या अखेरचें प्रूफ पाहून मी छापखान्याची पायरी उतरतों तोंच हायकोर्टाच्या बेलिफानें एक नोटिस आणून मजवर बजाविली. ही नोटिस माझ्यावर पुढें झालेल्या बेअदबीच्या खटल्याची होती.

माझ्यावर झालेल्या या खटल्याची सर्व हकीकत पुढें 'माझा न्यायकोर्टाशीं ऋणानुबंध' या प्रकरणांत मी देणार आहे म्हणून ती येथें देत नाहीं. या खटल्यांतून मी मोकळा होण्याच्या आधी व त्यानंतर मी दोन कामें त्यांतल्या त्यांत विशेष महत्त्वाचीं अशीं हातीं घेतलीं. एक टिळकांच्या शिक्षेवर विलायतेस प्रिव्हिकौन्सिलडे अपील करणें, आणि दुसरें कॉंग्रेसची दोन शकलें झालीं होतीं तीं शक्य तर जोडणें. प्रथम अपीलासंबंधानें सांगतों.

**खटल्याचें अपील**—मुंबईस टिळकांचा खटला चालू असतां त्यांच्या मदतीकरितां वर्गणी जमविण्यांत आली होती हे मागें सांगितलेच आहे. परंतु विलायतेतील

खर्च केसरी कचेरीच्या हातून निभावण्यासारखा नव्हता. फंड जमविण्याची गरज होती. त्याकरितां म्हणून तारीख १८ सप्टेंबर रोजीं मी व खाडिलकर यांच्या सहीनें वर्गणी-करितां जाहीर विनंतिपत्र काढण्यांत आलें. या विनंतिपत्राला उत्तर लोकांकडून समाधानकारक आलें. वर्गणीदारांची संख्या १८९७ सालापेक्षां फारच कमी होती. संख्येचा हा कमीपणा वर्गणीच्या आंकड्यांनीं थोडासा भरून निघाला. पण पूर्वी निरनिराळ्या प्रांतांत मिळून सुमारें पाऊण लाख रुपये वर्गणी टिळकांच्या बचावाकरितां जमली होती. तितकी या वेळीं जमली नाही. वर्गणी जमविण्यांत आली ती मुख्यतः मुंबई शहरांत व महाराष्ट्रांत. वर्गणीचे आंकडे किंवा नांवें प्रसिद्ध करण्याची सोय नव्हती. बहुतेक वर्गणीदारांनीं आमचीं नांवें प्रसिद्ध करू नका असाच उलट आग्रह धरल्यानें वर्तमानपत्रांतून पांच वगैरे प्रसिद्ध करण्यांत आली नाहीं. पैसा विश्वासानें दिला, विश्वासानें घेतला, व योग्य कारणांला खर्च झाला, इतकाच या रुपयांचा हिशोब या स्थितीत प्रसिद्ध करितां आला असता. आणि तो न छापताच लोकांना समजलाहि. कारण प्रथम खापर्डे व नंतर दादासाहेब करंदीकर हे विलायतेला गेले, आणि विलायतचा या दोघांचा खर्च व अपिलाचा खर्च या फंडांतूनच झाला. फंड अपुरा पडल्यामुळें केसरीला स्वतःची बरीच रक्कम घालावी लागली. ही रक्कम घातल्यानें केसरी शब्दशः निर्धन झाला व कर्जाहि झालें. दडपशाहीमुळें 'आमचा केसरीचा अंक बंद करा' अशी पत्रें येऊं लागलीं. जितकें मिळवावें तितकें खर्चावें, नाहीं तेव्हां मिळेल तेथून कर्ज काढावें, अशा हलाखीच्या स्थितींत आम्हाला दिवस काढावे लागले.

**संयुक्त काँग्रेसची खटपट**—सुरतेस मोडलेली काँग्रेस पूर्वीसारखी नेमस्त, राष्ट्रीय, क्रांतिकारक, अशा सर्व पक्षांची मिळून पुन्हां भरूं लागावी, आणि या प्रत्येक पक्षाचें जें काय बळ तें इतर पक्षांना एकत्र कार्य करीत असतां मिळावें अशी टिळकांची इच्छा होती. ते तुरुंगांत न जाते तर हा उद्योग ते स्वतःच करते. आणि मंडालेहून परत आल्या-वर हाच उद्योग त्यांनीं पुरा पाडलाच. आणि त्याकरितां त्यांनीं थोडी हारहि खालली. हा उद्योग पुरा करण्यापूर्वीच त्यांना तुरुंगात जाणे आले. तरी हें कार्य चालू रहाण्याकरितां दूर दृष्टीनें टिळकांनीं 'काँग्रेस कंटिन्युएशन कमिटी'

म्हणून एक मंडळ नेमलें. तिच्या चिटणीसाच्या जागीं म. रा. बोडस यांची नेमणूक करण्यांत आली.

ता. १५ ऑगस्ट रोजीं बोडसांनीं दोन-तीनशें पुढाऱ्यांना उद्देशून एक पत्रक काढून मतें मागविलीं. तीं पुढील आक्टोबरपर्यंत येत होतीं. ( यापैकीं मतप्रदर्शक कांहीं पत्रें मी टिळक-चरित्र खंड २, भाग ७, यांत दिली आहेत तीं वाचण्यासारखीं आहेत. ) या मतांचा निष्कर्ष काढून निर्णय करण्याकरितां कलकत्ता येथें ता. ७ नोव्हेंबर रोजीं अमृत बझार पत्रिकेच्या कचेरींत निमंत्रित पुढाऱ्यांची खासगी सभा भरविण्यांत आली. तिला मी, चिंतामणराव वैद्य, शिवरामपंत परांजपे, डॉ. मुंजे इत्यादि लोक गेलो होतो. सभेला नेमस्त पक्षाचे भूपेंद्रनाथ बसूप्रभृति कांहीं लोकहि हजर होते.

कलकत्त्याच्या या सभेंत बंगालच्या पुढाऱ्यांनीं असें आश्वासन दिलें की, समेट होणें शक्य आहे, म्हणून वेगळी राष्ट्रीय सभा तूर्त भरवूं नये. पण तसे न घडल्यास मद्रासच्या काँग्रेसला आपल्यापैकीं कोणी जाऊं नये. दरम्यान बंगाल्यांतील नेमस्तांची सभा १५ नोव्हेंबर रोजीं भरावयाची होती ती भरली. पण तींत समेटाला फारशी आशा उरण्यासारखें ठराव झाले नाहींत. अर्थात् वेगळी राष्ट्रीय सभा भरविणें हे आवश्यक आहे असे त्या विचाराचे लोक म्हणूं लागले. या संबंधांत नागपूरच्या लोकांनीं राष्ट्रीय सभेचें आमंत्रण पूर्वीपासून दिलेलेच होतें. म्हणून त्याचा विचार करण्याकरितां ' काँग्रेस कंटिन्युएशन ' कमिटीची सभा मुंबईस ता. २८ नोव्हेंबर रोजी ' राष्ट्रमत ' कचेरीत भरण्याचे ठरून चिंतामणराव वैद्य यांच्या सहीनें निमंत्रणपत्रें गेलीं. त्याप्रमाणें सभा भरली. या सभेंत एक किंवा दोन मतें विरुद्ध पडून नागपुरास वेगळी काँग्रेस डिसेंबरांत भरविण्याचा ठराव झाला. या दोन भिन्नमतवाल्यांपैकीं मी एक होतों ! मी भिन्न मत देण्याचें कारण असें सांगितलें कीं, " एकट्या महाराष्ट्रानें वेगळी राष्ट्रीय सभा भरविण्याची जबाबदारी घेऊं नये. सुरू केली व मग मोडली असे न व्हावें. परप्रांतांतले कांहीं लोक अशा सभेला येतील कीं नाहीं हें अजून पूर्ण अजमावले गेले नाहीं. जे गेले आहे त्यावरून थोडीशी डळमळच दिसते. विशेषतः बंगाल्यांत उभयपक्षांमध्यें वैमनस्य कमी हे पवना येथील सभेवरून दिसून आले आहे. कन्व्हेन्शनवाल्या नेमस्तांच्या सभेंत ता. १५ रोजीं जरी हवे तसे अनुकूल ठराव झाले नाहींत, तरी त्यांना एकदम सोडून स्वतंत्र राष्ट्रीय सभेला बंगालचे राष्ट्रीय पक्षाचे पुढारी

येणार नाहींत. त्यांच्यापेक्षां आमच्यावर मोतीबाबूंचे प्रेम अधिक आहे हे खरे. तरीपण ते वेगळे, आणि स्वतंत्र राष्ट्रीय सभेला येऊन मिळणे वेगळे. तें नेहमीच्या राष्ट्रीय सभेलाहि फारसे जात नाहींत. मग आमच्या सभेला या स्थितींत कसे येतील ! अर्थात् परप्रांतांतील लोक यथाप्रमाण येत असल्याशिवाय नुसत्या महाराष्ट्रीयांनीं स्वतंत्र 'काँग्रेस' भरविणें योग्य नाहीं. नागपुराखेरीज इतर कोणत्याहि प्रांतानें अशी सभा आपल्या प्रांतांत भरवूं असे आजवर म्हटलेलें नाही. तसेच 'समितीच्या कायद्या'नें सरकार नागपूरची सभा बंद करण्याचा संभव आहे. आणि ती बंद केली तर विनाकारण आपण थप्पड खाऊन बसलो असे होईल. म्हणून वेगळी राष्ट्रीय सभा न भरवितां महाराष्ट्रापुरते एक राष्ट्रीय पक्षाचे कॉन्फरन्स भरवावे."

**स्वतंत्र काँग्रेसला बंदी**—तथापि नागपुरास स्वतंत्र राष्ट्रीय सभा भरविण्याचा विचार कायम ठरला व त्याप्रमाणें नागपुरास राष्ट्रीय मंडळानें आपलें स्वागत-मंडळ बनवून सर्व तयारी केली. अशा प्रकारची सभा भरणार असे ठरल्यामुळें प्रत्येक प्रांतांत नव्या पक्षाचे असे जे थोडेबहुत लोक होते त्यांनीं सहजच डोकें वर काढले. त्यांना ह्या चळवळीनें उत्तेजन आलें. आणि चारदोनच कां होईनात पण आपल्या पक्षाचे प्रतिनिधि नागपुरास जावे अशा इच्छेनें त्यांनीं निवडणुकी करण्यास प्रारंभ केला. स्वयंसेवक मंडळाची योजना झाली. उतरण्याची व जेवण्याची जागा मंडप या सर्व व्यवस्थेला नागपूरची मंडळी उत्साहाने लागली. येऊन जाऊन अध्यक्षच काय तो ठरावयाचा होता. इतक्यांत लोकांनीं अदमास केला होता त्याप्रमाणें घडलें. अस्मानी—सुलतानी प्रकार झाला. तारीख ११ डिसेंबर रोजीं नागपूर येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें क्रिमिनल प्रोसिजर कोड १४४ प्रमाणें नोटीस काढली, व असें फर्मावलें कीं "नागपूर येथें होऊं घातलेली २४ वी राष्ट्रीय सभा सरकारकडून बंद करण्यांत आली आहे. ११ जानेवारी १९०९ पर्यंत स्वागत-मंडळानें या राष्ट्रीय सभेसंबंधानें कोणतीहि जाहीर सभा भरवूं नये. कोणत्याहि इमारती उभारूं नयेत. चालू काम असेल तें बंद करावें. मंडप वगैरे घालूं नयेत." या हुकूमानें राष्ट्रीय पक्षाच्या राष्ट्रीय सभेचे सगळेच गाठोडें नोकरशाहीच्या खुंटीला लागले. या हुकुमाविरुद्ध स्वागत-मंडळानें बरीच तक्रार केली. परंतु सर्व तक्रारी ऐकून घेऊन मॅजिस्ट्रेटनें फिरून १६ डिसेंबर रोजीं पूर्वी केलेला हुकूम कायम

केल्याचा पक्का हुकूम केला. त्यामुळें स्वागत-मंडळाचे चिटणीस डॉ. मुंजे व नारायणराव अळेकर यांनीं राष्ट्रीय सभा भरत नाहीं असें जाहीर केलें, आणि झालेली हकीकत 'काँग्रेस कंटिन्युएशन कमिटी'च्या अधिकाऱ्यांकडे कळविली.

पण अशा 'रीतीनें नागपूरची सभा बंद झाली तरी बंदीचा हुकूम नागपूर पुरताच असणार यामुळें ती सभा दुसरीकडे कां भरू नये अशी पृच्छा कित्येकांकडून होऊं लागली. कित्येक वर्तमानपत्रांतून अशा अर्धवट बातम्याहि प्रसिद्ध झाल्या कीं, नागपूरची सभा रहित झाली ती मुंबईस भरणार आहे. वास्तविक नागपुरास बंदीचा हुकूम काढण्याची सरकारची जीं कारणें तींच मुंबईसहि लागूं होती. म्हणून मुंबईस सभा भरवावी या सूचनेंत अर्थ नव्हता. आणि ती भरविली जाणार या वदंतेवर कोणी विश्वास ठेवण्याचें कारण नव्हतें. पण तशा बातम्या प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें माधवराव बोडस यांनीं वर्तमानपत्रांतून स्पष्टपणें जाहीर केलें कीं "मुंबईस सभा भरणार ही गोष्ट खोटी. तसा विचारच नाही. आणि कोणीहि ही वदंता खरी मानूं नये." बोडस हे व्यक्तिशः वेगळी राष्ट्रीय सभा भरविण्याच्या विरुद्ध होते. एवढेंच नव्हे तर, नागपूरची सभा बंद झाली हें ऐकून त्यांना मनातून आनंद झाला. आणि त्यांनीं तो ताबडतोब मराठा पत्राच्या द्वारें व्यक्त केला. ते लिहितात, "मुंबईस सभा भरणार ही गोष्ट काँग्रेस कंटिन्युएशन कमिटीला मान्य नाहीं व माहितीहि नाहीं. राष्ट्रीय सभा वेगळी भरवावी या गोष्टीला मी पहिल्यापासून विरुद्ध आहे. मी संयुक्त राष्ट्रीय सभेच्या कल्पनेचेंच सतत समर्थन केलें आहे. एकतर्फी राष्ट्रीय सभा भरविणे हे इष्ट नाही. तिला लोकांच्या दृष्टीनें कांहीं किंमत असणार नाहीं. उद्यां नेमस्त लोकांना अधिक शहाणपणा सुचून त्यांचा पक्षाभिमान हटेल व संयुक्त राष्ट्रीय सभा भरेल अशी मला आशा आहे. नेमस्त पुढाऱ्यांबद्दल व्यक्तिशः मला अत्यंत आदर वाटतो, व लॉर्ड मोर्ले यांच्या सुधारणांच्या योजनेंतून दरम्यान कांहीं भरीव असा फायदा हातीं लागेल अशी आपण सर्वांनीं आशा करावी हे योग्य आहे. नागपूरच्या अधिकाऱ्यांनीं सभाबंदीचा हुकूम काढला हें दिसण्यांत संकट असलें तरी वस्तुतः ती ईश्वराची कृपाच होय. कारण आमचे नागपूरचे उत्साही मित्र जी मोठी चूक करणार होते ती अशा रीतीनें परस्पर बचावली गेली."

नागपूरची सभा थांबल्यानंतर राष्ट्रीय पक्षाची वेगळी काँग्रेस भरण्याची कल्पना पुढें केव्हां निघालीच नाहीं. मात्र १९०८-१४ या वर्षांत नेमस्तांकडून

राष्ट्रीय सभा या नांवानें भरविली जाणारी सभा रोडावत जाऊन लोकांत अप्रिय झाली होती. आणि संयुक्त राष्ट्रीय सभा भरवूं इच्छिणारा पक्ष हळुहळू बळावत होता.

टिळकांचा खटला, त्यावरील अपील, विलायतेंतलें अपील, व संयुक्त राष्ट्रीय सभेची खटपट या संबंधानें या अवधींत मला स्वतःला आलेली कांहीं पत्रें या खालीं देत आहें:—

(ता. १७ जुलै १९०८)—"सहज २६ जूनचा एका इंग्लिश वर्तमानपत्राचा अंक विकत घेतला. त्यांत असें आढळलें कीं, बळवंतरावांना पकडण्यांत आलें. तुम्ही लिहिल्याप्रमाणें या दिवसांत सरकार काय करील, काय न करील याचा नियम नाहीं हें तर खरेंच. पण ज्या पत्रांत ही बातमी होती त्यांतच टिळकांच्या लेखाचा जो सारांश म्हणून दिला होता त्यावरून मला वाटतें कीं, ते लेख १८९७ सालीं शिक्षा झालेल्या लेखांहून कमी कडक आहेत. बळवंतराव आपला खटला स्वतः चालविणार या गोष्टीनें त्यांच्या पक्षाच्या दृष्टीनें फायदा होईल हें खरें. पण स्वतः त्यांचें मात्र नुकसान होईल असें मला वाटतें. पण मी खुळा मनुष्य पत्रांत हें जें लिहितो तें काय! तुमच्या हातीं हें पत्र पोंचण्यापूर्वीच कदाचित् खटल्याचा बरा-वाईट निकालहि लागून गेला असेल. बळवंतरावांना या प्रसंगीं एखाद्या लेखापेक्षां स्वतःचें समर्थन अधिक करावयाचें आहे. म्हणून स्वतःचा डिफेन्स देतांना त्यांच्या मनांतले विचार पुढें येऊन त्यांचाहि दोष त्यांच्या युक्तिवादाला बाधावयाचा!" (श्री. मो. साने, जर्मनी.)

(ता. ३ ऑगस्ट १९०८)—"टिळकांच्या खटल्याचा निकाल ऐकून इकडे सर्वांना फार वाईट वाटलें. त्यांचीं आमचीं मतें जुळत नसतील. पण त्यांची बुद्धिमत्ता त्यांचें मनःस्वातंत्र्य व त्यांची देशभक्ति याविषयीं कोणाचाहि मतभेद नाहीं. त्या बाबतींत त्यांचे कौतुक करावें मान द्यावा तेवढा थोडाच आहे. म्हणून हेही या नात्यानें मी तुम्हाला लिहितों कीं, या दिवसांत तुम्ही फार जपून लिहा. हें वाचून तुम्ही म्हणाल 'नटेसन तू भित्रा आहेस!' तसे वाटेल तर म्हणा. पण उगीच दगडाला टक्कर देण्यांत तरी काय अर्थ असें मीहि तुम्हाला विचारतो.' (जी. ए. नटेसन, मद्रास.)

(ऑगस्ट १९०८)—"माझे खटले कोर्टांत केव्हां निघतील याची कल्पना नाहीं. डिसेंबरापूर्वी ते निघत नाहींत. या खटल्यामुळें इंग्लंडला जाण्याचा

तूर्त थांबलों. विलायतेस गेलों तरी माझ्या हद्दपारीसंबंधानें कोणतीहि खटपट करण्याचा माझा विचार नाहीं. मात्र भाषणांतून त्यांवर टीका करीन. तेथें एक वर्षभर राहून राजकीय चळवळीचें व ग्रंथ लेखनाचें काम करण्याचा माझा विचार आहे. ब्रिटिश न्यायदेवतेवर माझा विश्वास नाहीं. टिळकांच्या खटल्यांत अपील करून कांहीं फायदा होईल असें मला वाटत नाहीं. मात्र त्या खटपटीकरितां तुम्ही किंवा कोणी जात असेल तर टिळकांच्या संबंधानें इतर खटपट करण्याला मीहि जाईन. तुम्ही व दाजीसाहेब खरे जाल तर चांगले होईल. मी तुमच्या बरोबर येईन. मात्र त्याकरितां शक्य तितकें लवकर गेलें पाहिजे." ( लाला लजपतराय, लाहोर.)

( ता. ८ ऑगस्ट १९०८ )—"टिळकांच्या खटल्याची समग्र हकीकत एका मोठ्या पुस्तकाच्या रूपानें तुम्ही काढीत आहा असें पत्रांत वाचलें. सखाराम गणेश देऊस्कर यांची इच्छा बंगालींत या खटल्याची हकीकत प्रसिद्ध करण्याची आहे. केसरी-मराठ्यांतील हकीकत त्रोटक असणार. म्हणून देऊस्कर यांची तुम्हांला अशी विनंती आहे कीं, या पुस्तकाचा प्रत्येक फॉर्म छापून झाल्याबरोबर त्याची एक प्रत त्यांच्याकडे पाठवावी. म्हणजे ताबडतोब ते भाषांतर करून घेतील." ( बाबूराव पराडकर, कलकत्ता.)

( ता. १५ सप्टेंबर १९०८ )—"हाइंडमन यांची गांठ पडल्याचें मागील पत्रीं लिहिलेच आहे. आज नेव्हिनसन, रॅडक्लिफ व कॉटन यांना नॅशनल लिबरल क्लबांत भेटलों. गोखले यांचा हात दुखावला म्हणून ते परत आले आहेत. जर्मनींत त्यांचा हात दुखावला. उद्या ऑक्सफर्ड येथें विश्वधर्म परिषद भरणार आहे तिला मी जातो. नेव्हिनसन म्हणाले 'तुम्ही ही सांधि वाया दवडू नका.' तेथें प्रतिष्ठित लोक येतात. जो तो म्हणतो कीं रुफस आयझॅक्स यांनाच वकीलपत्र द्या. ते फौजदारी कामकाजांत अतिशय उच्च दर्जा मिळविलेले बॅरिस्टर असून शिवाय पार्लमेंटचे सभासद आहेत. आमचे वकिलपत्र घेण्याला त्यांना सवड सांपडेल कीं नाहीं याविषयीं शंकाच वाटते. पण मागेल ती फी देऊं. नाहींतर काय करणार !" ( ग. श्री. खापर्डे, लंडन. )

( ता. २२ सप्टेंबर १९०८ )—तुम्ही माझ्या साहेबी टोपीला म्हणून सलाम पाठविला. पण मी माझा नेहमींचा रुमालच अजून ठेवला आहे. परकीय लोकांच्या अशा पोषाखाची लंडनच्या लोकांना अलीकडे थोडीबहुत संवय झाली आहे. म्हणून

पूर्वीप्रमाणें फारसा त्रास होत नाहीं. तरीपण एक टोपी घेऊन ठेवलीच आहे. ती एखाद वेळ डोक्यावर ठेवून आरशांत पाहून मी खूप हंसतो, व मला टोपी घातलेला पाहून लेह्यांनाहि हंसू येईल. टिळकांच्या अपीलाच्या कामीं डालग्यॅडो नांवाचे एक सॉलिसिटर आम्ही केले आहेत. पारीख या नांवाचे एक बॅरिस्टर इकडे दहा वर्षे धंदा करीत आहेत त्यांना दुय्यम म्हणून नेमू. सर हेन्री कॉटन यांचें चिरंजीव यांनीहि काम करण्याचें कबूल केले आहे. आतां मुख्य बॅरिस्टर कोण मिळतो पाहावें. रुफस आयझॅक्स की, सर एडवर्ड क्लार्क ? आज दोघेहि सर्वांत श्रेष्ठ बॅरिस्टर आहेत. आणि दोघेहि सारखेच हुशार आहेत. टिळकांच्या खटल्याला अर्धवट राजकारणाचें स्वरूप आहे म्हणून हुशार बॅरिस्टर असून शिवाय व्यावहारिक मुत्सद्दी असा असेल तर अधिक बरे. खुद्द पार्लमेंटमध्यें चळवळ होण्याचा संभव हल्लीं फारच कमी दिसतो. कारण सरकारी कामाकरित्यांच प्रधानमंडळानें सर्व दिवस आंखून घेतले आहेत. तेव्हां खासगी संभाषणांतून काय लाभ होईल तेवढा खरा." ( ग. श्री. खापर्डे, लंडन. )

( ता. ३० सप्टेंबर, १९०८ )—"तुम्ही तिकडील मंडळी सहजच निराश झालेली दिसता. पण प्रयत्नाखेरीज आपण कोणीहि काय करणार ? मेरिडिथ येथें सर विलियम वेडरबर्न यांची गांठ घेतली. केवढा त्यांचा वाडा व केवढी त्यांची उद्यानभूमि ! स्वागतपूर्वक ते माझ्याशी पुष्कळ बोलले. सर एडवर्ड क्लार्क यांच्यापेक्षां ते रुफस आयझॅक्सच अधिक पसंत करतात. राष्ट्रीय सभा फिरून संयुक्त पक्षाची व्हावी असा प्रयत्न एक दोन वर्षे तरी आणखी करावा असें त्यांचें म्हणणें आहे. नेव्हिनसन यांनीं मला फराळास बोलाविले होते. लजपतराय, पार्लमेंटचा एक सभासद, व वर्तमानपत्रांच्या धंद्यांतील तीन लोक तेथें होते. या लोकांची माझी ओळख व्हावी म्हणूनच नेव्हिनसन यांनीं इतका खर्च केला. लजपतराय हे आपण इकडे कां आलो हे नीट सांगत नाहींत. मुलाला इकडील एका शाळेंत ठेवण्याचा त्यांचा हेतू असावा. बिपिन पालहि येथें आहेत. लेखकाचा धंदा करून इकडे राहण्याचा त्यांचा विचार दिसतो. बॅप्टिस्टा यांनीं हायकोर्टाकडे अर्ज देतांना फारच चांगलें भाषण केलें. दादासाहेब करंदीकर यांच्याबरोबर कागदपत्र येताच अपील अर्ज दाखल करूं. टिळकांच्या खटल्याचें पुस्तक तुम्ही काढलें त्याची प्रत आतांच पोचली. त्याची प्रस्तावना तुम्ही फारच हुषारीनें व कुशलतेनें लिहिली आहे. म्हणून या पुस्तकाच्या पाठविता येतील

तितक्या प्रती इकडे पाठवा. म्हणजे त्या हळूहळू इकडच्या मंडळींत पेरण्याचा माझा विचार आहे." ( ग. श्री. खापर्डे, लंडन. )

( ३० सप्टेंबर, १९०८ )—" टिळकांच्या खटल्याची हकीकत लक्षपूर्वक वाचीत आहे. त्यांच्या पहिल्या खटल्याचें अपील ने. ना. ॲस्क्विथ यांनीं प्रिव्ही-कौन्सिलपुढें चालविलें तेव्हां मी कोर्टात हजर होतों. बादशहाकडे अपील करण्या-संबंधानें कांहीं तरी जोराची चळवळ कां होऊं नये ? हाइंडमन वगैरे लोक तिकडेहि चळवळ करतील. आमचा हिंदी स्त्रिश्चन समाज या बाबतींत चळवळ करण्याला तयार आहे. चिदंबरम् पिले यांचे अपीलहि पुढच्या पांच तारखेला निघणार आहे. अपीलांत कदाचित् त्यांची शिक्षा कमी होईल. त्यांचा खटला मी चालविला. त्यांच्याकरिता एक फंड जमविण्याचा माझा विचार आहे व त्यांतील २–३ हजार रुपये बिचाऱ्या त्यांच्या कुटुंबालाहि द्यावे असे वाटते. तुमचीं कांहीं पत्रें मला उशिरा पोचली, त्यांचे लिफाफे मी तपासून पाहिले नाहींत. तरी पण पत्रें उघडून पहाण्याचा त्रास इकडे कमी आहे." ( पॉल पीटर पिले, मदुरा. )

( ६ नोव्हेंबर, १९०८ )—" बादशहांचा जाहीरनामा वाचला. राजकीय गुन्हेगारांना माफी देण्याचें त्यांत लिहिले आहे तेहि पाहिले. या माफीचा फायदा बळवंतरावांना मिळेल काय ? मला वाटतें कांही झालें तरी त्यांना जानेवारीपूर्वी सोडणार नाहींत. या आठवड्यांत येथें मोठी खळबळ उडाली आहे. डेली टेलिग्राफ पत्रांतील मुलाखत वाचून जर्मन वर्तमानपत्रें उसळली आहेत, व कायसरनें अधिकाराचा अत्याचार केला असे म्हणत आहेत. चॅन्सेलर फॉन ब्यूलो यांनीं सर्व जबाबदारी आपणांवर घेऊन राजीनामा देऊं केला. पण तोहि बादशहानें घेतला नाहीं. मोरोक्कोमधील फ्रान्स व जर्मनी यांची चुरस फार वाढली असून युद्धाच्या गोष्टी लोक बोलूं लागले आहेत." ( श्री. मो. साने, जर्मनी.)

( १० डिसेंबर, १९०८ )—" आज टिळक असते तर त्यांचें मन मी वळवूं शकलों असतों. पण त्यांच्या अनुयायांचा तेवढा मजवर विश्वास दिसत नाहीं ! डॉ. मुंजे यांना मी पत्र लिहिलें आहे त्याचा सारांश असाः—

" तुम्ही आपलेंच मत घेऊन बसला आहा. तरी मला जें वाटते तें तुम्हांला लिहितों व तें माझें मत कायम आहे. आम्ही आज वर्षभर संयुक्त काँग्रेस झाली तरच काँग्रेस, नाहीं तर काँग्रेस नाहीं, अशी चळवळ केली असती तर मद्रासच्या

काँग्रेसला तुम्हाला बराच गौणपणा आणता आला असता, व एक दोन वर्षांत तुम्हांला राष्ट्रीय सभा काबीज करता आली असती. आम्ही इकडे काँग्रेसला जाऊन मिळालो नाहीं. आणि एक प्रकारची तटस्थ वृत्ति धरून बसलों आहों. पण तुम्ही जर वेगळी काँग्रेस काढली तर आधींच जे दोन पक्ष आहेत त्याचे तीन होतील, व तुम्ही आम्ही एकमेकांतच झगडल्यासारखें होईल. तुमच्याप्रमाणेंच आमचेंहि म्हणणें असें कीं प्रतिज्ञापत्रक नसावें. या दृष्टीनें तुमचे आमचे अधिक जुळते ही गोष्ट खरी. राष्ट्रीय पक्षावर स्टेट्समन वगैरे पत्रांतून हल्ले होतात त्यांना पत्रिका उत्तर देत असते. पण वेगळ्या काँग्रेसचें समर्थन करवत नाहीं. पबना येथील आमच्या ठरावाप्रमाणें कोणत्याच काँग्रेसला जावयाचे नाहीं असं आम्ही ठरविले आहे. तरी पण वेगळी काँग्रेस निघाली म्हणजे एखाद दुसरा इकडे जाईल, एखाद दुसरा तिकडे जाईल. तुम्ही आम्ही सर्व एक विचारानें आवळून बसलों तर मेथा वगैरे लोकांना कठिण जाईल ! वेगळी सभा काढून बंगालची सहानुभूति यावेळीं घालवूं नका." ( मोतीलाल घोस. देवघर, बंगाल. )

( ता. १५ जानेवारी, १९०९ )—"टिळकांच्या खटल्याचे ब्रीफ रुफस आयझॅक्स् यांनीं परत केलें असें ऐकतों. माझें मत असें आहे कीं टिळकांच्या लेखांनींच घात केला. त्यांना बेफामपणें बोलता येतें पण आपली टिमकी ऐकूं जाईल अशी कशी वाजवावी हे त्यांना कळत नाहीं. राष्ट्रीय पक्षांत पुष्कळ बखेडे झाले आहेत. त्यांतील अनेकांचें एकमेकांशीं पटत नाहीं. तरी मोर्ले यांच्या सुधारणावर राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें काय आहे हें ठरवून प्रसिद्ध करण्याकरितां एक परिषद भरवावी. बाबू मोतीलाल हे मला लिहितात कीं नवीन लेफ्टनंट गव्हर्नर व व्हाइसरॉयचे प्रायव्हेट सेक्रेटरी यांच्याशीं त्यांची मुलाखत झाली. त्या दोघांचें म्हणणें असें कीं सुधारणावर राष्ट्रीय पक्षाचें काय म्हणणें आहे तें सविस्तर सांगा. टिळक आज असते तर ते हीच गोष्ट करते. बहिष्कार व त्याग हा टायमन ऑफ अथेन्सला शोभतो व विलायतेंत त्याची बडबड करणे ठीक आहे. पण येथें ते निरुपयोगी आहे. रा. ब. जोशी यांचेंहि मत असेंच आहे. तरी त्यांचाहि विचार घेऊन काय ते लौकर ठरवा." ( म. रा. बोडस, मुंबई. )

( ता. १८ फेब्रुवारी, १९०९ )—"नॅशनल पब्लिशिंग कंपनीची सभा झाली. त्यांच्या विनंतिप्रमाणें 'राष्ट्रमत' हें पत्र तुम्ही घेऊन आपल्या जबाबदारीवर

चालवाल काय ? तसें केलें तर आम्ही फार आभारी होऊं." ( दि. धों. साठ्ये, डॉक्टर, मुंबई. )

( ता. ७ एप्रिल, १९०९ )—"लॉर्ड मोर्ले यांच्या योजनेवर आपण परिषद भरवून ठराव केलें त्यांच्या छापील प्रती आपण इकडे पाठविल्या. त्या पार्लमेंटच्या सभासदांमध्यें वांटण्याची मी खटपट करीत आहे. मोर्ले हे लिबरल पक्षाचे असल्यामुळें त्या पक्षाचे लोक तुमचें ठराव उचलून धरणार नाहींत. काँझर्व्हेटिव्ह लोकांविषयीं बोलावयासच नको. म्हणून मजूरपक्ष व आयरिश नॅशनॅलिस्ट पक्ष यांच्यांत पुष्कळशा प्रती वाटल्या. मी परत निघण्यासंबंधानें केरहार्डी म्हणतात की मे अखेरपर्यंत तुम्ही इथें राहा. ते पार्लमेंटच्या इंडिया कमिटीपुढें हें प्रकरण ठेवणार आहेत. ते झाल्यावर मी मे जूनच्या सुमारास निघतो व नंतर बर्लिनला जाऊन साने यांना भेटून तिकडे परत येईन. " ( ग. श्री. खापर्डे, लंडन. )

( ता. १० सप्टेंबर, १९०९ )—हुगळी येथील परिषदेनें संयुक्त राष्ट्रीय सभा भरविण्याकरितां एक कमिटी नेमली आहे. त्यात सुरेंद्रनाथ व अरविंद घोषहि आहेत. पंजाबांतील लोकमतहि याच बाजूचें आहे. मध्यप्रांताचेंहि तसेंच. इतर ठिकाणीं जिल्हा-सभांतून असेंच ठराव होत आहेत. तरी पुणे सार्वजनिक सभेनें आपलीहि एक कमिटी नेमावी व बंगाल व इतर प्रांतांतील पुढाऱ्याशीं सहकारिता करण्यास तिला सांगावें. " ( ग. व्यं. जोशी, पुणें.)

(ता. २८ डिसेंबर, १९०९)—"येथें पुष्कळ लोकांशी मी समेटाविषयीं चर्चा केली. त्यांचें म्हणणें नेमस्त लोकांना परत आणून सर्वांची एकच काँग्रेस करावी. असे करताना व पुढेहि कडक भाषा व व्यक्तिविषयक टीका परस्पर टाकून दिली पाहिजे! कलकत्ता येथील १९०६ च्या काँग्रेसचा ठराव हे सर्वांना समान अधिष्ठान आहे. इतर गोष्टी गौण माना‌व्या. आपटे, भानु, लिमये, यांच्याशी मी पुण्यास आल्यावर चर्चा करीन व नंतर कांहींतरी समेटाचा मार्ग हुडकून काढू." ( बळवंत बाबाजी देशपांडे, नगर. )

# अधिकारयोगाचा उत्तरार्ध

मी केसरीचा संपादक झालों व खाडिलकर यांनीं केसरी कचेरी सोडून दिल तेव्हांपासून मला अंतर्बाह्य निश्चिंतता लाभली. आणि त्यापुढील पांच वर्षे, अनेक विषयांचा अभ्यास करून, केसरींत लेख लिहिण्याची हौस मला फेडून घेतां आली. जॅक्सनच्या खुनाचा खटला संपल्यानंतर महाराष्ट्रांत एक प्रकारची उदासीनता व निष्क्रियता आली. वायु झालेला मनुष्य ती लहर जोरांत असता आपल्या आवाक्याबाहेर शारिरिक श्रम करतो; तो वायूचा झटका उतरला म्हणजे प्रतिक्रिया होऊन निपचित पडतो; व वायूच्या लहरीपूर्वी त्याच्या अंगांत जितकें त्राण असतें तितकेंहि त्या लहरीचा उपमर्श झाल्यावर उरत नाही. तशी स्थिति महाराष्ट्राची झाली. नवे नवे वाद किंवा नवे नवे उपक्रम सुरू करणारे टिळक तुरुंगांत डांबून बसले. राष्ट्रीय पक्षानें राष्ट्रीय सभेवर बहिष्कार घातला पण त्या ऐवजी स्वतःची अशी संघटना त्यानें कांहींच केली नाहीं. "टिळक परत येतील व मग जें काय करावयाचें तें करतील" असाच हवाला जो तो देत होता!

दुसरें पक्षीं, पूर्वी राष्ट्रीय पक्षाचे लोक राष्ट्रीय सभेंत असतांना जरी कलह होत तरी त्यामुळें राजकारणांत जागृति राहिली होती. पण सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर राष्ट्रीय पक्ष बाहेर पडून जरी नेमस्त पक्षाला एकतंत्री राज्य लाभलें, तरी त्या राज्यांत कांही स्वारस्य उरलें नाहीं. विरोधामुळेंच पुष्कळ गोष्टींना महत्त्व व तेज रहातें. पण तो विरोध संपला म्हणजे तें तेज नाहींसें होतें. रस्सीखेचीच्या खेळांत दोन पक्ष दोहोंकडे ओढींत असतात तों पर्यंत त्यांच्या हातांतील दोर लोखंडाच्या कांबीसारखा ताठ रहातो; व दोन्ही बाजूचे गडी पवित्र्यावर उभे राहून आपली शक्ति प्रगट करण्याची कमाल करीत असतात. पण ताण ऐन जोरांत असतां दोर तुटला, किंवा एका बाजूच्या लोकांनीं अवचित तो सोडून दिला, तर दुसऱ्या बाजूचे लोक नुसते कोलमडून पडतात! त्याप्रमाणें राष्ट्रीय पक्ष निघून गेल्यामुळें राष्ट्रीय सभेची दुर्दशा झाली. राष्ट्रीय पक्षाबरोबर त्या पक्षांत सामील नसलेल्या अशाहि अनेक लोकांनीं राष्ट्रीय सभेला जाण्याचें सोडलें. सर फेरोजशहा मेथा प्रभृति लोक आळशी व मिजासी असल्यामुळें, राष्ट्रीय सभेला जाऊन सर्व वेळ हजर राहून निरानिराळ्या युक्त्यांनीं तिला महत्त्व आणून ती चित्ताकर्षक करण्याचें काम

त्यांच्या हातून झालें नाहीं. सभेचे ठराव म्हणजे मिळमिळीतपणाचें प्रदर्शन होऊं लागलें. प्रतिनिधींची संख्या रोडावत चालली. १८९० च्या सुमाराला ही प्रतिनिधींची संख्या जी दोन हजारापर्यंत गेली होती ती १९१२–१९१३ च्या सुमाराला अवघ्या ३०० वर येऊन ठेपली. आणि अध्यक्षहि मुधोळकरासारखे लाभूं लागले होते. म्हणजे असे कीं, त्यांच्या भाषणांत, युक्तिवादांत, कृतीत, नुसत्या राजकीय तेजस्वितेचाच अभाव नव्हे तर मूर्तिमंत रुक्षपणाचा अवतार प्रगट होऊं लागला होता.

अशा रीतीनें राष्ट्रीय पक्ष कुढून बसलेला, व नेमस्त पक्ष हालचाल करीत असला तरी त्या हालचालीनें सरकारच्या तोंडावरची माशीहि न उठणारी ! टिळकांना काळ्यापाण्याची शिक्षा झाल्यामुळें वक्ते व लेखक यांच्यावर जरब बसलेली. आणि प्रेस ॲक्ट झाल्यामुळें वर्तमानपत्रेहि संभाळून लिहिण्याची संवय करूं लागलेली. अशा स्थितींत चालू राजकारण म्हणून फारसे उरलेलें नव्हतें. वरिष्ठ कायदे कौन्सिलांत होणाऱ्या कामालाच काय तें थोडेंबहुत महत्त्व होतें. कारण व्यापारी लोक म्हणजे सर इब्राहिम रहिमतुल्ला, सर विठ्ठलदास ठाकरसी, असे कौन्सिलांत शिरल्यामुळें त्यांनी व्यापार व उद्योगधंदे याविषयींच्या प्रश्नांना एक नवे महत्त्व प्राप्त करून दिलें होते. आणि गोखल्यांचें कायदे कौन्सिलांतील काम व त्यांच्या विलायतेंतील येरझारा हाच काय तो चर्चेचा मुख्य विषय होऊन राहिला होता.

या सुमारास कांहीं वेळ हिंदुस्थानांतील राजकारणा ऐवजीं दक्षिण अफ्रिकेंतील राजकारणाला महत्त्व आलें होतें. आजचे महात्मा गांधी तेव्हां नुसते मोहनदास गांधी या नांवानें ओळखले जात असत. त्यांनी सत्याग्रहाची चळवळ करून दक्षिण आफ्रिकेतील सरकारास थोडेसें जेरीस आणलें होतें. विलायतेच्या एका खेपेनंतर गांधी यांनीं गोपाळराव गोखले यांना दक्षिण आफ्रिकेस निमंत्रण केलें. ते तिकडे जाऊन त्यांनीं सामोपचार केला तो इकडे फेरोजशहा मेथा वगैरे लोकांनाहि आवडला नाहीं. परंतु गोखल्यांच्या प्रोत्साहनानें हिंदुस्थानांत वर्गणी जमवून इकडील लोकांनीं गांधींच्या चळवळीचा तिकडे पाठपुरावा केला व सक्रिय सहानुभूति प्रकट केली. या वेळची एक मौजेची गोष्ट अशी कीं, आजचे अनेक कट्टर गांधीभक्त त्या वेळीं गांधीना शिव्या देत होते व त्यांची चेष्टा करीत होते. पण उलट केसरीच्या द्वारें मीच पांच हजार रुपये वर्गणी गोळा करून गांधींना पाठविली !

असो. वर दर्शविलेल्या शिवाय इतर विशेष प्रकारच्या चळवळी हिंदुस्थानांत तेव्हां चालू नव्हत्या. बंगाल्यांतहि असेंच सामसूम होतें. अरविंद घोष पाँडेचरीला जाऊन बसले. त्यांचीं वर्तमानपत्रें बंद पडलीं. त्यांच्या लगत्याची मंडळी विस्कळीत झाली. चित्तरंजन दास यांचें नांव पुढें आलें होतें तरी यावेळीं ते स्वतंत्रपणें कांहीं चळवळ न करिता सर्व वेळ वकिली करून पैसे मिळविण्यांतच घालवीत होते. नाहीं म्हणावयाला एखादा क्रांतिकारक तरुण एखादा अत्याचार करी, व दास बाबूसारखे वकील त्याचा डिफेन्स करण्याला लाभल्यामुळें, अशा लोकांची न्याय-कोर्टांतील चौकशी हाच एक मोठा लोकचित्ताकर्षक विषय होऊन रहात असे. महाराष्ट्रांत दडपशाही खूप जोरांत सुरू होती. समर्थ विद्यालयासारख्या संस्था बेकायदा ठरवून बुडवण्यांत आल्या; व गुप्त पोलिसांच्या कारभाराचा इतका सुळसुळाट झाला होता कीं त्यांच्या बेसुमार त्रासामुळें व छळामुळें मोठे धीराचे लोकहि हातटेकीस आले.

अशा वेळीं केसरी चालविणें हें काम बिकट होऊन राहिलें असल्यास नवल नाहीं. चालू राजकारणाची गर्दी नसल्यामुळें त्यासंबंधीं लिहावयाला विषय थोडे आणि रुक्ष मिळत. यामुळें अवांतर विषय घेऊन ते अग्रलेखांच्या रूपानें मी वाचकापुढें मांडीत असे. १९०९ सालीं खाडिलकर केसरीचे संपादक असतांच आयर्लंडच्या इतिहासावर मी जी एक मोठी लेखमाला लिहिली तिला राजकारणाचें तरी स्वरूप होतें. पण पुढें १९११ सालीं मी 'संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन' ही लेख-माला लिहिण्याला घेतली तींत राजकारण हुडकूं गेलें तरी मिळावयाचे नाहीं. तथापि ती लेखमाला विद्वान लोकांना तर पसंत पडलीच पण सामान्य वाचकांनाहि आवडली; व तिचे एक स्वतंत्र पुस्तकच काढा अशा सूचना मजकडे आल्या. नामदार भूपेंद्रनाथ बसू यांनीं विशिष्टविवाहाचें म्हणून एक बिल यावेळीं वरिष्ठ कायदेकौन्सिलापुढें आणलें होतें. त्याला वादग्रस्त स्वरूप असल्यामुळें, चालू राज-कारणाच्या विषयांच्या अभावीं, त्याला नसतें महत्त्व आलें. बसू यांच्या बिलाचें तात्पर्य इतकेंच होतें कीं, " सिव्हिल ( स्पेशल ) मॅरेज आक्टाप्रमाणें विवाह करूं इच्छिणाऱ्या वधुवरांना आपण कोणत्याच धर्माचें नाहीं असें लिहून द्यावें लागत होतें; परंतु ही अट त्यांतून काढली जावी आणि रूढ धर्मविधी न करतां एखाद्याला सिव्हिल पद्धतीनें लग्न करावयाचें झाल्यास तशी परवानगी असावी." भूपेंद्र बसू हे 'ब्राह्मो' होते, व ब्राह्मो समाजाच्या उपक्रमावरूनच मूलांत हा

कायदा करण्यांत आला होता. परंतु या अटीमुळें हिंदुसमाजांतील सुधारकांना पेंच पडे. तो असा कीं, एक धर्म तरी सोडावा किंवा विवाहविधीच्या बाबतींत रूढाचाराला तरी मान लववावी. असा बिकट प्रसंग त्यांच्यावर येई. पण "विवाहविधीच्या बाबतींत स्वातंत्र्य देणें हें, एकंदरीनें हिंदुसमाजाच्या दृष्टीनें, धर्मांतून माणसें घालवून देण्यापेक्षां अधिक बरें. हिंदुसमाजाची संख्या आधीच घटत आहे ती अशामुळें आणखी घटविणें बरें नव्हे" अशा विचारानें मी बसू बिलाला संमति दिली. पण राष्ट्रीय पक्षांतील एका वर्गाला हे धोरण आवडलें नाहीं. त्यानें सार्वजनिक सभेमध्यें जाहीर सभा भरवून केसरीचा म्हणजे संपादक या नात्यानें माझा निषेध केला.

टिळक मंडालयाहून परत येण्यापूर्वी, राष्ट्रीय पक्षानें फिरून काँग्रेसमध्यें जावें कीं नाहीं व गेल्यास कोणत्या अटीवर जावें या संबंधानें वाद उपस्थित झाला होता. त्याला साताऱ्यास तोंड पडलें. सातारकर मंडळींनीं उभय पक्षाचा समेट व्हावा असा कांहीं उपक्रम करण्याकरितां एक परिषद भरविण्याचे ठरविले. तींत सातारचे नेमस्त पुढारी रावबहादूर विठ्ठलराव पाठक हे तेथील राष्ट्रीय पक्षाशीं सहकारिता करीत होते, व त्यांना सातारकरांची अनुकूलता होती. परंतु बाहेरून आलेल्या लोकांत मतभेद होता. सभेचें अध्यक्षस्थान नामदार बेळवी यांना देण्यांत आलें होतें. मुख्य ठरावासंबंधानें आमच्या आमच्यांत दोन तट होते ते असे. राष्ट्रीय सभेंत जाण्याचा दुरून कां होईना पण उपक्रम करावा, निदान कोणी त्रयस्थ लोक सद्धेतूनें समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करूं म्हणतील तर त्याला तरी विनाकारण नाहीं म्हणूं नये, अशा मताचा मी होतों, आणि परांजपे खाडिलकर वगैरे मंडळी उलट मताची होती. त्यांचें म्हणणें असें कीं, "टिळक परत येईपर्यंत या बाबतींत कोणत्याहि प्रकारचें मत प्रकट करण्याची जबाबदारी आपण घेऊं नये." ते तोंडानें इतकेंच म्हणत. परंतु "राष्ट्रीय सभेंत राष्ट्रीय पक्षानें हल्लीच्या स्थितींत तर शिरूं नयेच, पण हल्लींचे निर्बंध व अटी दुरुस्त करून घेण्याचा प्रयत्नहि आपण करूं नये. त्यांत आपल्याला कमीपणा येतो." असे त्यांना मनांतून वाटे. त्यावर माझें म्हणणें असें होतें कीं, "स्वतःला कोणत्याहि प्रकारें बांधून न घेतां कोणी तिऱ्हाईत सामोपचाराचें बालणें बोलेल तर त्याला 'ठीक आहे, प्रयत्न करा' असे म्हणण्यांत आपलें कांहीं वेचत नाहीं. काँग्रेसच्या नव्या घटनेला जर आपण नांवें ठेवीत आहो तर तींत काय दुरुस्ती व्हावयाला पाहिजे

हें पर्यायानें सुचवीतच आहो कीं नाहीं ! मग तेंच ठरावाच्या रूपानें मांडण्याला कां हरकत असावी ! टिळकांनीं सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यावर काँग्रेस कन्टिन्युएशन कमिटी नेमली ती फिरून काँग्रेसमध्यें जाण्याकरितां कीं न जाण्याकरितां ! टिळक तुरुंगांत असतांहि आम्ही कोणाशीं सामोपचारानें बोललों तर टिळकांना उद्यां परत आल्यावर त्याचें वैषम्य वाटणार नाहीं. शिवाय आपण कोणत्याहि तऱ्हेनें त्यांना बांधूं इच्छित नाहीं. ते परत आल्यावर योग्य तें करतीलच. पण आपणालाहि कांहीं विचारशक्ति म्हणून आहेच कीं नाहीं ! तिचा आपण कां उपयोग करूं नये ! "

असा दुतर्फी वाद सुरू झाल्यावर, जणू कांहीं एखादी पैज लागावी त्याप्रमाणें रोकडा हाच प्रश्न निघाला कीं, टिळक आज येथें असते तर ते काय करते ! तेव्हां फिरून मतभेद झाला. मी म्हणालों, " टिळक असते तर सातारकरांच्या ठरावाला विरुद्ध गेले नसते. " परांजपे खाडिलकर म्हणत " ते हटकून विरुद्ध गेले असते." पण हा वाद तुटण्यासारखा नव्हता. टिळकांना कोणी कसें त्यांचें मत विचारावयाचें ! आणि ते मंडाले येथील तुरुंगांतून आपलें मत कसे सांगणार ! अर्थात्, ज्यानें त्यानें आपल्या मतासारखेंच टिळकांचें मत पडलें असतें असें प्रतिपादावें इतकेंच उरलें. शेवटीं सातारच्या सभेंत परांजपे खाडिलकर यांच्या मताप्रमाणेंच झालें. पण मौज ही कीं, पुढें टिळक परत आल्यावर साताऱ्यास उपस्थित झाला तोच प्रश्न त्यांनीं होऊन उपस्थित केला व मी म्हणत होतों तसेंच अगदीं बरोबर मत त्यांनीं दिलें !

इतकेंच नव्हे, तर साताऱ्यास विठ्ठलराव पाठकासारखे नेमस्त म्हणजे ज्यांच्या हातीं त्या वेळीं काँग्रेस होती, त्यांच्यातलेच एक पुढारी समेट सुचविण्याला पुढें आले होते; पण टिळकांनीं जो उपक्रम पुढें केला त्यांत अशा नेमस्त पुढाऱ्याचें निमित्तहि सांगण्याला मिळण्यासारखें नव्हतें. तरीहि उघड उघड खटपट अशी सुचविण्यांत येत होती कीं, निरनिराळ्या प्रांतांतील राष्ट्रीय पक्षांच्या लोकांनीं काँग्रेसची विद्यमान घटना बदलण्याविषयीं योग्य अटी 'आपण होऊन' सुचवाव्या. अटी मान्य होऊन त्याप्रमाणें दुरुस्ती न झाली तर बाहेर राहिलेल्या लोकांनीं काँग्रेसमध्यें जाऊं नये, पण स्वतःच दुरुस्त्या सुचवण्यांत कमीपणा मानू नये.

बेळगांवास १९१६ सालीं राष्ट्रीय पक्षाची प्रांतिक परिषद भरली तींत हा प्रश्न मोठा वादग्रस्त होऊन राहिला. आणि टिळकांच्या अनेक अनुयायांनीं आपलीं मतें त्या प्रसंगीं टिळकांच्या मताविरुद्ध दिलीं ! नाहीं म्हणावयाला खाडिलकरांनीं मात्र आपलें पूर्वीचें मत बदललें. कारण साताऱ्यास जी गोष्ट टिळकांनीं केली नसती असें ते निश्चयानें सांगत होते त्याच्या बरोबर उलट मत स्वतः टिळकांनीं आतां प्रतिपादल्यावर ते काय करणार ! पण त्यांच्यांत व परांजपेप्रभृति मंडळींत फरक होता तो हाच. खाडिलकरांचा टिळकांच्या शहाणपणावर पक्का विश्वास. टिळक म्हणतील तें बरोबर असलेंच पाहिजे, व ते आपण डोळे मिटून खुशाल करावें असा त्यांचा निश्चय. परांजपे, वासुदेवराव जोशी वगैरे मंडळी ही देखील टिळकांची अनुयायी खरी. पण अनुयायी या शब्दाच्या अर्थाप्रमाणें पावलावर पाऊल ठेवून जाणारे अनुयायी नव्हेत, तर पायांत घुटमळून आडवे पडणारे अनुयायी ! पण कांहीं अंशीं खाडिलकरांनीं रागाला राग उभा करून आपल्या स्नेहीमंडळींना चांगल्या शिव्या हासडल्या तेव्हां टिळकांच्या मताप्रमाणें ठराव मंजूर झाला.

काय कारण घडलें लक्षांत नाहीं, पण मी या चिरस्मरणीय बैठकीला हजर नव्हतों. म्हणून या बैठकींतील मौजा पहाण्याला मला सांपडलें नाहीं. मी असतों तरी मला बोलण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण या बाबतींत माझें मत स्वतः टिळकच आग्रहानें प्रतिपादीत होते. पण अखेर बेळगांवच्या सभेंत राष्ट्रीय पक्षानें राष्ट्रीय सभेंत फिरून जाण्याची खटपट करावी असा ठराव झाल्याचें मी ऐकलें तेव्हां मला फार समाधान झालें व सातारचा सूड बेळगांवानें घेतली असे उद्गार मला काढतां आले.

केसरी माझ्या हाती. खाडिलकर रिकामे. आणि परांजपे यांचें काळपत्र बंद पडलेलें. तेव्हां उघड रीतीनें टिळकांच्या धोरणाविरुद्ध लिहितां येण्याला परांजपे यांना साधन नव्हतें. पण त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनें स्नेहीमंडळींचीं मनें कुरतुडण्याची खटपट आंतून चालूच होती. टिळकांनीं तुरुंगांतून सुटून आल्यावर शांततेचा जाहीरनामा काढला व त्यानंतर राष्ट्रीय सभेंत शिरण्याचा असा हा प्रयत्न सुरू केला हें पाहून परांजपेप्रभृति मंडळी—टिळकांच्या तोंडावर नव्हे पण मनांतून—त्यांना नेमस्त किंवा मवाळ म्हणूं लागली होती यांत शंका नाहीं. पण १९०८ सालीं परांजपे सावरकर प्रभृतींनीं टिळकांना जवळ जवळ हेंच विशेषण लावलेलें

असल्यामुळें हें प्रकरण फक्त 'मागील अंकावरून पुढें चालूं' असें म्हणण्यासारखें होतें.

साताऱ्यास घडलेल्या गोष्टी सांगत असतां त्याच अनुसंधानाला धरून पुढें घडलेल्या कांहीं गोष्टी मी आगाऊ सांगितल्या. म्हणून पूर्वीचाच विषय पुढें चालवावयाचा तर तो असा की, माझ्या संबंधानें ही अशी धुसफूस नेहमीं सुरूंच होती. पण मीहि एक गोष्ट मनाशीं ठरवून ठेवली होती कीं, भांडून तंडून हडसून खडसून टिळक मंडाल्यास असतां मी केसरी हातीं घेतला तेव्हां इतरांच्या असमाधानाला कोण पुसतो ? कोणी स्नेहबुद्धीने किंवा विरोधानें जर असें म्हणाला कीं, "तुम्ही लिहितां किंवा बोलतां ही अमुक एक गोष्ट केसरीला न शोभणारी व टिळकांना न आवडणारी अशी आहे" तर मी त्यांना शांतपणें उत्तर देत असें कीं, "माझ्या संपादकीय कचेरींत मी एक मोठी पिशवी खुंटीला टांगून ठेवली आहे. तींत मजविरुद्ध ज्या कोणाच्या कांहीं तक्रारी असतील त्या घालून ठेवीत असतो. उद्यां टिळक परत आले म्हणजे ती पिशवी आणि केसरी लिहिण्याची लेखणी त्यांच्यापुढें ठेवीन, व मग ते स्वतः वाटेल ते करण्याला मुख्यत्यार व समर्थ आहेतच." पण मौंज अशी झाली कीं, टिळक परत आल्यावर ती तक्रारीची मोठी पिशवी अदृश्य झाली. पिशवी काल्पनिकच होती; व ती अदृश्य झाली याचा अर्थ मजविरुद्ध टिळकांकडे तक्रार मांडण्याला कोणी पुढें आलाच नाहीं. आणि टिळक येण्यापूर्वी केसरीची लेखणी जशी माझ्या हातीं होती तशीच ती पुढेंहि अबाधित राहिली.

टिळक मंडाल्याहून सुटून आले तेव्हां त्या रात्रीं मी त्यांना भेटून नमस्कार करून कांहीं वेळ बसून घरीं परत आलों. दुसरे दिवसापासून पुढें आणखी दोन दिवस मी असा क्रम ठेवला कीं, कोठें तारा पाठवणें, पत्रें पाठविणें, अपरिचित लोकांना नेऊन टिळकांना भेटविणें, वगैरेपुरतां मी टिळकांकडे जाई. परंतु उगाच त्यांच्यापुढें गप्पा मारीत बसलों नाहीं. एरवीच्या शिरस्त्याप्रमाणें ही गोष्ट व्हावयाची. पण ती त्या महत्त्वाच्या दोन दिवसांत घडली नाहीं. हें टिळकांच्या लक्षांत आलें. मग तिसरें दिवशीं ते मला म्हणाले, "कां हो तात्या, इतके लोक येऊन बसून बोलून जातात. पण तुम्ही तर कांहींच विचारीत नाहीं व कांहींच सांगत नाहीं याचा अर्थ काय ?" तेव्हां मी प्रथम साळसूदपणानें म्हणालों, "तुम्ही इतकें वर्षांनीं तुरुंगांतून सुटून परत आलां तेव्हां तुमच्याशीं बसून बोलण्याची अपूर्वाई परक्या किंवा लांबच्या लोकांना फार. ती त्यांची

अपूर्वाई संपली म्हणजे आम्ही तर काय घरचेच व रोजचेच आहो.'' पण इतकें बोलून किंचित् मिस्किलपणानें मी पुढें म्हणालों, '' तुमच्या गैरहजेरींत तक्रारी करण्यासारख्या ज्या गोष्टी मजकडून घडल्या असतील त्या तक्रारींच्या पिशव्या तुमच्यापुढें लोकांकडून ओतल्या जात असतील. तेव्हां त्या सर्व ओतून झाल्या म्हणजे मगच तुमच्याशीं एकदां स्वस्थ बसून बोलावें व त्या तक्रारींचा निकाल करून घ्यावा म्हणतों.''

'' टिळकांना सहा वर्षांचा अज्ञातवास घडल्यामुळें तुरुंगांत जाण्यापूर्वी ज्या त्यांच्या कल्पना व भावना होत्या त्या घेऊनच ते परत आलेले असतील. तसें झाले असता, मला केसरीचा संपादक होण्याला जरी त्यांनी हरकत घेतली नाहीं तरी, मराठ्यांतील मतप्रतिपादनासंबंधानें पूर्वी जो त्यांचा व माझा मतभेद होता तो आजहि असेल. तसें असल्यामुळें आपल्या पक्षांतील लोकांना नापसंत असणारी मतप्रतिपादनपद्धति मी केसरीत ठेवली तिजवर स्वपक्षीय लोक नाखुष झाले असल्याची भीति टिळकांच्या मनांत असेल. आणि कदाचित् ते आल्याबरोबर कांहीं लोकांनीं त्या थोडक्या वेळांतहि माझ्याविरुद्ध कागाळ्या त्याना आपलेपणाच्या भावनेनें सांगितल्या असतील.'' अशा अनेक शंका मनांत असल्यामुळेंच मी वर लिहिल्याप्रमाणें दुरून दुरून वागत होतों. पण टिळकांना मी मुद्दाम संकोच करीत आहे असा संशय येऊन ते मला म्हणाले, '' आतां आज रात्रीं जेवावयालाच या म्हणजे आपण स्वस्थपणें बोलत बसूं.'' त्याप्रमाणें मी रात्री भोजनाला गेलों तेव्हां ते मला म्हणाले, '' तुम्ही असें कां वागत होतां हे माझ्या लक्षांत आलें. पण मी खरोखरच तुम्हाला सांगतों कीं, जो जो मला भेटला त्यानें तुम्ही केसरी फार चांगला चालविला असेंच मला सांगितलें. कोणीहि तक्रार सांगितली नाही किंवा कागाळी केली नाही.'' नंतर मीहि त्यांना आपली बाजू खुलासेवार सांगितली व ती त्यांना पटली असें दिसलें.

'' टिळक सुटून आल्यावर सरकारानें जाहिरनामे काढून त्यांची नाकेबंदी केली त्याविरुद्ध टिळकांनीं स्टेट सेक्रेटरीपर्यंत तक्रारी केल्या. पण पुढें महायुद्ध सुरू झाल्यामुळें टिळकांनीं एक जाहीरनामा काढला व सरकारनें त्यांच्यावरील ही नाकेबंदी उठविली. तेव्हां सहजच टिळकांनीं आपल्या कार्याला नवीन प्रारंभ केला. त्यांत राष्ट्रीय सभेची घटना दुरुस्त करून घेऊन राष्ट्रीय पक्ष तींत घुसवाव-याचा हा एक भाग होता. पण तें लवकर घडून न आलें तर तेथपर्यंत स्वतःच्या

पक्षाची म्हणून कांहीं राजकीय चळवळ सुरू करावयाची असाहि दुहेरी कार्यक्रम होता. टिळक परत आल्यावर खाडिलकरहि पूर्वीप्रमाणें येऊं जाऊं लागले. पण मी केसरीचा संपादक असल्यामुळें त्यांना केसरींत विशेष लिहिण्याचें कारण नव्हतें व टिळकहि त्यांना विशेषसें लिहिण्याला सांगत नव्हते. पण पुढें रा. दत्तोपंत लिमये, केसरीचे एक सहकारी संपादक किंवा उपसंपादक, हे वारल्यामुळें तेव्हांपासून खाडिलकर सहसंपादक म्हणून कायमचे जोडून घेण्यांत आले. अग्रलेख वगैरे मीच लिहीत असे. पण केसरी आठ पानांचा असल्यानें अर्थात् सहसंपादक लागत. म्हणून युद्ध हा रा. खाडिलकरांचा आवडता विषय असल्यामुळें केसरीतील त्या लिखाणाचें खातें खाडिलकरांच्याकडे देण्यांत आलें, व तो विषय ते हौसेनें रंगवून लिहीत. युद्धाचा विषय अद्‌भुतरम्य असल्यामुळें त्यानें खाडिलकरांची लिहिण्याची हौस पुरी भागविली, तथापि मीहि त्या काळांत याच विषयावर केसरीत बरेच अग्रलेख लिहिले.

महायुद्धाच्या विषयावर केसरींचें धोरण काय असेल हें न सांगतांहि समजण्यासारखें आहे. जर्मन लोकांचा प्रत्येक विजय हा आम्हाला प्रिय वाटे. कारण इंग्रजांवर स्वतः आम्हाला मूड उगवितां येत नाहीं अशा वेळीं त्यांची रग जिरविणारा, त्यांचीं हाडें मऊ करणारा, शेरास सव्वाशेर भेटलेला पाहून आम्हाला बरे वाटल्यावाचून कसें राहील ? हिंदुस्थानांत त्या वेळीं अत्यंत शांतता होती. क्रांतिकारक लोक स्वस्थ बसून काय काय होतें ते उत्सुकतेनें पहात होतें. लॉर्ड हार्डिंज यांनीं हिंदुस्थानांतील जवळ जवळ सगळे काळे गोरे सैन्य युरोपकडे धाडून, हिंदुस्थानचें संरक्षण स्थानिक अँग्लो-इंडियन व रेल्वे वगैरे स्वयंसेवक यांजवर सोपविलें होतें. जर्मनीच्या धाकानें आपण होऊन राजकीय सुधारणा हिंदुस्थानांत करण्याच्या गोष्टी सरकार बोलूं लागले होते. म्हणून ही वेळ आपलें चळवळीचें घोडें पुढें दामटण्याला बरी आहे असें टिळकांनीं मनाशीं ठरविलें व राष्ट्रीय सभेंत शिरून ती हातीं कशी घेतां येईल याचा विचार चालविला. पण राष्ट्रीय सभा एकदम हातीं येण्यासारखी नव्हती. तिजमध्यें एकदां प्रवेश झाल्यावर ती काबीज करणें तेव्हां कठिण नव्हतें, पण प्रवेश होणें हेंच अधिक कठिण होतें. या कठिणपणाचें कारण असें कीं, सुरतेस मवाळांनीं जी 'कन्व्हेन्शन' बनविली तिच्या नियमावरून पहातां, राष्ट्रीय सभा म्हणविल्या जाणाऱ्या या कन्व्हेन्शन-मध्यें कोणाला येऊं द्यावें न द्यावें याचा अधिकार, तिच्या अधिकाऱ्यांच्या हातीं

गेला होता. प्रतिनिधि पूर्वीप्रमाणें निवडणुकींनीं स्वतंत्रपणें व स्वतःच्या अधिकारानें जाणें शक्य राहिलें नव्हतें. अर्थात् राष्ट्रीय पक्षांतील जहाल गणल्या जाणाऱ्या पुढाऱ्यांना निवडून काढून त्यांना मज्जाव, व त्यामुळें त्यांचा व सबंध राष्ट्रीय पक्षाचा अपमान, होण्याचा संभव होता. म्हणून कन्व्हेन्शनचे नियम ढिले करावे असा जहाल पक्षाचा प्रयत्न सुरू होता; व त्याला उत्तर म्हणून ते ढिले न होऊं देण्याचा मवाळ पक्षाचा प्रयत्न सुरू होता. मवाळांनीं एक प्रकारचा घटना-तट बांधून त्यापुढें खंदक खणून आपल्या रक्षणार्थी तजवीज केली होती. आणि आंत येऊं इच्छिणारांनीं प्रथम कन्व्हेन्शनच्या प्रतिज्ञालेखावर सही करावी, म्हणजे खंदकावर पूल टाकून आम्हाला वेशीतून आंत घ्या असें विनवावें, व मग अधिकाऱ्यांनीं त्यांचा चेहरा न्याहाळून तपासून त्यांची झडती घेऊन त्यांना आंत सोडावे, असा प्रकार होता. तो सर्व बदलणें हें कालावधीचें काम होतें. म्हणून तें चालूं ठेवून इकडे; त्यांत यश येईपर्यंत, आपण संख्येनें मोठें आहो, आंत घ्याल तर कोंग्रेसला भरदार करून तिला बाळसें आणूं, व न घ्याल तर त्याच बळाचा उपयोग देशभर तुमच्या नालस्ती करण्याकडे करूं, असा धाक या कित्त्यांतल्या लोकांना घालावा असें टिळकांनीं ठरविलें. आणि या हेतूनें बरेच दिवस बंद पडलेल्या मुंबई-प्रांतिक परिषदेचें पुनरुज्जीवन करण्याचें त्यांनी ठरविलें.

प्रांतिक परिषदेंत यश मिळण्याची आशा टिळकांना होती, पण राष्ट्रीय पक्षाची म्हणून स्वतंत्र राष्ट्रीय सभा भरण्यांत यश येईल असें मात्र टिळकांना वाटत नव्हतें. याचें कारण असें कीं, प्रांतिक परिषद म्हटली म्हणजे ती मुंबई इलाख्यापुरती. या इलाख्यांतील सिंध प्रांतानें आपली उपप्रांतिक परिषद वेगळी भरवावी असें ठरविलें होतें. कारण सिंध फार दूर पडला. उरलेल्या तीन उपप्रांतांपैकीं महाराष्ट्र व कर्नाटक यांतील लोकमत बहुतेक सर्व टिळकांच्या बाजूचें असल्यामुळें टिळकांनीं भरविलेल्या प्रांतिक परिषदेला प्रातिनिधींची संख्या कधीहि कमी पडली नसती. आणि गुजराथेंतील लोकमत जरी कांहीं प्रमाणांत टिळकांना अनुकूल नसलें तरी गुजराथेंतून कांहीं थोडें तरी प्रतिनिधि हटकून आले असते. म्हणजे एकंदरीनें राष्ट्रीय पक्षाची प्रांतिक परिषद म्हटली तरी भरदार व प्रातिनिधिक स्वरूपाची खचित झाली असती.

पण 'राष्ट्रीय सभा' म्हटली म्हणजे तिला भरदार व प्रातिनिधिक स्वरूप येण्याला निरनिराळ्या अनेक प्रांतांचे प्रतिनिधि यावयास हवे. ते केवळ राष्ट्रीय

पक्षानें काढलेल्या राष्ट्रीय सभेला येणें शक्य नव्हतें. याशिवाय दुसरें एक कारण असें कीं, स्वतः टिळकांनाच दोन राष्ट्रीय सभा व्हाव्या अशी मनांतून खरी इच्छा नव्हती. सगळ्या राष्ट्रांतील मत व्यक्त करायचें तें होतां होईतों एकाच राष्ट्रीय सभेच्या मुखानें व्यक्त व्हावें ही टिळकांना महत्त्वाची गोष्ट वाटे. आणि त्यांचें म्हणणें मवाळ पक्षाला नेहमीं असें असे कीं, " तुमच्या हातीं राष्ट्रीय सभा राहिली तरी इतर कोणत्याहि पक्षाला तींत येण्याला प्रतिबंध होईल अशी तरी तिची घटना तुम्ही करूं नका. उलट आमच्या हातीं राष्ट्रीय सभा आली तरी आम्ही तशा प्रकारची घटना करणार नाहीं. राष्ट्रीय सभा म्हटली म्हणजे तिची बैठक इतकी मोठी व विस्तृत असावी कीं, तींत सर्व राजकीय पक्षांचा समावेश होऊन त्यांना बरोबरीच्या नात्यानें त्या बैठकीवर वसतां यावें." या बाबतींत ते पार्लमेंटचें उदाहरण नेहमीं घेत व म्हणत कीं, पार्लमेंटमध्यें आज एका पक्षाचें बहुमत, आज एका पक्षाचें प्रधानमंडळ, तर उद्यां दुसऱ्या पक्षाचें बहुमत व प्रधानमंडळ, असे होतेंच कीं नाहीं ? तसेंच राष्ट्रीय सभेचेंहि असावें.

असो. इकडे सर्वांची मिळून एक राष्ट्रीय सभा होण्याचा प्रयत्न चालूं असतां, प्रांतिक परिषद मात्र प्रयोगादाखल राष्ट्रीय पक्षाची म्हणून वेगळी भरविण्याचा टिळकांनीं विचार केला. त्यांत युक्ति इतकीच केली की, कन्व्हेन्शन काँग्रेसनें जें ध्येय म्हणून पहिल्या कलमांत घातलें होतें त्यांतील 'स्वराज्य हें साम्राज्यांतर्गत असतांहि व साधनमार्ग सनदशीर पद्धतीचे असा उल्लेख असतांहि तें कलम मात्र आपणाला मान्य', पण 'प्रतिनिधींची निवडणूक होण्याची घटनेंतील इतर कलमें अमान्य' असा भेद केला. आणि राष्ट्रीय पक्षाच्या प्रांतिक परिषदेलाहि या पहिल्या कलमाचें बंधन, मात्र तें गर्भित बंधन ठेवलें. अर्थात् कन्व्हेन्शनवाले व जुने राष्ट्रीय सभावाले यांच्यामध्यें खरा भेद किती थोडा आहे हें दाखविण्याचा तो एक उत्कृष्ट मार्ग होता. ही परिषद प्रथम बेळगांवास भरावी असें ठरत होतें. परंतु ती अखेर पुण्यासच भरवावी असें ठरलें. या सुमारास मला ताप येऊं लागल्यामुळें मी तीन आठवडे सिंहगडास टिळकांच्या बंगल्यांत प्रकृति सुधारण्याकरितां जाऊन राहिलों होतों. मी सिंहगडावर असतांच टिळकांचा वरील बेत ठरला. पण या परिषदेच्या मुख्य चिटणीसाचें काम मजकडे द्यावयाचें असें टिळकांनीं योजिलें असल्यामुळें, मी बरा होऊन परत येण्यासाठीं म्हणून त्यांनीं प्रत्यक्ष कार्यारंभ एक आठवडा पुढें ढकलला.

मी सिंहगडाहून परत येतांच परिषदेच्या तयारीला सुरुवात केली. परिषदेला अध्यक्ष शक्य तर विठ्ठलभाई पटेल यांना मिळवावें अशी टिळकांची इच्छा होती व त्याप्रमाणें मी वान्द्रें येथें जाऊन बरीच खटपट केली. पण विठ्ठलभाई हे पुढें ज्वलज्जहाल झाले तरी प्रथम ते मुंबईच्या नेमस्त पक्षांतच जवळ जवळ मोडत होते. त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें कीं, "राष्ट्रीय सभेची घटना आहे तींच मान्य करून तुम्ही प्रांतिक परिषद भरवीत असाल तरच मी अध्यक्षपद स्वीकारीन." अखेर बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांना अध्यक्ष होण्याची विनंति करण्यांत आली ती त्यांनीं ताबडतोब मान्य केली. अशा रीतीनें ही प्रांतिक सभा भरली व ती मोठ्या थाटाची झाली. बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांनीं १९०८ सालीं टिळकांच्या खटल्यांत मोठ्या धीटपणानें मदत केली होती. ती निःस्वार्थीपणानें केली होती. आणि या मदतीमुळें त्यांच्यावर सरकारचीच काय पण हायकोर्टातील न्यायमूर्तींची अवकृपा होऊन त्यांचा बॅरिस्टरीचा धंदा जवळ जवळ बसण्याच्या बेतांत आला होता. एवढी माहिती बाहेरगांवीहि होती. तसेंच त्या सुमारास झालेल्या बाँबच्या व राजद्रोहाच्या इतर खटल्यांत ते वकिलीचें काम चालवीत ही त्यांची कीर्ति कर्नाटकापर्यंत होती. यामुळें टिळकांनीं घडाविलेली राष्ट्रीय पक्षाची प्रांतिक परिषद व तिचे अध्यक्ष बॅरिस्टर बॅप्टिस्टा होणार या दुहेरी कारणांनीं पुष्कळ प्रतिनिधि परिषदेला आले होते.

परिषदेची सर्व व्यवस्था मजकडे होतीच, आणि स्वागताध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन हे नांवाचें स्वागताध्यक्ष असल्यामुळें, बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांच्या गैरहजेरींत विषयनियामक कमिटीचें बरेंचसें काम मलाच करावें लागलें. तात्पर्य, टिळकांनीं अशा प्रकारें आपला विश्वास व कार्याचा भार मजवर टाकलेला लोकांच्या निदर्शनाला आला. यामुळें खाडिलकरांच्या हातून मी केसरी ओढून घेऊन बळकावून बसलों अशी अढी व असा राग ज्यांनीं मनांत प्रथम धरला होता त्यांच्या त्या रागावर आपोआप विरजण पडलें. यानंतर बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांच्या मूळ सूचनेवरून बेळगांवास पुढील वर्षी होमरूल लीगची स्थापना झाली तिचाहि मुख्य चिटणीस मलाच नेमण्यांत आलें. यामुळें टिळकांच्या विश्वासाच्या पहिल्या शिक्क्यावर आणखी हा दुसरा शिक्का बसला. प्रांतिक परिषदेचा व होमरूल लीगचा चिटणीस होण्याला जर मीच इतरांपेक्षां लायक ठरलों, तर केसरीचा संपादक होण्याला मी लायक नाहीं असें कोणास म्हणतां आलें असतें ! शिवाय

माझ्या या पात्रतेचें वेगळें सर्टिफिकेट टिळकांजवळ लोकांनीं परस्पर दिल्याचें मी वर सांगितलेंच आहे.

वऱ्हाड, मध्यप्रांत, मध्य महाराष्ट्र, कर्नाटक या चारहि भागांत माझे समवयस्क, आणि शिक्षणानें व हुशारीनें बरोबरीचे, असे लोक म्हटले म्हणजे मुंजे, अणे, शिवरामपंत परांजपे, खाडिलकर, बेळवी, गंगाधरराव देशपांडे, इत्यादि लोक होत. यापैकी परगांवचे लोक पुण्यास येऊन, केसरी चालविण्याला मजपेक्षां अधिक लायक ठरून, टिळकांच्या योजनेनें माझ्या हातचा केसरी आपल्या हातीं घेतील हें शक्यच नव्हतें. येऊन जाऊन वर्तमानपत्राच्या कार्याला उपयोगी पडण्यासारखें लेखक म्हटले म्हणजे परांजपे व खाडिलकर हेच काय ते. पैकीं परांजपे यांची इतर रीतीची योग्यता टिळक जाणून होते तरी केसरी हा परांजपे यांच्या हातीं द्यावा असे टिळकांच्या स्वप्नीहि कधीं आले नसते. परांजपे यांचीं राजकीय मतें एकंदरीनें टिळकांना आवडण्यासारखीं असलीं तरी, आणि परांजपे यांच्या वक्रोक्तिपूर्ण लेखन-शैलीचें ते दुरून कौतुक करीत तरी, आपले व परांजपे यांचे व्यावहारिक राजकारणाचे मार्ग जुळणारे नाहीत हे टिळक पूर्ण जाणून होते. त्यांच्या निवृत्तिपर धोरणाचा टिळकांना राग येई. केसरीची भाषासरणी व परांजपे यांची भाषासरणी यांत फार फरक आहे, इतकेंच नव्हे तर परांजपे यांची भाषासरणी केसरीला लावूं नये असेहि टिळकांना मनापासून वाटे. येऊन जाऊन खाडिलकरच काय ते उरले. पण आपल्या गैरहजेरींत प्रेस ॲक्ट सारख्या संकटांतून निभावून "केळकरांनीं केसरी जिवंत ठेवला, इतकेंच नव्हे तर धोरण बिघडवूं न देतां लेखननैपुण्याच्या दृष्टीनेंहि उत्तम चालविला" असें लोकांनीं टिळकांजवळ प्रांजलपणानें बोलून दाखविल्यावर माझ्या हातून केसरी काढून घेण्याला त्यांना कांहींच सबळ कारण नव्हतें. तसें मनांत असते तरी त्यांना निदान एक गोष्ट करावी लागली असती. ती अशी कीं, प्रथम १८९९ प्रमाणें स्वतः आपलें नांव केसरीवर घालून केसरी मजकडून आपल्या हातीं घ्यावयाचा, आणि मग हळूच केव्हां तरी तो खाडिलकरांच्या हातीं द्यावयाचा. परंतु केसरी खाडिलकरांच्या हातीं देण्याची इच्छा जशी त्यांना उरली नाहीं, तशीच केसरी स्वतःच्या नांवानें चालविण्याची इच्छाहि त्यांना आता उरली नव्हती.

एक तर टिळकांचें वय या वेळीं ५८ वर्षांचें झालें होतें. प्रकृतिहि पूर्वीइतकी सुदृढ नव्हती. औषधें व पथ्येंहि त्यांना जडल्यासारखीं झालीं होतीं. फिरून दुसऱ्या कोणी केसरींत कांहीं लिहून त्याकरितां आपणाला व्यर्थ शिक्षा भोगावी लाग-

त्यास यापुढें तें फार जाचक होईल असें त्यांना वाटूं लागलें होतें. संपादक व लेखक या नात्यानें अधिक कीर्ति मिळविण्याचें त्यांना उरलें नव्हतें. पुढें मागें केव्हां तरी हातासरशी तयार होणाऱ्या लोकांच्या स्वाधीन केसरी केलाच पाहिजे हें वय-परत्वें ओघानेंच प्राप्त होणारें होतें. मग तें आजच कां न करावें ! इतर कोणी केसरीचा संपादक असला तरी त्यांत प्रसंगविशेषीं हवें तें लिहिण्याला टिळकांना कोणी नको म्हणणारें नव्हतें. कारण ते मालक ! केळकर खाडिलकर कोणी झाले तरी असिस्टंट. म्हणून स्वतः हवें तें लिहिण्यानें किंवा लिहिण्यास सांगण्यानें मतप्रसाराचें कार्य हवें तसें साधण्यासारखें होतें. शिवाय राजकारणांत पडावयाचें ठरून एखादी नवी चळवळ हातीं घ्यावयाची तर, स्वतःच्या डिक्टेरेशनमुळें पुण्याला व केसरीला बांधून जखडून पडणें ही एक प्रकारची अडचण होण्यासारखी असल्यामुळें स्वतः संपादक व्हावयाचें नाही हें जसें टिळकांनीं ठरविलें, तसेंच केळकरांच्या हातून केसरी काढून खाडिलकरांच्या हातीं द्यावयाचा नाही हेहि त्यांनीं निश्चित केलें होतें. आणि टिळक मजवर विश्वासाने कामाचा भार अधिकाअधिक टाकूं लागलेले पाहून, खाडिलकरांचे मित्र किंवा चहाते यांच्यापैकीं कोणालाहि यानंतर पुढें केव्हां टिळकांकडे जाऊन तसें सुचविण्याचें धाडस झालें नसेल असेंच मला वाटतें.

बेळगांव येथें पुढें झालेल्या समेटाच्या वादांत मी विशेषसा भाग घेतला नाहीं. कारण टिळकांचें मत काय होतें किंबहुना ते तेथें काय घडवून आणणार याची अटकळ मला होती. आणि तसें घडलेहि. अर्थात् राजकीय महत्त्वाच्या एका मोठ्या प्रश्नांत, टिळक सुटून येण्यापूर्वी एक वर्षभर, मी जें मत टिळकांना पसंत पडेल असें अनुमानाने लोकांना सांगितलें होतें तेंच तंतोतंत त्यांना पटलें, असें पाहिल्यावर माझा हेवा करणाऱ्या लोकांच्या तोंडांत परस्परच चपराक बसली. आणि केवळ भाषेच्या दृष्टीनें नव्हे तर राजकीय मताच्या दृष्टीनेंहि केसरीतून मतप्रसार करण्याला मी योग्य आहे, अशी कबुली त्यांना मनांतल्या मनांत द्यावी लागली. खाडिलकरांची व माझी तुलना करावयाची तर केळकरांचें मत टिळकांच्या गैरहजेरींत जें होतें तेंच ते आल्यावरहि राहिलें, पण खाडिलकरांच्या मतांत मात्र चलाबिचल झाली हेंहि लोकांना दिसून आलें.

पुण्याची प्रांतिक परिषद होऊन गेल्यावर, तींत नेमलेल्या टिळक-बॅप्टिस्टा-बेळवी यांच्या कमिटीनें समेटासंबंधानें जो रिपोर्ट प्रसिद्ध केला

त्यालाच बेळगांवच्या परिषदेनें दुजोरा दिला. समेटाच्या ठरावांत खालील प्रमाणें शब्द होते. "स्वदेशाच्या हिताकडे दूरवर दृष्टि देतां व सध्यांची परिस्थिति पहातां समेट होणें इष्ट आहे." 'सध्यांची परिस्थिति पहातां' या शब्दांत थोडी खोंच होती. त्या शब्दांचा टिळकांचा अर्थ असा होता कीं, "काँग्रेसच्या बाहेर राहून कांहीं एक काम झालें नाहीं. समेट होऊं नये, राष्ट्रीय पक्षानें जरूर तर स्वतंत्र काँग्रेसहि काढावी, असें म्हणणारांनीं जर माझ्या गैरहजेरींत कांहीं विशेष काम करून दाखविलें असतें, तर तेंच पुढें चालवा असें मी म्हटलें असतें." "पण माझी वाट पहात तुम्ही स्वस्थ बसला. कोणीच कांहीं केलें नाहीं. आणि मी बाहेर येतों तों महायुद्धामुळें परिस्थिति बदलली. तेव्हां आतां माझ्याच मताप्रमाणें करा" असें वेगळ्या शब्दांत टिळकांनीं आपल्या प्रमुख अनुयायांना सांगितलें. असो; फिरून कांहीं करणें कांहीं न करणें या बाबतींत खाडिलकरांची व माझी तुलना उपस्थित झाली. तींत असें दिसून आलें कीं, मी वर्तमानपत्राच्या द्वारें करतां येईल तितकें तरी केलें, पण खाडिलकर यांनीं केसरी ऑफिसवर बहिष्कार घातला आणि त्या अवधींत फक्त कांहीं नाटकें मात्र लिहिलीं! टिळक परत आल्यावर आपल्या कांहीं नाटकांचा एक सेट खाडिलकर यांनीं तो चांगला बांधून सवरून टिळकांच्या हातीं दिला. हेतु हा कीं, टिळक त्या कृतीचें कौतुक करतील. पण पाहणारे असें सांगतात कीं, टिळकांनीं तो सेट भिरकावूनच कांहीं दिला नाहीं पण दूर सारून ठेवून दिला; एक पानहि उघडलें नाहीं; व बऱ्याच रागानें खाडिलकरांना म्हणाले कीं, "या सहा वर्षांत हेंच राजकारण केलेत वाटतें!" या अवधींत मीहि एक दोन नाटकें लिहिलीं होतीं. पण माझा शिरस्ताच असा होता कीं, असलीं पुस्तकें स्वतःचीं असलीं तरी तीं टिळकांना नजर करावयाची नाहींत. तसेंच रंगभूमीवर माझीं नाटकें चालूं असतां, 'तीं पहाण्यास चला असें, खाडिलकरांच्या कंपनीप्रमाणें, तुम्ही टिळकांना म्हणावयास जाऊं नका' अशी सक्त ताकीद मी माझ्या नाटकमंडळीला दिली होती. मग मी स्वतः तसली विनंति करण्याची गोष्टच बोलावयास नको! नाट्यविषयासंबंधानें टिळकांची अप्रीति मला चांगली माहीत होती. पण त्याहून महत्त्वाची गोष्ट ही होती कीं, या सहा वर्षांत मी काय केलें याचें उत्तर टिळकांना लोकांकडूनच परस्पर मिळालें होतें.

बेळगांवांस ता. २८ एप्रिल १९१६ रोजीं होमरूल लीगची स्थापना झाली व तिचा चिटणीस, माझ्या गैरहजेरींतहि, मीच नेमला गेलों यामुळें माझ्याविरुद्ध

होणाऱ्या कारस्थानांवर आणखी एक दडपण बसलें. आजपर्यंत मी व्याख्यानें वगैरे देण्याला बाहेर फारसा फिरत नव्हतों, तो होमरूल लीगचा चिटणीस या नात्यानें बराच फिरूं लागलों. ठिकठिकाणीं होमरूल लीगचीं केन्द्रें स्थापावयाचीं, सभासद जोडावयाचे, वर्गणी जमवावयाची, हीं कामें करण्याला मला बाहेर फिरणें अवश्य होतें; व एकट्यानें किंवा जोडीला दा. वि. गोखले अथवा इतर कोणी व्याख्याते व प्रचारक लोक घेऊन मी दौरे काढूं लागलों. त्या वर्षाच्या मे महिन्यांत अहमदनगर येथें जिल्हासभा भरली तिचें अध्यक्षस्थान मला देण्यांत आलें होतें, व त्याच सभेला टिळकांनाहि सन्मान्य पाहुणे म्हणून निमंत्रण करण्यांत आलें होतें. जिल्हासभा व होमरूल लीगचें कार्य यांचा मेळ पडण्याला होमरूल लीगच्या चिटणीसालाच जिल्हासभेचे अध्यक्ष केले म्हणजे एकांत दोन कामें झालीं, असा नगरच्या पुढाऱ्यांचा विचार होता. नगरचे पुढारी बाळासाहेब देशपांडे हे नुकतेच निवर्तले होते, यामुळें नगरच्या राष्ट्रीय पक्षाला थोडा लंगडेपणा आला होता. पण रावबहादूर चितळे व हरिभाऊ पटवर्धन यांना पुढारीपण देऊन आपसांतील एकी करून नगरांतलि राजकीयपक्षांनीं तो लंगडेपणा भरून काढला होता.

होमरूल लीगचा चिटणीस म्हणूनच नव्हे तर व्यक्तिशःहि मीच जिल्हा परिषदेचा अध्यक्ष व्हावें अशी नगरच्या लोकांची फार इच्छा होती, व त्यांनीं बेळगांवासच आधीं मजकडून तसें वचन घेतलें होतें. मी अध्यक्ष व टिळक पाहुणे म्हणून मिरवणूक फारच थाटानें निघाली. जिल्हासभेचें कामहि माझ्याहातून यशस्वी रीतीनें पार पडलें. वरून एकी झाली असली तरी नगरांतल्या जहाल मवाळ पक्षाचें स्वरूप विषयनियामक कमिटींत बरेंच प्रकट होत होतें. पण विरोधकांचा मेळ घालून देण्याच्या माझ्या स्वभावाचा या ठिकाणीं पुष्कळ उपयोग झाला. वर्तमानपत्रांत लेख लिहिल्याप्रमाणें मी परिषदेचा अध्यक्ष म्हणून चांगलें भाषण करू शकतों व सभाहि चांगली चालवूं शकतों या गोष्टींच्या प्रतीतीनें माझें पारडें अधिकच स्थिर झालें. माझ्या प्रतिपक्षांना गौण स्थान स्वीकारून गप्प बसावें लागलें.

बेळगांवानंतर होमरूल लीगच्या मतप्रसाराचा नगरास आलेला हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें तेथें टिळकांची त्याच विषयावर दोन व्याख्यानें झालीं. मी होमरूल लीगचें ऑफिस मांडून बसलोंच होतों. पण स्वराज्य संघाचे सभासद

होण्यास फारच थोडे लोक मिळाले. स्वराज्य संघ स्थापू पहाणें किंवा होमरूलच्या स्वरूपाचेंहि स्वराज्य मागणें ही राजद्रोहाची गोष्ट आहे असा बभ्रा करण्याला सरकारानें सुरुवात केली होती. म्हणून तोंडानें स्वराज्य मागण्याला किंवा स्वराज्याच्या चळवळीला म्हणून वर्गणी देण्याला लोक तयार असले तरी सभासद पत्रिकेवर सही करण्याला लोक कचरत, ही गोष्ट आठवली म्हणजे आतां त्याचें नवल वाटतें.

असो. इंग्रजींतूनहि या विषयावर व्याख्यानें द्यावीं असें ठरलें, व त्याप्रमाणें चिटणीस म्हणून माझेंच पहिलें व्याख्यान किर्लोस्कर नाटकगृहांत बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. या चळवळींतील व्याख्यानांवर खटले करावे असे सरकारचें ठरलें असल्याचें प्रगट झालें होतें; व त्याप्रमाणें बेळगांव व नगर येथील टिळकांच्या भाषणावर खटलाहि भरला गेला होता. तथापि व्याख्यानें तर थांबवावयाची नाहींत आणि पोलिस रिपोर्टरांच्या हातीं तर सांपडावयाचें नाहीं—मग स्वतः जाणून बुजून लिहिलेल्या शब्दाबद्दलच काय व्हावयाचें तें होवो—अशा विचारानें या पुढील व्याख्यानें, निदान टिळकांच्या खटल्याचा निकाल होईपर्यंत, शक्य तेथवर लिहून वाचावीं असें धोरण आम्ही ठरविलें; व त्याप्रमाणें माझें इंग्रजी व्याख्यान लिहून छापून वाचण्यांत आलें. या सभेपासूनच स्पेशल सरकारी रिपोर्टर सभांना पाठविण्याची सुरुवात झाली. आणि पुढें सात आठ वर्षेपर्यंत आम्ही कोणीहि व्याख्यानास निघालों म्हणजे पोलिस रिपोर्टर आमच्या परिवारांत मिसळून आमच्याच बरोबर त्यानें प्रवास करावा असा योग येत होता. पुण्याच्या माझ्या व्याख्यानाच्या दिवशीं आयत्यावेळीं म्हणून एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरांचे खास लघुलेखक पाठविण्यांत आले होते. पण पुढें अनेक रिपोर्टर पाहिजेत म्हणून अधिक माणसें ठेवण्यांत आलीं, आणि आम्ही स्वराज्याच्या चळवळींत त्यांना अन्नाला लावून लघुलेखन घटविण्याकरिता शाळाहि घालून दिली असें म्हटलें तरी चालेल! टिळकांवरील खटल्यांत डि. मॅ. ने त्यांचा जामीन घेतल्यामुळें पुढें हायकोर्टांत तो रद्द होईपर्यंत व्याख्यानांचें काम व दौऱ्यांचें काम थोडेसें दबून दबूनच चालूं होतें. पण हायकोर्टानें जामीन रद्द केल्यावर व्याख्यानांची व दौऱ्यांची जी कांहीं लाट उसळली ती सांगतां पुरवत नाहीं. स्वराज्य संघाचे सभासद शेकड्यांनीं व हजारांनीं होऊं लागले. वर्गण्याहि शेकडों-हजारोनीं जुळूं लागल्या. शहरोशहरीं व खेडोंखेडीं व्याख्यानें सुरू झालीं. अनेक ठिकाणीं संघाचीं ठाणीं बसलीं. आणि पायाला चाक

बांधल्याप्रमाणें टिळकांबरोबर किंवा स्वतंत्र रीतीनें मी व माझी सहकारी मंडळी फिरूं लागलों.

अशा रीतीनें माझ्या कार्यांत व उपयुक्ततेंत कणाकणांनीं भरच पडूं लागली असता, त्यांतल्यात्यांत आणखी एक प्रकरण असें निघालें कीं त्यामुळें माझें वर्चस्व प्रतिपक्षांना दुःसह होण्याइतकें वाढलें. टिळकांवरील खटल्याचे सरकारी बेत चालू असतां टिळकांचा एकसष्टावा वाढदिवस येऊन ठेपला. अर्थात् हा फार मोठा प्रसंग कसा चांगला साजरा करावा याविषयीं आमच्या आमच्यांत चर्चा सुरू झाली. टिळक तुरुंगांत असतांना कवडेशास्त्री यांनीं टिळकांचा वाढदिवस पाळण्याचा उपक्रम केला होता. त्यालाच यंदा जाहीर समारंभाचें स्वरूप द्यावें असें ठरलें. सांर्वजनिक सभेंत आमच्या मंडळींची मोठी खासगी सभा भरली व अध्यक्षांनीं समारंभाच्या सूचना मागितल्या. तेव्हां ओला कोरडा दानधर्म, मंत्रजागर, दीपोत्सव, पुराण, कीर्तन, मेजवानी, सभा, असें एका दिवसांत व थोड्याबहुत खर्चांत सेंपून जाणारे प्रकार सुचविण्यांत आले. त्यावेळीं काय झालें कोणास ठाऊक, पण मला एकप्रकारची स्फूर्ति होऊन अशी कल्पना सुचली कीं, एक लक्ष रुपयांची वर्गणी जमवून तिचा अहेर या वाढदिवशीं टिळकांना करावा, म्हणजे टिळकांच्या मागें अनुयायांचें बळ किती आहे हें सरकाराला कळून येईल! त्या योगें आजवर कोणाचा झाला नाहीं असा गौरव टिळकांचा होऊन शिवाय हे लाख रुपये एकदम किंवा वार्षिक व्याजाच्या रूपानें सार्वजनिक कार्याला आणि चळवळीला उपयोगी पडतील. ही कल्पना मी बोलून दाखवितांच कांहींना ती फारच आवडली व कांहींना ती फारच नापसंत झाली. पसंत पडणारांना माझी विचारसरणी पटली. पण माझ्याविरुद्ध असणाऱ्या परांजपे जोशी वगैरे मंडळींनीं नाकें मुरड़न आपसांत कुजबूज सुरू केली. त्यांचा मुख्य आक्षेप हा कीं, उपक्रम करून फसला म्हणजे हंसें होईल त्यापेक्षां तो न केलेलाच बरा! तेव्हां प्रश्न निघाला कीं शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें बसल्या बैठकीस किती रुपये जमतात हें पहावें. तेव्हां मी कागद पुढें घेऊन सुरुवातीचा एक हजार रुपयांचा आंकडा घातला. माझे धनिक मित्र रा. हरिभाऊ तुळपुळे यांनींहि एक हजार रुपयांचा आंकडा घातला. मग आणखी कांहीं लोकांचे इतके नाहींत तरी बरेच मोठे आंकडे पडून पांचसात हजारांची रक्कम जुळली. तें पाहून सुचलेली कल्पना अमलांत आणण्याचें ठरलें. आणि मी व माझे कांहीं मित्र यांनीं या

कामास निश्चयानें सुरुवात केली. माझे प्रतिपक्षी मात्र चुरमुरे खात स्वस्थ बसले. शितावरी परीक्षा पास होऊन भात शिजणार हें त्यांना नाकबूल करतां येईना. पण कबूल करावें तर वर्गणी द्यावी लागते, व त्याहिपेक्षां विषादाचें मोठें कारण हें कीं नावडत्या माणसानें काढलेली कल्पना यशस्वी ठरण्यास मदत होते. पण मी हें ओळखून त्यांची वाटच सोडून दिली व आपल्या कामास लागलों.

ही योजना अवघ्या तीन आठवड्यांत, आणि ती देखील सर्वस्वी खासगी किंबहुना गुप्त अशा प्रयत्नानें, यशस्वी कशी व किती झाली याची हकीकत सविस्तर रीतीनें टिळक चरित्र खंड ३, भाग २ यांत मी दिलीच आहे. येथें इतकेंच सांगतों कीं माझी कल्पना जितकी चांगली तितकें तिला यशहि निर्विवाद आलें. खटपट करणारांनीं अर्थात् टिळकांच्याकरितांच ती खटपट केली, पण कल्पना मी काढली असें कर्णोपकर्णी कळल्यावर माझ्या पत्रांनींच इतकें काम झालें कीं मला या टोंकापासून त्या टोंकापर्यंत, म्हणजे कर्नाटकापासून नागपूरपर्यंत, एक नुसती धावती खेप घालून येण्यापेक्षां स्वतः कांहींच करावें लागलें नाहीं. ही कल्पना प्रथम टिळकांना होतां होईतों कळूच द्यावयाची नाहीं असा आमचा बेत होता. यामुळें गांवोगांव पत्रें लिहिणें, मनुष्यें पाठवणें वगैरे कामें टिळकांना चोरून, म्हणजे गायकवाड वाड्याच्या बाहेर, होतां होईतों मी करीत होतों. कल्पना यशस्वी करून जमलें तर टिळकांनाहि आश्चर्यचकित करावें अशी आम्हाला हौस वाटत होती. पण चार सहा दिवसांनीं टिळकांना ही गोष्ट नक्की कळली. तेव्हां त्यांनीं मला विनोदानें म्हटलें कीं, "तुम्ही मला एक लक्ष रुपये देऊन एकदम श्रीमंत करण्याचा विचार केलेला दिसतो." त्यावर मी इतकेंच म्हणालो कीं, "तुम्ही नेहमीचेच श्रीमंत आहा. तुम्हाला काय कमी पडणार! आणि लोकांच्या पैशानें श्रीमंत होणारे तुम्ही नाहीं हेंहि आम्हाला कळते. पण शक्यतर एक लक्ष रुपये जमवून तुम्हाला दिल्यानें सरकाराला लागला तर नाजूक धाक लावावा अशी कल्पना मंडळींत निघाली; आणि ती कशी काय साधते हें पहाण्याच्या हौसेनें आम्ही वर्गणी जमविण्याचा हा खेळ करीत आहो. तुमचा त्यांत कांहीं एक संबंध नाहीं. कल्पना सिद्धीस गेली तरी वाहवा, न गेली तरी वाहवा!"

वऱ्हाडकरांना या कल्पनेस बिनतक्रार पाठबळ दिलें. इतकेंच नव्हे तर या वेळीं आधीं कांहीं दिवस अच्युतराव कोल्हटकर हे 'मेसेज' पत्राकरितां वऱ्हाडांत

वर्गणी गोळा करीत होते त्यांना वऱ्हाडच्या पुढाऱ्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, "टिळकांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना एक लक्ष रुपयांची थैली अर्पण करण्याची कल्पना निघाली ती उत्तम असून तिचा आम्ही पहिला मान करणार. त्या कार्याला प्रथम वर्गणी देऊं. आणि तुमच्या मेसेज पत्रालाहि देऊं पण मागाहून देऊं." पण नागपुरास कांहीं मंडळी अशी होती कीं, त्यांना आधीं विचारल्याशिवाय पुण्यांत कांहीं कल्पना निघाली तर त्यांना त्याचा राग येई. आणि हे पुणेकर कल्पना काढतात आणि आमच्यावर लादतात, हा एक प्रकारचा जुलूम होतो, असे त्यांना वाटे. पण ही कल्पना अगदीं स्वयंस्फूर्तीनें एकदम उत्पन्न झालेली, नागपुरकरांना विचारण्याला अवसरांहे नव्हता, तेव्हां त्यांना कसें विचारणार ! हें कांहीं असलें तरी वरील विचारसरणीच्या मंडळींनीं रुष्ट होऊन थोडासा खो घातला. मात्र कल्पनेंत नांवें ठेवण्यासारखें कांहीं नसल्यामुळें आपला रोष आपणच खाऊन टाकून त्यांना या कार्याला वर्गणी द्यावी लागली.

ठरल्या तारखेस समारंभ झाला. अखेरच्या दोन दिवसांत पैशाचा पाऊस पडावा असें झालें. समारंभांतील मानपत्र वाचण्याला मी उभा राहिलों असतांहि माझ्या हातांत लोक नोटा आणून देत होते; व वाटचालींतील रकमा जमेस धरल्या असतां एक लाखाची बेरीज भरत होती. एकंदर समारंभ फारच चांगला झाला. तारीख ३० जून रोजीं रात्रीं ८७३३६ रुपये प्रत्यक्ष वसूल झाले. अर्थात् बाकीचे जमण्याला उरलेले दिवस पुरे होते. समारंभाला बाहेरगांवची मंडळी आधीं वर्गणी पाठवून किंवा बरोबर घेऊन आली होती. अशा रीतीनें हा समारंभ अकल्पित रीतीनें यशस्वी झालेला पाहून टिळकांनाहि फार आनंद झाला हें सांगावयास नकोच. आणि मजजवळ जरी बोलून दाखविले नाहीं, तरी मी ही कल्पना काढून यशस्वी करून दाखविल्याबद्दल त्यांनीं अनेकांजवळ मजसंबंधी प्रशंसापर उद्गार काढले. मजबरोबर या कामीं सहकार्य करणारांनाहि अशी इच्छा झाली कीं, मी हें मोठें काम केलें म्हणून एखादा खासगी समारंभ करून माझा कांहींतरी सत्कार करावा. त्याना मी परोपरीनें मोडा घातला; व अगदीं अंतरंगांतल्या दोघा तिघांना असें सांगितलें कीं, "तुम्ही मजविषयीं अशी भावना धरतां यांत मला सर्व मिळालें. माझा अभिमान धरून ही गोष्ट तुम्ही करणार असाल तर, ही कल्पना काढून मी सिद्धीस नेऊं शकलों ही गोष्ट माझ्या प्रतिपक्षांना लाजविण्याला पुरेसें आहे. फिरून त्यांच्या जखमेंत मीठ कां घालतां ? या तुमच्या समारंभानें माझ्या

विषयींचें त्यांचें वैषम्य व्यर्थ वाढेल." तरी सुद्धा त्यांनीं सार्वजनिक सभेच्या तिमजल्यावर अनेक लोकांना निमंत्रणें करून मला एक पुष्पहार व एक सौन्याची आंगठी नजर केली. माझ्या अपेक्षेप्रमाणें कांहीं ठराविक लोक या समारंभाला हजर राहिले नाहींत. त्यांना त्या समारंभामुळें फारच वाईट वाटलें !

ही एक लक्ष रुपये वर्गणीची गोष्ट मोठी झाली असें लोकांना वाटण्याचें मुख्य कारण असें कीं, यापूर्वी महाराष्ट्रांत इतकी मोठी वर्गणी कधीं झाली नव्हती. यापूर्वीची जाहीर वर्गणी म्हटली म्हणजे कै. माधवरावजी रानडे यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ जमविलेली वर्गणी. रानड्यांइतकें मोठें नांव तेव्हां महाराष्ट्रांत दुसरें झालें नव्हतें. नामदार गोखल्यांसारखा मनुष्य हे काम हातीं घेऊन निश्चयानें सरसावला होता. सरकार, संस्थानिक, लोकलबोर्डे, म्युनिसिपालिट्या, अशा सर्वांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत या स्मारकाला घेतली होती. आणि रानड्यांना प्रिय व महाराष्ट्राला उपयुक्त असा जो उद्योगधंद्याच्या वाढीचा विषय त्यासाठीं Ranade Economic and Industrial Institute या नांवाची संस्था काढून हें स्मारक करावयाचें असा हेतु प्रसिद्ध करण्यांत आला होता. अशा रीतीनें सर्व बाजूंनीं अनुकूल परिस्थिति असतां या स्मारकाला वर्गणी पाऊण लाखावर जमली नाहीं; व ती जमविण्याची खटपटदेखील कितीतरी दिवस जाहीररीतीनें सुरू होती. त्याच्या उलट ज्यांच्या नांवाशीं संबंध ठेवण्याला श्रीमंत लोक कचरत होते अशा टिळकांच्या वाढदिवसाचा समारंभ, आणि त्या करिता अवघ्या तीन आठवड्यांत गाजावाजा न होताहि विद्युद्वेगानें एक लक्ष रुपये जमले, या गोष्टीचा अचंबा लोकांना वाटल्याशिवाय कसा राहील !

या वाढदिवसाच्या समारंभाच्या दिवशींच सकाळीं टिळकांवर जामीनकीच्या खटल्याची नोटीस बजावण्यांत आली. त्यासंबंधीची हकीकत व पुढील खटल्याची हकीकत मी टिळकचरित्र खंड ३ यामध्यें सविस्तर दिली आहे म्हणून त्यासंबंधानें येथें कांहीं लिहीत नाहीं. पण माझ्यापुरते म्हणून इतकेंच सांगतों कीं, या खटल्यांतील खटपट ओघानेंच मजकडे आली होती. मुंबईस जाऊन बॅरिस्टर जिना वगैरेंना भेटून त्यांना टिळकांचें वकीलपत्र घेण्याला विनंति करणें वगैरे गोष्टी मीच केल्या. आणि इकडे खटला सुरू असतांहि नवीन स्थापलेल्या होमरूल लीगची चळवळहि मी सुरू ठेवली होती.

याच सालीं लखनौ येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेला मी टिळकांबरोबर गेलों होतों. डॉ. साठे वगैरेच्या खटपटीनें जी. आय्. पी. रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून स्पेशल ट्रेन काढविण्यांत आली होती. एक संबंध आगगाडी भरेल इतकें टिळकांचे मित्र व अनुयायी सगळ्या वाटभर जयघोष करीत, जयघोष ऐकत, मेजवान्या खात चालले होते. त्यावेळच्या उत्साहाचें वर्णन करणें जवळ जवळ अशक्य आहे. टिळकांनीं प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेंत जाऊन आपलें बहुमत करण्याचा प्रसंग अजून दूर होता. किंबहुना तो प्रत्यक्ष आलाहि नाहीं. टिळक काँग्रेसच्या प्रतिज्ञापत्रिकेवर सही करून राष्ट्रीय सभेला जाणार असे कळल्याबरोबर मुंबई टाइम्सनें बिगूल फुंकून इषारा दिला, व नेमस्तांना हलवून जागे करून सांगितलें कीं, "हां ! संभाळा ! टिळक राष्ट्रीय सभा काबीज करण्याला निघाले !" पण नेमस्तांना हें भविष्य आधींच कळून चुकलें होतें. प्रतिज्ञापत्रिकेवर सही करून जाऊं नये असा राष्ट्रीयपक्षाच्या छावणींत जोपर्यंत पुकारा सुरू होता तोंपर्यंत आपण सुरक्षित आहों असें नेमस्तांना वाटत होते. पण प्रतिज्ञापत्रिकेवरहि सही करूं पण राष्ट्रीय सभेंत घुसूं असा त्या छावणींत उलटा पुकारा होऊं लागतांच नेमस्तांना आपलें भवितव्य कळून चुकलें. आणि टिळकांच्या जयघोषांत निघालेली ही स्पेशल ट्रेन म्हणजे, हल्ल्याचें नव्हें तर एकप्रकारें विजयाचेंच, रणशिंग होय असें ते घेऊन चालले. १९०७ सालीं सुरत येथें राष्ट्रीय समेच्या मंडपांत उभे राहिलेले टिळक व १९१६ सालीं लखनौ-च्या राष्ट्रीय सभेच्या मंडपांत उभे राहिलेले टिळक या दोहोंत किती अंतर पडलें होतें हें, ज्यानें ते दोन्ही प्रसंग पाहिले असतील त्यालाच कळून आलें असतें. लखनौ येथील सभेंत गांधी व टिळक यांचा प्रत्यक्ष विरोध नव्हता. पण टिळकां-कडे नेमस्तांची वकिली करण्याकरिता ते येत; व त्या दोघांमधील बोलणें किंवा पत्रव्यवहार करण्याचें काम मजकडे आलें होतें.

तसेंच लखनौ काँग्रेसचे अध्यक्ष अंबिकाचरण मुजुमदार यांनीं विषय-नियामक कमिटींतील त्यांच्या सेक्रेटरीचें काम मजकडे दिलें होतें. १९०७ सालीं, म्हणजे सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं परप्रांतांत माझी फारशी प्रसिद्धी नव्हती, व सुरतेच्या सभेनंतर १९१६ सालींच प्रथम मी फिरून राष्ट्रीय सभेंत गेलों. तथापि दरम्यानच्या या काळांत मराठा पत्राचा संपादक या नात्यानें इतर प्रांतांतून माझी बरीच प्रसिद्धी झाली होती. येथपासून राष्ट्रीयसभेच्या विषय-नियामक कमिटींत माझी निवडणूक नेहमीं होत असे; व या सभेंतील चर्चेमध्यें मी ठराव मांडून

किंवा उपसूचना मांडून वादविवादांत भाग घेत असे. मात्र या सूचना उपसूचना टिळकांच्या संमतीनें तयार केलेल्या व अप्रत्यक्ष रीतीनें त्यांच्या धोरणाला उपयोगी अशा असत.

टिळकांनीं पहिल्या प्रवेशानेंच राष्ट्रीयसभा जवळ जवळ काबीज केली होती. मंडपाच्या बाहेर तर त्यांचाच जयघोष सुरू असे. त्यामानानें गांधी हे अजून प्रसिद्धीला आलेले नव्हते; व खुद्द त्यांचा असा म्हणण्यासारखा अनुयायीवर्गहि फारसा नव्हता. लखनौ येथील विषयनियामक कमिटीच्या सभासदांच्या दुतर्फी यादी तयार झाल्या. त्यांपैकीं एकींतहि गांधी यांचें नांव नव्हतें. पण तें आयत्यावेळीं सुचविलें गेलें व टिळकपक्षांतील मतें मिळाल्यानेंच ते निवडून आले! टिळकांविषयींचा द्वेष नेमस्त पक्षानें मात्र अद्यापि सोडून दिला नव्हता. पण त्यांतल्या त्यांत मुंबईच्या नेमस्तांचा त्यांच्यावर फार रोष; व तोहि ते अगदीं उघड रीतीनें प्रगट करीत. विषय-नियामक कमिटीच्या निवडणुकींत एका विरुद्ध एक नांव मताला घालण्याची वेळ आली तेव्हां टिळकांविरुद्ध मुंबईच्या मंडळींनीं गोकुळदास पारेख यांना पुढें केलें. परंतु अखेर टिळकांनाच बहुमतें पडून ते निवडून आले.

यावेळीं राष्ट्रीय सभेंत एक प्रकारचा तिरंगी सामना चालू झाला. एक पक्ष मुंबईकर प्रमुख नेमस्तांचा, दुसरा पक्ष टिळकांच्या राष्ट्रीय होमरूलर लोकांचा, व तिसरा पक्ष बेझंट बाईंच्या थिऑसॉफिस्ट होमरूलर लोकांचा. बाईंचा ओढा, म. गांधींप्रमाणें, त्यांतल्या त्यांत नेमस्त पक्षाकडेच अधिक असे. परंतु टिळकांबरोबर बाईंनींहि होमरूल संस्था स्थापन केलेली असल्यामुळें त्यांना टिळकांना उघड विरोध करतां येत नसे; व त्यांच्या अनुयायांमध्यें तर नेमस्तापेक्षां टिळकांकडेच सहानुभूतीचें पारडें अधिक झुकतें राहीं. या दोन्ही होमरूल लीगच्या विद्यमाने लखनौ येथें राष्ट्रीय सभेच्या बैठकीनंतर संयुक्त सभा म्हणजे 'स्वराज्यसंघ परिषद' भरली. त्याला सुमारें एक हजार होमरूलर हजर होते. होमरूलर लोकांचें हें संख्याबल पाहून राष्ट्रीयसभा आतां आपल्या हातून गेली असें नेमस्तांनीं पक्कें मानलें; व त्याप्रमाणें पुढच्या वर्षापासून नेमस्त पुढारी राष्ट्रीयसभेला येईनासे झाले. सुमारें चार दिवस खासगी भेटी, बैठकी, चर्चा, सभा, समारंभ चालू होते; व या सर्वांमध्यें टिळकांचा असिस्टंट, किंवा दुय्यम किंवा मदतनीस म्हणून पुष्कळसें काम

जबाबदारीनें मला करावें लागलें. अशा रीतीनें प्रत्यक्ष परिचय वाढल्यामुळें एक प्रांतीय पुढारी या नात्यानें माझी गणना होऊं लागली.

लखनौ काँग्रेसनंतर टिळक व आम्ही मंडळी कानपूरला गेलों; व तेथून पुढें निरनिराळे लोक निरनिराळ्या भागाकडे गेले. मोतीलाल घोस यांना भेटण्याकरितां खापर्डे व वासुदेवराव जोशी यांना घेऊन टिळक कलकत्त्यास गेले व नागपुरावरून परत पुण्यास आले. नागपुरच्या नेमस्त लोकांनीं या वेळीं टिळकांशीं बरेंच सहानुभूतीचें वर्तन केलें. याचा अर्थ नऊ दहा वर्षांपूर्वी नागपूर येथें झालेले जहाल व मवाळ यांचे रणसंग्राम लोक विसरून गेले होते. मी टिळकांबरोबर न जातां केसरीच्या कामाकरितां दोन दिवस आधीच निघून तातडीनें पुण्यास आलों, व 'स्वराज्याचें निशाण लखनौ येथें रोवलें' अशा अर्थाचा अग्रलेख केसरींत लिहिला. पूर्वीचे स्वराज्यविषयक मर्यादित लिहिणें व लखनौ येथें काँग्रेस-मुस्लीम लीग यांनीं एकमतानें बनाविलेली स्वराज्याची घटना मंजूर झाल्यावरचें लिहिणें, या दोहोंमध्यें त्या वेळीं मनाचा मनालाच मोठा फरक वाटला. पूर्वी मनांत ध्येय तेंच असता कोणास स्पष्ट बोलवत नसे. प्रकाशाचा किरण सूर्यावरून सुटला आहे, पण आकाश मेघाच्छादित असल्यामुळें उजेड पडत नाहीं, अशी पूर्वीची स्थिति होती. पण सगळे ढग वाऱ्यानें उधळून लावावे, व आकाश मोकळे होऊन जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश पसरावा, तशी आतांची स्थिति वाटूं लागली.

सन १९१७ च्या जानेवारींत गायकवाडवाड्यांत आमच्या स्वराज्यसंघाची पहिली मोठी सभा भरली. लखनौ येथील राष्ट्रीयसभेनें आपल्याशीं संघटित असलेल्या संस्थांना स्वराज्याच्या चळवळीचा प्रसार करण्यास आज्ञा केली होती. आम्ही आमचे स्वराज्यसंघ हे राष्ट्रीयसभेचे घटक म्हणून तिच्याशीं संलग्न करून घेतले नव्हते. पण स्वराज्याच्या चळवळीच्या कार्यांत किंवा अधिकारदानांत या स्वराज्यसंघांना घेऊं नये, त्यांची प्रवृत्ति जहाल म्हणून त्यांना बहिष्कृत मानावें, असा गिल्ला नेमस्तांनीं लखनौ येथें केला होता परंतु अखेर तो जुमानला गेला नाहीं; यामुळें स्वराज्यसंघ हे जणू कांहीं आपण राष्ट्रीयसभेचेच अधिकारी अशा भावनेनें खुल्या दिलानें स्वराज्याची चळवळ करूं लागले. पुण्यांत स्वराज्यसंघाची सभा झाली तींत आढावा घेतला त्यावरून असें दिसलें कीं, आमच्या स्वराज्यसंघाच्या सहा शाखा प्रस्थापित झाल्या. तीन

हजारांहून अधिक सभासद झाले आणि वर्गणी व. देणगी मिळून ७००० हजार रुपये जमले. या सभेंत अधिक प्रचारक नेमून दौरे काढावयाचे ठरले. आणि निरनिराळ्या ठिकाणचीं निमंत्रणें येऊं लागल्यामुळें मला निम्मे दिवस पुण्यास काढावे व निम्मे दिवस बाहेर हिंडावें असा कार्यक्रम आखावा लागला.

या सुमारास टिळकांनीं लष्करभरतीचा उपदेश सर्रास सुरू केला. बेझंट-बाई तर महायुद्धांत इंग्लंडला सर्वस्वी मदत करावी अशाच मताच्या होत्या. तथापि होमरूल मागणाऱ्यांनी साम्राज्याला मदत करावी असें म्हणणें हा नुसता वरकरणी बहाणा असून आंतील इंगित वेगळेंच आहे असें मानून सरकारनें, लष्कर-भरतीच्या उपदेशाचे उपकार न स्मरता, होमरूल लीगच्या चळवळीचा अपकार मात्र मनांत ठेवला. आणि बेझंट-बाई व टिळक यांना निरनिराळ्या प्रांतांत प्रवेश करण्याच्या बंदीचे हुकूम सुटूं लागले. लष्कर भरतीचा उद्योग खाडिलकरांना पसंत असला तरी त्यांच्या नेहमीच्या मित्रांना तो अप्रिय होता; व महायुद्धांत सरकारला लष्करभरतीची मदत हिंदी लोकांनीं करणें हा अगदीं खुळेपणा होय, यांत धोरण अगदींच चुकतें, असें वाटत होतें. असें पाहून टिळकांनीं अशी युक्ति केली की, लष्कर व युद्ध हे खाडिलकरांचे आवडते विषय म्हणून, लष्करभरतीच्या चळवळींत, त्यांनीं खाडिलकर यांना आपले मदतनीस म्हणून मुद्दाम घेतले. या वर्षी एप्रिल महिन्यांत टिळकांच्या बरोबर कर्नाटकांतील दौऱ्यावर मी व खाडिलकर गेलों होतों; व ठिकठिकाणीं सभांतून आमचीहि भाषणें टिळकांच्या आगेमागें होत असत.

पुढें मे महिन्यांत नाशिक येथें मुंबई प्रांतिक परिषद भरली. तिचें अध्यक्षस्थान कोणाला द्यावें असा प्रश्न निघाला तेव्हां मी भीत भीत नामदार श्रीनिवास शास्त्री यांचें नांव सुचविलें. भिण्याचें कारण असें कीं, शास्त्री हे नेमस्त पक्षाचे एक पुढारी. अर्थात्, राष्ट्रीयपक्षांतील एकाद्या पुढाऱ्याचें नांव सुचवावयाचें तें टाकून हें कसें सुचवावें ? पण टिळकांनाहि ती सूचना मान्य झाली. फेरोजशहा मेथा गोखले हे दोघेहि गेले, तेव्हां त्यांच्यामागून येणाऱ्या दुसऱ्या पिढींतिल पुढारी सामोपचारानें वश करून घेतां आले तर पहावें, हें धोरण टिळकांना इष्ट वाटलें. शिवाय आतां राष्ट्रीय सभेंत सर्व पक्ष मिसळून गेले होते, इतकेंच नव्हें तर होमरूलची मागणी करण्यांत सर्व पक्ष जवळ जवळ एकच होते; फक्त राष्ट्रीय सभेनें होमरूल

या शब्दाला आयर्लंडचा वास येतो म्हणून त्या ऐवजीं वसाहतीचें स्वराज्य हें नांव आपलें ध्येय प्रगट करण्यास स्वीकारलें होतें इतकेंच काय तें. 'टिळक-पक्षानें आपणाला मोठेपणा देऊन नाशिक प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष नेमण्याची खटपट केली म्हणूनच तें घडलें, एरवीं मुंबईच्या नेमस्तांना आतां जवळ जवळ कांहींच स्थान उरलें नव्हतें; फेरोजशहा मेथा यांनीं आपल्या प्रभावळींतील मंडळी एकामागून एक अध्यक्ष म्हणून बाहेर जिल्ह्यावर लादण्याचे दिवस गेले; व ही सत्ता पुण्याच्या नेमस्तांच्या हातीं केव्हांच नव्हती;' या गोष्टीची जाणीव श्रीनिवासशास्त्री यांना होती. अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं एखाद्या होमरूलरप्रमाणेंच भाषण केलें व परिषद संपल्यानंतर मला मुद्दाम पत्र लिहून कळविलें कीं " मला अध्यक्ष केल्याबद्दल मी टिळकांचे व तुमचे आभार मानतों. " नाशिक येथें परिषद सुरू असतां नामदार शास्त्री यांना मराठी भाषा समजत नसल्यामुळें त्यांचा प्रतिनिधि म्हणून विषयनियामक कमिटींत व परिषदेंतहि सभांचें सर्व यांत्रिक चालविण्याचें काम मजकडे आलें होतें; व जवळ जवळ मीच अध्यक्ष या नात्यानें परिषदेच्या सर्व व्यवहारांत लोकांनी मला मानून वागविलें.

यानंतर मद्रासेकडे गव्हर्नर लॉर्ड पेंटलंड व बेझंटबाई यांचा पुरा बेबनाव झाला; व अखेर बाईंना व त्यांच्या एकदोन मदतनिसांना उटकमंड येथें नजर कैदेंत ठेवण्यांत आलें. बाई मद्रासेहून जाण्यापूर्वी तेथें त्यांचा पुष्कळच सत्कार झाला; व बंधुत्वाच्या नात्यानें महाराष्ट्र स्वराज्यसंघाचा प्रतिनिधि म्हणून टिळकांनीं मला मद्रासला बाईंना भेटण्याला पाठविले. याप्रसंगीं बेझंटबाईचा पाहुणा म्हणून मी अड्यार येथें राहिलों, व बाईंच्या सांगण्यावरून त्यांच्या 'न्यू इंडिया' पत्रांत एक प्रासंगिक अग्रलेख आपल्या सहीवर लिहिला. त्याची बाईंनीं बरीच प्रशंसा केली. बेझंटबाईंना अटक झाल्याचा राग येऊन राष्ट्रीयसभेनें चळवळ करावयास पाहिजे होती. परंतु तिनें तशी कांहींच केली नाहीं. तथापि उभय स्वराज्यसंघांच्या आम्ही चिटणीसांनीं ती चळवळ करून, पूर्वी होमरूलर नसलेले लोक 'आम्ही यापुढें होमरूलर बनलों' असे जाहीर करण्यास पुढें येतील अशी खटपट केली. या चळवळीमुळें स्वराज्यसंघांच्या सभासदांची संख्या एकदम तुफान वाढली. नेमस्तपक्षांतहि हा आवेश अर्थात् स्वतंत्रपणें संचरला. आणि सुरेन्द्रनाथ बानर्जी, बॅरिस्टर जिना, सी. वाय्. चिंतामणी, वगैरे लोकहि आम्ही होमरूलच मागणारे आहो असें म्हणून प्रतिज्ञापत्रकांवर सह्या करण्यास तयार झाले.

याच सुमारास गांधींनीं चंपारण्यांत सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. अद्यापि त्यांनीं हिंदुस्थानांत प्रत्यक्ष राजकारणांत या शस्त्राचा उपयोग सुरू केला नव्हता. पण किसानवर्गाची त्यांना मनांतून विशेष सहानुभूति वाटत असल्यामुळें त्यांनीं तें नवीन शस्त्र त्या वेळीं या कार्यांत चालविलें. मुंबईची प्रांतिक काँग्रेस कमिटी अद्यापि मुंबईतील प्रमुख नेमस्तांच्याच हातीं असल्यानें तिनें सत्याग्रहाच्या चळवळीस मान्यता द्यावी कीं नाहीं हा नाजूक प्रश्न उपस्थित केला. त्यासंबंधानें मी एक प्रबंध या विषयाची चर्चा करून लिहिला. आणि शेवटीं नारायणराव समर्थ व मी, यांनीं इतर एक दोन सहकारी यांच्या मेळानें, सत्याग्रहाचीं तत्त्वें व त्याच्या मर्यादा ठरविल्या व तो रिपोर्ट काँग्रेसकमिटीपुढें मांडला. त्यावर कमिटींत बराच वादविवाद झाला व शेवटीं गांधी टिळक व चंदावरकर या तिघांनीं मिळून एक ठराव तयार केला तो प्रांतिक कमिटीनें मंजूर केला.

याच सुमारास हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेग्यु यांनीं ऑगस्ट महिन्यांत एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत स्वराज्यदानासंबंधीं नेहमींप्रमाणें मोघम भाषा वापरली होती. पण त्यांतल्या त्यांत विशेष महत्त्वाची गोष्ट ही सांगितली होती कीं, ते व गव्हर्नर जनरल लॉर्ड चेम्सफर्ड हे उभयता मिळून खुद्द हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं हिंडून लोकांच्या आकांक्षा व योजना समजावून घेणार, व नंतर सुधारणांची आपली योजना प्रधानमंडळापुढें मांडून ठरेल त्याप्रमाणें पार्लमेंटकडून त्या योजनेला कायद्याचें स्वरूप देणार. या जाहीरनाम्यामुळें हिंदी राजकीय वातावरणांत एकदम फरक पडला. आशेच्या ऊबदार किरणांनीं निराशेचें धुकें वितळून गेलें; व स्वराज्याची चळवळ जरी थांबली नाहीं तरी उभयपक्षी भावनेची जी तीव्रता पूर्वी उत्पन्न झाली होती ती शमली. ब्रिटिश सरकारनेंच स्वराज्यदानाचा विचार केला ! मग स्वराज्याच्या नांवानें कोणी कांहीं मागितलें तर त्यांत वावगें असें कांहींच म्हणतां येत नव्हतें. येऊन जाऊन रागाचा प्रश्न. पण देत नाहीं म्हणेपर्यंत राग ! " देणार आहों, देण्याच्याच विचारांत आहों " असें स्वतः सरकारच म्हणू लागलें तर मग रागवावयाचें कोणावर व काय म्हणून ! तात्पर्य, आवेशाची व उद्योगाची दिशा किंचित् बदलून स्टेट सेक्रेटरी व व्हाइसरॉय यांनीं ' वर मागा ' म्हणून आव्हान केलें तर त्यांच्या पुढें उभे राहून काय मागावें या विधायक विचाराला सुरुवात झाली.

या जाहीरनाम्याचा शुभशकून समजून विलायतेंत जाऊन यावेळीं कोणी चळवळ केली तर तिचा बराच उपयोग होईल, म्हणजे मॉंटेग्युसाहेब इकडे असता चळवळीचा प्रतिध्वनि तिकडे कोणी काढला तर तिकडील लोकांचें लक्ष सहजच अधिक जाईल, अशा विचारानें आमच्या स्वराज्यसंघाचे अध्यक्ष बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांनाच विलायतेंत पाठवावें असे टिळकांनीं ठरविलें. बेझंटबाई स्वतः विलायतेस वरचेवर जातच असत. तेव्हां आपल्या स्वराज्यसंघानेंहि कोणी तरी तिकडे पाठवून चळवळ करावी हें युक्त व अवश्य आहे अशा विचारानें टिळकांकडून बॅप्टिस्टा यांना धाडण्यांत आलें. विलायतेंत चळवळ करणें अगत्याचे असले तरी आपणां स्वतःपेक्षां या कामाला बॅरिस्टर बॅप्टिस्टा हेच अधिक लायक आहेत असे टिळकांना वाटत होते. म्हणून होमरूल लीगच्या खजिन्यांत त्या वेळपर्यंत जितका पैसा शिल्लक होता तितका सर्व या कामाकडे लावण्यांत आला. ही गोष्ट बेझंटबाई यांना पटून त्यांनींहि जरूर लागेल ती मदत देण्याचें आपण होऊन कबूल केलें. पण आपल्यालाहि विलायतेस पुढें मागें जावें लागणार असें टिळकांना माहीत होतें. कारण चिरोल साहेबावर त्यांनीं लावलेली फिर्याद पुढें मागें लवकरच सुनावणीस निघणार होती. त्या वेळीं वादी या नात्यानें आपणाला जी साक्ष द्यावी लागेल ती, इकडे कमिशनपुढें देण्यापेक्षां विलायतेंतील ज्यूरीपुढें दिली तर, अधिक श्रेयस्कर होईल, आणि या साक्षीकरितां विलायतेस जाऊं तेव्हां तेथील चळवळहि चालवूं असा एका खेपेंत दोन कामें करण्याचा टिळकांचा विचार होता.

इतक्यांत बेझंटबाईंची बंधमुक्तता झाली; व त्यांचा ७१ वा वाढदिवस त्यांच्या अनुयायांनीं विशेष समारंभानें साजरा केला. अलाहाबादेस भरलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभेसाठीं टिळक व बेझंटबाई दोघेहि गेलीं, तेव्हां दोघांची मिळून मोठी जंगी मिरवणूक अलाहाबादच्या लोकांनीं काढली. या वेळीं पंडित मदन मोहन मालवीय हेच अलाहाबादेस राज्य करीत होते. पंडित मोतीलाल नेहरू अजून ऐषरामांतच लोळत असून कायदे कौन्सिलच्या कामाखेरीज राजकारणांत फारसे पडत नसत !

या सभेनंतर दोन आठवड्यांनीं पंढरपूर येथें सोलापूर जिल्हा सभा झाली. तेथेंहि नगराप्रमाणेंच मला अध्यक्षपद देऊन टिळकांना सन्मान्य पाहुणे म्हणून मुद्दाम बोलावण्यांत आले होते. कोठेहि यःकश्चित जिल्हासभेचें अध्यक्षस्थान

टिळकांना देण्यांत त्यांचा कांहींच सन्मान होण्यासारखा नव्हता. कारण ते आतां जवळ जवळ राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षपदाच्या मानापर्यंत जाऊन पोंचले होते. पण आपल्या हातून होईल ते तरी करूं अशा बुद्धीनें पंढरपूरकरांनीं टिळकांच्या सत्काराची शर्थ केली. एका पंढरपूर शहरांत त्यांच्या स्वागतार्थ ३०० कमानी उभ्या करण्यांत आल्या होत्या. टिळकांचें चन्द्रभागेच्या वाळवंटांत व्याख्यान झालें तो प्रसंग चिरस्मरणीय होता. तसाच बाजारपेठेंतील व्याख्यानाचाहि. इतर ठिकाणाप्रमाणें याहि ठिकाणीं जिल्हासभेला जोडून इकडील केंद्राच्या स्वराज्य-संघाच्या सभासदांचें संमेलन भरविण्यांत आलें.

नोव्हेंबर महिन्यांत मॉंटेग्युसाहेब हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं शिष्टमंडळांच्या भेटी घेण्यास सुरुवात केली. आमच्या स्वराज्यसंघातर्फे दिल्लीस पाठविलेल्या शिष्ट-मंडळांत टिळक, खापर्डे, करंदीकर, मी स्वतः, वेळवी, गंगाधरराव देशपांडे, डॉ. मुंजे इत्यादि मंडळी होतो. पुण्यास खाडिलकर व इतर मंडळी यांच्या स्वाधीन वर्तमानपत्रें करण्यांत आलीं होतीं. डिसेंबर महिन्यांत मॉंटेग्युसाहेब मुंबईस आले. तेथें सार्वजनिक सभेतर्फेचे डेप्युटेशन आपली कैफियत घेऊन पाठविण्यांत आलें. या शिष्टमंडळांत माझी नेमणूक झाली होती. या शिष्टमंडळासंबंधानें एक गोष्ट सांगावयाची ती ही कीं, या दोघांकडून ज्या कैफियती दाखल करण्यांत आल्या त्यांचे कच्चे मसुदे करण्याचें काम मजकडे देण्यांत आलें होतें. आणि त्याचेंहि फिरून कारण असें कीं, यापूर्वी पण या प्रसंगांना उद्देशूनच, मी The case for Indian Home Rule हें सुमारें दोनशें पानांचें पुस्तक इंग्रजींत लिहिलें; व तेंहि स्वराज्यसंघाचा चिटणीस म्हणून. यामुळें त्याला व्यक्तिगत महत्त्वापेक्षा स्वराज्य-संघाची कैफियत असेंच स्वरूप जवळ जवळ होतें. टिळक मंडाल्याहून परत आल्या-नंतर, पूर्वी ते मंडाल्यास जाण्यापेक्षांहि, एक प्रघात अधिक सर्रास पडला होता तो असा कीं टिळकांना कोणत्याही विषयावर कांहीं विशेष लिहावयाचें असलें म्हणजे (त्याला खासगी पत्राचें स्वरूप नसून आमच्या राष्ट्रीयपक्षाच्यातर्फे लिहिलेल्या कागदाचें स्वरूप असल्यास) अशांचे कच्चे मसुदे टिळक प्रायः मला करावयास सांगत. किंवा त्यांना स्वतः लिहावेसें वाटलें तरी प्रत्यक्ष हातानें लिहिण्याकरिता ते मलाच मदतीस बोलावून घेत. हेतु हा कीं, अशा कामात एकास दोघे असलेले बरे; व लिहितां लिहितां ओघानें सूचना केलेल्या अधिक उपयोगी पडतात. यामुळें कांहीं टिळकांनीं लिहावें, कांहीं मी लिहावें, कांहीं त्यांनीं तोंडानें सांगून

मी हातानें लिहावें, अशा सरमिसळ रीतीनें टिळकांकडून जाणारे कागद लिहिले जात. परंतु The Case for Indian Home Rule हें मोठें पुस्तकच व्हावयाचें असल्यामुळें त्यांत काय विषय यावेत याची फक्त चर्चा माझ्याशीं करून तें लिहिण्याचें एकंदर काम टिळकांनीं मजकडे सर्वस्वी अखत्यारीनें सोपविलें. मधून मधून मी त्यांना विचारी व त्यांचा सल्ला घेत असे, व अगदीं शेवटचीं प्रुफें ते पहात असत. हें पुस्तक लिहिण्याची कल्पना त्याच उशिरा निघाली. म्हणजे मांटेग्यु साहेब इकडे येऊन दाखल होण्याच्या सुमारास ते छापून तयार होऊन त्यांच्या हातीं पडावें तर त्याला फक्त सात आठ आठवड्यांची अवधी होती. पण हे काम मजकडे विश्वासानें सोपविलें असल्यामुळें मी रात्रीचा दिवस करून सर्व पुस्तक लिहून व छापूनहि काढलें. या कामी ज्ञानप्रकाश छापखान्याची बरीच मदत झाली. एरवी ते पुस्तक छापून इतक्या अवधीत तयार झालें नसतें. हें पुस्तक किती थोड्या वेळांत लिहून व छापून झालें याचा जाहीर उल्लेख मी त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंतच केला आहे. तेव्हां ही गोष्ट इतक्या वर्षांनीं मी आतां फुगवून सांगत आहे असें कोणी समजण्याचें कारण नाहीं; आणि "केळकर होते म्हणूनच हें पुस्तक इतक्या लवकर लिहून व छापून होऊं शकलें, एरवीं आपल्या पक्षांतील दुसऱ्या कोणाच्याहि हातून तें झालें नसतें" असें टिळकांनीं अनेक लोकांपाशीं माझ्या परोक्ष बोलून दाखविलें. या पुस्तकाच्या प्रति स्वराज्यसंघातर्फे इकडे व विलायतेंतहि पुष्कळ ठळक लोकांकडे पाठविण्यांत आल्या. अशा रीतीनें या चार वर्षांत मी नुसता केसरीचा संपादकच नव्हे तर टिळकांचा प्रायव्हेट सेक्रेटरी व पोलिटिकल सेक्रेटरीहि होऊन राहिलों होतों.

१९१८ च्या प्रारंभीं बॅरिस्टर जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं लोणावळा येथें पुणें जिल्ह्याची परिषद आम्ही भरवली. मला वाटतें, याचवेळीं टिळकांचा व जयकरांचा प्रथम परिचय झाला. यापूर्वी टिळकांच्याविषयीं जयकरांच्या मनांत आदरभाव असेल, परंतु ते जातीनें जाऊन टिळकांना कधीं भेटले नव्हते. टिळकांबद्दल त्यांना आदर असला तरी ते त्यांच्याशीं दुरूनच संबंध ठेवीत!

यानंतर लवकरच टिळक हे त्यांच्या सुप्रसिद्ध अशा मोठ्या दौऱ्यावर निघाले. या दौऱ्याची सविस्तर हकीकत मी टिळक चरित्रांत दिली आहे. मात्र ती दुर्घट पुराव्याच्या स्वरूपाची म्हणजे दुसऱ्याकडून ऐकलेल्या माहितीवरून व

दुसऱ्यांनीं लिहिलेल्या लेखावरून दिलेली आहे. कारण यां दौऱ्यांत मी टिळकांच्या बरोबर जाऊं शकलों नाहीं. खाडिलकर गोखले वगैरे मंडळी गेली होती. मध्य महाराष्ट्रांतील व वऱ्हाडांतील पुढाऱ्यांनीं व अनुयायांनीं या दौऱ्याची व्यवस्था ठेवली होती व तो अत्यंत यशस्वी झाला. अशा प्रकारचा दौरा यापूर्वी हिंदुस्थानांत कोणत्याहि पुढाऱ्याचा निघालेला नव्हता. त्या दौऱ्याची बरोबरी पुढें महात्मा गांधी यांच्या दौऱ्यांनींच काय ती केली, किंबहुना कांहीं अंशीं त्यांना मागेंहि टाकलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ह्या दौऱ्यांत सुमारें पाऊण लक्ष रुपये इंतकी वर्गणी देणगीच्या रूपानें मिळाली व ती अगदीं वेळेवरच मिळाली. कारण बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांची टिळकांना विलायतेस बोलावण्याचीं निकडीचीं पत्रें येऊं लागली म्हणून टिळकांनींहि जाण्याचें ठरविलें. विलायतेस डेप्युटेशन जावयाचें तर तें बऱ्याच खर्चाचें काम. त्याला ही रक्कम आयतीच उपयोगी पडली. टिळकांच्या हालचालींना व भाषणांना इकडे अधिकाधिक बंदी होऊं लागली होती. यामुळें विलायतेस जाऊन चळवळ करणें अधिक सोईचे असेहि वाटूं लागले. त्याप्रमाणें त्यांनीं स्वतः जाण्याचें ठरवून शिवाय बिपिनचंद्र पाल, दादासाहेब खापर्डे, व मी इतक्यांना आपणाबरोबर नेण्याचें ठरविलें.

या वेळी पासपोर्टस् व पॅसेजेस् ही दोन्ही मिळण्याचे मोठे कठिण झाले होते. पासपोर्ट कसे तरी मिळाले. पण मुंबईहून आगबोटीचा पॅसेज मिळणें दुर्घट झाल्यामुळें आम्ही कोलंबोहून जाण्याचे निश्चित केले. टिळक विलायतेस जाणार ही गोष्ट लोकांना अद्भुत तर वाटलीच. पण उतार वयांत दूरदेशची सफर. समुद्रांतील महायुद्ध अजून पूर्णपणें थांबलेलें नसून मधून मधून आगबोटींना अपघात होत. टिळकांना मधुमेहाचा विकार असल्यामुळें व ते कट्टे शाकाहारी असल्यामुळें त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था कशी काय निभेल याविषयीं लोकांना सहजच चिंता वाटे. यामुळें मोठ्या कार्यावर निघण्याकरितां म्हणून निरोप द्यावयाचाच, पण कदाचित् तो निरोप शेवटचाच होण्याचा संभव अशा भावनेनेंहि तो द्यावयाचा. तेव्हां सत्कार समारंभ कसे झाले असतील याची कल्पना कोणासहि होईल. अधिक माहिती मी येथें देत नाहीं, कारण ती टिळकचरित्रांत मी भरपूर दिली आहे.

आम्ही मंडळी कोलंबोचा प्रवास करीत असतां इकडे हिंदुस्थान सरकार व विलायत सरकार यांच्या तारा एकमेकांत सुरू होत्या, व खल असा चालला होता की टिळकांना या वेळीं विलायतेस जाऊं द्यावें कीं नाहीं ! आणि अखेर जाऊं देऊं नये असें ठरून अगदीं शेवटच्या तासाला आमचे पासपोर्ट रद्द करण्यांत आले. ती हकीकतहि मनोरंजक असून चरित्राच्या तिसऱ्या खंडांत तिसऱ्या भागांत मी दिली आहे. टिळकांबरोबर इतरांनाहि हीं बंदी झाली होती. मिसेस् नायडू यांना असाच प्रतिबंध झाला. जॉर्ज जोसेफ हे बेझंटबाईंच्या स्वराज्यसंघातर्फे म्हणून गेले. त्यांना जिब्राल्टरपर्यंत जाऊं दिलें व तेथें अटक केली ! पासपोर्ट रद्द केल्यामुळें अर्थातच कोलंबोहून आम्हा सर्व मंडळींना परत मुंबईस यावें लागलें. शिवाय पॅसेजेस् म्हणजे बोटीवरील जागेसंबंधानेंहि इतकी अडचण झाली कीं, "नोव्हेंबरपर्यंत मुंबईहून निघणाऱ्या एकाहि टपाल बोटीवर एकट्या टिळकांनाहि जागा मिळणार नाहीं, कोलंबोहून केप ऑफ् गुड् होप वरून जपानी बोटीनें कोणी जाण्यास तयार असल्यास कळवावें," असें टॉमस् कुक कंपनीनें आम्हाला पुण्यास कळविलें ! पुढें बॅप्टिस्टांनींहि कळविलें कीं इकडे किंचित चलबिचल झाल्यामुळें टिळक तूर्तच न येतां मागाहून आलेले बरे. शिवाय पुढील राष्ट्रीय सभेच्या वेळीं टिळकांना अध्यक्षस्थान देण्याचें घाटत होतें, तशा स्पष्ट सूचना होत होत्या, व राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष या नात्यानें राष्ट्रीय सभेची हुकमत घेऊन टिळक विलायतेस जातील तर त्यांचें वजन अधिक पडेल व काम अधिक चांगलें होईल असें बॅप्टिस्टा यांनीं लिहिलें. इंग्लंडांतील गडबड म्हणजे आयरिश होमरूलच्या जोराच्या खटपटीची. महायुद्धाकरितां लष्करी नोकरीची सक्ति आयरिश नागरिकांवर कशी करितां येईल असा प्रश्न निघाला होता. आणि स्वराज्य भोगणाऱ्या इंग्लंडांतहि जर अशी सक्ति करणें कठिण, तर आयर्लंडांत ती करावयाची असल्यास आधी निदान होमरूलच्या स्वरूपाचें स्वराज्य तरी आयरिश लोकांना द्यावयास पाहिजे. अर्थात् अशा वेळीं टिळकांनीं विलायतेत जाऊन "हिंदुस्थानालाहि होमरूल द्या, आम्हीहि लष्करी नोकरी करण्याला तयार आहोत" असें म्हटलें तर त्यांना ते नाहीं कसें म्हणतां येईल ? या अवघड विचारांत विलायतचे मुत्सद्दी गढून गेले होते. म्हणून त्यांनीं ठरविलें कीं तूर्त विलायतेत हिंदुस्थानच्या स्वराज्यासंबंधी चळवळ होऊंच देऊं नये, व इकडे हिंदुस्थानांत युद्धपरिषदा भरवून लोकांचा रागरंग काय आहे तो पहावा.

त्याप्रमाणें दिल्ली येथें एक मोठी युद्धपरिषद भरविण्यांत आली. पण टिळकांना आमंत्रण करण्यांत आलें नाहीं. वास्तविक टिळक सैन्य भरतीला अनुकूल असे लेख केसरीत लिहीत होते. मुंबईस त्यांनीं सभा भरवून आठशें लोक सैन्यांत शिरण्याकरितां तयार करून त्यांचीं नांवें नोंदविण्याचें सुरू केलें; व मी आपला एक मुलगा लष्करभरतींत पाठविण्यास तयार आहे असेंहि जाहीर केलें. इतकें असूनहि टिळक हे महायुद्धांत सरकारला मदत करण्याच्या विरुद्ध बोलतात असा खोटा समज करून देऊन त्यांना कांहीं ठिकाणीं भाषणबंदी करण्यांत आली होती. टिळकांप्रमाणें बेझंटबाईनाहि निमंत्रण नव्हतें. हा अन्याय वाटून महात्मा गांधी हे पहिल्या दिवशीं युद्ध परिषदेतून उठून गेले. पण व्हाइसरॉयांनीं त्यांची समजूत घालून दुसरें दिवशीं त्यांना हजर ठेविलें ! युद्धांत मदत हवी तर हिंदी शिपायांचे पगार वाढवा अशी सूचना एका सभासदानें केली त्याला सरकारानें " याचा रीती-प्रमाणें विचार करूं " असें कोरडें उत्तर दिलें, व खापर्डे यांनी स्वराज्यदानाचा प्रश्न उपस्थित केला तेव्हां तो परिषदेच्या कक्षेच्या बाहेर आहे असे ठरवून व्हाइसरॉय साहेबांनीं काढून टाकला.

पण हाच प्रश्न मुंबईस प्रांतिक युद्धपरिषद भरली तींत निघाला. दिल्लीची चूक दुरुस्त करून टिळकांना निमंत्रण करण्यांत आलें होतें. तसेंच ते मलाहि आलें. तेव्हां दिल्लीस घडलेला प्रकार लक्षांत घेऊन, मी गव्हर्नर लॉर्ड वुलिंग्डन यांच्या सेक्रेटरींना पत्र लिहून असें विचारलें कीं " आम्हाला परिषदेस बोलावतां त्या अर्थी आम्हास तेथें भाषणें करण्याची इच्छा आहे. तरी वाटेल त्या माणसाला तुम्ही बोलू द्याल कीं ठराविक माणसांकडून ठराविक भाषणें करवूनच परिषद गुंडाळून घ्याल ? तसेंच सभेचा कार्यक्रम काय ठरला आहे ? मुख्य ठराव मांडल्यावर त्याला कोणी उपसूचना आणली तर ती आणूं द्याल कीं नाहीं ? " त्यावर उत्तर आलें कीं, " ठराविक वक्ते आधीं बोलून ठराव मांडतील. त्यावर उपसूचना आणण्यास परवानगी मिळणार नाहीं. परंतु जाहीर चर्चेंत कोणाला बोलावयाचें असल्यास परवानगी देऊं. " तेव्हां सभेंत काय बोलावयाचें हें आधीं ठरवून टिळकांनीं व मी आम्ही आपापलीं भाषणें लिहून काढलीं. त्यांत मुख्य मुद्दा हा होता कीं, लष्करी मदत सरकारला हवी तितकी मिळेल, परंतु स्वराज्य दिल्याशिवाय मात्र नाहीं. स्वराज्य व लष्करी नोकरी यांचा संबंध तोडतां येत नाहीं. मग अदमासाप्रमाणेंच घडलें. म्हणजे टिळकांना बोलण्याची परवानगी मिळून ते या मुद्यावर येतांच लॉर्ड

विलिंग्डन यांनीं त्यांना थांबविलें, व हा अवांतर विषय तुम्ही बोलूं नये असें सांगितलें. असें होणार याचें स्वप्न पडलेंच होतें, म्हणून ठरल्याप्रमाणें टिळक परिषद सोडून निघून गेले. नंतर माझी पाळी आली. मलाहि त्याचप्रमाणें लॉर्ड विलिंग्डन यांनीं मध्येंच थांबविलें व मीहि सभागृह सोडून निघून गेलों. आमच्यामागून वमनजी शेट पारशी हे कांहीं न बोलतांच निषेध प्रदर्शित करण्याकरितां उठून गेले. हॉर्निमन, जमनादास द्वारकादास, वगैरेनींहि तोच मार्ग स्वीकारला. बॅरिस्टर जिना व लॉर्ड विलिंग्डन यांचीं बरीच प्रश्नोत्तरें झालीं. नंतर शांतारामाच्या चाळींत गांधी यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून गांधी व जिना यांनीं लॉर्ड विलिंग्डन यांच्या कृत्याचा निषेध केला. "स्वराज्य राहो पण लष्करभरती हवी तशी झाल्यास लष्करांतील वरिष्ठ अधिकाराच्या जागा तरी हिंदी लोकांना देण्याचें आश्वासन द्या" असें हिंदी पुढारी म्हणूं लागले. परंतु सरकारला मिळेल तें घ्यावयाला पाहिजे होतें, कांहींहि द्यावयाला नको होतें. गांधी हे बिनशर्त लष्करभरती करून देण्यास तयार असून त्याप्रमाणें खटपटहि करीत होते. परंतु "टिळकांना लष्करभरतीवर भाषणें करण्याची सरकारानें मनाई केल्यामुळें माझ्या रिक्रूटिंगच्या कामाला हरकत होत आहे" अशी गांधी यांनीं गव्हर्नरसाहेबांकडे तक्रार केली.

यानंतर मुंबई येथें राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन मुद्दाम भरविण्याचें ठरलें. त्याला टिळक व त्यांची मंडळी हजर होती. बंगाल्याहून बरेच पुढारी आले होते. मुख्य ठराव मॉंटेग्यु-चेम्सफर्ड रिपोर्टाच्या आधारें स्वराज्य मागण्याचा मंजूर झाला; व विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली. मुंबईहून परत जातांना बाबू मोतीलाल घोस, शामसुंदर चक्रवर्ती, चित्तरंजन दास, बिपिनचंद्र पाल, बॅरिस्टर लहिरी, वसंतकुमार घोष, चिदंबरम् पिले वगैरे मंडळींना 'सार्वजनिक सभेच्या मॅनोजिंग कमिटीचा चेअरमन म्हणून' मी पुण्यास येण्याकरितां निमंत्रण दिलें. त्याप्रमाणें ही मंडळी पुण्यास आली व गायकवाड-वाड्यांत त्यांचीं व्याख्यानें झालीं. पण या वेळीं, टिळकांना डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाखालीं भाषण बंदीचा हुकूम होता, म्हणून टिळकांनीं या सर्व प्रसंगांत साक्षीभूत होऊन बसावें, व त्यांच्याकरितां भाषणें वगैरे करावयाचीं तीं अध्यक्ष या नात्यानें मी करावीं अशी योजना करणें भाग पडलें.

यानंतर लवकरच टिळक विलायतेला गेले. "चिरोलसाहेबाविरुद्ध मी फिर्याद केली ती मला चालवावयाची आहे, मला जबानी देण्याकरितां लंडनच्या ज्यूरीपुढें जावयाचें आहे, तरी मला पासपोर्ट व परवानगी द्यावी," असा आग्रह टिळकांनीं धरून एकसारखा पत्रव्यवहार सुरू केल्यामुळें सरकाराला नाहीं म्हणतां येईना. म्हणून त्यांनीं "विलायतेंत कोणतीहि राजकीय चळवळ करावयाची नाहीं" या अटीवर "फक्त वकील व एक दोघे सोबती घेऊन जाण्याची" परवानगी दिली होती. त्याप्रमाणें टिळक अवचित निघून गेले. अर्थात् या वेळीं त्यांच्या जाण्या-संबंधानें कोणताहि सत्कार समारंभ वगैरे झाला नाहीं. आपली निघण्याची तारीख त्यांनीं फारशीं कोणास कळविली नाहीं; कोणच्याहि समारंभाला एकप्रकारचा प्रतिबंधच केला;आणि एकदम उठून एखाद्या गांवी जावें त्याप्रमाणें मुंबईस जाऊन बोटींत बसले. बरोबर वकील म्हणून दादासाहेब करंदीकर, सोबती वासुदेवराव जोशी, व नोकर किंवा परिचारक म्हणून गणपतराव नामजोशी इतक्यानांच बरोबर नेण्यांत आले.

हें झाल्यानंतर ऑल इंडिया काँग्रेस कमिटी भरली. तींत टिळकांना सर्वानुमतें राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. पण टिळक ऑक्टोबरला विलायतेस पोंचणार, व राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्याकरितां चिरोल केस संपवून हिंदुस्थानास परत येणार, ही गोष्ट अशक्य होती. हें त्यांची निवड करणारांनाहि पुरें माहीत होतें. म्हणून "न खात्या देवाला नैवेद्य" दाखविण्याचाच तो एक प्रकार झाला. तथापि विलायतेस गेल्यावर जेव्हां टिळकांवरील बंदी उठेल तेव्हां तरी त्यांना हा निवडणुकीचा मान उपयोगी पडेल अशी समजूत होती; व ती मात्र यथार्थ होती. टिळकांना अध्यक्ष निवडल्याची बातमी त्यांना काँग्रेस कमिटीनें पोर्ट सय्यद येथें तारेनें कळविली, उलट टिळकांनीं तारेनें काँग्रेस कमिटीचे आभार मानले व अध्यक्ष निवडणुकीच्या स्वीकारास नकार दिला. तेव्हां त्यांच्याजागीं ऑ. इं. काँ. कमिटीकडून पंडित मदन मोहन मालवीय यांची निवडणूक झाली. राष्ट्रीय सभेचें अधिवेशन दिल्लीस झालें. त्याला आमची होमरूल लीगची मंडळी पुष्कळ गेली होती. त्याचप्रमाणें बेझंटबाई आपलेहि पुष्कळसे होमरूलर घेऊन आल्या होत्या. सभेंत माँटेग्यु-चेम्सफर्ड रिपोर्टावर 'असमाधानकारक व निराशा-जनक' असा शेरा मारण्यांत आला. नेमस्तपक्षानें या शब्दांना हरकत घेतली पण त्यांचे कांहीं चाललें नाहीं. काँग्रेसतर्फे विलायतेंत शिष्टमंडळ पाठवावे असाहि ठराव या सभेंत झाला. आणि पंडित मालवीय यांनीं दिल्लीस खटपट करून

सरकारकडून याविषयीं एक पत्र आणविलं होतें तें वाचून दाखविण्यांत आलें. त्यांत असें म्हटलें होतें कीं, 'काँग्रेसनें आपलें शिष्टमंडळ विलायतेस पाठविण्याचें ठरविल्यास त्यांतील सभासदांना पासपोर्ट देण्याची व्यवस्था करण्यांत येईल.'' या डेप्युटेशन संबंधानें खटपट करण्याचें काम सेक्रेटरी म्हणून मी व विठ्ठलभाई पटेल यांजकडे सोपविण्यांत आलें होतें; व त्याप्रमाणें मी त्या कामाला लागून एकसारखा अनेक लोकांशीं पत्रव्यवहार सुरू केला. पत्रव्यवहाराचा उद्देश कोण विलायतेस जातात, कोण जात नाहींत, हें प्रथम समजावून घ्यावें; मग त्यांची नेमणूक करवून घ्यावी; आणि नंतर त्यांचे पासपोर्ट व पॅसेजेस मिळविण्याची खटपट करावी असा होता. या कामाचा निकाल बरेच दिवस लागला नाहीं. तेव्हां पटेल व मी यांनीं असें ठरविलें कीं, कोणी येवो, कोणी न येवो, तुम्ही आम्ही व इतर चार लोक तुमच्या आमच्या बरोबर जाण्यासारखे असतील ते घेऊन आपण मार्च-एप्रिलांत निघूच निघू. काँग्रेसचें डेप्युटेशन गेलें न गेलें तरी आमच्या होमरूल लीगचें जावयाचेंच होतें. त्याचे अध्यक्ष टिळक हे पूर्वीच विलायतेस जाऊन राहिले होते; व सेक्रेटरी म्हणून मी जावें असें ठरलें होतें. तेव्हां माझ्याबद्दल प्रश्नच नव्हता. पण मे–जून महिन्यापर्यंत माँटेग्युसाहेब हे आपलं बिल पार्लमेंटपुढें आणणार नाहींत असें प्रसिद्ध झालें असल्यामुळें तेथपर्यंत मला सवड होती.

दरम्यान १९१९ च्या फेब्रुवारींत चिरोल केसचा निकाल प्रतिकूल झाला; व तो होतांच एक आठवड्याचे आंत आम्ही या केसच्या खर्चाप्रीत्यर्थ सुमारें तीन लक्ष रुपये फंड जमविण्याचे ठरविले. ही कल्पना प्रथम पुण्यास मी, डॉ. पळसुले व आणखी एक दोन ब्रेही मंडळी यांनीं काढली. मुंबईस अण्णासाहेब लेनेप्रभृतींनीं त्याला ताबडतोब संमति दिली. आणि मग वऱ्हाड नागपूर प्रांतांच्या ब्रेही मंडळीची संमति घेऊन वर्गणी जमविण्यास एकदम सुरुवात झाली. विलायतेस जाण्याला दोन महिने अवकाश होता तो मला या वर्गणीची खटपट करण्याला चांगला उपयोगी पडला. तिकडे विलायतेंत युद्ध संपून तात्पुरता तह झालेला असल्याकारणानें टिळकांवरील भाषणबंदी उठली; व त्यांनीं बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांच्या सहाय्यानें होमरूल लीगच्या नांवानें अर्ज, प्रसिद्धिपत्रकें, वगैरे काढून चळवळ सुरू केली.

नंतर बॅरिस्टर बॅप्टिस्टा व दादासाहेब कांदीकर हे एकामागून एक विलायतेहून इकडे परत आले, तेव्हां टिळकांनीं मला विलायतेस लवकर येण्याची घाई केली. त्याप्रमाणें मी व विठ्ठलभाई पटेल हे एप्रिलच्या अखेरीस विलायतेस निघून गेलों. माझ्यामागून कांहीं दिवसांनीं दादासाहेब खापर्डे हे आले. इतक्यांत काँग्रेसच्या डेप्युटेशनपैकीं आणखी कांहीं लोक आले. आणि टिळकांच्याच घरीं होमरूल लीगचें डेप्युटेशन व राष्ट्रीय सभेचें डेप्युटेशन यांच्या कामाची एकत्रच व्यवस्था सुरू झाली. डेप्युटेशनच्या कामाच्या तयारीबरोबर आम्हांला दुसरेंहि एक काम करावें लागलें तें असें. विलायतेंत ब्रिटिश इंडियन काँग्रेस कमिटी ही संस्था आणि तिचें मुखपत्र इन्डिया ही दोन्ही काँग्रेसच्या खर्चानें चालत असता नेमस्त पक्षाला सामील झाली होती, ती आपल्या ताब्यांत घ्यावयाची. त्याप्रमाणें टिळक पटेल व मी मिळून, ब्रिटिश काँग्रेस कमिटींतील कांहीं सभासदांची मदत घेऊन, प्रथम इंडिया पत्र ताब्यांत घेतलें. दक्षिणा एकाची घ्यावयाची व आशीर्वाद दुसऱ्याला द्यावयाचा असा प्रकार या कमिटीनें चालविला होता, तो इंडिया पत्र आमच्या स्वाधीन झाल्यानें थांबला. लंडनचे सॉलिसिटर मि. पोलाक हे गांधी व गोखले यांचे मित्र आणि नेमस्त लोकांचे पक्षपाती. त्यांनी काँग्रेसचा हुकूम धाब्यावर बसवून पूर्वीप्रमाणें इन्डिया हें पत्र आपल्या ताब्यांत ठेवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परन्तु तो सिद्धीस मात्र गेला नाहीं. आणि या पत्रासंबंधीं पूर्वी सहसंपादकाचें काम करीत असलेल्या आयरिश बाई मिस् नॉरमेन्टन् यांना व मला सजोड सहकारी संपादक नेमण्यांत आलें.

इंडिया पत्राचें काम अंगावर पडल्यामुळें माझा बहुतेक वेळ त्यांत जाऊं लागला. कारण दर आठवड्याला एखादें दुसरें आर्टिकल लिहावयाचें तें लिहून, शिवाय सिलेक्ट कमिटीच्या सभांना हजर राहून, तेथील कामाचा सारांशरूपानें अहवालहि द्यावयाचा असे. तिकडील छापखानेवाले इकडच्या पेक्षां मोठे टिपणबाज. म्हणजे ठरीव वेळेला त्यांना मजकूर दिलाच पाहिजे. द्यावयाचा तो अगदीं शुद्ध स्वच्छ दिला पाहिजे. टाइपिस्टची घरीं सोय नव्हती; यामुळें माझा मजकूर हातानेंच लिहून द्यावा लागे. प्रुफें वाचण्याला वेळेवर गेलें पाहिजे; व एखाद्या लहानशा शब्दापलीकडे प्रुफांत करेक्शन केलें तर त्याकरितां छापखानेवाला वेगळा आकार घेई! यामुळें वर्तमानपत्राचें काम मोठ्या जिकिरीचें होई. माझा मीच सेक्रेटरी असल्यामुळें पार्लमेंटरी कमिटीला हजर राहण्यापासून छापखान्यांत

जाऊन प्रुफें पहाण्यापर्यंत सर्व गोष्टी माझ्या मलाच कराव्या लागत. वर्तमान-पत्राचें हें काम या प्रसंगीं अवघड होण्याचें विशेष कारण हें कीं, काँग्रेस डेप्युटेशन जन्या वतनदारांच्या हातून हिसकावून तें आपल्या हातीं घेतल्यामुळें त्यांतील उणेपणा काढण्याला ते टपून बसले होते. हिंदुस्थानांतील निरनिराळीं डेप्युटेशनें कधीं नव्हे तीं बिलायतेस गेलेलीं; यामुळें बिलायतेंत हें इंडिया पत्र एरवीं सहसा न वाचणारे लोकहि मधून मधून वाचीत. शिवाय हें पत्र विशेष जहाल-पणानें चालविलें जावें असें टिळकांच्या पलिकडेहि जाऊन म्हणणारे हॉर्निमनसाहेब लंडनलाच होते. ते या अंकांत अमुक आले नाहीं, त्या अंकांत तसें लिहिलें नाहीं, अशा तक्रारी ऑफिसांत येऊन करीत. त्या इतक्या कीं, शेवटीं एक दिवस कंटा-ळून मी आमच्या कमिटीला म्हणालों "हें पहा, हॉर्निमन साहेबांचें म्हणणेंच बरोबर असेल तर इंडिया पत्राचे संपादक त्यांना नेमा. मी सहकारी संपादक म्हणून त्यांना मदत करीन." पण टिळकांना हॉर्निमन साहेबांच्या तक्रारी असाव्या तितक्या सयुक्तिक वाटत नसत. आणि त्यांनीं आहे तीच व्यवस्था दडपून चालूं ठेवली. यामुळें व्याख्यानांचे कार्यक्रम कांहीं ठरविण्यांत आलें त्यांत मला लंडन सोडून फारसें दूर व्याख्यानें देण्यास जातां आलें नाहीं.

टिळकांबरोबर मी ऑक्सफोर्ड व केंब्रिज येथें गेलों होतों पण त्यांच्या-बरोबर मला स्कॉटलंडला जातां आलें नाहीं. मी फक्त बर्मिंगहॅम्, ब्रिस्टल् वगैरे जवळच्या ठिकाणीं व्याख्यानें देण्याला जाऊं शकलों. पार्लमेंटरी कमिटीपुढें साक्षी द्यावयाच्या त्या व्यक्तिशः जातील तितक्या लोकांच्या न घेतां गटागटांनीं घेण्याचें ठरलें. यामुळें काँग्रेसतर्फे एकटे पटेल, बेझंटबाईच्या होमरूल लीगतर्फे एकट्या बाई, आणि आमच्या होमरूल लीगतर्फे एकटे टिळक, इतक्यांच्या साक्षी झाल्या. त्यांत मला स्थान नव्हतें. पण मुलाखती वगैरेकरितां आम्ही सर्व मिळून जात होतों. मॉंटेग्युसाहेबांच्या भेटीला, लेबरपार्टीनें दिलेल्या भोजनाला, व अशाच इतर अनेक प्रसंगीं मी डेप्युटेशनचा एक सभासद म्हणून जाई. पण लंडनच्या सर्व मुक्कामांत माझें मुख्य काम इंडिया पत्राचा संपादक या नात्याचेंच राहिलें. आणि या पत्राकरितां नेमलेल्या कमिटीनें व ब्रिटिश काँग्रेस कमिटीनें मला अखेर निरोप देतांना एक रुप्याचें तबक आठवण म्हणून नजर केलें.

टिळक पायानें अधू व त्यांच्या डोळ्यालाहि दूरचें दिसत नसे, यामुळें गणपतराव नामजोशी हे नेहमीं त्यांच्याबरोबर हात देण्याला असतच. परंतु

त्यांच्या सेक्रेटरीचें म्हणून जें काम असे तें मलाच करावें लागें. आणि याच कामाकरितां म्हणून टिळकांनीं मला विलायतेस बोलावलें होतें. इन्डिया पत्राचें काम मजकडे येईल अशी कल्पना मला बोलावतांना व जातांना कोणालाहि नव्हती. सिलेक्ट कमिटीचें व डेप्युटेशनचें काम संपल्यानंतर, हिवाळ्याच्या तोंडीं, हिंदुस्थानला परत येण्याची सर्वच शिष्टमंडळांची घाई सुरू झाली. जातांना आगबोटीवर जागा मिळण्याची जशी पंचाईत झाली तशीच परत येतांनाहि ती पडली. नेमस्तपक्षाचे लोक सरकारला आवडते. त्यांच्या करितां इंडिया ऑफिसचे लोक सवलती करून देत. पण टिळक व त्यांची मंडळी हे नावडते लोक. यामुळें आमच्याशीं ते काटेकोरपणानें वागत. याचा परिणाम असा झाला की, मिळेल त्या बोटीवर जागा घ्यावी पण लंडनहून लवकर पाय काढावा ! मिळालेली संधि दवडली तर फिरून ती केव्हां मिळेल याचा नेम नाही. यामुळें नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत इजिप्त नांवाच्या बोटीवर आम्हाला जागा मिळाल्या त्या घेऊन आम्ही इकडे निघून आलों. ही बोट मार्सेलला लागणारी नव्हती. यामुळें मला तेव्हां फ्रान्समध्यें उतरतां येत नव्हते. सगळा प्रवास फक्त समुद्रमार्गानें एकदम पुरा करावा लागला. टिळकांना युरोपखंडांत प्रवास करावयाची इच्छाच नव्हती, यामुळें त्यांना यांत गैरसोय झाली नाहीं. मला मात्र वाटे कीं, इतके लांब आल्यासारखे जमल्यास युरोपखंडहि एकदा पाहून घ्यावें. पण बोटीची गैरसोय वर सांगितल्याप्रमाणें. मागें राहून प्रवास करावा तर आणखी किती महिने रहावे लागेल व किती खर्च करावा लागेल याचा नेम सांगवेना. शिवाय एक महिन्यानें डिसेंबरांत अमृतसर येथील राष्ट्रीयसभेचें अधिवेशन व्हावयाचें असून, तें बरेंच वादग्रस्त होण्याचा संभव दिसूं लांगला होता. या सर्व कारणांमुळें मी देखील टिळकांच्या बरोबरच परत जावें असें ठरलें. आम्ही त्याप्रमाणें नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत मुंबईस येऊन दाखल झालों.

अमृतसर येथील राष्ट्रीयसभा अदमासाप्रमाणें वादग्रस्त झाली. पार्लमेंटनें केलेल्या कायद्यानें नेमस्त पक्षाचें सर्वस्वीं समाधान झालें, व या कायद्याला राष्ट्रीय सभा नांवें ठेवणार असें भाकीत कळल्यावरून नेमस्तपक्षाचे लोक या सभेला कोणीहि आले नाहींत. गांधी यांचें मत नेमस्तपक्षाप्रमाणेंच होतें तरी ते सभेला आले होते. कारण पंजाबांतील अत्याचार, मार्शल लॉ, वगैरे प्रकरणें काँग्रेसमध्यें निघावयाचीं होतीं. "या प्रकरणापुरतेंच मी यंदाच्या सभेत लक्ष घालूं इच्छितों,

इतर बाबतींत मी तटस्थ राहीन " असें गांधीचें म्हणणें होतें. पण त्यांना कोणी तसें बसूं देईना. टिळक, दास वगैरे लोकांशीं गांधींचें विशेष सख्य नव्हतें; होतें तें मोतीलाल नेहरू, मदन मोहन मालवीय यांच्याशींच होतें. अर्थात् या दोघांनीं टिळक व दास यांच्याबरोबर झगडण्याला गांधींनाच तोंडाशीं दिलें. वाद म्हणण्यासारखा कांहींच नव्हता. अगदींच शुष्क, म्हणजे एक दोन विशेषणें घालावीं कीं न घालावीं यापुरताच होता. तरी देखील वादाला बराच रंग चढला. टिळकांचे निरोप घेऊन गांधी व नेहरू यांच्या छावणींत मी जाई, तेव्हां नेहरू गांधी वगैरेंचें सख्य कांहीं एका विशेष कारणानें त्यावेळीं कसें जडलें होतें हें मला तेव्हां प्रथम पहावयास सांपडलें. नेहरू मंडळी व गांधी यांचें बंधुप्रेम बातलगाहून अधिक असें जें आज सतरा अठरा वर्षे लोकांना पहावयास सांपडलें त्याचा उगम प्रथम अमृतसर येथें झाला.

राष्ट्रीय सभेहून परत आल्यावर पुढें कायदे कौन्सिलच्या निवडणुकी उभ्या राहिल्या. त्यांत आपल्या पक्षाचे उमेदवार उभे करणें व आपल्या पक्षाचा म्हणून एखादा जाहीरनामा काढणें या गोष्टी ओघानें प्राप्त झाल्या. मग त्याच गडबडींत माझे कांहीं दिवस गेले. स्वतः मी पुणें शहरच्या मतदारसंघातर्फे निवडणुकीला उमेदवार म्हणून उभा राहिलों. ब्राह्मणेतर पक्षानें विठ्ठल रामजी शिंदे यांना उभे केले होते. कारण ब्राह्मण-ब्राह्मणेतराच्या वादाला पूर्वी दोन तीन वर्षांपासून प्रारंभ झाला होता व तो यावेळीं चांगलाच रंगाला आला होता. भावी युद्धांत ब्राह्मणेतरांच्या छावणींत शिरून त्यांच्या सहकारितेनें राष्ट्रीयपक्षाशीं लढावें असें धोरण महाराष्ट्रांतील नेमस्तपक्षानें योजिलें होतें. त्याचा प्रत्यय आम्ही मंडळी विलायतेहून परत आल्यावर टिळकांना व मला पुण्याच्या नागरिकांनीं व पुणें म्युनिसिपालिटीनें मानपत्रें दिलीं त्यांच्या जाहीर समारंभाच्या वेळींच आला होता. पण टिळकांची लोकप्रियता यावेळीं इतकी होती कीं, नेमस्त व ब्राह्मणेतर यांनीं संगनमत केलें त याचा परिणाम राष्ट्रीयपक्षावर कांहींच होण्याचा संभव नव्हता याच सुमारास बझटबाईनींहि टिळकांशीं राजकीय दावा मांडला होता. या दाव्यांतील आपल्या कैफियती लिहिणें, प्रसिद्ध करणें, या शिवाय नवीन दाव्यांचें कामहि टिळकांना करावें लागलें. जुन्नर येथील जिल्हासभेच्या प्रसंगीं नेमस्तांनीं आपली शर्थ करून पाहिली. उन्हाळ्यांत सोलापूर येथें प्रांतिक परिषदेचें अधिवेशन व्हावयाचें ठरलें होतें. तेथेंहि नेमस्तपक्ष व बेझंटबाईचे होमरूलर जमून

फिरून एक युद्ध होणार अशी चिन्हें दिसत होतीं. या परिषदेचें अध्यक्षस्थान मला देण्याचें स्वागतमंडळानें ठरविलें तें टिळकांना आधीं विचारूनच ठरविलें होतें.

या परिषदेची हकीकत मी टिळक चरित्रांत सविस्तर दिलेलीच आहे. म्हणून त्याविषयीं येथें अधिक तपशील लिहीत नाहीं. परंतु इतकेंच सांगतों कीं, या परिषदेचें अध्यक्षपद ही एक माझी कसोटी ठरण्याचाच प्रसंग होता. पण त्या कसोटीला मी सर्व बाजूंनीं उतरलों असें लोकमत शेवटीं मला ऐकावयास सांपडलें. कसोटी लागण्याचें कारण असें कीं, " या प्रांतिक परिषदेंत हटकून बखेडा करावयाचा. टिळक म्हणतात इतकें बहुमत त्यांच्या बाजूला नाहीं. ते स्वतःला लोकप्रिय मानीत असले तरी त्यांनाहि गदगदा हलवून सोडण्याइतकें बळ आम्ही तिघे— म्हणजे नेमस्तपक्ष, बेझंटपक्ष, व ब्राह्मणेतरपक्ष—इतकें एकजुटीनें बागलों असतां आम्हाला खचित निर्माण करतां येईल " अशा आत्मविश्वासानें हे तीन्ही पक्ष सोलापुरास आले होते; आणि हजारो रुपये खर्च करून प्रतिनिधींची भरती त्यांनीं केली होती. स्वतः टिळक जरी खंबीर व कार्यकुशल असले तरी अध्यक्षस्थानीं ते बसावयाचे नव्हते, मी बसावयाचा होतों. आणि सर्व तंट्या-बखेड्यांतून व मारामाऱ्यांतून परिषद तडीला नेण्याची जबाबदारी मुख्यतः मजवर होती. ही माझी जबाबदारी पार पडली तर लोक मला बरे म्हणणार; व कोणत्याहि कारणानें परिषद उधळली गेली किंवा तींत बखेडा होऊन तिचें काम वेडेंवाकडें विपरीत कांहीं तरी झालें, तर त्या दोषाला दुसरे लोक कारण असले तरी अखेर अपयशाचा धनि मीच होणार; असा तो बिनतोड प्रसंग होता. स्वतः टिळक परिषदेला हजर रहाणार यामुळें मला पाठबळ फार मोठें होतें. परंतु अध्यक्ष या नात्यानें वादामध्यें निःपक्षपातीपणा ठेवूनच मला काम केलें पाहिजे होतें. तीं जबाबदारी टिळकांवर नव्हती. यामुळें प्रसंगविशेषीं टिळकांना व आमच्या पक्षांतील इतर लोकांना अप्रिय होण्यासारख्या कांहीं गोष्टी कदाचित् मला कराव्या लागतील असाहि संभव उघड दिसत होता. त्याप्रमाणें भर परिषदेंत व विषयनियामक कमिटींत मला अध्यक्ष या नात्यानें अप्रिय असे काम दोन तीन प्रसंगीं करावेंहि लागलें. तथापि एकंदरीनें आमच्याच पक्षाची छाप परिषदेवर सर्वस्वी पडली आणि असे होऊनहि मी निःपक्षपातीपणा अध्यक्षपदाला शोभेल असाच राखला, असे सर्टिफिकीट मला प्रतिपक्षाकडूनहि मिळालें.

परिषदेच्या प्रारंभीं ब्राह्मणेतरांनीं मंडपांत घुसण्याचा पुंडावा केला. दगडफेक होऊन कांहीं लोकांच्या डोक्याला जखमा झाल्या. या सर्व दंगेखोरीला रँग्लर परांजपे व ब्राह्मणेतर पक्षाचे त्यावेळचे पुढारी रा. वालचंद कोठारी यांची फूस होती. परंतु अध्यक्ष या नात्यानें सोलापूरच्या कलेक्टराशीं बोलणें चालणें करून मी प्रतिपक्षाचें कारस्थान उघडकीस आणूं शकल. परिषदेच्या मंडपांत जरी प्रत्यक्ष पोलिसांची मदत घेण्याचे मी नाकारले तरी कलेक्टर यांनीं खरा प्रकार ओळखून बाहेर योग्य तो बंदोबस्त ठेवला. यामुळें पुढें गडबड कांहीं झाली नाहीं; व परिषद उधळण्याचा डाव फुकट गेला. विषयनियामक कमिटींतील काम मी झटपट व तातडीनें सर्व संपवून तडीला नेलें. हें पाहून, बेझंटबाईच्या विरुद्ध मी अध्यक्ष म्हणून एक–दोन निकाल दिले असतांहि, शेवटी मजजवळ येऊन "तुम्ही आपलें काम फार चांगलें केलें; व कामाचा उरक फार चांगला दाखविला" असे गौरवपर शब्द त्या मला मुद्दाम बोलल्या.

मुख्य परिषदेंतहि कांहींसा असाच प्रकार झाला. नवीन सुधारणांच्या कायद्याला नांवें ठेवण्यासारखा ठराव टिळक आपल्या अनुयायांच्या बळावर परिषदेंत करणार. तरी तो पास होऊं देऊं नये अशा ईर्षेनें रँग्लर परांजपेप्रभृति नेमस्त व बेझंटबाईसह त्यांचें अनुयायी आले होते व त्यांनीं या कामीं ब्राह्मणेतर पक्षाची मदत घेतली होती. अर्थात् हाच ठराव महत्त्वाचा व वादग्रस्त, म्हणून परिषदेच्या कार्यक्रमांतील एका सकाळची सर्व बैठक त्याकडेच देण्यांत आली होती. ठरावावर उपसूचना आल्या होत्या व उलट सुलट बोलणाऱ्या वक्त्यांचीहि मोठी यादी मजकडे आली होती. अशा रीतीनें वादविवादाचें रण तुंबळ माजणार होतें. यामुळें कोणाहि अध्यक्षाचा स्वभाव व सभा चालविण्याचें कौशल्य याची परीक्षा होण्यासारखाच एक प्रकारचा तो प्रसंग होता. तो लक्षांत घेऊन, मी वक्त्यांचीं नांवें अशा रीतीनें आपल्या अधिकारांत एका पुढें एक ठेऊन दिली होती कीं, त्यांच्या भाषणांत सहजपणें उत्तर प्रत्युत्तर असा प्रकार घडून वादाला रंग चढावा; आणि अखेर निकाल कसाहि झाला तरी कोणालाहि अन्याय झाला नाहीं इतके तरी समाधान सर्वांना वाटावें. घंटा व घड्याळ यांच्या सहाय्यानें मी ठरीव मुदतीपर्लीकडे कोणालाहि, प्रत्यक्ष टिळकांनाहि, बोलूं दिलें नाहीं.

शेवटीं उपसूचना मांडावयाच्या तशा क्रमानें मताला घातल्या; व मुख्य ठरावावर मतें घेऊन राष्ट्रीय पक्षाचा ठराव मंजूर झाला असें मी मोघम रीतीनें

जाहीर केलें. परंतु प्रत्यक्ष हात मोजले असतां आपल्या बाजूचीं मतें अगदींच थोडी दिसणार नाहींत, टिळकांचा प्रत्यक्ष पराभव न केला तरी त्यांना आपलें बळ तरी जाणवलें असें म्हणतां यावें, म्हणून रँग्लर परांजपे व बेझंटबाई यांनीं मला अशी विनंति केली कीं "दोन्ही बाजूचे नक्की आंकडेच न सांगितलें तरी साधारणपणें त्याचें प्रमाण तरी जाहीर करा;" व तसें करणें योग्य असें वाटून मी तें जाहीर केलें. त्यानें त्यांचें समाधान झालें. आमच्या पक्षालाहि कमीपणा येण्यासारखें या निकालांत कांहीं नव्हतें. तथापि माझ्या या करण्यानें टिळक थोडेसें मनांतून नाखूष झाले. "उलट सुलट मतांचें प्रमाण सांगा ही विनंतिच मी अमान्य करावी, पण बेझंटबाईंची भीड मला आवरली नाहीं, मी त्यांच्या आहारीं गेलों," असे टिळकांना वाटले. आणि त्याप्रमाणें त्यांनीं स्वतः या परिषदेवर त्याच दिवशीं दोन प्रहरीं खाडिलकरांना तोंडीं मजकूर सांगून केसरीकरितां अग्रलेख लिहून पाठविला त्यांत या मताचा उद्गार काढला. कदाचित् इतरांना तो उमगला नसेल, पण मला तो जाणवला. तथापि त्याच अग्रलेखांत त्यांनीं इतर रीतीनें माझ्या कामाची प्रशंसा करून, अध्यक्ष या नात्याचें माझें भाषण खुद्द राष्ट्रीय सभेच्या एखाद्या अध्यक्षाला शोभेसें झालें असें म्हटलें होतें.

हा रागलोभ अर्थात् आमच्या आमच्यांतला होता. पण अकल्पित रीतीनें एका भलत्या गृहस्थाकडून माझ्या कामाबद्दलची शाबासकी या प्रसंगीं मला मिळाली. सकाळच्या बैठकींतील ठराव निकालांत निघून परिषद खलास झाल्याचें मी सांगितल्यावर, मी खुर्चीवर बसलों असतांच, सर नारायण-राव चंदावरकर हे आले व माझ्या पाठीशीं खुर्चीवर हात ठेवून ते मला म्हणाले, "मि. केळकर, तुम्ही आज अध्यक्षाचें काम व एकंदर परिषदेचें काम इतकें चांगलें केलें कीं त्यावरून, उद्यां आम्ही लोक स्वराज्य चालविण्याला पात्र आहों कीं नाहीं असें कोणी मला विचारल्यास मी या परिषदेचेंच उदाहरण देऊन म्हणेन कीं, होय, आम्ही स्वराज्याला पात्र आहों." सर नारायणराव चंदावरकर हे भावनेच्या भरांत बिनहिशेबी शब्द बोलूं शकतात हें मला माहीत असल्यामुळें, त्यांनीं केलेली ही स्तुति त्यांत घालावयाचा तो बट्टा घालूनच मी स्वीकारली. कदाचित् टिळकांसारख्यांनाहि थोडेसें नाखुष करण्याचें धैर्य मी दाखविलें या गोष्टीचाहि परिणाम त्यांच्या मनावर झालेला असेल. तथापि उलटसुलट सर्व पुरावे लक्षांत घेतां माझ्या हातून सोलापूर परिषदेचें काम चांगलें पार पडलें असें मलाहि

म्हणण्यास हरकत वाटत नाहीं. या परिषदेनें टिळकांच्या हाताखालचा मुख्य प्रांतिक पुढारी या नात्यानें लोकमतांत माझी प्रस्थापना झाली, हे उघड दिसून येण्यासार होते.

आदल्या वर्षीहि विजापूर येथें प्रांतिक परिषद भरली तिचे अध्यक्ष विठ्ठलभाई टल हे होते तरी त्यांना मराठी चांगलें येत नसल्यामुळें, पूर्वीच्या नाशिकच्या प्रांतिक परिषदेप्रमाणें, येथेंहि परिषदेचें चालकत्व मजकडेच येऊन राहिलें होतें. अशा रीतीनें या दोन्ही तिन्ही प्रसंगावरून अशा सभांचे प्रसंग पार पाडण्यास मी लायक आहे असें लोकमत सहजच बनलें, व माझ्या समजुतीनें या बाबतीपुरतें तरी लोकमत मजसंबंधानें अखेरपर्यंत कायम टिकलें. विषयनियामक कमिटी म्हणजे तो जवळ जवळ गोंधळाचा व बखेड्याचा मोठाच प्रसंग असतो. पण अशा सभांना अध्यक्ष होण्याचा, किंवा सेक्रेटरी म्हणून काम चालविण्याचा, जेथें जेथें म्हणून प्रसंग आला, तेथें तेथें मी इतका उरक दाखविलेला लोकांना दिसला कीं, या कामांतला एक पंडित असे अशा कामांतले जाणते लोक चटेनें मला म्हणत. वास्तविक या गोष्टीला फारसें चातुर्य लागत नाहीं. जो खरा गुण लागतो तो इतकाच कीं, स्वतः दीर्घसूत्रीपणा करावयाचा नाहीं, डोक्यांत किडे पाडून घ्यावयाचे नाहींत. इतर पुष्कळांच्या अंगीं केवळ हा गुण नसल्यामुळेंच गोंधळ माजून सभांचें काम डोईजड होतें.

असो. यानंतर सांगण्यासारखा प्रसंग म्हटला म्हणजे १९२० मेअखेर पुण्यास टिळकांच्या वाड्यांत झालेला पर्सफंड समर्पण करण्याचा समारंभ. या समारंभाची सविस्तर हकीकत मी टिळक चरित्रांत दिलीच आहे. माझ्या संबंधाची या समारंभांतील गोष्ट म्हटली म्हणजे, टिळकांनीं आपल्या आभार प्रदर्शनाच्या भाषणांत अच्युतराव कोल्हटकर यांच्या विषारी टीकेला खूप खरपूस उत्तर देऊन, रा. अण्णासाहेब नेने व मी यांच्या संबंधानें प्रशंसापर व विश्वासाचे काढलेले उद्गार ही होय. समारंभाला बाहेरगांवचे पुष्कळच प्रतिनिधि आले होते. गायकवाड्याचें सर्व विस्तृत अंगण प्रेक्षकांनीं फुलून गेलें होतें. त्याप्रसंगीं प्रास्ताविक भाषण करण्याचें काम मजकडे आल्यामुळें, आम्ही पर्सफंडाची योजना कशी केली, वर्गणी कशी जमली, वगैरे गोष्टी मी सविस्तरपणें सांगितल्या. फंडाच्या कल्पनेवर आक्षेप घेणाऱ्या माधवराव बोडसांदिकांवर, पण कोणाचीहि नांवें न घेतां मी सौम्य टीका केली. व

समर्पक उत्तर दिलें. ज्युबिली फंड हा उत्साहाचा होता. पण पर्सफंड हा खेदाचा व ईर्षेचा होता. म्हणून आम्ही योजली ती पद्धति, म्हणजे तिकिटें काढून जबाबदारीनें वर्गणी गोळा करण्याची पद्धति, हीच योग्य होती असे मी सांगितले. याहि गोष्टीचा कांहींनीं विपर्यास केला. पण एकंदरीनें माझें भाषण कोणालाहि आवडलें नाहीं असे झाले नाहीं. मात्र योग असा आला कीं पर्सफंडाच्या आक्षेपकांस उत्तर हाच या सभेंतील मुख्य विषय होऊन बसल्यामुळें, अच्युतराव कोल्हटकर यांचें कपट नाटक उघडकीस आलेलें पाहून व त्याची खंती वाटून, बाबासाहेब खापर्डे, वामनराव जोशी, नारायणराव वैद्य वगैरे वऱ्हाड–नागपूर-कडल्या अच्युतरावांच्या स्नेह्यांनींच अच्युतरावांवर सडकून टीका केली.

शेवटीं टिळकांनीं तर अच्युतरावांवर फारच जोराचा हल्ला केला. प्रथम चिरोलकेसला उद्देशून ते थोडे बोलले, व शेवटीं तीन लक्ष रुपये देऊन देशानें मला विकत घेतलें असें सद्गदितपणें बोलून त्यांनीं आभार मानले. पण मधला सर्व भाग बोलत असतां मात्र ते अतिशय रागानें व आवेशानें बोलत होते. तें भाषण पुष्कळच लांब आहे म्हणून मी अधिक न लिहितां, माझ्यासंबंधाने टिळकांनीं जे उद्गार काढले तितकेच येथें उद्धृत करतों. ते म्हणाले, " आपला गुन्हा छपविण्याकरितां अच्युतराव यांनीं अशी युक्ति केली कीं तात्यासाहेब केळकर यांना आपण वादांतील सर्व रक्कम रोख दिली आहे असें म्हणावें, व एका स्नेही वकिलाकडून केळकरांना अभावितपणें मोघम कांहीं तर लिहून त्यांजकडून एखादें उत्तर बेसावधपणें भलतेच कांहीं तरी आलें तरी त्याशीं याचा संबंध कसा तरी जोडून तो पुरावा म्हणून पुढें करावा. मी आधींच सामान्यतः रागीट माणूस. त्यांत हें पत्र पाहून मला अधिकच राग आला. आणि अच्युतरावांना बोलावून घेऊन मी त्यांना असें सांगितलें कीं ' या पत्रावरून एक केळकर तरी लबाड असले पाहिजेत किंवा तुम्ही तरी लबाड आहात. मग यापैकीं खरा लबाड कोण हें मला सांगा.' या निग्रहाच्या प्रश्नाला ' तुम्ही आतां रागांत आहा सध्या जबाब देत नाहीं.' असें सांगून अच्युतराव निघून गेले. खोटे चेक देणें, आणि अमुक एक रक्कम रोख एखाद्यास दिलीच आहे असा त्यावर खोटाच आरोप करणें, या काय प्रामाणिकपणाच्या गोष्टी आहेत ! माझा आणि केळकरांचा आज वीस वर्षांचा संबंध आहे व त्यांच्याविषयीं मला पूर्ण भरंवसा आहे. माझे मित्र तात्यासाहेब केळकर, अण्णासाहेब नेने, आणि नानासाहेब देशमुख यांच्यासारख्यावर आक्षेप

घेणें हें उलट्या काळजाचें लक्षण होय. तात्यासाहेब केळकरांवर अच्युतरावांचा आक्षेप असा कीं ते फंडावर पोट भरतात. ( 'फंड-गुंड' हा शब्द असल्या प्रकारच्या आक्षेपांतूनच निघाला आहे. ) पण हें जर खरें असतें तर मी या फंडांतून एक पैहि घेतली नसती ! " असो. या समारंभाच्या प्रसंगीं कसलाहि वाद निघूं नये असें अण्णेप्रभृति कांहीं लोकांना वाटत होतें हें खरें. आणि समारंभाच्या आधीं खाजगी रीतीनें हा प्रश्न निघाला तेव्हां हा वाद यावेळी काढूं नये, त्यानं विषाद उत्पन्न होऊन समारंभाचें स्वारस्य थोडें कमी होईल, असें मीहि आपलें मत दिलें होतें. परंतु अण्णासाहेब नेने यांची कामगिरी या कामी फार मोठी झाली असें टिळकांना वाटत होतें; अच्युतरावांना याच समारंभांत तुम्ही उत्तर दिलें पाहिजे असा वैतागल्याप्रमाणें, अण्णासाहेबांनीं आग्रह धरला होता; आणि खुद्द टिळकहि अखेरच्या दिवसापर्यंत अच्युतरावांचें कुत्सित लिहिणें पाहून बेसुमार रागावले होते, यामुळें त्यांनीं अखेर त्यांना उत्तर देण्याचें निश्चित केलें.

वऱ्हाड-नागपुराकडे कांहीं दुटप्पी वागणारे लोक अच्युतरावांचे स्नेही होते. त्यांनीं याविषयीं बराच कांगावा केला. परंतु टिळकांच्या परिवारांतील बाहेरगांवच्या अनेक प्रमुख लोकांनीं खऱ्या प्रकाराबद्दल केसरीकडे अनेक पत्रें पाठविलीं व तीं सर्व समग्र छापलीं गेलीं. यामुळें या कांगावखोरांचें तोंड बंद झालें. या प्रकारानंतर अच्युतराव कोल्हटकर यांनीं टिळकांवर अपशब्दांचा भडिमार सुरू केला व आपलें ग्राम्य स्वरूप व मनाचा अधमपणा खरा प्रगट केला. परंतु टिळकांनीं आधींच इतकें समर्पक व साधार असें या प्रश्नाचें विवेचन करून ठेवलें होतें कीं, तोंड आहे म्हणून बोलावें व लेखणी आहे म्हणून लिहावें या पलीकडे अच्युतरावांना कांहीं आधार उरला नाहीं. त्यांच्या गुन्ह्याचें समर्थन तर कोणीच केलें नाहीं. पण उलट त्यांनीं पूर्वी राष्ट्रीय पक्षाची सेवा केली व तुरुंगवास सोसला त्या सर्वांचें पुण्य या एका अपकृत्यानें नाहींसें होऊन त्यांचा अधःपात झाला ! टिळकांचें मात्र कांहीं-एक नुकसान त्यांच्यानें करवलें नाहीं.

यानंतर लवकरच टिळक जगन्नाथमहाराज यांच्या मुंबई हायकोर्टातील अखेरच्या दाव्याच्या कामीं गुंतून व गढून गेले. त्यांनीं पांच पन्नास छापिल पानांचें एक पुस्तक लिहून जगन्नाथमहाराजांची कैफियत तयार केली, व तीं बॅरिस्टरला समजावून देण्याकरितां स्वतः मुंबईस जाऊन राहिले. तेथेंच त्यांना

अखेरचा ज्वर आला तो कांहीं केल्या निघाला नाहीं, व ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं त्यांतच त्यांचा अंत झाला. याच्या आधीं पांच सहा दिवस धोंडोपंत विद्वांस यांनीं मला तार करून मुंबईस बोलावलें. कारण त्यांना स्वतःला हें चिन्ह कांहीं ठीक नाही असें वाटूं लागलें होतें. त्याप्रमाणें मी व इतर कांहीं मंडळी पुण्याहून मुंबईस गेलों. तेथें औषधोपचाराला डॉक्टर मित्रांनीं कांहीं एक कमी पडूं दिलें नाहीं. परंतु आयुष्यच भरलें तेथें कोणाचा इलाज चालेना. सुमारें दोन-तीन वर्षांपासूनच टिळकांची प्रकृति खालावत चालली होती. ते विलायतेस गेले ते केवळ मानसिक उत्साहाच्या जोरावर. शरीरांत जोर असा कांहींच राहिला नव्हता. शिवाय परत आल्यावर त्यांनीं फिरून दौरे आरंभिले; व इतर रीतींनें श्रमाचीं अशी अनेक कामें अंगावर घेतलीं. सोलापूर परिषदेच्या आदल्या आठवड्यांत सिंधमधील त्यांच्या भक्तांनीं त्यांना दौऱ्यावर ओढून नेले तो केवळ अविचारच झाला. कारण टिळकांच्या प्रकृतीस उन्हाळा सोसत नसे, व दौऱ्यांत तर त्यांना सिंधमधील प्रखर उन्हाळा रात्रंदिवस भोगावा लागला. सोलापुराकडे येण्याला निघाले तेव्हां वाटेंत दोन दिवस त्यांनी कांहीं खाल्ले नाहीं, तर नुसतें बर्फ व सोडावॉटर पीत पीत आले असें सांगतात! प्रकृतीला न संभाळतां काम करण्याचा टिळकांचा परिपाठ असल्यामुळें त्यांना आला हा खरोखर अपमृत्यूच होता यांत शंका नाहीं. आणि मला तर असे वाटते कीं, सहा वर्षें त्यांना ब्रह्मदेशांत एकांतवास घडला यामुळें चौसष्ट वर्षांपर्यंत तरी ते वांचले. नाहीं तर चार पांच वर्षें आधींच जावयाचे. त्यांना अखेरीला ताप आला तेव्हां शरीर आंतून अगदीं पोखरल्यासारखें झालें होतें. यामुळें डॉक्टर लोकांचा प्रथमपासूनच धीर सुटला होता. तीन दिवस आधींपासून अशी स्थिति झाली होती कीं, त्यांच्या खोलीपासून कोणी बाहेर पडावें तेंच कदाचित् टिळकांच्या जिवंतपणचें त्यांचें अखेरचें दर्शन त्याला घडतें कीं काय अशी भीति वाटें.

मृत्युपूर्वी एक दिवस डॉ. नानासाहेब देशमूख, अण्णासाहेब नेने, व दादासाहेब करंदीकर यांनीं असा विचार केला कीं, टिळकांनीं पूर्वी कोलंग्रो येथें केलेलें मृत्युपत्र शिल्लक होतें तरी, त्यानंतर घडलेल्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन, आणि टिळकांच्या सांपत्तिक स्थितींत पडलेल्या फरकाला अनुसरून, एखादा मृत्युपत्राचा मसुदा करावा. मुंबईस त्या वेळीं टिळकांसंबंधांचीं सर्व माणसें म्हणजे मुलगे मुली जावई वगैरे हजर असल्यामुळें, त्यांपैकीं प्रत्येकाला विचारून मिळेल ती माहिती घ्यावी;

तो सर्व सुसंगत रीतीनें कायदेशीर लिहावी, अशा सर्वसंमत रीतीनें तयार झालेला मसुदा टिळकांना वाचून दाखवावा; व त्यांना तेवढी शक्ति असेल तर त्यांची सही घेऊन साक्षी घालून डॉक्टर मंडळीसमक्ष मृत्युपत्र पुरें करून घ्यावें. त्याप्रमाणें वडील जावई रा. केतकर वकील यांनीं टिपणें केलीं, व दादासाहेब करदीकर यांनीं ती सर्वांना वाचून दाखवून सर्वसम्मत म्हणून त्यावर आपली सहीहि करून ठेवली. परंतु ती टिळकांना वाचून दाखवून सही घेण्याच्या स्थितींत पुनः केव्हांहि टिळक आले नाहींत; व क्षणोक्षणीं आम्हा सर्व मंडळींचें लक्ष इतर व्यवहारांतून निघून आसन्नमरण झालेल्या टिळकांच्याकडे लागून राहिलें.

मरणाच्या रात्रीं आवशी महात्मा गांधी हे एकदां येऊन टिळकांचा समाचार घेऊन गेले; व मरणानंतरहि पुन्हा येऊन कांहीं वेळ बसले होते. आदले दिवशीं मुंबईच्या पोलीस कमिशनरनें, सभ्यपणाच्या रीतीनें, समोरच्या इमारतींतून म्हणजे सरदारगृहांतून आपल्या कचेरींत मला बोलावून नेले, व मोठ्या सहानुभूतीनें टिळकांच्या प्रकृतीविषयीं विचारपूस केली. तेव्हांच, टिळकांचें दहन सोनापुरांत होऊं शकेल कीं काय, किंवा समुद्रकाठीं मोकळ्या जागेवर करावें लागेल की काय, व त्याकरितां अगाऊ कांहीं तजवीज परवानगी वगैरेची व्यवस्था केली पाहिजे कीं काय, असा दूरदर्शी विचारहि त्यांच्या मनांत आला असावा, असें त्यांच्या एक-दोन ओझरत्या वाक्यांवरून मला दिसलें. कारण टिळक जगण्याची आशा नाही हें यावेळी जवळ जवळ सर्वतोमुखीं झालें होतें. पण 'मरणा आधीं सरणांत घालणे' ही म्हण निषेधार्थी सर्वांनाच पटणारी असल्यामुळें, पोलिस कमिशनरला याहून अधिक कांहीं बोलतां आलें नाहीं. टिळकांचें देहावसान झाल्यावर सुमारें पांच तास रात्र शिल्लक होती तरी दुसरे दिवशीं प्रहर दिवसपर्यंत त्यांची स्मशानयात्रा निघूं शकत नाहीं हें निश्चित होतें. यामुळें सरदारगृहांत जमलेली सर्व मंडळी निरनिराळे गट करून ठिकठिकाणीं हलक्या आवाजानें व व उदास मनानें बोलत बसली व ती रात्र त्यांनीं तशीच काढली. याच अवधींत टिळकांच्या अगदीं विश्वासांतल्या दहा-पांच लोकांची वेगळी सभा भरून, पुढें टिळकांचें धोरण चालवून त्यांचें कार्य चालू ठेवण्यासाठीं पंचमंडळहि सभेंत नेमण्यांत आलें असें मला समजलें.

'असें मला समजलें' हे शब्द मी घातले ते अशा करितां कीं त्यापूर्वी मी उठून माझ्या कामाला लागलों होतों; व तें काम म्हटलें म्हणजे दोनच दिवसांनंतर

निघणाऱ्या केसरींत टिळकांसंबंधाचा मृत्युलेख लिहिण्याचे. सोलापूर परिषद संपल्यानंतर लवकरच मी केसरीचें डिक्लेरेशन करून तो फिरून हातीं घेतला होता. अर्थात् टिळकांच्या मृत्युसंबंधीं अग्रलेख लिहिण्याचें दुर्घट काम मजवरच पडणार होतें. आणि टिळकांच्या मृत्युमुळें इतर सर्व गोष्टी विसरून जाण्याइतकें दुःख इतरांप्रमाणें मलाहि झालें होतें तरी, केसरीचा संपादक होण्याची खरी जबाबदारी काय हे साऱ्या जन्मांत त्यावेळीं मला जितकें जाणवलें तितकें एरवी केव्हांहि जाणवलें नव्हतें. आणि म्हणून या जबाबदारीच्या जाणिवेनें त्या दुःखाचाहि मला विसर पाडून कार्यप्रवृत्त केलें. टिळक वारले तो उजाडता रविवार होता. अर्थात् पुढचा केसरी काढण्याला फक्त तो रविवारचा व सोमवारचा दोनच दिवस उरले होते. अशा वेळीं केसरींत टिळकांविषयीं अग्रलेख सामान्य प्रतीचा किंवा अपुरा आला तर माझ्या संपादकत्वाची सगळी अब्रू जाणार, व खरी अडचण लक्षांत न येतां केसरींतील टिळकांवरचा अग्रलेख वाचणारे लोक केसरी प्रसंगाला जागला नाहीं अशी नांवें ठेवणार. अर्थात् नुसता हा आक्षेप टळावा इतकेंच नव्हे, तर टिळकांचा मृत्युलेख मनासारखा वाचण्यास मिळावा अशी जी वाचकांची स्वाभाविक इच्छा ती सफळ व्हावी हें माझें कर्तव्य जाणून, मी आमच्या मंडळींतून उठलों व त्यांना ही माझी अडचण सांगितली. अर्थात् ती तेव्हांच त्यांच्या लक्षांत आली व त्यांनीं मला सांगितलें कीं, यापुढें तुम्ही आपल्या कामाला लागा, इकडे कांहीं एक पाहूं नका. इतकेंच नव्हे, तर तुम्ही सकाळच्या एक्स्प्रेस गाडीनें पुण्यास निघून जा. स्मशानयात्रेकरितां रहाल तर सोमवार सकाळपर्यंत तुम्हाला पुण्यास पोचतां येणार नाहीं, व एथल्या गडबडींत तुमचें कांहींहि लिहून होणार नाहीं असेहि त्यांनीं सांगितलें.

माझा विचारहि तोच होता, व त्याला इतरांकडून ही पुष्टि मिळालेली पाहून मला बरें वाटलें. लगेच डॉ. विष्णुपंत भट, माझे असिस्टंट, जवळच होते त्यांना मी चला म्हटलें, व अगदीं लांबच्या अशा खोलींत जाऊन बसून केसरींत उद्यां काय लिहावयाचें याचें टिपण करून अग्रलेखाचीं चार-दोन पहिलीं पानेंहि भटांना तोंडानें मजकूर सांगून लिहविलीं. आणि सकाळीं गाडीची वेळ होतांच ते कागद घेऊन स्टेशनावर गेलों. परंतु पुण्यास पोचल्यावर कांहीं वेगळाच प्रकार तेथें होऊन राहिला होता; त्यामुळें ताबडतोब घरीं जाऊन पुढील उद्योगास लागण्याचा माझा विचार फुकट गेला. मी मुंबईहून पुण्यास निघालों अशी बातमी पुण्याच्या मित्रमंडळीला

तारेनें कळली होती. त्यामुळें बराच मोठा घोळका जमून त्यांनीं मला पुण स्टेशनावर उतरतांच जवळ रानडे कॉन्ट्रॅक्टर यांच्या काम्पाउंडांत नेलें. तेथें आणखीहि शेंदोनशें मंडळी जमली होती. ते मला म्हणूं लागले कीं, आम्ही पुण्याचे लोक टिळकांची प्रेतयात्रा मुंबईस होऊं देणार नाहीं. त्यांचें शव पुण्यास घरीं आणून तेथून तें समारंभानें ओंकारेश्वरावर नेऊं. याकरितां आमचे कांहीं लोक सकाळच्या गाडीनें मुंबईस रवाना झाले आहेत. पण आमचा हक्क सांगून भांडण्यास तुमच्यासारखा वजनदार माणूस पुणेकरांना कोण लाभणार ? तेव्हां आतां येथून मुंबईस तार करा, प्रेतयात्रा थांबवा, व पुढच्याच गाडीनें परत मुंबईस चला. आम्ही तुम्हाला पुण्यास जाऊं देणार नाहीं. मी परोपरीनें त्यांना सांगून पाहिलें व म्हणालों कीं, "या कामीं मुंबईच्या लाखो लोकांपुढें तुमचें काय व माझें काय—कांहींच चालणार नाहीं. एव्हांना प्रेतयात्रा सरदारगृहांतून बाहेर पडून बऱ्याच अंतरावर गेली सुद्धां असेल. म्हणून मी किंवा तुम्ही यानंतर मुंबईला जाण्यांत कांहींच अर्थ नाहीं. आणि पुण्याहून गेलेल्या लोकांना आपला हक्क चालविता आला असता तर अशी तार तुम्हाला यापूर्वीच आली असती." पण माझें बोलणें कोणीच ऐकून घेईना. रात्रीचें अलोचन जागरण व कष्ट, बारावर दोन वाजून गेले तरी माझें शौचमुखमार्जनहि झालेलें नाहीं, अशा स्थितींत मी या मंडळीशीं बोलतांना अगदीं जेरीस आलों. शेवटीं ज्या विशेष कामाकरितां प्रेतयात्रा टाकून पुण्यास निघून आलों त्याचें महत्त्वहि त्यांना समजावून सांगितलें. परंतु सर्व व्यर्थ ! शेवटीं बेळगांवचे बेळवी वकील मला भेटण्याकरितां स्टेशनावर आले होते, त्यांनीं लोकांची कशी तरी समजूत घातली. पण ती देखील झाली ती त्यांनीं स्वतः मुंबईस जाण्याचें कबूल केल्यावर ! ते व डॉक्टर लोहोकरे यांना जेव्हां मोटारींत बसवून लोकांनीं मुंबईस रवाना केलें तेव्हां मी टांग्यांत बसून घरीं निघालों.

घरीं गेल्यावर आंघोळ करून दोन घास खातों न खातों तोंच श्रमानें मला इतकी झोंप आली कीं, केसरींतील मजकूर लिहिण्याचें विचार तसेच राहून, रात्रीं सातआठ वाजतां झोंप होऊन थोडी विश्रांति मिळल्यावर मी लेख लिहिण्याला सुरुवात केली; व दुसरें दिवशीं सबंध दिवस मजकूर लिहिणें व प्रुफें तपासणें हें काम बैठक न सोडतां रात्रीं दहापर्यंत मी करीत होतों. यामुळें केसरींत दहा कॉलमचा अग्रलेख व दहा कॉलम इतर माहिती वगैरे घालून मंगळवारीं सकाळीं वेळ न चुकता केसरी वाचकांच्या हातांत मला पाठकतां आला. तो वाचल्यावर

जाणते होते त्यांनीं अर्थातच या कामगिरीचें कौतुक केलें. पण " केळकर प्रेत-यात्रा टाकून मुंबईहून पुण्यास गेले " या अर्धवट सत्याचा पुकारा व गवगवा अच्युत-राव कोल्हटकर यांनीं संदेश पत्रांत करून माझी नालस्ती चालविली. मंगळ-वारचा केसरी वाचून त्यांना या टीकेबद्दल मूर्खांत काढणें ही कोणासहि अगदीं साध्या समंजसपणाची गोष्ट होती. पण असमंजस लोक हेच संदेशपत्राचें भांडवल होऊन बसल्यामुळें मजवरचा हा वृथा अपवाद नाहींसा होण्याला कांहीं काळ लागला. या पहिल्या हल्ल्याच्या वेळीं माझ्यावर कोणत्याहि स्वार्थबुद्धीचा आरोप करतां आला नाहीं. फक्त टिळकांविषयीं माझी भक्तिच कमी इतकाच बहाणा करतां आला ! पण पुढें टिळकांच्या मुलांचा व आम्हा ट्रस्टींचा वाद सुरू झाल्यावर, मी पुण्यास धावत आलों तो मृत्युपत्र हस्तगत करून घेण्याकरितां आलों व टिळकांच्या मुलांना लुबाडण्याकरितां आलों, असा एक नवीन आरोप माझ्या शत्रूंना मजवर आणतां आला व तोहि आणल्याशिवाय त्यांनीं सोडलें नाहीं !

टिळकांच्या शवाला पुण्याला आणतां आलें नाहीं ! तरी त्यांच्या अस्थींना समारंभानें आणावें असें अर्थातच ठरलें. आणि कांहीं विशेष उत्साही मंडळींनीं आम्हा कोणाला न विचारतां, पुणें स्टेशनावर जाऊन बोरीबंदरावर तार करून स्पेशल ट्रेन ठरवली. तिच्यांतून टिळकांच्या अस्थि आणण्यांत आल्या; व त्यांच्या शहर प्रवेशाचा फार मोठा समारंभ झाला. पुढें क्रिया-कर्मान्तर सुरू झालें. तें निम्मेशिम्में कसें तरी पार पडलें. पण टिळकांच्या चिरंजीवांनीं आम्हाला अमुक अमुक गोष्टी मुळीच करावयाच्या नाहींत असे सांगितले. तेव्हां उरलेली क्रिया धोंडोपंत विद्वांस यांनीं केली ! टिळकांच्या हयातींत त्यांच्या मुलांचा बाहेर कोणाशीं विशेष संबंध येत नसे. यामुळें त्यांचे स्वभाव कळून आले नव्हते. परंतु या क्रियाकर्मान्तराच्या वेळीं त्यांनीं प्रथमच लोकांना आपल्या स्वभावाची जी परीक्षा जाहीर रीतीनें दिली ती पाहून लोक खरोखरच मनांत दचकले. आम्हाला त्यांच्या स्वभावाचा थोडथोडा परिचय होता. परंतु टिळक वारल्यामुळें आतां त्यांचा आमचा प्रत्यक्ष संबंध येथून पुढें सतत येणार म्हणून आमच्याहि मनांत चिंता वाटण्याला प्रारंभ झाला. पण तेराव्या दिवशीं दुखवट्याचे अहेर झाले तेव्हां, धाकटा मुलगा श्रीधर-बापू यानें अहेर करणारांचे आभार मानून " वडिलांचा लौकिक कायम ठेवण्याचा प्रयत्न करूं" असे सांगितले त्यानें सर्वांनाच बरें वाटलें !

चौदाव्या दिवशीं लोकमान्यांच्या उत्तरक्रियेसंबंधीं सर्व गोष्टी निकालांत निघाल्या. तेव्हां आतां पुढें घरची, व वर्तमानपत्रें छापखाना यांची, काय व्यवस्था करावयाची? याविषयीं उभयतां जावयांनीं, म्हणजे साने व केतकर यांनीं, टिळकांच्या मुलांपाशीं हळूहळू गोष्ट काढली. टिळकांनीं कोलंबो येथें मृत्युपत्र केलें होतें तेंच अखेरचें ही गोष्ट मुलांसुद्धां सर्वांना माहीत होती. अर्थात् त्यांतील कलमांप्रमाणें व्यवस्था व्हावयाची हें सर्वसंमत झाल्यासारखें होतें. कारण तें मृत्युपत्र खोटे आहे, किंवा बेकायदेशीर आहे. किंवा त्यानंतर दुसरें मृत्युपत्र पुरें केल्यामुळें हे पहिलें निरुपयोगी ठरतें, असली कुकल्पना तेव्हां मुलांच्या मनांत आली नव्हती; व ती त्यांच्या मनांत भरविण्याला इतर कोणालाहि तोपर्यंत संधि मिळाली नाहीं. पण सर्वांत सुदैवाची गोष्ट म्हटली म्हणजे हें मृत्युपत्र टिळकांच्या माडीवर खासगी कागदांत राहिलेलें नसून, खालीं केसरी–कचेरीच्या कागदांत, म्हणजे धोंडोपंत विद्वांस यांच्या ताब्यांत राहिलें होतें.

वास्तविक हा अत्यंत खासगी स्वरूपाचा कागद म्हणून तो खुद्द टिळकांच्या टेबलांत रहावयाचा. परंतु टिळक विलायतेस जाण्यापूर्वी एकदां अशी गोष्ट निघाली कीं, "कोलंबो येथील मृत्युपत्र अगदीं घाईनें झालें होतें, म्हणून आतां थोडी सवड काढून स्वस्थपणानें टिळकांनीं स्वदस्तुरचें मृत्युपत्र नवीन लिहावें, व त्यांत सर्व व्यवस्था मनासारखी करून मगच विलायतेस जावें." पण ती गोष्ट टिळकांनीं फारशी मनावर घेतली नाहीं. "तुम्हांला काय मसुदा करावयाचा असेल तो करून मला दाखवा," असें त्यांनीं मला व धोंडोपंतांना सांगितलें, आणि त्याकरितां म्हणून कोलंबोचें मृत्युपत्र धोंडोपंतांच्या स्वाधीन केलें. त्याप्रमाणें आम्ही एक कच्चा मसुदा तयार केला व तो त्यांना दाखविला. तो त्यांनीं वाचला. पण तोहि परत धोंडोपंतांच्या स्वाधीन करून ते म्हणाले "माझ्या पूर्वीच्या मृत्युपत्रांत व या तुमच्या मसुद्यांत फरक म्हणण्यासारखे विशेष नाहींत. सार्वजनिक देणग्या वगैरे तुम्ही सुचविल्या ती गोष्ट नवीन आहे. तथापि पहिल्या मृत्युपत्रांतहि वर्तमानपत्रांचा ट्रस्ट केल्याचें लिहिलेंच आहे. शिवाय विलायतेंत काय काय गोष्टी घडतात व मग आपली सांपत्तिक स्थिति कशी काय होते याचा आज अदमास लागत नाहीं. याकरितां तो लागल्यावर मग वाटल्यास दुसरा कागद करू. तोंपर्यंत हे सर्व कागद असेच तुजजवळ ठेवून दे." त्याप्रमाणें धोंडोपंतांनीं ते आपल्या ऑफिसच्या कागदांत ठेवले. टिळकांच्या गैरहजेरींत

त्यांच्या माडीला बहुधा कुलूप लावून ठेवलेलें असें; व ते नसले म्हणजे त्यांच्या खासगी पत्रांना विशेष कारणाशिवाय कोणी हात लावूं नये अशी टिळकांची इच्छा व धोंडोपंतांचा प्रघात असे.

टिळक विलायतेस गेल्यावर चिरोल केस हरल्यामुळें त्यांची सांपत्तिक स्थिति जशी एकदम खालावली, तशीच पुढें आम्ही पर्सफंड गोळा केल्यामुळें ती उलट एकदम सुधारली! यामुळें टिळकांना चिंतेचें कोणतेंहि कारण राहिलें नव्हतें. टिळक परत आल्यावर कांहीं दिवसांनीं अण्णासाहेब नेने यांनीं टिळकांसंबंधीच्या खासगी व सार्वजनिक पैशांचे सर्व हिशेब तयार केले, व १९२० च्या मे महिन्याच्या २२ व्या तारखेला जाहीर रीतीनें पर्सफंड टिळकांना समर्पण करण्यांत आला. अशा रीतीनें पैशाची निरवानिरव झाली. केसरीचें उत्पन्न वाढत होतें. इतर सर्व कामें जोरांत चालूं होतीं. अर्थात् टिळक विलायतेस निघाले असतां मृत्युपत्र करण्याची जी जरुरी पूर्वी दोन प्रसंगीं वाटली, ती आतां टिळक खुद्द पुण्यांत असल्यावर, व ते आपलीं कामें नेहमीप्रमाणें करूं लागल्यावर, फारशी उरली नाही. कोणी त्यांच्याकडे मृत्युपत्र करण्यासंबंधाची गोष्ट काढणें उघडच अप्रयोजकपणाचें झालें असतें.

इकडे टिळकहि जुनें मृत्युपत्र शिल्लकच आहे, व नवें करण्याची जरुरी किंवा घाई नाहीं, असें समजून चालढकल करीत होते. माझी समजूत अशी कीं, जुन्या मृत्युपत्रानेंहि सर्व निर्वाह होण्यासारखा आहे अशीच बहुधा त्यांची समजूत होती. त्यांतूनहि ते एखाद्या विशेष रोगानें महिना दोन महिने, अंथरुणावर खितपत पडते तर त्यांना नव्या मृत्युपत्राची कल्पना सुचली असती, व पडल्या पडल्या कदाचित् त्यांनीं तें केलेंहि असतें. पण मुंबईस अभावितपणें ते आजारी पडले, व दोन दिवसांतच इतके क्षीण झाले की, शुद्धि असली तरी सर्व मजकूर जुळवून सांगून लांबलचक मृत्युपत्र लिहविण्याइतकी शक्ति त्यांच्यामध्यें राहिली नाही.

आणि कोलंबो येथें मृत्युपत्र लिहिलें गेलें तें तरी किती घाईत! इतकें कीं, कोणाला सांगितलें तरी खरेंहि वाटणार नाहीं. वास्तविक कोलंबो येथें टिळकांचा मुक्काम पांच-सहा दिवस पडला होता. जवळ धोंडोपंत व मी होतों. दिवसांतून अगदींच केव्हां स्वस्थपणा मिळत नव्हता असेंहि नाहीं. तथापि कोणतेंहि काम अगदीं आयत्या वेळीं शेवटच्या घटकेला करण्याची एक प्रकारची संवय टिळकांना

जन्मभर होती. तिचा कित्येक वेळीं अगदीं अतिरेक होई, त्यांतलेंच त्यांच्या मृत्युपत्राचें हें एक उदाहरण होय. मृत्युपत्रासारखा कागद त्यांनीं, पुण्याहून प्रथम विलायतेस प्रयाण करण्यापूर्वीच, स्वस्थपणानें लिहून, सह्या साक्षी घालून, पाकीट-बंद करून, वर आपलें सील करून, बंदोबस्तानें धोंडोपंतांकडे देऊन ठेवावयाचा किंवा रजिस्टर कचेरींत दाखल करून ठेवावयाचा. कारण तो कागद अत्यंत महत्त्वाचा ठरणार हें उघड होतें. परंतु कोलंबोस जाऊन पांच-सहा दिवस झाले, मुक्काम संपला, बोटीच्या धक्क्यावर जाण्याकरितां सामान भरून गाड्यांच्या येरझारा सुरू झाल्या, अशा वेळीं एका खोलींत बसून, बहुधा दारहि न लावून घेतां, धोंडो-पंतांना एक मसुदा त्यांनीं तोंडानें सांगितला. जसा कांहीं तो वर्तमानपत्रांत घालण्याचा मजकूरच होता! त्यांत कांहीं शोध घालावे लागले तेहि त्याच कागदावर घातले. वेगळी स्वच्छ प्रत करण्यासहि त्यांना अवसर सांपडला नाहीं! फक्त मला हांक मारून ते इतकेंच म्हणाले कीं, "अहो, हे पहा मी मृत्युपत्र लिहून ठेवलें. यावर साक्ष घाला." त्याप्रमाणें मी साक्ष घातली; व तो कागद धोंडोपंतांच्या हातीं सही करून देतांच टिळक आंगरखा पागोटें घालण्याच्या तयारीला लागले. केसरीचें व आमचेंहि सुदैव हेंच कीं, अशा घाईत तरी हें मृत्युपत्र लिहून सही साक्ष घालून पुरें झालें. कारण कोणत्याहि कारणानें तें न होतां टिळक तसेच गाडींत बसले असते, तर काय काय परिणाम घडले असते याची कोणालाहि आज कल्पना करतां येईल!

असो. मृत्युपत्राचा हा इतका विस्तृत इतिहास सांगण्याचें कारण इतकेंच कीं, तें धोंडोपंतांच्या हातीं राहिलें म्हणून, टिळकांचें क्रियाकर्मांतर संपल्यानंतर, पुढें काय करावयाचें अशी गोष्ट तरी टिळकांच्या जावयांना काढून मुलाशीं बोलणें चालूं करतां आलें. नाहीं तर बोलण्याला मुद्दाच कांहीं नव्हता; आणि जांवई व मुली आपापल्या घरीं गेल्यानंतर दुसरेच दिवशीं धोंडोपंतांना धोतर झाडून राहत्या घरांतूनच काय पण केसरी ऑफिसांतूनहि बाहेर पडावें लागलें असतें. मला कदाचित् तो प्रसंग त्याच दिवशीं आला नसता. पण तो पुढें फार दिवस टळला नसता. पण मृत्युपत्र होतें म्हणून, धोंडोपंतांना राहतें घर सोडावें लागलें तरी, तेच मृत्यु-पत्राचा अंमल करणारे एक्झिक्युटर असल्यामुळें केसरी ऑफिस सोडावें लागलें नाहीं! आणि त्याच कारणानें टिळकांच्या हयातींत मी जें केसरीचें डिक्लेरेशन करून वर्तमानपत्र ताब्यांत घेतलें तें पुढें माझ्याच ताब्यांत राहिलें.

क्रिया संपल्यानंतर पुढील व्यवस्थेला प्रारंभ कराक्याचा तर कायमची अशी काय तजवीज करावी हा प्रश्न निघाला. त्यावेळीं मुलांची दृष्टि इतकीच होती कीं पत्रें, छापखाना, कारखाना हीं कोणाच्याहि हातीं जावोत. किंबहुना त्यांचा उपद्रव आपणाला नकोच. फक्त मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें कोणती किती मिळकत केव्हां व कशी आपल्या ताब्यांत येईल ? हें दोन तऱ्हांनीं घडून घेण्यासारखें होतें. (१) एक तऱ्हा अशी कीं मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें 'एक्झिक्युटर' धोंडोपंत यांनीं मुलांना निम्मा गायकवाडवाडा, निम्म्या वाड्याचें भाडें, सिंहगडचा बंगला, टिळकांचे सर्व ग्रंथ व त्यांच्या प्रति, पुढील उत्पन्न, विम्याचे पैसे, दाग-दागिने, लातूरची गिरणी, व दर महिना दोनशें रुपये पेन्शन—इतकें द्यावें म्हणजे मुलांचा हक्क संपला. बाकीच्या सर्व मिळकतीची व्यवस्था, व्यवस्थापक या नात्यानें, धोंडोपंतांनीं करावी. (२) याचाच दुसरा प्रकार असा कीं, बाकी सर्व मिळकत मुलांना द्यावयाची ती वर लिहिल्याप्रमाणेंच द्यावी, पण दोनशें रुपये पेन्शनच्या पोटीं जगन्नाथ महाराज यांजकडे येणें निघत असलेली टिळकांची सर्व रक्कम मुलांना द्यावी, म्हणजे मग पेन्शनचा संबंध उरला नाहीं.

पहिल्या प्रकारानें मुलांनीं आपला हक्क बजावला असता तर त्यांच्या हातीं एकदम एक गट अशी रक्कम थोडी आली असती, व दरमहा वाड्याचें भाडें व दोनशें रुपये असे घेऊन निर्वाह करावा लागला असता. ही रक्कम, विम्याचे पैसे, गीतारहस्याचे पैसे, व प्रत्येकीं रोख मिळणारे पंधरा हजार या सर्वांवरील व्याज, आणि शिवाय राहण्याला बिनखर्ची वाडा, एवढ्यावर, पण येवढ्यावरच, त्यांना निर्वाह करावा लागला असता. आणि एवढ्यांत निर्वाह उत्तम रीतीनें झालाहि असता. कारण घरीं कुटुंब अवघ्या तीन-चार माणसांचें. अजून मुलांचा परिवार नाहीं. फुकट पोसण्याचे लोकहि पदरीं कोणी नाहींत. अशा स्थितींत आपापला शिक्षणाचा क्रम पुरा करून, ज्याला लिहिण्याची हौस तो केसरी-मराठा पत्राच्या संपादकीय खात्याकडे, व ज्याला तें अनुकूल नाहीं त्यानें छापखान्यांच्या कारखान्यांकडे, स्वतःला जोडून घेतले असते तर केसरी ट्रस्टकडूनहि दरमहा वेगळे शें-दोनशें रुपये तरी पगार मिळण्यास कांहींच हरकत नव्हती. वर्तमान-पत्रांचें कारखान्याचें काम ते करू म्हणते तर आम्हीं त्यांना किती तरी हौसेनें सामील करून घेतलें असतें ! व यानंतर क्रमाक्रमानें ते सार्वजनिक कार्यांत पडले असते, तर त्यांना वडिलांच्या कीर्तीची बैठक एवढी मोठी लाभली होती कीं,

त्यांनीं मूठभर कार्य केलें तर पुरुषभर लौकिक त्यांचा झाला असता. पण त्यांना मनांतूनच केसरी-मराठा पत्रांशीं, छापखान्याशीं, संबंध ठेवावयाचा नव्हता. अखेरच्या दिवसांत केव्हां केव्हां टिळक त्यांना म्हणत कीं, "तुम्हाला वर्तमानपत्राच्या कामांत पडावयाचें असेल तर आतांपासून तिकडे लक्ष ठेवा. सत्तेचीं एवढीं लौकिकवान वर्तमानपत्रें व द्रव्यसंपन्न कारखाना कोणाला सहसा मिळत नाहीं." पण मुलांनीं त्यांना उत्तर द्यावें कीं, "आम्हाला केसरी नको. आम्हाला त्या छापखान्याच्या भानगडींत पडण्याची इच्छा नाहीं," आणि क्वचित् थट्टेनेंहि म्हणत कीं, "आम्हाला तुमच्यासारखे लोकमान्य व्हावयाचें नाहीं!" या बोलण्यांत थोडीशी खोंचहि होती. कारण धाकटा मुलगा श्रीधर बापू याचीं मतें सर्वस्वी अत्यंत पुढारलेल्या सुधारकासारखीं होतीं, व थोरल्याची मजल तर कोणाहि विद्यमान सुधारकाला गांठतां आली नसती. म्हणून दोघांच्याहि म्हणण्याचा अर्थ असा होता कीं "पुराणमतवादी सामाजिक मतें प्रतिपादल्यामुळें तुम्हाला लोकमान्यता मिळाली. पण त्या पदवीपेक्षां आम्हाला आमच्या सुधारणावादी उदार मतस्वातंत्र्याची किंमत अधिक वाटते." तात्पर्य, उभयतां मुलांचा मार्ग वडिलांहून अनेक दृष्टींनीं अगदीं भिन्न असल्यामुळें, वर्तमानपत्रें व छापखाना संभाळणें व चालविणें ही एक उपाधि किंवा नसती ब्याद असे त्यांना मनापासून वाटे. आणि हीं वर्तमानपत्रें परस्पर केळकर घोंडोपंत हे किंवा इतर कोणी संभाळोत, आपण वडिलांच्या मृत्युपत्राप्रमाणें मिळणारी मिळकत घ्यावी, व मनाप्रमाणें स्वतंत्रपणें वागण्यास मोकळें व्हावें! या मोकळेपणांत चालूं शिक्षणक्रम सोडून देण्याचाहि समावेश त्यांच्या मनानें केला होता.

सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, पहिल्या प्रकारानें मृत्युपत्रांतील हक्क बजावून केसरी ट्रस्टचे पेन्शनर होऊन रहाण्यापेक्षां दुसऱ्या प्रकारानें मिळणारी मोठी रक्कम एकदम स्वाधीन करून घ्यावी, हें मुलांना मनांतून अधिक पसंत पडलें. एक्झिक्युटर घोंडोपंत यांना यांतील कोणताहि प्रकार मान्यच होण्यासारखा होता. किंबहुना मुलें जी वांटणी उचलतील ती त्यांना देण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पण त्यांतल्या त्यांत मुलांनीं दुसरा प्रकार पसंत करण्यांत घोंडोपंतांची एक विशेष सोय अशी होती कीं, टिळकांचें मानसपुत्र मानलेल्या जगन्नाथ महाराजांच्या मागें लागून त्यांजकडील रक्कम वसूल करण्याचा जो अत्यंत दुःखदायक वाईटपणा

धोंडोपंतांवर यावयाचा, तो आयताच टळत होता ! मुलांनीं जगन्नाथमहाराजांचें कर्ज आपणाकडे लावून घ्यावें व जगन्नाथमहाराजांनीं तें त्यांना द्यावें, असें ठरल्यास, एक्झिक्युटरच्या जबाबदारीचा एक मोठा व्यवहार परस्पर उलगडून धोंडोपंतांचें काम आयतेंच हलकें होणार होतें.

अशा रीतीनें उभयपक्षीं एकच योजना मान्य झाल्यानें मृत्युपत्रांतील इतर बाबी उलगडणें ओघानें पुढें आलें. त्यांतील मुख्य बाब केसरी व मराठा यांचा ट्रस्ट करण्याची. वास्तविक टिळकांनीं मृत्युपत्रांत याविषयीं स्पष्ट उल्लेख केलेला असल्यामुळें स्वतः मृत्युपत्रालाच ट्रस्टडीडचें स्वरूप होतें. तो Testamentary Trust असा आपोआपच ठरत होता. वेगळें ट्रस्टडीड न केलें तरी चाललें असतें. पण एक पक्षीं असा विचार वाटला कीं, मुलांनीं ट्रस्टडीड करून दिलें म्हणजे मृत्युपत्राची अंमलबजावणी करण्यांत मुलें व धोंडोपंत यांच्यामध्यें कांहीं एक वांधाच उरणार नाहीं. दुसरें पक्षीं, म्हणजे मुलांच्या बाजूनें, त्यांनीं ट्रस्टडीड करून देणें हें मृत्युपत्रांतील कलमांचाच पुनरुच्चार करण्यासारखें असलें तरी, "आम्ही ट्रस्टडीड करून दिलें, आम्ही वडिलांच्या मृत्युपत्रांतील आज्ञा मान्य केली व पाळली" असें भूषण त्यांना सहजच वाटण्यासारखें होतें. यामुळें उभयतां जावयांनीं या ट्रस्टडीडची कल्पना पुढें मांडली. ती त्यांना पसंत पडली तर उत्तमच, नाहींतर धोंडोपंतांनीं कोर्टांत अर्ज करून प्रोबेट आणि लेटर्स ऑफ् ॲडमिनिस्ट्रेशन काढण्याचा मार्ग मोकळाच होता.

ट्रस्टडीडच्या कल्पनेचा विचार मुलांनीं एक-दोन दिवस केला. त्याचे मसुदेहि जावई केतकर वकील यांच्या सल्ल्यानें झाले. त्यांत खोडाखोडी फेरफार झाले. फिरून नवे मसुदे झाले. या गोष्टी परस्पर त्यांच्या त्यांच्यांत म्हणजे मेहुण्या मेहुण्यांत होऊनहि कांहीं जम बसेना असें जेव्हां पाहिलें, तेव्हां मी उघडपणें म्हणालों कीं, "ट्रस्टडीड होत नसेल तर राहो. आमच्या ताब्यांत मृत्युपत्र आहे तें आम्ही आजच्या आज कोर्टांत नेऊन गुदरतों; आणि एक्झिक्युटर या नात्यानें धोंडोपंतांकडून प्रोबेटचा अर्ज करावितों. यांत येऊन जाऊन खर्च बराचसा लागेल, कांहीं कालावधि होईल, जाहीर नोटिसा लागतील. तात्पर्य, ट्रस्टडीडनें टळण्यासारख्या अनेक अनिष्ट गोष्टी न टळतील, पण मग त्याला काय इलाज ?"

यापूर्वी मुलांनीं मृत्युपत्र अनेक वेळां वाचून पाहिलें होतें. तें खरें व कायदेशीर असल्याची त्यांची मनानें खात्री होती. तें नाकबूल करणें किंवा खोटें म्हणणें हें मुळींच न साधण्यासारखें धाडस होतें, हें त्यांचें मनच त्यांना सांगत होतें. अशा स्थितींत एक्झिक्युटर यांना कोर्टांत प्रोबेट मागण्यास व खर्च करण्यास भाग पाडण्यापासून आपलें हित असें कांहींच साधण्यासारखें नाहीं हेंहि त्यांना दिसत होतें. म्हणून प्रोबेट घेण्याचा आमचा निश्चय पाहतांच ट्रस्टडीडला संमति देण्याचें त्यांनीं अखेर ठरविलें. मनांतला हेतु हा की, हे करतांनाच "जें कांही अधिकउणें मिळण्यासारखें असेल तें साधून घेऊं:" व त्याप्रमाणें त्यांनीं घेतलेंहि. कारण मृत्युपत्रांत केसरीकडे असलेल्या अर्ध्या वाड्याचें भाडें पाऊणशें घ्यावें असें लिहिलें असतां मुलांनीं शंभर रुपये भाडें असावें असें सांगितलें व आम्हींहि तें मान्य केलें. नंतर गोपाळराव पटवर्धन वकील यांचा सल्ला घेतां असें ठरलें की, वारस म्हणून दोघे मुलगे व एक्झिक्युटर म्हणून धोंडोपंत विद्वांस या तिघांनीं मिळूनच ट्रस्टडीड करून घ्यावें.

यानंतर प्रश्न निघाला तो ट्रस्टी कोण असावे या संबंधाचा. तेव्हां मी व धोंडोपंत यांचीं नांवें मुलांना ओघानेच सुचण्यासारखीं होतीं. मी पंचवीस वर्षें केसरी-मराठा पत्रांच्या संपादकमंडळावर होतों, टिळकांचा पोलिटिकल सेक्रेटरी होतों, व सर्व तऱ्हेनें त्यांच्या मदतनीसांतील मुख्य होतों ही गोष्ट मुलांना माहीत होती. टिळकांशी माझें व्यक्तिशः संबंध कसे विश्वासाचे व आपलेपणाचे होते हेहि मुलगे रोज पहात. ज्युबिलीफंड, पर्सफंड वगैरे उभारण्यांत माझा पुढाकार कसा होता हेंहि त्यांना अवगत होतें. शिवाय टिळकांच्या मृत्युपत्रावर साक्ष एकट्या माझी; व त्याच मृत्युपत्रांत तंटेबखेडे व वाद कोर्टांत न नेतां तोडण्यासाठीं दोघां जावयांबरोबर, किंबहुना त्यांच्याहूनहि अग्रेसर मान देऊन, टिळकांनीं मलाच पंच किंवा आर्बिट्रेटर नेमलेलें. अशी स्थिति असतां ट्रस्टी नेमावयाचे तर पहिला ट्रस्टी मला नेमल्याशिवाय दुसरी कोणची गोष्ट मुलें करूं शकतील ? किंवा त्यांच्या मनांत तरी येईल ? न्यायाच्या दृष्टीनें मुलांसंबंधीं बोलावयाचें तर मी हेंहि प्रांजलपणें सांगतों कीं, यावेळीं म्हणजे ट्रस्टडीड करण्याच्या वेळीं, मुलांच्या मनांत माझ्याविषयीं पूर्णपणें आदरबुद्धि वसत होती; व टिळकानंतर विश्वास टाकण्याला माझ्यापेक्षां अधिक योग्य असा मनुष्य त्यांना दुसरा कोणी आहे असें वाटत नव्हतें.

दुसरे ट्रस्टी धोंडोपंत असावेत हेंहि तितकेंच क्रमप्राप्त होतें. कारण ते एक्झिक्युटर तर होतेच. पण माझ्याप्रमाणें वर्तमानपत्राशीं व छापखान्याशीं त्यांचाहि संबंध अखंड पंचवीस वर्षांचा होता. कारखान्यांतील एकहि पान त्यांच्याशिवाय हलत नव्हतें, इतकेंच नव्हें तर टिळकांनीं खासगी व सार्वजनिक कार्यांतील पैशा-अडक्याची सर्व जबाबदारी विश्वासानें धोंडोपंतांवरच जन्मभर टाकलेली होती. दोघांबरोबर हा तिसरा मुलगा मानून, देणगीदाखल धोंडोपंतांना एका रकमेनें दहा हजार रुपये द्यावेत असें मृत्युपत्रांत लिहिलें होतें, व पुढील व्यवस्थेंत ती रक्कम पंधरा हजार केली होती. याहूनहि निर्णायक गोष्ट म्हटली म्हणजे धोंडोपंतांकडे केसरीच्या व्यवस्थापकाचा कारभार त्यांच्या जन्मभर ठेवावा व त्यांना एडिटर-इतका पगार द्यावा अशीं स्पष्ट कलमें मृत्युपत्रांत होतीं. तात्पर्य, संपादकीय शाखेकडे काम करणारा एक व मुख्य ट्रस्टी मी, आणि छापखान्याकडील व खालच्या कचेरींतील सर्व व्यवस्था पहाणारा दुसरा ट्रस्टी धोंडोपंत, या नेमणुका अगदीं क्रमप्राप्त असून उभयता मुलगे, उभयता जावई व टिळकांच्या तिघीहि जाणत्या मुली या सर्वांना एकमतानें मान्य होत्या.

नंतर प्रश्न निघाला कीं, ट्रस्टी दोन असावे कीं अधिक ? तेव्हां मी होऊन सुचविलें कीं, रा. कृष्णाजीपंत खाडिलकर यांनींहि केसरीची सेवा पुष्कळ दिवस केलेली आहे. तेव्हां आमच्या जोडीला त्यांनाहि तिसरे ट्रस्टी नेमा. परंतु कारण काय असेल ते असो, खाडिलकर हे तिसरे ट्रस्टी नसावेत असें मुलांचें आग्रहाचें म्हणणें पडलें. दोघा जावयांपैकीं एकाचें मत तसेंच होतें, व दुसरा त्याविषयीं उदासीन होता. म्हणून या गोष्टीचा निर्णय करण्याचें काम जावई डॉ. साने यांजकडे सोपविण्यांत आलें. याप्रमाणें त्यांनीं खाडिलकर यांच्याकडे जाऊन तिसरे ट्रस्टी होण्याला तुम्ही कबूल आहां काय ! असें विचारलेहि. परंतु योग असाच होता कीं, मुलांनीं एका कारणाकरितां तर खाडिलकरांनीं दुसऱ्या कारणाकरितां नकार दिला; व ही पडत्या फळाची आज्ञा घेऊन मुलांनीं व जावयांनीं दोनच ट्रस्टी असावेत, आणि ते मी व धोंडोपंत असावे, असें निश्चित केलें. आणि त्याप्रमाणें अखेर आम्हा उभयतांच्या नांवें ट्रस्टडीड करण्यांत आलें.

हें ट्रस्टडीड व इतर एक-दोन कागद व्हावयाचे होते, ते तयार करण्यांत आम्ही बाहेरच्या कोणा वकिलाची मदत घेतली नाहीं. केतकर व मी यांनीं, आम्हाला

कायद्याचें ज्ञान असल्यामुळें, मुलांच्या संमतीनें व त्यांच्या सर्व सूचना समाविष्ट करून, सर्वसंमत असे पक्के मसुदे तयार केले; व आम्ही जो हा कामाचा उरक दाखविला तो आमचा आम्हाला उपयोगी पडला. कारण डॉ. साने व केतकर वकील यांना पुण्यास अधिक दिवस रहातां येत नव्हते; व ही संधि जर कां गेली असती तर मुलें, मुली, जावई, इतकी सर्व मंडळी पुन्हा एकत्र जमून सर्वसंमत रीतिनें टिळकांच्या उत्तरकालीन व्यवहाराची व्यवस्था समाधानकारक लागणें कठिण झालें असतें. आणि या दरम्यान माधवराव बोडसासारखे कोणी सल्लागार त्यांना मिळाले असते तर ट्रस्टसंबंधीं जो वाद पुढें पांच सहा वर्षांनीं अखेर निघाला, पण पूर्वीच्या कागदाचा पक्केपणा होता म्हणून आम्हाला बाधला नाहीं, तो वाद प्रारंभींच निघावयाचा, व कदाचित कागदच न व्हावयाचे !

असो; हे सर्व कागद तयार झाल्यावर दुसरें दिवशीं आम्ही सर्वजण मिळून राजिस्टर कचेरींत गेलों. तेथें प्रथम मृत्युपत्र नोंदविण्यांत आलें. तें मुलांनींच हजर केलें. "हेंच शेवटचें मृत्युपत्र असून आम्ही तें नोंदविण्याकरितां हजर करितों" असें लिहून दिलें. मृत्युपत्रावरील साक्षीदार या नात्यानें माझी, टिळकांचें हस्ताक्षर ओळखण्यासंबंधानें अनंतराव फडणीसांची, व आणखी एका दोघांच्या अशा जबान्या घेतल्यावर मृत्युपत्र नोंदण्यांत आलें. त्यानंतर ट्रस्ट-डीडचा कागद नोंदण्यांत आला. आणि अशा रीतीनें हा महत्त्वाचा पण भानगडीचा प्रश्न सुटला !

पुढें लवकरच जगन्नाथमहाराज यांच्याकडून येणें असलेलें कर्ज मुलांनीं एकरकमेनें वसूल केलें. विम्याचे पैसे त्यांचे त्यांना देण्यांत आले. घरांतील सर्व चीजवस्तु घरांतच होती; व उत्तरकार्यानंतर पांच चार दिवसांतच धोंडोपंत विद्वांस हे, स्वतःकरितां कांहीं एक सामान न घेतां, कुटुंब व मुलें यांसह बाहेर पडले व त्यांनीं वेगळें बिऱ्हाड केलें. यामुळें सर्व वाड्याची वहिवाट मुलांना स्वतंत्र-पणानें हवीतशी करतां येऊं लागली. मृत्युपत्रांत लिहिलेल्या कलमांची अंमल-बजावणी, माझ्या सल्ल्यानें, धोंडोपंतांनीं एक्झिक्युटर या नात्यानें हळुहळू सर्व केली. गीतारहस्य वगैरे ग्रंथांची पुस्तकें मुलांच्या स्वाधीन करून हिशोबाचे सर्व पैसे चुकते केले. जुनीं देणीं सर्व देऊन टाकलीं. त्यांची तोशीस मुलांना कांहीं ठेवली नाहीं. टिळकांच्या और्ध्वदेहिकाचा व प्रयागास अस्थि नेऊन गंगेंत टाकण्या-

पर्यंतचा सर्व खर्च एक्झिक्युटर यांनीं केला. पुढें एक वर्षानें, वाडा-रिपेरी वगैरे कामाकरितां म्हणून व इतर कांहीं कलमें दाखवून, मुलांनीं मृत्युपत्रांतील पंचांकडे फिर्याद करून वेगळे पांच सहा हजार रुपये मागून घेतले; व एवढी रक्कम देण्याचें कारण नाहीं असें माझें स्वतःचें मत होतें तरी "पंचांचा लवाद-निवाडा एकमतानें व्हावा व मुलांचाहि संतोष व्हावा" म्हणून मी त्यास संमति दिली. बुडीत कर्जे कांहीं होती तीं एक्झिक्युटर यांनीं सोसली, व तरती कुळें होतीं ती मुलांनीं आपल्याकडे लावून घेतलीं. पुढें छापखान्याकडील जाग्याच्या भाडेचिठ्ठीचे कागद-हि झाले. तात्पर्य अशा रीतीनें पैशाअडक्याबाबदचे हितसंबंध मुलांचे व केसरी ट्रस्टचे जितके सोडवून वेगळे करतां आले तितके आम्ही केले. मुलांकडून कुल बेदावे पत्र रजिस्टर करून घेतले. आणि प्रथम कांहीं दिवस तरी टिळकांचे मुलगे व ट्रस्टी यांचे संबंध अगदीं सलोख्याचे नसले तरी शांततेचे होते.

पण पुढें हळुहळू मुलांची दृष्टि फिरली. केसरी ही उत्पन्नाची मोठी बाब असतां ट्रस्टडीड करून दिल्यानें आपल्या हातून ती गेली असें त्यांना वाटूं लागले. वास्तविक त्यांनीं ट्रस्टडीड न केलें असतें तरी परिणाम तोच झाला असता. कारण केसरीसह सर्व मिळकत ही टिळकांची स्वसंपादित होती म्हणून तिची वाटेल तशी व्यवस्था मृत्युपत्रानें करण्याचा त्यांना अधिकार होता; व मृत्यूपत्रांत एक्झिक्युटर म्हणून काम करण्याचा पहिला मान धोंडोपंत यांना टिळकांनी लिहून दिला असल्यामुळें ते स्वयंभच ट्रस्टी होते. येऊन जाऊन मी ट्रस्टी झालों नसतों इतकेंच काय तें. परंतु लवादनाम्याकरितां मुख्य पंच म्हणून मृत्युपत्रानें मला अधिकार दिला होता. आणि केसरीचा संपादक मी पूर्वीपासून होतों तो तसाच पुढेहि सहजच राहिलों असतों. धोंडोपंत, एक्झिक्युटर या नात्यानें, मला काढून दुसऱ्या कोणाला संपादक नेमतील हे सर्वस्वी असंभाव्य होतें. माझ्यावर त्यांचा पहिल्या-पासून विश्वास. १९०९ सालीं मी केसरीचा संपादक नव्हतों तेव्हां त्यांनींच मला संस्थेंतून जाऊं दिलें नाहीं. आग्रहानें धरून ठेवलें. आणि टिळकांच्या गैरहजेरींत ते सर्वस्वी माझाच सल्ला घेऊन आपलें काम करीत. मी होतों म्हणून केसरी टिकला ही त्यांची तरी बालंबाल खात्री व दृढभावना! ते स्वतः जरी लेखक नसले तरी, वाचक या नात्यानें व बाहेर लोक बोलत त्यावरून, माझ्या हातून केसरी जाणें व दुसऱ्या कोणाच्या हातीं देणें यासारखी दुसरी आपत्ति केसरीवर नाहीं असें त्यांच्या मनानें घेतलेलें. आम्ही दोघेहि ट्रस्टडीडमुळें सारख्या अधिकाराचे ट्रस्टी असलों

तरी हिशेबाचें खातें, वसुलीचें खातें, जाहिरातीचें खातें, व केसरी छापून त्याचा बटवडा करण्याचें खातें, हीं कामें जरी व्यवस्थापक ट्रस्टी या नात्यानें त्यांच्या जबाबदारीनें चालत तरी महत्त्वाच्या अशा कोणत्याहि कामांत ते माझा सल्ला घेत. इतकेंच नव्हे तर मी करीन ते प्रमाण अशा बुद्धीनें वागत.

तात्पर्य, मुलांनी ट्रस्टडीड केल्यानेंच ट्रस्टी म्हणून कायदेशीर अधिष्ठान मला मिळालें असें जरी दिसत असलें तथापि, तें झालें नसतें तरी संपादक व मुख्य सल्लागार या नात्यानें, कारखान्याची वर्तमानपत्राची सर्व व्यवस्था मजकडेच व्यवहाराच्या दृष्टीनें राहिली असती. ट्रस्टडीड होऊन ट्रस्टी या नात्यानें काम करण्यांत मला कायदेशीर आधार व प्रतिष्ठा मिळाली यांत शंका नाहीं. पण मुलांनीं मला ट्रस्टी नेमला तो नेमण्याशिवाय त्यांनाहि गत्यंतर नव्हतें. कसेंहि असलें तरी माझा काय किंवा धोंडोपंतांचा काय खरा आधार म्हणजे मृत्युपत्र हाच होता. म्हणून जर का हें कोलंबोचें मृत्युपत्र, दुसरें करावयाचें म्हणून, टिळकांनी फाडून टाकलें असतें, किंवा पूर्वी सांगितल्याप्रमाणें तें धोंडोपंताजवळ न रहातां मुलांच्या हातांत परस्पर गेलें असतें, किंवा मृत्युपत्र आमच्या ताब्यांत असून किंवा रजिस्टर होऊनहि, धोंडोपंत हयात न राहिल्यानें, एक्झिक्युटरचें काम मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें रामभाऊ टिळक यांच्या हातीं गेलें असतें तर मात्र मला बहुधा पहिल्या वर्षांतच केसरी सोडून जावें लागलें असतें. इतकेंच नव्हे तर, पुढें अनुभव आला त्यावरून पहातां, केसरीहि आहे त्या स्थितींत उरला नसता. कदाचित् अच्युतराव कोल्हटकरांसारखा एकादा डोळे दिपविणारा लेखक, किंवा एखादा ब्राह्मणद्वेष्टा ब्राह्मणेतर, किंवा एकांतिक मतें प्रतिपादन करणारा सुधारक, किंवा अस्पृश्योद्धारक, किंवा समाजद्वेष्टा लेखक संपादक झाला असता. केसरीची लोकप्रियता सर्व नाहींशी झाली असती. वर्गणीचें व जाहिरातीचें उत्पन्न संपुष्टांत आलें असतें. तात्पर्य, आजचा केसरी, त्याचा परिवार, प्रतिष्ठेचें त्याचें स्थान, हीं सर्व नष्ट होऊन आम्ही मागें केसरीची जी ज्युबिली केली तशी करण्याची पाळी आली नसती. एक तरी मृत्युपत्र, शिळक व आमच्या हातीं राहिल्यानें, आणि धोंडोपंतांना आज टिळकानंतर इतकीं वर्षें आयुष्य लाभल्यानें, ज्या गोष्टी घडल्या आहेत व तदभावी ज्या काय गोष्टी घडल्या असत्या असें सहज अनुमान करतां येतें त्यांतील जमीन-अस्मानाची तफावत पाहिली म्हणजे, मनुष्याला दैववादी झाल्याशिवाय खरोखर गत्यंतर रहात नाहीं.

प्रत्यक्ष व्यवहारांत मी उद्योगवादी असलों तरी स्वतः माझ्याच आयुष्यांत अशा कांहीं गोष्टी अकल्पित रीतीनें घडलेल्या आहेत कीं, मी आज आहे तो माझ्या उद्योगवादामुळें नसून माझ्या सुदैवामुळें आहे अशी स्पष्ट कबुली देण्याला मला कांहींच संकोच किंवा कमीपणा वाटत नाहीं. १८९६ सालीं मी पुण्यास येणें, पुढें इतक्या दंगलींत व बिकट परिस्थितींत केसरीचा व माझा संबंध टिकून रहाणें, स्वतः केसरीच अनेक गंडांतरांतून जगणें-वांचणें, १९१० सालीं तो माझ्या हातीं घेण्याचा माझा आग्रह खाडिलकरांनीं पड खाल्ल्यानें तडीस जाणें, कोलंबोच्या धांदलींत टिळकांच्या हातून मृत्युपत्र लिहून होणें व तें आमच्या ताब्यांत शाबूत राहिल्यामुळें त्याच्या जोरावर मुलांकडून ट्रस्टडीड करविणें, हे इतके निरनिराळे सांधे किंवा खटके होते कीं, कोणाहि जबरदस्त उद्योगवादी मनुष्यानें "या गोष्टी मला आपल्या उद्योगानें स्वाधीन करितां आल्या असत्या व गाडी या रुळावरची त्या रुळावर जाऊं देण्याचें हटकून टाळतां आलें असतें" असें म्हणणें ही धाडसाची कमालच होईल. निदान तसलें धाडस मी तरी करूं शकत नाहीं.

एका दृष्टीनें पाहिलें असतां टिळकांनीं सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन मृत्युपत्रापर्यंत वाट न पहातां, स्वतः होऊनच त्यांना हवें तसें व्यवस्थित ट्रस्टडीड करून ठेवावयास पाहिजे होते. केसरीचा ट्रस्ट करण्याची कल्पना त्यांची फार पूर्वीपासूनची होती. आणि ट्रस्टडीड करून ठेवून, त्यांत स्वतःला आपल्या मृत्यूपर्यंत सर्वाधिकारी एकटा एक ट्रस्टी नेमून घेऊन, त्यांतच आपल्या मागें ट्रस्टची व्यवस्था कशी व्हावी हें त्यांनीं लिहून ठेवलें असतें तर कांहींच भानगड उरत नव्हती. संपादकीय खात्याकडे मी व खाडिलकर दोघेहि किंवा खाडिलकर न राहिल्यास मी हाच मुख्य संपादक रहाणार, व धोंडोपंत हेच तहाहयात व्यवस्थापक रहाणार, हीच गोष्ट टिळकांना इष्ट व अपेक्षित होती. पण आपल्या मृत्यूनंतर मृत्युपत्र किंवा ट्रस्टडीड नसेल तर मुलगे वारस होणार, केसरी-मराठा पत्रें व छापखाना ही त्यांच्या खासगी मालकीची होणार, आणि ती त्यांच्या हातीं गेली म्हणजे केळकर, खाडिलकर, धोंडोपंत यांपैकीं कोणीहि जागेवर रहाणार नाहीं—फार काय पण केसरीहि कदाचित् जागेवर रहाणार नाहीं—ही गोष्ट त्यांना सहज समजण्यासारखी नव्हती असे कोण म्हणेल? असे असतां टिळकांनीं स्वतः ट्रस्टडीड तर करून ठेवलेंच नाहीं, पण मृत्युपत्राचीहि चालढकल अगदीं अखेरपर्यंत कशी केली हें पूर्वी सांगितलेंच आहे.

मला असें आठवतें कीं, रावबहादूर माधवराव रानडे यांनीं आपलें मृत्युपत्र केलें त्यांत दत्तक घेण्याची परवानगी कुटुंबाला दिली. पुढें त्यांच्या मरणोत्तर त्यांचें कुटुंब कै. रमाबाई रानडे यांनीं आपला पुतण्या दत्तक घेतल्यावर माय-मुलांत बेबनाव झाला, व सर्व प्रकरण हायकोर्टापर्यंत गेलें. या गोष्टीला अनुलक्षून टिळक रानड्यांना हंसत. दत्तकाची कल्पना टिळकांना पसंत नव्हती, व रानडे एवढे सुधारक असतां एखाद्या जुन्या चालीच्या हिंदूप्रमाणें त्यांनीं मृत्युपत्र करून व दत्तक मुलाविषयीं इच्छा प्रगट करून, शेवटीं कुटुंबाला संकटांत घातलें याला अनुलक्षून ते म्हणत कीं, "रानड्यांचें मृत्युपत्र हें अस्सल हिंदूचें मृत्युपत्र होय." पण पुढें टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांनीं जे वाद केले ते वाद, स्वतः टिळकांनींच जिवंतपणीं ट्रस्टडीड करून ठेवलें असतें तर, टळले असते. ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांनाहि 'हिंदु' म्हणून कोणी नांवें ठेवलीं असतीं तर त्याला, परिणामावरून पहातां, थोडाबहुत आधार सांपडता! ट्रस्टडीड नाहीं तर नाहीं पण निदान मृत्युपत्र तरी याहून अधिक व्यवस्थित करून, म्हणजे "मी केसरीचा पब्लिक ट्रस्ट केला आहे" एवढेंच न लिहितां "ट्रस्टींचीं नांवें, त्यांची परंपरा रहाण्याचा कायदेशीर मार्ग, व एकंदरीनें ट्रस्टच्या व्यवस्थेची योजना" ही त्यांनीं सविस्तर लिहून ठेवली असती तर फार चांगलें झालें असतें. कारण धोंडोपंतांच्या मागें या पब्लिक ट्रस्टचा ट्रस्टी आपल्या वारसापैकींच कोणी तरी होणार ही अनिष्ट गोष्ट ढळढळीत दिसत असल्यामुळें तिचा कायदेशीर परिहार त्यांनीं अगाऊ करून ठेवला असता. मी काय, खाडिलकर काय, किंवा इतर कोणी काय, केसरीचा संपादक नेमावयाचा तो व्यवस्थापक धोंडोपंत किंवा वारस मुलगे यांनीं नेमावयाचा! त्यांनींच त्यांचा पगार वगैरे ठरवून बहाली बडतर्फी करावयाची! ही गोष्ट अगदींच अप्रयोजकपणाची होणार हे टिळकांच्यापुढें कोणी मांडलें असतें तर त्यांनीं ते केव्हांच कबूलहि केलें असतें. पण अशा कामांत तिऱ्हाइतानें बोलणें उघडच अशक्य. यामुळें पुढची सर्व कल्पना स्वतः करून त्याची तजवीज स्वतः त्यांनींच करावयास पाहिजे होती. आणि हें तरी म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, आपलीं मुलें कोणत्या मताचीं आहेत हें त्यांना पुरतें माहीत होतें. शिवाय मुलांना कांहीं तरी मर्यादित उत्पन्न येण्याइतकीच रक्कम द्यावी, आणि केसरी मराठा पत्रें व छापखाना ही सार्वजनिक अशी समजून त्यावर आपल्या वारसांचा या ठराविक रकमेपलीकडे कोणताहि हक्क राहूं नये, असा त्यांचा निष्ठापूर्वक निश्चय होता हे माझ्याप्रमाणें इतर

पुष्कळांना माहीत होते. आणि म्हणूनच ही चालढकल त्यांच्या हातून झाली ती मनांत नसतां झाली, केवळ हयगयीनें झाली, आणि कोणचेंहि काम अखेरपर्यंत पुढें ढकलण्याच्या संवयीनें झाली, असें म्हणावें लागतें. याहून स्वार्थीपणाचा किंवा केसरी बुडवून मुलांना द्रव्यसंपन्न करण्याचा त्यांचा कधींहि इरादा नव्हता ! हें आम्हा सर्वांना पक्कें माहीत असल्यामुळें, वरील दोष एका दृष्टीनें लहान, तरी दुसऱ्या दृष्टीने तोच मोठा ठरतो असें मला वाटतें.

पण टिळकांच्या बाजूनेंहि एक असें म्हणण्यासारखें होतें कीं स्वतःची मिळकत कांय, केसरी काय, सर्वच गोष्टी त्यांच्या संबंधाच्या चंचल स्वरूपाच्या आहेत असे त्यांना नेहमीं वाटे. त्यांचें सगळें आयुष्य, एखाद्या वादळाच्या झपाट्यांत समुद्रामध्यें नाव चालण्यासारखें, मार्ग काढीत होते. शिवाय जरा स्वस्थता लाभली कीं कांहीं तरी एखादा मोठा उपक्रम असा ते करून ठेवीत कीं, पुढें कांहीं दिवस त्यांतच त्यांचें सर्व लक्ष व हाताशीं असलेला सर्व पैसाहि गुंतून जावा. एखादे वेळीं त्यांच्या मनांत, धावत्या ढगासारखी, अशीहि कल्पना येऊन जावी कीं आपल्या पश्चात् चार दोन वर्षे तरी केसरी संस्था टिकते कीं नाही ! होतो त्यांतल्या त्यांत मी, धोंडोपंत, खाडिलकर यांच्यावरच त्यांचा विश्वास होता. या संस्थेच्या कामांत दुसरे कोणी बाहेरचे लोक आणून घालण्याचें त्यांच्या मनांत १९०९।१० नंतर केव्हांहि आलें नाहीं, हें मी निश्चयानें सांगतों. स्वतःच्या मुलासंबंधानें तर त्यांनीं आधींच पुरी परीक्षा करून ठेवली होती कीं, यांच्यापैकीं कोणी केसरी संस्थेला, निदान प्रथमच व ताबडतोब, उपयोगी पडण्याचें नशीबांत नाहीं. त्यांचें वय लहान व अनुभवहि नाहीं. तथापि न जाणो वेळ कशी काय येईल हें कोणी सांगावें ? खाडिलकरांच्या लिहिण्यांत एक गुण तर एक अवगुण. केळकरांच्या लिहिण्यांत एक गुण तर एक अवगुण. धोंडोपंत उद्योगी व प्रामाणिक. तथापि मुलांचें त्यांचें बरे नाहीं. व्यवस्थेच्या कामांतहि ठरीव पद्धतीपलीकडे धोंडोपंतांची दृष्टि जाणारी नाहीं. आणि त्यांच्यामागून त्यांच्याइतका प्रामाणिक व्यवस्थापक मिळण्याची शंकाच. शिवाय राजकीय वातावरणांत होणारे वादळ दर्शविणारे ढग हळुहळू क्षितिजावर त्यांना दिसून येत होते. आणि शेवटीं अशीहि गोष्ट एकंदरीनें खरी कीं, "आपणामागें जग बुडणार" अशी जी एक सामान्य माणसाची, मनानें मानण्याची प्रवृत्ति असते ती टिळकांचीहि असण्याचें कारण असें कीं, त्यांनीं जन्मभर केलेले उद्योग उलाढाली फार मोठ्या होत्या आणि त्या ते होते म्हणूनच

निभावल्या. त्यांच्या डोळ्यादेखत इतरांची परीक्षा त्यांना पहावयास सांपडली नाहीं. कारण या इतरांनीं आपापल्या परीनीं कांहीं पराक्रम म्हणण्यासारख्या लहान सहान गोष्टी त्यांच्या लहानशा योग्यतेनुरूप केल्या असल्या तरी, त्यांच्या उभ्या छत्राच्या सांवलीखालींच त्या सर्व झालेल्या होत्या यांत शंका नाहीं. या सर्व कारणांमुळें केसरी संस्थेसंबंधानें टिळक कांहींसे दैववादी बनले होते ! केसरीचा पब्लिक ट्रस्ट करून, म्हणजे मुलावारसांना द्यावयाचें तें देऊन टाकून उरल्या सर्वांवरील स्वत्वनिवृत्ति टिळकांनीं केली यांत "माझ्या हातून व्हावयाचें तें झालें. आतां पुढें ती संस्था आहे, ती ज्यांच्या स्वाधीन होणार ते लोक आहेत, व त्या उभयतांचें दैव आहे, अर्थात् जें घडेल तें खरें," इतकें मनाशीं म्हणून त्यांनीं कित्येक वेळां स्वतःचें समाधान केलें असेल.

"आपल्या इकडील इतर कोणत्याहि पत्रापेक्षां केसरीची स्थिति व त्यांत पडलेलीं माणसें हीं अधिक चांगलीं आहेत," असा जरी त्यांना पुष्कळ वेळां अभिमान वाटे, व तोंडानें केव्हां केव्हां तो ते बोलूनहि दाखवीत, तरी आज त्यांच्या मरणोत्तर इतक्या वर्षांनीं केसरी संस्थेची जी स्थिति आहे ती भविष्यरूपानें त्यांनीं वर्तविली असती कीं नाहीं, याची शंकाच वाटते. अंधारांत जशा नसत्या आकृति डोळ्याला दिसतात, त्याप्रमाणें आपल्या पश्चात् काय काय गोष्टी होतील याच्या अशाच कांहीं कल्पना प्रत्येक मनुष्याच्या डोळ्यापुढें येत असतात. विशेषतः आपल्या मागें उरणारी मंडळी आपल्या इतक्या श्रेष्ठ योग्यतेची नाहींत असें ज्याला वाटतें त्याच्या डोळ्यापुढें तर वर सांगितल्याप्रमाणें कल्पनांच्या आकृति उभ्या राहिल्यास नवल नाहीं.

आणि याबद्दल टिळकांना तरी दोष कसा द्यावा ! कारण ते गेल्याबरोबर आम्हीहि सर्व इतके दिङ्मूढ बनलों कीं संस्थेचें व आमचें पुढें काय होणार याची आम्हालाहि बरोबर कल्पना नव्हती. १८९७ सालीं टिळकांना शिक्षा झाली तेव्हां ते, दीड वर्षांनीं कां होईना, परत येऊन सर्व कांहीं आपल्या हातीं घेऊन पूर्ववत् संभाळतील या खात्रीनें हें दीड वर्ष आपण कसेंहि निभावून काढूं असा आत्मविश्वास वाटे. फिरून १९०८ सालीं त्यांना शिक्षा झाली तेव्हां ते परत येतील अशी खात्री पूर्वीइतकी उरली नव्हती; पण मंडाल्याहून दर महिन्याला त्यांचें पत्र स्वदस्तुरचें येई व वर्षांतून एखादे वेळीं धोंडोपंतहि त्यांना समक्ष भेटून हकीकती सांगून व ऐकून येत. यामुळें तेथपर्यंत तरी आधाराचा विश्वास वाटे. पण १९२०

सालीं टिळक प्रत्यक्ष मृत्यूच पावल्यावर आम्हाला आधार कशाचा मिळणार? तेव्हां मात्र अगदीं खरोखर आमचे आम्हीच उरलो असे वाटले. टिळक वारले त्या दिवशीं खरोखरच मला एका जुन्या प्रसंगाची आठवण झाली प्रसंग तो या ग्रंथांत पूर्वी २१० पृष्ठावर दिला आहे. त्याचप्रमाणें टिळकांच्या मृत्युनेंहि फिरून एक वेळ 'आभाळ फाटलें' असेंच आम्हांला वाटलें.

उलट, जबाबदारीनें कोणचेंहि काम अंगावर पडणें याची भावना कांहीं वेगळीच असते. एक पक्षीं आपणहि आपल्यांत काय गुण किंवा दम आहे तो दाखवूं असें वाटून एक प्रकारचा अपरिचित असा उल्हास मनुष्याला वाटतो हें खरें. तरी पण जबाबदारी खरीच मोठी असेल तर तो उल्हास दबूनच जातो. मनांत पहिली भीति ही कीं, टिळक तुरुंगांत असले किंवा बाहेर असले तरी त्यांच्यावर दृष्टि देऊनच वाचक व वर्गणीदार केसरीला उदार आश्रय देतात. वास्तविक केसरींतील लेखांपुरते पाहिले तर आम्हाला टिळक हे तुरुंगांतून विद्युत्संदेश पाठवीत होते असें थोडेंच आहे! यामुळें त्यांच्या अभावीं केसरींत येणारे लेख जर लोकांना पसंत पडत असतील तर त्यांचें श्रेय वास्तविक वाचकांनीं आमचें आम्हास द्यावें; व आम्हीहि तो व्यक्तिशः आमचा गुण आहे असा आत्मविश्वास धरावा. परंतु तेव्हां या आत्मविश्वासापेक्षां टिळकांची पुण्याईच प्रभावी आहे व तिचाच आधार आम्हाला आमच्या यशांत आहे असे मनाला वाटे. आणि लोकांचा तर खरोखरच एक डोळा केसरींतील मजकुराकडे असला तर दुसरा डोळा अदृश्य टिळकांकडे असे. पण आतां टिळक मृत्यु पावल्यावर "टिळकांची पुण्याई संपली व त्याबरोबर त्यांचें वर्तमानपत्रहि संपलें" अशीच भावना लोकांची न होईल कशावरून, असे आम्हाला वाटे. पुढें पुढें केसरीचें उत्पन्न वाढलें होतें तें आतां कसचें टिकून रहातें! तें हातोहात तुटत जाईल, अशीहि एक प्रकारची भीति मनाला भासे. जणूं कांहीं केसरींतील जाहिरातदार हे टिळक आहेत म्हणूनच आपल्या जाहिराती केसरींत देत होते! वास्तविक ही भीति अगदीच निराधार होती. परंतु प्रारंभीं ती मनाला वाटत होती एवढें मात्र खरें.

महायुद्ध, होमरूल लीगच्या चळवळी, विलायतेचीं डेप्युटेशनें, इत्यादि गोष्टीमुळें १९१९-२०च्या सुमारास, किंवा त्या आधीहि दोन तीन वर्षे, केसरीचा खप इतका वाढला होता कीं मागणी इतका पुरवठाच एखादे वेळीं करितां येत नसे. आणि या

बाजून पहातां हा खप टिकणार नाहीं अशी जी भीति आम्हाला वाटूं लागली ती मात्र कांहीं अंशी साधार होती. त्यांतूनहि टिळकांच्या मुलांचीं व आमचीं भांडणें कोर्टात जातात कीं काय, अशीहि भीति पुढें लवकरच मनांत येऊ लागली. नवें ट्रस्टडीड होईल अशी साधारणतः प्रथम कल्पनाच नव्हती. आणि मृत्युपत्र कोर्टात जाऊन शाबीत होऊन त्याचें प्रोबेट बिनतक्रार पदरांत पडावयाचें म्हणजे तें एक दिव्यच वाटे. मृत्युपत्रांत लिहिलेल्या ट्रस्टचें स्वरूप 'पब्लिक ट्रस्ट' या शब्दांनीं सार्वजनिक म्हणजे काय ठरावयाचें हा प्रश्न कायद्याच्या दृष्टीनें वादग्रस्त असा होता. तथापि ट्रस्ट केला असला काय किंवा न केला असला काय, आम्ही ती मिळकत, टिळकांच्या मुलांचीहि, खासगी स्वरूपाची मानणें शक्यच नव्हतें. ट्रस्टडीड न होतें तर एक्झिक्युटर रा. विद्वांस यांनीं नेमलेला केसरीचा मी पगारी संपादक म्हणजे नोकर हें नातें रहावयाचें, त्या ऐवजी ट्रस्ट झाल्यामुळें ट्रस्टी व संपादक असें नातें अर्थात अधिक प्रतिष्ठित राहिलें. तथापि ट्रस्टीच्या ताब्यांतील मिळकत ही देखील खाजगी मालकीची नव्हे, व मी ट्रस्टी असलों तरी पगारी संपादकच होतों.

ट्रस्टडीडमध्यें आम्ही ट्रस्टी या नात्यानें पगार घ्यावा असें लिहिलेलें नव्हतें हें खरें. आणि ट्रस्टीला केवळ ट्रस्टच्या कामाकरितां पगार घेतां येत नाहीं हेंहि खरें. पण प्रस्तुतच्या विषयीं वर्तमानपत्रें व छापखाना चालविण्याखेरीज ट्रस्टचें असें इतर कांहीं एक कामच नव्हतें. काम होतें म्हटलें तर मिळकत संभाळणें इतकेंच होतें. अर्थात् ट्रस्ट विरहीत इतर सर्व काम संपादकाचें, व वर्तमानपत्रासंबंधीं सर्व प्रकारची व्यवस्था ठेवण्याचें, त्याकरितां पगार घेतल्याशिवाय रहाणें शक्यच नाहीं. शिवाय मृत्युपत्र व ट्रस्टडीड या दोहोंतहि पगार घेण्याला अनुकूल अशीं गमकें आहेत. कारण मृत्युपत्रांत धोंडोपंत विद्वांस यांना एक्झिक्युटर नेमले असतां म्हणजे त्यांना टेस्टेमेंटरी ट्रस्टी नेमले असतां त्यांनाच जन्मभर छापखान्याचे मॅनेजर ठेवावें व त्यांना एडिटर इतका पगार द्यावा असें टिळकांनींच लिहून ठेविलें होतें. ट्रस्टी हा एक्झिक्युटर असला तरी सामान्यपणें त्याला पगार घेतां येत नाहीं. परंतु मृत्युपत्र करणारानें, म्हणजे टेस्टेमेन्टरी ट्रस्टी नेमणारानेंच, त्याला पगार द्यावा असें लिहून ठेवलें होतें; व जो कोणी संपादक असेल त्यालाहि पगार द्यावा हें धोंडोपंत यांच्या पगाराच्या उल्लेखांतूनच निघणारे होतें. शिवाय मुलांनीं ट्रस्टडीड केलें त्यांतच असें लिहिलें आहे कीं, "मृत्युपत्र करणाराचे सर्व हेतु पूर्ण करण्याकरितांच ट्रस्टडीड करून ठेवीत आहों;.....पूर्वी चालल्याप्रमाणें

पत्रें व छापखाना यांजकडील नोकर चाकर ठेवणें, सार्वजनिक खर्च करणें, वगैरे सर्व अधिकार पूर्वी चालत आल्याप्रमाणें ट्रस्टींना दिले आहेत." ट्रस्टडीडच्या पूर्वीची स्थिति म्हणजे मी पगारी संपादक होतोंच, तेव्हां ट्रस्टडीड केल्यानें मी ट्रस्टीचें व संपादकाचेंहि काम निर्वेतन करावें असा अभिप्राय त्यांतून निघूंच शकत नाहीं. आणि मुलांनीं जे दावे वगैरे केले त्यांतहि ही गोष्ट कायदेशीर तक्रारीच्या रूपानें त्यांनीं कधीं पुढें मांडली नाहीं.

असो. अशा रीतीनें ट्रस्टच्या कामाला सुरुवात झाली, व मुलांनीं वर्तमान-पत्रांतून कारणपरत्वें लिहितांना "आम्ही हा ट्रस्ट करून दिला आहे म्हणजे वडिलांच्या इच्छा पूर्ण केल्या आहेत" असें आत्मगौरवबुद्धीनें लिहिलेंहि. पण पुढें त्यांना वाईट सल्लागार भेटले म्हणा; किंवा स्वतः त्यांचींच बुद्धि फिरली म्हणा; त्यांनीं तक्रारी करण्यास सुरुवात केली. त्याप्रमाणे मी व टिळकांचे दोघे जावई यांनीं मृत्युपत्रांत नेमलेले पंच या नात्यानें लवाद–निवाडे करून दिले. लवादांपुढील फिर्यादींत मुलांच्या तक्रारी फक्त आपलें कांहीं पैशाचें नुकसान झाल्याच्या किंवा या नाहीं त्या रीतीनें अधिक पैसे मागण्याच्या स्वरूपाच्याच होत्या. त्यांत ट्रस्टडीड आमच्याकडून जुलमानें किंवा फसवणुकीनें करून घेतलें अशा तक्रारी नव्हत्या. पैशाच्या तक्रारींपैकींहि कांहीं मान्य व कांहीं अमान्य असें ठरलें; आणि लवाद–निवाड्यानें ज्या रकमा मुलांना देवविल्या त्या त्यांनी घेऊन पावत्या व एकंदर बेदावा लिहून देऊन तो रजिस्टरहि करून दिला. पण पुढें लोभबुद्धि अधिक बळावत चालली, व आमच्या कांहीं प्रतिपक्षांनीं त्यांना "तुम्हाला केळकर-विद्वांस यांनीं व तुमच्या मेहुण्यांनींहि फसविलें" असें म्हटलेलें ऐकून आणखी वाईट वाटूं लागावें असें होत गेलें. तेव्हां कायदेशीर इलाज कांहीं उरला नाहीं म्हणून आडमार्गांत शिरून बेकायदेशीर रीतीनें आडदांडपणा करून कोणीकडून तरी आम्हाला त्रास द्यावा असें धोरण त्यांनीं स्वीकारीलें. या आडदांडपणाला उलट आडदांडपणा करावा ही गोष्ट सहज सुचणारी होती; व कारखान्यांत आम्ही सर्व संपादक, उपसंपादक मंडळी व इतर छापखान्याकडील वगैरे नोकर मिळून पांच पन्नास लोक असल्यानें, त्यांच्या आडदांडपणाला उलट उपाय आम्हाला सहज करतां आला असता. परंतु या क्रिया-प्रतिक्रियेच्या द्वंद्वामध्यें लोकापवादाची भीति आम्हाला, व टिळकांचे मुलगे म्हणून वस्तुस्थिति माहीत नसणाऱ्या जनसमूहाची सहानुभूति त्यांना, अशी स्थिति असल्यामुळें ते दोघे व आम्ही पन्नास हे सारखे नव्हेच पण उलट

आम्ही कमी असें ठरूं पहात होतें. टिळकांचा मुलगा झाला तरी त्यानें प्रत्यक्ष शरीरानें दंडेली करू नये असें कोणीहि म्हणेल. परंतु थोरला मुलगा छापखान्याचें काम चालू असतां बेधडक कारखान्यांत जाई व कामगारांना अडथळा करी. एकदां तर त्यानें आपली जाहिरात हवी तशी न छापल्याच्या सबबीवर पांच कॉलमी पानाची केसरीची कागदी मेट्रिस तयार झालेली हातांत ओढून घेऊन टरकावून फेकून दिली; आमचे कोणी मनुष्य दिसलें कीं, त्याला ऐकूं जाईल अशा रीतीनें "आम्ही ट्रस्टींना मारून काढूं" अशा धमक्याहि देई. तो त्या इतक्या दुःसह झाल्या कीं या विषयींची तक्रार किंवा फिर्याद साक्षीपुराव्यानिशी आम्ही पोलिस सुपरिंटेंडेंटकडे लेखी दिली. पण या मारहाणीच्या धमकावण्यापेक्षांहि चालत्या कामांतील अडथळे आम्हाला अधिक त्रासदायक होऊं लागले. आमच्या अंगणांत वाटेल ते ढीग आणून टाकावे, माल रचावा, चुन्याच्या घाणीसारखीं कामें काढावीं, आमच्या भाडेचिठ्ठीच्या जागेंत आम्ही इमारत बांधण्यास काढली असतां तिला हरकत करावी, छापखान्याकडील जुना निरुपयोगी माल विकावयास काढला असतां पोलीसकडे विश्वासघाताची फिर्याद देऊन तो अडकून पाडावा, दारावरील भय्याला वाटेल ते हुकूम करावेत, त्याची चारपाई त्याचें सामान उचलून फेकून द्यावें, अशा गोष्टी होऊं लागल्या. त्या सहन करून काम चालविणें दुर्घट झालें. तेव्हां मृत्युपत्र, ट्रस्टडीड, व भाडेचिठ्ठी यांतील दस्तऐवजांच्या आधारावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करावी व एकदा कायमचा निकाल लावून घ्यावा ही गोष्ट आम्हाला प्राप्त झाली. "मृत्युपत्रांतील पंचांचे यापुढें आम्ही ऐकणार नाहीं" असें त्यांनीं म्हटल्यानें दिवाणी कोर्ट हा एकच सरळ मार्ग आम्हाला उरला व आम्ही तोच स्वीकारला. आम्ही कागद करून घेतले ते जुलमानें, वजन पाडून, अज्ञानाचा फायदा घेऊन, फसवून करून घेतले हा प्रवाद तोंडच्या भाषेनें किंबहुना वर्तमानपत्रांत प्रत्यक्ष लेख लिहून जाहीर रीतीनें त्यांनीं सुरू केला होता; आणि आम्ही त्याला कांहींच उत्तर देत नव्हतों यामुळें हळुहळू लोकमत विनाकारण बिघडत चाललें होतें. तेव्हां उघड कोर्टांतच हडसून खडसून शपथप्रमाण होऊन पुरावा देऊन जो काय निर्णय लागावयाचा तोच एकदा लागूं दे असे म्हणून पण मोठ्या कष्टानें आम्ही कोर्टांत फिर्याद मांडली.

कष्टानें म्हणण्याचें कारण असें कीं आमचें म्हणणें किंवा आमची बाजू कितीहि खरी असली तरी "आम्ही टिळकांच्या मुलावर कोर्टांत दावा करावा म्हणजे काय! तीं बोलून

चालून मुलें! आम्ही प्रौढ व अनुभविक! तेव्हां हरप्रयत्नाने त्यांची समजूत काढणें हें आमचेंच काम! आम्ही काय बोलन चालून परके बाहेरचे! संपादक किंवा ट्रस्टी झालों म्हणून काय झालें? मुलगे किती झाले तरी टिळकांचे वारस! टिळकांनीं ट्रस्ट करतांना लोकहितबुद्धि मनांत ठेवली असली तरी आपणाला हवें तितकें बापानें ठेवलें नाहीं अशी तक्रार त्यांच्या मुलांना सुचणें स्वाभाविक आहे. तात्पर्य, आम्ही कोर्टात दावा मांडणारे वाईट, व टिळकांचे मुलगे म्हणून ते मात्र चांगले किंवा निदान सहानुभूतीला पात्र," अशी लोकांची भावना उघड उघड दिसून येई. फार काय पण चांगल्या समंजस लोकांनाहि सकृद्दर्शनीं असें वाटे. ज्यांना आमच्याविषयीं सहानुभूति वाटे असे लोक सुरुवातीला तरी फारच थोडे होते. कारण मुलांचा खरा स्वभाव परक्या माणसाला कसा कळणार? यामुळें ताईमहाराज केसमध्यें टिळक हें एका स्त्रीशीं वाद घालीत आहेत या एका गोष्टीमुळें त्यांना नांवें ठेवणारें जसे अनेक लोक सुज्ञ समाजांतहि निघाले, त्याचप्रमाणें आम्ही ट्रस्टींनीं दावा मांडला तो टिळकांच्या मुलांविरुद्ध, केवळ एवढ्याच भावनेनें आम्हाला नांवें ठेवणारे लोक तसेच निघाले. पण ती वेळ अशी होती कीं, आम्हीच काय ते सर्व प्रकारचे गैरसमज, आक्षेप, अपवाद सोसावें, लोकांत मान खाली घालावी व न्यायकोर्टात उघड चर्चा झाली म्हणजे मग लोकमताचें पारडें फिरेल या दूरच्या आशेवर समाधान मानून दिवस कंठावें व दैवप्राप्त कर्तव्य करीत राहावें, अशी पाळी आमच्यावर आली.

हें संकट खरोखरच बिनतोड होतें. कारण मुलांच्या तकारीचा पारा दिवसें दिवस वर वाढत चालल्यामुळें केवळ त्यांना कांहीं पैसा देऊन हें भांडण मिटेल अशी स्थिति उरली नव्हती. ट्रस्ट रद्द करावा किंबहुना मृत्युपत्र खोटें म्हणावें, आणि केसरी-मराठा पत्रांची मालकी व व्यवस्था, अर्थात् त्या कारखानदारींत होणारा नफा, हा सर्व आपलासा करावा असेच मुलांच्या मनानें घेतलें. इकडे आम्ही आमच्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें ट्रस्ट पत्करून ट्रस्टी होऊन बसलों होतों, आपल्या समजुतीप्रमाणें मुलांचें सर्व देणें योग्य तें आम्ही देऊन टाकलें होतें. केसरी-मराठापत्रांविषयीं, स्वतः आमच्याविषयीं, आणि उलट मुलांविषयीं खुद्द टिळकांच्या इच्छा काय होत्या हें आम्हाला पूर्णपणें माहीत होतें; व डोळ्यापुढें हे विशेषतः दिसत होते कीं, आम्ही आपला अधिकार सोडून केसरी-मराठा मुलांच्या हातीं दिल्यास त्यांची दुर्दशा ठेवलेली! लोकांना प्रिय वाटणाऱ्या व चाळीस

पंचेचाळीस वर्षे उत्तम स्थितींत चाललेल्या एका सार्वजनिक संस्थेचा नाश ठेवलेला! अर्थात् दंडेली, कपट, शठशाठ्यनीति हीं तर राहोंतच पण दिवाणी कोर्टांत जाऊन निर्णय करून घेण्याचा साधा व सीधा मार्ग तोहि सोडून देऊन दुबळ्या-प्रमाणें ट्रस्ट सोडून बाजूला व्हावें ही गोष्ट आम्हांला कशी शोभली असती ?

असो. फिर्यादीचें काम सुरू झाल्यावर अपेक्षेप्रमाणें मुलांच्या कैफियती दाखल झाल्या. त्यांत आमच्यावर जे जे कांहीं आक्षेप म्हणून घेणें शक्य होते ते ते सर्व त्यांनीं घेतले होते. पण पुढें त्यांचें त्यांनाच हळुहळू असें दिसून येऊं लागलें कीं, आक्षेप घेणें सोपें आहे पण पुराव्याने ते सिद्ध करणें हें कर्म महा-कठीण आहे !

अशा विवंचनेंत ते असतां धाकटा मुलगा श्रीधर बापू यानें असा एक अक-ल्पित प्रकार केला कीं, त्यामुळें आमच्या संकटांत अधिकच भर पडली. त्यावेळीं मी गोवें प्रांतीं हिंदुमहासभेच्या व मसूरच्या ब्रम्हचाऱ्यांनीं केलेल्या शुद्धीच्या कार्यासंबंधानें गेलों होतों. तेथें एके दिवशीं संध्याकाळीं माझ्या हातीं अवचित अशी तार आली कीं, " बापू टिळक याचें प्रेत भांडुर्डा स्टेशनच्या बाजूला रेल्वेनजिक सांपडलें." त्यावरून मला प्रथम कांहीच कल्पना होईना. एक वेळ वाटे कीं त्याचा स्वभाव तापट म्हणून किंवा त्याच्याजवळ खिशांत बरीच रक्कम असेल म्हणून, कोणी त्याचा खून करून वहीम लपवण्या-करितां आगगाडीच्या रूळावर ठेवला असेल. त्याचें प्रेत रात्रीं सांपडलें यावरून ही कल्पना झाली. तथापि दुसरें दिवशीं सर्व खरी हकीकत कळली त्यावरून ती आत्महत्या होती यांत संशय राहिला नाहीं. परंतु आत्महत्या तरी कशाकरितां या विषयीं कल्पना चालेना. पहिली तार आल्यापासून मी गोवें येथील उरलेलें सर्व कामकाज टाकून देऊन स्तंभित होऊन बसलों; व सवड होतांच परत निघून आलों. आत्महत्येच्या ऐवजीं तो खून ठरता तर संशयाचे धागेदोरे इतर रीतीनें पसरावयाचे. परंतु आत्महत्या असें निर्विवाद ठरल्यानें आमच्यावरचें एक संकट टळलें आणि एक आलें. पण अपवाताची मीमांसा करितांना आम्ही उपस्थित केलेल्या दाव्याचें कारण जोडून आम्हाला लोक जो काय दोष देतील तेवढाच उरेल असें पाहून त्यांतल्या त्यांत समाधान वाटलें.

"मरावयाचें तर फुकट कां मरा! प्रतिपक्षाबर शिंतोडा उडवून मरावें" अशी मात्र श्रीधरबापूला वासना झाली असली पाहिजे. एरवीं त्यानें आत्महत्येपूर्वी

पुणें कलेक्टरला जे पत्र लिहिलें तें लिहिलें नसतें. आतां या पत्रांत त्यानें आम्हा कोणाचीं नांवें घेतलीं नाहींत. वकील, कायद्याचे सल्लागार, न्याय देण्याविषयीं अविश्वास वाटणारीं न्यायकोर्टें, इत्यादिकांवर त्यानें आपल्या मरणाची जबाबदारी ढकलली आहे. आम्ही केलेला दावा व त्याला आधारभूत असलेले कागदपत्र हे त्याला खोटे म्हणतां आले नाहींत, तरी आपण कोर्ट कचेरीच्या या कामांत जिकिरीला आलों असे या पत्रांत त्यानें दर्शविलें आहे. परंतु तीहि उपपत्ति सर्वस्वी बरोबर बसत नाहीं. कारण आमचा दावा कोर्टांत दाखल होऊन सुमारें दीड वर्ष झालें होतें. दोन्ही बाजूचे कागदपत्र दाखल करावयाचे ते करून झाले होते; व आतां फक्त तोंडी पुराव्याला सुरुवात व्हावयाची होती. हा पुरावा त्यांना न देतां आल्यामुळें दावा आम्हाला बहाल झाला असता तरी वास्तविक जीव देण्याइतकें मुलांचें नुकसान त्यांत कांहीं नव्हतें. कारण टिळकांच्या मृत्युपत्राप्रमाणें जितकी मिळकत जास्तींत जास्त त्यांना मिळावयाची ती सर्व आगाऊ मिळून चुकली होती, व ही मिळकत स्थावर जंगम मिळून निदान दोन लक्ष रुपयांची होती. अर्थात् त्यांचा दावा बुडाला तरी त्यांच्या एका पैशालाहि धक्का नव्हता. बरें, वर्तमानपत्रें हातीं घेऊन तीं चालवून त्यांत लौकिक मिळवूं अशीहि महत्वाकांक्षा त्यांनीं कधीं बाळगली नव्हती. अशा स्थितींत वकिलाला पैसे भरून झाल्यावर, दावा नुसता खेळवून आमच्यावर चार शिंतोडे उडवावयाचे तें उडविण्याचें सुख घेऊन, शेवटीं आमचें कांहींच नुकसान झालें नाहीं असे म्हणत व हंसत त्यांना कोर्टाबाहेर पडतां आलें असतें. बरें, मुलांच्या आग्रही व तापट स्वभावाप्रमाणेंहि त्यांनीं वास्तविक वाटेल तें झालें तरी दावा अखेरपर्यंत लढविण्यास दंड थोपटून उभे राहावयास पाहिजे होते. पण बापूनें तसा प्रकार केला व रामभाऊंनीं त्या प्रकाराचें नुसते कागदी निमित्त करून, बापूच्या मरणानंतर अनेक महिन्यांनीं, पुराव्यांत आपली धडगत लागत नाहीं असें पाहून यापुढें आपण काम चालवीत नाहीं, दाव्याचा निकाल एकतर्फी व्हावा, असें लिहून दिलें.

तात्पर्य, दोघाहि बंधूंनीं आपापल्या परीनें कांगावाच केला. पण बापूच्या मरणोत्तर त्यांच्या घरीं जे प्रकार घडले व ज्या प्रकारांचें पर्यवसान शेवटीं श्रीधरबापूच्या विधवेनें मुलांना घेऊन घरांतून निघून जाण्यांत व वांटणीकरितां मुलांच्यातर्फे कोर्टामध्यें दावा आणण्यांत झालें, व या दाव्यांत रामभाऊचीं जीं पत्रें दाखल झालीं, त्यावरून श्रीधरबापूच्या आत्महत्त्येचें खरें कारण काय असावें याची

कल्पना लोकांना हळुहळू परस्पर येऊं लागली. बापूची आत्महत्या झाल्याबरोबर आमच्या प्रतिपक्षीयांनीं वर्तमानपत्रांत आमच्यावर हल्ले चढवून, त्या मुलाची ती आत्महत्या नसून आम्ही ट्रस्टीनीं केलेला तो नैतिक खून होता असें म्हणण्यास कमी केलें नाहीं! परंतु आपल्यावरील आक्षेपाचें निरसन दमानें घेतलें असतां आपोआप हळुहळू परस्पर होत असतें असा माझा अनुभव व विश्वास असल्यामुळें आम्ही एका शब्दानेंहि त्या टीकेला उत्तर दिलें नाहीं. असो. शेवटीं पुणें फर्स्ट क्लास कोर्टांत दाव्याचा निकाल सर्वस्वीं आमच्या तर्फे लागला. मृत्युपत्र ट्रस्टडीड वगैरे सर्व कागद शपथ पुराव्यानें शाबीत झाले. आम्ही मागितल्या त्या बहुतेक ताकिदी देण्यांत आल्या. आमचा खर्चहि कोर्टाने देवविला. यावर पुढें मुलांनीं मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें, पण त्यांताहि आम्हालाच यश येऊन न्यायमूर्ति पाटकर व न्या. ब्रूमफील्ड यांनीं प्रत्येक कागदपत्राची छाननी करून ते शाबीत ठरविले. ते कागद आम्ही कपटानें करून घेतले अशा अर्थाचे आक्षेप निर्मूल ठरविले. आणि न्या. ब्रूमफील्ड यांनीं तर असें स्पष्ट लिहिलें कीं "ट्रस्टींनीं मुलांना त्रास दिला किंवा छळ केला हा आक्षेप खोटा असून उलट मुलांनींच ट्रस्टीना पद्धतशीर रीतीनें व मनांत एक प्रकारचें धोरण ठेवून चिमटे काढकाढून ट्रस्टींचाच छळ केला."

न्या.मू.च्या या एका वाक्यानें आठनऊ वर्षें भोगलेल्या आमच्या दुःखाचा परिहार झाला असें वाटलें. कारण कोर्टाचा अखेर निकाल होईपर्यंत कोणाच्या टीकेला उत्तर म्हणून द्यावयाचें नाहीं असा निश्चय करून आम्ही ओठ दाबून व लेखणी आखडून बसलों होतों. परंतु सुदैवानें केसरीचा ज्युबिली अंक काढण्याचे आधीं कांहीं दिवस हायकोर्टाचा निकाल झाल्यामुळें त्या अंकांत आम्ही ट्रस्टसंबंधीं सर्व कागदपत्र व पैशाच्या व्यवहारासंबंधी सर्व हकीकती सविस्तर छापून लोकांच्या हातीं देऊन मोकळे झालों. ते वाचून, उशीरा कां होईना, पण आमच्या टीकाकारांना मान खाली घालावी लागली. आणि तसें बाहेर बोलण्याइतका प्रामाणिकपणा त्यांच्या अंगीं नव्हता तरी त्यांना मनांतून खजिल व्हावें लागलें. परंतु एक प्रकारच्या अज्ञातवासांत, म्हणजे आपल्याच हातानें आपलें तोंड दाबून बसण्यांत, जे आमचे दिवस गेले ते फार कष्टाचे गेले. कारण अपवाद खोटा ठरेपर्यंत होता तो फारच मोठा होता! आमची बाजू पुढें मांडावी तर कोर्टांत खटले चालू आहेत. अखेर निकाल झाला नाहीं या कारणानें आमचे वकीलच आम्हाला कोणतीहि हकीकत केसरींतून छापून प्रसिद्ध करू देईनात. आक्षेपक व निंदक यांच्यावर मात्र ही जबाबदारी कांहीच नसल्यामुळें

त्यांचें तोंड नेहमीं उघडे राही. आणि आम्ही उत्तर देत नाहीं या गोष्टीचा आधार घेऊन ते जितं जितं असें म्हणून कोलाहल करीत !

केसरी ट्रस्टसंबंधी झालेल्या उलटसुलट दाव्यांच्या कामीं आम्ही ट्रस्टींनीं आमचे मित्र रा. लक्ष्मणराव भोपटकर यांना वकीलपत्र दिलें होतें. त्यांनीं 'केसरी प्रबोध' नामक ग्रंथांत या सर्व प्रकरणाची छाननी व फोड फार सूक्ष्म रीतीनें केली आहे ती वाचकांनीं अवश्य पहावी. येथें त्यांच्या लेखांतील अगदीं मुद्याचे असे दोन तीन परिच्छेद या खालीं देत आहे त्यांवरून आमच्यावरील तेव्हांच्या संकटाची कल्पना वाचकांना येईल. रा. भोपटकर लिहितातः—

"लोकमान्यांच्या पश्चात् टिळकबंधूंना सुमारें अडीच तीन लाखांची मिळकत मिळाली. तिचा तपशील ज्युबिली-अंकांत दिलेला आहे. लोकमान्यांच्या अनुयायांनीं त्यांना सुमारें तीन लाखांचा जो 'पर्स-फंड' अर्पण केला तो केला नसता, तर चिरंजीवांना मिळकत मिळाली असती शून्य ! लोकमान्यांच्या पश्चात् लवकरच दोघां बंधूंनीं शिक्षणक्रम आंखडता घेतला. दोन्ही भावांचा स्वभाव फारच खर्चीक असल्याकारणानें त्यांना मिळालेल्या मिळकतीला ओहोटी सुरू झाली. जवळचा बराचसा रोकड पैसा घरावर खर्च केला; याशिवाय खर्चास अनेक तोंडें पडलीं होतीं तीं निराळींच ! साहाजिकपणें पैशाची अडचण भासू लागल्यावर त्यांची दृष्टि केसरी ट्रस्टकडे वळली, व त्यांना वाटू लागलें असावें कीं, हें बरें घबाड आहे. येथें जर युक्तिप्रयुक्तीनें आपला शिरकाव करून घेतां आला, तर आपली उत्तम सोय होईल; आणि त्या दिवसापासून त्यांनी ट्रस्टींवर हल्ला उपसलें ! व वेळेला सुचतील तसले सुसंगत विसंगत आरोप ट्रस्टींवर बिनदिक्कत करण्यास त्यांनीं मागेपुढें पाहिलें नाहीं ! एवढेंच नव्हे तर ट्रस्टींबरोबर आपल्या मेव्हण्यांनाहि भरडून काढण्यास कमी केलें नाहीं ! आपण लोकमान्यांचे चिरंजीव असल्यामुळें व एका दृष्टीनें त्यांच्या थोरपणावर आरूढ झाल्याकारणानें ते स्वतःस फारच मोठे समजूं लागले. त्यांतच केसरीविरुद्ध असलेल्यांची त्यांना भर मिळाली. मग काय विचारतां ? बोलण्या चालण्यांत, लिहिण्यांत तर त्यांनीं जवळजवळ 'हुतात्म्या' चेच अवसान आणलें ! ट्रस्टींनीं व त्यांच्या प्रत्यक्ष मेव्हण्यांनीं त्यांना फसवून ट्रस्ट-डीड वगैरे कागदपत्र त्यांच्याकडून करून घेतले ही गोष्ट जर खरी होती, तर ते रद्द ठरवून घेण्यासाठीं त्यांनीं ट्रस्टींवर व मेव्हण्यांवर दावे कां केलें नाहींत ? अजागळा-

सारखे अगदींच स्वस्थ कां बसले ! दाव्याच्या खर्चास त्यांच्याजवळ पैसे होते. व बरावाईट सल्ला देण्यास सल्लागारहि कांहीं थोडेथोडके नव्हते. त्यांना कोर्ट-दरबारचा अनुभवहि कांहीं कमी नव्हता. बरें, हेंहि जाऊ द्या. ट्रस्टींनीं लाविलेल्या फिर्यादींत हे कागदपत्र रद्दबातल ठरवून घेण्याची संधि त्यांना अनायासें प्राप्त झालेली होती. मग तिचा फायदा घेऊन ट्रस्टींची व मेव्हण्यांची लबाडी कोर्टा-कडून शाबीत करून घेण्याऐवजीं ऐनवेळीं माघार ती काय म्हणून घेतली ! यांतलें इंगित असें कीं, कागदपत्रासंबंधींची तक्रारहि त्यांना वास्तविक करावया-चीच नव्हती, तर त्या तक्रारींच्या पांघरुणाखालीं ट्रस्टच्या क्षेत्रांत जर आपला हात घुसविता आला तर तो त्यांना पाहिजे होता !

" केसरी-मराठा संस्थेसंबंधानें पुण्याच्या दिवाणी कोर्टातून मु. नं. $\frac{१२६४}{१९२३}$, मुं. नं. $\frac{१८८७}{१९२३}$ व मु. नं. $\frac{२०२}{१९२८}$, असे एकंदर तीन दावे चाललेले होते. यांपैकीं पहिला दावा वरील संस्थेचे ट्रस्टी केळकर व विद्वांस यांनीं लोकमान्यांचे चिरंजीव रामभाऊ टिळक व कै. बापूराव टिळक यांच्यावर लावलेला होता, तर बाकीचे दोन टिळकबंधूंनीं ट्रस्टींवर लाविलेले होते. हे दोन्ही दावे रामभाऊ यांनीं पुढें काढून घेतले ! ट्रस्टींच्या दाव्याचा निकाल सन १९२९ च्या मार्च महिन्यांत पुणें कोर्टात ट्रस्टींच्या वतीनें झाला. त्यावर रामभाऊ यांनीं स्वतःतर्फे व कै.बापूराव यांच्या अज्ञान मुलांतर्फे नामदार हायकोर्टात नं. $\frac{१९०}{१९२९}$ चें अपील केलें होतें. त्याचाहि निकाल ट्रस्टींच्या तर्फेनें झालेला आहे.

" ट्रस्टींनीं आपला दावा ता. १६ ऑगस्ट १९२७ रोजीं दाखल केला, व त्याचा निकाल ता. ७ मार्च १९२९ रोजीं झाला; या दरम्यानच्या काळांत व नंतरहि या दाव्याकडे महाराष्ट्राच्या जनतेचें लक्ष अनेक दृष्टींनीं वेधून गेलेलें होतें, यांत कांहीं संशय नाहीं. लोकमान्य, त्यांची परंपरा व त्यांनीं निर्माण केलेला ट्रस्ट, यांच्याबद्दल भक्ति व अभिमान बाळगणाऱ्या लोकांना, ट्रस्टींना ट्रस्टच्या बाबतींत दावा करण्याचा व तोहि लोकमान्यांच्या चिरंजीवांवर करण्याचा प्रसंग यावा, याबद्दल मनांतून वाईट वाटणें अगदीं साहजिक होतें. ट्रस्टींना तर मरणप्राय दुःख वाटत होतें ! परंतु करतात काय बिचारे ! एक तर दावा करून ट्रस्टचें जतन तरी करावें, नाहींतर स्वस्थ बसून डोळ्यांदेखत ट्रस्टचा नाश खुशाल होऊ द्यावा, अशा अत्यंत बिकट पेंचांत ट्रस्टी सांपडलेले होते. परंतु

अखेर स्वकर्तव्याला जागून त्यांनीं योग्य त्या मार्गाचाच अवलंब केला, याबद्दल टिळकभक्त त्यांना केव्हांहि दुवा दिल्याशिवाय खचित रहाणार नाहींत. आपण हा दावा केल्यानंतर, लोकमान्यांचे, त्यांच्या परंपरेचे व ट्रस्टींचे प्रकट वा प्रछन्न शत्रू या गोष्टीचा पूर्णपणें गैरफायदा घेऊन, लोकमान्य, ट्रस्टी, किंबहुना महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्ष, यांच्यावर एकच काहूर उसळून देण्यास चुकणार नाहींत, याची जाणीव ट्रस्टींना नव्हती असें नाहीं. दुसऱ्या एखाद्या कच्चया दिलाच्या ट्रस्टींनीं हा मार्ग पत्करण्यास बहुधा अळमटळमच केली असती ! परंतु सुदैवानें ट्रस्टींच्या ठिकाणीं तात्यासाहेब केळकर व बाबासाहेब विद्वांस यांच्यासारखे खंबीर मनाचे गृहस्थ असल्याकारणानें, त्यांनीं योग्य व आवश्यक अशा मार्गाचाच अंगिकार केला; व त्यांनीं दाखविलेल्या या मनोधैर्याबद्दल कोणीहि निःपक्षपाती मनुष्य केव्हांहि त्यांचें कौतुकच करीत राहील !

"एकीकडे वरीलप्रमाणें वस्तुस्थिति होती, तर दुसरीकडे कित्येक विघ्नसंतोषी लोकांना पूर्वोक्त दावे दाखल झाल्यानंतर आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या. पूर्वीच्या वैराचा सूड उगविण्यास, नाहीं तर केसरी संस्थेवर धोपाट्या घालण्यास ही उत्तम संधि आहे असें पाहून पुणेंमुंबईच्या लेखकांनीं व पत्रकारांनीं दोन तीन वर्षेपर्यंत ट्रस्टींवर जें तोंडसुख घेतलें, त्याला तर सीमाच नव्हती ! हा धांगडधिंगा घालण्यांत निरनिराळ्या लेखकांचे निरनिराळे हेतू होते. कोणास ट्रस्टीच्या नांवाखालीं लोकमान्यांच्या स्मृतीवर तडाखे लगवावयाचे होते, तर कोणास ट्रस्टी ब्राह्मण म्हणून त्यांची बदनामी करावयाची होती; कोणास ट्रस्टी सारस्वतव्यतिरिक्त ब्राह्मण-विशेषतः कोंकणस्थ ब्राह्मण--म्हणून त्यांना निंदावयाचे होते, तर कोणास केसरी प्रतिसहकारित्वाचा पुरस्कर्ता म्हणून त्यावर घाव घालावयाचे होते; कोणास तात्यासाहेबांचा बोलबाला सहन होत नव्हता म्हणून त्यांचा पाणउतारा करावयाचा होता, तर कोणास या संधींतून जमल्यास स्वतःचा लग्गा साधून घ्यावयाचा होता म्हणून तो धूमधडाक्यांत सामिल झालेला होता ! सारांश, प्रत्येक लेखक कांहीं तरी विशिष्ट हेतूनें प्रेरित होऊन त्यानें दोनतीन वर्षांच्या अवधींत मनःपूत असें लिखाण केलें ! या सर्व लिखाणांत अर्थात् सभ्यपणास फांटा देण्यांत येऊन बाष्कळपणास जसा काय ऊत आलेला होता ! असें करण्यांत या लेखकांना टिळकांच्या चिरंजीवांबद्दल प्रेमाचा मोठा पान्हा फुटत होता असे नव्हे ! सगळ्यांची मनोवृत्ति एकच कीं, तिकडे ते ट्रस्टी मरोत, नाहींतर चिरंजीव मरोत, कैक

दिवस पोटांत ढवळत असलेलें विष बाहेर ओकून टाकण्याची जी संधि प्राप्त झाली आहे, ती वाया घालवा का ? त्यातच मधून मधून श्री. रामभाऊ व के. बापूराव हे आपल्या स्वतःच्या लेखांची व मुलाखतींची भर घालण्यास चुकत नसत ! परंतु ट्रस्टी हे माझे पक्षकार व मी त्यांचा वकील असल्यामुळें हायकोर्टात दाव्याचा निकाल होईपर्यंत कोणत्याहि टीकेला कसलेंहि उत्तर द्यावयाचें नाहीं अशी मी ट्रस्टींना मनाई केलेली होती, व मला लिहिण्यास आनंद वाटतो कीं, ती त्यांनीं अक्षरशः अंमलांत आणिली. चौफेर टीकेचा भडका उडालेला असतांना ट्रस्टींनीं त्याबद्दल कोठेंहि अवाक्षर काढलें नाहीं किंवा लिहिलें नाहीं, याचे कारण ही माझी मनाईच होय ! हायकोर्टाचा निकाल लागेपर्यंत या बाबतींत ट्रस्टींना मूकवृत्ती धारण करण्यास लावण्यांत जर कदाचित् कोणाचा दोष असलाच, तर तो सर्वस्वीं माझाच आहे ! माझ्या या मनाईमुळें ट्रस्टींना दोन तीन वर्षेपर्यंत अनंत मानसिक यातना सहन कराव्या लागल्या याची मला पूर्ण जाणीव होती व आहे. तथापि, कोर्टात दावा चालू असेतोंपर्यंत वर्तमानपत्रांतून या वादाचा खल करणें व दाव्यांतील पुराव्याची विरी घालवून टाकणें चांगलें नव्हे असें वाटून मी केलेली मनाईच इष्ट होती, असें अद्याप मला वाटतें."

असो. १९१० सालीं मी केसरीचा कायम संपादक झाल्यानें माझ्या अधिकारयोगाचा पूर्वार्ध झाला असें म्हणतां येतें. तसेंच १९२० सालीं मी केसरी-संस्थेचा ट्रस्टी झाल्यानें त्या अधिकारयोगाचा उत्तरार्ध पुरा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि ट्रस्ट प्रकरण कोर्टात जाऊन अखेर १९३० सालीं तें कायमचें संपलें यामुळें हा उत्तरार्ध १९३० सालींच खरा संपला असेंहि म्हणतां येईल. या दृष्टीनें ट्रस्टच्या दाव्याच्या निकालापर्यंतची हकीकत याच प्रकरणांत दिली आहे. १९३० पासून पुढें १९३७ च्या आगष्ट महिन्यापर्यंत मी ट्रस्टीचा अधिकार सर्वस्वी निर्विवाद अशा मनस्थितींत भोगला. आणि त्यानंतर तो अधिकार केवळ स्वेच्छेनें सोडून, आतां शुद्ध निरुपाधिक प्रेम व ममत्व या दृष्टीनीं केसरी संस्थेकडे दुरून किंवा जवळून पहाण्याचा आनंद मी भोगीत असतों. म्हणून मला स्वतःला यापुढें फार दिवस आयुष्य लाभलें नाहीं तरी तें केसरी संस्थेला लाभावें अशी प्रार्थना आहे.

# सिंहावलोकन (२)

## १९२० ते १९३८

### (१) असहकारिता पर्व

सन १८९६ पासून १९२० पर्यंत केसरीचा, किंवा मराठ्याचा, किंवा दोहोंचा संपादक मधून मधून असल्यानें, मी एकप्रकारें राजकारणांतच होतों. १९१४ सालीं टिळक मंडालेहून परत आल्यापासून संपादकापेक्षाहि टिळकांचा राजकारणांतील मदतनीस, चिटणीस, किंवा मुखत्यार अशा निरनिराळ्या नात्यांनीं मला राजकारणांत प्रत्यक्ष भाग घ्यावा लागला. तथापि १९२० पर्यंत मी जो भाग घेतला त्याला 'स्वतंत्र' असें विशेषण केव्हांहि लावतां येण्यासारखें नव्हतें हें उघड आहे. स्वतःचें वेगळे कांहीं सुचवावें, चर्चा करावी, किंवा वेळीं थोडाबहुत मतभेदहि दर्शवावा इतके करण्याला मला वाव होता. तसा वाव मी आपण होऊन घेत असे व टिळकहि उदारपणें तो देत असत. परंतु शेवटीं मीं जें कांहीं लिहावयाचें, बोलावयाचें, करावयाचें तें टिळकांच्या मुख्य धोरणाला अनुसरून असलें पाहिजे हें क्रमप्राप्तच होतें.

विलायतेहून परत आल्यावर १९२० सालीं सोलापूर येथील प्रांतिक परिषदेचा अध्यक्ष या नात्याचा अधिकार चार दिवस मला आला तेवढ्यापुरता मी स्वतंत्र आहे असें मला म्हणतां आलें. आणि मतभेदांच्या वादविवादांत ही माझ्या मनाची भूमिका परिषदेंतील लोकांच्या प्रत्ययाला आल्याशिवाय राहिली नाहीं. तथापि माझें स्वातंत्र्य गाजविण्याकरितां परिषदेत वावगें असें मी कांहीं केलें नाहीं. चार वेगळ्या मताचे लोक परिषदेसारख्या ठिकाणीं एकत्र आले असतां, तिचा अध्यक्ष हा कोणत्याहि एका पक्षांतून निवडला असला तरी, कायदे कौन्सिलच्या अध्यक्षाप्रमाणें त्यालाहि म्हणावें लागतें कीं " यां वेळेपुरता मी माझ्या पक्षाचा नाहीं. सर्वांचाच आहे." आणि हे असे नुसते वरकरणी बोलून भागत नाहीं, तर न्यायबुद्धीला अनुसरून थोडेबहूत करावेंच लागतें. सोलापुरास मी तसें केलेहि. पण या परिषदेनंतर अवघ्या तीन महिन्यांतच टिळक निवर्तले, आणि तेथपासून राजकारणांतील स्वतंत्र अशा माझ्या कार्याचा प्रारंभ झाला.

वास्तविक राष्ट्रीय राजकारणांत स्वतंत्र असा कोणीच नसतो. कारण राजकारण हें संघटित असतें. आणि प्रत्येकाच्या स्वातंत्र्याला, तशाच स्वातंत्र्याचा हक्क

असणाऱ्या, इतरांच्या स्वातंत्र्याची मर्यादा पडते. पण मी वर जें स्वतंत्र राजकारण म्हटलें तें थोडेसें केवळ महाराष्ट्र डोळ्यापुढें ठेवून. टिळकानंतर महाराष्ट्रांतील राजकारणाचें पुढारीपण ओघानेंच मजकडे आलें. या वेळीं मला तुल्यबल असा प्रतिपक्षी किंवा प्रतिस्पर्धी दुसरा कोणी नव्हता. टिळकांनीं विलायतेला मलाच सहाय्यक म्हणून नेलें. होमरूल लीगचा चिटणीस मीच होतों. केसरीचें संपादकत्व मजकडेच होतें. प्रांतिक परिषदेचा अध्यक्ष मलाच निवडले. त्यापूर्वी काँग्रेसचा एक चिटणीस म्हणून माझींच निवडणूक १९१८ सालीं झाली. काँग्रेसच्या शिष्टमंडळाचा व्यवस्थापकहि मलाच नेमण्यांत आले. आणि १९२५ सालीं काँग्रेसच्या अध्यक्षपदाकरितां माझें एकच नांव कित्येक प्रांतांकडून सुचविण्यांतहि आलें होतें. या सर्व गोष्टीवरून त्यावेळीं महाराष्ट्राचें पुढारीपण मजकडे होतें हें दिसून येतच होतें. इतकेच नव्हे तर पुढें असहकारितेचें धोरण काँग्रेसनें स्वीकारल्यावरहि, काँग्रेस वर्किंग कमिटीत महाराष्ट्रातर्फे मीच एक सभासद निवडला गेलों. आणि राष्ट्रीय सभेची नवीन अशी पहिली घटना तयार करण्याचें काम विठ्ठलभाई पटेल यांच्याबरोबर गांधींनीं मजकडे सोपविलें, यावरून देखील महाराष्ट्राचें राजकीय पुढारीपण त्यावेळीं मजकडे होते ही गोष्ट दिसून आल्याशिवाय रहात नाहीं.

पण स्वतंत्र राजकारण करण्याच्या पहिल्याच प्रसंगीं एकदम माझ्या वाटेंत असहकारितेचा डोंगर उभा राहिला. आणि तो आतां कसा चढून उतरून जावयाचा याच्या निर्णयानें माझ्या स्वतंत्रबुद्धीच्या परिक्षेची वेळ झाली. यापुढील सतरा वर्षांत मी स्वतंत्रपणें काय केलें हें सांगण्याबरोबर इतर अनेकांशीं मिळून काय केलें हें सांगणेंहि तितकेच यथार्थ होईल. त्या सर्वांचा संकलित वृत्तांत पूर्वी दोन निरनिराळ्या रीतींनें दोन निरनिराळ्या ग्रंथांत मी प्रसिद्ध केला आहे. पहिला ग्रंथ "गेलीं पांच वर्षे" या नांवाचा असून, त्यांत १९२६ पर्यंतचा विषय आला आहे. आणि दुसरा ग्रंथ म्हणजे "समग्र केळकर वाङ्मय" या १२ खंडाच्या ग्रंथांतील पांचवा म्हणजे "असहकारिता खंड". हा सुमारें १२५० पानाचा असून, त्यांत १३ ऑगस्ट १९३७ पर्यंतची याच विषयावरची हकीकत दिली आहे. या विषयावर इतकें लिखाण माझ्या हातून आधींच लिहून झाल्यामुळें येथें पुनः निराळें म्हणून कांहीं लिहिण्याला मन व बुद्धि दोन्ही सहजच बोथट झाली आहेत. नवें असें कांहीं लिहिण्याला नाहीं, व पुनरुक्तिचा कंटाळा येतो. तथापि त्या ग्रंथांतील लिखाण एका दृष्टीनें, म्हणजे

व्यक्तिविषयक टिपणाच्या दृष्टीनें, अपुरें आहे. त्यांतील पुष्कळसे लेख केसरींतील लेख असल्यामुळें त्यातून व्यक्तिविषयक भाग माझा किंवा इतरांचाहि सहजच गाळूनं टाकावा लागला. शिवाय आत्मचरित्ररूप गतगोष्टींचा ग्रंथ म्हटला ह्मणजे त्यांत हा विषय यथाप्रमाण येणारच. म्हणून आवश्यकता व सोय ही दोन्ही डोळ्यापुढें ठेवून प्रस्तुत एकाच प्रकरणांत हा सर्व विषय त्रोटक पण नव्या रूपानें मांडणारं आहे.

अत्यंत महत्त्वाच्या अशा सतरां वर्षांतील अत्यंत महत्त्वाचा असा हा वृतांत असतांहि, त्याला मी देत आहे याहून अधिक वाव देतां येत नाहीं. यावरूनच माझी खरी अडचण वाचक लक्षांत घेतील अशी मला आशा आहे.

असहकारितेशीं महाराष्ट्राचा झगडा १९२० सालीं सुरू झाला तो १९३६ सालापर्यंत टिकला. महाराष्ट्राचा या झगड्यांत जितका संबंध आला तितकाच सूत्ररूपानें या खालीं देतों. मात्र महाराष्ट्राचा म्हणून जो संबंध सांगितला तो या झगड्यापुरता व्यक्तिशः माझाहि आहे असें म्हणतां येईल.

महाराष्ट्रांत माझें पुढारीपण इतर कोणत्या दृष्टीनें कोणी मानो वा न मानो परंतु हा झगडा इतकी वर्षे चालविल्याबद्दल ज्या अर्थी गांधीचे अनुयायी मलाच दोष देतात त्या अर्थी ह्या झगड्यांत शेवटी मिळालेलें यश माझ्या पदरांत टाकावें हें ओघानेंच प्राप्त होतें. हा झगडा चालविणें ही जर कांहींच्या मतें माझी चूक होती, तर असहकारितेचा विरोधी पुढारी मीच ठरतो. आणि हें पुढारीपण मी सोळा वर्षें चालवून गांधी-विरोधाचें निशाण माझ्या हातीं ठेवलें हें कांहींच्या मतें मला भूषणास्पद झालें आहे. सोळा वर्षांच्या अंतीं असहकारिता मागें पडून प्रतिसहकारितेचें तत्त्व उदयास आलें यांचें श्रेय गांधीभक्त मला न कां देईनात, परंतु त्या तत्त्वांचा त्यांनीं आतां अंगीकार केला यांतच मला समाधान वाटतें. "आपण चुकी करीत होतो व दुसरा बरोबर होता" हें कोणत्या राजकीय पक्षानें आपल्या प्रतिपक्षाविषयीं जगांत आजवर कबूल केले आहे ? म्हणून तो वाद सोडून देऊन महाराष्ट्रापुरता असहकारितेचा षोडशवर्षात्मक वृत्तांत तेवढा सूत्ररूपानें खालीं देतों. तो असा :—

मोहनदास गांधी यांनीं दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रहाच्या तत्त्वाचा प्रथम उपयोग केला, तो प्रयोग जगाच्या डोळ्यांत भरण्यासारखा झाला. परंतु त्यांतून फारशी फलश्रुति पदरांत पडली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या चळवळीच्या अखेर

तींत सामील झालेल्या लोकांमध्यें दुमत झालें, आणि प्रतिपक्षाच्या हातून गांधींना प्रत्यक्ष मार खावा लागला. शिवाय एखादी चळवळ सुरू करावयाची आणि ती अनपेक्षित रीतीनें लहरीपणानें मागें घ्यावयाची हा गांधींच्या स्वभावांतील दोष या सत्याग्रहाच्या चळवळीत दिसून आला. त्या चळवळीचें बीज मनांत ठेऊन गांधी इकडे आले. परंतु पुढें पांच सहा वर्षेपर्यंत साम्राज्यविरोधी चळवळ अशी त्यांनीं कांहीं केली नाहीं. उलट पूर्वी बोअर युद्धाप्रमाणें गेल्या महायुद्धांतहि त्यांनीं साम्राज्याला मनोभावानें मदत केली. हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं बिहार प्रांतांत चंपारण्यामध्यें प्रथम राजकीय चळवळ केली, ती साम्राज्य विरोधी नव्हती. परंतु सरकारी आज्ञाभंगाचें तत्त्व या चळवळींत त्यांनीं अनुसरल्यामुळें तिला तीव्र राजकीय स्वरूप आलें. सरकारनेंहि यांत भर घातली ती अशी कीं, गांधींच्या हालचालींना ठिकठिकाणीं विनाकारण प्रतिबंध केला. आणि तो प्रतिबंध न जुमानण्याचा क्रम गांधींनीं ठेवल्यामुळें घर्षण उत्पन्न झालें. लोक मोठमोठ्या समुदायांनीं सभा भरवूं लागले, सरकारचा निषेध करूं लागले, त्याला प्रतिबंध होऊं लागला, त्याचें निवारण करण्यांत कांहीं अत्याचार झाले, त्यांना सरकारनें सहेतुक रीतीनें विकृत स्वरूप देऊन बेसुमार दडपशाही केली व उलट अत्याचार केले. तथापि गांधींच्या चळवळीला अद्यापि असहकारितेचें रूप आलेलें नव्हतें.

ही स्थिति १९१९ मध्यें अमृतसर येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेपर्यंत टिकली. परंतु पुढें गांधींना काय लहर आली कोणास ठाऊक, त्यांनीं सत्याग्रहाचें रूपांतर सार्वत्रिक असहकारितेंत केलें. लो. टिळकांना असहकारितेचें तत्त्व मुळींच मान्य नव्हतें. व हें त्यांचें मत त्यांनीं आपल्या मृत्यूपर्यंत एकसारखें प्रगट करण्याचें चालूं ठेवलें होतें. पण कलकत्त्याच्या जादा राष्ट्रीय सभेंत असहकारितेचा ठराव अनपेक्षित रीतीनें मंजूर झाला. खिंडींत गांठल्याप्रमाणें गांधींनीं कॉंग्रेसनिष्ठेचें हत्यार तिच्या भक्तांवर चालवून, त्यांच्यावर असहकारिता लादली. वास्तविक ते स्वतः राष्ट्रीय सभेशीं कधीं निष्ठावंत नव्हते व नाहींत. आपलें म्हणणें कॉंग्रेसला पटविण्यापूर्वीच त्यांनीं व्यक्तिशः अधिकारावर असहकारितेचा फैलाव सुरू केला होता, व जादा राष्ट्रीय सभेनें ती गांधीपासून दत्तक घेतली.

गांधीपेक्षांहि महाराष्ट्राची कॉंग्रेसनिष्ठा अधिक प्रबल, म्हणून कलकत्त्याच्या सभेचा ठराव महाराष्ट्रानें मान्य केला. पण तसें करतांना आपण तो ठराव निष्ठेच्या

जुलमानें मान्य करीत आहों अशी घोषणाहि केली. आणि त्याप्रमाणें अवघ्या १।–१॥ वर्षांतच महाराष्ट्रानें असहकारितेविरुद्ध आपला मतप्रचार सुरू केला. वसई, पेण, येथें भरलेल्या परिषदांतून महाराष्ट्राच्या विरोधानें प्रथम थोडेसें डोकें वर काढलें. पण पुढें लवकरच अकोला परिषदेंत असहकारितेविरुद्ध आपलें निशाण उभारलें. स्वतः गांधीचे स्वभावदोषहि या विरोधी चळवळीला उपकारकच ठरले. अहसकारितेनें एक वर्षांत स्वराज्य मिळविण्याची त्यांची घोषणा निष्फळ ठरून त्या घोषणेची थट्टा जनतेला उघडपणें करतां येऊं लागली. लॉर्ड रीडिंग यांनीं सामोपचाराची तयारी दर्शविली असतां ती आपल्याच तोऱ्यांत झिडकारून आपल्याजवळ मुत्सद्देगिरी नाहीं हें जसें गांधींनीं प्रगट केलें, तसेच बार्डोलीचा बार विनाकारण भरून तो फुसका ठरवून, भलते कारण भलत्याला लावून, पूर्वी सांगितल्याप्रमाणें " चळवळ करण्याला उशीर नाहीं व ती मागें घेण्यालाहि उशीर नाहीं " हा जो आपला स्वभावदोष तो गांधींनी पुनः एकवार जगाच्या प्रत्ययाला आणला. अवघ्या दीड वर्षांत सरकारानें गांधींचें पाणी जोखलें व त्यांच्या अंगावर हात टाकला. म्हणजे त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरून सहा वर्षांची शिक्षा दिली. यामुळें जगांत गांधींचें नाव झालें. पण असहकारितेचें तत्त्व यशस्वी झालें असें मात्र जगानें मानलें नाही.

पण जगानेंच कशाला? खुद्द गांधींच्या अनुयायांतहि ही चळवळ आहे तशीच चालविण्याविषयीं मतभेद दिसून आला. कायदेभंग थांबवावा अशा सूचना पुढें येऊन त्यांचा विचार करण्याकरितां कमिटी नेमण्यांत आली. तिनें सर्व देशभर दौरा काढला. कमिटीच्या सभासदांत अखेरचा निर्णय करतांना मतभेद झाला. निम्या लोकांनीं कायदेकौंसिलावरील बहिष्कार उठवावा अशी शिफारस करून असहकारितेच्या तत्त्वाचें कंबरडें मोडलें. पण स्वतः गांधी कांहीं केल्या आपला हट्ट सोडीनात आणि त्यांना गुरुबोवा मानणारे कांहीं अंधभक्त मिळाल्यामुळें, नाफेरवाल्यांचा म्हणून एक वेगळा कंपू तयार झाला. नामांकित व महत्त्वाचे असे पुढारी, गांधींचे अनुयायी म्हणविणारांपैकींहि, फेरवाल्या पक्षांत समाविष्ट झाले. गांधींना विधायक कार्यक्रमाशिवाय दुसरें कांहीं राजकारण उरलें नाहीं; व ते तेवढेंच घेऊन एका बाजूस उदास व रंजीस असे होऊन बसले. तथापि खुद्द राष्ट्रीय सभेकडून कौंसिलप्रवेशाला आज्ञा मिळविण्याची वेळ अद्यापि आली नव्हती. म्हणून नाफेरवाल्या गांधीभक्तांनीं उपेक्षावृत्ति दाखवावी, आणि फेरवाल्या गांधीभक्तांनीं

भक्त नसलेल्या अशा इतर पक्षांशीं मिळून कौसिलप्रवेश करावा, मात्र नाफेरवाल्यांना त्यांत ओढूं नये, असा एकप्रकारचा तह उभयतांमध्यें ठरला. (१९२४)

फेरवाल्या कौंसिलवादी लोकांनाहि स्वतःला काँग्रेसवाले म्हणवून घेण्याचा हक्क होता. तो नाफेरवाल्यांना नाकबूल करता येत नव्हता. म्हणून इकडे गांधी कौंसिलप्रवेशाला मनानें प्रतिकूल असतां त्यांनीं फेरवाल्यांकडे कानाडोळा करावा, आणि फेरवाल्यांनीं गांधींच्या विधायक कार्यक्रमाला संमतीचा करभार देऊन कौंसिलप्रवेशाचें आपलें कार्य साधावें अशी तडजोड ठरली. या तडजोडींतून स्वराज्य पक्ष निर्माण झाला. त्यानें देशभर निवडणुकी जिंकून प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांत आपलें प्रस्थ बसविलें. पुढे कौसिलांतील कार्य करतांना सहजच त्याच्या अनुभवाला असें आलें कीं, "सरकाराला अडथळा करण्याची इच्छा खरीच व राष्ट्रीय बुद्धीनें सरकाराला विरोध करकरूनच पाऊल पुढें पडावयाचें; पण या विरोधी साहचर्यांत साधेल तेथें देशहित पदरांत पाडून घेतांना सरकाराशीं सहकारिताहि करावी लागल्यास तेवढ्यापुरती ती सदोष मानूं नये." याचा अर्थ काँग्रेस स्वराज्य पक्षाच्या निशाणाच्या एका बाजूला "अडथळा व विरोध" अशी अक्षरें लिहिलीं असलीं तरी त्याचेच प्रतिशब्द म्हणून दुसऱ्या बाजूला "प्रतिसहकारिता" हीं अक्षरें लिहिलेलीं होतीं.

सरकारनें नेमलेल्या मंडळांतून, कामिट्यांतून, कार्यसाधूपणानें प्रवेश करण्याला स्वराज्यपक्षानें हळुहळू सुरुवात केली. (१९२५) यानंतर सरकारनें एखादी मोठी अधिकाराची जागा लोकपक्षांतील पुढाऱ्यांना दिली असतां तिचाहि उपयोग याच कार्यसाधू दृष्टीनें करावा कीं नाहीं असा एक वेगळा प्रश्न उत्पन्न झाला. तेव्हां महाराष्ट्राने प्रतिसहकारतत्त्वाचा अवलंब केला. पण स्वराज्यपक्षाला हे तेव्हां न आवडल्यामुळें महाराष्ट्राला त्यांतून फुटून निघावें लागलें. (१९२५) कौन्सिलप्रवेशाचें तत्त्व प्रयत्नानें पदरांत पाडून घेतल्यावर अधिकारग्रहणाचें तत्त्व ओघानेंच त्यांतून निघणारें होतें. या मुद्दयावर महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं उघडपणें प्रतिसहकारपक्ष म्हणून स्वतंत्र पक्षच स्थापला. आणि कौन्सिलप्रवेशाची चळवळ या विस्तृत स्वरूपांत पुढें चालू ठेविली. पूर्वी नाफेरवाल्यापेक्षां फेरवाल्यांना लोकमत अधिक अनुकूल आहे असें स्वराज्यपक्ष-स्थापनेच्या वेळीं दिसून आलें, तसेंच यापुढें स्वराज्य पक्षांतील नाफेरवाल्यापेक्षां त्या पक्षांतील फेरवाल्यांना लोकमत अधिक अनुकूल

आहे असेच कौन्सिल निवडणुकीच्या द्वारें दिसून आलें. (१९२६) हें पाहून मूळच्या नाफेरवाल्यांनीं मूळच्या फेरवाल्यांशीं अधिकाधिक जुळतें घेण्याचें आरंभिलें. जणुं कांहीं कौन्सिलप्रवेशाचा वाद शिल्लक उरला नाहीं, असें भासण्याइतक्या उघड रीतीनें, नाफेरवाला पक्ष कौन्सिलांतील स्वकीयांच्या द्वारे आपल्या विधायक व इतर कार्यक्रमाला मिळेल तो फायदा मिळवून घेऊं लागला. आणि एकटे गांधी आणि त्यांच्याभोवती घेर धरून बसणारे पांच-चार कट्टर नाफेरवाले इतकीच मंडळी एक लहानसा गट करून कौन्सिलविरोधाचा बहाणा चालविणारी उरली. (१९२७)

गांधींनी जवळ जवळ कॉंग्रेस सोडून दिली व असे भासविलें की, " तुमचें तुम्ही करा, माझे मी करीन. दोघेहि बरोबर आहों. म्हणून आपापल्या कार्याचा आनंद दोघांनीहि भोगावा." अशा रीतीनें कौन्सिलप्रवेश निर्वेध झाल्यानें स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांनी साम्राज्यांतर्गतच स्वराज्य मागण्यापर्यंत असहकारितेची तार ढिली करून सर्वपक्षीय म्हणून एक स्वराज्यघटना तयार केली. (१९२८) परंतु बापाच्या मुलावर मुलगा यावा त्याप्रमाणें ही घटना राष्ट्रीय सभेनें नामंजूर करून प्रत्यक्ष स्वातंत्र्याची घोषणा केली. (१९२९) स्वातंत्र्यबुद्धीचा पुरावा म्हणून गोलमेज परिषदेचें निमंत्रण धिक्कारून कौन्सिलप्रवेश रद्द केला आणि कायदेभंग सुरू केला. (१९३०)

१९३० सालीं पहिली कायदेभंगाची मोहीम झाली. पण स्वातंत्र्याचा ठराव बदलला नव्हता तरी गांधींनी लॉर्ड आयर्विन यांशी स्वतंत्र तह करून गोलमेज परिषदेचें निमंत्रण स्वीकारलें. आणि या लहरीपणाच्या भरीला गोलमेज परिषदेत (१९३१) अत्यंत बिनमुत्सद्दीगिरीचें वर्तन ठेवलें. १९३२ सालीं कांहीं योग्य कारण नवें घडलें नसतां, किंबहुना गांधींच्या मनांत नसतां दुसऱ्या कोणाच्या चिथावणीनें, गांधींनीं कायदेभंगाची दुसरी मोहीम सुरू केली. या दोन्ही मोहिमांत हजारों लोक सामील झालें. त्यांतच प्रतिसहकारवादी कांहीं महाराष्ट्रीय पुढारीहि ध्येयभावनेनें सामील झालें. तथापि त्यांनीं आपला कौन्सिलप्रवेशाचा हक्क मात्र सोडला नव्हता. या दोन मोहिमांत गांधींना जनता वश आहे असें दिसून आलें तरी स्वतः गांधींना हें दिसून आले कीं, ही जनता हें एक बाजारबुणगें किंवा पेंढार आहे. आपल्या तीक्ष्ण ध्येयाच्या कसोटीला म्हणजे सत्य काय किंवा अहिंसा काय यांच्या कसोटी-ला उतरणारें नाहीं. यामुळें " कायदेभंगाची चळवळ थांबवून पूर्वीच्या अमृतसर येथील राष्ट्रीय सभेच्या घोरणाचा म्हणजे शुद्ध प्रतिसहकारितेचा अवलंब करून

लोकांना विधायक राजकारणाच्या मार्गावर घालावें " असें गांधींचा 'आंतला आवाज' म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराचा आवाज त्यांना सांगूं लागला! (१९३३-३४) त्यांचा कट्टर नाफेरवाला परिवारहि मनांतून या गोष्टीला नुसता अनुकूलच नव्हे तर आतूरहि झाला होता. गांधींनी भासविलें कीं, " माझे अनुयायी बोलूनचालून मूर्ख म्हणजे कौन्सिलप्रवेशाच्या मोहांतून न सुटणारे, म्हणून त्यांच्या छंदानुरोधानेंच मी हें परिवर्तन घडवून आणीत आहे." (१९३५) गांधींच्या अनुयायांनाहि ही पडत्या फळाची आज्ञा इष्टच होती. यामुळे त्यांनी कायदेमंडळाची झाडे हलवून नांवानें 'पडलेलीं' फळें खाण्याची हौस पोटभर पुरवून घेतली. (१९३६) आणि जनताहि कौन्सिलप्रवेशाला आतूर झालेली असल्यामुळे तिनें गांधीभक्तांना सर्वत्र आश्रय व पाठिंबा देऊन बहुतेक सर्व प्रांतांतून प्रचंड बहुमतानें निवडून दिलें, आणि त्यामुळें प्रधानमंडळें काँग्रेसला स्थापन करतां आली. (१९३७)

हें घडून येत असतां स्वातंत्र्यप्रेम, साम्राज्यविरोध, स्वयंनिर्णय, घटनाभंग इत्यादि मोठमोठ्या तत्त्वांची आठवण राष्ट्रीय सभेला क्षणभर बाजूला ठेवावी लागली. दक्षिणेचा सूर्य उत्तरेला जावा त्याप्रमाणें घडून राजकीय धोरणाचें ऋतुमान बदललें. पूर्वी ज्यांना कौन्सिल हा नरक वाटत होता त्यांनाच तो आतां मोक्ष किंवा निदान स्वर्गलोक तरी वाटूं लागला ! ज्यांना कौन्सिलें हीं मायागृहें वाटत होती त्यांनाच ती आतां त्रिवार सत्यसृष्टि वाटूं लागली ! कौन्सिलांचें स्मशान-चितेचें स्वरूप जाऊन त्याला मंगलदायक होमकुंडाचें स्वरूप आलें ! सर्व प्रकारचा अविधि हा विधि ठरला ! असूक्त सूक्त ठरलें ! अधोगति ही उन्नति वाटूं लागली ! आणि संन्याशाचा कर्मयोगी बनला ! असहकारितेच्या सुरवंटांतून फुलपाखरूं बाहेर पडलें, त्याला नाचण्या बागडण्याला जग अपुरें भासूं लागलें ! तात्पर्य, यक्षिणीनें कांडी फिरवावी त्याप्रमाणें गांधी व त्यांचे अनुयायी यांची लोककल्याणाची दृष्टि दक्षिणध्रुवावरून निघून उत्तरध्रुवावर येऊन बसली.

या सोळा-सतरा वर्षांच्या अवधींत महाराष्ट्रानें मात्र एखाद्या होकायंत्रांतील कांट्याप्रमाणें आपली दृष्टि या उत्तरध्रुवाकडेच रोखून ठेविली होती. आणि तिला धक्के देऊन चंचलत्व आणण्यासारख्या अनेक गोष्टी घडल्या तरी, त्यानें आपला दृष्टि-कोन केव्हां कलेअर्धकलेनें दुसरीकडे फिरविला तरी फिरून आपला स्थिति-स्थापकत्वाचा गुण अबाधितच ठेवला. असो. ह्याच विषय आतां थोडासा खुलासे-वार रीतीनें मांडतों.

या प्रकरणाला प्रारंभ करणें तो म. गांधी यांनी लो. टिळकांना लिहिलेल्या एका 'हिंदी' पत्रानेंच केलेला बरा. कारण या पत्रांत गांधी यांनीं काँग्रेस व तिच्यांतील मवाळ व जहालपक्ष यांच्या संबंधाचें आपलें धोरण प्रथमच प्रगट केलें असें वाटतें. मॉंटेग्यू चेल्म्सफर्ड सुधारणांचा स्वीकार करावा, पण त्या पूर्णपणें पदरांत पडण्यास जरूर तर सत्याग्रह करावा, असें गांधींचें धोरण या पत्रांत प्रगट झालेलें दिसतें. हें पत्र असेः—

अहमदाबाद श्रावण कृष्ण २

**लोकमान्य टिळक महाराज**

"आपका खत मिला है. आपकी दिल मोजीसे मे अनुगृहीत हुआ हुं. मेरे स्वास्थ्यके लिये आप क्यौं चिंतित न होगे? ईश्वर कृपासे मेरी तबिअत अब ठीक है. बिछाना तो मै थोडे रोजतक नहि छोड सकुंगा. बडा दर्द रहा था वह अभी शांत हुआ.

"कॉंग्रेसमे मेरा आनेका बिलकुल इरादा है नहि. नरम दलकी संमेलनमेभी जानेका इरादा है नहि. मै देखता हूं मेरा अभिप्राय दोनोंसे विचित्र. आपको मैने बतला दिया है मेरा मंतव्य है इस समय युद्ध की भरती मे हम अब जानेसे, लाखोंको लेजानेसे, हिंदुस्थान की बडी भारी सेवा कर सकते है, और हमारा साध्य—जो स्वराज्य है—उसकी प्राप्ती हम एकदम कर सकते है. मेरी इसराय में आप और मिसीस बेझंट संमिलित नहि है. मै जानता हूं नरम दलवाले भी इस कार्य में तीव्रतासे मपगुल नहि होगे. यह तो एक बात रही. मेरी दुसरी राय है मॉंटेग्यू चेम्सफर्ड योजना का तत्व का ग्रहण करना और उस मे जो कुछ सुधारा हम चाहते है वह सुधारा साफ बतादेना. और जो सुधारा हम बतालावेंगे उसका स्वीकार करने के लिये मरणपर्यंत लडना. इस सूत्र का नरम दल स्वीकार नहि करेगे यह तो स्पष्ट है. यदि आप और मिसीस बेझंट स्वीकार करेंगे तोभि जिस तरहसें मै लढना चाहता हूं वैसा तो आप नहि लढोगे. मिसीस बेझंटने कहदिया है की वह सत्याग्रही नहि है. आपने एक दुर्बलो कां हथियार सत्याग्रह का स्वीस्कार किया है. इस भ्रमणमे मै पडना नहि चाहता हूं. और आप दोनोसे विमुख होकर कॉंग्रेस मे आंदोलन करना नहि चाहता हूं. मेरे सूत्रपर मेरा आत्यंतिक विश्वास है, और मेरा यहभी मंतव्य है की यदि मेरी तपश्चर्या संपूर्ण होगी तो आप और मिसीस बेझंट भी मेरा सूत्र का स्वीकार करेंगे. मै धैर्य रखसकता हूं.

"नरम और गरम दल उस की थोडी बातो को छोडकर संमिलित होजाने की चेष्टा करे यह मुझ को बिलकूल पसंद नहि है. देश मे दो पक्ष है. दोनो पक्षो की राय साफ साफ प्रजा को और राजा को बताने मे कुछभी हानी होगी ऐसा मै मानता नहि हूं. गरम-दल और नरम दलको मिलने की चेष्टा करना मुझ को बिलकूल पसंत नहि है. दोनो पक्ष दृढतासे उसकी राय राजा प्रजा की समक्ष रखेंगे तो बडा फायदा पोहुचेगा."

" आपके कार्य मे प्रभु आपको साहाय्य हो."

**मोहनदास गांधी**

सन १९१९ सालच्या डिसेंबरांत अमृतसर येथे झालेल्या राष्ट्रीय सभेंत मॉंटेग्यू पुरस्कृत सुधारणांचें बिल 'अपुरें, असमाधानकारक, आणि आशेची निराशा करणारें' आहे इतकेंच म्हटलें होतें. टिळकांच्या आग्रहावरून हा शेवटचा शब्द घातला होता; तथापि त्या सौम्य शब्दालाहि नेमस्तच काय पण महात्मा गांधीहि नाराज होते. त्यांना तोहि शब्द जहाल वाटला. शिवाय 'या कायद्यावर बहिष्कार घाला' असे शब्द नसून 'दिलेल्या हक्कांचा उपयोग करा' असेंच म्हटलें होतें. या पूर्वी गांधी हें सत्याग्रहाचें तत्त्व आफ्रिकेंत कसाला लावून घेऊन इकडे आले होते. आणि टिळक विलायतेस जाण्यापूर्वी मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटींत या तत्त्वाची कसून चर्चा झाली होती. या विषयावर मुंबईचे श्री. नारायणराव समर्थ व मी या दोघांनीं एक एक निबंध लिहून प्रांतिक कॉंग्रेस कमिटीपुढें मांडला होता. त्यांत सत्याग्रहाचें तात्त्विक विवेचन होतें. १९०७ सालीं ना. गोखल्यांनीं प्रजेच्या हक्काची मर्यादा वाढल्यास कर न देण्यापर्यंतहि जाऊं शकते असे म्हटले होतें तें समर्थ यांनीं मान्य केलें होतें. पण हिंदुस्थान ही आफ्रिका नव्हे असे दर्शवून समर्थांनी सत्याग्रहाला अव्यवहार्य ठरविलें. माझा निबंध सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत छापला आहे. त्यांत मी असें प्रतिपादन केलें आहे कीं, कोणताहि एखादा सरकारी हुकूम अन्यायाचा असेल तर, त्यापुरता तो शांततेनें मोडून त्याला विरोध करणें याचें नांव सत्याग्रह. पण हा सत्याग्रह केव्हांहि निश्चित अशा एका मुद्यापुरता करावा, त्याला संकीर्ण स्वरूप असूं नये, यावर मी आपणाकडून विशेष भर दिला होता. आणि तसें असल्यास मग कोणी, कोठें, केव्हां, व काय हें प्रश्न उद्भवत नाहींत असें मी प्रतिपादिलें होतें. याचा अर्थ असा कीं, गांधी सारख्यांनीं किंवा इतर कोणी

सत्याग्रहाचा नक्की एकच मुद्दा हातीं घेतला तर, आणि त्यांतील अन्याय सर्वांना अमान्य असेल तर, सत्याग्रह करणें योग्य होईल व तो करणाराला इतरांनीं सहाय्य करावें. पण त्यावेळीं कायदे कौंसिल वरील बहिष्कार अशा सत्याग्रहांत येतो अशी कल्पना गांधींच्याहि मनांत नव्हती मग आमच्या मनांत ती कोठून असणार ? कायदे कौंसिलच्या निवडणुकी करण्याचा जाहीरनामा निघाला तर तो सक्तिचा अन्यायाचा हुकूम होत नाहीं, म्हणून कौंसिल बहिष्कार हा सत्याग्रह होत नाहीं, हें कोणीहि कबूल करतील. पण जे गांधी अमृतसरच्या राष्ट्रीय सभेंत 'निराशाजनक' या शब्दाला तो जहाल म्हणून चिचकले, यांनीं अवघ्या सात महिन्यांत दुसऱ्या टोंकाला धांव घेतली. आणि सामुदायिक, सार्वत्रिक, सर्वंकष, सर्वसंग्राहक, अशा असहकारितेवर आपलें ठाणें नेऊन बसविलें.

१९२० च्या जून-जुलैत, टिळक वारण्यापूर्वी, सत्याग्रहाचे प्रयोग मुंबईस गांधींचे कांहीं अनुयायी करूं लागले. ते एखाद्या विवक्षित मुद्यापुरते होते. पण गांधींच्या मनांत अधिक व्यापक प्रेरणा कशी झाली न कळे. 'सत्याग्रह' हा शब्द सुटून 'असहकारिता' हा शब्द पुढें आला. त्याची कल्पना टिळकांना अमान्य होती. यामुळें मुंबईस शेवटच्या दुखण्यांत, आंथरुणाला खिळले असतां शुद्धींतील बोलण्यांत व बरळण्यांतहि, गांधींच्या नव्या धोरणाच्या निषेध टिळकांच्या तोंडून निघत असे. गांधी टिळकांना भेटण्याकरितां आले तेव्हां टिळक बेशुद्ध व आसन्नमरण होते. अर्थात् उभयतांचें बोलणें कसें होणार ? टिळक मध्यरात्रीं वारले. दुसरें दिवशी सकाळी असहकारितेचा जन्म झाला. दरम्यान या मधल्या सहा तासांत टिळकांचें शव पांघरूण घालून ठेवल्यावर, अजून रात्र आहे म्हणून, सरदार गृहांत टिळकांचे प्रमुख अनुयायी एका खोलींत दारें लावून चर्चा करीत बसले. त्यांत असे ठरलें की, केळकरांना केसरीचे सर्वाधिकारी व महाराष्ट्राचे पुढारी म्हणून मानावें; परंतु राजकारणांतील जें धोरण म्हणून या पुढें ठरवावयाचें तें कर्नाटक, पुणें महाराष्ट्र, वऱ्हाड महाराष्ट्र, व नागपूर महाराष्ट्र या सर्वांचें एकच राहील असें असावें. या करितां पांच चार प्रमुख गृहस्थांचें एक मंडळ नेमण्यांत यावें, व या मंडळाच्या धोरणाप्रमाणें सर्वांनीं वागावें.

या पूर्वी विपिन पाल बाबूनीं कोलांटी खाऊन आमच्या राष्ट्रीय पक्षावर टीकास्त्र धरलें होतें. ते म्हणत, "शक्य तर सहकारिता व अशक्य तर असहकारिता या म्हणण्यांत अर्थ नाहीं. प्रतिसहकारी धोरण हें शरणागतीचेंच धोरण होय." म्हणून

मी ता. २९ जून, १३ जुलै, व २७ जुलै १९२० च्या केसरीच्या तीन अंकांत राष्ट्रीय पक्षाच्या धोरणाची सूक्ष्म चर्चा केली ती सर्वांना पसंत पडली होती. आणि टिळकांचें 'प्रतिसहकारी' राष्ट्रीय धोरण हेंच पुढें चालवावें असें सरदारगृहांत नेमलेल्या मंडळानेंहि निश्चित केलें.

टिळकांच्या मृत्यूच्या दिवशीं केसरीसंबंधानें जसें आम्हाला आभाळ फाटल्यासारखें वाटलें तसेंच राजकारणांतहि वाटलें. टिळक असत तोंपर्यंत महाराष्ट्रांतलेच काय पण इतर कांहीं प्रांतांतलेंहि राजकारण त्यांच्या तंत्रानें चालें. पण ते निवर्तल्यावर महाराष्ट्रांतच काय पण इतर प्रांतांतहि दुफळ्या माजतील अशी भीति वाटत होती. आणि खरोखर दुफळी पडण्यासारखेंच राजकारणाचें एक नवें धोरण टिळकांच्या मृत्यूच्या दिवशींच महात्मा गांधी यांनीं जाहीर केलें. व्यक्ति या नात्यानें गांधीविषयीं टिळकांना आदर होता. तथापि राजकारणांतील धोरणासंबंधानें गांधींच्यावर टिळकांचा विश्वास नव्हता. याचा अर्थ गांधी हे अप्रामाणिक असे टिळकांना वाटत होते हा नव्हे. तर याच्या उलट गांधी हे फारच फार प्रामाणिक असे टिळकांना वाटत होते ! मग प्रामाणिकपणा हा दोष मानावयाचा कीं काय ? तर तसें नाहीं. प्रामाणिकपणा हा गुण खरा, पण गांधींचा प्रामाणिकपणा स्थिरबुद्धीवर अधिष्ठित नसल्यामुळें, त्यांच्या प्रामाणिकपणाला इतकें चंचलपणाचें स्वरूप येऊं शकेल कीं अखिल जनतेला तें पटणार किंवा पचणार नाहीं. टिळकांना वाटे कीं गांधी हे एखादेवेळीं सरकाराशीं इतक्या साळसूदपणानें, इतक्या सढळपणानें, किंवा इतक्या सौम्यपणानें वागतील कीं, लोकांना तो फार मवाळपणा वाटेल. उलट एखादेवेळीं ते इतका तीव्रपणा स्वतःस्वीकारून लोकांच्याहि मागें तो लावतील कीं त्यांना त्याचें सोंगहि पार पाडतां पाडतां कठिण जाईल, व कांहींच्या मनांत त्या तीव्रपणाच्या भीतीनेंच विद्वेष उत्पन्न होईल. टिळकांचें सर्वसाधारण धोरण असें कीं, लोकांच्यापुढें फार तर चार पावलें उभे राहून त्यांच्याकडे मागें वळून पहावें व मजबरोबर चला असें त्यांना म्हणावें. म्हणजे लोक तेवढी चार पावलें चालून आपणाबरोबर येतील. उलट गांधीच्यासारखें सत्याग्रहाचें अंतिम धोरण स्वीकारलें, व त्यांतहि सत्य या शब्दाच्या अर्थाची अतिशयोक्ति केली, तर लोकांच्या हातून तें व्रत चांगलें पाळलें जाणार नाहीं; व लोकांचा दुर्बळपणा निष्कारण सरकाराच्या नजरेस पडेल. गांधीप्रमाणें टिळकांच्या राजकारणाला सद्गुणसंवर्धनाचें स्वरूप नव्हतें. कामकरी माणसाच्या मागें त्याच्या व्यक्तिनिष्ठ गुणांची चिकित्सा किंवा

प्रतिज्ञापालनाचें शुक्लकाष्ठ लावावें असें धोरण नव्हतें. तात्पर्य, गांधींच्या राजकारणांत जो चंचलपणा, अनिश्चितपणा, व विशेषतः तऱ्हेवाईकपणा दिसे तो टिळकांना कसासाच वाटे. यामुळें गांधी हे जरी एखाद्या पंथाचे पुढारी होऊन आपलें व्यक्तित्व राजकारणांतहि चांगले पटवितील, तरी पण अखिल जनतेचे ते पुढारी होतील कीं नाहीं याविषयीं टिळकांना शंका वाटे. त्यांतूनहि गांधी हे कै. गोखल्यांचे शिष्य म्हणवीत; व तोंडानें जहाल राजकारण बोलत असतांहि मवाळ पक्षांतील पुढाऱ्यांशींच अधिक घसट व मैत्री असल्याचें दाखवीत. यामुळें गांधी हे आपले कीं परके असा प्रश्न मनापुढें उत्पन्न झाला असतां, 'ते आपले नव्हत' असेंच टिळकांना वाटे. दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रह प्रवर्तविणारे गांधी अमृतसरच्या राष्ट्रीयसभेंत सुधारणांच्या कायद्याला नुसतें निराशाजनक असेंहि विशेषण लावूं नका असें म्हणतात, या दोन गोष्टींचा मेळ कसा घालावा ? निदान लहरीपणा हें कारण धरल्याशिवाय तो मेळ कसा घालावा याचें टिळकांना मोठे गूढ पडलें होतें. तसेंच टिळकांचें धोरण अत्याचारांना फार अनुकूल आहे असे गांधी समजत असल्याची वदंता टिळकांच्या कानावर होती. आणि अहिंसावादी या नांवाचा पक्ष प्रचलित राष्ट्रीय-पक्षाला नामोहरम करून, किंवा त्याची एकप्रकारें बेअब्रू करून, किंवा तें करण्याकरितांच, 'सत्यमिश्रित अहिंसा' या तत्त्वाचा पक्ष गांधी हे काढण्याच्या विचारांत आहेत पण यामुळें दुफळी झाल्याशिवाय राहाणार नाही, अशीहि भीति टिळकांना वाटत असे.

अशा प्रकारचीं ही दोन मोठी माणसें आणि अशा प्रकारचीं हीं त्यांचीं दोन मतें ! अशी अनिष्ट स्थिति असतांहि टिळक स्वतः जिवंत असते तर गोष्ट वेगळी होती. गांधींच्या बरोबरीनें आपला पक्ष लढविण्याकरितां, इतर प्रांतांतील पुढाऱ्यांच्याकडून जें बळ मिळावयास पाहिजे तें मिळविण्याइतका, टिळकांचा दाब निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांवर होता. पण ते गेल्यानें आतां सर्व भार दुय्यम पुढाऱ्यांवरच पडला. म्हणून या अडचणींतून एकमुखानें मार्ग कसा निघेल याविषयीं आम्हा मंडळींना सहजच चिंता वाटू लागली. दासबाबू हे टिळकांचे ऐकण्यासारखे. पण ते आमचे ऐकतील कशावरून ? कारण टिळकांमागें उरलेल्या कोणत्याहि राष्ट्रीय पक्षांतील पुढाऱ्याच्या मानानें वडीलकीचा मान त्यांच्याचकडे जात होता. दुसऱ्या बाजूस गांधी व मोतीलाल नेहरू. यांची मैत्री अनेक कारणांनीं बळावत गेली होती. पंजाबांतील अत्याचार प्रकरणामुळें लोकांचें लक्ष इतर प्रांतांतून निघून पंजाबाकडे सहजच वळलें होतें. आणि वातावरणांत मोठी क्रान्ति

व्हावयाची असतां कोठें तरी एके ठिकाणीं त्या क्रान्तीचा मध्यबिन्दू बनून राहातो, व आसपासची हवा तो आपल्याकडे ओढून घेतो, त्याप्रमाणें नेहरू व गांधी या जोडीनें इतर प्रान्तांतले वातावरण आपणाकडे ओढून घेण्यास प्रारंभ केला होता.

या सर्व गोष्टी तपशीलवार सांगण्याचें कारण इतकेंच कीं टिळकांची गांधी-संबंधाचीं मतें, खुद्द टिळकांच्याच तोंडून विशद होऊन, आम्हाला नित्य ऐकावयास मिळत होतीं. आणि टिळकांचा मृत्यु व गांधींच्या सत्याग्रहाच्या मोहिमेचा प्रारंभ या दोन गोष्टींचा योग एकाच तारखेला म्हणजे ता. १ ऑगस्ट १९२० ला पडल्या-मुळें, पुढें कसें होईल ही विवंचना आम्हाला पडली. टिळकांच्या मृत्यूनंतर सुमारें दोन तासांनीं सरदारगृहांत जमलेली टिळकपक्षाची मंडळी एका बाजूला जाऊन बसली आणि त्या सभेंत त्यांत त्यांनीं आपणांपैकीं पांचसहा मंडळीचें सल्लागार मंडळ म्हणून नेमलें हें मागें सांगितलेंच आहे. नागपुरापासून कर्नाटकापर्यंत कोठें कांहीं करावयाचें तर या सल्लागार मंडळाचा विचार घेऊनच करावें असेंहि ठरलें. पण ही योजना पुढें फार काळ अमलांत राहिली नाहीं. आम्हां सर्वांत दादासाहेब खापर्डे हे वडील. पण टिळकांच्या विषयीं त्यांची निष्ठा जरी निखालस व अलौकिक होती तरी, पुढारी या नात्यानें, टिळकांच्या अंगीं जे गुण होते, किंवा कोणत्याहि सर्वमान्य होण्यासारख्या पुढाऱ्याच्या अंगीं असावे लागतात, ते दादासाहेब खापर्डे यांच्या अंगीं असावे तितके नव्हते. त्यांचे वक्तृत्व, त्यांची बुद्धिमत्ता, वजनदारी, इत्यादि गोष्टी अगदीं उघड होत्या. टिळकपक्षांत त्यांचें जें वजन होतें ते टिळकांचे एकनिष्ठ भक्त म्हणून, त्यांचे सहाय्यकर्ते म्हणून. पण स्वतंत्र विचाराचे पुढारी म्हणून नव्हे. टिळक जिवंत असतां टिळकांच्या बुद्धिमत्तेचें व राजकीय धोरणाचें वर्णन करणाऱ्या दादासाहेबांना जें तेज होतें तें टिळक दिवंगत झाल्यावर राहिलें नाहीं. एका पक्षाचे पुढारी या नात्यानें दुसऱ्या पक्षाच्या पुढाऱ्यांना टिळक कसून विरोध करीत. पण या दुसऱ्या पक्षाच्या पुढाऱ्यांसंबंधानें खापर्डे यांची जिव्हा असें अद्वातद्वा बोले कीं, त्या पक्षाला शत्रू मानणाऱ्या अशाहि लोकांना, दाक्षिण्यबुद्धीमुळें, खापर्डे यांचें बोलणें ऐकवत नसें. टिळकांच्या तोंडून प्रतिपक्षांतील व्यक्तीविषयीं अनुदारपणाचे शब्द निघोत, पण व्यक्तिशः अभद्र अपशब्द कधींहि निघत नसत. यामुळें कोणत्याहि वादांत खापर्डे यांनीं चारचौघांत बोलणें म्हणजे तें उपकारक न होतां उलट अपायकारच होईल अशी राष्ट्रीय पक्षांतील लोकांना भीति वाटे. राष्ट्रीय सभेसारख्या

प्रसंगीं आपल्या अनुयायांचे मेळे जुळवितील, हजर ठेवून काम करून घेतील, त्याकरितां लागेल तो खर्च व पडतील ते श्रमसायास करतील, अशी त्यांच्याविषयीं लोकांची खात्री किंवा भावनाहि नव्हती. म्हणून राष्ट्रीय पक्ष पुढें चालवावयाचा तर खापर्डे यांना प्रत्यक्ष पुढारी करून तो चालणें कठिण असें आमच्या पक्षानें ठरविलें. पण वऱ्हाड नागपुरकडे मुंजे व अणे, इकडे मी व चिंतामणराव वैद्य, खाडिलकर व शिवरामपंत परांजपे, आणि खालीं कर्नाटकाकडे बेळवी, देशपांडे व कौंजलगी इतकीं माणसें टिळकांच्या मृत्यूच्या वेळीं एकविचाराचीं होतीं. थोड्याशा फरकानें तीं सर्व जवळ जवळ एकाच दर्जाचीं असून आपापल्या प्रांतांत त्यांना सारखाच मान होता. या लोकांच्या मनांत परस्परांविषयीं तेव्हां आदरभावहि चांगला होता. म्हणून ते एकजुटीनें जे करतील तें इतर प्रांतांना, टिळकांइतकें नसलें तरी त्यांच्या खालोखाल, लक्षांत घ्यावें लागेल अशी स्थिति होती. आणि टिळकांच्या मृत्यूनंतर कांहीं दिवसपर्यंत ती स्थिति टिकली. किंबहुना या भावनेच्या आधारावरच टिळकांच्या मृत्यूमुळे उपस्थित होणारं संकट बरेंचसें निभावतां येईल असें आम्हाला वाटत होतें. आणि त्याचा अनुभव टिळकांच्या मृत्युनंतर कलकत्ता येथें भरलेल्या जादा राष्ट्रीय सभेंत आम्हाला आलाहि. कारण या सभेंत असहकारितेचा जो ठराव पास झाला तो वरील सर्व मंडळींना मान्य नसल्याकारणानें त्या सर्वांनीं त्या ठरावाविरुद्ध मतें दिली.

मी गंगाधरराव देशपांडे वगैरे मंडळी कलकत्त्यास एकेच ठिकाणीं उतरलो होतों. इतर प्रांतात चलबिचल होती. मद्रासचे कस्तुरीरंग अय्यंगार यांनी असहकारितेचें तत्त्व मान्य आहे पण तपशील मान्य नाही असें मत दिलें होतें. बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीनें असा ठराव केला होता कीं, एकंदर कारणाकरितां असहकारितेचें तत्त्व मान्य करावें, परंतु तें प्रचारांत कसें आणावें हें प्रत्येक प्रांतानें आपापल्या परिस्थितीप्रमाणें ठरवावें. पंजाब कमिटीनें असा ठराव केला होता कीं, असहकारितेचें तत्त्व मान्य आहे, परंतु त्या तत्त्वाच्या नांवावर कोणकोणत्या साधनांचा उपयोग करावा हें, स्पेशल काँग्रेसचा ठराव झाल्यावर, त्यांतील तपशील काय आहे हें पाहून मग ठरवावें ! मुंबई प्रांतिक कमिटीनें तत्त्व मान्य करून तपशील आखण्याकरितां स्वतः काँग्रेसनेंच एक कमिटी नेमावी असा ठराव केला होता. तात्पर्य, तत्त्व सर्वांना मान्य पण तपशील पहावा तर तो मात्र कोणाचा आपल्या मनाशीं निश्चितपणें ठरलेला नव्हता. आणि गांधीनीं सुचविलेला तपशीलहि कोणाला मान्य

नव्हता. परंतु उगीच आंधीं विरोध कशाला करा ? खुद्द स्पेशल काँग्रेसमध्यें तरी तो मंजूर होईलच कशावरून ? यामुळें त्यांनीं आपलीं मतें चांचपडत दिलीं होतीं. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, लवाद कोर्टांची स्थापना वगैरे गोष्टी सर्वांनाच मान्य होत्या. उलट शिक्षणसंस्था, न्यायकोर्टें व कायदेकौन्सिलें यांवर बहिष्कार घालण्याची तयारी लोकांच्या मनांतून नव्हती; व तो कार्यक्रम त्यांना तत्त्वतःहि पसंत नव्हता. तथापि प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेनें हाहि कार्यक्रम मंजूर केला तर खरी परीक्षेची वेळ येणार होती. आणि स्पेशल काँग्रेस होईपर्यंत लोक संदिग्ध बोलत याचें कारण, राष्ट्रीय सभेनें हा तपशील मंजूर केला तर तो शिस्तीखातर पाळावा असें कांहींना वाटत होतें, पण काँग्रेसनें तो मान्य केला तरी तो पाळूं नये असें इतर कांहींना वाटत होतें. परंतु दोघेहि वरून एकच मोघम भाषा बोलत होते.

ता. २४ ऑगस्ट १९२० रोजी कलकत्त्यास राष्ट्रीय सभेची स्पेशल बैठक भरली. ती सहा दिवस चालू होती. अध्यक्ष लाला लजपतराय हे होते. टिळकांचे प्रमुख अनुयायी एकत्रच उतरले होते. त्यांनीं या सभेंत कौन्सिल-बहिष्काराविरुद्ध भाषणें केलीं व अखेर मतेंहि नकारार्थीच नोंदविलीं. त्यांत खापर्डे, अणे, गंगाधरराव देशपांडे, कृष्णाजीपंत खाडिलकर, मी इत्यादि होतो. पण आम्हींचसे काय, इतर अनेक प्रांतांतील टिळकानुयायी म्हणविणारांनीं अशीच प्रतिकूल मतें नोंदविली. लजपतराय यांनीं, सुरतेप्रमाणेंच येथेहि, उभयस्पर्शी दुहेरी धोरण ठेविलें होतें ! असहकारितेच्या व्यापक ठरावांतील कांहीं गोष्टी त्यांना मान्य व कांहीं अमान्य होत्या. त्यांचें पहिलें आणि शेवटचें भाषण यांतहि किंचित् विसंगती दिसून आली. पण गांधी व त्यांचे अनुयायी हे कलकत्त्यास असहकारितेचा ठराव मंजूर करून घेण्याच्याच निश्चयानें आले होते. असहकारितेंत जात्याच अद्भुत वाटण्यासारखा,म्हणजे भोळ्या विकारी भावनाशील मनावर पाश टाकण्यासारखा,कांहीं भाग उघडच होता. "गांधी हे प्रथमच उदयाला येऊन आपणाला एक जबरदस्त पुढारी मिळाला, आणि फिरून तोहि गुजराथी मिळाला," या आनंदानें गुजराथी लोक हुरळून गेले होते. आणि गांधींचें धोरण यशस्वी करण्याकरितां त्यांनीं तन, मन, धन अर्पण करण्याचें ठरविलें होतें. याचा प्रत्यय कलकत्त्याच्या या सभेंत कोठल्या प्रांतांतले किती प्रतिनिधि आले यावरून कळला. या वेळीं काँग्रेसची जुनी घटना अमलांत असल्यामुळें, वाटेल त्याला प्रतिनिधित्वाचें सर्टिफिकीट सहज मिळवून सभेला येऊन

मत देतां येत होते. याचा फायदा घेऊन जमनालाल बजाजप्रभृतींनीं वाटेल तितका पैसा खर्च करून आपल्या मताचे प्रतिनिधि आणून भरले.

सभेचा निर्णय अपेक्षेबाहेर झाला यामुळें आम्ही सर्वजण डोक्यावर मोठा आघात व्हावा त्याप्रमाणें सुंद व स्तंभित झालों. गंगाधरराव देशपांडे खाडिलकर अशा लोकांनीं, मी किंवा खापर्डे यांच्याहिपेक्षां, अधिक नापसंती प्रगट केली. कारण भावनावश माणसाचा जसा लोभ तसाच राग. दोन्ही बिनहिशेबी असावयाची. पूर्वी आफ्रिकेंतील चळवळीनंतर गोपाळराव गोखले यांनीं, गांधींना सहाय्य देण्याकरितां, हिंदुस्थानांत फंड जमविला त्याला केसरींतून मतप्रसार करून मी ५००० रुपये देवविले. त्या वेळीं शिवरामपंत परांजपे खाडिलकर यांनीं मला तर मूर्खांत काढलेंच, पण गोखल्यांचा हस्तक म्हणून गांधीनाहि वाटेल तीं दूषणें लावलीं. त्याचप्रमाणें या लोकांना गांधींना नांवें ठेवण्याचा हा दुसरा प्रसंग कलकत्त्यास आला. परंतु देशपांडे परांजपे खाडिलकर यांना भवितव्यता मनांत हंसून म्हणत होती कीं, "जरा थांबा! तुमच्या मनावर भुरळ घालणारा जादूगार जन्माला आला आहे. तो तुमच्या वांग्यांचें लवकरच भूत बनवील! किंवा तुम्हाला खालीं डोकें वर पाय करावयास लावील!" आणि तेंच अखेर खरें ठरलें. देशपांडे यांनीं लवकरच अहिंसेची जपमाळ येवढी मोठी हातांत घेतली, आणि तो जप ते येवढ्या मोठ्यानें करूं लागले कीं, जणु कांहीं हिंसेच्या तत्त्वाची व यांची उभ्या जन्मांत कधीं ओळखच नव्हती! परांजपे यांच्यावर भवितव्यतेनें असा सूड घेतला कीं, त्यांचा डौलदार श्रीमंती थाटाचा पोशाख—म्हणजे तें पोपटी जाकीट, तें रेशीमकाठी उपरणें, तें झोकदार पागोटें—ही सर्व जाऊन त्या जागीं बाळ संतोषासारखें खादीचें डगले, आणि डोकीवर बेढब बिनआकाराची अर्धवट पांढरी खादीची टोपी आली. दोन वर्षांपूर्वीचे परांजपे दोन वर्षांनंतर कोणाला ओळखेनासे झाले. "हे परांजपे नसून परांजप्यांचें शापग्रस्त भूत आहे" असें त्यांच्या मिजाशी पोशाखाकडे पाहून पूर्वी डुलणारे लोक मनांत म्हणूं लागले. आणि हिंसेच्या प्रतिपादनाकरितां ज्यांचें सर्व वाङ्मय सरकारजमा झालें, तेच परांजपे जाहीर सभांतून अहिंसात्मक शांततापूर्ण अशा असहकारितेच्या विशेषणावर जोर दिल्यानें वक्तृत्त्वांत फिके आणि जाणत्या लोकांत हास्यास्पद होऊन राहिले. जुनें भावनावशतेचें सर्व भांडवल गांधींच्या चरणी अर्पण केल्यामुळें, त्यांनीं स्वतःचें म्हणून वर्तमानपत्र काढलें तरी तें तोंडमिळवणी करीना. आणि मनाविरुद्ध लिहिण्याचा कंटाळा येऊन पुढें त्यांनीं

तो मार्गच सोडून दिला. अवतारसमाप्तीनंतरचा कृष्ण तशी शिवरामपंत परांजप्यांची स्थिति झाली. त्यांचें कर्तृत्व पूर्वी केवळ माझ्यासारख्या प्रतिपक्षांची नालस्ती करण्यांत दिसून येवो; पण त्याबरोबर स्वराज्याची तळमळ प्रगट करण्याविषयीं खऱ्या मनानें लिहितांना त्यांचें व्याजोक्ति व्यंग्योक्ति यांनीं परिपूर्ण असलेलें काव्यमय वक्तृत्व लेखणीनें व जिभेनें प्रभावी होण्याला पुरकळच वाव होता. आतां मात्र त्या सद्गुणांचा सर्व आधार त्यांचा त्यांनींच आपल्या हातानें काढून घेतल्यामुळे अहिंसात्मक असहकारितेच्या पिंजऱ्यांत ठेवलेल्या चिरउपोषित सर्पाप्रमाणें ते निरुपद्रवी बनून गेले. त्यांनीं पुढेंहि मजवर तोंड टाकण्यास कमी केले नाहीं. परंतु सरकारला बाधणारें असें त्यांचें जहाल विष गांधींनी परांजप्यांच्या दांतांतून पिळून टाकल्यानें, या सापाचे दांत आणि एकाद्या पांढऱ्या हस्तिदंती कंगव्याचे दांत दोन्ही सारखेच वाटूं लागले होते !

कृष्णाजीपंत खाडिलकर हे मात्र अधिक दैववान. कारण नवा गुरू भेटला कीं त्याला सदेह आत्मसमर्पण करण्याची शक्ति त्यांच्यामध्यें जबर होती. देशाच्या दृष्टीनेंच काय, पण स्वतःच्या व्यवसायाच्या दृष्टीनेंहि, ज्या वेळीं जो डाव रंगेल तो रंगवावा अशी वृत्ती त्यांना प्रकट करतां आली. आज टिळक काय उद्या गांधी काय—दोघेहि स्वराज्य मिळविण्याचें काम परस्पर करीत आहेत ना ? करूं देत ! आपल्याला तोशिस न पोंचली म्हणजे झाले. आपलें काम केवळ रणवाद्य फुंकण्याचें ! आणि तेंहि रणावरच फुंकलें पाहिजे असें शास्त्र कोठे आहे ? एक तुरुंगांत गेला तर दहांनीं जावें म्हणावें ! दहांचें नुकसान झालें तर एकाचें झालें असें म्हणावें ! विचार, दूरदर्शीपणा यांचा विवेक करावयाचा तर तो आपणापुरता करावा, व प्रसंग पडला तर वर्तमानपत्रांतून बेधडकपणें काळ्याला पांढरे व पांढऱ्याला काळें म्हणावें येवढी विद्या मात्र त्यांनीं शिल्लक ठेविली. बाकी टिळकांकडून मिळविलेली इतर विद्या, आणि केसरींतून प्रगट केलेलें जहालपण, हें त्यांनीं सर्व गांधीच्या चरणीं वाहिलें. हिंसेची तोंडानें उघड निंदा करणारे, व प्रायश्चित्त म्हणून या निंदेची शिक्षा भोगणारे हे तीन तापसी राष्ट्रीय व्याघ्र गांधींनीं निर्माण केलेल्या अहिंसेचें लेबल लावलेल्या पिंजऱ्यांत पडलेले पाहून, १९०८–१९०९ सालची आठवण असलेले ब्रिटिश सरकार मनांत काय म्हणत असेल याची कल्पना कोणालाहि करतां येईल !

असो. पूर्वी इंग्राजांच्या कवायती कंपूनें असंघटित अशा हिंदी सैन्याची व बाजारबुणग्यांची अनेक वेळा दाणादाण कशी केली हे इतिहास सांगतो. तीच गोष्ट

कलकत्त्यास या राष्ट्रीय सभेंत घडली. एका बाजूला गांधी व नेहरू येवढेच प्रमुख सेनानायक असे होते. आणि उलट दुसऱ्या बाजूला त्यांच्या बरोबरीचे दहा-पांच तरी पुढारी होते. परंतु गांधींच्या कांहीं हस्तकांनीं, खर्चाकडे न पाहतां, असहकारितेच्या ठरावाला मत देण्यास स्वतःला बांधून घेतलेले असे शेंकडो प्रतिनीधि आयत्या वेळी आणून भरले यामुळें प्रत्यक्ष मत-मोजणीत या दुसऱ्या पक्षाचा पराभव झाला. पहिला विजय पदरीं पडतांच आक्रमण केलेल्या भूमीची बळकटी-बंदस्ती करणें हें कोणताहि कुशल सेनापति आपलें पहिलें कर्तव्य समजतो त्याप्रमाणें गांधींनीं केलें. उलट पराभव पावलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या अनेक पुढाऱ्यांनी एकत्र जमून, सहविचार करून, परत हल्ला चढविण्याचा प्रसंग पुढें तरी उत्पन्न करतां येईल कीं काय हें पाहावयास पाहिजे होतें पण तें त्यांच्या हातून झालें नाहीं. सभा संपतांच गांधी हे आपला पक्ष बळकट करण्याच्या तयारीला लागले, आणि राष्ट्रीय पक्षाची मात्र वाताहत झाली. कलकत्त्याच्या सभेंत स्वतः टिळक असते तर अशी गोष्ट झाली नसती असें कित्येकांचें अनुमान आहे. वास्तविक एकटे गांधी किंवा एकटे टिळक हे एकेकटेच घेतले तर ते कलकत्त्यास तुल्यबळ ठरले असते. परंतु गांधींच्या सहाय्याला जी दुसरी गोष्ट उपयोगी पडली ती अगदीं अनपेक्षित व नवी असून, तिनें कदाचित् टिळकांच्याहि विरुद्ध पारडें फिरविलें असतें. ही गोष्ट म्हणजे असहकारितेच्या तत्त्वाचा चित्ताकर्षकपणा !

टिळकांच्या प्रतिसहकारितेंत असहकारितेचें स्वरूप अंतर्भूत होतेंच. तथापि सहकारितेशीं संलग्न असल्यामुळें त्या असहकारितेचें स्वरूप मिश्र किंवा शबल ठरत होतें. उलट गांधींच्या असहकारितेचें स्वरूप अमिश्र व शुद्ध होतें. सरकारशीं केवळ सहकारिता करूं पहाणाऱ्या नेमस्तांचे पाय आतां जमिनीवर राहिले नव्हते; अमृतसरच्या राष्ट्रीय सभेंतच त्यांनीं काँग्रेसला रामराम ठोकला ! पण टिळकांच्या प्रतिसहकारितेलाहि आतां वाव उरला नाहीं अशी जनतेची समजूत झाली होती. त्यांना नवीन अद्भुत व चित्ताकर्षक असें राजकीय चळवळीचें एखादें साधन मिळालें तर हवें होतें, आणि नक्की तेंच गांधीनीं या वेळीं जनतेपुढें ठेविलें. हें नवें साधन झालें तरी स्वराज्य मिळेपर्यंत सतत टिकेल व कार्यक्षम होईल अशी जनतेची खात्री होती असें नाहीं. पण अग्निमांद्याची बाधा झालेला मनुष्य कांहीं तरी तिखट खाण्याची इच्छा करितो, व त्यानें क्षुद्बोध झाला तर पहावा म्हणतो,

त्याप्रमाणें या नव्या उपायाला एक संधि तर देऊन पहावी असें सामान्य जनतेला वाटूं लागलें होतें हें मात्र निर्विवाद होय.

आमच्या राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांना दुसरी एक अडचण व ताहि प्रथमच नवी अशी उत्पन्न झाली. ती म्हणजे, राष्ट्रीय सभेंत रीतसर निर्णित झालेलें बहुमत अवमानावयाचें कसें? राष्ट्रीय सभेच्या ठरावाला मान्यता देऊन देऊनच आपण तिची प्रतिष्ठा आजवर वाढविली. तिला अग्रगण्यता प्राप्त झाली. सरकाराविरुद्ध उगारण्याचे आपलें हेंच मुख्य शस्त्र असे आपण भासवीत आलों. मग ठरावाचा डाव आपल्या विरुद्ध जातांच आपण तो न मानण्याची घोषणा केली तर, हिंदुस्थानांतील विद्यमान राजकीय चळवळीच्या पायाखालचा सर्वच आधार आपण आपल्या हातानें काढून घेतला असे होणार नाहीं काय? अशी शंका राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांना आली. आणि ती शंका थोडीशी बरोबर होती. झालेले ठराव बदलून घ्यावयाचे मनांत असले तरी, पुढच्या वर्षाचे काँग्रेसचें अधिवेशन होईपर्यंत त्यांना मान्यता दिलीच पाहिजे, म्हणजे त्याप्रमाणें आचरण केलेंच पाहिजे, हा सद्विचार ओघानेंच प्राप्त होणारा होता. आतां त्यामुळें या पुढाऱ्यांनीं सभा संपल्यानंतर एकत्र बसून पुढें काय करावयाचें याचा विचार करण्यास हरकत आली नसती. त्याला कोणी फार तर कट म्हटलें असतें. तें प्रत्यक्ष बंड ठरलें नसतें. पण ही साधी गोष्ट देखील घडली नाहीं हें खरें. या कामीं पुढारीपण घेण्यास देशबंधु दास हेच सर्वांत अधिक योग्य. परंतु त्यांनीं तत्काल कांहींच हालचाल केली नाहीं. खापर्ड्यांना ही गोष्ट सुचली होती म्हणतात, पण ती त्यांच्या हातून पार पडणें शक्य नव्हते.

तात्पर्य, सभेनंतर कोणी कोणास न भेटतां निरनिराळ्या प्रांताचे प्रमुख प्रतिनिधि आपापल्या गांवीं निघून गेले. त्याप्रमाणें मीहि पुण्याकडे परतलो. वाटेंत माझा पहिला मुक्काम जळगांवास बंधूकडे पडला. जाहीर सभा क्रमप्राप्तच होती. यामुळें तेथपर्यंत मनाचा कांहींतरी निश्चय करून तो प्रसिद्ध करणें याशिवाय मला गत्यंतर नव्हते. नुसती जाहीर सभाच असती तर तो प्रसंग मी कसातरी टाळला असता. परंतु माझ्या विशेष परिस्थितीची अडचण मला या वेळीं विशेष भासली. ती म्हणजे या महत्त्वाच्या विषयावर केसरींत अग्रलेख लिहिणें. ज्यांना ही अडचण नसते त्यांना विचार करण्याला अधिक वेळ मिळतो. इतक्या तडकाफडकी निर्णय करावा लागत नाहीं. खाजगी बोलण्यांत निरनिराळ्या ठिकाणीं क्वचित् उलट-

सुलट मतप्रतिपादन घडलें तरी ते उघडकीस येत नाहीं. पण वर्तमानपत्रांत लिहिणें म्हणजे तो जगजाहीर वज्रलेपच. तात्पर्य, कलकत्त्याहून जळगांवास येतांना वाटेंतच मी असें ठरविलें कीं, कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचा निर्णय तूर्त तरी मानावयाचा. पण त्याबरोबर हेंहि निश्चितपणें ठरविलें कीं, तत्त्वतः तो आपणाला मान्य नाहीं, आणि तो बदलून घेण्याची खटपट आपण करूंच करूं असेंहि प्रगट करावयाचे, म्हणून जळगांवच्या सभेंत मी असें जाहीर केलें कीं, "लौकरच होणाऱ्या कायदेकौन्सिलच्या निवडणुकीला पुणें शहरातर्फे मी उमेदवार म्हणून उभा राहिलो होतों, पण असहकारितेचें धोरण 'तात्पुरते' मान्य करावयाचें असल्यामुळें मी आपली उमेदवारी परत घेतली आहे." मग पुण्यास येताच पहिला प्रसंग मराठ्यांत या विषयावर लिहिण्याचा आला म्हणून त्यांतील अग्रलेख लिहितांना मी दोन्ही गोष्टी लिहील्या. त्या अशा की, "तूर्त असहकारितेचें धोरण मान्य केलें आहे. पण तें मला कायमचे मान्य नाही. कलकत्त्याचा ठराव बदलून घेण्याची पहिली संधि येईल तीहि आपण घेऊं. आणि असहकारितेचें धोरण सोडून देऊं." इतर लोकांनाहि आपलें मत निश्चित करणें प्राप्तच होतें, म्हणून लवकरच मुंबईस राष्ट्रीय पक्षाच्या इकडील पुढाऱ्यांची सभा बोलवण्यांत आली. तिनेंहि माझेंच धोरण स्वीकारण्याचा ठराव केला. आणि जे कोणी निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे होते त्या सर्वांनी आपआपल्या उमेदवाऱ्या परत घेतल्या.

केसरींत मी, २१ सप्टेंबर १९२०च्या अंकांत असें लिहिले कीं, "आम्ही गांधीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण तो सिद्धीस गेला नाहीं. स्वतःच्या मताविरुद्ध इतक्या पुढाऱ्यांचें मत आहे हें पाहून गांधींनी हार खावयास पाहिजे होती तीं त्यांनीं खाल्ली नाहीं एवढ्यापुरतां दोष त्यांना आम्ही देतों. तथापि त्याकरितां आम्ही गांधीचा द्वेष करीत नाहीं. असहकारिता यशस्वी करण्याला राष्ट्र जितकें तयार आहे असें गांधींना वाटतें तितकें तें तयार आहे असें आम्हांला वाटत नाहीं. त्यांत व्यावहारिक अडचणी पुष्कळच आहेत. कायदेकौन्सिलावरील बहिष्कार ही तर सर्वांत मोठी मतभेदाची बाब. जरी गांधींच्या मताप्रमाणें ठराव झाला आणि अनेकांनीं आपल्या उमेदवाऱ्या परत घेतल्या, तरी ही बाब उलगडली असें म्हणतां येत नाहीं. आम्ही या बाबतींत आपल्या मताचा आग्रह सोडला नाहीं. ठरावांतील इतर तपशीलहि बराच वादग्रस्त आहे. ठरावाचा आदर करणें ही गोष्ट

शिष्टाचाराची असली तरी, पुढेंमागें तो ठराव दुरुस्त करण्याचा आग्रह सोडण्याची सक्ति किंवा नैतिक बंधनहि आमच्यावर नाहीं."

मला वाटतें केसरीतील हें माझें लिहिणें अगदीं स्पष्ट होतें. परंतु त्यावर आमच्या आमच्यांत मतभेद झाला आणि पुढेंहि तो वाढतच गेला. असहकारितेच्या या ठरावानें राष्ट्रीय पक्षाची फळी दुभंगली. टिळकांच्या वेळींहि या पक्षांत डावी व उजवी अशा दोन बाजू होत्याच. डावी म्हणजे एकांतिक जहाल मतवाल्यांची. आणि उजवी म्हणजे सारासार विचार करून, व्यवहार लक्षांत घेऊन, राष्ट्रीयच पण मध्यक्रमिक मतवाल्यांची. साध्याच्या दृष्टीनें दोघे सारखेच. पण साधनांच्या दृष्टीनें थोडथोडे वेगळे. याविषयीं कांहीं उदाहरणेंच देतों म्हणजे लक्षांत येईल. डाव्या बाजूचें टोंक म्हणजे चित्रशाळेचे वासुकाका जोशी, आणि उजव्या बाजूचें टोंक म्हणजे दादासाहेब खापर्डे. शिवरामपंत परांजपे हे डाव्या बाजूंत नेहमींच मोडावयाचे. गांधींच्या आधीपासूनच कायदे कौन्सिलाविषयीं त्यांचा बहिष्कार मनानें सिद्ध झाला होता. याकरतां, आणि त्यांतल्या त्यांत निवडणुकीला खर्च लागतो म्हणून, ते कोणत्याहि जागेकरतां उमेदवार म्हणून उभे राहिले नव्हते. म्हणून असहकारितेंतील कौंसिल-बहिष्कार त्यांना पूर्ण संमत झाला. इतर कांहीं कलमासंबंधानें मात्र त्यांचा गांधीशी मतभेद होता. पण त्यांचा स्वभाव विधायक टीका करण्याचा कधींच नसल्यामुळें, त्यांना अमुक हवें अमुक नको हें नक्की कधींच कोणास कळले नाहीं. राष्ट्रीय भावनेनें एखादा मुद्दा घ्यावयाचा, आणि तो तेवढा रंगविण्यांत ते आपली सर्व प्रतिभा खर्चावयाचे. टिळकांच्या वेळींहि जोशी व परांजपे हे टिळकांचीं कांहीं कांहीं मतें अमान्य करणाऱ्यापैकींच होते. आणि आतां तर हुल्लडीची एक नवी संधि आली. ते ती कशी सोडणार !। खाडिलकर डाव्याच पक्षांत मोडणारे, परंतु टिळक असेपर्यंत ते टिळकांची कोणचींहि मतें सर्वस्वी उचलून धरींत. नव्या निवडणुकीकरतां पुणें शहरांत टिळकांनीं मला उभे केले, तसेंच बाहेरच्या एका जागेकरतां त्यांजकडून खाडिलकरांना उभे करण्यांत आले होते. म्हणजे कौंसिल-बहिष्कार त्यांना कृतीनें अमान्य नव्हता. पण टिळक गेल्याबरोबर त्यांनी कौंसिल-बहिष्कारासुद्धां असहकारितेची कांस धरली. आणि निवडणुकींतून आपलें आंग काढून घेतलें. त्यांचा स्वभावहि खटपटी करण्याला व उद्योग करण्याला प्रतिकूल होता.

ते खरे स्वास्थ्याचे भोक्ते होते. त्यांना स्वार्थत्यागाची लज्जत होती, परंतु उद्योगाचें वावडें होते. स्वस्थ बसून चार गोष्टी सांगाव्या, चार लिहाव्या, येवढेंच त्यांच्या प्रकृतीला मानवणारे असे. म्हणून निष्क्रियता हा ज्या असहकारितेचा गाभा असें त्यांना वाटले ती असहकारिता सहजच त्यांच्या पथ्यावर पडली. मी कौन्सिलवादी म्हणून पूर्वी प्रसिद्ध होतों व आजहि तसाच आहे. तथापि कलकत्त्याचा ठराव 'तूर्त' मानावयाचा असें मी ठरविल्यामुळें आपली उमेदवारी परत घेण्याला मला मुळींच वाईट वाटलें नाहीं. हा ठराव झाला नसता तर मी निवडणूक लढविली असती आणि निवडूनहि आलों असतों या विषयीं मला मुळीच शंका नव्हती. केसरी ऑफिसांतील मत माझ्याप्रमाणेच होतें. वऱ्हाडचे पुढारी बापूजी अणे यांना तर कौन्सिल-बहिष्कार मुळीच मान्य नव्हता. मुंबईत आमच्या मंडळींची सभा झाली तींत उमेदवाऱ्या परत घेण्याविरुद्ध त्यांनीं आपलें मत दिलें. ते स्वतः निवडणुकीला उभे राहिले नाहींत, पण आपले मित्र रा. अण्णासाहेब जतकर यांना उभे करून, व निवडून आणून, त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या धोरणाचा उघड निषेध आणि तिच्या शिस्तीची उघड अमान्यता प्रगट केली.

असो. कलकत्त्याच्या जादा राष्ट्रीय सभेनंतर गांधीजी व महाराष्ट्र यांच्या दरम्यान एकप्रकारें रस्सीखेचीचा खेळ चालू होता. शिस्तीकरितां आणि राष्ट्रीय सभेच्या इभ्रतीकरितां, म्हणजे औपचारिकरीत्या, असहकारितेचा ठराव महाराष्ट्रानें मान्य केला होता हें गांधी जाणून होतें. पण त्यानें त्यांचें समाधान होत नव्हतें. या उपचाराचें परिवर्तन खऱ्या खुऱ्या श्रद्धेंत झालें तर तें त्यांना पाहिजे होतें. आणि गंगाधरराव देशपांडे, कृष्णाजीपंत खाडिलकर, शिवरामपंत परांजपे हे दाखवीत असलेल्या झोकावरून, अंतर्यामीची श्रद्धा असली किंवा नसली तरी, महाराष्ट्रांतले पुढारी शेवटीं आपल्या गोटांत कायमचे येऊन तळ देतील अशी आशा गांधींना वाटूं लागली होती. त्यांना खात्री किंवा आशा नव्हती ती मी जयकर, मुंजे आणि अणे इत्यादिकांची. म्हणून गांधीजींनी धूर्तपणानें या आम्हा मंडळीशीं प्रथम कांहीं दिवस सामोपचाराचें, किंबहुना 'खुशामतीचें' असेहि मी म्हणेन, धोरण ठेवलें होतें. पाण्यांत गळ टाकून बसलेला धीवर तोंडानें इकडच्या तिकडच्या शिळोप्याच्या गोष्टी बोलत असतो. पण त्याचें सारें लक्ष गळाच्या दोरीला ओढ कितपत बसते याकडे असतें. गांधींचेंहि आम्हासंबंधानें असें झालें होतें. 'मनावर घेईल तर वाघ मारील' हा एका सुप्रसिद्ध हिंदी म्हणींतला पहिला अर्ध

गांधी प्रथम एक दीड वर्ष महाराष्ट्राला लावीत. पण पुढें निराशा झाल्यावर 'मरेल पण मनावर घेणार नाहीं' हा दुसरा अर्ध ते घोकू लागले. आपल्या कार्यसाधनापुरते गांधी म्हणत " वः महाराष्ट्र, म्हणजे काय गोष्ट आहे ! सगळ्या हिंदुस्थानचा पुढारी तो. उगीच कां टिळकांनीं इतकी तपश्चर्या केली आणि पुण्याई संपादिली ! महाराष्ट्र माझ्या बाजूला येण्याचाच अवकाश कीं मी असहकारितेची चळवळ यशस्वी केली म्हणून समजा." उलट आम्हीहि प्रथम प्रथम गांधीजीवर उघड टीका न करतां त्यांना चुचकारून घेत होतों. त्यांना मोठेपणा देत होतों. "त्यांनीं राजकीय चळवळींचें एक अकल्पित व नवें साधन उपयोगांत आणलें त्याला संधि दिली पाहिजे; न जाणो तेंहि आमचें स्वराज्याचें काम करणार नाहीं कशावरून !" असें म्हणत होतों. यामुळें मला पहिल्याच काँग्रेस वर्किंग कमिटीचा सभासद नेमण्यांत आलें, आणि काँग्रेसची नवी घटना करण्याचें काम स्वतः गांधी व विठ्ठलभाई पटेल यांच्याबरोबर मजकडे देण्यात आलें. सन १९२२ अखेर हा ऋणानुबंध टिकला, तोंपर्यंत गांधी व मी यांजमध्यें पत्रव्यवहारहि होत असे. अशा पत्रव्यवहारापैकीं उपलब्ध असलेलीं कांहीं पत्रें या खालीं देतों.

( १ )

" आम्ही आपल्या ध्येयाचा मार्ग फार जलद काढीत आहों असें मला वाटतें. आपली ध्येयमूर्ति अगदी एक वर्षांतच आपल्या डोळ्यापुढें उभी राहील असें वाटत नाहीं. तथापि त्या अवधींत बरीच मजल गाठू असें वाटतें. तुम्ही व तुमच्या पक्षांतील लोक यांच्या मनांतील खऱ्या खऱ्या इच्छा काय आहेत त्या कळाव्या असें वाटतें. हल्लीच्या युद्धांत तुम्ही व त्यांनीं अंतःकरणपूर्वक उडी घ्यावी असें मला फार फार वाटतें. तुम्ही येथें ता. २२ रोजीं आला तर बरें होईल. म्हणजे आपण २३ तारखेस निघू शकू." ( मो. गांधी )

( २ )

" मला अनेकांकडून अभिनंदनाचे संदेश पोंचले. परंतु तुमच्या संदेशाला मी सर्वांत अधिक किंमत देतों. कारण तुम्ही पूर्ण अंतःकरणपूर्वक सहकारिता कराल तर तिची मला फार गरज आहे. मात्र ही मदत तुम्ही स्वतःची खाती पटवूनच दिलेली असली पाहिजे. काँ. वर्किंग कमिटीसंबंधानें तुमचें पत्र मिळालें. या पुढें तुम्हाला जसे योग्य वाटेल, जशी स्फूर्ति होईल तसेच

तुम्ही करावें. माझ्यामतें आतां वर्किंग कमिटी ही प्रबल झाली आहे. तिनें भराभर कामें हातीं घेऊन भराभर उरकलीं पाहिजेत, व त्याकरितां तींत एकमताचीं माणसें पाहिजेत. राष्ट्रीय सभेची आजची घटना पूर्णपणें अमलांत आणली तर तिनें आम्हाला पाहिजे तें मिळविता येईल. अर्थात् मला आपलीं मतें सर्व हिंदुस्थानला कशी पटवून देता येणार ? मी म्हणतो त्याप्रमाणें जर यंदा आपल्याला स्वातंत्र्य लाभलें तर माझ्या म्हणण्याची खात्री लोकांना पटेल." ( मो. गांधी )

( ३ )

" जमनालालजी यांनीं मला काल केसरींतील तुमचे लेख वाचून दाखविले. ते वर्किंग कमिटीच्या ठरावावर होते. ते ऐकून मला फार दुःख झालें. वर्किंग कमिटींत झालेल्या गोष्टींचा असा जाहीर उल्लेख व्हावा हें बरें काय ! कमिटीच्या ठरावाला तुम्ही जर तेथेंच तीक्ष्ण विरोध केला असता तर मी ते ठराव करून घेण्याचा आग्रह धरला नसता. मला वाटलें कीं तुम्ही फक्त आपला मतभेत बोलून दाखवीत आहा. बहुमत चुक आहे असे तुम्हाला वाटले तर सकाळींच तुम्ही त्याला हरकत घेतली असती तर बरे झाले असते." (मो. गांधी)

( ४ )

" अहमदाबादेस कोण येतील कोण येणार नाहींत हे आज सांगता येणार नाहीं. म्हणून मी केलेल्या ठरावाचा मसुदा तुमच्या विचाराकरितां पाठवीत आहे. तो तुम्ही आपल्या स्नेह्यांना दाखवावा म्हणजे अशा रीतीने ता. २३ च्या सभेपुढें संघटित असा अभिप्राय मांडला जाईल. तूर्त हा ठराव खाजगी समजण्याचा आहे." ( मो. गांधी )

( ५ )

" सोबतचे कागद टिळकांच्या मुलाकडून मजकडे आलेले दिसतात. पण त्यावर त्यांची सही नाहीं. अर्थात् सही असती तरी मी इतकेंच केले असते व आतांहि करतो कीं, ते सर्व कागद तुम्हाकडे परत पाठवितों. कारण मला अशी खात्री वाटते कीं, तुम्ही कांहीं तरी आपसांत तडजोड व तीहि न्यायाची अशी खचित करून घ्याल. मी व्हाइसरॉयला पत्र लिहिलें त्याविषयीं तुमचा अभिप्राय काय तो कळवावा." ( मो. गांधी )

( ६ )

" येथील परिस्थिति फारच गंभीर आहे. तरी तुम्ही शक्य असेल तेथवर लवकर यावें. मुंबईस वर्किंग कमिटीची सभा भरवली पाहिजे. सुरतेस सभा भरचून उपयोग नाहीं, असे तुम्हाला वाटत नाहीं काय ? ते कांहीं असो. उद्यां रविवारीं तुम्ही शक्य तर निघून यावे म्हणजे मला बरे वाटेल." ( मो. गांधी )

( ७ )

" तुमचें पत्र पोंचलें. लोक महाराष्ट्र पक्षासंबंधानें कांहीं म्हणोत. त्यावर भित्रेपणाचा आरोप कोणालाहि करता येणार नाहीं. दुःख सोसण्यांत त्या पक्षापुढें दुसरा कोणी मजल मारील असें मला वाटत नाहीं. तुम्ही तुमचा मुलगा वगैरे जर तुरुंगांत जाल, तर तुम्ही गैरहजर म्हणून तुमच्यातर्फे तुमचें म्हणणें काँग्रेसपुढें मांडण्याची मी खातरजमा करतों. तुमच्याविषयी मला इतकी पूर्ण माहिती आहे, व माझें तुमच्याबद्दल इतकें प्रेमहि आहे कीं, तुमच्या मताचा विपर्यास करून मी मांडणें हें केव्हांहि शक्य नाहीं." ( मो. गांधी )

( ८ )

येत्या राष्ट्रीय सभेमध्यें हिंदी भाषेंतून भाषणें व्हावी या सूचनेला तुम्ही पाठिंबा दिला हे ऐकून मला फार आनंद झाला. तुमची या कामीं मदत असेल तर पुष्कळच कार्य होईल या विषयीं मला शंका नाहीं. तुम्ही केसरींत एक कॉलम हिंदींत देत असता असेहि ऐकलें आहे. मला केसरीची एक प्रत नियमित पाठवीत जावी. 'इंडियन केस फॉर होमरूल' या तुमच्या पुस्तकाची प्रत मिळाली. त्याबद्दल आभारी आहे. तें केव्हां वाचीन हें सांगता येत नाहीं. पण निदान हिंदुस्थानांतील पहिली होमरूल पार्लमेंट जेव्हा मला एखाद्या गुन्ह्याकरितां कैदेंत घालील तेव्हां तें मी खास वाचीन ! आज चालू राजकारणासंबंधानें माझी जर कोणी परीक्षा घेतली तर मी त्यांत नापास होईन, असें मला वाटतें." ( मो. गांधी )

( ९ )

" बेझवाड्याचा कार्यक्रम एकदाचा कसा काय तडीला जाईल याबद्दल मी अस्वस्थ झालों आहे. ३० जूनपर्यंत टिळक-स्वराज्य-फंड तुमच्याकडून किती जमेल त्याच्या नक्की आंकड्याची मला ताबडतोब तार करा. यापूर्वी तुमचे जम-

लेले पैसे तुम्ही ऑल इं. काँ. कमिटीकडे पाठविले असतीलच. भडोच अहमदाबाद हीं ठिकाणें झाल्यावर बहुधा सर्व जून महिना टिळक–स्वराज्य–फंडाकरितां मी मुंबईतच काढणार आहे. माझ्या कार्यक्रमासंबंधीं तुम्हाला कांहीं सूचना करावयाच्या असल्यास तारेनें जरूर कळवावें." ( मो. गांधी )

( १० )

"तुमचें पत्र पावलें. गंगाधरराव देशपांडे व कौजलगी यांना प्रत्येकीं एक हजार रुपये दिले. अद्याप त्याचा तपशील आला नाहीं. पण त्यांनींहि माझ्याप्रमाणेंच वकिली सोडणाऱ्या वकिलांना दरमहा ५० रु. प्रमाणें पैसे दिले असतील. तुमची इच्छा असल्यास रकमेच्या तपशीलाबद्दल मी त्यांना लिहितों. कांहीं वकिलांनीं पैसे घेण्याचें नाकारलें. त्यांना त्याची गरज नव्हती असे नाहीं, पण कदाचित् त्यांची अपेक्षा थोडीशी जास्त असावी. स्वतः तुम्ही व शेट जमनलालजी यांनीं कांहीं कांही लोकांना जी मदत केली त्यावरून मला वाटतें कीं, वकिली सोडणाऱ्या वकिलाला ५० रु. देऊ करणें ही गोष्ट फारशी बरी नाहीं. आपल्याला एकच वर्षाकरतां हा प्रयोग करून पहावयाचा तर ७५ किंवा १०० रुपयांपर्यंत देणें वाजवी होईल. पण ते सर्व आपल्या हाती किती पैसे आहेत त्यावर अवलंबून रहाणार. मजजवळ असलेल्या ३००० रुपयांतून सुमारें २० वकिलांची सोय मला करावयाची असल्यानें ५० रु. पेक्षां जास्त कोणासच देतां आलें नाही. पण इतर प्रांतांत वकिलांना सुमारें १०० रुपये देण्यांत आल्याकारणानें महाराष्ट्र व कर्नाटक इकडेहि याच प्रमाणांत पैसे देण्यास हरकत नसावी. बहुधा जे सुखवस्तु वकील लोक आहेत ते हा पगार घेत नाहींत. इतरांत सर्वच सारख्या पात्रतेचे नसतात. पण असा भेदाभेद करणें चूक होईल. वकिली सोडलेल्या कोणाहि वकिलानें कमिटीकडे अर्ज केला कीं, त्याला सहाय्याची गरज आहे असें घेऊन चालावें असे मी म्हणतों. वकिलांना सांपत्तिक सहाय्याची अडचण राहू न देण्याचे शेठ जमनलालनी आश्वासन दिलें आहे म्हणून आमच्या कमिटीनें मागितलेली रक्कम त्यांना पाठवून देण्यास सांगावें." ( मो. गांधी )

( ११ )

"अलीबंधूंना पकडल्या कारणानें आपण एकत्र भेटणें अवश्य झालें आहे. ता. ६ ऑक्टोबरला अहमदाबादेस वर्किंग कमिटीची बैठक आहे परंतु तारीख ८

लाच आपण सर्वांनीं मुंबईस भेटणें बरें होईल. महाराष्ट्रांतून मी फक्त तुम्हालाच बोलाविलें आहे. परंतु चर्चेकरतां आणखी कोणालाहि घेऊन या." ( मो. गांधी )

( १२ )

" गांधीजींच्या भयंकर आजाराबद्दल आपण ऐकलेच असेल. आजार उलटल्या कारणाने गेले चार दिवस आम्ही मोठ्या चिंतेंत काढले. दर घटकेला प्रकृती खालावत आहे व अन्नपाणी वगैरे कशाचाच कांहीं उपयोग होत नाहीं. सर्वांत शोचनीय गोष्ट म्हणजे आपला मरणकाल जवळ आला, व आयुष्यांतील आपलें इतिकर्तव्य संपलें, असे गांधीजींच्या मनानें घेतलें आहे. पांचसहा वेळ आम्हाला बोलवून त्यांनीं गीता वाचून घेतली, व 'एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति । स्थित्वा ऽस्यामन्त कालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ या गंभीर श्लोकाचें त्यांनीं वारंवार चिंतन चालविलें आहे. आम्हाला ही मोठी दुर्दशेची वेळ आलेली आहे. माझी व आपली ओळख नाहीं पण व्हावीसे वाटतें. हें पत्र तुम्ही इतर स्नेह्यांना दाखविलेंत तरी हरकत नाही." ( हे पत्र महादेवभाई देसाई यांजकडून आलेले आहे. )

( १३ )

" कायदेभंग करण्याला मी उद्युक्त व्हावें व माझ्या मनाला कोठून तरी जबरदस्त धक्का बसावा असा हा तिसरा प्रसंग. पहिला धक्का एप्रिल १९१९ मेमध्यें व दुसरा गेल्या नोव्हेंबरांत बसला. आणि आतां तर गोरखपूर जिल्ह्यांत झालेल्या प्रकाराने माझें मन फार प्रक्षुब्ध झाले आहे. बरेली व सहारणपूर येथें स्वयंसेवक लोकांनीं केलेल्या गोष्टीमुळें त्यांत भरच पडली. गुन्ह्याच्या स्वरूपाचा कायदेभंग व सविनय कायदेभंग हे दोन्हीहि एकाच उद्देशानें व एकाच वेळीं होण्यांत फारसा अर्थ नाहीं. सविनय कायदेभंगाचें सर्व स्वारस्य तो अनत्याचारी असला तरच होईल. हिंदुस्थानाएवढ्या प्रचंड व विस्तीर्ण प्रदेशांत सर्वत्र असें अनत्याचारी वातावरण राहीलच असें समजण्यांत मला मनुष्यस्वभावच कळत नाही असें वाटल्यास म्हणा. आतां यामुळें परिस्थिति अजमावण्याची माझ्यांत बुद्धि नाही असे फार तर ठरेल. पण त्यामुळें पुढें हटकून अयशस्वी होणारी चळवळ कशी व कां चालवावयाची ! अर्धवट अत्याचारी व अर्ध्या अनत्याचारी मार्गानें प्रत्यक्ष स्वराज्य मिळालें तरी देखील मला तें नको, कारण माझ्या कल्पनेप्रमाणें असलेले तें

स्वराज्य नव्हेच ! म्हणून तूर्त कायदेभंगाची चळवळ थांबविण्याचा विचार ठरविण्याकरितां, व अनत्याचारी वातावरण पूर्णपणें उत्पन्न होइपर्यंत ही चळवळ अनियमित मुदतीनें शक्य तितकी पुढें ढकलावी म्हणून, बार्डोलीस ता. ११ रोजीं सभा भरविली आहे. तुम्हास येतां आले अगर नाही तरी तुमचें मत मला कळवा." ( मो. गांधी )

( १४ )

" तुमच्याशीं व राजकारणांत थोर असलेल्या महाराष्ट्र पक्षाशीं मीहि संभाषण व विचार-विनिमय करण्यास फार चहातों. पण या पक्षाकडून मला अर्धवट पाठिंबा मिळतो ही गोष्ट मला मुळींच पसंत नाहीं. अर्धवट पाठिंबा ( Lukewarm ) असें म्हणण्यांत कोणाचेंहि मन दुखवावें असा माझा हेतु नाहीं. पण यापेक्षां चांगलें अर्थसूचक विशेषण सांपडलें तर तें मलाहि पाहिजे आहे. बौद्धिक खात्री पटून, महाराष्ट्र मला मनःपूर्वक पाठिंबा देऊन माझे बाजूस येईल, तर तो मला हवा आहे. काँग्रेसची आज्ञा ती मँडेट मानली गेल्यामुळें तुम्ही औपचारिक रीतिनें तिचें ठराव अमलांत आणण्यास तयार होतां. पण हे मला नको आहे. महाराष्ट्र पक्षाची जर मला बौद्धिक खात्री पटवून देतां येत नसेल तर तुमचें व माझें प्रतिपक्षी या नात्यानें उघड उघड दोन हात झालेले चांगले ! महाराष्ट्र पक्षाच्या उत्कट देशाभिमानाबद्दल मला पूर्ण खात्री आहे. पण मी अंगिकारलेल्या मार्गाच्या सत्यतेविषयीं माझेंहि मत अगदीं निःशंक असल्यामुळें महाराष्ट्र पक्षाला काबीज करून मी काया-वाचा-मनेकरून आपलासा करीन अशी मला आशा वाटते. तुम्ही व तुमची मित्रमंडळी यांना अहमदाबादेस येण्याचे गैरसोयीचे होत असल्यास मीच याकरितां मुंबईस येऊं शकेन. बुधवारपर्यंत मी अमदाबादेस आहे. गुरुवारी बार्डोलीस जाईन." ( मो. गांधी )

( १५ )

" मी लवकरच पकडला जाणार अशा फार दाट बातम्या उठत आहेत हें तुम्हाला माहीत आहे. तथापि पकडला गेलों नाहीं तर तुम्ही मला कळवताक्षणींच मी तुम्हाला मुंबईस येऊन भेटेन. मलाहि विश्रांतीची फार जरूर आहे. व सरकारनेंच आपण होऊन मला ती दिली तर शक्य तितके करून ही चळवळ पुढें ढकलण्याची तजवीज तुम्ही कराल च. ' मी पकडलो गेलो तर ' या यंग इंडियां-

तील लेखांत बहुतेक सर्व खुलासा मी केलेलाच आहे. खिलाफत प्रश्नासंबंधीं काय करावयाचे ते शेट छोटानी हे तुम्हाला सांगतीलच." ( मो. गांधी )

( १६ )

" अहमदाबादेस भरलेल्या मागील वर्किंग कमिटीनें खालील ठराव पास केला आहे. 'डॉ. अन्सारी व केळकर यांची सबकमिटी नेमण्यांत यावी. कमिटीच्या सभासदांनीं काय काय कामें करावयाचीं या संबंधीचे नियम केळकर यांनीं तयार करावें." ( एम्. एस्. गोडबोले, गांधीजीकरितां. )

गांधी यांजकडून मला आलेलीं पत्रें वर दिलीं. मजकडून गांधींना गेलेल्या पत्रांच्या नकला मजजवळ नाहींत म्हटलें तरी चालेल. पण एक सांपडली ती देतों. म्हणजे या पत्रावरून माझें मनोगत कळून येईल.

" तुमचें पत्र अगदीं योग्य वेळीं आलें. कारण दडपशाहीचा हात आतां पुण्यावर पडला आहे. आणि पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं पिकेटिंग बेकायदेशीर ठरवून त्याला मनाई केल्यामुळें काल रात्रीं मंडळींच्या विचारे हा हुकूम मोडण्याचे आम्ही ठरविले. आणि त्याप्रमाणें आज सकाळीं मॅजिस्ट्रेटला कळविलेहि.

" मी व माझा मुलगा, तसेच भोपटकर, परांजपे, गोखले वगैरे १६ मंडळी कायदेभंगाच्या पहिल्या टोळींत होतो. आमच्या मागील मंडळी हा क्रम असाच पुढें खालीनें चालू ठेवतील. पुण्यावर पाळी आली आहे. तेव्हां तें आपलें कर्तव्य कसें काय पार पाडून दाखवितात हें पहावयाचें आहे.

" महाराष्ट्र पक्षाला खरोखर मनांतून काय वाटतें असें तुम्ही मला विचारतां. पण कायदेभंगाबद्दल तुमच्या आमच्यांत यत्किंचितहि मतभेद नाहीं हे मी तुम्हाला प्रथमच सांगून टाकतों. फक्त कार्यक्रमाच्या इतर बाबतींत आम्हाला कांहीं फेरफार हवे आहेत. 'सर्व रस्ते रोमकडे जातात' त्याप्रमाणें आज देशाची स्थितीच अशी झाली आहे कीं, कौन्सिलांतल्या किंवा कौन्सिलाबाहेरच्या माणसासहि कायदेभंग केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण शाळा कोर्टें यांजवरील बहिष्कार घालण्यांत फारसें शहाणपण आहे असें मला वाटत नाहीं. आणि जोपर्यंत प्रतिस्पर्धी राज्यसंस्था (Parallel Government) स्थापन करून यशस्वी रीतीनें चालण्याची वेळ आली नाहीं तोपर्यंत कायदा मोडून तुरुंगांत जाणें हें इतराप्रमाणें स्वार्थ-

त्यागाचें एक लक्षण होय इतकेंच मानले पाहिजे. स्वभावभेदामुळें हें लक्षण कोणत्या रीतीनें व प्रकारानें व्यक्त करण्यांत यावें याला पूर्ण वाव दिला पाहिजे. शिस्तीच्या नांवाखालीं हेहि स्वातंत्र्य लोकांना न राहील तर ती शिस्त नसून शिस्तीचा अतिरेक होय !

"पण हे विचार मी येथेंच थांबवितों. कायदेभंग करून माझ्या अल्प शक्ती-प्रमाणें या राष्ट्रयज्ञांत माझ्याहि स्वार्थत्यागाची मी लहानशी आहुती टाकण्यास प्रवृत्त झालों आहे. आणि जर ही अपेक्षा पूर्ण झाली तर येत्या राष्ट्रीय सभेस मला हजर राहतां येणार नाही. निदान कांहीं महिने तरी कारागृहांत काढावे लागतील. कारागृहाच्या दारांत पाऊल ठेवीत असतांना राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांत फेरफार मागण्याचे माझे विचार मी बोलून दाखवितों, याचें खरें कारण तुम्ही मला माझ्या मनांतले विचार मोकळेपणानें जाणण्याची उत्सुकता दाखवितां हेंच होय. माझे इतर दोष कांहींहि असोत, पण तुमच्याशीं मी अतिशय मनमोकळेपणानें वागत आलों आहे, व या बाबतींत माझ्या खऱ्या मनोभावना काय आहेत त्या तुम्हास माहीत आहेत. पत्र पुरे करण्यापूर्वी एवढेच सांगतों कीं, माझ्यावर व अकोला परिषदेवर जो निष्कारण कडक आरोप करण्यांत आला आहे त्याचा मी मनःपूर्वक निषेध करतों. स्वतः मी तेथें फार तर सभानियामक अगर प्रेक्षक यापेक्षा जास्त कांहींच केलें नाहीं. तेथें पास अगर नापास झालेल्या कोणत्याहि ठरावांना मी आपले मत अगर पसंती दिलेली नाहीं. ठरावाच्या शब्दासंबंधानें तडजोडीची एक शब्दयोजना मी सुचवली पण ती अखेर नापास झाली. शिवाय या कॉन्फरन्ससंबंधानें तुमचें माझ कांहींहि मत असलें तरी, गेल्या जुलै ऑगस्टपासूनच कॉन्फरन्स भरविण्याचें ठरत होतें, व त्याप्रमाणें सहज योगानेंच ही परिषद आतां भरली इतकेंच आपण समजावें. पण यापेक्षां पुढें जाऊन, दडपशाहीमुळें लोकपक्षाची बाजू सरकारनें कमी करीत आणली असतां आम्ही बंड करण्याची ही संधि साधली, अगर दडपशाहीतून सुटण्यासाठीं कातडी बचावण्याचा प्रयत्न केला, असा कोणी आरोप करणें हा केवळ दुष्टपणा होय.

"पण आतां मी खरोखरच थोड्या गडबडींत असल्यानें हें पत्र पुरें करतों. तुरुंगांत जाण्यापूर्वी तुम्हास लिहावें म्हणूनच चार ओळी लिहिल्या आहेत.

"ता. क.—इतर कोणत्याहि प्रांतापेक्षा वऱ्हाड व मध्यप्रांत यांमध्यें कौन्सिल-प्रवेशाचा वाद अगदीं बिनतोड आहे. या प्रांतामध्यें अतिशय चिकाटीचे

खंबीर व शूरातले शूर असे राष्ट्रीय लोक आहेत. निदान यांच्याकडे पाहून तरी कौन्सिल-वादीपक्षाच्या हेतूंचा विपर्यास होऊं नये.

" ता. क.—अकोला परिषदेंतील एक गमतीची गोष्ट सांगण्यासारखी आहे. जमनादास मेहता अकोल्यास म्हणाले 'The Working Committee be hanged till it dies.' आतां वर्किंग कमिटींतील पुढारी सरकार फांशी देत नाहीं हें खरें. पण लजपतराय, दास, मौलाना, मोतीलाल नेहरू वगैरेंना उचलून तुरुंगांत ठेवून सरकारनें राष्ट्रीय सभेच्या शरीराचा एक एक भाग कापून काढला आहे. आतां यापुढें कोणावर पाळी येणार ? मला वाटतें एकटे तुम्हींच शिल्लक राहिला आहा ! " ( न. चिं. केळकर )

गांधी यांनीं लॉर्ड रेडिंग यांची मुलाखत घेतली तींत साहेबमजकुरांनीं गांधींना असें सांगितलें कीं " तुमच्या पक्षांतील असेच आणखी कोणी पुढारी आपल्या भेटीस येतील तर आपण त्यांच्याशींहि बोलूं." या आश्वासनाचा फायदा घेण्याकरितां गांधींनीं इतर कांहीं लोकांप्रमाणें मलाहि कळविलें. पण अशा भेटीपासून कांहीं निष्पन्न होण्यासारखें नाहीं असें वाटून मी लॉर्ड रेडिंग यांची भेट घेण्यास गेलों नाहीं. मुंजे जाणार होते असे वाटते. ते मला लिहितातः—

" ना. व्हाइसरॉय हे कांहीं असहकारितावादी पुढाऱ्यांची भेट घेण्यास तयार असल्यामुळें, तुम्ही व्हाइसरॉय यांना पत्र लिहून मुलाखतीची वेळ ठरवा असें महात्मा गांधींचें पत्र मला आलें आहे. तुम्हालाहि त्यांचें असेंच पत्र आलें असेल. तुमचा विचार मला ताबडतोब कळवा. कारण जें काय करावयाचें तें आपण महाराष्ट्रांतले लोक एकमतानें व शिस्तीनें करूं. व्हाइसरॉयांच्या मुलाखतींत काय बोलावयाचें याबद्दल आपण सर्वांनीं एक दिशा ठरविली पाहिजे. गांधीनीं व्हाइसरॉयांची मुलाखत सहा वेळां घेतली, पण त्यांत दोघांचें बोलणें काय झालें याचा सुगावा त्यांनीं वर्किंग कमिटींतल्या लोकांनाहि लागू दिला नाहीं. ते काय बोलले असतील तें कोणास ठाऊक ! तें सर्व बोलणें खाजगी असल्यानें कोणासच कळण्याची आशा नाहीं. पण ते कांहींहि असले तरी व्हाइसरॉयांच्या मुलाखतीला जाण्याचे तुम्ही ठरवीत असल्यास आपण सर्वांनी आधीं एकमेकांस भेटून काय बोलावयाचें तें निश्चित ठरविलें पाहिजे."

महाराष्ट्रानें असहकारितेला एक वर्षभर मान्यता दिली, तथापि ही मुदत संपतांच पुढें काय करावयाचे हें ठरविण्याकरितां महाराष्ट्र, वऱ्हाड, नागपूर या तीन प्रांतांनीं सहविचार करावा अशी सर्वांची इच्छा होती. यासंबंधीं बापूजी अणे मला लिहितातः—

"महाराष्ट्राची संयुक्त परिषद भरविण्यासंबंधानें व कार्यक्रम आखण्या-संबंधानें माझे विचार तुम्हास पसंत आहेत हे पाहून आनंद झाला. डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या खटल्याचा निकाल ता. २९ ला आहे. त्यांच्या विरुद्ध सरकारी पुरावा मुळींच टिकला नाहीं. तथापि त्यांना शिक्षा होणार हे ठरलेलेच आहे. स्वदेशी व बहिष्कार या बाबतींत आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहो, पण त्या मानानें आतापर्यंत आलेलें यश हें फारसें उत्साहजनक नाहीं."

याच विषयीं डॉ. मुंजे यांचें पत्र, ता. ३ जून १९२१ चें, खालील प्रमाणें आहेः—

"सर्व महाराष्ट्राची म्हणून एक परिषद भरविण्याची तुमची कल्पना मला फार पसंत आहे. या संबंधानें दादासाहेब खापर्डे यांना मी लिहितों. पण सध्या ते डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या खटल्यांत गुंतले आहेत. पण मला वाटते आतां पेक्षांहि ऑक्टोबरमध्यें हें कॉन्फरन्स भरविल्यास जास्त सोयीचें होईल. गेल्या केसरींत, मुसलमान लोक व अलीबंधु हे केमाल पाशा व अफगाणिस्थान यांची बडेजावी करीत असतात याबद्दल, फार मार्मिक व नामीरीतीनें तुम्ही आपलें मत व्यक्त केलें आहे. अलीबंधूंचें खरें सोंग बाहेर पडलेंच आहे. पण त्यांचा जाहीर निषेध इतक्यातच आपण करूं लागलों तर तिकडे सरकारचें मात्र फावावयाचे. तुम्ही बाण अगदीं अचूक मारला आहे. महात्मा गांधींच्या लक्षांत हें केव्हां येईल तेव्हां येईल ! अनत्याचारीपणापासून अलीबंधु अद्याप ढळले नाहींत असें गांधी 'यंग इंडियां'त सांगोत, पण त्यांची ही भूमिका व्हाइसरॉयच्या मुलाखतींत टिकलेली दिसत नाहीं. न बोलावता हे मुलाखतीला गेले ही पहिली चूक. आणि तेथें गेल्यावर अली बंधूंची त्यांनीं पाठ राखली नाहीं ही दुसरी चूक. अलीबंधूंना माफी मागण्याची पाळी यावी, आणि यामुळें त्यांच्या सार्वजनिक कीर्तीवर बोळा फिरविण्याचा प्रसंग यावा, याची मला कींव वाटते. त्यांची त्यांच्यावरच गोष्ट सोंपविली असती तर अशा वेळीं अलीबंधूंनीं कधींच माफी मागितली नसती. असहकारितेची लढाई हे शांतिमय युद्ध आहे असें महात्मा गांधी समजात. पण

राजकारणांत इंग्रज लोकांशीं दोन हात यशस्वी रीतीनें करणें फार कठिण आहे. ज्यांनीं जर्मन लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकली त्यांना गांधीसारख्या महात्म्याला फसविणें म्हणजे कांहींच अवघड नाहीं. तें पोरखेळाइतके सोपें आहे. अशी उदाहरणें पाहिलीं म्हणजे गेल्या शतकांत नाना फडणविसानंतर राजकारणांत धुरंधर असा मुत्सद्दी एक लोकमान्यांच्या खेरीज झालाच नाहीं हे मनाला पटूं लागतें. त्यांनीं या इंग्रज लोकांशीं फार धूर्तपणानें डाव चालविले. आपल्या अनुयायांना तर त्यांनीं असें तोंडघशी कधींच पाडले नसते! मवाळांना हाताशीं घेऊन सरकार 'अफगाण बोगी'चें महत्त्व नसते वाढवीत आहे. पण या जाळ्यांत न सांपडतां, गांधीच्या सल्ल्याने महंमदअल्लींनीं भडोचच्या कॉन्फरन्समध्यें या आक्षेपाचें निराकरण केलें असतें म्हणजे बस्स होतें. माफीचींच इतकी जरूरी नव्हती. हा व्हाइसरॉय व्यावहारिक शहाणपणांत पक्का मुरलेला मनुष्य आहे. त्यानें अल्लीबंधूंची माफी मात्र खिशांत घातली, व त्यांना निमूटपणानें खड्ड्यांत घातले. अँग्लो इंडियन लोकांचें मात्र आतां चांगलें फावणार. महात्माजींचा चुकीचा सल्ला ऐकून अल्लीबंधूंनीं माफी मागितली याबद्दल पुढल्या केसरींत त्यांच्यावर सडकून टीका करा. राजकारण हें राजकारणाच्याच रीतीनें केलें पाहिजे. कानांत तुळशीपत्र घालून कांहीं राजकारण करीत नसतात! मला सुचलें तें मोकळेपणानें लिहिलें आहे. पण तुमच्या विवेचक बुद्धीवरच माझा जास्त विश्वास आहे. अल्लीबंधूंवर खटला भरण्याच्या विचारांत सरकार आहे असें व्हाइसरॉयांच्या भाषणांत आलें आहे. खरें काय होतें तें लवकरच कळेल."

१९२१ मध्यें असहकारितेला अनुसरून जी मद्यपान-प्रतिबंधाची, म्हणजे पिकेटिंगची, चळवळ झाली ती पुणें धारवाड ठाणें इत्यादि जिल्ह्यांतून झाली. धारवाडकडील चळवळीशी माझा कांहीं संबंध नव्हता. पण ती चळवळ कर्नाटकच्या लोकांनीं तीव्र स्वरूपाला नेली व शेवटीं गोळीबार व हत्या झाली हें प्रसिद्धच आहे. पुण्यांतील चळवळींत आमच्या पक्षाच्या पुष्कळ लोकांवर खटले झाले, आणि दंड इतकें भरावे लागले कीं, पैशाचा हा अपव्यय म्हणून चळवळ थांबवावी लागली. ठाणें जिल्ह्यांत जमनादास मेथा प्रभृति लोकांनीं ती चळवळ केली. ती करण्यापूर्वी जमनादास यांनीं ता. ८ सप्टेंबर रोजीं. मला खालील पत्र पाठविलें:—

"ठाणे जिल्ह्यांत सरकारी हुकमाची पायमल्ली करून पिकेटिंग करण्याबद्दल निरनिराळ्या तालुक्यांतून मी सुमारें शंभर प्रमुख लोक जमा केले आहेत. सरका-

रच्या आव्हानाला आम्ही तोंड देणार आहो. आतां पुढें कसें पाऊल टाकावें याबद्दल तुमचें मत कळवा. शक्य तर आपण समक्ष भेटून या संबंधी निश्चित ठरवूं."

जमनादास यांच्या चळवळीनें काय परिणाम झाला हें खालील त्यांच्याच एका पत्रावरून दिसून येईलः—

"ठाण्यामध्यें पिकेटिंगविरुद्ध निघालेला सरकारी हुकूम रद्द झाला. याबद्दल तुम्ही जें माझें अभिनंदन केलें त्याकरतां तुमचे आभार मानतो. महाराष्ट्राच्या सर्वमान्य पुढाऱ्याकडून हें अभिनंदनाचें बक्षीस मिळालें त्यामुळें त्याची किंमत विशेष वाटते. पण या बहुमानांत दुसरेहि वाटेकरी आहेत. या सत्याग्रहाचीं स्फूर्ति मला तुमच्याकडून मिळाली, व सर्व ठाणें जिल्ह्यानें माझे प्रयत्न यशस्वी करण्यास मदत केली. पटेल व तुम्ही मिळून एकमेकांस लिहिलेलीं पत्रें मी पाहिलीं. पटेल यांनीं शेवटचें वाक्य तुम्हास लिहावयास नको होतें. पण त्याला तुम्हीहि उलट टोला चांगलाच दिला आहे. त्यानें पटेल साहेबांचें नाक थोडे झणझणले असेल. पटेल यांना वाटतें कीं, आपण सर्वच गंमत करतो म्हणून त्याबद्दल लोकांनीं रागावूं नये. पण कुचेष्टेलाहि मर्यादा आहेच कीं नाहीं ? आपण सर्व आतां आकोल्याला भेटूच. बल्लारीप्रांताच्या विभागणीबद्दल असलेल्या तंट्यांत कॉंग्रेसनें तुम्हाला न्यायाधीश निवडले आहे व तें काम तुम्ही यशस्वीरीतीनें कराल च." ( ता. ३० सप्टेंबर १९२१ ).

बॅरिस्टर जयकर व आम्ही राष्ट्रीय पक्षांतील महाराष्ट्रीय लोक यांची मनोवृत्ति असहकारितेविषयीं जवळजवळ एकाच प्रकारची होती. म्हणजे असहकारिता हा योग्य मार्ग नव्हे, पण राष्ट्रीय सभेच्या इभ्रतीकरितां तो मार्ग कांहीं काळ अवलंबावा असे त्यांचेंहि मत होतें. त्यांनीं वकिली सोडली, व टिळकांच्या नांवानें निघालेल्या स्वराज्य फंडाला पंचवीस हजार रुपये एका रकमेनें दिले. असहकारितेपूर्वी जयकर व मी यांचा विशेष संबंध येत नसे. पण नंतर टिळकांच्या पश्चात्, मी महाराष्ट्राचा पुढारी असें मला मानून, ते माझ्याशीं स्नेहसंबंध ठेवून सहविचार करूं लागले. मुंबईस त्यांना फार प्रमुखस्थान असतां 'केळकर पुढारीपण घेतील तर मी त्यांचा अनुयायी म्हणवून घेऊन काम करीन' असे ते परवां परवां पर्यंत स्नेहीमंडळीजवळ म्हणत. उलट पहिल्या प्रतिसहकारपक्षाचे अध्यक्ष त्यांना करून मी त्यांच्या हालाखालीं काम केलें. आणि १९३३ सालीं ते विलाय-

तेस असतांना इकडे हल्लीचा लोकशाही पक्ष स्थापला गेला तेव्हां ते येथें असते तर त्यांनाच अध्यक्ष करून मी त्यांच्या हाताखालीं आनंदानें काम केलें असतें. असो. जयकर व मी यांच्यामध्यें खालील पत्रानें पत्रव्यवहाराला प्रारंभ झाला असें मला स्मरतें.

"मी वकिलीची प्रॅक्टिस सोडल्यापासून आपली दोघांची गांठ पडली नाहीं. तथापि जमनादास मेहता मला सांगतात कीं, मी तुम्हास भेटून एकदा चर्चा केल्यास बराच फायदा होईल. माझ्या मनाला सध्या अशी अडचण आली आहे कीं, गांधी व त्यांचें देशकार्य यांच्याविषयीं माझ्या मनांत फार निष्ठा आहे पण अनेक मुद्यांवर त्यांच्याहून माझे विचार वेगळे आहेत. आणि म्हणून मतभेद उपस्थित करण्यापेक्षां तूर्त गप्प बसावें असें वाटतें. अर्थात् याहि गोष्टीचा अतिरेक होऊन उपयोग नाहीं. तथापि कार्यक्रमांत कितीहि दोष असले तरी एकी राखण्याकरितां कोणताच मतभेद सध्या तरी दर्शवूं नये असें वाटतें. यामुळें कोठें कोठें थोडा गैरसमजहि उत्पन्न झाला असेल. पण मला वाटतें कीं, आपण दोघे एकत्र बसल्यास कार्यक्रमांतील दोष टाळून तो जास्त व्यावहारिक कसा करतां येईल याबद्दल आपण कांहीं उपाय सुचवूं शकूं." ( २० सप्टेंबर १९२१ ).

असहकारिता पटत नसतांहि प्रथम केवळ कॉंग्रेसच्या इभ्रतीकरितां कांहीं लोकांनीं तिला पाठिंबा दिल्याचें आणखी एक उदाहरण खालील पत्रावरून दिसून येईलः—

"सरकारच्या दडपशाहीमुळें कलकत्त्यांतील परिस्थिति मोठी चिंताजनक झाली आहे. खुद्द कॉंग्रेसचेंच अस्तित्व राहतें कीं नाहीं याची भीति वाटते. आपले मतभेद कांहींहि असले तरी या वेळीं कॉंग्रेसचा बचाव करणें आपलें काम आहे. स्वतः मी असहकारितावादी नाहीं व महात्माजीचा कार्यक्रमहि मला सर्वस्वी मान्य नाहीं. तथापि सहिष्णुतेनें मतभेद सोसण्यास आपण तयार झाले पाहिजे. बॅ. जयकर यांना शक्य तर मुंबईस एखादी कॉन्फरन्स बोलाविण्याची मी तारेनें विनंति केली आहे तिला तुम्हीहि जरूर या. (आशुतोष चौधरी, कलकत्ता, ता.१५डिसेंबर १९२१)

बार्डोलीची चळवळ करून ती मागें घेतली ही गांधींच्या चंचल स्वभावाची खूण ठरली. यासंबंधी बापूजी अणे यवतमाळहून मला लिहितातः—

"तुमचें पत्र पोहोचले व त्याबरोबरच तुमचा केसरींतील बार्डोलीसंबंधानें अग्रलेख वाचला. कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींत तीव्र बुद्धिमत्ता व राजकारणांतील व्यावहारिक धोरण जाणणारीं माणसें तुमच्याखेरीज कोणी नाहींत. निदान तुम्ही तरी तेथें असल्यानें ही उणीव भरून निघाली आहे, हे महाराष्ट्रांत व बाहेर हिंदुस्थानांत आतां सर्वांना माहीत आहे. अनेक प्रसंगीं जर वर्किंग कमिटीत तुम्ही नसता, तर सुधारलेल्या सर्व जगाकडून छीःथू होऊन कॉंग्रेस खात्रीनें हास्यास्पद झाली असती. तुम्ही बऱ्याच कुशलतेनें व यशस्वीरीतीनें आपला मार्ग काढला. पण अलीकडे कॉंग्रेसची कार्यकारी मंडळी वहावत चालली; व ती जबाबदारी आपण घेऊ नये म्हणून कमिटीशीं आपला संबंध तोडून टाकावा असे तुम्हास वाटू लागल्याचे दिसते. वर्किंग कमिटीचे विचार म्हणजे एकट्या गांधीचे विचार असेच सध्या झाले आहे, व त्यांच्या धोरणांत गेल्या बारा महिन्यांत जे जे प्रचंड चढउतार झाले ते पाहिले म्हणजे शर्थ व कींव वाटते. वादळ उठल्याची त्यांना मौज वाटते, पण वादळामागून येणाऱ्या देवतांचा कोप होऊ नये म्हणून ते शांतिपाठ गाऊ लागतात. आपल्याच कृत्यानें उत्पन्न झालेल्या परिणामांना तोंड देण्याइतकें खंबीर पोलादी अन्तःकरण या गृहस्थाजवळ नसावे याचा खेद वाटतो. देशांतील चळवळ या वेळीं इतक्या परमोच्च कोटीला पोंचली असतांना तिला नीट सावरून नेता येऊ नये, व अत्यंत अयोग्य वेळीं गांधीच्या मनावर मृदुतेचा पगडा बसावा हें देशाचे दुर्दैव होय!" (ता. १७ फेब्रुवारी १९२२)

त्याच विषयावर आणखी एक, सुरतेचे गोटोसकर यांचें, ता. १८ फेब्रुवारीचें खालीलप्रमाणें पत्र मला आलें:—

"बार्डोलीचा बार फुकट गेला" हा अग्रलेख वाचून आपण एकंदर महाराष्ट्राचें हद्गत सर्वांना स्पष्टपणें समजावून दिलें आहे अशी आमची तर पूर्ण खात्री झालीच आहे. परंतु येथील आमचे गुर्जर बंधू यांनाहि त्या लेखानें इतकें थक्क करून टाकले कीं, तो लेख वाचण्यास केसरीची सारखी मागणी होत जाहे. येथील बहुतेक विचारी व पुढारी गुर्जर बंधू आपल्याच धोरणाचे असून आतां पुढें महाराष्ट्र काय करतो इकडे डोळे लावून राहिले आहेत. येथील लोकवार्ता अशी आहे कीं, लोकमान्य आज हयात असते तर ही वेळ आली नसती; व आपण दिग्दर्शित केलेल्या विचारावरून आपण जें कार्य कराल त्यांत येथील जनतेची पूर्ण मदत व

सहानुभूति आहे ही खात्री आपण बाळगावी. आम्हा सर्व मंडळीस लोकमान्यांची नेहमीं आठवण होत असून आपण त्यांच्या मागें त्यांचें कार्य योग्य दिशेनें चालूं ठेविलें आहे याचीहि पूर्ण जाणीव आम्हास आहे. ''

बारडोलीच्या अयशस्वी चळवळीचें धोरण प्रमुख काँग्रेसभक्तांनाहि अप्रिय होतें. आणि त्या नंतर दिल्लीच्या ऑ. इं. कॉं. कमिटींत गांधींच्या निषेधाचा ठराव येण्यापर्यंत मजल जाणार होती ती टळली इतकेंच. पण गांधीहि मनांतून टरकले. आणि यापुढें कांहीं दिवस त्यांनीं राजकारणांतून लक्ष कमी करून 'विधायक' नांवाच्या कार्यक्रमावर लावून आपलें वैशिष्ट्य उरवावें असें योजिलें. पण या कार्यक्रमांत काँग्रेसलाहि ओढण्याचा गांधींचा विचार दिसून आला. रा. बापूजी अणे यांच्या लक्षांत ही गोष्ट येऊन ते मला यवतमाळहून ता. ४ मार्च १९२२ च्या पत्रांत लिहितात :—

''बंगाल व पंजाबमधील प्रतिनिधि मनामध्यें बरेच नाराज आहेत असें दिल्लीच्या सभेंत दिसून आलें. बहुतेक सर्वांच्याच मनांत असंतोष होता. पण कांहीं महत्त्वाचे फेरफार करावेत असा शब्द मात्र कोणाच्याच तोंडून बाहेर येईना. कारण महात्माजी सिंहासनावरून उतरून राजसंन्यास करतील ही त्यांच्या मनांत भीति! महात्माजींचें मुख्यपद कायम राहून इतर गोष्टी घडून याव्या असें त्यांना वाटतें. पण आतां पुढें मागें लवकरच काँग्रेस ही एक 'सोशल सर्व्हिस'ची संस्था होणार, व आपणाला या अधिकारी मंडळीशीं तंटे करावे लागणार, हे मला निश्चित दिसत आहे. आपण राष्ट्रापुढें एक जोरदार व लोकास चकित करून सोडील असा कार्यक्रम ठेवणार आहों असे गांधी म्हणतात. पण असल्या भाषेचा आतां मला वीट आला आहे. काँग्रेसच्या सभासदांनीं म्हणे अमूक अटी पाळाव्यात! असा कार्यक्रम अवनतिकारक आहे इतकेंच नव्हे तर देशांतील कार्यकर्त्या लोकांची त्यानें पांगापांग झाल्याशिवाय राहाणार नाहीं. समाजांतील खालचे व वरचे वर्ग यांच्यामध्ये कृत्रिम भावना उत्पन्न होऊन तंटे लागतील. ही आपत्ती मला बिनतोड व दुस्तर दिसते; व आपल्या सारख्या वरिष्ठ मंडळींनीं यावेळीं काळजीपूर्वक निश्चय करून व धैर्यानें पुढें होऊन या लोकांना थोपवून धरलें पाहिजे. राष्ट्राचें संरक्षण करण्याला या खेरीज दुसरा मार्ग नाहीं. मुंजे यांनीं, भोपटकर वगैरे मंडळींसह तुम्ही इकडे येण्याबद्दल, तुम्हाला लिहिलेच आहे. आपण सर्व एकत्र होऊं आणि आपला वेगळा कार्यक्रम पुढें मांडून तो अमलांत आणू असे निश्चयानें सांगूं. मग

ऑ. इं. कॉं. कमिटी त्याचा अंगिकार करो अगर न करो. बंगाल पंजाब व मद्रास येथील लोक आपल्याला खास मिळतील. तुमच्याच निर्णयावर आम्ही ही सर्व गोष्ट सोपविली आहे."

पण लवकरच गांधींच्यावर खटला होऊन कॉंग्रेसचें लक्ष वेगळ्या विषयाकडे वळलें. याविषयीं बापूजी अणे मला लिहितातः—( ता. २१ मार्च १९२२ )

" नुकतेंच गांधी व बॅंकर यांना झालेल्या शिक्षेचें वर्तमान कानीं आलें. गांधींना सहा वर्षांची शिक्षा ठोठावली जाईल अशी मला कल्पनाहि नव्हती. टिळक व गांधी यांच्या काल्पनिक साम्याची जज्जाला भुरळ पडली. गांधीजींच्या तुरुंगवासामुळें आपल्या नव्या कार्यक्रमाची कल्पना थोडी पुढें ढकलावी असे मला वाटूं लागले होते. पण मध्यंतरीं कलकत्त्याहून परत येताना मि. बमनजी भेटले. त्यांनीं एक चिठ्ठी दासबाबूंकडून आणली आहे असे ते म्हणाले. डॉ. मुंजे यांनीं ती उतरून घेतली आहे. तिचा सारांश असा कीं, " प्रॉव्हिंशियल ऑटॉनमी मागावी. नवीन निवडणुकी करतां उभे रहावे. संप वगैरे करून करबंदीपर्यंत चळवळ भिडवावी. वर्किंग कमिटीची पुनर्घटना करावी. मवाळ लोकांना थोपवून धरावे, व महात्माजींच्याबद्दल फारसे कांहींच न बोलता हा नवा कार्यक्रम पुढें आणावा. दासबाबूंची ही चिठ्ठी खरी असल्यास बंगालप्रांताला हाताशीं धरून पुढे कांहींतरी करण्याची आशा आहे. दासबाबूंच्या पत्राबद्दल तुम्हाला काय वाटते? तुम्ही तें पत्र पाहिलेच असेल.

" मुळशी पेट्यांतील चळवळ सपशेल तोंडघशी पडली हें ऐकून वाईट वाटलें. पण मुळशीच्या मावळ्यांनींच आपला नैतिक पाठिंबा दिल्याशिवाय स्वतः पुढें होऊन लोकांनीं ही चळवळ करण्यांत फारसें तथ्य आहे असे मला वाटत नाहीं. किंबहुना ते तयार नसताना इतरांना ही चळवळ करण्याला अधिकारच नाहीं. या बाबतींत सर्व हिंदुस्थानला केलेल्या जाहीर विनंतीचा कांहींहि उपयोग होणार नाहीं असें आपल्या मित्रांना माझें मत मी कळविलें आहे. मावळ्यांना जमीन विकावयाचीच नसली तर गोष्ट निराळी. पण तसे नसल्यास त्यांच्या नांवावर इतरास लुडबुड करण्याचा हक्कच रहात नाहीं."

यानंतर सर्व महाराष्ट्रीय पक्ष मिळवून स्वतंत्र धोरण ठरविण्याचा आमचा निश्चय कायम झाला. पण त्याला प्रारंभ म्हणून पेण येथें महाराष्ट्राची परिषद आम्ही

भरविली. तींत या प्रश्नाला उघड तोंड फुटलें. परिषदेचें अध्यक्षपद खाडिलकरांना दिलें होतें. तथापि त्यांचे विचार वेगळे परिषदेचे वेगळे हे दिसून आले. परिषदेच्या ठरावांचे निर्णय अगदीं 'पोल' घेऊन मतें मोजून करण्यांत आले, ते फेरवाल्यांच्या बाजूचेच झाले. पेण परिषदेची हकीकत वाचून डॉ. मुंजे मला लिहितातः—

" महाराष्ट्र पक्षाच्या तत्त्वाकरितां पेण कॉन्फरन्समध्यें चांगलीच खडाजंगी उडाली असें वर्तमानपत्रावरून दिसतें. खाडिलकर अध्यक्ष असताना आपल्या मित्रमंडळीनीं मोठाच जय मिळवून लढाई मारली त्याबद्दल फार समाधान वाटते. आपल्या टिळक–पक्षांत असलेलें सख्य मोडून लोकमान्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या दीड वर्षांत त्याची वाताहत झाली, व हाच तो पूर्वीचा टिळकांचा महत्तम व बलिष्ठ पक्ष काय अशी भ्रांत पडून शंका येऊं लागली. पण याहिपेक्षां काळजाला घरें पाडणारीं गोष्ट म्हणजे, सद्बुद्धीनें व मित्रभावानें महात्माजींच्या चुका वेळोवेळीं महात्माजींना दाखवून व पटवून दिल्या तरी, आपलेच कांहीं मित्र व खांद्याला खांदा लावून काम करणारे कार्यकर्ते यांनीं उठून आपणांविरुद्ध गैरसमज पसरविण्याचें व्रत अनुसरावें ही होय. राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम आम्ही शक्य तितका कसून अमलांत आणला, व वेळोवेळीं निर्भयपणें व प्रामाणिकपणें पुढें असणाऱ्या धोक्याची सूचना महात्माजींना सावधगिरीनें दिली. म्हणून गांधींचे अस्सल खरे मित्र असे आपणास मानले जाण्याऐवजीं, आपण जणु काय गांधींचे शत्रू असून त्यांचे पाय पाठीमागें खेचले अशी बदनामी करण्यांत येत आहे ! इमानीपणाचें हें बक्षीस ! टीकेचा हा मोह खाडिलकरांनाहि आवरला नाहीं. पण आपलें दिल साफ आहे, आणि आपल्यापैकीं कोणासंबंधानेंहि त्याला बार्डोलीचा कार्यक्रम नापसंत आहे, असे महात्मा गांधींच्या एखाद्या जवळच्या अंधभक्तालाहि म्हणतां यावयाचे नाहीं. तुरुंगांत जाण्यापूर्वी या कार्यक्रमाखेरीज गांधी इतर कांहीं सांगून गेलेच नाहींत, व स्वराज्य प्राप्तीकरितां हा कार्यक्रम पुरा नाहीं. गांधी सहा वर्षांनीं येईपर्यंत त्यांच्याकरतां देशातील चळवळ थांबविण्यास आपण तयार नाहीं. म्हणून व्यावहारिक रीतीनें राजकारण करण्याकरितां कॉं. कमिटीनें देशांतील परिस्थितीचा व कार्यक्रमाचा फेरविचार केला पाहिजे. यांत खरोखर मतभेद होण्यासारखे काय आहे ? पण अशारीतीनें आपल्याला यादवी व युद्ध करण्यास भाग पाडावयाचे असेल तर आम्हीहि मोठ्या निकरानें लढूं हे त्यांनीं लक्षांत ठेवावें मग त्यांत वाटेल तो जगो किंवा मरो ! दुर्दैवाचें या लोकांशीं आज

यांदवीचा प्रसंग असला तरी आपण नेहमीं सरकारला एकजुटीनें तोंड देऊं व भांडूं.

" महात्माजींचा कार्यक्रम आपणास कितपत पसंत आहे व नाहीं ? तसेंच लोकांनीं जे खोटेनाटे आरोप व गैरसमज पसरविले आहेत त्याबद्दल इनकार करणारा एक जाहीर 'मॅनिफेस्टो' आपण काढावा व धैर्यानें या परिस्थितीला तोंड द्यावें असें मला वाटतें." ( ता. २३ एप्रिल १९२२ )

या सुमारास महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटी आमच्या पक्षाच्या हातीं असून मी तिचा अध्यक्षच होतों. परंतु काँग्रेसच्या घटनेंतील अधिकाराच्या अशा या जागीं राहिल्यानें, मला स्वतंत्र मतांचा प्रसार केसरीतून व जाहीर सभांतून करणें अडचणीचे वाटूं लागले. काँग्रेसचे ठराव सामान्य सभासदांवर बंधनकारक नाहींत ही तात्त्विक भूमिका मी लढवीत होतोंच. पण प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षाला तितकें स्वातंत्र्य रहात नाही असें माझें मत असल्यामुळें, या अध्यक्षपदाचा मी राजीनामा खुषीनें दिला व तो स्वीकारला जावा असा आग्रहहि धरला. या संबंधांत दोन पत्रें देतोः—

रा. पी. जी. जोशी हे एरंडोलहून लिहितातः—( ता. ६ मे १९२२ )

" तुम्ही म. प्रां. कॉ. कमिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला हे वाचून मनाला फार वाईट वाटले. जर तो तुम्ही परत घेतला नाहीं तर महाराष्ट्रावर मोठें संकट आलें आहे असें आम्हाला वाटतें. तुमच्यावर किती अगणित टीका केली जात आहे हे मला माहीत आहे. पण तुम्ही तेथें आहात म्हणूनच या टीकाकारांच्या जिव्हेला कांही तरी आळ्य आहे. म्हणून तुम्ही आपला राजीनामा परत घ्यावा असें मला वाटतें. पण तुमच्या मनांत कदाचित् लोकांचा आपल्यावर विश्वास किती आहे हे अजमावण्याचे असेल ! तथापि चौकशी कमिटी निवडण्याच्या वेळीं याविषयीं शहानिशा आपोआप होईलच. २१ तारखेच्या सभेत आपलें बहुमत करूं व तुमच्याबद्दल विश्वास निदर्शक ठराव पास करूं. आणि तुम्हाला आपला राजीनामा परत घ्यावयास लावूं. "

याचविषयीं बापूजी अणे यांचें पत्र खालीलप्रमाणें आलेः—" तुम्ही सध्या कोणत्या मनःस्थितींत आहात त्याची मला बरोबर कल्पना आहे व

त्यासंबंधीं मला आश्चर्य वाटत नाहीं. महात्मा गांधींनीं उत्पन्न केलेल्या भ्रमिष्टपणाच्या कल्पना टाकून पुनः राजकारणाच्या वळणावर यावें, अशा हेतूनें कंबर बांधून मोहिमेस सुरुवात करण्याकरितां म्हणून जर तुम्ही आपला राजीनामा दिला असेल तर महाराष्ट्रानें आपलें कार्य बरोबर ओळखलें असेच मी म्हणेन. इतकीं वर्षे सार्वजनिक कामांत पडलेल्या तुमच्यासारख्या अनुभविक वर्तमानपत्रकर्त्यानें देशाला हांक मारली तर, सामान्य जनतेचेंच काय परंतु निर्ढावलेल्या नाफेरवाल्यांचेंहि अन्तःकरण जागे झाल्याशिवाय राहणार नाहीं. ही गोष्ट ताबडतोब तुम्ही हातीं घेण्यास तुमच्या मार्गांत बऱ्याच अडचणी असतील हे मला समजते. पण हे केल्याखेरीज मात्र उपयोगी पडणार नाहीं हे निश्चित समजा. तात्यासाहेब, तुम्हांला खरे सांगतो कीं, हाताशीं चरखा घेऊन कॉंग्रेसच्या सध्या मानमान्यतेच्या वरिष्ठ अधिकारी मंडळाच्या जागेमध्यें नाचण्यापेक्षां मला त्यापासून चार हात दूर फटकून राहण्यांतच आनंद वाटतो. आपल्या नेमस्त मित्रांच्या कारवाईमुळें जसें त्यांनीं कॉन्स्टिटयूशनचें कुंपण आपणाभोवतीं उभे केलें व आपण बाहेर राहिलों, त्याप्रमाणें चरक्याच्या आग्रहामुळें गांधींनीं कॉंग्रेसमधील अधिकार हा निव्वळ तुरुंग बनविला आहे. या घटनेखालीं इतर जागाच काय पण ऑ. इं कॉं. कमिटीची माझी जागाहि मी साफ सोडून द्यावयास तयार झालों असतों. पण हे करतांना ज्या लोकमान्यांच्या हाताखालीं २५ वर्षे राजकारणांत आपण वाढलों त्याच तत्त्वावर पुनः काम करावें एवढीच इच्छा आहे. साबरमतीच्या तीरावरील आश्रमांतून एक एक नवीन हुकूम सुटावेत, व आम्ही भ्रमिष्टपणानें त्यांचा जप करीत बसावें हे वस्स झाले. आपण सर्वच कॉंग्रेसच्या अधिकारांच्या जागांचे राजीनामे देऊन टाकू व धीटपणानें आपलीं मतें पुढें मांडूं. ही गोष्ट आपण केली तर महात्माजी खडबडून जागे होतील; व कार्यक्रमांत एकतर आपणास इष्ट असलेला बदल घडवून आणता येईल किंवा कॉं. घटनेच्या बंधनांतून कायमचे मुक्त होऊन आपणास पाहिजे ते करण्यास अवसर सांपडेल. तुम्ही राजीनामा देणार ही गोष्ट मला पसंत आहे. पण या गोष्टी व पुढील दिशा आपण एकमतानें ठरवूं. या सर्व गोष्टींचें माझ्या मनावर इतकें जड ओझें असल्यासारखें झालें होतें म्हणून तुम्हास सविस्तर लिहिलें."

आम्हा महाराष्ट्रीयांची ही विचारसरणी या सुमारास मोतीलाल नेहरू, गांधींचे नवे पट्टशिष्य व हस्तक, यांनाहि पटूं लागली होती. ता. २९ व ३०

ऑक्टोबरच्या सुमारास पंडित मोतीलाल यांनीं डेहराडून येथें प्रांतिक परिषद भरविली. तिचें अध्यक्षपद त्यांनीं मला देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तें स्वीकारण्याची विनंति तारेनें केली. पण मी तें त्या वेळीं स्वीकारू शकलों नाहीं. अणेप्रभृति कांहीं लोकांनाहि डेहराडून येथें निमंत्रण करण्यांत आलें होतें. या प्रांतिक परिषदेस नेहरूंनी आम्हास कां बोलावले असेल याची मीमांसा बापूजी अणे यांनी मला ता. २५ ऑक्टोबर रोजीं लिहिलेल्या पत्रांत खालीलप्रमाणें केली आहेः—

"डेहराडून परिषदेकरितां हजर रहाण्याची पं. मोतीलाल नेहरू यांच्याकडून मला तार आली आहे. मला दुखण्यामुळें जातां येत नाहीं. तथापि अशी एक शंका मनांत आली कीं, पं. नेहरूंना कौन्सिल-बहिष्कारासंबंधानें इकडच्या कांहीं लोकांशीं चर्चा करावयाची असेल. कौन्सिल-बहिष्कारापासून उलट खाऊन पंडितजी कौन्सिल-प्रवेशाच्या धोरणाकडे वळूं लागलेले दिसतात. त्यांना विरोध करणाऱ्या लोकांची समजूत त्यांना घालावयाची असेल म्हणून त्यांनी तुम्हाला व डॉ. मुंजे यांना डेहराडूनला येण्याविषयीं तार केली असेल. तुम्ही जाणार आहात किंवा काय?"

पंडित नेहरू यांचें कौंसिल-प्रवेशविषयक धोरण पक्के ठरून तें पुढील डिसेंबरांत गयेस प्रगट झालेंच.

गंगाधरराव देशपांडे हे १९२१ मध्यें तुरुंगांत गेले ते १९२२ च्या मेच्या सुमारास परत आले. ते अद्यापि स्वतःस पूर्ण नाफेरवाले म्हणत नव्हते. किंबहुना महाराष्ट्रांतल्या दोनहि विवादी पक्षांत आपले स्नेहि असल्यामुळें, आपण मध्यस्थी करून कांहीं तडजोड करू अशी त्यांना आशा वाटत होती. म्हणून त्यांनीं केसरीमध्यें ता. ३० मे १९२२ रोजीं खालील पत्र प्रसिद्ध केलेंः—

"वि. वि. आज सहा महिनेपर्यंत मी सार्वजनिक आयुष्यक्रमांतूनच बाजूला होतों. आतां तुरुंगांतून बाहेर आल्यावर महाराष्ट्र, कर्नाटक, वऱ्हांड, नागपूर वगैरे प्रांतांतील निरनिराळ्या मित्रमंडळींशीं माझीं भाषणें झालीं त्या सर्वांत एकच गोष्ट मला प्रमुखपणें दिसून आली ती ही कीं, हल्लीं राष्ट्रीय पक्षामध्यें बरेच मतभेद झालेले असून, त्याचें पर्यवसान राष्ट्रकार्य साधण्याच्या दृष्टीनें इष्ट होणार नाहीं असें वाटतें. पण त्या गोष्टीबरोबर दुसरीहि एक कल्पना तितक्याच ठळकपणानें नजरेस आली ती ही कीं, राष्ट्रीय पक्षांतील निरनिराळ्या मतांच्या

प्रमुख गृहस्थांनीं एकत्र बसून, संयुक्त असें धोरण निश्चयात्मक ठरविण्याचें मनांत आणलें तर तें एकंदर राष्ट्रीय पक्षानें मान्य करणें अशक्य नाहीं. स्वतः माझें मत तसेंच असून वरील कल्पना सिद्ध करण्याविषयीं जितकी खटपट करतां येईल तितकी करावी अशी माझी इच्छा आहे. तथापि अशा कामास सर्वांची संमति असल्याशिवाय कोणतीच गोष्ट करतां येत नाहीं. सर्वांची संमति असल्यास सर्वांतर्फे एक कमिटी नेमून तिचा निकाल सर्वमान्य होण्याचा पुष्कळ संभव आहे. माझ्या मतें खालील गृहस्थांची कमिटी नेमल्यास तिचा निकाल राष्ट्रीय पक्षास पूर्ण मान्य होईल. ते गृहस्थ म्हणजे—चिं. वि. वैद्य ( अध्यक्ष ), अभ्यंकर, डॉ. मुंजे, अणे, कौजलगी, खाडिलकर, केळकर व मी स्वतः. मी त्या कमिटीचें पडेल तें कार्य करण्यास तयार आहे. या कार्यास मदत करण्याकरितां भाषणांतून व लेखांतून हल्लीं एकमेकांत चालविलेले वाद तूर्त तहकूब ठेवावे अशी माझी सर्वांस आग्रहाची विनंति आहे." पण या योजनेतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं.

१९२२ च्या मे जून पासून महाराष्ट्रांतील नाफेरपक्षानें बरीच उचल केली. महाराष्ट्र प्रां. कॉं. कमिटी आम्हा फेरवाल्या पक्षाच्या हातीं होती याचें त्याला वैषम्य वाटूं लागून, पुणें शहर व जिल्हा कॉंग्रेस कमिट्या आपल्या हातीं आणण्याची खटपट त्यानें सुरूं केली. या खटपटींत त्याजकडून दंगल दांडगाई यांचाहि उपयोग होऊं लागला. १९२२ च्या ऑक्टोबरांत पुणें शहरांत झालेल्या निवडणुकी उधळून लावल्या गेल्या आणि पुंडाई वाढूं लागली. म्हणून आम्ही मंडळींनीं एक जाहीर पत्रक काढून उमेदवारींतून आपलीं नांवें परत घेतलीं व जिल्हा कॉंग्रेस कमिटीवरील जागांचे राजीनामे दिले. हें पत्रक खालीलप्रमाणें :—

" रा. रा. चिटणीस, जिल्हा कॉंग्रेस कमिटी, पुणें यांस :— वि. वि. पुणें जिल्हा कॉं. क. नें अधिकार दिलेल्या कार्यकारी मंडळानें ठरविल्याप्रमाणें निवडणुकीचें काम योग्य रीतीनें तीन तास चालूं असतां कांहीं 'नाफेरवाल्या' मंडळींनीं बेकायदेशीर तक्रारी करण्यास सुरुवात केली.

" ज्या कोणत्या तक्रारी असतील त्यांचा निर्णय मागाहून रीतीप्रमाणें लावितां येईल, पण निवडणुकीस हरकत करूं नका, असें जि. कॉं. कमिटीचे अध्यक्ष श्री. ज. स. करंदीकर यांनीं सांगितलें असतां, आम्ही 'सत्याग्रह' करणार असें म्हणून, 'नाफेरवाल्या' मंडळींनीं गडबड गोंधळ करून निवडणुकीचें

काम बळजबरीनें थांबविलें. पोलिंग ऑफिसर यांना काम चालवूं दिलें नाहीं. यास्तव 'नाफेरवाल्या' मंडळींची नियमाप्रमाणें वागण्याची इच्छा दिसत नाहीं. हीच स्थिति पुढील निवडणुकींतहि घडून येण्याचा संभव दिसतो. याकरितां आम्हांपैकीं उमेदवार म्हणून ज्यांचीं नांवें जाहीर झालीं आहेत त्यांनीं आपआपलीं नांवें परत घेतलीं आहेत. तसेंच वरील कारणाकरितां आम्ही खालीं सह्या करणारे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अधिकारी व कार्यकारी मंडळाचे सभासद आज रोजीं आपआपल्या जागांचे राजीनामे देत आहोत. ते जि. काँ. कमिटीच्या साधारण सभेपुढें ठेवावेत, अशी विनंति आहे. कळावें. तारीख २५ ऑक्टोबर सन १९२२."

न. चिं. केळकर, वामन मोरेश्वर पोतदार, अनंत वासुदेव फडणीस, वि. गं. केतकर, गणेश विनायक देवधर, रामकृष्ण गोपाळ भिडे, ना. पु. कर्वे, गंगाधर विश्वनाथ गोखले, विश्वास बळवंत डावरे, भालचंद्र गणेश ठकार, बाळुभाई किकाभाई, रंगनाथ ग्यानोबा लडकत, रघुनाथशास्त्री पटवर्धन, गोपाळ हरी धारप, दा. वि. गोखले, न. वि. गाडगीळ, गमनाजी पिताजी, कृ. गो. लोहोकरे, बाबूराव भाऊराव फुले, दत्तात्रय नारायण गोडसे, शंकर गणेश लवाटे, गोपाळ सदाशिव पळसुले.

यांत रा. न. वि. गाडगीळ हे एक आहेत हें वाचकांनीं ध्यानांत ध्यावें.

असहकारितेच्या वादांत आम्ही फेरवाले लो. टिळकांचें नांव ओढीत नव्हतों. पण नाफेरवाले ही गोष्ट आग्रहानें करीत. म्हणून टिळकांचें नांव वादांत ओढण्याचा एक मासला देण्यासारखा आहे तो असा. कै. विसूभाऊ राजवाडे हे चालू राजकारणांत कधींहि भाग घेत नसत. शिवाय ह्या विषयांतील त्यांच्या मताला कोणी फारसा मान देत नसत. कारण ते कोणत्या क्षणाला उलट सुलट काय बोलतील याचा नेम नसे. पुण्यांतील अग्रेसर नाफेरवाले वासुकाका जोशी. त्यांनीं राजवाडे यांना खुषींत आणून असहकारितेच्या समर्थनार्थ एक लेख 'चित्रमय-जगतां'त लिहिवून प्रसिद्ध केला. त्याला 'संबंध-ट्वालन' असें कौतुकास्पद नांव दिलें होतें. राजवाडे यांच्या राजकीय मतांची आम्हाला पर्वा नव्हती. परंतु त्यांच्या इतिहास संशोधकत्वाची पुण्याई या वादांत असत्पक्षाच्या बाजूनें खर्ची पडणार होती, म्हणून मला त्यांच्या लेखावर टीका करणें भाग पडलें. त्या संबंधानें ता. ५ सप्टेंबर १९२२ च्या केसरींतला उतारा खालीं देत आहेः—

" जुन्या इतिहासाचें संशोधन करणाराना प्रचलित राजकारणासंबंधानें आपलीं मतें व्यक्त करण्याचा अधिकार इतर कोणाहि इतका पोंचतो ही गोष्ट आम्हास मान्य आहे. तथापि लोकांना प्रत्यक्ष दिसणाऱ्या ऐकूं येणाऱ्या गोष्टीसंबंधानें अशा संशोधकांनीं भ्रामक विधानें केलीं किंवा अपसिद्धांत प्रतिपादले, तर त्यांच्या संशोधनावरील लोकांचा विश्वास कमी होणें स्वाभाविक आहे. ही विद्यावर्धनावर एक प्रकारची आपत्ति होय. सर वॉल्टर रॅले हा तुरुंगांत बसून जगाचा इतिहास लिहीत असतां, आपल्या शेजारी घडणाऱ्या गोष्टीसंबंधानें आपली समजूत खोटी कशी ठरली हें त्याला दिसून येतांच, त्यानें तोंपर्यंत लिहिलेल्या जगाच्या इतिहासाचें आपलें बाड निराधार म्हणन जाळून टाकलें असें म्हणतात ! आमचे एक विद्वान मित्र व इतिहाससंशोधक हे प्रचलित राजकारणावर लिहिण्याच्या भानगडींत आजपर्यंत फारसे पडले नाहींत ही त्यांची देशावर कृपा होय. कारण एका मासिक पुस्तकांत प्रचलित राजकारणावर त्यांनीं जो एक लेख नुकताच लिहिला आहे तसे लेख वरचेवर लिहिण्याचा प्रसंग त्यांचे स्नेही त्यांच्यावर दुर्दैवानें आणतील तर, त्यांच्या इतिहासविषयक सिद्धांतांच्या प्रमाणावर अविश्वासाची आपत्ति अधिक ओढवत जाईल अशी भीति आम्हास वाटते. ' असहकारिते'ला ' संबंधत्वालन' हें जें नवीन नांव त्यांनीं शोधून काढलें त्याच्या योगानें 'असहकारिता' शब्दाची व्याख्या न झाल्यामुळें, त्या शब्दाचा आधींच असलेला गूढार्थ अधिक गूढ—अतएव अधिक पवित्र—होण्यास पुष्कळच मदत होईल यांत शंका नाहीं ! तथापि "गांधीनीं काँग्रेसचें बहुमत काबीज केल्यास आपल्या अनुयायांसह गांधींना एकनिष्ठ साहाय्य करण्याचें टिळकांनीं वचन दिलें होतें " असें जें एक विधान त्यांनीं या लेखाच्या शेवटीं केलें आहे तें मात्र अत्यंत ' चिंत्य ' व 'भोळें' आहे असें कष्टानें म्हणावें लागतें.

" लो. टिळक व सदर संशोधक यांची गांठ टिळकांच्या मृत्यूपूर्वी किती वर्षें पडली नव्हती. हा भावी संशोधकांना एक विषयच होऊन राहण्यासारखा आहे. ज्या अस्सल प्राथमिक पुराव्याविषयीं ते नेहमीं इतका योग्य आग्रह धरतात त्या सदराखालीं हें विधान मुळींच पडण्यासारखें नसून, निवळ 'बखरवजा' आहे असें आम्हास तरी वाटतें. अंतःपुराव्याच्या दृष्टीनें तर हें विधान विशेषच 'चिंत्य' होय. गांधींनीं आधीं स्वतः काँग्रेसचें बहुमत काबीज करावें व मग मदत करण्याचें वचन टिळकांनीं द्यावें ही गोष्ट, टिळकांचा स्वावलंबी व कर्तेपणाचा स्वभाव

ज्यांना पुरा माहीत होता त्यांना कधींहि खरी वाटणार नाहीं. दुसऱ्यांनीं आधीं तरवार चालवून लढाई जिंकल्यानंतर मग रणांगणावर जाऊन लूट गोळा करण्यास मदत करणें हें टिळकांच्या स्वभावांतच जर नव्हतें, तर असलें स्वाभिमानविरोधी वचन त्यांनीं दिलें असेल हें संभवतच नाहीं. शिवाय गांधींनीं स्वपराक्रमानें काँग्रेसचें बहुमत जिंकल्यावर मग त्यांना टिळकांच्या मदतीची परवा असण्याचें तरी कारण काय उरते ! तात्पर्य, अंतर्बाह्य दोनहि प्रकारच्या पुराव्यांकरून सदर संशोधकांनीं दिलेली माहिती खरी नाहीं असे आमच्या लहानशा संशोधक बुद्धीस वाटतें. असहकारितेचा सर्व कार्यक्रम, त्यांतील कारणमीमांसेसह, मला आपला सर्वस्वी पटतो ! असे नुसतेच हे संशोधक म्हणते तर शब्दप्रामाण्यप्रिय अशा त्यांच्या असहकारिता-वादी मित्रांना बहुमोल मदत झाली असती. पण वर दर्शविलेल्या त्यांच्या 'भोळ्या' बखरीनें विनाकारण घात केला असेच म्हणावें लागते ! आनंदाची गोष्ट त्यांतल्या त्यांत इतकींच कीं, सुरतेच्या बखेड्यासंबंधानें यांनीं असाच एक विस्तृत लेख लिहिला होता. त्यानंतर पंधरा वर्षांनीं लिहिलेला त्यांचा हा दुसराच असला लेख असावा. हेंच प्रमाण पुढे राहिल्यास असली सदोष माहिती प्रसिद्ध करण्याची चूक फिरून त्यांच्या हातून पंधरा वर्षें होणार नाही. दरम्यान राजकारणाचा इतका खच पडेल कीं, भावी इतिहाससंशोधकांना ती एक मेजवानीच होऊन राहील. "

गया काँग्रेस नंतर लवकरच १९२३ मध्यें स्वराज्यपक्षाची स्थापना झाली तिचा जाहीरनामा खालीं देत आहेः—

"गयेस भरलेल्या राष्ट्रीय सभेनें जो कार्यक्रम आंखला आहे त्यानें स्वराज्याची प्राप्ति लवकर होईल असें वाटत नसल्यामुळें, व ज्या विषयांचा सदर कार्यक्रमांत अंतर्भाव होणें जरूर होतें त्यांचा अंतर्भाव झाला नसल्यामुळें, आम्ही राष्ट्रीय सभेच्या छत्राखालींच एका नव्या पक्षाची स्थापना करीत आहों. शांततेच्या व हक्कदारांच्या सर्व मार्गांनीं स्वराज्य प्राप्त करून घ्यावयाचें हें राष्ट्रीय सभेचें ब्रीद व अनत्याचारी असहकारितेचें तत्त्व आम्हास मान्य आहे. ह्या पक्षाचें अध्वर्युत्व देशबंधु चित्तरंजन दास यांस आम्ही देत असून पं. मोतीलाल नेहरू, श्रीयुत बी. एन्. ससमल, विठ्ठलभाई पटेल व चौधरी खलिकुझमा यांस चिटणीस नेमीत आहो. या पक्षाची संघटना जानेवारी महिन्यांत व्हावयाची आहे. अध्यक्ष व चिटणीस यांनीं कार्यक्रम व कायदेकानू ठरवून ते चिटणीस

ठरवितील त्या वेळीं व त्या ठिकाणीं सभासदांपुढें विचाराकरितां मांडावे. ऑ. इं. काँग्रेस कमिटीच्या व राष्ट्रीय सभेच्या मिळून ११० सभासदांनीं आणि प्रतिनिधींनीं यावर सह्या केल्या आहेत. त्यांतील कांहीं प्रमुख गृहस्थांचीं नांवें पुढीलप्रमाणें—चित्तरंजन दास, हकीम अजमलखान, पं. मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, न. चिं. केळकर, मुकुंदराव जयकर, सी. एस्. रंगाअय्यर, व्ही. अम्यंकर, बी. एस्. मुंजे, म. श्री. अणे, ल. ब. भोपटकर, दा. वि. गोखले, बी. एन्. ससमल, टी. आर्. फूकन, जम्नादास मेहता, सुलेमान कादर, फिरोजुद्दिन, ए. रंगास्वामी अय्यंगार, व्यंकट रंगम् नायडू, लाला दुनीचंद (अंबाला), एस्. ई. स्टोक्स, राघवेंद्रराव, श्यामसुंदर भार्गव, जयदेव नाकवीय पांडे, हरकर्णनाथ मिश्र, श्रीप्रकाश, संपूर्णानंद, रुचिराम सहानी, कुमारी सोज्वली, स्वामी रामानंद, अब्दुल कादर, टी. ए. शेरवानी, मौ. मसूदअह्मी, खलिकुज्झमा खोजा."

स्वराज्यपक्षाची स्थापना झाली आणि यापुढें गांधींचें व माझें जुळणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट झाली. तथापि गांधीच्या संबंधानें माझ्या मनांत असलेली आदरबुद्धि इतर कारणाकरितां शिल्लक होती हें महादेवभाई देसाई जाणून होते. त्याचे प्रत्यंतर एका प्रसंगानें अकस्मात आलें. ता. १८ मार्च (१९२३) हा महात्मा गांधीच्या तुरुंगवासाचा प्रथम वार्षिक दिवस असल्यामुळें 'यंग-इंडिया' पत्राचे स्थानिक संपादक महादेवभाई देसाई यांनीं सदर पत्राचा एक मोठा खास अंक काढण्याचें योजिलें होतें, व त्याकरितां लेख पाठविण्याविषयीं अनेक लेखकांना विनंतिपत्रें धाडली. विशेषतः महात्माजींच्या खटल्याच्या दिवशीं कोर्टात हजर असणाऱ्या गृहस्थांना त्या प्रसंगाच्या आपल्या आठवणी लिहून पाठविण्यास त्यांनीं विनंति केली होती. पण या कामीं त्यांची इतकी निराशा झाली कीं, ही निराशा म्हणजे 'मी केलेल्या नसल्या उपद्व्यापाचें प्रायश्चितच कीं काय' असें त्यांना 'यंग-इंडियां'त उघड लिहावें लागलें! नाहीं म्हणावयाला सरोजिनीदेवींनीं मोजक्या आठ ओळी लिहून पाठविल्या! पण देसाईभाई यांची अपेक्षा फक्त एके ठिकाणींच सफळ झाली व ती मजकडून. 'यंग-इंडियां'त घालण्याकरितां खटल्याच्या आठवणींचा सुमारें तीन कॉलमायेवढा लेख मी महादेवभाईना पाठविला. त्यासंबंधानें माझे आभार

मानतांना देसाई लिहितात " माझी विनंति ताबडतोब व मित्रभावानें मान्य केली अशी एकट्या केळकरांनींच."

याशिवाय ते आपल्या पत्रांत लिहितात " मी पुष्कळांना लेख मागितले. पण कोणाकडून लेख आला नाहीं. हें तर झालेंच पण त्यांजकडून लेख आले असते तरी तुमच्याइतकें चटकदार व डोळ्यापुढें खरें चित्र उभें करविणारें वर्णन दुसऱ्या कोणासहि लिहितां आलें नसतें असें मी म्हटलें, तर त्यांत मी तुमची तोंडदेखली स्तुति करतों असें खचित होणार नाहीं. " माझ्या उत्तमांतल्या इंग्रजी लेखांपैकीं तो एक आहे असें मीहि अभिमानानें म्हणू शकतों. ही हकीकत येथें देण्याचें कारण इतकेंच कीं, केळकर हे म. गांधींचा द्वेष करतात व त्यांना शिव्या देतात असा एक खोटा आरोप नाफेरवाले आपमतलबीपणानें लोकांत पसरवीत होते. व्यक्तिशः महात्माजींविषयीं माझा कोणताहि लेख पाहिला तरी त्यांत त्यांच्या खऱ्या गुणांची स्तुतिच आढळली असती. या विषयावरील माझीं व्याख्यानें ऐकणारांसहि हाच अनुभव आला असेल. उलट कित्येक नाफेरवाल्यांनीं पूर्वी संभाषणांत महात्माजींना ठेवलेलीं नांवें आज उच्चारलीं तर काय प्रकार दृष्टीस पडेल हे मी सांगूं इच्छित नाहीं.

स्वराज्यपक्ष स्थापल्यावर मोतीलाल नेहरू यांनीं विलायतेंतील चळवळीकडेहि थोडेसें लक्ष दिलें. असहकारितेचा उदय झाल्याबरोबर ही चळवळ मावळली होती. लंडनमधील 'इंडिया' वर्तमानपत्र बंद पडलें. इतकेंच नव्हे तर आम्ही विलायतेंतील लोकांकडून सहानुभूति घेणें हें अपमानास्पद आहे असें गांधी म्हणू लागले. पण नेहरूप्रमाणें विठ्ठलभाई पटेल यांचा परराष्ट्रीय राजकारणावर विश्वास होता ही गोष्ट अखेरपर्यंत दिसून आली. स्वराज्यपक्ष स्थापन झाला याचा अर्थ अयुक्तिक अशी असहकारिता थांबली. तेव्हां विलायतेंतील उदारमतवादी पक्ष, मजूरपक्ष, हिंदुस्थानच्या पुढाऱ्याशीं बोलणें चालणें करण्याचा संभव आहे असें वाटू लागलें. आणि येथपासून पुढें सर्वपक्षीय पुढाऱ्यांची परिषद भरवून स्वयंनिर्णयात्मक हिंदी राजकीय घटना बनवीपर्यंत नेहरूंना अशी आशा वाटत होती कीं, या घटनेची चर्चा होण्याकरितां सरकार एखादी गोलमेज परिषद भरवील. टिळकपक्षाच्या कार्यक्रमांत परदेशी राजकारण ही एक ठराविक बाब म्हणून असे हें प्रसिद्धच आहे. टिळकांनीं विलायतेस डेप्यूटेशनें पाठविण्याचा आग्रह धरला. स्वतः विलायतेस गेल्यावर मजूरपक्षाचा स्नेह संपादला. इंडियापत्र व लंडन काँग्रेस कमिटी आपल्या

हातीं घेतली. १९२० सालीं विठ्ठलभाई पटेल यांना फिरून विलायतेस जाण्याला पैशाची मदत केली. तेंच धोरण आम्हीहि पुढें चालू ठेवलें. १९२४-२५ सालीं आमच्यापैकीं विलायतेस जाण्यासारखे कोणी रिकामे नव्हते. पण सत्यमूर्ति हे जाण्यास तयार झाले व गेलेहि. त्यांना मी केसरीकडून पांचशे रुपयांची मदत केली. १९२९ सालीं सायमन कमिशनचा रिपोर्ट बाजूला पडल्यानंतर, नव्या गोलमेज परिषदेची तयारी दिसू लागल्यावर, असहकारिता थांबवावी, परराष्ट्रीय राजकारण करावें, विलायतेचें निमंत्रण आल्यास तें स्वीकारावें, असें आमच्या महाराष्ट्रपक्षाचें मत होतें. या गोष्टींवर प्रकाश पाडणारीं खालील दोन-तीन पत्रें देत आहे.—

( १ )

( ता. २० मार्च, १९२४ )—असेंब्लीनें बजेट फेटाळून लावलें, तसेंच नागपुरास मुंजे यांच्या पक्षानें दिवाणांचा पगार नामंजूर केला, या गोष्टींनीं इकडे फार मोठा परिणाम झाला. लॉर्ड रेडिंग नरमाईला येऊन त्यांनीं कांहीं सूचना केल्या पण इंडिया ऑफिसांत ऑलिव्हियर यांनीं त्या फेटाळून लाविल्या. हें समजतांच मजूरपक्षांत फार मोठा गवगवा झाला. तथापि मॅक्डोनाल्ड यांची आपल्याला सहानुभूति आहे; व आयर्लंडशीं समेट करण्याकरितां डी व्हॅलेरा वगैरेंना जसें इंग्लंडनें गोलमेज परिषदेला बोलाविलें त्याप्रमाणें हिंदी पुढाऱ्यांना परिषदेला बोलावून चर्चा करावी असें मॅक्डोनाल्ड यांना वाटतें. मीहि त्यांना देशबंधु दास, मोतीलाल नेहरू, तुम्ही केळकर, जिना, अन्सारी, रंगाचारियर, मुंजे, इब्राहिम रहीमतुल्ला इतक्यांचीं नांवें सुचविलीं आहेत. मुख्य प्रधानांची व माझी पुनः उद्यां भेट होईल. ( एम्. आर. बमनजी, लंडन. )

( २ )

( ता. १७ एप्रिल, १९२४ )—ता. २४।२५ च्या सभांना तुम्ही येत आहा हें पाहून आनंद वाटतो. सभ्यां स्वराज्य-पक्षाची घटना केवळ नांवाची आहे. म्हणून जनरल कौन्सिलची सभा न बोलाविता कार्यकारी मंडळाचीच सभा बोलवावी असे पटेल यांनीं व मी ठरविलें. येत्या सभेंत पक्षाची घटना व नियम नीट रीतीनें ठरवूं. हाऊस ऑफ कॉमन्स सभेंत हिंदी राजकीय परिस्थितीचा प्रश्न निघून मजूरपक्षाच्या मदतीची आशा फोल ठरली. तेव्हां आपणच आतां कंबर बांधून आपली मागणी रोखठोक व धैर्यानें पुढें मांडली पाहिजे. ( मोतीलाल नेहरू, जुहू. )

( ३ )

( ६ मार्च, १९२५ )—माझ्या विलायतच्या प्रवासाकरितां तुम्ही रु. ५०० पाठविण्याचे कबूल केले याबद्दल आभारी आहे. बजेट सेशनपर्यंत रहावें असा मित्रांनीं आग्रह केल्यामुळें एप्रिलमध्यें मी निघावयाचें ठरविलें आहे. ( सत्यमूर्ति, मद्रास. )

( ता. २ जुलै, १९२४ )—" अहमदाबादच्या वाटाघाटींत आपणाला यश बऱ्यापैकीं मिळालें असें तुम्हीहि म्हणाल. हें काम मोठ्या श्रमाचें व दमछाकीचें होतें. अद्यापिहि आपण विश्रांति घेण्याची सोय नाही ! जो जो प्रसंग सांपडेल त्याचा उपयोग करून घेत पुढें गेले पाहिजे. नाहींतर बार्डोली-प्रमाणें कायमची माघार घेऊन नामशेष व्हावें लागेल अशी मोठी आणी-बाणीची वेळ आली आहे ! मी पुन्हा अहमदाबादेस जाऊन म. गांधींची भेट घेणार आहे. गेल्या आठवड्यांत घडलेल्या गोष्टींवर त्यांनीं पूर्ण विचार केलाच असेल, म्हणून त्यांच्याशी एकदां अखेरचें बोलणार आहे. तसेंच स्वराज्यपक्षाची संघटना करणें व पक्षास आर्थिक सहाय्य मिळवून देणें हींहि कामें आहेतच. मुंबई अगर अहमदाबाद यांच्याइतकें पुणें श्रीमंत नाहीं हें खरे. पण पुण्यानें मला रिक्तहस्तें परत पाठवून चालणार नाहीं. ही मी एक-प्रकारें तुम्हाला आगाऊ नोटिसच देऊन ठेवतों असे म्हणाना. ( मोतीलाल नेहरू, राजकोट )

( ता. ९ जुलै, १९२४ )—पुणें म्युनिसिपालिटीनें लो. टिळकांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ माझ्याहस्तें करावयाचें ठरविलें त्याबद्दल मान्यतेची तार काल मी तुम्हाला पाठविलीच आहे. एकंदर सर्व परिस्थितीचा विचार केला असतां असें वाटतें कीं, म. गांधींनीं जें अव्यवहार्य धोरण राजकारणांत ठेवलें आहे त्यावर या प्रसंगाने फार मोठा परिणाम होईल. अर्थात् अलाहाबादेहून त्याकरिता पुष्कळच हेलपाटे मारावें लागतील. पण त्याला इलाज नाहीं. तुम्ही पाठविलेलीं सर्व बिलें पोहोचलीं. अहमदाबादला घडलेल्या गोष्टी पाहून आपणहि आपल्या पक्षाची संघटना मोठी बळकट व सुयंत्रित केली पाहिजे असे मला वाटूं लागले आहे. हल्लीं त्याचाच मी येथें बसून सगळा विचार करीत आहे. मुंबईला जो आमचा सत्कार झाला व पक्षाला मान्यता

मिळाली त्या वरून मुंबईतून स्वराज्य पक्षाला कांहीं आर्थिक सहाय्य होईल असें वाटतें. सध्या सभांतून मी फारशी भाषणें करीत नाहीं. विठ्ठलभाई पटेल हे पक्षावर रागावले असून स्वतःचा पक्ष काढण्याच्या विचारांत आहेत असे कळले. समजलें कां ? त्यांची माझी गांठ पडली नाहीं. तथापि जमनादास मेहता यांना मी भेटावयास बोलाविले आहे. त्यांची भेट झाल्यावर विठ्ठलभाईबद्दल काय करावयाचे ते ठरवूं. पक्षाचे हेतु उद्देश वगैरे इतक्यातच मी जाहीर करीत नाहीं. तें काम पुण्यास करूं. मुंबईत सभा भरविली तर विठ्ठलभाई पटेल हे विपर्यास करतील असें जयकरांचें म्हणणें आहे. पुतळ्याच्या अनावरण समारंभाच्या दिवशीं राजकीय मतभेद बोलता येत नाहींत, म्हणून जयकरांचें म्हणणें असें आहे कीं त्याकरितां वेगळी सभा करावी. तथापि ही गोष्ट मी सर्वस्वी तुमच्याकडे सोपवितों.

अहमदाबादला मी दुसऱ्यांदा खेप घालून म. गांधींना भेटलों. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं त्यावरून माझें असें निश्चित मत झालें आहे कीं, महात्माजी हे त्यांच्या भोंवती असणाऱ्या बेछूट ( Unscrupulous ) लोकांच्या हातीं सांपडले असून स्वतःचे मत काय हेंच त्यांचें त्यांना नीटसें कळेनासें झालें आहे. ( मोतीलाल नेहरू, मुंबई. )

( ता. २० ऑक्टोबर, १९२४ )—म. गांधींचा कार्यक्रम, मिसेस बेझंट यांचे बेत, व काँग्रेस मधील समेट याबद्दल महाराष्ट्रांत कसें काय लोकमत आहे हें कळण्याची इच्छा आहे. मराठ्यांतील तुमचें तेजस्वी लेख वाचून तुम्ही काय करणार याची कल्पना करतां येते. महाराष्ट्रांतले पुष्कळसे डेलिगेट यंदा बेळगांवला येतील तर त्यांचा आम्हांला फार उपयोग होईल. 'स्वदेशमित्रम्'ला एकादा छोटा लेख पाठवितां आल्यास पहा. ( रंगास्वामी अय्यंगार, मद्रास. )

( ता. ६ डिसेंबर, १९२४ )—तुम्ही इतक्या मोठ्या बहुमतानें ऑ. इं. कौं. कमिटीवर निवडून आला याबद्दल तुमचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों. पुढच्या वर्षी म. गांधी काँग्रेसचें अध्यक्ष होणार, तोपर्यंत महंमदअल्ली हेच अधिकार गाजविणार. डेलिगेटांची यादी तुम्ही पाठविलीत, बरें केलेंत. तुम्ही तीनशें नांवें पाठविलीं असतीत तरीहि आम्ही त्यांना निवडून आणले असते. ( पं. मोतीलाल नेहरू, अलाहाबाद. )

कौन्सिलवादी स्वराज्यपक्षाची स्थापना झाली ही गोष्ट गांधींना मनापासून आवडली नाहीं. पण ते काय करणार ? त्यांच्या अगदीं जवळच्या हस्तकांपेक्षां मोठे महत्त्वाचे असे दास-नेहरू-प्रभृति पुढारी स्वराज्य पक्षाला लाभल्यामुळें त्यांना नमतें घ्यावें लागलें. आणि अखेर उभयपक्षांत एक करार ठरला. त्याचा मुख्यार्थ असा होता कीं 'कोणी कोणाच्या वाटेस जाऊं नये व परस्परांविषयीं बंधुभाव मनांत बाळगावा.' स्वतः गांधी हा करार पाळीत, पण त्यांचे नाफेरवाले अनुयायी तो पाळीत नसत. म्हणून याविषयीं तक्रारी होत. १९२४ च्या डिसेंबरांत बेळगांवच्या राष्ट्रीय सभेच्या वेळी हा वाद वाढला तेव्हां गांधीनी आपले धोरण स्पष्ट शब्दांनीं व्यक्त केलें. त्यासंबंधीं त्यावेळी एका वर्तमानपत्राच्या बातमीदारानें हकीकत प्रसिद्ध केली तिचा उतारा देतोः—

"श्री. केळकर यांनीं या सुमारास महात्माजीस सांगितलें कीं, तुम्ही आम्हा स्वराजिस्टांना जसा उपदेश चालविला आहे, तसाच नाफेरवाल्यांनाहि थोडासा उपदेश स्वराजिस्टांना मदत करण्याविषयींचा करा. महात्माजीनी ताबडतोब ते मान्य करून खालील उद्गार काढले.

"माझी विनंति केवळ स्वराज्य पक्षाला उद्देशून केलेली नाहीं. नाफेरवाल्यांमध्यें सुद्धां चरख्यावर विश्वास नसलेले लोक आहेत असे मी ऐकले आहे. म्हणन नाफेरवाल्यांना माझें असें सांगणें आहे की, या करारांकडे त्यांनी तत्त्वदृष्टीनें पाहून त्याप्रमाणें वर्तन केलें पाहिजे. स्वराज्य पक्षाच्या लोकांनीं त्यांच्या कार्यांत मदत करण्याचा माझा विचार आहे. मी मुद्दामच विचारपूर्वक "त्यांचे कार्य" असें म्हणतों. त्यांचें कार्य हें केवळ त्यांचें अगर काँग्रेसचें नसून तें सबंध राष्ट्राचें आहे. चरखा हे काय नुसतें खेळणें आहे असें म्हणण्याचा त्यांना अधिकार आहे. तसेच कौन्सिल हें काय नुसतें बुजगावणें आहे असें त्यांना विचारण्याचा मलाहि अधिकार आहे. कौन्सिल हें नोकरशाहीशीं खेळावयाच्या युद्धांतील एक महत्त्वाचें हत्यार आहे असें स्वराज्यपक्षीय म्हणतात. पण मला ते तितकें पटत नाही. परंतु स्वराजिस्टांना मदत करणें व काँग्रेसची त्यांना मंजुरी मिळवून देणें ही गोष्ट मला करतां येईल असें करून घेणें हा त्यांचा हक्क आहे. ही कांहीं काँग्रेस त्यांच्यावर मेहरबानी करीत नाही. हें कळावयास मला थोडा वेळ लागला खरा; पण तें कळल्यावर मनांत सुद्धां त्यांना मी विरोध करतां कामा नये. उलट ते जें काय करीत आहेत तें बरोबर आहे असेंच समजण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. पण याचा अर्थ जर असा

होईल कीं, मी सरकारी बिलावर जाहीर व्याख्यानें द्यावीं व जाहीर सभा भरवाव्या तर तें मला शक्य नाहीं. स्वराज्यपक्षाशीं करार करतांना मी हें कबूल केलेलें नाहीं. मी या गोष्टी करावयास नाखुष नाहीं, परंतु या गोष्टी केल्या पाहिजेत याबद्दल माझी खात्री झाली पाहिजे. जर तशी खात्री झाली तर मी शंभर नंबरी स्वराज्य-पक्षीयच होऊन जाईन. आज मला त्यांना द्यावा तसा पूर्ण सहकारितेचा पाठिंबा देतां येत नाहीं; तरी पण मी त्यांना त्यांच्या कामांत, करारांत समाविष्ट केलेल्या बाबींपुरता, पूर्ण पाठिंबा देईन. उदाहरणार्थ, सरकार जर त्या पक्षाचा नाश करण्याचा प्रयत्न करूं लागलें तर मी त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभा आहे असें आढळून येईल. कौन्सिलच्या कामाच्या बाबतीत मी त्यांना जी मदत करीन तिच्या स्वरूपाशीं, त्यांच्या चरख्याच्या बाबतीत मला देणाऱ्या मदतीचें स्वरूप सर्वस्वी जुळणारे नाहीं; व हें करारांत स्पष्टच घातलें आहे. स्वराज्यपक्ष हा तर हिंदुस्थानचा शत्रु नव्हेच; पण शिवाय त्या बिचाऱ्या अराजकांना सुद्धां मी हिंदु-स्थानचे शत्रु समजत नाहीं. मात्र येथें अशा तुलनेला जागाच नाहीं. नाफेरवाल्यांना मी असें स्पष्ट सांगतों कीं, चरख्यावर तुमचा विश्वास नसेल तर अखेर तुम्हाला असें आढळून येईल कीं, तुम्हास अत्याचाराशिवाय दुसरा उपाय राहाणार नाहीं. चरख्यावर विश्वास नसेल तर तुम्हास कौन्सिलांतच जावें लागेल; कारण तेथें जाऊन निदान तुम्हास कांही कैदी तरी सोडवितां येतील. अंदमानांतील अगर येरवड्यांतील कैदी सोडवावे या हेतूनें स्वराज्य-पक्षाचे लोक कौन्सिलांत गेलेले नाहींत. त्यांनीं जें ध्येय ठेऊन कौन्सिलप्रवेश केला, त्या ध्येयाला ते बरोबर जागले आहेत. चरख्याला तोड म्हणून फक्त कौन्सिलेंच रहातात; व म्हणूनच इतके लोक आज कौन्सिलाकडे वळले. कौन्सिलांत गेलेले लोक राष्ट्राच्या बुद्धीचे निवडक नमुनेच आहेत असें अखेर म्हणावेंच लागतें. ते कसलेले योद्धे आहेत. पंडित मालवीय व नेहरू, तसेंच दास व केळकर, यांचा स्वार्थत्याग स्वयंप्रकाशी आहे हें कोण नाकबूल करील ! मतभेद हे जगाच्या अखेरीपर्यंत चालतच रहातील. स्वराज्यपक्षाच्या लोकांना चरख्याच्या बाजूस वळवतां आलें म्हणजेच नाफेरवाल्यांचा खरा जय झाला असें म्हणतां येईल. लोक चरख्याच्या पक्षास मिळत नसतील तर त्याचें कारण इत-केंच कीं, लोकांना त्याची उपयुक्तता पटलेली नाहीं. ती देखील दाखविली पाहिजे. श्रद्धेची फार मोठी बाण आहे. प्रत्येक नाफेरवाल्याला माझ असें म्हणणें आहे कीं, तुम्ही आपल्या तत्त्वांना, अनुसरण्यास योग्य असाल, व खरोखर तुमची वृत्ति

अहिंसावादी असेल तर तुम्ही स्वराज्यपक्षीयांशीं हस्तांदोलन करून 'आम्ही केले तें सर्व विसरून आम्हाला क्षमा करा' असें तुम्ही म्हणाल. कोणाच्याहि विरुद्ध मनांत वाईट बुद्धि ठेवण्याचा तुम्हास अधिकार नाहीं. इतकेंच नव्हें तर त्याच्या-विरुद्ध ब्रहि काढण्याचें तुमचें काम नव्हें. याहून जास्त चांगलें मला तुम्हाला कांहींच सांगतां येणार नाही. वर्षअखेर सर्व प्रकार ठीक होतील."

स्वराज्य-पक्षाची स्थापना होऊन दोन वर्षे होतात न होतात तोंच त्यांत तट पडण्याचा प्रसंग आला. तो ना. तांबे यांनी नागपूर गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळावरील जागा स्वीकारल्यानें. तांबे स्वराज्य-पक्षांतर्फे कौन्सिलांत निवडून आले होते व त्या पक्षाच्या बळावर कौन्सिलचे अध्यक्ष झाले होते. त्यांना कार्यकारी मंडळांत स्थान द्यावें असें गव्हर्नर साहेबांना सहजच वाटलें. कारण या मंडळांत बिनसरकारी मनुष्याकरितां एक जागा राखून ठेवण्याची प्रथा पडली होती. यापूर्वी ती नेमस्त लिबरल पक्षांतील एखाद्या पुढाऱ्याला द्यावी म्हणून सर मोरोपंत जोशी यांना देण्यांत आली होती. पण आतां त्या पक्षाला मागें टाकून राष्ट्रीय-स्वराज्यपक्ष पुढें सरसावला होता. तेव्हां ती त्याजकडेच जाणें प्राप्त. आणि कायदेमंडळाच्या प्रत्यक्ष अध्यक्षाला ती देऊं करणें याहून उचित गोष्ट कोणती ? पण प्रश्न होता तो हा कीं, स्वराज्य-पक्षांतील सभासदानें ती घ्यावी यांत औचित्य आहे किंवा नाहीं ? स्वराज्य-पक्षानें त्या वेळी अधिकाराच्या जागा स्वीकारूं नये असें धोरण ठरविलें होतें ही गोष्ट खरी. आणि स्वराज्य-पक्षाच्या अधिकारी मंडळापुढें हा प्रश्न आला असता तर ती जागा घेऊं नये असा निर्णय झाला असता. ती जागा तांबे यांनीं कोणास न विचारतां घेतली हें गैर झालें. ती घ्यावयाची तर स्वराज्य-पक्षाच्या सभासदत्वाचा राजीनामा त्यांनी आधी द्यावयास पाहिजे होता. तोहि रीतसर दिला नव्हता. मागाहून दिला. नागपूर स्वराज्यपक्ष शाखेच्या कांहीं लोकांना तांब्यांनी देऊं केलेल्या जागेची वार्ता अगदींच माहीत नसेल असे म्हणवत नाहीं. तथापि या पक्षांतील महाराष्ट्रीय लोक टिळकांच्या परंपरेंत वाढलेले. यामुळें मिळेल ती जागा घ्यावी, गबवावी, ताबडावी असें त्यांचें खरें खासगी मत होतें. यामुळें त्यांनीं तांब्यांना अप्रत्यक्ष संमति दिली असण्याच्या संभव होता. कसेंहि असो. तांबे यांनीं ती जागा स्वीकारल्याचें प्रसिद्ध होताच खासगी लेही या नात्यानें मी त्यांना, वैयक्तिक अभिनंदनाची तार पाठविली. पण ती प्रसिद्ध होतांच वादळ उठलें.

केवळ पहिला आवेग मनांत आल्याबरोबर ज्या गोष्टी कित्येक वेळां होतात त्यांतलीच एक माझी ही तार देखील होती. तांबे यांची माझी जुनी ओळख होती. विशेषतः टिळकांच्या वकिलीचें काम त्यांनी औरंगाबादेस वकील असतां स्नेहबुद्धीनें फुकट केलें, आणि त्यांचें वकीलपत्र ताईमहाराज प्रकरणीं माझ्या जोडीनें दाखल होत. ही गोष्ट माझ्या मनांत वर उसळून आली. आणि व्यक्तिशः त्यांचा उदय झाला याच्या अभिनंदनार्थच ती तार होती. तींत स्वराज्य पक्षाला उद्देशून एकहि शब्द नव्हता. तो विचार मनांत खराच असता तर मी तेंहि कांहीं कां लिहिलें नसतें ? जो विचार मनांतच नव्हता तो तारेंत कोठून येईल ? पण त्या बरोबर आतां मला असेंहि वाटतें की, मी ती तार पाठविण्यांत थोडी घाई व चुकच केली. माझ्यासारख्या पुढाऱ्यानें, या तारेचा कांहीं विपरित अर्थ व परिणाम होईल की काय, या गोष्टीचाहि विचार करावयास पाहिजे होता. कारण केवळ शिस्तीच्या अभिमानाकरितां, १९२३ सालीं, माझे वडील बंधू म. चिं. केळकर हे खानदेशाकरितां स्वतंत्र उमेदवार म्हणून कौन्सिल निवडणुकीला उभे असतां, माझ्या स्वराज्यपक्षाच्या उमदेवारांना यश मिळावें यासाठी मी बंधूंना मतें देऊं नये असे सभांतून सांगितलें. त्यापेक्षां तांब्यांना अभिनंदन न पाठविणें ही कांहीं अवघड अशी गोष्ट नव्हती. पण चुक झाली खरी. तांबे यांच्या कृत्याबद्दल अणे यांना काय वाटलें हा एक वादाचा प्रश्न पुढें निघाला. त्या संबंधीं तपस्वी बाबा परांजपे यांनी खालील उद्गार काढल्याचें केसरींत प्रसिद्ध झालेलें आहे. ते म्हणाले, " श्री. बापट यांचे पत्र मी वाचलें. सरकारच्या ताब्यांतील जागांवर सरसकट बहिष्कार घालण्याच्या स्वराज्य पक्षाच्या धोरणाला वऱ्हाडांतलि आम्ही बहुतेक कार्यकर्ते ( यांत बापूजीहि येतात ) त्या वेळीं अगदीं कंटाळलों होतों. अशा परिस्थितींत श्री. तांबे यांनी गृहमंत्रिपदाची जागा स्वीकारली. त्यांत शिस्तीचा भंग झाला एवढीच तक्रार वऱ्हाडच्या मंडळींत मुख्यतः होती. माझी स्वतःची तर श्री. तांबे यांच्या या कृत्याला पूर्ण संमति होतीच; पण बापूजींचीहि या कृत्याला 'मूकसंमति' होती, अशी माझी समजूत आहे. त्यानंतर या प्रश्नावर जो वाद झाला, त्यांत एकंदरींत त्यांची भूमिका तटस्थाची होती."

**पण अणे यांचा हा तटस्थपणा पुढें राहिला नाहीं. जयकर व मी यांच्याबरोबर तेहि स्वराज्यपक्षांतून निघून प्रतिसहकारपक्ष काढण्यास तयार झाले.**

वर माझी चूक मी कबूल केलीच आहे. आणि स्वराज्यपक्षाचे अध्यक्ष पं. मोतीलाल नेहरू यांनीं खासगी रीतीनें या प्रश्नाची चर्चा केली असती तर उलट सुलट कांहीं खुलासे होऊन हा प्रश्न तडीला लागला असता व स्वराज्यपक्ष मोडलाहि नसता. पण या निमित्तानें पंडितजींचें आम्हा महाराष्ट्रीयांविषयींचें कलुषित मन ढवळून बाहेर पडलें. त्यांनीं एकदम जाहीर मुलाखत देऊन 'महाराष्ट्रीयपक्ष हा स्वराज्य-पक्षरूपी शरीराचा कुजलेला भाग आहे. तो कापूनच काढला पाहिजे' अशी घोषणा केली. माझा जसा अविचार तसाच पंडितजींचा हा प्रत्यविचार. आणि मग वादाला जें तोंड लागलें तें केव्हांहि आवरलेंच नाहीं. अणे यांची तांब्यांना पूर्व संमति नव्हती हे खास. पण प्रतिसहकारपक्षाला मिळाल्यानें त्यांची पश्चात् मूक संमति मिळाली हें सहजच ठरलें. नागपूर व वऱ्हाड प्रांतांत तांबे यांच्या निषेधाची एकहि सभा झाली नाहीं. किंवा एकाहि वर्तमानपत्रानें त्यांना दोष दिला नाहीं. सर्वांची भूमिका एकच. ती अशी की, तांबे यांनीं आधी पक्षाचा राजीनामा देऊन मगच प्रधानपद स्वीकारलें असेल असें वाटलें. पण तो जरा मागाहून दिला. म्हणजे चूक झाली ती जागा पत्करली या मुख्य गोष्टींत नव्हे, तर राजीनामा योग्य वेळी पटविला नाही या गौण उपांगभूत गोष्टींत.

तांबे प्रकरणीं वाद नेटाला लागायला दुसरीहि कारणें होतीं. आपल्या पायाखालीं काय जळतें आहे याचा पंडितजींनीं कधी विचार केला नाही. म्हणजे उदाहरणार्थ, तांब्याच्या नेमणुकीला नांवें ठेवणारे पंडितजी स्वतः स्कीन लष्करी कमिटीचे सभासद झाले, व सर्व लोकांनीं त्यांचा निषेध केल्यावर मग त्यांनीं तिचा राजीनामा दिला. स्कीन कमिटीच्या सभासदत्वाला भत्ता होता ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती जागा सरकारनियुक्त 'बेजबाबदार' होती. प्रथम जागा पत्करली, काम केलें, व मग राजीनामा दिला यांत पंडितजींनीं काय साधलें! 'बुंदसे गयी तो हौदसे आती नही' हीच म्हण सार्थ झाली. तसेंच त्या वेळच्या वार्किंग कमिटीचे सभासद बॅ. सेनगुप्त यांनीं अशीच मौज केली. याच सुमारास बॅ. एस्. आर. दास यांना गव्हर्नर जनरलचे लॉ मेंबर नेमले. त्यांच्या मेजवानीला सेनगुप्त हे गेले! मग ही गोष्ट वर्किंग कमिटीवर असतां सेनगुप्त यांनीं कशी केली! ती संमति नव्हे काय! पण पंडितजींनीं सेनगुप्त यांच्यावर शिस्त धरली नाहीं. असेंब्लीत सरकारी मंत्र्यांना 'तुमचें तोंडहि पाहूं

नये' असें टाकून बोलणारे पंडितजी संध्याकाळीं त्याच मंत्र्याबरोबर बसून ख्याली-खुशाली करीत व मद्याचे पेले झोकीत. तें तरी कोणाला मानवत होतें !

प्र. स. पक्षाची रीतसर स्थापना १९२५ च्या नोव्हेंबर महिन्यांत झाली तरी त्याआधीं मे महिन्यापासून त्या पक्षाच्या तत्त्वानें आपलें डोकें वर काढलें होतें. या गोष्टीचा खुलासा मी ता. १७ नोव्हेंबरच्या केसरींत स्पष्टपण केला होता. त्याचाच उतारा या खालीं देतों. म्हणजे वेळोवेळीं पं. नेहरूंना मी युक्तिवादाच्या आधारावर जीं उत्तरें देत होतों त्यांचा पुनरुच्चार करण्याचें कारण उरणार नाहीं. तो उतारा असा—

"प्रतियोगी सहकारितेचा वाद गेल्या तीन आठवड्यांत अवचित पुढें आला ही गोष्ट निराळी. पण शांत मनानें विचार करणारास असें दिसून येईल कीं, निदान गेल्या मे महिन्यापासून तरी हा वाद त्यांच्यापुढें आहेच. त्या महिन्यांत सातारा येथें महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरली होती, तींत जो एक महत्त्वाचा ठराव सर्वसंमत झाला त्याची आठवण आज वाचकांना विस्तारानें करून देणें अवश्य झालें आहे. वस्तु प्रत्यक्ष डोळ्यापुढें असली तरी मन विशेष कारणानें ओढलें गेलें नसलें तर तिचे सविकल्पक ज्ञान होत नाहीं; असाच कांहींसा प्रकार या ठरावासंबंधानें झालेला दिसतो. तर प्रथम हा ठराव काय होता तें सांगून नंतर त्यावरून हल्लीच्या वादावर त्यामुळें काय प्रकाश पडतो ते पाहूं.

"सातारा प्रांतिक परिषदेंतील ठराव क्रमांक ९ हा खालीं दिल्याप्रमाणें होता—

"देशाच्या राजकारणांत मंदाई उत्पन्न झाल्याबद्दल परिषदेला वाईट वाटत आहे. परिषदेचें असें स्पष्ट मत आहे कीं, ही मंदाई उत्पन्न होण्यास सर्वस्वी नसलें तरी बव्हंशी कारण म्हणजे काँग्रेसला स्वतःचा असा राजकीय कार्यक्रम नाहीं हें होय. काँग्रेसनें आपलें सर्व लक्ष राजकारणाशीं संबंध नसलेल्या विधायक कार्यक्रमाकडे लावलें आहे; व देशांतील अनेक राजकीय पक्षांत एकी नाहीं म्हणून ही परिषद ऑल इंडिया काँग्रेस कमिटीला अशी शिफारस करते कीं, देशांतील राजकीय जीवनांत चैतन्य उत्पन्न होण्यासाठीं काँग्रेसनें राजकीय कार्यक्रम हातीं घ्यावा. अमृतसर काँग्रेसप्रमाणें काँग्रेसमध्यें इतर पक्ष सामील होण्यासाठीं अवश्य तर सर्वांस इष्ट अशा दुरुस्त्या स्वराज्य-पक्षाच्या कार्यक्रमांत कराव्या, व अशा रीतीनें प्रस्तुतच्या राजकीय झगड्यांत कौन्सिलांतून व बाहेरून सरकाराशीं तोंड देण्यास अनुकूल अशी परिस्थिति निर्माण करावी."

"वरील ठरावांत मुख्यतः खालील गोष्टी येतात. (१) राष्ट्रीय सभेनें स्वतःचें असें राजकीय धोरण स्वीकारावें. (२) मूळाधार स्वराज्य पक्षाचा कार्यक्रम हाच आपला कार्यक्रम असें तिनें मानावें. (३) तथापि वरील दोहोंपेक्षां अधिक महत्त्वाची गोष्ट ही कीं, राष्ट्रीय सभा जी हल्लीं एकपक्षीय होऊन एकांगी अशी बनली आहे तें तिचें स्वरूप जाऊन ती पूर्वीप्रमाणें सर्वपक्षीय व्हावी. (४) पण राष्ट्रीय सभा सर्वपक्षीय व्हावयाची तर माझाच कार्यक्रम आहे तसाच राष्ट्रीय सभेनें घेतला पाहिजे असा आग्रह स्वराज्य पक्षाला धरतां यावयाचा नाहीं. याकरितां त्या कार्यक्रमांत तिला अवश्य तो फेरबदल करतां आला पाहिजे. आणि (५) असहकारितेच्या युगाचा आरंभ होण्यापूर्वी अमृतसर येथें झालेल्या राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं जो कार्यक्रम मान्य झाला, त्याचा पुनरुद्धार केल्यास तोच आजहि सर्वसंमत कार्यक्रम असा मानला जाईल, आणि राष्ट्रांत पुनः ऐक्य नांदूं लागेल. वरील ठराव विठ्ठलभाई पटेल व केळकर यांच्या संमतीनें रचला गेला, व जरी केळकर यांनींच तो पुढें मांडला तरी विठ्ठलभाई यांची त्याला संमति होती. सुताची वर्गणी राष्ट्रीय सभेंतून काढून टाकण्याविषयींचा दुसरा ठराव असून तो पुढें मांडण्याचें काम पटेल यांनीं स्वतः स्वीकारलें. तात्पर्य, पटेल व केळकर यांच्या संमतीनें व सहविचारानें नाफेरपक्षास अप्रिय व बंडखोरीचे वाटण्यासारखें हे दोन ठराव सातारा परिषदेनें मान्य केलें.

"त्यानंतर ध्यानांत घेण्याची गोष्ट ही कीं, सातारा प्रांतिक परिषदेला पुष्कळ लोक आले, तरी आले नव्हते असेहि पुष्कळच होते. म्हणून अशांची संमति या ठरावाना आहे कीं नाहीं हें निश्चित करण्याचा प्रयत्न परिषदेनंतर करण्यांत आला. पाटणा येथें ऑल-इंडिया काँग्रेस कमिटी लवकरच भरावयाची होती, आणि तिजमध्यें राष्ट्रीय सभेचें धोरण आगाऊ ठरवावयाचें होतें. याकरितां वरील ठरावावर आणि हातसुतीची वर्गणी काढून टाकण्यांत यावी या ठरावावरहि महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाचें मत अजमावण्याकरितां मतपत्रिका बाहेर पाठविण्यांत आल्या. तेव्हां जून व जुलै या दोन महिन्यांत तीन हजारांवर मतें या दोनहि ठरावांस अनुकूल अशीं लिहून आलीं व आणखीहि पुढें येणार होतीं. परंतु मध्यंतरीं पाटणा येथील सभेच्या आधींच महात्मा गांधी यांनीं वरील ठरावांतील तत्त्वें जवळ जवळ मान्य केल्याचें 'यंग इंडिया' पत्रांत प्रसिद्ध केलें, यामुळें पुढें मतपत्रिका मागविण्याचें बंद करण्यांत आलें. जें कार्य व्हावयाचें तें

परस्पर झालें, आणि मग महाराष्ट्राचें मत अमुक म्हणून ऑ. इं. कॉं. कमिटीपुढें मांडण्याचें कारणच पडलें नाहीं. दीड-दोन महिन्यांत हातीं आलेल्या सह्यांची जिल्हावार वांटणी खालीलप्रमाणें आहे —

| जिल्ह्याचें नांव | सह्यांची संख्या |
|---|---|
| १ रत्नागिरी | ८४१ |
| २ ठाणें | ३९६ |
| ३ कुलाबा | ३५६ |
| ४ प. खानदेश | ३४६ |
| ५ पुणें | ३४१ |
| ६ सातारा | २४८ |
| ७ मुंबई | १९८ |
| ८ नाशिक | १०१ |
| ९ पूर्वखानदेश | ९१ |
| १० अहमदनगर | ४७ |
| ११ सोलापूर | ४३ |
| एकूण | ३००८ |

" असो. महाराष्ट्रास संमत असलेल्या या ठरावांत अमृतसर येथील राष्ट्रीय सभेचा जो उल्लेख करण्यांत आला आहे त्याचें मर्म काय हें आतां पाहूं. ही सभा १९१९ सालच्या डिसेंबरांत भरली होती. त्यापूर्वी पार्लेमेंटमध्यें नवा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट मंजूर झाला होता. हिंदुस्थानांतून विलायतेस गेलेलीं अनेक शिष्टमंडळें परत आलीं होतीं. महात्मा गांधी पूर्णपणें उदयोन्मुख झाले होते. पंजाबांत लष्करी कायद्यानें अटकेंत पडलेले कित्येक पुढारी, तसेंच उभयतां अलीबंधू, हे कैदेंतून नुकतेच सुटून परत आले होते. टिळक व दास दोघेहि जोरांत होते. अशा परिस्थितींत भरलेल्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान पंडित मोतीलाल नेहरू यांचेकडे होतें. अर्थात् या सभेंत झालेलीं भाषणें, ठराव आणि त्यांत स्पष्ट दिसून आलेली विचारसरणी हिला तेव्हां तर महत्त्व होतेंच, पण आज कलकत्त्याच्या जादा राष्ट्रीय सभेपासून राष्ट्रानें हातीं घेतलेला असहकारितेचा प्रयोग, ९९ हिश्शांनीं व त्या प्रयोगाच्या मूळ पुरस्कर्त्यांच्या संमतीनेंच, समाप्त झाल्यावर

अमृतसरच्या या ठरावांना, भाषणांना व धोरणांना पुनः एक वेळ पहिला दिवस असल्यासारखें ताजें महत्त्व येत आहे. नित्य व नैमित्तिक या गोष्टींचा विवेक कोणासहि सुटलेला नाहीं. राष्ट्रालाहि तो सुटत नाहीं. असहकारितेचा प्रयोग नैमित्तिक होता, व प्रायः या ज्ञानामुळेंच एक वर्ष या मुद्दतीला महात्मा गांधी यांनीं लेखांत व भाषणांत वारंवार घोळविलें. कोणतीहि नैमित्तिक गोष्ट ही कालाच्या दृष्टीनें मर्यादित अवधीची असते हा जनतेचा अनुभव असल्यामुळें एक वर्ष हा शब्द त्यांच्या तोंडांतच नव्हे तर मनांतहि बसला होता. या एक वर्षाचीं पुढें दोन, तीन, चार वर्षें झालीं. अखेर गतवर्षी असहकारितेचे पंचप्राण म्हणजे जे पंचबहिष्कार ते राष्ट्रीयसभेच्या कार्यक्रमांतून पुसून टाकले जाऊन, विधायक कार्यक्रमापैकीं खादीकार्याच्या एका प्राणावर या राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाची धुगधुगी शिल्लक उरली ! शरीरांत जीव आहे कीं नाहीं हें ओळखण्याला नाकाशीं सूत धरणें हा एक उपाय आहे. पण या दृष्टीनें पाहतांहि सूतसंघ एक तर वेगळा काढण्यांत आला, आणि त्यांत दुसऱ्यातिसऱ्या कोणाचा हात नसतां त्याचेंहि कार्य मोठ्या धडाडीनें चाललें आहे असें फारसें ऐकूं येत नाहीं. आणि म. गांधी हे राष्ट्रीय सभेच्या सर्वाधिकाराचे जागीं स्वराज्यपक्षाची नेमणूक करण्यास तयार झाले आहेत, व स्वराज्य पक्षाचा कार्यक्रम राजकारणाच्या स्वरूपाचाच रहावयाचा ठरला आहे. अशा परिस्थितींत जुन्या अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावाची आठवण लोकांना झाली तर त्यांत काय नवल ! पहिला बाण कोठें पडला याचें विस्मरण होऊन तो हरवतोसें वाटलें तर दुसरा बाण त्याच दिशेनें फेंकला असतां दुसरा पडतो त्याच्या आसपास पहिला सांपडतो असा तिरंदाज लोकांचा अनुभव आहे. राजकारणांतला धागादोरा तुटून त्याचे टोंक डोळ्याआड झालें. पण फिरून तोच दोरा वळवून पुढें चालवावयाचा असल्यास वरील तिरंदाजी युक्तिसारखीच युक्ति करावयास पाहिजे. आणि अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावाच्या आसपास धुंडाळल्यास राजकारणाच्या तुटलेल्या धाग्यादोऱ्याचीं टोकें पुनः हातीं लागतील असा विचार करूनच समयज्ञ अशा सातारा प्रांतिक परिषदेनें त्या ठरावाची लोकांना आठवण करून दिली.

"या ठरावांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, सुधारणा निराशाजनक व अपुऱ्या आहेत हें खरें; तरी त्यांना भरपूर राबवून घेऊन त्यांचा होईल तितका उपयोग पदरांत पाडावा. आणि उरलेल्या अधिकाराचें भांडण पूर्वीसारखेंच चालूं ठेवावें. हा

ठरावं महात्मा गांधी, लो. टिळक व देशबंधु दास या तीन व्यक्तींच्या एकीकृत विचारांचा परिणाम होय. आणि जेव्हां एकट्या लोकमान्यांचें, किंवा एकट्या महात्माजींचें, किंवा एकट्या देशबंधूंचें मत एकेकटें घेतलें असतां लोकांस पटत नाहींसें दिसतें, तेव्हां या त्रिमूर्तींच्या एकवाक्यतेनें बनलेल्या ठरावाहून अधिक स्थान राष्ट्राला दुसरें कोणतें मिळणार ! गेल्या अंकांतील अग्रलेखामध्यें एक हात तें गच्च पकडण्याला गुंतवून, दुसरा हात उरलें तें मिळवावयाला मोकळा ठेवावा व चालवावाहि, अशी जी दोन हातांच्या कामाची वांटणी श्रेयस्कर म्हणून दर्शविली, तींच मूर्तिमंत अमृतसरच्या ठरावांत दिसून येते. मिळालेल्या सुधारणा हातांत पुऱ्या पकडून त्यांचा पूर्ण उपयोग करण्याच्या कामीं चार बोटांचा हल्लीं स्वराज्य-पक्ष उपयोग करीत आहे; त्याऐवजीं त्यानें मन मोकळें करून पांचहि बोटांचा उपयोग करावा; पण तो आजपासून नव्हे तर १९२७ सालापासून करावा, येवढेंच आम्ही म्हणत आहों. आणि आमच्या म्हणण्याला पं. मोतीलाल नेहरू यांचा आजचा नसला तरी पांच वर्षांपूर्वीचा आधार आहे हें आम्ही सुदैव समजतों.

" १९१९ सालच्या अमृतसरच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान पंडित मोतीलाल नेहरू यांनी मंडित केलें होतें. त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत खालील मजकूर आहे " सुधारणांचा स्वीकार केलाच पाहिजे अशा प्रकारचें राष्ट्रीय सभेचें कर्तव्य ठरत नाहीं, किंवा उलटपक्षीं पार्लमेंटानें ज्या सुधारणा देऊं केल्या त्या नाकारून निरुपयोगी करण्याचीहि शक्ति किंवा अधिकार राष्ट्रीय सभेला नाहीं. राजकीय सुधारणा मागण्याच्या कामीं राष्ट्रीय सभेनें अधिकार चालविला, व तो देण्याच्या कामीं पार्लमेंटानें आपला अधिकार चालविला. कित्येक बाबतींत राष्ट्रीय सभेच्या मताला पार्लमेंटनें मान दिला, कित्येक बाबतींत आपलेंच म्हणणें चालविलें. पार्लमेंटच्या मनांतील युक्तिवाद आम्हांस कांहीं पटतो व कांहीं पटत नाहीं. सुधारणांचा कायदा हिंदी जनतेच्या इच्छेप्रमाणें रचला गेलेला नाहीं, आणि राष्ट्रीय सभेनें केलेल्या कमींत कमी मागणीपेक्षांहि कांहीं देगण्या अपुऱ्या पडतात. तथापि या कायद्यामुळें जें हित होणार आहे किंवा पाऊल पुढें पडणार आहे त्याचें महत्त्व आपण मुद्दाम होऊन कमी करणें किंवा भासविणें हें योग्य नाहीं. आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या कायद्यानें आम्हाला कांहीं सत्ता किंवा अधिकार दिला जात आहे; व आजपर्यंत ज्या देशसेवेचीं द्वारें पूर्णपणें आमच्या मार्गांत बंद करून ठेव-

ण्यांत आलीं होतीं तीं उघडलीं जाऊन नवे मार्ग दिसूं लागले आहेत. या स्थितींत आपणाला जे अधिकार मिळाले त्यांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें व जे आपणास मिळाले पाहिजे पण अजून मिळाले नाहीं त्याकरितां सरकारच्या मागें मागणीचा तगादा करणें हें आमचें स्पष्ट कर्तव्य ठरतें."

"शेवटीं एकच गोष्ट सांगावयाची उरते ती ही कीं, पंडितजींच्या वरील उद्गारांत प्रधानमंडळें बनवून कायदेकौन्सिलांचा उपयोग करून घेणें ही गोष्ट सहजच येते. अर्थात् मी तेव्हां जें बोललों तें चुकीचें होतें असें वाटलें तर त्यांनी म्हणावें, तसें म्हटल्यास त्याला आमचीं दोन उत्तरें आहेत. पहिलें असें कीं, आमचीहि आज चूक असली तर तिजमुळें केवळ चुकीखेरीज इतर कोणतेहि आरोप पंडितजींना करण्याचें कारण रहात नाही. आणि दुसरें असें कीं, १९१९ व १९२५ या दोन सालांतील त्यांची धोरणें परस्पर विरोधी हे निश्चित. अर्थात त्यांचें पूर्वीचें मत चुकीचें असण्याइतकाच आजचेंहि मत चुकीचें असण्याचा संभव आहे. राजकारणांत मतें हीं प्रगमनशील असतात याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं, तीं बदलूं शकतात. परंतु नव्या जुन्या मतांपैकीं कित्येक वेळां नव्यापेक्षां जुनीं मतेंच अधिक सयुक्तिक ठरण्याचा संभव असतो, आणि यामुळेंच स्वराज्य पक्षांतील एकाद्या सभासदानें आजच्यापेक्षां पंडितजींच्या जुन्या मतांवर अधिक भर दिला तर हा त्याचा गुन्हा त्याला स्वराज्य पक्षांतून घालवून देण्याइतका तरी खचित भयंकर ठरत नाहीं."

प्रतियोगी-सहकार पक्षाची स्थापना १९२५ च्या नोव्हेंबरांत झाली. तेव्हां निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून त्या पक्षाविषयीं कोणच्या प्रकारचें लोकमत प्रगट झालें याचे कांहीं नमुने देतोः—

**लाहोर, सन्डे टाइम्स**—केळकर-जयकरांना पक्षांतून काढून लावण्याची धमकी देण्यांत पंडित नेहरू यांनीं अविचारीपणा केला. प्रतिसहकारितेवर श्रद्धा ठेवणारे आणखी कितीतरी सभासद आहेत याची पंडितजींना माहिती नाहीं असें दिसतें.

**लाहोर, ट्रायब्यून**—स्वराज्यपक्षांत यादवी माजली तिला पं. नेहरूंचा अविचारच कारणीभूत आहे. जयकर यांनीं पंडितजींना रोखठोक असाच जबाब दिला आहे. परिस्थितीप्रमाणें सहकारिता किंवा अडवणूक हीच प्रतिसहकाराची

व्याख्या ठीक होय. स्वराज्यपक्ष तरी याहून वेगळें काय करीत आहे ? ( शीखांचें वर्तमानपत्र )

**कलकत्ता, बंगाली**—केळकर-जयकर यांच्या राष्ट्रीय भावनांतील सच्चेपणा व शुद्ध हेतु, त्याप्रमाणें त्यांची सूक्ष्म व अचूक राष्ट्रीय दृष्टि, आणि त्यांच्या विचारांतील व्यवहार्यता व तर्कशुद्धता याविषयीं कोणासच संशय वाटणार नाहीं. जयकर-केळकरांची प्रतिसहकारितेची मोहीम आजकालच्या राजकारणांत क्रांतिकारक ठरेल, व त्यांना या मोहींमेंत लोकांचा आधार मिळेल. ( बंगाल राष्ट्रीय पक्षाचें वर्तमानपत्र )

**मद्रास, न्यू इंडिया**—असेंब्लींत मोतीलाल नेहरूंनीं आपली मागणी मांडल्यापासून स्कीनकमिटीवरील जागा स्वीकारीपर्यंत प्रतिसहकारिताच केली नाहीं तर काय ? या वादांत आमची सहानुभूति महाराष्ट्रीयांकडे आहे. त्यांच्या मार्गानेंच तरणोपाय लवकर सांपडणार आहे. पंडितजींचा मार्ग वांकडा तिकडा वरखालीं चक्राकार जातो, व त्याचा शेवट काय होणार हें कळत नाहीं. ( वेझंटबाईंचें वर्तमानपत्र )

**दिल्ली, हिंदुस्थान टाईम्स**—प्रतिसहकार म्हणजे शक्य तेथें अडथळा करावा, नसेल तेथें तटस्थ रहावें, आणि मिळेल तेथें सत्ता बळकावून आक्रमण करीत जावें हाच उत्तम मार्ग होय. ( पं. मदनमोहन मालवीय यांचें वर्तमानपत्र )

**लाहोर, पीपल**—मुंबईच्या स्वराजिष्ट आमदारांनीं दिवाणगिऱ्या पत्करण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला हें योग्यच केलें. या कामीं प्रत्येक प्रांताला परिस्थितीप्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य देणेंच श्रेयस्कर होय. केवळ अडवणूक हेंच जर स्वराज्यप्रक्षाचें धोरण म्हणावयाचें तर, पटेल यांना असेंब्लीचें अध्यक्षपद कां दिलें ? निःपक्षपाती अध्यक्षापेक्षां सत्ताधीश दिवाण किंवा कारभारी यांना लोकहित साधण्याची संधि अधिक मिळते. ( लाला लजपतराय यांचें वर्तमानपत्र )

**कराची, सिंध ऑब्झर्व्हर**—स्वराज्यपक्षांतील कारभारी मंडळाचा जुलूम असह्य झाला म्हणूनच प्रतिसहकार पक्ष निघाला !

**मुंबई, कैसर-इ-हिंद**—नवा पक्ष काढण्यांत केळकर-जयकर यांना कोणताच स्वार्थ साधावयाचा नव्हता. हल्लीच्या राजकारणांत माजलेलें ढोंग त्यांना

आवडत नाहीं इतकेंच. ते सचेष्टणानें सरळ चालणारे पुढारी आहेत. केळकर-जयकर राजीनामे देऊन स्वस्थ बसले असते तर त्यांना नीतिधैर्य नाहीं असेंच लोकांनीं म्हटलें असतें. स्वराज्यपक्षाचें अडवणुकीचें ढोंग पुरे करा असे कोणीतरी सांगावयास पाहिजे होतें तें काम या दोघांनीं केलें. त्यांचें चारित्र्य निष्कलंक आहे म्हणून या वादानें स्वराज्यपक्षाचें धोरण स्पष्ट व सुसंगत झाल्यास राष्ट्राला तो एक मोठा लाभच होईल.

**लखनौ, वेल्थ ॲण्ड वेल्फेअर**—स्वराज्यपक्ष जर एकजात अडवणुकीचीच भाषा सदोदित अविवेकानें बोलत राहील तर राष्ट्रहित साधण्याला तो निरुपयोगी ठरेल. कानपूरच्या राष्ट्रीय सभेनें प्रतिसहकार पक्षाचें धोरण पसंत करावें.

**मच्छलिपट्टण, जन्मभूमि**—केळकर-जयकर कंपूशीं पं. नेहरूंचा जो वाद चालला त्यांत महाराष्ट्रपक्षानेंच विजय मिळविला. हे दोघे दिवाणगिऱ्यांच्या गुळखोबऱ्याला भुलणारे कुकुबाळ नाहींत, व पंडितजींच्या धमकीला भीक घालण्याइतके ते भित्रेहि नाहींत. (हें पट्टाभिसीतारामय्या यांचें मत आहे!)

**मुंबई, इंडिअन सोशल रिफार्मर**—पंडित नेहरू यांचें आव्हान महाराष्ट्रानें स्वीकारलें आहे. तीन वर्षांच्या अनुभवानें शहाणे होऊन कानपूरच्या राष्ट्रीय सभेनें प्रतिसहकारितेच्या धोरणाला पाठिंबा द्यावा हेंच योग्य.

बाबु अरविंद घोष हे ध्येयवादी क्रांतिकारक व स्वातंत्र्यभक्त असें मानतात. तथापि विशेष परिस्थितींत प्रतिसहकारिता करणें हें त्यांनाहि संमत होतें याविषयीं ता. २ मार्च १९२६ च्या केसरींतील एक उतारा याप्रसंगीं यासंबंधांत देण्यासारखा आहे म्हणून तो खालीं देतों.

**अरविंदबाबूंचा संदेश**—सुधारणा प्राप्त होण्यापूर्वी जुन्या राष्ट्रीयपक्षानें जी चळवळ केली त्यांत महाराष्ट्रप्रमाणें बंगाल प्रांत हा प्रमुख होता. महाराष्ट्रांत राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांचें अखेरचें राजकीय बुद्धिभ्रंश "प्रतियोगी सहकारिता" किंवा "मिळालेलें पदरांत घ्या व बाकीचें मिळविण्याचा उद्योग करा" हें होतें. बंगालच्या राष्ट्रीय पक्षाचे तेजस्वी पुढारी बाबू अरविंद घोष यांनीं, पांदेचरीस जाण्यापूर्वी, आपला अखेरचा निरोप म्हणून १९१० सालीं जें उघड पत्र आपल्या देशबांधवांना लिहिलें तें त्यांचें राजकीय 'व्यवस्थापत्र' समजण्यांत येतें.

या पत्रांत अरविंदांनीं "अर्धवट स्वराज्यहि स्वीकारून त्याचा पूर्ण स्वराज्य मिळविण्याच्या कामीं उपयोग करा" अशा स्पष्ट शब्दांत प्रतियोगी सहकारितेचाच उपदेश केलेला आहे. हें पत्र "कर्मयोगिन्' मध्यें प्रसिद्ध झालें होतें. त्यांतला प्रतियोगी सहकारितेसंबंधाचा उतारा महत्त्वाचा असल्यामुळे पुढें देत आहों—

"स्वराज्याचें पूर्ण दान पदरांत पडेपर्यंत सहकारिता करण्याचे, सतत व आग्रहानें नाकारणें याच एका धोरणाला राष्ट्रीय पक्ष बांधलेला आहे असें सामान्यतः समजण्यांत येते. राष्ट्रीय पक्षाच्या पत्रकारांनीं ही चुकीची समजूत खोडून काढण्याची खबरदारी पूर्वी घेतली नाहीं, कारण त्या वेळीं तो एक व्यावहारिक प्रश्न नव्हता. असल्या प्रश्नाची चर्चा करण्यापेक्षां निःशस्त्र प्रतिकार व पूर्ण स्वावलंबन यांचें ध्येय लोकांना मान्य कसें होईल याचीच राष्ट्रीय पक्षाला मुख्य काळजी त्या वेळीं होती. पण हें उघड आहे कीं, वरच्यासारखा सिद्धान्त पुढें मांडणारा पक्ष हा व्यावहारिक विचारी कार्यकर्त्यांचा न ठरतां आग्रही तत्त्ववादी व ध्येयमग्न लोकांचा ठरेल. जोपर्यंत ताबा नाहीं तोपर्यंत सहकारिताहि नाहीं हें राष्ट्रीय पक्षाचें तत्त्व होय. ज्या अर्थी आम्हाला कोणत्याहि प्रकारचा ताबा दिला जात नाहीं त्याअर्थी तो मिळेपर्यंत सहकारिता नाकारणें ही गोष्ट शक्य तितक्या पूर्णपणें राष्ट्रीय पक्ष उपदेशीत आहे. पण समजा, लोकांनीं निवडलेल्या लोकसभेला संरक्षक जकाती बसविण्याचा अधिकार देण्यांत आला तर, या हक्काचा उपयोग न करतां पूर्वीचा व्यापारविषयक बहिष्कार चालू ठेवावा असें कोणताहि समंजस पक्ष म्हणणार नाहीं हें उघड आहे. किंवा समजा, लॉर्ड रे यांनी एके वेळीं बेत केला होता त्याप्रमाणें शिक्षणावरील सरकारी ताबा काढून तो लोकसभेच्या हातीं दिला, तर त्या शिक्षणावर बहिष्कार घाला असें कोणताहि समंजस राजकीय चळवळ्या मनुष्य सांगणार नाहीं. किंवा समजा, कोर्टात हिंदी न्यायाधीश नेमले, व ते अंमलबजावणी खात्याला जबाबदार न रहातां लोकांना प्रतिनिधि असलेल्या मिनिस्टराला जबाबदार राहिले, तर राष्ट्रीय पंचायती या मुख्य कोर्टांना पोषक व पुरवणी स्वरूपाच्याच राहतील. त्याचप्रमाणें ज्या कारभारांत लोकांचा ताबा बिलकुल नाहीं त्याच्याशी सहकारिता करण्याचें नाकारणें या धोरणामध्यें, लोक हे ज्या राज्यकारभाराचा परिणामकारक असा अवयव आहेत त्यांतहि सहकारिता करण्याचें नाकारणें ही गोष्ट येत नाहीं. अरेरावी देणग्या नाकारणें म्हणजे लोकांना कायमच्या मिळालेल्या हक्कांचा

उपयोग करण्याचें नाकारणें मात्र नव्हे. स्वावलंबन व निःशस्त्रप्रतिकार यांची चळवळ सुरू करण्याचा हेतु हा होता कीं, स्वराज्याचे निरनिराळे अंश देण्यास शांततेच्या व नैतिक दाबांच्या जोरावर सरकारास भाग पाडावें, व हे अंश न मिळाल्यास नोकरशाहीच्या संस्था नाहींशा करण्यासाठीं आपल्या स्वतंत्र संस्था उभारण्या. दिलेले हक्क लोकांनीं स्वीकारल्याने पूर्ण स्वराज्याचा हक्क, किंवा पुढेमागें लोकांच्या हक्कांत अरेरावीनें ढवळाढवळ केल्यास निःशस्त्रप्रतिकाराचा उपयोग, या दोनहि गोष्टी कायमच्या सोडल्या असें मुळींच होत नाहीं. हे हक्क स्वीकारण्याचा अर्थ इतकाच कीं पूर्ण स्वराज्य मिळविण्याची पायरी व साधन म्हणून अर्धवट स्वराज्याचाहि उपयोग करावा."

याशिवाय महाराष्ट्र, मुंबई, वऱ्हाड, नागपूर या प्रांतांतील मराठी वर्तमानपत्रांनीं आपलें पाठबळ दिलें होतेंच. प्रतिसहकार पक्षाची स्थापना केल्यामुळें मी बंडखोर ठरलों असें कांहीं लोकांनीं म्हटलें तरी, त्यामुळें मी अगदी टाकाऊ ठरलों नव्हतों याचें प्रत्यंतर हेंच कीं, या सालच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकींत, नेहरू प्रभृतींनीं किंवा गांधींच्या अनुयायांनीं मिसेस नायडू यांच्याकरितां विशेष खटपट केल्यामुळें त्यांना पहिल्या नंबरची पण मला दुसऱ्या नंबरची मतें मिळाली. कानपूरच्या राष्ट्रीय सभेच्या एका आवारांत एका चौकाला 'केळकर चौक' असें नांव देण्यांत आलें होतें. आणि कानपूर म्युनिसिपालिटीनें ज्या चार पुढाऱ्यांना मानपत्र दिलें त्यांतला मी एक होतों. १९२६ सालीं प्रतिसहकार पक्षाला कायदेमंडळांच्या निवडणुकींत सर्वत्र यश आलें हें तर प्रतिसहकारपक्षाच्या लोकप्रियतेला आलेलें मोठेंच प्रत्यंतर होय.

१९२५ सालीं मुंबई क्रॉनिकल पत्रांत माझे एक टीकाकार एल्. जी. के., (लक्ष्मण गणेश खरे) क्रॉनिकलचे एक दुय्यम संपादक यांनी मजविषयीं एक स्वतंत्र लेख लिहिला. त्यांत मला अनुकूल व प्रतिकूल अशी दोन्हीं मतें प्रकट केलेलीं असल्यामुळें ती टीका या खालीं देतों. गुण व दोष या दोन्हीकडे विवेचक दृष्टीनें पाहणारांचें म्हणणें आपणाला सर्वस्वी मान्य नसलें तरी एक ग्राह्य पुरावा म्हणून तो जमेस धरावा लागतो. रा. खरे म्हणतात—"मी डेक्कन कॉलेजांत असतांना प्रि. बेन यांनीं केळकरांचा उल्लेख एकदां तिरस्कारानें केलेला आठवतो. पण तेच केळकर

तेव्हां टिळकांचे नमुनेदार चिटणीस म्हणून परिणति पावत होते. सतत परिश्रम करण्याची केळकरांची शक्ति ही विस्मयकारक आहे. टिळकांना एक उंची दर्जाचा आणि कर्तृत्ववान मदतनीस मिळणार अशी स्वतः टिळकांची व इतरांची अपेक्षा बनत चालली होती व ती प्रत्ययालाहि आली. गेल्या वीस वर्षांत त्यांनीं राजकारणाचें व वाङ्मयाचें काम अत्यंत हौसेनें केलें. भाषा स्पष्ट समर्पक व संभावित, तथापि विषयासंबंधीं व माहितींत अत्यंत काटेकोरपणा हे गुण त्यांच्या सर्व प्रकारच्या वाङ्मय लेखनांत पूर्णपणें दिसून येतात. पण एक गोष्ट गौण झाली ती ही कीं पुष्कळ काळपर्यंत टिळकांच्या छायेंत दुय्यम स्थान घेऊन कार्य करण्याची जी संवय केळकरांना एकदा लागली ती टिळकांच्या मरणानंतरहि गेली नाहीं. एका शब्दांत सांगावयाचें तर केळकरांचा विनय हाच त्यांचा मुख्य दोष होऊन बसला आहे ! शिवाय ते आपल्या भाषणांत शुद्ध विषय प्रतिपादन कितीहि उत्तम व विनोदपूर्ण रीतीनें करीत असलें तरी, प्रचंड लोकसभांना भावनावश करून गदगदा हलविण्यासारखें किंवा उत्साहानें उठावणी देण्यासारखें मैदानी वक्तृत्व त्यांना करतां येत नाहीं. सरकारी न्यायखात्यांत ते न्यायाधीश झाले असते तर ज्यूरीला निःपक्षपातपणें खटल्यांतील मर्म समजावून देण्याच्या कामीं त्यांचा हात धरणारा कोणी भेटला नसता. त्यांना मोठेपणाचें जें स्थान मिळालें त्याचीच केव्हां केव्हां अडचण झाल्याची ते भासवितात ! उडी घालण्यापूर्वी पाण्याची खोली किती असेल हे ते अजमावून पाहिल्याशिवाय राहावयाचे नाहींत. ध्येय हस्तगत करण्याचीं साधनें ठरवितांना सुचवितांना ते आधी निर्दोष मनुष्यस्वभावाला काय पचेल व रुचेल हें पहातात. गेल्या पांच वर्षांत (१९२०-२५) त्यांनीं सुशिक्षित राजकारणी महाराष्ट्रीयांची मनोभूमिका विनचूक विशद केली आहे. ज्याला कारस्थानी खटपट म्हणतात ती त्यांना आवडत नाहीं; व त्यांतून ते मुक्त राहिले तर ते ऐक्य व शांतता नांदवूं शकतील. त्यांचा राजकारणांतील प्रामाणिकपणा सर्वीनाच केव्हांहि मान्य आहे. आपल्याला नापसंत असणाऱ्या कोणत्याहि मतांचा पोषाख ते आपल्या मनावर कधींहि चढविणार नाहींत. अलीकडे मेळ्यांच्या पदांतून त्यांच्यावर ग्राम्य टीका होते. मुळशी-प्रकरणीं त्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला. असहकारतेच्या चळवळीला धार्मिक आचरणाचें तीव्र पण विकृत स्वरूप आलें तें न पटल्यामुळें ते मागें पडले. तथापि त्यांनीं आपला बुद्धिभ्रंश होऊ दिला नाहीं. डोकें ठिकाणावर ठेविलें आणि 'प्रतिसहकारिते'चें निशाण खंबीरपणें हातीं

धरलें. 'मिळेल तें घ्यावें व बाकीच्याकरतां झगडावें' या सनातनी राजकारणी धोरणाला ते चिकटून राहिले. त्यांना दंगाधोपा गडबड आवडत नाहीं. चरखा मागें पडेल आणि असहकारतावादी सरकारशीं व्यापारी पद्धतीनें लवकरच तडजोंड करूं लागतील असें भविष्यहि त्यांनीं वर्तविलें. तसेंच देवघेव करण्यांत अप्रामाणिकपणा नाहीं असें ते उघड प्रतिपादितात. त्यांच्याविषयीं आदर असणारे ब्राह्मणेतरहि पुष्कळ आहेत. मुसलमानांना देखील ते अगदी बिन हिशेबी जहाल आहेत असे वाटत नाहीं. स्वतः राजपद भोगण्यापेक्षां दुसऱ्याला राजा करून त्याजकडून सूत्रें चालवावीं हें त्यांना अधिक सोयीचें वाटतें. हें सर्व खरें, पण प्रश्न विचारावासा वाटतो कीं, असेंब्लीमध्यें दुय्यम दर्जाचें पुढारीपण घेऊनच ते बसणार आणि आपले अनुभव दवडणार, किंवा त्यांच्या गुरुप्रमाणें प्रचंड लोकसमाजाला आपल्यामागें घालून पुढारीपणानें महत्कार्य करणार? आजची स्थिति अशी आहे कीं ते मनांत आणतील त्या उच्चस्थानाला पोंचतील. तें काग्रेसचें अध्यक्षहि होऊं शकतील. पण ते घेऊन टिकवितील किंवा सात्त्विक सच्चे साहित्यिक म्हणूनच त्या आवडीचें काम पुन्हा करू लागतील?" (ता. ७ ऑगस्ट १९२५)

टीकाकाराचें म्हणणें सयुक्तिक आहे. पण साहित्याची मला त्यांतल्यात्यांत अधिक आवड आहे हें जरी खरें असलें तरी, अप्रामाणिक मतांचा पोषाख मनावर आणि खादीची झूल अंगावर चढविण्यास मी कबूल झालों नाहीं यामुळेंच मला राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचें स्थान न मिळतां कानपुरास ते श्री. सरोजिनी नायडू यांना मिळालें हें कोणीहि सांगेल. मी या मानाकरितां, मनांत इच्छा बाळगून आकांक्षा ठेवून, माझ्या मतांना व आचरणाला ढोंगीपणानें किंचित् मुरड घातली असती, व महात्मा गांधींचा खरा अनुयायी आहे असें भासविण्याचा झोंक ठेविला असता, तर तें पद मला सहज मिळालें असतें. पण तें मिळाल्यावर मी काय केलें असतें केलें नसतें याविषयीं वरील टीकाकारानें उपस्थित केलेली शंकाहि अगदींच अस्थानीं आहे असें म्हणवत नाहीं.

गौहत्ती येथील राष्ट्रीय सभेस (१९२६) मी गेलों नाहीं. तत्पूर्वी आमच्या प्र. सहकारपक्षानें कौन्सिल-निवडणुकी जिंकल्या होत्या आणि एका अर्थानें पंडित नेहरूंचा पाडाव केला होता. या राष्ट्रीय सभेच्या आधीं एका जाहीर सभेंत माझ्या धोरणाचा मी खुलासा केला व थोडासा बोधप्रद असा पूर्वेतिहासाहि सांगितला तो या खालीं देतोः—

" थोडक्यांत सांगावयाचें तर असें सांगतां येईल कीं, राज्यकारभारांतली सर्व खातीं जर चालूं रहाणार तर त्या सर्वांचें मूळ जें कौन्सिल तें कसें बंद पाडतां येईल ! मात्र तें चालूं ठेवावयाचें यापेक्षां कौन्सिलांना जास्त महत्त्व द्यावयाचें नाहीं. कौन्सिलांत शेकडा ९० काम सरकारी व १० सभासदांच्या उपक्रमाचें असतें. तेथल्या कामकाजाचा सर्व कार्यक्रम गव्हर्नर ठरवितात. अशा स्थितींत खाजगी सभासदास विशेष काम करतां येणार नाहीं हें काळ्यांचें म्हणणें खरें आहे. ज्याला आपल्या जबाबदारीची जाणीव आहे तो असेंच म्हणणार. तेव्हां कौन्सिल हें सर्व खात्यांचें उगमस्थान असल्यामुळें तें चालूं ठेवून त्यांत सरकार जसा उपक्रम ( initiative ) घेईल त्याप्रमाणें त्याला उत्तर द्यावयाचें. उपक्रम करणारे सरकार अनुयोगी, त्याला उत्तर देणारे लोक प्रतियोगी-प्रतिनिधि; हीच प्रतियोगी सहकारिता. हें तत्त्व पूर्वीचेंच आणि इतकें साधें व सोपें असतांहि तें पुनः पटण्यासाठीं पांच वर्षें व्यर्थ गेली, तरी अजून काँग्रेसचा त्याला विरोध आहेच !

" आतां काँग्रेसबद्दल म्हणावयाचे तर गौहत्तीस तिजकडून या बाबतींत काय धोरण स्वीकारलें जाईल तें कोणासच सांगतां येत नाहीं. आम्ही या वर्षी काँग्रेसला कां जात नाहीं असा प्रश्न आम्हाला विचारण्यांत येतो. त्यांचीं कारणें दोन आहेत. पहिलें असें कीं, निवडणुकी नुकत्याच संपल्या असून नेहरू पक्षाचा त्यांत पाडाव झाला व आम्ही निवडून आलों, त्यामुळें नेहरू चिडलेले असणार. एका पक्षांत आम्ही यापूर्वी होतों तेव्हांच त्यांच्या आमच्यांत खूप भांडणें होत होतीं. आताच्या आमच्या जाण्यानें तीं किती वाढतील, व एकमेकांचे कसें वाभाडे निघतील हें सांगावयास नकोच. तेव्हां हीं भांडणें वाढूं नयेत हा यंदा गौहत्तीस न जाण्यांत आमचा हेतु आहे. दुसरा हेतु जरा मुत्सद्देगिरीचा (Tactical) आहे. तो असा कीं, स्वराज्य पक्षांत झालें तरी नेहरू पक्ष, व श्रीनिवास अय्यंगार पक्ष असे दोन उपपक्ष आहेतच. यापैकीं अय्यंगार पक्ष मनांतून आमच्या बाजूचा आहे. समजा, आम्ही गौहत्तीस गेलों तर आमचा पाडाव करण्यासाठीं हे दोन पक्ष एक होणार; पण आम्ही न गेलों तर मात्र त्या दोघांतच भांडण लागेल आणि प्रतिसहकार-तत्त्वाच्या विजयाच्या दृष्टीनें तेंच अधिक इष्ट आहे. श्रीनिवास अय्यंगार मनांतून आमच्या बाजूचे आहेत हें ऐकून तुम्हास आश्चर्य वाटेल. पण ती खरीच गोष्ट आहे. अहमदाबाद काँग्रेसच्या वेळीं श्रीनिवास अय्यंगार, रंगस्वामी अय्यंगार, पटेल, सत्यमूर्ति मी इत्यादि मंडळी एकाच मताचीं होतों. आम्ही पहिल्या-

पासून असहकारितेच्या विरुद्ध असतां त्या चळवळीला कां मिळालों असें पुष्कळजण विचारतात. असहकारितेचें तत्त्व नापसंत असतां त्याला तात्पुरतेंहि मिळणें ही आमची तात्त्विक चूक होती हें खरें, पण व्यावहारिक दृष्ट्या तसें करणेंच जरूर होतें. त्या वेळची परिस्थिती, केसरी ट्रस्टची जबाबदारी, इत्यादि गोष्टींचा विचार करून आम्हास तसें करणेंच अधिक युक्त होते. असो. प्र. स. पक्षाची स्थापना झाल्यावर जयकरांच्या घरीं अय्यंगारांची व माझी गांठ पडली त्या वेळेला त्यांनीं आमचें करणें पसंत केलें, व आमच्या मतास जुळेल असा काँग्रेसच्या धोरणाचा फॉर्म्यूला तयार करण्याचें त्यांनीं आपण होऊन कबूल केलें. अय्यंगार हे मनांतून आमच्याच मताचे आहेत याचें आणखी एक प्रत्यंतर, त्यांनीं मद्रास प्रांतांतील दिवाणगिऱ्यास आपला नैतिक पाठिंबा दिला आहे हें होय. तेथेहि असेंच झालें. स्वराजिस्टांचें बहुमत झाल्यानंतर त्यांनीं दिवाणगिऱ्या स्वीकारणें युक्त. पण काँग्रेसची आज्ञा आड येते. ती डिसेंबरपर्यंत बदलून घेतां येत नाहीं. अडवणुकीचा कार्यक्रम नापसंत व विफल ठरलेला. मग स्वतंत्रांना दिवाणगिऱ्या घेऊं देऊन त्यांना पाठिंबा देणें हाच काय तो मार्ग मद्रासी स्वराजिस्टांपुढें होता व तो त्यांनीं पत्करला. प्रतिसहकाराच्या तत्त्वाची खरी किंमत कौन्सिलांत बहुमतें मिळाल्यावर त्यांना पटली. म्हणून काँग्रेसचें आजचें धोरण बदलून घेणें त्यांना भागच आहे. तेव्हां त्याकरितां अय्यंगार व सौ. सरोजिनी नायडू या एका बाजूस, आणि नेहरू व बंगाली स्वराजिस्ट दुसऱ्या बाजूस, असा हा सामना गोंहत्तीस होईल. अशा रीतीनें परस्परच काम भागत असतां आम्ही तेथें जाऊन आमच्या विरुद्ध त्या दोघांना एक होण्यास संधि कशाला द्या! आम्ही आपलें येथूनच मौज पाहू म्हणजे झालें.

"कौन्सिलचे मतदार व काँग्रेस मतदार याजमधील मतभेद अशा रीतीनें जितक्या लवकर जाईल तितके जरूर आहे. हे दोन्ही मतदार समव्याप्त होतील तेव्हांच काँग्रेसमध्यें एकी होईल. माझ्या मतें काँग्रेसची अधिकारविभागणी होणें आतां जरूर झालें आहे. तसें झालें तरच मतदारसंघ आणि काँग्रेस यांजमधील विरोध नाहींसा होईल. प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळांत ज्या बाबींवर मतदारांची सत्ता चालते, त्या बाबींत काँग्रेसनें आपला पुनः अधिकार चालविण्याचें काय प्रयोजन आहे? त्या गोष्टी आपल्या परिस्थितीप्रमाणें व मताप्रमाणें करण्याची मुभा काँग्रेसनें लोकांस दिली पाहिजे. सरकारनें अधिकारविभागणी न केल्यास तें जसें दोषास पात्र होतें त्याप्रमाणें काँग्रेसनें न केल्यास तिलाहि दोष द्यावा लागेल. अशा

चाची सोडूंच दिल्या तरी, ज्यांवर कायदेमंडळाची सत्ता नाहीं, अशा दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत तेवढ्याच काँग्रेसनें आपल्या हातांत घ्याव्या; व त्यांवर लोकमत संघटित करावें. उदाहरणार्थ सिव्हिल सर्व्हिसचा व हिंदी संस्थानांचा प्रश्न. या कशांवरहि कोणत्याहि कायदेमंडळास बोलतां येत नाहीं. या बाबींचा वरिष्ठ राजकारणांत समावेश होतो. तें वरिष्ठ राजकारण काँग्रेसनें आपल्या हातांत ठेवून दुसरें कनिष्ठ राजकारण कायदेमंडळांवर पूर्णपणें सोपवावें. त्या कामांत मतदार जे करतील ते त्यांना खुशाल करूं द्यावें. असें केल्यानेंच सर्वत्र संतोष होईल व काँग्रेसचा श्रेष्ठ दर्जा कायम राहील. "

असो. माझा असहकारितेशीं ऋणानुबंध अवघा दोन वर्षे टिकला. पण माझाचसा काय, दास नेहरू प्रभृतींचाहि. माझा हा ऋणानुबंध मर्यादित कालपर्यंतच राहील असें मी प्रथमच जाहीर केलें होतें. हा ऋणानुबंध १९२३ सालीं अर्धवट संपला होता तो १९२५ सालीं पुरा संपला. तेथपासून पुढेंहि कांहीं काळ मी काँग्रेस मध्यें समाविष्ट होतों असें म्हणता येईल. कारण मी प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळाचा, आणि तिनें निवडून दिलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीचा, एक सभासद १९२९ पर्यंत होतों. परंतु १९२९ च्या डिसेंबरांत एका मध्यरात्रीं लाहोरास रावी नदीच्या काठीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आकाशांतून अवतरलें ! तेव्हां कायदेमंडळांत राहणारा मी काँग्रेसच्या कोणत्याहि अधिकाराच्या जागीं राहूं शकत नाहीं म्हणून "तुम्ही ऑ. इं. काँग्रेस कमिटीच्या जागेचा तरी किंवा कायदेमंडळाचा तरी राजीनामा द्या " असें राष्ट्रसभाध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांजकडून मला लिहून आल्यामुळें मी, असहकारिता मान्य नाहीं म्हणून, ऑ. इं. कॉं. कमिटीचा राजीनामा दिला.

यानंतर १९३० मध्यें काँग्रेसनें कायदेभंगाची चळवळ केली तींत भाग घ्यावा असें आमच्या लो. स्व. पक्षानें ठरविलें. तेव्हां त्याच्याखातर, त्याचें कार्य चालू करून देण्याकरितां, मी दोनतीन प्रकारचा कायदेभंग केला. तथापि असें करण्यांत माझा व 'असहकारिते'चा कांहीं संबंध आहे असें मी मनानें मानिलें नाहीं. १९३२ सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत मी तितकाहि भाग घेतला नाहीं. कारण तो कायदेभंग मला अधिकच नापसंत होता. १९३३ सालीं तर मी कायदेभंग थांबविण्याकरितां कैसरींतून जोराचा मत-प्रचारच केला. तात्पर्य १९२० पासून १९३६

मध्यें काँग्रेस ही कौन्सिलें निवडणुकी लढविण्यास उभी राहीपर्यंत काँग्रेसचा व माझा मतभेद चालूच होता. त्यानंतर काँग्रेसनें स्वतःच प्रतिसहकारवादी बनून आधिकार ग्रहण केल्यापासून तर असहकारिता ही काँग्रेसच्या कबुलीनें व कृतीनेंहि संपली! मग माझा तिच्याशी तत्त्वाचा असा मतभेद कांहींच उरला नाहीं. तथापि मी लोकशाही स्वराज्य पक्षाचा सभासद व पुरस्कर्ता असल्यामुळें काँग्रेसचा प्रतिपक्षीसा भासतो, याचें कारण व्यक्तिशः काँग्रेस कार्यकर्ते माझा द्वेष करतात. जुन्या विरोधाच्या आठवणी विसरूं शकत नाहींत. आणि ज्या गोष्टीला आपण पूर्वी अविचाराने विरोध केला तीच गोष्ट आपण आतां उत्साहानें स्वीकारीत आहों या जाणीवेनें मनांतून त्यांची त्यांनाच लाज वाटते!

असो. प्र. स. पक्षाच्या स्थापनेनंतर मी तीन वर्षे वरिष्ठ कायदे कौन्सिलांत होतो. पं. नेहरूहि होते. त्यांचा व माझा स्वतःच्या पक्षाच्या दृष्टीनें संबंध सुटला तरी प्रतिपक्षांतला एक पुढारी म्हणून संबंध उरला. कालांतराने जुना वाद विसरून आम्ही थोडेबहुत खेळीमेळींनेंहि वागत असूं. शिवाय शेवटीं सर्वपक्षीय परिषद भरवून 'नेहरू रिपोर्टा'त समाविष्ट झालेल्या राज्यघटनेची चर्चा पंडितजीनी सुरू केली तेव्हां त्यांना मला परिषदेस आमंत्रण द्यावें लागलेंच. १९२४-१९३० या सालांत मी वरिष्ठ कायदेमंडळांत होतो. त्याची हकीकत पुढे दिलीच आहे. पण १९२५ सालीं प्र. स. पक्षाची कल्पना निघाल्यापासून १९२९ पर्यंतचीं कांहीं पत्रे यापुढें देतों—

(ता. २३ ऑगस्ट, १९२५)—तुम्हांला यंदा काँग्रेसचे अध्यक्ष करावे म्हणून मी लजपतराय यांना व प्रकाशम् यांना पत्रें पाठविली आहेत. युरोपमध्ये मी आणखी कांहीं दिवस राहणार आहे. तुमच्या पक्षातर्फे परराष्ट्रीय चळवळ करण्यास येथें माझा उपयोग झाला तर आनंद होईल. (तारकानाथ दास, म्युनिच, जर्मनी)

(ता. ३ ऑक्टोबर, १९२५)— काँग्रेसचा स्वराज्यपक्षाशी अगर सूतसघाशीं अधिकृत संबंध असूं नये असें तुमचें मत असल्याचें पाहून आनंद झाला. एकतर काँग्रेस मोडून तरी टाका, किंवा या नसत्या थोतांडांतून तिची मुक्तता करा. तुम्ही महाराष्ट्रांतले लोकच काँग्रेसला तिचें पूर्वीचें माननीय स्थान प्राप्त करून द्याल. कारण आम्हा स्वतंत्र पक्षाच्या लोकांना कोणीच विचारीत

नाही. तात्कालिक राजकीय वावटळीबरोबर वहात आलेल्या मतांना ज्यानें मान वाकवली नाहीं असा पक्ष म्हणजे लो. टिळकांचाच पक्ष होय ! कलकत्त्याच्या वर्किंग कमिटीच्या सभेला तुम्ही हजर रहाल अशी आशा आहे. ( सत्येंद्र बोस, कलकत्ता )

( ता. २२ ऑक्टोबर, १९२५ ) तुम्ही व जयकर यांनीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलेल्या मुलाखती आजच सकाळीं वाचल्या. याबद्दल मला काय म्हणावयाचे ते जयकर यांना लिहिलें आहे. तेच पत्र सोबत पाठविलें आहे. नागपुरच्या सभेला तुम्ही जा; तेथें कांहीं तडजोडीचा मार्ग निघतो कीं काय हें पाहूं. याहून पत्रद्वारें अधिक चर्चा करता येत नाही. ( पं. मोतीलाल नेहरू )

( ता. २२ ऑक्टोबर, १९२५ )—सितापूरहून मी परत आल्यावर तुमचें पत्र व तुम्ही आणि जयकर यांनी वर्तमानपत्रांना दिलेल्या मुलाखती वाचावयास मिळाल्या. मीहि त्यावर सितापूरला भाषण केलें व प्रेसच्या मुलाखतींत माझें मत प्रसिद्ध केलें. अर्थात् त्यावेळी तुमच्या दोघांच्या मुलाखतींची बातमी सारांश रूपानेंच कळली होती. पण आतां तुमच्या समग्र मुलाखतीच हाती आल्यामुळें मोठी चिंताजनक परिस्थिति उत्पन्न जाहली आहे असें मला वाटते. मुलाखतीत तुमचें मत तुम्ही स्पष्टपणें मांडणार आहात असें तुम्ही पत्रांत लिहिले आहे. पण ज्या गोष्टी तुम्ही मुलाखतीत बोललात त्या बोलणें योग्य होतें कीं काय हाच वादग्रस्त प्रश्न खरा आहे. स्वराज्य पक्षाचा अध्यक्ष म्हणून मला बोलण्यास केव्हांहि बंदी नाहीं म्हणून तुमच्या मुलाखतीबद्दल मलाहि माझें मत लोकांना सांगावें लागेल. तुम्ही, व जयकर यांनीच स्वराज्य पक्षाचा कार्यक्रम हास्यापद आहे असें जाहीरपणें सांगितलें तर तें कसे चालेल ? यासंबंधीं पुढें काय करावयाचें हा प्रश्न आहे. कारण त्याची उपेक्षा करतां येत नाहीं. तुम्ही आम्ही आपले मतभेद मिटवून या पुढे कसे वागावयाचें हें ठरवावें. किंवा तुम्ही पक्षाचा संबंध सोडावा. पहिली गोष्ट तुम्ही स्वीकारलीत तर त्यांत आनंद आहे, नाहीं तर दुसरी गोष्ट अनिवार्य आहे.

ता. १ नोव्हेंबरला पक्षाच्या कार्यकारी मंडळाची नागपूरला सभा आहे, त्या वेळीं तांबे यांचें वर्तन, मध्यप्रांतांत दिवाणगिऱ्या घेण्याचा प्रश्न, तसेंच मध्यप्रांत वऱ्हाड येथील स्वराजिस्त्यांचें धोरण इत्यादि अनेक विषयांचा विचार होईल. तुम्ही व जयकर कार्यकारी मंडळाचे सभासद असल्यामुळें तुमच्या वर्तनावर

कार्यकारी मंडळापेक्षां पक्षाचें जनरल कौन्सिलच मत प्रदर्शित करूं शकेल असें मला वाटतें. तथापि तुमचे आमचे मतभेद मिटतात कीं काय याची चर्चा नागपूरच्या सभेत करूं. तरी तुम्ही नागपूरच्या सभेस जरूर यावे. मात्र तोपर्यंत तुम्ही कोणतीहि मुलाखत प्रसिद्ध करूं नये. अशा प्रश्नांचा जितका लवकर सोक्षमोक्ष करतां येईल तितकें बरें ! ( मोतीलाल नेहरू, अलाहाबाद )

(ता. २८ ऑक्टोबर, १९२५)—पं. नेहरू व तुम्ही यांच्यामध्यें गैरसमज वाढत चाललेले पाहून वाईट वाटतें. कोर्टाच्या बेअदबीच्या बिलाच्या वेळींच असे कांहीं तरी बनत असावें असें मला वाटलें. तथापि नागपूरला जमून तुम्ही सर्व हे गैरसमज मिटवाल अशी आशा आहे. पण त्यांपूर्वी वर्तमानपत्रांतून तुम्ही कोणताहि वाद अगर चर्चा करूं नये इतकीच तुम्हास विनंति आहे. 'स्वराज्यां'त जो तुमचा लेख कालच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत तुम्ही पुष्कळच सडेतोडपणें व टाकून लिहिलें आहे. यामुळें तुमच्या शत्रूंना मात्र हत्यार सांपडेल अशी भीति वाटते. ( शिवस्वामी अय्यर, मयलापूर, मद्रास )

( ता. ३० ऑक्टोबर, १९२५ )—बॅ. चक्रवर्ति व त्यांची सर्व जुनी अनुयायी मंडळी ही तुमच्या व जयकरांच्या हालचालींकडे उत्सुकतेनें पहात आहेत. जरूर तेथें दिवाणगिरीच्या स्वीकारून शत्रूशी सामना द्यावा असें ठरलें तर आम्ही सर्व तुमच्या बाजूचे आहोत. तुमच्या पक्षाला पाठबळ देण्याकरितां इकडे आम्ही तुम्हाला शक्य ती मदत करूं. ( बी. के. लहिरी, कलकत्ता )

( ता. १५ नोव्हेंबर, १९२५ )—आपल्या राजकीय पक्षांतून सध्या जो दांभिकपणा माजत चालला आहे तो साफ झाडून टाकण्याचें व्रत तुम्ही व जयकर यांनीं मोठ्या धैर्यानें आचरिलें आहे याबद्दल तुमचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. येत्या कॉंग्रेसमध्यें आतां काय काय होतें इतकीच चिंता वाटते. प्रतिसहकार पक्ष तुम्ही कॉंग्रेसमध्यें रीतसर स्थापन कराल तर मी त्याला ताबडतोब येऊन मिळतों आणि इतरांनाहि येण्यास सांगतों. पण समजा कॉंग्रेसनें तुमचें प्रतिसहकाराचें तत्त्व अमान्य केलें, तर पुढील वर्षी तुम्ही प्रतिसहकाराच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करणार कीं जुना कानपूर कॉंग्रेसचाच कार्यक्रम पुढें चालवणार ? हें लवकर कळवावें. ( एम्. राम. शास्त्रुल्, एलोर )

( ता. २२ नोव्हेंबर, १९२५ )—मी नुकताच कौन्सिल ऑफ स्टेट मध्यें निवडून आलों. आणि कोणत्या पक्षांत जावें याचा विचार करकरून असें ठरविलें

कीं एक स्वतंत्र राजकीय पक्षच स्थापन करावा. सुधारणा आहेत तशा राबवून त्यांचा होईल तेवढा उपयोग करून घ्यावा. अडवणुकीचा कार्यक्रम मला पसंत नाहीं. यामुळें मी स्वराज्य पक्षांत येत नाहीं. आणि शक्य तेथें सहकरिता व अपरिहार्य तेथें विरोध हे नेमस्तांचें मताहि मला पटत नाहीं. कौन्सिलांत काम करावयाचें त्यांत सहकारिता कसली आणि असहकारिता कसली ! जरूर तेव्हां दोन्ही गोष्टी कराव्या लागतील. प्रत्येक प्रांतांत वेगवेगळी परिस्थिति असल्यास कोठें काय धोरण पत्करावें हे त्या त्या प्रांतानें स्वायत्ततेनें ठरवावें, मध्यवर्ती संस्थेनें त्यांत हात घालूं नये, अशा तत्त्वावर नवा पक्ष काढणें तुम्हास पसंत असेल तर तुम्ही व जयकर यांच्याशीं मी बोलूं इच्छितो. (.सर शंकरन् नायर, मद्रास )

बापूजी अणे यानीं पं. नेहरू यांना खालील पत्र लिहिलें:—

( ता. ७ जानेवारी, १९२६ )—"असेंब्लींतील माझ्या जागेचा मी राजिनामा दिला; त्याचप्रमाणें या पत्राने स्वराज्यपक्षाचाहि देत आहे ! येथल्या प्रांतिक शाखेच्या अनेक सभासदांनीं राजीनामे दिले आहेत ते रीतसर प्रांतिक शाखेच्या सभेनें स्वीकारले नाहींत. पण त्याची वार्ता तुमच्या कानावर घालणें माझें कर्तव्य आहे. कारण येत्या सभेत त्यांचा विचार व्हावयाचा आहे. 'स्वराज्य पक्षाच्या शरीरांतील कुजलेला अवयव कापून काढावा' असे आपण म्हणाला होता. आम्ही सर्वांनीं राजिनामे देऊन आपल्या इच्छेप्रमाणेंच घडवून आणले आहे ! यांत आमचा कोणताहि व्यक्तिशः हेतु नाहीं. हा राजिनामा देताना देशहिताच्या माझ्या कल्पनेप्रमाणें केवळ कर्तव्यबुद्धिला स्मरणें यापेक्षां कांहीं मनांत आणले नाहीं. आपणासारख्या बाणेदार व त्यागी मनुष्यानें अलंकृत केलेला पक्ष सोडण्यांत मला दुःख वाटतें. पण आपण दूर झालों तरी देशहितबुद्धिनें परत एकत्र येऊं अशी आशा आहे.

(ता. ११ जानेवारी, १९२६)—काल वऱ्हाडच्या स्वराज्यपक्षाची सर्व साधारण सभा होती. चारहि जिल्ह्यांतले प्रमुख सभासद हजर होते. पं. नेहरूनी रफी अहमद यांना स्वतःचे प्रतिनिधि म्हणून मुद्दाम एका लघुलेखकासह पाठविले होते. तसेंच बॅ. अभ्यंकर व जमनादास मेहता हेहि नेहरूंच्या वतीनें सल्ला देण्यास सभेस हजर होते. सभेपुढें राजिनाम्यांचा विचार होऊन सभेंत राजिनामे मंजूर झाले. रामराव देशमुख यांनी आपण पक्ष सोडून जाऊं व स्वराजिस्ट म्हणून कोणत्याहि

निवडणुकीस यापुढें उभे रहाणार नाहीं म्हणून सांगितलें. या प्रमाणें वऱ्हाडांत तरी स्वराज्यपक्ष पूर्णपणें नामशेष झाला आहे असे दिसेल! ( बापूजी अणे, यवतमाळ. )

(ता. १२ जानेवारी, १९२६)—काल रोजीं येथील स्वराज्यपक्षाच्या प्रांतिक सभेंत बहुतेक सभासदांच्या राजीनाम्याचा विचार होऊन ते बहुमतानें मंजूर झाले. स्वतः अणेच अध्यक्ष असून त्यांनीहि राजीनामा दिला असल्यामुळें, पं. नेहरूंनी आपला प्रतिनिधि ही सभा पहाण्यास पाठवावा असें अणे यांनी मुद्दाम कळविलें होतें. त्याप्रमाणें बॅ. अभ्यंकर व जमनादास मेहता हे पंडितजींच्या वतीनें सभेस हजर होते. सभासदांनीं स्वराज्यपक्षाचे राजीनामे देऊं नयें म्हणून मेहता व अभ्यंकर यांनी विनंति केली, व 'तात्यासाहेब केळकर यांनी या प्रश्नावर अखेरचें मत देईपर्यंत हा प्रश्न तहकूब करावा' असेंहि म्हणून पाहिलें ! पण कांहीं उपयोग झाला नाहीं. दोघांखेरीज सर्वांनीं राजीनामे दिलेले आहेत. अशी एकंदर इकडली हकीकत आहे. ( वा. ग. खापर्डे, उमरावती )

( ता. २ फेब्रुवारी, १९२६ )—माझ्या मुलाच्या आजारीपणामुळें मी घरी निरुपायानें अडकून पडलों पण मनानें मी कानपूर काँग्रेसमध्येच वावरत होतो. तुमच्या प्रमाणेंच कानपूर येथें अडचणींना तोंड देण्याकरितां मी हजर नव्हतो याबद्दल वाईट वाटतें. स्वराज्य पक्षाच्या सभेत, विषय-नियामक कमिटींत, आणि तसेच भर काँग्रेसमध्यें मोतीलाल नेहरू यांचें धोरण चवाठ्यावर आलें हें चांगलें झालें ! डॉ. मुंजे हेहि बंडखोरीत उघडपणें येऊन मिलाले. तुम्ही राजीनामा दिलात, पण ज्या मतांचा तुम्ही गेली ३-४ महिने धैर्यानें उघड उघड पुरस्कार केलात त्याला तो सुसंगतच होता. असेंब्लीचा माझा राजीनामा मी कालच पाठविला. जयकरांनी व तुम्ही इतक्यांतच फेर निवडणुकीसाठी वर्तमानपत्रांत स्टेटमेंट करूं नये. ( बापूजी अणे, यवतमाळ )

मिसेस बेझंट यांना माझें पत्रः—

(पुणें ता. १७ मार्च, १९२६)—तुम्ही प्रतिसहकार पक्षाच्या लीगला येऊन मिळाल्याचे कळले. राष्ट्रीय कामांत आपण पुन्हा एकदा समान भूमिकेवर आलो. नॅशनल फेडरेशनचा मी आधींच सभासद असून पार्लमेंटांतील तुमच्या बिलास मी पाठिंबा देण्याचे ठरविले आहे. तुमच्या मॅनिफेस्टोवर सही करून मी सोबत पाठवीत आहे. एकाच हेतूनें पण वेगवेगळ्या संस्थांतून आपण काम करावें ही माझी

कल्पना तुम्हास मान्य झाली हें मला बरें वाटतें. प्रत्येक लीगनें आपापले निवडणुकीचे मॅनिफेस्टो स्वतंत्र आहेत असे समजावे. त्यांतील गटांना योग्य तें आचारस्वातंत्र्य असावें. प्रतिसहकार पक्षाचें नांव घेऊन कोणीहि उमेदवार उभा राहिला तरी, ज्याला ते तत्त्व मान्य आहे त्या उमेदवाराला हा पक्ष आपली मान्यता देईल. पण उमेदवाराची लायकी नालायकी, तसेच एकाच मतदारसंघांत यशाच्या दृष्टीनें कोणी उभे रहावें व कोणी माघार घ्यावी, प्रतिस्पर्धी उमेदवारांशीं कोणत्या अटीवर तडजोड झाल्यास ती करावी, या सर्व तपशीलाच्या बाबी स्थानिक पुढाऱ्यांवरच सोपवाव्या. येत्या निवडणुकींत प्रतिसहकार पक्षाला किती जागा जिंकता येतात यावरून त्याचें बळ समजेल. कित्येक ठिकाणीं नेमस्त व राष्ट्रीय हे दोघेहि तुल्यबल असतील, व त्यांतून कोणाला निवडावें हा एक बिकट प्रश्न पडेल. पण प्रतिसहकाराची मर्यादा इतकी व्यापक आहे कीं, राष्ट्रीय पक्षाचा मनुष्य पडला व नेमस्तांचा विजय झाला असेंहि क्वचित घडलें तरी, नॅशनल फेडरेशनच्या मॅनिफेस्टोवर जर त्यानें सही केली असेल तर, नेमस्त असूनहि तो मनुष्य प्रतिसहकार पक्षाचा नव्हे असें म्हणता येणार नाहीं. ते कांहींहि असो. आपलें जाळें विस्तृत्व रीतीनें टाकल्या शिवाय, आणि तपशीलाच्या बाबतींत लक्ष घालण्याचें कमी केल्याशिवाय, आपणाला यशाची आशा नाहीं. प्रतिसहकारपक्षाचा सभासद होण्याला काँग्रेसचा सभासद असणें ही आवश्यक अट होती, पण मुंबई शहरापुरती ही अट आम्ही काढून टाकली आहे, यावरून व्यापक धोरणाने आम्ही वागावयाचें ठरविलें आहे हें तुम्हाला दिसेल.

( ता. ३१ मार्च, १९२६ )—जयकर व इतर स्नेही यांच्याशी पुष्कळ चर्चा केली. बंगाल संयुक्तप्रांत तसेच इतर ठिकाणांहूनहि अनेक पुढारी येत आहेत व परिषदेला बरेंच महत्त्व येईल. तरी तुम्ही येणें फार जरूरीचें आहे. रायगडचा उत्सव संपवून ता. ३ एप्रिलच्या सुमारास तुम्ही इकडे येऊं शकाल. ( महमद अल्ली जिना, मुंबई )

(ता.१२ एप्रिल, १९२६)—समेटाचें बोलणें करण्यास येण्याबद्दल पं. नेहरूंचें पत्र तुम्हास पोहोचलेच असेल. आपणाला अकाल्पित रीतीनें अनेकांकडून मदत झाली याचा नेहरूंच्या मनावर परिणाम झाला असावा असें दिसतें. मुंबईतील सभा जर यशस्वी न होती तर मात्र हें घडून न येतें. ( मु. रा. जयकर, मुंबई )

( ता. १७ एप्रिल, १९२६ ) 'येथें जरूर या. पण मनुष्य चिंतितो त्याच्या अगदीं उलट दैव विचार करीत असतें हें विसरूं नका ' असें तुमच्या तारेला मी उत्तर पाठविलें होतें. या अनौपचारिक सभेबद्दल मला कांहींच कल्पना नाहीं. नेहरू यांच्या सांगण्यावरून मी तुम्हांला निमंत्रण केलें. जयकर यांनी अणे व मुंजे यांना तारा करण्यास मला सांगितलें आहे. आपण सर्वजण काय धोरण पत्करू यावर सभा यशस्वी होईल कीं नाहीं हें अवलंबून आहे. या सभेंतून काय निष्पन्न करावयाचें, व वाटाघाट कोणत्या मुद्यांवर करावयाची, याबद्दल नेहरू यांनी मला कांहींच कळविलें नाहीं. ( म. गांधी, साबरमती )

( ता. २ सप्टेंबर, १९२६ )—समेट फसणार हें दिसतच होतें. " नव्या पक्षांत येण्यास आमची ना नाहीं. पण आमचा प्रतिसहकार पक्ष आम्ही मोडणार नाहीं अगर तुमच्या पक्षांत पूर्णपणें विलीन केला असें दाखविणार नाहीं. प्रतिसहकार पक्षाच्या नांवानें व नांवाकरितां उघड प्रचार पुष्कळ केला आहे. तरी यावेळीं आम्ही नव्या पक्षांत सामील होणें निवडणुकींच्या दृष्टीनें धोक्याचें आहे" असें मी पंडित मालवीय यांना तारेनें कळविले आहे. ( बापूजी अणे )

( ता. २६ नोव्हेंबर, १९२६ )—निवडणुकींत यश मिळाल्याबद्दल तुमचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. मद्रासमध्ये स्वराजिस्ट लोक बहुमतानें निवडून आल्यामुळें कशी पंचाईत झाली पहा ! ते स्वतः दिवाणगिऱ्या घेत नाहींत व इतरांना घेऊं देत नाहींत. जस्टिस पक्षानें जे केलें त्याचींच पुनरावृत्ती होणार म्हणावयाची ! आमाम कॉंग्रेसला पुष्कळ लोक बरोबर नेऊन दिवाणगिऱ्यावरील बहिष्कार दूर करण्याबद्दल तुम्ही कॉंग्रेसचें मन वळवा. कौन्सिल बहिष्कार जसा दूर झाला तसाच हाहि होऊं शकेल. तुम्ही त्याबाबत जोराची खटपट कराल अशी आशा आहे. ( शिवस्वामी अय्यर, मद्रास. )

(ता. २ डिसेंबर, १९२६)—तुम्ही असेंब्लींत निवडून आल्याबद्दल तुमचें मी अभिनंदन करण्याची आवश्यकता नाहीं. पण हॉर्निमन व त्यांचें हेरल्ड पत्र यांनीं तुम्हावर जी शिव्याची लाखोली वाहिली होती ती लक्षांत घेतां मला मुद्दाम अभिनंदन करावेसें वाटतें. मला वाटतें ज्या मताचा तुम्ही पुरस्कार केला तें गौहत्तीच्या कॉंग्रेसमध्ये स्वीकारलें जाईल, आणि तुम्ही देशाला दाखविलेला मार्ग बरोबर होता हें पुनः एकवार सिद्ध होईल. ( मनु सुभेदार, मुंबई )

(ता. २२ एप्रिल, १९२७ )—काँग्रेसमधील अनेक पक्षांच्या ऐक्याबाबत श्रीनिवास अय्यंगार यांचें मला इतरांप्रमाणेंच एक छापील पत्रक आलें आहे. त्यांच्या दौऱ्याचा काय फायदा देव जाणे. पण मला ते मुंबईस भेटले तर येथील कार्यकर्त्यांचा व त्यांचा संभाषण-प्रसंग घडवून आणीन. ऐक्याबद्दल तुम्ही तुमच्या ज्या सूचना त्यांना दिल्या आहेत त्यांना आम्ही चिकटन राहूं यांत प्रश्नच नाहीं. ही सर्व गोष्ट आम्ही तुम्हांवरच सोपविली आहे. यत्या ऑ. इंडियाच्या सभेस हजर राहून तुम्ही याबाबत पुढाकार घ्यावा. कारण तुमच्यावांचून हें काम करणारा महाराष्ट्रांत दुसरा कोणीच नाही, व तुमचा कोणीहि दुय्यम हें काम करूं शकणार नाहीं. तरी जरूर यावें. ( एम्. आर. जयकर, मुंबई. )

श्री. बापूजी अणे व डॉ. मुंजे यांना माझें पत्रः—

ऑल इं. कों. कमिटीची बैठक ता. १५ रोजीं मुंबईस आहे हे तुम्हांला माहीतच आहे. कांहीं महत्त्वाच्या गोष्टी मध्यंतरीं घडल्यानें आपल्या पक्षाच्या सर्व मंडळींनीं मुंबईच्या सभेस हजर रहाणें जरूर आहे. श्रीनिवास अय्यंगार हे दौऱ्याकरितां इकडे महाराष्ट्रांत आले आहेत. दिल्लीला समेटाविषयीं माझ्या निश्चित लेखी सूचना श्रीनिवास अय्यंगार यांच्या हातीं दिल्या हे तुम्हांला माहीतच आहे. त्यावरून त्यांनी इकडे दौऱ्यास येण्याची मला तार केली, व बंगालच्या पुढाऱ्याप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि येऊन समेटाची चर्चा करावी असा त्यांचा बेत दिसतो. त्यांचें म्हणणें मी शब्दशः खरें धरलें नाहीं! आमच्या म्हणण्यांतील कांहीं मूलभूत तत्त्वें त्यांनी मान्य केल्याशिवाय इकडे दौरा करण्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं असेहि त्यांना मी स्पष्टपणें कळविलें. यावर जाहीर सभांतून पक्षभेदासंबंधी वाद उकरून काढणार नाहीं असें त्यांनीहि तारेनें आश्वासन दिलें. प्रांतिक कॉं. कमिटी आमच्या हातीं आणि ते पडले कांग्रेसचे अध्यक्ष! यामुळें दौऱ्याला येऊं नका असेहि त्यांना मला म्हणतां येईना! अर्थात् ते आले. आणि माझ्याकडे दोन दिवस राहून हल्ली ते अलीबागला गेले आहेत. नंतर वाई, सातारा, कऱ्हाड, रत्नागिरी, चिपळूण इत्यादि ठिकाणीं आम्हीहि त्यांच्याबरोबर जाणार आहों. हा दौरा तारीख १३ ला संपेल.

पुण्यांतील मुक्कामांत श्रीनिवास अय्यंगार यांना असें आढळलें कीं फेर व नाफेर या दोन्ही पक्षांचा त्यांच्यावर विश्वास नाहीं. दोन दिवस नाफेर मंडळींनीं

शिवरामपंत परांजपे यांच्या घरी त्यांना चर्चेला बोलाविले. पण त्यांना नेण्यांला कोणी मनुष्य अगर तांगाहि त्यांनी पाठविला नाहीं ! आमच्या घरी दोन खाजगी सभा झाल्या त्यांत ते पुष्कळ मनमोकळेपणानें बोलले. या सभांना मराठी जिल्ह्यांचे पुष्कळ पुढारी आले होते, आणि मी श्रीनिवास अय्यंगार यांना दिलेल्या समेटाच्या लेखी सूचनांचा या सभांतून कलमवार विचार झाला. कांहीं कांही शब्दांत विरोध कमी करावा या दृष्टीनें फेरफार झाल्यास माझ्या सूचनांतील मुख्य तत्त्व अय्यंगार यांना मान्य झाले आहे असें मला तरी वाटतें ! काँग्रेसचे अध्यक्ष या दृष्टीनें पक्षातीत तटस्थपणाचा देखावा ते करोत, पण पंडित नेहरू व स्वराज्यपक्ष यांच्या धोरणाचा त्यांना कीट आला असून, ऑ. इं. का. कमेटीच्या सभेत ऐक्याचा कांहीं मार्ग काढावा असें त्यांना वाटूं लागले आहे ही गोष्ट मात्र कांहीं लपत नाही. किंबहुना सत्यमूर्ति व इतर पुढारी यांच्याशी विचारविनिमय करून बंगाल, तामिळनाडू व महाराष्ट्रांतील पुढारी यांचें पाठबळ मिळाल्यास श्रीनिवास अय्यंगार यांना तें हवें आहे. इतकें झालें तरी मुंबईच्या सभेंत अखेर काय होईल हें मला सांगतां येत नाहीं. तथापि तें कसेहि असलें तरी नागपूर वऱ्हाडपासून अखिल महाराष्ट्रांतील आपल्या पक्षाच्या झाडून सर्व पुढाऱ्यांनीं मुंबईच्या सभेला अवश्य आलें पाहिजे इतकें मात्र खरें. पुण्याम खासगी सभांना श्री. कौंजलगी हजर होते. त्यांनीं माझ्या समेटाच्या सूचनांना अनुकूलता दर्शविली. आणि गंगाधररावं देशपांडे यांनी विरोधाची बाजू उचलून धरली तर कौंजलगी व इतर कर्नाटकीयांचें मत आपल्या बाजूला पडेल असें वाटतें. तरी ता. १३ ला निश्चितपणें इकडे यावें म्हणजे जयकर व अय्यंगार यांच्याशी आधीं चर्चा करण्याला दोन दिवस भरपूर वेळ मिळेल. मीहि या दौऱ्यानंतर मुद्दाम मुंबईस दोन दिवस आधीं येत आहे.

( २१ मे, १९२७ )—मी काल येथें आलों. तुम्ही गेल्यानंतर श्रीनिवास अय्यंगार यांच्याशी माझें बोलणें झालें. हुटगीपर्यंत आम्ही मिळून प्रवास केला. तुमच्या पक्षाला येऊन मिळण्याची त्यांची फार इच्छा आहे. समेट मोडण्याला स्वतः तुम्ही अगर तुमचा पक्ष कारण नसून दुसरेच कोणीतरी आहेत याबद्दल त्यांची खात्री झाली आहे, व अडचणींतून कांहींतरी मार्ग तुम्ही काढावा अशी त्यांना अपेक्षा आहे. त्यांचें म्हणणें इतकेंच कीं, तूर्त अधिकारस्वीकाराच्या प्रश्नाचा तुमच्या कार्यक्रमांत समावेश तुम्ही करूं नये. मलाहि तसेंच वाटतें. तुमचें

मत युक्तिसिद्ध असेल, पण पक्षातील महत्वाकांक्षी सभासदांना अधिकाराची जागा घेऊं दिल्याने पक्षांतील एकी बिघडते. कांहीं लोक तर केवळ याच हेतूवर लक्ष ठेवून तुमच्या पक्षात आले आहेत.

केवळ व्यक्तिविषयक आरोप करणारे जे तुमचे प्रतिस्पर्धी आहेत त्यांची सद्दी आता संपली आहे. अय्यंगार व तुमचें एकमत झालें तर नर्मदेपर्यंत साऱ्या दक्षिण हिंदुस्थानचा तुम्हाला पाठिंबा आहे असें समजा. मद्रासेंतील कांहीं जहाल त्रागा करतील. पण श्रीनिवास अय्यंगार त्यांना पाहून घेतील. श्री. बाबुराव गोखले जर गंगाधररावांशी बोलण्याची खटपट करतील तर त्यांचा विरोध मावळून साऱ्या कर्नाटकाचा तुम्हाला पाठिंबा मिळेल.

वर्किंग कमिटीचा कौन्सिलसंबंधी ठराव तुम्हांला पसंत नसल्याने तुमची उपसूचना मजकडे पाठवावी. म्हणजे मी ती श्रीनिवास अय्यंगार यांच्याकडे पाठवीन. नंदिहल्लसमक्ष्ये म. गांधींची गांठ पडल्यावर तुमच्या सूचनेबद्दल त्यांना गांधी-जींशीं बोलतां येईल.

तुमचे पत्रोत्तर लवकर यावे. लो. टिळकांच्या मतांचा विजय व्हावा अशी माझी इच्छा आहे. यांत व्यक्तिविषयक बाब पुढें येऊं नये. तुमच्यावर व तुमच्या पक्षावर चढि येण्यासारखे व्यक्तिविषयक हल्ले प्रतिस्पर्ध्यांनीं केले. पण तुम्ही रोखठोक प्रत्युत्तर द्यावयाचें म्हटलें तर समेट लांबणीवर पडेल ! म्हणून निंदेमुळें आलेला कढ मनांत तसाच जिरवून मनःसंयमन केलेत तर या वर्षाच्या अखेरीला तरी तुमचा जय होईल असें वाटतें, आणि अधिकार-स्वीकाराच्या मोहाच्या वर आपण आहो असेहि वेळप्रसंगी दाखवून राजकार-णाची दिशा आत्मविण्यांत टिळकांच्या शिष्यांनींच पुढारीपण घेतलें आहे हें पाहून मला अधिक आनंद वाटेल. ( श्रीनिवास कौजलगी, विजापूर. )

प्रेसिडेंट विठ्ठलभाई पटेल यांना मी पाठविलेल्या पत्रांतील उतारा—

( पुणे, ता. ११ जून, १९२७ )—अध्यक्ष या नात्याने आपण बजावलेल्या कामगिरीबद्दल जी योग्य अशी सार्वत्रिक स्तुति होत आहे त्यांत मी भर घालावी असें नाहीं. पण दोन शब्द लिहितोच.

अलीकडे आपण स्वराज्यपक्षाचे सभासद होतां. पुढें अवचित अध्यक्ष-पदावर बसलां. यामुळें 'स्वराज्यपक्षानें आपणाला सलणारा कांटा दूर केला' अशी कित्येकांनीं टीका केली. पण त्यांना हें माहीत नाहीं कीं, आपल्या अंगीं जसा मित्रांच्या बाबतींत कांद्याचा बोंचकपणा आहे, तसाच नोकरशाहीच्या मांसाला भोंकें पाडील असा भाल्याचा भेदकपणाहि आहे. कोणी म्हणाले 'पटेलांचा स्वभाव इंग्रजांना आवडणार नाहीं.' मी तर म्हणालों कीं 'फार आवडेल. कारण पटेल यांच्या अंगीं इंग्रजांचेच गुण आहेत.'

याबद्दल अशी एक गोष्ट सांगतात की कांहीं दिवसांपूर्वी सरहद्दीच्या एका गांवांवर लुटारू दरवडेखोरांनीं हल्ला करून लूट जमविली. ती परत आणण्याकरितां सरकारनें जें सैन्य पाठविलें त्यांत एक इंग्लिश, एक स्कॉच, व एक आयरिश अशा तीन तुकड्या होत्या. दरवडेखोरांनीं एका बळकट किल्ल्याचा आश्रय केला होता. आयरिश फौज आघाडीला होती. आयरिश माणसांना चढाऊ वीरवृत्तीची मोठी हौस. म्हणून त्यांनींच प्रथम हल्ला केला. पण बिचारे सर्व त्यांत गारद झाले. स्कॉच लोकांची देशभक्तीपेक्षां वडेजाबी व बहुमान यांवर दृष्टि जास्त. त्यांची फौज मध्यें होती. आयरिश लोकानंतर त्यांनीं हल्लाकरून दरवडेखोरांना कैदी करून ताब्यांत घेतले. पण इंग्रज सैनिक फार भूर्त. त्यांची फौज पिछाडीला होती. दरवडेखोर कैद झालेले पहातांच त्यांनीं भराभर जाऊन मेलेल्या व जखमी झालेल्या शिपायांचे खिसे तपासले आणि लूट काबीज करून परत आणली !

आपल्या स्वराज्य पक्षाच्या सैन्यांतहि असेंच झालें नाहीं काय ! देशबंधु दास यांनींच प्रथम कौन्सिलप्रवेशाबद्दल हटातटानें भांडून व त्याला मान्यता मिळ-वून नोकरशाहीच्या अभेद्य तटाला भलमोठें खिंडार पाडल. नंतर पंडित मोतीलाल नेहरूंनीं असेंब्लीच्या चतुर वाग्युद्धांत सरकारी सभासदांना कुंठित–बंदिवान् केले. आणि, पटेलसाहेब, सरतेशेवटीं आपण मात्र अध्यक्षपदाच्या निमित्तानें सरकारच्या तिजोरीवर हात मारला ! दरसाल पन्नास हजार रुपये पगार ही सरकारकडून लूटच आपण मिळविली नाहीं काय ! तेव्हां ठकाला ठक भेटावा त्याप्रमाणें तुमच्या रूपानें इंग्रजांना आपणाला केवळ इंग्रजच भेटला असें वाटेल. यापेक्षां वेगळें वाटणार नाही !

आपण अध्यक्ष झाल्यामुळें स्वराज्य पक्षाला अंतरला. तसेंच आपणालाहि ही जागा घेऊं देण्यांत स्वराज्यपक्षालाहि स्वार्थत्याग करावा लागला आहे. विनोद उपहास व्यंजना इत्यादि अनेक वाग्युद्धांतील शस्त्रांनीं आपण परिपूर्ण असला तरी यापुढें ओठावर आलेले शब्द गिळून प्रतिपक्षांतील वाद अध्यक्षपदांवरून तटस्थपणानें आपणांस पहावे लागतील. पण तटस्थपणा स्वीकारून दोन्ही पक्षांना न्याय देणें यांतहि उच्च कर्तव्यबुद्धीचें समाधान आहे. वाक्चातुर्य हें रुप्यासारखें शुभ्र आहे. पण मौनाला तर सुवर्णाचीच उपमा देतात. शिवाय मौन हें 'सर्वार्थसाधक' असतें असेंहि म्हणतात !!

पार्लमेंट सभेचा स्पीकर व असेंब्लीचा अध्यक्ष यांत साम्य असलें तरी, तुमच्या बाबतींत वैधर्म्य असें कीं नेहमींची मुंबई सोडून निवडणुकीकरितां तुम्हांला यावेळी गुजराथ पहावी लागली ! पार्लमेंट बरखास्त झालें तरी तोच स्पीकर पुनः त्याच मतदारसंघातर्फे निवडून येतो. अध्यक्षपदावरून निघाल्यावर दरम्यान गोहत्ती-च्या काँग्रेससंबंधानें तुमचें मत तुम्ही मोकळेपणानें प्रदर्शित कराल अशी पुष्कळांची अपेक्षा होती. पण मौन स्वीकारण्यांत तुम्हीं गांधींच्यावर ताण केली ! पण पुनः अक्षाध्यपद मिळविण्याकरितां तुम्ही आंतून काय काय सूत्रें हालवित होता हें धूर्त त्रयस्थांना मात्र दिसल्याशिवाय राहिलें नाहीं. तें कसेंहि असो. अध्यक्षाच्या जागेला तुम्ही लायख आहा आणि ती जागा तुम्हांला शोभतेहि. तुमच्याच वक्रोक्तीच्या पद्धतीनें क्षणभर बोलावयाचें तर 'तुमचें स्वराज्य तुमच्या पदरांत पडलेंच आहे. आतां हिंदुस्थानचें स्वराज्य देशाला केव्हांहि सावकाश मिळो !'

( ता. ७ नोव्हेंबर, १९२७ )—कमिशन नेमण्याची तारीख ८ निश्चित झाली आहे. तरी सर्व पक्षाच्या मंडळींनीं तांतडीनें एक झाले पाहिजे. इतर पुढाऱ्यांनाहि तारा केल्या आहेत. तरी १५ तारखेस मुंबईस जी सभा बोलावीत आहो त्याला अवश्य यावे. ( बॅ. महमदअल्ली जिना, मुंबई )

( ता. ११ नोव्हेंबर, १९२७ )—कमिशनवर बहिष्कार घालावा, पण कायदे-मंडळांवर बहिष्कार घालूं नये असें मला वाटतें. तुमचें मत काय आहे ! ( लाला लजपतराय, लाहोर )

( ता. १३ नोव्हेंबर, १९२८ )—गंभीर परिस्थिति उद्भवल्यामुळें सर्व राजकीय पक्षांनीं एक होऊन कमिशनवर बहिष्कार घालावा असें वाटतें. तुमचा

सल्ला काय ? बहिष्कारापुरती सर्व पक्षांची लीग स्थापण्याचें आम्ही ठरविलें आहे. ( श्रीनिवास अय्यंगार, मद्रास )

(ता. ३० नोव्हेंबर, १९२७ )—सायमन कमिशन संबंधाचा पार्लमेंटचा अखेरचा निर्णय प्रसिद्ध झाला आहे. हिंदी लोकांना त्यांतून वगळलें यामुळे कमिशनची योजना अधिकच आक्षेपार्ह आहे. याचाच अर्थ हिंदुस्थानपुढें एक मोठा आणीबाणीचा प्रसंग आला आहे. यामुळे प्रत्येकानें आपापले धोरण वेगवेगळे न ठेवतां काँग्रेस, मुस्लीम लीग, हिंदु महासभा, लिबरल फेडरेशन यांनी यावेळी एकच धोरण ठेवून वागणें इष्ट आहे. व तसें वागलें तरच कांही तरी यश येईल असें मला वाटतें. ता. १२ ते १५ डिसेंबरच्या दरम्यान काँग्रेसचे पुढारी मुंबईस येऊं शकतील असें आश्वासन मला काँग्रेसच्या अध्यक्षाकडून मिळालें आहे. लिबरल फेडरेशनचे पुढारी येतील असे वाटते. तरी तुम्ही खालीन याल अशाविषयीं मला तार करा. तुम्हाला येणें कितीहि गैरसोईचे किंवा त्रासाचे झालें तरी हरकत नाहीं. पण आल्याशिवाय राहूं नका. कारण सर्वांच्या एकदिलाने धोरण ठरविण्याची ही वेळ आहे. आणि आतांच ही गोष्ट न केली तर नाताळांत वेगवेगळ्या परिषदा भरतील व तेथें निरनिराळे सूर निघू लागतील. तरी पुन्हा सांगतों कीं आम्ही भरवितो त्या परिषदेला पूर्णपणें प्रातिनिधिक स्वरूप यावयास पाहिजे म्हणून तुम्ही आलेच पाहिजे. ( बॅ. महमदअल्ली जिना, मुंबई )

( ता. १० जानेवारी ,१९२८ )—बनारस येथे वर्किंग कमिटीची सभा ता. १५ रोजीं बोलावली असून, सायमन कमिशन व इतर महत्त्वाच्या विषयांवर तुमचा सल्ला घेण्याची जरूरी आहे. तरी कितीहि थोडा वेळ आलांत तरी इकडे जरूर या. तारीख व वेळ मालवीय यांना तारेनें कळवा. ( डॉ. अन्सारी, दिल्ली )

( ता. २६ जून १९२८ )—सर्व पक्षीय परिषदेनें जी कमिटी नेमली होती तिच्या बैठका २२ तारखेपर्यंत भरल्या. राज्यघटनेच्या मसुद्यावर सर्वांचें पूर्ण एकमत झालें तरच सर्व पक्षीय परिषदेंत तो मान्य होण्याची आशा. ता. ६ व ७ जुलै रोजीं अखेरची सभा आहे. तरी हें पत्र केवळ औपचारिक असे न मानतां गैरसोय सोसूनहि याच. या बिकट परिस्थितींतून मार्ग काढण्याला तुमच्या सल्ल्याच मला अतिशय उपयोग होईल ( मोतीलाल नेहरू, अलाहाबाद )

( ता. २५ नोव्हेंबर, १९२८ )—कमिशनवर सर्व गोरे आहेत ही हिंदी लोकांना एक होण्याला चांगली संधि आहे. सध्यां इकडे दक्षिणेंत मी व्याख्यानांचा दौरा काढला आहे. सभांत आम्ही दोन ठराव करितों. ( १ ) बहिष्कार 'प्रतियोगी' असावा ( २ ) आणि कस स्वराज्य पाहिजे हें हल्लीची राज्यघटना बदलून दुरुस्त्या सुचवून काँग्रेसनें ती आपली मागणी म्हणून मांडावी. पुण्यास मी आल्यावर तुम्हाला भेटून तुमच्याशीं बोलण्याची इच्छा आहे. (मिसेस ॲनि बेझंट, त्रिचनापल्ली )

( ता. ३ ऑगस्ट, १९२९ )—येत्या ऑगस्टमध्यें जी गांधी-जिना परिषद भरणार त्यासंबंधानें माझ्या प्रमाणेंच तुम्हांलाहि डॉ. मुंजे यांचें पत्र आलें असेल. तडजोडीच्या नांवाखालीं मागें ज्याप्रमाणें मुसलमानांनीं अधिक हक्क मिळविण्याचा कावेबाज प्रयत्न केला त्याप्रमाणेंच जिना व सरोजिनी नायडू यांना पुढें करून हा दुसरा प्रयत्न चालू आहे. पण या तडजोडींतून हिंदुमहासभेला मात्र वगळलेले आहे! थोडें स्वस्थ बसून काय होतें ते पहावें असें माझें मत मी डॉ. मुंजे यांना कळविलें आहे; कारण हिंदूंचे हक्क म. गांधी असे परस्पर अगदींच बुडविणार नाहींत अशी माझी कल्पना आहे. उलट मुंजे यांना असें वाटते कीं, नेहरू रिपोर्टांत बदल करावा लागेल अशी कोणतीच तडजोड आतां हिंदूंनीं पंत्करूं नये, व असें त्यांनीं जाहीर पत्रक काढून प्रसिद्धच करावें. डाका येथें हिं. म. परिषद तुमच्याच अध्यक्षतेखालीं भरत आहे. मला वाटते तुमच्या अध्यक्षीय भाषणांत हिंदुसभेचें या तडजोडीबद्दल काय मत आहे तें परिणामकारक रीतीनें मुद्देसूद मांडण्याला तुम्हाला फार चांगली संधि आहे. राजकारणांतील न्यायबुद्धीबद्दल हिंदु व मुसलमान दोघांनाहि तुमच्याबद्दल फार आदर असल्यामुळें हें काम तुम्हीच फार चांगल्यारीतीनें करूं शकाल. डॉ. मुंजे यांच्याप्रमाणेंच मलाहि वाटतें कीं, अध्यक्षीय भाषणाचा कांहीं भाग मुद्दाम या विषयाला देऊन ठराव होईल तोहि यथायोग्य ठरावा याची तुम्ही काळजी घ्यावी. आज मुसलमानांना नवे अधिक हक्क देण्याचें कारण नाहीं. आणि ज्या वेळीं हिंदु मुसलमान व सरकार हे राज्यघटना ठरविण्याला एकत्र बसतील त्या वेळीं मुसलमानांच्या मागण्यांचा विचार करतां येईल. नेहरू रिपोर्टाच्या आधारावर मुसलमानांशीं बोलतां येईल; पण सरकार काय करणार हें अनिश्चित असल्यामुळें त्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. उलट आम्ही खुशीनें त्या मागण्यांना मान्यता

दिली अशी नसती कबुली आमच्यावरच बंधनकारक व्हावयाची ! सदर बाबतींत परिषदेंत जो ठराव होईल तो दरेक शब्द पारखून तुम्ही कसोशीनें कराल याबद्दल मला खात्री आहे. डॉ. मुंजे यांना तुमचें मत तुम्ही ताबडतोब कळवा. ( बॅ. एम्. आर. जयकर, मुंबई )

असो; अशा रीतीनें हें 'असहकारिता' प्रकरण संपलें. त्याची चौफेर माहिती या प्रकरणांत मधून मधून दिलेल्या पत्रव्यवहारावरून कळून येईलच. तथापि वाचकांच्या लक्षांत ठळकपणें येण्या-राहण्याकरितां अनुसंधानात्मक असे दोन कागद या खालीं स्वतंत्रपणें देत आहे. त्यांतील नंबर १ हें लोकमान्य टिळकांनीं म. गांधींना लिहिलेलें, आणि गांधींच्या 'यंग इंडिया' वर्तमानपत्राच्या तारीख २८ जानेवारी १९२० च्या अंकांत छापलेलें, एक पत्र आहे. तें दहा-पांच ओळींचेंच असलें तरी त्यावरून लो. टिळक व म. गांधी यांच्या तत्त्वज्ञानांतील भेद आणि 'प्रतिसहकारिते'च्या तत्त्वाचा अर्थ अगदीं स्पष्ट होण्याजोगा आहे.

हें पत्र असेंः— "राजकारण हा लौकिक अभ्युदय इच्छिणाऱ्या लोकांचा, व जगाच्या रीतीनें पदरांत पाडून घेण्याचा, खेळ आहे. तो साधूंच्या लागी नाही. बुद्धानें "अक्कोधेन जयेत् क्रोधं" असा जो उपदेश केला तो केवळ साधू लोकांकरितां आहे. राजकारणी पुरुषांकरितां नाहीं. म्हणून तो मला मान्य नाहीं. त्याऐवजीं मला भगवद्गीतेचा उपदेशच मान्य वाटतो. तो उपदेश "ये यथा मां प्रपद्यंते तान् तथैव भजाम्यहं" या वाक्यांत आढळतो. या थोड्याशा विवेचनावरून तुमच्या माझ्या तत्त्वज्ञानांतील भेद आणि प्रतियोगीसहकारिता या शब्दाचा अर्थ कळून येईल. तुमचा व माझा हे दोनहि मार्ग प्रामाणिकपणाचे व सात्विक बुद्धीचे असूं शकतात. पण लौकिक जगाच्या दृष्टीनें पाहिलें असतां माझाच मार्ग तुमच्यापेक्षा अधिक युक्त व कार्यसाधक आहे. याहून अधिक खुलासा पाहिजे असल्यास तो माझ्या 'गीतारहस्य' या ग्रंथांत मिळेल." बा. गं. टिळक

नं. २ चा कागद मी लिहिलेला आहे. तो ता. ११ जानेवारी १९२७ च्या केसरींत छापलेला आहे. त्याचा प्रसंग असा.

१९२७ सालीं एप्रिलांत काँग्रेस व प्रतिसहकारपक्ष यांच्यामध्यें अजूनहि कोणत्या अटींवर सलोखा होऊं शकेल याविषयीं मी खालील जाहीरपत्रक काढलें. पूर्वी सांगितलेली गौहत्तीची राष्ट्रीय सभा होऊन गेली होती. तींत सभेनें कौन्सिल-

प्रवेशाच्या प्रश्नाचा विचार केला होता. त्याला उद्देशून हें माझें पत्रक होतें. येथें इतकेंच सांगावयाचें कीं या कामीं श्रीनिवास अय्यंगार हे पं. नेहरूपेक्षां माझ्याशी अधिक सहमत होते. माझें पत्रक असें होतें:—

## 'राजकीय पक्षांतील ऐक्य'

दिल्ली येथें गेल्या दोन महिन्यांत राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगार व प्र. स. पक्षाचे पुढारी श्री. केळकर यांच्या अनेक खाजगी भेटी झाल्या. असेंब्लीच्या कामांत कॉंग्रेस पक्ष व प्र स. पक्ष त्यांच्या धोरणांत किंवा कार्यक्रमांत आतां फारसा फरक नाहीं. फक्त फायनॅन्स बिलापुरताच असला तर असणार. आणि तोहि यंदा उरला नव्हता. येऊन जाऊन प्रान्तिक कायदेकौन्सिलांत प्रधानमंडळ बनविण्यापुरताच काय तो फरक उरला आहे. उभयतांच्या मतें तोहि काढून टाकण्यासारख्या कांहीं थोड्या बहुत सुधारणा राष्ट्रीय सभेच्या ठरावांत करतां येणें शक्य आहे; व साधल्यास त्या सुधारणा ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या येत्या सभेंत घडवून आणाव्या असें उभयतांनाहि सारखेंच वाटत होतें. म्हणून श्रीनिवास अय्यंगार यांच्या विनंतीवरून श्री. केळकर यांनी त्यांना आपल्या सूचना लेखी दिल्या, व त्या श्रीनिवास अय्यंगार यांनीं पं. नेहरू यांना दाखविल्या आहेत. त्याच सूचना पुणें येथील प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेपुढें परवां ठेवण्यांत येऊन सभेकडून त्या मंजूर करण्यांत आल्या. ह्या सूचनांचा सारांश खालीं दिला आहे.

### एकीच्या विधायक सूचना

१ गौहत्ती येथील राष्ट्रीय सभेनें कायदे कौन्सिलाविषयीं जो ठराव केला त्यांत सहा कलमें आहेत; त्या पैकीं 'अ' व 'ब' हीं कलमें गाळण्यांत यावीं. बाकीचीं सर्व राहावीं. त्यांना विरोध करील असा कोणताच राजकीय पक्ष नाहीं म्हटलें तरी चालेल.

२ कोणत्याहि एखाद्या प्रान्तांत प्रधानमंडळ बनवावें अगर न बनवावें याविषयीं राष्ट्रीय सभेनें कोणताहि बंधनकारक नियम करूं नये. ज्या त्या प्रान्तांतील कायदे-कौन्सिलामध्यें निवडून आलेल्या सभासदांच्या इच्छेवरच ती गोष्ट सोपवावी.

३ नुकत्याच झालेल्या निवडणुकीवरून हें सिद्ध झालें आहे कीं, सामान्यतः मतदारसंघांचें मत कौन्सिलांत प्रधानमंडळ बनविण्याला अनुकूल आहे, प्रतिकूल नाही. प्रधानमंडळें बनविण्याच्या आधी किंवा बनविल्यानंतर, कित्येक प्रान्तांतून हीं मंडळें बनवूं नयेत किंवा बनविलेली मोडावीं अशा अर्थाचे प्रत्यक्ष ठरावहि सुचविण्यांत आले होते. परंतु त्यांपैकीं एकहि मान्य झाला नाही. आणि एकाहि प्रान्तांत प्रधानमंडळ बनल्याशिवाय आतां राहिलेल नाही.

४ कौन्सिलांचा उपयोग कसा करावयाचा हें मुख्यतः मतदारसंघावरच सोपविणें ही गोष्ट सयुक्तिक होय. कारण राष्ट्रीय सभेनें १९१९ सालीं पार्लमेंटरी कमिटीपुढें आपलें म्हणणें मांडून मतदारसंघ सरकाराकडून निर्माण करविले. अर्थात् कांग्रेसनें ह्या मतदारसंघांना मतस्वातंत्र्य न ठेवतां आपली हुकमत त्यांच्यावर लादावी, आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध कायदेकौन्सिलांत काम करवावें, ही गोष्ट योग्य नाहीं. मतदारसंघांनीं आपल्या पसंतीप्रमाणें प्रतिनिधी निवडून द्यावेत, आणि त्यांच्या हातून मतदारसंघाच्या इच्छेप्रमाणेच कौन्सिलांत काम करवून घेतलें जावें, हीच राजकीय सुधारणांची मूळ उपपत्ति आहे.

५ बहुधा असा एकहि प्रान्त नाहीं कीं, ज्यांतील कायदेकौन्सिलांत कांग्रेसच्या नांवावर निवडून आलेल्या सभासदांचें 'निर्विवाद' बहुमत आहे किंवा होऊं शकेल. बहुमत असेल तेथें तें निरनिराळ्या मतांच्या एका किंवा अनेक सभासदांच्या समूहानेंच बनलेलें आहे. आणि या बहुमतवाल्या अनेक वर्गांनींच मिळून प्रधानमंडळ बनविलेलें आहे. प्रधानमंडळ बनूं देऊंच नये हें राष्ट्रीय सभेचें मत कोणत्याहि कायदे कौन्सिलांत यशस्वी झालेलें नाहीं.

६ कसेंहि पाहूं गेलें तरी, प्रधानमंडळ बनविण्याच्या बाबतींत कांग्रेस पक्षानें किंवा कोणीहि पुरुषातीला अडथळे करूं नयेत. ताज्या अनुभवावरून असें दिसतें कीं, कौन्सिलांतील सभासदांच्या निरनिराळ्या वर्गांचें संख्याबल किती आहे हें पाहून, म्हणजे त्यांतल्या त्यांत मोठ्या वर्गाच्या पुढाऱ्यांनाच बोलावून घेऊन, प्रधानमंडळ बनविण्याच्या बाबतींत गव्हर्नरांकडून विनंति करण्यांत येते. निरनिराळ्या गव्हर्नरांनीं केलेला हा उपक्रम नवीन सुधारणांच्या मूळ तत्त्वाला धरूनच आहे. आणि राष्ट्रीय सभेच्या पक्षानें आम्ही प्रधानमंडळ बनवीत नाहीं असें म्हटलें तरी तें बनल्याशिवाय रहातहि नाहीं. इतर वर्ग तें मंडळ बनवितातच.

याकरितां यापुढें अशी तजवीज व्हावी कीं निवडणुकीचा निकाल लागून कौन्सिलें सुरूं होण्याची वेळ आली म्हणजे, राष्ट्रीय सभेचा म्हणून एक पक्ष बनविण्याची खटपट प्रत्येक प्रान्तांतील पुढाऱ्यांनी करावी.

७ या कॉंग्रेस पक्षांत राष्ट्रीय सभेच्या नांवावर निवडून आलेले सभासद तर असावेच; पण इतरहि सभासद त्या पक्षांत सामील होण्यास तयार असतील तर त्यांनाहि त्यांत घेण्यांत यावें. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें, गौहत्तीच्या ठरावांतील पहिलीं दोन सोडून उरलेलीं जीं इतर चार कलमें आहेत तीं मान्य करून, कॉंग्रेस पक्षांत समाविष्ट होण्यास तयार असणारे पुष्कळ सभासद मिळतील असें वाटतें. अर्थात् अशा रीतीनें राष्ट्रीय हिताचीच दृष्टि बाळगणारा, केवळ जातवार दृष्टि न ठेवणारा, सरकारला जरूर तेथें विरोध करणारा, आणि बिकट स्थितींत होईल तितकें लोकोपयोगी काम कौन्सिलांकडून करविणारा, असा एक मोठा वर्ग कायदे कौन्सिलांत निर्माण होईल. आणि प्रधानमंडळ बनवावयाचे तर गव्हर्नरांनीं प्रथम अशाच वर्गाच्या पुढाऱ्यांना बोलावून म्हणावें लागेल कीं, 'प्रधानमंडळ बनवीत आहों, तुम्हीं आपलीं माणसें कोणतीं ती द्या.'

८ याचा उपयोग असा होईल कीं, आज कोठल्यातरी पक्षाला बोलावून त्याजकडून प्रधानमंडळ बनविण्यांत गव्हर्नर मदत घेतात तसें यापुढें न होतां, अशा पक्षालाच बोलाविलें जाईल कीं, ज्यानें नेमून दिलेले लोक राष्ट्रहितबुद्धि बाळगणारे आणि राष्ट्रीय सभेचा हा ठराव मान्य करणारे असेच असतील. प्रधानमंडळांतील जागांकरितां जे गृहस्थ या पक्षाने निवडून किंवा नेमून द्यावयाचे त्यांजकडून वाटेल तर कांही करार करवून घेतां येतील, आणि ते करार पाळण्याचें बंधन त्यांजवर राहील.

९ अशा रीतीनें प्रधानमंडळ बनलें म्हणजे कौन्सिलाच्या कामास सुरुवात होईल. पण हे प्रधान आपल्या पक्षाला दिलेलीं वचनें पाळतात किंवा नाहीं हें कळून येण्याला फारसा उशीर लागणार नाहीं. प्रधान होणें म्हणजे सरकारचें धोरण थोडेबहुत स्वीकारणें ही गोष्ट उघड आहे. ती नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. पण सामान्यतः प्रधानांचा कल लोकपक्षाकडे झुकतो, त्यांची राष्ट्रीय दृष्टि अगदींच ढळलेली नाहीं, कौन्सिलाच्या इच्छेप्रमाणें होतां होईल तों वागण्याची त्यांची तयारी आहे, असें दिसून आल्यास कॉंग्रेस पक्षानें त्यांना

आपलें काम रीतसर करूं द्यावें. आणि त्यांनीं आणलेलीं बिलें किंवा ठराव यांची अखेरची व्यवस्था त्यांतील गुणावगुणाकडे दृष्टि ठेवून योग्य तशी करावी. याचा अर्थ हाच कीं, प्रधानांनीं आणलेलीं बिलें किंवा ठराव केव्हां पास होतील, केव्हां नापास होतील, किंवा केव्हां मूळच्या सूचनेंत दुरुस्त्या होतील. असें झाल्यास प्रधानांना कांहीं नांवें ठेवतां येणार नाहींत.

१० पण समजा कीं, याच्या उलट प्रकार घडला आणि एखाद्या प्रधानानें राष्ट्रीय हिताची दृष्टि ठेवली नाहीं, कौन्सिलच्या इच्छेला अयोग्य प्रकारचा विरोध केला, किंवा काँग्रेस पक्षाला दिलेलें वचन पाळलें नाहीं, तर 'तुम्ही राजीनामे द्या' असें खासगी रीतीनें ह्या पक्षाला त्याला म्हणतां येईल. "करार तरी पुरा करा किंवा जागांचे राजीनामे द्या" असें काँग्रेस पक्षानें प्रधानांना म्हणणें सरळ आणि रीतीचेंच आहे. आणि हें झाल्यावर एखाद्या प्रधानानें आपला करार पुरा केला नाहीं किंवा राजीनामाहि दिला नाहीं तर, त्याच्याविरुद्ध स्पष्ट निंदात्मक असा ठराव काँग्रेस पक्षानें मांडून शक्य तर तो मंजूर करून घ्यावा. आणि ह्या निंदेलाहि त्याने दाद दिली नाहीं तर तो जातो कोठ? पुढच्या बजेटाच्या वेळीं त्याचा पगार इतका कमी करावा कीं तो प्रधान जागेवर राहूंच शकणार नाहीं.

११ काँग्रेसपक्षानें नेमून दिले म्हणून सर्वच प्रधान सर्वस्वी सोळा आणे लोकपक्षाचेंच काम करतील असें नाहीं. कारण प्रत्यक्ष काम करतांना अनेक प्रकारच्या अडचणी असतात त्या काम करणारालाच कळतात. तथापि केवळ जातवार मतदारसंघाचें किंवा केवळ सरकारचें पाठबळ ज्या प्रधानाला आहे, अथवा जो प्रधान कायदे कौन्सिलांतील गोंधळाच्या पायावर आपली इमारत बांधून कारभार करूं म्हणेल, त्या प्रधानापेक्षां वर सांगितल्याप्रमाणें काँग्रेस पक्षानें नेमून दिलेला प्रधानच लोकहिताची दृष्टि अधिक ठेवील यांत शंका नाहीं. दगडापेक्षां वीट मऊ हा नियम कौन्सिलांतहि अनुसरल्याशिवाय चालणार नाहीं.

१२ कौन्सिलांतील पक्षांच्या बलाबलावर गव्हर्नर लोक प्रधानमंडळाकरितां उमेदवार स्वीकारतात ही गोष्ट आतां निश्चित झाली असून, तिचा फायदा राष्ट्रीय पक्षानें करून घेण्याचें मनांत आणल्यास त्याला घेतां येईल. आणि मतदारसंघाच्या इच्छेप्रमाणें कायदे कौन्सिलांत काम करवून घेण्यास सुरुवात होईल. उलट अशा रीतीनें फायदा न घेतला तर प्रधानमंडळ बनल्याशिवाय तर राहावयाचेंच नाहीं,

आणि जे प्रधान नेमिले जातील ते लोकमताची पर्वा न बाळगणारे असेच असतील. अर्थात् अशा प्रधानमंडळापासून जनतेचें हित होणार नाहीं. अगदीं सोळा आणे लोकमताप्रमाणें चालणारे प्रधान न मिळाले तरी निदान १०–१२ आणे तसे चालणारे प्रधान स्वीकारावेत आणि त्यांजकडून काम करवून घ्यावें, हें लोकव्यवहाराला धरूनच आहे.

१३ "लोकमताला न जुमानणारे वाईट सभासद कौन्सिलांत येऊन बसतील आणि सरकारला मदत करतील, याकरितां तसले लोक निवडून येऊं नयेत—त्यांच्याहून चांगले लोक निवडून यावेत—म्हणून कॉंग्रेसनें कौन्सिलप्रवेश मान्य केला आहे." तेंच तत्त्व प्रधानमंडळालाहि तंतोतंत लागू पडतें. प्रधानमंडळ जर बनणारच तर मग वाइटापेक्षां चांगलें प्रधानमंडळ बनवितां आलें तर तें इष्टच नव्हे काय ! अर्थात् ज्या कारणाकरितां कौन्सिलांत शिरण्याचा कार्यक्रम कॉंग्रेसनें मंजूर केला त्याचकरितां व तींच दृष्टि शक्य तितकी ठेवून, आपल्या प्रतिनिधीकडून प्रधानमंडळ बनविण्याचा कार्यक्रम घडवून आणणें योग्य होईल, म्हणून मी ही विधायक सूचना करीत आहे. कौन्सिल बहिष्कार घातल्यानें कौन्सिलें भरण्याचें थांबलें नाहीं. त्याप्रमाचें प्रधानमंडळें बनवूं नये असें म्हटल्यानें तीं बनण्याचींहि रहात नाहींत. आणि तीं जर बनणारच तर तीं त्यांतल्या त्यांत चांगल्या लोकांचीं बनवावीं हें उघडच आहे.

१४ राष्ट्रीय सभेनें आपल्या कामाची वांटणी करणें आतां जरूर झाले आहे. ही वांटणी अशी करावयाची कीं, जें काम कौन्सिलांतून करतां येतें तें कौन्सिलांवर सोंपवावें; त्यांत राष्ट्रीय सभेनें ढवळाढवळ करूं नये. पण हल्लींच्या कायद्यामुळे कौन्सिलांतून करतां येत नाहीं असें बरेंच राष्ट्रीय काम असतें. किंबहुना नव्या कमिशनामुळें कायद्याची सुधारणा झाली तरी, कौन्सिलानें करतां येत नाहीं असें बरेंच काम शिल्लक राहील. उदाहरणार्थ, देशी संस्थानांचा अंतर्गत कारभार; इंग्रज सरकार व देशी संस्थानें ह्याचे हितसंबंध; हिंदुस्थानसरकारचे परराष्ट्रीय संबंध; सैन्य आरमार वैमानिक दळ यांचे कारभार; वरिष्ठ सिव्हिल सर्व्हिसच्या नोकऱ्या; स्टेटसेक्रेटरी व त्यांचे अधिकार; हिंदुस्थानाचें आर्थिक स्वातंत्र्य; आशिया खंडांतील राष्ट्रांचा संघ इ. इ. राष्ट्रीय सभेला हीं कामें करण्याला काय थोडीं आहेत किंवा लहान आहेत ! शिवाय कौन्सिलांतील कामासंबंधानें मतभेद फार होऊं

शकतो. कारण त काम तपशिलाचें आहे. पण वर दर्शविलेल्या विषयांसंबधान हिंदी लोकांत फारसा मतभेद होणार नाहीं.

१५ राजकारणांतील एक विशिष्ट पक्ष ह्या नात्यानें तर काँग्रेसनें आपलें काम करूंच नये. आणि स्वराज्य संपादण्याला जणुं काय एकच कोठला तरी मार्ग आहे अशा समुजुतीनेंहि अशा एखाद्या धोरणाला तिनें स्वतःला चिकटवून घेऊं नये. देश एकच म्हटला तरी त्यांत हितसंबंध अनेक प्रकारचे असतात. आणि राष्ट्रीय सभा हीं कोणत्याहि एका हितसंबंधाचें समर्थन करतें असा भास लोकांना झाल्यास तें बरें नाहीं. युरोपांत जशी लीग ऑफ नेशन्स किंवा राष्ट्रसंघ निर्माण झालेला आहे तशीच प्रान्तांसंबंधानें,आणि सर्व हितसंबंधाविषयींचा विचार करणारी,राष्ट्रीय सभा हीं समजली जावी. म्हणजे निरनिराळ्या किंवा परस्पर विरोधी हितसंबंधांमधील तंटा किंवा लंढा मिटवून त्यांचें तोंड मिळतें करणें एवढेंच अंतर्गत कार्य राष्ट्रीय सभेनें करावें. या कामाकरितां राष्ट्रीय सभेनें आपल्यातर्फे 'आरबिट्रेशन बोर्डस' किंवा न्याय-मंडळें नेमावीं. हल्लींच्या पक्षभेदांतून राष्ट्रीय सभेनें डोकें वर काढल्याशिवाय राष्ट्रीय सभेविषयीं कोणास बहुमान किंवा प्रीति वाटणार नाहीं !

१६ खादीच्या पोषाखासंबंधानें राष्ट्रीय सभेच्या नियमांत घातलेली अट काढून टाकली तरच राष्ट्रीय सभेला कांहींसें प्रातिनिधिक स्वरूप येईल. तसेंच स्थानिक काँग्रेसकमिट्यांनीं काँग्रेसचें प्रतिनिधि आणि ऑल-इंडिया काँग्रेस-कमिटीचे सभासद हल्लींप्रमाणें कांहीं निवडून द्यावेच; पण प्रत्येक प्रांतांतील कायदे-कौन्सिल, असेंब्ली, व कौन्सिल ऑफ स्टेट यांच्या शेकनियुक्त सभासदांना राष्ट्रीय सभेमध्यें अवश्य स्थान मिळालें पाहिजे. मतदारसंघांतून निवडून येणें ही देखील राष्ट्रीय सभेचा प्रतिनिधि किंवा ऑल-इंडिया काँग्रेस कमिटीचा सभासद होण्याला स्वयंभू पात्रता समजावी. हे सगळेच सभासद घेतले तर त्यांची संख्या फार होईल असे वाटल्यास कोणते किती सभासद कसे घ्यावेत याची योजना ठरवितां येईल.

* * *

या माझ्या पत्रकाची शिफारस अशी करतां येईल कीं या पत्रकांतील सूचना सातारा येथील कट्टर नाफेरवाल्यांनाहि मान्य झाल्या होत्या, आणि त्यांनीं मला तसें लिहून कळविलें होतें.

नाफेरवाले व फेरवाले यांच्यांतील मतभेद हा इतका सूक्ष्म होता. तथापि त्यांच्यांतील समेटाचा प्रश्न या दृष्टीनें मागें पडून दुसऱ्या एका वेगळ्या दृष्टीनें पुढें आला व तो थोडासा सुटला. तो असा कीं, १९२८ अखेर 'नेहरू रिपोर्ट' तयार झाल्यावर तो फेर-नाफेरवाले या सर्वांना पसंत पडून कांग्रेसनेंहि त्याला मान्यता दिल्यावर, महाराष्ट्रांतील या दोनहि पक्षांनीं मिळून महाराष्ट्रांत दौरा काढला होता. परंतु १९२९ च्या लाहोर कॉंग्रेसमध्यें तो रिपोर्ट उलथून पडल्यावर पुन्हा मतभेद डोकावूं लागला !

---

## ( २ ) कायदेकौन्सिलांतील कामकाज

माझें प्रथमपासूनच असें निश्चित मत होतें कीं, जोंपर्यंत ब्रिटिशसरकारला न जुमानणारे असे प्रतिस्पर्धी सरकार हिंदुस्थानचे लोक निर्माण करूं शकत नाहींत, तोंपर्यंत वरिष्ठ किंवा कनिष्ठ कायदेकौन्सिलावर बहिष्कार घालणें सयुक्तिक नाहीं. १९२० च्या पूर्वी जहाल मवाळ असा भेद राजकीय पक्षांत असला तरी त्यापैकीं कोणीहि कायदे कौन्सिलावर बहिष्कार घालण्याची कल्पना मनांत आणली नव्हती. सरकारी नोकरी ही लोकसेवेच्या तुलनेनें हीन अशी भावना असतांहि, सरकारी नोकरींतल्या वरिष्ठ मानाच्या अधिकाराच्या व मिळकतीच्या जागा आपणा हिंदी लोकांना हक्कानें मिळाव्या अशी राष्ट्रीय मागणी करण्यांत जें स्वारस्य असतें, त्याच प्रकारचें स्वारस्य कायदे कौन्सिलांतील मिळतील त्या जागा लोकपक्षाच्या हातीं असाव्या या म्हणण्यांत आहे हें कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील. कायदे कौन्सिलाचा इतिहास पहातां, लोकपक्षाला निर्णायक स्वरूपाचा अधिकार १९३५ सालच्या राज्यघटना कायद्यानेंच कांहीं थोडासा मिळाला आहे हें खरें. तथापि प्रथम मनासारखें मिळत नसलें तरी मिळेल तें, त्याला नांवें ठेवीत ठेवीत, स्वीकारावयाचें व त्याचा शक्य तो उपयोग करून घ्यावयाचा हें धोरण कोणत्याहि पक्षानें पूर्वीपासून ठेवलें होतें. इतर देशांचीं उदाहरणेंहि हेंच सांगत आलीं आहेत. १९२० मध्यें असहकारितेची घोषणा करण्यांत आली तरी, आणि मधून मधून कायदेभंगाची चळवळ करण्यांत आली तरी, कॉंग्रेसच्या हातून प्रतिस्पर्धी सरकार निर्माण करणें झालें नाहीं. कायदेभंगाच्या विशिष्ट बाबीखेरीज करून इतर सर्व प्रकारचे कायदे असहकारवादीहि मान्य करीत. सरकारचे हुकूम मान्य करीत त्याबरोबरच सरकार-

कडून होणारा लोकहिताचा लाभहि पदरांत पाडून घेण्यास त्यांची तयारी असे. फार काय, कौन्सिलावर बहिष्कार घालणाऱ्या काँग्रेसनें, याच कौन्सिलांत घडणाऱ्या कायद्यानें व नियमांनीं बनणारी व चालणारी जी स्थानिक-स्वराज्य संस्था तिजवर केव्हांहि बहिष्कार घातला नव्हता हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. या विपरीत धोरणांत शहाणपणा कसला ! नदीच्या उगमाजवळचें पाणी बहिष्कृत मानून खालीं वहात आलेलें पाणी शुद्ध मानण्यासारखेंच विपरीत असें हें धोरण नव्हतें काय ? किंवा दुसरी उपमा द्यावयाची तर लहान परकऱ्या मुलींची रीत अशी असते कीं, त्यांना एखाद्या गोष्टीची लाज वाटली म्हणजे त्या नेसूंचा परकर वर उचलून घेऊन त्यानें आपलें तोंड झाकून घेतात व लाज छपविण्याचा प्रयत्न यशस्वी झाला असें मानतात.

असो. कायदे कौन्सिलासंबंधानें माझें हें मत प्रथमपासून असल्यामुळें, माझ्या राजकीय उमेदवारीच्या प्रगतींत संधि येईल तेव्हां मी कौन्सिल निवडणुकीला उभा रहाणार हें ठरल्यासारखेंच होतें. १९०७ पर्यंत ही संधि मला येणें शक्य नव्हतें. पण १९०९ सालच्या निवडणुकी उपस्थित झाल्या तेव्हां मी मध्यभागांतील लोकल-बोर्डातर्फे होणाऱ्या निवडणुकीला उभा राहिलों. माझे प्रतिपक्षी पुण्याचे कादंबरीकार हरि नारायण आपटे आणि धुळ्याचे सि. धों. गरूड वकील हे होते. माझ्या उमेदवारीला चांगलेंच पाठबळ होतें. आणि अकल्पित रीत्या विजय झाला नसता तर मी बहुधा निवडून आलों असतों असें म्हणतात. परंतु आदल्या वर्षी मला हायकोर्टाच्या बेअदबीच्या गुन्ह्याकरितां तुरुंगवासाची शिक्षा झाली होती हें कारण लावून लॉर्ड सिडनहॅम, गव्हर्नर, यांनीं माझी उमेदवारी आपल्या खास अधिकारांत रद्द केली. माझा 'नॉमिनेशन पेपर' रीतसर स्वीकारला जाऊन निवडणुकीस, म्हणजे प्रत्यक्ष मतपत्रिका कमिशनरकडे दाखल होण्यास, आरंभ झाला होता. परंतु वरील प्रकार घडल्यामुळें उरल्या दोन नांवांच्याच मतपत्रिका नोंदल्या जाऊन रा. गरूड हे निवडून आले. अशा रीतीनें कौन्सिल-प्रवेशाची माझी पहिली संधि फुकट गेली.

१९२३ च्या अखेरीस कनिष्ठ वरिष्ठ विधिमंडळाच्या नव्या निवडणुकी व्हावयाच्या असें ठरलें. त्या आधीं काँग्रेसची कायदेभंगाची चळवळ थांबविण्यांत आली होती. आणि कायदेभंग चौकशी कमिटीच्या निम्म्या सभासदांनीं काँग्रेसनें कौन्सिल प्रवेश करावा अशी शिफारस केली होती. 'स्वराज्य पक्षा'नें तर काँग्रेसला न जुमानतांच विधिमंडळांत प्रवेश करावयाचें धोरण निश्चित केलें होतें. त्याप्रमाणें

दिल्ली येथील विधिमंडळाच्या निवडणुकीकरितां मध्यभागाच्या सात जिल्ह्यांतर्फे मी आपली उमेदवारी जाहीर केली. काँग्रेसने स्वतः या निवडणुकींत भाग न घेण्याचें ठरविलें असल्यानें तिच्यातर्फे कोणीच उमेदवार उभा राहिला नाहीं. तथापि महाराष्ट्रांतील लिबरल पक्ष आणि ब्राह्मणेतर पक्ष यांनीं आपले उमेदवार उभे केले. काँग्रेसनें निवडणुकींत भाग घ्यावयाचें ठरविलें असतें तरी मला वाटतें, तिला मला तुल्यबळ असा प्रतिस्पर्धी उभा करणें त्यावेळीं शक्य झालें नसतें. एका अर्थानें स्वराज्यपक्ष हा काँग्रेसमधील अंतर्गत पक्ष असाच मानला जात होता. पुष्कळ काँग्रेसच्याहि पुढाऱ्यांना विधिमंडळ प्रवेश मनांतून मान्य होता. पण म. गांधीजींचे अनुयायी या नात्यानें त्यांच्या गुरुच्या मताविरुद्ध जाण्याचें धाडस त्यांना करवत नव्हतें यामुळें स्वराज्यपक्षाविषयीं सहानुभूति-मिश्र असा तटस्थपणा त्यांनीं स्वीकारला. ब्राह्मणेतर पक्ष अजून काँग्रेसशीं फटकून वागत असे, इतकेंच नव्हे तिजवर उघड उघड टीका करीत असे. यामुळें त्या पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याला काँग्रेस पुढाऱ्यांना कांहीं कारण नव्हतें. आणि उत्साह तर नव्हताच नव्हता. स्वराज्यपक्ष गांधीजीविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त झाला असला तरी, हाडानें तो पक्ष पुरा 'राष्ट्रीय' आहे तसा ब्राह्मणेत्तर पक्ष नाहीं, ही त्यांची खात्री होती. तात्पर्य कट्टर गांधीभक्तांना मी प्रिय नसलों तरी त्यांनीं माझ्या निवडणुकीला विरोध केला नाहीं.

महाराष्ट्राच्या सात जिल्ह्यांकरितां मिळून दोन जागा होत्या. पैकीं या दुसऱ्या जागेकरितां पुण्याचे डॉक्टर लोहोकरे हे उभे राहिले. तेहि स्वराज्यपक्षाचे सभासद होते. तेव्हां एकाच पक्षाच्या दोन उमेदवार नेमावे की नाहीं हा मोठा बिकट प्रश्न उत्पन्न झाला. लोहोकरे यांना स्वराज्यपक्षानें स्वीकृत केले नसते तरी, ते उद्योगी आणि महत्वाकांक्षी असल्यामुळें स्वतंत्र म्हणून उभे राहिले असते! तेव्हां एकंदर परिस्थिति पहातां, या पक्षाचे दोन उमेदवार उभे केले तरी ते झेपू शकतील असे वाटल्यावरून, लोहोकरे यांच्या उमेदवारीलाहि स्वराज्यपक्षानें संमति दिली. उलट लोहोकरे यांनींहि असें कबूल केलें कीं, "केळकरांच्या मार्गांत मी मुळींच आड येणार नाहीं. आधी ते निवडून येण्याची खात्री करून मग उरलीं मतें मी आपणाला घेईन." वास्तविक एकदां चढाओढ सुरू झाली म्हणजे हा सूक्ष्म विवेक फारसा टिकत नाहीं, आणि जो तो उमेदवार आपल्यापुरती खंबिरी करितो, हें स्वाभाविकच आहे. पण हें ठाऊक असतांहि लोहोकरे यांना जोडीचे उमेदवार म्हणून पत्करण्यास मी तयार झालों, इतका आत्मविश्वास मला होता.

व्यक्तिशः मी निवडून आलोंच पाहिजे, कारण त्यावर नव्यां स्वराज्यपक्षांची इभ्रत आणि यश अवलंबून होत ! याकरितां मी शक्य तितकी आपल्या मतांची खात्री करावी हें क्रमप्राप्त झालें. स्वतः लाहोकरे हेहि ही गोष्ट गृहीत घेऊन चालले होतेच. पण महाराष्ट्रांतील माझ्या सहाय्यकांना देखील ही गोष्ट उघड दिसत होती. म्हणून, या व्यवस्थेत असणारा धोका पत्करूनाहि, मी लोहोकरे यांना हाताशीं घेऊन निवडणूक लढविण्याच ठरविलें.

या धोक्याचा प्रत्यक्ष अनुभव निवडणुकींत थोडथोडा आलाहि. कारण आम्ही दोघे उमेदवार मिळून एकाच वाहनांतून मते मिळविण्याकरितां हिंडत असलो तरी जात्याभिमान हा जेथें तेथें डोक वर काढून बसलेलाच होता. यामुळें असें घडें कीं, जाहीर सभेत "प्रथम केळकरांना हटकून निवडून येण्याला लागतील तितकीं मतें देऊन मग उरलीं मतें लोहोकऱ्यांना द्यावी " असें ठराव होत. परंतु मी चित्पावन कोंकणस्थ आणि लोहोकरे यजुर्वेदी देशस्थ हा भेद ध्यानांत धरून खासगी कारस्थानांत कांहीं कांहीं मतदार आपल्या जात्यभिमानाच्या वळणावर थोडे बहुत जात. हा जात्यभिमान उभयपक्षांतहि होताच. तथापि देशस्थ यजुर्वेदी लोकांत शिक्षण कमी यामुळें त्यांच्यामध्यें तो थोडा अधिक होता इतकेच. माझें पारडें इतर रीतीनें आधीच जड यामुळेंहि मला जात्यभिमान भरीस घालण्याचें कारण नव्हतें. परंतु लोहोकरे यांच्याकरितां झटणारे लोक या जात्यभिमानाचा उपयोग करीत ही गोष्ट नगर नाशिक व खानदेश या जिल्ह्यांत विशेष दृष्टोत्पत्तीस आली. पण याकडे दुर्लक्ष करणें प्राप्त होत. मी स्वतः मात्र या जात्यभिमानाचा उपयोग कोठेंहि केला नाहीं हें प्रामाणिकपणें सांगूं शकतों. हें कारस्थान तोंडानें वाच्यता न करतां गुप्त मतदान पद्धतीत सहज साधण्यासारखें होतें तरी तें निवडणुकीच्या निकालानंतर सहजच उघडकीस आलें. मात्र या कारस्थानाची बाधा विशेष न होतां माझी निवडणूक यशस्वी झाली. आणि दोनाहि जागा स्वराज्य पक्षाच्या पदरांत पडून त्याची इभ्रत एकदम वाढली. लोकमतानें निःसंदिग्ध असाच निर्णय दिला.

स्वराज्य पक्षाप्रमाणें लिबरल आणि ब्राह्मणेतर पक्षांनींहि या दोन जागांकरितां दोन दोन उमेदवार उभे केले होते. लिबरल पक्षातर्फे पुण्याचे बा. सी. कामत आणि अहमदनगरचे ह. क. पटवर्धन उभ होते. ब्राह्मणेतर पक्षातर्फे कोल्हापूरचे निंबाळकर आणि पुण्याचे बागडे उभे होते. वस्तुतः या दोन पक्षांनीं

आपले ठराव करून त्यांना उभे केले नव्हते. परंतु निवडणुकीच्या प्रचारांत ते त्या पक्षांचे सभासद म्हणून त्या पक्षांची नांवे सांगत. लिबरल पक्षाची मुख्य कचेरी पुण्यास होती. परंतु कामत व पटवर्धन या पैकीं कोणी तरी एकच उभा करून त्यावर सर्व बळ एकवटावें हें इष्ट असतां तिला तसें घडवून आणतां आलें नाहीं. ब्राह्मणेतर पक्षाच्या मुख्य कचेऱ्याच मुळांत दोन ठिकाणी. एक पुणे व एक कोल्हापूर येथें. यामुळें त्यांच्यांत एकवाक्यता होणें शक्यच नव्हतें. तात्पर्य अशा रीतीनें या तीन पक्षांचे प्रत्येकीं दोन याप्रमाणें एकूण सहा उमेदवार या निवडणुकीस उभे होते. रा. कामत हे पूर्वी एकदा १९२० च्या निवडणुकींत उभे राहून निवडून आले असल्यामुळें त्यांना आपण फिरून निवडून येऊं अशी आशा होती. निंबाळकर यांचा पोलीस खात्याशीं संबंध व त्यांना कोल्हापूरच्या महाराजांचा पाठिंबा होता. बागडे हे एल्एल् बी. वकील. त्यांच्याइतका सुशिक्षित ब्राह्मणेतर पुढारी त्या वेळीं पुण्यांत नव्हता. यामुळें आपणास या पक्षाकडून पाठिंबा मिळेल अशी त्यांना आशा होती. शिवाय ब्राह्मणांना शिव्या देण्याच्या कामीं ब्राह्मणेतर पक्षातील अत्यंत मुखर असे ते एक चांगले वक्ते होते येऊन जाऊन हरिभाऊ पटवर्धन यांनाच सर्वांत पाठबळ कमी होतें. आणि शेवटी तें तसें दिसून आलेंच. या निवडणुकीच्या निकालाचा तक्ता खालीं दिला आहे.

**मध्यप्रांत (मुंबई ईलाखा) असेंब्ली निवडणूक** (ता. १४ नोव्हेंबर, १९२३)

| अ. नं. | उमेदवाराचें नांव | निवडणुकींत मतें पडलीं तीं |
|---|---|---|
| १ | नरसिंह चिंतामण केरुकर | ९४४६ |
| २ | कृष्णाजी गो. लोहोकरे | १६३७ |
| ३ | निंबाळकर | १५६४ |
| ४ | बागडे वकील | १४४० |
| ५ | बा. सि. कामत | १२८५ |
| ६ | ह. के. पटवर्धन | ११६६ |
| | एकूण | १६५३८ |

वरील तक्त्यातील आकड्यावरून होणारा बोध स्पष्टच आहे. एकंदर मतें पडलीं त्यातली निम्म्याहून अधिक मतें मला एकट्याला मिळालीं. लोहोकरे हे दुसरे निवडून आले; परंतु त्याच्या माझ्यामध्यें जवळ जवळ आठ हजारांइतकें अंतर पडल ! दोनहि ब्राम्हणेतर उमेदवारांना मिळून माझ्या एकतृतीयांशहि मतें लाभलीं नाहींत ! आणि दोनहि लिबरल उमेदवारांना मिळून माझ्या चतुर्थांशाइतकींच मत पडलीं !

पण केवळ आकड्यावरून दिसून न येणारी अशी सांगण्यासारखी एक गोष्ट आहे ती अशी. निवडणुकीच्या नियमांत एक नियम असा होता कीं, "प्रत्येक उमेदवाराला प्रारंभीं पांचशें रुपयांची ठेव सरकारांत भरावी लागते. तो निवडून आला तर ती रक्कम त्याला परत देण्यांत येते. मग त्याला कितीहि कमी मतें पडोत. पण निवडून न आलेल्या उमेदवाराला जर एकूण नोंदलेल्या मतांपैकीं एक अष्टमांशाइतकींहि मतें पडलीं नाहींत तर त्याची ती पांचशें रुपयांची रक्कम सरकारजमा होते." प्रस्तुत निवडणुकींत एकंदर मतें १६५३८ इतकीं नोंदलीं गेलीं. अर्थात् ज्या अयशस्वी उमेदवाराला निदान दोन हजार मतें पडलीं नाहींत त्याची ठेव सरकारजमा होण्याला पात्र ठरावयाची. त्याप्रमाणें निंबाळकर, बागडे, कामत व पटवर्धन या सर्वांचे पांच-पांचशे रुपये बुडून सरकार जमा झाले ! लोहोकरे हेहि एक अष्टमांशाइतकीं मतें न मिळालेले म्हणून त्यांचीहि ठेव अशीच सरकार जमा व्हावयाची, परंतु ते नंबर दोनच्या जागीं निवडूनच आले म्हणून त्यांची ती रक्कम वांचली ! अशी रक्कम ठेवून घेण्यांत सरकारचा हेतु हाच असतो कीं, वाटेल त्या मनुष्याला उमेदवार म्हणून उभे रहातां येतें एवढ्याकरताच त्याने उभे रहावें असें नाहीं. निवडून येण्याची थोडीबहुत तरी आशा असेल त्यानेच उभे रहावें. नाहीं तर वाटेल तितके उमेदवारें भरमसाट उभे रहातात. आणि मग सरकारला तितक्यांच्यां नांवाच्या पेट्या तयार ठेवाव्या लागतात आणि विनाकारण खर्च आणि व्यवस्थेचा त्रास होतो. असो. अशा रीतीनें मी बेसुमार मतें एकटयाला खाऊन सरकारच्या पदरांत दोन हजार रुपये घालण्याला कारणीभूत झालो. पण मी तरी त्याला काय करणार !

## जिल्हावार मतनोंदणीचा तक्ता

| अ. नं. | जिल्हा | केळकर | लोहोकरे | निंबाळकर | बागडे | कामत | पटवर्धन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्व खानदेश | १३९० | २७१ | ३९४ | ५७५ | ३९ | १५७ | २८२६ |
| २ | नाशिक | १२३९ | २४५ | ४०८ | ५७ | १२९ | ४१ | २११९ |
| ३ | सोलापूर | १३४४ | २२ | १७१ | ९६ | २८५ | ३२ | १९५० |
| ४ | पश्चिम खानदेश | १३१७ | ५८१ | १५६ | १६० | १७२ | ३८ | १४२४ |
| ५ | सातारा | १८३१ | १२५ | २४६ | ४३० | १९५ | ८६ | २९१३ |
| ६ | अहमदनगर | ८८३ | १५२ | ८५ | २९ | ४८ | ६९७ | १७९४ |
| ७ | पुणें | १३९१ | २२१ | ९२ | ८२ | ४१४ | ९५ | २१९५ |
| | शंकित पण कायम धरलेलीं | ५१ | २० | १२ | ११ | ३ | २० | १४७ |
| | एकूण मते | ९४४६ | १६३७ | १५६४ | १४४० | १२८५ | ११६६ | १६५३८ |

जिल्हावारीनें पाहिलें तरी प्रत्येक जिल्ह्यांत कोणत्याहि उमेदवाराला माझ्याहून अधिक मतें मिळालीं नाहींत. एक अहमदनगर सोडल्यास प्रत्येक जिल्ह्यांत मला १२०० पासून १८०० च्या दरम्यान मतें मिळालीं. अहमदनगर जिल्ह्यांत मात्र मला ८८३ मते मिळालीं आणि हरिभाऊ पटवर्धन यांना माझ्या खालोखाल ६७७ मतें मिळालीं, कारण हरिभाऊ हे त्या जिल्ह्यांतील प्रमुख वजनदार पुढारी होते. त्या जिल्ह्यांत पडलेल्या एकंदर १७९४ मतांपैकीं मी व पटवर्धन यांनीं मिळून १५८० मतें घेतलीं. लोहोकरे यांना पश्चिम खानदेशांत जितकीं मतें पडलीं तितकीं अहमदनगर सोडल्यास दुसऱ्या कोणत्याहि जिल्ह्यांत कोणाहि उमेदवाराला मिळालीं नाहींत. याचें एक कारण त्या जिल्ह्यांत देशस्थ यजुर्वेदी लोकांची वस्ती मोठी आहे. माझ्या सहाध्यकर्त्यांनीं देखील एक मत मला तर एक लोहोकरे यांना अशी टाकण्याची व्यवस्था केली. परंतु सर्व साधारण मतदार संघांत मलाच अधिक मतें पडल्यामुळें लोहोकरे यांच्यापेक्षा माझीं मतें खानदेशांतहि साडेसातशेंनीं अधिक भरलीं. पूर्व खानदेशांत बागडे यांना लोहोकरे यांचे खालोखाल ५७५ मतें पडलीं.

याचें कारण पूर्व खानदेशांत मतदारांचा भरणा फार मोठा आणि ब्राम्हणेतर मताचें प्राबल्य. तथापि त्याहि जिल्ह्यांत बागडे यांच्यापेक्षां मला आठशेंहून अधिक मतें मिळालीं. तात्पर्य, कोणच्याहि दृष्टीनें पाहतां मतदानाच्या मापाने मोजतां येणारी माझी लोकप्रियता त्यावेळी इतर कोणत्याहि उमेदवारापेक्षां, आणि स्वराज्यपक्षाची लोकप्रियता इतर कोणत्याहि पक्षापेक्षां, निःसशय अधिक होती हे या निवडणुकीनें ठरविलें.

या १९२३ च्या निवडणुकींत व्यक्तिशः मला एक मोठी अप्रिय गोष्ट करावी लागली ती अशी. कनिष्ठ म्हणजे मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीत माझे वडील बंधु अप्पासाहेब केळकर हे पूर्व खानदेशतर्फे उभे राहिलेल्या उमेदवारांपैकीं एक होते. निवडणुकीपूर्वी कांहीं थोडे दिवस त्यांनी पेन्शन घेतले होतें. पेन्शन घेतलें असलें तरी त्यामुळें निवडणुकीला उभे राहण्यास त्यांना बाध नव्हताच. आणि याच जिल्ह्यांत मामलेदार व डेप्युटी कलेक्टर या नात्यानें काम करून सरकारी शिफारसीबरोबर त्यांनीं लोकप्रियताहि संपादन केली होती. उमेदवार वकीलांपेक्षांहि एका दृष्टीनें त्यांचा परिचय जिल्ह्यांतील जनतेशी पुष्कळच अधिक निकट आलेला होता. आणि प्रत्यक्ष मुलकी खात्यांतच त्यांची नोकरी झाल्यामुळें रयतेचीं खरीं दुःखें त्यांना इतर कोणाहिपेक्षां अधिक परिचित, म्हणून त्यांचा गवगवा विधिमंडळांत करून ती दूर करवून घेण्याची पात्रताहि त्यांच्या अंगीं अधिक होती. याकरितां सेवानिवृत्तीनंतर हातून थोडाबहुत लोकोपयोग व्हावा या हेतूनें ते निवडणुकीस उभे राहिले. परंतु या जिल्ह्याच्या तीनाहि जागांकरितां स्वराज्यपक्षानें तीन उमेदवार उभे केल्यामुळें, माझें खाजगी नातें आणि माझें सार्वजनिक कर्तव्य यांमध्यें मोठाच दुस्तर विरोध उत्पन्न झाला ! तथापि या नात्यापेक्षां या कर्तव्यालाच अधिक मान देणें मला प्राप्त असल्यामुळें मतप्रचाराच्या जाहीरसभांतून "माझ्या बंधूंना मतें देऊं नका, तीं स्वराज्यपक्षाच्या उमेदवारालाच द्या" असें मला उघडपणें सांगत जावें लागलें ! पण माझी अडचण ध्यानांत येण्याइतकें माझे बंधु स्वतः समंजस असल्यामुळे, मजकडून होणाऱ्या विरोधाचा बिलकूल गैरसमज त्यांनीं करून घेतला नाहीं, राग मानला नाहीं, तर खाजगी रीतीनें उलट कौतुकच केलें.

या पुढील निवडणूक १९२६ च्या नोव्हेंबरांत झाली. तिलाहि फिरून मी उमेदवार म्हणून उभा राहिलों. पण या पूर्वी एक महत्त्वाचें स्थित्यंतर घडून आलें

होतें. १९२५–२६ सालीं स्वराज्यपक्षांत मतभेद झाला. विधिमंडळांत नुसतें शिरावें इतकेंच नव्हे तर मिळतील त्या अधिकाराच्या जागाहि स्वीकाराव्या असें आम्हा महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचें मत असल्यामुळें, स्वराज्यपक्षाचे अध्यक्ष पं. मोतीलाल नेहरू व त्यांचे सहाय्यक ( दिल्ली विधिमंडळाचें अध्यक्ष ) विठ्ठलभाई यांचा आणि आमचा पुष्कळच बेबनाव झाला. आम्ही स्वराज्यपक्षाच्या तिकिटावर निवडून आलेले म्हणून मी, बापूजी अणे इत्यादि पुढाऱ्यांनीं असेंब्लींतींलं आपल्या जागांचे राजीनामे दिले. पण १९२६ च्या अखेरीस नव्या निवडणुकी उपस्थित होतांच आमच्या नव्या, म्हणजे प्रतियोगी सहकारिता पक्षाचें समर्थन जनतेपुढें करण्याकरितां आम्हांला निवडणुकी लढविणें प्राप्तच झालें. मजवर पूर्वी, कौन्सिल प्रवेशाची तरफदारी करणारा म्हणून, काँग्रेसपक्षांतील कट्टरांचा राग होताच. पण तेव्हां मोतीलाल नेहरू व चि. रं. दास या सारख्यांचें मला पाठबळ होतें. आतां दास दिवंगत झाले आणि नेहरू ब्रियरले, तेव्हां असह्याय्य असें माझें महाराष्ट्रांतील पुढारीपण पणाला लागण्याचा प्रसंग येऊन ठेपला. पूर्वी काँग्रेसवाले सहानुभूति-मिश्र तटस्थपणा धारण करून राहिले, पण ते आतां मजवर उघड उघड रागावले. आणि माझा पाडाव करण्याकरितां मला प्रतिस्पर्धीहि उभा करते, परंतु तसें करणें म्हणजे कौन्सिल प्रवेशाला मान्यता देण्यासारखे होईल, म्हणून त्यांना ही गोष्ट करतां येईना. मात्र पूर्वीचें तटस्थपणाचें धोरण सोडून आतां ते गुप्त कारवाई करून मला आपला विरोध जाणवूं लागले.

तथापि माझीं मतें व माझें पुढारीपण महाराष्ट्राला मान्य होतें, त्यांत फेरबदल झाला नव्हता, याचा प्रत्यय या नव्या निवडणुकीनें आणून दिला. या खेपेस लिबरलपक्ष निवडणुकीच्या भानगडींत मुळीं पडलाच नाहीं. ब्राह्मणेतर ( सत्यशोधक ) पक्ष मात्र अजून जागा धरून राहिला होता. इतकेंच नव्हे, तर त्याचें बळ वाढत होतें. या खेपेस पक्षातीत म्हणजे स्वतंत्र अशा उमेदवारांची संख्या पुष्कळच होती. त्यांत विशेष पुढें सरसावण्यासारखे दोन होते. एक शिंया स्टी. नॅ. कंपनीचे साराभाई हाजी, आणि दुसरे जळगांवचे रुपचंद मोतीरामशेट. 'हाजी' हें नांव मुसलमानी दिसतें, पण साराभाई हे जैनधर्मी गुजराथी वैश्य आहेत. या अपरिचित गृहस्थाचें नांवहि तेव्हां इकडे कोणास माहीत नव्हतें. तथापि ते मुंबईच्या एका मोठ्या नॅव्हिगेशन कंपनीचे एक अधिकारी होते. यामुळें दिल्ली येथील विधिमंडळांत किनाऱ्यावरील वहातुकीचें बिल आणण्याच्या खटपटीकरितां कंपनीनें त्यांना

उभे करून, त्याकरितां वाटेल तितका खर्च करण्याचें योजिले होतें. शेट रुपचंद मोतीराम हे जळगांव येथील एक धनिक व्यापारी होते. आणि जो उमेदवार खानदेश जिंकील तो सर्व निवडणूक जिंकील असे वाटण्याइतकी मतदारांची भरती त्या दोन जिल्ह्यांत मिळून असल्यानें, रुपचंद यांना यशाची मोठी आशा वाटत होती. इतर जिल्ह्यांतील मारवाडी समाजाची मदतहि त्यांना होण्यासारखी होतीच. उरल्या उमेदवारांत बागडे हे ब्राह्मणेतरांतर्फे उभे होते. शिवाय माळेगांवचे राजे शंभुसिंग जाधवराव आणि खर्डेकर ( कोल्हापूर संस्थानापैकीं एक जहागीरदार ), हे स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे होते, तरी त्यांची भिस्त ब्राह्मणेतर मतदार संघावर बरीच होती.

या स्वतंत्र उमेदवारांत सातारा जिल्ह्याचे पुढारी रा. दादासाहेब करंदीकर हेहि यावेळीं उभे होते. दादासाहेबांची नेहमींची भूमिका 'सर्वपक्षीय' अशी असल्यामुळें ते कोणत्याहि एका पक्षातर्फे उभे राहणें शक्यच नव्हते. तथापि इतर अनेक रीतीनें ते व मी हे एकाच गटांतले व ऋणानुबंधी. त्यांचे सातारा जिल्ह्यांत स्वाभाविक वजन होतें, तर मी एकंदर महाराष्ट्राचा एक पुढारी या नात्यानें माझेंहि हितचिंतक सातारा जिल्ह्यांत पुष्कळ. यामुळे तेथील मतदारांना मोठाच पेंच येऊन पडला. दादासाहेबांना त्यांच्या कांहीं मित्रांनीं असें सुचविलेंहि कीं, " ही निवडणूक एकप्रकारें तत्त्व प्रस्थापनेकरितां होत आहे, केळकर हे वरिष्ठ विधिमंडळांत असतां त्यांनीं प्रतिसहकार तत्त्वाच्या वादांत एक वर्ष आधी (१९२६) राजीनामा दिला. आणि तें तत्त्व विजयी करण्याकरितां निवडणुकीस उभे आहेत. म्हणून वडीलकीच्या नात्यानें तुम्ही या वेळीं मागें सरून त्यांचा मार्ग मोकळा करून देणें इष्ट आहे." परंतु एकदां दाखल केलेली उमेदवारी परत घेणें हें करंदीकरांना जड वाटलें. तेव्हां मतदारांनींच आपला काय तो विचार करावा असा प्रसंग आला. म्हणून रा. भाऊसाहेब सोमण वकील, जे दादासाहेबांच्या मागून सातारा-जिल्ह्याचे अनभिषिक्त पुढारी ठरले होते, त्यांनीं आपल्या सहीवर जाहीर विनंति-पत्रक काढून " ही वेळ केळकरानांच मतें देण्याची आहे " असें मतदारांना सुचविलें. दादासाहेबांना अशा रीतीनें विरोध करावा लागणें हें स्वतः मला व माझ्याहिपेक्षां सोमण यांना संकट वाटलें, परंतु त्यांनीं तसें करण्याचें धैर्य दाखविलें. यामुळें दादासाहेबांना पुष्कळ कमीं मतें पडलीं आणि माझ्या निवडणुकीस मोठें सहाय्य झालें.

अशाच प्रकारची दुसरी एक अडचण माझ्या मार्गांत येणारी होती परंतु तिचेंहि निराकरण एका निराळ्या रीतीनें झालें. पूर्वीच्या निवडणुकींत माझ्या सहाय्याने माझ्याबरोबर यशस्वी झालेले डॉ. लोहोकरे यांना वरिष्ठ विधिमंडळाच्या निवडणुकीला पुनः उभे राहण्याची इच्छा सहजच होणारी. आणि ते उभे राहते तर मला खचित अडचण तरी झाली असती. लोहोकरे हे केवळ एल्. सी. पी. एस्. डॉक्टर असतांहि मोठे तरतरीत, धीट व उद्योगी होतेच. पण या सर्वांपेक्षां महत्वाकांक्षेचा गुण त्यांच्यामध्यें मोठा होता. म्हणून त्यांना आवरणें, माझ्या व त्यांच्याहि मित्रांना कठिण गेले असते. परंतु याच वेळीं मुंबई प्रांतिक विधिमंडळाच्याहि निवडणुकी व्हावयाच्या होत्या. यामुळें पुण शहरातर्फे आपण उभे रहावें अशी कल्पना त्यांना सुचली. आणि नव्या प्रतिसहकार पक्षानें त्यांना उभें रहाण्यास संमति दिली. आपण निवडून आल्यास प्रधानमंडळांतलेंहि एखादें पद आपणाला लाभूं शकेल ही कल्पना त्यांच्या मनांत येऊं लागली! आणि प्रतिसहकार पक्षाच्या पाठबळावर त्यांची ती आकांक्षा सफळ होण्याचा संभव अगदींच नव्हता असे नाहीं. यामुळें त्यांनीं वरिष्ठ मंडळाकरितां उभे न राहण्याचे ठरविले. ही गोष्ट मला फार सोईची झाली हें सांगावयास नकोच. आमच्या पक्षानें पुण्यांत त्यांना भरपूर पाठबळ दिलें. आम्ही सर्वांनीं व्यक्तिशः लोहोकरे यांच्याकरितां खूप चळचळ व खटपट केली. तथापि दैवदुर्विलासाचा एक चमत्कार त्यांच्याविषयीं घडला तो जातां जातां, थोडे विषयांतर करूनहि, सांगावासा वाटतो.

पुण्यांतील या निवडणुकीची मोठी चुरस लागून राहिली होती. कट्टर काँग्रेसवाल्यांनीं शहरचे एक व्यापारी रा. ब. लल्लूभाई शहा यांना आतून बाहेरून पूर्ण पाठबळ दिलें होतें. वास्तविक राष्ट्रीय वृत्तीच्या दृष्टीनें लोहोकरे हे लल्लूभाई पेक्षां फारच श्रेष्ठ ही गोष्ट या कट्टरांना माहीत नव्हती असें नाहीं. परंतु आमच्या प्रतिसहकारपक्षाचा पाडाव करावा हें व धोरण यावेळीं कट्टरांना अधिक प्रिय असल्यानें त्यांचा विवेक सुटला. काँग्रेसच्या आणि शहरांतील धनिक व्यापारी वर्गाच्या सहाय्यानें लल्लूभाई यांना आपण हटकून निवडून आणूं असे त्यांना वाटले. शहरांत मतप्रसाराच्या चळवळीची शर्थ झाली. डॉ. लोहोकरे यांना डॉक्टर लोकांचें पाठबळ होतें. शिवाय ते स्वतः इतके जबरदस्त उद्योगी व खटपटी कीं त्या कामीं त्यांचा हात कोणीहि धरूं शकला नसता. निवडणुकीच्या आदल्या रात्रीं साडे अकरा वाजतां, सर्वव्यवस्था मनासारखी करून, ते आंथरुणावर पडले.

पण त्यांना साधी विश्रांति मिळावयाची त्याऐवजीं चिरविश्रांतीच मिळाली! लोहोकरे यांना काळजाच्या रोगाची व्यथा फार दिवसाची होती. आणि आवाक्याबाहेर केलेल्या परिश्रमामुळें काळजावर अनिष्ट परिणाम होऊन ते झोपेंत असतांच हृदयक्रिया बंद पडून मृत्युवश झाले. पहाटे त्यांचे मित्र त्यांना उठविण्याकरितां गेले तों हा प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला! ही वार्ता कळण्याच्या अगोदर कित्येक पेठांतून मतदानाला सुरुवातहि झाली. परंतु या विशिष्ट परिस्थितींत होणारी निवडणूक अयोग्य आहे असें ठरवून पुणें कलेक्टरांनीं स्वतः सर्व पेठांतून हिंडून निवडणुकीचें काम थांबविलें.

अशा अकाल्पित रीतीनें थांबलेली निवडणूक नंतर कांहीं दिवसांनीं झाली. तिला फिरून लल्लूभाई शहा हे उभे राहिले. त्यांना प्रतिसहकारपक्षातर्फे म्हणून आम्ही पुण्याचे वकील रा. चंद्रचूड यांना उभे केले. ही निवडणूकहि तितक्याच चुरशीची झाली. पण या वेळीं आमच्या पक्षाला एका निराळ्या रीतीनें सहाय्य झालें. कट्टर काँग्रेसवाल्यांचा मुख्य आधार व्यापारी वर्ग हा होता. पण रा. चंद्रचूड हे कर्मधर्मसंयोगानें स्मॉलकॉज कोर्टातील पुढारी वकील होते, आणि या कोर्टाशींच व्यापारी वर्गाचा नित्य ऋणानुबंध. यामुळें चंद्रचूड यांना व्यापारी वर्गांत फूट पाडून स्वतःला बरेंच पाठबळ मिळवितां आलें. चंद्रचूड हे बी. ए. एल्एल्. बी. ही गोष्टहि सहाय्यकच ठरली, कारण पूर्वी डॉक्टर मंडळीची मदत लोहोकरे यांना होणार होती तशीच आतां वकील लोकांची मदत चंद्रचूड यांना मिळाली. काँग्रेसवाल्यांना लल्लूभाईच्या बाजूनें सांगण्यासारखे कांहींच नव्हते. त्यांचा सर्व भर प्रतिसहकार पक्षाच्या निंदेवर होता. पण एकीकडे कौन्सिल बहिष्काराचे स्तोम माजवावयाचें, आणि दुसऱ्या बाजूस राष्ट्रीय भावनेविषयीं प्रसिद्धी नसलेल्या उमेदवारास सहाय्य करून यश मिळवावयाचें तें कौन्सिल प्रवेश करविण्याकरितांच, ही त्यांची तात्त्विक धरसोड लोकांना हास्यास्पद वाटली. प्रतिसहकार पक्षाला त्याच्या तत्त्वनिष्ठेकरितां सहाय्य करणारेहि स्वतंत्र मतदार होतेच. तात्पर्य, पुणें शहरांतील ही दुसरी निवडणूक आम्ही जिंकली.

पण प्रतिसहकार पक्षाला मतदारांत मान्यता कितपत आहे याचा निर्णय सर्व महाराष्ट्रांत मिळून व्हावयाचा होता तोहि माझ्या निवडणुकीनें झाला. इतर उमेदवारांनीं प्रयत्नांत उणें पडूं दिलें नाहींच. पण साराभाई हाजी यांच्याकरितां

जी खटपट आयत्यावेळीं झाली ती इतकी कीं, तिजमुळें आमच्या कार्यकर्त्यांनाहि पुष्कळसें आश्चर्य व थोडीशी चिंताहि वाटली. मी दोन जागांपैकीं एकीला निवडून येईन या विषयीं त्यांना खात्री होतीच. परंतु समजा, हाजी हे पहिल्या नंबराला आले व मी दुसऱ्या नंबराला आलों तरी ते गौणच असें त्यांना वाटत होतें. हाजी यांची प्रत्यक्ष ओळख राहोच, पण त्यांचें नांवहि कोणास फारसें ऐकन ठाऊक नव्हतें. असें असतांहि शेवटीं त्यांना दुसऱ्यानंबरचीं मतें मिळालींच. याचें कारण निवडणुकीच्या दिवशीं प्रत्येक पोलिंग स्टेशनावर त्यांच्या मोटारींचा गराडा पडला होता. माझ्यासुद्धां इतर सर्व उमेदवार त्यांच्या श्रीमंती थाटापुढे असे लसेच दिसूं लागले ! हाजी यांच्या निवडणुकीप्रीत्यर्थ कमीतकमी पंचवीस तीस हजार रुपये खर्च झाले असावें असें अनुमान होत. स्वतः हाजी हे राष्ट्रीय वृत्तीचे होते यांत वाद नाही. ते अर्थशास्त्रज्ञहि होते. पण मौज ही की, हे त्यांचे गुण ठाऊक आहेत असें म्हणणारे शेकडा तीन मतदाराहे नसतील ! त्यांची माहिती शून्य असणारे शेकडा ऐशी तरी असतील. लोकशाहींतील मतदानपद्धतीवर हा आकस्मिक रीतीनें असा प्रकाश पडला कीं त्या राज्यपद्धतीच्या गुणाविषयीं विचारी मनुष्यानें शंकितच व्हावें. असो. या निवडणुकीचा निर्णय ता. १८ नोव्हेंबर १९२६ रोजीं खालीलप्रमाणें प्रसिद्ध झाला.

| अ. नं. | उमेदवाराचें नांव | निवडणुकींत मतें पडलीं तीं |
|---|---|---|
| १ | नरसिंह चिंतामण केळकर ( प्रतिसहकार ) | ८९१३ |
| २ | साराभाई हाजी ( स्वतंत्र ) | ५४८४ |
| ३ | रा. सा. रूपचंद ( स्वतंत्र ) | ४४१५ |
| ४ | बागडे वकील ( सत्यशोधक ) | ३५३१ |
| ५ | राजे शंभुसिंग ( स्वतंत्र ) | ९८५ |
| ६ | रघुनाथ पांडुरंग करंदीकर ( स्वतंत्र ) | ८६३ |
| ७ | खर्डेकर ( स्वतंत्र ) | ४०५ |
| | एकूण | २४५९६ |

निवडणुकींतील मतें मोजीत असतां खानदेश सोलापूर या जिल्ह्यांच्या पेट्या उघडल्या तेव्हां हाजी व शेट रूपचंद यांच्या पेक्षां मला कमी मतें पडू लागलेलीं पाहून प्रथम मी थोडासा गांगरलोंच. पण बाकीच्या जिल्ह्यांत माझी सरशी दिसून आली. सातारा जिल्ह्यानें मला विशेष आधार दिला. आणि पहिल्या निवडणुकींतील आश्चर्यकारक असें यश यावेळीं मला न लाभलें तरी, माझें पहिलें स्थान कायम राहिलें आणि पहिल्या दुसऱ्या जागेंत साडेतीन हजार मतांचा फरक पडला !

१९२३ व १९२६च्या निवडणुकींत जो दुसरा एक फरक पडला तोहि सांगण्यासारखा आहे. पहिलींत एकंदर मतें साडेसोळा हजार नोंदली गेलीं तर दुसरींत साडेचोवीस हजार मतें नोंदलीं गेलीं. याचें एक कारण कौन्सिल बहिष्कार शिथिल झाला होता. असेंब्लींतील स्वराज्य पक्षानें उत्कृष्ट कामगिरी करून दाखवून बहिष्काराचा वेडेपणा लोकनिदर्शनास आणिला होता. पण आणखीहि एक कारण हें कीं, या मधल्या काळांत निवडणुकीचे नवे नियम होऊन त्यामुळें मतदारांची संख्या वाढली होती. याचा मला प्रत्यय आला तो असा कीं, पहिल्या निवडणुकीच्या वेळीं मी मतदारांना विनंतिपत्रें म्हणून दोन वेळां छापील पोष्टकार्डें पाठविलीं. पण दुसऱ्या निवडणुकीच्या वेळीं हा खर्च झेपेना म्हणून एकच कार्ड पाठविलें. आणि आयत्या वेळीं विनंतिपत्रें छापून घेऊन ती प्रत्येक तालुक्याच्या गांवी माझ्या सहाय्यकर्त्यांच्या हाती वांटण्यास पाठवून दिलीं. दुसऱ्या खेपेस दर मतदारागणिक पोष्टकार्ड पाठवावयाचें तर निदान साडेतीन हजार रुपये खर्च आला असता. मजप्रमाणें इतर उमेदवारांनींहि केलें. मात्र साराभाई हाजी यांनी प्रथम पासूनच पोष्टापेक्षां स्वतःच्या खर्चाच्या मोटारीनें काम चालविलें होतें. त्यांचा पोष्टाचा खर्च वांचला असेल. पण हा मोटारीचा खर्च त्याहूनहि अधिक झाला. दुसऱ्या निवडकीच्या वेळीं मतदारांची संख्या यादींत तीस हजारापर्यंत गेली होती असें स्मरतें. या तीस हजारांपैकीं पुष्कळांना माझें नांव माहीत असावें. शिवाय केसरीपत्राचें सहाय्य, प्रसिद्धी मतप्रचार इत्यादि माझ्या कामांना पुष्कळच होण्यासारखें होतें. पुण्यासारख्या एका शहरांतल्या शहरांतहि मतप्रचाराला किती खर्च येतो हें गतवर्षी झालेल्या निवडणुकींत कळून आलेंच आहे.

मी ज्या मध्यभागातर्फे उमेदवार उभा होतों त्याची लांबी सुमारें चारशें मैल आणि रुंदी सुमारें दीड-पावणे दोनशें मैल होती. नुसत्या जिल्ह्यांचीं शहरें व

तालुक्यांचीं गांवें घेतलीं तरी त्यांची संख्या सुमारें ऐशी होती. आणि पोलिंग स्टेशनें ( मतनोंदणीचीं ठिकाणें ) शेकड्यांनी मोजावीं इतकीं होतीं. उमेदवारानें निदान एका पोलिंग स्टेशनाला एक भेट द्यावयाची म्हटले तरी अवघ्या दोन अडीच महिन्यांत इतका प्रवास होणें परम दुष्कर. यावेळीं माझी स्वतःची मोटार नव्हती आणि असती तरी एका मोटारीनें भागलें नसतें. यामुळें पुष्कळसा प्रवास आगगाडीनें, उरला मोटार सर्व्हिसनें, व कांहीं बैडगाडीनेंहि केला! जावें त्या गांवीं व्याख्यान व्हावयाचें. तें न झालें तरी पाहुणचाराचा जुलूम प्रत्येक ठिकाणीं होई. आणि पाहुणचार म्हटला कीं वेळ बराच जावयाचा. खाण्याकरितां नसलें तरी वटवट करण्याकरितां तोंड नेहमीं उघडें ठेवावेंच लागें. खाण्यापिण्यांतहि नियम रहात नसे. प्रत्येक ठिकाणचें पाणी निराळें. आगगाडीशीं संबंध असला आणि वेळ वांचविण्याकरतां तिचा उपयोग करावयाचा, म्हणजे त्याबरोबर रात्रीं-अपरात्रीं प्रवास व जाग्रणें हीं क्रमप्राप्तच होतीं. तथापि माझी प्रकृति सुदृढ म्हणून हें सर्व झेपलें. ईर्षेनें मनुष्याला दुप्पट बळ अंगीं येतें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. शिवाय जेथें जावें तेथें स्नेह व सहानुभूति भेटत यामुळें प्रवासाचा शीण मनानें हलका होई. पण एकंदरीनें निवडणुकीची दगदग इतकी होते कीं फिरून तिसऱ्या खेपेस मी निवडणुकीला उभा राहिलों नसतों. मग हे श्रम करून अपयश ज्यांच्या पदरीं पडतें त्यांच्या मनःस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव नसला तरी मनानें त्याची कल्पना मला करतां येतेच.

खर्चाच्या दृष्टीनें हें सांगितलें पाहिजे कीं या बाबतींत केसरी ट्रस्ट संस्थेचा आधार मला नसता तर मी कोणच्याहि निवडणुकीला उभाच राहिलों नसतों. दोन निवडणुकी मिळून सुमारें नऊ हजार रुपये खर्च आला. तो करण्याचें माझ्यामध्यें सामर्थ्य नव्हतें पण केसरीच्या सक्रिय राजकारणांत स्वपक्षीयांच्या निवडणुकी लढविणें, लढविण्यास मदत करणें, हें अंग समाविष्ट होतें. अशा कामीं केसरी-संस्थेचा खर्च करण्याचा परिपाठ कै. लो. टिळकांच्या वळेपासून होता. सुरतेच्या राष्ट्रीय सभेकरितां केसरीनें सात आठ हजार रुपये खर्च केल्याचें मला माहीत आहे. स्वपक्षीयांच्या म्युनिसिपल निवडणुकीकरितांहि केसरी थोडा फार खर्च करी. आणि माझी कौन्सिल निवडणूक थांबली त्यानंतरहि, केसरीचे संपादक संचालक नसलेल्या अशाहि पुढाऱ्यांच्या कौन्सिल निवडणुकींना केसरीनें हजारो रुपयांचें सहाय्य केलें आहे. तात्पर्य, केसरीचें सहाय्य न लाभतें तर, मतदारांनीं

निवडून देण्यासारखी माझी पात्रता असतांहि मला त्या भानगडींत पडतां आलें नसतें. म्हणून या दृष्टीनें सार्वजनिक कार्य करण्याची जी संधि व जें यश मला लाभलें त्याचें सर्व श्रेय केसरीसंस्थेला असून त्याकरितां मला कृतज्ञता वाटते. पण या म्हणण्यांत विशेष असें कांहीं नाही. कारण वयाच्या चोवीसाव्या वर्षापासून आजपर्यंत माझी एकंदर जीवयात्रा केसरीमुळेंच झाली. तेव्हा हा विशेष उल्लेख करण्याचेंहि कारण नाहीं. मतप्रतिपादन व मतप्रसार याकरितां इतका खर्च ज्यानें केला असें वर्तमानपत्र पुण्याबाहेरच्या हिंदीजगांत दुसरें कोणचें असेल याची चांगली चौकशीच करावी लागेल.

केसरीच्या आधाराशिवाय मला निवडणुकींचा खर्च करतां आला नसता हें सांगितलेंच. पण त्याबरोबर दुसरें हेहि सांगितलें पाहिजे कीं माझ्या इतक्या थोडक्या खर्चांत इतर कोणाहि उमेदवाराचें काम झालें असेल असें मला वाटत नाहीं. याचें मुख्य कारण माझ्याविषयीं जनतेत असलेली सहानुभूति. निवडणुकीच्या कामीं स्वार्थपरायण लोक उतावळ्या उमेदवारांचा फायदा घेतात. पैसे उकळण्याच्या सुवर्णसंधीचा हवा तसा उपयोग करतात. पण सुदैवानें मला असे कोणी भेटले नाहींत. कट्टर काँग्रेसवाल्यांच्या दृष्टीनें मी महाराष्ट्राचे पाय मागें ओढींत असलों तरी, सामान्य जनता असेच म्हणणारी होती कीं टिळकांच्या राजकारणी धोरणाला अनुसरून केळकर वागत आहेत. केसरीविषयीं जनतेच्या मनांत जो आदर व जी कृतज्ञता वागत असे ती प्रगट करण्याची एक संधि असे मानून माझ्या निवडणुकीला ठिकठिकाणचे पुढारी उत्साहानें हातभार लावीत. राजकारणाच्या क्षेत्रांतील पात्रतेच्या दृष्टीनें माझ्याहून अधिक लायक उमेदवार मध्यभागांत उभा नव्हता असे माझ्या प्रतिपक्षांनाहि कबूल करावें लागत होतें. परंतु ते काँग्रेसच्या अभिमानानें मला पाण्यांत पहात. कदाचित दुसरे कोणी असे असतील कीं व्यक्तिशः मी त्यांना आवडत नसेन. मी सर्वांना सारखाच प्रिय होतों किंवा अप्रिय असा कोणासच नव्हतों असे मी तरी कसें म्हणेन ! परंतु बहुसंख्य लोकांच्या मनांत माझ्या विषयीं सहानुभूति होती. आणि तीच या निवडणुकीच्या प्रसंगानें प्रगट झाली यांत शंका नाहीं. माझ्या कार्यकर्त्यांपैकीं पुष्कळांनीं मजकडून किरकोळ खर्च घेतला नाहीं. मतदारांना मतदानाच्या जागीं नेण्याला मला फारच थोडा खर्च लागला.

आता यानंतर दिल्ली सिमला येथील हकीकती थोडक्यांत सांगतों. (१९२४) प्रथम महाराष्ट्रप्रमाणें हिंदुस्थानभर स्वराज्य पक्षाचे उमेदवार बहुतेक सर्व निवडून

आले. या पक्षांत आम्ही प्रारंभींच सुमारें चाळीस लोक होतों. चि. रं. दासबाबूं स्वतः वरिष्ठ असेंब्लीच्या निवडणुकीला उभे राहिले नाहींत. मोतीलाल नेहरू बिनविरोध निवडून आले. त्यांच्याकडे स्वराज्यपक्षाच्या अध्यक्षत्वाचा मान सहजच गेला. विठ्ठलभाई पटेल हे उपाध्यक्ष झाले. हिंदुपत्राचे संपादक ए. रंगास्वामी अय्यंगार यांना पक्षाचे चिटणीस, आणि मला पार्टीचा व्हिप म्हणजे संचालक नेमण्यांत आलें. वास्तविक चिटणीशीचें काम मला अधिक आवडलें असत. कारण व्हिप हा माझ्यापेक्षां चपळ तिडतिडा मनुष्य लागतो. परंतु चिटणीसाच्या अंगीं सरकार-पक्षीय पुढाऱ्यांकडे जाऊन भेटणें सवरणें हें गुण लागतात ते मजमध्ये कमी. म्हणून मी देहोंतरीं व्हिपची जागा स्वीकारली. सभेंत पक्षातर्फे भाषणें करणें, उत्तरें प्रत्युत्तरें देणें, या गोष्टी अध्यक्ष उपाध्यक्ष करीत. दोघेहि या कामाला अनुभवी आणि लायक. कायदेमंडळाच्या कामाचा हा पहिलाच प्रसंग होता. नेहरू हे यापूर्वी अलाहाबादच्या विधिमंडळांत पुष्कळ वर्षे होते. पटेल हेहि दिल्ली येथील जुन्या असेंब्लींत व मुंबई कौन्सिलांत कांहीं वर्षे होते. माझें व्हिपचें काम, पार्टीच्या सभांना हजर राहून सभेंत होणाऱ्या कामाविषयींचे ठराव पार्टीच्या सभासदांना आगाऊ कळवून ठेवणें आणि आयत्यावेळीं सभासदांना हजर ठेवून मतनोंदणींत ते यथायोग्य भाग घेतील अशी तजवीज करणें, हें होतें. मी लेखी काम सर्व करी. पण हेलपाट्यांचे आणि मेंढरें वळवून आणून गोठ्यांत घालण्याचें काम माझ्या दुय्यम व्हिपवर सोंपवीं.

पहिल्या वर्षी " विधिमंडळांत आपण झालों तरी विधायक कार्य कांहीं करावयाचें नाहीं शक्य तितका उपद्रवच सरकारला द्यावयाचा " असें स्वराज्य पक्षाचें शाब्दिक धोरण होतें. आणि अशी उनाडकी करण्याला पोषाखाचा जो स्वैरपणा शोभतो तोच आम्ही स्वीकारला होता. आमच्या पोषाखावरून आम्हांला जुन्या जमान्याच 'जंटलमेन' असं कोणीच म्हटलें नसतें. अंगांत उघडा शॉर्ट कोट, नेसूंची तोकडी धोतरें, अंगावर उपवस्त्र आहे आह नाहीं नाहीं, आणि डोक्याला टोपी, असा हा पोषाख असे. मी एक वर्ष खादीचा शॉर्ट कोट आणि खादीची किंवा लोकरी टोपी घालीत असें. त्या वेळच्या फोटोवरून मी एक वेळ गांधी टोपी घालीत असें असा कित्येक मजवर आरोप करीत. पण माझी टोपी पांढरी कधींच नव्हती! ती काळी किंवा भगवी असे! पांढऱ्या खादीची टोपी ही गांधींच्या दास्यत्वाची खूण असे म्हणणारा मी ती कशी घालीन! असो. विधायक कार्य याचा अर्थ विधि-

मंडळानें नेमलेल्या उपमंडळावर काम करणें, म्हणजे वाकडे असेल तें चर्चेनें सरळ सुती करणें. याच्या उलट विध्वंसक काम म्हणजे सरकारी बिल ठराव, कोणताहि असो, तो हाणून पाडण्याचा प्रयत्न करणें; खरोखर अगदीं लोकोपयोगी व सद्धेतु प्रेरित असेंहि बिल किंवा ठराव असला तरी तो हाणून पाडणें, किंवा निदान त्याला संमति न देतां तटस्थ बसणें; सरकारतर्फेचें लोक जिकडचें मत देतील तिकडें मत न देणें; त्यांच्याबरोबर लॉबींत न जाणे; आणि सरळ असेल तें शक्य तितकें वाकडे आणि सरकाराला अडचणीचें करून ठेवणें—असें स्वराज्य-पक्षाचें जाहीर धोरण होतें. त्याला ' Obstruction ' ही संज्ञा होती. पण पहिल्या सहा महिन्यांतच हें धोरण ढिलें पडलें. विधायक चर्चेंत आमचा पक्ष भाग घेऊ लागला आणि मौन सोडून भाषणें करूं लागला.

अध्यक्ष पंडित मोतीलाल नेहरू यांचें आणि उपाध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांचें कधींच बनत नसे. यांचीं दोन कारणें होतीं. नेहरू हे असेंब्लींत स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष म्हणून जोरदार भाषणें करीत, तथापि त्यांचा आणि सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा खासगी स्नेह चांगलाच असे. पंडितजी हे खाण्यापिण्याच्या बाबतींत मोठे रसज्ञ असत. यामुळें युरोपियन अधिकारी निरनिराळे प्रसंग उत्पन्न करून ख्यालीखुशालींत समरस होण्याकरितां त्यांना लोभवून नेत, आणि पंडितजी हे त्या सामाजिक संगतीचे भोक्ते असल्यामुळे जात. पंडितजी खासगी बोलण्या-चालण्यांत मोठे चतुर. जेवणाखाणाच्या टेबलाशीं जीं नर्म संभाषणें, कोट्या प्रति-कोट्या, हास्यविनोद चालतो त्यांत युरोपियन लोकाबरोबरीनें भाग घेणारे, किंबहुना त्यांच्यावर चढ करणारे असे होते. उलट विठ्ठलभाई हे खाण्यापिण्यांत कमी करणारे नसले तरी, ते युरोपियन लोकांशी फटकून वागत. त्यांच्या संभाषणांत गोडवेपणा कधींहि नसावयाचा. विनोद असे, पण तो केव्हांहि कोणाला तरी लागण्यासारखा बोचण्यासारखा असावयाचा. भांडखोर प्रतिपक्षी हें आपलें नातें खासगी संभाषण प्रसंगींहि विसरण्यास ते तयार नसत. उलट येईल तो प्रसंग आपला आंबट-तिखट-तुरटपणा प्रगट करण्याकरितां साधीत. यामुळें युरोपियन अधिकारी त्यांना कधी जवळ करीत नसत. पटेल म्हणजे ती एक खाज-कुयली किंवा हेजहॉग (तीक्ष्ण पिसाची साळू) असें मानून ते पटेलाना टाळीत. पंडितजींच्या व युरोपियन अधिकाऱ्यांच्या स्नेहाबद्दल पटेल तक्रार करीत, आणि खासगी मित्र-

मंडळींत ते पंडितजींवर एकसारखे टीकास्त्र चालवीत. पक्षाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यातला हा बेबनाव आम्हाला मोठा घोटाळ्याचा होत असे.

पटेल यांचा दुसरा एक स्वभावगुण असा कीं, जो कोणी कांहीं जहालपणाचें म्हणून बोलेल किंवा करील त्याच्यापुढें आणखी चार पावलें आपण आहों असें भासविण्याचा ते प्रयत्न करीत. त्यांच्या दृष्टीनें सर्वच मवाळ. पंडित नेहरूहि. आणि पंडित नेहरू हे दुटप्पी वागणारे म्हणून त्यांच्यावर पटेलांचा मोठा राग. पटेल यांच्या इतर गुणामुळें पंडितजींना ते अनिर्वाह्य वाटत. पण 'तुझें माझें पटेना आणि तुझ्यावांचून गमेना' अशी स्थिति पंडितजींची पटेल यांच्यासंबंधी झाली होती. याचा वचपा असेंब्लीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या वेळीं पंडितजींनी थोडा बहुत काढला. "पटेल हे अध्यक्ष हवे, पण पटेल नसतील तर बरे" असें त्यांचें मन द्विधा झालें. पटेल यांच्याविषयीं जिना यांच्या पक्षांतहि अप्रीति होती ती पटेल यांच्या द्राड जिभेमुळें, मानभंग करण्याच्या व खोडसाळ वागणुकीमुळें. या दोन अप्रीतिचा मेळ पडून अध्यक्ष निवडण्याच्या बाबतींत जेव्हां खासगी सभा झाली, तेव्हां पटेल यांच्या उमेदवारीला एकदम संमति देण्याला जिना व पंडितजी दोघांनीहि खळखळ केली. तेव्हां इतर नांवें सुचवावीं असा बूट निघाला तेव्हां जिनापक्षांतील दि. व. रामचंद्रराव आणि स्वराज्यपक्षांतील मी अशीं नांवें सुचविण्यांतहि आलीं. तथापि, अखेर निर्णयाच्या वेळीं पटेल यांनाच बहुमत मिळालें, आणि तेच दि. व. रंगाचारियर यांना पराभूत करून निवडून आले. पटेल अध्यक्ष झाल्यावरहि त्यांचा व नेहरू यांचा बेबनाव घुमसतच होता. पण पटेल हे स्वराज्यपक्षाचे साधे सभासद नाहींसे झाल्यानें अस्तनींतला निखारा किंवा विंचू निघून गेल्याचें सुख पंडितजींना लाभलें.

अध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या संभवनीय नांव-निशींत माझें नांव आलें याचा अर्थ इतकाच होता कीं, स्वराज्यपक्षांत नेहरू व पटेल यांच्या खालोखाल पात्रता व आदरबुद्धि या बाबतींत माझाच नंबर लागे. माझें नांव या यादींतच आलें तेव्हां मी अध्यक्ष निवडला जाण्याचा संभव माझ्या मनांत एक क्षणभर, पण एक क्षणभरच, चमकून गेला असेल खरा. तथापि, अध्यक्षाच्या जागेला माझ्यापेक्षा पटेल हेच अधिक योग्य आहेत असें मला तेव्हां वाटत होतें, आणि आजहि तसेंच वाटत आहे. अध्यक्षाच्या मानाला मी विद्वत्तेच्या दृष्टीनें अयोग्य

किंवा हा बहुमान देण्याला आदरबुद्धीच्या दृष्टीनें अपात्र, असें पंडितजी किंवा जिना यांचेंहि म्हणणें नव्हतें. किंबहुना मी निवडलों गेलों असतों तर स्वराज्य-पक्षाला तें भूषणच वाटलें असतें. कायदेकानू पाहून तपासून वादांतील निर्णय देण्याचें कामहि मी चांगलें करूं शकलों असतों असें मला वाटतें. तथापि माझी न्यायबुद्धि हाच माझा मोठा अवगुण होता. अध्यक्ष या नात्यानेंहि पटेल यांनी स्वराज्यपक्षाचें जितकें हित साधून दिलें तितकें माझ्या हातून बहुधा झालें नसतें. माझी घातक सद्बुद्धि मला आड आली असती. पण पक्षपाताचा विषादिन अवगुण सोडून इतर बाबतींत तर पटेल हेच माझ्यापेक्षां तें काम करण्याला अधिक लायक होते यांत शंका नाहीं. पटेल हे मजपेक्षां अधिक बुद्धिवान नसले तरी कायदे कौन्सिलच्या कामांत अधिक सराईत, अधिक रुळलेले, अधिक हजर-जबाबी, अधिक कदरदान, अधिक खंबीर, अधिक कठोर, अधिक कारस्थानी, अधिक साधनयोजक, आणि अधिक धीट होते. त्यांनी आपलें अध्यक्षपद सजविलें गाजविलें आणि यशस्वी केलें यांत मुळींच शंका नाहीं.

विठ्ठलभाई पटेल हे असेंब्लीचे अध्यक्ष निवडले गेले तेव्हां त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर स्वराज्यपक्षाचा उपाध्यक्ष म्हणून माझी निवडणूक झाली. आणि माझ्या ह्विपच्या जागीं षण्मुखं चेट्टी ( हल्लीचे कोचीन संस्थानचे दिवाण ) यांची निवडणूक झाली. चिटणीशीचें काम पूर्वीप्रमाणेंच ए. रंगस्वामी अय्यंगार यांच्याकडे राहिलें. माझी निवडणूक उपाध्यक्षाच्या जागीं झाली हें यांचेंच प्रत्यंतर कीं नेहरू व पटेल यांच्या खालोखाल मला स्वराज्यपक्षांत मान्यता होती. तथापि पटेल अध्यक्ष झाल्यावर त्यांच्या जागीं असेंब्लींत पुढाकार घेऊन बोलण्या चालण्याचें काम रंगस्वामी अय्यंगार हे करीत. त्यांना बोलण्याची कला माझ्यापेक्षां अधिक अवगत होती. तीच गोष्ट सभाधीटपणाची. आधी-पासून भाषण करण्याचें पार्टीच्या सभेंत ठरलें तर तें माझेकें काम मला सांग-ण्यांत येत असें. कारण कोणच्याहि विषयावर भाषण करावयाचें तर त्या विष-याचा आधीं अभ्यास करून सविस्तर व समर्पक भाषण मी करीन असा पार्टीच्य सभासदांचा विश्वास असे. पण आयत्यावेळीं उठणाऱ्या वादळाला तोंड देण्यांत मी तितकासा पटाईत नव्हतों शिवाय पुष्कळ लोकांच्या मानानें माझें कर्णेंद्रिय कमी तिखट असें. माझी गणना अगदीं बहिऱ्यांतच नव्हती, पण युरोपियन लोक हलक्या आवाजानें अस्पष्ट उच्चारानें बोलतात तें मला चांगलेसें उमजत नसें.

दूर अंतरावर होणाऱ्या हिंदी सभासदांच्या भाषणांचीहि तीच गत. शिवाय खासगी रीतीनें स्वस्थपणें बसून वादविवाद करण्यांत मी फारसा कोणाला हार जाणारा नव्हतों तरी सभेंतल्या दंगलींत मी गोंधळून जात असें.

माझ्या अंगीं वक्तृत्वाचा गुण प्रथमपासूनच कमी होता. त्यांतूनहि इंग्रजी भाषण करण्याचा. याला दोन तीन मोठीं कारणें होतीं. पहिलें असें कीं, आवाज मऊ सफाईदार नाहीं. थोडासा घोगरा आहे. आणि आपले बोलणें सर्व समाजाला ऐकूं जावें अशी मनांतून नेहमीं इच्छा असल्यामुळें मी बोलतों तें आवाज मुद्दाम मोठा काढून जोरानें बोलतों. यांतच माझा घसा खोकलेवाईक असल्यामुळें बोलण्याला मधून मधून प्रतिबंध होतो. पुष्कळ वेळां घसा बसतोहि. तसें झालें म्हणजे दमयुक्त होते व बोलण्यांतील स्वारस्य जातें. माझी स्मरणशक्ति सराईत नाहीं. ती आयत्या वेळीं दगा देते. यामुळें मी नेहमीं कागदावर मुद्दे टिपून घेऊन त्याकडे मधून मधून पाहून बोलतों. अर्थात् बोलण्याचा प्रवाह अस्खलित चालत नाहीं. मला सरळ युक्तिवादाचें बोलणें तेवढें येतें. खऱ्या वक्तृत्वाला कोठूनहि प्रारंभ करून वाटेंत वाटतील तीं वळणें घेऊन आपल्या कल्पनाशक्तीच्या बळावर वेळ मारून नेतां येतें. पण-विषय प्रतिपादन हाच माझ्या कोणत्याहि भाषणाचा हेतु असतो. मुख्य विषयाला लागू ( Relevant ) काय याची माझी समजूत तीक्ष्ण असल्यामुळें मला फारसे फाटे फोडतां येत नाहींत. आणि फाटे फोडण्यांत गैर-लागू असें विचार प्रगट होताच माझें मनच माझा निषेध करूं लागतें. त्या आत्म-निषेधानें मी खजिल होतों, आणि बोलण्यांत विरस होतो. जन्मभर आठवीत आठवीत जुळवीत जुळवीत लिहिण्याची संवय लागल्यामुळें विचार प्रगटीकरण्याची माझी गति मंद आणि कुंठित असते. आणि गति जितकी अधिक तितकी उद्गारांत तीव्रता आणि सुरेलपणा येतो हे फोनोग्राफवर चांगलेंच कळून येत नाहीं काय !

सार्वजनिक आयुष्यांतल्या पहिल्या पंचवीस वर्षेपर्यंत मला मराठी बोलणेंहि चांगलें साधत नसे. पण पुढें सरावच पुष्कळ झाल्यानें मला सभाधीटपणा आला, व त्याबरोबर बोलणें कसें तरी रेटून नेतां येऊं लागलें. मराठी ही माझी जन्म-भाषा. व्याकरणाची आठवण करावी लागत नाहीं म्हणून शुद्धाशुद्धाकडे लक्ष द्यावें लागत नाहीं. आणि वाचनानें बहुश्रुतपणा आल्यानें विचारांची किंवा

योग्य शब्दांची फारशी वाण पडत नाहीं. यामुळें मला कोणत्याहि विषयावर मराठी बोलणें अवघड वाटेनासें झालें. तरी अजून मला असें वाटतें कीं, माझें मराठीहि भाषण मला न कळत कोणी फोनोग्राफवर जशाचें तसें उतरून घेऊन मला परत वाजवून दाखविलें तर अपूर्ण राहिलेलीं वाक्यें, अशुद्ध पडलेले व्याकरण-प्रयोग, क्वचित् अनुचित शब्द, आणि देशी विदेशी शब्दांचें मिश्रण इत्यादि पाहून माझें मलाच हसूं येईल. माझीं भाषणें अलीकडे लोकांना आवडूं लागलीं यांत मात्र शंका नाहीं. पण त्याचें खरें कारण माझी वक्तृत्वकला हें नाहीं. तर माझ्या भाषणांत विषयप्रतिपादन समर्पक, युक्तिवाद नीटस श्रोत्यांना पटण्यासारखा, उपमा दृष्टांतांचा भरपूर उपयोग, वाङ्मयाची मधून मधून फोडणी, बहुश्रुतपणाचा ठसा इत्यादि गुण प्रकट होऊं लागले हें होय ! पण याहून आणखी मोठे माझे दोन गुण म्हणजे मी भाषणांत बहुधा नवीन असें कांहीं तरी सांगतों,—जुन्याहि विचारांची नवी मांडणी करतों—हें एक, आणि बोलणें विनोदशील असतें हें दुसरें. यामुळें हसूं येऊन श्रोत्यांचा श्रमपरिहार होण्याला सहाय्य होतें. मी सभा जिंकली तर वक्तृत्वानें नव्हे तर विवेचनानें व विनोदानें जिंकतों.

पण इंग्रजी बोलण्याची अडचण याहून मोठी. शब्द-वाक्यरचना व्याकरण ही सर्वच परकी. टेबलाशीं बसून इंग्रजी भाषा विचारपूर्वक सजवून लिहिण्याची संवय. उचित–अनुचिताचें ज्ञान घासून पुसून तीक्ष्ण झालेलें. आणि इंग्रजी भाषण करण्याच्या वेळीं श्रोत्यांमध्यें इंग्रज दिसला म्हणजे परीक्षकापुढें विद्यार्थी उभा राहिला असतां तो जसा गांगरून जातो तसाच मीहि. लिहून वाचलेल्या इंग्रजी भाषणांनीं मी इंग्रजाकडूनहि शाबासकी मिळवूं शकेन असा आत्मविश्वास वाटे. परंतु बोलण्याची वेळ आली म्हणजे सभाधीटपणा पळून जाई. आणि सर्कशीच्या रिंगणांत सोडलेल्या पशुपक्षाप्रमाणें मी प्रायः गांगरून जाई. शिवाय सांगण्याला वाईट वाटतें कीं अलीकडील इतक्या वर्षांच्या संवयीनेंहि मी खरा सभाधीटपणा शिकूं शकलों नाहीं. इंग्रजी भाषण करण्याचा प्रसंग आला कीं अजूनहि मोठें संकट वाटतें. ही गोष्ट माझीच काय शिवरामपंत परांजपे यासारख्या नामांकित महाराष्ट्रीय वक्त्यांचीहि होती. मला पक्कें आठवतें कीं एकदा दासबाबू वगैरे बंगाली पाहुणे पुण्यास आल्यावेळीं सार्वजनिक सभेंत त्यांच्यापुढें इंग्रजी भाषण करण्याचा प्रसंग शिवरामपंतांवर आला. तेव्हां ते कसे तरी पांच मिनिटें अडखळत थांबत एकदाचें बोलले झाले ! पण शाळेंतील नवशिका विद्यार्थी बोलावा तसें

त्यांचें भाषण झालें. त्याची त्यांना व आम्हांलाहि लाज वाटली ! आणि " महाराष्ट्रांतील हा पहिल्या प्रतीचा नामांकित सभा हलवून सोडणारा वक्ता " असें या पाहुण्यांना कोणी सांगितलें असतें तर ते म्हणते " वः आमची काय थट्टा करितां होय ! "

असो. कसेंहि असलें तरी असेंब्लींत गेल्यावर उठल्या बसल्या इंग्रजीमध्यें भाषण करण्याचाच प्रसंग. म्हणून त्या दृष्टीनें मी स्वतःला पात्रता आणून घेऊं लागलों. ती पात्रता म्हणजे जो विषय चर्चेला निघणार त्याची माहिती करून घेणें, आणि बोलण्याचा प्रसंग येईल तो साधणें. यामुळें देखील माझें वक्तृत्व पुष्कळ सुधारलें असें नाहीं, पण पुण्यास मला जी मुळींच संवय नसे ती होऊं लागली. मी मुख्यतः भाषणें केलीं तीं माझ्या (Pleasures and Privileges) या पुस्तकात दिली आहेत ती " वाचून पाहूनच " ज्याला माझ्या वक्तृत्वाची कल्पना करावी लागेल तो कदाचित म्हणेल कीं मी बऱ्यापैकीं एक वक्ता होतो. पण प्रत्यक्ष तीं ऐकणाऱ्या लोकांना त्या कलेबद्दल मला तितकें चांगलें सर्टिफिकीट-प्रशस्तिपत्र देतां आलें नसतें. पण दुसरी मला अनुकूल अशी एक गोष्ट सांगितली पाहिजे की, पुष्कळ इतर सभासदापेक्षां विद्वत्ता व वाङ्मय यांचा जिव्हाळा आणि प्रत्यक्ष उपयोग हा माझ्या भाषणांतच अधिक सांपडेल. उलट एक उदाहरण बॅ. जिना यांचें देण्यासारखें आहे. ते फार परिणामकारक भाषणें करीत. पण तीं केवळ त्याक्षणीं तीं ऐकणारा पुरतीं. ते विवाद कुशल, वकीली पद्धतीनें फड मारून नेणारे. ते उत्कृष्ट नट असत. आवाजाचा चढ उतार, ठेकेबाजपणा, अंगविक्षेप या साधनांनीं ते उत्कृष्ट परिणाम करीत. पण त्यांचें कोणतेंहि भाषण काढून मागाहून वाचलें तर त्यांची भाषा सामान्य कॉलेज विद्यार्थ्यापेक्षां अधिक चांगली वाटणार नाहीं. भाषा सोपी व्यावहारिक पण अगदीं रुक्ष निरस ! या माणसाला वाङ्मय म्हणजे काय पदार्थ असतो याची कल्पनाहि नसेल असेच वाचकाला वाटेल. माझीं भाषणें निबंधाच्या पद्धतीचीं. जिना यांचीं अस्सल वक्त्याच्या थाटाचीं !

वक्तृत्व कला सोडून इंग्रजी भाषेच्या दृष्टीनें पाहिलें तर माझ्या भाषणांविषयीं जाणत्या सभासदांचें मत काय होतें यावें उदाहरण द्यावयाचें तें सर डेनिस ब्रे यांचें. सगळ्या सरकारी युरोपियन सभासदांत ते वाङ्मयप्रवीण व साहित्यिक म्हणून ख्याति होती. शेक्सपियर संबंधीं त्यांनीं नव्या विचारांचें पुस्तक

लिहिलें आहे. त्यांनीं असेंब्लीच्या एका सभेंत भाषण करतांना माझा उल्लेख खालीलप्रमाणें केला. "केळकर बोलावयास उठले म्हणजे मी लक्ष लावून सरसावून त्यांचें भाषण ऐकावयास बसतों. आणि तें ऐकतांना अर्धातास आनंदांत जातो. कारण त्यांच्या भाषणाची शैली सभ्य सुसंस्कृत असून त्यांत वाङ्मयाची लजत असते. तसेच विनोदी चुटके मोठे गमतीचे असतात. आज मात्र त्यांच्या मनांत नाहीं तें बोलण्याचा प्रसंग त्यांच्यावर दिसतो, म्हणून त्यांत कृत्रिमपणा आला आहे." ( हा प्रसंग पब्लिक सेफ्टी बिलाचा होतासा वाटतें. )

असेंब्लीचे प्रेस-रिपोर्टर लेही मला सांगत कीं "तुमच्यांत वक्तृत्वाचा ओघ नाहीं. तुम्ही सावकाश आणि संगतवार बोलतां हें आमच्या पथ्यावरच पडतें. तसेंच तुमचें भाषण उतरून घेतांना एकप्रकारें आनंद वाटतो. कारण त्यांत विद्वत्ता आणि विनोद असतो. तुमच्याकडून पुर्फे वाचून परत आलीं म्हणजे त्यांत खोडाखोडीहि थोडी असते, कारण तुम्ही बोलतां तेंच जपून सरळवाक्यांनीं बोलतां." ही स्तुति तोंडदेखली नसून प्रांजलपणाचीच होती असें मी कसें म्हणूं ? पण असेंब्लींतली माझी दहा पांच भाषणें तरी अशी काढून दाखवितां येतील कीं त्यांचें भूषण मला यथार्थ रीतीनें मानतां येतील. तथापि असेंब्लींतील वक्त्यांमध्यें कोणी माझी गणना करूं शकला नसता.

वरिष्ठ विधिमंडळाचा सभासद या नात्यानें दिल्ली व सिमला येथें १९२४ पासून १९३० पर्यंत मधून मधून माझा मुक्काम पडत असे. १९२६ सालीं स्वराज्य पक्षांतून मी बाहेर पडल्यामुळें विधिमंडळावा राजीनामा दिला. आणि फिरून १९२७ पासून त्या मंडळांत प्रविष्ट झालों. पण १९३० सालच्या पहिल्या बैठकी नंतर पुन्हा राजीनामा दिला. सात वर्षांत पांच सात मुक्काम दिल्लीस झाले आणि पांच सात सिमल्यास झाले. हे मुक्काम कामकाजामुळें गर्दीचें पण इतर रीतीनें सुखाचे गेले. दिल्लीस विधिमंडळाच्या बैठकी बहुधा थंड हवेच्या दिवसांत आणि सिमल्यास उन्हाळ्याच्या दिवसांत होतात. यामुळें प्रकृतीला ते मुक्काम मानवत. दिल्लीस जानेवारीपासून एप्रिलच्या प्रारभापर्यंत रहावें लागे. यामुळें प्रथम भर थंडीचा कडाका, नंतर फेब्रुआरींत समशीतोष्ण सुखकर अशी हवा, आणि मार्च अखेर उन्हाळा अशा तीन प्रकारची हवा एकाच मुक्कामांत अनुभवावयास मिळे. जानेवारींत खोलीचीं दारें बंद करून शेगडी पेटवून बसावें लागें तर मार्चअखेर

पंखे चालू करून वारा घ्यावा लागे. मात्र मध्यंतरीं वसंत पंचमीस अशी सुंदर हवा कांहीं दिवस भोगावयास मिळे कीं जन्मभर तशी असेल तर बरें असें वाटें. दिल्लीचें पाणीहि गोड व आरोग्यकारक. नवी दिल्ली सुंदर बांधलेली. पटांगणें उद्यानें भरपूर. रस्तेहि उत्तम. गर्दी अगदीं कमी. यामुळें चालण्याचे श्रम किंवा करमणूक करण्यास तें स्थान फार रम्य व सुखदायक वाटे आणि भूक चांगली लागून शरीराचें वजनहि थोडें वाढें.

सिमला सात हजार फूट उंच. यामुळें तेथील हवा उन्हाळ्यांत चांगली सुखाची खरी. तथापि तेथें हवेमध्यें एका दिवसांत तीन तीन प्रकार होत. यामुळें निश्चित धोरणानें वागणें कठिण होत असे. केव्हां धुक्यानें दिशा धुंद व्हाव्या तर केव्हां पाऊसच धो धो पडूं लागावा. यामुळें बाहेर पडतांना हवा एक प्रकारची तर परत येतांना दुसऱ्या प्रकारची इतके त्वरित परिवर्तन घडें. ऊबदार कपडे नेहमीं अंगावर घालावे लागत, आणि निघतांना स्वच्छ ऊन पडले असले तरी पावसाळी ओव्हरकोट हाताशीं सज्ज ठेवावा लागे. कारण केव्हां हवेंतील ऊब नाहींशी होऊन पावसानें भिजावे लागेल आणि थंडी बाधेल याचा नियम नसतो. तसेंच सिमल्याचें पाणी थंडगार पण रुचीला दिल्लीसारखें गोड नसून फारच जड. यामुळें हवें तितकें प्यावें तरी पंचाईत आणि न प्यावें तरी पंचाईत. पाणी जड म्हणून चालण्याचे श्रम करावे लागत, आणि सिमल्यास चालण्याचा व्यायाम करण्याला बाहेर पडावे तर चढउतार फार. व्यायाम कमी पडला तर अन्न बाधावयाचें, आणि थोडें खाल्लें तर भूक बाधावयाची. हवा स्वच्छ असेल तेव्हां प्रसन्नता वाटे पण कुंद झाली म्हणजे मन उदास होऊन जाई. चालत जावें तर श्रम होतात. आणि मनुष्य वाहन ( रिक्शा ) वापरावें तर माणुसकीच्या दृष्टीनें अप्रशस्त वाटतें. सिमल्याचें ठिकाण केवळ साहेब लोकांच्या सोईचें. आणि तेथल्या मुक्कामाचा आनंद तेच खरे भोगीत. सिमल्याच्या बैठकीला मी मनांतून कंटाळे. आणि तो मुक्काम केव्हां संपवून खालीं जातो असे मला होई.

दिल्ली सिमला येथें सरकारी वसतिगृहाची सोय आहे. नव्या दिल्लींतले बंगले सोईचे असून विधिमंडळाच्या गृहापासून फार लांब नाहींत. तथापि जेवण केल्याबरोबर चालत जाणें जिवावर येई. म्हणून जातांना मोटारींतून जावें आणि येतांना पायानें चालत यावें असा माझा साधारणपणें क्रम असे. सिमला येथील कार्ट रोडवरील बंगल्यांत मी रहात असे ती जागा रस्त्यापासून सुमारें चार-पांचशे

फूट खालीं. यामुळें जेवल्यावर पुस्तकें कागदपत्र व पावसाळी ओव्हरकोट इतकें ओझें घेऊन चढून जाणें कठिण म्हणून मी बहुधा जातांना रिक्शा करूनच जाई. आणि परत येतांना चालत येई. सुटीच्या दिवशीं किंवा फावल्या वेळीं दूरवर हिंडण्यासाहि जाई. पण हा ठरीव मार्ग फार रुक्ष व धुळीने भरलेला असे. सिमल्यास हिंडण्या-फिरण्याचें खरें सुख भोगावयाचें तर मुख्य मार्ग सोडून आजूबाजूस भटकलें पाहिजे. मात्र सर्वत्र उंच वृक्षांची झाडी असल्यामुळें सिमल्यास आडमार्गानें भटकणाराला उन्हाचा त्रास होत नाहीं. कोठेहि गेलें तरी खालीं खोलवर नजर पोंचून निरनिराळे रम्य देखावे दिसतात. पाण्याचे प्रवाह मात्र फारसे आढळत नाहींत. सिमला हा हिमालयाचाच भाग असला तरी खरा हिमालय याहून अधिक उंच जावें तेव्हांच पहावयास सांपडतो. सिमल्यास दाट जंगल असें कमी. वृक्ष अतिशय उंच पण तुरळक. यामुळें खालच्या बाजूला हिंडण्या-फिरण्याला अडचण पडत नाहीं. अडचण खरी काय ती उंचनीच भूमिभागाची.

दिल्ली सिमला येथील मुक्कामांत आम्ही दक्षिणी मंडळी क्लब बनवून एकत्र जेवणखाण करीत असूं. त्याकरितां पुण्याहून दोन आचारी आणि एक गडी नेत असूं. शिवाय तेथील एखादा नोकरहि असे. या क्लबची सर्व व्यवस्था रा. अनंतराव फडणीस हे ठेवीत. ते केसरी कचेरीचे नोकर असून सरबराई खातें सर्वस्वी त्यांच्याकडे सोंपविलेलें असें. १९१६ पासून १९२० पर्यंत ते टिळकांच्या दौऱ्यांमध्यें प्रवासांतील सर्व व्यवस्था त्यांच्याबरोबर हिंडून ठेवीत. तसेंच टिळकांकडे येणारे पाहुणे, त्यांच्यासंबंधी होणाऱ्या सभा-समारंभ, आणि केसरी कचेरीचीच पण घरगुती निमस्वरूपाची सर्व कामें त्यांजकडेच सोपविलेली असत. टिळकांच्या पश्चात त्यांची नेमणूक मजकडे झाली. तींतहि पूर्वीचेंच काम त्यांच्याकडे दिलें गेलें. लेखक या नात्याचा दुसरा एक सेक्रेटरी किंवा शॉर्टहँड टाइपिस्ट मी केसरी कचेरींतलाच घेई. शिवाय कचेरींतला एखादा दुय्यम संपादक मजबरोबर विधिमंडळाचें काम पाहण्यास येई तोहि लिहिण्याच्या कामीं उपयोगी पडे. तथापि क्लब संभाळण्या चालविण्याचें काम सर्वस्वी फडणीसांकडेच असें. बंगल्याचे केर काढविणें, पैशाभराची भाजी आणविणें, येथपासून खाजगी सभा संमेलनें मेजवान्या सार्वजनिक लोकांच्या गांठी भेटी आणि गुप्तमसलतीचीं कामें, येथपर्यंत सर्व काम फडणीस करीत. आणि तें इतकें आस्थेवाईकपणें आणि बिनबोभाट करीत कीं याची सर दुसऱ्या कोणालाहि आली नसती.

क्लबच्या व्यवस्थेला फडणीसासारखा मनुष्य लाभला म्हणून आम्हा ऋणानुबंधी लोकांना एकत्र राहतां आलें आणि खर्चहि बेताचा पडला. १९२४ साली मी, लोहोकरे, मुतालीक, करंदीकर, बेळवी, अणे, अभ्यंकर असे एकत्र बंगल्यांत राहत होतों. सोईच्या दृष्टीनें ( किंवा कांही अंशी स्वभावाच्या दृष्टीनेंहि म्हणण्यास हरकत नाही ) आम्ही एकेका खोलीत राहण्याकरितां खालील जोड्या लावल्या होत्या. १ मी व बेळवी, २ करंदीकर व मुतालीक, ३ अणे व अभ्यंकर. डॉ. लोहोकरे यांची एकट्याची निराळी व्यवस्था केली होती. लोहोकरे हे सदा आजारी असत. त्यांना ऊष्ण उपचार फार लागत. इतके कीं त्यांच्या विजेच्या शेगडीला एकदां एका महिन्यांत पन्नास रुपये खर्च आला. त्यांचा स्वभावहि तापट आणि कोणाशी फारसा जुळण्यासारखा नव्हता. मुतालीक व करंदीकर हे दोघेहि एकाच सातारा गांवचे लेही. दोघेहि स्नानसंध्याशील. सोवळें ओवळें मानणारे. अणे व अभ्यंकर यांची जोडी ते केवळ वऱ्हाड-नागपूरचे म्हणून लावण्यांत आली होती. अणे हे कर्मठ स्नानसंध्या करणारे तर अभ्यंकर यांची मजल मांसाहारापर्यंत जाणारी. दोघांचे स्वभावहि निरानिराळे. अणे मिळतें घेणारे सहनशील, तर अभ्यंकर हे उग्र स्वभावाचे उद्दाम व आपलाच हेका चालविणारे. परंतु अभ्यंकर हे अण्यांना वडीलकीचा मान देत व अणे त्यांना अरे जारे म्हणणारे. यामुळें सर्वांत त्यांचीच जोडी अधिक जमण्यासारखी होती. मी व बेळवी यांचा स्वभाव फार जुळे. आणि पांच वर्षे आम्ही एकत्र राहिलों होतों तरी त्यांचें माझें जुळलें नाहीं असा एकहि प्रसंग मला आठवत नाहीं.

अभ्यंकराचा स्वभाव थट्टेखोर. पण त्यांच्या थट्टेचें पर्यवसान कोणा इतराच्या निंदेत हटकून व्हावयाचें. त्यांच्या भाषणांत लावून बोलण्याचा प्रकार इतका असे कीं तो त्यांच्या थट्टेखोरपणानेंहि नीटसा झांकून जात नसे. डॉ. लोहोकरे यांना आपली थट्टा केलेली कळत नसे. आणि कोणी आपली व्याजस्तुति केली तरी ते ती खरी मानीत. क्लबासारख्या मेळांत, कोणी एक असा मिळाला म्हणजे मग ज्यानें उठावें त्यानें त्याची टिंगल करीत सुटावें असें होतें. लोहोकरे हे जात्या बुद्धिवान खरे. पण त्यांचें शिक्षण एकांगी आणि बेतापुरतें होतें. त्यांना असें वाटें कीं, आपण अर्थशास्त्रीय विषयांत मोठे निष्णात आहो. पण त्यांचें त्यांना नुसते वाटत असते तरी ठीक होते. पण ते आपल्या आवाक्यापलीकडे जाऊन विधिमंडळांत बोलण्याचें धाडस करीत. यामुळें त्यांचें हसूं होई. या त्यांच्या स्वभावदोषाला

अनुलक्षून अभ्यंकर यांनी एकदां एक नाटकच केलें. विधिमंडळाचे काम संपून क्लबाचे आम्ही सभासद घरोघर जाण्याला निघण्याच्या वेळीं लोहोकरे यांना क्लबांत औपचारिक रीत्या 'मानपत्र' द्यावयाचा कट अभ्यंकरांनीं केला. मानपत्र लिहून काढलें. फुलांची माळ आणविली. आणि चहाच्या निमित्तानें सर्वांना, म्हणजे पांचसात असामींना, एकत्र करून त्यांतल्याच एकाला अध्यक्ष नेमून ओतप्रोत स्तुतीनें भरलेलें मानपत्र अभ्यंकरांनी मोठ्या गंभीरपणानें वाचून दाखविलें आणि मग गळ्यांत माळ घातली. ही थट्टा न उमगून सर्व प्रकार प्रांजलपणाचा असें समजून लोहोकरे यांनी मोठें थाटदार उत्तरहि दिलें. आणि हा सर्व वेळ आम्हा इतरांना आपली विनोदबुद्धि इतकी आवरून धरावी लागली कीं जसें कांहीं गुदमरल्यासारखें होऊन गेलें.

अभ्यंकर हे माझी थट्टा करण्याच्या भानगडींत फारसे पडत नसत. आणि त्यांना मनांतून मी आवडत नसून ते माझा थोडासा द्वेषहि करीत. त्यांना वाटे कीं, केळकरांनाच या क्लबाचे आणि पर्यायानें महाराष्ट्र वऱ्हाड व नागपूर या प्रांतांतील सभासदांचे पुढारी मानतात ते काय म्हणून ! पण नेहरूप्रभृति तसे मानीत खरे. स्वराज्य पक्षाच्या व्हिपचें काम माझ्याकडे होतेंच. पण कार्यकारी मंडळांत तरी नागपूरचा प्रतिनिधि म्हणून आपणाला घ्यावें असें अभ्यंकरांना मनांतून वाटे. उलट या मंडळांत जागा ठरीव व थोड्या. यामुळें पं. नेहरू खऱ्या भावानें म्हणत कीं, "एक केळकर आहेत ते तुम्हां महाराष्ट्रीय सभासदांचे प्रतिनिधि आहेतच." पण मला अशी पंचाईत पडे कीं, अभ्यंकरांना घ्या म्हणावें तर आमच्या आमच्यांत फूट आहे असें जाहीर केल्यासारखें होतें, आणि घेऊं नका म्हणण्याचे तर कांहींच कारण नव्हतें. पण पुढें अभ्यंकर मला नकळत या गोष्टीचा आपाप्रसांत गवगवा व तक्रार करूं लागले. शेवटीं एक दिवस त्यांनीं माझ्यावर उघडपणें असा आरोप केला कीं मी इतर प्रांतांचें हित पहात नाहीं. याचा मलाहि राग आला. आम्हां दोघांचें कडाक्याचे भांडण झालें. तेव्हां मी पुढील निवडणुकीच्या वेळीं 'कार्यकारी मंडळांत नागपूर प्रांताला वेगळा सभासद द्या' असा आग्रह धरला व खरा प्रकार उघडकीस आणून तो आग्रह सिद्धीस नेला. अभ्यंकरांचा व माझा स्वभाव कधी जुळण्यासारखे नव्हतेच. शिवाय त्यांनीं वैरी मानलेल्या डॉ. मुंजे यांचा पक्षपाती मी असा त्यांचा समज होता. यामुळें ते मनांतून जळत..

आणि ही बेबनावाची स्थिति पुढें कधीं सुधारली नाहीं इतकेंच नव्हे तर अखेर अखेर तिचा कडेलोट झाला.

अशा प्रकारचा थोडासा गुप्त बेबनाव आमच्यांत असला तरी तो बाहेर पडत नसल्यानें, कर्नाटकी बेळवीसकट आम्ही महाराष्ट्र मंडळी म्हणजे सहजीवित्वाचा मित्रत्वाचा व एकजुटीचा नमुनाच असें विधिमंडळांतील इतर बहुतेक मानीत. महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यांतील आतांचा भेद तेव्हां डोकें वर काढून प्रगट झाला नव्हता. आणि बेळवी हे सज्जन असून हे दोन प्रांत वेगळे असें त्यांना कधींच मनांतूनहि वाटत नसें. इतर सभासदांतहि कांहीं कांहीं गट असेंच असत. पण ते ख्यालीखुशाली व खेळ यांच्याकरितां विशेष प्रसिद्ध असत. आमच्या क्लबांत फार तर गप्पा मारण्यांत वेळ जाई. पण आम्हांपैकी कोणीहि पत्ते खेळण्यांत वेळ दवडला नाहीं. जो तो आपापल्या कामांत गर्क असे. अभ्यंकरांचा तडाखा पाणचट इंग्रजी कादंबऱ्या वाचण्यावर असावयाचा. आणि अश्लील बोलण्यांत ते फार पटाईत असत. ते चालू विषयाचा अभ्यास असा क्वचितच करीत. वर्षांतून एकदां एखाद्या राजकीय विषयावर ते बोलावयास उठावयाचें. आणि मग आपल्या धिप्पाड शरीरास शोभण्यासारख्या राक्षसी आवाजाने सरकारची हजेरी घेतांना वर्षभर साठविलेली कुचकी नासकी विशेषणें सरकारपक्षाला अर्धा तासभर समर्पण करावयाचे. बेळवी फावल्यावेळीं आपले आवडते इंग्रजी ग्रंथकार व कवी वाचीत बसावयाचे. अणे प्रचलित विषयाचे कागदपत्र आस्थेनें व बारीक नजरेनें वाचीत. तेहि एखादेंच वेळीं भाषण करीत तेव्हां त्यांचा आवेश फार प्रकट होई. त्यामुळें बोलतांना त्यांचे पाय पायांत अडखळत. पण त्यांची इंग्रजी भाषा व मुद्दे सांगले असत.

करंदीकर व मुतालीक दोघांचेंहि बरेंचसे काम दिल्ली सिमला येथील मोठमोठ्या लोकांच्या गांठी भेटी घेण्याचें असें. करंदीकर हे बुद्धिवान असून संभाषणांत मोठी गोडी उत्पन्न करणारे असत. आणि बाहेर कोण काय बोलतो, कोठें काय चालले आहे, याची माहिती ते एखाद्या मधुमक्षिकेप्रमाणें गोळा करून आणीत. तथापि अशा औपचारिक संभाषणात गोरा अधिकारी आपल्या मनचें खरें कोणास कांहींच सांगत नसतो, म्हणून तुमचे ओळखी करण्याचे श्रम व्यर्थ आहेत, असे म्हणून आम्ही विनोदानें त्यांची थट्टा करावयाचे. बालसंगोपनासारख्या विषयाचें निमित्त करून युरोपियन अधिकाऱ्यांच्या स्त्रियांच्या भेटी घेण्यापर्यंत त्यांची मजल

जाई ! मुतालीक हे सरदार इनामदार वर्गाचे प्रतिनिधि म्हणून निवडून आलेले असल्यामुळें अधिकारी लोक त्यांना विशेष मान देत, आणि सरकारतर्फे एखाद्या उपमंडळावर सभासद नेमण्याचा प्रसंग असतां त्यांची नेमणूक करीत. मुतालीक हे बुद्धिवान असूनहि त्यांचे चर्चेचे विषय मोजके ठराविक, आणि विशेषतः इनामदार जमीनदार सरदार वर्गाच्या हित संरक्षणाचे असत. आणि हें हित ते चांगले संभाळीत. वास्तविक त्यांचा ऋणानुबंध लोकपक्षापेक्षां सरकारपक्षाशीं अधिक. असे असतांहि मत देण्याची वेळ आली म्हणजे ते सरकारची निराशा हटकून करीत. आणि ते लोकपक्षांत उघडपणें सामील नसले तरी, मतनोंदणीच्या अदमासांत त्यांचें मत सरकार विरोधी पक्षाकडेच पडावयाचे असे आम्ही सर्रास घेऊन चालत असूं.

आम्हापैकीं करंदीकर व वेळवी हे नियमानें हिंडण्या फिरण्याला जात. अणे यांना आवेशयुक्त वादविवादाच्या हौसेमुळें बसल्या बसल्याच व्यायाम घडे ! मला हिंडावयास जाण्याचा कंटाळा तसाच वादविवादाचा. शिवाय मला लिहिण्या वाचण्याचें काम असें, आणि या कामाचें निमित्त करून मला बैठेपणाची संवय किंवा व्यसन भागवितां येई. मी उरला सुरला सर्व वेळ एकलकोंडेपणानें आपल्या खोलींतच बसून लिहिण्या वाचण्यांतच घालवी. तोंडानें मजकूर सांगून लिहविण्याचें एक मोठें साधन म्हणजे लघुलेखक हाताशी असल्यामुळें मला माझें व्यसन आळवितां येई. माझ्या टेबलावर उत्तर न देतां पडून राहिलेलें पत्र कधीं सांपडावयाचें नाहीं. केसरीला नित्य नवा मजकूर, बातमीपत्रें किंवा स्वतंत्र लेख यांच्या रूपानें, पाठविण्याची नड ही मला आयती निमित्तादाखल उपयोगी पडे. दिल्ली सिमल्याम असलो तरी अभिप्रायार्थ पुस्तकें येऊन माझी पाठ शिवीत. आणि तेंहि एक मोठें कामच होऊन बसें. परंतु स्वतःच्या स्फूर्तीनेंहि मी लघुकथा लिहिणें, कविता ( केव्हां इंग्रजी विनोदी ) करणें हीं कामें करीं. विधिमंडळाच्या ग्रंथालयांतून रोज एखादें नवें पुस्तक मी आणीत असें, तें वाचण्यांत वेळ जाई. आणि एकेरी पक्षाच्या सभा, दुहेरी तिहेरी पक्षाच्या सभा, या भरीला असतच. तात्पर्य हिंडाफिरायला न जाण्याला निमित्त हुडकणारा मी भला, आणि तें निमित्त पुरविणारें दिल्ली सिमल्याचें सार्वजनिक जीवनहि भलें, असा मेळ बसे. इतर कसल्याहि भानगडींत न पडणारे बेळवी या विषयीं माझी थट्टा नेहमीं करीत. आणि लघु-

लेखक हाताशीं पुढें घेऊन बसलेला मला त्यांनी पाहिले म्हणजे ते म्हणत "हे पहा लठ्ठ उदराचे गणपति. आपलें मूषकवाहन आपल्यापुढें घेऊन बसले आहेत."

जी गोष्ट दिल्ली सिमल्याच्या मुक्कामांत बाहेर पडून हिंडण्याफिरण्याची तीच आसपासचे प्रांत पहाण्याची. विधिमंडळाच्या बैठकी चालू असतां लगतच्या प्रांतांत हिंडून प्रवास करून प्रेक्षणीय स्थळें पहाण्याला पुष्कळ सवड असते. आणि आमच्यांतले अनेक लोक हिंडून फिरून येतहि. पण मी तसे हिंडण्याफिरण्याचा कंटाळा करी. येऊन जाऊन सरहद्दप्रांतांत दौरा काढण्याची व्यवस्था सरकारकडून झाली, सर्व प्रवास विनखर्ची व सुखाचा व्हावयाचा होता, म्हणूनच मी दौऱ्यांत सामील झालों. परंतु ऋषीकेश डेहराडून वगैरे अनेक प्रेक्षणीय स्थळें आसपास असतां मी जाण्याचा कंटाळा केला. काश्मिर पहावे असें मनांत फार येई. पण तेंहि घडले नाहीं. सिमल्याच्या बैठकीकरितां गेलों म्हणजे काश्मिरला जाण्याचे माझे व बेळवी यांचे बेत सुरूं व्हावयाचें. परंतु बैठक संपण्याची वेळ आली म्हणजे बेळवीना बेळगांवास परत जाऊन वकिली चालूं करण्याचा तगादा मनांतून सुरू होई, आणि तहकूबी मिळविलेल्या दाव्यांच्या तारखा पाहण्याकरितां ते आपलीं रोजनिशी चालू लागावयाचे. त्याप्रमाणें मी पुण्यांत किंवा बाहेरगांवीं आमंत्रणें पतकरून कामें मागें लावून घेतलेली असत, त्यांच्या तारखांची आठवण जागी करण्याकरितां मीहि रोजनिशीची पानें चाळू लागे. तात्पर्य, कौन्सिलची बैठक संपतांच कोणती गाडी परतीच्या प्रवासाला पकडतां येईल याचे बेत सुरूं होऊन, काश्मिरचा प्रवास अपूर्ण मनोरथाच्या यादींत लिहून, आम्ही आपलें सामान बांधण्याची तयारी करीत असूं.

विधिमंडळाच्या निवडणुकींना खर्च येई तरी पुढें दिल्ली सिमला येथील मुक्कामांचा खर्च सरकाराकडून मिळणाऱ्या रोजीं वीस रुपयांच्या पगारांतून भागे. आम्ही क्लब केल्यामुळें राहण्या-जेवण्याचा खर्च थोडाथोडा वांटून जाई. शिवाय आमचा क्लब श्रीमंतीचा आव आणून कोणाला मेजवान्या जाफती देण्याच्या भानगडीत पडत नसे. आपणाला परत भेटीच्या पाहुणचाराकरितां लोकांना बोलवितां येत नाहीं मग आपण तरी लोकांचा पाहुणचार कां घ्या ? अशा विचारानें मी कित्येक मेजवान्यांचीं आमंत्रणें कांहीं तरी निमित्त सांगून टाळीत असें. जेवणाखाण्याला जाणें ही आहाराच्या दृष्टीनेंहि मला उपाधी अशीच वाटे. आम्ही दक्षिणी माणसें श्रीमंत नाहीं, गरीब असतो, अशी दिल्ली सिमला येथील लोकांची समजूत परस्पर

झालेली असे. आणि ती खरी असून आमच्या पथ्यावर पडे. पण इतर रीतीनें आमच्या क्लबाविषयीं सर्व साधारणपणें आदरबुद्धि असे. आम्ही लोक ख्याली-खुशाली न करणारे, खेळाचे अड्डे न मांडणारे, नुसती कारस्थानें न रचणारें, बडे-जावी वाढविण्याकरितां श्रीमंत लोक किंवा अधिकारी लोक यांच्या गांठीभेटी न घेणारे, असे असल्याबद्दल आमचा लौकिक असे. उलट आम्ही मताचे खंबीर, स्वातंत्र्यप्रिय, राष्ट्रीय वृत्तीचे, अभ्यासू असाहि लौकिक असे. वरचे कांहीं लब्ध-प्रतिष्ठित सोडले तर सल्ला मसलतीला आम्ही उपयोगी पडणारे असे इतर लोक आम्हाला मानीत, आणि आमच्याकडे येऊन चर्चा विचारविनिमय करीत.

१९२७ सालीं फिरून आम्ही विधिमंडळांत गेलों त्या वेळीं हा क्लब टिकून राहिला तरी पहिला संच माडला. डॉ. लोहोकरे निवर्तले. करंदीकर व मुतालीक यांची मुदत संपली व ते पुन्हां निवडून आले नाहींत. अभ्यंकर निवडणुकीला उभे राहिले, पण डॉ. मुंजे यांनीं त्यांना पराभूत केल्यामुळें ते गळले. डॉ. मुंजे आमच्यांतलेच पण ते नव्या दिल्लींत स्वतंत्रपणें राहत. त्यांना आमच्या क्लबांतले शाकाहारी मिळामिळींत जेवण आवडत नसे. तथापि ते दिवसांतून क्लबाकडे एक वेळ फेरी मारून गप्पागोष्टी करून जात. शेवटीं क्लबांत मी बेळवी आणि बापूजी अणे असे तिघेच उरलो. त्यांचा समावेश एकाच बंगल्यांत होऊं शकला. अभ्यंकर व लोहोकरे नसल्यानें या पुढच्या तीन वर्षांत भांडणाचे प्रसंग क्लबांत मुळींच आले नाहींत. पूर्वीप्रमाणें आतांहि आमच्या क्लबानें लब्ध प्रतिष्ठितपणाचा खेळ केला नाहीं. हा खेळ मेजवान्या पार्ट्या देण्याचा. तो खेळ फार खर्चाचा असतो आणि त्यांतून लभ्यांशहि फार नसतो. आमच्या क्लबाप्रमाणें राजकीय 'राष्ट्रीय' पक्षाचा बनावहि नवाच होता. आमच्याच क्लबांतले बेळवी हे जुन्या स्वराज्यपक्षांत राहिले. त्यांनीं प्रतिसहकारपक्ष स्वीकारला नाहीं. अणे आणि मी हे नव्या पक्षाचे सभासद होतों, व या नव्या पक्षाच्या तिकिटावरच निवडून आलों होतों. तथापि विधिमंडळांतल्या नव्या पक्षाची संघटना, प्रतिसहकार पक्ष न स्थापलेल्या पण त्याला सहानुभूति असलेल्या प्रांतांतून आलेल्या सभासदांची संयुक्त स्वरूपाची असल्यामुळें, त्याला 'प्रतिसहकार' पक्ष हे नांव न देतां 'नॅशनॅलिस्ट' असें नवेंच नांव देण्यांत आलें होतें. एका स्वराज्यपक्षाला दोन फाटे फुटले. मात्र माणसें पुष्कळचीं तींच होतीं.

१९२७ सालीं विधिमंडळाच्या पहिल्या बैठकीला दिल्लीस गेलों तेव्हां मजवर एक गंडांतर आलें. यापूर्वी निवडणुकींत पुष्कळ हिंडावें लागलें त्यांत मोटारीच्या प्रवासांत उजव्या कानावर वाऱ्याचा मार बसून आंतल्या बाजूस दुखापत झाली. कानाच्या वरच्या बाजूला थोडथोडें दुखत असतांच दिल्लीच्या वाटेवर मी धुळ्यास गेलों. तेथें कानाच्या पाळीवरच्या अंगास डोक्याला सूज आली म्हणून डॉ. साठे यांचा सल्ला घेतला. त्यांनीं औषध दिलें परंतु असें बजाविलें कीं " सूज न उतरली तर आंतल्या बाजूस गळू होईल. आणि ते कापून घेण्याची हयगय केल्यास गळू खालीं चरत जाऊन हाडाला भिडण्याचा संभव आहे. तसें झाल्यास हाडच छिन्नून काढावें लागतें. त्याला मॅस्टॉईड असें नांव आहे. तरी सावधगिरी ठेवा. " पण गळू वरच्या बाजूस उमटून पोटिस लावून पिकविल्यास कदाचित् बाहेरच्या अंगाला फुटेल या आशेनें मी पुढील प्रवास सुरूं केला. भुसावळेस गेलों तों गळू ठणकूं लागलें. तरी ऊन पाणी मिळवून शेकून तसाच पुढें दिल्लीस गेलों. पुढें इजा कमी न होतां वाढली. तापहि येऊं लागला. एक दिवस गांवांत जाऊन डॉक्टरी इलाज केला. परंतु बरें वाटेना. दुसरें दिवशीं संध्याकाळीं डॉ. मुंजे भेटीस आले. त्यांनीं सांगितलें कीं "शस्त्रक्रिया केल्याशिवाय हें गळू बरें होणार नाहीं. आणि एकेक दिवसाचा विलंब होईल तर हाडाला इजा पोचेल. तरी तुम्ही उद्यांच्या उद्यां सकाळीं येथून मुंबईस चालते व्हा. मी एक दिवसहि तुम्हास येथें राहूं देणार नाहीं. "

दिल्ली येथील इस्पितळांत गेलों असतां तेथें शस्त्रक्रिया झाली नसती असें नाहीं. परंतु तें परकें ठिकाण. इस्पितळांत किती दिवस पडून रहावें लागतें याचा नेम नाहीं. या विचारानें फडणीसांना बरोबर घेऊन तडक मुंबईला आलों. डॉ. गोपाळराव देशमुख यांचा शोध केला. पण त्यांची गांठ पडली नाहीं. ते पुण्यास गेले होते. तेव्हां डॉ. दलाल यांच्याकडून शस्त्रक्रिया करविण्याचें ठरवून गिरगांवांतील 'कैकिणी व टिळक' यांच्या इस्पितळांत मी जाऊन राहिलों. दुसरें दिवशीं क्लोरोफॉर्म देऊन ऑपरेशन करण्यांत आलें. जखम अद्यापि भरून येण्याला अवकाश होता, तों इतक्यांत दिल्लीहून पत्र आलें कीं, " तुम्ही विधिमंडळांत प्रविष्ट करण्याकरितां दोन बिलें पाठविलीं होतीं तीं निघण्याचा दिवस अभावितपणें लवकर आला आहे. तरी बरे असाल तर एकदम निघून या. " त्यामुळें पेंच असा पडला कीं दिल्लीस जावयाचे तर न भरलेली जखम अंगावर घेऊन जावें लागतें. आणि

जातां येतां सोळाशें मैलाचा प्रवास! बरें न जावें तर माझीं बिलें प्रविष्ट करण्याची ही संधि गमावल्यास ती फिरून केव्हां मिळेल कीं नाहीं याची शंकाच. कारण खाजगी बिलांना संबंध वर्षांत चार दोन दिवस मिळावयाचे. आणि दुसरीं बिलें आधी प्रविष्ट झालीं म्हणजे त्यांची वासलात लागेपर्यंत माझीं बिलें मागें पडून रहावयाची. खाजगी बिलांना यशस्वी होण्याला फारच गंडांतर असतात म्हणून मी आजारी असतां त्याच दिवशी दिल्लीस निघालों. नेमल्या दिवशी, बांधलेल्या जखमेवर रुमाल बांधून कण्हतकुंथत, बिलें कशी तरी एकदाची प्रविष्ट करून दुसऱ्याच दिवशी परत मुंबईला निघालों आणि इस्पितळांत येऊन दाखल झालों. डॉ. दलाल यांनीं पट्टी सोडून पाहिलें तों जखम अद्यापि खोलच होती. इतकेंच नव्हे तर फिरून एक ऑपरेशन करावं लागेल असें त्यांचें मत पडलें! तेव्हां डॉ. देशमुखांसह आणखी दोन-तीन प्रसिद्ध शस्त्रवैद्य बोलावून सल्ला घेतला. त्यांत "फिरून शस्त्रक्रिया करावयाची झाली तरी इतक्यांतच करूं नये, जखम भरण्याला आणखी संधि देऊन पहावी," असें डॉ. देशमुख यांनी निर्धाराने सांगितल्यावरून दुसरें, ऑपरेशन रहित झालें. आणि इस्पितळांत एकंदर दहा दिवसांचा मुक्काम करून मी पुन्हां परत दिल्लीला गेलों.

माझीं बिलें चर्चेला पुनः निघालीं तेव्हांहि जखमेवर पट्टी बांधलेलीच होती. तथापि सभेला जाऊन भाषण करण्याइतका मी बरा झाला होतों. या शस्त्रक्रियेचा एक परिणाम प्रथम असा झाला की उजवा कान जवळ जवळ बधिर झाला. यामुळें एखाद्या बहिरटाप्रमाणें डाव्या कानाला हात लावून विधिमंडळांतील काम कांहीं दिवस करावें लागलें. भीति वाटली कीं मी एका कानानें कायमचाच बहिरा होतों कीं काय! पण सुदैवानें कांहीं महिन्यांनी उजव्या कानाला फिरून थोडथोडें ऐकूं येऊं लागलें. एकंदरीनें हें गंडांतर बरें निभावलें. कारण हाडाला इजा पोंचती तर ती शस्त्रक्रिया कठिण झाली असती. आणि खालच्या हाडाला जखम भिडली म्हणजे फार यातना होतात व रोग असाध्य होतो असेंहि म्हणतात.

या वेळीं मी विधिमंडळांत दोन बिलें प्रविष्ट केलीं. त्यांतील एक शेवटीं मंजूर झालें, मग दुसरें सिलेक्ट कमिटीपर्यंतहि न जातां फेटाळलें गेलें. मंजूर झालेलें बिल अगदीं लहान पण उपयुक्त होतें. त्याचा प्रकार असा. पूर्वी अनेक प्रकारच्या खाजगी संस्था सोसायट्या रजिस्टर करतां येत होत्या. उदाहरणार्थ—

शिक्षणसंस्था, परोपकारी संस्था इत्यादि. परंतु राजकीय संस्थाचें स्वरूप तितकेंच परोपकारी व सार्वजनिक स्वरूपाचे असलें तरी अशा संस्था रजिस्ट्रार हा दाखल करून घेत नसे. याचा अर्थ त्यांना व्यवहारोपयोगी अशी कायदेशीर संघटना न लाभल्यानें व्यवहाराला फार अडचणी येतात. संस्था रजिस्टर असली म्हणजे तिचा एखादा अधिकारी एकंदर संस्थेच्या वतीनें सर्व कायदेशीर व्यवहार करूं शकतो. पण संस्था रजिस्टर नसली म्हणजे मालमिळकत कोणी धारण करावी हा प्रश्न पडतो. तसेंच वाद उत्पन्न होऊन प्रकरण न्यायकोर्टांत गेल्यावर संस्थेचे सगळे सभासद वादी किंवा प्रतिवादी करावे लागतात. अर्थात् ही गोष्ट फार त्रासाची भानगडीची होऊन बसते. पुणें सार्वजनिक सभेला हा अनुभव येऊन चुकला होता. पुण्याच्या सर्व्हंट ऑफ इंडिया संस्थेनें घटना नोंदणीकरितां निरनिराळ्या प्रांतांत अर्ज करून पाहिले, परंतु शिक्षणाची संस्था ही परोपकारी या सदराखाली पडूं शकत नाहीं असें ठरवून अधिकाऱ्यांनीं नोंदणी नाकारली. आमच्या होमरूल लीग संस्थेचे ट्रस्टडीडच झालें होतें म्हणून गोष्ट वेगळी. नाही तर हाच प्रसंग यावयाचा. हें सर्व लक्षांत घेऊन मी माझ्या बिलानें अशी दुरुस्ती सुचविली होती कीं 'धर्मार्थ परोपकारी' संस्था यांच्या वर्णनाचे जे शब्द कायद्यांत आहेत त्यांत 'राजकीय शिक्षणाच्या संस्था' असे शब्द प्रत्यक्ष घालून त्या कायद्याची व्याप्ति वाढवावी.

सोसायट्यांच्या रजिस्ट्रारांनीं भलताच हट्ट धरला नसता तर, आहे त्या शब्दांतच राजकीय संस्थाहि बसतात असा अर्थ होऊन, माझ्या बिलाचें कारण उरलें नसतें. परंतु त्यांच्या दुराग्रहामुळें, भ्रामक अर्थमीमांसेमुळें, माझें बिल अवश्य ठरत होतें. वास्तविक राजकीय संस्था नोंदविल्या गेल्या तर ती गोष्ट सरकाराला इष्टच वाटावी; कारण संस्था नोंदली म्हणजे तिची घटना, नियम, अधिकाऱ्यांची चालकांचीं नांवें सर्व कांहीं जगजाहीर असते. अर्थात् अशी संस्था ही गुप्तमंडळीच्या अगदीं दुसऱ्या टोकाची संस्था होय. म्हणून सरकारानें तिच्या नोंदणीला साहाय्यच करावें. पण इतका विचार करतो कोण ? असो. माझ्या बिलाला सरकारानें हरकत घेतली नाहीं. कारण माझ्या बिलाचा हेतु मी आपल्या भाषणांत इतका स्पष्ट आणि खात्री पटविण्यासारखा मांडला होता कीं त्यावर आक्षेप घेणें हें समंजस माणसाला अशक्य होतें. शेवटीं किरकोळ एकदोन शब्दांचा फरक करून बिलाचीं तीनहि वाचनें होऊन तें मंजूर झालें. अशा

रीतीनें "कायदा बनविण्याचा" हक्क मला पांच वर्षांत एकदा तरी सिद्धीस नेतां आला.

माझें दुसरें एक बिल फेटाळलें म्हणून सांगितलें त्याचा हेतु असा होता. सक्तीनें खाजगी जमिनी ताब्यांत घेऊन एका मालकाकडून काढून—त्याला किंमत देऊन कां होईना पण—त्याचें स्वामित्व नष्ट करून दुसऱ्या कोणाला त्या देण्याचा अधिकार हल्लींच्या कायद्यानें सरकाराला आहे. पण हा अधिकार बजाविताना चारदोन गोष्टी वाईट होतात. वेळ अतिशय लागतो. मध्यंतरीं मालकाला धड कांहींच करतां न आल्यामुळें त्याचें नुकसान होतें. आणि किंमत देण्याचा ठराव मुलकी अधिकारीच करतात. यामुळें ती कमी देण्याकडे त्यांचा कल असतो. त्यांच्या निकालावर जिल्हाकोर्टांत दावा करतां येतो. परंतु फिरून तेंहि काम वर्षानुवर्षें चालतें. आणि कोर्ट-खर्च इतका येतो कीं तो करण्यापेक्षां मुलकी अधिकाऱ्यांनीं दिलेली किंमतच स्वीकारून मोकळें व्हावें आणि त्रास चुकवावा असें वाटण्या इतका जुलूम मालकावर होतो. हे सर्व दोष काढून टाकण्याच्या हेतूनें मी विद्यमान कायद्यांत दुरुस्त्या सुचविल्या होत्या. त्यांतील मुख्य अशी होती कीं, सक्तीनें घेतलेल्या जमिनीची किंमत सरकारी अधिकाऱ्यांनीं न ठरवितां ती पंचायतपद्धतीनें ठरविण्यांत यावी. पण जुनी पद्धति सर्व बदलून तिच्याजागीं नवी बसवावयाची यामुळें, पांच पंचवीस कलमांत कांहीं शब्द बदलावे लागले, कांहीं नवे घालावे लागले, कांहीं कलमें मूळचीं वगळावीं लागलीं, कांहीं नवीं करून घालावीं लागलीं. मी सुचविलेली पंचायतपद्धति हल्लींच्या पूर्वी एकवेळ अंमलांत असलेल्या कायद्यांत होती ती पुढें सरकारानें काढून टाकली. म्हणजे सुधारणेची कुधारणा केली. अर्थात् तो जुना दाखला लक्षांत घेऊनच मी फिरून पंचायतपद्धति सुरूं करणार होतों.

या बिलाची कल्पना मुळशी पेट्यांतील धरणाखालीं गेलेल्या जमिनीच्या अन्यायावरून मला सुचली. १९२० च्या पूर्वी नगर जिल्ह्यांत साखरेच्या कारखान्याकरितां सरकारानें या कायद्यानें जमिनी घेऊन दिल्या, त्या पक्षपाताविरुद्ध बरीच तक्रार झाली होती. मुळशीच्या प्रकरणांत तर हा अन्याय अधिक प्रकट होऊन चळवळहि जोराची होणार होती, व हा कायदाच ऐनजिनशी रद्द करावा अशी सार्वजनिक मागणी करण्यापर्यंत मजल गेली होती. पण माझ्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सोलापूर प्रांतिक परिषदेंत साधकबाधक चर्चा होऊन असा निर्णय

लागला कीं " कोणत्याच सार्वजनिक कार्याला सरकारनें खाजगी जमीन सक्तीनें घेऊन देऊं नये असें म्हणून कधीं चालणार नाहीं. आगगाड्यांचे रस्ते, शिक्षण-संस्था, दवाखाने यांच्या इमारती, कालव्याचीं धरणें, इत्यादिकांना खाजगी जमिनी घ्याव्या लागणारच. खाजगी प्रयत्नानेंच त्या घ्याव्या म्हटले तर त्या हव्या तितक्या एकगट मिळूं शकत नाहींत. आणि मिळावयाच्या तर खाजगी मालक बेसुमार किंमती मागणार हें ठरलेलें. तेव्हां सक्तीनें जमिनी घेण्याच्या कायद्याला तत्त्वतः हरकत नसावी. पण नुकसानभरपाई द्यावयाची ती मात्र पंचायत पद्धतीनें दिली जावी " असें मत परिषदेंत प्रगट झालें. मुळशीच्या चळवळींत तिच्या चालकांनी " जान कि जमीन " असलें एकांतिक तत्त्व पुढें आणल्यामुळें नुकसान भरपाईचा प्रश्न सहजच गौण ठरत होता. म्हणजे त्या प्रसंगीं पंचायत पद्धतीनें जमिनीची किंमत देण्याला सरकार कबूल झालें असतें तरी चळवळीच्या पुढाऱ्यांनीं ती गोष्ट मान्य केली नसती. पण मुळशीचें प्रकरण हें एकदां एक घडणारें. तें बाजूला ठेवलें तर प्रत्यही शेकडो इतर प्रकरणीं किंमतीच्या मोबदल्यांत अधिकारी अन्याय करतात त्याचें काय ? तो दूर करावा आणि पंचायत पद्धतीनें, जुनेंच पण मध्यंतरीं लुप्त झालेले, तत्त्व पुनर्जीवित करावें हाच माझ्या ह्या बिलाचा हेतु होता. पण सरकारी सभासदाप्रमाणें कांहीं खाजगी सभासदहि प्रतिकूल झाल्यानें माझें बिल नामंजूर झालें.

दिल्ली सिमला येथील माझें कामकाज कसें काय चाले याची माहिती रा. शं. न. आगाशे यांनी जवळून पण तिऱ्हाइताच्या दृष्टीनेंहि पाहिलेली अशी एका ठिकाणीं लिहिली आहे त्या लेखांतला एक उतारा या खालीं देतों.

" पं. मोतीलाल नेहरू ह्यांची कामगिरी उत्कृष्ट तर खरीच, पण स्वतंत्र-पक्षाशीं सल्लामसलत करण्याचे बाबतींत केळकर व अणे यांना खलबतांत घेतल्या खेरीज पं. मोतीलाल नेहरू यांचें पान हालत नसें. ज्या केळकरांची कौन्सिल-बहिष्काराचे प्रश्नावर पं. मोतीलाल नेहरू यांनीं खरपूस तपासणी केली, व एकदां तर " महाराष्ट्राचें मत राष्ट्रीयसभा मानणार काय " असेहि ते म्हणाले, त्या केळकरांशीं पं. मोतीलाल नेहरू यांचें इतकें सख्य पाहून कित्येकांना अचंबा वाटे. स्वतंत्र व स्वराज्य पक्षाला एके ठिकाणीं आणावयाचें म्हणजे आंवळ्यांची मोटच बांधावयाची. कारण मोट बांधायला एक टोंक जवळ करावें तर दुसरें सुटूं लागावें व

कांहीं आंवळे घसरून पडावें. पण केळकरांनीं युक्तीनें स्वतंत्र पक्षांतील आंवळ्यांनाहि मोटेंत बांधलें.

"सप्टेंबर १९२५ मध्यें असेंब्लीचा अध्यक्ष निवडण्याची वेळ आली तेव्हां स्वराज्यपक्षातर्फे सहा व स्वतंत्रपक्षातर्फे सहा एकूण १२ सभासदांची एक कमिटी नेमिली. त्या कमिटीनें उमेदवारांची निवड करावी असें ठरलें. स्वतंत्र पक्षानें दि. ब. रंगाचारीयर व स्वराज्यपक्षानें पटेल अशीं नांवें सुचविलीं. पण एकमत होईना. अखेर स्वराज्यपक्षातर्फे केळकरांचें नांव अध्यक्षांचे जागेकरितां सुचविण्यांत आले, व पं. मोतीलाल नेहरू यांनींहि 'तुम्ही खटपट करा' असें केळकरांना सांगितलें होतें. पण अखेर दोन्ही पक्षांत एकमत झालें नाही, व स्वराज्यपक्षाचे उमेदवार म्हणून पटेल यांना निवडण्यांत आलें. पटेलांना ५८ मतें व रंगाचारियर यांना ५७ मतें पडलीं. ना. पटेल यांना एक मत एरवीं न मिळणारें असें केवळ केळकरांच्या मोहबतीखातरच मिळालें होतें. ( हें मत सरदार मुतालीक यांचें होतें. )

"१९२६ च्या निवडणुकींत केळकर हे प्रतिसहकार पक्षातर्फे निवडून आले व असेंब्लींत दे. भ. लाला लजपतराय यांच्या पुढारीपणाखालीं स्थापन झालेल्या राष्ट्रीय-पक्षाचे ते एक प्रमुख सभासद झाले. जयकर, डॉ. मुंजे, अणे व केळकर हे चौघे प्रतिसहकारवादी म्हणून याच पक्षांत विलीन झाले होते. केळकर हे १९२७ ते ३० पर्यंत राष्ट्रीय पक्षाच्या कार्यकारी मंडळांत होते, व त्यांच्या सल्ल्यानें कोणी कोणत्या कमिटीवर जावें व पक्षातर्फे कोणता ठराव कोणी मांडावा हें ठरत असे. पण केळकरांनीं स्वतः आपण होऊन कोणत्याहि कमिटीवर जाण्याचा अभिलाष धरला नाहीं. स्वराज्य-पक्ष व राष्ट्रीय-पक्ष यांच्यामध्यें असेंब्लीच्या कामांत नामाभिधानापलीकडे फरक असा कांहींच नव्हता. राष्ट्रीय-पक्ष "आम्ही 'प्रतिसहकारिता' करितों" असें स्पष्टपणें सांगत असे. स्वराज्य-पक्ष " आम्ही अडवणूक करितो व आमचे पूर्वीचेंच धोरण कायम आहे " असें तोंडानें उच्चारी. पण आचार मात्र प्रतिसहकार पक्षाचा. प्रथम प्रथम स्वराज्य–पक्षाच्या सभासदांनीं सरकारी सभासदांच्या चहापाण्याला जाऊं नये असें फर्मान पं. नेहरू यांनीं काढलें; पण त्यांचा अधिकार न मानणारेच बरेचसे सभासद निघाले. शिस्तीचा धाकहि त्यांनीं घातला. पण तो फारसा चालत नसे. रिझर्व्ह बँक बिल, करन्सी बिल, ट्रेड डिस्प्युट्स बिल व इतर अनेक बिलांच्या सिलेक्ट कमिट्यांवर स्वराज्य–पक्षाच्या सभासदांनीं कामें

केलीं. रिझर्व्ह बँक बिल, सिलेक्ट कमिटी, संमतिवयाची कमिटी, यांसारख्या कमिट्यांवरहि कामें करून त्यांनीं भत्त्याचे पैसे घेतले होते. नॅशनॅलिस्ट व स्वराजिस्ट यांमध्यें फरक इतकाच की, नॅशनॅलिस्ट पक्षानें आम्ही कमिट्यांवर कामें करूं असें मतदारांना सांगितलें व स्वराजिस्टांनीं हें धोरण जाहीर केलें नव्हतें इतकेंच. पण याहि खेपेला केळकरांचा असेंब्लींतील दर्जा पूर्वीइतकाच उच्च होता. त्यांच्या विद्वत्तेची छाप सर्वांवर पडत असे. त्यांचीं विनोदी व माहितीपूर्ण भाषणें सर्वांना आवडत. त्यांच्या निःस्पृहपणामुळें ते नवीन सभासदांना आदर्श झाले होते. ते कोणाचा द्वेष कधींच करीत नसत. असेंब्लींतील कोणत्याहि सभासदाला—मग तो स्वतंत्र, स्वराज्य-पक्ष, राष्ट्रीय-पक्ष व कांहीं कांहीं वेळेला युरोपियन पक्ष यांपैकी कोणत्याहि पक्षाचा असो—असें वाटे कीं, केळकरांच्या भाषणांत तथ्यांश आहे. त्यांना भावनाप्रधान भाषणें करतां येत नव्हतीं. त्यांच्याजवळ लाला लजपतराय यांच्यासारखा आवेश अगर वक्तृत्व नव्हतें. बॅ. जिना यांच्यासारखी ऐट नव्हती. पं. मदनमोहन मालवीय यांच्याप्रमाणें त्यांचें भाषण अस्खलित नसे. तरी पण त्यांच्या भाषणांत बुद्धिमत्तेची झाक, अभ्यासाची आवड, विनोदासह गांभीर्य, राष्ट्रप्रेम व मताचा उदारपणा हे गुण प्रामुख्यानें दिसत. सहसा कोणत्याहि बिलावर अगर ठरावावर भाषण करण्यापूर्वी त्या विषयावरील पुस्तकें, हिंदी व परकी तज्ज्ञ लोकांचे अभिप्राय, इतर राष्ट्रांतील कायदे व पद्धती, त्या विषयाचा संपूर्ण अभ्यास करून त्यांनी भाषणांची टिपणे केलीं नाहींत असें कधी झालें नाहीं. करन्सी रिझर्व बँक यासारख्या क्लिष्ट विषयांचा अभ्यास त्यांनी असेंब्लीचे सभासद असतांना दिल्ली-सिमल्यांतच केला. बजेटाचीं पुस्तकें घेऊन मागील १०-१५ वर्षांच्या आंकड्यांशीं तुलना करीत ते फारसे बसत नसत; पण फडणविसांची बजेटवरील भाषणें व त्यावरील स्पष्टीकरणाचे रिपोर्ट त्यांनीं काळजीपूर्वक वाचले नाहींत असें कधीं झालें नाहीं. आपल्या भाषणांच्या पुष्ट्यर्थ ते जे दाखले देत, ते बहुतांशीं इंग्लिश ग्रंथकारांच्या ग्रंथांतूनच घेत व प्रतिपक्षाला निरुत्तर करीत. लांबच्या लांब भाषणें करण्याची हौस त्यांना फारशी नसे. नाहीं म्हणावयाला करन्सी बिलावरील त्यांचें भाषण सुमारें दीड दोन तास चाललें होतें. केळकर बोलावयास उठले कीं त्यांचें प्रतिभाशाली व विनोदपूर्ण भाषण ऐकण्याकरितां कांहीं कांहीं बुद्धिप्रधान लोक आपल्या जागेवर येऊन बसत. सर डेनीस ब्रे हे

परराष्ट्रीय खात्याचे चिटणीस, त्यांना असेंब्लींत फारसें काम नसे, व ते असेंब्लींत फारसें बसतहि नसत. पण तात्यासाहेबांच्या भाषणास ते आवर्जून बसत.

"व्हाइसरॉय साहेबांच्या बंगल्यावरील पेटींत Visiting Card टाकून कित्येक सभासद जेवणाचें आमंत्रण लावीत. त्यांच्या या लघळपणाचा तात्यांना अतिशय राग येत असे. सरकारी सभासदांना आपल्या घरीं जेवणाखाण्यास अगर चहापाण्याचें आदरातिथ्य करण्यांत त्यांनीं आपला वेळ कधीं फुकट दवडला नाहीं. आपण होऊन कोणा साहेबांशीं बोलावयास गेले व त्यांच्यापाशीं हस्तांदोलन केलें असें कधीं झालेंच नाहीं. असेंब्लीचें काम संपलें कीं सुटीचा दिवस ते केसरी-मराठा पत्राकडेच खर्च करीत. दिल्ली-सिमल्याची बातमीपत्रें लिहीत, नवीन पुस्तकांवर अभिप्राय देत, व असेंब्लीच्या लायब्ररींतील नवीन पुस्तकें आणून केसरीच्या वाचकांना त्यांतील माहिती उपलब्ध करून देत. कौटिलीय अर्थशास्त्र, छंदोरचना, व 'शिवचरित्रप्रदीप' यांवरील अभिप्राय, 'शारदेची आकाशवाणी' हे लेख, '१६ पेन्स १८ पेन्साचा वाद' वगैरे कित्येक लेख त्यांनीं सिमला-दिल्लीसच लिहिले. टिळकचरित्रापैकीहि कांही कांही भाग त्यांनी तेथेंच लिहिला. त्यांचा उद्योगी स्वभाव त्यांना बसूंच देत नसे म्हटले तरी चालेल; पण इतकेंहि करून दिल्ली व सिमला येथील स्थायिक महाराष्ट्रीय मंडळींच्या हांकेला त्यांनी रुकार दिला नाहीं असें कधीं झालें नाहीं. दरवर्षी सिमल्यास जातांना महाराष्ट्र क्लबांत गणपत्युत्सवाच्या निमित्तानें ते व्याख्यान देत व महाराष्ट्र मंडळांतील स्नेहीमंडळींची विचारपूस करीत. रामदासनवमीचा उत्सव तर त्यांचेच अध्यक्षतेखालीं साजरा होई. महाराष्ट्र, वऱ्हाड, नागपूराकडील मनुष्य दिल्लीस कांहीं कामानिमित्त आला तर आपली दाद केळकरांकडून लावून घेई. "तुमचेंच काम करण्यास मी येथें बसलों आहे, मजकडून तें करून घ्या" असें तें मोठ्या उदार मनानें सांगत. रेल्वेच्या मजूर संघाची पुढारी मंडळी संघाचे अगर इतर कामानिमित्त १०–१५ दिवस केळकरांकडे राहून गेली नाहींत असें कधीं झालें नाहीं. पोस्ट, टेलिग्राफ व करन्सी खात्याचे नोकरवर्गांतील तक्रारीचें वकीलपत्र त्यांनीं सतत कायमचेंच घेतलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचेकडे दर वर्षी १००–१५० प्रश्न विचारण्याकरितां येत. त्यांत कमीजास्त दुरुस्ती करून ते विचारीत व मिळेल ती माहिती गोळा करून त्यांचेकडे पाठवीत. प्रत्यक्ष खात्याचे अधिकाऱ्याला भेटून योग्य असतील त्या अडचणी दूर करण्याची खबरदारी

घेत; पण योग्य कारणाशिवाय सरकारी अधिकाऱ्यांची मनधरणी त्यांनीं केली नाहीं. त्यांची भेट घेण्याला वशिले लावावे लागत नसत. अगर भेटण्याची वेळहि आधीं पत्र लिहूनच ठरविली पाहिजे असे नसे. अमक्याला भेटावयाचें तमक्याला भेटावयाचें नाही असें कधीं झालें नाहीं. परप्रांतीय लोकांनाहि ते महाराष्ट्रीयाप्रमाणेंच वागवीत. इतर प्रांतांतील पुढारीमंडळीप्रमाणें आपले आप्तेष्ट अगर जातबांधव यांची वर्णी सरकारी खात्यांत लावण्याची खटपट त्यांनी कधीं केली नाहीं. पण त्या बरोबरच, कोणाला अन्याय होत असेल, अगर लायक इसम असतांना वशिल्याची उंटें मध्यें येत असतील, तर त्याची दाद लावून घेण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. असेंब्लींत त्यांनीं कोणत्या ठरावांवर व बिलांवर भाषणें केली व त्यांत कोणत्या विशेष मुद्यांचें विवेचन केलें हें येथें सविस्तर सांगणें शक्य नाहीं. पण त्यांच्या कारकीर्दीत त्यांनीं निदान पांचसहा नवीन बिलें आणलीं व त्यांपैकी निदान एक बिल तरी मंजूर करून घेऊन, राजकीय शिक्षण-संस्थांना रजिस्ट्रेशन ॲक्टाखालीं नोंदणीचा अधिकार प्राप्त करून दिला असें म्हणतां येईल. तसेच हिंदुस्थानच्या भोंवती अफाट समुद्र असतांना मिठाचे बाबतींत लोकांना परावलंबी रहावें लागतें ही गोष्ट सरकारास लज्जास्पद आहे अशा अर्थाचा ठराव बजेटमंजुरीचे वेळीं काटाच्या रूपानें त्यांनी आणला होता व तो मंजूर झाला.

"असेंब्लींत अमुक वेळीं हजर रहावें असा पक्षाध्यक्षाचा हुकूम झाला असतांना त्यांनीं आपली खाजगी गैरसोय व अडचण पुढें आणली नाहीं. असेंब्लीच्या बैठकीला सुरुवात झाल्यापासून ती संपेपर्यंत सहसा कांहीं निकडीच्या कामाखेरीज दिल्ली–सिमला सोडून ते गेलेच नाहींत. भाषणें कितीहि कंटाळवाणी होत असलीं व तासन्तास बसून रहावें लागलें तरी असेंब्लीची इमारत सोडून ते कधीं गेले नाहींत. पक्षाच्या व्हिपप्रमाणें मत देण्यास ते हजर रहाण्याची विशेष खबरदारी घेत. एकदां तर १९२८ सालीं प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें त्यांना सिमल्याचे बैठकीस जातां आलें नाह एवढा लाबचा त्रासदायक प्रवास करणें व सिमल्याल्या कुंद हवेंत रहाणें प्रकृतीला हितावह नव्हते. बैठक संपण्यास अवघा एक आठवडाच अवकाश होता. तरी देखील लाला लजपतराय यांची तार आल्याबरोबर ते कशाची परवा न करतां सिमल्यास उठून गेले, व सरकारच्या पब्लिक सेफ्टी बिलावर भाषण करून आपलें विरुद्ध मत त्यांनीं नोंदून घेतलें. यावरून मतदारांच्या हिताकरितां ते किती जागत होते हें दिसून येतें.

"याशिवाय असेंब्लीच्या दसरी दाखल नाहीं तरी, असेंब्लीचे सभासद असतांना त्यांनीं चारदोन गोष्टींत जी कामगिरी केली तिचा थोडा उल्लेख करितों. त्या गोष्टी अशाः—

१९२३ सालीं गोरा शिपाई प्रायव्हेट वॉकर याची नेमबाजी वडगांवच्या अर्जुना नांवाच्या शेतकऱ्यावर आली व तो प्राणास मुकला ! प्रायव्हेट वॉकर याचेवर खटला होऊन तो निर्दोषी ठरावयाचा तसा ठरला ! पण पुढें केळकर असेंब्लींत आल्यानंतर त्यांनीं मिलि. सेक्रेटरीकडे या प्रश्नाची दाद मागण्यास सुरुवात केली. प्रथम एका सभासदाकडून मुंबई कायदे—कौन्सिलांत अर्जुनाचे कुटुंबास नुकसानभरपाई देण्यांत आली काय व नसेल तर ती देण्यांत येईल काय अशी चौकशी केली. पण ठरल्याप्रमाणें मुंबईसरकारनें वाटाण्याच्या अक्षता लाविल्या व मिलिटरी-खात्याकडे बोट दाखवून बोळवण केली. केळकरांनीं या प्रश्नाचा छडा असेंब्लींत लावला, व अर्जुनाचे कुटुंबास नुकसानभरपाई देण्यांत कां येऊं नये अशी पृच्छा केली. फडणवीस खात्याचे चिटणीस मि. बर्डन यांनी नुकसानभरपाई देतां येत नाहीं व लष्करी खात्यांत पैशाची टंचाईच आहे असें उत्तर दिलें ! हें उत्तर केळकरांनी असेंब्लींत ऐकून घेतलें. पण घरीं आल्यावर बर्डन यांना खरमरीत पत्र लिहून विचारलें, "अहो पैसा नाहीं म्हणतां याचा अर्थ काय ? निदान मी केसरींत न्यायमूर्तीचे निकालावर टीका केली व कोर्टाची बेअदबी झाली म्हणून माझेकडून ५००० रुपये सरकारनें वसूल केले, ते तरी फुकाचे पैसे आहेत ना ? मग तेच ५००० रुपये तरी त्या गरीब शेतकऱ्याच्या बायकापोरांना द्याल कीं नाही ?" तेव्हां कोठें सरकार जागें झालें व पुढें चौकशी होऊन १५०० रुपये अर्जुनाच्या कुटुंबास नुकसानभरपाई मिळाली. हें काम होण्यास केवळ केळकरांचाच उपयोग झाला हे सांगणें नकोच.

"दुसरी एक बाब मसूर आश्रमांतील गोव्यास गेलेल्या प्रचारकांची. गोव्यास शुद्धिकार्याच्या प्रसाराकरितां गेलेल्या प्रचारकांनीं हिंदु धर्माचा प्रचार केला व खेडीच्या खेडी हिंदु धर्मांत परत येण्यास तयार झाली. साहजिकच तेथील पाद्री लोकांत खळबळ झाली. गोवें सरकारनें त्यांना कैद करून मारहाण केली व त्यांना बाहेर घालवून देण्यास सुरुवात केली. तेव्हां येथील हिंदुधर्मीयांना सोसाव्या लागणाऱ्या छळाची हकीकत केळकरांच्या कानांवर आली. तेव्हां केळकरांनीं असेंब्लींतील सभासदांच्या वतीनें एक जाहीर पत्र पोर्तुगीज

गव्हर्नरकडे पाठविलें, धर्मस्वातंत्र्याचा डंका बजाविणाऱ्या पोर्तुगीज सरकारनें हिंदुधर्मीयांवर जुलूम-जबरदस्ती करणे इष्ट नाहीं असे निदर्शनास आणलें, व झालेल्या अत्याचारांबद्दल निषेध करून दाद मागितली. पण एवढ्यावरच ते स्वस्थ बसले नाहीत. छळाची वार्ता ऐकल्यापासून त्यांचें मन अस्थिर झालें होते व एक सारखी त्यांच्या मनाला तळमळ लागली होती. त्या रात्री त्यांना झोंपहि लागली नव्हती म्हटल तरी चालेल. गोवा प्रांतांतील हिंदूंचे मदती-करितां त्यांनी एक जाहीर पत्रक काढलें, व दुसरे दिवशीं उजाडतांच घराबाहेर पडले ते तडक बिर्ला, भर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, श्रीनिवास आय्यंगार, पं. मालवीय व इतर सभासदांना भेटून सुमारे १००० रुपये वर्गणीचे आंकडे त्यानी मिळविले. हिंदु महासभेच्या कार्यकारी मंडळाकडेहि त्यांनीं मदत मागितली व एकंदर दोन हजार रुपये मिळवून दिले.

"तिसरी एक गोष्ट म्हणजे मिरतच्या कटांतील आरोपींच्या बचावाकरितां लागणाऱ्या खर्चाच्या तरतुदीची. कटाचा खटला आज ३–३॥ वर्षे चालूच आहे. खटला भरण्यांत आला तेव्हां एक 'डिफेन्स कमिटी' नेमण्यांत आली होती. त्या कमिटीचे केळकर हे एक सभासद होते. कमिटीनें ७–८ हजार रुपये जमविले व सुमारे वर्ष–सहामहिन्यांच्या खर्चाची तरतूदहि केली. केळकरांनी महाराष्ट्रांत जमलेली वर्गणी पूर्वीच पाठविली होती. पण पुढें पैशाची तरतूद कशी करतां येईल यासंबंधानें कमिटीची सभा झाली. बचाव करण्याकरितां १-२ वकील द्यावयाचे त्यांचाच खर्च दरमहा हजारभर रुपये येईल असें ठरलें. तेव्हां केळ-करांनीं सूचना मांडली की, प्रत्येक प्रांतानें ५००० रुपये गोळा करून द्यावे. महा-राष्ट्रांतर्फे हें काम केळकरांनी आपल्या अंगावर घेण्याचें कबूल केलें. पण पुढें पं. नेहरू, जवाहिरलाल नेहरू, डॉ. अन्सारी वगैरे मंडळी म्हणूं लागली कीं, 'या खट-ल्याचे मदतीकरितां आमच्या प्रांतांत पैसा जमणार नाही. जमीनदार लोक म्हणजे कम्युनिस्ट लोकांचे शत्रु तेव्हां ते पैसे कसे देणार ?' पं. मोतिलाल नेहरू म्हणाले, "अहो केळकर, परवांच कलकत्त्यास माझ्या एका स्नेह्याकडून सार्वजनिक कामा-करितां १००० रुपयांचा चेक घेऊन मी आलों. पण मी घरीं पोंचतों तोंच मला तार आली कीं मिरत कटाचे खटल्याकरितां याचा विनियोग करूं नका." तेव्हां पैसे जमा होणार नाहींत असें दिसून आलें. पं. जवाहिरलाल नेहरू यांनीं तर आरोपींनीं बचाव करूंच नये असा सल्ला दिला म्हणतात. डॉ. अन्सारी आधीच अंग झाडून

मोकळे झाले होते. तेव्हां कमिटीची सभा भरल्याचा उपयोग फारसा झालाच नाहीं म्हटलें तरी चालेल. पण केळकर असेंब्लीच्या कामाकरितां दिल्लीस गेले असतांना, मुद्दाम मिरतेस जाऊन कॉमरेड डांगे, जोगळेकर, निमकर, घाटगे, अधिकारी, ठेंगडी, वगैरे मंडळींची भेट घेऊन त्यांची त्यांनी विचारपूस केली. तथापि बचावाला लागणारा सर्व खर्च करण्याची जबाबदारी आपणा एकट्यावर घेणें त्यांना अशक्यच होते. तेव्हां सर्व आरोपींनी मिळून सरकारकडेच डिफेन्स देण्यास मदत मागावी असा सल्ला केळकरांनी दिला. आणि महाराष्ट्रीय तरुण मंडळीना असें आश्वासन दिले की, तुम्हांला लागणारी इतर कांही मदत मी देईन. डांगे वगैरे मंडळींना लागणारे सरकारी रिपोर्ट व इतर पुस्तके ही त्यांनी विकत घेऊन पाठवून दिलीं. त्यांच्या तक्रारींची दाद असेंब्लींत मागितली, व त्यांना थोडीफार पैशाची मदतहि त्यांनीं केली. या तरुण लोकांचा स्वार्थत्याग व हाल पाहून, व त्यांना कम्युनिझमची मतें स्वीकारल्याबद्दल होणारी शिक्षा यांची कल्पना त्यांच्या मनांत येऊन त्यांच्या मुखांतून 'यांच्या स्वार्थत्यागाची किमत लोक करीत नाहींत व यांची लोक दाद घेत नाहींत!' असे शब्द निघालेले प्रस्तुत लेखकानें अनेकदा ऐकले आहेत."

---

## ( ३ ) स्थानिक स्वराज्यांतील कामकाज

कायदेकौन्सिलच्या खालोखाल मी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व मानतों. कारण स्थानिक समाजाच्या धोरणासंबंधाने या संस्था प्रत्यक्ष कायदेकौन्सिलेंच होत. अशा संस्था म्हटल्या म्हणजे ग्रामपंचायती, लोकलबोर्डे व म्युनिसिपालिट्या. मी खेडेगांवाचा रहिवासी असतों तर ग्रामपंचायतीचें काम आवडीनें केलें असतें. पुण्यासारख्या मोठ्या शहरांत राहिल्यामुळें मला लोकलबोर्डीतहि काम करण्याचा प्रसंग फारसा आला नाही. नाहीं म्हणावयाला मी कांहीं थोडे दिवस हवेली तालुका बोर्डावर व कांहीं दिवस पुणें जिल्हा लोकलबोर्डावर काम केलें. तेथें माझी निवडणूक पुणें म्युनिसिपालिटीकडून झाली होती. परंतु तेव्हां तालुका लोकलबोर्डाला काम असें कांहीच नसें. आणि जिल्हा लोकलबोर्डाचीं सूत्रें सर्वस्वीं कलेक्टरच्या हाती असत. जिल्हा बोर्डाच्या सभा वर्षांतून फार तर दोनतीन होत. आणि त्यांतहि दहापांच प्रकरणें, कलेक्टरच्या हाताखालच्या एकाद्या

डेप्युटी कलेक्टरानें किंवा चिटणीसानें तयार करून व त्याविषयीं हवे ते ठरावहि लिहून, सभेंत मांडलेली अशी बिनविवाद मंजूर होत. यामुळें मी तिकडे फारसें लक्ष घातलें नाही. तालुक्यांतून हिंडण्याचा मला सराव नव्हता व साधनहि नव्हतें. पण पुणें शहरच्या म्युनिसिपालिटीत काम करण्याची संधि मला सुमारे पंचवीस वर्षे लाभली.

माझें मत असें आहे कीं, प्रत्येक सुशिक्षित नागरिकानें आपल्या सार्वजनिक आयुष्यांतील कांही भाग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामाला अवश्य दिला पाहिजे. 'हा कारभार हलका मानण्याची खोड कांही सुशिक्षित लोकांत आढळून येते ! म्युनिसिपल कारभाराला 'केरकचऱ्याचें स्वराज्य' असें म्हणून त्याची टवाळी करण्यांत येते. पण त्यांना हे कळत नाही कीं, स्थानिक स्वराज्याचा कारभार हाच कोणत्याहि मोठ्या दर्जाच्या स्वराज्याचा पाया आहे. ग्रामपंचायती ह्या स्वराज्याच्या प्राथमिक शाळा, म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे ही स्वराज्याचीं हायस्कूलें, आणि कायदेकौन्सिलें ही स्वराज्याचीं कॉलेजें किंवा युनिव्हर्सिटी, असा क्रम लावतां येईल. खेडेगांवांतील लोकांना हायस्कूलचें शिक्षण लाभत नाही, तथापि त्यांना प्राथमिक शिक्षण मिळविण्याची संधि असते व तें चांगलें मिळविल्याने त्यांचें काम भागतें. त्याचप्रमाणे खेडेगांवचें लोक आणि ग्रामपंचायती यांचा परस्पर संबंध मानावा. ग्रामपंचायती चांगल्या चालविल्या तर त्यांतच खेडेगांवच्या लोकांचा सुखदुःखपरामर्ष भागण्यासारखा असतो. लहानसहान शहरांचा कारभार म्युनिसिपालिट्यांतून चालतो तेथेंहि हाच न्याय लागू पडतो. लहानसहान गांवांतील बुद्धिमान अशाहि लोकांना कायदेकौन्सिलांत शिरणें कठिण असतें. तथापि त्यांनीं आपल्या गांवच्या म्युनिसिपालिट्यांचा कारभार चांगला केला तर त्याचें श्रेय व फलश्रुति कायदेकौन्सिलांत काम करण्याइतकी ठरेल. आणि मोठमोठ्या शहरांतील लोकांनीं आपलें लक्ष कायदेकौन्सिलाकडे लावल्यास ते त्यांना अनुरूपच ठरेल.

तथापि देशांत एक फार मोठा वर्ग असा असतो कीं, त्याला स्वतःच्या निव्वळ स्वार्थी कामकाजापलीकडे कांहीच दिसत नाहीं. सार्वजनिक कार्य करणें हें आपलें एक कर्तव्य आहे असें या वर्गांतील लोक मानीत नाहींत. उलट ते फक्त एकच गोष्ट जाणतात ती म्हणजे सार्वजनिक कार्यांत पडणाऱ्या लोकांची टवाळी किंवा नुसता हेवा करणें. ग्रामपंचायती किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या संबंधानें

खऱ्या आदर बुद्धीचे उद्‌गार काढणारे असे फारच थोडे समंजस मार्मिक लोक मला आढळले. कांहीं त्यांत शिरले तर केवळ स्वार्थ साधण्याकरितां किंवा प्रतिष्ठेकरितां शिरतील. इतर कांहीं लोक अशा संस्थांकडे ढुंकूनहि पहाणार नाहीत. उरलेले फारच थोडे लोक मला असे आढळले कीं, ज्यांनीं अशा संस्थांतून काम करणें हें सार्वजनिक कार्यांतील एक अवश्य अंग आहे असे मानिले. आपल्या गांवची किंवा शहरची सुधारणा कशी होईल, नव्या सुखसोई कशा संपादितां येतील, आरोग्य, शिक्षण इत्यादि कशीं वाढवितां येतील, याचा परिश्रमपूर्वक विचार व कारभार अशा थोड्या लोकांनींच काय तो केला.

जें काम आपणाला करावयाचें नाहीं तें तुच्छ म्हणावयाचे अशी एक नेहमींची रीत काम न करणारांची असते. आणि चांगल्या सुशिक्षित लोकांत देखील जेव्हां ही प्रवृत्ति मी पाहतों तेव्हां मला अतिशय वाईट वाटतें. "दिल्लींच स्वराज्य मिळत नाहीं म्हणून, तीं सबब सांगून, मुंबईचें स्वराज्य मिळवावयाचें नाहीं, करावयाचें नाहीं व नांदवावयाचें नाहीं" अशी जी एक प्रवृत्ति मधल्या असहकारितेच्या काळांत कांहीं लोकांनीं, भ्रामक राष्ट्रभक्तींनें किंवा ध्येयवादानें, अनुसरली तीच बहुजन समाज हा स्थानिक स्वराज्याच्या कारभारासंबंधानें अनुसरतो. मात्र तें कोणच्याहि ध्येयवादित्वामुळें नव्हे, किंवा स्वराज्याच्या तळमळीमुळें नव्हे. तर आळशीपणा निष्क्रियता या अवगुणांचा दोष लपविण्याला सोईची सबब म्हणून. स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या कारभारांतील स्वार्थ किंवा अधिकार यांच्या मोहाला बळी पडून त्यांना जन्मभर जळूसारखीं चिकटून बसणारी माणसें जशी कांहीं आढळतात, तशीच उलट बाजूला पण फार मोठ्या प्रमाणांत असे लोक आढळतात कीं, आपलीं कामें लोकांनीं करावीं, त्यांच्या बुद्धिमत्तेचा फायदा आपण कांहीं मोबदला न देतां घ्यावा, आणि वरतीं त्यांची आणि त्यांच्या कामाची अवहेलना कृतघ्नबुद्धीनें करावी अशीच संवय त्यांना जन्मभर लागलेली असते. अशा वृत्तीचे लोक हिंदुस्थानांत असंख्य आहेत म्हणूनच स्वराज्याच्या चळवळींत आपला देश मागें आहे.

एखादी हुल्लड कोठें निघाली म्हणजे मात्र तींत क्षणभर जाऊन मिसळावें, त्यामुळें येईल तो मोठेपणा मिळवावा, लोकांनीं पेटविलेल्या मशालींभोंवतीं आपले चेहेरे आयते ओवाळून ते उजळ करावे, असे करणारेच पुष्कळ भेटतात. पण सात्त्विक बुद्धीनें आपल्या गांवचा कारभार आपण करणारे, नव्या संस्था बनवि-

ण्यांत बुद्धि खर्चणारे, आणि सार्वजनिक कामांत बिनमोबदल्यानें सोसावी लागणारी झीज सोसणारे, विधायक कार्यकर्ते फार थोडे. पाश्चात्य देशांत स्थानिक संस्थांच्या कारभारांत लक्ष घालणें ही सार्वजनिक जीवनाची पहिली पायरी असें समजतात. तेथें शिक्षण घेऊन, त्या शिक्षणाच्या बळावर व अनुभवावर कायदेकौन्सिलें किंवा पार्लमेंटें यांत शिरून, प्रधानपदाचीं मुत्सद्देगिरीचीं कामें करण्याची ईर्षा व उमेद तिकडील लोक बाळगतात. आमच्याइकडे मात्र मोठें कार्यक्षेत्र मिळत नाहीं म्हणून धाकटें कार्यक्षेत्र लाथाडणें यांतच राष्ट्रभक्ति सांठविलेली आहे असे मानणारेच फार.

आतां अशा संस्थांतून निवडणुकीच्या द्वारें शिरण्याला लागणारा खर्च किंवा श्रम ज्यांना करतां येत नाहींत असे लोक मागें राहिल्यास, आणि तेंच त्यांचे खरें कारण असल्यास, त्यांना दोष देतां येत नाहीं. परंतु अशाहि लोकांना इतर रीतीनें बाहेरून थोडेबहुत काम करतां येतें आणि आंतल्यांना सहाय्य देतां येतें. म्युनिसिपालिटीला 'खराट्याचे स्वराज्य' असें कोणी म्हटलें म्हणजे माझ्या अंगाचा तिळपापड होतो, व मीहि त्याला असें उत्तर देतों कीं, "बाबा, खराट्याची खरी योग्यता ओळखणारा विरळा. माझें तर मत असें आहे कीं, म्युनिसिपालिटयांच्या ऐपतीप्रमाणें सोन्यारुप्याची किंवा जडावाचीहि खराटयाची प्रतिमा करून ती प्रत्येक म्युनिसिपालिटीच्या प्रवेशद्वारावर लावावी इतकी योग्यता या खराट्याची आहे. स्वावलंबनाच्या तत्त्वाचें उत्कृष्ट प्रतीक खराट्यासारखें दुसरे कोणतेंच मिळणार नाहीं. मनुष्य स्वभावांतील गुणावगुणांची पहिली परीक्षा देण्याची शाळा स्थानिक स्वराज्याचा कारभार हीच होय. मनुष्य स्वभाव हा कोठेंहि गेलें तरी तोच असणार, यामुळें स्थानिक स्वराज्याचा कारभार यशस्वी होण्याला जे गुण लागतात तेच प्रधान मंडळाचा कारभार करण्याला लागतात. आणि स्थानिक स्वराज्याचा कारभार बिघडण्याला जे दुर्गुण खालीं कारणीभूत होतात तेच वर प्रधानमंडळाचा कारभार बिघडण्यालाहि कारणीभूत होतात असें निखालस समजावें."

असो. स्थानिक स्वराज्यासंबंधानें माझीं मतें अशीं असल्यामुळें सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभींच मी माझें लक्ष तिकडे घातलें. आणि आयुष्यांतील सुमारें पंचवीस वर्षें या कार्याला दिलीं. या कार्यांत मी कांहीं मोठ्या अलौकिक किंवा लोकोत्तर गोष्टी संपादिल्या, पराक्रम केले, क्रांत्या घडवून आणल्या, असें म्हणूं शकत

नाहीं. तथापि मी केलें ते सर्व काम निस्वार्थी बुद्धीनें केलें, व त्याचा मोबदला घेतला असलाच तर तो फक्त त्या कार्यांत मिळणाऱ्या बहुमानाच्या रूपानें घेतला.

प्रथम १८९८ सालीं मी पुणे म्युनिसिपालिटीत निवडून आलों तो लोकप्रियतेच्या लाटेवर. आणि पुढें ही लोकप्रियता अखंड अगदीं एकसारखी टिकली नसली, तरी सुमारें पंचवीस वर्षांत मी कोणत्याहि निवडणुकीला उभा राहिलों आणि अयशस्वी ठरलों, असें झालेंच नाही. किंवा फार खालच्या नंबरला निवडून आलों असेंहि नाही. या बाबतींत मात्र मला मिळालेलें यश असामान्य होतें असें मी म्हणूं शकेन. आणि उलट पुण्याच्या नागरिकांना मीहि त्याचा मोबदला माझ्या वेळांतला पुष्कळ वेळ खर्चून व परिश्रम करून दिला असें मला न्यायबुद्धीनें म्हणतां येईल. मी पुणें म्युनिसिपालिटीचा दोन वेळां अध्यक्ष होतो. या मुद्दतींत म्युनिसिपल कामावर खर्च झालेल्या माझ्या वेळाची सरासरी काढली तर , मी पुण्यांत हजर असलेल्या दिवसांत, रोज तीन किंवा चार तासहि भरेल.

असो. सहा वर्षांपूर्वी पुणें म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर रा. सदाशिव रामचंद्र भागवत यांनीं, शहर म्युनिसिपालिटीच्या कागदपत्रांच्या आधारानें, म्युनिसिपालिटीतील माझ्या कामासंबंधाने जी माहिती एकत्र करून 'केळकर' ग्रंथांत दिली आहे तिचाच उपयोग येथें करावासा मला वाटतो. कारण कागदपत्रावरून केलेल्या टिपणाइतकी विश्वसनीय माहिती मला स्मरणानें देतां येणार नाही. रा. भागवत यांचीं टिपणें खालीलप्रमाणें आहेत:—"तात्यासाहेब केळकर यांची ह्या म्यु. पा. तील कामगिरी म्हणजे गेल्या पावशतकाचा पुणें म्यु. पा. चा विहंगम दृष्टीनें पाहिलेला कारभारच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. इ. स. १८५६ त स्थापन झालेल्या ह्या संस्थेचे केळकर हे इ. स. १८९८ सालीं सभासद म्हणून, टिळक किंवा राष्ट्रीय पक्षाच्या पाठिंब्याबरोबरच न. आ. द्रविड इत्यादि भिन्न मतांच्याहि लोकांच्या सहानुभूतीनें निवडून आले. येतांच सॅनिटरी कमिटींत त्यांची पोटनिवड झाली. नंतर मॅनेजिंग कमिटी, प्रॉसिक्यूशन कमिटी, कबरस्थान कमिटी, नियामक कमिटी, जकात व ड्रेनेज कमिटी, इत्यादि कमिट्यांवर तात्यासाहेबांची निवड होत असे. म्हणजे लोकहिताच्या कसोटीस ते सर्वतोपरी उतरत. त्यांत त्यांच्या अष्टपैलूपणाची व लोकप्रियतेची साक्ष पटते. ना. गोखले हे दोराबजी पदमजीनंतर अध्यक्ष झाले. ( इ. स. १९०२ ) त्या अवधींत केळकरांनीं

स्मशान कमिटी, राज्यारोहण व्यवस्था कमिटी वगैरे कामीं वेळोवेळीं दाखल होऊन कामांचे निकाल लावलेले आहेत. इ. स. १९०३ ते १९०८ सालांत म्युझियम, प. वर्क्स, गव्हर्नरांना मानपत्र, लॉ, एस्टॅब्लिशमेंट, नाटकगृह, ऑडिट इतक्या कमिट्यावरील कामें त्यांनी केलीं आहेत. शिवरामपंत परांपजपे व पेंडसे हे सन १९०८ च्या निवडणुकींत यशस्वी झाले. पण त्यांनीं राजिनामे दिल्यामुळें केळकर व खाडिलकर हे उभे राहून निवडून आले. १९११ सालीं पुनः त्रैवार्षिक निवडणूक व्हावयाची. पण प्लेग, खानेसुमारीचें काम, ह्यामुळें सहा महिन्यांची मुदत वाढून नंतर निवडणूक झाली. त्यांत तात्यासाहेब निवडून येऊन उपाध्यक्ष झाले. (१९१२) ह्या वेळीं म्यु. पा. च्या घटनेंत फरक झाला. म्हणजे लोकनियुक्त २६ व सरकार नेमणुकीचे १३ अशांचें म्यु. पल बोर्ड बनलें. ह्यांत सभासदांची संख्या वाढली पण प्रमाण वाढलें नाहीं. तात्यासाहेब उपाध्यक्ष होते तरी अंग मोडून काम करण्याचा त्यांचा स्वभाव असल्यामुळें ते स्वतः प्रत्येक गोष्टींत लक्ष घालीत, व त्यांचा उपयोग काम चोख व पायाशुद्ध होण्यांत होई. ह्या मुदतीत म्यु. पा. ची आर्थिक परिस्थिति सुधारणा कमिटी, पडजागांच्या योजनेबाबत कमिटी, बालक मृत्युसंख्या चौकशी कमिटी, भांबुर्डागांव सुधारणा कमिटी इत्यादि प्रासंगिक व महत्त्वाच्या कमिट्यांवर त्यांनी काम केलीं आहेत. इ. १९१८ च्या निवडणुकींत श्री. केळकर हे निवडून आलेच, आणि शिवाय लोकनियुक्त अध्यक्ष होण्याचा पहिला मान मिळवून ही प्रथा पाडण्याचेंहि श्रेय त्यांजकडेच आलें. नगराध्यक्षस्थानी म्हणून सुमारें एक वर्षभर केळकरांनीं काम केलें. पुढें विलायतेस स्वराज्यसंघाचे शिष्टमंडळाबरोबर व काँग्रेस डेप्युटेशनचे सेक्रेटरी म्हणून जावें लागल्या कारणानें केळकरांनी अध्यक्षपदाचा ( २३-४-१९ ) राजीनामा दिला. विलायतेहून परत आल्यावर म्यु. पा. नें लोकमान्य टिळकांबरोबर अध्यक्ष तात्यासाहेब केळकर यांस मानपत्र दिलें.

"इ. सं. १९२१ च्या ऑक्टोबरांत सभासद खा. ब. भुरभ्या जलभ्या यांनीं ना. प्रिन्स ऑफ वेल्स —यांस ते ह्या वेळीं हिंदुस्थानांत आले होते व पुण्यास यावयाचे होते—मानपत्र देण्याबद्दलचा ठराव मांडला. तेव्हां १९१९ मधील जालियनवाला बागेंतील ब्रि. सरकारकृत अमानुष कत्तल लोकांच्या ध्यानांत होती व असहकारितेविरुद्ध चाललेली दडपशाही लोक अनुभवीत होते. तेव्हां श्री. तात्यासाहेब केळकरांनीं हें 'ध्यानांत घेऊन मतें द्यावींत' असे लोकमताचा वारा ओळखून सभासदांना बजाविले. त्याचा इष्ट तो परिणाम होऊन ठराव नापास झाला. येथें सांग-

ण्यासारखी गोष्ट कीं, ह्या सभेपूर्वी व नंतर झालेल्या बऱ्याच सभांना केळकर हजर नसत. पण ह्या सभेला ते मुद्दाम आले. ह्याप्रमाणेंच तात्विक स्वरूपाचे व विशेष गुंतागुंतीचे प्रश्न म्यु. पा. पुढे विचारास येत त्या वेळी केळकर समक्ष हजर रहात, व देतां येईल ती योग्य मसलत देऊन लोकमताचा बोज कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत. इ. स. १९२२ साली तात्यासाहेब अध्यक्ष निवडले गेले ते पुढें तीन वर्षे होते. बावीसच्या जानेवारीत म्यु. पा. चे ५१ समासद हे सर्व लोकनियुक्त असावेत असा ठराव तात्यासाहेबांनीं आणला व त्यावर फारच मुद्देसूद भाषण केलें. ह्या तीन वर्षांत केळकरांना पूर्वीप्रमाणें म्यु. पा. कडे लक्ष देण्यास असेंब्लीच्या कामामुळें हवा तेवढा वेळ मिळाला नाही. पण एक चिरस्मरणीय व पुण्यनगरीस भूषणभूत अशी थोरवीची गोष्ट ह्या मुदतींतच धैर्याने, धोरणाने व जबाबदारी घेऊन केळकरांनीं घडवून आणली. ती म्हणजे लोकमान्यांचा संगमरवरी पुतळा मार्केटमध्यें उभा करण्याची. या वेळीं म्यु. पा. विरुद्ध दोन दावे चालू होते. म्यु. सभासदांतहि, पाहूं सावकाशीनें, दाव्याचा निकाल होऊं द्या, पैसे कोठें आहेत ? इत्यादि बोलणारे होते. ब्राह्मणब्राह्मणेतर पक्षवादित्वहि ह्यांत अंतर्भूत होतें. पण सरकार विरुद्ध लोकपक्ष अशा तात्विक झगड्यांतील कसोटीचा हा निकाल होता. एका राष्ट्रवंद्य विभूतीच्या चिरस्थायी स्मारकाचा हा एक प्रश्न होता. तेव्हां सरकारी फिर्यादीच्या बागुलबोवाला भिऊन पुतळा उभारण्याचे रहित करावें असें केळकरांना वाटेना. म्हणून तो प्रश्न सभेपुढें येतांच त्यांनीं १० हजार रुपये म्यु.च्या हवालीं केले व ठराव पास करून घेतला. पुढे हे पैसे त्यांस, म्हणजे केसरी-मराठ्याचे ट्रस्टी श्री. केळकर यांस, परत दिले गेले. पण ह्या प्रसंगावरून केळकरांची दूरदर्शीबुद्धि व तडफहि चांगली प्रतिबिंबित होते. तात्यासाहेबांनीं इ. १९२५ सालीं असेंब्लीच्या कामामुळें वेळ मिळत नाहीं, असें म्हणून, व कामाच्या सोयीच्या दृष्टीनें, म्यु. सभासद रहा रहा म्हणत असतांहि राजिनामा दिला; व जवळ जवळ २५।२६ वर्षपर्यंत म्यु. कारभाराचीं जीं सूत्रें केळकरांनीं चालविलीं होतीं ती सोडिलीं. म्यु. पा. तील केळकरांच्या कामासंबंधानें दोनतीन गोष्टी मुख्य आहेत. एक असेंब्लीचा काल सोडला असतां, त्यांची सभांमधील हजेरी 'सर्व सभांस हजर' असें ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टांत नमूद केलेलें आहे. दुसरें, म्यु. पा. तील एकहि बारिक मोठें अंग असें सांपडणार नाहीं कीं ज्यांत केळकराचें तज्ज्ञत्व दिसून येत नाही. आणि तिसरें म्यु. पा. विषयींचा अभिमान. पुणें म्यु. पा. नें, ते अधिकारनिवृत्त

झाले तेव्हां, केळकरांचा यथोचित गौरव केला. म्हणजे आम्ही प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें, म्यु. पा. नें आपल्या गेल्या पाव शतकांतील प्रत्यक्ष इतिहासकाराचाच सन्मान केला."

सन १९१९ सालीं मी विलायतेहून परत आलो तेव्हां पुणें शहर म्युनिसिपालिटीनें लो. टिळकांच्याबरोबर मलाहि मानपत्र दिलें. तसेंच तिनें १९३२ सालीं माझ्या ६१ व्या वाढदिवसाला उद्देशून सत्कारपूर्वक माझें अभिनंदन केलें. त्याप्रसंगीं मी खालीलप्रमाणें भाषण उत्तरादाखल केलें:—

"मी प्रथम सन १८९८ सालीं या म्यु. टींत निवडून आलों व तेव्हांपासून मध्यंतरीं २५ वर्षे माझा म्यु.शीं संबंध होता. मी या म्युनिसिपालिटीचा अभिमानी आहे. आपल्या ताब्यांत थोडी पण अनेकविध सत्ता आली आहे. पण सत्तेबरोबरच जबाबदारीहि आली आहे. एकमुखी सत्ता असली तर चुकीकरितां एकट्या व्यक्तीलाच नांवे ठेवतां येतात. परंतु सर्व नागरिकांच्या हातांत सत्ता आली म्हणजे मग नांवे तरी कोणास ठेवाल? त्यामुळें आपण आपलीच निंदा करतों हें लक्षांत ठेवून निंदा करा म्हणजे झालें असें मी लोकांना म्हणतों. मात्र आत्मनिंदेसारखे स्वतःच्या सुधारणेला दुसरें साधन नाहीं याच दृष्टीनें म्यु. कडे पाहून मनुष्य वागेल तर त्याचा फायदाच होईल. रोज सकाळीं उठल्यावर आपण आपली निंदा करावी म्हणजे आपली सुधारणा होईल. मी म्यु. त सारासार विचारानें लोकहिताचें काम केलें. आपण माझी आठवण ठेविली तशीच मीहि आपली ठेविली आहे. म्यु. कारभारांत कुणी आमच्याजवळ जास्त हक्क मागतात म्हणून मला केव्हांच वाईट वाटत नाहीं. मी मि. बेग यांना असें सांगतों की, पुणें शहरांतल्याप्रमाणेंच जर सर्व ठिकाणचे मुसलमान असतील तर भांडणें होणारच नाहींत. आम्हाला चीड कां येते तर आमच्या देवांवर व बायकांवर हात टाकला जातो व कपटानें लोकांचें धर्मांतर केलें जातें. याचें आम्हांस वाईट वाटतें. हें थांबेल तेव्हां तुम्ही आम्ही माऊभाऊच आहों. तसेंच ब्राह्मण-ब्राह्मणेतरांबद्दल होय. राजकारणाबद्दल मला एवढेंच सांगावयाचें की, आपण अंगणांत विजेचा दिवा लावला तरी घरांतला नंदादीप कोणी मालवीत नाहीं. विवेकबुद्धीचा दीप हा कोणी मालवूं नये. या दृष्टीनें मी राजकारणांत सदा सिद्ध आहे. मला तें नावडतें नाहीं व वावडेंहि नाही. परंतु आजच्या स्थितींत माझ्यापेक्षां चांगले लोक आहेत ते राजकारण करीत आहेत. माझ्याप्रमाणें लोक जेव्हां उघड उघड बोलूं लागतील

तेव्हां पुनः माझे राजकारण मी चालूं करीनच. म्युनिसिपालिटी म्हणजे तो स्वयं-पाक आहे. चांगला झाला तर आपणच खाऊं, बरें वाईट झाला तर नांवें कोणाला ठेवणार ? मी जबाबदारीचें भाषांतर स्वयंपाक असें करतों. सर्वांनीं सामुदायिक काम करावें, व्यक्तिद्वेष टाळावा, अशी माझी सर्वांना विनंति आहे."

लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्था हा समाजाच्या घसेडखोरपणावर उत्तम उतारा असतो. म्युनिसिपालिटीचा कारभार सर्वस्वी लोकतंत्री असल्यावर त्या कारभाराची जी निंदा ती मतदार संघाची, अर्थात् त्या समाजाचीच निंदा नव्हे काय ? म्हणून म्यु. कारभाराला कोणी नांवें ठेवून हसूं लागला म्हणजे मी त्याला म्हणतो, " काय हो तुम्ही तुमचे तुम्हालाच हसतां आहांत, हे तुमच्या लक्षांत येत नाहींसें दिसते. तुम्ही केले ते तुम्हीच भोगलें पाहिजे. यांत दुसऱ्या कोणाला नांवें ठेवणार ? आरशांत आपलेंच प्रतिबिंब पडत आहे हें लक्षांत न येतां, समोर दिसणारी आकृति कुरूप म्हणून तिला कोणी हसूं लागला तर ती मूर्खपणाची कमालच नव्हे काय ! कसोटीवर घासलेले सोनें हिणकस ठरलें तर त्यानें सोनाराला दोष देण्यांत काय अर्थ ? म्युनिसिपालिटी अपात्र तर समाज अपात्र. जशी खाण तशी माती." मोठ्या स्वराज्याच्या गोष्टी बोलतांना सरकार वरिष्ठ अधिकार आपणाला देत नाही अशी तक्रार आपण करितों ते एका अर्थाने बरोबर असले तरी, त्याने देऊन टाकलेल्या अधिकारांचें चीज स्वराज्यरूपानें आपण कितपत करितों हें मधून मधून तरी पहावयास नको काय ?

दुसरें असें की, मोठे ध्येय डोळ्यापुढें ठेवल्यानें तन्मयता पावलेल्या कांहीं थोड्या व्यक्तींना, व्यवहारास आवश्यक असणाऱ्या लहानसहान दुय्यम गोष्टींकडे स्वतः लक्ष देण्यास फावत नसले तरी म्हणजे त्यांना स्वतः त्यात पडावयाचें नसले तरी, परहस्तें त्यांनी त्याची योग्य व्यवस्था लावून दिलीच पाहिजे. व्यव-हारात जातीने पडण्याची त्यांना स्वतःला माफी असली तरी, व्यवहार चांगला न चालला तर त्याच्या दूषणाचे खापर त्यांच्याच डोक्यावर फुटणार हे उघड आहे. अर्थात् स्वतः स्थानिक स्वराज्याच्या खटाटोपांत त्यांस पडावयाचें नसले तरी त्यांना आपल्याला जबाबदार अशा दुय्यम लोकांचा त्यामध्यें प्रवेश करवून दिला पाहिजे व त्यांच्या कामावर देखरेख ठेवली पाहिजे. पण असें होण्याचे झाले तरी, स्थानिक स्वराज्याविषयीं त्यांनीं यथाप्रमाण आदरबुद्धि दाखविली

पाहिजे. पहिल्या प्रतीचे काम करण्याची ज्याची योग्यता त्यानें पहिल्या प्रतीचेंच काम करावें; कारण तो स्वतः त्याच कामास अधिक लायक आहे. पण दुय्यम प्रतीचें काम अगर तें काम करणारा मनुष्य यासंबंधानें तुच्छताबुद्धि दर्शविणें हें गैरमुत्सद्दिणाचें लक्षण होय. " मी मोठा, मी मोठें काम करीन. तूं धाकटा किंवा हलका, सबब तूं धाकटें किंवा हलकें काम कर." असें म्हणणारांचा किंवा दर्शविणारांचाहि मोठेपणा खोटा आहे असें बेलाशक समजावें. मनुष्याचा दर्जा व कामाचें महत्त्व हे तिऱ्हाईतपणें पहाणाऱ्या जगानें ठरवावयाचें असतें, व जग तें ठरवितेंहि. पण लोकनायक—मग तो कितीहि मोठा असो—त्यानें नेहमीं असेच म्हटलें पाहिजे व वर्तनानें दर्शविलें पाहिजे की सार्वजनिक काम करणारे हें सर्वच बंधु असून, शिवाय त्यांत लहानमोठा हा भेदभाव नाही. ते सर्व जुळे भाऊ आहेत. कामाची वांटणी झाली पाहिजे खरी, पण ती कार्यकर्त्यांच्या लहान-मोठेपणावर नाही, तर युक्तायुक्तता व औचित्य-अनौचित्य याच तत्त्वावर व्हाव-याची असते. ज्याला जे काम उत्तम करतां येईल ते त्याकडे द्यावयाचें हाच नियम. प्रत्येक सार्वजनिक काम महत्त्वाचें आहे, व तें काम जो उत्तम करील तोच मनुष्य उत्तम. मग काम लहान असो वा मोठें असो त्याच्याशीं आपल्यास कांहीं करावयाचें नाहीं. स्थानिक स्वराज्याला ' उकिरडा ' असें एकदां म्हटल्यावर मग त्या कामांत तुम्ही पडा असें कोणास म्हणणें म्हणजे ती त्याची स्तुति नसून तूं हलका व तुझ्याच लायकीचें तें काम अशी निंदा करण्यासारखेंच आहे. अर्थात् एखाद्या पुढाऱ्यास स्थानिक स्वराज्याचें काम स्वतःस करावयाचें नसलें तरी, त्यानें त्या कामाबद्दल आपणास तिरस्कार वाटतो असें न दर्शवितां उलट " काम महत्त्वाचें खरें, व त्यांत पडण्याची माझी देखील फार इच्छा आहे. पण दुसरें काम आगाऊच हातीं असल्यामुळें या कामांत पडण्यास मला वेळ मिळत नाही याबद्दल दिलगिरी वाटते " अशीच खरी भावना दर्शविली पाहिजे; व ती भावना खरी आहे असें त्याच्या वर्तनावरून दिसलेंहि पाहिजे. तरच त्याचे अनुयायी स्वाभिमानबुद्धीनें त्या कामांत पडतील, एरवीं पडणार नाहींत.

---

## ( ४ ) केसरीची ज्युबिली

ता. १ ऑगस्ट १९३० रोजीं टिळकांच्या मृत्यूला दहा वर्षे झालीं. या दहा वर्षांत केसरी ट्रस्टची व्यवस्था व केसरीचें संपादकत्व मजकडे होतें. त्या दोनहि

कामाचें तेथपर्यंतचे इतिवृत्त एखाद्या निमित्तानें महाराष्ट्रापुढें ठेवणें हें त्या समयाला उचित ठरत होतें. आणि तें करण्याचा मी एक असा मार्ग काढला कीं, त्यामुळें हीं दोनहि कामें मी कशी काय केलीं याची कल्पना लोकांना एकदम व यावी. ही कल्पना अशीं कीं, केसरीच्या शिलकी पैशांतून तीन लक्ष रुपये बाजूला काढून ठेऊन त्या रकमेचा सार्वजनिक राष्ट्रीय कामांना अखंड उपयोग व्हावा अशा योजनेचा एक ट्रस्ट करावा. या एका योजनेनें ज्या अनेक गोष्टी आपोआपच सिद्ध होणार होत्या त्या अशा—१ टिळकांच्या मृत्युनंतर, प्राणांतिक संकटें असतांहि, मी केसरीसंस्था दहा वर्षें टिकवूं शकलों. २ ती मी नुसती कशी तरी जीव धरून जगविली असें नव्हे तर चांगली दणदणीत रीतीनें चालविली. ३ हा दणदणीतपणा केवळ मतप्रसारतच नव्हे तर आर्थिक सुस्थितींतहि होता. ४ दहा वर्षांत मी केसरीची पूर्वीचीं सर्व देणीं देऊन टाकून, केसरीविषयीं योग्य त्या नव्या योजना व गरजा भागविण्याला अवश्य तें द्रव्य शिलक ठेऊन, शिवाय हातावेगळी करितां येईल अशी तीन लक्ष रुपयांची रक्कम केसरीच्या उत्पन्नांतून उरवूं शकलों. ४ केसरीला कार्यक्षम ठेवतांना त्यांतच मितव्ययाचीहि दृष्टि मी संभाळली होती. ५ केसरी जवळच्या द्रव्यसाधनाचा उपयोग त्याला किंवा त्याच्या आश्रितांना श्रीमंत करण्याचा नसून लोककार्याला राष्ट्र-कार्यालाच व्हावा हा टिळकांचा हेतु मी विसरलों नव्हतो. ६ आणि सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे, चिरोल केसच्यापायी टिळकांना झालेलें कर्ज फेडण्याला जनतेनें योग्य वेळीं तीन लक्ष रुपये देऊन केसरी संस्था वांचविली त्या ऋणाची फेड करणें हें 'पितृकार्य' होय असें मी सदोदित मनांत स्मरत होतो.

१९३१ च्या प्रारंभी होणारी केसरीची ज्युबिली केवळ एखादा जादा अंक काढूनच साजरी न करतां, त्या आधीं एखादें भरीव सत्कार्य सिद्धीला नेऊनच करणें अधिक योग्य असें मनाशीं ठरविल्यावर, या तीन लक्ष रुपयांचा ट्रस्ट-विनियोग कसा करावा याच्या विचारांत मी अनेक दिवस घालविले, अनेक मित्रांचा सल्ला घेतला, आणि शेवटी त्याचें जें स्वरूप ठरविलें त्याची कल्पना येण्याकरितां त्या ट्रस्टडीडपैकीं खालील उतारा देत आहे:—"पर्स-फंडाची रक्कम परस्पर व अभावितपणें सार्वजनिक वर्गणीनें जमा झाली नसती तर, न जाणों, कदाचित् आजमितीलाहि केसरी-मराठा संस्थेला न फिटण्याइतक्या कर्जांत रहावें लागलें असतें. आणि व्याजमुद्दलाच्या फेडींत दरसाल बहुतेक उत्पन्न घालवावें लागल्यानें, केसरी-मराठा संस्थेची सांपत्तिक उपयुक्तता अगदींच कमी होऊन, सांपत्तिकदृष्ट्या ती

जगते किंवा मरते अशी स्थिति आली असती. टिळकांच्या डोळ्यापुढें ही स्थिति ढळढळीत दिसत असल्यानें, १९२० मे महिन्यात 'पर्स–फंड' त्यांना नजर करण्यांत आला त्या वेळी त्यांना गहिंवर आला; व त्यांच्या तोंडून असें शब्द निघाले– ( उतारा ) " या खटल्याच्या निमित्तानें माझ्या खिशांत तीन लाख रुपये पडले अशी आपली समजूत करून घेऊन Mr. Tilak will chuckle over the three lacs असें एकानें (टाईम्सने) म्हटलें आहे. पण Chuckle over करण्यासारखी ही आनंदाची गोष्ट नाहीं. दुसऱ्या जवळून पैसे घेणें ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. या खटल्यांत मी बुडालों तर माझ्या आयुष्यांतलीं जीं काय दोनचार वर्षे राहिलीं असतील त्यांत थोडी जास्त खटपट करून मी पैसे फेडीन अशा हिंमतीनें हा खटला केला होता. पण खर्चाचे पैसे मला देऊन ती वेळ, तें काम, व ती हिम्मत आपण विकत घेतली आहे. आतां हें सारें आयुष्य मला तुमच्याकडे लावलें पाहिजे. त्यांत मला 'चकलं' होण्यासारखें कांहींच नाहीं. तुम्हाला आयतें गिऱ्हाईक सांपडलें आणि मीहि मला विकून घेतलें. हा व्यवहार माझ्या स्मरणांतून जाणें शक्य नाहीं. चिरोल केसमध्यें जय मिळून जरी माझा खर्च मला मिळाला असता तरीहि ते पैसे मी तुम्हालांच दिलें असतें. " याचा अर्थ आम्ही ट्रस्टी असा समजतों, व लोकहि तेव्हां असाच समजले कीं, टिळकांनीं पर्स-फंडाची रक्कम स्वतःला व केसरीलाहि कर्जासारखी मानली. तें कर्ज फेडण्याची इच्छा त्यांच्या मनांत होती, व ते हयात असते तर त्यांनी हरप्रयत्नानें तें फेडलेंहि असतें. परंतु पुढें दोन सव्वादोन महिन्यांतच त्यांना मृत्यु आला व ती त्यांची इच्छा तशीच राहून गेली. म्हणून त्यांची ती इच्छा शक्य तर आपण पूर्ण करावी हा हेतु, आम्हा उभयतांकडे केसरी-मराठा संस्थेच्या ट्रस्टीचें काम आलें तेव्हांपासून, आम्ही नेहमीं उराशीं बाळगून ठेवला होता. रक्कम लहान नव्हती. आम्ही संस्थेच्या जबाबदारीला नवीन होतों. आणि देशांतील परिस्थिति दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत चालली होती. यामुळें आम्हाला या गोष्टीचा आजपर्यंत उघडपणें उच्चार करतां आला नाहीं. पण ती मनांत दृढ ठेवून, संस्थेचा खर्च होईल तितका कमी ठेवून, काटकसर करून आम्ही पर्स-फंडाची ही रक्कम हळुहळू जुळवून संग्रहीं ठेवण्याचा प्रयत्न चालविला होता. आणि या दहा वर्षांच्या अखेर आज तो हेतु सिद्धीस नेण्यासारखी स्थिति ईश्वरकृपेनें व लो. टिळकांच्या आशीर्वादानें आम्हांस प्राप्त झाली याबद्दल आनंद वाटतो. लोकमान्य

टिळकांच्या आशीर्वादानेंच केसरी-मराठा ही संस्था अनेक संकटें आलीं असतां आजपर्यंत जिवंत राहून तिची आर्थिक स्थिति बरी टिकली. आणि येत्या जानेवारींत केसरी व मराठा या पत्रांना पन्नास वर्षे पुरी होऊन त्यांची 'ज्युबिली' करण्याचा प्रसंग येत आहे, अशा वेळेपूर्वी लो. टिळकांना वर सांगितल्याप्रमाणें आम्हांस ऋणमुक्त करतां आलें तर त्यांच्या आत्म्याला बरें वाटेल, अशी आमची प्रामाणिक समजूत असल्यानें तसें करणें हें आम्ही ट्रस्टी या नात्यानें आमचें पवित्र कर्तव्य समजतों.

"या रकमेसंबंधानें लो. टिळकांना ऋणमुक्त करणें म्हणजे पर्सफंडाकरितां ज्या ज्या लोकांनी वर्गणी दिली त्याच सर्वांना किंवा त्यांच्या वारसांना व्यक्तिशः ती परत देणें असा मात्र अर्थ आम्ही समजत नाहीं. कारण ज्यांनी ती वर्गणी दिली त्यांनी ती सार्वजनिक हितबुद्धि मनांत ठेवूनच दिली. स्वतःला परत घेण्याच्या आशेनें दिली नाहीं. शिवाय परत द्यावयाची म्हटली आणि ती देणारांची नांवनिशीवार यादी कांहीं मिळाली, तरी पुष्कळ लोकांनी आपले नांव प्रगट न करतां गुप्त रूपानेंच वर्गणी देऊन पावती-तिकिटें घेतलीं आहेत. अर्थात् ही रक्कम परत देणें म्हणजे ती बाजूला काढून ठेवून तिचा सर्वस्वी सार्वजनिक हितबुद्धीनें उपयोग करणें हेंच होय. आणि या रकमेचा अशा रीतीनें कायमचा निश्चितपणें उपयोग आम्ही केला असें जाहीर झाल्यास, पर्सफंडाच्या सर्व वर्गणीदारांना लो. टिळक हे आपल्या ऋणांतून मुक्त झाले असेंच वाटेल यांत शंका नाहीं. पर्सफंडाची वर्गणी जमली इतकी मोठी जमली नसती, तर केसरी-मराठा संस्था आजपावेतों सावकारी ऋणांत बुडून राहिली असती. ज्युबिली फंड सर्व खर्चून गेला असता. आज त्याच्या व्याजांतून जो लोकोपयोग होतो तो झाला नसता. आणि लोकमान्यांच्या चिरंजीवांना जी खाजगी म्हणून मिळकत राहिली तीहि मुळींच राहिली नसती. अशा रीतीनें तीन मार्गांनीं तिघांवर येणारीं संकटें पर्सफंडाच्या द्वारें लोकांनीं उदारपणानें वांचविलीं. यामुळें आम्ही योजल्याप्रमाणें, लो. टिळकांना ऋणमुक्त करून तसेंच पर्सफंडाची रक्कम सर्व आज ट्रस्ट करून वेगळी लोकोपयोगाकरितां काढून ठेवल्यास, व तिच्या व्याजांतून लो. टिळकांच्या इच्छेनुरूप किंवा धोरणानुसार आणि मूळच्या ट्रस्टडीडमध्येंहि सांगितल्याप्रमाणें सालोसाल सत्कारणीं व सार्वजनिक कार्यांत तिचा खर्च करीत गेल्यास, ते लोकमान्य टिळकांचें एक मोठें कायमचें स्मारक होईल.

आणि ज्यांनीं पर्सफंडाची वर्गणी दिली ते व इतर लोकहि अत्यंत संतुष्ट होतील असा आम्हास दृढ भरंवसा वाटतो. मूळ ट्रस्टडीडमध्यें कलम (१) यांत खालील शब्द आहेत. " कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं केसरी व मराठा वर्तमानपत्रें हातांत घेतल्यापासून त्या पत्रांचें द्वारें राजकीय शिक्षणाचा प्रसार करून, लोकांत राजकीय हक्कांची जाणीव उत्पन्न करणें व राष्ट्रीय ध्येयास पोषक अशा इतर अनेक अंगांच्या सार्वजनिक चळवळी करणें, वगैरे सर्व कामें ज्या हेतूनें केली तोच त्यांचा हेतु त्यांचे पश्चात निरंतर अबाधित अमलांत येण्याचें साधन म्हणून हें ट्रस्टडीड करण्यांत आलें आहे." ही गोष्ट लक्षांत घेऊन वरील कलमांतील उद्देश तडीस नेण्याकरितां प्रस्तुतच्या या ट्रस्टडीडमधील योजना आम्ही केली आहे. आणि एवढ्याचकरितां ही सर्व विस्तृत हकीकत सांगून आमचा या ट्रस्टचा हेतुनिर्देश मुद्दाम केला आहे.

"वरील हेतुप्रमाणें आम्ही आज रोजीं केसरी–मराठा संस्थेच्या शिलकेंतून इष्टांकी रक्कम रुपये तीन लक्ष (पर्स–फंडाच्या रकमेइतकी रक्कम व त्यांत संस्थेच्या पदरचे १३६४२८८८१० रुपये घालून निर्देश होण्याकरितां सोयीची म्हणजे तीन लक्ष करून) वेगळी काढून त्या रकमेचा ट्रस्ट निर्माण करीत आहो व ती रक्कम स्वतंत्र अशी ठेवीत आहो. म्हणजे मूळच्या ट्रस्ट मिळकतींपैकीं कांहींची Appointment of property या ट्रस्टनें करीत आहो.

"सदरहु रक्कम, या ट्रस्टडीडच्या पोटी, ट्रस्ट-फंड व कायमनिधी या स्वरूपानेंच रहावयाची असून, त्यांतील मुद्दल न खर्चता फक्त व्याजांतून खालीं लिहिल्याप्रमाणें वेळोवेळीं खर्च होण्याचा आहे.

"या ट्रस्ट-फंडाची रक्कम रहाणें ती केसरी–मराठा संस्थेचे जे विद्यमान ट्रस्टी वेळेवेळीं असतील त्या सर्वांनीं मिळून संयुक्त रीतीनें ती धारणा करून आपल्या ताब्यांत ठेवावी. तिजवरील व्याज वगैरे वसूल करणें तें त्यांपैकीं कोणाहि एकास अधिकारपत्र देऊन वसूल करण्यास हरकत नाहीं. परंतु ऐनजिनसी नोटांची देवघेव, विक्री, अगर इतर कोणताहि व्यवहार विद्यमान सर्व ट्रस्टींच्या मिळून सह्यानिशींच झाला पाहिजे.

"सदरहू ट्रस्ट्र-फंडाचे पहिले ट्रस्टी केसरी-मराठा संस्थेचे विद्यमान ट्रस्टी म्हणून आम्ही खालीं सही करणार हेच राहतील. आमच्या मागून आमच्या या

जागीं मूळ ट्रस्टडीडमधील नियमानुसार, वेळोवेळीं जे दुसरे कोणी ट्रस्टी येतील, किंवा त्यांचे जागीं फिरून जे कोणी येतील ते आपोआप, म्हणजे नवीन मुद्दाम नेमणूक न करतांहि ( Ex-officio ) या, ट्रस्ट मिळकतीचे ट्रस्टी नेमले गेले असें समजण्यांत येईल.

"या ट्रस्ट–फंडाच्या मुद्दलावर सर सालांत जें व्याज प्रत्यक्ष वसूल होईल त्यांतील शेंकडा पांच इतकी रक्कम त्या खात्यांतील कामगिरी ( कचेरी ) खर्चाकरितां बाजूस ठेवून कामगिरीखातीं जमा करावी व कामगिरीसंबंधानें नेमण्यांत येणाऱ्या ऑफिस एस्टॅब्लिशमेंटवर व कामगिरीसंबंधानें जरूर त्या इतर साधनांवर खर्च करावी. आणि उरलेली पंचाण्णव टक्के रक्कम ही कार्योपयोगी समजून तींतून खर्च करावा.

"लो. टिळकांना पर्सफंडाची जी रक्कम अर्पण करण्यांत आली, तींत निरनिराळ्या प्रांतांतील अनेक लोकांच्या देणग्या समाविष्ट होत्या. म्हणून हल्लीं ती रक्कम जर ऋणविमोचनाकरितां सार्वजनिक खर्चासाठीं परत द्यावयाची तर त्या त्या कोणाहि व्यक्तीला नव्हे पण जनतेला, या परत दिलेल्या रकमांचा कांहीं तरी सामुदायिक रीतीनें व राष्ट्रीय कार्याकरितां उपयोग होईल अशी व्यवस्था होणें इष्ट आहे. पूर्वीच्या हिशेबावरून पहातां पर्सफंडाच्या वर्गणीच्या रकमेपैकीं उत्तर महाराष्ट्र, म्हणजे वऱ्हाड व नागपूर प्रांत, यांनीं मिळून सुमारें नव्वद हजार रुपये वर्गणी दिली. अर्थात् पर्स-फंडाच्या परत फेडीचा जो उपयोग व्हावयाचा तो या प्रांतांना त्यांच्या मूळच्या देणगीच्या रकमेच्या प्रमाणानें करून देणें योग्य होय. म्हणून आम्ही असें ठरविलें आहे कीं, परत कर्जफेडीच्या रकमेवरील वार्षिक व्याजांतून सुमारें एक लक्षावरील व्याज म्हणजे हल्लीच्या दरानें रु. पांच हजार इतकी रक्कम नागपूर–वऱ्हाड प्रांतांच्या उपयोगाकरितां दरसाल मिळावी. तसेंच कर्नाटक प्रांताच्या उपयोगाकरितां सुमारें पंचवीस हजारावरील व्याज म्हणजे दरसाल साडेबाराशें रुपयांची रक्कम दिली जावी. या रकमा आम्हा ट्रस्टीकडून घेऊन त्या आपल्या प्रांतांत योग्य कामीं खर्च करण्याकरितां नागपूर–वऱ्हाडकरितां एक व कर्नाटक प्रांताकरितां एक अशी कायमचीं अधिकारी मंडळें स्थापण्यांत आली पाहिजेत; मग ती ट्रस्टडीडनें निर्माण होवोत किंवा रजिस्ट्रेशन ऑफ सोसायटीजच्या कायद्याच्या आधारें निर्माण होवोत."

ही योजना ता. १ ऑगस्ट १९३० रोजीं टिळकस्मारक-मंदिराच्या पटांगणांत एका मोठ्या सभेंत ज्या दिवशीं जाहीर केली त्या दिवसाची आठवण मला पक्की आहे. ती अशी कीं, तीन लक्ष रुपयांच्या सार्वजनिक ट्रस्टची कल्पना जमलेल्या लोकांना विस्मयकारक वाटली. पण तिचें योग्य प्रकारें गुणग्रहण करण्यासारखी त्यांची मनःस्थिति नव्हती. १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळीच्या ऐन मध्यान्ही हा प्रसंग घडला यामुळें, सभा लो. टिळकांच्या वार्षिक पुण्यस्मरणाची होती तरी प्रौढ विचारी समंजस असे फार थोडे लोक सभेला आले होते. कारण या सभेंत कायदेभंगाचीच कांहीं तरी उठावणी कदाचित् होईल अशी भीति त्यांना वाटत असावी—सभेला आले ते बहुशः तरुण विद्यार्थी होते. त्यांच्या डोळ्यांत कायदेभंगाची चळवळ भरलेली होती. ते स्वतः तुरुंगाबाहेर होते तरी तुरुंगांत जाणें हाच मोठा पराक्रम, असें त्या वेळीं त्यांना वाटत होते! म्हणून ३ लाखांच्या ट्रस्टची जाहीर घोषणा ऐकली न ऐकली असें त्यांनीं केलें. मात्र आतां या ट्रस्टच्या पैशाच्या उपयोग करून घेण्याकरितां कोण कसे अर्ज करितो हें पाहिलें म्हणजे त्या वेळच्या लोकांच्या उदासीनतेचें मला हंसू येतें!

असो; स. १९३१ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या अंकाला केसरीच्या एकावन्नाव्या वाढदिवसाचें टिपण येत होतें. तो अंक ज्युबिली अंक म्हणून काढण्याचें मी ठरविलें. आणि त्याप्रमाणें ता. ३ चा अंक नेहमींहून वेगळ्या आकाराचा सुमारें १०८ पानाचा काढला. तो सचित्र तर होताच. पण माहितीचे लेख, वर्णनात्मक लेख, चर्चात्मक लेख इत्यादि अंगांनीं मी तो इतका समृद्ध व चित्ताकर्षक केला कीं, सर्व हिंदुस्थानांत अशा ज्युबिलीच्या निमित्तानें निघालेल्या कोणाहि वर्तमानपत्राच्या अंकाची तो बरोबरी करूं शकता. त्याचा खपहि तसाच झाला. म्हणजे पसतीस हजार प्रती काढल्या तरी अपुऱ्या पडल्या, आणि कित्येक लोकांना (याविषयीं एकदोन मौजेचीं उदाहरणें म्हणूनहि सांगतां येण्यासारखीं आहेत) त्या अंकाची प्रत प्रयासानें किंवा वशिला लावून मिळवावी लागली असें धोंडोपंत सांगतात! या अंकाचा अभिमान मला वाटण्यासारखी एक विशेष गोष्ट अशी आहे कीं, हा सर्व अंकच्या अंक बहुशः माझ्या एकट्याच्या हातचा आहे. आणि त्यांतले कांहीं चर्चात्मक लेख तर अगदीं माझ्या मनासारखें उतरले आहेत. या अंकांत केसरी-मराठा संस्थेसंबंधीं कांहींहि माहिती किंवा बातमी देण्याचें मी शिलक ठेवलें नाहीं. याचें कारण एक तर ही संस्था सार्व-

जनिक स्वरूपाची अशी एकदां मानल्यावर तिच्या संबंधीं खासगी असें कांहींच उरत नाहीं. दुसरें कारण असें कीं, टिळकांच्या या संस्थेसंबंधीं अनेकांगी बारीक सारीकहि माहिती कळावी, समजून घ्यावी अशी ऋणानुबंधी लोकांची इच्छा असते ती पुरी करावी असें मला वाटलें. आणखीहि विशेष असें एक कारण हें कीं, या संस्थेचा वाद हायकोर्टापर्यंत जाऊन नुकताच निकालांत निघून तिचें कायदेशीर अधिष्ठान पक्कें झालें होतें. आणि यापूर्वीच्या दहा वर्षांत मी व माझे सहकारी ट्रस्टी यांनीं संस्थेचें संगोपन संवर्धन कशाप्रकारें केलें हें जगापुढें खुलासेवार मांडण्याची ती एक आयती संधि आम्हाला मिळाली होती. ती घेऊन, १९०९ सालीं टिळकांनीं केलेल्या पहिल्या मृत्युपत्रापासून १९३० सालीं मुंबई हायकोर्टानें दिलेल्या अखेर निकालापर्यंतचे, सर्व अस्सल कागदपत्र मी या अंकांत छापले. यामुळें टिळकांचे मुलगे व आम्ही ट्रस्टी यांच्यांतील वादावर लख्ख प्रकाश पडून सर्व शंकेखोरांचे डोळे उघडले आणि प्रतिपक्षीयांची तोंडेंहि बंद पडलीं. या अंकाचा व्याप विस्तार व महत्व लक्षांत येण्याकरितां त्यांतील विषयांची अनुक्रमणिकाच या खालीं उतरून देतों म्हणजे झालें:—

१ केसरीचा एकावन्नावा वाढदिवस, २ केसरी-मराठा यांची उत्पत्ति व वाढ, ३ केसरीचें पहिलें प्रसिद्धीपत्रक, ४ केसरीतील मजकुराची मांडणी, ५ केसरी-मराठ्यावरील आपत्तीचे प्रसंग, ६ मराठा पत्राची हकीकत, ७ केसरी टाईप फाउण्डरी, ८ टिळक टाईपाच्या वर्णमालेचे नमुने, ९ केसरी ट्रस्टसंबंधीं कांहीं कागदपत्र, १० लो. टिळकांचें पहिलें मृत्युपत्र (१९०९), ११ लो. टिळकांचें दुसरें व अखेरचें मृत्युपत्र (१९१८), १२ केसरी-मराठा संस्थेचें ट्रस्टडीड, १३ लवादनामा नं. १, १४ रिलीज डीड किंवा बेदावापत्र, १५ भाडेचिठी नं. १ व २, १६ पावती नं. १, २, ३, ४, १७ लवादनामा नं. २, १८ रामभाऊ टिळकांचा कोर्टास अर्ज (दाव्याचें काम न चालविण्याबाबत), १९ पुणें कोर्टाचा हुकूमनामा, २० केसरी ट्रस्टच्या दाव्यांतील 'जजमेंट' (निकालाचीं कारणें), २१ केसरीची तीन लक्ष रुपयांची देणगी, २२ केसरी-संस्थेची सांपत्तिक स्थिति, २३ मतप्रसार, धर्मादाय, देणगी वगैरेची यादी, २४ लो. टिळकांच्या वारसांची सांपत्तिक स्थिति, २५ केसरी-मराठा संस्थेचा निर्लोभीपणा, २६ केसरी—मराठा संस्थेचे नियम, २७ एजन्सी खातें, २८ केसरी संस्थेचे अवांतर उद्योग, २९ गुजराथी केसरी, ३० केसरीची मालकी व संपा-

दकीय धोरण, ३१ केसरीचा व तुरुंगाचा ऋणानुबंध, ३२ संपादकीय शिक्षण, ३३ वर्तमानपत्र मीमांसा, ३४ विलायती वर्तमानपत्रांचा इतिहास, ३५ हिंदी वर्तमानपत्रांचा इतिहास, ३६ हिंदी अखबारांचे नमुने, ३७ हिंदुस्थानांतील छापखानें व वर्तमानपत्रें, ३८ महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें, ३९ जुना ज्ञानप्रकाश, ४० बंगाल्यांतील वर्तमानपत्रें, ४१ मद्रासचें पुढारी पत्र, ४२ वर्तमानपत्रें व देशी–विदेशी भाषा, ४३ इकडील वर्तमानपत्रें, ४४ प्रेस ॲक्टाची कामगिरी, ४५ हिंदी वर्तमानपत्रें व टपालखातें, ४६ चित्रमाला परिचय, ४७ केसरीसंबंधी कांहीं आठवणी, ४८ उपसंहार व आभारप्रदर्शन.

ट्रस्टच्या दाव्याचा निकाल लागेपर्यंत आम्ही ट्रस्टींनीं बाहेर कांहीं बोलावयाचें नाहीं लिहावयाचें नाहीं अशी सक्त ताकीद आमच्या वकीलांनीं आम्हाला दिल्याचे, व त्यामुळें आम्ही गुदमरून जाऊन जीव कंठीत राहिल्याचें, पूर्वी सांगितलेंच आहे. पण सुदैवानें ज्युबिली अंक काढण्याच्या आधीं हायकोर्टाचा निकाल लागल्यानें आमच्या तोडावरचें मुसकें निघालें, आणि आमच्या तर्फेची सर्व हकीकत आणि तींहि प्रत्यक्ष कागदपत्राच्या द्वारें आम्हाला मुक्तकंठानें सांगतां आली. ट्रस्ट केला तेव्हां टिळकांच्या मुलांची सांपत्तिक स्थिति किती चांगली होती हें वाचून शेकडों लोकांना विस्मय वाटला. "ट्रस्टींनीं या मुद्दांना छळण्याऐवजी खरोखर मुलांनींच या ट्रस्टींना छळलें" या न्या. ब्रमफील्डच्या एका वाक्यानें पूर्वीचे सर्व विपरीत समज उलथे पालथे झाले! आणि आम्ही संस्थेची सर्व अंगें व्यवस्थित व सुसंघटित करून वरती तीन लक्ष रुपये शिल्लक टाकून टिळकांना निष्कर्जी केलें हें वाचून आमच्या प्रतिपक्षीयांनाहि आमची कार्यक्षमता व कर्तव्यतत्परता मान्य करावी लागली.

असो. हा ज्युबिली अंक काढण्याचा एक हेतु केसरी-मराठा संस्थेला पन्नास वर्षांत लाभलेल्या मित्रऋणाचा कृतज्ञतापूर्वक उच्चार करावयाचाहि होता. तो उच्चार मी त्या ज्युबिली अंकांत खालीलप्रमाणें केला आहे:—

"दुसरीहि एक गोष्ट आहे ती सांगण्याला संकोच करण्याचें कारण नाहीं. ती ही. कोणत्याहि संस्थेचा ज्युबिली समारंभ होण्याचा सुप्रसंग येण्याला, म्हणजे तिचें कार्य पन्नास वर्षे अखंड चालूं राहण्याला किंवा त्याची सर्वांगीण प्रगति होण्याला, अनेक व्यक्तींची सेवा श्रम बुद्धि चातुर्य इत्यादि अनेक उपजत किंवा कर्मार्जित गुण

उपयोगी पडलेले असतात. तथापि अशा प्रसंगीं अशा व्यक्तीपैकीं मृतांचा व तोहि त्यांच्या गुणांचाच उल्लेख कृतज्ञतापूर्वक करणें हें अधिक उचित ठरतें. जित्यांचा उल्लेख होऊंच नये असें नाहीं ! पण त्यांची वेळ येण्याला स्वाभाविक अवधि असते. निदान असें खरें कीं, त्यांनाहि आपण संस्थेला उपयोगी पडलों असें थोडेबहुत वाटण्याला, किंबहुना थोडाबहुत तसा अभिमान बाळगण्यालाहि, योग्य कारण असलें तरी त्यांनीं स्वतःविषयी एक शब्द उच्चारणेंहि अनुचित आणि हास्यास्पद ठरेल. त्यांनीं खरोखरच जर संस्थेची कांहीं सेवा केली असेल व लोकांना ती पटली असेल तर पुढची पिढी त्यांची आठवण कां न ठेवील ? किंवा यथाप्रसंग त्यांच्यासंबंधीं योग्य ते दोन शब्द कां न लिहील किंवा कां न बोलेल ! बुद्धीचा असा मक्ता कोणीहि आपणा एकटयाकडेच आहे असें मानूं नये. ती सर्व पिढ्यांना सारखीच वाटलेली असते. तसेंच एक पिढी जाऊन दुसरी तिच्या जागीं आली म्हणजेच, डोळे दिपविणारा, संकुचित करणारा, किंवा दृष्टिभ्रम उत्पन्न करणारा, फालतुक आडव्या तिडव्या ज्ञानकिरणांचा व विकारी किरणांचा दोषी प्रकाश लुप्त होतो, दुर्बिणींतून तेजोमय तारा किंवा शबलरूप ढग पहावा व त्याचें यथार्थ वर्णन बिनचुक करतां यावें, त्याप्रमाणें पुढच्या पिढीच्या विवेचक बुद्धीना व न्यायी मनांना गत पिढींतील मृत व्यक्तींच्या गुणदोषांची चर्चा बिनचुक निदान निर्भयतेनें करतां येते. आम्ही तर असेंच समजतों कीं, हा ज्युबिलीचा अंक म्हणजे केसरीच्या हल्लींच्या सेवकांनीं कृतज्ञताबुद्धीच्या खांद्यावरून पूर्वीच्या सेवकांना वहाण्याची पालखी आहे. अर्थात् पालखी वहावयाची ती वहातांना, पालखी वहाणारा स्वतःच पालखींत बसूं शकत नाहीं हें अगदीं उघड आहे.

" ही दृष्टि चालवून आम्ही या अंकांत स्मृति-शेषभूत झालेल्या अशाच केसरी कार्यकर्त्यांचे विशेष उल्लेख केले आहेत. यामुळे वाचकांनीं, हे उल्लेख अपूर्ण वाटल्यास, त्याबद्दल सहृदयतेनें क्षमा करावी. विद्यमान सेवकांच्या, यथार्थ असेल अशाहि, स्तुतीला जर ही मर्यादा तर पूर्वी त्यांच्याबरोबर केसरीची सेवा केलेल्या पण पुढें त्यांच्याशीं मतभेद झालेल्या, किंवा फुटून निघालेल्या, किंवा त्याचे प्रतिपक्षी होऊन त्यांच्याशीं झगडणाऱ्या इतर गृहस्थांची निंदात्मक किंवा दोषात्मक चर्चा करून वाद उकरून काढण्याचे तर ज्युबिली अंक हें स्थळ नव्हेच नव्हे. तात्पर्य, हा विशेष आनंदाचा प्रसंग समजून, त्या आनंदाच्या दुधांत मिठाचा खडा पडेल असले कोणतेहि उल्लेख किंवा विधानें करणें योग्य नव्हे अशा बुद्धीनें,

आम्ही त्यापासून अलिप्त रहाण्याचा प्रयत्न केला आहे. केसरीसारख्या संस्थेचें चालकत्व टिळकांच्या पसंतीनें त्यांच्याच हयातींत आमच्या हातीं येणें, व तें त्यांच्यानंतर दहा वर्षें टिकविणें, या एका गोष्टीनेंच आमच्या टीकाकारांच्या सर्व टीकांचा सहज परिहार होणारा आहे. मग जीभ व्यर्थ विटाळण्याचें काय कारण?

"सन १९२० सालापर्यंत, म्हणजे लो. टिळक हयात असेपर्यंत, त्यांचे मदतनीस किंवा सहकारी म्हणून ज्या इतर व्यक्तींनीं केसरी–मराठा संस्थेचें कांहीं कार्य केलें त्यांना त्याबद्दल स्वतंत्र श्रेय अर्थातच नाहीं. त्यांची स्फूर्ति स्वतंत्र नव्हती. पण त्यांच्या मृत्युनंतर दहा वर्षांनीं, अजूनहि लो. टिळकांचीच स्मृति लोकांच्या मनांत असल्यामुळें, या दहा वर्षांतील चालकांकडून केसरीचें जें कांहीं कार्य झालें असेल त्याबद्दलहि चालकांना फारसें श्रेय देतां येत नाहीं. सूर्य अस्ताला गेला व क्षितिजावर दिसतनासा झाला तरी जो संध्याप्रकाश उरतो, व ज्यांत माणसांना तोंडास तोंड दिसतें, तो परिवर्तित असला तरी प्रकाश सूर्याचाच! त्याप्रमाणें लोकांना टिळकांच्या केसरीची अद्यापि तोंडओळख उरली असली तरी ती टिळकांच्या स्मरणानें परिवर्तित केलेल्या त्याच तेजामुळें होय. ही गोष्ट निश्चित असल्यामुळें गेल्या दहा वर्षांतील केसरी संबंधानें स्वतः आम्ही जसें कांहीं बोलूं शकत नाहीं, त्याप्रमाणेंच इतरांनीं त्याविषयीं कांहीं बोलण्यालाहि ती एक मर्यादाच आहे."

यानंतर पांच महिन्यांनीं 'केसरी प्रबोध' नांवाचा ग्रंथ भोपटकर, माटे, जोशी, प्रभृति मंडळींनीं प्रसिद्ध केला. त्यांच्याशीं आम्हा ट्रस्टींचा कांहीं संबंध नव्हता. तथापि या त्यांच्या मित्र-कार्यानें आम्हाला सहाय्यच झालें. तें असें कीं, केसरी संस्थेचें मित्रमंडळ केवढें मोठें आहे हें त्यावरून दिसून आलें.

या ग्रंथाची निर्मिति करण्यांत शंभराहून अधिक लेखकांनीं आनंदानें भाग घेतला. पन्नास वर्षांतील केसरीचे अंक वांचून त्यांनीं सुमारें वीस हजार इतकीं टिपणें प्रकरणवारीनें केलीं. आणि त्यांच्या आधारानें अनेक विषयावर केसरीनें वेळोवेळीं कोणतें मत कसें प्रगट केलें याची माहिती या लेखकांनीं थोडक्यांत पण सुबोध अशी वाचकांस करून दिली. अशा रीतीनें केसरीचें पन्नास वर्षांचें समालोचन झालें. या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढावी लागली त्याचा फायदा घेऊन तो थोडा वाढविण्यांत आला. ग्रंथ मोठ्या आकाराच्या सुमारें नऊशें पानांचा आहे यावरून त्याची कल्पना होईल!

केसरीनें वाचकांकरितां पन्नास वर्षांत जें केलें त्याची परत भेट देण्याकरितां हा ग्रंथ तयार केला गेला. आणि तो त्या वर्षाच्या पाडव्याच्या दिवशीं केसरी प्रबोध मंडळानें टिळकस्मारक मंदिरांत मोठा समारंभ करून आम्हा ट्रस्टींना मौल्यवान अहेरासह अर्पण केला. ग्रंथाचा स्वीकार करितांना मी खालील आशयाचें लहानसें भाषण केलें:—

" आजचा समारंभ अनेक दृष्टीनीं अपूर्व व केसरी संस्थेला अभिमानास्पद असा आहे. सभा अभिनंदन व सत्कार या तिहींत ' केसरी–प्रबोध ' नांवाचा ग्रंथ आम्हाला अर्पण केला तोच खरा अपूर्व आहे; व त्याच्या योगानें ह्या सत्काराचें औचित्य विशेष आहे

"केसरी संस्थेनें १-१-१९३१ रोजीं ज्युबिली अंक प्रसिद्ध केला. त्याव वेळीं केसरीच्या ५० वर्षांच्या समग्र लिखाणाचें आम्हींच पर्यालोचन करावें असें कित्येकांनीं सुचविलें. पण ती सूचना आम्हाला अंमलांत आणतां आली नाहीं. तथापि केसरीविषयीं आजवरचा आमचा अनुभव असा आहे कीं, केसरीचें कोणतेंहि न्यून पडलें कीं तें केसरीचे स्नेही, ऋणानुबंधी, हितचिंतक भरून काढतात. अशा समयोचित सहाय्याच्या अनुभवापेंकींच आजचा आनंददायक अनुभव आम्ही अनुभवीत आहो यांत आश्चर्य काय ! त्यांतूनहि आजच्या उचिततेचा विशेष हा कीं, ग्रंथ वाचकांतर्फे प्रसिद्ध होऊन संस्थेला परत भेट येत आहे !

"विद्यादानाप्रमाणें वाङ्मयदान हेहि सर्वश्रेष्ठ व श्रेयस्कर होय. आणि अशा दानाला शारदावरद श्रीमत् शंकराचार्यांचा हस्तस्पर्श झाल्यानें त्याला विशेषच महत्त्व प्राप्त झालें आहे. आपण दिलेल्या ग्रंथांतील बोधानंद उपभोगण्याला अर्थातच अवधि आहे. वास्तविक कोणत्याहि वर्तमानपत्राच्या पन्नास वर्षांतील लिखाणाचा आढावा काढून कोण किती काढणार ! कितीहि वाचलें, व त्यावरून कितीहि लिहिलें, तरी तें थोडेंच वाटावयाचे ! अशा ह्या अवीट कामाला देखील स्वाभाविक मर्यादा पडतात. तथापि, आपल्या ग्रंथानेंहि समाधान न होतां केसरीसेवनाची भूक शिल्लक उरेल हें खरेंच आहे. ग्रंथांत लेखकांनीं आपली स्वतंत्र मतें सांगण्यापेक्षां केसरीचीं मतें सांगण्याचें बंधन पाळल्यामुळें त्याचा उपयोग, स्वतःचें तेज पाडणाऱ्या सूर्यापेक्षां सूर्याचें तेज जगाला देणाऱ्या चंद्रासारखा सुखावह झाला. यांतच केसरीला थोरपणा देऊन स्वतःकडे लहानपणा घेतला हे लेखकांच्या विनयशीलतेला शोभण्यासारखेंच आहे.

"केसरीचेच काय पंण त्याच्या दर्जाच्या कोणत्याहि वर्तमानपत्राचे संपादक स्वतःला 'आम्ही' म्हणून संबोधितात. तें एका दृष्टीनें अहंकारार्थी व इतर दृष्टींनीं सत्यवचनार्थीच असते. कारण त्यांतील लेखन हें स्वरूपतःच परसापेक्ष असतें. असो. To see the wood for the trees या म्हणीप्रमाणें कोणाहि व्यक्तीच्या नांवापेक्षां व्यक्तिनिरपेक्ष केसरी हें नांवच लोकांना अधिक प्रिय आहे. मीहि हा सत्कार संस्थेकरितांच स्वीकारीत आहे. वाटेल तर सपादकवर्गाच्या अविभक्त कुटुंबातर्फे म्हणून मी आजच्या त्या सत्काराचा स्वीकार करतों. व केसरीकडून अशीच सेवा घडावी व असा मानाचा विडा मिळावा अशी परमेश्वराची प्रार्थना करतों."

ज्युबिली अंक काढण्यापलीकडे आम्ही केसरी ज्युबिलीचा 'समारंभ' असा स्वतः संस्थेमार्फत कांहीं केला नाहीं. पुण्यांतल्या आमच्या हितचिंतकांनींहि त्यांना करण्याचा होता तो जाहीर अभिनंदनाचा समारंभ पाडण्यापर्यंत पुढें ढकलला. कारण लवकरच त्या मुहूर्ताला 'केसरी-प्रबोध' ग्रंथाचें प्रकाशन व समर्पण व्हावयाचें ठरलें होतें. आणि लागोपाठ दोन समारंभ नको म्हणून १९३१च्या प्रारंभीं पुण्याच्या नागरिकांतर्फे असा कोणताच जाहीर समारंभ झाला नाहीं. तथापि मुंबईकर मित्रमंडळींना तशी कांहीं सबब नव्हती. म्हणून त्यांनीं ता. ४ रोजीं ब्लॅव्हॅट्स्की लॉजमध्यें प्रचंड समारंभ केला. त्यांत मुंबई शहरांतील दहा पांच संस्था सामील झाल्या होत्या. अध्यक्षस्थानीं डॉ. गोपाळराव देशमुख यांची योजना करण्यांत आली होती. समारंभ कसा थाटदार झाला असेल याची कल्पना वाचकांना करतां येईलच. तथापि सभेंत झालेल्या मुख्य भाषणांपैकीं कांहीं कांहीं वाक्यें उद्धृत करितों त्यावरून केसरी-मराठ्याविषयी लोकमत काय होतें हें लक्षांत येईल. उदाहरणार्थ, डॉ. देशमूख म्हणाले—"या पत्रांचे संस्थापक भांडवलवाले नव्हते. सहा महाराष्ट्रीय गरीब तरुणांनीं आपल्या देशबांधवांमध्यें कर्तव्यजागृति करून त्याची स्थिति सुधारण्याच्या उद्देशानें केसरी व मराठा वृत्तपत्रे काढलीं. दाक्षिणात्य लोक फक्त आरंभशूर असतात अशी एक म्हण आहे. परंतु केसरी–मराठा पत्रांना पन्नास वर्षे पुरी झाली असल्यामुळें या संस्थेनें स्वतः पुरता तरी तो आरोप धुवून काढला आहे. दारिद्र्य व सरकारची कायमची गैरमर्जी असतांहि संस्थेनें आपलें सामर्थ्य वाढविलें. लोकमान्य टिळक तीनदां कारागृहांत गेले असतां त्यांच्या गैरहजेरींत श्रीयत केळकर व खाडिलकर यांनीं केसरी पत्र सुंदर चालविलें ही गोष्ट नमूद करणें आवश्यक आहे.

"केसरी हें विशेषतः राजकीय वृत्तपत्र आहे. हिंदुस्थानला स्वराज्य मिळविण्यास सिद्ध करणें हें त्या पत्राचें ध्येय आहे. आज हजारों लोक अहमहमिकेनें तुरुंगांत जातांना दिसतात. परंतु या नवस्फूर्तीचा उगम पन्नास वर्षांपूर्वी झाला हें विसरून चालणार नाहीं. ज्या वेळीं तुरुंगांत जाणें हें मुष्किलीचें काम होतें व कारावास खडतर होता त्या वेळीं लोकमान्यांनीं तुरुंगवास पत्करून इतरांना तो धडा घालून दिला. केसरी निव्वळ राजकीय विषयाची चर्चा करतो व समाज सुधारणेच्या विरुद्ध आहे, असा आक्षेप कांहीं लोक काढतात. परंतु तो खोटा आहे. ज्यांनीं समाजसुधारणा विषयक बिलें आणलीं त्यापैकीं बहुतेक लोक स्वराज्य संघाचे सभासद व लोकमान्य टिळकांचे शिष्य व अनुयायी आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. जे लोक केसरी समाज-सुधारणेचा विरोधक आहे असें म्हणतात ते एक तर पूर्वग्रहदूषित तरी असले पाहिजेत, अगर त्यांना केसरीची माहिती तरी नसावी. राजकारण व समाजसुधारणा याखेरीज अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, ज्योतिषशास्त्र यांनाहि केसरीनें चालना दिली आहे."

बॅ. जमनादास मेथा म्हणाले—

"गेल्या ५० वर्षांत जनतेमध्यें राष्ट्रीय भावना उद्दीपित करून स्वार्थत्याग व स्वावलंबन या गुणांचें स्वराज्याच्या चळवळीला पोषक असें राष्ट्रीय शिक्षण सतत देण्याची जी अपूर्व कामगिरी केसरी–मराठा संस्थेनें केली तीबद्दल या सभेला आनंद होत आहे. तसेंच केसरी–मराठा संस्थेनें सर्व प्रकारच्या अडचणींच्या प्रसंगांतून मार्ग काढून राष्ट्राचें नियोजित ध्येय जवळ आणण्याच्या दृष्टीनें अखंड प्रचारकार्य केसरीनें केलें आहे. वाङ्मय संशोधन, सामाजिक सुधारणा व इतर राष्ट्रीय अंगें या बाबतींतहि संस्थेनें जी प्रगति केली आहे तीबद्दल या सभेला अभिमान वाटत आहे, व त्याबद्दल ही सभा त्या संस्थेचें अभिनंदन करीत आहे. संस्थेचे ट्रस्टी न. चिं. केळकर व धों. वा. विद्वांस यांनीं संस्थापकांचें कार्य उत्कृष्टपणें चालविलें व संस्थेचा अधिकच उत्कर्ष केला याबद्दल ही सभा त्यांचें अभिनंदन करतें."

मि. बी. जी. हॉर्निमन म्हणाले—"देशीभाषांत निघणारीं वृत्तपत्रें इंग्रजी वृत्तपत्रांपेक्षां कोणत्याहि दृष्टीनें कमी योग्यतेचीं नाहींत. नीतिमत्तेच्या बाबतींत तर तीं इतरांपेक्षां खात्रीनेंच अधिक उच्च दर्जाचीं आहेत. केसरी हा उच्च

दर्जाच्या वृत्तपत्राचा मासला आहे. केसरीबद्दल मला विशेष आदर वाटत आला आहे. मी सव्वीस वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत आलों. त्या वेळेपासून मधून मधून केसरींतील लेखांचीं भाषांतरें करवून घेऊन मी वाचीत असे. १९१३ सालीं मुंबईला 'क्रॉनिकल' पत्राचें संपादकत्व घेण्याकरितां आल्यावर तर मी इकडचें राजकारण समजाऊन घेण्याकरितां नियमानें केसरीचें भाषांतर करवून घेऊं लागलों. पश्चिम हिंदुस्थानांतील राजकारणाची माहिती मला केसरीवरूनच झाली."

नामदार के. एम्. मुनशी, हल्लीचे मुंबई सरकारचे गृहमंत्रि, म्हणाले—

"केसरी व मराठा पत्रांच्या द्वारें लोकमान्य टिळकांनी हिंदुस्थानांतील लोकांच्या विचारांना नवी दिशा लागली. आजच्या सर्व चळवळीचें श्रेय लोकमान्य टिळकांच्या व केसरी-मराठा संस्थेच्या कार्याला आहे. स्वराज्य मिळवावयाचे असेल तर तेल्यातांबोळ्यांना विश्वासांत घ्या हा महामंत्र केसरीनें शिकविला त्याचा उपयोग आज आपण करीत आहोत. लोकमान्यांनी जनतेच्या संघटनेकरितां गणेशोत्सव सुरूं केला. आज तो दक्षिणी लोकाइतकाच गुजराथ्यांनाहि आपलासा वाटतो. केसरीच्या कार्याचें वैशिष्ट्य सामुदायिक संघटनेंत आहे."

शेट जमनादास द्वारकादास म्हणाले—

"केसरीचें कार्य यशस्वी झालें यांचें कारण केसरी जनतेची नाडी-परीक्षा उत्तम करीत आला. जनतेच्या आकांक्षांना कधींहि मागें खेचावयाचें नाहीं असें लोकमान्यांचें धोरण होतें. ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थान राहील असे तुम्ही करा असा आग्रह पंधरा वर्षांपूर्वी लोकमान्यांजवळ महात्माजींनी धरला असतां लोकमान्यांनी स्पष्टपणें सांगितलें की, लोकांनीं अमुकच गोष्टीवर संतुष्ट राहावें असें मी कसें सांगणार!"

प्रो. पां. वा. काणे, लो. टिळकांविषयींच्या कांहीं जुन्या गोष्टी सांगून म्हणाले, "आजपर्यंत केसरीनें पुढील गोष्टी केलेल्या आहेत. (१) केसरीनें राजकारणांत अगर इतर कोणत्याही विषयाची चर्चा करतांना आपलें अभय-ब्रीद कायम ठेवलें. (२) सर्व हिंदुस्थान आपला आहे ही गोष्ट ध्यानांत धरून आपलें धोरण सर्वव्यापक ठेवलें. (३) केसरी लोकांचा असल्यामुळें केसरीनें लोकांचें म्हणणें पुढें मांडलें. त्या धोरणामुळेंच केसरीला आजचें महत्त्व

प्राप्त झालें. हेंच धोरण निरंतर चालवलें जाऊन केसरीची निरंतर भरभराट व्हावी असें मी इच्छितों."

सॉलिसिटर खेर, सध्याचे मुंबईचे प्रधानमंत्री, म्हणाले "आज जी राष्ट्रीयत्वाची लाट सर्वत्र उसळलेली दिसत आहे तिचा उगम केसरीनें उत्पन्न केलेल्या नवचैतन्यांत आहे. आज अक्रोडाचीं फळें खातांना त्या झाडाची आठवण झाल्याशिवाय कशी राहील? ज्या वृक्षावर हीं फळें धरलीं तो वृक्ष उत्तरोत्तर अधिकाधिक वाढावा असें मी इच्छितों."

---

## ( ५ ) माझी ६१ व्या वर्षाची 'ज्युबिली'

ता. १ जानेवारी १९३१ रोजीं केसरी मराठ्याला ५१ वें वर्ष लागलें. त्याच्याच पुढच्या वर्षी आगस्टच्या २४ व्या तारखेला मला ६१ वें वर्ष लागलें. हा प्रसंग साहजिकपणेंच माझ्या अभिनंदनाचा होता. परंतु यावेळी महाराष्ट्राची परिस्थिति माझ्या मनाला स्वस्थता वाटण्यासारखी आणि अभिनंदन समारंभ मानवण्यासारखी नव्हती. कारण काँग्रेसनें सुरूं केलेली कायदेभंगाची दुसरी मोहीम सुरूं असून शेंकडो हजारो लोक तुरुंगांत गेले होते. दडपशाही सुरूं होती. म्हणून या वाढदिवसाच्या समारंभाच्या योजनेची कल्पना उडतपणें माझ्या कानावर आली तेव्हां मी तिला निकरानें मोडता घातला. शेवटीं सांगितलेंहि कीं "तुम्ही आपला हट्ट सोडला नाहीं व माझा हट्ट चालूं दिला नाहीं तर मी ता. २४ च्या सुमारास बाहेर कोठें तरी न सांगतां निघून जाईन मग तुम्ही काय कराल!" तेव्हां समारंभाचे चालक म्हणाले, "तुमच्या अभावी तुमची तसबीर मांडून, तिच्या रूपानें तुम्हीच उपस्थित आहां असें समजून, समारंभ पार पाडूं. मग तुम्ही काय कराल!"

उभयतांचा उलट सुलट युक्तिवाद दोघांनाहि चांगला कळत नव्हता असें नाहीं. पण शेवटीं एका गोष्टीला मी निरुत्तर झालों. समारंभाचे चालक मुख्यतः अण्णासाहेब भोपटकर व प्रो. माटे हे होते. ते प्रांजलपणानें म्हणाले "तुम्हांला एकसष्ठावे वर्ष यंदाच लागतें हा योग कोणालाच टाळतां येण्यासारखा नाहीं. बरें, कायदेभंगाची चळवळ ओसरल्यावर मग समारंभ करावा म्हटलें तर फिरून तुमचे निंदक

म्हणणार " पण अजून असहकारितेची चळवळ कोठे संपली आहे ?" तात्पर्य, तुम्हांला जोपर्यंत प्रतिपक्षी आणि निंदक आहेत तोंपर्यंत यापुढें केव्हांहि तुमच्या कोणत्याहि समारंभाला मुहूर्त लाभणारच नाहीं. मग आजचा समारंभ विनाकारण लांबवावा तरी किती ? व तो पुढें केव्हां केल्यानें औचित्य साधत नाहीं त्याचें काय करावयाचे ! केवळ तुमच्या विनयबुद्धीचा प्रश्न असता तर आम्ही आमचा हट्ट सोडून दिला असता. पण तुम्हांला आमचे खरे हृद्गत सांगावयाचें तर तें हें कीं, तुमचे शत्रू व तुमचे मित्र यांच्यातल्या सामन्याचा व कसोटीचाच हा मोठा समर प्रसंग आहे. तो परम्पर व्हावयाचा आहे. तुमचा त्यांत प्रत्यक्ष संबंध कांहीं नाहीं. तुम्ही निमित्तमात्र आहां. तुम्हांला शत्रू किती कोण कसे आहेत हें जगाला या असहकारितेच्या चळवळींत दिसून आलेंच आहे. पण तुमचे मित्र चहाते व हितचिंतक किती कोण कसे आहेत हें दिसून येण्याला प्रसंग नव्हता. तो आयता या एकसष्ट्याव्या वाढदिवसाच्या निमित्तानें येत आहे. तो आम्ही साधणारच. त्याच्या आड तुम्ही आल्यास आमचा फारच असंतोष व उत्साहभंग होईल. म्हणून असें करूं नका. विनय हा चांगला खरा पण सार्वजनिक व्यक्तीनें त्याचा अतिरेक करणें हेंहि बरें नाहीं. आमच्या कल्पनेप्रमाणें अपेक्षेप्रमाणें हा समारंभ झाला म्हणजे मग तुम्हाला कळून येईल कीं, जसे शत्रु पुष्कळ आहेत तसे मित्रहि आहेत. अशा प्रसंगाला उचित असें तुमचें मनोगत, मानपत्राला उत्तर देतांना हवें त्या शब्दांनीं तुम्हाला प्रकट करतां येईल. त्यांत तुम्ही आम्हाला नांवें ठेवलीं तरी चालेल. पण तुमचे प्रतिपक्षी हे आम्ही आमचेहि प्रतिपक्षी मानीत असल्यानें त्यांच्याशीं दोन हात करण्याची ही संधि काय वाटेल तें झालें तरी आम्ही साधणारच. या कामीं व्यक्तीच्या गौरवापेक्षांहि तत्वाचा गौरव अधिक आहे हींच गोष्ट खरी आहे. आणि ती तुम्हाला पटावी."

माझ्या मित्रांचे व शत्रूंचे दोन हात व्हावयाचे याचा अर्थ भांडण मारामारी असा नव्हे. कारण हा प्रसंग, म्हणजे त्या निमित्त होणारा समारंभ, माझ्या शत्रूंना न आवडणारा असला तरी ते समारंभाच्या ठिकाणीं प्रत्यक्ष येऊन तो उधळतील बिघडवितील बेरंग करतील अशी मला भीति नव्हती. दोन हात होणें याचा अर्थ या शत्रूंची कोणत्याहि प्रकारची मदत न घेतां मागतां, खासगी रीतीनें अनुभवास येणाऱ्या त्यांच्या विरोधालाहि न जुमानता समारंभ यशस्वी करणें. आणि त्याची छाप जनतेच्या डोळ्यांवर पाडून विरोधी मताला चूप बसायला

लावणें असा होता. आणि या अर्थानें पाहिलें तर माझ्या मित्रांनीं हा समारंभ त्यांच्या स्वतःच्या, माझ्या, आणि माझ्या शत्रूंच्या अपेक्षेबाहेर यशस्वी व परिणामकारक करून दाखविला यांत मुळींच शंका नाहीं. माझ्या शत्रूंना विरोधाची आपली हौस अगदीं खासगी कुजबुजणाऱ्या निंदेनें भागवून घ्यावी लागली. किंबहुना त्यांतले कांहींजण तरी, एरवी वाईट दिसेल म्हणून, या समारंभांत औपचारिकरीत्या सामीलहि झाले. इतर कांहींना मात्र, सार्वजनिक कारणें लावून, व्यक्ती या नात्यानें ते करीत असलेल्या माझ्या द्वेषाला पडदपोशी करतां आली.

असो. या समारंभाची हकीकत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली ती तशीच्या तशीच या खालीं देतोः—

"साहित्यसम्राट श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या ६१ व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ त्यांस 'केळकर' ग्रंथ समर्पण करण्याचा समारंभ, या समारंभासाठींच स्थापन झालेल्या केळकर–वाढदिवस–मंडळातर्फे ता. २४ रोजीं पुणें टिळक स्मारक मंदिराच्या विस्तीर्ण पटांगणावर, वऱ्हाडचे पुढारी लोकनायक माधव रावजी अणे यांच्या अध्यक्षतेखालीं, अपूर्व उत्साहानें व थाटानें साजरा करण्यांत आला.

पुण्यांत हा मुख्य समारंभ होण्यापूर्वी ता. २२ रोजीं बृहन्महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं अनेक संस्थांमार्फत श्री. केळकर यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला व त्यांस ठिकठिकाणीं मानपत्रें व अहेरहि अर्पण करण्यांत आले होते. अशा रीतीनें ठिकठिकाणीं महाराष्ट्रांत केळकरांच्या आदराचे व प्रेमाचे अनेक प्रवाह उत्पन्न झाले त्या सर्वांचा मधुर संगम पुण्यास या समारंभाच्या निमित्तानें होऊन लोकगंगेला विलक्षण पूर आला.

बृहन्महाराष्ट्रांतील, म्हणजे बेळगांवपासून नागपूरपर्यंतच्या, सर्व भागांतून अनेक संस्थांचे प्रतिनिधि उपस्थित होते. महाराष्ट्रांतील सर्व पक्षांच्या व जातींच्या सुसंस्कृत व निवडक अशा लोकांचें या निमित्तानें एक अपूर्व असें संमेलनच भरलें होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. एकंदर या समारंभास पांच हजार स्त्रीपुरुषांचा समुदाय उपस्थित होता. समारंभास बरोबर सहा वाजता सुरुवात झाली.

संगीतनिपुण प्रो. विनायकराव पटवर्धन यांनीं आपल्या मधुर स्वागतपर

गायनानें सभामंडपांत शांतता प्रस्थापित केल्यावर समारंभाचे स्वागताध्यक्ष श्री. अण्णासाहेब भोपटकर यांचें भाषण झालें. ते म्हणाले—

" दे. भ. तात्यासाहेब केळकर, लोकनायक बापूजी अणे व बंधुभगिनींनो,

केळकर-वाढदिवस-मंडळाच्या निमंत्रणाचा स्वीकार करून आपण सर्वजण या समारंभास उपस्थित झाला आहांत, याबद्दल सदरहु मंडळाच्या तर्फेनें मी आपले अंतःकरणपूर्वक स्वागत करतों व आपले आभार मानतों.

गेल्या शंभर वर्षांत बृहन्महाराष्ट्रांत जे दहा-पांच थोर पुरुष निर्माण झाले, त्यांमध्यें तात्यासाहेबांची गणना कोणालाहि करावी लागेल. इतकी सरस व बहुमोल सेवा त्यांनीं आपल्या राष्ट्राची, समाजाची, धर्माची व वाङ्मयाची केलेली आहे. त्या सेवेचें यथार्थ स्वरूप जाणण्याची ज्याची इच्छा असेल त्यांनी आमचा ग्रंथ लक्षपूर्वक वाचल्यावांचून राहूं नये.

सध्याची देशस्थिति उत्सव-समारंभाला अनुकूल नाहीं, ती अनुकूल असती तर तात्यासाहेबांच्या योग्यतेस साजेल असा भरीव अहेर अर्पण करण्याची व इतर तऱ्हेनें समारंभ मोठ्या प्रमाणावर करून आपली कृतज्ञता व्यक्त करण्याची आमची फार इच्छा होती. पण समारंभास अजिबात फांटा देण्याची तात्यासाहेबांची सूचना मात्र आम्हांस मान्य होईना आणि त्याचें कारण हें कीं, परिस्थिति सर्वस्वी अनुकूल नसली तरी नित्य—नैमित्तिक लक्षांत घेऊन तो तो प्रसंग त्या त्या वेळीं कांहीं प्रमाणांत तरी साजरा करावाच लागतो व आपण करीतहि असतो.

"ह्याच न्यायानें तात्यासाहेबांच्या ६१ व्या वाढदिवसाचा हा प्रसंग अगदींच सुना जाऊं देणें आम्हांस प्रशस्त वाटेना. प्रसंग कांहीं कोणाकरितां थांबून रहात नाहीं, आणि ६१ व्या वाढदिवसासारखा प्रसंग उपस्थित झाला असतां, तात्यासाहेबांना आयुरारोग्य चिंतणें व त्यांच्या अनेकविध कामगिरीबद्दल महाराष्ट्राला त्यांच्याविषयीं वाटणारा पूज्यभाव व्यक्त करणें, हें महाराष्ट्राचें केवळ कर्तव्य होय. कोणत्याहि सबबीवर तें टाळणें कृतघ्नपणाचें झालें असतें. आणि म्हणूनच परिस्थिति कांहींशी अनुकूल नाहीं ही तात्यासाहेबांची नाजूक भावना दुखवूनहि कांहीं आग्रह, कांहीं भीड, व कांहीं राग या उपायांनीं आम्ही त्यांची संमति शेवटीं मिळविलीच. आणि परिस्थिति ठीक असती तर तात्यासाहेबांच्या योग्यतेस

साजेल अशा जेवढ्या मोठ्या प्रमाणावर हा समारंभ केला असता, तेवढा नसला तरी, कांहीं प्रमाणांत तरी तो करण्याचें आम्ही निश्चित केलें."

यानंतर 'केळकर' ग्रंथाची रूपरेषा थोडक्यांत सांगून ते पुढे म्हणाले—

"वाढदिवस-मंडळानें योजिल्याप्रमाणें हा ग्रंथ तयार करण्याच्या कामीं अनेकांनीं अनेक प्रकारचें सहाय्य मंडळास वेळोवेळी केलें, त्याबद्दल मंडळातर्फे मी सर्वांचे साकल्यानें मनःपूर्वक आभार मानतों.

"ग्रंथाची प्रहिली आवृत्ति तो प्रसिद्ध होण्यापूर्वीच म्हणजे ता. १४ ऑगस्टला खलास झाली. ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्याची पहिली आवृत्ति खलास व्हावी, व वाढती मागणी भागविण्यासाठीं दुसरी आवृत्ति झपाट्यानें काढण्याची गरज भासावी असा सुयोग, मला वाटतें, मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रांत फारच थोड्या ग्रंथांच्या नशिबी आलेला असेल. किंबहुना, कोणत्याहि ग्रंथाच्या नशिबी आलेला नसेलहि. यावरून आमच्या ग्रंथाची योग्यता व दे. भ. तात्यासाहेब यांची लोकप्रियता कोणाच्याहि निदर्शनास आल्यावांचून रहाणार नाहीं.

"आमच्या मंडळानें ग्रंथाची योजना केली, कवींनी कविता रचिल्या, लेखकांनीं लेख लिहिले, छापखानेवाल्यांनी छापण्याची सिद्धता केली, व ग्रंथ समारंभानें अर्पण करण्याचे बेत झाले; परंतु "सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः" या न्यायानें सर्व गोष्टी पार पाडण्यास पैशाची जरूरी होतीच. परंतु तात्यासाहेबांच्या भक्तांनीं व अनुयायांनीं मंडळास या बाबतींत अत्यंत उत्साहान ताबडतोब निश्चित केले, हें कळविण्यास मला अतिशय आनंद वाटतो, व याबद्दल मी मंडळातर्फे त्या सर्वांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

"अशा प्रकारें सर्व सिद्धता झाल्यावर या समारंभाच्या अध्यक्षस्थानीं कोणाची योजना करावी, याबद्दल मंडळ विवंचनेंत असतां लोकनायक बापूजी अणे यांची तुरुंगांतून सुटका झाल्याबद्दलची सुखवार्ता आम्ही वर्तमानपत्रांतून वाचली. त्याबरोबर आम्ही त्यांना या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंति केली व ती त्यांनी लगेच मान्य केली. लोकमान्यांच्या एका पट्टशिष्याच्या ६१ व्या वाढदिवसाचा समारंभ त्यांच्या दुसऱ्या एका पट्टशिष्याच्या अध्यक्षतेखालीं साजरा करणें, यापेक्षां दुसरा कोणता शुभ व उचित योगायोग असूं शकेल ! तेव्हां जास्त

पाल्हाळ न करतां मी अशी सूचना करतों कीं, या समारंभाचें अध्यक्षस्थान माझे मित्र लोकनायक बापूजी अणे यांनीं स्वीकारावें, व समारंभाचा कार्यक्रम पार पाडावा. ''

स्वागताध्यक्षांचें भाषण झाल्यानंतर अध्यक्षांच्या सूचनेला नगरशेट रा. ब. हणमंतराम रामनाथ यांनीं अनुमोदन दिलें. त्याचप्रमाणें डॉ. वेलकर यांचें अनुमोदनात्मक भाषण झाल्यावर श्री. बापूजी अणे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. त्यांस पुष्पाहार समर्पण केल्यावर मंडळाचे एक चिटणीस प्रो. रानडे यांनीं समारंभास सहानुभूति दाखविण्यासाठीं आलेले कांहीं संदेश वाचून दाखविले.

एकंदर संदेश सुमारें ५०० च्यावर व हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांतूनहि आले होते. त्यांत राजेरजवाडे, सरदार, जहागिरदार, वृत्तपत्रकार, अनेक वाङ्मय संस्था, राजकारणी संस्था व व्यक्तिशः अनेक गृहस्थ यांचा समावेश झाला होता. संदेश निवेदनानंतर श्री. अणे यांचें भाषण झालें. ते म्हणाले—

'' सार्वजनिकरीत्या ज्यांचा असा ६१ वा वाढदिवस साजरा झाला असे लोक फार थोडे आहेत. लो. टिळकांच्या नंतर असा हा मोठा समारंभ हाच असावा असें मला वाटतें. गुरु आणि शिष्य यांची ही जोडी खरोखरीच अनुरूप आहे. लोकमान्यांनी श्री. केळकर यांची जी निवड केली ती खरोखरीच अनाठायी नव्हती ही गोष्ट लोकमान्य कारागृहांत गेले त्यावेळीं लोकांच्या ध्यानांत आपोआप आलीच. लोकमान्य मंडालेच्या तुरुंगांतून सुटून आल्यावर श्री. केळकर यांना हुरूप येऊन पुढची कामगिरी जोरानें करतां आली. पण पुढें म्हणजे लोकमान्यानंतर सर्व बाजूंनीं आपत्ति आली असतां श्री. केळकर यांनी जी कामगिरी केली ती स्वतःच्या कर्तबगारीवरच केली ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. त्यांनीं 'केसरी'ची इभ्रत व इज्जत वाढवून लो. टिळकांचें वैशिष्ट्य राखलें असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

''लो. टिळकांचे पुष्कळ शिष्य आहेत. पण त्यांच्या कार्याची जाणीव बाळगून त्याप्रमाणें कार्य करणारा एखादाच सांपडतो. ही जाणीव केळकर यांना उत्तम असल्यानें त्यांनीं लोकमान्यास अनृणी करून सोडलें. त्यांनीं त्यांचे सर्व लेख छापून प्रसिद्ध केले. तात्यासाहेबांच्या परिश्रमाचें दुसरें पूर्ण फल म्हणजे टिळकमंदिर होय. श्री. केळकर यांनीं आपले अनेक व्याप संभाळून या गोष्टी केल्या हे

लक्षांत ठेवण्यासारखें आहे. श्री. केळकर हे असेंब्लींत असतांना त्यांची काम करण्याची पद्धति पहाण्याचा मला योग आला होता. त्यांचीं असेंब्लीमधील भाषणें वाचावीत म्हणजे आपली खात्री होईल कीं, तीं कोणत्याहि कसलेल्या तज्ज्ञापेक्षां निःसंशय भारदस्त व नवीन माहितीनें पूर्ण अशींच आहेत. त्यांच्या बुद्धीची ग्राहकता खरोखरीच विशाल आहे. असेंब्लीचें काम सांभाळून त्यांना आपल्या पत्राकरितां बातमीपत्रें व लेख लिहावें लागत ते निराळेच. यावरून वर जें विधान केलें ते बरोबरच असल्याबद्दल आपली खात्री होईल.

"वाङ्मयांत मोकळें मैदान सांपडल्यानें त्यांनी दाखविलेली बुद्धिमत्ता खरोखरीच वाखाणण्यासारखी आहे. वाङ्मयाची सेवा करून त्यांनी आपल्या मायभाषेची फारच मोठी सेवा केली. असा पुरुष खरोखरीच विरळा. कारण त्यांच्या तोडीचा एखादा तरी सांपडेल काय, असा मी शोध घेऊं लागलों तेव्हां बंगालमधील कै. रमेशचंद्र दत्त यांचें नांव माझ्या डोळ्यासमोर उभें राहिलें. त्यांनींहि श्री. केळकर यांच्याप्रमाणें आपल्या भाषेची अनुपम सेवा केली. राजकारणांत त्यांचा दर्जा खरोखरीच श्रेष्ठ आहे. राजकारणांत धक्केचपेटे सोसून वाङ्मयनिर्मिती करणें खरोखरीच दुर्घट काम आहे, व तें करण्याची जी कुशलता श्री. तात्यासाहेब यांनी दाखविली त्याबद्दल त्यांना साहित्याचार्य असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. श्री. केळकर यांनीं आपल्या वाङ्मयाच्या द्वारें लोकांना नवीन वळण लावलें यांत शंका नाहीं.

"असो. एवंगुणाविशिष्ट श्री. केळकर यांना राष्ट्रपुरोहित म्हटल्यास वावगें होणार नाहीं. जो स्वतः तीन वेदांचें अध्ययन करून त्याप्रमाणें आचरण ठेवतो तोच खरा राष्ट्रपुरोहित होय. अशा तऱ्हेचे पुरोहित ज्या राष्ट्रांत निर्माण होतात त्यांतील सर्व समाजाचें बळ आपोआपच वृद्धिंगत होतें. पूर्वभूमिका न सोडतां प्रगति करण्याची त्यांची शिकवण असते. जी गोष्ट श्री. केळकर यांना पटली ती सर्व समाजाला पटेलच असा सर्व वर्गांतील लोकांचा विश्वास आहे. राजकारणांत जरी कांहीं मतभेद असले तरी १९२० ते ३२ सालापर्यंतच्या इतिहासलेखकाला श्री. केळकर यांच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख करावाच लागेल ही गोष्ट निर्विवाद आहे. श्री. केळकर यांना परमेश्वरानें देशाची सेवा करण्यास उदंड आयुरारोग्य द्यावें अशी मी प्रार्थना करतों."

यानंतर उत्तरा दाखल मी भाषण केलें तें असें:—

"वाढदिवस मंडळाचे अध्यक्ष, चालक, सभासद व या ठिकाणीं उपस्थित झालेले सर्व सज्जन स्त्री-पुरुष !

"आज या ठिकाणीं असा व एवढा मोठा समारंभ करून, आपण सर्वांनीं माझ्या ६१व्या वर्षाचा वाढदिवस साजरा केला, याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांतूनहि प्रथमतः व मुख्यतः या मंडळाचेच आभार मला मानले पाहिजेत. कारण या समारंभाची मूळ कल्पना त्यांचीच असून ती सिद्धीस नेण्याला त्यांना किती श्रम पडले असतील, व किती खर्च आला असेल, याची कल्पना मला आहे, व ती आपणा सर्वांनाहि सहजच करतां येईल. वास्तविक मजसंबंधीं असला कोणताहि समारंभ होऊं नये असा प्रथमपासून माझा आग्रह होता. कोणाला हे माझें म्हणणें विश्वसनीय वाटो वा न वाटो; परंतु आहे ती खरी गोष्ट मला जाहीर रीतीनें सांगितलीच पाहिजे. मी सामान्यतः अगदीं रुक्षच नसलों तरी फारसा भावनायुक्त असा मनुष्य नाहीं. आदर, स्नेह, प्रेम यांची भावना च जाणीव ही असली तरी ती मनोमन साक्ष असावी, त्यांचें दृश्य बाह्यस्वरूपांत भडक रंगांत दाखविलेंच पाहिजे असें नाही, या मताचा मी आहे. आणि माझी खरी माहिती असणारे लोक सांगूं शकतील कीं, माझ्या स्वभावाचा हा तऱ्हेवाईकपणा किंवा विशेष, मी खाजगी व सार्वजनिक अशा दोनहि खात्यांमध्यें शक्य तितका सारखाच अमलांत आणण्याचा प्रयत्न यथाशक्ति करीत असतों. यामुळें या समारंभाची कल्पना गेल्या नोव्हेंबरांत, म्हणजे देशांत पूर्ण शांतता नांदत असताहि, प्रथम निघाली तेव्हांहि तिला मी जोराचा विरोध केला; व गेल्या जानेवारीत कायदेभंगाची चळवळ सुरूं झाली तेव्हां तर ती कल्पना रहित करविण्यांत मला प्रथम प्रत्यक्ष यशहि आलें असें वाटलें. पण फिरून गेल्या एप्रिलपासून या कल्पनेचें पुनरुज्जीवन झालें; व शेवटीं मित्रप्रेमाची सरशी होऊन, हें नाहीं तें नको असें मी म्हणत असताहि त्या कल्पनेला आजच्या या समारंभाचें स्वरूप आलें. त्यांत अकृत्रिम मित्रप्रेमाचा विजय आहे, व भिडस्त स्वभावाचा पराजय आहे. पण हल्लीं समाजाची स्थिति सर्वच बाजूंनीं विपन्न असल्यामुळें, असल्या समारंभाचा आनंद सेवन करतां येण्यासारखी आपली किंवा माझी कोणाचीहि मनःस्थिति नाहीं. म्हणून आज जरी हा समारंभ झाला आहे तरी आपणा सर्वांप्रमाणें माझेंहि अंतःकरण या प्रसंगीं थोडेबहुत उदासीन व व्यग्रच आहे !

"आता झालेलीं भाषणें आपण ऐकिलींच. त्यांत माझा इतका गुणगौरव केलेला आहे कीं, तो सर्व माझ्या हक्काचा माल असें मला मानतां किंवा स्वीकारतां येत नाहीं. तर त्यांत मित्रप्रेमाचा कांहीं पक्षपात व कांहीं अतिशयोक्ति आहे असेंच मला म्हणावें लागतें. उपचारांची भाषाच ठरून गेल्यासारखी असते, म्हणनहि कदाचित् मानपत्रे लिहिणारांचा नाइलाज होत असेल. तथापि सुदैवानें मला लोकनिंदा व दूषणें ही स्तुतिबरोबर, निराळ्या रीतीनें, इतकीं ऐकावयास मिळतात कीं, आज येथें होणाऱ्या, किंबहुना या चार सहा दिवसांत महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं होणाऱ्या, गुणगौरवानें मला मानसिक अजीर्ण होण्याचा संभव नाहीं. जेथें रोग तेथेंच औषध, किंवा जेथें विष तेथेंच त्याचा उतारा, निर्माण करण्याची सृष्टीची रीतच आहे. म्हणून ज्या कानांनी स्तुति त्याच कानांनी निंदा ऐकण्याचा सराव मला पडला आहे. आणि गणित हा जरी माझा अद्यापि कच्चा राहिलेला असा एक शिक्षणविषय आहे, तरी मनाच्या रेघेच्या वरच्या बाजला स्तुतीच्या निरनिराळ्या रकमा, आणि तिच्या खाली निंदेच्या निरनिराळ्या रकमा, अशा मांडल्या गेल्या असतां, अंशाचा छेदाशीं जाईल तितका संक्षेप देऊन, व्यवहारी अपूर्णांकाचें हें उदाहरण मी बरोबर सोडवूं शकतों, याविषयी अनेक तज्ज्ञ लोक साक्ष देऊं शकतील असा भरंवसा मला वाटतो. पण अशा उदाहरणाच्या सर्वच उत्तरांत, सगळाच संक्षेप न जाता, कांहीं थोडी बाकीहि केव्हां केव्हां उरूं शकते, व प्रस्तुत उदाहरणांत ती मला अनुकूल अशी उरते असें मला वाटतें. म्हणूनच आजच्या सारखे समारंभ, अप्रिय असले तरी ते केवळ दुःसह असे वाटत नाहींत. ते तसे दुःसह वाटण्याइतका खरोखरच मी नादान आहे असें माझें मन मला सांगतें, तर मी या ठिकाणीं आलोंच नसतों. कित्येक वेळा निंदेविरुद्ध मनांत प्रतिक्रियाहि आपोआप घडते. आणि असेंहि प्रसंग मनुष्यावर येऊं शकतात कीं, शेवटीं विनयाला मर्यादा घालून, आत्मविश्वासानें आत्मसमर्थन करणें ही गोष्ट स्वतःसंबंधानेंहि अहंकाराची न ठरतां केवळ न्यायाच्या आग्रहाची वाटावी, व ती त्याने करावी.

"कोणताहि मनुष्य घेतला तरी, मी वर दर्शविल्याप्रमाणें तें एक स्तुति व निंदा असें व्यवहारी अपूर्णांकाचें उदाहरणच असतें. ईश्वराशिवाय पूर्ण गुण असें कोण असूं शकेल? म्हणून कोणीहि मनुष्य अपूर्णच पण सर्व साधारणरीत्या एकंदरीनें कसा काय आहे, हें ठरवूनच निर्वाह करून घ्यावा लागतो. आत्मनिरीक्षण करण्याची मला

नुसती पात्रताच नव्हे तर संवयहि आहे. म्हणून माझ्या स्वभावांतले व माझ्या कामांतले गुणदोष माझे मलाहि कळतात. तथापि इतक्या उतारवयांत अंगीं असलेले दोष हटकून टाळणें व नसलेले गुण हटकून अंगीं आणणें, ही गोष्ट मला इतरांप्रमाणेच दुःसाध्य वाटते. कसेंहि असो, आपण माझा जो गौरव करीत आहां त्यामुळें मला धन्यता वाटते ही गोष्ट मी नाकबूल करीन तर मी ढोंगी ठरेन. म्हणून मी ती करीत नाहीं. माझ्या अंगच्या ज्या गोष्टींना विशेष अनुलक्षन आपण माझा गौरव केला त्या तरी आपल्या या उत्तेजनानें वाढोत इतकीच माझी प्रार्थना आहे.

"असो. 'वाढदिवस' या शब्दाला प्रेमाच्या पण मनुष्यजातीच्या बाळपणाच्या आठवणी चिकटून राहात असल्यानें, "६१ वा वाढदिवस" हा शब्दच मनाला मोठा मौजेचा वाटतो. मनुष्यसृष्टीच्या रंगभूमीला एकच दार आहे, आणि तें बाळपण हेच होय. त्यांतूनच त्या रंगभूमीवर अवतरणाऱ्या पात्रांनीं प्रवेश व निर्गम करावें अशी ईश्वरी योजना दिसते. उतार वय हें दुसरें बाळपणच होय. "Age is second childhood" हें कविवर्य शेक्सपीयर याचें वचन सुप्रसिद्ध आहे व तें खरेंहि आहे. क्षुधा हटलेला, दांत पडलेला, टक्कल पडलेला, पोक आलेला, काठीच्या आधाराशिवाय चालतांना लटपटणारा, स्मृतिभ्रंश झालेला, चिरचिरा बनलेला वृद्ध मनुष्य, व एतद्गुण लहान मूल यांत किती तरी साम्य आहे! व ही गोष्ट मनाला पटल्यामुळेंच बहुधा बाळपणाप्रमाणें ६१ व्या वर्षापासून वाढदिवसांचे समारंभ पुन्हा करण्याची आठवण होत असावी. पण इतर रीतीनें समारंभ साजरा झाला तरी, मुलाला घुसळखांबावर म्हणजे धारण्यावर चढवितात तसा साठ वर्षांच्या मुलाला चढवितां येत नाहीं म्हणून त्या प्रसंगीं त्याची स्तुति करून त्याला लक्षणेनें हरभऱ्याचे झाडावर चढविण्याची कल्पना सुचली असावी! पण नेणतें मूल घुसळखांबावर चढतांना खळखळ करतें तसें म्हातारे होऊं घातलेलें मूलहि हरभऱ्याच्या झाडावर चढण्याला खळखळ करतें हा अनुभव या ठिकाणीं आताच आपणाला आला आहे!

"नेणतें बाळपण व जाणतें बाळपण यांतील अधिक चांगले कोणते हे ठरविणें कठिण आहे. लहान मूल हें या जगांतल्या अनुभवासंबंधीं नेणतें असेल, पण त्याला तेव्हां पूर्वजन्माची आठवण असते म्हणतात. त्याच्या अकारण हास्य-

रुदनाची मीमांसा तत्त्ववेत्ते वरील मोहक कल्पनेनेंच करतात. माझ्या गतजन्माची आठवण मलाहि केव्हां असली तरी ती लहानपणींच नष्ट झाली. आतां पुढच्या जन्माचीच "तयारी" करावयाला लागले पाहिजे. पण त्या जन्माविषयीं झालें तरी अज्ञानच ! रेल्वेहून दूर असणाऱ्या गांवीं जाण्याकरितां रेल्वेच्या प्रवासाला निघावें, आणि रेल्वे—गाइडच घरी विसरावें तशी या मधल्या जन्मांत मनुष्यजीवाची स्थिति होते.

वर्डस्वर्थ मनुष्याच्या जीवयात्रेसंबंधानें म्हणतोः—

"Not in entire forgetfulness
Not in utter nakedness,
But trailing clouds of glory do we come
From God, Who is our home" :

"एखाद्या अपघातानें स्मरणशक्ति नष्ट झालेला मनुष्य घरून निघतो, व फिरून त्याला घरींच परत जावयाचें असतें, तथापि मार्ग सांपडत नाहीं. तसाच हा प्रकार होय. मनुष्याच्या अंगावरचें बाळलेणें, वर्डस्वर्थनें म्हटल्याप्रमाणें, ईश्वराघरचेंच घातलेलें आहे. पण रस्त्यांत चुकलेल्या मुलाच्या अंगावरील केवळ दागिन्यांवरून त्याचें घर नक्की सांपडणें जसें हुशार पोलिसालाहि कठिण जातें, त्याप्रमाणें पुढच्या जन्मवराची ओळख या जन्मींच्या कृत्यांवरून आपली आपणांसहि जेथें लागत नाहीं तेथें ती इतरांना कशी लागणार ? अर्थात् भूत व भविष्य दोहोंचा नाद सोडून वियमान स्थितीकडे पहावें यांतच समाधान आहे.

"या दृष्टीनें पहातां माझ्या आयुष्यांत माझ्या हातून जेवढें कांहीं मला करतां आलें त्याबद्दल मला समाधान वाटतें. आत्मतुष्टि हा अहंकाराचा एक प्रकार होऊं शकेल. पण मायावी कांगावखोर असंतुष्टता दर्शविणें हा त्याच अहंकाराचा एक अधिक मोठा व दोषास्पद प्रकार होऊं शकतो हें विसरतां येत नाहीं. "केलें यापेक्षां अधिक करतां आलें असतें व अधिक करावयास पाहिजे होतें" या शेऱ्यांतून कोणीहि सुटणार नाहीं. तसाच मीहि. तथापि आपण मजविषयीं काढलेल्या ऊद्गारांत योग्य नागपुरी आंकडा बाद घातला असता, "मी यथाशक्ति थोडेंबहुत

समाजसेवेचें काम केलें" असली आत्मतुष्टतेची भावना त्या उद्‌गारावरून समर्थनीय ठरेल असें मला वाटतें.

"यापुढे काय हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. त्यासंबंधानें मी इतकेंच सांगतों कीं आजवर चालल्याप्रमाणें पुढेंहि होईल तें करीत रहावें अशी मनांतून इच्छा आहे. तथापि प्रकृतीला कमकुवतपणा आताच भासूं लागला आहे ही गोष्ट खोटी नाहीं. आपण मला आयुरारोग्य लाभावें अशी प्रार्थना मानपत्रांत केली ती ठीकच आहे. पण अशी प्रार्थना करण्याची वेळ आली हेच हा वाढदिवसाचा समारंभ सुचवीत नाहीं काय ? आजच्या समारंभाला टाइपरायटरवर वाजणाऱ्या घंटेची उपमा द्यावीशी वाटते. या घंटेचा नाद गोड असतो. घंटा वाजल्यावरहि चार दोन अक्षरें लिहितां येतील इतकी जागा असते. यामुळें आरंभिलेला शब्द तरी पुरा करूं, सोडून द्यावा लागणार नाहीं, अशी खात्री असते. पण मात्र तो तेवढाच शब्द हो ! यामुळें मंजुळ घंटानादाला धोक्याचें—निदान सावधगिरीच्या सुचनेचें—स्वरूप येतें. आजच्या ६१ व्या वाढदिवसाच्या समारंभांतील भाषणें टाइपरायटरच्या घटेसारखी नादमधुर होतीं. पण त्या भाषणांना माझ्या हातून झालेल्या पूर्व कामगिरीच्या समारोपाचें स्वरूप आहे, नूतन उपक्रमाच्या सूचनेचें स्वरूप नाहीं, असें मी समजतों. अर्थात् जो थोडा काळ यापुढें उरला त्याचा उपयोग कसा करावयाचा हा प्रश्न मनांत आल्यावर मन असें सांगतें कीं, आजवरची कामाची मामुली पद्धति, म्हणजे अनेक कार्ये एकाच वेळीं करीत राहण्याची पद्धति सोडून द्यावी, व कोणतें तरी एखादेंच काम हातीं घेऊन, मिळेल तो सर्व सवडीचा वेळ त्यावर खर्चून, तेंच करावें म्हणजे तें कदाचित् मनासारखें होईल, आणि त्याला कांहीं स्वरूपहि येईल. आजवर माझ्या मुख्य व्यवसायाशिवाय, लोकांच्या शिफारशी करणें, चित्र्याचपाट्या लिहून देणें, हस्तलिखितें वाचणें, अभिप्राय देणें, प्रस्तावना लिहिणें इत्यादि गोष्टी मी इतक्या केल्या, व निरनिराळ्या संस्थांच्या कार्यकारी मंडळांवरहि इतकें काम केलें कीं, आतां यापुढें तें मी सर्व सोडून दिलें आहे, असें मी म्हटल्यास तें ऐकून निराश होणारे लोकहि मला क्षमाच करतील. केसरीचा संचालक म्हणून शक्य असेल तें राजकारण व लेखन, आणि अद्यापि लिहिण्याचे राहिलेले कांहीं वाङ्मयप्रकार, या दोन कामांवरच मिळेल तो वेळ व शक्ति यापुढें खर्च करावी अशी निदान इच्छा आहे. काय घडेल तें खरें !

"वाङ्मयप्रेम ही एक प्रकारची खोड आहे. 'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं,' ही म्हण प्रसिद्धच आहे व ती मलाहि लागूं पडणार असें वाटतें. वर आत्मसंतुष्टतेचा जो मी उल्लेख केला त्यांत मुख्य भाग वाङ्मयसेवेलाच उद्देशून होता. म्हणून शेवटीं या समाधानाच्या उद्गाराला केवळ वाचेपेक्षां कांहीं निराळ्या प्रकारानें स्वरूप द्यावें असें वाटतें. तरी त्यासंबंधीं दोन शब्द सांगून हें आभारप्रदर्शक भाषण मी पुरें करणार आहे. वाङ्मयसेवेचा आनंद मला सर्व जन्मभर पुरला. प्रथम कांहीं वर्षे माझी सेवा कसोटीला लावण्याकरितां कीं काय, वाङ्मयानें मला कांहींच वेतन किंवा मुशाहिरा दिला नाही. या ३६ वर्षांतील जवळजवळ निम्मा काळ तसा गेला असें म्हणतां येईल. पण नोकराची सेवा पसंत पडल्यास नेहमीच ती निर्वेतन घेण्याचे निष्ठुर काम वाङ्मय झाले तरी कां करील ? त्याप्रमाणें पुढील १९–२० वर्षांत वाङ्मयानें मला सुमारे ३० हजार रुपयांची प्राप्ति करून दिली. अद्यापि महाराष्ट्रांत केवळ वाङ्मयावर उपजीविका करणें अशक्य किंवा निदान फार कठिण आहे, म्हणून अशा स्थितींत झाला या द्रव्यलाभाबद्दल मला कृतज्ञताच वाटली पाहिजे. आतां कृतज्ञता या शब्दाचा अर्थ एका विनोदी इंग्रज ग्रंथकारानें " अधिक लाभ होण्याची आकांक्षा " असा केला आहे हें खरें. पण थट्टा म्हणून ही सोडून दिली तर, किंवा तो अर्थ अंशतः बरोबर म्हणून स्वीकारला तरीहि, कृतज्ञता याचा अर्थ 'उपकाराची फेड' असाच बव्हंशीं केला पाहिजे. म्हणून वाङ्मयाच्या उपकाराची फेड करण्याची एक योजना मी केली आहे. ती अशीः– महाराष्ट्र युनिव्हर्सिटीची कल्पना अद्यापि असिद्ध आहे व अमूर्तहि आहे. तिला निश्चित रूप व प्रत्यक्ष सिद्धी केव्हां लाभेल ती लाभो. पण ती केव्हां तरी लाभेलच अशी माझी श्रद्धा आहे. दुर्दैवानें ती गोष्ट माझ्या हयातींत होऊं शकत नाहीं. तथापि ती होईल तेव्हां माझा कांहीं तरी पै पैसा तिच्याकारणीं खर्च पडावा अशी माझी इच्छा आहे. महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झालें म्हणजे मराठी भाषेचें दैन्य संपलें, तिचें पांग फिटलें, व सर्व प्रकारच्या उच्च संस्कृतीचा सुलभ लाभ तिच्याद्वारें समाजांतील सर्व वर्गांच्या लोकांना होण्याची कायम व्यवस्था झाली असें मी मानतों. म्हणून त्या भावी कार्याला मदत करण्याकरितां आज मी पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचे पांच टक्के व्याजाचे आठ हजार रुपयांचे कर्ज-रोखे खरेदी केले; आणि वरील उद्देशानें त्या रकमेवर स्वत्व-निवृत्ति करून ती गोष्ट आज या ठिकाणीं जाहीर करीत आहे.

"महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ज्या वेळीं सरकारी कायद्यानें अस्तित्वात येईल त्या वेळीं ही सर्व रक्कम त्या युनिव्हर्सिटीच्या अधिकृत मंडळाच्या स्वाधीन केली जाईल. तोंपर्यंत दरसाल या रकमेवरील व्याज मी मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीकरितां खर्च करीत जाईन. शिष्यवृत्ति, पारितोषक, सुवर्णपदक किंवा ग्रंथप्रसिद्धीला मदत, यांपैकीं कोणत्या ना कोणत्या रूपानें दरसालच्या व्याजाची रक्कम पुढें ठरेल त्याप्रमाणें खर्च होईल. ही रक्कम माझ्या वडीलमातोश्रींच्या स्मरणार्थ देऊं इच्छित आहे. म्हणून त्यासंबंधानें कांहीं कायमची योजना मित्रमंडळीचा सल्ला घेऊन मी सवडीनें करीन. येथें मी इतकेंच सांगूं इच्छितों कीं वडीलमातोश्रीच्या स्मरणार्थ आठ हजार रुपयांची रक्कम मी आज बाजूस काढून ठेवून त्यावरील स्वत्वनिवृत्ति केली आहे. त्याच्या खर्चाची योजना होईल ती मागाहून प्रसिद्ध करीन. तशाच इतर दोन देणग्याहि या प्रसंगीं मला द्यावयाच्या आहेत. माझ्या कुटुंबाची श्रद्धा गोरक्षणाच्या कार्यावर आहे, म्हणून तिचेकरितां गोभक्तिपरायण श्रीचौडेमहाराज यांच्या गोरक्षणसंस्थेला माझ्या कुटुंबाची म्हणून एक हजार रुपयांची देणगी मी देत आहे. दुसरी देणगी एक हजार रुपयांची प्रो. कर्वे यांनीं स्थापिलेल्या महिला विद्यापीठाला मला द्यावयाची आहे तींहि आज देत आहे.

"या देणग्यासंबंधानें मला हें मुद्दाम सांगावयाचें आहे कीं ही दहा हजार रुपयांची रक्कम केवळ मला स्वतंत्र ग्रंथ-लेखनानें मिळालेल्या पैशांतूनच मी खर्च करीत आहे. त्यांत केसरीकडून मला मिळणाऱ्या पगाराचाहि कांहीं संबंध नाहीं. कोणत्याही उद्योगधंद्यानें मिळालेल्या पैशांपैकीं कांहीं अंश त्या उद्योगधंद्याला करभार म्हणून प्रत्येक मनुष्यानें देणें योग्य आहे. शिवाय धंद्यांतली मिळकत परत धंदा वाढविण्याकडेच खर्च व्हावी हाहि अर्थशास्त्राचा एक स्थूल नियम आहे. म्हणून इतर अनेक सत्कार्यें डोळ्यापुढें येत असताहि, ही माझी लहानशी देणगी वाङ्मयाच्या अभिवृद्धीकडेच मी स्वाभाविकपणें देत आहे. ही देणगी वाङ्मय लिहून मिळालेल्या पैशांतून देण्याइतकी सुस्थिति मला प्राप्त झाली त्याचेंहि पण श्रेय मनानें मी सर्वस्वी कै. लो. टिळक यांच्याकडेच देत आहे. सत्संगतीचा लाभ केव्हांहि श्रेयस्कर व फलप्रदच होतो. मला केसरी-मराठा संस्थेला येऊन मिळण्याची संधि देण्याची इच्छा लो. टिळकांना व्हावी, ती संधि घेण्याची इच्छा मला व्हावी, आणि या संस्थेंत ३६ वर्षांहून अधिक काळपर्यंत

मी स्थिरपद होऊन तिची सेवा मला करतां यावी, हा सर्वस्वी सुदैवयोग होय. आणि आपल्या सुदैवाबद्दल आनंदानें उल्लेख करणें यांत कोणत्याहि प्रकारें अहंकार-बुद्धि नाहीं. आज ३६ वर्षें माझी लोकयात्रा नीट चालली. माझ्या आवडीचा व्यवसाय सतत भरपूर माझ्या हातून घडला. लौकिक दृष्ट्या यश किंवा कीर्ति ज्याला म्हणतात त्याचा थोडाबहुत लाभ मला झाला. आणि समाजोपयोगी असें कांही कार्य माझ्या हातून झालें. हें सर्व लो. टिळकांचा व त्यांच्या संस्थेचा संबंध मला दैवयोगानें जडवून दिल्यामुळेंच घडलें. म्हणून यांत माझा भाग्योदय असेल तो सर्वत्र एकप्रकारचे माझें 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र' म्हणण्यास हरकत नाहीं; किंवा तसें उघड उघड म्हणण्याला मी आनंदानें तयारहि आहे. कारण अहंकारबुद्धि धरल्याशिवाय तें मला म्हणतां येतें. जगांत मित्रसंबंध हा पुत्रसंबंधासारखाच जिव्हाळ्याचा मानतां येईल. आणि एखाद्या भाग्यवान पुरुषाच्या पोटीं पुत्र म्हणून जन्माला येणें काय, व सहकारी विश्वासू मित्र म्हणून त्याच्या संगतिचा लाभ घडणें काय, हे दोनहि यदृच्छा लाभ होत. कदाचित् फरक असला तर तो इतकाच म्हणतां येईल कीं भाग्यवानाच्या पोटी जन्माला येण्याला स्वतः पुत्रानें कांहींच केलेलें नसतें; पण मित्राचा संबंध येऊन तो टिकणे टिकविणें या गोष्टीला त्या मनुष्याचा कांहीं तरी स्वतःचा म्हणून उद्योग, बुद्धिमत्ता, सत्प्रवृत्ति इत्यादि गुण खर्ची पडावे लागतात. एवढी गोष्ट लक्षांत घेतली असतां, उपयुक्त व उपकारक अशा स्वरूपाचें जें जें म्हणून मला कांहीं करतां आलें तें तें, लो. टिळकांच्या पुण्याईच्या हलवाई-दुकानावर मी माझें तुळशीपत्र ठेवलें असेंच समजतों. लोकमान्यांच्या हयातींत तीन लक्ष रुपये जमवून त्यांचें चिरोल केसचें कर्ज फेडलें, व त्यांच्या मागें १२ वर्षें केसरीसंस्था टिकवून फिरून तीन लक्ष रुपये देऊन मित्रऋणहि मी फेडलें, हें जसें त्या लोकमान्य हलवायाच्या घरावर माझें तुळसीपत्र, तसेच आज दोन-तीन देणग्यांच्या रूपानें मी जें सुमारें १० हजार रुपये खर्च करीत आहे हेंहि एका अर्थानें लोकमान्यांच्या पुण्याईच्या व प्रसादाच्या हलवाई-दुकानावर तुळशीपत्रच होय. असो.

"इतकें सांगून व फिरून वाढदिवसमंडळांतील सर्व कार्यकारी लोकांचे, व त्यांच्या उत्साहाचें चीज करण्याकरितां जमलेल्या आपणा सर्व मंडळीचे, मी कृतज्ञतापूर्वक आभार मानून हें भाषण संपवितों."

[ वर हलवायाच्या घरावर तुळशीपत्र हे शब्द आहेत त्याचें कारण हें कीं, या वाढदिवस समारंभाच्या दिवशीं रा. रामभाऊ टिळकांनीं मजसंबंधीं एक हस्तपत्रक काढून त्यावर ' हलवायाच्या दुकानावर तुळशीपत्र ' असा मथळा घातला होता. म्हणून टिळकांच्या पोटीं येऊन त्यांच्या मिळकतीचा हव्यास धरणारा फुकट्या पुत्र आणि श्रम सायासयुक्त सेवा करून योग्यतेला चढणारा त्यांचा मित्र व शिष्य यांतील मार्मिक भेद मला लोकांच्या नजरेस आणावयाचा होता.]

आभार प्रदर्शनाच्या माझ्या भाषणानंतर मला पुण्याबाहेरील व पुण्यांतील अनेक संस्थातर्फे विविध स्वरूपाचे अनेक आहेर व पुष्पहारं समर्पण करण्यांत आले. त्यांत पुढील संस्थांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल.

मुंबई—मुंबई नगरवासीयांचें केळकर वाढदिवसमंडळ, श्रीलोकमान्य, ब्राह्मण सभा, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, पाठारे प्रभू सोशल समाज, पैसाफंड, गोग्रास संस्था. दादर—माध्यंदिन ब्राह्मणसभा. ठाणें—भारतसेवक नाट्यमंडळ. मिरज—स्नेहसंवर्धक संघ, मिरज सं. प्रजाप्ररिषद, विद्यार्थीसंघ, अंबाबाई व भानू तालीम, गीतामंडळ, वांई—स्वस्तिक संघ, वैराज वसतव्याख्यानमाला व वांई-कर नागरिक. सांगली—सार्वजनिक सभा, गजानन मिल्स, सं. प्रजापरिषद, युनि-यन क्लब आरोग्यमंडळ, टिळक स्मारकमंदिर. मोडनिंब—सार्वजनिक सभा. सातारा—सार्वजनिक सभा. पाचवड—स्वाध्यायमंदिर. मडगांव-गोवा—सरस्व-तीसेवक इ. ६ संस्था. कोल्हापूर—जनरल लायब्ररी. नाशिक—अनाथ वि. गृह. अकोळ—(निपाणी). नागपूर—वागीश्वरीमंडळ. सोलापूर-साहित्यमंडळ. नगर—अनाथ वि. गृह. उगार—ग्रामसेवामंडळ, बोरखळ—सार्वजनिक सभा. पुणें—भारत स्व. से. मंडळ, आयुर्वेदीय रसशाळा, वक्तृत्वोत्तेजक सभा, महाराष्ट्र चित्र-कारमंडळ, नि. भा. आयुर्वेद महामंडळ, संभाजीमंडळ, वारकरीमंडळ, शेतकरी हितवर्धकमंडळ, हिंदुधर्म मठ, सन्मित्र समाज मेळा, वैदिक संशोधन मंडळ, व्हिक्टोरिया टेलरिंग कॉलेज, गोपाळ गायन समाज, बोहरी समाज, वेदशास्त्रोत्ते-जक सभा, अस्पृश्यतानिवारक मंडळ, शिवचरित्रकार्यालय, सारस्वत-सेवासंघ, पंचांगप्रवर्तन कमिटी, नाट्यचित्रवस्तुसंग्रहालय, राष्ट्रीय भैरव-नाथमंडळ, हिंदु महासभा, लोकमान्य पंथ, महाराष्ट्र स्वदेशी संघ, मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक, व्यापारी मंडळ, गीताधर्ममंडळ, आनंद प्रेस, डेक्कन एज्यु-

केशन सोसायटी, गीर्वाणवाग्वर्धिनी सभा, नगर वाचनमंदिर, दलितसेवा-संघ, महाराष्ट्रीय व्यायाम शाळा, वसंत व्याख्यानमाला, डे. इं. ऑफ कॉमर्स, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, शिक्षण प्रसारक मंडळी, मुंबई इ. प्रा. शिक्षक संघ, पोस्टल यूनियन, आर. एम्. सर्व्हिस बी डिव्हिजन, यजुःशाखीय ब्राह्मण सभा, राष्ट्रीय शिक्षण मंडळ, डेक्कन जिमखाना., गणेश महादेव आणि मंडळी, बडोदे साहित्यसेवक, बृहन्महाराष्ट्र ब्राह्मण परिषद, गोवर्धन संस्था पुणें व वाई, भारतमित्र समाज मेळा, मध्वसिद्धान्तप्रचारिणी सभा शाखा, चित्रमयजगत् पुणे, त्वष्टाकासार समाजोन्नति संस्था, कॉमनवेल्थ विमा कंपनी, द. सं. हितवर्धक सभा, ऑ. इं. स्टेट्स परिषद, दक्षिण हैद्राबाद प्रजा परिषद, दैवज्ञ असोसिएशन, गांधर्व महाविद्यालय, प्रेस-ओनर्स असोसिएशन, ऑ. इं डि. क्लासिस प्रां. सभा, भारतीय चर्मकार समाज, भारतीय दलितसेवाश्रम संस्था, महाराष्ट्र ब्राह्मण सभा, ताराचंद रामनाथ धर्मार्थ दवाखाना, गुर्लहोसूर—लोकमान्य वाचनालय, भगूर—जाहीर सभा, पडघवली—( भोर ) शिवाजी उत्सव संस्था इत्यादि.

या नंतर पुणें शहरांत सुमारें आठ पंधरा दिवस मला या समारंभाकरितां आमंत्रणे येत होतीं. मात्र या करितां बाहेरगांवचीं सर्व निमंत्रणे मी नाकारलीं. नाहीं तर मला महिना दोन महिने दौराच काढावा लागता !

पुणें शहरांतील समारंभापैकीं केसरी संस्थेतर्फे झालेला समारंभ विशेष जिव्हाळ्याचा होता. त्याप्रसंगी झालेलें माझें भाषणहि एका विशिष्ट दृष्टीनें महत्त्वाचें होतें म्हणून त्या समारंभाची केसरीतील हकीकत देतोः—

" ता. २४-८-३२ रोजीं सकाळीं केसरी-मराठा संस्थेचें सर्व कामगार व संपादक-मंडळ यांतर्फे श्री. तात्यासाहेब केळकर यांना मानपत्र व अहेर समर्पण करण्याचा समारंभ गायकवाडवाड्यांतील नुकत्याच बांधलेल्या ग्रंथशाळेच्या भव्य दिवाणखान्यांत करण्यांत आला. श्री. दा वि. गोखले यांनीं समारंभाला कौटुंबिक स्वरूप कसें आहे हें विशद करून श्री. बाबासाहेब विद्वांस यांनी अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी विनंति केली व श्री. घोटणे यांनी अनुमोदन दिलें. श्री. धोंडोपंत विद्वांस म्हणाले कीं केळकरांना मानपत्र अर्पण करणें म्हणजे एक प्रकारें डाव्या हातानें उजव्या हाताला मानपत्र देण्यासारखेंच होतें. तथापि या दोन्ही डाव्या-उजव्या हातांनीं टिळकांचा हयातींत व त्यानंतरहि एकोप्यानें व गोडीनें सारखीं

३६ वर्षे एकत्र काम केलें. अनेक सुखदुःखांचे प्रसंग अनुभविलें. खस्ता खाल्ल्या. निंदा व स्तुति ही दोन्हीहि समान मानून व आपल्याला ही केसरी संस्था टिकवावयाची आहे असें समजून नेटानें व निर्धारानें कसें काम केलें त्याची आठवण होऊन श्री. विद्वांस व केळकर या दोघांनाहि भाषण करितांना उमाळ्यावर उमाळे येत होते, व त्यांची ती स्थिति पाहून प्रेक्षकांनाहि गहिंवरून आल्याशिवाय राहिले नाहीं. श्री. विद्वांस यांनीं संस्थेचा आतांपर्यंतचा इतिहास व त्यांतील ताम्यासाहेबांची कामगिरी वर्णन करणारें आपलें भाषण श्री. धारप यांना वाचावयास सांगितलें. तें वाचून झाल्यावर श्री. वा. कृ. भावे यांनीं मानपत्र वाचून दाखविलें. बाबासाहेबांनी ताम्यासाहेबांना चांदीच्या तबकांतून मानपत्र, पगडी व चांदीची फुलदाणी वगैरे आहेर अर्पण केला.

"उत्तरादाखल भाषण करतांना केळकर म्हणाले—" आजच्या प्रसंगीं मीहि बाबांचे अनुकरण करून माझें भाषण लिहून आणून कोणी ते वाचले असतें तर बरें झालें असतें असें आतां मला वाटतें. पण आलेल्या प्रसंगाला तोंड देऊन तो कसा तरी निभावून नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बाप, आई आणि मुलें मिळून कुटुंब होतें अशी एकानें व्याख्या केली आहे. त्या बिचाऱ्याला काय माहीत कीं, कुटुंबाची व्याप्ति याहिपेक्षां मोठी असूं शकते. केसरी संस्थेंतील आपण माणसें म्हणजे व्यापक अर्थानें कुटुंबच आहोत. आज ही संस्था इतक्या ऊर्जितावस्थेला आली असली तरी आजच्या प्रसंगीं पूर्वी अनुभविलेल्या सुखदुःखाची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. टिळकांनी १८९१ साली केसरी घेतला. तो कर्जासह घेतला. आज केसरी ऑफिसची ही एवढी अवाढव्य जागा व छापखाना आपण पहातों पण त्या वेळी केसरीला स्वतःचे ऑफिस अगर छापखाना ही कांहींच नव्हती. विंचुरकरांच्या वाड्यांत डाव्या हातच्या अंगास टिळक रहात. ते फक्त पांच खणी जागेंतच रहात होतें. त्या जागेत बसून त्यांनी केसरी लिहावा व आर्यभूषणमध्यें छापून काढावा. पैशाची व ऑफिसची व्यवस्था चित्रशाळेचे वासुदेवराव जोशी यांनी पहावी असें होतें. पुढें १८९६ साली मी केसरीला येऊन मिळालो त्या वेळीं केसरी कर्जातच होता ही गोष्ट मी मुद्दाम येथें सांगतों. पुढें १८९७ सालीं टिळकांच्यावर राजद्रोहाचा पहिला खटला झाला त्या वेळीं अशी खडतर वेळ आली की, आर्यभूषण छापखान्याचे मॅनेजर हरीपंत गोखले यांनी अवचित सांगितले कीं, केसरी छापण्याची व्यवस्था तुम्ही दुसरीकडे करा. तेव्हां

टिळकांनी त्या वेळीं हाताशीं असलेले बाबा विद्वांस यांना ऑफिसचें काम सांगितलें, व मला ही गोष्ट पक्की आठवतें कीं त्या वेळीं विंचुरकरांच्या घरांतील पुढल्या अर्ध्या खणांत न पुसलेली किंवा न रंधली सवरलेली तीन देवदारी खोकीं मांडून बाबांनी कामाला सुरुवात केली. ही गोष्ट मी डोळ्यांनी पाहिलेली आहे. ही केसरीच्या पहिल्या ऑफिसची स्थिति. पुढें १९०१ सालीं ताईमहाराजांचा खटला निघाला. त्या वेळीं तर टिळक कर्जांत बुडूनच गेले होते. लॉ-क्लास बंद केल्यानें तेंहि उत्पन्न नव्हतें. पण केसरी चालवून दुसरीकडे ताईमहाराजांचा खटला टिळक लढत होते. खटला सुरूं झाला म्हणजे किती तोंडांनीं खर्च सुरूं होतो हें आपणांस माहीत आहेच. एकीकडे कामाची चिंता व दुसरीकडे पैसा कोठून यावयाचा ही विवंचना. या खटल्यांत कित्येक प्रसंगी तकार सांगण्याकरितां मी स्वतः अनेकदां वकीलपत्रें हजर करून काम चालविलें आहे. १९०८ सालीं फौजदारी खटल्यांत टिळक निर्दोषी सुटले तेव्हां पैशाची विवंचना कमी न झाली तरी हृदयावरचें एक मोठें दडपण किंवा ओझें हलकें झालें असें वाटलें. तेथून जरा जम बसतो तो सुरत काँग्रेसची वेळ आली. टिळक पैसा मिळवीत तसा तो खर्चहि करीत. एकट्या टिळकांनी या काँग्रेसच्या वेळीं आपल्या पदरचे १०००० रुपये खर्च केले ही गोष्ट कोणास सांगून तरी खरी वाटेल काय ! १९०७ सालीं टिळकांना सहा वर्षें काळेपाण्याची शिक्षा झाली तेव्हांचे दिवस अत्यंत चिंतेत गेले. केसरी जगला म्हणजे मिळविली असें वाटूं लागले. टिळकांना वासुदेवराव जोश्यांनी मदत केली तशी अनेक प्रसंगीं शंकरराव जोशी यांचीहि मदत मला झाली हें सांगितलें पाहिजे. त्यांना खरोखर मी भाऊ मानतो. केसरीकडून १९१२ साली जामिनकी मागण्यांत आली ती रविवारीं रात्रीं व फक्त सोमवारचा एकच दिवस मध्यें होता. त्या वेळची सांपत्तिक स्थिति इतकी चमत्कारिक होती कीं, जामिनकीचे पांच हजार रुपये द्यायला केसरीची शिल्लक नव्हती, तेव्हां बाबांनी व मी स्वतःच्या विम्याच्या पॉलिसी गहाण टाकून त्यांच्या तारणावर पांच हजार रुपये भरण्याचे ठरविले. पण उरवणे शेटजींनी टिळकांच्या प्रेमाखातर अयाचित रीतीनें मदत करून पांच हजार रुपये कर्जाऊ दिले. पुढें टिळक सुटून आल्यानंतर १९१४ सालीं युद्धाचा सूर लागला. आणि तेथून केसरीच्या सुस्थितीला सुरुवात झाली असें म्हणतां येईल. नंतर होमरूल लीगची चळवळ निघाली आणि टिळकांच्या कामाचा व्याप व हिम्मत तर एवढी दांडगी पहा कीं, मिळालेल्या लाखा-

च्या पर्सपैकीं एकदम एका रकमेनें पन्नास हजार रुपये त्यांनी परदेशांत चळवळ करण्याकरितां डॉ. रवींद्रनाथ टागोर यांना पाठवून दिले. पुढें रवींद्रनाथ-बाबू परदेशला गेले नाहींत व ती रक्कम त्यांनी परत केली ही गोष्ट निराळी. त्यानंतर झालेल्या चिरोल खटल्यानें तर टिळकांना तीन लक्ष रुपयांचे कर्ज झालें; व आम्ही त्यांना पर्स देण्याची कल्पना काढून व खटपट करून लोकांकडून हे तीन लाख रुपये जमवून टिळकांना दिले नसते तर आज केसरी संस्था ही आकंठ कर्जात बुडून राहती, व नुसते हेतेबंदीनें त्या कर्जाचें व्याज फेडतां फेडतां चालकांचे नाकी कसें नव आलें असतें याची कल्पना आपणच करा म्हणजे झालें. १९२०सालीं टिळक वारल्यानंतर केसरीची वर्गणीदार संख्या थोडीफार घटली; नाहीं असें नाहीं. तथापि २५ ते ३० हजारचे दरम्यान आजहि केसरीचे अंक आम्ही काढतों. केसरी विपन्नावस्थेत असतांना मी केसरीस मिळालो तेथपासून मी ही हकीकत सांगितली. टिळक असेपर्यंत केसरीच्या सुस्थितीचें सर्व श्रेय टिळकांना कोणी दिलें तर त्याला माझी हरकत नाहीं. पण त्यानंतर १०–१२ वर्षांत आम्ही केसरी संस्था टिकविली इतकेंच नव्हे, तर काटकसरीनें वागून व शिल्लक टाकून तीन लाख रुपयांचा ट्रस्ट परवां करून लोकांनीं चिरोल केसकरितां कर्ज म्हणून दिलेली रक्कम महाराष्ट्रास परत दिली. या तरी कामगिरीचा किंवा श्रेयाचा थोडाबहुत भाग घेण्याची आमची पात्रता आहे किंवा नाहीं ! टिळकांना लोकांनीं तीन लाख दिले. ते आम्ही परत केले ही गोष्ट मी अहंकारबुद्धीनें सांगत नाहीं. आणि या बारा वर्षांत खरोखर टिळकांना आम्ही पैसे दिले असे कोणा एकाहि व्यक्तीनें आम्हांला प्रत्यक्षपणें दर्शविलेंहि नाहीं. पण टिळकांच्या पुण्याईनें जरी केसरीला एका अर्थानें या मदतीमुळेंच आज निष्कर्जी राहण्याची व संपन्नता प्राप्त करून घेण्याची सुस्थिति लाधली, तरी तो उपकार स्मरून हे ऋण आपण सार्वजनिक ट्रस्टच्या रूपानें ज्या त्या प्रांतांना हिस्सेरशीनें कां परत करूं नये असें मनांत आलें; व म्हणून आम्ही हा ट्रस्ट केला–अहंकारबुद्धीनें नव्हे. आज मी व बाबांनी या संस्थेंत एकसारखें ३६ वर्षें काम केलें, आतां आम्ही जाग्यावर बसून स्वस्थपणानें स्वतः कांहीं काम न करतां इतरांनीं काम केलेलें पाहिलें म्हणजे झालें. यापेक्षां आमच्यावर अधिक जबाबदारी नाहीं. बाबा खालच्या ऑफिसचे मालक व मी वरच्या ऑफिसचा मालक; तथापि उभ्या ३६ वर्षांत आमचें एकदांहि भांडण होण्याचा प्रसंग आला नाहीं हें मी अभिमानानें सांगतों. असे

ऋणानुबंध, अशी मैत्री, नुसत्या वरच्या व खालच्या नव्हे तर अगदीं खालच्या खालच्या म्हणजे कामगार वर्गाच्या खाल्यांत नांदली व सर्वांना एकमेकांविषयीं बंधुभाव वाटला तरच संस्था टिकेल व भरभराटेल.

"मंगळवार उजाडला व केसरी वेळच्यावेळीं निघाला नाहीं असा प्रसंग गेल्या पन्नास वर्षांत एकदाहि आला नाहीं. वर्तमानपत्राचा अंक अचूक बाहेर पडणें याला मी एक Weekly Miracle म्हणजे साप्ताहिक चमत्कारच म्हणतो. खरोखरीच ही अभिमानाची गोष्ट आहे व हें ब्रीद आम्ही आजवर टिकविलें आहे. केसरी द्विसाप्ताहिक केल्यामुळें पुढल्या पिढीवरील जबाबदारी वाढली आहे हें मी जाणतों; पण तो द्विसाप्ताहिक केल्यामुळें तशी अनुकूलताहि अधिक वाढली आहे. आज केसरीला स्वतःचे ऑफिस आहे, छापखाना आहे, नोकर वर्ग भरपूर आहे, प्रुफांचीहि दगदग नाहीं. १८९७ साली प्लेग होता तेव्हां तर सर्व लोक गांव सोडून बाहेर रहावयास गेलेले असत. पण छापखाना गांवांत. मी रात्रीं दोन वाजतां आर्यभूषण छापखान्यांत येऊन दाराच्या दिडींत थंडींत कुडकुडत बसें; व मला एका मिणमिण्या दिव्याच्या प्रकाशांत मराठ्याची सर्व प्रुफें पाहून देऊन अरुणोदयापर्यंत काम करावें लागे. त्यावेळीं थंडीचा अगर वाऱ्याचा झोत अंगावर येऊन असें वाटे की कांही विचारूं नका. आज ती स्थिति राहिली नाहीं. संध्याकाळीं ५ च्या नंतर कोणाला कामहि पडत नाहीं. हाताशीं नोकर माणसेंहि लागेल तशी आहेत. मी टिळकांना १८९६ साली येऊन मिळालों त्या वेळीं एकटे टिळक व मी असे दोघेच होते. हाताखालीं एकहि नोकर नव्हता; व आज प्रुफें नेआण करणारा नोकर जें झाडलोटीचें किंवा घड्या उलगडून ठेवण्याचें काम करतो तें सुद्धां कित्येक दिवस प्रथमतः माझें मीच केले आहे हें लक्षांत ठेवा. मनुष्य लहान झाला म्हणून त्यालाहि दर्जा असतो ही गोष्ट माझ्या सदैव ध्यानांत असते. आज ३६ वर्षांत एकाहि नोकराला मी एकदाहि अपशब्द बोललों नाहीं असें मी सांगूं शकतों. अशा एकनिष्ठतेनें संस्थेचें सुखदुःख तेंच आपलें सुखदुःख मानून आम्ही केसरी संस्था टिकविली व चालविली. परद्रव्याच्या अपहाराच्या एका पैशाचाहि डाग या ३६ वर्षांत मला लागला नाहीं हें मी जाहीर रीतीनें सांगतों. केसरीनें प्रथम कर्जांत जीवन काढले व त्यापुढेंहि स्वावलंबनानें व निस्पृहपणानें त्यानें आपलें जीवित-कार्य कंठले. आम्ही संकटें भोगलीं, टिळकांचीं आमचीं सुखदुःखें एक मानलीं, म्हणूनच टिळकांच्या केसरीचा वारसा क्रमप्राप्त रीतीनें मजकडे आला. कोणी विचारतात

कीं, 'तुमच्याकडे केसरी कसा काय आला ?' मी या आक्षेपकाला विचारतों 'माझ्या नाहीं तर काय तुझ्या हातीं केसरी यावयाला हवा होता ?' पण असल्या निंदकांना उत्तरहि देण्याचें कारण नाहीं. मी माझ्या परीनें केसरी आतांपर्यंत चालविला तसे पुढीलहि कामगार लोक पाठीमागील हा इतिहास ओळखून संस्थेची जबाबदारी पार पाडतील इतकीच आमची इच्छा आहे. मी अष्टपैलु लेखक असलों तरी माझ्यांत सगळे अष्टादश पैलू नाहींत. एखादी नवीन कल्पना काढून सुचेल तिनें मनोरंजकपणा सिद्ध करून संपादकानें लिहिलें पाहिजे. वरच्या वर्गानें खालच्या मंडळीशीं स्नेह ठेविला व सर्वांनीं संस्थेचा अभिमान धरला तरच संस्था टिकेल."

यानंतर आणखी एका समारंभाचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. तो 'साहित्य संस्थे'तर्फे भारत इतिहास मंडळाच्या जागेत ता. २७ ऑगस्ट रोजीं झालेला. माझ्या जावनांत साहित्यप्रेमी लोकांचा संबंध राजकारणप्रेमी लोकांपेक्षां अधिक आला. यामुळें त्यांनीं दिलेल्या (या खालीं छापलेल्या) मानपत्राचा खरोखरच मला फार अभिमान वाटतों. तें मानपत्र येणेंप्रमाणें—

"साहित्याचार्य श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर ! श्रीपरमेश्वरकृपेनें आपणांस नुकतेंच एकसष्टावें वर्ष लागलें याबद्दल आपलें अभीष्टचिंतन व अभिनंदन करण्याकरितां आज आम्ही महाराष्ट्रांतील अनेक साहित्यसंस्थांचे प्रतिनिधि, स्थानिक व परस्थ मराठी साहित्यसेवक, येथें जमलों आहों. आपणांवर आम्हां साहित्यसेवकांचा जितका हक्क आहे तितका दुसऱ्या कोणाचाहि नाहीं, ही गोष्ट आपणांसहि मान्य होईल. कारण आपण प्रथम साहित्यप्रणेते व नंतर इतर सर्व कांहीं आहां.

"विष्णुशास्त्री चिपळुणकर, टिळक व आगरकर या थोर पुरुषांप्रमाणें आपणहि वकिलीचा किंवा सरकारी नोकरीचा मोह आवरून वाङ्मयाच्या द्वारां देशसेवेचें पवित्र व्रत स्वार्थत्यागपूर्वक स्वीकारलें व तें आजपर्यंत अखंड पाळलें. यांत आपल्या सात्त्विक मनोवृत्तीचें व एकांत वाङ्मयोपासनेच्या दृढ निश्चयाचें बीज आहे. इ. स. १८९४ पासून तों आजपर्यंतची आपली वाङ्मयात्मक कामगिरी सर्वश्रुत व सर्वसंमत आहे. या दीर्घ कालांतील आपला वाङ्मयप्रपंच विस्तृत, विविध व बहुरंग आहे. यांत आपली विद्वत्ता, व्यासंग, लेखनकौशल्य, बुद्धि-

स्वातंत्र्य व विचारवैशिष्ट्य हीं दिसून येतात. सात्त्विकपणा, उदात्तपणा, रंजकता, बोधपरता व ज्ञानसंग्राहता हे अभिजात वाङ्मयाचे प्रधान गुण आपण निर्मिलेल्या वाङ्मयांत चहूंकडे दृष्टीस पडतात. हें वाङ्मय स्फूर्तिदायक, विचारप्रवर्तक, ज्ञानसंवर्धक, आनंददायक आणि म्हणूनच आदर्शभूत आहे. तें निरंतर टिकणारें व उपकारक आहे.

"आपण वाङ्मयाच्या कोणत्याहि शाखेंत निर्भयपणें संचार करतां हा आपल्या कर्तृत्वाचा अनन्यसाधारण विशेष आहे. काव्य, नाटक, इतिहास, कथा, साहित्य-ग्रंथ, टीका, ग्रंथपरीक्षण, पुस्तकप्रस्तावना, वृत्तपत्रांतील लेख व अनेक मासिक पुस्तकांत लिहिलेले विविध लेख अशा सर्वच ठिकाणीं आपली लेखणी लीलेनें विहार करते. तशीच आपली रसनाहि अनेक वाङ्मयविषयांचा परामर्श घेण्यास समर्थ आहे. लेखणी व रसना हीं आयुधें कुशलतेनें योजणारे आपल्यासारखे सव्यसाची वाङ्मयवीर फार विरळे !

" सुंदर कल्पना, प्रतिभेची चमक, चमत्कृतिजनकता व सभ्य विनोद हे वाङ्मयाचा उत्कर्ष करणारे गुण आपल्यांत सहजात आहेत. आपण त्यांचें संवर्धन करून त्यांचा चातुर्यानें उपयोग केला आहे. सदभिरुचि व औचित्य यांचा भंग कोठेंहि केलेला नाहीं. हा आपल्या वाङ्मयाचा एक विशेष आहे. प्रसादगुणप्रधान वैदर्भी रचनापद्धति आपल्या वाङ्मयांत सर्वत्र आदरिलेली आहे. यामुळे आपलें सर्व लिखाण रसिकमान्य झालेलें आहे.

" प्रतिपाद्य विषयाची पुरी माहिती, तिचा सांगोपांग, समतोल व समंजस विचार व तिची तर्कशुद्ध, प्रमाणबद्ध, व सुबोध मांडणी हा कोणत्याहि चांगल्या ग्रंथाचा प्राणभूत अंश होय. अभिनव कल्पनांनीं, मनोहर अलंकारांनीं व सुभाषित विनोदानें नटलेल्या आपल्या वाणीचा या प्रमाणभूत अंशाशीं केव्हांहि वियोग होत नाहीं. यामुळें आपला कोणताही लेख सरस, रमणीय व उद्-बोधक वाटतो.

"मराठी वाङ्मयांतील टीकेचें दालन पूर्वी फार संकुचित व एकदेशीय होतें. तें विशेषतः आपण विस्तृत व सर्वांगपरामर्शी केलें. आपले टीकालेख भारदस्त, समतोल, माहितीनें भरलेले व ग्रंथकारास व लेखकास प्रोत्साहक असतात. कित्येक

पुस्तकांना आपण लहानमोठ्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्या फार मार्मिक, सुंदर, सारग्राही व उद्बोधक आहेत.

"प्रस्तुतच्या लहानशा मानपत्रांत आपल्या प्रचंड वाङ्मयनिर्मितीचा ओझरतासुद्धा योग्य परामर्ष घेतां येणें शक्य नाहीं. तथापि टिळकचरित्र, तोतयाचें बंड, सुभाषित आणि विनोद, मराठे व इंग्रज, विलायत व सिमला येथील बातमीपत्रें, आयर्लंडचा इतिहास, बडोद्याच्या साहित्यप्रसंगी आपण अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण व नाट्याचार्य श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकाचें परीक्षण, एवढेंच आपलें लिखाण कोणी वाचलें तरी त्यावरून सुद्धा आपल्या बहुश्रुतपणाची, विद्वत्तेची, लेखनकुशलतेची, रसिकतेची व सहृदयत्वाची एकदम ओळख पटल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थशास्त्र, हुंडणावळ, सुवर्णचलन, शुद्धलेखन, छन्दोरचना अशांसारखे स्वभावतः रुक्ष व दुर्बोध विषयसुद्धां आपल्या सरस लेखणीनें सुगम व मनोरम करून सोडले आहेत.

"श्रीसरस्वतीची दिव्य उपासना आपण जातीनें केली इतकेंच नव्हे, तर महाराष्ट्र भाषाभिवृद्धीसाठीं जे जे प्रयत्न झाले आणि ज्या ज्या संस्था स्थापण्यांत आल्या त्यांना आपण 'केसरीद्वारा' व इतर रीतीनें अनेक प्रकारचें बहुमोल सहाय्य दिलेलें आहे, हेहि कृतज्ञतापूर्वक येथें नमूद करणें आमचें कर्तव्य होय. सारांश, आपली वाङ्मयसेवा सर्वांगीण व सर्वमान्य आहे. हिच्याबद्दल आमच्या मनांत वसणाऱ्या आदराचें अल्पसें चिन्ह म्हणून हें मानपत्र आपणांस आजच्या शुभप्रसंगीं प्रेमादरपूर्वक अर्पण करीत आहों. त्याचा स्वीकार व्हावा अशी विनंति आहे.

"सरतेशेवटीं परमेश्वराजवळ एवढीच प्रार्थना आहे कीं, त्यानें आपणांस दीर्घ आयुष्य व आरोग्य द्यावें व आपल्यासारख्या अभिजात व अष्टपैलु ग्रंथकारांची परंपरा कायम ठेवून तिच्या द्वारें मराठी वाङ्मयाचा उत्कर्ष व महाराष्ट्राचें कल्याण करावें. ही सदिच्छा तो सफल करो अशी आशा प्रदर्शित करून आम्ही आपली रजा घेतों."

साहित्यसंस्था—महाराष्ट्र साहित्य परिषद, भाषाशास्त्र मंडळ, पुणें; सरस्वती मंदिर, पुणें; मयूर मंडळ, पुणे; भारतवर्षीय चरित्रकोश मंडळ, पुणें; गोमांतक साहित्य सेवक मंडळं, पणजी; महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर; राजवाडे संशोधन

मंडळ, धुळें; देवल क्लब, सांगली; कविमित्र मंडळ, दादर; भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें; साहित्य मंडळ, सांगली; काव्यरत्नावली संस्था, जळगांव; व्यापारी मोफत वाचनालय, सांगली; नगर वाचन मंदिर, कोल्हापूर; जुम्मा दादा व्यायाम मंडळ, बडोदे; साहित्यसेवा मंडळ, कऱ्हाड; विदर्भ साहित्य संघ, नागपूर; धर्मकोश कार्यालय, प्राज्ञपाठशाळा वांई; शारदा मंडळ, नागपूर; महाराष्ट्र शब्दकोश मंडळ, पुणें; वाङ्मयोपासक मंडळ, अहमदनगर; भारत कविमंडळ, कोल्हापूर; वाचनालय संस्था, विटें; साहित्यसेवा मंडळ, इचलकरंजी; महाराष्ट्र भाषासंवर्धक मंडळ, नागपूर; वाङ्मयचर्चा मंडळ, बेळगांव; साहित्य सरोज मंडळ, औंध; पाठारे प्रभु सोशल समाज, मुंबई; श्रीमहाराष्ट्र शारदा मंदिर, पुणें; मित्रमंडळ, बेळगांव; महाराष्ट्र वाचनमंदिर, नाशिक; वाङ्मय विहार मंडळ, नाशिक; तांबे मंडळ, ग्वाल्हेर; मराठी ग्रथसंग्रहालय, ठाणें; महाराष्ट्र मंडळ, कराची; मठग्रामस्थ हिंदु मंडळ, मडगांव; ऐक्यसंवर्धक मंडळ, पुणें; महाराष्ट्र वाङ्मयमंडळ, फ. कॉ. पुणें.

साहित्य सेवक—चिंतामण विनायक वैद्य. श्री. सरदार माधवराव किबे. सौ. कमळाबाई किबे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. वामन मल्हार जोशी. मावध श्रीहरी अणे. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर. नारायण गोविंद चाफेकर. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. दत्तो वामन पोतदार. श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर. पांडुरंग वामन काणे. द्वारकानाथ गोविंद वैद्य. गोविंद सखाराम सरदेसाई. दाजी नागेश आपटे. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले. जनरल नानासाहेब शिंदे. प्रो. माणिकराव. नारायण केशव बेहेरे. वसंत नारायण नाईक. माधव दामोदर आळतेकर. रामचंद्र काशिनाथ तटणीस. माधव त्र्यंबक पटवर्धन. चिंतामण विनायक जोशी. बाळकृष्ण गणेश खापर्डे. वासुदेव विनायक जोशी. विनायक सदाशिव वाकसकर. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर. शंकर दामोदर पेंडसे. विठ्ठल सिताराम गुर्जर. विष्णु सखाराम खांडेकर. नारायण बाळकृष्ण पराडकर. नारायण हरी आपटे. रे. भास्कर कृष्ण उजगरे. सुंदरराव भास्कर वैद्य. रघुवेल ल्यूकस जोशी, भास्कर रामचंद्र तांबे. चंद्रशेखर राजकवि, बडोदे. यशवंत. वासुदेव गोविंद मायदेव. वैजनाथ काशीनाथ राजवाडे. प्रल्हाद केशव अले. साधुदास काव्यविहारी. आनंदराव टेकाडे. सदाशिव अनंत शुक्ल. विनायक लक्ष्मण बर्वे, (आनंद.) केशव महादेव सोनाळकर. केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर. ज. वा. पाटणकर. वासुदेव कृष्ण भावे. गणेश गंगाधर

जांभेकर. रामकृष्ण गणेश हर्षे. गजानन विश्वनाथ केतकर. केशव सिताराम ठाकरे, नारायण रामलिंग बामणगांवकर, दत्तात्रय गणेश सारोळकर, नारायण नरसिंह फडणीस, अनंत हरी गद्रे, केशव वासुदेव साठे, यशवंत रामकृष्ण दाते, चिंतामण गणेश कर्वे, कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, श्रीपाद महादेव माटे, बापूजी मार्तंड आंबेकर, नारायण महादेव भिडे, दत्तात्रय विष्णु आपटे, अनंत भा. प्रियोळकर, दामोदर मोरेश्वर भट, शेषाद्रि गोविंद कानडे, द. वि. पारखे. रामचंद्र गोविंद कानडे. वि. धों. कुलकर्णी. ग. स. जोग. प. स. देसाई, वा. ना. शहा, भालचंद्र लक्ष्मण पाटणकर, रा. ल. घरत, दत्तात्रय व्यंकटेश पै, गोविंदराव उपळेकर, यादव शंकर वावीकर, अज्ञातवासी.

संपादक—ज्ञानप्रकाश, लोकशिक्षण, आनंद, रत्नाकर, स्फूर्ति, चित्रमय-जगत्, बालबोध, ज्ञानमित्रमाला, गोरक्षण, दीनबंधु, भद्रायु–पुणे; मनोरंजन, खेळगडी, विविधवृत्त, प्रभुप्रभात, भारत गौरव ग्रंथमाला, नवाकाळ, मौज–मुंबई; महाराष्ट्र, वागीश्वरी–नागपूर; किर्लोस्कर व स्त्री-किर्लोस्करवाडी; सद्विचार–बडोदे; सुबोध, आर्यविज्ञान–गोवा; रामकृष्ण निकेतन माला–रत्नागिरी; सत्यवादी–कोल्हापूर; विजय–सांगली; निजाम विजय–दाक्षिण हैद्राबाद; समर्थ–सातारा; उदय–उमरावती; टणत्कार–विलेपारलें; वैनतेय–सावंतवाडी; प्रबोध–धुळें; बलवंत–रत्नागिरी.

श्रीमहाराष्ट्र शारदा मंदिरातर्फे झालेल्या या सत्कार समारंभांत चिंतामणराव वैद्य म्हणाले "मी आजपर्यंत अनेक वेळां अध्यक्ष झालों आहे. पण आजचा सुप्रसंग असा पहिलाच आहे आणि तो मी स्वतःला बहुमान समजतों." रा. यशवंतराव दाते यांनीं मानपत्र वाचून दाखवून सांगितलें कीं, "या मानपत्रांत इतक्या सह्या आलेल्या असल्या तरी आमच्याकडे दाखल झालेलीं साहित्यसेवक व साहित्यसंस्था यांचीं कितीतरी नांवें त्यांत आलेलीं नाहींत. मानपत्राच्या आकारमानामुळें सर्वांचा समावेश करणें अशक्य होतें."

प्रो. वा. म. जोशी म्हणाले—"लोकांनीं प्रेमानें साजरा केलेला असा हा समारंभ आहे. अनेक साहित्यसेवक आज एका साहित्यसेवकाचा गौरव करीत आहेत हें औचित्यपूर्णच आहे; पण आश्चर्यजनकहि आहे. कारण प्रायः समानविद्य लोकांनीं परस्पराचा मत्सर करावा अशी स्थिति असते. पण येथें तात्यासाहेबांशीं

समानविद्य असणारा कोणी नाहीं म्हणून त्यांच्याबद्दल कोणाला असूयाहि नाहीं हेंच खरें. तात्यासाहेबांचें वाङ्मय विविधरंगी, मनोरम, व कल्याणप्रद आहे. इतकें कीं त्याची सर दुसऱ्याला येणार नाहीं. 'सत्यं, शिवं, सुंदरम्' हीं उच्च वाङ्मयाचीं सारीं लक्षणें त्यांच्या लेखनाला लागूं पडतात. ते सव्यसाची लेखक असल्यामुळें त्यांना अर्जुनाची उपमा देण्यांत येते. पण त्याहिपेक्षां भीष्म किंवा द्रोण यांची उपमा त्यांना अधिक शोभते असें मला वाटतें. कारण दोनहि हातांनीं झाले तरी अर्जुन फक्त बाणच मारी; पण द्रोण हे 'शापेनापि शरेणापि' आपलें कार्य करीत. तात्यासाहेब हे दुर्मतरुपी शत्रूवर शरसंधान तर करतातच, पण त्याहिपेक्षां ब्राह्मण्याला उचित असा युक्तिवादहि करतात. त्यांत अगतिक झाल्यावरच ते शस्त्र हातीं घेतात."

रे. भास्करराव उजगरे—"आम्ही ख्रिस्ती असलों तरी आमची मातृभाषा मराठी आहे आणि तिचा अभिमान आपणा सर्वांपेक्षांहि आम्हांला अधिक आहे. तात्यासाहेब हे साहित्यसेवक असून एक राष्ट्रपुरुष आहेत म्हणून त्यांचा सन्मान करण्याचा आम्हांला हक्क आहे."

सौ. सरलाबाई नाईक—" तात्यासाहेबांचें वाङ्मय हें शाळेंत शिकणाऱ्या मुलांपासून पंडितापर्यंत सर्वांना मनोरंजन व बोधप्रद असें असतें. वाचकवर्गाच्या अभिरुचिबरोबर वहात न जातां ती अभिरुचीच उच्च दर्जाला नेणें हें काम त्यांच्या वाङ्मयानें केलें आहे. स्त्री-पुरुषांनीं एकत्र व स्वच्छंदानें वाचावें इतकें त्यांचें वाङ्मय निर्दोष आहे. "

श्री. के. सी. ठाकरे—"केळकरांची टीकावृत्ति ही मूषकप्रवृत्तीची आहे—आंतडें कुरतडणारी पण फुंकर घालणारी आहे. त्यामुळें टीका खालेल्या प्रतिपक्षाच्याहि मनांत द्वेषभाव उत्पन्न होत नाहीं. त्यांचें तडजोडीचें धोरणहि असाच इष्ट परिणाम घडवून आणतें. "

शेवटीं मी उत्तरादाखल बोललों तें असें:—" मानपत्रांतील स्तुतीमुळें माझी जीभ भारावली आहे; तेव्हां मी फारसें बोलणार नाहीं. मानपत्रांत इतकीं विशेषणें मला लावलेलीं आहेत कीं, तीं सारीं अहेतुक वापरलीं म्हणावें तरी कठिण, आणि खरीं म्हणावीं तरी कठिण. म्हणून मी एवढेंच म्हणतों कीं, चार-पांच लेखकांनीं मिळून आपापलीं दोन-दोन चार-चार विशेषणें त्या मानपत्रांत समाविष्ट केलीं. अर्थात् तीं सर्व यथार्थ म्हणून मी स्वतःला तीं सारीं लावून

घेईन तर ती चूक होईल. पण मी एवढें सांगूं इच्छितों कीं जीं विशेषणें खऱ्या बुद्धीनें योजलेलीं असतील त्यांपैकीं कांहीं वाचून मला आनंद वाटला. उदाहरणार्थ 'बुद्धिस्वातंत्र्य' हा त्यांत उल्लेखिलेला गुण घ्या. त्यावर माझा कटाक्ष आहे. कोणालाहि खूष करण्याकरितां मी जन्मांत कधीं लिहिलें नाहीं. 'सात्त्विकपणा' हें विशेषण मी मला भूषण समजतों. तसेंच 'सभ्यता, सदभिरुचि व औचित्य' हे शब्द तर मी शिरोधार्य मानतों. कारण वाङ्मय म्हणजे मनुष्याच्या साऱ्या संस्कृतीचें सार आहे, अर्कच आहे म्हणा ना ! तो अर्क शंभर टक्के निर्दोष असला पाहिजे. असदभिरुचीचें समर्थन मी स्वप्नांतहि करणार नाहीं. माझे 'टीकालेख लेखकास प्रोत्साहक असतात' असें मानपत्रांत म्हटलें आहे, तें ठीकच आहे. कारण तरुण लेखकांबद्दल मला भारी कौतुक वाटतें. ते उत्साहार्ह आहेत. नवीन लेखकवर्ग मोठा प्रतिभासंपन्न असा निर्माण होत आहे असें मला दिसतें आणि म्हणून त्याच्यावर माझी फार आशा आहे. केळी तोडाव्या व त्यांतून नवे कोंब फुटावे तशी मराठी साहित्याची वाढ चोहों अंगांनीं होत असल्याचें मी पहात आहे. 'सुगमता' याहि गुणाकडे मी आस्थेनें लक्ष पुरविलें आहे. एक वेळ ज्ञानाची गंभीरता कमी असली तरी चालेल, पण लेख सर्वांना सुगम असलाच पाहिजे असें माझें मत आहे. मी असेंच मानतों कीं, एखादा ग्रंथ स्वतः वाचणें काय आणि त्यांतील आशय सुबोध रीतीनें व्यक्त करणारा लेख लिहिणें काय, वाचकांच्या दृष्टीनें दोन्ही सारखेंच. लेखकाची महत्त्वाकांक्षा अशी असावी कीं, कल्पना सुचली कीं मी ती कागदावर मांडीन, व नंतर तो लेख स्वतः वाचीन तेव्हां स्वतःला आनंद होईल, छापल्यावर लोकांना आनंद होईल, आणि त्या आनंदाचें किरण परत मजकडे येतील. असें हें विद्युन्मंडळ (Electric circuit) पूर्ण झालें पाहिजे. त्यासाठीं लोकांना सुगम होईल अशाच रीतीनें लिहिलें पाहिजे..... मला ६० वर्षें आयुष्य लाभलें व केसरीच्या चव्हाट्यावर स्थान मिळालें हीं माझ्या यशाचीं दोन बीजें आहेत. नवीन लेखक मला प्रतिभासंपन्न दिसतात. त्यांना माझें सांगणें एवढेंच कीं, सदभिरुचि, औचित्य व बुद्धिस्वातंत्र्य हे तीन गुण अंगिकारा म्हणजे मराठी भाषेचें वैभव खचित वाढेल. तसेंच महाराष्ट्र विद्यापीठ निघालें म्हणजे तिचा उत्कर्ष आणखी मोठ्या प्रमाणावर होईल."

पुण्यांतील सुमारें दहावीस संस्थांकडून सत्कार समारंभ इतक्या थाटानें यशस्वी झाले कीं, त्यामुळें "समारंभाच्या प्राथमिक चालकांनीं माझ्या व त्यांच्या

शत्रूंवर व निंदकांवर मात करून दाखविण्याची प्रतिज्ञा पार पडली व इर्षा सफळ केली" असें प्रशस्तिपत्र त्यांना प्रामाणिकपणें द्यावें लागलें. पुण्यांतील समारंभांत मिळून माझ्या गळ्यांत इतके हार पडले कीं, मला त्यांचीं ओझीं उचलतां आलीं नसतीं. पुण्यास व बाहेरगांवीं मिळून जीं मानपत्रें देण्यांत आलीं किंवा अभिनंदनपर पत्रें मजकडे पाठविण्यांत आलीं त्यांचा एक भला मोठा गठ्ठाच झाला असता. आणि मौल्यवान् वस्त्रांचे, कलाकुसरीच्या पदार्थांचे, विशेषतः चांदीचे अहेर इतके आले कीं, त्यांची किंमत सुमारें दोन अडीच हजार रुपये तरी होईल. आणि ते संभाळण्याकरितां मी सुमारें ऐशी-पंचाऐशी रुपयांचें एक स्वतंत्र कपाट केलें तरी त्यानेंहि भागलें नाहीं.

असो. बाहेरगांवीं झालेल्या सत्कार समारंभांना मी मुळींच कोठेंहि गेलों नाहीं. ते सर्व माझ्यापरोक्ष झाले. पण त्यांतील मुख्य म्हटला म्हणजे मुंबईस ब्लॅव्हॅटस्की लॉजमध्यें झालेला. सुमारें सतरा अठरा संस्थांनीं यांत भाग घेतला होता. सर्व व्यवस्था स्वस्तिक लीगनें ठेवली होती. अध्यक्षस्थानीं सर चुनीलाल मेहता, मुंबई सरकारचें माजी फडणीस मंत्रि, यांची निवडणूक करण्यांत आली होती. या सभेंत झालेल्या भाषणांतलेहि कांहीं उतारे द्यावेसे वाटतात.

सर चुनीलाल मेहता—"माझा तात्यासाहेब केळकरांशीं निकट परिचय आलेला नाहीं; परंतु ज्या गृहस्थानें आज कमींत कमी ३६ वर्षें तरी स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रसेवा केली त्याच्या वाढदिवससमारंभांत भाग घेणें हें माझें कर्तव्य आहे असें वाटल्यावरून मी येथें आलों आहे. मी तात्यासाहेबांचे 'प्लेझर्स अँड प्रिव्हिलेजिस् ऑफ दि पेन' हें पुस्तक वाचलें आहे. त्यांत तात्यासाहेबांनीं उगीच कल्पनेच्या भराऱ्या मारलेल्या नाहींत. त्यांची दृष्टि विधायक असून त्यांनीं स्वार्थत्यागाची वृत्ति व निष्कलंक चारित्र्य या गुणांवर जोर दिलेला आहे. हे दोनहि गुण त्यांच्या अंगीं वसत आहेत हें विशेष आहे. महाराष्ट्रांतीलच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेरील लोकांचेंहि केळकरांवर प्रेम आहे. त्यांचें कार्य निरनिराळ्या क्षेत्रांत झालेलें आहे. हिंदु समाजांत व राजकीय क्षेत्रांत त्यांची कामगिरी झालेली आहे. असेंब्लीमध्यें त्यांनीं सहा वर्षें काम केलें व त्यांच्या टीकेच्या भडिमाराला तोंड देणें फडणीसांना कठिणच होऊन बसलें असेल. त्यांची निर्भयता, देशभक्ति, विचारशक्ति व बुद्धि या गुणांचा व त्यांच्या अमोल अनुभवाचा देशाला उपयोग होणार आहे."

नंतर 'इंडियन सोशल रिफॉर्मर' चे संपादक श्री. के. नटराजन् यांनीं माझ्या अभिनंदनाचा ठराव मांडला. या ठरावावर बोलतांना ते इंग्रजींत म्हणाले, "पुण्यामध्यें सध्यापेक्षां पूर्वी तीव्र मतभेद होते. परंतु केळकरांचा स्वभावच असा आहे कीं ते कोणालाहि तोडीत नाहींत. नामदार गोखल्यांनीं माझ्याजवळ असे उद्गार काढले होते कीं केळकर हे पुण्यांतील दोन राजकीय-पक्षांमधील दुवा आहेत. केळकरांसारख्या राष्ट्रीय दृष्टीच्या पुढाऱ्याला दीर्घायुष्य लाभावें व हिंदुसमाजाची व राष्ट्राची त्यांच्या हातून भरीव सेवा व्हावी असें मी इच्छितों."

मि. बी. जी. हॉर्निमन—"या प्रसंगीं भाषण करणें हा मी माझा हक्क समजतों. इतकेंच नव्हे तर केळकरांचा समव्यवसायी वृत्तपत्रकर्ता व त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढणारा राजकारणी संवगडी या नात्यानें हें माझें कर्तव्यच आहे. वृत्तपत्रकार या नात्यानें केळकरांची योग्यता दांडगी आहे. हिंदुस्थानांतील सर्वांत पहिल्या दर्जाच्या आजच्या वृत्तपत्रकारांत त्यांची गणना केली पाहिजे. कदाचित् ते पहिल्या प्रतीच्या विद्यमान वृत्तपत्रकारांत पहिले आहेत असेंहि म्हणावें लागेल. दोन भाषांतील वृत्तपत्रें एकाच वेळीं चालविणें व तींहि उत्कृष्ट रीतीनें चालवून वाचकांवर आपली छाप पाडणें ही गोष्ट सोपी नाहीं. संपादकाचा धंदा हा वास्तविक फार धोक्याचा. त्याला शाश्वती मुळींच नाहीं. स्वास्थ्याचं नांव नको. म्हातारपण मुळीं नसतेंच. मी केळकरांच्यापेक्षां फार तर दोन वर्षांनीं लहान असेन. संपादक या नात्यानें आम्ही म्हातारे होऊं शकत नाहींत. लो. टिळक व श्रीयुत केळकर यांजसारखें मोठे लोक हिंदु समाजांत निपजतात हें हिंदुस्थानचें भाग्य होय."

श्री मावजी गोविंदजी—"मी गुजराथ, काठेवाड व कच्छ यांच्या वतीनें केळकरांचें अभिनंदन करतों. हिंदूंचा बचाव करणारा, भूतकाळाकडे भक्तीनें पाहणारा, भविष्यकाळाकडे आशेनें नजर देऊन राहणारा, असा महाराष्ट्रांतला माणूस असतो. आणि केळकर तसेच आहेत."

बॅ. मुकुंदराव जयकर—"श्री. केळकर हे गेलीं छत्तीस वर्षें राजकारणांत आहेत. आज एकसष्ट्या वर्षीहि त्यांच्यावर देशांत अनुकूल प्रतिकूल टीका केली जाते हेंच त्यांच्या मोठेपणाचें एक मोठें लक्षण आहे.

अलबत्या-गलबत्या मनुष्य प्रिय अगर अप्रिय होऊं शकत नाहीं. आज मुंबई शहरांतील सतरा-अठरा संस्था हा समारंभ करण्यास एकवटल्या आहेत, यावरून त्यांच्याबद्दल जनतेला आपलेपणा किती वाटतो हे स्पष्ट होत आहे. केळकरांची कामगिरी बहुविध आहे. ते म्हणजे मानवी बुद्धीचा एक सर्वसंग्रहच होत. साहित्याच्या विविध शाखांत त्यांनी संचार केलेला आहे. वृत्तपत्रकार या नात्यानें तर त्यांचें स्थान फारच श्रेष्ठ आहे. आज असें महाराष्ट्रांतील गांव नाहीं कीं, जेथें केसरी जात नाहीं. केळकरांच्या लेखणीनें लोकांना चटका लावला आहे. राजकीय विषयांवरील लेखांबद्दल विचारावयासच नको. ते राजकीय लेखनाचे व्यासमुनि आहेत. ता. १ ऑगस्ट १९३१ च्या केसरींतील सहासात कॉलमी लेख तर राजकीय विषयांवरील उत्कृष्ट लेखांचा नमुना आहे. तो लेख मी पुनः पुनः चारदा वाचला. केळकरांच्या लेखांतील विवेचनपद्धति तर्कशुद्ध व उच्च प्रतीची आहे. केळकरांनीं हिंदुमहासभेची मोठी सेवा केली आहे. कित्येक हिंदु पुढाऱ्यांना हिंदु म्हणवून घेण्यांत कमीपणा वाटतो तसा तो मला अगर केळकरांना वाटत नाहीं. आम्हांला ज्ञातिनिष्ठ म्हणतात. जो हिंदु असून स्वतःला हिंदु म्हणवतो तो ज्ञातिनिष्ठ अशी विपरीत व्याख्या सध्या रूढ झाली आहे. मुसलमानांनीं सवता सुभा स्थापला व कांहीं मागण्या केल्या तरी ते मात्र ज्ञातिनिष्ठ ठरत नाहींत. आम्ही मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्यांना विरोध करतों. असें असतां आम्हांलाच ज्ञातिनिष्ठ म्हणतात. वास्तविक जे ब्रिटिशांच्या मैत्रीमुळें आपला अधिक फायदा होईल असे मानतात तेच खरे ज्ञातिनिष्ठ होत. तुम्ही तेलाचा दिवा घ्या नाहींतर विजेचा दिवा घेऊन शोधा, तुम्हांला केळकरांच्या एका शब्दांतहि असली हिणकस ज्ञातिनिष्ठा सांपडणार नाहीं. केळकरांची राष्ट्रीय वृत्ति खणखर्णात आहे. आम्ही असेंब्लींत असतांना देशाला विघातक असे कायदे ज्या ज्या वेळीं विचारार्थ पुढें आले अगर पास झाले त्या वेळीं रात्रींच्या रात्रीं केळकरांनीं झोपेविना काढल्याचें मला माहीत आहे !"

सिंधचे काँग्रेस पुढारी डॉ. चोइथराम गिडवानी—"टिळकांचे सहकारी या नात्यानें केळकरांनी केलेली कामगिरी संस्मरणीय आहे. आम्हा परप्रांतीयांना केळकरांचें नांव आठवलें कीं टिळकांची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते."

डॉ. सावरकर—"टीकाकारांनीं वायफळ टीका न करतां टिळकांनीं त्यांच्यावर सोपविलेलें कोणतें कार्य केळकरांनी केलें नाहीं हें दाखवावें."

प्रो. पां. वा. काणे—"मी केसरीचा सतत चाळीस वर्षे वाचक आहे. केसरीच्या वाचकांतर्फे मला श्री. केळकरांना असें सांगावयाचें आहे कीं, त्यांनीं केलेली केसरीची सेवा महाराष्ट्राजवळ रुजू आहे. मग 'का पुरुष' कांहींहि म्हणोत."

श्री. पी. बाळु—"".....श्री. केळकरांनीं केसरीपत्रातून अस्पृशोद्धाराच्या चळवळीला उचलून धरलें आहे, व वेळोवेळीं सक्रिय सहानुभूतिहि दाखविली आहे. श्री. केळकर हे राजकीय क्षेत्रांतील खेळाडू आहेत. खेळाडूला जे गुण लागतात ते गुण त्यांच्या अंगीं आहेत. मनुष्याची सेवा हाच खरा धर्म होय; व ही सेवा केळकरांनीं अविरत चालविली आहे."

स्त्रियांच्यातर्फे सौ. सरस्वतीबाई कावनईकर यांनीं भाषण केलें.

असो.असा बहुधा मोठा गांव नव्हता कीं जेथें माझ्या वाढदिवसानिमित्त जाहीर सभा झाली नाही. आणि असें एकहि मराठी वर्तमानपत्र किंवा मासिक नव्हतें कीं ज्यानें आपला विशेषांक मजकरितां काढला नाहीं किंवा माझें चित्र व चरित्र दिलें नाहीं, किंवा मजवर अभिनंदनपर लेख, लहान मोठा लिहिला नाहीं. (फार काय 'विविधवृत्त' पत्रानेंहि माझ्या अभिनंदनपर गुणग्राहक असा दहा वीस ओळींचा लेख लिहून आपली जागा खर्ची घातली व तो अंक माझ्या निंदेशिवाय दवडला! आणि अच्युतराव कोल्हटकर जिवंत असते तर त्यांनीं आपल्या बहुरूपी वर्तमानपत्रांपैकीं एखाद्यांत मजविषयीं एखादा मोठा लेख स्तुतिपर असा लिहिला असता.)

असा एकहि महाराष्ट्रीय पुढारी उरला नाहीं कीं, ज्याची मुलाखत घेऊन, किंवा ज्याकडे लहान मोठा लेख मागून, एखाद्या वर्तमानपत्रानें त्या गृहस्थाला माझ्या विषयींचें मत प्रगट करण्याची उपकारक संधि दिली नाहीं किंवा भाग पाडलें नाहीं.

असो. येथवर समारंभांची हकीकत देऊन झाली. आतां विवेचनपर असें कांहीं थोडे लिहून हें वाढदिवस प्रकरण संपवितों. लोकांनीं केलेल्या माझ्या अभिनंदनाचें प्रकार व मजविषयीं त्यांनीं काढलेले स्तुतिपर उद्गार हे वरती मुक्तहस्तानें माझे मीच उधृत करीत होतों तेव्हां माझी चित्तवृत्ति द्विधा झाली होती. एक मन सांगें, "याला आत्मस्तुतीचें स्वरूप येतें. दुसऱ्याचें निमित्त घेऊन केली किंवा त्याच्या

शब्दांनीं केली तरी ती आत्मस्तुतीच नव्हे काय?" दुसरें मन सांगे "हा प्रसंगच असा होता कीं त्याचें वर्णन वगळणें म्हणजे फाजील विनयानें आत्मचरित्रांत व्यंग ठेवणें होय. लोकांनीं जें तुझ्यासंबंधीं केलें, तुझ्यासंबंधीं ते जें बोलले, तें खोटें होतें काय? तें त्यांना तूं किंवा इतर कोणी बळेंच चिकटविलें होतें काय? नाहीं. त्यांनीं तसें करण्याला, त्यांनीं तें तसें बोलण्याला, त्यांना कोणी भाग पाडलें होतें काय? त्यांच्यावर कोणी बळजोरी म्हणजे भिडेची जबरदस्ती केली होती काय? नाहीं. जें केलें तें त्यांच्या मनांत करावयाचें नसतें, जें बोलले तें बोलावयाचें नसतें तर तें त्यांना टाळतां आलें असतें कीं नाहीं? त्यांच्या बोलण्याकरण्यांतला नैमित्तिक औपचारिकपणा—जो कोणत्याहि सत्कारांत थोडाबहुत असतोच—तो वजा घातला असतां बाकी त्यांनीं केलें, ते बोलले, ते खऱ्या मनाचें नव्हतें काय? होतें. ज्यांना तुझा द्वेष वाटत होता ते—उदाहरणार्थ कांहीं काँग्रेसवाले व कांहीं बिन काँग्रेसवालेहि—या सत्कार समारंभातून अलग राहिलेच कीं नाहीं? होय. अनेक! पण पुष्कळांना जसा तूं अप्रिय आहेस तसा पुष्कळांना तूं प्रिय आहेस कीं नाहीं? होय. मी नाहीं म्हणेन तर कृतघ्न ठरेन. तुझी निंदा द्वेषबुद्धीनें करणारे आपली हौस रोज फेडून घेत आहेत कीं नाहीं? होय. तो अनुभव रोजचा आहे. तुझ्याविषयीं आदरबुद्धि प्रगट करू इच्छिणारांना तसा प्रसंग रोज असतो काय? नाहीं. मग त्यांनीं आपलें मन प्रगट करण्याचा हा जो जन्मांत एकदां येणारा प्रसंग साधला तो तूं विनयबुद्धीच्या वजनानें दडपून टाकणार काय? नाहीं. तें बरोबर नाहीं. शिवाय तूं वैयक्तिक रीत्या आत्मसमर्थन कसें करणार? अनायासें लोकांकडून होतें त्यांत आत्मस्तुति कसली? वरील प्रश्नोत्तरांत या एकंदर प्रकरणावरून निघणाऱ्या शंकांना उत्तर आहे. वाट सोडून मुद्दाम आड वळण घेऊन केलेली आत्मस्तुति वेगळी, आणि प्रसंगोपात्त घडलेली व निंदापरिहारार्थ आत्मसमर्थनार्थ उपयोगांत आणलेली परकृत स्तुति वेगळी. हा फरक कोणीहि करील. माझी निंदा करणें ही एक मध्यंतरीं फॅशनच होऊन राहिली होती. इतकी कीं एका पत्रांत एका प्रश्नोत्तरमालिकेंतील 'केळकर काय खातात?' या प्रश्नाला 'शिव्या खातात' असें उत्तर दिलें होतें! याचा अर्थ माझी होत असलेली निंदा मलाच बेसुमार वाटत होती असें नव्हे तर इतरांनाहि तसेंच वाटत असावें. मग प्रश्न असा सुचे कीं 'एकजात लोकांनीं निंदाच करावी इतका वाईट मी आहे कीं काय? मजमध्यें लोकांनीं घ्यावा असा कोणताच गुण नाहीं कीं काय'? पण याचें उत्तर—

आणि तेंहि घसघशीत असें उत्तर—अनपेक्षितपणें या वाढदिवसाच्या निमित्तानें साक्षीदाररूपी अनेक प्रतिष्ठित लोकांकडून परस्पर मिळालें.

१९३२च्या सुमारास असा काळच आला कीं माझ्या शत्रूंना वाटणारे माझे अवगुण आणि माझ्या मित्रांना वाटणारे माझे गुण यांची रास किंवा शीग पुरी भरली. माझ्या काँग्रेस विरोधाची जशी परिसीमा झाली तशीच केसरी विषयक माझ्या कर्तृत्वाचीहि परिसीमा झाली. १९२० पासून बारावर्षे सांचत असलेल्या या परस्पर विरोधी शक्तींची टक्कर केव्हां तरी व्हावयासच पाहिजे होती. आणि परिणामकारक नाट्यप्रसंगाला उचित म्हणून एखाद्या चतुर नाटककारानें प्रसंग निवडून काढावा त्याप्रमाणें, कायदेभंगाच्या दुसऱ्या प्रचंड मोहिमेचा मध्यकाळ आणि माझा एकसष्टावा वाढदिवस यांची अवचित गांठ पडून एक प्रकारचा स्फोट झाला! म्हणून पुण्यांतील माझ्या कांहीं मित्रांनीं आत्मविश्वासानें माझ्या निंदकांचें आणि टीकाकारांचें आव्हान स्वीकारून, माझा वाढदिवस समारंभ करण्याचा निश्चय करून, एक प्रकारें घोषणाच केली कीं "चला आतां प्रसंग ठीक आहे. याला उद्देशून, याचा फायदा घेऊन, केळकरांच्या सर्व गुणग्राहक शक्ती आम्ही एकवटतों, आणि त्यांच्या सर्व निंदाव्यंजक शक्ती तुम्ही एकवटा. आणि पाहूं या कोणाचा आवाज अधिक उंच किंवा अधिक दूरवर ऐकावयाला जातो तो." आणि प्रत्यहीं माझें समर्थन करण्याच्या, मजकरितां प्रतिपक्षाला उत्तरें देण्याच्या, भानगडींत न पडणाऱ्या माझ्या स्नेह्यांनीं या एकाच प्रसंगानें सर्व वचपा काढून घेतला.

---

## ( ६ ) विलायतेच्या दोन सफरी

१९३२ च्या आक्टोबर महिन्यांत मी मद्रासला गेलों. माझे फारा दिवसांचे मित्र व हिंदुपत्राचे संपादक ए. रंगस्वामी अय्यंगार यांनीं त्यांच्या 'स्वदेशमित्रन्' नामक तामीळ पत्राच्या ज्युबिलीकरितां अध्यक्ष म्हणून मुद्दाम मला निमंत्रण केलें होतें. त्याप्रमाणें मी गेलों. माझी उतरण्याची सोय कॉसमॉपॉलिटन क्लबांत केली होती. ज्युबिली समारंभ मोठ्या थाटानें झाला. माझ्या भाषणांत मी जी. सुब्रह्मण्य अय्यर यांचें स्मरण कृतज्ञतापूर्वक केलें. जवळ जवळ एकाच वेळीं मराठी व तामीळ वृत्तपत्रांचा जन्म कसा झाला, तसेंच निरनिराळ्या प्रांतांत एकाच वेळीं राष्ट्रीय भावनेचा उदय कसा झाला, राष्ट्रकार्याच्या दृष्टीनें इंग्रजीपेक्षां देशी भाषांना

महत्व सहजच कसें येतें, इत्यादि चर्चा केली ती सर्वांना फार आवडली. मद्रासच्या मुक्कामांत ठिकठिकाणीं पानसुपाऱ्या, मेजवान्या, गायनाचे जलसे इत्यादि सत्काराचे प्रकार माझ्याकरितां अनेक झाले. बहुतेक सर्व मद्रासी पुढाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या गांठीभेटी झाल्या. आणि मी परत येतांना गाडींत बसवून देतांना रंगस्वामी मला म्हणाले "Kelkar, you have come and conquered" 'केळकर तुम्ही आला आणि आम्हाला जिंकले.' मी म्हणालों, 'मित्रप्रेमानें कोणी स्वतःला जिंकून घेण्याला तयारच झाल्यावर त्याला जिंकणें काय कठिण !' या मुक्कामांत मद्रासेंतील महाराष्ट्रीय समाजाच्या संमेलनाला मी हजर राहून भाषण केलें. त्यांनीं दसऱ्याचा म्हणजे सोनें लुटण्याचा समारंभ एका बागेंत केला होता. तात्पर्य, मद्रासेंतील चार दिवस मोठ्या आनंदांत गेले. पूर्वी राष्ट्रीय सभेकरितां मी मद्रासला जात असें पण असा मोकळेपणा कधी मिळाला नव्हता. मद्रास सोडण्यापूर्वी अड्यारलाहि जाऊन आलों. या वेळीं बेझंटबाई जवळ जवळ निर्वाणपदावर होत्या.

मद्रासेहून परत येतांना मी हैद्राबादेला मुद्दाम गेलों. हेतु असा होता कीं निजामच्या राज्यांत केसरीला बंदी होती ती निघते कां पहावें. हैद्राबादेस वामनराव नाईकांच्याकडे माझा मुक्काम होता. जातांच मी एक अर्ज लिहून तीनहि मुख्य कौंसिलर लोकांच्या गांठी घेतल्या. त्यांत फडणीशी खात्याचे मुख्य मि. ट्रेंच हे अघळपघळ बोलले पण सर्व कारभार—राजकीय स्वरूपाचा—सर अकबर हैदरी यांजकडे आहे असे म्हणाले. होम मेंबर विशेष कांहीं आश्वासनपर बोलले नाहींत. त्यांनीं माझी स्तुति व सत्कार करून वाटेला लावले. प्रधान मंत्री सर अकबर हैदरी यांनीं मुख्य विषयाला त्रोटक उत्तर दिलें, आणि उस्मानिया युनिव्हर्सिटीकरितां आपण काय काय परिश्रम केले याचा कंटाळवाणा पाढा वाचला. "ऊर्दू हें माध्यम स्वीकारून आपण या विद्यापीठांतून इंग्रजीची जवळ जवळ हकालपट्टी केली, इंग्रजी व युरोपियन भाषेंतील ग्रंथांचीं भाषांतरें ऊर्दूत करण्यासाठीं लाखो रुपये खर्चले" वगैरे सांगितलें. तेव्हां "ऊर्दू ही मुसलमानांची मायभाषा असें म्हणतां येईल, पण ती महाराष्ट्रीय आंध्र कर्नाटक या लोकांची कशी म्हणतां" असें मी सर अकबर यांना विचारलें. तेव्हां ते थोडेसे गोंधळले पण म्हणाले "वः, ऊर्दू ही हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली भाषा म्हणून सर्व हिंदुस्थानची मातृभाषा ठरतेच !" तेव्हां मी या विधानाला हरकत घेतली. त्यामुळें सर अकबर यांच्या उस्मानिया विद्यापीठाच्या स्तुतिस्तोत्राचा ओघ थांबला आणि मग त्यांनीं दुसरा विषय काढला. उस्मानिया

कॉलेजांत मी अर्थशास्त्र व राजकारण यांचा संबंध या विषयावर व्याख्यान दिल्यावर मला चहापार्टी झाली. तींतहि ऊर्दूचा प्रश्न असाच निघाला.

ज्युबिल्यांच्या या वर्षांत ( १९३२ ) माझ्या संबंधांत घडलेली आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मला गोलमेज परिषदेचें आमंत्रण आलें व तें स्वीकारून मी विलायतेस गेलों ही होय. यापूर्वी १९१९ सालीं मी विलायतेची पहिली फेरी केली होती. पण 'अधिकार योगाचा उत्तरार्ध' या प्रकरणांत, ( पृष्ठ ४३५-४३७ ) त्या प्रकरणविषयाचा ओघ खंडित न व्हावा म्हणून, मी त्या माझ्या फेरीचा निजव्यक्तिविषयक वृत्तांत अगदीं ओझरता उल्लेखून पुढें गेलों. परंतु आतां विलायतेच्या या १९३२ च्या फेरीचें इतिवृत्त देण्यापूर्वी १९१९ च्या त्या फेरीचाहि सविस्तर वृत्तांत देणें योग्य व सोईचें होईल. म्हणून तो आधीं देऊन नंतर १९३२ च्या गोलमेज परिषदेच्या सफरीचा वृत्तांत देण्याचें योजिलें आहे. तेरा वर्षांच्या अंतरानें माझ्या विलायतच्या या दोन फेऱ्या झाल्या असल्या तरी वस्तुतः दोहोंचा हेतु आणि कार्य हीं एकाच स्वरूपाचीं म्हणजे राजकारण विषयक होतीं. यामुळें हे दोन वृत्तांत सुसूत्र किंवा सांधजोडीचे असेच वाचकाला वाटतील.

**विलायतेची पहिली सफर**—सन १९१८ च्या डिसेंबरांत दिल्ली येथें राष्ट्रीय सभा भरली. या सभेला टिळक हजर नव्हते. ते आधींच विलायतेला निघून गेले होते. त्यासालीं राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवडणूक झाली होती. परंतु चिरोल केस लंडन कोर्टाच्या बोर्डावर लागली व आगबोटींतील पॅसेजहि मोठ्या कष्टानें पण मिळाला. म्हणून ही निवडणूक होणार असे माहीत असतांहि ते तिच्या आधींच निघून गेले. त्यांची निवडणूक झाल्याची तार त्यांना विलायतेच्या मार्गावर पोहोंचली. अर्थात् 'मी आभारी आहे, पण येऊं शकत नाहीं' याहून अधिक जबाब त्यांना देतां येणें शक्य नव्हतें. अध्यक्ष निवडल्याचा उपयोग इतकाच झाला कीं, चिरोल केसचा निकाल लागल्यावर आणखी कांहीं दिवस तेथें राहून स्वराज्याच्या चळवळीसंबंधानें जी खटपट करण्याचे टिळकांनीं योजिलें होतें तींत राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्यानें त्यांना एरवींहून थोडे अधिक महत्व सहजच प्राप्त होणारे होतें. स्वराज्यसंघाचे अध्यक्ष ते होतेच. पण राष्ट्रीय सभेइतकीहि स्वराज्यसंघाला सरकाराकडून अद्यापि सर्वमान्यता नव्हती. किंबहुना राष्ट्रीय

सभेपेक्षां पुढें जाणारी जहाल राजकीय संस्था असे सरकारकडून व विलायतेंतील लोकांकडून त्याला मानण्यांत येत होते.

येथें जातां जातां एक गोष्ट सांगावीशी वाटते ती सहज सांगतों. विलायतेस जाणें ही एक अपूर्व व इष्ट गोष्ट खरीच. पण मी होऊन टिळकांकडे विलायतेस जाण्याचें आमंत्रण लावलें नाहीं. आधींच मला प्रवासाचा कंटाळा. आणि दुसऱ्याच्या खर्चानें प्रवास व सफर हें एक त्यांतल्या त्यांत संकोचाचें कारण. न जाणो माझ्या खर्चात माझ्या ऐवजीं दुसरा कोणी अधिक उपयोगी किंवा अधिक आवडता म्हणून टिळकांना न्यावयाचा असल्यास त्यांना, मला नाराज केल्याची, माझी निराशा केल्याची, अडचण वाटूं नये म्हणून इकडून जाणाऱ्या पत्रांत मधून मधून मी टिळकांना मुद्दाम सुचवीत असें की, इकडे मीच करावें असें काम मला पुष्कळ आहे, तरी वाटल्यास दुसरा एखादा मदतनीस बोलवा. पण टिळकांना मलाच विलायतेस नेणें आवश्यक वाटत होतें, हें या खालीं दिलेल्या तीन पत्रांवरून दिसून येईल.

( ता. ६ मार्च १९१९ ) शिष्टमंडळ इकडे आल्यानें माँटेग्युच्या योजनेंत सुधारणा होण्याचा संभव आहे. सोबत टाईम्सचा अंक पाठविला आहे तो पाहा म्हणजे कळेल. याविषयीं नेमस्त लोकांना भीति वाटते ती खरी नाहीं. शिष्टमंडळ येणार तें वजनदार असावें. टाईम्समधील लेख वाचून बेझंटबाई तुमच्या बाजूला येऊन मिळतील असे वाटते. शिष्टमंडळें चारपांच असावीं. उदाहरणार्थ ( १ ) सर रवीन्द्रनाथ टागोर व महमुदाबादचे राजेसाहेब—अगदीं वरिष्ठ वर्गांत यांचा उपयोग होईल. ( २ ) दास व बॅप्टिस्टा यांना पार्लमेंटरी कमिटीपुढें साक्षी देण्याला घालूं व सुधारणाच्या बिलांत उपसूचना मांडण्याला हे उपयोगी पडतील. ( ३ ) स्वतः तुम्ही व इतर कांहीं लोक—हे आले म्हणजे आमचे सेक्रेटेरियट बनेल ( ४ ) बेझंटबाई—त्यांचा मजूरपक्षाकडे व स्त्रीवर्गांत उपयोग होईल ( ५ ) खापर्डे मदनमोहन म्हणजे कायदेकौन्सिलचे सभासद—हे सरकारी अधिकाऱ्यांशीं बोलण्याचालण्याला उपयोगी पडतील. याप्रमाणें माझी योजना आहे. तुम्ही आलेच पाहिजे. करंदीकर परत येईन असे सांगून गेले आहेत. शिष्टमंडळांत तेहि असावेत. बर्न कमिटीचे ठराव सोबत पाठविले आहेत. हेरल्डमध्यें माझ्या भाषणाचा सारांश आला आहे तो पाहा. ( बा. गं. टिळक, लंडन. )

( ता. १३ मार्च १९१९ ) या सोबत आठवड्याचा अहवाल पाठविला आहे. त्यांतील काय छापावें काय छापूं नये हे वाचून नीट ठरवा. चिरोलकेस-मध्य अपील करावें कीं नाहीं यासंबंधीं विचार बाबांच्या पत्रांत लिहिले आहेत. दादासाहेब करंदीकर आज मनोरा बोटीनें तिकडे परत निघाले. ते व बॅप्टिस्टा यांच्याकडून तुम्हाला इकडची प्रत्यक्ष माहिती मिळेल. शिष्टमंडळाबरोबर तुम्ही आतां होईल तितकें करून लवकर या. मला मदत करण्याला येथें आतां कोणी नाहीं. ( बा. गं. टिळक, लंडन )

( ता. २७ मार्च १९१९ ) बॅप्टिस्टा यांनीं भेटून आपली मंडळी व बेझंटबाई यांच्यांतील मतभेद दूर केला असेलच. आपलें होमरूल लीगचें शिष्ट-मंडळ लहानच पण वजनदार आणि एका जीवाभावाचे असले पाहिजे. जमले तर तुम्ही व बॅप्टिस्टा दोघेंहि मिळूनच या. येथें तुम्हा दोघांची फार गरज आहे. ( बा. गं. टिळक, लंडन. )

टिळकांच्या अभावीं त्यांच्या पक्षातर्फे राष्ट्रीय सभेंत करण्याचें काम मजकडे आलें. माझें हें प्रतिनिधित्व ओळखून मला दोन जागा देण्यांत आल्या. (१) राष्ट्रीय सभेचा जॉइंट-सेक्रेटरी व ( २ ) विलायतेस काँग्रेसतर्फे जाणाऱ्या शिष्टमंडळाचा चिटणीस. हीं दोन्हीं कामें मला एकाच वेळीं झेपणारीं नव्हतीं. आणि मी विलाय-तेला जाण्याचे बहुधा निश्चित असल्यानें काँग्रेस सेक्रेटरीची जागा दुसऱ्या कोणास मिळावयाची ती विनाकारण अडवून बसणें असा अर्थ होता. म्हणून मी काँग्रेस सेक्रेटरीची जागा नाकारली, व विलायत शिष्टमंडळाचा चिटणीस ही जागा स्वीकारली. तेथपासून पुढें सर्व हिंदुस्थानभर निरनिराळ्या प्रमुख लोकांशीं मी पत्रव्यवहार करूं लागलों; व राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळावर कोण जाऊं इच्छितो, व कोणी जाणार झाला तर तो केव्हां निघूं शकेल याची माहिती काढूं लागलों.

सुमारें तीन महिने हें काम चालूं होतें. पण हवे तितके लोक नेमके हवे तेव्हां निघण्याला तयार नाहींत असें दिसून आलें. लोक असे पाहिजे होते कीं, विलायतेहून वर्दी येतांच एका आठवड्यांत निघून मुंबईस बोटीवर पाय ठेवितील. पण जो तो म्हणे " मी येण्याला कबूल आहे. पण केव्हां निघावयाचे याचा निश्चय मी आज करूं शकत नाहीं. " आणि त्यांचा असा निश्चय कळणें तर

अत्यवश्य होतें. कारण नक्की नांवें दिल्याशिवाय आगबोट कंपनी बोटीवर जागा ठराविक तारखेला राखून ठेऊं शकत नव्हती. शिवाय युद्ध नुकतेच संपलें तरी पक्का तह अजून व्हावयाचा होता. यामुळें विलायती आगबोट कंपन्यांचें चालकत्व जवळ जवळ हिंदुस्थान सरकारच्या होममेंबरच्या हातीं गेल्यासारखें होतें. त्यानें कृपा केली, शिफारस केली, तर मेल बोटीवर जागा मिळावयाची. पण काँग्रेस ही तेव्हांहि सरकाराला आजच्या सारखीच मनांतून नावडती होती. यामुळें नेमस्त व इतर पक्षांतील लोकांना आगबोटीवर जागा जशा हटकून मिळत तशा राष्ट्रीय सभेच्या लोकांना मिळत नसत. होमसेक्रेटरीला लिहिलें किंवा जाऊन भेटलें तर तो म्हणे कीं, 'तुमच्या शिष्टमंडळांतील लोकांचीं नांवें द्या, म्हणजे मग पाहूं.' आणि वर सांगितल्याप्रमाणें इकडे तर ज्याला विचारावें तो अर्धवट उत्तर देई व नक्की तारीख कळवीना. अशा गोंधळांत कांहीं दिवस गेले. तेव्हां पंडित मदत मोहन मालवीय व मी दोघे मिळून दिल्लीस जाऊन होमसेक्रेटरीला भेटलों. यामुळें पासपोर्ट व पॅसेज यांची कांहीं सोय लागली. तथापि एप्रिल १९१९ अखेर वाटेल तेव्हां आगबोटीवर पाय ठेवण्याला विठ्ठलभाई पटेल व मी असे दोघेच तयार झालों. आणि विलायतेहून टिळकांकडून निकडीचीं बोलावणीं येऊं लागलीं तेव्हां आम्ही दोघांनीं एप्रिल अखेर निघण्याचें ठरावीलें.

त्याप्रमाणें ता. २९ एप्रिल रोजीं मनोरा नामक बोटीवर आम्ही दोघें चढलों. कर्मधर्मसंयोगानें श्रीनिवासशास्त्री व पं. हृदयनाथ कुंझरू हेहि त्याच बोटीनें जात होते व आम्हा चौघांना मिळून एकच खोली देण्यांत आली होती. मला प्रवास हा मनांतून फार वावडा असतो. आणि ही तर खुद्द विलायतच्या सफरीची तयारी. तेव्हां त्याची मला किती जिकीर मनांतून वाटली असेल याची कल्पनाच करावी. पण पूर्वी कोलंबोकडून जाणार होतों तेव्हां जी तयारी केली होती तिच्यातली बरीचशी यावेळीं उपयोगी पडली.

'विलायतेच्या यात्रेची तयारी' या नांवाची एक ओवीबद्ध १४५ ओव्यांची विनोदी कविता पुढें विलायतेहून परत येतांना, रिकामपणाची कामगिरी म्हणून, ता. ७ ते ता. १० नोव्हेंबर १९१९ या चार दिवसांत मी लिहिली, ती १९२२ च्या द्वितीय कविसम्मेलनांत वाचून दाखविली; आणि ती परिशिष्टरूपानें माझ्या विलायतच्या बातमीपत्रांच्या पुस्तकांत छापली आहे. त्या कवितेंत अर्थात्

थोडीशी अतिशयोक्ति आहे. पण तींतील यात्रेची मुख्य भूमिका खरी होती. म्हणूनच ती कविता मला सुचली. आणि सामानहि कदाचित् पूर्वी घेतले त्याचा चौथा हिस्साहि यापुढें कधी मी घेणार नाहीं. पण प्रवासाला निघालें म्हणजे इतरांप्रमाणें आमचें असेंच होतें. उदाहरणार्थ १९०५सालीं आम्ही घरची सर्व मंडळी काशीयात्रेला गेलों तेव्हां इतकें सामान घेतलें कीं, जळगांवांत वाटेंत मुक्काम पडला तेव्हां त्यांतील निम्मे सामान गुड्स् करून पुण्यास परत पाठविल्याचें स्मरतें. आणि पुढें एक प्रत्यय असा आला कीं, विठ्ठलभाई पटेल यांचे सामान बोट निघाल्यावर दहा दिवस पर्यंत कोठें हरवलें किंवा गळाटलें तें सांपडेचना, तेव्हां माझ्यांतील बरेंच सामान त्यांच्या उपयोगी पडलें. याचा सरळ अर्थ हाच कीं, मी तें वाजवीहून जास्ती घेतलें होतें.

मनोरा बोटींत आम्ही फर्स्टक्लासचें तिकीट घेतलें होतें. पण आमच्या वांटणीला बोटच दुसऱ्या दर्जाची आली. तेव्हां तिचा पहिला क्लास कसा काय असेल याची कल्पना करावी. बोटीचें वजन मुळीं चार हजार टन होतें. म्हणजे आज विलायतेस जाणाऱ्या टपालबोटी तिच्या निदान चौपट किंवा पांचपट मोठ्या असतात. खोली अगदीं लहान व तींत चार माणसें आणि चौघांचें सामान. पण दिवस उकाड्याचे यामुळें बराच वेळ उघड्या डेकवरच घालवावा लागे यामुळें खोलींत गर्दी फारशी वाटेनाशी झाली. सुदैवानें खालचीं दोन बाकें मात्र पटेल व मी यांना मिळाली आणि शास्त्री व कुंझरू यांना वरचीं बाकें मिळालीं. ते थट्टेनें म्हणत 'आम्ही नेमस्त पण पहा तुम्हा जहालांच्या डोक्यावर चढलों आहों कीं नाहीं'! त्यावर आम्ही उत्तर देत असूं कीं 'वर खाली हा भेद आम्ही मानीतच नाहीं. फक्त इंग्रजीतील म्हणीप्रमाणें मवाळ जहाल झालों तरी We are in the Same Boat इतकेंच मानतों. पण आमच्या खालच्या जागा घ्या व वरच्या द्या असें म्हणाल तर तेवढें मात्र होणार नाहीं!" आम्हां चौघांपैकीं बोट सर्वांत कमी लागली अशी मला व सर्वांत अधिक लागली अशी कुंझरू यांना. त्यामुळें आम्हा सर्वांपेक्षां त्यांना खोलीचा आश्रय अधिक करावा लागे. मी मूळचा बूटपाटलोणवाला नाहीं. निव्वळ शाकाहारी व टेबलावर कांटया चमच्यानें जेवण्याची संवय नाहीं. शिवाय सर्वांत मोठी गोष्ट ही कीं मी अत्यंत संकोची वृत्तीचा. यांमुळें कांहीं नड आली तर बोटीच्या अधिकाऱ्याला ती सांगणार कसा व दुरुस्त करून घेणार कसा? अशा संशयामुळें मी मनांत चूर असावयाचा. पण तशी नड फारशी आली नाहीं.

आगबोटीवर वास्तवीकपणें सर्व खाजगी माम्ला. आणि प्रवास म्हटला म्हणजे मनुष्य त्यांत अगदीं काटेकोरपद्धतीनें वागत नसतो. पण आधीं साहेब लोकांच्या अंगांत शिस्त मुरलेली. त्यांना दिवसांतून दोनदां हजामत करण्याची, चार वेळ कपडे बदलण्याची, जेवतांखातांहि शिष्टाचार संभाळण्याची संवय झालेली. आणि त्यांतूनहि इंग्रजाच्या हातून चूक झाली तर त्याला हंसणार कोण ? आणि मला तर असें वाटें कीं माझी चूक होईल तेव्हां कोणी उघड हंसणार नाहीं पण मनांतले मनांत मला गांवढळ म्हणून आपापसांत माझी चेष्टा करीत असतील. या भयामुळें बोटीच्या डेकवर हिंडतांना काय किंवा टेबलावर जेवावयास बसतांना काय मी आपला ठराविक एकच पोशाख म्हणजे लांब कोट व पगडी घालून बावळटासारखा कोठेंहि हिंडत व बसत असे ! आणि न जाणों याच गोष्टीची कदाचित् इतर लोक मनांतून चेष्टाहि करीत असतील. पोषाखाप्रमाणेंच मितभाषण हें आपल्या हातचें, म्हणून डेकवर हिंडतांना इतर हिंदी लोकांप्रमाणें मी कोणाच्या ओळखी करीत नसे; किंवा भाषण प्रसंगांत स्वतःला गुंतवून घेत नसे. ईझीचेअर टाकून तटस्थ वृत्तीनें समुद्राकडे पहात बसावें किंवा लायब्ररीच्या खोलींत जाऊन तेथें पुस्तक घेऊन पंख्याखालीं बाकीत बसावें. खरी अडचण जेवणाखाण्याची यावयाची. पण सुदैवानें त्याची व्यवस्था बरी झाली. म्हणजे आम्हां पांचसहा हिंदी गृहस्थांपुरती एका बाजूला मोठ्या टेबलाशेजारींच दोन लहान टेबलें मांडून व्यवस्था करण्यांत आली होती. आम्ही शाकाहारी असें सांगितल्यामुळें तशी सोय झाली. पण आम्हांपैकीं खरे शाकाहारी मी, कुंझरू, व शास्त्री इतकेंच ठरलों. विठ्ठलभाई पटेल पूर्वी दोन वर्षें विलायतेंत राहून बॅरिस्टर होऊन आले होते, तेव्हांच त्यांचा शाकाहार संपला होता. दिवाण व्ही. पी. माधवराव हे मात्र पक्के शाकाहारी असतील अशी समज़त होती. पण पुढें ते हळुहळू वाढपी लोकांना 'सब चीज लाव' असें म्हणून मांसाहारी पदार्थहि मागून घेऊन खाऊं लागले ! मांसाहारी मनुष्य शेजारीं बसून जेवतांना पाहून प्रथम थोडी किळस वाटते. पण टेबलावरील जेवणाखाण्याचें सामान अतिशय स्वच्छ असल्यामुळें, आणि ताज्या मांसाहाराला सहसा घाण येत नाहीं यामुळें, ती अडचण फारशी वाटली नाहीं. आणि मी याच आनंदांत गर्क होतों कीं, मुख्य मोठ्या टेबलावर माझें पान धरून ठेवलें असतें तर डावी किंवा उजवी कोणीकडे तरी बोटीच्या रिवाजाप्रमाणें एखादा साहेब किंवा मडम बसावयाची, व त्यांच्याशीं पोकळ शिष्टाचा-

राच्या गोष्टी, हवापाण्याच्या गोष्टी बोलतांना माझा जीव टेकीला यावयाचा, तो प्रसंग टळला. या मांसभक्षकांच्या मेळ्यांत शाकाहारी माणसाचे हाल होत असतील अशी आपली व लोकांची प्रथम कल्पना असते परंतु अनुभवानें ती खोटी ठरली. केवळ शाकाहारी अन्नपदार्थ मागितले तर कांहीं मिळतातच, परंतु फळें मेवा इ० एरवीचेच पदार्थ इतकें पुष्कळ असलात कीं ते पुरून उरतात. पहाटे अंथरुणांत तोंड धुण्याच्या पाण्याबरोबर चहा फिरून बाहेर टेबलावर बसून घेण्याची चहा कॉफी सुमारें एकतासानें. त्या चहाबरोबर बाटोळे पावाचे तुकडे मिळतात. नऊ वाजतां छोटी हजेरी. तींत हवे तितके दूध घातलेली खीर, एखाद दुसरी भाजी, रोटी, फळें इतके पदार्थ असतात. दुपारीं १ वाजतांचा फराळ व रात्रीं ७॥ वाजतांचें जेवण यांत पदार्थ पुष्कळच असतात. भातहि असतो व एखादें पक्कान्नहि असतें. तात्पर्य शाकाहाऱ्याला देखील अधाशीपणानें अजीर्ण होण्याइतकी व्यवस्था असते. यामुळें घराहून जे खाण्याचे पदार्थ मी डब्यांतून भरून घेतले होते ते लंडनला घरीं जाऊन स्वस्थ झाल्यावर प्रथम उघडले. प्रवासाच्या पहिल्या दोनतीन दिवसांतच माझें सगळें बस्तान नीट बसलें. बोटीवरील पिण्याचं पाणी चांगलें असें व लागेल तेव्हां सोडालिंबू जिंजर वगैरे मिळत. आणि बर्फहि हवा तितका मिळे.

आगबोटीवर युरोपियन लोक सर्व प्रकारचे खेळ खेळून आपला जीव फार रमवितात पण आमच्या हिंदी लोकांपैकीं फार थोड्यांना त्यांच्या करमणुकींत यथायोग्य रीतीनें सामील होता येते. याचें एक कारण त्यांचा समाज स्त्रीपुरुष मिश्रित असाच कोणत्याहि कामांत असतो; आणि आगबोटीवर हिंदी पुरुष पुष्कळ, स्त्रिया फार थोड्या व संकुचित वृत्तीच्या. यामुळें दोन्ही समाज करमणूक करण्याच्या मनोवृत्तींत तुल्यबल नसतात. संभाषणाचा विषय राजकारणाचा असला तर आम्हां हिंदी लोकांतच जहाल व नेमस्त हा भेद जाणवे. मग युरोपियन लोकांशीं या विषयावर आमचें संभाषण कसें व्हावें ! मिळून कितीहि सरामिसळ वागण्याचा आव आणला तरी त्यांचा गट वेगळा आमचा गट वेगळा असेच शेवटीं घडे. ते आमच्याकडे पहात आम्ही त्यांच्याकडे पाहूं. खांद्याला खांदा लावून हिंडतहि होतों; पण भाषणव्यवहार कमी. इतर कांहीं साधन हाताशीं नसलें तर वृद्ध असेहि युरोपियन लगोऱ्या खेळत. आणि त्यांच्या लहान मुली आपल्या आकाराच्या बाहुल्या हातगाडींत घालून त्यांना आजीबाईप्रमाणें उघड्या डेकवर खेळवीत.

ता. १ मे रोजी आम्हां सर्व उतारूंना बोट बुडूं लागली तर जीव कसा बचावावा याची कवाईत शिकविण्यांत आली. कापडी कॉर्कचे भोपळे होतेच पण शिवाय ताबडतोब लहान होडगीं खालीं सोडून त्यांत कसें उतरावें हेहि दाखविण्यांत आलें. ही कवाइत शिकविण्याचें कारण असें कीं अजूनहि समुद्रांत कोठें कोठें तरते सुरुंग फिरत असून आगबोटीना धोका होण्याचा संभव असे. ता. ३ ते ६ मे हे दिवस मोठे कष्टाचे गेले. वारा अगदीं पडला, समुद्र एखाद्या डबक्यासारखा शांत दिसे, पण उष्मा इतका बेसुमार झाला कीं अंगांतून दहा-वीस शेर पाणी गेले असेल. त्यांतून दोन दिवस मला सडकून ताप आला व त्यामुळेंहि घाम इतका फुटला कीं पेटींतील बहुतेक सदरे घामानें भिजवून घ्यावें लागले. व ध्रुवावयास परटाकडे द्यावें लागले. या दोन दिवसांत मी जेवण वर्ज्य केलें आणि दूध व बर्फ येवढ्यावर राहिलों.

जातांना आमच्या बोटीनें एडन बंदर घेतलें नाहीं. तांबड्या समुद्रांतून जातांना किनाऱ्या जवळून कोंकणच्या बोटी जातात तसा देखावा दिसला. मात्र कोंकण किनाऱ्याला झाडी फार आणि अरबस्तान म्हणजे ओसाड अरण्य. ता. ८ मे रोजी जहाजावर एक मुसलमान मुलगा तापानें वारला तेव्हां समुद्रांत प्रेत सोडण्याचा विधी उतारूलोकांसमक्ष यथाविधि करण्यांत आला. सुएझ बंदरांत गेल्याबरोबर सर्वच गोष्टींत फरक पडला. हें बंदर मुंबई बंदरापेक्षां लहान वाटलें. कांही वेळ थांबून आमच्या बोटीनें कालव्यांत प्रवेश केला. त्यांत किनाऱ्यापासून १०।१५ हातांचे अंतरानें बोट जात होती यामुळें खालीं खोलींत बसून पाहिले तर आगबोट जमिनीवरूनच चालली आहे असा भास होई. कारण पाणीच दिसेना. असा अरुंद कालवा ७५ मैल लांब आहे. दुतर्फा तारायंत्राची डबल लाईन व युद्ध नुकतेंच संपलें असल्यामुळें पूर्वी खणलेले खंदक व काटेरी तारांचीं जाळीं एकसारखी दिसत. ता. ११ रोजीं पोर्टसय्यद येथें पोंहोचलों. येथें बंदर समुद्रांतल्या सारखें नसून मोठ्या खाडींतल्यासारखें आहे. सकाळीं आम्ही होडींतून धक्क्यावर गेलों व गांव पाहून परत आलों. गांव गलिच्छ. थाट इंग्रजीपेक्षां फ्रेंच पद्धतीचा. येथील हितसंबंधांची गुंतागुंत अशा शब्दांनीं वर्णन करतां येईल कीं अधीं राज्यसत्ता तुर्की सुलतानाची, गादी खेदीवाची, कारभार इंग्रजांचा, बाजार फ्रेंचांचा, आणि भाषा सर्वांची! रात्रीं भूमध्य समुद्रांत शिरलों. तेव्हां पुस्तकांतून वाचलेले इतिहास आठवून या कीर्तिमान व प्रसिद्ध

समुद्राचा प्रत्यक्ष परिचय घडल्याचा आनंद वाटला. तीन खंडांचीं दारें या समुद्रांत उघडतात. भूमध्य समुद्र लागल्यापासून हवा खूप गार सुटली. सर्व कपडे लोंकरीचे चढवावे लागले. ता. १३।१४ रोजीं वारा कमी झाला व हवा आपल्या हिवाळ्याइतकीच थंड वाटली. तारीख १५ रोजीं माल्टा बेट डावें घालून पुढें गेलो. नंतर माजाला नांवाची फ्रेंच वसाहत आढळली.

ता. १६ रोजीं समुद्रावर बरेंच मोठें वादळ झालें. डेक सगळे भिजून गेले. टेबलावर बसून जेवण्याची सोय राहिली नाहीं. सामानाचीहि आदळ आपट झाली. ता. १७ रोजीं उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील डोंगर दिसूं लागले. ता. १८ रोजीं स्पेनचा किनारा व नेव्हाडा पर्वताची ओळ दिसूं लागली. पर्वत शिखरावर बर्फ पडलें होतें. तें पाहून वांगीभाताच्या ढिगावर बायकांनीं घातलेलें किसलेलें खोबरें अशी उपमा मला सुचली ती इकडे पत्रांत लिहून कळविली. ती माझ्या मित्रांना इतकी आवडली कीं ते मला अजून त्या उपमेची आठवण देतात ! ता. १९ रोजीं पहाटे जिब्राल्टरला पोंहोचलों. चांदण्यांत किल्ल्याची शोभा फार चांगली दिसली. बंदर बॅकबेहून मोठें वाटलें. बंदराचें तोंड मात्र फार लहान. बंदरांत जहाजेंच जहाजें व शेंकडों बोटी माशासारख्या पाण्यावर वावरत होत्या. गाडी करून सर्व शहर पाहून आलों. शहरला भुइकोट किल्ल्याच्या पद्धतीची चौफेर तटबंदी आहे. मुख्य किल्ला दिल्लीच्या किल्ल्यासारखा वाटला. शहर डोंगराच्या लवणावर बसलेलें आहे. घरावर घर असे १०।१५ मजले दिसतात. डोंगराच्या वरचा भाग दौलताबादच्या किल्ल्यासारखा वाटला. झाडी अगदीं तुरळक. उंच जागेवर तोफाचे बुरूज बांधलेले आहेत. त्यांच्या चौफेर माऱ्यांतून जहाज निभावयाचेंच नाहीं. जिब्राल्टर गांवचा एक भाग स्पॅनिश वस्तीचा आहे. तो पाहून काशीच्या बोळांची व घरांची आठवण झाली. फरसबंदीमुळें धूळ नाहीं पण एरवीं अस्वच्छतेचा कहर.

परत बंदरावर आलों तेव्हां कांहीं सिंधी व्यापारी भेटले. हे प्रत्येक मोठ्या बंदरांत दुकानें घालून राहातात. आणि अपूवाईच्या जिनसा विकून लाखो रुपये मिळवितात. या व्यापाऱ्यांनीं आमचें स्वागत करून फराळाला घातले व फुलांचे हार घेऊन ते आम्हांला बोटींत पोंचवावयाला आले. ता. २१ मे रोजीं दिवसभर पोर्तुगालच्या किनाऱ्यानें वाट चालत होतों. अटलांटिक महासागरांत वादळ नसलें तरी बोटी फार हालतात. लाटा इतक्या उंच उडतात कीं, एका कला-

टणींत ४५ अंशावरचे तारे दिसतात तों लागलीच दुसऱ्या कलाटणीस पाण्यांतले मासे दिसतात. ता. २२ रोजीं व्हेल मासे दिसले. हे मासे प्रचंड असून तोंडांत पाणी घेऊन कारंज्यासारखें उंच उडवितात यावरून त्यांचें स्थान कळतें. ता. २३ रोजीं इंग्लिश चॅनलमध्यें आम्ही प्रवेश केला त्याबरोबर घर भेटल्यासारखा इंग्रज उतारूंच्या तोंडावर आनंद चमकूं लागला. पण इंग्लंड हें आमचें घर नसल्यामुळें तुलनेनें आमची आगबोट हेंच आम्हांला घर वाटे. पिंजऱ्यांतल्या उंदराप्रमाणें तीन आठवड्यांत आमची स्थिति झाली. कंटाळा आला म्हणजे खोलींतून डेकवर जावें; तेथें कंटाळा आला म्हणजे डेकवरून खोलींत यावें. प्रवास संपत आला असें पाहून इंग्रज उतारूंनीं डेकवर रंगभूमि थाटली आणि विजेची रोषनाई करून गाण्याचा मोठा जलसा केला !

सर्वांनीं चिनी पोषाख केले होते. एका उतारूनें खलाशाचें सोंग आणलें व हंशा पिकविला. स्वतः गलबताच्या कॅप्टननें जादूचे प्रयोग करून दाखविले. ता. २४ रोजीं धुकें अतिशय दाट पडलें. सावधगिरीचे कर्णे एकसारखे वाजत होते. आगबोट मुंगीच्या पावलानें चालत होती. इतर आगबोटी दिसत नव्हत्या, पण त्यांचेहि कर्णे ऐकूं येत. ता. १५ रोजीं सकाळीं लंडनपासून ५० मैलावर आम्ही कांहीं वेळ नांगर टाकून विश्रांति घेतली. दुपारीं धुकें निवळलें. संध्याकाळीं ५ वाजतां टेम्स नदीच्या आखातांत शिरलों, व ७ वाजतां नदीमुखांत शिरलों. रात्रीं ८॥ वाजतां टिलबरी बंदरांत पोंचल्यावर रात्रभर तेथेंच मुक्काम केला. येथें पासपोर्टची तपासणी झाली व सकाळीं १० वाजतां किनाऱ्यावर उतरून स्पेशल ट्रेनमध्यें बसलों आणि ३ वाजतां सेंट पँकर्स स्टेशनवर उतरून टिळकांच्या बिऱ्हाडीं पोंचलों. रा. नामजोशी व कोलियार हे आम्हांला नेण्याकरितां आले होते. ता. २६ पासून हिंदी स्नेही मंडळी भेटूं लागली व गांवांत हिंडून फिरून पहाण्यास सुरुवात केली.

लंडनला पोंचण्यापूर्वी मॉंटेग्यू साहेबांनीं हिंदुस्थानच्या वार्षिक पत्रकावर भाषण केलें होतें. नंतर चार दिवसांनीं साउथबरो, फीबॅंच वगैरे कमिट्यांचे रिपोर्ट प्रसिद्ध झाले. लौकरच तिकिटें मिळवून पार्लमेंटचें कामकाज पहाववयास गेलों. याहि दिवशीं मॉंटेग्यू साहेबांनी भाषण केलें. पण तें ऐकण्याला १०।२० प्रतिनिधीहि असतील नसतील. तथापि भरलेल्या नाटकगृहापुढें भाषण करणाऱ्या नटाप्रमाणें ते आवेशानें भाषण करीत होते. ता. ४ जून रोजीं टिळकांबरोबर मी केंब्रिज येथें गेलों.

तेथील ८०।९० विद्यार्थ्यांनीं मजलीस बनवली होती. टिळकांचें व्याख्यान झालें. ते म्हणाले 'येथें स्वतंत्रतेच्या हवेंत तुम्ही खूप बोलतां, पण परत हिंदुस्थानांत गेल्यावर स्वार्थत्याग व देशकार्य काय करणार याचा विचार केव्हां करतां कां ?' कांहीं हिंदी विद्यार्थ्यांनीं वेडेपणाचे प्रश्न केले व स्वतःचें हंसें करून घेतलें. एक तरतरीत ब्राह्मण मुलगा म्हणाला कीं, 'मी सिव्हिल सर्व्हिस परीक्षेला बसणार, पासहि होणार; पण नोकरी मात्र करणार नाहीं हें तुम्ही पहाल.' पण तें पहाण्यास टिळक जगलें नाहींत. आणि जगतें तर विपरीत दिसलें असतें ! कारण हा मुलगा परीक्षा पास झाला पण नोकरींतहि शिरला. तो प्रथम असिस्टंट कलेक्टर होऊन १९२२ सालीं अहमदाबादेस गांधींचा खटला सुरूं असतांना आला. हल्लीं इकडील एका जिल्ह्याचा तो कलेक्टर आहे. त्यानें आपलें वचन पाळलें नाहीं, पण नोकरींत राहून तो होईल तितकें लोकांचें बरें करतों हें खचित.

सुधारणा बिलावरील सिलेक्ट कमिटी अजून भरावयाची होती. यामुळें आम्ही इतर उद्योग केले. त्यांतील मुख्य म्हटला म्हणजे लंडन येथील ब्रिटिश काँग्रेस कमिटी जी नेमस्त लोकांच्या हातीं गेली होती ती काँग्रेसच्या तर्फेची बनवावयाची, व तिचें मुखपत्र 'इंडिया' हें काँग्रेसचें पैसे घेऊन काँग्रेसच्या विरुद्ध लिहींत असें तेंहि स्वाधीन करून घ्यावयाचें. काँग्रेस कमिटीशिवाय आम्हांला मदत करणारी दुसरी मंडळी म्हणजे मजूर पक्षाची. तथापि या पक्षांत बेझंट बाईंचें वर्चस्व होतें, व बाई टिळकांना सर्वस्वीं एकरूपतेनें वागवीत नसत. म्हणून या पक्षाकडून मदत कितपत मिळते याची थोडी शंकाच होती. तथापि कर्नल बेन्सवुड वगैरे जे लोक प्रमुख होते त्यांच्या गांठी आम्ही घेण्याला सुरुवात केली. ब्रिटिश इंडिया काँग्रेस कमिटीशीं वाद कसे घालावे लागले, इंडियापत्र स्वाधीन करून घेण्याला किती त्रास पडला, या गोष्टींची माहिती मी टिळक चरित्र खंड तीन यांत सविस्तर दिली आहे म्हणून ती येथें देण्याचें कारण नाहीं. विलायतेंत माझा मुक्काम पडला तरी तो प्रवासखातींच समजून तितक्या पुरतीच माहिती येथें देत आहे.

इंडिया पत्र हस्तगत केल्यावर ब्रिटिश इंडिया काँग्रेस कमिटीनें मला त्या पत्राचा सहसंपादक नेमलें व मी परत येईपर्यंत तें काम करीत होतों. किंबहुना संपादकीय काम हेंच माझें मुख्य काम होऊन बसल्यामुळें माझा बहुतेक सगळा वेळ त्यांतच जाई. ता. ४ जून रोजीं मॉंटेग्यू साहेबांनीं पार्लमेंटच्या

इमारतींत सर्व हिंदी पाहुण्यांना मेजवानी दिली. नेमस्तांपुढें राष्ट्रीय सभा एक मजल व काँग्रेसच्या पुढें होमरूल लीग एक मजल अशा क्रमानें राजकीय स्वरूपाच्या मागण्या होत्या. यामुळें त्यांतल्यात्यांत अधिक छाप कोणाची पडते असे जो तो पहात होता. पण त्यांतल्यात्यांत राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि पटेल आणि स्वराज्यसंघाचे अध्यक्ष टिळक यांचा सर्वांशीं एकविचार असून त्यातल्या एकानें कांही अधिक मागितले तर त्याबद्दल दुसऱ्याला वाईट न वाटतां आनंदच होण्यासारखा होता. नेमस्तांची व बेझंटबाईची गोष्ट मात्र तशी नव्हती. यामुळें ते दोन पक्ष एकोप्यानें व हे दोन पक्ष एकोप्यानें अशीं कामें चालत. स्वतः मी स्वराज्य संघाच्या व राष्ट्रीय सभेच्या दोन्ही शिष्टमंडळांचा सभासद होतों, यामुळें इंडिया पत्रांत त्यांतल्यात्यांत अधिक प्रगतिपर असें धोरण संपादक म्हणून मी ठेवलें होतें. जूनअखेरपर्यंत शिष्टमंडळांचे इतर सभासद हळुहळू विलायतेस येत होते. हे दिवस तिकडील वसंताचें म्हणून काम होईल तितकें कमी, आणि हवाखोरी, करमणूक व सहल होईल तितकी अधिक असा विलायतेंतील लोकांचा कार्यक्रम असतो. आकाश निरभ्र असून ऊन पडत होतें. थर्मामिटर ७० पर्यंत जाई. म्हणजे इकडची ती अर्धवट थंडीच, परंतु तिकडे या हवामानांत उकाडासा वाटे.

जून १० चे सुमारास हिंदी सुधारणा बिलाचें दुसरे वाचन होऊन सिलेक्ट कमिटी नेमली गेली. या प्रसंगीं मी पार्लमेंटमध्ये हजर होतों. माँटेग्यू साहेबांच्या दीड तासाच्या भाषणांतील एक वाक्य मी चांगलेंच लक्षांत ठेवलें आहे तें असें. "हिंदुस्थानांत काय किंवा इंग्लंडांत काय सिव्हिल सार्व्हिसच्या हातून कोणतीच सुधारणा आपण होऊन आजवर मिळाली नाहीं व पुढेंहि मिळावयाची नाहीं. त्यांना नोकराप्रमाणें सांगकामें बनवून राबविलें म्हणजेच त्यांचा खरा उपयोग होतो. बिनसरकारी लोकांच्या डोक्यांतच राजकीय सुधारणांची गर्भधारणा होते, व तेच लोक सुधारणांचें बाळंतपण करण्यास लायक असतात." या बिलाचें काम रात्रीं १२ वाजतां संपलें. हा रात्रिंचरपणा विलायतेंत पाहिला तेव्हां प्रथम आश्चर्य वाटलें. पण पुढें असहकारतेच्या काळांत इकडे काँग्रेस व तिचीं उपमंडळें यांच्या सभा रात्रीं अपरात्रीं कशा चालत, व कित्येक वेळां पहाटे दोनतीन वाजतां मतमोजणी होऊन ठरावांचे निकाल लागत हें मी पाहिलें तेव्हां मुत्सद्यांच्या रात्रिंचरपणाचे कौतुक माझें नाहींसें झालें.

यानंतर सिलेक्ट कमिटीच्या बैठकी सुरूं झाल्या. दरम्यान स्टेट सेक्रेटरी

यांनीं शिष्टमंडळांना भेटीस बोलाविले. या भेटींत झालेल्या संभाषणाची हकीकत टिळकचरित्रात मी सविस्तर दिली आहे. जूनअखेर उन्हाळा वाढला व एक दिवस पारा ८२ पर्यंत गेला तेव्हां 'लंडन शहर होरपळून निघाले' असें त्याचें वर्णन वर्तमानपत्रांनीं केलें. या आठवड्यांत टिळकांच्याबरोबर मी ऑक्सफर्ड येथें गेलों. कांहीं प्रमुख कॉलेजें वगैरे पाहिलीं. रात्रीं आठ वाजतां तेथील मजलसीपुढें टिळकांचें व्याख्यान झालें. केंब्रिजपेक्षां वादविवाद अधिक जोराचा झाला. इकडच्या मोकळ्या हवेत हिंदी विद्यार्थी किती जहाल बोलतो हें येथें दिसून आलें, व जहालाग्रणी म्हणणाऱ्या टिळकानांच विद्यार्थ्यांना नेमस्तपणाचा उपदेश करावा लागला ! म्हणून साध्य आणि साधनें यांच्यासंबंधाचें तत्त्वज्ञान टिळकानीं त्यांना सांगितलें. ऑक्सफर्ड येथें हिंदी विद्यार्थी फार थोडे असतात. मजलसीचें अध्यक्षस्थान मिस् शकुंतला नांवाच्या एका पंजाबी कुमारिकेकडे होतें. अशा ठिकाणीं विचारस्वातंत्र्य कां असतें व राजकारणाची स्फूर्ति कशी मिळते हें ऑक्सफर्ड येथील इमारती, लेख, चित्रें, पुतळे वगैरे पाहून लक्षांत येतें.

जूनच्या अखेरीस विलायतेंत पाऊस पडून किंचित् शीतळता आली. एक इंच पाऊस पडला त्यानें एक एकरी शंभर टन पाणी मिळालें, आतां पिकें वांचलीं असे शेरे वर्तमानपत्रांतून येऊं लागलें. करमणुकी व खेळ वाढले. लेडी लिटन यांनी पार्टी दिली. लंडनाबाहेर ब्रॅडले नांवाच्या सुखवस्तु गृहस्थाच्या घरी हिंदी लोकांनीं इंग्रजी भाषेतून 'आराकानची राणी' या नांवाच्या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. उघड्या अंगणांत संध्याकाळीं हा नाटक-प्रयोग झाला. एका लतामंडपाची ग्रीनरूम केली होती. वेलींच्या ताट्यांकडे पडद्यांचें काम सोंपविलें होतें. अभिनय बेताचा पण गायन बरें होतें. उघड्या हवेंतील नाट्य-प्रयोगाचा हा नमुना इकडे उपयोगांत आणण्यासारखा आहे. जुलै महिन्याच्या प्रारंभीं जर्मनीशीं पक्का तह झाल्याची बातमी येतांच विजयोत्सव सुरूं झाला. त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं. तथापि थोडें देतों.

दुकानें कचेऱ्या एकदम बंद होऊन लोक रस्त्यावर बाहेर पडले. गाडया व मोटारी यांची वहातुक गर्दीमुळें बंद झाली. तोफांचे प्रचंड आवाज व त्यांतच फटाक्यांच बार होऊं लागले. वर आकाशांत विमानें घारीसारखी फिरूं लागलीं. मोठीं निशाणें डोक्यावरील टोप्यांपासून इमारतीवरील शिखरांपर्यंत लटकूं लागलीं.

इतर बाजार बंद पडून एकट्या निशाणांची खरेदी-विक्री सुरूं झाली. भर रस्त्यावर स्त्री-पुरुष उडया मारून गाऊं नाचूं लागले. खेळ, तमाशे, मद्यपान, भामटेगिरी यांना नुसता ऊत आला. विमानांनीं राजवाडयावर लखलखीत प्रकाश पाडला व त्यांतच हजारों लोकांनी राजदर्शन घेतलें. पुढील चार सहा दिवसांतच तहाच्या अटीसंबंधानें वाद सुरूं झाला. तसेच मजूरपक्षानें साऊथपोर्ट येथें वार्षिक संमेलनांत आपल्या बंडाचें निशाण उभारलें. या परिषदेला बेझंटबाई गेल्या व तेथें त्यांनीं भाषणहि केलें. आमच्या शिष्टमंडळाचे कांहीं सभासद गेले होते. त्यांचा खाजगी रीतीनें सत्कार करण्यांत आला. येथून पुढें शिष्टमंडळाच्या कामाला बरीच गति मिळाली.

शिष्टमंडळांच्या चिटणीसांचें, लेखी टांचणें ममुदे वगैरे करण्याचें, काम चाढलें. हळुहळू सुरेंद्रनाथ बॅनर्जीसुद्धा नेमस्तांचे बहुतेक प्रतिनिधि लंडनला आले. आगाखान, अमीरअल्ली हेहि आले. हिंदुमुसलमान यांच्यामध्यें त्यावेळीं हल्लीं इतका मतभेद नव्हता. तथापि युरोपियन लोकांच्या मदतीनें ज्या सभा होत त्यांत नेमस्त पुढाऱ्यांच्या भाषणांचीच योजना असे. टिळकांदिकांवर अर्थात् बहिष्कारच होता. सिलेक्ट कमिटीचें काम ता. १६ जुलै रोजीं सुरूं झालें तिला इंडिया पत्राचा संपादक व रिपोर्टर या नात्यानें मी जाऊं लागलों; व दर आठवड्यांत जें काम होई त्याची टांचणें घेऊन इंडियाच्या दर अंकांत त्याची सुसंगत हकीकत देऊं लागलो. पोलाक साहेबांनीं आजवर आशेनें मागें ठेवलेला संपादकत्वाचा लेखी राजीनामा काँग्रेस कमिटीकडे पाठविला. ब्रिटिश इंडिया काँग्रेस कमिटीची पुनर्घटना झाली. सिलेक्ट कमिटीचें काम सोमवार मंगळवार व बुधवार तीन दिवस चाले. क्वचित् चौथ्या दिवशीं. कमिटीची जागा लहान. प्रेक्षकांना दोन-तीन बाकेंच होतीं. त्यावर आमच्याबरोबर हिंदुस्थानांतील जुनें प्रांतिक एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर उपगव्हर्नर वगैरेहि बसत. एकादां तर सर क्रॉड हिल हे जागा मिळेना म्हणून आम्हा वर्तमानपत्रकारांच्या बाकावर किंचित् टेकले तर शिपायानेंच त्यांना उठवून लाविले ! सर जॉर्ज क्लार्क हे माझ्या जागेपासून एका यार्डाच्या अंतरावर कमिटीचे सभासद म्हणन बसत. कमिटींत उलट तपासणी करण्याचें काम मुख्यतः मॉंटेग्यू व लॉर्ड सिंह हे करीत.

जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत डॉ. नायर हे एकदम वारले. त्यांच्याबरोबर टिळकांच्या आजारीपणाची निराधार बातमी स्टेट्समन पत्राच्या लंडनच्या बातमीदारानें हिंदुस्थानांत पाठविली. त्यामुळें इकडे बराच गोंधळ व गडबड झाली. ति चें

निराकरण तारा करून आम्हाला ताबडतोब करावें लागलें. सिलेक्ट कमिटीपुढें गोरे काळे, सरकारी बिनसरकारी, तात्विक राजकारणाचा विचार करणारे व अनुभविक कारभारी, स्वार्थी परार्थी, अशा सर्व प्रकारच्या लोकांच्या साक्षी झाल्या. अर्थात् या सर्वांचीं प्रश्नोत्तरें प्रत्यक्ष ऐकण्याची मोठी मौज होती. बऱ्याचशा साक्षी ।।एकेकट्या व्यक्तीच्या झाल्या पण कित्येक प्रसंगीं साक्षीदारांचे गट करून साक्षी घेण्यांत आल्या. तेव्हां एकानें बोलावें व जवळच्यानें त्याला मधून मधून सुचवावें असें चालें. आणि हें सुचविणारा एखादा, तर कांहींच न करतां फक्त जवळ बसणारे चारदोन असत. याचा अर्थ इतकाच कीं या बिनबोलक्या साक्षीदारांनाहि 'आमची साक्ष झाली' असें म्हणतां यावें.

मी काँग्रेस शिष्टमंडळाचा सभासद होतों तरी मंडळातर्फे एकच साक्षीदार सिलेक्ट कमिटीपुढें पाठवावा असें ठरल्यामुळें वल्लभभाई पटेल, शिष्टमंडळाचे सेक्रेटरी, यांचीच योजना झाली. तथापि त्यांच्याद्वारें मांडण्याची कैफियत टिळक, पटेल, हॉर्निमन व स्वतः मी अशा चौघांनीं विचारविनिमय करून लिहून काढली होती. या कैफियतींतील मागण्याइतक्या पुरोगामी, प्रगतिकारक किंवा जहाल मागण्या इतर कोणत्याहि शिष्टमंडळाच्या कैफियतींत नव्हत्या. आणि यामुळें आमचें काँग्रेस शिष्टमंडळ सर्वांत अधिक नावडतें होतें. बेझंटबाई नेमस्तांचा कैवार घेऊन काँग्रेस शिष्टमंडळावर नाराज असत, आणि हें शिष्टमंडळ आपल्या जहाल धोरणानें सर्व कांहीं बिघडवीत आहे असे त्या इकडे आपल्या वर्तमानपत्रांतून जाहीर करीत. पण नेमस्तादि इतर शिष्टमंडळांतील अनेक लोक विलायतेच्या या कामगिरीबरोबर स्वतःचा कांहीं स्वार्थहि साधण्याच्या खटपटींत असत. यामुळें त्या मंडळांबद्दलहि, पण दुसऱ्या एका कारणाकरितां, ब्रिटिश मुत्सद्दी खासगी रीतीनें चेष्टा करीत. आणि असा कोणी स्वार्थी साक्षीदार समोर येऊन मोठ्या गोष्टी देशाच्या नांवानें बोलूं लागला म्हणजे कांहीं कुत्सित लोक आपआपसांत कुजबुजून बोलत "हं. या राजश्रींना काय पाहिजे आहे ! याला 'मुखलेप' केवढासा मोठा दिला पाहिजे" ! अशा बातम्या खासगी रीतीनें ऐकूं येत.

होमरूलच्या शिष्टमंडळातर्फे एकट्या टिळकांचीच साक्ष झाली. यासंबंधानें थोडी प्रास्ताविक हकीकत सांगणें जरूर आहे. "स्वराज्यसंघातर्फे साक्षी देण्यास राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनप्रमाणें संधाचेहि सर्व सभासद म्हणजे टिळक, खापर्डे

व केळकर तिघेहि तयार आहेत, तिघांच्याहि साक्षी घेण्यांत याव्या व तिघांच्या नावें कमिटीचे प्रश्न पाठविण्यांत यावे" असें कमिटीच्या चिटणिसांस कळविण्यांत आलें होतें. पण "दर डेप्युटेशनागणिक होतां होईतों एकच साक्षीदार घ्यावयाचा असें कमिटीनें ठरविलें आहे, सबब एकाच गृहस्थाचें नांव द्या," असें उलट लिहून आल्यावरून अर्थात् टिळक हेच संघाचे एक साक्षीदार असें चिटणिसांकडून लिहून गेलें. तेव्हां टिळकांची साक्ष घ्यावयाची की नाहीं हा प्रश्न कमिटीपुढें अध्यक्षांनीं मांडला. कमिटींतला वादविवाद अर्थात् गुप्त होता; पण अशाहि गुप्त खलबतांचें अनुकरणात्मक ध्वनि भिंतींतून बाहेर पडत असतात, त्यावरून असें समजलें कीं, टिळकांची साक्षच घेऊं नये असें म्हणणारें बहुमत कमिटींत होतें. तथापि ती कां घेऊं नये या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मात्र या बहुमतवाल्यांस सुचेना! तेव्हां नाइलाज म्हणून टिळकांची साक्ष घेण्याचें ठरून टिळकांकडे प्रश्नांची यादी पाठविण्यांत आली; व त्या प्रश्नांचीं उत्तरें टिळकांनीं लिहून पाठविलीं, त्यांवरून टिळकांना साक्षीस बोलाविलें. रीतीप्रमाणें अध्यक्षांनीं टिळकांना 'प्रश्नोत्तरांखेरीज तुम्हांला आणखी कांहीं सांगावयाचें असल्यास सांगा,' असें विचारल्याबरून त्यांनी सुमारें दहा मुख्य मुद्यांवर सुसंगत, सुव्यवस्थितपणें, अंतर किंवा अधिक-उणा एकहि शब्द न बोलतां, राष्ट्रीय सभेची स्वराज्ययोजना कमिटीस सांगितली. प्रश्नोत्तरांचें टिपण जे त्यांनीं प्रथम पाठविलें होतें त्याला धरून पण त्याची सूत्ररूपानें एकवाक्यता करून टिळकांनीं कमिटीपुढें आपला खुलासा मांडला व तो सर्वांस फारच पसंत पडला. यानंतर मधली सुट्टी झाली व फिरून कमिटी भरल्यावर टिळकांची उलटतपासणी पाहावयास सांपडेल अशी लोक उत्सुकतेनें वाट पाहत होते. पण कमिटीच्या पोटांतले पाय या वेळीं बाहेर आले. तिनें टिळकांस साक्षीस बोलवावयाचें पण एकहि प्रश्न विचारावयाचा नाही असा आपणांत निश्चय केलेला असल्यामुळें त्यांची साक्ष उलटतपासणीशिवायच संपली. लॉर्ड सिडनहॅमसाहेब तर आधींच उठून गेले होते!

टिळकांना उलटतपासणींत एकहि प्रश्न विचारावयाचा नाहीं याचा अर्थ त्यांच्यावर कमिटीची इतराजी हाच होय हें उघड होतें. व ही इतराजी कां तर ती टिळकांच्या राजकीय मतांकरितां, किंवा सरकारचा व त्यांचा जो अपूर्व ऋणानुबंध होता त्याकरितां हेंहि उघड होतें. पण ही गोष्ट घेऊन चाललें तरी, त्यांना प्रश्न न विचारण्याचा जो पोरकटपणा कमिटीनें केला त्याचें

मात्र पुष्कळांना हंगूं आलें. कमिटीचा टिळकांवर राग होता तर तिनें टिळकांना साक्षीसच बोलवावयाचें नव्हतें. तसें करण्यास त्यांना भाग पाडण्यास होमरूल लीगला काय साधन होतें ? हा केवळ खुषीचा सौदा आहे. "टिळकांना नाकारतां त्या अर्थी आम्ही आमच्या वतीनें दुसरा कोणीच साक्षीदार पाठवीत नाहीं" असें फार तर लीगनें उत्तर दिलें असतें, व जगानें झाली ही गोष्ट बरी अगर वाईट याचा न्याय आपल्या ठिकाणीं केला असता. पण तसें करण्याची कमिटीची छाती झाली नाहीं. बरें, भलेपणा घेण्याकरितां किंवा सरळ सार्वजनिक बुद्धीनें जर कमिटीनें त्यांना साक्षीला बोलावलें तर रीतीप्रमाणें इतर साक्षीदारांसारखे चार प्रश्न विचारावयास काय हरकत होती ? तसें केल्यानें कमिटीस बट्टा लागण्याचा संभव नव्हता. पण साक्षीस तर बोलावलें, त्यांना आपलें म्हणणें सर्व मांडूं दिलें, पण उलटसाक्षी-पुरता त्यांच्याशीं अबोला धरला; यांत कमिटीनें कोणतें तत्त्व किंवा कार्य साधलें हें कमिटीसच माहीत ! पण उलट प्रश्न न विचारले तरी होमरूल लीगचें काम झालें. अशा कमिट्या व त्यांपुढील साक्षी यांचा मुख्य उपयोग हाच असतो कीं, ज्याला त्याला आपलें म्हणणें जाहीर रीतीनें मांडतां यावें; आणि टिळक, पटेल व दिवाण माधवराव यांच्या साक्षी वाचल्या म्हणजे इंग्रज राष्ट्राचे पुढारी, मुत्सद्द्यांतले मुरब्बी, अधिकाऱ्यांतले अग्रगण्य अशांच्या समोर तोंडावर लोकपक्षाचे खरे खरे विचार स्पष्ट निर्भीड भाषेंत मांडण्यांत आले यांत सर्व कार्यभाग आला. ज्यांना अधिकाऱ्यांचे स्नेह जोडण्याला किंवा आपापले खासगी कावे साधण्याला येथें जावयाचें होतें त्यांची गोष्ट अर्थात् निराळी.

पण आपला पक्षपातीपणा लोकांच्या लक्षांत येऊं नये अशा बुद्धीनेंच जणूं काय कमिटीनें उलटतपासणी न करण्याचा मान इतर एकादोघांसहि दिला. कारण टिळकानंतर मिसेस् नायडू यांची साक्ष झाली, व त्याच्यानंतर सर फ्रँक स्लाय यांची साक्ष झाली. त्या दोघांनाहि उलट सवाल विचारण्यांत आले नाहींत.

माझी स्वतःची साक्ष सिलेक्ट कमिटीपुढें झाली नाही. परंतु इंडिया पत्र चालविणें हें जोखमीचें काम मजकडे स्वतंत्रपणें तोडून दिलें होतें तें करण्यांत माझा पुष्कळ वेळ जाई. शिवाय वक्तशीरपणा हा विलायतेंतील लोकांच्या अंगीं इतका मुरला आहे कीं हिंदी पद्धतींत मुरलेल्या मनुष्याला तिकडे कामधामाची टिपणें

अगर इतर तजविजी वेळेवर पार पाडणें मोठें जड जात असलें पाहिजे. पण सुदैवानें मीहि इकडे हिंदुस्थानांतच वक्तशीरिपणाचा गुण बराचसा माझ्या अंगीं आणलेला होता. यामुळें तिकडे माझ्या कामांत मला खालीं पाहण्याची वेळ आली नाहीं. छापखान्याला मजकूर द्यावयाच तो अगदीं स्वच्छ लिहून काटेकोर असा दिला पाहिजे. उलट छापखानेवालेहि दिलेला मजकूर थेट अस्सल बरहुकुम छापून देण्यास स्वतःला जबाबदार समजतात. अर्थात् मागाहून जर खोडाखोड केली, शुद्धिपत्रें जोडली तर त्याचा खर्च बिलांत घातला जातो. पांच चार ओळींत एखादा शब्द पांचचार अक्षरें इतकें शुद्धीकरण इतकेंच क्षम्य मानलें जातें. मी या बाबतींत इकडे तितकासा दक्ष नव्हतो. पण विलायतेतील चुणूक कळतांच मी तो गुण लवकरच शिकलों.

ब्रिटिश इंडियन कमिटीच्या पैशांतून हें इंडिया पत्र चालविण्याची सर्व व्यवस्था होई. या कमिटींत डॉ. क्लार्क ( चेअरमन ) पांचसात इंग्रज आणि कांहीं लंडन रहिवासी हिंदी सभासद होते. मी हिंदुस्थानाकडे परत येण्याला निघालों तेव्हां या कमिटीनें इंडिया पत्राच्या कामाबद्दल माझे आभार मानण्याचा ठराव नमूद केला. मला चहापार्टी दिली. आणि चांदीचें पात्र नजर केलें. डॉ. क्लार्क हे मूळचे लिबरल पक्षाचे, पण प्रगतिप्रिय असल्यामुळें त्यांनीं काँग्रेसचें धोरण स्वीकारण्यास फारशी खळखळ केली नाहीं. माझी सहसंपादिका हेलेना नॉरमँटनबाई. तिजवर त्यांची फार ममता असे. आणि पुढें डॉ. क्लार्क यांच्या मुलाशीं या बाईचें लग्न झालें. हेलेना नॉरमँटन ही युनिव्हर्सिटीची पदवीधर असून ग्रंथकर्ती होती. राजकारणांत तिचीं मतें राष्ट्रीय वृत्तीचीं असत. कारण तिच्या अंगांत आयरिश रक्त होतें. तथापि मी असें पाहिलें कीं, राष्ट्रीय वृत्तीच्या स्वातंत्र्यप्रिय अशा ब्रिटिश लोकांच्या डोक्यांत हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र होण्याची कल्पना शिरतां शिरत नाहीं व शिरली तरी ती त्यांना आवडत नाहीं.

अशा रीतीनें कमिटीचें काम आक्टोबरच्या शेवटल्या आठवड्यांत संपलें. मध्यंतरीं उन्हाळ्याच्या सुटीमुळें पार्लमेंटचें काम बंद होतें. यामुळें शिष्ट-मंडळाच्या लोकांनीं व्याख्यानादिकांचे दौरे काढले. खाजगी भेटीं घेण्याचें काम काढले. तसेंच खाजगी भोजनें उपहार यांचे उलट सुलट उपचार झाले. कंक्सटन हॉल, एसेक्स हॉल वगैरे ठिकाणीं व्याख्यानें झालीं. दक्षिण वेल्स, बोर्नमाउथ् साउथॅम्प्टन, एडिंबरो इत्यादि ठिकाणीं खापर्डे, टिळक, नायडू वगैरे

मंडळी गेली होती. या सर्वांची छाप निरनिराळ्या रीतीनें पडली. टिळक मुत्सद्दी म्हणून, बेझंटबाई बकत्या म्हणून, व खापर्डे हे विनोदी व्याख्याते म्हणून. बेझंटबाई यांनींहि तेलंग, वाडिया, जमनादास द्वारकादास वगैरे मंडळीबरोबर घेऊन व्याख्यानांचा दौरा काढला होता. नंतर मी, हॉर्निमन, आयंगार, मिस नॉरमँटन ( इंडिया पत्राच्या सहकारी संपादक ) अशी मंडळी फुटून फुटून इंग्लडच्या पश्चिम भागांत व्याख्यानास गेलों. मिस् नॉरमँटनबाई या आयरिश असून त्यांनीं लंडन युनिव्हर्सिटींत इतिहास या विषयांत ऑनर्स मिळविले होते. त्यांनीं बॅरिस्टरीची परीक्षा विद्याभ्यासाच्या दृष्टीनें दिली होती. पण या वेळेपर्यंत बायकांना वकिली करण्याची परवानगी मिळालेली नव्हती. त्यामुळें त्यांनीं हौस ऑफ लॉर्डस्कडे परवानगीचा अर्ज करून आपल्या हक्काचें भांडण चालविलें होतें, व वजनदार मुत्सद्दी लॉर्ड सेसिल यांनीं त्यांचा पुरस्कार चालविला होता. मी बर्मिंगहॅम्, ब्रिस्टल्, ब्रायटन, टाँटन, वेस्टर्न सुपरमेयर इत्यादि ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. हॉर्निमन व रंगस्वामी हे कार्डीफकडे व्याख्यानें द्यावयास गेले होते ते कार्डीफ येथें आम्हांला येऊन मिळाले व तेथें आम्हा सर्वांचीं भाषणें झालीं. इकडील व्याख्यानांचा सामान्य अनुभव असा— खटपट झाली असतां कोठेंहि सभा होण्यास अडचण पडत नाहीं. श्रोतृसमाज किती मिळेल हे मात्र सांगतां येणें कठिण असतें. कारण सभा कोण भरवतो यांवर ते बरेचसें अवलंबून असतें. प्रायः प्रत्येक शहरी इंडिपेन्डन्ट लेबरपार्टी, ॲडल्ट स्कूल, चर्च सोसायटी वगैरे दोन तीन संस्था असतातच, व त्यापैकीं एखाद्या संस्थेच्या विद्यमाने सभा भरूं शकते. शिवाय या संस्थेच्या आठवड्याच्या, पंधरवड्याच्या ठराविक सभा असतातच. त्यांतलीच एखादी सभा आपणास मिळाली तर श्रोतृसमाज विशेष भरपूर मिळतो. प्रत्येक शहरीं स्थानिक वर्तमानपत्र असतेंच, व जाहिरात आगाऊ झालेली असल्यास त्या पत्राचा रिपोर्टर येऊन थोडा तरी रिपोर्ट देतो. सभेस येणारे लोक शेंकडा नव्वद सहानुभूतिपूर्ण असतात, व व्याख्यानानंतर विचारलेल्या प्रश्नांत विरोधापेक्षां जिज्ञासाच अधिक असते. विरोध करणारा एखादा भेटतोहि. परंतु प्रश्न विचारणारापेक्षां उत्तर देणाऱ्याला विषयाचें ज्ञान अधिक असल्यामुळें तो सहसा आपली छाप पाडल्याशिवाय रहात नाहीं.

विलायतेंतील चळवळींत नेमस्त, बेझंटबाई, काँग्रेस व होमरूललीग असे चार पक्ष काम करीत होते. मुसलमान व अस्पृश्य या नांवांचे स्वतंत्र पक्ष त्यावेळीं नव्हते. वरील चार पक्षांपैकीं काँग्रेस व होमरूललीग हा पक्ष संयुक्त होता. त्यांत

मतभेद मुळीच नसून दोन्ही पक्षांच्या सूत्रचालकत्वाचें काम टिळकांकडेच होतें. नेमस्त पक्षाची खटपट बाहेर लोकांत विशेष नसून ती मुख्यतः सरकार दरबारीं चाले. बेझंटबाई या उभयान्वयी असून, सहानुभूति नेमस्त पक्षाकडे पण प्रत्यक्ष खटपटींत काँग्रेस व होमरूललीग पक्षाशींहि सहकारिता, असें त्यांचें धोरण असें. कारण त्यांना विलायतेंत जनतेमध्यें जितकी मान्यता होती तितकी सरकार दरबारीं नव्हती. यामुळें नेमस्त व राष्ट्रीयपक्ष यांच्या मिळून सभा विलायतेंत कोठें झाल्या नाहींत तरी बेझंटबाई व टिळक आणि हॉर्निमन सकलातवाला सत्यमूर्ति चमनलाल यासुद्धां एकत्र सभा होऊं शकली. ती सुप्रसिद्ध ऑलबर्ट हॉलमध्यें झाली. तेथें एका टोकाला बेझंटबाई व दुसऱ्या टोकाला चमनलाल अशी खेच असून टिळकांनीं दोन्हीकडे हात देऊन दोरी सावरून धरली होती; व शेवटीं चमनलालसारख्या तडफदार वक्त्याच्या भाषणावरहि आपल्या मुत्सद्देगिरीची छाप पाडून टिळकांनीं ती सभा जिंकली.

अशा रीतीनें विलायतेंतलें काम संपल्यावर टिळक व वासुदेवराव जोशी यांच्याबरोबर मी विलायतेहून परत आलों. येतांना बोट मिळाली ती 'इजिप्त' नांवाची, आणि टेम्स नदीपासून मुंबई बंदरापर्यंत एकदम म्हणजे वाटेंत फ्रान्सकडे न वळणारी अशी मिळाली. यामुळें फ्रान्समध्यें मार्सेल्सला उतरून युरोपखंडाकडे प्रवास करतां आला नाहीं. जातांना पक्का तह झाला नव्हता म्हणून मार्सेल्सला उतरूं शकलों नाहीं. आणि येतांना उतारूंची गर्दी फार; तिकिटें देण्याचें काम आगबोट कंपनीपेक्षां इंडिया ऑफिसच्या अधिकाऱ्यांच्या हातीं. मिळेल ती बोट ताबडतोब न घेतली तर पुढें केव्हां मिळेल याचा नेम नाहीं. टिळक दीड वर्ष विलायतेंत राहून कंटाळलेले, यामुळें कसेंहि करून लौकर परत हिंदुस्थानाला जावें अशी त्यांची इच्छा. आणि मी वेगळा फुटून युरोपखंडाचा प्रवास करून येईन म्हटलें तर मजजवळ त्यावेळीं तितकें स्वतंत्र द्रव्यसाधन नाहीं. यामुळें आपण मागें न रहातां टिळकांबरोबरच परत जावें हें उत्तम असें ठरवून मीहि आणखी प्रवासाच्या भानगडींत पडलों नाहीं. टिळक 'विलायतेला' गेले ते खरोखर विलायतेला गेले नव्हते. कामाकरितां गेले होते! आणि माझीहि स्थिति तीच होती.

टिळक शरीराच्या दृष्टीनें किंचित परावलंबी झालेले असून त्यांना बरोबर मनुष्य घेतल्याशिवाय फिरणें शक्य नव्हतें. माझी स्थिति तशी नव्हती. पण मी विलायतला गेलों तो खरोखर 'विलायत' पहाण्याकरितां गेलों नव्हतों. मग युरोप-खंडचा प्रवास दूरच. यामुळें मलाहि विलायतेंत देखील हिंडतां फिरतां आले

नाहीं. दर आठवड्याला इंडिया पत्राचा अंक काढावयाचा, केसरीकरितां एक बातमीपत्र लिहावयाचें, अवांतर पत्रव्यवहार व टिळकांची निरोपेगिरी वगैरे काम करावयाचे. यामुळें मला लंडन सोडून बाहेर सबंध अर्धा आठवडाहि रहाणें शक्य नव्हतें. यामुळें लंडनमध्यें राहूनच एखाद्याअर्ध्या दिवसांत जें काय पहातां येईल तें पहावे असा क्रम मी ठेविला होता. त्याप्रमाणे वुइन्डसर, रिचमंड व लंडन टॉवर येथील राजवाडे, सुप्रसिद्ध चित्रसंग्रह, एकदोन जत्रा, मध्यवर्ती लायब्ररी व पदार्थ-संग्रहालय, एक-दोन सभागृहें, एक-दोन नाटकगृहें, दोन तीन नाटक-प्रयोग व कांहीं सार्वजनिक उद्यानें याशिवाय अधिक कांही मला पहावयास सांपडलें नाही. आणि ऑक्सफर्ड, केंब्रिज, बर्मिंगहॅम, ब्रिस्टल व टॉटन याशिवाय शहरें पहावयास सांपडलीं नाहीत. पांच महिने इंग्लंडमध्यें राहून इतकें थोडें पाहिलें म्हणजे कांहींच पाहिलें नाही असा अर्थ सहजच होतो. पण विलायतच्या सफरींत माझा हेतु प्रवासाचा आणि स्थलसौंदर्य पहाण्याचा नसल्यामुळें मला त्याचें वाईट वाटलें नाहीं. माझ्या मनांतच युरोपचा प्रवास व स्थलदर्शन नव्हते या अर्थानेंच ते दैवांत नव्हतं असें वाटले तर म्हणावें ! तथापि नाहीं नाहीं म्हणतां १९३२ सालीं विलायतेच्या सफरीचा दुसरा प्रसंग आलाच.

* * * *

**विलायतेची दुसरी सफर**—आतां या दुसऱ्या सफरीची हकीकत थोड-क्यांत सांगतों. १९३२ च्या आक्टोबरांत मद्रासेहून पुण्यास परत येतांना वाटेंत निजाम हैद्राबाद शहरीं मी गेल्याची हकीकत मागें सांगितली आहे. येथें प्रथम हें सांगावयाचें कीं अगदीं अभावितरीतीनें हैद्राबादच्या या मुक्कामांतच मला गोलमेज परिषदेचें निमंत्रण मिळालें. त्याचा प्रकार असा—

हैद्राबादेस मला संयुक्त महाराष्ट्रीय मंडळाची पानसुपारी झाली. आणि मी परत पुण्याला निघणार इतक्यांत हैद्राबादच्या रेसिडेंटसाहेबांकडून मला भेटीचें निमं-त्रण आलें. त्यांचा हेडक्लार्क मोटार घेऊन मला हुडकीत आला, व त्यानें रेसिडेंट साहेबाचें निमंत्रणपत्र हातीं दिलें. त्यांत 'जरूर येऊन भेटून जा' असें लिहिलें होतें. मला कांहींच बोध होईना. मी गेल्यावर रेसिडेंट मला स्वतःच्या बसण्याच्या खोलींत घेऊन गेले व पेटींतून एक तार काढून त्यांनीं मला वाचून दाखविली. तींत मजकूर असा होता. " केळकर हे हैद्राबादेस गेल्याचें समजतें तरी तुम्ही त्यांना

भेटीस बोलावून विचारा कीं, तिसऱ्या राऊंड टेबल कॉन्फरन्सला सभासद म्हणून त्यांना निमंत्रण करण्याचा सरकारचा विचार आहे तरी हें निमंत्रण ते स्वीकारतील किंवा कसें ?" मी अर्थातच बुचकळ्यांत पडलों. मी म्हणालों, "इतक्या तातडीनें या प्रश्नाचें उत्तर येथेंच देणें कठिण वाटतें. तरी मी पुण्यास गेल्यावर याचें उत्तर कोणास कळवावें तें सांगा म्हणजे त्याला पाठवीन." रेसिडेंट म्हणाले "तुमची अडचण मी ओळखतों. मात्र कृपा करून तुम्ही थोडा विचार करण्यास वेळ घेतला तरी चालेल, पण मला निश्चित स्वरूपाचें कांहीं उत्तर देऊन गेलां तर बरें होईल. ही तार पुणें मद्रास असें करीत करीत हैद्राबादेस आली आहे. त्यावरून सरकारला उत्तर त्वरित हवे असें दिसतें." असें म्हणून मला विचार करण्याला वेळ देण्याकरितां दुसरे कागदपत्र काढून ते वाचूं लागले. पांच मिनिटानंतर मी म्हणालों "ठीक आहे. मी निमंत्रण स्वीकारीन असें कळवा." परत आल्यावर जो तो मोठ्या उत्सकतेनें विचारूं लागला की रेसिडेंटने भेटीला कां बोलावलें ? पण भेट केवळ औपचारिक असें सांगून मी कोणासहि मुळींच सुगावा लागूं दिला नाही.

पुण्यास आल्यावरहि यांतलें एक अक्षर मी कोणास कळूं दिलें नाहीं. पण सर फ्रे. साईक्स, मुंबईचे गव्हर्नर, यांजकडून गणेश खिंडीतून भेटीस बोलावल्याचें निमंत्रण आलें, तेव्हां मग राऊंड टेबलच्या निमंत्रणाची गोष्ट मला बाहेर फोडावी लागली. हे मधले चार पांच दिवस एका अर्थानें फुकट गेले. कारण प्रत्यक्ष निमंत्रणाचें पत्र हातीं आल्यापासून आगबोटींत बसण्याला अवघे चार पांच दिवस होते. आणि तयारी तर करावयाची विलायतच्या थंडीच्या दिवसांतल्या प्रवासाची ! पण निमंत्रण हातीं पडण्यापूर्वी तयारी करावयास लागावयाचे नाही, मग त्यांत गैरसोय धांदल झाली तरी चालेल असा निश्चयच केला होता. शेवटीं ठरल्यावेळी मी मुंबईस जाऊन आगबोटींत बसलों. पॅसेज पासपोर्ट यांची व्यवस्था सरकारकडून करण्यांत आली. त्या खटपटीचा माझा वेळ वांचला. तसेंच पुण्यांतील गोखले शिंपी यांनीं ठरल्या मुदतींत सर्व कपडे तयार करून दिले. मुंबईस निरोप देण्याकरितां महाराष्ट्रांतील दहा वीस ठिकाणचे मित्र व जिल्हापुढारी आले होते. अणे यांना मुंबईच्या मित्रांकडून निमंत्रण गेलें होतें. पण त्यांना मी राऊंड टेबल कॉन्फरन्सला जाणें पसंत नव्हतें हें माहीत असल्यामुळें मी त्यांना खुलासेवार तार केली व ते न येण्यानें होणारा गैरसमज दूर केला. या पूर्वीपासूनच काँग्रेस विषयक

धोरणांत अणे व मी यांच्यामध्यें मतभेद होऊं लागला होता. म्हणून व्यक्तिशः स्नेह असला तरी मतभेदामुळें " तुम्ही निरोप देण्यास न आला तरी त्यामुळें माझा गैरसमज होणार नाहीं, इतर अनेकांची माझ्या जाण्याला मान्यता आहे तेवढी मला पुरे आहे" असें मी त्यांना कळविलें.

**पुणेंकरांचा निरोप**—ता. २६ आक्टोबर रोजीं नगराध्यक्ष डॉ. नायडू यांच्या अध्यक्षतेखाली मला निरोप देण्याचा समारंभ टिळक मंदिरांत झाला. त्याबद्दल वर्तमानपत्रांत हकीकत आली ती अशीः—प्रथम प्रो. पोतदार म्हणाले,

"राजकारणांत रुसवारुसवी फार वेळपर्यंत टिकूं शकत नाहीं. राजकारण हा फक्त कुस्तीचा आखाडा असल्याकारणानें त्या आखाड्यांत उतरून लढत राहणें ही गोष्टच शेवटी कल्याणप्रद होते." या बाबतींत त्यांनीं इतिहासांतील अनेक दाखले देऊन आपल्या म्हणण्याला पुष्टि दिली. व्यक्तिशः आपलें मत सांगतांना प्रो. पोतदार म्हणाले " गोलमेज परिषदेला १९३१ सालीं श्री. केळकर यांना आलेलें आमंत्रण त्यांनी नाकारलें ही गोष्ट बरी केली नाहीं. तिसऱ्या गोलमेज परिषदेला त्यांना बोलावणें आलें व तें तरी त्यांनी पत्करलें हें फार चांगलें झालें. आपल्यास या बाबतींत जी महाराष्ट्राची नाडी माहीत आहे तीवरून असे म्हणतां येईल कीं, श्री. केळकर यांना महाराष्ट्राचा पाठिंबा आहे. गोलमेज परिषदेंतून काय निघेल यासंबंधानें कोणालाहि कांहीं शंका असल्या तरी विलायतेस जाऊन तेथील राजकारणी मुत्सद्यांबरोबर चार हात करण्यांत पुष्कळ अर्थ आहे. या निरनिराळ्या दृष्टींनी पहातां श्री. केळकर हे तिसऱ्या गोलमेज परिषदेला जात आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांचा सारखा चतुरस्र, हजरजबाबी व राजकारणांत मुरलेला असा गृहस्थ विरळा. महाराष्ट्रांत प्रतिनिधीची निवड लोकांनीं करण्याची वेळ आली असती, तरी केळकर यांनाच सर्वांनीं निवडून दिले असते अशी माझी खात्री आहे. "

" प्रो. पोतदार यांचें वरील आशयाचें भाषण झाल्यावर प्रो. काळे म्हणाले कीं, " श्री. केळकर हे महाराष्ट्राचे तर प्रतिनिधि आहेतच, पण त्यांना गोलमेज परिषदेमध्यें कामगिरी करावयाची आहे ती हिंदुमहासभा, संस्थानी प्रजाजन, व सर्वसाधारण हिंदी जनता यांच्यातर्फे करावयाची आहे. श्री. केळकर यांना कोणत्याहि विषयाची मांडणी किती सफाईनें व कौशल्यानें करतां येते हें

असेंब्लींत उत्तम रीतीनें दृष्टोत्पत्तीस आलें आहे." श्री. केळकरांच्या अंगांत सर्व विषयांचें आकलन करण्याची शक्ति किती मोठी आहे हें सांगतांना प्रो. काळे यांनीं आपल्या तीस वर्षांपूर्वीच्या कांहीं आठवणी सांगितल्या. "चलनपद्धति संबंधानें १८९८–९९ सालीं फौलर कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला त्या वेळीं कै. न्या. म्. रानडे म्हणाले होते कीं, अशा तऱ्हेच्या शास्त्रीय विषयाचा संपूर्ण अभ्यास करून त्यावर ठाम मत देणारे तरुण आपल्यांत उत्पन्न झाले पाहिजेत, व ते नाहींत म्हणून रानड्यांना वाईटहि वाटले होते. पण त्याच वेळीं श्री. केळकर यांनीं फौलर कमिटीच्या रिपोर्टाचा पूर्ण अभ्यास करून त्यासंबंधी लिहिलेला एक निबंध सार्वजनिक सभेंत वाचला होता. चलनासंबंधीचा हा निबंध पाहून न्या. म्. रानडे यांना आनंद झाला. 'मराठा' पत्राची प्रुफें मी पहात असतांना केळकर हे आपलीं आर्टिकलें कशी लिहीत असत हें मला माहीत आहे. 'मराठ्यांत' लेख लिहिण्यास त्यांनीं आपल्याला कसें उत्तेजन दिलें हें सांगून प्रो. काळे यांनी श्री. केळकर यांना त्यांच्या विलायतेंतील कामांत यश यावें अशी सदिच्छा प्रकट केली व केळकरांना पुष्पहार घालून त्यांनी आपलें भाषण संपविलें.

"उत्तरादाखल भाषण करतांना केळकर म्हणाले की, "मी तिसऱ्या गोलमेज परिषदेस जात आहे तो केवळ सध्याच्या आणीबाणीच्या वेळीं हिंदुस्थानाकरितां आपल्यास कांहीं तरी भरीव कामगिरी करतां यावी एवढ्याच सदिच्छेनें. म. गांधी तुरुंगांत असतांना लोक म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांचीं कामे चालवितातच व हीं कामें सरकारी कायद्यानेंच चालतात. स्थानिक स्वराज्यसंस्था चालविण्यास जर या लोकांना हरकत वाटत नाहीं, तर ज्या कायद्यानें अखिल हिंदुस्थानचें राज्य-यंत्र बनविलें जाणार आहे, तो कायदा व्हावयाच्या प्रसंगीं आपण हजर कां राहूं नये व आपल्या म्हणण्याप्रमाणें कायदा करून घेण्याची खटपट कां करूं नये हें मला समजत नाहीं !

"म. गांधी व सरकार यांच्यामध्यें कांहीं तडजोड निघून राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि जर या तिसऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहिले असते तर फार चांगलें झालें असतें. आज देशांत राष्ट्रीय सभेएवढा वजनदार व कार्यकर्ता असा दुसरा पक्ष नाही हें खरें, पण अलीकडे घडलेल्या अनेक गोष्टी पाहतां म. गांधींचीं सुटका होऊन ते गोलमेज परिषदेला जातील असा संभव दिसत नाहीं. ते गेले

असते तर खचित हिंदुस्थानचें कल्याण झालें असतें. परंतु ते जात नाहींत म्हणून सगळें रान इंग्रजी साम्राज्यवादी स्वराज्यद्रोह्यांना मोकळें सोडावें ही गोष्ट मला पटत नाहीं. ठिकठिकाणीं आपल्या हातून होईल तितका पायबंद त्यांना घालावा असें माझें मत असल्याकारणानें मी या परिषदेचें निमंत्रण स्वीकारलें, व ही गोष्ट मी बरोबर केली असें मला वाटतें. तथापि हेहि लक्षांत ठेवा कीं, येथें तुमच्यासमोर उभें राहून जें मी बोलतो तेंच तेथें पाठीमागेंहि बोलेन !

"पुष्कळांना असें वाटत आहे कीं, या गोलमेज परिषदेंतून कांहींहि निष्पन्न होणार नाहीं. पण मला त्यांची ही वृत्ति पटत नाहीं. निराशा ही प्रत्येक बाबतींत पसरलीच आहे. परतंत्र म्हणून राजकारणाच्या दृष्टीनें आपण मेलेलेच आहों. पण यांतहि आशा ठेविली तरच आपला तरणोपाय आहे. या वेळीं मला एका इंग्रजी स्मशान-भूमीवर लिहिलेलें अर्थपूर्ण वाक्य स्मरतें. या वाक्यांत निराशावाद्यांना जसें उत्तर दिलें आहे तसेंच मी कां जातो याचेंहि गमक त्यांत आहे. तें इंग्रजी वाक्य असें:—"दि डेड डू नॉट फियर डेथ्, बट दे होप फॉर रिसरेक्शन" म्हणजे "मेल्यानंतर मृतांना मृत्यूची भीति वाटत नाहीं; पण ते आपल्या पुनरुद्धाराची मात्र मोठ्या आशेनें वाट पहात असतात !"

"आपल्या या हिंदुस्थानांत सर्वत्र निराशाच भरली असून यापूर्वी निमालेल्या देशभक्तांच्या अतृप्त आकांक्षाच सर्वत्र वावरत असलेल्या आपल्या दृष्टीस पडतात. स्वराज्याच्या हक्कांच्या दृष्टीनें हिंदुस्थान हें एक स्मशानच नाहीं काय ? स्मशानांत श्रीमंताच्या कबरीवर मौल्यवान अशी एकादि छत्री असो किंवा गरिबांच्या मृत देहांवर लहानसा क्रॉस असलेली एखादी काठी असो. पण दोहोंत तत्त्वदृष्ट्या फरक नाहीं. हिंदुस्थानांत मोठमोठे देशभक्त आपापल्या शक्तीप्रमाणें कार्ये करीत असतांना शांत झाले. पण त्यांच्या आकांक्षा तशाच राहिल्या. ज्या दिवशीं आपलें स्वातंत्र्य गेलें त्याच दिवशीं आपण राजकीय दृष्टीनें मृत झालों. दादाभाई नौरोजी, रानडे, गोखले, टिळक यांनीं प्रयत्न करून स्वराज्य मिळविण्याची खटपट केली. तथापि त्यांच्या इच्छा अतृप्तच राहिल्या. हिंदुस्थानच्या या स्मशानभूमींत त्यांच्या अतृप्त वासनावरील कोरलेलीं चिन्हें आजहि स्पष्ट दिसत आहेत. तथापि हें असें असलें तरी आशावाद सोडून उद्योग बंद करणें मला पसंत नाहीं. मनुष्यानें आशावादी राहून आपला उद्योग

करीत असावें यांतच यश आहे. प्रयत्न केला असतां आपल्याला कधीतरी यश येईल हें माझें ब्रीदवाक्य असल्यावें या माझ्या प्रयत्नास सर्वांकडून सहानुभूति व आशीर्वाद मिळावा हेंच युक्त असून तसा तो मिळत आहे यांतच मला आनंद वाटतो."

**मुंबईकरांचा निरोप**—( वर्तमानपत्राचा उतारा )—हा निरोप देण्याला दूर नागपूरपासून मंडळी आली होती. ब्राह्मणसभेत सुमारें अडीचशें परस्थ लोक जमले होते. अध्यक्ष या नात्याने बॅरिस्टर जमनादास मेहेता म्हणाले—

"श्री. तात्यासाहेब केळकर हे तिसऱ्या गोलमेज परिषदेकरितां जात आहेत. गोलमेज परिषदेला जाऊन स्वराज्याचे भरीव हक्क आपणास मिळतील अशी केळकरांची अपेक्षा नाही. परराष्ट्रीय राजकारण व लष्करी खातें यांवर हिंदी राष्ट्रीय सरकारची हुकमत चालल्याशिवाय हिंदुस्थानला खरे स्वराज्याचे हक्क मिळाले असें होणार नाही. व पहिल्या दोन गोलमेज परिषदांचे अहवाल पाहिल्यास ही दोन खातीं हिंदी लोकांच्या ताब्यांत देण्यास ब्रेटब्रिटन तयार होईल असें वाटत नाहीं. श्री. केळकर हे तिसऱ्या गोलमेज परिषदेंत हिंदी लोकांच्या आकांक्षा काय आहेत हें स्पष्टपणें मांडतील. श्री. केळकर हे गोलमेज परिषदेला जात आहेत याबद्दल कांहीं लोक बोटें मोडीत आहेत. परंतु हे टीकाकार म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे यांत मात्र अहमहमिकेनें शिरून तेथें कामें करीत आहेत. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे यांमध्यें काम करण्यास जर या लोकांना कांहीं दिक्कत वाटत नाहीं, तर या संस्थांपेक्षा अधिक महत्त्वाचे व राष्ट्रीय स्वरूपाचे प्रश्न ज्या परिषदेपुढें येणार आहेत, व ज्या परिषदेला महात्मा गांधींना जाण्याचा मार्ग सुकर व्हावा अशी लोकांची इच्छा आहे, त्या गोलमेज परिषदेला श्री. केळकर हे हजर राहिले तर त्यांत कोठे बिघडते हें मला समजत नाहीं. श्री. केळकर हे राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें तेथें स्पष्टपणें मांडतील. गोलमेज परिषदेला जाणें म्हणजे तेथें जे जे ठरेल त्याला मान्यता देण्याप्रमाणें आहे असें म्हणणें हा वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. ही एकच वेळ अशी आहे कीं ज्यावेळीं सरकारनें बिनचूक गोष्ट केली. कारण, लोकनियुक्त प्रतिनिधि पाठविण्याचे ठरले असते तरीहि श्री. केळकर यांचीच या भागातर्फे निवडणूक झाली असती!"

"डॉ. मुंजे यांनीं थोडक्यांत भाषण करून श्री. केळकर यांना तिसऱ्या गोलमेज परिषदेकरितां सरकारनें निमंत्रण केलें याबद्दल आनंद व्यक्त केला व ते

म्हणाले कीं, " आज हिंदु समाजाची बाजू गोलमेज परिषदेपुढें राष्ट्रीय दृष्ट्या समतोल बुद्धीनें मांडण्यास जर कोणी लायक गृहस्थ असेल तर ते श्री. केळकर हे होत. " खासदार नारायणराव गुंजाळ यांनीं श्री. केळकरांच्या अभिनंदनपर भाषण केल्यावर एरंडोलचे श्री. पु. गो. जोशी यांनी असें सुचविलें कीं, "गेल्या दहा वर्षांतील निवडणुकींचा अनुभव पहातां साक्षरतेचा प्रसार झाल्याविना मतदारांची संख्या वाढविली गेल्यास योग्य उमेदवार निवडून येणें कठिण जाईल, तरी गोलमेज परिषदेच्या निदर्शनास ही गोष्ट तात्यासाहेबांनीं आणावी." यवतमाळचे तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे यांनीं श्री. केळकरांनीं तिसऱ्या गोलमेज परिषदेचें निमंत्रण स्वीकारलें यावरून महाराष्ट्रांत अजून स्वतंत्र बुद्धि कायम आहे असें सांगून, आपलें समाधान व्यक्त केले, आणि श्री. केळकरांनीं विलायतेंत कोणतीं मतें मांडावीं याबद्दल ठिकठिकाणच्या मंडळींनीं ज्या सूचना केल्या त्याबद्दल त्यांना असा इषारा दिला की, " श्री. केळकरांसारख्या मुरलेल्या राजकारणी पुरुषानें विलायतेंत काय सांगावें याबद्दल त्यांना सूचना करण्याचें कारण नाहीं."

" यानंतर वऱ्हाड-मध्यप्रांताचे पूर्वीचे दिवाण बॅ. रामराव देशमुख यांचें विचारपरिप्लुत असें भाषण झालें. ते म्हणाले कीं, " श्री. केळकरांना वऱ्हाडच्या प्रश्नाबद्दल गोलमेज परिषदेपुढें आमची बाजू मांडण्याबद्दल आम्ही सांगितलेच आहे. भावी फेडरेशनबद्दल मला श्री. केळकरांना नम्रतापूर्वक असे सुचवावयाचे आहे कीं, भावी राज्यघटनेंत शेषाधिकार प्रांताकडे न जातां मध्यवर्ती सरकाराकडेच राहतील याबद्दल त्यांनी जरूर खटपट करावी. फेडरेशनला मान्यता देणें याचा अर्थ आमच्यांत एकराष्ट्रीयत्व नाहीं अशी कबुली देणें हा आहे. पण शेषाधिकार मध्यवर्ती सरकाराकडे राहिल्यास आज ना उद्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासना तरी होण्याची आशा राहील. " प्रांतांच्या पुनर्रचनेसंबंधानें ते म्हणाले कीं, "सांप्रतची अनैसर्गिक प्रांतरचना मोडून ज्या त्या लोकांचा इतिहास व संस्कृति लक्षांत घेऊन भाषावार प्रांतरचना होणें आवश्यक आहे." शेवटीं प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरळीत चालण्याच्या दृष्टीनें प्रांतांनाहि दुहेरी कायदेमंडळें असणें आवश्यक आहे असें मत त्यांनीं प्रदर्शित केलें. उमराघतीचे आमदार बाबासाहेब खापर्डे यांनीं असें सांगितलें कीं, दुहेरी कायदेमंडळें अस्तित्वांत आणल्यानें लोकसत्ताक राजपद्धतीच्या मार्गांत नसत्या अडचणी मात्र उत्पन्न होतील,

तेव्हां प्रांतांत तरी दुहेरी कायदेमंडळें अस्तित्वांत येऊं नयेत. धारवाडचे आमदार जोग यांनीं सुचविलें कीं, श्री. केळकरांनी आर्थिक स्वायत्तता हिंदुस्थानाला दिली जाण्यावर गोलमेज परिषदेंत विशेष जोर द्यावा.

"ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं श्री. तात्यासाहेबांना भाषण करण्यास विनंति केली. त्याप्रमाणें श्री. केळकरांनीं भाषण केलें. ते म्हणाले, "आपण दूरदूरच्या ठिकाणांहून येथे येऊन माझ्याशीं विचारविनिमय करून जो प्रेमाचा निरोप देत आहां त्यामुळें मजवरील कार्याची जबाबदारी वाढत आहे. वस्तुतः कार्य आटोपून परत आल्यावर विलायतेंत माझ्या हातून जी कांही अल्पस्वल्प कामगिरी घडेल ती आपणांस पसंत पडून नंतर जर आपण माझा गौरव केला असतां तर बरें झालें असतें. पहिल्या गोलमेज परिषदेला मला व डॉ. मुंजे यांना निमंत्रण आलें. मी निमंत्रण स्वीकारले नाही. परंतु डॉ. मुंजे यांना मुद्दाम पुण्यास बोलावून आग्रहानें निमंत्रण स्वीकारण्यास मी सांगितलें. या वेळीं आलेलें निमंत्रण मी विचार करूनच स्वीकारलें. हिंदु महासभेचा अध्यक्ष असल्यामुळें हिंदु समाजाच्या हिताचें राष्ट्रीय दृष्ट्या संरक्षण करणें हे माझें कर्तव्य होतें. मी गेलीं दहा वर्षे संस्थानी प्रजाजनांच्या चळवळींत लक्ष घालीत आहे; व भावी राज्यघटना ठरत असतांना गोलमेज परिषदेपुढें त्यांची बाजू मांडण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांनी मला तसें सांगितलेहि आहे. वऱ्हाडचा प्रश्न गुंता-गुंतीचा. माझे ऋणानुबंधी लेही वऱ्हाडांत फार. त्यांचें काम हें माझ्या स्वतःच्या कामापेक्षांहि अधिक महत्त्वाचें असें मी समजतों. याशिवाय एकंदर राष्ट्रीय पक्षाच्या मागण्या काय आहेत हें स्पष्टपणें पुढें मांडलें जाणें आवश्यक आहे."

"श्री. न. चिं. केळकर हे तिसऱ्या गोलमेज परिषदेला गेले त्या वेळीं त्यांच्या कार्यांत त्यांना यश यावें म्हणून ज्यांनीं संदेश पाठविले त्यांची नांवें पुढें दिली आहेत—

**वऱ्हाड**—अकोला : श्री. प. चिं. जोगळेकर, गं. बा. बापट, वा. ल. चिपळुणकर, शि. पा. अभ्यंकर, म. के. सोमण, स. बा. केळकर, गो. कृ. चितळे, अ. स. आठल्ये, बुलढाणा, रा. अ. कानिटकर, बी. एच्. जतकर यवतमाळ, वीर वामनराव जोशी, ना. रा. बामणगांवकर, उमरावती.

**नागपूर**—डॉ. मुंजे.

**पुणें**—श्री. द. ग. काळे, शं. रा. दाते, अध्यक्ष हिंदुसभा, ल. र. गोखले, मेंबर, मुंबई कौन्सिल; डॉ. ना. भि. परुळेकर, सं. सकाळ, रा. ब. हणमंतराम रामनाथ, अध्यक्ष व्यापारी संघ पुणे, व्ही. बी. नाईक, अध्यक्ष स्नेहसंवर्धक मंडळ, अ. वि. पटवर्धन, राजाराम रामदासी, अध्यक्ष हिंदु स्टूडंट्स् लीग, पं. रघुनाथशास्त्री, पी. डी. दीक्षित, अहमद हरून जाफर.

**मुंबई**— श्री. दा. ग. विजयकर, सं. प्रभु प्रभात, माधवराव गोडबोले.

**इतर गांवें**—पंत प्रतिनिधि, संस्थानाधिपति औंध, रामचंद्र गोविंदराव ऊर्फ तात्यासाहेब भुइंजकर भुइंज, पु. ल. ओगले, शहापूर, मद्रास, एन्. डी. वरदाचारियर, ना. नटेसन्, श्री. द. वि. कोल्हटकर, जळगांव, बा. वि. शिखरे इस्लामपूर, श्रीमंत सर गंगाधरराव पटवर्धन, अधिपति सं. मिरज, सेक्रेटरी, स्टेट पीपल्स सोसायटी सांगली, आर. बी. खेडकर व ब. गो. कुलकर्णी सांगली, शिवबाळप्पा देशमुख सोलापूर, वा. ना. देशपांडे, सातारा, अ. गो. गानू, कुरुंदवाड, रा. ब. काळे, सातारा, र. पां. करंदीकर, सातारा, ग. ल. पागे, मंगळवेढे, द. प. चिंवाळकर, अमळनेर, रा. कृ. पुराणिक, पनवेल, रा. शं. राजवाडे, सोलापूर, वि. कृ. जोशी, सांगली, गा. मो. फणसे, पेण, पां. बो. जोशी हैद्राबाद (दक्षिण), दा. मो. भट, मिरज, डॉ. वैशंपायन, सोलापूर, ए. एस्. भिडे, सेक्रेटरी सहकारी मित्र मंडळ, वाटेगांव, पांडुआण्णा शिराळकर कऱ्हाड, लक्ष्मणराव देशपांडे कऱ्हाड, अध्यक्ष हिंदु-महासभा वाई, गो. कृ. देशपांडे पंढरपूर, डॉ. द. बा. केळकर, धुळें, गोविंदराव बिनिवाले, आठवले व राजवाडे सांगली, गोपाळराव देसाई, देवळाली, वामनराव नाईक, हैद्राबाद, खरे शिरपूर, बंडोपंत जोशी, देवगड, उपळेकर कोल्हापूर, हिवरगांवकर अहमदनगर, आठवले वानिवडे, रा. ल. लघाटे, मालगांव ( मिरज ), डॉ. हिंगोराणी, कराची, शास्त्रलु, मद्रास.

पुणें महाराष्ट्र नागपूर वऱ्हाड या तीनहि प्रांतांतील माझ्या पक्षाच्या मंडळींची मला गोलमेज परिषदेचें निमंत्रण स्वीकारण्यास संमति होती. नाहीं म्हणावयास बापूजी अणे हे काँग्रेसच्या धोरणांत व कार्यक्रमांत विशेष रीतीनें गुरफटले गेले असल्यामुळें त्यांना माझें जाणें पसंत नव्हतें. पण बुलढाण्याचे

वकील रा. कानिटकर यांनी वऱ्हाड समितीतर्फे संमतीच नव्हे तर वकीलपत्रहि दिलें होतें. यामुळें अणे यांची नापसंती केवळ व्यक्तिशःच ठरली.

ही गोष्ट स्पष्ट करण्याकरितां त्यासंबंधी कांहीं पत्रेंच देतोः—

(ता. २६।११।३२) गोलमेज परिषदेमध्यें वऱ्हाडच्या लोकांतर्फे स्वतंत्र प्रांताची मागणी मांडण्याची कामगिरी तुम्ही पत्करली हें वाचून आनंद झाला. आमचा वऱ्हाड प्रांत हा स्वतंत्र करावा व फेडरेशनमध्यें इतर प्रांतांप्रमाणें स्वतंत्र प्रांत म्हणून त्याची गणना व्हावी अशी आमची इच्छा आहे. या बाबतीत रामराव देशमुख, दादासाहेब खापर्डे इत्यादि लोकांनीं तुम्हाला लिहिलें असेलच. याबद्दल आम्ही एक मेमोरियल म्हणजे अर्ज तयार केला होता. गतवर्षी मी दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेलों होतों. त्या वेळीं लॉर्ड सँकी यांच्याशी वऱ्हाडसंबंधी माझें बोलणें झालें व त्यांना यासंबंधी मी एक टिपणहि दिलें. वऱ्हाडचा प्रश्न चालूं गोलमेज परिषदेपुढें निघेल किंवा नाहीं पहावें. तुमचें पत्र कानिटकरांना रावळपिंडी बोटीवरून आलें. त्यांची प्रत त्यांनीं मला पाठविली. वऱ्हाडांतील मुसलमानांचा विरोध वऱ्हाड प्रांत स्वतंत्र होण्याला नाहीं. परंतु वऱ्हाड हा निजामाला द्यावा किंवा नाहीं असा प्रश्न निघाल्यास ते त्या मागणीला विरोध करणार नाहींत. म्हणजे वऱ्हाड निजामाला न दिला तर तो फेडरेशनमध्यें एक स्वतंत्र अवयव व्हावा याला त्यांची ना नाहीं. तुमच्या पत्रांतून सर अकबर हैदरी यांचें व तुमचें बोलणें होऊन मुद्यांचें टिपण झालें तें मी पाहिलें, आणि तें असावें तसेंच आहे अशी माझी समजूत झाली. निजाम सरकारला दरसाल २५ लक्ष रुपये देणें, त्यांच्या जन्म दिवशी तोफांची सलामी देणें, इत्यादि सन्मानाच्या खुणा निजाम सरकारला हव्या तितक्या द्याव्या. त्याला आमचीहि हरकत नाहीं. पण ज्या अर्थी वऱ्हाड निजाम सरकारकडे जात नाहीं तोंपर्यंत तो स्वतंत्र प्रांत समजला जावा; इतकेंच आमचें आग्रहाचें म्हणणें आहे. (एस. बी. तांबे, पूर्वीचे एक वेळचे गव्हर्नर, नागपूर.)

(ता. २।१२।३२) आमच्या वऱ्हाडच्या प्रश्नाचें काय होतें? तुम्हांस आमची मागणी मांडण्यास केव्हां संधि मिळते याकडे आम्ही लक्ष लावून बसलों आहोंत. तुम्ही प्रश्न काढलात की, "थांबा, फिरून वऱ्हाड निजामालाच देऊन टाकूं अशा धमक्या सुरूं होतील. किंवा सर अकबर हैदरी आणखी कांहीं तरी

मेखा मारून ठेवतील हेहि संभवनीय आहे. हिंदुस्थान सरकार काय किंवा निजाम काय दोघांनाहि तूर्त वऱ्हाडचा प्रश्न लोंबकळत ठेवावयाचा आहे. पुढें मागें परस्परांच्या वादांत त्याचा उपयोग करण्याचा त्यांचा डाव आहे. आमचें मात्र पहाणें असें कीं, वऱ्हाडचें जें व्हावयाचें तें आतांच होऊन जाऊं द्या.

"वऱ्हाडच्या प्रश्न तुम्ही हातीं घेतला असल्यामुळें वऱ्हाडच्या लोकांची बाजू तुम्ही उत्कृष्ट मांडाल असा आम्हास भरंवसा आहे. आम्ही आज गप्प बसलों तर पुढें निजाम आणि हिंदुस्थान सरकारचे अत्यंत लांच खाऊ पोलिटिकल डिपार्टमेंट यांच्या तावडींत आम्ही सांपडूं. दोघेहि डाकूच!" (रामराव देशमुख, अकोला.)

(ता.२।१२।३२) तुमचें मार्सेल्सहून १२ नोव्हेंबरचें पत्र आलें तें पोचलें. वऱ्हाड इंडियन फेडरेशनमध्यें स्वतंत्र विभाग म्हणून सामील होणार, त्याच्या हक्काच्या आड हैद्राबादच्या शिष्टमंडळानें येऊन हरकत काढूं नये अशाविषयीं तुम्ही हैद्राबादकरांचें मन वळवूं शकलांत हें वाचून समाधान वाटलें. आतां नवीन घटनाकायद्यांत वऱ्हाडाला फेडरेशनमध्यें निजामच्या संमतीखेरीज सामील होता यावें अशी तजवीज तुम्हाला करून घेतां येईलसें वाटतें. ( रामचंद्र अनंत कानिटकर, वकील, बुलढाणा. )

( ता. १२।१।३३ ) बापूजी अणे दिल्लीकडे निघाले आहेत. त्यांना तुमची गांठ घ्यावयाची होती आणि ती तुम्ही दिल्लीस जाण्यापूर्वी पडली तर हवी होती. आज सकाळीं खासगी रीतीनें प्रांतांतील लोकांची सभा झाला त्या सभेला बापूजी हजर होते. तुम्ही गोलमेज परिषदेपुढें वऱ्हाडसबंधीं भाषण केलें त्याची प्रत मला मिळाली. ती मंडळीपुढें ठेवण्यांत आली व सर्वांनीं तें भाषण पसंत केलें. आम्ही जो अर्ज केला आहे त्याला धरूनच तें आहे हें सांगावयास नकोच. रावळपिंडी बोटीवरून तुम्ही पाठविलेल्या संभाषणाच्या टिपणांत एक वाक्य असें होतें कीं, " वऱ्हाडच्या लष्करी संरक्षणाच्या खर्चाच्या ज्या रकमेला निजाम मान्यता देईल, त्याचा बोजा वऱ्हाडच्या उत्पन्नावर राहावा. " परंतु अशी गोष्ट काय म्हणून व्हावी ? परंतु सर्वच गोष्टी अजून अनिश्चित आहेत. ( एस्. बी. तांबे, नागपूर.)

( ता. १४।१।३३ ) तुम्ही विलायतेहून परतल्याचें वाचलें. फ्री प्रेस पत्राच्या प्रतिनिधीला तुम्ही दिलेली मुलाखत वाचली. तींत तुम्ही म्हटलें आहे,—

" वऱ्हाड हा निजामाला देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. फक्त वऱ्हाडवर निजामाचा कांहीं तरी दुरून हक्क पोंचतो, इतकेंच दर्शाविण्याची खूण शिल्लक ठेविली म्हणजे झाले. आणि अशीच योजना गोलमेज परिषद ठरवील. " नागपूर कायदेमंडळाचे वऱ्हाडचे सर्व सभासद ता. १९ रोजीं येथें जमणार आहेत. तरी त्यांच्यापुढे ठेवण्याकरितां कांहीं अंतस्थ बातमी तुम्हाला पाठवितां आली तर पहा. तुम्ही परत येतांच तुमच्यामागें काम पुष्कळच लागणार. तथापि अशी कांहीं माहिती लिहून पाठविण्यास तुम्हाला वेळ झाला तर मी तुमचा आभारी होईन.—( एस्. बी. तांबे, नागपूर. )

तिसऱ्या गोलमेज परिषदेत मी काय काम केलें याचें इतिवृत्त परत आल्यावर छापून वाटले त्यांत दिलें आहे. त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. लंडन येथें माझा मुक्काम नोव्हेंबर १२ पासून डिसेंबर पंचवीसपर्यंत होता. ह्यॅन्स केसंट नामक एका प्रतिष्ठित हॉटेलांत राहिलों होतों. रा. ताम्हनकर बी. ए. यांनीं माझ्या सेक्रेटरीचें व व्यवस्थापकाचें काम पत्करलें होतें आणि तें त्यांनीं चांगलें केलें. परिषद व इतर सभा संमेलनें, भेटी परतभेटी, यांचें काम सर्व दिवसभर पुरत असें. परिषदेचें काम फारसें आशाजनक होण्याचा रंग दिसत नव्हता. पूर्वी म. गांधी गोलमेज परिषदेला गेले त्यावेळीं ते इतर पुढाऱ्यांशीं सहकारितेनें वागले नाहींत, आपल्या लहरी चढेल आणि अहंमन्यस्वभावानें त्यांनीं कार्य नासलें, अशी तक्रार सप्रू जयकर इत्यादि करीत. गांधीजींच्या या धोरणानें गोलमेज परिषदेंतील प्रतिगामी लोकांना चांगलेंच फावलें असें दिसून येत होतें. आम्ही दहा बारा लोक एक विचारानें वागत होतों. तथापि नाताळच्या सुटीच्या निमित्तानें सरकारानें परिषदेच्या कामांत गडबडगुंडा करून काम आवरतें घेतलें. नाताळचा पहिला दिवस होतांच मी हिंदुस्थानला परत यावयास निघालों. पूर्वी न मिळालेली अशी यूरोपचा प्रवास करण्याची संधि सहज चालून आली होती. पण हिंवाळ्याचे दिवस अशा प्रवासाला सोईचे नाहींत यामुळें तो बेत रहित केला. परदेशांत आजारी पडण्यापेक्षां यूरोप पहाण्याचा आनंद गमावणें बरें असें मनाशीं ठरविलें.

१९१९ व १९३२ या दोन सालीं मला विलायतेंत रहावें लागलें त्यांत मला जो अनुभव आला त्यावरून मला विलायतेंत युरोपांत राहणें प्रवास करणें एकंदर मानवण्यासारखें नाहीं असें ठरलें. यामुळेंहि पुन्हा १९३३ सालीं गोलमेज परिषदेचें

निमंत्रण मला आलें तें मी नाकारलें. माझें शाकाहारित्व मला नडलें नाहीं. इतकेंच काय शाकाहार संभाळूनहि मला प्रकृति सुदृढ ठेवतां आली. परंतु तिकडील सर्व कामकाज सकाळीं अकरा वाजतां सुरू होतें. त्यापूर्वी भूक चांगली लागत नाही. आणि भरपूर आहार केल्यावर चांगली सुमारें तासभर तरी विश्रांति हवी अशी इकडे मला संवय झाली आहे ती विश्रांति मिळत नाहीं. यामुळें बारापासून दीडवाजेपर्यंतचें काम कंटाळवाणें होतें. झोपेची नड जांभया देऊन भागवावी लागते. सभेच्या कामांत भाग घ्यावयाचा ठरलें असल्यास त्या ताणामुळे झोंपच प्रत्यक्ष येत नाहीं, पण झोंप न आल्यानें होणारा शीण टळत नाहीं. मधल्या दीडाच्या सुटींत फराळ केला तर फिरून झोंप येण्याची आपत्ति. न खाल्ले तर रात्रीं आठ वाजेपर्यंत उपवाशी राहावें लागें. परिषदेचें काम पांच वाजतां संपलें तर खासगी सभा व चर्चा यांचें काम सुरू होई. दुसरी गोष्ट खासगी मुलाखतींची. टिपण ठरलें तर तें संभाळलें पाहिजे हा मनाला मोठा धाक व ध्यास राही. तें साधावयाचें तर त्याचा वेध आधी बराच वेळ लागून इतर काम होत नसें. सर्वांत मोठी अडचण दिवसभर कोट पाटलोणी-सकट सगळें अवजड खोगीर अंगावर घालून बसण्याची. आगगाडी बस-सर्व्हिस हा नक्की साधणें ही देखील अडचण वाटे. मी असावा तितका चपळ नाहीं इतकाच त्याचा अर्थ.

विलायतच्या या दुसऱ्या मुक्कामांत खासगी कार्य-प्रसंगांचीं निमंत्रणें इतकीं येऊन पडत कीं त्यांतल्या एखाद दुसऱ्यालाच हजर राहतां येई. पण बाकींच्यांना न गेलें तरी 'येतां येत नाहीं याबद्दल वाईट वाटतें' अशीं औपचारिक पत्रोत्तरें रोज पाठवावी लागत. एखाद्या फराळाला जेवणाला गेलें तर तें तब्बल दीडदोन तासांचें कृत्य होई. इकडे केसरीकडे खासगी पत्रें पाठविण्याचा मनाचा तगादा त्यांतच असे. अधिक खर्चण्याला भरपूर द्रव्य-साधन असतें तर लघु-लेखक कारकून शिपाई इत्यादि ठेवून बरेंच काम सुकर करतां आलें असतें. निदान मुख्य कामाशिवाय इतर कोणतेंहि काम मागें नाहीं असे असेल तर निभावेल. पण माझी स्थिति सर्वच दृष्टींनीं असमाधानकारक होती. आणखी एक गोष्ट अशी कीं, मला वायफळ औपचारिक गप्पागोष्टी मारण्याचा कंटाळा आहे आणि इंग्रजी पद्धतीनें सफाईदार भाषेनें त्या मारेंतां येत नाहींत. कोठेंहि जेवणाफराळाला जा, एक मिनिटभर तोंडाला विश्रांति मिळावयाची नाहीं. एकच हवेचा प्रश्न किंवा मुद्दा. तो दिवसांतून दहावेळ निरानिराळ्या तऱ्हांनीं बोलावा लागतो. इंग्रजाला आपल्या हवेची कोणी निंदा केलेली आवडत नाहीं आणि तिला

सांगली म्हणण्याचा योग क्वचितच येतो. शेजारीं एखादी बाई बसली असली म्हणजे तिच्या शिष्टपणाच्या, संभावितपणाच्या, दाक्षिण्याच्या भावना संभाळून बोलणें कठिण होऊन बसतें. तात्पर्य, विलायत युरोप हें मानवण्याला माझी शरीर-प्रकृति व मनःप्रकृति दोन्ही पुन्या प्रतिकूल असें अनुभवाला आलें. पण आतां पुन्हां तिकडे जाण्याचा प्रसंगहि नाहीं म्हणा !

आतां या दुसऱ्या खेपेच्या सफरीची कांहीं प्रास्ताविक हकीकत सांगावयाची. पण लंडनला मेल्यावर प्रथमच वर्तमानपत्राच्या बातमीदारानें मला विचारल्या-वरून त्याला मी जी हकीकत सांगितली तीच मुलाखत अनायासें उपलब्ध असल्यानें प्रश्नोत्तररूपानें सांगतोः—

प्रश्न—आपली ही विलायतेस येण्याची दुसरी खेप नव्हे काय ?

उत्तर—होय, दुसरी. पण पहिली खेप संपवून परत गेलों तेव्हां पुनः मी विलायतेस येईन अशी कल्पना मला स्वप्नांतहि आली नाहीं; व मनांतून तशी विशेष इच्छाहि पण नव्हती. मात्र माझे एक गुजराथी स्नेही शेट दीपचंद जव्हेरी यांच्या घरीं ( नं. ६० टॉलबट रोड बेस वॉटर येथें ) लो. टिळक, मी, वासूकाका जोशी, खापर्डे वगैरे मंडळी राहत होतों, तेव्हां दीपचंद मला नेहमीं म्हणत असत कीं, "केळकर, तुम्ही पुनः विलायतेस येणार खास असें माझें भविष्य आहे. तर केव्हां येणार तें सांगा " तेव्हां मी त्यांना म्हणे कीं, " मी पुनः येणार हें भविष्य जर तुम्ही करतां तर केव्हा येईन याचेंहि भविष्य तुम्हांला कां करता येऊं नये ? मला तर तूर्त संभव दिसत नाहीं. " सुमारें २-३ वर्षांपूर्वी अहमदाबादेच्या शेतकरी परिषदेचा अध्यक्ष म्हणून काम संपवून मी मी सुरतेस जव्हेरीशेट यांचा पाहुणा म्हणून गेलों. तेव्हांहि त्यांनीं पूर्वीचीच गोष्ट काढली. तेव्हां मी त्यांना म्हणलों, " तुमच्या भविष्याला आतां मुदतीचा कायदा लागणार ! तेव्हां ती बात सोडून द्या. " पण कांहीं लोक कायद्यांतील मुदत होऊन गेली तरी इमानानें ऋण फेडतात. त्याप्रमाणे जव्हेरीशेट यांच्या भविष्याचें झालें आहे. कारण पुन्या १३ वर्षांनंतर पुनः मी विलायतेला आलों ! आणि मौज ही कीं पूर्वी एका २९ तारखेला मुंबईस आगबोटींत बसलों व बरोबर त्या म्हणजे २९ तारखेसच या खेपेसहि मुंबईस आगबोटींत बसलों.

प्रश्न—सामानसुमानाची तयारी कशी काय झाली ?

उत्तर—पहिल्या खेपेपेक्षां पुष्कळच त्वरित झाली. पण फकीर बैरागी लोक खरे सुखी. कारण हिंदुस्थानाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत केवळ खांद्यावर वाहून नेण्याइतक्या सामानानें त्यांचें काम सहा ऋतु व तीन काळ भागतें. पण एखाद्या विरागी माणसालाहि स्वतःच्या नसला तरी दुसऱ्याच्या हव्यासाच्या आग्रहापासून उपद्रव होतो. म. गांधी यांना प्रवासाला किती थोडें सामान लागत असेल याची कल्पना कोणीहि करील. पण मला असें समजतें कीं १९३१ सालीं त्यांच्या प्रेमाखातर इतर मंडळींनीं मुंबई बंदरावर बोटीवरील त्यांच्या खोलींत इतकें सामान भरून दिलें कीं, त्याची वाट कशी लावावी यावर तीन दिवस एक कमिशन बसून, सभासदांचा मतभेद होऊन, महात्मा गांधींना निर्णयाचा सर्वाधिकार आपल्या हातीं घेऊन निम्म्याहून अधिक सामान एडनहून मुंबईस परत पाठवावें लागलें !

प्रश्न—आपला प्रवास एकंदरीनें कसा काय झाला ?

उत्तर—एकंदरीनें प्रवास फारच सुखकर झाला. फक्त जुन्या प्रवासाची याहि खेपेला बरोबर पुनरावृत्ति व्हावयाची होती म्हणूनच कीं काय नेमकें भूमध्य समुद्रांत प्रवासाच्या शेवटल्या दिवशीं बारा तास वादळ झालें. पण उद्यांपासून समुद्रप्रवास संपला या खुषींत असल्यामुळें त्याचें आम्ही कांहीं मानलें नाहीं. पूर्वीच्या प्रवासांत तेव्हां जर्मनीशीं पक्का तह न झाल्यामुळें आमची बोट मार्सेल्सला लागली नाहीं यामुळें अटलांटिक महासागर व इंग्लिश चॅनल यांमधून आणखी ८-९ दिवस समुद्रप्रवास करावा लागला होता. तो मात्र या खेपेस टळणार ही आनंद वाटण्यासारखीच गोष्ट होती.

प्र.—तर मग आपण फ्रान्सची भूमि यंदाच प्रथम पाहिली म्हणावयाची !

उ.—होय. पण येतांना भूमि पाहिली इतकेंच पाहिलें. कारण मार्सेल्सहून संध्याकाळीं ४॥ वाजतां आगगाडींत बसलों तों कॅले बंदरावर दुसरें दिवशीं दोन प्रहरीं एकाचें सुमारास येऊन पोंचलों. वाटेंत पॅरिस शहर लागलें. खुद्द पॅरिस स्टेशनावर गाडी उभी राहिली. पण पुण्याची पॅसेंजर गाडी भायखळ्यावर थांबते तितका वेळ थांबली. तितक्या अवधींत मी प्लॅटफॉर्मवर उतरून पॅरिस जितकें 'पादाक्रांत' करतां येईल तेवढें केलें. म्हणजे खरा फ्रान्स अजून मला पहावयाचाच आहे. मात्र आदले दिवशीं दोन तास व दुसरें दिवशीं ६ तास आगगाडींतून फ्रान्सचा प्रदेश

भरपूर पाहावयास सांपडला. तसेंच रात्रीं चांदणें होतें यामुळें भिंगाच्या खिडकींतून कांहीं वेळ पहात बसलों होतों.

प्र.—हा प्रदेश पाहून आपली काय कल्पना झाली ?

उ.—कल्पना हीच कीं इकडे हिंदुस्थानसारखे मोठे भूभाग कांहींच दिसत नाहींत. डोंगर नद्या भेटल्या तरी हिंदुस्थानाच्या मानानें लहान. पण सपाटी असो, डोंगराळ असो, सगळ्या भागावरून माणसाचा हात फिरला आहे असें स्पष्ट दिसतें. रानवट किंवा इंग्रजींत ज्याला ' वाइल्ड ' असें म्हणतात असें कोठेंच कांहीं दिसलें नाहीं. हिंदुस्थानप्रमाणें मोठें वृक्ष नाहींत. आहेत ते सुरूच्या झाडासारखे म्हणजे बारीक पानांचे असतात. मात्र सरळ उंच असतात. आणि पाहावें तेथें लागवड करून मुद्दाम लावल्यासारखे हारींच्या हारींनें दिसतात. गाईम्हैशांच्या कळपांकरितां राखलेलीं मोठमोठीं कुरणें देखील नव्या दिल्लींतील हरळीगवताच्या राखीव मैदानाप्रमाणें सपाट दिसतात. बागबगीचे विस्तृत असे कोठेंच नाहींत. थोड्या जागेंत पुष्कळ पीक काढण्याची विद्या सफळ झाल्यामुळें लहान लहान तुकडे करून लागवड करतात तसें दिसतें. बांधउरोळ्या कोंकणच्या बांधासारख्या. एक गोष्ट विशेष दिसली कीं फ्रान्समध्यें आगगाड्यांचा फैलाव फार. बहुतेक सर्व वाटभर रेल्वे यार्डातूनच जातों कीं काय असें भासत होतें. मधून मधून जंक्शनें व रेल्वेच्या शाखा बऱ्याच आढळत. उलट सुलट जाणाऱ्या गाड्यांचीहि रहदारी बरीच दिसली. असे दोन तीन मैलहि जात नव्हते कीं जेथें एखादें लहानसें खेडें रेल्वेलगत नव्हतें, व जें पहावें तें टुमदार व नमुनेदार. विजेची रोषनाई नाहीं असें गांव क्वचितच दिसलें व खेडेगांवांत वीज कशी परवडते याचें आश्चर्य वाटलें. खेडीं सांधणारे रस्ते व रानांतील रस्ते अरुंद पण अत्यंत नीटनेटके व वळणदार. रस्ता अरुंद ठेवण्यांत खर्चाची जी बचत होत असेल ती तो रस्ता दुरुस्त ठेवण्यावर खर्च होत असावी.

प्र.— आगबोटीवरील दिवस सहवासाच्या दृष्टीनें कसे गेले ?

उ.—पूर्वीच्या खेपेपेक्षां यंदा बोट मोठी आणि गर्दी कमी होती. कारण विलायतेला जाण्याचा आतां उलटा मोसम होता. तेव्हां सुलटा होता. यामुळें या खेपेस अगदीं जरूरीच्या कामानिमित्त जाणारी तेवढी मंडळीच बोटीवर होती. सुदैवानें मला सर्वांत वरच्या डेकवर खोली व तीहि सिंगल

म्हणजे एका माणसाची असल्यामुळें मी खालच्या डेकवर क्वचितच जाई. वरचें माझें डेक मला पुरून उरण्याइतकें होतें म्हणून हिंडून फिरून वाचून वेळ घालवीत होतों. अपरिचिताशीं आपण होऊन ओळख करून घ्यावी किंवा नसत्या गोष्टी उकरून काढून बोलाव्या याचा मला कंटाळा आहे. शिवाय ज्या कामाकरितां निघालों त्यासंबंधीच वाचावयाचें कितीतरी होतें. खालीं येणेंजाणें जेवणापुरते किंवा बरोबरच्या हिंदी प्रतिनिधींशीं बोलण्यापुरते.

प्र.—मग तेथें गोलमेज परिषदेविषयी बरींच चर्चा होत असेल ?

उ.—होत होती. पण याविषयी मनमोकळेपणानें बोलणें होई तें सप्रू, जयकर, मी, व सर कावसजी जहांगीर यांच्यामध्येंच होई. इतरांपैकीं सर अकबर हैदरी, डॉ. शफत अहमदखान व वाजायत हुसेन यांच्याशीं संभाषण होई. हैदरी यांच्याशीं मी वऱ्हाडासंबंधानें बोलत असे; कारण वऱ्हाडची मागणी अशी आहे कीं आपला प्रांत हिंदी प्रांतापासून अलग व स्वतंत्र व्हावा, पण निजामाच्या राज्यांत परत जाऊं नये. डॉ. अहमदखान यांच्याशीं हिंदु-मुसलमानांच्या संबंधीं कांहीं भाषण होई, पण अधिकारानें बोलण्याइतके ते जबाबदार नाहींत असें दिसलें. पण इतिहासाचे प्रोफेसर म्हणून त्यांच्याशीं गप्पा मारीत होतों. वाजायत हुसेन हे काश्मिर संस्थानचे प्रतिनिधि व तरुण सिव्हिलियन आहेत. मी पूर्वी विलायतेला गेलों तेव्हां कॅब्रिज येथें त्यांची गांठ पडली होती. त्यांच्या सांगण्यांत असें आलें की, काश्मिरच्या महाराजांचें मुसलमान प्रजेशीं वागण्याचे धोरण खरोखरीच चांगलें आहे व दंगेधोपे होतात ते फालतू माणसांकडून होतात. शिवाय बाहेर गवगवा ऐकूं येतों इतका मुळांत बखेडा नाहीं. काश्मिर संस्थान फेडरेशनमध्यें सामील होऊं इच्छितें असेंहि दिसलें.

प्र.—सप्रू, जयकर व आपण या त्रिवर्गांच्या संभाषणांत काय निष्पन्न झालें ?

उ.—सप्रू, जयकर या दोघांनाहि परिषदेच्या फलश्रुतीबद्दल थोडी चिंताच वाटत होती. पण मध्यवर्ती सरकार जबाबदार करण्याचा प्रश्न न निघेल, किंवा निघून त्यास वाटाण्याचा अक्षता लागतील, तर आपण त्यापुढें परिषदेच्या कामांत भाग घेऊं नये असें माझ्याप्रमाणें त्यांचेंहि म्हणणें दिसलें. एकंदरीनें पुढारी या

नात्यानें सप्रू यांचा रोख बरा दिसला. आम्हांवर इतरांपेक्षांहि कांहीं विशेष जबाबदारी पडत आहे ही जाणीव त्यांना असलेली दिसली.

प्र.—लंडनमधील मुक्कामाची सुखसोय आपणांस कशी वाटते ?

उ.— ही सुखसोय पूर्वीपेक्षां या खेपेस मला यंदा विशेष रीतीनें करूनच घ्यावी लागली आहे. पूर्वी उन्हाळ्यांत आलों. यंदा भर हिंवाळ्याशीं गांठ पडली आहे. पूर्वी चिटणीस म्हणून आलों, हल्लीं यजमान किंवा स्वतःचा प्रतिनिधि या दोनहि कारणांमुळें विशेष चांगल्या प्रतीची जागा घेऊन, विशेष चांगल्या पद्धतीनें राहावें लागत आहे व त्याप्रमाणें करीतहि आहे. यामुळें सुखसोयींचा प्रश्न फारसा उरलेला नाहीं. खर्च मात्र किती होईल हें न सांगितलेलेच बरें.

प्र.—पण सरकार भत्त्याच्या रूपाने प्रतिनिधींना कांहीं रकम देणार आहेना ?

उ.—तें तर उघडच आहे. पण तो सर्व भत्ता संपून बहुतेक प्रतिनिधींना पदरमोड बरीच करावी लागेल.

प्रश्न—येथील मुक्कामाचा अंदाज काय आहे ?

उ—सर्वच बाजूंनीं नाताळाची मजल दिसते. तशी उचलच आहे. तसें झालें तर मला आनंदच वाटेल. कारण माझ्यासारख्या बैठ्या वृत्तीच्या माणसाला कारणाशिवाय एक दिवसहि अधिक या असल्या हवेंत राहणें आवडणार नाहीं. याचा अर्थ कामच लांबलें तर हवेला कंटाळून तें टाकून देऊन जाईन असें मात्र नाहीं.

प्रश्न—मग याहि खेपेस युरोपखंड पहाण्याची आपली इच्छा साधणार नाहीं.

उ.—मी स्वतः प्रवासाचा कंटाळा करणारा असल्यामुळें बहुधा एकदमच हिंदुस्थानास परत जाईन. कारण या हिंवाळ्यांत युरोप झालें तरी इंग्लंडासारखेच. जॉन्सनप्रमाणेंच मीहि असें म्हणणारा आहे कीं, I want to see but I do not want to go to see " पहावेसें वाटतें, पण पहावयासाठी उठून जावेसें वाटत नाहीं." अर्थात् माझ्यासारख्या माणसाला कोण कृपाळू उपकारी देवदूत खांकेत मारून हिंडून जग दाखविणार ! तेव्हा डोळे मिटून कल्पना करून किंवा डोळे उघडून लेखीं वर्णनें वाचून भूगोलाचें ज्ञान मिळवावें झालें.

मी लंडनला पोंचल्याच्या दुसऱ्याच दिवशीं लंडन टाइम्सच्या बातमीदारालाहि माझी मुलाखत घ्यावीशी वाटली. ती मी दिली. तिची हकीकत त्या पत्रांत आली ती तशीच या खालीं ( भाषांतर करण्याच्या कंटाळ्यामुळें ) इंग्रजींतच देतोः—

Mr. N. C. Kelkar, who, at the Round Table Conference represents, among other interests, the Hindu Mahasabha, was received and welcomed on arrival in London, along with official representatives and the Press, by his numerous Indian friends.

Mr. Kelkar had visited England in 1919 as a member of the Deputations which gave evidence before the Joint Parliamentary Select Committee on behalf of the Indian National Congress and the Indian Home Rule League. He confessed that in his opinion there was a great difference between the position of Indian politics then and now. One of the principle points of difference was that the Deputations had then come to England, along with other individual witnesses, to suggest alterations, not so much in the principle as textual provisions of the bill, relating to Indian Reforms, which was already introduced in the Parliament. The position in 1932, on the occasion of Mr. Kelkar's second visit to England, was obviously materially advanced, as the two Round Table Conferences had already met and the third was now meeting to discuss principles and plans of a very comprehensive scheme of Indian Reforms, possibly going up to the point of an All India Federation, by the far more acceptable method of discussion and agreement as far as possible across the table. Further the coming Joint Select Committee, though relating to a bill, which would be framed as a result of the deliberations of all the three Round Table Conferences, was to be held before the bill itself would be introduced in the Parliament. The two things together evidently meant that full latitude should be available for persuasion, and perhaps even mild political pressure, on either side with

a view to the framing of a bill of reforms calculated to take into consideration both the principle of self-determination and the exigencies of the political situation with regard to Parliamentary Government. For all these reasons Mr. Kelkar considers that the final session of the Round Table Conference is a very important one, involving, however, for the same reason, great responsibility not only upon the non-official members but also upon the Indian States' Representatives, and perhaps more especially on the British Delegation to the Conference. Mr. Kelkar said he could not possibly make a guess as to how the situation would develop. But he hoped that the Communal questions had been practically settled, whether agreeably or disagreeably to certain communities. The field is now ready and open for the Indian States' Representatives to come forward with their much valued verdict as to whether they would enter the Federation or not. And in case a reasonably considerable number of the States express their willingness to join the Federation, the Conference would naturally and necessarily have to give the first place to what should be done about the Federation itself. For responsibility in the Centre appears somehow to be made dependent upon the States coming into the Federation, although there was also, as is well-known, another view of the matter. As for Provincial Autonomy that seems to be already so much a matter of common ground, that neither the Conference nor the outside world feel great or particular interest in it, in relation to a Round Table Conference of this nature, where the chosen representatives of the three realms of the Empire have been invited for common deliberation at such great cost and inconvenience.

As for himself, Mr. Kelkar said, he was called upon to attend the Conference at very short notice, as must have also been the case with a number of other members of the

Conference, who found it impossible for them to attend here on the 15th, which at first was stated to be a peremptory date for the Commencement of the Conference.

ही हकिकत अशी देण्याचें कारण हें कीं, लंडन टाईम्सारख्या एका अत्यंत वजनदार पत्रांत जबाबदार रीतीनें मी गोलमेज परिषदेच्या स्वरूपाविषयीं व फलश्रुतीच्या कल्पनेविषयीं जें मत पूर्वीच प्रगट केलें तें या प्रकरणीं नमूद झालेलें असावें.

गोलमेज परिषदेच्या कामाला ता. १७ नोव्हेंबर रोजीं सुरुवात होऊन तें ता. २३ डिसेंबर रोजीं संपलें. अध्यक्षाच्या जागीं प्रथम मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड, नंतर लॉर्ड सँकी, व सँकीच्या अभावी स्टेट सेक्रेटरी सर सॅम्युअल होअर हे बसत.

परिषदेच्या कार्यक्रमाविषयी मी पहिल्याच दिवशीं तक्रार मांडली. कारण गौण विषय प्रथम चर्चेला घेऊन वेळ घालवावयाचा, व पुढें वेळ थोडा म्हणून गडबडगुंडा करून महत्वाच्या विषयांना टाळा द्यावयाचा असा बेत दिसला. तेव्हां रॅम्से मॅक्डोनाल्ड म्हणाले कीं, तसा कांहीं आपला हेतू नाहीं. कार्यक्रमांत कोणाला बदल करावा असें वाटल्यास सभासदांना परवानगी दिली जाईल. त्याप्रमाणें मी वऱ्हाड, ब्रम्हदेश, मूलभूत हक्क इत्यादि विषय पुढें सुचविले आणि त्यांच्या चर्चेला वेळ मिळविला. सर सप्रू व सर मनुभाई मेथा यांनींहि असेच कांहीं विषय सुचविले. शिवाय ता. १२ डिसेंबर रोजीं भरलेल्या आमच्या नॅशनलिस्ट पार्टीच्या सभेंत ठराव होऊन कार्यक्रमाच्या अडचणीबद्दल अध्यक्षांना पत्र लिहिण्यांत आलें, त्यानें माझ्या मूळच्या तक्रारीला पाठिंबा मिळाला.

या पत्रांत असें सुचविलें होतें कीं, किरकोळ गोष्टी मागें टाकून फेडरेशनची घटना, संस्थानांचा त्यांत प्रवेश, लष्करी खातें, आणि मध्यवर्ती सरकाराचे अधिकार व हिंदी प्रतिनिधींना त्यांत मिळणारी सत्ता या गोष्टींना फार महत्व असल्यामुळें त्यांची चर्चा करून व्हावी आणि त्याला वेळेची सबब सांगितली जाऊं नये.

पण अखेर वेळेचा संकोच झालाच. यामुळें कांहीं कांहीं प्रश्नांच्या विचाराकरितां उपमंडळें नेमण्यांत आलीं आणि शेवटीं अगदीं आयत्या वेळीं त्यांचे रिपोर्ट नुसते दाखल करून घेण्यांत आले. त्यांवर फारशी चर्चा झाली नाहीं.

परिषदेंत मी एकंदर सात विषयांवर भाषणें केलीं आणि मेमोरॅंडम्सच्या रूपानेंहि कांहीं मुद्दे व चर्चा परिषदेच्या कागदपत्रांत दाखल होईल अशी तजवीज आग्रहपूर्वक केली.

मी दिलेल्या लेखी कैफियतींत, (१) मांडलिक संस्थानिक जहागिरदार यांच्या हक्क संरक्षणाची जामीनकी, (२) संस्थानिकांचा फेडरेशनमध्यें लोकनियुक्त प्रातिनिधिद्वारां प्रवेश, आणि (३) कॅम्यूनल अवार्ड (जातिनिर्णय) या विषयावरील माझें म्हणणें मांडलें होतें. या तिसऱ्या कैफियतीवर बॅ. नानकचंद व संरदार तारासिंग यांनीं मजबरोबर सह्या केल्या होत्या. माझ्या भाषणाचे विषय खालीलप्रमाणें होतें. (१) कार्यक्रमांत फेरफार, (२) मतदारांच्या लायकीचे नियम, (३) शेषाधिकाराचा प्रश्न, (४) गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांचे राखीव अधिकार, (५) राष्ट्रसंरक्षण आणि सैन्य, (६) जनतेचे मूलभूत हक्क, (७) वऱ्हाडचा प्रश्न.

असो; गोलमेज परिषदेंतील माझ्या कामासंबंधानें एक गोष्ट मुद्दाम सांगावीशी वाटते ती ही कीं माझे अकारण वैरी विविधवृत्तकार यांनीं विलायतेंत असतांनाहि माझी पाठ सोडली नव्हती. गोलमेज परिषदेस गेलेल्या एका निनांवी गृहस्थाची साक्ष देऊन त्यांनी माझें गो. मे. परिषदेतलें काम वाईट झालें असें लिहिलें होतें. याला उत्तर असेंब्लींतील माझ्या कामकाजाविषयीं लोकमत हें तर होईलच. गो.मे. परिषदेंतील माझ्या सर्व भाषणांचा रिपोर्टच मी छापला आहे ! पण एक स्वतंत्र अभिप्राय परवा सहज कागदपत्र चाळीत असतां आढळला तो देतों.

(ता. १५।१२।३३) "तिसऱ्या राउंड टेबल कॉन्फरन्समधील तुमचें काम तुमच्या व माझ्या देशाला उपयुक्त असेंच झालें. या देशसेवेबद्दल हिंदी लोक तुमच्याशीं कृतज्ञ रहातील यांत शंका नाहीं. (सर मनुभाई मेथा, दिवाण, बिकानेर).

पण या शिवाय गोलमेज परिषदेंत झालेलें माझें एक भाषणच देतों. म्हणजे त्यावरूनहि माझें काम कसें काय झालें हें कळून येईल. फेडरेशन झालें तरी शेषाधिकार कोणाकडे रहावें, म्हणजे मध्यवर्ती सरकाराकडे कीं प्रांतिक सरकाराकडे, या विषयावरील तें भाषण आहे. तें असें:—

गोलमेज परिषदेपुढें जे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांत संयुक्त सरकाराचे अधिकार किती व कोणते असावें हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. मुसलमा-

नांच्या ज्या मुख्य चौदा मागण्या आहेत त्यांत प्रांतिक सरकाराकडे सर्व शेषाधिकार असावें अशी आग्रहाची मागणी आहे. संस्थानांनाहि हेंच पाहिजे. या दोन्ही पक्षाची योजना अशी कीं संयुक्त सरकाराच्या घटनेमध्यें विशिष्ट अधिकार नांवनिशीवार देऊन ते मुख्य मध्यवर्ती सरकाराकडे ठेवावयाचे, व बाकी राहिलेले सर्व अधिकार प्रांतांनी भोगावयाचे. त्यांच्या मतें अशी वांटणी झाल्याशिवाय पूर्ण प्रांतिक स्वायत्तता मिळाली असे होत नाहीं. परंतु एकंदरींत राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें पाहतां मध्यवर्ती सरकाराचा लगाम सैल झाला कीं प्रांतिक सरकारें व संस्थानें आपल्या राज्यांत वाटेल तो धुमाकूळ घालतील अशी परिस्थिति येणें बरें नाहीं.

हिंदुस्थान सरकार व स्वराज्याचे इतर घटक यांचे संबंध काय असावें, त्यांना कोणकोणते अधिकार असावेत, यासंबंधीं व विशेषतः शेषाधिकाराच्या प्रश्नासंबंधीं मला कांहीं विचार पुढे मांडावयाचे आहेत. प्रथमतःच मला एक गोष्ट सांगावीशी वाटतें ती ही कीं, या शेषाधिकाराच्या प्रश्नांत ज्ञातिविषयक आग्रहाचा विशिष्ट रंग असूं नये व नाहींहि. मि. जिना यांनीं मुसलमान समाजातर्फे म्हणून जे सुप्रसिद्ध चौदा मुद्दे मांडले त्यांत हा प्रश्न गोवल्याकारणानें याला ज्ञातिविशिष्ट स्वरूप आलें आहे. हिंदु सभेनें ही मागणी मान्य केली नाहीं. त्याबरोबरच हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हिंदुस्थानाचे कांहीं हिंदु प्रांत व कांहीं मुसलमान प्रांत असे ज्ञातिनिष्ठतेच्या दृष्टीनें झालें तरी, त्यामध्यें हिंदु प्रांतांची संख्या अधिक असणार यांत शंका नाहीं. आणि म्हणूनच, जर शेषाधिकार मध्यवर्ती सरकाराकडे रहावें, प्रांतांकडे राहूं नयेत, असें मी म्हटलें तर मी हिंदूंच्या हिताविरुद्ध बोलतों असें होईल. पण तसें शक्य नाहीं. म्हणूनच मला अशी विनंति करावयाची आहे कीं, ह्या प्रश्नाचा विचार तात्त्विक मुद्द्यावरच व्हावा. निदान मी तरी या बाबतींत पूर्णपणें निःपक्षपातबुद्धीनें बोलतों आहे असें आपण समजावें.

आपणा सर्वांना माहीत आहे कीं, राज्यशास्त्राचा विचार करणारे लोक संयुक्त राज्यपद्धतीचे दोन प्रकार कल्पितात. एक व्यष्टीकडून समष्टीकडे जाणारा प्रकार, व दुसरा समष्टीकडून व्यष्टीकडे येणारा. पहिल्या प्रकारांत मध्यवर्ती सत्ता ही मुख्य धरावयाची व त्या सत्तेचा कांहीं भाग प्रांतांना तोडून द्यावयाचा. हे प्रांत किंवा घटक पूर्वी स्वायत्त नसतात किंवा स्वतंत्र नसतात; या घटकांना

मुख्य सत्तेशीं गट्टी करून संयुक्त राज्यपद्धति अंमलांत आणण्याची विनंति केलेली असते. म्हणूनच मुख्य सत्तेचे कांहीं अधिकार या प्रांतांना वांटून द्यावयाचे असतात. दुसऱ्या प्रकारांत प्रांतिक सत्ता किंवा घटक पूर्वीचेच स्वतंत्र असतात. त्यांनीं आपल्या पूर्वीच्या अधिकारापैकीं कांहीं अधिकार मध्यवर्ती सत्तेला द्यावें अशी विनंति त्यांना करण्यांत येते व अशा रीतीनें संयुक्त राज्यपद्धति बनते. यामुळें ज्या प्रांतांनीं शेषाधिकार, म्हणजे जी सत्ता किंवा जे अधिकार, मध्यवर्ती सत्तेला दिलेले नसतात ते त्यांच्याकडे राहतातच. परंतु आज हिंदुस्थानांत जी पद्धति आपण उत्पन्न करूं पाहतो ती या प्रकारची नाहीं. ती पहिल्या प्रकारची म्हणजे समष्टीपासून व्यष्टीकडे अधिकारदान जींत होतें अशी आहे. आज मध्यवर्ती सत्तेलाच सर्व अधिकार आहेत, व ती सत्ता हे अधिकार प्रांतांना देणार आहे. तेव्हां जे अधिकार मध्यवर्ती सत्तेनें वांटून दिल्यानंतर शिल्लक राहतात ते मध्यवर्ती सत्तेकडेच राहिले पाहिजेत हें सहज आहे. जे अधिकार मध्यवर्ती सत्ता प्रांतांच्या स्वाधीन करील त्यांची नांवनिशी दिली पाहिजे. म्हणजे शिल्लक उरणारे अधिकार मध्यवर्ती सत्तेचेच राहतील यांत शंका काय ? आज आपल्यास ही अधिकारवांटणी कशी करावयाची हें ठरवावयाचे आहे. लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत अधिकारांचें केंद्रीकरण अगदीं पराकोटीला गेलें. आतां उलट प्रकार सुरूं होणें साहजिकच आहे.

१७७४ चा 'रेग्युलेटिंग ॲक्ट' होण्यापूर्वी मुंबई, मद्रास, बंगाल हे प्रांत हिंदुस्थानांतील एका मध्यवर्ती अशा सत्तेखालीं नव्हतेच. ती मध्यवर्ती सत्ता इंग्लंडांत होती. ही पद्धति वरील कायद्यामुळें बदलली. १८५८ मध्यें कंपनीचा कारभार बंद होऊन इंग्रजी साम्राज्यसत्ता तो कारभार पाहूं लागली. या बदलाबदलींत फक्त मुख्य धनि बदलला. परंतु सत्तेचें केंद्र इंग्लंडांतच राहिलें. हींच केंद्रीकरणाची पद्धत सर्व खात्यांतूनहि चालूं होती व त्या त्या खात्यांच्या अधिकाऱ्यांच्या हातीं सर्व सत्ता असे. चाळीस पन्नास वर्षांपूर्वी ज्याप्रमाणें वऱ्हाडांत दिवाणी, मुलकी, फौजदारी व न्यायखात्याचे अधिकार पुष्कळ वेळा एकाच अधिकाऱ्याच्या हातीं असत त्याप्रमाणेंच पूर्वी स्थिति होती. लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत तर या केंद्रीकरणाचा कळस झाला.

१९०७ सालापासून मात्र प्रतिक्रियेला सुरुवात झाली. त्या सालीं मुंबई इलाख्यांत अधिकारविभागणीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक चौकशीमंडळ

नेमण्यांत आलें व त्यापुढे लो. टिळक आणि ना. गोखले यांच्या साक्षीहि झाल्या. अधिकारविभागणीचें प्राथमिक स्वरूप असें दिसून आलें की, गव्हर्नरानें आपले कांहीं अधिकार कमिशनरला दिले, कमिशनरनें कलेक्टरला दिले, कलेक्टरनें डे. कलेक्टरला दिले; व अशा रीतीनें तें लोण अगदीं कनिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत पोहोचविण्यांत आलें. अर्थात् हें झालें तरी ते खात्यांच्या चौकटींतच. त्याचबरोबर अधिकारविभागणीचा हा ओघ स्थानिक स्वराज्य संस्थापर्यंतहि पोहोचला. १९१२ सालीं शहरांतील म्युनिसिपालिट्यांना व पुढें बोर्डांनाहि लोकनियुक्त अध्यक्ष असण्याचा अधिकार मिळाला. १९११ सालीं प्रथमच आमच्या कानावर 'प्रांतिक स्वायत्तता' हे शब्द पडले. त्यासालीं सुप्रसिद्ध दिल्ली दरबार भरला त्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत राजेसाहेबांनीं 'प्रांतिक स्वायत्तता' या शब्दांचा उच्चार केला. आपण झालों तरी या परिषदेंत पूर्वीपासून चालत आलेल्या अधिकारविभागणीचीच पद्धति पूर्णांशाला नेण्याचा प्रयत्न करीत आहों. प्रत्येक प्रांत स्वयंघटित होऊन विशिष्ट बंधनांनीं मध्यवर्ती संयुक्त सत्तेशीं तो निगडित झाला, म्हणजे अधिकारविभागणीचें तत्त्व पूर्णपणें सिद्धीस गेले असें होईल. संयुक्त राज्यघटना अस्तित्वांत आली आणि अधिकार-विभागणीची पद्धतिहि कडेला लागली, तरी मध्यवर्ती सरकाराची कल्पना शिल्लक राहतेच. आणि मध्यवर्ती सरकार असावयाचें तर तें समर्थ व कार्यक्षम असलें पाहिजे. यास्तव त्यालाच शेषाधिकार असले पाहिजेत.

असें समर्थ सरकार अनेक दृष्टींनीं उपयुक्त असतें. डॉ. सप्रू व बॅ. जयकर यांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानामध्यें दिवाणी व फौजदारी कायद्यांत एकसूत्रीपणा राहण्यासाठीं, इतर देशांशीं असलेल्या राजकीय व व्यापार-विषयक संबंधांची पाहणी करण्याकरितां, तसेंच प्रांताप्रांतांमध्यें सीमान्तप्रदेशाबद्दल भांडण उपस्थित झालें असतां त्याचा निवाडा देण्यासाठीं जबाबदार मध्यवर्ती सरकाराची अत्यावश्यकता आहे.

दुसऱ्याहि एका दृष्टीनें मध्यवर्ती सरकार कार्यक्षम असणें योग्य होय. प्रांताप्रांतामधील आर्थिक बाबी ठरवून द्यावयाच्या वेळीं वडीलकीच्या नात्यानें निर्णय करण्यास कोणत्या तरी वरिष्ठ सत्तेची मरज आहेच. हाच मुद्दा एका गोष्टीनें अधिक स्पष्ट करून सांगण्यासारखा आहे. एखादा कोणा एका गृहस्थानें

मरतांना आपल्या सर्व जिंदगीचें मृत्युपत्र केलें व त्यांत तीन मुलांना एकद्वितीयांश, एकचतुर्थांश, व एकपंचमांश असे भाग अनुक्रमें मिळावें अशी योजना केली. परंतु पुढें असें आढळून आलें कीं, त्या तीन मुलांमध्यें १९ हत्ती वांटावयाचे होते! बरें, बापाच्या इच्छेप्रमाणें प्रत्येक मुलाला यथाप्रमाण वांटा मिळावयाचा तर कांहीं हत्ती कापावयाची आपत्ति ओढवणार! मुलांना हे कोडें जेव्हां उलगडेना तेव्हां ते आपल्या सल्लागाराकडे गेले. त्यानें थोडा विचार करून १९ हत्तींत आपला एक मिसळला व वडील मुलाला १०, मधल्या मुलाला ५, धाकट्याला ४ हत्ती देऊन तें कोडें सोडविलें. गोष्टींतील तात्पर्य अगदी उघड आहे. संयुक्त घटनेत प्रांत हे वयांत आलेल्या मुलांप्रमाणेंच होत. अर्थात् मध्यवर्ती सरकारापासून अडचणींच्या प्रसंगीं सल्ला घेण्यास प्रांतांना लाज वाटण्याचें कांहीच कारण नाहीं. अधिकारविभागणी (डीसेंट्रलायझेशन) व अधिकारसंक्रमण (डेव्होल्यूशन) हीं पूर्णतः यशस्वी व्हावयाचीं तर मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकारें यांमधील विषयविभागणी कशी करतां येईल या गोष्टीचा या परिषदेनें कसून विचार केला पाहिजे.

याशिवाय पार्लमेंटच्या इमारतींत एका उदारमतवादी व पार्लमेंटचा सभासद असलेल्या विदुषीनें मला, डॉ. सप्रू, ना. जयकर इत्यादि लोकांबरोबर, जेवावयाला बोलाविलें. त्या प्रसंगीं आयत्या वेळच्या मागणीवरून मी भाषण केलें तें इंग्रजींतच देत आहे.

[ Speech at a lunch in the House of Commons in honour of the R. T. C. delegates.]

"I join with my friends Dr. Sapru and Mr. Jaykar in expressing our gratitude to the hostess for giving us this lunch and opportunity to meet you all here this evening And as I have been called upon to speak, I shall express my mind also in my own way in a few words. Since coming to London a number of friends have been asking me as to how I feel like, in relation to this Conference. And I shall tell you what I have been telling these friends that I still find myself to be "in the wood", in the sense that I do not see the light beyond it. I only hope that on going back to India I may

not have to tell my people that I was in a wilderness, whose acoustic properties also were so bad that it did not even give back an echo ! ! I was here in 1919, thriteen years ago, in connection with similar work. For I had come as secretary and member of the Home Rule League Deputation and a member of the Congress Deputation.

During these thirteen years, this wonderful country of yours must have changed enormously owing to the after effects of the War. But your landmarks, in respect of British Indian politics at any rate, do not seem to have changed. For even to-day, as then, I find the same Conservative Party with its empty blessings, the same Liberal Party, with its cooly calculated caution, and the same Labour Party, with its great gushing good-will to India but with its absolute impotence ! Of course, I take my hat off to that band of fifty Labour Members in Parliament who have kept the flag flying. But they are in a plight which deserves *our* sympathy just we in India deserve *your* sympathy. I feel confident, however, that a day will come when with the assistance of the Labour Party, India will gain what she wants. But I must tell and warn you that the landmarks in *Indian* politics have changed. For in 1929 the Congress actually passed a resolution in favour of independence, and the President of the Congress actually planted with his own hand the flag of independence. You may ask me what has come out of that. I know we have not got actual independence out of it. But that at any rate shows how far India has advanced in point of political feeling.

So far about the general position. Coming back to the Round Table Conference, we are, of course, glad that the Conference is again meeting as a Round Table Conference. But we really yet do not know where we are. For on the one hand, the Prime Minister assures us, and I believe in

his sincerity, that the White Paper, embodying the intentions of Government declared in it, will be carried out to the letter and the comma. But on the other hand, there is Mr. Churchill who said, what you know, only two days ago. He said that the Conference was only for consultation, in fact for talking things over with us. Indeed, he at least said that we who have come here are "cultured and estimable gentlemen,"—and I say, 'even for this small mercy, thanks!' But he said that Government was not at liberty to arrive at conclusions or at any rate to make any commitments. And that if any commitments were made, he and his "storm troops"—meaning thereby his Conservative followers, were ready to upset the apple cart. (A voice—Oh, you take Mr. Churchill too seriously.)

Well, whatever it is, the threat is there. And in the Conference itself, we find something like what he said. As soon as I came here, I raised the question about the agenda of the Conference and I suggested that more important questions should be taken up first for discussion. But that was not done. And we are wasting precious time over such matters as the franchise. Of course, we are glad about some decisions that have been taken, e. g. the recognition given to Women and Labour in the electorate and special provision made for their representation in the Legislature. But the more important questions such as Responsible Government in the Centre still remain. And the Chairman is reminding us again and again that the Conference would end on 20th December. He almost seems to say, "Beware of the *ides* of December" just as the sooth-sayer, or whoever he was in Shakespear's Julius Caesar, was warning Caesar to "Beware the *ides* of March!" He would almost seem to be making fun of the time-limit whenever a speaker exceeded his allotted length in speech. That, gentlemen, is the plight

in which we find ourselves here. And, therefore, it is for you people—independent people of England—to extend your help and sympathy to enable us to see the matter through.

आतां गोलमेज परिषदेच्या या सहा आठवड्यांत माझे अवांतर कार्यक्रम काय झाले तें थोडक्यांत सांगतों ( पुढील मजकूर केसरीच्या बातमीदारातर्फे म्हणून केसरींत प्रसिद्ध झाला होता. )

" रा. केळकर यांना येथें आल्यास सुमारें दोन आठवडे झाले. या अवधींत त्यांनीं अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. बटलर, स्टेट सेक्रेटरी सर सॅम्युअल होअर, व मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड इतक्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यानंतर त्यांनीं माजी भारतमंत्रि मि. वेजवुड बेन यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीसंबंधानें विशेष सांगण्याचें असे कीं, बेनसाहेब हे हल्लीं तर स्टेट सेक्रेटरी नाहींतच, व गोल-मेजचे सभासदहि पण नाहींत. गेल्या निवडणुकींत ते निवडूनहि आले नाहींत, तथापि लॉर्ड आयर्विन व वेजवुड बेन यांनीं मिळून गोलमेज परिषद भरविण्याचें श्रेय घेतले, व विशेषतः गतवर्षी म. गांधी यांची मुक्तता करून काँग्रेसशीं तह करविला, ही गोष्ट कोणीहि हिंदी मनुष्य विसरणार नाहीं. यामुळें रा. केळकर हे त्यांना कर्तव्य म्हणून भेटण्यास गेले. या गोष्टीची जाणीव बेनसाहेबांनांहि होती असें दिसलें. केळकरांनीं त्यांना लिहिलेल्या पत्रांत थोडे कुचेष्टेनें असें म्हटलें होतें कीं, " कालचक्राच्या फेऱ्याचा आम्हाला अनुभव आहे; तसा तुम्हाला आला याबद्दल वाईट वाटतें." यालाच अनुलक्षून बेनसाहेब केळकरांना म्हणाले कीं, " मी स्टेट सेक्रेटरी नसतां तुम्ही मला भेटायला आला याचा मला विशेष आनंद होतो." कदाचित् या म्हणण्याचा त्यांचा अर्थ मनांतून असा असावा कीं, " जे हिंदी लोक मी स्टेट सेक्रेटरी असतां मला आवर्जून भेटण्याला आले त्यांनीं मी पदच्युत झालों म्हणून आतां माझी गांठ घेण्याचें प्रयोजन ठेवलें नसावें." आणि प्रमुख हिंदी गृहस्थ त्यांना या खेपेस भेटण्यास गेले नाहींत हेंहि खरेंच !

" बेनसाहेबांच्या स्वभावाचा परिचय त्यांच्या भाषणावरून वगैरे झाल्यानें त्यांच्या संबंधानें जें मत हिंदुस्थानांत लोकांचें होतें तेंच केळकरांना प्रत्यक्ष अनुभवास आलें. म्हणजे मनुष्य अतिशय खुल्या मनाचा उत्साही व दिलदार दिसला. विनोद बुद्धीनें त्याज निषेध करून बेनसाहेब केळकरांना म्हणाले कीं, १९३०सालीं आम्ही

सर्वांनीं मुद्दाम ठरवून तुम्हालाहि निमंत्रण दिलें होतें. परंतु तुम्ही आला नाहींत हा माझा तुम्ही मोठा अपराध केला आहे." आणि मग मौजेनें त्या वेळचा गोलमेज परिषदेचा थाटमाट, भपका, राजे लोकांचे पोषाख, नाताळामधील गमती खेळ वगैरेसंबंधानें त्यांनी खूप रंगवून वर्णन केलें. या सर्वांना तुम्ही उगीच मुकलां असें थट्टेनें केळकरांना म्हणण्याचा त्यांचा हेतु होता. पण तो जाणून केळकर त्यांना इतकेंच म्हणाले कीं, मग अशा डामडौलाच्या गोलमेजाच्या परिषदेच्या वेळीं तुम्ही स्टेट सेक्रेटरी होता याचाच तुम्हाला मोठा अभिमान वाटत असावा असें दिसते ! या दीड तासाच्या मुलाखतींत बेनसाहेबांनीं केळकरांना आंतल्या बाहेरच्या अशा पुष्कळ गोष्टी सांगितल्या. बेनसाहेबांचें कुटुंब हेहि आदरातिथ्य करणारेंच आहे. त्यांनीं आम्हाला जाण्यापूर्वी मुद्दाम कॉफी करून दिली.

"दुसरी मुलाखत मि. लॅन्सबरी यांची. तीहि गेल्या गुरुवारी सायंकाळीं पार्लमेंटच्या सभागृहांत झाली. १९१९ साली केळकर यांची मि. लॅन्सबरी यांच्याशी ओळख झालेलीच होती व ती अद्यापि तशीच कायम आहे. लॅन्सबरी हे तेव्हां नुकत्याच निघालेल्या 'डेली हेरल्ड' पत्राचे संपादक होते; व लो. टिळकांनीं मजूरपक्षास हस्तगत करण्याकरितां होमरूल लीग फंडांतून खूप मोठी रक्कम त्यांना दिली होती. अर्थात होमरूल लीग संबंधाने वगैरे हेरल्ड पत्रात मजकूर लिहिणें व लिहविणें याकरितां, तसेंच गांवांतील सभा भेटी वगैरे ठरविण्याच्या कामाकरितां, टिळकांबरोबर केळकरांना लॅन्सबरीसाहेबांना नेहमीं भेटावें लागे. तेव्हां मजूर पक्षांत त्यांचा दर्जा दुय्यम होता; पण प्रामाणिकपणाच्या दृष्टीनें त्यांना तेव्हां स्वपक्षांत बराच मान असे. आणि आजहि मजूरपक्षाची उतरंड सगळी ढांसळली असतांहि मि. लॅन्सबरी हे मात्र गेल्या क्रांतिकारक निवडणुकींत निवडून आले, व आज पार्लमेंटामध्यें 'अपोझिशनच्या' म्हणजे विरुद्ध पक्षाच्या पुढारीपणाचा मान त्यांच्याकडे आला आहे. माणूस सच्चा पण कर्तृत्व तितकेंसें नाहीं. यामुळें या त्यांच्या मानाला अनुलक्षून 'एरंडोऽपि द्रुमायते' असें त्यांच्याविषयीं कांहीं कुत्सित लोक म्हणतात. पण माळावर इतर झाड उगवूंहि शकत नाहीं तेथें एरंड हा तरी ताठ उभा राहतो ही त्यांची स्तुति किंचित् निंदागर्भ असली तरी खरीच आहे. निदान माळावर उगवून मेलेल्या रोपट्यांना तरी एरंडाची निंदा करतां येणार नाहीं. लॅन्सबरीसाहेबांचा हेरल्ड पलाशीं संबंध

आतां राहिलेला नाहीं, आणि तें पत्रहि राजकारणापेक्षां 'चहा चिवडा चिरूट' अशा बेतांचेंच झालें आहे.

"गुरुवारीं संध्याकाळीं ठरल्याप्रमाणें मि. लॅन्सबरी यांनीं केळकरांची गाठ घेतली. केळकरांचें त्यांनीं उत्साहानें स्वागत केलें. टिळकांच्या बद्दल त्यांनीं फार आदरपूर्वक उद्गार काढले. आणि त्यांच्या बरोबर एक मेयर होते ते कोण असेंहि विचारलें ! याचा संबंध असा होता कीं, १९१९ सालीं केळकर विलायतेला गेले तेव्हां ते पुणें म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष निवडून आले होते. या गोष्टीला अनुलक्षून लॅन्सबरीप्रभृति मंडळींत "हे पुण्याचे लॉर्ड मेयर" असा केळकरांचा विनोदानें उल्लेख होत असे. त्यांना लंडनच्या मेयरचें वैभव व महत्त्व माहीत. बिचारें पुणें किती गरीब व त्याचा मेयर किती कःपदार्थ हें त्यांना काय माहीत ? पण महत्त्वाचा शब्द मेयर एवढा लक्षांत राहिला होता. त्याची आठवण त्यांनीं दिली. श्री. विठ्ठलभाई पटेल यांचीहि त्यांनीं आठवण काढली. तेव्हांचे त्यांचे हस्तक बेन स्पूर हे वारल्याचा त्यांनीं उल्लेख केला. हेरल्ड पत्रासंबंधानें त्यांनीं जवळ जवळ तिरस्काराचे शब्द काढून "तें पत्र आतां लंडनच्या लक्षाधीशांच्या हातीं गेलें असून त्याला लेबरपक्षापेक्षां ताज्या खनाची माहिती अधिक महत्त्वाची वाटूं लागली आहे, कारण भांडवलावर टक्के एरवीं कसे सुटणार ?" असें ते स्पष्ट म्हणाले. तथापि अजूनहि त्याच्या डायरेक्टर बोर्डावर मजूर पक्षाचे कांहीं लोक आम्ही ठेविले आहेत असें त्यांनीं सांगितलें. लेबर पक्षांतल्या ज्या लोकांशीं ( मि. मॅक्डोनाल्डसकट ) आतां त्यांचें बिघडलें आहे, त्यांच्याविषयीं तें काय बोलले हें न लिहिलेलें बरें. तेव्हां केळकर इतकेंच म्हणाले कीं "जगभर राजकारण हें असेंच आहे." गोलमेज परिषदेमध्यें आपण मजूर पक्षाचे सभासद पाठविले नाहींत याचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं "तुमच्या मनासारखें कल्याण करण्याची आज आमच्यांत शक्ति उरलेली नाहीं. आणि संपकांनें उगाच वाइटाची जबाबदारी मात्र अंगावर यावयाची." काय करावयाचें हें सरकारचें जवळ जवळ ठरल्यासारखेंच आहे असे ते म्हणाले. पण असेंहि म्हणाले कीं, "सरकार तरी काय करणार ! पार्लमेंटांत कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाचें एवढें प्रचंड बहुमत आहे की, यापुढें सर्वांनाच नमावें लागतें."

"मजूर पक्षाच्या ऱ्हासाचा उल्लेख करून ते म्हणाले कीं, "आम्ही पार्लमेंटांत आज पन्नास च लोक आहों पण एकजुटीचे आहों. म्हणून त्यांचा पुढारी या नात्या

मी हातीं निशाण धरून ठेवलें आहे. कितीहि निराशा वाटली तरी जागा सोडतां येत नाहीं. प्रांतिक स्वायत्ततेशिवाय अधिक कांहीं बिलांत नसेल तर हिंदुस्थानांत तुम्ही कोणी तें पत्करणार नाहीं याविषयीं माझी खात्री आहे. पण फेडरेशन झालें व मग मध्यवर्ती सरकारांत सत्ता तुमच्या अपेक्षेपेक्षां थोडी कमी मिळाली तरी तुम्ही तें टाकूं नये असे मला वाटतें." गांधी येथें आल्याचा उल्लेख केला. पण "त्यांनाहि कांही निष्पन्न करून घेऊन जातां आलें नाहीं, हें मी पाहिलें" असे ते म्हणाले. अशा प्रकारचें सुमारें अर्धा तास संभाषण होऊन लॅन्सबरी परत पार्लमेटमध्यें जाण्याकरितां निघाले. तथापि 'या आमच्या गुंफेंत तुम्हांला वाट सांपडणार नाही, मी दाखवितों" असें म्हणून केळकरांचा हात धरून ते हौस ऑफ लॉर्डसपर्यंत पोंचविण्यास आले. लॅन्सबरी यांचें वय आज ७३ वर्षांचें आहे. पण त्यांचें प्रचंड शरीर, जबडा, व भव्य कपाळ पाहून मला तर हिंडेनबुर्ग यांची आठवण झाली.

"ता. २० रोजीं लंडन येथील सर्व महाराष्ट्रीयांना रा. केळकर यांनी आपल्या हॉटेलांत—हॅन क्रेसंट—चहापार्टी दिली. सुमारें ३५।४० लोक आले होते. त्यांतील बरेचसे अपरिचित होते. अर्थात् नवीन लोकांचा परिचय या दृष्टीनें बराच लाभ झाला, व कार्यक्रमाचा हेतु लक्षांत घेऊन ज्यांना प्रत्यक्ष आमंत्रणें पोंचूं शकलीं नाहींत असेहि ५-४ गृहस्थ आवर्जून स्नेहभावानें आले. त्यांत बहुतेक येथ असलेल्या विद्यार्थ्यांचा भरणा होता व प्रौढ असेहि कांहीं लोक होते. पांच स्त्रियाहि होत्या. चहापान झाल्यानंतर सर्वजणांनीं एकत्र बसून गप्पागोष्टी थट्टामस्करी व गायन इत्यादि प्रकार अगदीं खेळीमेळीनें केले. त्यांतल्या त्यांत येथें एखादा महाराष्ट्रसंघ स्थापला जाण्यासंबंधानें चर्चा झाली. एकंदर कार्यक्रम इकडच्या पद्धतीनें सुमारें एक प्रहरभर चालला होता."

लंडनच्या या मुक्कामांत लॉर्ड सँकी, सर सॅम्युअल होअर, लॉर्ड आयर्विन (हॅलिफॅक्स), ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे हंफ्रे मिलफर्ड, प्रो. एडवर्ड थॉमसन, प्रोफेसर जिलबर्ट मरे इत्यादि गृहस्थांनीं मला फराळाजेवणास बोलाविलें होतें. वेळांत वेळ काढून मी ऑक्सफर्ड येथें जाऊन आलों. तात्पर्य अवघ्या सहा आठवड्याच्या मुक्कामांत माझा बराच कार्यक्रम झाला.

ता. २५ डिसेंबर रोजीं मी पॅरिस शहरीं आलों तेथें तीन दिवस राहून सर्व

शहर पाहून घेतलें व तेथून मार्सेल्सला येऊन आगबोटींत बसून मुंबईस ता. १२ जानेवारी १९३३ रोजी येऊन दाखल झालों.

यानंतर झालेल्या चौथ्या गोलमेज परिषदेचें निमंत्रण मला आलें होतें पण तें मी नाकारलें.

"गो. परिषदेला मला तीनदां आमंत्रण आलें व मी तें दोनदां नाकारलें" या दोन वाक्यांत मिळून माझ्या एकंदर राजकीय चरित्राचें सार आलें असें म्हणतां येईल. पहिल्या वाक्यानें सरकाराच्या दृष्टीनें व राष्ट्राच्या दृष्टीनें माझी योग्यता काय होती हें दिसून येतें. आणि दुसऱ्या वाक्यानें राजकीय पक्षोपन्यासांत मी कोठें बसूं शकतों हें दिसून येतें. मी कधीहि सरकारदरबारीं आपण होऊन न जाणारा, बोलून चालून टिळकांचा शिष्य व त्यांचा शेषाधिकारी, व सर्वसामान्यरीत्या सरकाराला विरोधी असणाऱ्या पक्षांत प्रमुख, असें असतां सरकारानें मला गोलमेज परिषदेला एक प्रतिनिधि म्हणून आमंत्रण दिलें तें, माझी विद्वत्ता, समाजांतील माझा दर्जा, माझें सार्वजनिक कार्य, व सर्वसामान्यरीत्या एक पुढारी या नात्याची माझी पात्रता, इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन दिलें ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करतां येणार नाही. मी प्रांतिक पुढारी या पदवीला तर पोंचलों होतोच, पण अखिल भारतीय पुढाऱ्यांपैकीं एक अशीहि माझी गणना होती.

असो, पण या सर्व गोष्टींव्यतिरिक्त मी हिंदुस्थानांतला एक प्रमुख वर्तमानपत्रकर्ता या दृष्टीनेंहि सरकाराला माझी योग्यता मान्य करणें प्राप्त होतें. आणि तें ती मान्य करीत होतें हें मला गोलमेज परिषदेस दिलेल्या निमंत्रणावरून उघड झालें. मला सरकारानें निमंत्रण दिलें तें वरील अनेकांपैकीं नक्की कोणत्या गोष्टीला उद्देशून दिलें हें सांगणें कठिण आहे. तथापि मी लोकमताचा एक ठळक पुढारी होतों ही गोष्ट त्यांना मान्य करावी लागली यांत शंका नाहीं. मला निमंत्रणें आलीं ही गोष्ट आश्चर्यकारक असें कोणीहि म्हटलें नाही.

आतां मी हें निमंत्रण दोन वेळां नाकारलें याचा अर्थ काय होतो हे पाहूं. पहिली व मुख्य गोष्ट ही कीं मी गोलमेज परिषदेला जाण्यासाठीं इतर कित्येक लोकांप्रमाणें हापापलेला नव्हतों. नाहीं तर ही सोन्यासारखी मोठेपणा मिळविण्याची व विलायतेची सफर बिनखर्चानें करण्याची संधि मी दोनदां कां गमावली असती! माझीं मतें बेमस्त आहेत असा आरोप मजवर कायमचाच आहे. पण मी लाहोरास

भर काँग्रेसमध्यें स्वातंत्र्य प्रस्थापनेच्या ठरावाला विरोध केला तेव्हां, "केळकरांना गोलमेज परिषदेला जाण्याची हौस आहे म्हणून त्यांचा विरोध स्वार्थी आहे" या अंदेशाची भर त्या नेमस्तपणाच्या आरोपांत पडली. माझे निंदक उघडपणें तसे म्हणूंहि लागले. बरें, पुढें सत्याग्रहाच्या चळवळींत मी एक दोन तीन वेळां कायदेभंग केला पण प्रत्यक्ष तुरुंगांत घालीपर्यंत कायदेभंगाची पाठ पुरविली नाहीं व खरखरमुंडेपणा केला नाहीं यावरून त्यांनी माझ्या कृत्याला अंगचोरपणाचे स्वरूप दिलें ! व फिरून या अंगचोरपणाचें कारण 'गोलमेज परिषदेला जाण्याची इच्छा' असेहि माझे शत्रू म्हणूं लागले. किंबहुना गोलमेज परिषदेला मला जातां यावें म्हणूनच सरकारानें मुद्दाम होऊन माझ्यावर खटला भरला नाहीं, आणि या बाबतींत सरकाराशीं माझा एक प्रकारचा कट किंवा संगनमत होतें, असेहि अनुमान कांहींनीं केलें. गोलमेज परिषदेचें आमंत्रण नसणाऱ्या रा. बापूजी अणे यांना सहा महिन्याची शिक्षा, व डॉ. मुंजे यांना मात्र पहिल्या गुन्ह्याला एक दिवसाची व दुसऱ्याला एक आडवड्याची शिक्षा झाली, यावरूनहि वरील अनुमानाचें समर्थन कित्येकांनीं केलें !

पण हीं सर्व अनुमानें खोटी होतीं. सरकारच्या मनांत काय असेल हे कोणी सांगावें ? पण निदान मला तरी निमंत्रण येईल अशी माझी अपेक्षा नव्हती. जे इतर चार लोक बोलावतील त्यांच्याइतकी माझी योग्यता व हक्क होता हे मी केव्हांहि म्हणेन. पण या इतर चार लोकांपैकीं कांहींनीं निमंत्रण येण्याची खटपट केली तशी मी मुळींच केली नाहीं. फार काय पण मी इतकेहि शपथेवर सांगण्याला तयार आहे कीं, ही निमंत्रणें जाण्यांत ज्यांचा थोडासा हात होता अशा अधिकाऱ्यांशींच काय पण, सप्रू जयकर मदन मोहन यांच्यांशींहि गोलमेज परिषदेच्या निमंत्रणांच्या विषयावर एक चकार शब्दहि मी कधीं बोललों नाहीं. आणि याविषयीं मला कोणीहि खोटा पाडू शकणार नाहीं हें मी प्रतिज्ञेवर सांगूं शकतों. माझ्याबद्दल सप्रू जयकर कोणी मला निमंत्रण देण्याविषयीं सरकारी अधिकाऱ्याकडे परस्पर बोलले असले तर तें त्यांचे त्यांना माहीत. त्यांचा सल्ला लॉर्ड आयर्विन यांनी घेतला असल्यास त्यांनीं मला निमंत्रण द्यावें असें अर्थात्च सांगितलें असेल. पण तें मी सत्याग्रहाच्या चळवळींत जोरानें पडलों नाहीं, किंवा काँग्रेसच्या धोरणाला विरोध करणारांपैकीं एक अशा अर्थानें नसेल; तर अखिल भारतीय पुढाऱ्यांपैकीं महा-

राष्ट्राचा निर्विवाद प्रतिनिधि म्हणूनच असेल. त्यांत व्यक्तिशः लेडयांच्या शिफारशीचाहि संबंध नसणार.

जयकरांचा व माझा स्नेह असला तरी सप्रूंचा व माझा म्हणण्यासारखा स्नेह नाहीं. पण याहि पलीकडे जाऊन एक गोष्ट मुद्याची म्हणून येथें सांगण्यासारखी आहे ती ही. येरवडयास गांधी व लॉर्ड आयर्विन यांच्या दरम्यानचा समेट सप्रू जयकर यांच्या मध्यस्थीनें सुरूं असतां, सप्रू हे ना. कामत यांच्या घरीं उतरले होते. आणि त्यांनी व जयकरांनीं आपण होऊन मला लागोपाठ दोन दिवस बोलावून येरवडयास झालेल्या चर्चेची हकीकत खासगी रीतीनें सांगितली. पण या दोन दिवसांच्या त्यांच्या माझ्या भेटींत गोलमेज परिषदेचा एक शब्दहि मी त्यांच्याशीं बोलल्याचे मला आठवत नाहीं. कर्मधर्मसंयोगानें याच दिवसांत मुंबईच्या गव्हर्नरानी मला भेटीला बोलावून पहिल्या गोलमेज परिषदेचें निमंत्रण रीतीप्रमाणें दिलें व 'वर काय लिहूं' म्हणून विचारलें. पण आमच्या पक्षाच्या मित्रमंडळींना विचारून उत्तर देण्याकरितां दोन दिवसांची मुदत मी मागून घेतली, व येरवड्याचा समेट होत नाहीं असें ठरतांच मी गव्हर्नर साहेबांना लिहून कळविलें कीं "मला निमंत्रण स्वीकारतां येत नाहीं."

पण सांगण्याचा मुद्दा हा कीं, या दोन दिवसांत सप्रू जयकर यांची गांठ रोज पडत असतां मला गव्हर्नर साहेबांनीं बोलावून निमंत्रण दिल्याची, मी मुदत मागून घेतल्याची, व अखेर नकार दिल्याची गोष्ट मी चकार शब्दानेंहि बोललों नाहीं. शेवटी जयकर पुण्याहून जाणार त्या दिवशीं मी नकार दिल्याची गोष्ट त्यांना परस्पर कळली तेव्हां ते मुद्दाम मजकडे आले, आणि मजवर अतिशय रागावून, "तुमच्या मित्रमंडळींना बोलवा, मी त्यांची खात्री करून देतो कीं तुम्ही निमंत्रण स्वीकारणें हेंच उचित आहे," असे आग्रहाने म्हणाले. "तुम्ही नुसतें होय म्हणा, तुमचा नकार व्हाइसरॉय साहेबांपर्यंत जाऊन पोंचला असला तरी तो स्वीकारूं नये अशी खटपट मी करतों, व तुमचें पूर्वीचें निमंत्रण कायम करवितों," असें त्यांनीं मला परोपरीनें सांगितलें. पण माझा आग्रह मी कायम ठेवल्यानें त्यांना फार राग आला, आणि तुम्ही स्वतःचेंच काय पण देशाचेंहि नुकसान व्यर्थ करीत आहां असें बोलून व बजावून ते निघून गेले. तात्पर्य, पुष्कळांच्या मतें मी निमंत्रण नाकारणें ही गोष्ट अनपेक्षित व अनिष्ट अशीहि घडली.

पण हें निमंत्रण यावेळीं नाकारण्याचीं माझीं कारणें तशींच सबळ होतीं. पहिलें

हें कीं माझा काँग्रेस व गांधी यांना असलेला विरोध निःस्वार्थी आहे हीं खरी गोष्ट लोकनिदर्शनाला यावी. काँग्रेसचे पुढारी गोलमेज परिषदेला न गेले तर परिषद यशस्वी किंवा निर्णायक होऊं शकत नाहीं. तेव्हां आज न गेलेलेंच काय वाईट ? उद्यां समेट झाला व ते लोक जाऊ लागले तर आपल्यालाहि फिरून बोलावतीलच. काँग्रेसचे लोक जात नाहीत तोपर्यंत केसरींत, इतर वर्तमानपत्राप्रमाणेच, गोलमेज परिषदेची उठल्या बसल्या निंदा येणार. अशा स्थितींत मी परिषदेचा सभासद म्हणून तींत भाग घेणें योग्य होणार नाहीं. आमच्या राष्ट्रीयपक्षांत मी जावें असें म्हणणारे कांहीं लोक होते तरी न जावें असें म्हणणारेहि कांहीं होते. अर्थात स्वतःच्या पक्षाला नाखुष करून जाणें मला बरें वाटलें नाहीं. अशा स्थितींत गोलमेज परिषदेचें निमंत्रण स्वीकारण्याकरितां केसरीचें संपादकत्व सोडणें मनाला कसेंसेंच वाटे ! पुढील जानेवारींत केसरीचा ज्युबिली समारंभ करावयाचा तो योग्यवेळीं स्वतःच्या हातानें करावा, आणि मग केसरी दुसऱ्याच्या नांवावर केल्यानंतर काँग्रेसच्या लोकाविरहितहि भरणाऱ्या परिषदेला गेल्यास तितकीशी हरकत वाटणार नाहीं. अशी सर्व माझीं कारणें होतीं.

या कारणांची विशेषशी चर्चा बाहेर झाली नाहीं. कारण असला विषय सभांतून किंवा वर्तमानपत्रांतून बोलण्याचा नसतो. यामुळें उलट सुलट कोणचीहि अनुमानें ज्यानें त्यानें आपल्या मनाशी करावीं व आपल्या मनाला पटेल असें बोलावें असें सुरूं होतें. मला पहिल्या गोलमेज परिषदेला निमंत्रण असतांहि जातां आलें नाहीं यामुळें मित्र-मंडळी मनांत खिन्न होतीं. जो मान माझा तोच माझ्या राजकीय पक्षाचा व मित्रांचा. आणि माझ्या पक्षांतले कांहीं लोक सत्याग्रहाच्या चळवळींत हुल्लडीदाखल सामील झाले होते तरी त्यांना गोलमेज परिषदेचें महत्त्व माहीत होतें. म्हणून मी गेलों असतों तर बहुतेकांना फार आनंद झाला असता. उलट माझे प्रतिपक्षी असें धेऊन चालले होते कीं मला निमंत्रण येणार व तें मी स्वीकारणार. जणुकांहीं माझ्या काँग्रेसविरोधाचा तो स्वाभाविक परिणामच होता. आणि मी गेलों असतों म्हणजे ते हटकून म्हणाले असते कीं, " पहा ! येवढ्याकरितांच सर्व खटपट चालूं होती व ती साधलीहि ! " मीज ही कीं, असें म्हणण्याची संधि पुढें एकदां त्यांना लवकरच आली. तेव्हां मनांत डाचत होते तें त्यांनीं म्हटलेच, पण मग मलाहि त्यांचें तोंड फोडतां आलें. येरवडा येथील समेटाचें बोलणें संपलें व सप्रू जयकर अपयश पावून निघून गेले, त्यानंतर जो केसरीच्या

अंक आला त्यांत समेट न केल्याबद्दल, विशेषतः भलत्याच गोष्टीवर मोडल्याबद्दल, मी गांधींना उघड दोष दिला. या माझ्या लेखानें बरीच खळबळ उडाली. आणि मुंबईच्या क्रॉनिकलपत्रानें असें उघड लिहिलें कीं, "केसरीनें असें करण्याचें कारण गोलमेज परिषदेला निमंत्रण मिळविण्याची केळकरांची खटपट हेंच असलें पाहिजे!"

माझ्यावर असा हल्ला कोणीतरी करील याची मी मनांतून वाटच पहात होतों, कारण तसा हल्ला होणारच अशी माझी खात्री होती. आणि या पहिल्याच हल्ल्याच्या संधीचा फायदा घेऊन मी निमंत्रण येऊनहि तें नाकारल्याची बातमी खासगी स्वरूपाची होती तरी ती बाहेर फोडली. येवढें महत्वाचें निमंत्रण नाकारलें व एकप्रकारचा स्वार्थत्याग केला, मग त्याचा फायदा घेतल्याशिवाय मी तरी कां सोडीन! म्हणून केसरीच्या पुढच्याच अंकांत मी क्रॉनिकलला उत्तर दिलें त्यांत म्हटलें कीं "गांधीनीं समेट मोडला त्या पूर्वीच मी गोलमेज परिषदेचें हातीं आलेलें निमंत्रण नाकारलें होतें. गांधींच्या या असमंजसपणाच्या कृत्यावर टीका करून पाण्यांत गळ टाकून धीवर मासा येण्याची वाट पहात बसतो तसा मी निमंत्रणाची वाट पहात बसलेला नव्हतो. माझी टीका सर्वस्वी निःस्वार्थी होती." या माझ्या उत्तरानें क्रॉनिकलकार थोबाडांत बरोबर चपराक बसून थंड पडले. कारण जो हातचा अस्त्रेरचा बाण म्हणून त्यांनीं मजवर सोडला तो माझ्या अंगावरील निस्वार्थीपणाच्या चिलखतावर टोक मोडून बोथट झाला!

मी निमंत्रण नाकारल्यावर कांहीं दिवसांनीं गांधी-आयर्विन तह झाला. तुरुंगांतले सत्याग्रही कैदी सुटले. नंतर कराचीच्या राष्ट्रीय सभेनें या तहाला मान्यता दिली. गांधी हे गोलमेज परिषदेला काँग्रेसचे प्रतिनिधि म्हणून निवडले गेले. आणि परिषदेवरचा बहिष्कार उठला. मग फिरून माझ्या जाण्याचा, निमंत्रण येण्याचा, प्रश्न निघाला. तेव्हां आमच्या पक्षांतील कित्येकांना मला हें निमंत्रण येईल असें वाटूं लागलें. सरकार दरबारीं जाणाऱ्या येणाऱ्या एका दोघांनीं मला तसें सांगितलेंहि. पण दुसऱ्या खेपेस मला निमंत्रण आलें नाहीं. याचें कारण मी पहिलें निमंत्रण नाकारलें याबद्दल राग आल्याचा बहाणा सरकारानें केला. आणि जयकर सप्रू हेहि मजवर याच कारणाकरितां मनांतून रागावलेले असल्यानें या खेपेस त्यांनीं माझें नांव सुचविलें नसावें हेंहि अगदीं साहजिक आहे. शिवाय मीहि माझें तुटकपणाचें धोरण कोणत्याहि बाबतींत सोडलें नव्हतें. जयकर राउंड टेबल

परिषदेहून आल्यापासून मी होऊन त्यांना भेटलों नाहीं व आतां निमंत्रण आल्यास मी जाईन असेहि सुचविलें नाहीं. पं. मदनमोहन मालवीय व डॉ. मुंजे यांनीं माझें नांव लॉर्ड विलिंग्डन यांजजवळ सुचविलें होतें असा माझा एक तर्क आहे. पण हिंदुसभेचे लोक अधिक न घेतां मुसलमान प्रतिनिधि अधिक घ्यावयाचे असें सरकारचें धोरण या वेळीं ठरल्यामुळें मला सरकारानें पुन्हां निमंत्रण दिलें नाहीं.

असो, अशा रीतीनें गोलमेज परिषदेच्या निमंत्रणाची खरी हकीकत आहे. आणि मी प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें त्या दोन गोष्टी एकत्र घेतल्या असतां या ठिकाणीं माझ्या राजकीय चरित्राची परीक्षा झाली असेंच ठरतें. याहून अधिक कोणत्याहि रीतीनें माझी सरकारच्या दृष्टीनें योग्यता ठरण्याचा संभव नाहीं. राजकीय चळवळीच्या दृष्टीनें मी याहून पुढें जाण्याचा फारसा संभव नव्हता. आणि मी केसरीचें प्रत्यक्ष व कायदेशीर संपादकत्व सोडल्यामुळें माझ्यावर खटला होऊन तुरुंगांत जाण्याचाहि संभव फारसा राहिला नाहीं. कायदे कौन्सिलांच्या निवडणुकी पुनः उभ्या राहिल्या तरी मी यापुढें केव्हांहि निवडणुकीस उभे न राहण्याचा निश्चय केलेला होताच. आणि संघटित संस्था परिषदा यांचा अध्यक्ष नेमून लोकांनीं माझा मान सन्मान करण्यासारखाहि कांहीं उरलेला नव्हता. यामुळे या पुढें माझ्या राजकीय चारित्र्यांत कांहीं वैशिष्ट्य उत्पन्न होईल असा संभव उरला नाहीं असे तेव्हां दिसूं लागले.

असो. आतां या सुमाराचीं कांहीं पत्रें देऊन हें प्रकरण पुरें करतों.

( ता. १५।११।३२ ) आज टेलिफोनवरून कळविल्याप्रमाणें तुम्ही उद्यां बुधवारीं दुपारीं ६॥ वाजतां हाऊस ऑफ कॉमन्समध्यें प्राइम मिनिस्टरना भेटण्यास त्यांच्या खोलीवर यावें. ( एफ्. एफ्. टर्नबुल, व्हाइटहॉल. )

( ता. १६।११।३२ ) तुमच्या पत्रकाला मंगळवारच्या अंकांत लंडन टाइम्सनें प्रमुख स्थान दिल्याचें तुम्हांला आढळून येईल. सोमवारच्या अंकांत तें कमी करून छापण्यापेक्षां मंगळवारच्या अंकांत सविस्तरच देणें मला योग्य वाटलें. शिवाय त्या अंकांत दुसऱ्या कोणाचीं पत्रकें नसल्यामुळेंहि लोकांच्या तें अधिक नजरेंत भरेल. तुमच्यासारख्या वृद्ध संपादकीय व्यवसायिकाला ई. इंडिया असोसिएशनची चांगली माहिती आहेच. असोसिएशनपुढें वाचलेल्या निबंधावर

तुम्ही टीकाहि केली असेल. पण आमच्या वतीनें येवढें निश्चित समजा कीं, आम्ही पक्षाभिनिविष्ट वृत्ति ठेविलेली नाहीं. चालू हिंदी विषयांसंबंधीं कोणालाहि येथें आपले विचार निःसंकोचपणें मांडता येतात. तुम्ही असोसिएशनचे सभासद व्हावे अशी विनंति आहे. सोबत रिपोर्ट पाठविला आहे. त्यावरून असोसिएशनच्या कामाची कल्पना येईलच. ( एफ्. एच्. ब्राऊन, ऑ. सेक्रेटरी, ईस्ट इंडिया असोसिएशन, लंडन.)

( ता. २३।११।३२ ) तिसऱ्या राउंड टेबल कॉन्फरन्सचे मेंबर म्हणून तुमचें नांव प्रसिद्ध झाल्यापासून तुमच्याकडून कांहीं पत्र येईल अशी मी अपेक्षा करीत होतें. राजकारणासंबंधीं एकमेकांना केलेले अपकार किंवा उपकार हें जणूं कांहीं ते घडलेच नाहींत इतके पुढें विस्मरणीय बनतात हें असलें तरी, आपला 'इंडिया' पेपर चालतांना तुम्ही मला जी सर्वतोपरी मदत केली तिचा मला कदापि विसर पडणें शक्य नाहीं.

माझे श्वशुर डॉ. क्लार्क हे १९३० च्या जुलै महिन्यांत वारले. त्यांचा उल्लेखहि हिंदी वर्तमानपत्रांनीं केला नाहीं ! बाकी १९१९ सालीं काँग्रेस कमिटीनें त्यांना ज्या तऱ्हेनें वागविलें तें पाहतां याचें आश्चर्य वाटावयास नको. त्यांचे दोष कांहीं असले तरी त्यांनीं आपल्या सर्व हयातींत हिंदी लोकांच्या आकांक्षांचा मनःपूर्वक पाठपुरावाच केला होता. असो. आतां त्या गोष्टी कशाला ? झालें तें संपलें. माझ्या पतींना तुम्ही केव्हां भेटण्यास येणार आहांत ? तुमच्याविषयीं मी त्यांच्याजवळ इतके वेळां बोलले आहे कीं तुम्हांस त्यांना भेटलेच पाहिजे. ( हेलेना नॉरमँटन ).

(ता.२०।११।३२) माझी तुमची प्रत्यक्ष ओळख नाहीं. पण हिंदी राजकारणांतील प्रश्नासंबंधीं व विशेषतः हिंदी महिलांच्या प्रश्नासंबंधीं मी फार अगत्य बाळगीत आले आहे. काल लँकेस्टर हौसमध्यें कळलें कीं, तुम्ही इंडियन वुमेन्स असोसिएशन पुढें स्त्रियांच्या मताधिकार चर्चेंत व्याख्यान देणार आहांत. राउंड टेबल कॉन्फरन्समध्यें स्त्रियांच्या मताधिकाराला काट देण्यांत आला म्हणून त्याबाबत तुमचे विचार ऐकावयाचे आहेत. उद्यां शुक्रवारीं तुम्ही मजकडे फराळास याल काय ? सर सप्रू, जयकर, जोशी वगैरे मंडळी येणार आहेत. ( मिस् रॉथबोन. )

(ता. ३०।११।३२)तुम्ही आम्ही स्वस्थपणें भेटल्यामुळे परस्परांना किती आनंद झाला म्हणून सांगूं ! तुमच्याशीं आणखी बराच वेळ बोलायला सांपडले नाहीं याचेंच आम्हां उभयतांना ( पतिपत्नी ) वाईट वाटलें. प्रो. एडवर्ड थॉमसन आणि दुसऱ्या बऱ्याच जणांकडून तुमची स्तुति मी यापूर्वी ऐकलीच होती. ( प्रो. जिलबर्ट मरे, ऑक्सफर्ड. )

( ता. ३०।११।३२ ) तुमचे पत्र पोंचलें. येथून पुढील कांहीं दिवस मी अगदी कामाच्या गर्दीत सांपडलो आहे. तथापि सोमवार डिसेंबर ५ तारखेस ऑक्सफर्ड अँड केंब्रिज क्लबमध्यें मजकडे फराळाला याल तर मला फार आनंद होईल. ( लॉर्ड सॅकी.)

हाऊस ऑफ कॉमन्समध्यें उद्यां बुधवारीं साडेसहा वाजतां प्राईम मिनिस्टर यांना आपल्या खोलीमध्ये श्री. केळकर यांना भेटण्याची इच्छा आहे. तरी इंडिया ऑफिसमध्यें मला टेलिफोननें कळवावे. ( प्रायव्हेट सेक्रेटरी, लंडन. )

( ता. २।१२।३२ ) तुमच्यासारख्या नामांकित साहित्यिकाचा सत्कार करण्यांत आम्हांलाच भूषण होतें. मराठे लोकांशी मला मनापासून मैत्री करावीशी वाटते. त्यांची चिकाटी किंवा निष्ठा ( Staunchness ) आणि भूत-दया किंवा परोपकारी वृत्ति ( Humanity ) या गुणांचा मी फार भोक्ता आहे. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे मि. मिलफर्ड हे तुम्हांस भेटूं इच्छितात. त्यांना वेळ कळवावी. (एडवर्ड थॉमसन, ऑक्सफर्ड.)

( ता. ६।१२।३२ ) सोबत सर फिलिप् हॉर्टाग यांचें मजविषयींचें ओळखपत्र जोडलें आहे. आमच्या क्लबाचा हिंदी विद्यार्थ्यांना फार उपयोग होतो. त्यासंबंधीच तुम्हांस माहिती द्यावयाची आहे. लॉर्ड आयर्विननीं तुमचें नांव मुद्दाम सुचविल्यामुळें तुम्हास लिहिलें आहे.(मेरी ट्रेव्हिलियन, लंडन.)

( ता. ६।१२।३२ ) मिस मेरी ट्रेव्हिलियन या स्टुडंट मुव्हमेंट हॉऊसच्या चिटणीस आहेत. जगांतल्या सर्व राष्ट्रांच्या विद्यार्थ्यांसाठी हा क्लब आहे. सुमारें दोनशें हिंदी विद्यार्थी या क्लबाचा फायदा घेतात. लॉर्ड आयर्विन, डॉ. लिंड्से, यासारखे हिंदुस्थानविषयीं सहानुभूति बाळगणारे लोक क्लबाला मदत करणाऱ्यांत प्रमुख आहेत. ( सर फिलिप् हॉर्टाग, लंडन. )

( ता. ७।१२।३२ ) एकदोनदां तुमच्या हॉटेलांत चौकशी करून गेलों. पण तुम्ही बाहेर गेलां होता. सभेची वेळ ठरविण्याविषयीं विचारावयाचे होतें. असो. या पत्रासोबत येत्या मंगळवारीं सर रॉस् बार्कर हे जो निबंध वाचणार आहेत त्याची प्रत पाठविली आहे. सभेत पुष्कळ उपवक्ते बोलतील. ६ वाजतां सभा संपविण्याचा रिवाज असल्यामुळें अध्यक्षांना वक्त्यावर कालाचें नियंत्रण बहुधा घालावें लागेल. तथापि तुमच्या तोंडून कांही ऐकावें अशी आमची फार इच्छा आहे. तर उपवक्त्यांच्या यादीत तुमचें नांव घालूं काय ? ( एफ्. एच्. ब्राऊन, ऑ. सेक्रे. ईस्ट इंडिया असोसिएशन, लंडन. )

(ता. १२।१२।३२) तुमचें ८ तारखेचें पत्र पोंचलें. आमच्या असोसिएशन पुढें रविवार ता. १८ रोजी तुम्ही व्याख्यान देण्याचें कबूल केलें हें वाचून आनंद झाला. तुम्ही लंडनहून केव्हां निघणार तें कळवा म्हणजे तुम्हांस उतरून घेण्याची तजवीज करतो. ( आर. एफ्. एबुकर्क, दि इंडियन असोसिएशन, बर्मिंगहॅम. )

( ता. १३।१२।३२ ) स्टूडंट मुव्हमेंट हाऊस बाबत तुम्ही गेल्या शुक्रवारीं मजला भेटण्याची कृपा केली याबद्दल फार आभारी आहे. आम्ही विद्यार्थ्यांसाठीं लंडनमध्यें जें काम करीत आहों याविषयी आपण सकौतुक प्रोत्साहन देऊन उपकृत केलें आहे. केव्हांतरी एक दिवस आमच्याकडे चहाला येण्याचे आश्वासन दिलें आहे त्याची आठवण ठेवावी. ( मेरी ट्रेव्हिलियन, लंडन. )

( ता. २०।१२।३२ ) स्टेट सेक्रेटरी साहेबाची इच्छा परिषदेच्या प्रमुख प्रतिनिधीना उद्यां सकाळीं बोलावून राउंड टेबल परिषदेचा पुढील कार्यक्रम ठरवावा अशी आहे. तरी तुम्ही आल्यास त्यांना आनंद होईल. बैठक इंडिया ऑफिसच्या कौन्सिलरूममध्यें १२। वाजतां व्हावयाची आहे. ( डब्ल्यू. डी. कॉफ्ट.)

( ता. २२-१२-३२ ) आपण २०-१२ रोजीं कॉन्फरन्सच्या प्रोसीजर-संबंधीं निरनिराळ्या मुद्यांची विचारणा लॉर्ड चॅन्सेलरकडे केली. त्यांनीं निकाला-करतां तें पत्र स्टेट सेक्रेटरीकडे पाठविलें आहे. स्टेट सेक्रेटरींनीं मला आपणांस असें कळविण्यास सांगितलें आहे कीं, काल सकाळीं त्यांचें तुमचें जें बोलणें झालें त्यांत तुम्ही चॅन्सेलरला लिहिलेल्या पत्रांतील मुद्यांचीं उत्तरें मिळालीं असतील. ( एफ्. एफ्. टर्नबुल, इंडिया ऑफिस, व्हाईटहॉल.)

(ता.५।५।१९३३) वर्तमानपत्रांत मी असें वाचलें कीं, तुमची प्रकृती बरी नाहीं म्हणून तुम्हाला चालू उन्हाळ्यांत इंग्लडला ( गोलमेज परिषदेकरितां ) येणें शक्य नाहीं. हें वाचून मला फार वाईट वाटले, मी खरोखर तुम्हाला सांगतों कीं तुम्ही आमच्यामध्यें बसून चर्चा करण्यास येऊं शकत नाहीं हें वाचून निराशा झाली. असो. तुम्ही आपल्या प्रकृतीची काळजी ध्याल व लवकरच बरे व्हाल अशी आशा आहे. ( सर सॅम्युअल होअर. )

येथें इतकेंच सांगतो कीं हें पत्र माझ्या कोणत्याहि पत्राचें उत्तर नाहीं. मी गोलमेज परिषदेस जाऊं शकत नाहीं हें फक्त मुंबईच्या गव्हर्नराला कळविलें होतें. सर सॅम्युअल होअर यांस मी पत्र लिहिलें नव्हतें.

---

## ( ७ ) लोकशाही स्वराज्यपक्षाची स्थापना

राष्ट्रीय सभेनें चालविलेल्या असहकारितेचा उल्लेख पूर्वी विस्तृत असा करण्यांत आलाच आहे. तथापि पुनः स्मरणार्थ त्याची आठवण करून देऊन १९३२ नंतर असहकारितेचें पर्यवसान कसें काय झालें हें पाहूं.

१९२० च्या सप्टेंबरांत राष्ट्रीयसभेनें सर्वांगीण असहकारिता व कायदे-कौन्सिलावर बहिष्कार पुकारला. असहकारितेपैकीं न्यायकोर्टावरील बहिष्कार सर्वांत अधिक अयशस्वी ठरला. आणि माझी माहिती खरी असेल तर, हा बहिष्कार पुकारला जात असतां, स्वतः गांधींनींच अहमदाबाद येथील आश्रमाच्या जागेचा वाद न्यायकोर्टांत गेला तेव्हां, ट्रस्टी म्हणून वकील दिला होता. कांहीं मोठमोठ्या वकीलांनीं एखादें वर्ष वकिली बंद केली. ज्यांना कांहीं काम मिळत नव्हतें त्यांना वकिली बंद केल्याचें सांगून वर्षभर महिना पन्नास पाऊणशेंची वर्णी मिळवितां आली. असा पगार न घेतां ज्यांनीं खरा स्वार्थत्याग केला त्यापैकीं कांहींचा जम पुढें वकिली पुन्हां सुरूं केली तेव्हां पूर्वीसारखा न बसल्यानें त्यांना पश्चातापाची पाळी आली.

शिक्षणसंस्थांवरील बहिष्कारांचें असेंच झालें. कांहींना या राजकारणाची सबब सांगून उनाडकीची हौस उजळमाथ्यानें भागवितां आली. स्वतंत्र्य राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा अनेक ठिकाणीं निघाल्या. त्यांतून तात्पुरत्या शिक्षणाची सोय

झाली. तिचा फायदा घेऊन कांहींनीं आपला अभ्यास चालूं ठेविला. राष्ट्रीय विद्यापीठाच्या पदव्या मिळविल्या. कांहीं स्वार्थत्यागी होते तथापि या नवीन संस्थांतून मिळणाऱ्या शिक्षणावर त्यांचा विश्वास नसल्यानें त्यांनी राष्ट्राची आज्ञा म्हणून घरीं बसून काळ काढला किंवा राष्ट्रीय सभेच्या विधायक कार्यक्रमापैकीं कांहीं भाग उचलला. पण सरकारी निमसरकारी संस्थांतून बाहेर पडलेल्या पुष्कळशा विद्यार्थ्यांनीं फिरून लवकरच त्या पूर्वीच्या संस्थांतून प्रवेश केला, व संस्थांच्या चालकांनींहि त्यांच्यावर करडी नजर न करितां त्यांना पुन्हा प्रविष्ट करून घेतलें. यामुळे त्यांचें फारसें नुकसान झालें नाहीं.

चरख्याचा व खादीचा प्रसार पुष्कळ झाला. लक्षावधि रुपये त्यावर खर्च झाले. पण त्या स्वदेशी व्रताच्या स्वाभाविक मर्यादा लवकरच प्रगट होऊन खादी वस्त्र हें गांधींच्या हट्टाची व काँग्रेसच्या सुलतानशाहीची खूण म्हणूनच आतां कांहीं उरलें आहे. काँग्रेसच्या सभासदत्वाची अट म्हणून खादीला जें महत्व चिकटून राहिलें आहे, तें निघून गेल्यास केवळ शुद्ध स्वदेशीचे जे थोडे भक्त असतील त्यांच्यांतच खादी शिल्लक राहील. हजारो लाखो रुपयांचे चरखे जळण म्हणून शेवटीं चुलींत गेलें. किंवा वळचणीखालची अडगळ म्हणूनच उरले. खऱ्या ऐवजीं खोट्या खादीची निपज होऊं लागून स्वार्थी व्यापाऱ्यांनीं हात साधून घेतला. खादीकार्याच्या नात्याने पैशाचा अपव्यय किती झाला हे ऑ. इं. कॉ. कमिटीच्या हिशेब तपासनिसांनींच प्रसिद्ध केलेलें आहे. मात्र खादीसंघ ही एक स्वतंत्र संघटना बनून राहिली; व तिच्या पैशांतून काँग्रेसचा व गांधी तत्वज्ञानाचा प्रचार करणारे पगारी भाडोत्री नोकर पोसून गांधी सांप्रदायाची परंपरा व संख्याबळ ही राखतां आली.

अस्पृश्यता निवारणाला मात्र अकल्पित अशी चालना मिळाली. या सुधारणेचा प्रचार गांधीइतका पूर्वी कोणाहि सुधारकाला करतां आला नाहीं. अस्पृश्यता निवारणाकरितां व अस्पृश्यांना मतदार या नात्यानें हिंदू समाजांतून फुटून न जाऊं देण्याकरितां गांधींनीं जंगजंग पछाडले. प्राणांतिक उपोषणापर्यंत मजल नेली. कायदे कौन्सिलावरील बहिष्कार इकडे अमलांत असतांच, अस्पृश्यता निवारणाकरितां वरिष्ठ कौन्सिलांत कायद्याचें बिल प्रविष्ठ करण्याचा मोह न आवरून गांधींच्या पट्टशिष्यांनीं स्वतःस हास्यास्पद करून घेतले. अनेक ठिकाणीं

देवळें व मंदिरें हीं अस्पृश्यांना खुलीं झालीं. या सुधारणेच्या मार्गांतील मंदिर-विश्वस्तांच्या अडचणी निघून जाण्याकरितां कायदे झाले. प्रांतिक व स्थानिक स्वराज्य संस्थांनीं अस्पृश्यांकरितां शिक्षणाच्या सोयी शिष्यवृत्त्या व सरकारी नोकऱ्या शक्य तितक्या राखून ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. आणि अस्पृश्यांचे उद्धारक ही पदवी गांधींना इतर कोणाहिपेक्षां अधिक यथार्थतेनें लावितां येईल.

तथापि काय असेल तें असो, गांधीचें अस्पृश्यता-निवारणाचें कार्य अस्पृश्यांच्या मुख्य पुढाऱ्यांना फारसें पटलें नाहीं. नुकताच 'चित्रा' मासिकाने आपला दिवाळी अंक काढला त्यांत डॉ. आंबेडकरांनीं गांधीविषयीं जे फार कडू उद्गार काढले आहेत ते वाचणाराला माझे वरील विधान पटेल. गांधींना 'महात्मा' हे बहुमानास्पद विशेषण लावणें चूक आहे असें आंबेडकरांनीं म्हटलें आहे त्याचें कांहीं विशेष वाटत नाहीं. परंतु गांधींच्या अस्पृश्यता-निवारणाच्या कार्यासंबंधानें आंबेडकरांनीं खालील उद्गार काढलेले आहेत ते विस्मयकारक वाटण्यासारखे होत. ते म्हणतात—" वर्तुळपरिषदेच्या वेळीं अल्पसंख्याकांच्या बैठकींत गांधीनीं असें कबूल केलें होतें की, इतर प्रतिनिधींनीं दलितवर्गाच्या प्रतिनिधित्वाच्या मागणीला मान्यता दिली तर त्याला आपण कोणत्याहि प्रकारची हरकत घेणार नाहीं. आणि इतर सर्व प्रतिनिधींनीं जेव्हां ही मान्यता दिली तेव्हां त्यांनीं जें वर्तन केलें त्याला मी 'विश्वासघात' हेंच नांव देऊं शकतों. ते मुसलमानाकडे जाऊन त्यांच्या कानाला लागले, आणि त्यांना म्हणाले कीं तुम्ही जर दलितवर्गाज्या मागण्यांना विरोध करण्याचें कबूल कराल तर मी तुमच्या चौदाच्या चौदा मागण्या मान्य करीन. एखाद्या घोटीव बदमाषानेहि असलें नीच कपट केलें नसतें. ×××× सत्याची हिंदु मुसलमानांची तेढ हीहि त्यांच्या अशाच कपटाचरणाची औरस संतति आहे. जो इसम दलितवर्गाचा व मुसलमानांचा मित्र म्हणून मिरवितो त्यानें, दिलेलीं वचनें पाळण्याच्या जबाबदारींतून निसटून जाण्यासाठीं, भुयारी (गुप्त) मार्गाचा अवलंब करावा हा विचार खरोखर उद्वेगजनक आहे. 'मुखमे राम बगलमे छुरी' अशा प्रकारच्या माणसाला जर महात्मा म्हणता येत असेल तर मोहनदास हे महात्मा आहेत." दलितवर्गाच्या हिताकरितां गांधींनीं प्राणांतिक उपवासाची ट्रूम काढली, आणि जरी शेवटीं पुणें-करारावर आंबेडकरांनीं सही केली, तथापि 'गांधी मेले तरी हरकत नाहीं' असे उद्गार आंबेडकरांनीं काढले होते असे म्हणतात. कपटाचरण हें गांधींच्या सत्यांत बसूं

शकतें हें प्रसिद्ध आहेच. मात्र त्यांच्या अहंकाराच्या हिमालयापुढें कपटाचरण ही पर्वतांची टेकडी शोभेल.

पण टिळकांच्या अनुयायांचा खरा तंटा गांधींशीं होता तो त्यांच्या विधायक कार्यासंबंधानें फारसा नव्हता. तो त्यांच्या बहिष्कारात्मक विध्वंसक अशा कांहीं कार्यासंबंधानें होता. या बहिष्कारांतहि गांधींनी परदेशी व ब्रिटिश कपड्याच्या बहिष्काराला केव्हांहि मुक्तकंठानें संमति दिली नाहीं. पण त्यांनीं आपलें सगळें बळ, आपली सगळी तपश्चर्या, एका कौन्सिल बहिष्कारावर खर्चली. उलट-पक्षी टिळकानुयायांचें असें मत होतें कीं कायदे कौन्सिले ताब्यांत ठेवलीं असतां इतर विधायक व विध्वंसक अशा कोणत्याहि कार्याला शक्यांत शक्य जास्ती पाठबळ मिळेल. सरकारी पैसा व सत्ता यांचा उपयोग विधायक कार्याला कसा करतां येतो हें सांगावयास नकोच. आणि नुसता अडथळा व गोंधळ करावयाचा म्हटलें तरी त्यालाहि कौन्सिलाची भूमिका सर्व बाजूंनीं अनुकूल होऊं शकते. परंतु "कायदे-कौन्सिलचें नांव काढले कीं मला मळमळूं लागते, माझ्या कपाळांत तिडीक उठते" असा जो घातक बहाणा गांधींनीं १९२० सालीं सुरूं केला तो १९३५ पर्यंत म्हणजे अखंड पंधरा वर्षें टिकविला. यामुळें देशाचें फार नुकसान झालें.

असहकारितेच्या कार्यक्रमांपैकीं सर्वांत अत्यंत वादग्रस्त अशी बाब ही कौन्सिल बहिष्काराचीच होती हें असहकारिता सुरूं होऊन दोन वर्षें होतात न होतात तोंच लोकनिदर्शनास आलें. इतर अनेक कार्यक्रम व्यक्तिशः होणारे न होणारे असे होते. पण कायदे कौन्सिलांत जहाल राष्ट्रीय वृत्तीचे प्रतिनिधि पाठविणें हें कार्य राष्ट्रीय सभेनें सामुदायिक उठावणी केल्यावांचून होणारें नव्हतें. लोकमताच्या लाटेच्या जोरावरच घडून येईल अशी ही गोष्ट होती. आणि यामुळें कौन्सिल प्रवेशाला प्रतिकूल असें जें वातावरण काँग्रेसनें पंधरा वर्षें निर्माण करून ठेवलें त्याच्या योगानें स्वराज्याच्या चळवळीला आणखी जो जोर चढावयाचा तो चढला नाहीं. इतर राष्ट्रीय पक्षांनीं स्वतः निवडणुकी लढवून या अपकाराचें परिमार्जन थोडेंबहुत केलें; परंतु तें करतांना पुष्कळशी शक्ति काँग्रेस विरोधाच्या दगडावर थडकी देण्यांत विनाकारण खर्च झाली. या थडकीमुळें काँग्रेसकृत कौन्सिल बहिष्कार जो निष्प्रभ झाला, सैल पडला, त्यांत जोर घालण्याकरितां १९३० व

१९३२ सालीं कायदेभंगाच्या चळवळी करण्यांत आल्या. पण त्यांचाहि विशेष उपयोग न होतां शेवटीं कौन्सिल-प्रवेशाचें तत्व प्रस्थापित झालेंच !

या दोनहि कायदेभंगाच्या चळवळी गांधींनीं जवाहरलाल यांच्या प्रेमाला बळी पडून सुरूं केल्या असें म्हणतां येईल. १९३० ची मोहीम १९२९ साल-अखेर झालेल्या लाहोर काँग्रेसमधील स्वातंत्र्याच्या ठरावामुळें प्राप्त झाली. या ठरावानें नेहरू रिपोर्टाला मूठमाती दिली, आणि गोलमेज परिषदेवर बहिष्कार घातला. पण लाहोरचा हा ठराव म्हणजे विसंगत अशा गोष्टींचे तें एक बोचकें किंवा कडबोळें होतें. स्वातंत्र्य हें अंतिम ध्येय म्हणणें, व ही गोष्ट काँग्रेसच्या ब्रीदवाक्यांत घालणें राहू देणें, हे तूर्त वसाहत पद्धतीचें ( डोमिनियन स्टेटस् ) स्वराज्य मागण्याशीं विसंगत नव्हतें. नेहरू रिपोर्टांत या डोमिनियन स्टेटस्ची मर्यादित मागणी होती; आणि नेहरू रिपोर्ट शिल्लक उरता तर त्याच्या पायावर राष्ट्रीय सभेला गोलमेज परिषदेंत भाग घेतां आला असता. बरें स्वातंत्र्य हें नुसतें ब्रीदवाक्यांतच घालून जवाहरलाल नेहरू थांबले नाहींत. त्यांनी ठराव पास झाल्याच्या मध्यरात्रीं स्वराज्य स्थापनेचीच घोषणा, निशाण उभारून, रावी नदीच्या कांठीं केली. ज्या अखिल भारतीय सर्वपक्षीय पुढाऱ्यांना जमवून त्यांना राबवून एकमत करून पंडित मोतीलाल यांनीं नेहरू रिपोर्ट तयार केला, त्यांच्यांशीं त्यांच्या पश्चात काँग्रेसनें शुद्ध बेइमानी केली. मग मुळांतच अशी सर्वपक्षीय परिषद भरविलीच नसती तर काय बिघडलें असतें ? सर्वांचा विचार घ्यावयाचा तर सर्वांचा म्हणून होईल त्या निर्णयाला चिकटून राहणें हीच इमामदारी ठरते.

बरें स्वातंत्र्याची घोषणा केली तर तें पदरांत पाडण्याची साधनें राष्ट्रीय सभेनें कोणतीं ठरविलीं व योजलीं ! वास्तविक स्वातंत्र्याच्या घोषणेच्या दुसऱ्या दिवसांपासून ब्रिटिश सत्तेशीं प्रतिस्पर्धी असें सरकार, म्हणजे सत्ता व राज्ययंत्र, सुरूं करावयास पाहिजे होतें. पण ते तर झालें नाहींच. पण लाहोरच्या ठरावांत फक्त इतकेंच म्हटलें होतें कीं, ' प्रस्तुत परिस्थितींत काँग्रेसला गोलमेज परिषदेंत भाग घेतां येत नाहीं. ' पण एकदां रोखठोक स्वातंत्र्यच जाहीर केल्यावर गोल-मेज परिषदेंत भाग घेतां येईल अशी कोणती वेगळी परिस्थिति ( स्वातंत्र्यांतर्गत ) निर्माण होऊं शकली असती ! गोलमेज परिषदेंत काय स्वतंत्र अशा हिंदी राष्ट्राशीं ब्रिटिश सरकार चर्चा करणार होतें ! डोमिनियन स्टेटस् हा विषयहि अखेरपर्यंत

ज्या गो. मे. परिषदेच्या कार्यक्रमांत सरकारानें घालूं दिला नाहीं, त्या परिषदेंत काँग्रेस पुढें केव्हां झालें तरी कसा भाग घेणार ?

तात्पर्य, गोलमेज परिषदेची पहिली संधि काँग्रेसनें व्यर्थ दवडली. बरें हें बहिष्काराचें धोरण पुढें तरी कायम टिकलें काय ? नाहीं. १९३० चीं कायदे-भंगाची एक हुल्लड केल्याबरोबर, लॉर्ड आयर्विन यांनीं मोठी मुत्सद्देगिरी लढवून आपल्या दिखाऊ भलेपणाचे मायावी पाश टाकले, त्यांत 'गव्हाची कणिक करून देऊन', सप्रू—जयकर अशांनाहि मानवल्या नाहींत अशा अटी मान्य करून, काँग्रेसचे एकमेव पुढारी म्हणून गांधी आपल्या पायांनीं गोलमेज परिषदेला गेलेच कीं नाहीं ? बरें हे नवें धोरण एकदां स्वीकारल्यावर तें तरी सुसंगत टिकवावें कीं नाहीं ? तेंहि नाहीं. गोलमेज परिषदेहून गांधी परत येण्यापूर्वीच फिरून जवाहरलाल नेहरूंच्या उतावळ्या स्वभावानें जे हुल्लडीचें जाळें तयार करून ठेवलें त्यांत गांधींनीं आपली मान अडकवून घेतली ! तात्पर्य—'एक ना धड भाराभर चिंध्या' असें हास्यास्पद कांग्रेसचें धोरण झालें. एक पुढारी लहरी आणि अहंकारी, तर दुसरा अविचारी आणि उतावीळ. पण या दोन पुढाऱ्यांच्या परस्पर मोहबतीचा परिणाम काँग्रेसच्या धिंडवड्यांत झाला !

स्वातंत्र्य संपादनाचीं साधनें म्हणून लाहोर कांग्रेसनें हीं ठरविलीं:—(१) खादी (२) अस्पृश्यता निवारण (३) परदेशी कापडावर बहिष्कार (४) मद्यपान-प्रतिबंध (५) निवडक प्रदेशांत कायदेभंग. या साधनांनीं प्रतिस्पर्धी सरकारी सत्ता —स्वातंत्र्याच्या भावनेला साजेशी—कशी निर्माण होणार याचा कांहीं विचार ? आणि फिरून शांतता, अहिंसा, प्रेम, सत्य, हीं गांधीचीं आवडतीं बंधनें या मवाळ कार्यक्रमाच्याहि मागें आहेतच. जणु कांहीं गुलाबपाण्याच्या फवाऱ्यांनीं सर्व प्रकारचे विषारी जंतु व हिंस्रपशु मरणार ! तात्पर्य, प्रत्यक्ष स्वातंत्र्य प्रस्थापनेची घोषणा अकालीं झाली हें कोणीहि म्हणेल. लाहोरच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत सुभाषबोस हे विरोधी पक्षांत होते. त्यांना पूर्ण स्वातंत्र्य मान्य, पण या साधनांनीं तें मिळेल अशी त्यांची भावना नव्हती. म्हणून कांग्रेसशीं भांडून त्यांना विषय-नियामक कमिटींतून स्थानत्याग करून जावें लागलें.

असो. १९३० च्या प्रारंभीं पुन्हां बेताळ पूर्वस्थानावर आला. चढाईचें धोरण म्हणून कायदेकौन्सिलचा बहिष्कार जोरावला. ऑ. इ. कां. कमिटींत ज्यांना

राहावयाचे होते त्यांना कौन्सिलांतल्या जागांचे राजीनामे द्यावे लागले. स्वतः मी ऑ. इं. कॉं. कमिटी सोडली, व कौन्सिलमेंबरशिप ठेवली. कौन्सिल बहिष्काराच्या पाठोपाठ कायदेभंग सुरूं झाला.

१९३० च्या कायदेभंगाची भाषा सुरूं झाली तेव्हां मी दिल्लीस असेंब्लीच्या कामांत गुंतलों होतों. आणि आमच्या पक्षानें, विशेषतः केसरी मराठा कचेरीनें, कोणतें धोरण स्वीकारावें हा प्रश्न मला विचाराला घेणें प्राप्तच होतें. ही चळवळ यावेळीं अयुक्त होती असें माझें मत वर दर्शविलेंच आहे. तथापि मला हेंहि माहीत होतें कीं आमच्या पक्षानें, नेमस्त किंवा मवाळ किंवा सरकारजमा पक्षाप्रमाणें, अशा चळवळीवर बहिष्कार घातलेला नव्हता. राष्ट्रीय पक्षाच्या वृत्तींत तुरुंगांत जाणें किंवा सरकाराशीं तीव्र स्वरूपाचा झगडा करणें ही गोष्ट स्वाभाविक होती. म्हणजे क्रमप्राप्त असल्यास ती स्वीकारणें योग्य असें आमच्या पक्षाचें मत होतें. लो. टिळकांनीं हें उदाहरण घालून दिलेंच होतें. टिळकांच्या हयातींतील १९०८ ची पिकेटिंगची चळवळ ही कायदेभंगाचीच चळवळ होती व टिळक पक्षीयांनीं दंडाचे शेंकडो रुपये भरले होते. राजद्रोहाची शिक्षा झालेल्या लोकांना केसरी कचेरी हें आपलें मायपोट असें वाटें. डॉ. भट, पी. एम्. बापट, वा. म. जोशी यांना याच दृष्टीनें टिळकांनीं केसरी मराठ्याकडे नोकऱ्या दिल्या होत्या. खाडिलकरांची तुरुंगांत जाण्याची पाळी अजून आली नव्हती. पण मी त्यांच्या आधीं तुरुंगवास भोगून आलों होतों. १९२१ ची पिकेटिंग चळवळ आम्ही केली होती. १९२२ च्या मुळशी सत्याग्रहांत रा. ज. स. करंदीकर, डॉ. पळसुले इत्यादि आमच्या पक्षाचे लोक तुरुंगांत जाऊन आले होते. तात्पर्य, कॉंग्रेसच्या विशिष्ट धोरणाशीं आमचा मतभेद असला तरी राष्ट्राच्या नांवानें तिनें उभ्या केलेल्या कायदेभंगाच्या चळवळींत सामील होण्याकडे आमच्या पक्षाच्या कांहीं लोकांचा ओढा असणार हें मी जाणून होतों.

स्वतः मला दुसऱ्या दृष्टीनें असें वाटत होतें कीं, या नव्या चळवळींत कोणी शिरल्यास "आपण तुरुंगाला भीत नाहीं, त्या मार्गानें प्राप्त होणाऱ्या स्वार्थत्यागाला आपली तयारी आहे" हें सिद्ध करण्याची संधि मिळत असली तरी या स्वार्थत्यागाचें श्रेय प्रतिपक्षाला मिळतें, याशिवाय त्याबरोबर त्यांत कौन्सिल बहिष्कार दृढ होतो हें मात्र ठीक नाहीं. सत्याग्रहच करावयाचा, तुरुंगांत जाण्याचाच पराक्रम दाखवावयाचा, तर महाराष्ट्रीय पक्षानें स्वतः अंगिकारलेल्या अशा एखाद्या खास

विशिष्ट तत्वाकरितांच तें कां न करावें ? कारण तसें केल्यानें मिळणारें श्रेय तरी आपल्या पक्षाला मिळेल. तुरुंगांत जाणें हा जर लोकांच्या डोळ्यांत भरण्याचा एक मार्ग, तर तो निदान प्रतिपक्षानें उठावणी केलेल्या, त्याला श्रेय मिळणाऱ्या, चळवळींत तरी करूं नये. तथापि दिल्लीसारख्या दूरच्या ठिकाणाहून तसा सूक्ष्म विवेकाचा युक्तिवाद पत्रोपत्रीं मी किती करणार ? म्हणून केसरी-मराठा कचेरीच्या लोकांकरितां एक पत्र रा. ग. वि. केतकर यांच्या नांवानें मी लिहिलें तें असें:—

(नवी दिल्ली, ता. १३ मार्च १९३०) " रा. ग. वि. केतकर यांस, सा. न. वि. वि. या सोबत माझा प्रां. कॉ. कमिटीच्या सभासदत्वाचा राजीनामा पाठवीत आहे. ए. आय. सी. सी. चा राजीनामाहि काँग्रेस कमिटीकडे परस्पर अलाहाबादेस पाठविला आहे. राउंड टेबल कॉन्फरन्ससंबंधानें तूर्त कांहींच प्रश्न नाहीं. तेव्हां त्या बाबतींत केसरींत कांहींच लिहिण्याचें कारण नाहीं. त्या प्रकरणानें पुन्हा उचल खाल्ली म्हणजे काय लिहावयाचें तें लिहूं.

" कायदेभंगासंबंधानें नक्की काय लिहावयाचें याचें धोरण येथून लिहून किती लिहिणार ! कायदेभंगाची चळवळ ही आपल्या राष्ट्रीय पक्षाच्या धोरणांत समाविष्टच आहे. तेव्हां तिचा पुरस्कार अवश्य केलाच पाहिजे यांत संशय नाहीं. तसेंच केसरी ऑफिसमधील ज्या मंडळींना या चळवळींत गुजराथेंत जाऊन सामील व्हावयाचे असेल त्यांना तसें करण्याला पूर्ण मोकळीक आहे. एवढेंच नव्हे तर ज्यांची तशी खरी इच्छा असेल त्यांनीं अवश्य जावें. तसेंच, आपल्या काँग्रेस कमिटीमार्फत किंवा इतर रीतीनें महाराष्ट्रांत सर्वसंमत अशी एखादी कायदेभंगाची चळवळ करण्याची असल्यास तीहि अवश्य करावी. मात्र त्यापूर्वी केवळ आपल्या पक्षाच्या अशा पांचपन्नास मंडळींची खासगी सभा बोलावून विचार करावा, व मग इतर पक्षांशीं बोलून ठरवावें. ही गोष्ट मी पुण्यास परत येण्यापूर्वीच करावी. याचें कारण असें कीं या गोष्टी स्वयंस्फूर्तीनें होण्याच्या असतात. त्यांना व्यक्तिशः माझें प्रोत्साहन नको किंवा प्रतिबंधहि नको. शिवाय मी हजर असल्यास, मनांतून ज्यांना कांहीं गोष्ट करावयाची नसते त्यांना उगाच माझें निमित्त बाहेर सांगण्यास सांपडतें. तरी यां प्रसंगीं मंडळींनीं परस्परं ठरवावें; व वरील आपली मंडळी जें ठरवतील तें मलाहि मान्य आहे असें समजावें. स्वतः मी काय करावें, कोठें काय

करावें किंवा काय न करावें, याचा विचार मी स्वतंत्रपणें करीन. पण आपल्या मंडळींना एक विचारानें जी गोष्ट करावीशी वाटेल ती, मी त्यांत आहे म्हणून त्यांनीं केली असें होऊं नये. किंवा मी त्यांत नाहीं म्हणून केली नाहीं असेंहि होऊं नये. नवी पिढी जी जी चळवळ करील तिचें सर्व श्रेय तिलाच मिळावें अशी माझी खरी इच्छा आहे. परंतु त्या बरोबर अशीहि इच्छा आहे कीं, स्वतःस कांहीं करावयाचें नसतां माझी सबब सांगितली जाऊं नये. माझा स्वभाव असा आहे कीं, स्वतःच्या स्फूर्तीनें जो स्वार्थ-त्याग करील त्याला मी उघड राजरोस रीतीनें भरपूर श्रेय देईन. परंतु कोणाहि व्यक्तीला किंवा वर्गाला अशा कामीं भरीला घालणार नाहीं. म्हणून केसरींत लिहितांनाहि कायदेभंगाच्या चळवळीचें सर्वसाधारणपणें समर्थन करावें, परंतु विद्यार्थी किंवा तरुण वर्ग यांना विशेष प्रकारे उद्देशून या चळवळींत सामील होण्याचा उपदेश करूं नये ही खबरदारी अवश्य घ्यावी. आपल्या ऑफिसपैकीं ज्यांना या चळवळींत शिरावयाचें असेल त्यांनीं तसें ठरवून थोडें आगाऊ मल कळवावें. कारण वर्तमानपत्रें चाललीं पाहिजेत. म्हणून मला आगाऊ कळलेलें बरें. निदान मी ३।४ एप्रिलचे सुमारास येत आहे तोपर्यंत कळलें तरी बरें. तुम्ही काँग्रेस कमिटीचे प्रेसिडेन्ट म्हणून पुष्कळ दिवस बाहेर फिरणार असला तर कामाची व्यवस्था रा. करंदीकर-भावे यांच्या विचारें करावी. मला येथून कांहीं करतां येणार नाहीं. तसेंच तुमच्या प्रवासाचा खर्च काँग्रेस कमिटींतून मिळेल तेथपर्यंत तिकडून घ्यावा व तो मिळण्यासारखा नसेल तेव्हां केसरी ऑफिसकडून घेण्यास हरकत नाहीं. तात्पर्य, मी परत येईपर्यंत वरीलप्रमाणें करावें, व मी आल्यावर अधिक विचार होईलच. परंतु मी नाहीं म्हणून कोणी कोणतीहि गोष्ट थांबविण्याचें कारण नाहीं. कळावें."

—न. चिं. केळकर.

पुढें लवकरच टिळक मंदिरांत पुणें शहरांतील राष्ट्रीय पक्षाच्या सभासदांची सभा भरून असें ठरलें कीं, हल्लीं सुरूं असलेल्या कायदेभंगाच्या चळवळींत, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीशीं व इतरांशीं सहकारिता ठेवून, पण त्यांतल्या त्यांत स्वतंत्रपणें, महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षानें आपला एकादा कार्यक्रम आंखून पार पाडावा. हें करण्याकरितां तूर्त खालील गृहस्थांचें एक कार्यकारी मंडळ नेमण्यांत आलें तें खालीलप्रमाणें:—

( १ ) अध्यक्ष—न. चिं. केळकर, ( २ ) चिटणीस—दि. वा. दिवेकर, ( ३ ) सभासद—१. ल. ब. भोपटकर, २. दा. वि. गोखले, ३. पां. के. शिराळकर, ४. डॉ. गोपाळराव पळसुले.

" या मंडळांत आणखी प्रतिनिधी समाविष्ट करून घेण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आलेला आहे. विशेषतः महाराष्ट्रांतील इतर जिल्ह्यांतून या कार्याचा प्रचार करण्याचा, किंवा प्रचार होत जाईल त्याप्रमाणें अधिक सभासद नेमून घेण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आला आहे."

" सामान्यतः या चळवळीचा प्रसार खालील मार्गानें करण्यांत यावाः—

( १ ) प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य शहरीं जिल्ह्यांतील प्रमुख पुढाऱ्यांची आणि प्रत्येक तालुक्याच्या गांवीं तालुक्यांतील प्रमुख पुढाऱ्यांची प्रास्ताविक सभा ताबडतोब बोलावण्यांत येऊन, तेथें जिल्हामंडळें व तालुकामंडळें स्थापण्यांत यावीं, व या दोन्ही मंडळांमार्फत प्रत्यक्ष कायदेभंग करण्यास तयार होणाऱ्या, किंवा इतर रीतींनें या कार्यास मदत करण्यास तयार असणाऱ्या, स्वयंसेवकांची नोंद करण्यांत यावी. आणि या दोन्ही प्रकारच्या कार्यकर्त्यांचा उपयोग कोठें, केव्हां व कसा करावयाचा हें उभयपक्षीं सहविचारानें ठरविण्यांत यावें.

( २ ) अशा रीतीनें मध्यवर्ती कार्यकारी मंडळ नेमण्यांत आलें असलें तरी, सर्व महाराष्ट्रभर या चळवळीचें कार्य व्हावयाचें तर प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य शहरींच काय, पण तालुक्यांच्या गांवींहि कार्यप्रेमी पुढाऱ्यांनीं हें कार्य आपल्या अंगावर स्वयंस्फूर्तीनें व आस्थेनें घेतलें पाहिजे. हें कार्य कसें करावें यासंबंधाच्या सूचना मुख्य कार्यकारी मंडळाकडून वेळोवेळीं देण्यांत येतीलच. तथापि, मिठाच्या कायदेभंगाचें प्रत्यक्ष कार्य समुद्रकांठीं जाऊनच केलें पाहिजे असें नाहीं, कारण प्रत्यक्ष मीठ तयार करणें हा जसा या कायदेभंगाचा एक प्रकार आहे, तसाच बिगर परवाना तयार झालेल्या मिठाची खरेदी-विक्री व देवघेव करणें या प्रकारांनींहि या मिठाच्या कायद्याचा भंग होतो. शिवाय बिगर परवाना तयार झालेलें मीठ महाराष्ट्रांतील दूरदूरच्या भागांतहि अगदीं सुलभतेनें नेतां येण्यासारखें असल्यामुळें, हा कायदेभंग करण्याची इच्छा असणाऱ्या लोकांना आपलें ठिकाण सोडून पर ठिकाणीं दूर जाण्याचे श्रम व खर्च

करण्याचें कारण नाहीं. कायदेभंगाचे हें साधन त्यानीं आपल्या जिल्ह्यातील किंवा तालुक्यांतील कार्यकारी मंडळाकडे मागणी केली असतां सहज पुरविण्यांत येईल. अशा रीतीनें वांचलेले प्रवासाचे श्रम व पैसा यांचा उपयोग इतर रीतीने या कार्याच्या प्रचाराकडे केल्यास तो अधिल फलप्रद होईल.

( ३ ) म. प्रां. कॉ. कमिटीचे अध्यक्ष व केसरीचे एक सहसंपादक रा. ग. वि. केतकर, हे राष्ट्रीय सभेच्या आज्ञेनें व वर्किंग कमिटीच्या नियमानुसार या कार्याचा प्रसार महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या क्षेत्रांत करीतच आहेत. तरी ज्यांना ज्यांना हे कार्य करण्याची इच्छा असेल त्यांनीं रा. केतकर यांच्याकडे समक्ष कळवावें अगर पत्रव्यवहार करावा किंवा पुणें येथील या मुख्य कार्यकारी मंडळाचे चिटणीस रा. दिवेकर ( गायकवाड वाडा, नारायण पेठ ) यांजकडे, किंवा यानंतर जिल्हामंडळें किंवा तालुकामंडळें, किंवा यांच्या चिटणिसांचीं जीं नांवें प्रसिद्ध होतील त्यांजकडे आपली नांवे नोंदवून कार्याला लागावें.

( ४ ) या चळवळीसंबंधानें मध्यवर्ती मंडळाकडून प्रसिद्धिपत्रकांच्या द्वारें वेळोवेळीं अवश्य तो मजकूर सर्वांना कळविण्यांत येईलच. तसेंच महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व वर्तमानपत्रांतून मोठ्या कार्योपक्रमांची आमाऊ सूचना किंवा झालेल्या कामांची हकीकत वेळोवेळीं प्रसिद्ध करण्यांत येईलच. तथापि जिल्हामंडळें किंवा तालुकामंडळें यांनीं अशा प्रसिद्धिपत्रकांची किंवा वर्तमानपत्रांतून येणाऱ्या मजकुराची वाट न पाहतां, आपणास मार्गदर्शक होणाऱ्या कार्यकारी मंडळाशीं समक्ष अगर पत्रव्यवहारानें विचारविनिमय करावा.

( ५ ) या कार्याचा प्रचार ठिकठिकाणीं जाहीर सभा भरवून व जाणत्या पुढारी लोकांचीं भाषणें होऊन जितका होईल तितका इतर रीतीनें होणार नाहीं हें उघड आहे. म्हणून अशा सभा भरविणें हें काम स्थानिक पुढाऱ्यांनींच आपल्या अंगावर घेतलें पाहिजे. मध्यवर्ती मंडळाचे अधिकारी किंवा पुढारी यांना सर्व जिल्ह्यांतून किंवा सर्व तालुक्यांतून फिरतीवर जाणें शक्य नाहीं. किंबहुना कांहीं पुढारी माणसांना आपापलीं नित्याचीं कामें संभाळूनच या चळवळीचें हें विशेष कार्य करावयाचें आहे. करितां असे लोक आपल्या गांवीं येतील व मग आपण या चळवळींतील प्रत्यक्ष कायदेभंगाचें किंवा प्रचाराचें काम करूं, अशी अपेक्षा बाळगून हात आखडून बसल्यास व्हावें तितकें कार्य

होणार नाहीं हें अगदीं उघड आहे. ही चळवळ यशस्वी व्हावयाची तर ती बाहेरच्या उपदेशापेक्षां स्वतःच्या अंतःकरणांतील स्फूर्तीनेंच अधिक यशस्वी होईल हें सांगावयास नको. आपापल्या स्थानिक कार्यकारी मंडळांचा उपयोग करून त्यांच्या नेतृत्वाखालीं ही चळवळ ठिकठिकाणच्या लोकांनीं पार पाडावी. तालुक्याच्या परीनें तालुक्यांत व जिल्ह्याच्या परीनें जिल्ह्यांत लोकांना मान्य व आदरणीय असे जुने पुढारी आजहि आहेत; व कार्य केल्यानें नवेहि सहजच निर्माण होतात. आणि कोणत्याहि खऱ्या राष्ट्रीय चळवळीची खूण हीच कीं तिच्या कार्यांत हा लहान हा मोठा हा भेद सहसा उरत नाही, किंवा तो कोणीहि मानूं नये. लहान गांवापासून राजधानीच्या शहरापर्यंत सर्व तऱ्हेचे पुढारी हे एकाच कार्याला एकाच हेतूनें जुंपलेले असल्यामुळें, देशाच्या दृष्टीनें सर्वच कनिष्ठ पण कार्याच्या दृष्टीनें सर्वच श्रेष्ठ अशी भावना ठेवून एकविचारें कार्य घडल्यास फार थोड्या अवधींत मोठें कार्य घडूं शकतें.

( ६ ) राष्ट्रीय पक्षाच्या या कार्यसंघटनेंत प्रत्येक जिल्ह्यांत कार्य होईलच. परंतु कुलाबा जिल्ह्यांत रा. रामचंद्र नारायण मंडलिक व ठाणें जिल्ह्यांत रा. जम्नादास मेहेता यांनीं पुढारीपण घेऊन हें कार्य चालूं करण्याचें ठरविलें असून तसें त्यांनीं यापूर्वीच मजकडे कळविलें आहे. तरी इतर जिल्ह्यांतूनहि अशाच प्रकारची योजना होऊन पुणें येथील मध्यवर्ती कार्यकारी मंडळाकडे कळविल्यास बरें होईल.

( ७ ) हल्लीं चाललेली कायदेभंगाची चळवळ ही स्वातंत्र्यप्राप्तिकरितां असो किंवा मिठाचा कायदा रद्द करण्याकरितां असो, तिजपासून राष्ट्रीय जागृतीला मदतच होणारी आहे. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाच्या तत्त्वांत व धोरणांत अशा चळवळीचा अंतर्भाव अवश्य होतो. म्हणून तिला सहानुभूति प्रदर्शित करण्याकरितां आपल्या या पक्षानें तींत योग्य व शक्य तो भाग घ्यावा असें मला वाटतें."

पुणें
ता. ११।४।१९३०

न. चिं. केळकर

आतां माझी भूमिका सांगतों. आमच्या पक्षानें असें ठरविलें कीं कोणत्याहि काँग्रेस कमिटीच्या आज्ञेंत राहून कायदेभंग करावयाचा नाहीं. आपल्या पक्षाच्या

पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालींच आपणं तो करूं. आणि पहिल्या सत्याग्रही तुकडीच्या नांवाची नोंदहि होऊं लागली. तेव्हां मला असें सांगण्यांत आलें कीं, "तुम्ही यांत येऊं नका. मागें कोणी तरी पाठपुरावा करणारा मोकळा असावा लागतो. ते तुम्ही रहा." पण मला माहीत होतें कीं, पोटांत पाय असणाऱ्या निंदक-वर्गांतील कांहीं लोकांच्या मनांतला हा अर्थ असण्याचा संभव कीं "तुरुंगांत जाण्याला भिणारे तुम्ही. तुम्हाला चळवळींत पडणें न पडणें दोन्ही जिवावर येणार. म्हणून त्यांनींच होऊन भलेपणाचा देखावा करून तुम्हाला सांगितलें कीं तुम्ही मागें रहा." पण या निंदकांच्या आधींच मी एक वेळ तुरुंगांत जाऊन आलों होतों. आणि जबाबदार संपादक म्हणून पीनल कोडाच्या वस्त्राच्या धारेवर पाय ठेवून वर्षानुवर्ष लेख लिहीत होतों. अर्थात् मी तुरुंगाला भिणारा नव्हतो. म्हणून कोणचींहि कारणें न देत बसतां मी इतकेंच म्हणालों "ठीक आहे. चाळीसांची याद करतांच आहां तर त्यांत माझें नांव पहिलें लिहा पाहूं. मग बाकी एकूणचाळीस कोण तें लिहा." अस्तनींतील निखारे विझविण्यालाहि हें उत्तर समर्पक होतें.

त्याप्रमाणें याद होऊन निरनिराळीं माणसें निरनिराळ्या ठिकाणीं रवाना झालीं. पेण येथें रा. रामभाऊ मंडलिक यांनी कायदेभंग सुरूं करून मला निमंत्रण पाठविलें. त्याचा ताबडतोब स्वीकार करून मी निघालों. वाटेंत लोणावळ्यास माझे वडील बंधु येऊन राहिले होते, त्यांना, "पेणला म्हणजे तुरुंगांत जायला निघालों आहे, सहा महिने पुन्हां भेटण्याचा संभव नाहीं" असें सांगूनच मी पुढें गेलों. गेल्या दिवशींच रात्रीं कायदेभंगाला उत्तेजनकारक व्याख्यान दिलें. दुसऱ्या दिवशीं झेंडावंदन करून हजारों लोकांसमक्ष मिठाचा सत्याग्रह केला व परत आलों. मला अटक झाली नाहीं याचें आश्चर्य वाटलें. मी आल्यानंतर रा. केतकर, मंडलिक वगैरे मंडळी पेण तालुक्यांत, दा. वि. गोखले वसई तालुक्यांत, भोपटकर पुण्यास अशी धरपकडीची माळ लागून तुरुंग-वासाच्या शिक्षा झाल्या. पेणला चुकलें तर तें पुण्यास साधावें अशा विचारानें शिवाजी मंदिरांत फिरून मिठाचा सत्याग्रह केला. फिरून टिळक मंदिरांत आक्षिप्त वाङ्मय वाचनाचा सत्याग्रह केला. पण हे तीन प्रयत्न फुकट गेल्याचें पाहून मग मी तो नाद सोडला. "तुरुंगांत जाण्याकरितां जंग जंग पछाडीन पण एकदांचा तुरुंगांत जाईन" अशी माझी प्रतिज्ञा नव्हती. शिवाय कौन्सिलवर मनांतून

मी नाराजच होतों, म्हणून सरकारनें मला तुरुंगांत न धाडण्याचा निश्चय केलेला पाहून तो मार्ग मीहि सोडून दिला.

१९३२ सालीं फिरून काँग्रेसनें कायदेभंगाची चळवळ सुरू केली तेव्हां तर मी प्रथमपासूनच मनानें ठरविलें कीं, या चळवळीला दुरून सुद्धां स्पर्श करावयाचा नाहीं. कारण १९३० सालच्या पेक्षांहि ही १९३२ ची चळवळ अधिक असमर्थनीय होय असें माझें मत होतें. आमच्या पक्षांतील लोकांनाहि असेंच वाटूं लागलें होतें. पण या दुसऱ्या चळवळींत लोकांनीं कायदा मोडण्याची वाटच सरकारानें पाहिली नाहीं. त्यानें पूर्वपरिचयावरून याद्याच तयार करून ठेवल्या होत्या, आणि चळवळीची घोषणा होतांच त्या याद्या बरहुकूम धरपकड करून होय नाही म्हणण्यास कोणाला सवडच ठेवली नाहीं. यामुळें या चळवळींत कांहीं लोक अनिच्छेनें सामील झाले होते, म्हणजे सापडले होते. याचें प्रत्यंतर हेंच कीं, कांहींना पॅरोलवर सोडलें असतां त्यांनीं त्याच्या अटी पाळल्या. त्या मोडून स्वतःला शिक्षेला पात्र करून घेतलें नाहीं. पण मी अगदींच गप्प बसलों नव्हतों. सोलापूर येथील लष्करी कायद्याच्या जुलमावर मी केसरीच्या अंकामागून अंकांत इतकी कडक टीका करीत होतो कीं, तशी टीका त्या वेळच्या दुसऱ्या एका तरी पत्रानें केलेली कोणी मला दाखवून द्यावी असे माझें जाहीर आव्हान आहे. मी कायदेभंगाच्या चळवळींत सामील झालों नाहीं, पण कर्मयोगांत क्रमप्राप्त ठरेल तर त्या तुरुंगवासालाहि भ्यालों नाहीं.

या सुमारास कायदेभंगाला बरेंच विकृत स्वरूप आलें होतें. कांहीं स्वयंसेवक म्हणविणारांनीं पैसे घेऊन तुरुंगवास पत्करला. कांहीं काँग्रेसवाले नाइलाजानें नाखुषीनें तुरुंगांत जात होते. कांहीं हिंडून जागेचा थारेपालट करून तुरुंगवास चुकवीत होते. आणि विशेष हें कीं तुरुंगवासाचे श्रम कष्ट हाल हे सर्वस्वी संपून तुरुंगांत मिळणाऱ्या सवलती सुखसोई यांच्यामुळें तुरुंगवास हा एक खेळ होऊन बसला होता. १९३२ चा कायदेभंग घटत चालला, आतां लोक तुरुंगांत घालण्यास सरकाराला कष्टसायास करावें लागतात, असें पाहिल्यावर मी केसरीतून कायदेभंगाची चळवळ थांबविण्याचा उघड आग्रह करूं लागलों. माझा युक्तिवाद याविषयीं असा होता कीं सरकाराला धाक दाखवावयाचा हेतु असेल तो सफळ झाला. सरकार आपण चळवळ हाणून पाडली असें कांहीं म्हणूं शकत नाहीं हें खरें. पण त्यामुळें ती थांबवा अशी याचनाहि तें काँग्रेसकडे करणार नाहीं हें उघड

होतें. बरें भांडण मिटवावयाला प्रायः मध्यस्थ तिऱ्हाईत उपयोगी पडतो पण आतां सप्रू जयकरांसारखे लोकहि पूर्वानुभवानें विटलेले, हात पोळलेले, म्हणून या कामांत पडणार नाहींत असें अनुमान करतां येत होतें. इतर पक्षांच्या पुढाऱ्यांविषयीं बोलावयासच नको. एतावता स्वतः काँग्रेसपक्षीय लोकांनींच या कामीं पुढारीपण घ्यावें, आणि कारणें सांगत न बसतां काँग्रेस ही चळवळ थांबवील असा प्रयत्न त्यांनीं करावा, असे मी केसरीतून सुचविलें. त्याविषयी थोडे उतारे देतों :—

"कायदेभंगाची चळवळ आतां थांबविली पाहिजे, व ती थांबविण्याचा अधिकार राष्ट्रीय सभेलाच असल्यामुळें तिनेंच या गोष्टींत पुढाकार घेतला पाहिजे, असे आम्ही मागील अंकीं लिहिलेच आहे. ही गोष्ट केवळ आजच प्राप्त झाली, किंवा तिजविषयीं आम्ही अशा प्रकारचें मत आजच प्रथम प्रकट करीत आहोंत असें मात्र नाहीं. तर ता. १२ ऑगस्ट १९३२ च्या केसरीच्या अंगांत "तिरंगी सामन्यांतून तिरंगी समेट निघेल काय !" असा प्रश्न उपस्थित करून, त्याचें जें उत्तर आम्ही दिलें होतें त्यांत कायदेभंगाची चळवळ थांबविण्याची सूचना केली होती. तेव्हां आम्ही असें म्हटलें होतें की, राजकारणाचा डाव कुजलेला आहे. तो तसाच कुजलेला राहण्यापासून देशाचें अनहित आहे. हा कुजटपणा काढून टाकून राजकारण पुन्हा प्रवाही व खेळतें करण्याकरितां युक्तिप्रयुक्ति करणें अवश्य आहे. साध्या खेळांत बुद्धिवान् पुढारी गडी जशा युक्त्याप्रयुक्त्या बदलतात, तशा राजकारणांतहि बदलणे अवश्य असतें. आणि युक्तिप्रयुक्ति बदलल्यानें फायदाहि होण्याचा संभव असतो. प्रस्तुत युक्तिप्रयुक्ति म्हटली म्हणजे कायदेभंगाची चळवळ राष्ट्रीय सभेनें आपण होऊन थांबविणें ही होय. आणि सात महिन्यांपूर्वीच जर असें करणें योग्य होतें, तर आज त्यानंतर आणखी सात महिने गेल्यावर तसें करणें अधिकच योग्य ठरत नाही काय ? म्हणून सात महिन्यांपूर्वी जी सूचना आम्ही उघडपणें केली तीच फिरून एकवार आज करीत आहों.

"राष्ट्रीय सभेनें चळवळ थांबवावयाची तरी ती कशी थांबवावयाची ? या प्रश्नाचें आमचें उत्तर असें कीं, मध्यस्थीनें व खटपटीनें. पण कोणाच्या ? तर जे राष्ट्रीय सभावाले किंवा चळवळीचे पुरस्कर्ते आज तुरुंगाबाहेर आहेत त्यांच्या. कारण जे तुरुंगांत आहेत त्यांना ही खटपट करतां येणें शक्य नाहीं. तुरुंगांत

असलेल्या एखाद्याला फार तर कदाचित् शेठ जम्नादास द्वारकादास यांच्याप्रमाणें करतां येईल. म्हणजे त्रागा करून, म. गांधींना दूषण देऊन, यापुढें आपण ही चळवळ करणार नाहीं असें जाहीर करून, व स्वतःची सुटका करून घेऊन ! पण असें उदाहरण एखादेंच होणार, व झालें तरी त्याचा परिणाम चळवळीच्या पुढाऱ्यांवर चांगलासा होणार नाहीं. वास्तविक जम्नादास द्वारकादास यांनीं दोन-तीन वेळ स्वेच्छेने या चळवळींत तुरुंगवास पत्करिला, यामुळें त्यांच्यावर भ्याड-पणाचा, भित्रेपणाचा आरोप कोणी करूं शकणार नाहीं. शिवाय त्यांच्या सुटकेची स्वाभाविक मुदत यापुढें फक्त एक-दीडच महिना उरलेली असल्यामुळें, त्यांनीं केलें तें सुटकेच्या उतावळीपेक्षां म. गांधींच्या धोरणासंबंधानें उत्पन्न झालेल्या तीव्र नापसंतीनें व उद्वेगानेंच केलें असेंच कोणालाहि म्हणावें लागेल. आणि आमची अशी समजूतच काय, पण आम्हांला अशी माहितीहि आहे कीं, म. गांधींचे कित्येक कट्टर अनुयायीहि म. गांधींच्या चुकीच्या धोरणामुळें त्यांच्यावर मनां-तून खूपच नाखूष झाले आहेत !

" गुरुनिष्ठेमुळें ते आपली नाखुषी बोलून दाखवीत नाहींत, व जम्नादास द्वारकादास यांच्यानें ती बोलून दाखविल्याशिवाय राहवलें नाहीं, इतकाच फरक. तथापि प्रत्यक्ष समेटाच्या कारवाईच्या दृष्टीनें, जम्नादास द्वारकादास यांचा त्रागा फारसा उपयोगी पडणार नाही. ते चळवळीमध्यें तुरुंगांत गेले तरी राष्ट्रीय सभेच्या अधिकारी वर्गांत त्यांची गणना कोणीहि करीत नाहीं. उलट तीन वेळ तुरुंगांत जाऊनहि, अविचारी कट्टर लोकांकडून देशद्रोही म्हणवून घेण्याची त्यांच्यावर पाळी आली आहे असेंच समजावें. कारण रागावलेल्या मनुष्याच्या तोंडाला पहिला शब्द शिवीचा येतो, व राज-कारणाच्या भाषेत 'देशद्रोही' ही शिवी आजकाल कोणी कोणाला सहज जातां येतां द्यावी अशी सर्वसामान्य होऊन बसली आहे. म्हणून जम्नादास द्वारका-दास यांच्या त्राग्याचा परिणाम इतर लोकांच्या मनावर झाला तरी, राष्ट्रीय सभेचें धोरण ठरविण्याचा अधिकार ज्यांच्या हातीं आहे त्यांच्यावर तो होण्याचा फारसा संभव नाहीं.

" जम्नादास द्वारकादास यांच्याइतकेच म. गांधींना विटलेले, किंवा या चळवळीला कंटाळलेले, किंवा फक्त ती चळवळ आतां थांबवावी हें युक्तिप्रयुक्ती-च्या दृष्टीनें योग्य आहे असें वाटणारे, असे बरेच लोक आज तुरुंगांत आहेत

यांत शंका नाहीं. पण जम्नादास यांच्या उतूं येण्याच्या पद्धतीनें मनाच्या या जाचांतून सुटका करून घ्यावी हें त्यांना पसंत नाहीं. यामुळें प्रामाणिक मत बोलून दाखविण्याचें धैर्य त्यांच्या अंगीं असलें तरी फुकटच जाणार! म्हणजे त्यांच्या भलेपणामुळें तें निरुपयोगी ठरणार! तुरुंगांत असलेल्या लोकांचीं चळवळीविषयींचीं खरीं मतें घेण्याचा व मोजण्याचा कांहीं निरपवाद असा मार्ग असता, तर चळवळ थांबविण्याला त्यांचीहि कबुली मिळाली असती. परंतु असा मार्ग मिळणें अशक्य आहे. यामुळें एक तर ते दुसऱ्या कोणी चळवळ थांबवीपर्यंत असेच मनांत कुढत व असंतुष्ट होऊन बसतील; किंवा अंगावर ओढून घेतलेली शिक्षा पुरी होईपर्यंत ते सात्विकपणें समाधान मानून आनंदानेंहि काळ काढतील. पण हें माहीत असतां त्यांची अडचण दूर न करणें हें मात्र राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना दूरदर्शीपणाचें होणार नाहीं. तुरुंगांत असतां सुटकेची रोज नवी आशा उत्पन्न व्हावी व रोज ती नष्ट व्हावी, अशा रीतीनें आशानिराशेचे खेळणें बनून दुःखित झालेले किती तरी लोक आज तुरुंगांत असतील. अर्थात त्यांची आशा निखालस नाहींशी करावी, किंवा चळवळ बंद करून त्यांची सुटका करून द्यावी, हेंच चळवळीच्या पुढाऱ्यांचें आज कर्तव्य ठरतें.

"नाहीं म्हणावयाला तुरुंगांत असूनहि चळवळ बंद करण्याचा ज्याला आज अप्रत्यक्ष अधिकार आहे असा एकच मनुष्य आम्हांला दिसतो व तो म्हणजे म. गांधी होत. त्यांच्या कैदेला मुदत नाहीं. कारण त्यांच्यावर खटला न होतांच त्यांना तुरुंगवास प्राप्त झाला आहे. यामुळें त्यांची सुटका होण्याला जसा एक क्षणहि लागणार नाहीं तशीच त्यांचा तुरुंगवास लांबण्यालाहि कांहीं कालमर्यादा नाहीं. इतर कैद्यांपेक्षां विशेष अर्थानें ते 'सरकारचे पाहुणे' आहेत; व अशा पाहुण्याप्रमाणेंच सरकारनें त्यांची सर्व व्यवस्था ठेवलेली आहे. यामुळें राजकारणासंबंधीं वाटाघाट करण्याची, किंवा मत प्रदर्शित करण्याची, जी सवलत इतर कैद्यांना मिळण्यासारखी नाहीं, ती म. गांधींना मिळण्यासारखी आहे. खुद्द सरकारशीं बोलणें चालणें करण्याला तर त्यांना कांहींच आडकाठी नाहीं, आणि किल्लेकांच्या मतें सरकाराशीं त्यांचा पत्रव्यवहार आज चालूंहि आहे. फक्त तो प्रसिद्ध होत नाहीं इतकेंच.

"पूर्वीच्या त्यांच्या प्रायोपवेशनाच्या आधीं कित्येक दिवसपर्यंत त्यांचा थेट मुख्य प्रधानाशीं पत्रव्यवहार चालू होता, व तोच पुढें आयत्या वेळीं प्रसिद्ध झाला, हें सर्वांना ठाऊकच आहे. तथापि हल्लीं पत्रव्यवहार चालू आहे किंवा नाहीं हें आम्हांला निश्चित माहीत नाहीं; शिवाय तो चालू असला तरी त्यांत 'मी चळवळ थांबवितों' असें सरकारास कळविण्यापर्यंत त्या पत्रव्यवहाराची मजल आली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कारण कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याची जबाबदारी जशी काँग्रेसच्या वर्किंग कमिटीवर तशीच ती थांबविण्याचीहि जबाबदारी त्याच कमिटीनें घेतली पाहिजे, असें म. गांधी यांचें मत असण्याचा संभव आहे. आणि तसें असेल तर त्यांत वावगें असें फारसें नाहीं. म. गांधी यांच्या मताला अर्थातच इतर कोणाच्याहि मतापेक्षां पुष्कळच अधिक किंमत असणार. पण चळवळ थांबविणें, सुरू करण, या गोष्टींत माणसाच्या महत्त्वापेक्षां त्याचा अधिकारच अधिक निर्णायक ठरतो.

"अशा रीतीनें तुरुंगांतून वैतागानें बाहेर पडलेले, किंवा नाखुषीनें तुरुंगांत राहून कुढत बसणारे, किंवा सात्विक समाधान वृत्तीनें राहणारे, किंवा म. गांधीसारखे व्यक्तिशः फार महत्त्वाचे हे सर्व लोक चळवळ थांबविण्याला निरुपयोगीच ठरतात. या कामी आमच्या मतें तुरुंगांत नसलेले पुढारी हेच खरे उपयोगी आहेत. आणि म. गांधींच्या सल्ला-मसलतीचा किंवा वजनाचा उपयोग व्हावयाचा असेल किंवा होईल तर, तो या लोकांच्या अधिकृत खटपटीची केवळ पुरवणी म्हणून! पण तुरुंगांत नसलेल्या या लोकांतहि अनेक प्रकार आहेत. कांहीं लोक एकदां किंवा अनेकदां शिक्षा भोगून आलेले आहेत. त्यांना फिरून चळवळ करून तुरुंगांत जावें असें वाटत असतें तर त्यांनीं यापूर्वीच केलें असतें; पण तसें केलें नाहीं याचा अर्थ काय करावयाचा हें उघडच दिसतें. दुसरें कांहीं स्वतःच्या कोणत्याहि उघड कृत्यामुळें तुरुंगांत गेलेले नसून, केवळ संशयानें सरकारनें त्यांना तुरुंगांत घातलें होतें. आणि मामुली दोन महिन्यांची मुदत संपतांच त्यांजवर कांहीं अटी घालून त्यांना मोकळें सोडलें आहे. अर्थात् यांपैकीं ज्यांनीं अटी पाळल्या त्यांच्या मतें ही चळवळ थांबावी असेंच असल्याचें अनुमान करतां येतें. कारण असें अनुमान न केलें तर स्वतःला ही चळवळ चालविण्याची संधि असतां इतरांनीं मात्र तुरुंगांत जावें व आपण मोकळें राहावें अशी त्यांची इच्छा असल्याचा आरोप त्यांच्यावर करावा लागतो! पण तो करण्यास आम्ही तयार नाहीं.

तात्पर्य, पक्की कैद भोगून बिनअटींनें किंवा कच्ची कैद भोगल्यावर अटी पाळून, जे लोक आज तुरुंगाबाहेर आहेत त्यांनीं ही चळवळ थांबवावी असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होतें.

"पण या शिवाय आणखी एक वर्ग आहे. त्याच्यासंबंधानें तर हें विधान करण्यास कांहींच भीति नाहीं. हा चमत्कारिक वर्ग म्हटला म्हणजे स्वतः कच्च्या किंवा पक्क्या कोणच्याहि प्रकारच्या कैदेंत कधीं न जातां चळवळीस मदत केलेल्या किंवा करणाऱ्या लोकांचा. हे लोक मनांत म्हणत असतील कीं, "आम्हींच तुरुंगांत कशाला जावयास हवें ? आम्ही मोकळे राहून चळवळीचा पाठपुरावा करणें हें प्रत्यक्ष चळवळ करण्यासारखेंच होय." पण त्यांनीं लक्षांत ठेवावें कीं, त्यांच्या दुर्दैवानें जगाचें मत तसें नाही. "मला चळवळ पसंत नाहीं असें म्हणून, किंवा मला चळवळ पसंत आहे पण तुरुंगांत जाणें मला अनुकूल नाही" असें म्हणून प्रांजलपणें सरळ अपवाद सोसणारा मनुष्य एक वेळ जगाला चालेल. पण जेव्हां पाहावें तेव्हां कायदेभंगाच्या चळवळीचा पाठपुरावा करण्याच्या बहाण्यांतच मग्न झालेले, इकडे लोकांना नांवें ठेवणारे पण स्वतःच्या कातडीला सोन्याचें मोल मानून, फिरून वरती ती देशहिताकरितां सांभाळून ठेवीत आहे असला कांगावा करणारे लोक कांहीं थोडे नाहींत ! अर्थात् त्यांनीं लोकांना परभारें तुरुंगांत पाठविण्याची देशसेवा आतां पुरी करावी असें त्यांना हात जोडून सांगण्याची वेळ आली आहे ! तोंडानें बहिष्काराचा घोष चालू ठेवणारे पण आंतून खुशाल परदेशी मालाचा व्यापार करून पोट भरणारे, तोंडानें कौन्सिलबहिष्काराचा घोष करणारे पण साधेल त्या प्रसंगीं साधेल त्या रीतीनें कायदेकौन्सिलांचा उपयोग काढीइतकाहि होत असेल तरी न सोडणारे, तोंडानें सरकारी कायद्या-विषयी अद्वातद्वा बोलणारे पण स्वतः आचरणांत सर्व कायदेकानू एखाद्या गुलामा-प्रमाणें पाळणारे, आणि शेवटीं कायदेभंगाच्या चळवळीचा स्तुतिपाठ गाणारे पण अनेक खाजगी किंवा सार्वजनिक पोकळ सबबी सांगून स्वतः तुरुंगापासून शेंकडों कोस दूर राहणारे—अशा दुटप्पी लोकांच्या वर्तनानें गेलीं बारा वर्षें या देशांत सुसता गोंधळ घातला आहे ! तो इतका कीं, कॉंग्रेसचे खरे भक्त व खरे स्वार्थत्यागी पण विचारी, अशा बुढ्ढ्यांचे त्या गोंधळांत कांहीं एक चालत नाहीं. भाडोत्री

नौबती आणून कोणी त्या बडविण्याचें काम सुरू ठेवलें तर बिचाऱ्या मनुष्याचा आवाज कितीहि मोठा असला तरी कोणाला कसा ऐकूं जाईल ?

" पण आतां वेळ अशीच आली कीं, कच्च्या दिलाचे पण सच्चे, भोळे पण भले, स्वार्थत्यागी पण विचारी, अशा लोकांनीं जर एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन ही चळवळ थांबावी असें जाहीर रीतीनें प्रकट केलें, व त्या आपल्या निःस्वार्थी मताचा योग्य तो आग्रह धरला, तर त्यांचें म्हणणें तडीला जाऊं शकेल. कारण आजवर झालेली चळवळ ही राष्ट्राला भूषणभूत अशीच झाली हें जसें त्यांना म्हणतां येईल, तसेंच ही चळवळ पुढें चालल्यास भूषण जाऊन त्या ठिकाणीं दूषण येईल, अति केलें तर माती होईल, चळवळीचें वस्त्र ताणलें तर फाटून जाईल, आणि वारा फार भरला तर कातडी चेंडूहि फुटून जातो म्हणून चळवळ थांबवा असेंहि त्यांना यथार्थतेनें प्रतिपादिता येईल. म्हणून जे लोक या चळवळींत स्वेच्छेनें जाऊन, तुरुंगवास पत्करून, खरा स्वार्थत्याग करून आज हालचाल करण्याला मोकळे आहेत, त्यांनींच आतां पुढें येऊन ही चळवळ थांबविण्याचा सल्ला राष्ट्रीय सभेला देण्याचें धैर्य दाखविलें पाहिजे.

"तो मान व तो अधिकार हा जसा त्यांचा, तशीच ती जबाबदारीहि त्यांचीच होय. जे या चळवळींत पडले नाहींत त्यांना तो अधिकार अर्थातच नाहीं. तसेंच ज्यांनीं त्यांत फक्त लुडबुड करण्याइतकाच भाग घेतला, किंवा तितकाहि भाग न घेतां फक्त लोकांना नांवे ठेविलीं, त्यांनाहि हा अधिकार नाहीं. तर जे खऱ्या मनानें चळवळींत पडले, ज्यांनीं खऱ्या मनानें स्वार्थत्याग केला, व आतां ज्यांना खऱ्या मनानेंच ही चळवळ थांबावी असें वाटतें त्यांनाच ती थांबविण्याचा अधिकार आहे. आज चौदा महिने चाललेली चळवळ आतां थांबवावी असें म्हणण्याला अनेक कारणें आहेत; पण त्या सर्वांचा स्पष्ट उच्चार करण्याचें कारण नाहीं. त्यांचा उच्चार न झाला तरी लोकांना तीं कारणें माहीत आहेत. जें काय पाहिजे आहे तें विधायक स्वरूपाचें धैर्य. हे धैर्य दाखविल्याशिवाय, म्हणजे चळवळ आपण होऊन थांबविल्याशिवाय, ती थांबूं शकणार नाहीं. आणि ती जोंपर्यंत तशी थांबूं शकत नाहीं, तोंपर्यंत इतर कांहींहि होऊं शकत नाहीं हेंहि उघड आहे.

" यावर कोणी म्हणेल कीं लढणारा लढतो, व सोसणारा सोसतो, मग बघणाराला त्याची कींव कां यावी ? त्याला आमचें पहिलें उत्तर हें कीं, चळवळ चालू असतां तिच्या चढत्या काळांत आपलेपणामुळें अभिमान वाटणें हा जसा बघणाराचा सहज मनोधर्म आहे तसा, त्याच आपलेपणामुळें, तिच्या पडत्या काळांत तिची कींव येणें हाहि सहज मनोधर्मच आहे. जे युद्धांत शिरतांना आपल्याकडे कोणी पाहात आहे कीं नाहीं याची पर्वाहि करीत नसतील, अशा सात्विक वीरांनाच " आमची कींव तुम्ही कां करतां ? " असें विचारून आपल्या अभिमानी लोकांचा अधिक्षेप करण्याचा अधिकार असतो. पण प्रस्तुत चळवळीसारख्या युद्धांत पडणारांपैकीं तसे खरे किती ? आजूबाजूला न पाहतां, कोणाच्या सहानुभूतीची अपेक्षां न ठेवतां, लोकेषणा यत्किंचितहि न बाळगतां, आणि चळवळींत पडण्यापासून होणाऱ्या संभवनीय स्वार्थी अहंकारनिष्ठ फलाची अपेक्षा न करतां, जो या चळवळींत पडणारा असेल त्याला लोकांच्या स्तुतीची किंमत वाटणार नाहीं; आणि त्याचप्रमाणें आपली कोणी सहानुभूतीनें कींव केली तरी तिजमुळें आपला तेजोभंग झाला अशी तक्रारहि तो करणार नाहीं.

" असे केवळ सात्विक व धीर वृत्तीचे कांही महात्मे याहि चळवळींत आहेत याविषयीं आम्हांला शंका नाहीं. पण वरील वर्णन ज्यांना लागूं पडत नाहीं असे किती तरी लोक या चळवळींत पडतात, ही माहिती ज्यांना आहे त्यांना अशांची कींव करावीशी वाटली तर त्यांनी कां करूं नये ? या पक्ष्याकच्यांची अशी खिचडी होण्याचें कारण हेंच कीं, चळवळ सामुदायिक म्हणून योजली व चालली आहे हें होय. तिजमध्यें पडणारे बरेचसे लोक विवेकनिष्ठ निश्चयानें पडत नाहींत. ते केवळ लोंढ्याबरोबर वाहवत जाणारे व भावनावश असे असतात. आणि कांहीं तर तुरुंगांत गेल्यावर आपण कोणत्या तरी प्रसंगानें, कोणत्या तरी निमित्तानें, किंवा कोणाच्या तरी खटपटीनें सुटूं अशी अपेक्षा मनांत ठेवून काळ कंठतात. अशा लोकांबद्दल सहानुभूति कां वाटूं नये ? किंबहुना अशा लोकांचे तुरुंगांतील जीवित अशा सहानुभूतीवरच अवलंबून असतें. आणि तें तसें असतें म्हणूनच बाहेर इतरांकडून त्यांच्या सुटकेची खटपट जाहीर रीतीनें सुरू असते. प्रस्तुत चळवळीच्या पुढाऱ्यांना ती थांबविण्याचा सल्ला हा जर खरोखर आपला तेजोभंग वाटत असेल, तर त्यांनीं पहिली गोष्ट ही करावी कीं, " तुरुंगांतील राजबंद्यांची सुटका करण्याविषयीं लोकांनीं सभांतून ठराव किंवा कायदे-

मंडळांतून खटपट करणें हा चळवळीचा तेजोभंग होतो म्हणून कोणीहि तसली गोष्ट करूं नये" असें फर्मानच काढावें. म्हणजे मग लोक त्या भानगडींत कशाला पडतील! कारण धावल्याचा पाय विनाकारण ओढावा, किंवा प्रकाशमानांच्या प्रकाशाच्या आड येऊन त्यांचें तेज लववावें असा कोणाचाच हेतु नसतो. निदान काँग्रेसविषयीं यथायोग्य अभिमान वाटणारांचा तरी तसा हेतु नसतो हे कोणासहि कबूल करावें लागेल."

केसरींतील या माझ्या लिहिण्यावर कट्टर काँग्रेसवाले फार रागावले. त्यांनीं निषेधाचीं पत्रकें काढलीं. त्यांना मी केसरींतून समर्पक उत्तरें दिलीं. पण ती हकीकत वाढवीत नाहीं. त्याची वाचकांना आपोआप कल्पना होईल. सांगण्याचें तात्पर्य इतकेच कीं काँग्रेसवाल्यांनाच चळवळ थांबविण्याच्या प्रश्नाचा गंभीर व विवेकबुद्धीनें विचार करावा असें वाटूं लागलें. म्हणून त्या वेळचे काँग्रेसचे हंगामी सर्वाधिकारी बापूजी अणे यांनीं पुणें येथे एक मोठी परिषद १९३३ च्या जुलै महिन्यांत भरविली. सुमारें दीडशें लोक हजर होते. अणे माझ्याच घरीं पाहुणे म्हणून उतरलेले याकरितां त्यांनीं मला निमंत्रण देणें प्राप्तच होतें. पण इतर परिस्थितींत मला निमंत्रण येणें शक्य नव्हतें. मी चळवळ थांबवा म्हणूनच सल्ला देणारा, ना. शास्त्री हेहि त्याच मताचें, पण गांधींनीं सल्ला घेण्याकरितां मद्रासेहून ना. शास्त्री यांना तारेनें बोलावलें मात्र माझी त्यांनीं आठवणहि केली नाहीं. पलीकडचा तोंच अलीकडच्याहून अधिक जवळ असें म्हणतात तेंच खरें.

असो. या सभेंत काय निष्पन्न झालें? हेंच कीं, "सत्याग्रह हा एक नवीन प्रकारचा योग आहे. त्याचा दृष्टान्त आपणालाच झाला. अर्थात् त्याचें शास्त्र त्याचें सूत्र, त्याचें तंत्र, त्याचा न्यास, त्याची ध्यान-धारणा, त्याचा आसनविधि, आणि त्याचें आवाहन विसर्जन यांची माहिती फक्त आपणाला आहे तशी दुसऱ्या कोणालाहि आज नाही" असा घमेंडखोर महात्माजीचा दृढ-विश्वास आहे. आणि तो विश्वास ते स्वतःच कांहीं विनोदानें पण पुष्कळसे खऱ्या भावनेनेंहि बोलून दाखवीत असतात. तेव्हां त्यांच्या अनुयायांना तें मान्य करणें प्राप्तच होतें! आणि सामुदायिक कायदेभंग थांबवून तो व्यक्तिशः करावा, पण फिरून तोहि गांधीवर सोंपवावा असें ठरलें.

असो; कायदेभंगाची चळवळ थांबवावयाची तर सरकार बहुमानास्पद असा तह मान्य करील तरच थांबवावयाची हें पर्यायानें मान्य करून, या तहाची

वाटाघाट करण्याची कामगिरी सभेंतील लोकांनीं एकट्या महात्माजीवरच सोंपविली. त्याप्रमाणें गांधीजींनीं व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांना मुलाखत देण्याविषयीं तार केली. तें कांहींहि असो, कायदेभंगासंबंधानें लोकमत अजमावण्याची एक संधि पुण्याच्या या सभेनें दिली, आणि अखेर ठराव कांहींहि झाला तरी तो थांबवावा असेच बहुतेक एकंदरीनें लोकमत असल्याचें सिद्ध झालें, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. विशेषतः चळवळ थांबवावी असें ज्यांनीं स्पष्ट बोलून दाखविलें त्यांतले बहुतेक लोक या गेल्या चळवळींत स्वतः अंग मोडून काम करणारे होते. पण त्यांपैकीं कित्येकांनीं जर, ठराव मताला घालण्याच्या वेळीं, स्वतःच्या मताविरुद्ध मत दिलें असलें, ( आणि यांत गंगाधरराव देशपांडे हे एक होते ) तर त्याचें कारण एकच, तें हें कीं, 'एक मी कीं एक तूं!' असा कठोर सवालच गांधींनीं अनुयायांना टाकून त्यांच्या काळजाला हात घातला!

" सत्याग्रहाची कायदेभंगाची व पर्यायानें सर्व राजकारणाची धुरा या पुढें एकट्या माझ्या खाद्यांवर ठेवून या पुढें काँग्रेसच मोडून टाका " असाच जवळ जवळ गांधींनीं आपल्या अनुयायांना सल्ला दिला. याचें वर्णन मी केसरीत केलें तें असें:—

"कसेंहि असो. काँग्रेस तर आतां नष्ट झालीच आहे. आणि उद्या गांधीजी तुरुंगांत जाऊन बसले म्हणजे हिंदी राष्ट्रीय राजकारणांतला एक नैमित्तिक प्रलय झाला असेंच म्हणावें लागेल! प्रलयकालचीं वर्णनें निरनिराळ्या पुराणांत निरानिराळीं केलेलीं आढळलीं तरी त्यांचें तात्पर्य एकच असतें. 'प्रलय झाला तेव्हां सर्व जलमय झालें. एकट्या ईश्वराचा आत्मा तेवढा या जलमय विश्वावर एखाद्या प्रकाशकिरणाच्या कवडाशासारखा चंचलपणानें तरंगत राहिला' असें वर्णन ख्रिस्ती धर्मग्रंथांत आहे. हिंदु पुराणांतहि असें वर्णन आढळतें कीं, " प्रलय होतो तेव्हां सर्व विश्व जलमय होतें व एकटा श्रीविष्णु तेवढा पिंपळाच्या एका पानावर आंगठा चोखीत बसतो. " राष्ट्रीय राजकारणाचा जलप्रलय करून म. गांधी हे ईश्वराप्रमाणेंच अहंकारांत एकाग्र व मग्न होऊन बसणार हें ठरलें. पण पुराणांतरींचा ईश्वर आत्यंतिकनाश तरी इच्छित नाहीं. ख्रिस्तपुराणांतल्या ईश्वरानें सृष्टि फिरून उत्पन्न करण्याची आपल्या आवडत्या नोहाची इच्छा तृप्त केली. त्या मानसपुत्रानें एका मोठ्या नावेंत सर्व जीवसृष्टीचे बीजरूप अवशेषांश भरून ठेविले आणि प्रलयजल ओसरल्यावर त्यानें त्यांतूनच

नवी सृष्टि निर्माण केली. हिंदु पुराणांतला श्रीविष्णुहि असाच प्रवृत्तिपर आहे. तो पिंपळाच्या एका पानावरच वसल्या वसल्या नाभिकमलांतून ब्रह्मदेव उत्पन्न करतो; व तो ब्रह्मदेव मग सर्व चराचर सृष्टि पुन्हां उत्पन्न करतो. याप्रमाणें सृष्टीच्या नैमित्तिक प्रलयाबरोबर नैमित्तिक उत्पत्तिचीहि व्यवस्था झालेली असते. पण म. गांधीची लहर ईश्वराइतकीहि प्रवृत्तिप्रवण व लीलाप्रिय दिसत नाहीं !"

या कायदेभंग तहकुबीसंबंधाने एक गांधीचें व दुसरें सर्वाधिकारी अशे यांचें अशीं दोन पत्रकें निघालीं. या पत्रकांची सटीक छाननी मी खालीलप्रमाणें केसरींत केली—

( १ ) कायदेभंगाची चळवळ बिनशर्त थांबविणें देशाच्या हिताचे नाहीं. ( २ ) या शर्ती सरकारनें समेट करण्याची बुद्धि दाखविण्यावर अवलंबून राहतील. ( ३ ) ही बुद्धि दिसून यावयाची म्हणजे प्रथम व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांनीं म. गांधीची भेट बिनशर्त घ्यावयाची. ( ४ ) या भेटींत म. गांधी यांना आयत्या वेळीं ईश्वर बुद्धि देईल ती योजना—स्वराज्यविषयक योजना—ते व्हाइसरॉय यांजपुढें मांडतील ! ( ५ ) ती योजना काय हे आज गांधींचें गांधीना नुसतें माहीतहि नाहीं. तथापि त्यांचा दृढविश्वास मात्र असा आहे कीं, ती पुढें मांड-ल्यास व्हाइसरॉय म्हणजे सरकार व हिंदी जनता या उभयतांना ती एकदम सारखीच मान्य होईल ! ! ( ६ ) पण व्हाइसरॉय गांधीजींना भेटीस बोलावीत नाहीं हें व्हाइसरॉय यांचेंच दुर्भाग्य व त्यांचाच अपमान ! गांधींचा नव्हे ! व हिंदुस्थानचाहि नव्हे ! ( ७ ) आणि हा लॉर्ड विलिंग्डन यांचा अपमान धुऊन निघण्याकरितां किंवा स्वराज्य मिळविण्याकरितां हिंदी जनतेनें कायदेभंगाची चळवळ चालूं ठेविली पाहिजे. ( ८ ) पण ती यापुढें सामुदायिक रीतीनें चालूं ठेवूं नये. कारण त्या रीतींत कार्ययोजना गुप्तपणानें होते; आणि सत्याग्रहाच्या अनेक मोहिमा केल्यानंतर आज प्रथमच गांधीजीना कळलें कीं, गुप्तपणा हा सत्याग्रहाच्या तत्वाविरुद्ध आहे. ( ९ ) ही गुप्तपणाची योजना संभवूच नये म्हणून कॉंग्रेस कमिट्या सर्वच्या सर्व मोडून टाकाव्या. मात्र व्यक्तिशः वाटेल त्यानें कायदेभंग करावा. पण तो स्वतःच्या जबाबदारीवर. म्हणजे त्यानें दुसऱ्या कोणाकडून मदतीची अपेक्षा करूं नये. आणि दुसऱ्या कोणी त्याला ती मदत करूं नये. मदत उघड केली तर तें कृत्य बेकायदा ठरणार; आणि गुप्तपणें केली तर ते सत्याग्रहाच्या तत्वाविरुद्ध म्हणून गांधींच्या

कायद्याप्रमाणें बेकायदा ठरणार ! ! ( १० ) मात्र अशा रीतीनें कोणी कायदेभंग केला तर तो काँग्रेसच्या नांवावरच करावा. ( ११ ) म्हणजे एतावता कायदेभंगाचें नांव तर राहिलें, मग कार्य न झालें तरी चालेल ! किंबहुना कार्य जितकें थोडें तितकें तें अधिक सगुण होतें ! फार काय, एकटे गांधी व त्यांच्या हुजरातीचें पथक इतकेच लोक तुरुंगांत गेल्याने सरकारावर जितका परिणाम होईल तितका पूर्वीसारखे जिकडे तिकडे तुरुंग भरल्यानेंहि होणार नाहीं. ( १२ ) व्यक्तींनीं कायदेभंग केला म्हणजे तो केवळ स्वयंस्फूर्तीचाच असतो. व्यक्ति गुप्त कारस्थान करीत नाहींत ! काँ. कमिट्या सामुदायिक म्हणून त्या मात्र गुप्तपणा राखूं शकतात ! ! ( १३ ) कॉंग्रेस कमिट्या मोडल्या म्हणजे त्यांच्या जागीं डिक्टेटर उभा करावा. ( १४ ) सगळ्या हिंदुस्थानाकरितां खुद्द काँग्रेसचा प्रतिनिधि म्हणून एक डिक्टेटर जनरल—सर्वाधिकारी—असावा. ( १५ ) ही सर्व भानगड गांधीना व्हाइसरॉय साहेबांनी भेटीस बोलावल्यानें मिटली असती. ( १६ ) पुणें परिषद ही गुप्त स्वरूपाची होती. म्हणून तिजमध्यें कायदेभंगाला अनुकूल झालेल्या भाषणांचा परामर्श, स्वतःकडे आलेल्या बातम्यांवरून, व्हाइसरॉय साहेबांनी घेतां कामा नये. पण कायदेभंगाला प्रतिकूल झालेल्या भाषणांचा परामर्श वाटल्यास घ्यावा ! तथापि त्यांतल्या त्यांत व्हाइसरॉय साहेबांकडे जाऊन भेट मागण्यास गांधीजींना जी परवानगी व जो अधिकार पुणें परिषदेनें दिला त्याचा परामर्ष मात्र, ती परिषद गुप्त असली तरी, व्हाइसरॉय यांनी अवश्य घ्यावयास पाहिजेच होता ! ( १७ ) गुप्त कारवाई वाईट म्हणून ती थांबविण्याकरितांच पुणें परिषदेचें काम गुप्तपणें करण्यांत आलें. ( १८ ) सगळ्या वर्तमानपत्रांतून हकीकत एकाच प्रकारची आली म्हणून काय झालें ? ती 'अनधिकृत म्हणून खोटीच समजावी.' ( १९ ) "तुम्ही आपली परिषदेची हकीकत म्हणून खरी काय असेल ती प्रसिद्ध करांना" असें आम्हांला कोणी म्हणूं नये. व्हाइसरॉय बोलावतील तेव्हां ती सर्व त्यांजपुढें खरी खरी मांडूं. मात्र आमच्या जवळ त्या हकीकतींचीं टिपणेंहि नसेनात कां ? ( २० ) ज्यांना व्यक्तिशः जबाबदारीवर कायदेभंग करतां येईल ते तो करतालच अशी अपेक्षा आहे. पण ज्यांना तो करतां येणार नाहीं त्यांनीं आपल्या लागीं असेल तें विधायक कार्य करीत राहावें. ( २१ ) इतर काय वाटेल तें करावें किंवा काय नको तें न करावें. पण-पण एक गोष्ट मात्र करूं नये ! करूंच नये ! ! करूं नयेच नये ! ती

म्हणजे कौन्सिल-प्रवेश ! ! ( २२ ) इतर विधायक कार्यक्रमांनीं एकवेळ स्वराज्य मिळेल. पण कायदेकौन्सिलांत शिरण्यानें ते मिळावयाचें असेल तर मृगजळासारखें तें दूर दूर जात राहील. ( २३ ) म. गांधींनी राजगोपाळाचारियर यांना मंदिरप्रवेश बिलाकरितां कौन्सिलाकडे जाऊन खटपट करावयास सांगितले म्हणून काय झालें ? गांधी व त्यांचे शिष्य यांनी सहकारिता केली तरी ती असहकारिताच समजावी. फक्त इतरांनीं असहकारिता केली तरी ती सहकारिताच होते ! ( २४ ) पुणें परिषद भरविली ती फक्त लोकांचें म्हणणें ऐकून घेण्याकरितां. परिषदेनें ठराव म्हणून केले तरी ते फुकटच समजावे. ( २५ ) गांधींच्या मताशीं लोकांचें मत जुळतें असेल तेव्हां, किंवा गांधींच्या मताप्रमाणे मत द्यावयास लोक तयार असतील तेव्हां त्या लोकांचें मत गांधी वेदाक्षराप्रमाणें पवित्र मानतील ! गांधींच्या मताशी न जुळणारें मत हें केव्हांहि लोकमत असूंच शकत नाहीं !

वरील छाननीमध्यें मी पत्रकांतील मुद्दे देतां देतांच त्यांची थट्टाहि केली आहे व ती अगदीं योग्य होती.

१९३२ सालापासून बापूजी अणे यांचा ओढा काँग्रेसकडे अधिक झाला त्यामुळें त्यांच्या माझ्यांत पूर्वी नव्हता तो मतभेद होण्यास प्रारंभ झाला. ते राष्ट्रीय सभेचे सर्वाधिकारी झाल्यापासून गांधीविषयीची त्यांची विरोधी वृत्ति सौम्य झाली. आणि अणे हे आतां गांधींच्या कच्छपी लागले असें आमच्या पक्षांतील लोकांना वाटूं लागले. पुणें-परिषदेच्या वेळी त्यांनीं आपलीं प्रामाणिक मतें दडपून ठेवलीं असा आक्षेप त्यांच्यावर घेण्यांत आला. कारण परिषदेनंतरच्या त्यांच्या पत्रकांत किंवा इतर रीतीनेंहि त्यांना अखंडाप्रिय असलेल्या कौन्सिलप्रवेशाची सूचना त्यांनी केली नाही. त्यांच्याविषयी मी केसरीत लिहितांना म्हटलें:—

" ओघानेंच आलें म्हणून म. गांधी व श्री. अणे ( म्हणजे प्रस्तुत राजकारणाच्या इतिहासांत एकाच 'बापूजी' या लाडक्या नांवानें कांहीं काळ लोकांच्या तोंडी झालेल्या ) या दोन व्यक्तींच्या परस्परसंबंधाविषयीं दोन शब्द लिहिणें अपरिहार्य आहे. अणे टिळकांचे शिष्य व अनुयायी. मरणसमयीं आपल्या राजकारणविषयक तत्वाचें व उद्योगाचें व्यवस्थापत्र करून त्याची वहिवाट करण्याकरितां टिळकांनीं एखादें पंचायतन नेमलें असतें तर त्यांत अणे यांचें स्थान निश्चित

होतें. टिळकांच्या पश्चात् अणे यांनीं "वऱ्हाड प्रांतांतील टिळक" असे बहुमानास्पद नामाभिधान आपल्या कर्तृत्वानें स्वतःस जनतेकडून मिळवून घेतलें. इ. स. १९१९ पासून इ. स. १९२९ पर्यंत अणे हे इतर महाराष्ट्रीय पुढाऱ्याबरोबरच गांधीजीच्या प्रतिपक्षीयांत गणले जात. ज्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना म. गांधी हे प्रांजलपणें विरोधी व विनोदानें 'शत्रू' असें म्हणतात त्यापैकीच अणे हे होते.

"सन १९२१ साली सारा देश कौन्सिलबहिष्कार गर्जत असतां अणे यांनीं स्वतःच्या व्यक्तिपुरती काँग्रेसची आज्ञा तोंड वाईट करून गिळली. तरी श्री. दादासाहेब खापर्डे व श्री. जतकर वकील यांना ती आज्ञा धाब्यावर बसवून निवडणुकीस त्यांनीं उभे केलेच! नंतर काँग्रेसविरुद्ध उघड बंड करून दास व नेहरू यांना मिळून ते स्वराज्य पक्षाचे प्रांतिक पुढारी बनले. आणि त्यानंतर वेळ आली तेव्हां खुद्द पंडित नेहरूंशीं भांडून प्रतिसहकार पक्षाच्या स्थापनेस त्यांनीं फार मोठी मदत केली. कारण ज्या विधिघटनेमुळें श्री. तांबे हे नागपूर सरकारचे कार्यकारी कौन्सिलर व शेवटीं गव्हर्नरहि झाले ती वऱ्हाडांतच घडून आली; व बापूजी अणे हे तिला मदत करणारेच होते. लाहोर काँग्रेसमध्यें अणे यांनी म. गांधी यांना अनेक गोष्टींत विरोध केला. आणि १९३० साली काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरशहा यांनी हुकम काढून "एक काँग्रेस तरी सोडा नाहीं तर कौन्सिल तरी सोडा" असा कोलदांडा घातला तेव्हां अणे यांनी कौन्सिलची जागा सोडली नाहीं, पण ऑ. इं. काँग्रेस कमिटीच्या सभासदत्वाचा व वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला! १९२१ ते १९२९ या सालांतलीं अणे यांचीं व्याख्यानें पाहिलीं तर तीं गांधीभक्तासारखीं नमून गांधीविरोधकासारखींच आढळतील.

"पण सन १९३० पासून थोडेसें व १९३२ पासून बरेंचसें हें गाडें बदललें. त्याची मीमांसा करण्याचें कारण नाही. तथापि सन १९३० सालच्या का. भं. चळवळींत त्यांनीं भाग घेतल्यामुळें व त्यांना शिक्षा झाल्यामुळें काँ. वर्किंग कमिटींत त्यांची निवड झाली. आणि १९३२च्या कायदेभंगांत ते केवळ इमानदारीमुळें सांपडले. संगतीचा गुण हा नाहीं म्हटला तरी कांहीं असतोच. त्याप्रमाणें अणे यांचे होऊन असहकारितेचे एक कट्टे विरोधी ही भूमिका त्यांनीं हळूहळू सोडली. आणि कौन्सिलप्रवेशाचे सगळ्यांत अधिक कट्टे पुरस्कर्ते अशी आजहि

मनानें त्यांची खरी भूमिका असतां, काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष या नात्यामुळें त्यांनीं कौन्सिलप्रवेशाबाबत मौनव्रत स्वीकारलें. इतकेच नव्हे, तर कायदेभंगाची चळवळ पुढें चालविण्याला आपल्या खऱ्या मताविरुद्ध संमति दिली; व गांधीच्या एकाद्या हस्तकाची भूमिका स्वीकारून एका डिक्टेटरशिवाय इतर सर्व गोष्टींत गांधींच्या आज्ञेप्रमाणें फर्मान काढलें !

" वास्तविक गांधी हे जसे एका प्रकारचे डिक्टेटर तसेंच काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष हेहि डिक्टेटरच होत. पण पर्णकुटीच्या रंगभूमींत या दोन डिक्टेटरांची जी लढत झाली त्यांत अणे हरले व म. गांधी हे विजयी झाले असेंच मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें ! स्वतः त्यांच्याच प्रांतांत, अणे यांचे स्नेहीसोबती व शिष्य म्हणविणारे लोकच काँग्रेस विरुद्ध बंड करून आज उठले आहेत; अणे यांच्या मानसिक आशीर्वादानें ते नवा पक्ष स्थापित आहेत; आणि " तुम्ही जुने असला तरी आमचे पुढारीच आहां. तथापि यापुढें पूजा तुमची आणि प्रसाद आमचा " अशी वांटणी प्रेमानें भांडून ते त्यांच्याशीं करून घेत आहेत. हें दृश्य पाहिलें म्हणजे म. गांधीचे पाश अणे यांच्यावर पडले ते कांहीं अगदींच फुकट गेले नाहींत असें गांधींच्या अनुयायांना यथार्थ अभिमानानें म्हणतां येईल !

" असहकारितेमध्यें ( म्हणजे गांधीप्रणीत असहकारिता ) असलेले आनुषंगिक गुण केसरीप्रमाणें अणे यांना मान्यच आहेत. पण केसरीप्रमाणेंच अणे यांनाहि त्या विशिष्ट असहकारितेचे दोष किती जाणवत होते हें सप्रमाण सिद्ध करतां येतें. ' गेलीं पांच वर्षें ' या नांवाचें केळकरकृत लेखसंग्रहाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें. त्याला श्री. अणे यांनीं प्रस्तावना लिहिली आहे तींत ते म्हणतातः— " बॅ. बॅप्टिस्टा यांनीं, एका महर्षीनें करावें त्याप्रमाणें, असहकारितेच्या जन्मकालींच तिचें जातक वर्तवून ठेविलें तें एकाद्या भविष्याप्रमाणें पांच वर्षांच्या कटु अनुभवानें खरेंच ठरलें. असहकारितेतून कांहीं गोष्टी बऱ्या निघाल्या एवढ्या कबुलीवरच सर्वथैव अव्यवहार्य ठरूं पाहणारा कार्यक्रम कोणी अट्टाहासानें उचलून धरण्याचा प्रयत्न करील, तर त्यांतून कार्यसिद्धि न होता कार्यहानि मात्र होणार आहे, असें महाराष्ट्रीयांना प्रामाणिकपणानें कां वाटतें याची विस्तृत मीमांसा केळकरांच्या या लेखसंग्रहांत वाचकांना पाहावयास मिळेल ! "

" पण हे शब्द प्रस्तावनेंत राहिले, आणि अव्यवहार्य गांधीप्रणीत विशिष्ट प्रकारच्या असहकारितेचें आज्ञापत्रक त्याच गांधींच्या आज्ञेनें लिहून छापून जग-

जाहीर करण्याचें अणे यांच्या नशिबीं आलें हे दैवदुर्विलसितांचेंच एक उदाहरण होय. आणि हें आम्हीच म्हणतो असें नाहीं; तर त्यांचाच एक अनुयायी केसरीच्या गेल्या अकांतील बातमीपत्रांत लिहितो कीं—" बापूजींचें पत्रक कसें असेल याची रूपरेषा गांधीजींच्या मुलाखतींत प्रकट झालेली असल्यामुळें या पत्रकाचे लोकांना आश्चर्य असें कांहीच वाटले नाहीं. परंतु गया कॉंग्रेसच्या वेळीं स्वराज्यपक्षाला जन्म देणाऱ्या मंडळींत प्रमुख असलेले व पुढें स्वराज्यपक्षाच्या वांझोट्या धोरणाविरुद्ध बंडाचें निशाण घेऊन उभे राहिलेले बापूजी अणे कोणीकडे, व आज बहुधा स्वतःच्या खऱ्याखुऱ्या मताला बाजूस सारून प्रवाहपतिताप्रमाणें गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकून वैयक्तिक कायदेभंगाचें धोरण जाहीर करणारे बापूजी कोणीकडे, असा प्रश्न त्यांच्या अनेक चाहत्यांच्या मनांत उद्भवला असेल यांत संशय नाहीं ! '

" श्री. अणे हे आपल्या अनेक गुणांमुळें महाराष्ट्रीय जनतेला आदरणीय झाले आहेत. तथापि त्या जनतेला खरोखरच असें वाटत आहे कीं, अणे हे गांधींच्या आहारीं जाऊन विनाकारण त्यांच्या पचनीं पडले. गेल्या मे महिन्यापासून या दोघां मांत्रिकांची गांठ पडली; पण एक अभिमंत्रित अशा स्वस्थानीं असल्यामुळें दुसऱ्यास भारी ठरावा असें अखेर झालें. " नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति " हेंच खरें. या तीन महिन्यांत अणे यांनीं म. गांधींचा पलंग-पहारा ठराविक वेळीं कधींच चुकविला नाहीं. त्यांच्या परिवारांत समरस होता येत नव्हते तरी स्वतःचें दाक्षिण्य संभाळिलें. मनांत दूर पण जगांत जवळ अशा एखाद्या अंतेवासी ' शागीर्दाप्रमाणें ' अणे यांनीं गांधीजींच्या लहरी स्वभावाची खस्त खाल्ली. आणि अखेर टिळक मंदिरांतील परिषदेंत, स्वतःच्या मताचा एकहि शब्द न बोलतां, गांधीचें उपाध्येपण सांगसफल करून देऊन, कॉंग्रेसची अंत्येष्टि त्यांनीं आपल्या हातानें केली ! या स्वत्वसंन्यासाबद्दल अणे यांची स्तुति गांधीजींचे अनुयायी तरी खचित करतील यांत शंका नाहीं. "

यवतमाळ येथील अणे यांच्या मित्रांना हें माझें लिहिणें आवडलें नाहीं. त्यांनीं याविषयीं मला लिहिलेलें पत्र व मी त्याला दिलेलें उत्तर हीं दोनहि एका दृष्टीनें उल्लेखनीय ठरतात म्हणूनच तीं खालीं देतो. यवतमाळ हा वऱ्हाडांतील टिळक सांप्रदायाचा 'बाले किल्ला'. पण गांधींच्या कारणानें त्यांच्यांत व माझ्यांत

स्वमताभिमानानें या प्रसंगीं थोडासा बेबनाव झाला. मात्र सुदैवानें हा कायम टिकणारा नव्हता असें आमच्या परस्पराविषयींच्या वागणुकीनें पुढे दिसून आलेंच. असो. हीं पत्र अशीं होतीं:—

( ता. १९।८।३३ ) "दुर्दैवानें आपणांस खालील चार ओळी लिहिण्याचा प्रसंग आला याबद्दल अतिशय वाईट वाटतें. आम्ही स्वतःस लोकमान्य आणि त्यांचा केसरी यांच्या पंथाचे समजत आहोत. परंतु सध्याचें केसरीचें धोरण पाहतां तें लोकमान्यांच्या पंथास कितपत साजेसें आहे याबद्दल जबरदस्त शंका येऊं लागली आहे. देशांत चालू असलेल्या तीव्र चळवळीसंबंधीं अवहेलना उपहास किंबहुना विरोध दर्शवून, केसरीनें गेल्या दीड वर्षांत जी शल्यनीति अवलंबिली ती पाहून मन उद्विग्न होते. आणि सर्वांचा कळसच म्हणून की काय लोकमान्यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्तानें ता. १ ऑगस्ट रोजींच्या अंकांत जो अग्रलेख प्रसिद्ध झाला त्यानंतर लोकमान्यपंथीयांच्या मनांत 'आतां मात्र प्रळयकाळ खराच ओढवला' असून त्यांत लोकमान्यांची भक्ति शिल्लक होती नव्हती ती रसातळास जाणार, अशा विचारांचें काहूर उद्भवलेलें आहे.

"ता. १ ऑगस्टच्या अग्रलेखांत इतकीं अक्षिप्त विधानें आहेत कीं त्यांचें खंडन करावयाचें झाल्यास त्या लेखाच्या दहा कॉलमांस निदान तेवढेंच विस्तृत उत्तर द्यावें लागेल. आमचा उद्देश वर्तमानपत्री वादाची धूळ उडविण्याचा नसून केवळ टिळक व केसरी सांप्रदायी लोकांच्या अंतःकरणांत केसरीच्या अलीकडील, व विशेषतः १ ऑगस्टच्या अंकांत प्रकट झालेल्या विचारसरणीनें जी कालवाकालव होत आहे, तीच केसरीच्या स्पष्टपणें निदर्शनास आणावयाची एवढाच आहे. आक्षिप्त विधानाचा एक नमुना म्हणून अग्रलेखाच्या पहिल्या कॉलमाच्या अखेरीस सुरूं झालेलें पुढील वाक्य पहा.

"ऑर्डिनन्सेसचें राज्य दडपशाही वगैरे आपत्ति ओढवून घेतल्या."

या वाक्याच्या मागें असणारी विचारसरणी आणि त्या वाक्यांतून निघणारे ध्वनि पुनः एकदां शांतपणें विचार करून आपणांस कितपत समर्थनीय वाटतात! लोकमान्यांच्या नांवावर चालविलेल्या केसरींत हीं विधानें यावीत याची आम्हांस लाज वाटते. बड्यांतला बडा ब्युरोक्रॅट यापेक्षां जास्त उपहासगर्भ विधानें मुद्दाम करूं शकेल असें वाटत नाहीं. गेल्या ३ वर्षांत नोकरशाहीनें मांडलेल्या धुडगुसाचें आणखी निराळें समर्थन या केसरीच्या कबुलीजबाबानंतर कशास हवे!

"दुसरे—श्रीयुत बापूजी अणे यांच्यासंबंधी इतकें विस्तृत लिहिलें नसतें तर खुद्द अणे अथवा त्यांचे चहाते यांच्यावर अनंत उपकार झाले असते. "मनांत दूर पण जनांत जवळ" असें अण्यांचें वर्तन होतें असें आपण लिहितां! केसरीच्या निकट सहवासांत अणे हे नुकतेच एक-महिन्याच्यावर राहिल्यानंतरहि केसरीशीं आलेला अणे यांचा संबंधहि जवळ जवळ वर वर्णिलेल्या नमुन्याचाच झाला असें कष्टानें म्हणावें लागतें. श्रीयुत अणे यांच्यासंबंधी जवळपास अडीच पावणेतीन कॉलम मजकूर लिहून केसरीनें काय साधले? गांधी–अणे वादांत अणे हरले व परप्रत्ययनेय बनून गांधीजीच्या चळवळीचें तुणतुणें त्यांनी पुन्हां सुरूं केले हेंच ना! आणि हे अणे यांनीं सारसार विचार आणि स्वतंत्र बुद्धि यांच्याकडे पाठ-मोहरे होऊन केवळ इमानदारीवर अधिष्ठित असलेल्या शागीर्दी कर्तव्य-कल्पनेस बळी पडून केले असेंच ना? आपण लिहितां की, "१९२१ते१९२९ या सालांतील अणे यांचीं व्याख्यानें पाहिली तर ती गांधीभक्तासारखीं नसून गांधी-विरोधका-सारखीं आढळतील." पण "सन १९३०पासून थोडेसे व १९३२ पासून बरेचसें हें गाडें वदललें." कां? आपण म्हणतां "त्याची मीमांसा करण्याचें कारण नाहीं" आमच्या मतें सन १९३० सालीं अणे यांनीं जें गाडें वदलले त्याची मीमांसा केल्याशिवाय आजच्या त्यांच्या वर्तनाचा अर्थ शोधणे व्यर्थ होय. आपण अणे यांची मनोभूमिका समजून न घेतां त्यांच्या मतासंबंधीं जीं अनेक विधानें केलीं आहेत त्यामुळें विशेषतः तीं विधानें "जनांत जवळ मनांत दूर" अशा त्यांच्या केसरीशीं नुकत्याच आलेल्या संबंधानंतर केल्यामुळें आपण अणे यांचेसंबंधीं मोठाच अन्याय केला आहे. सन १९२० च्या कलकत्त्याच्या जादा काँग्रेसनंतर पोळा (वऱ्हाडी सण) फुटल्यावर जसे बैल बेफाम सैरावैरा धावत जातात त्याप्रमाणें सर्व दूर अशी स्थिति झाली असतां केवळ एकच एक जो महाराष्ट्रीय गृहस्थ (पुढारी म्हणत नाहीं) स्थितप्रज्ञ राहून मार्गदर्शक झाला, तो पन्नाशी उलटल्यावर दोनतीन वर्षांतच बावचळला, बुद्धिभ्रष्ट, परप्रत्ययनेय बनला, "महात्मा गांधींचें दास्यच अनुसरण्यास" तयार झाला, 'स्वतंत्र बुद्धि' व 'सारासारा विवेक' यांना पारखा होऊन 'निराळा मार्ग' काढण्यास कचरला असमर्थ ठरला असें केसरीस म्हणावयाचें असल्यास त्यानें खुशाल म्हणावें!

"आम्हास जास्त लिहिण्याची जरूरी वाटत नाहीं. लोकमान्यांच्या प्रेमामुळें आणि केसरीच्या पूर्व परंपरेमुळें जो ऋणानुबंध अनेक वर्षांपासून चालू आहे तो पूर्ववत्

चालू रहावा अशी आमची तीव्र इच्छा आहे. केसरीच्या अलीकडे दृष्टोत्पत्तीस येत असलेल्या धोरणामुळें त्या इच्छेस धक्का लागतो कीं काय अशी आमच्या मनात जबरदस्त शंका उद्भवल्यामुळें, ती गोष्ट वेळींच आपल्या नजरेस आणणें आम्ही आपलें पवित्र कर्तव्य समजतो. केसरीनें सरकारच्या धोरणाचें पर्यायानें कां होईना समर्थन केलेलें लोकांस खपणार नाहीं. केसरीनें मार्गदर्शन केल्यास हरकत नाहीं परंतु तेजोवध करूं नये अशी लोकांची अपेक्षा असते.

"असो. थोडक्यांत वर लिहिल्याप्रमाणे आम्ही आपले विचार आपणास स्पष्टपणें कळविलें आहेत. त्याचा नीट विचार होऊन यापुढें केसरीचें धोरण योग्य तेच राहील अशी आशा आहे. कळावें, लोभ असावा ही विनंति." (भा. ह. जतकर, भा. म. टेंबे, अ. र. साकळे, प्र. कृ. द्रवीड, रा. ब. जोशी, त्र्यं. स. बापट, इ.

याला मी उत्तर लिहिले. परंतु वाद वाढूं नये म्हणून आत्मसंयमन करून मी तें पाठविण्याचें रहित केलें. आणि नुसती चार ओळींची पोच दिली. न पाठविलेलें पत्र असें आहे:—

(ता. २१।८।३३) रा. रा. समस्त यवतमाळकर मित्रमंडळी यांस कृ. सा. न. वि. वि.—आपलें ता. १४ चे पत्र पावलें. त्याला उद्देशून खालील चार ओळी लिहितों. ता. १ ऑगस्टच्या केसरींतील लेखाला आपण तितकेंच लांब उत्तर देऊं शकाल, आणि तसें आपण दिलें तर त्याला प्रत्युत्तर म्हणून मीहि तितकेंच पुनः लिहूं शकेन. पण शक्य तितके थोडक्यांत लिहितों. माझें असें प्रामाणिक मत बनलें आहे कीं, वर्किंग कमिटीच्या इमानदारीला बापूजी अणे यांनीं संभाळलें; पण आपल्या खासगी मताचा आपल्याच हातानें कोडमारा करून आपल्या जुन्या पक्षाला भ्रमाच्या गर्तेत लोटलें व मार्गदर्शनहि भलतें केलें. पुणें परिषदेत त्यांचा पक्ष प्रतिबिंबित व्हावा तितका झाला नव्हता; व जो झाला होता त्याचें खरें मत काय होतें हें आपणांस माहीत आहेच. अर्थात् परिषद बोल वणें व वर्किंग कमिटीच्या सभेत स्वतःला बंधनकारक असे ठराव होऊं देणे या गोष्टी घडण्यापूर्वी, त्यांनी आपल्या जुन्या पक्षाची मंडळी मध्यवर्ती ठिकाणीं एकत्र करून, त्यांच्याशीं सर्व बाजूंनीं विचारविनिमय करून मग, इमानदारीकरितां इतकें समजा व खरें मत असें आहे असें समजा, असें स्पष्ट केलें असतें म्हणजे ठीक झालें असतें. पण वर्किंग कमिटीत गेल्यामुळें त्यांना जवळ जवळ जुना स्वपक्षच राहिला नाहीं असें मला

एकंदरीनें दिसूं लागलें. आणि त्यांना जर असा स्वपक्षच उरला नाहीं तर त्यांच्या संबंधानें सर्वस्वी काँग्रेसनिष्ठ नसणाऱ्या पक्षानें त्याला योग्य वाटले ते लिहिलें त्यांत फारशी चूक नाहीं.

"केसरीप्रमाणेंच 'महाराष्ट्र'नेंहि लिहिलें आहे. शब्द कदाचित् वेगळे असतील. बापूजी अणे यांचें मत, त्यांच्या हल्लींच्या वर्तनावरून कोणा अनुमित करील तर, तें असे की, कायदेभंगाची चळवळ सुरू झाली ती "स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं व स्वातंत्र्य मिळेपर्यंत" आणि तींहि मुख्य साधनमार्ग म्हणून! विधायक कार्यक्रमांत कायदेकौन्सिलाचें नांवहि नाहीं. हें मत बापूजींचें १९२९ पर्यंत नव्हतें असें मी स्पष्ट म्हणूं शकतों. त्यांचें नवें मत गांधींनीं केवळ आपल्या अंकित ठेवलेल्या वर्किंग कमिटीचे मत आहे; व तेंहि त्यांतील हेयवांचें आहे. विवेचकांचें नाहीं. असें असतां तें मत विस्तृत राष्ट्रीय पक्षावर केवळ वर्किंग कमिटीच्या इमानदारीकरितां लादणें म्हणजे, जें जें काँग्रेसच्या हातून गांधीजींच्या हातून घडेल त्याचें त्या पक्षानें समर्थन करावें अशी अपेक्षा करणें हा अन्याय आहे असें मी समजतों. व्हाइसरॉयानें गांधीची भेट न घेतल्याबद्दल केसरीनें व मी व्यक्तिशः स्पष्ट शब्दांनीं व्हाईसरॉयाचा निषेध प्रगट केला आहे. पण मुळांत व्हाइसरॉयाला भेटण्याची विनंति करण्याचा मार्ग हा चुकीचा व हटकून अपयश ओढवणारा असा दिसत असतां त्याचा मात्र निषेध करणें हें म्हणे वाईट! कां तर त्यामुळें सरकारचें अप्रत्यक्ष समर्थन होतें! याचा अर्थ, गांधी लहरीनें किंवा मनस्वितेनें जें जें करतील त्या सर्वांचें उघडपणें समर्थन करण्याशिवाय गत्यंतर नाहीं! हा शुद्ध जुलूम व मुस्कटदाबी होय. ती मी, किंवा केसरी माझ्या हातीं आहे तोपर्यंत केसरी, कधींहि करून घेणार नाहीं. मग त्यांत आम्ही दोघेहि लोकप्रियतेच्या रसातळाला गेलों किंवा नष्ट झालों तरी मला त्याची पर्वा नाही. आज इतकीं वर्षें सरकारी दडपशाहीविरुद्ध केसरींतून सारखा भडिमार होत आहे. असें असतां कुठल्या तरी एका वाक्याचा आधार घेऊन केसरीवर 'सरकारचे समर्थन' करण्याचा आरोप करतांना आपण सारासार विचार केला नाहींत असेंच म्हणावें लागतें.

"असो. मी या वादांत मी अधिक पडूं इच्छित नाहीं. आपला राग अद्यापि ओसरला नाहीं व माझाहि राग अद्यापि ओसरला नाहीं. अशा स्थितींत अधिक न लिहावें हेंच चांगलें. आपलें जुनें १५–१७ वर्षांचे संबंध लक्षांत

घेऊन आपण मजविषयीं जें सौजन्य आजच्या स्थितींतहि दाखवितां त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. बापूजींना आपल्या मताचा अभिमान असेल व त्यांचा अभिमान आपल्याला असेल, तसाच मलाहि माझ्या मतांचा अभिमान आहे आणि लोकप्रियता नष्ट होण्याचा धाक सरळ समोर दिसत असतां मी तीं प्रतिपादित आहे यावरून मजमध्येंहि कांहीं प्रामाणिकपणा असेल असें आपण मानल्यास कृपा होईल. बापूजी यांनीं गांधीजींच्या संबंधांत अलीकडे जें एकंदरीनें वर्तन केलें त्याचा, पूर्वीच्या त्यांच्या मताशीं विरोध पाहतां मला खरोखरच खेद वाटला. गांधी काय पूर्वी नव्हते व आतांच मोठे झाले वाटते! असो. बापूजी करतात तें मजपेक्षां अधिक देशाभिमानाचेंहि असेल. माझी साठी उलटली म्हणून माझी बुद्धि नाठी झाली असेंहि वाटेल तर आपण म्हणावें. पण "गांधीजींचे दोष व त्यांच्या चुका दाखवित्या म्हणजे त्यापासून सरकारचे अप्रत्यक्ष समर्थन होतें" हा सिद्धान्त व कोलदांडा मला मान्य नाही. गांधी अनत्याचारित्वाचें स्तोम माजवितात तेव्हां ते सरकारचें समर्थन व बंगाली तरुणांची निंदा करितात असें समजावयाचे काय? सरकारचें समर्थन करणें तें स्पष्ट त्याच हेतूनें केलें तर होतें. इतर रीतीनें होणारा कोंडमारा मला मान्य नाहीं! मग मी किंवा केसरी सरकारजमा झालों असें आपण म्हटलें तरी चालेल! गांधी व त्यांचे सहकारी यांची सत्यनिष्ठा शंभर टक्के असेल, मज गरिबाची दहा टक्के तरी असेल. पण ती कांहीं थोडीतरी आहे असें मात्र मी म्हणतों. पस्तीस वर्षें वर्तमानपत्रांतून देशसेवा केल्यानंतर सरकारचें समर्थन न होईल असें कसें लिहावें हें लोकांनीं मला लिहिलें तर मलाहि तें खपणार नाही. आणि जर मला अजूनहि तें यवतमाळकरांनींहि शिकावयाचेच असेल तर तें मी आतां यापुढें केव्हां शिकणार? अशा 'समर्थना'संबंधीं लोक मला लिहितात तो मी त्यांचा शुद्ध कांगावा समजतों.

पुणें परिषदेंत जवळ जवळ जाहीरपणें (तो गुप्तपणा फक्त नांवाचा होता) कायदेभंगाच्या चळवळीविरुद्ध अनेक बाजूंनीं स्पष्ट कडक भाषणें झालीं त्यांनाहि मग सरकारचें समर्थन करणारीं कां म्हणूं नयेत! असो. पण आतां थांबतोच. लिहिण्यानें लिहिणें वाढतें. ईश्वराची कृपा असेल व फिरून महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षांत एकोपा व्हावा असा संकेत असेल तर तो होईलहि. तीं संधि अजून सर्वस्वी नष्ट झालेली नाहीं असें मी समजतों. कारण अणे यांचें एक मित्र उमरावतीहून लिहितात कीं, "आतां तुरुंगांतून परत आल्यावर बापूजी गांधीजींना प्रतिपक्षी

म्हणून विरोध करण्याला उभे राहणार आहेत." तें घडेल तो मी सुदिन मानीन ! पण तोपर्यंत काय किंवा यापुढें आतां केव्हांहि काय, मी असेंच समजतों की लोकप्रियता संपादण्याच्या वेळीं कोणाच्याहि मतांची किंवा सत्यनिष्ठेची कसोटी लागते तिजपेक्षां ती नष्ट होण्याच्या वेळींच अधिक लागते. वऱ्हाडकर मित्र-मंडळींनीं मला कांहीं वेळ, त्यांनी आदरानें व मित्रभावानें गुंफलेल्या माळेंतील, एका फुलाचें स्थान दिलें होतें. पण असे कोणचें फूल आहे कीं ज्याचा केव्हांहि निर्माल्य होत नाहीं ? पण निर्माल्याला पुढें देवघरांत किंवा माजघरांत स्थान न मिळालें तरी त्याचें म्हणून कांहींतरी वेगळें स्थान असतेंच. त्याला अगदींच कोणी उकिरड्यावर टाकून देत नाहीं. आपल्या मनो-भावनेंत किंवा निदान स्मरणांत यापुढे मी, वास नष्ट झालेल्या, निर्माल्याइतका राहिलों तरी पुष्कळ समजेन. आपलें पत्र मी कोणासहि प्रकट केलें नाही. आपणहि माझें पत्र यवतमाळकरं मित्रमंडळी पलीकडे जाऊं देऊं नये अशी विनंति आहे.

"माझ्यो लेखांना आपण शल्यनीति हें नांव दिलें. पण ज्या वीरांचा तेजोभंग मी केला ते असन्मार्गप्रवृत्त, कौरवांचा पक्षपात करणाऱ्या सहोदर वैरी कर्णा-प्रमाणें, ठरतात हेहि आपणाला कबूल करावें लागेल. तें आपणाला कबूल आहे काय ! तसेच हेहि लक्षांत ठेवा कीं, कर्णाचा वध झाला तो शल्यानें केलेल्या तेजोभंगामुळें नाहीं तर पृथ्वीनेंच त्याचें रथचक्र गिळल्यामुळें ! म. गांधींचें रथ-चक्र गिळण्याची कारवाई केसरी करीत नमून स्वतः त्यांचा अविवेक व बुद्धिभ्रंशच ती करीत आहे, असे उद्यां जगाच्या प्रत्ययाला येईल ! "

पूर्वी एक सामुदायिक कायदेभंगाची तरी चळवळ, नाहीं तर कौन्सिल-प्रवेश, असा विकल्प सर्व समंजस काँग्रेसवाले मानीत असत. पुणें परिषदेनंतर सामुदायिक कायदेभंग थांबला. तथापि कौन्सिलप्रवेशाला मात्र मान्यता मिळेना ! या संबंधानें मी केसरींत खालीलप्रमाणें निश्चित व ठासून लिहिलें :—

" महात्माजींशीं देशाचा वेबनाव असणारी दुसरी गोष्ट म्हणजे कौन्सिल-प्रवेश. " कौन्सिलचें नांव काढलें कीं, माझें डोकें चक्राकार भ्रमूं लागून घेरी येते " असें विधान त्यांनीं आपल्या एका ताज्या मुलाखतींत केलें आहे. पण एकाला जांभई आली म्हणजे ती पाहून दुसऱ्यालाहि येते, त्याप्रमाणें एकाचें

डोकें फिरलेलें पाहून सहानुभवित्वानें दुसऱ्याचेंहि डोकें केव्हां केव्हां फिरतें. कौन्सिलसंबंधांत गांधीचें हे मस्तकभ्रमण पाहून आमचेंहि डोकें फिरतें, म्हणून आम्ही जास्त न बोलण्याची मुद्दाम सावधगिरी घेतो. आम्हांला आश्चर्य इतकेंच वाटतें कीं, गांधीजींचें डोकें भ्रमून त्याबरोबर कायदे कौन्सिलहि गिरक्या खात असतां, मंदिरप्रवेशाच्या प्रसंगी मात्र गांधीजीना अचूक आपलें बोट, शकुनवंतीच्या कोष्टकांतील मंगलदर्शक घराप्रमाणें, कौन्सिलवर ठेवतां येतें ! आणि आपल्या चपल शिष्याकडून नेमकी त्या कौन्सिलांत उडी घेववितां येते ! पण कौन्सिलच्या विषयासंबंधीं गांधीजींचा व आम्हां इतरांचा इतका वाद आज दहा वर्षे झाला आहे कीं, त्यांना उद्देशून त्या विषयावर एक शब्द लिहिणें हा देखील आम्हांला शीण वाटतो. एखाद्याला एखाद्या गोष्टीची शिसारी कांहीं तरी कारणानें येते. कोणाला कोथिंबीर आवडत नाहीं तर कोणाला कलमी आंबा आवडत नाहीं ! किंवा एखाद्याची नेत्ररचनाच अशी असते कीं, त्याला एखादा रंगच अजिबात दिसत नाही. तशांतलें हेंहि एक व्यंग गांधीजींना जडलेलें आहे इतकें म्हणून सोडून द्यावें हेच बरें. "लोक कौन्सिलांत जाणार झालेच तर मी एका व्यक्तीनें त्यांना विरोध करून काय होणार ?" असें गांधींनीं त्याच मुलाखतींत म्हटलें आहे. कदाचित् याचा गांधींच्या मनांतला अर्थ मात्र अगदीं उलटाहि असेल. तसें उलट अर्थानें ते कित्येकदां बोलतातहि. म्हणून कदाचित् त्यांना असें म्हणावयाचें असेल कीं, "मी एक विरुद्ध आहे असे कळल्यावर मग काय बिशाद आहे कौन्सिलप्रवेशाची चळवळ होण्याची !" पण आम्हीहि महात्माजींना स्पष्टच सांगतों कीं, आतां त्यांनीं सगळीच्या सगळी पुण्याई कौन्सिलप्रवेशाविरुद्ध खर्चली तरी ती चळवळ यशस्वी झाल्याशिवाय राहात नाहीं !"

पण हें भविष्य खरें ठरण्याला स्वतःहि कांहीं हातभार लावणें अवश्य होतें. अर्थात् काँग्रेस यापुढेंहि कौन्सिलप्रवेशाची चळवळ न करील तर त्याचा सक्रिय निषेध, आणि मार्गदर्शन म्हणूनहि, आपण स्वतंत्र पक्ष काढावा असें आमच्या पैकीं ( विशेषतः मंडलिक जम्नादास मेथा इत्यादि ) मंडळींनीं ठरविलें. त्याप्रमाणें १९३३ च्या ऑक्टोबरांत मुंबईस सरदारगृहांत या पक्षाची स्थापना झाली. स्वागताध्यक्ष मेथा हे असून वऱ्हाडचे एक पुढारी रामराव देशमूख हे अध्यक्ष होते. तथापि परिषदेच्या अधिवेशनाचा प्रारंभ करून देण्याचा मान मला देण्यांत

आला होता. या नात्यानें मी जें भाषण केलें त्यांतील कांही उतारे या खालीं देत आहे :—

"आपण मला परिषद उघडण्याचा बहुमान दिला त्याबद्दल मी आपले कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. मात्र मला हें आपल्याला प्रथमच सांगितलें पाहिजे कीं, एक केवळ 'सन्मान्य पाहुणा' या नात्यानें मी परिषदेचें उद्घाटन करीत नाहीं. एका इंग्रज सद्गृहस्थानें नुकतेंच 'राजकीय परिषदेचा सन्मान्य पाहुणा म्हणजे राजकारणांतून लोपत चाललेला मुत्सद्दी' असें वर्णन केलें आहे. परंतु मला 'सन्मान्य पाहुणा' आणि 'लोपत चाललेला मुत्सद्दी' हीं दोनहि विशेषणें लागूं नाहींत. अकस्मात् उदय किंवा अकस्मात् लोप हा माझ्या जीविताचा गुणधर्मच नाहीं; तर राजकीय क्षेत्रांत आपल्या शक्तीप्रमाणें काम करणारा मी एक गृहस्थ आहे. वयोमानाप्रमाणें पूर्वीप्रमाणें सार्वजनिक कार्यें उरकण्यास मजमध्यें तितकीशी धमक राहिली नसल्यास नवल नाहीं. आणि यामुळें परिषदेमध्यें नव्या पक्षाची स्थापना झाल्यावर प्रत्यक्ष अधिकाराचें असें कोणतेंहि पद न स्वीकारण्याचें मी ठरवलें आहे. मात्र त्या पक्षाचा मी सभासद राहीन हें निश्चित. यापुढें राजकीय चळवळींत प्रत्यक्ष भाग घेणें मला शक्य होवो अथवा न होवो, सद्यःस्थितीबद्दल मात्र माझीं कांहीं ठाम मतें झालीं आहेत. तीं मतें मी आपणापुढें मांडीत आहे.

"कांहीं महिन्यांपूर्वी पुणें येथें कांग्रेस कार्यकर्त्यांची एक परिषद भरली आणि विशेष निर्णय न होतां ती तशीच समाप्त झाली. नंतर सार्वत्रिक कायदेभग बंद ठेवून वैयक्तिक कायदेभंग सुरूं ठेवण्यांत आला. परंतु त्याचीहि स्थिति किती शोचनीय झाली आहे हें दिसतच आहे. कायदेभंगाच्या चळवळींत धुगधुगी कायम ठेवण्याचे अट्टाहासपूर्वक खासगी प्रयत्न चालूं आहेत. परंतु देशांतील सर्वसामान्य जनता दडपशाहीच्या रूळाखालीं भरडली गेल्यामुळें कॉंग्रेसच्या सर्वाधिकाऱ्याकडून त्या चळवळीवर बहुतांशीं पडदा पाडण्यांत आला. अशा वेळी सार्वत्रिक चळवळ मागें घेणें हेच शहाणपणाचें लक्षण होय. असहकारितेचा अर्थ मलाहि कळतो. आणि ती यापुढें खरी परिणामकारक व्हावयाची असेल तर ती मतदारसंघाच्या द्वारेंच होणार आहे. हिंदी राजकारणांत मतदार ही एक जबरदस्त शक्ति निर्माण करण्यांत आली आहे. आणि व्यवहारतः ती शक्ति तुम्ही नाहीशी करूं शकत नाहीं, म्हणून तिला तुम्ही आपल्या कारणीं लावून घेतली पाहिजे. सरकारला असें वाटतें कीं, हिंदुस्थानांतील राजकीय विचार गारद करण्यासाठीच पार्लमेंटनें 'मतदार' ही एक

तलवार तयार केली आहे. ठीक आहे. मतदार ही एक तलवार आहे तर तिला आपल्या मताप्रमाणें धार आणि पाणी देणें आपलें कर्तव्य आहे. नव्या राज्यघटनेंत मतदानाचें क्षेत्र इतकें वाढविण्यांत येणार आहे की, भावी कालांत देशांतील तोच मुख्य घटक ठरणार आहे. अर्थात त्याजवर विसंबल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. राजकीय चळवळ विधायक स्वरूपाची असो वा विध्वंसक स्वरूपाची असो, तुम्हांला मतदारांचाच आश्रय घ्यावा लागेल. असहकारिता आणि कायदेभंग या चळवळींच्या वेळीं त्यांचीच मदत तुम्ही घेतली नाहीं कां ! आणि २० महिने अखंड चळवळ चालविल्यावर लोक दडपशाहीनें जिगजिगलेले पाहून तुम्हीच सार्वत्रिक कायदेभंगाचें शस्त्र म्यान केलेंत ना ! अशा रीतीनें ही चळवळ बंद केल्यावर तिच्या ऐवजीं तुम्ही त्याच लोकांना कोणती राजकीय कामगिरी सांगणार ! खादी, अस्पृश्यतानिवारण यांचें नांव घेतां येईल. परंतु नित्य राजकीय चळवळीत त्यांना फाजील महत्त्व देणें योग्य नाहीं.

" शिस्त, स्वार्थत्याग आणि ऐहिकभोग–विरक्ति या यौगिक गुणांत मुरलेले असे थोडेसे लोक वैयक्तिक कायदेभंगाचे व्रत चालविण्यास तयार असणार. परंतु बहुजनसमाजाची वाट काय ! त्यांच्यापासून तुम्ही कोणतें कार्य करून घेणार ! खादी आणि अस्पृश्यता–निवारण. एवढ्यावरच भागणार नाहीं. लोकांना आपल्यावरील कर्जाचें ओझें कमी होण्यासाठी पतपेढ्या पाहिजे आहेत. त्यांना औद्योगिक व मोफत आणि सक्तीचें शिक्षण हवें आहे. शेतकरी आणि मजूर यांची आर्थिक स्थिति सुधारावयास पाहिजे आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार सुरळीतपणें चालावे म्हणून रुपयाचा दर निश्चित व्हावयास पाहिजे आहे. करपद्धति आमूलाग्र सुधारून गरीब व श्रीमंत यांच्यामध्यें योग्य प्रमाणांत करांची वांटणी व्हावयास पाहिजे आहे. लष्करी शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे. अशा एक ना दोन, लोकांच्या नडीच्या हजारों गोष्टी सांगतां येतील. कायदेमंडळावर बहिष्कार घालून व लोकांना नुसते असहकारितेचे पाठ देऊन या गोष्टी मिळवितां येतील काय ! कायदेमंडळ हें एक यंत्र आहे. त्याच्यावर ताबा ठेवून त्याचें विघातक कार्य तुम्ही होऊन थांबविणार नसाल तर तें तुम्हांला चिरडल्याशिवाय राहणार नाहीं. कांहीं असा आक्षेप घेतील कीं, नव्या राज्यघटनेंत आपल्याला या यंत्राचा मनाजोगा उपयोग करून घेतां येणारच नाहीं. परंतु मला इतकेंच सांगावयाचें आहे

कीं, सबंध यंत्राचा ताबा तुम्हांला मिळाला नाहीं तरी त्याजकडून होणाऱ्या राष्ट्र-विघातक कार्याला तुम्ही पायबंद घालूं शकाल.

"कायदेभंगाच्या ऐवजी विधायक कार्यक्रमहि एका मोठ्या व्यक्तीकडून सुचविण्यांत आला आहे. या विधायक कार्यक्रमांतील कांहीं बाबींविषयीं मतभेद होण्याचें कांहींच कारण नाहीं. प्रश्न आहे तो हा कीं, त्या विधायक कार्यक्रमांत कायदेमंडळ-प्रवेश बसतो कीं नाही ? आणि याच प्रश्नाने तर सारा गोंधळ उडविला आहे. काँग्रेसचे कार्यकर्ते आपल्या विधायक कार्यक्रमांत कायदे-मंडळांना स्थान देतील तर खरोखरच आम्हाला नवा पक्ष काढण्याचीहि गरज राहणार नाहीं. आणि तसें झालें तर काँग्रेसच्या निशाणाखालीं सर्व जुन्या-नव्या काँग्रेसवाल्यांना जमविणें मुळींच कठिण नाहीं. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, काँग्रेसमधील एका बड्या पुढाऱ्यानें निष्कारणपणें आपल्या एका पत्रकांत कौन्सिलांचा मुद्दाम निषेध केला आहे ! आणि आश्चर्य असें कीं, मंदिरप्रवेशाची सवलत अस्पृश्यांना कायद्यानें मिळावी म्हणून तेच पुढारी कौन्सिलचे उंबरठे झिजवीत आहेत आणि सभासदांची मनधरणी करीत आहेत ! अशा स्थितींत कौन्सिलांचा उपयोग खरा कीं त्याजवरील बहिष्काराचें प्रेम खरें ? कौन्सिलांबद्दलचा काँग्रेस-वाल्यांचा हा दुराग्रह ज्या दिवशीं मावळेल तो सुदिन होय. कौन्सिलबहिष्काराच्या भरांत त्यांजकडून विसंगत कृत्यें होत आहेत. कौन्सिलबहिष्कारामुळें होत असलेली ही विसंगत वर्तणूक थांबवावयाची असेल तर त्यांनीं सद्यःस्थितीचा फेरविचारच करावयास पाहिजे. तसें न करतां ते पुनरपि कौन्सिलबहिष्काराचें तुणतुणेंच वाजवीत बसतील तर शेतकरी कामकरी आणि युवक त्याला मिथ्याचारच मानतील."

यानंतर या पक्षाच्या विधायक कार्यक्रमाविषयीं कांहीं सूचना करून शेवटीं मी असें सांगितलें कीं काँग्रेसवरील बंदी उठल्यावर या पक्षाच्या प्रत्येक सभासदानें काँग्रेसचा सभासद असलेच पाहिजे असा नियम करावा. या शेवटच्या मुद्यावर पुढें विषयनियामक मंडळांत सरदारगृहाच्या गच्चीवर सर्व रात्रभर (अलोचन जाग्रण करून ) चर्चा झाली. पुष्कळांचें मत ही अट काढून टाकावी असें होतें. पण शेवटीं निर्णायक मताचा मान मला द्यावयाचा म्हणून ती अट ठेवावी असें ठरलें. ही पक्षस्थापना होतांना बॅ. जयकर व डॉ. मुंजे हे विलायतेंत होते. त्यांना या स्वतंत्र पक्षाची कल्पना मानवली नाहीं. जुना प्रतिसहकार पक्षच पुढें चालूं ठेवावा असें

त्यांचें मत होतें. पुढें जयकर हे नव्या पक्षाचे किंवा काँग्रेसचेहि सभासद झाले नाहींत. पण मुंजे मात्र एक दोन वर्षांनीं या पक्षाचे सभासद झाले.

मुंबईच्या सभेंत शेवटीं पक्षाचें अध्यक्षपद स्वीकारण्याचा आग्रह जम्नादास मेथा यांनी केल्यावरून मी तें स्थान कांहीं दिवस घेतलें. पुढें बापूजी अणे यांना तें पद देण्यांत आलें. त्यानीं तें कांहीं दिवस स्वीकारलें. पण पुढें झालेल्या कौन्सिल निवडणुकीच्या बाबतींत मतभेद झाल्यामुळें त्यांनीं या पक्षाचा राजीनामा दिला. हा नवा लोकशाही स्वराज्य पक्ष आज स्थिरपद असून, त्याने कायदे कौन्सिलच्या व परवां नुकत्याच झालेल्या म्युनिसिपालिट्यांच्या निवडणुकी लढविल्या.

---

## ( ८ ) कौन्सिल-बहिष्काराचा अंत

जगांत कोणत्याहि गोष्टीला शेवट हा असतोच! आणि असहकारितेच्या वेडाचें असेंच झालें. पण तो शेवट असा तसा झाला नाही. तर म्हणींतल्याप्रमाणें 'अगदीं इकडचें थोबाड तिकडें' फिरविल्याप्रमाणें भवितव्यतेनें काँग्रेसच्या धोरणांत परिवर्तन घडवून आणलें. सर्वांना हवें होतें तेच. डॉ. अन्सारी यांनीं डॉ. बिधनराय व भुलाभाई देसाई यांना हाताशीं घेऊन, व म.गांधींच्या कानाशीं लागून, कौन्सिल-प्रवेश घडवून आणण्याला अनुकूल व उपयोगी अशा जुन्या काँ. स्वराज्यपक्षाचें पुनरुज्जीवन करण्याचें ठरविलें. पण असें करतांना डॉ. अन्सारी यांनीं कम्यूनल अवॉर्डेला ( जातीयनिर्णयाला ) संभाळून धरण्याची, न दुखवूं देण्याची, कारवाई फारच सफाईन केली. शेवटीं सर्व कारवायांवर शिक्कामोर्तब गांधींचें व्हावयाचें हें ठरलेलेंच! त्याप्रमाणें गांधींनीं अन्सारी यांना लिहिलेलें पत्र प्रसिद्ध करण्यांत आलें तें असें:—

" दिल्ली येथें काँग्रेसच्या कांहीं अनुयायांची जी औपचारिक सभा भरली व तींत कांहीं ठराव पसार झाले त्यासंबंधीं मजबरोबर चर्चा करण्याकरितां आपण तिघेजण पाटण्यास आला होतां हें एकपरी बरें झालें. जुन्या स्वराज्य पक्षाचें पुनरुज्जीवन करण्यासंबंधीं व असेंब्लीच्या नव्या निवडणुकींमध्यें उभें राहण्यासंबंधीं परिषदेनें केलेल्या ठरावांना संमति देण्यास मला कांहींच प्रत्यवाय वाटत नाहीं. सद्यःस्थितींत कायदेमंडळाचा राष्ट्रीय कार्याला कितपत उपयोग होईल या बाबतची

माझीं मतें सुप्रसिद्ध आहेत. १९२० सालीं कायदेमंडळाच्या उपयुक्ततेबद्दल माझीं जीं मतें होतीं तींच आजहि कायम आहेत. तथापि मला असें वाटतें कीं, ज्यांना कांहीं निमित्तामुळें कायदेभंगांत भाग घेतां येत नाहीं किंवा घेण्याची इच्छा नाहीं, आणि ज्यांचा कायदेमंडळावर विश्वास आहे, त्यांनीं राष्ट्रहितदृष्ट्या काम करण्यासाठीं कायदेमंडळांत शिरणें हें केवळ योग्यच नव्हे तर, त त्यांचें कर्तव्यच आहे. हे जे विचार मी प्रदर्शित केले आहेत त्यांना अविरोधी अशा धोरणाने नव्या पक्षाला जी जी मदत लागेल ती ती देण्याला मी यथाशक्ति मदत करीन."

पाटणा येथें ता. ७ रोजीं काढलेल्या जाहीर पत्रकांत म. गांधी म्हणतात, "मी जे जाहीरपत्रक काढीत आहे त्यांतील प्रत्येक शब्द हा आत्मनिरीक्षण, अंतःसंवेदना, आणि ईशप्रार्थना या तिन्हीचा उद्रेक आहे. या निर्णयाने अर्थातच कोणाहि एखाद्या व्यक्तीवर शिंतोडा उडविण्याचा माझा मानस नाहीं. माझ्या मर्यादित सामर्थ्याची ती एक प्रांजळ कबुलीच आहे. आश्रमवासीयांबरोबर केलेल्या संभाषणामुळे हें पत्रक काढण्यास मला स्फूर्ति झाली. विशेषतः एका जुन्या व चिरपरिचित सहकाऱ्याशी माझें बोलणें चालूं असतां त्यांत मला विशेष उद्बोधक अशी माहिती मिळाली. तुरुंगांत दिलेंल काम करण्यास तो सहकारी कंटाळा करी. अर्थात् सत्याग्रहतत्त्वाच्या विरुद्ध ही त्याची वागणूक झाली. माझ्या सहकाऱ्याची समजूत अशी की, आपलें दौर्बल्य मला ( गांधीना ) माहीत आहे. परंतु खरोखर मला त्याची जाणीवहि नव्हती. आणि असला अन्वळेपणा पुढाऱ्याच्या ठायी असणें ही अक्षम्य गोष्ट होय. लगेच मला असें वाटूं लागले कीं, कांहीं कालपर्यंत मी स्वतः एकटाच कायदेभंगाचा क्रियावान् प्रतिनिधि म्हणून राहावें. सद्यःस्थितींत कायदेभंगाची जबाबदारी माझ्या एकट्याशिवाय दुसऱ्या कोणीहि स्वीकारता कामा नये. मला असें वाटतें कीं, सत्याग्रहाचा वास्तविक संदेश अद्यापहि बहुजनसमाजापर्यंत पोहोचलेला नाहीं.

"आश्रमवासीयांबरोबर झालेल्या संभाषणावरून व स्वतः केलेल्या आत्मनिरीक्षणावरून मला असा निर्णय देणें भाग पडत आहे कीं, विशिष्ट तक्रारीशिवाय 'स्वराज्या'साठीं चालविलेली सत्याग्रहाची चळवळ काँग्रेसच्या अनुयायांनीं तहकूब करावी. त्यांनीं ती चळवळ आतां माझ्या एकट्यावरच सोपवावी. माझ्या हयातींत ती चळवळ ज्या कोणाला पुनरुज्जीवित करावयाची असेल त्याला सत्या-

ग्रहशास्त्राचीं तत्त्वें पूर्णपणे माहीत असली पाहिजेत, व ती चळवळ त्यानें माझ्या आदेशाप्रमाणें चालविली पाहिजे. सत्याग्रहाचा प्रणेता व पुरस्कर्ता या नात्यानेंच मी हें मत देत आहे. आतांपर्यंत स्वराज्यासाठीं म्हणून ज्यांनी ज्यांनीं माझ्या परोक्ष-अपरोक्ष सल्लयावरून वा उपदेशांवरून कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतलेला आहे, त्यांनीं त्या चळवळीपासून आतां परावृत्त व्हावें. पुष्कळांनीं उदासीन स्थितींत केलेल्या सत्याग्रहामुळें क्रांतिकारक किंवा राज्यकर्ते यांच्या अंतःकरणांत कांहींच फरक पडलेला नाहीं. अशा रीतीनें सत्याग्रहांतून मुक्त झालेल्या कार्यकर्त्यांनीं खादीप्रसार, जातीय ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, मद्यपानप्रतिबंध यांसारख्या राष्ट्रपोषक चळवळींत मनोभावें भाग घेतला पाहिजे. ज्यांना ही कामें करतां येणार नाहींत, त्यांनीं राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या अशा लहान लहान उद्योगधंद्यांत भाग घेऊन आपला उदरनिर्वाह करावा. हें पत्रक काढल्यामुळें कॉंग्रेसचे अधिकार मी लुबाडले असें अर्थातच होत नाहीं. सत्याग्रहाच्या बाबतींत माझ्याकडून कांहीं सल्ला मिळावा अशी ज्यांची इच्छा आहे त्यांना या पत्रकान्वयें मी सल्ला देत आहे."

याला अनुसरून लगेच डॉ. अन्सारी यांनीं खालील पत्रक प्रसिद्ध केलें—

"पाटणा येथें महात्माजींशीं विचारविनिमय केल्यावर जो निर्णय बाहेर पडला आहे त्यामुळें मला फारच समाधान वाटत आहे. म. गांधींनीं जुन्या स्वराज्य पक्षाच्या पुनरुज्जीवनास व कायदेमंडळाच्या निवडणुकींत भाग घेण्यास उदार अन्तःकरणानें संमति दिली आहे! खुद्द त्यांचीं मतें कायदेमंडळाच्या उपयुक्ततेबद्दल पूर्वीप्रमाणेंच ठाम असलीं तथापि त्यांना असें वाटतें कीं, ज्यांना कायदेभंगाच्या चळवळींत कोणत्याहि कारणानें भाग घेतां येत नाहीं, व ज्यांचा कायदेमंडळांतील कामावर विश्वास आहे, अशा कॉंग्रेसच्या अनुयायांनीं आपापल्या समजुतीप्रमाणें राष्ट्रहितपोषक विधायक कार्य करणें त्यांचें कर्तव्य आहे. इतकेंच नव्हे तर, स्वराज्यपक्षाला मदत करण्यासहि महात्माजी तयार आहेत. महात्माजींच्या या अन्तःकरणपूर्वक व आत्मस्फूर्तीनें मिळालेल्या पाठिंब्यामुळें कांग्रेसमध्यें फूट पडण्याचें टळल ही आनंदाची गोष्ट होय. या निर्णयानें कॉंग्रेसमधील विविध पक्षोपपक्षांचें सहकार्य व संमीलन होण्यास मदत होणार आहे.

"जुन्या स्वराज्य पक्षाचें पुनरुज्जीवन व संघटन झाल्यावर कॉंग्रेसपुढें व राष्ट्रापुढें व्यावहारिक, परिणामकारक, व क्षोभजनक असा विधायक कार्यक्रम ठेवतां येईल. असा

कार्यक्रम मांडतां आल्यावर देशभर पसरलेले राजकीय औदासिन्य व शैथिल्य घालवितां येईल, व सरकाराच्या नजरेस ही गोष्ट आणतां येईल कीं, 'पांढऱ्या खलित्यां'तील स्वराज्य-योजना व दडपशाहीचे जुलमी कायदे यांचा निषेध करण्याच्या कामीं आमच्या पाठीशी अवघी जनता उभी आहे. त्याच वेळी आपल्याला राष्ट्राची स्वराज्याची मागणीहि सरकारपुढें एकमुखाने मांडतां येईल. जातीय समेट हा अर्थातच त्या राष्ट्रीय मागणीचा एक महत्त्वाचा घटक समजला जाईल. स्वराज्य-पक्ष हा जातीय ऐक्य साधण्याचा कसोशीचा प्रयत्न करणार आहे. बॅ. जिना यांच्या मागण्यांत फरक करून मुसलमानांतील सर्व उपपंथांना व इतर जातींना त्या मान्य होण्यासारख्या करतां येतील असें मला वाटतें. एप्रिल महिन्याच्या अखेरीस किंवा मे महिन्याच्या सुरुवातीस कलकत्ता येथे स्वराज्यपक्षीय व काँग्रेस-वाले यांची एक मोठी परिषद बोलावण्याचा माझा विचार आहे. त्या सभेत पक्षाचा कार्यक्रम ठरविणें, त्याचें कार्यकारी मंडळ निवडणें इत्यादि कामें होतील."

कौन्सिलप्रवेशाचे पुन्हा प्रवर्तन घडवितांना काँग्रेसमधील जुन्या स्वराज्य-पक्षाला अग्रेसर करावें, व त्याच्याकडून तें कार्य करवावें, अशी डॉ. अन्सारी यांची सूचना होती व ती गांधीनाहि पटली होती. पण प्रत्यक्षांत तसें घडलें नाही. गांधी-च्या बगलेंतल्या थोड्या निवडक पुढाऱ्यांनीच तें सर्व काम आपल्या हातीं घेतलें. यांचा प्रमुखपणा डॉ. अन्सारी यांजकडे होता व त्यांना तर जातीयनिर्णयाला धक्का लावावयाचा नव्हता. म्हणून त्यांनी अगदीं एका बाजूस रांचीसारख्या ठिकाणीं खाजगी कट जुळवून हवें तसें धोरण आंखलें. ही गोष्ट बापूजी अणे यांना पसंत पडली नाहीं. विशेषतः महाराष्ट्रांतील जुन्या स्वराज्य पक्षाच्या आम्हा महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना या खासगी सभेला निमंत्रण न द्यावें, व मुद्दाम वगळावें, या गोष्टीचा त्यांना रागहि आला. यासंबंधीं अणे यांचीं कांही पत्रें देतों :—

( ता. २२।४।१९३४ ) या सोबत मी मुंबईस के. एफ्. नरीमन यांना पाठविलेल्या पत्राची प्रत तुम्हाला अवलोकनार्थ पाठवीत आहे. तें पत्र असें :— कायदेभंगाची चळवळ थांबल्यापासून देशांत जी स्थिति उत्पन्न झाली आहे तिच विचार करण्याकरितां, आणि स्वराज्यपक्षाच्या पुनर्घटनेचा विचार करण्याकरितां, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी लवकरच बोलावण्यांत येईल असें वाटतें. ही सभा रांचीस बोलावणें ठीक होणार नाहीं. मुंबई किंवा कलकत्ता येथें, विशेषतः कलकत्ता-

सच अशी महत्त्वाची सभा बोलाविली पाहिजे. रांचीस सभा न बोलाविली तर सल्ला द्यावयाला गांधी हजर राहूं शकणार नाहींत या सबबींत अर्थ नाहीं. इतक्या लोकांकरितां गांधीनींच आपला कार्यक्रम किंचित बदलून घ्यावा. डॉ. अन्सारी, डॉ. महंमूद यांना मी याप्रमाणें लिहीत आहे. पाटणा येथें गांधींनीं जे उद्गार काढले त्याचा अर्थ तुम्ही व सरोजिनी नायडू यांनीं केला तो बरोबर आहे. म्हणजे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें स्पष्ट शब्दांत आतां असें ठरविलें आहे कीं कायदे-भंग थांबविला पाहिजे. नाहींतर सरकार या मुग्धतेचा फायदा घेईल.

"नव्या निवडणुकी व्हावयाच्या तर ही गोष्ट अवश्य आहे. या निवडणुकी-च्या कामाकरितां काँग्रेसनें स्वराज्य पक्षाला पूर्ण मुखत्यारी द्यावी, फार तर आपलें धोरण दर्शविण्यासारखें कांही नियम घालून द्यावेत. पण काँग्रेसनें स्वतः असें कांहीं न केलें तर मी स्वराज्य पक्षाची संघटना करणार आहे हें तुम्हास उघड सांगतों. याकरतां खुद्द काँग्रेसचें जादा अधिवेशन भरावें कीं काय तें मग पाहूं. जुन्या स्वराज्य पक्षाशी, म्हणजे ज्याचे अध्यक्ष पंडित नेहरू होते त्याच्याशीं, मी १९२९ सालींच संबंध सोडला. त्याचवेळी जयकर, केळकर, मुंजे यांनींहि तो सोडला. त्यांच्याबरोबर मीहि प्रतिसहकारी पक्षाच्या तिकिटावर निवडून आलों. लाहोर येथील काँग्रेसचा ठराव माझ्यावर बंधनकारक होता असें मी तरी केव्हांहि समजलों नाहीं. आम्ही सन १९३० सालीं असेंब्लीचा राजीनामा दिला तो सरकारच्या इतर कांहीं कृत्यांचा निषेध करण्याकरितां.

"मी स्वतः कायदेभंगांत भाग घेतला याचा अर्थ माझ्या जुन्या प्रतिसहकार पक्षाचीं तत्त्वें मी सोडून दिलीं असतील असा नाहीं. मी वर सुचविलेल्या नांवाचे इतर गृहस्थ जर तुम्हाला बोलवावयाचे नसतील तर मलाहि बोलवूं नका. त्यांना वगळल्यास तुमच्या परिषदेच्या ठरावांना महाराष्ट्रांत नागपुरांत व वऱ्हाडांत कोणीहि किंमत देणार नाहीं हें लक्षांत ठेवा. तुमच्या परिषदेचा मुख्य विषय कौन्सिलप्रवेश हा आहे म्हणून तर मी हें सांगतों. आणि म्हणतो कीं, वरील गृहस्थांचा सल्ला तुम्ही अवश्य घ्या. स्वतः महात्मा गांधी यांनीं 'स्टेटस्मन' पत्राला जी मुलाखत दिली आहे त्यांत ते म्हणतात 'स्वराज्य पार्टीचीं तत्त्वें ज्या कोणाला मान्य असतील त्या सर्वांनीं तींत प्रवेश मिळवावा, मग त्याचें जुनें वर्तन कोण-त्याहि बाजूचें झालेलें असो.' आतां म. गांधी म्हणतात कीं, मी पूर्वी पंडित मोती-

लाल व देशबंधू दास यांना कौन्सिलांतील धोरण ठरवून दिलें नाहीं, तसेंच या नव्या स्वराज्य-पक्षालाहि ठरवून देऊं शकत नाहीं. हें गांधींचें म्हणणें त्यांच्या दृष्टीनें योग्यच आहे. ( बापूजी अणे, यवतमाळ. )

( ता. २४।४।१९२४ ) माझ्या मागील पत्रांत मी डॉ. अन्सारींना आपणास रांचीच्या सभेस आमंत्रण करण्याबद्दल सुचविले असल्याचे लिहिले होते. त्या पत्रास डॉ. अन्सारींनीं उत्तर लिहिलें आहे की " नवीन स्वराज्य पक्षाची घटना, कार्यक्रम, व धोरण काय असावें हें ठरविण्यासाठीं होणाऱ्या या सभेस प्रतिसहकारपक्षाच्या पुढाऱ्यांना इतक्यांतच बोलाविणें युक्त होणार नाहीं. पण पुढें ऑ. इं. कॉं. कमिटीची संमति मिळाल्यावर प्रतिसहकारपक्ष व स्वराज्यपक्ष यांमधील मतभेदाची तडजोड करून निवडणुकींत जास्तींत जास्त यश मिळविण्याचा आमचा इरादा आहे. मी आपणांस लिहिलेल्या पत्रांत आपण रांचीच्या सभेचें आमंत्रण स्वीकारावें अशी विनंति केली होती. पण आतां त्या पत्राने आपली कांहीं गैरसोय झाली असल्यास तसदीची माफी करावी.

डॉ. अन्सारींच्या नकाराबद्दल जरी मला फार वाईट वाटत असले तरी मी समेटाची आशा अजिबात सोडलेली नाहीं. स्वराज्यपक्ष व प्रतिसहकारवादी पक्ष यांच्यांत तडजोड करून, कौन्सिलवादी कॉंग्रेसभक्तांच्या या दोन्ही महत्वाच्या गटांचें ऐक्य करण्याचा प्रयत्न मी चालूं ठेवीन. ( मा. श्री. अणे. )

(ता. २।७।१९२४) माझ्या पंडित मालवीय यांच्याशीं २८ ता.स झालेल्या भेटींत वर्किंग कमिटीनें "कम्युनल अवॉर्ड" संबंधीच्या ठरावांत समाधानकारक फरक केला नाहीं तर आम्ही दोघांनीं राजीनामे द्यावें असें ठरविलें आहे. " राजीनामा दिल्यावर पुन्हां असेंब्लीच्या निवडणुकीस उभें राहूं नये, कारण त्यामुळें कॉंग्रेसच्या उमेदवाराविरुद्ध निवडणूक लढविणें भाग पडेल " अशा मताचा मी आहे. या विषयीं तुम्ही सुचविलेल्या मुद्यांचा मालवीयांच्यावर फार परिणाम झाला. तेही आपल्याच मताचें आहेत. तरीहि " कम्युनल अवॉर्ड "मुळें होणारा अन्याय जगजाहीर करून, ब्रिटिश सरकारच्या धोरणाविरुद्ध लोकमत निर्माण करावेंच. त्यासाठीं एक स्वतंत्र " लीग " स्थापन करावी कीं कसें याचा विचार बनारसच्या वर्किंग कमिटीच्या अधिवेशनानंतर आपण भेटून ठरवूं. ( मा. श्री. अणे, यवतमाळ. )

या नवीन घडामोडीला पं. मदनमोहन मालवीय आणि बापूजी अणे यांनीं प्रथम अनुमोदन दिलें तें असेंः—

पंडित मदनमोहन मालवीय—"काँग्रेसवाल्यानें असेंब्लींतील प्रत्येक जागा जिंकण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे."

लोकनायक बापूजी अणे—"सध्याच्या निष्क्रिय व कुचंबलेल्या राजकारणामुळें ज्या काँग्रेसवाल्यांचीं मनें अस्थिर होत होतीं त्यांना दिल्लीचे ठराव व त्यांना म. गांधीनीं दिलेली अनुमति ही ऐकून समाधान वाटेल यांत शंका नाहीं. काँग्रेसनें सरकाराचें निवडणुकीचें आव्हान स्वीकारून व निवडणुकींत आपले उमेदवार बहुसंख्याक असे निवडून आणून जनतेवर आपलें वर्चस्व अद्यापि किती आहे, हें दाखविणें हेंच योग्य आहे. नव्या पक्षाच्या पुढाऱ्यांनीं निवडणुकी कोणत्या तत्त्वावर व पद्धतीवर लढवावयाच्या यासंबंधी एक निश्चित कार्यक्रम ताबडतोब आंखला पाहिजे."

तथापि अन्सारी प्रभृति काँग्रेस पुढारी आणि अणे मालवीय यांचें जातीयनिर्णयाबाबत एकमत होणें शक्य नव्हतें. लोकशाही स्वराज्य पक्षाला तर जातीयनिर्णय मान्य नसल्याचें पूर्वीच प्रसिद्ध झालें होतें. अशा स्थितींत वरील दोघांनी कम्यूनल अवॉर्डशीं झगडण्याला एखादा नवीन पक्ष स्थापित करण्याऐवजीं लो. स्व. पक्षासच येऊन मिळावयास पाहिजे होते. पण "महाराष्ट्रावर इतर प्रांत नाराज असतात यामुळें अखिल भारतीय असा नवाच एखादा पक्ष काढावा" असें अणे यांच्या मनानें घेतलें. ते स्वतः लोकशाही पक्षाचे सभासद झाले होते. पण पंडित मालवीय यांना पुढारी करून आणि बंगालप्रांत आपल्या बाजूला आणन कलकत्ता येथे एक नवा राष्ट्रीयपक्ष स्थापण्याची योजना सिद्ध झाली. माझें व इकडील इतर मंडळीचें म्हणणें असें की कम्यूनल अवॉर्ड ही महत्त्वाची पण एकेरी बाब आहे. म्हणून त्याशीं झगडण्याकरितां वेगळा पक्ष असा नको. एखादा स्पेशल स्वतंत्र 'संघ' त्या कार्यापुरता काढावा. पण तें अणे मालवीय यांना पटेना.

मालवीय व अणे यांनीं कॉ. वर्किंग कमिटीचे राजीनामे दिले याचें कारण असें कीं जातीयनिर्णयाविरुद्ध असलेलें आपलें मत उघडपणें प्रतिपादण्यास त्यांना स्वतःला, व त्याच विचाराच्या इतर सर्व काँग्रेसच्या अधिकाऱ्यांना, स्वातंत्र्य

असावें तें नव्हतें. वास्तविक काँग्रेसनें या एका मुद्यापुरतें मतस्वातंत्र्य देण्यास कांहीं हरकत नसावी. तें दिलें असतें तर काग्रेसमधील फूट थांबली असती. इतकेंच काय, मालवीय व अणे यांना नवा पक्ष काढावा लागला नसता. आणि आमचा लोकशाही पक्षहि काँग्रेसशीं मिळतें घेण्याला तयार झाला असता. पण काँग्रेस पुढारी डॉ० अन्सारी प्रभृति मुसलमानांचें मन दुखवण्यास तयार नव्हते. इतर कोणालाहि दुखवावें पण मुसलमानांना दुखवूं नये, हा काँग्रेसचा परिपाठच होता !

असो. नवीन पक्ष असा काढूं नये या करितां अणे व मालवीय यांचें मन वळवावें म्हणून मी त्यांना खालीलप्रमाणे अनावृत पत्र लिहिलें:—

" आपण उभयतांनी पार्लमेंटरी बोर्ड व काँग्रेसची वर्किंग कमिटी यावरील आपल्या जागांचे राजीनामे देऊन, हिंदुस्थानांत अद्यापि राष्ट्रीय वृत्ति व राष्ट्रीय तत्त्वें हीं जिवंत आहेत व काँग्रेस पुढाऱ्यांनी प्रचलित केलेल्या हिंदुमुसलमानांच्या खोट्या एकीच्या कल्पनांनीहि तीं नाहींशीं झालेली नाहींत, असेंच सिद्ध केलें आहे.

" मात्र आपल्या राजीनाम्यानंतर आपण प्रस्तुत जातीयनिर्णय व त्यावर अधिष्ठित झालेल्या राज्यघटनेचा निषेध करण्याकरितां एक कायमचा नवा पक्ष स्थापन करण्याचा जो उपक्रम चालविलेला आहे त्याबद्दल इकडील आम्हा महाराष्ट्रीयांकडून मान्यता मिळणार नाहीं. आपल्या जाहीरपत्रकावरून पाहतां हिंदुस्थानांत असेंब्लीमध्यें, व लंडन येथें पार्लमेंटमध्यें, श्वेतपत्रिकेला अनुसरून व्हावयाचा कायदा विचाराकरितां पुढें येईल तेव्हां जातीयनिर्णयाला आपला पक्ष कसून विरोध करील असें दिसतें. याकरितां स्वतंत्र पक्षाच्या संघटनेचा व्याप वाढवून स्वदेशांत व परदेशांत करावा लागणारा मतप्रसार, मोठ्या प्रमाणावर संघटना, मोठा द्रव्यानिधि इ. पक्षसंघटनेच्या अनुषंगानें येणाऱ्या अनंत गोष्टींमध्यें आपलें सामर्थ्य खर्ची घालण्याऐवजीं, आपण आपल्या जवळील सर्व मनुष्यबळ व द्रव्यबळ जातीयनिर्णयाला सर्व प्रकारें विरोध करण्यांत कारणीं लावावें. आणि सर्व प्रकारच्या राजकीय प्रश्नांबद्दल मतप्रदर्शनाचें आवश्यक ओझें अंगावर घेणारा व्यापक व स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याच्या भरीस न पडतां, तेवढेंच एक काम एकमुखानें पार पाडावें हें अधिक व्यवहार्य नाहीं काय !

" खरें म्हटलें तर जातीयनिर्णयविरोध हा मुख्य प्रश्न धसाला लावण्याचें काम एखाद्या सर्वव्यापी पक्षापेक्षां एखाद्या संघानेंच अधिक यशस्वी होईल. संघ केव्हांहि सुटसुटीत असल्यामुळें त्याच्या कर्तृत्वांत त्वरा करामत आणि सामर्थ्य हीं सहज प्रतीत होतात. अंगीकृत प्रश्नांशिवाय इतर बाबतींत देशांतील इतर पक्षांशीं संघाला मतभेद प्रदर्शित करून वैमनस्य वाढविण्याचें कारण नसतें. देशाच्या आजच्या परिस्थितींत ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असून आपण एखादा जातीय निर्णयविरोधी संघ ( Anti-Communal Award League ) किंवा तत्सम संस्था स्थापन केल्यास आपल्या नियोजित पक्षापेक्षां त्याच्या हातून केव्हांहि अधिक यशस्वी कार्य होण्याचा संभव आहे असें आम्हांस वाटतें.

" नव्या पक्षाच्या, आपण सुचवितां त्या तऱ्हेच्या, योजनेंत आणखीहि अपरिहार्य दोष आहेत. आपला राष्ट्रीय पक्ष हा जातीय निर्णयाच्या विरुद्ध असलेल्या सर्व प्रकारच्या लोकांचा संग्रह करण्याच्या मागें लागला असतां, अर्थात् काँग्रेसच्या बाहेरच्या लोकांचाहि त्यांत समावेश क्रमानेंच होणार. आणि मग काँग्रेसच्या जातीयनिर्णयापुरताच त्याचा विरोध मर्यादित न राहतां काँग्रेसचा विरोधी पक्ष म्हणून तो राजरोस उभा ठाकणार ही परिस्थिति केव्हांहि इष्ट ठरणार नाही. कारण जातीयनिर्णय व श्वेतपत्रिका एवढ्या बाबतींत ऐकमत्य असल्यामुळें आपल्या पक्षाला मिळालेले लोक इतर बाबतींत काँग्रेसशीं सहकार्य न करतां तिला विरोध करण्याचाच बराच संभव आहे. कदाचित् ते सरकारच्या बाजूनेंहि मतें देतील. हा संभव केव्हांहि अनिष्टच असून कधीं काळी पश्चात्तापाला कारणीभूत होईल. शिवाय परवां श्री. अणे यांनींच जाहीर सभेंत सांगितल्याप्रमाणें नवा घटना कायदा पास होईपर्यंत काय तो जातिनिर्णयाविरुद्ध चळवळ करण्याचा उपयोग आहे. पुढें जातीयनिर्णय हा त्या नव्या कायद्याचा घटक बनून गेल्यानंतर त्या विरुद्ध चळवळ करून कांहींच फायदा होण्यासारखा नसून मग विरोधाचा मोर्चा सर्वच्या सर्वच घटनाकायदा बदलून घेण्याकडे वळविला पाहिजे. यामुळें या पक्षाच्या कार्याला एक प्रकारची स्वाभाविक कालमर्यादा पडत आहे. केवळ जातीयनिर्णयाचा विरोध करण्याकरितां जन्मास आलेल्या पक्षाला, त्याचा समावेश करणारा घटनाकायदा एकदां पास झाल्यानंतर, पुढें कामच राहणार नाहीं. म्हणून कालदृष्ट्या व कार्यदृष्ट्या मर्यादित कार्यक्षेत्र पत्करून त्याकरितां एक तात्पुरता संघ निर्माण करावा हेंच इष्ट आहे.

" महाराष्ट्रांत आपल्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या लोकांना खरें म्हटलें तर असा एक नवा संघहि स्थापन करण्याची आवश्यकता भासत नाही. गेल्या वर्षीच महाराष्ट्रांत डेमोक्रॅटिक स्वराज्य पार्टी स्थापन झाली आहे हें आपणां उभयतांस माहीत आहेच. समर्पक व मनोवेधक नांव, आणि पक्षसंघटनेचीं सर्व अंगेउपांगें एका अर्थानें सिद्धच आहेत. हा पक्ष काँग्रेसच्या अंतर्गत असून फक्त काँग्रेसच्या सभासदांचाच बनलेला आहे. शिवाय जातिनिर्णयाचा निषेध ही नव्या पक्षाला इष्ट असणारी गोष्ट त्या पक्षानें आधींपासूनच निश्चयानें स्वीकारलेली आहे. या बाबतींत त्या पक्षानें पास केलेले ठराव आणि त्याच्या पुढाऱ्यांनीं वेळोवेळीं केलेलीं भाषणें यामध्यें स्पष्ट निर्देश आहेत. ते आपल्या माहितीकरितां खालीं दिले आहेत.

ठरावः—" हा पक्ष प्रौढांना मतदानाचा हक्क व संयुक्त मतदानपद्धति यांचा पुरस्कार करतो. मि. मॅक्डोनाल्ड यांनीं दिलेला जातीयनिर्णय हा लोकशाहीच्या तत्त्वाला विरुद्ध असून देशांतील राष्ट्रीय सामर्थ्य हरण करणारा असल्यामुळें हा पक्ष त्याला सतत विरोधच करील. "

बॅ. रामराव देशमुख त्यांनी आपल्या भाषणांत जातीयनिर्णयाचा व त्याच्या विघातक परिणामांचा सर्वच बाजूंनीं उत्तम विचार केला आहे. ते म्हणाले, " आज जगांत कोणत्याहि देशांत न आढळणारा अन्याय प्रस्तुत जातीयनिर्णयानें हिंदुस्थानांत केला जाणार आहे. ' फोडा आणि झोडा ' या दुष्ट नीतीचें नग्न स्वरूप या निर्णयांत प्रतिबिंबित झालें असून सुशिक्षित मुसलमान बंधूंच्या मनांत विश्वास उत्पन्न करण्याकरितां म्हणून लखनौला जी तात्पुरती तडजोड करण्यांत आली तीच आतां उग्र स्वरूप धारण करून सुधारणेची तिळमात्रहि असा नसतांना आपल्या राजकारणांत कायमच्या रोगाच्या स्वरूपानें चिरस्थायी होऊन बसत आहे. या निर्णयानें सुचविलेली व्यवस्था ही इतिहासांत अश्रुतपूर्व आणि अर्थात अत्यंत गर्ह्य अशी आहे. या निर्णयाचे परिमार्जन केल्याशिवाय हिंदुस्थानांत शांतता नांदण्याचें नांवच नको. सर्वत्र हुकूमशाहीचे दुष्परिणाम उघडच दिसतात. त्या सर्वांपेक्षां या निर्णयानें चिरस्थायी होणारी हुकूमशाही ही सर्व जगांत हीनतम होय."

" गेलीं कित्येक वर्षें लखनौ-करार अस्तित्वांत होता. आणि तो जर मुसलमानांना असमाधानकारक वाटूं लागला तर अर्थात् त्या तऱ्हेचा दुसरा

परंतु बिगरमुसलमानांना मान्य होणारा असा करार त्यांनींच सुचवावयास पाहिजे होता. आणि जर तसा एखादा अन्यकरार त्यांना सुचवितां येत नसला तर कोणत्याहि प्रामाणिक सरकारनें तोच शेवटचा शब्द धरून चालावयास पाहिजे होता. परंतु तसे न करतां बुद्धया मुसलमानांच्या बाजूनें नवा निर्णय करवून हिंदुमुसलमानांच्या सलोख्यांत बिघाड करावा व त्या बिघाडाबद्दल फिरून हिंदूंनाच जबाबदार धरावें ही वक्रनीतीची कमालच होय!'

'गेल्या दोन पिढ्या ज्या स्वातंत्र्याकरितां काँग्रेस मोठ्या परिश्रमानें झगडली त्या स्वातंत्र्याची कल्पनाहि आतां या निर्णयामुळें हवेंतील वाफेप्रमाणें विरल विरल होत जाणार' असें मत स्वागताध्यक्ष श्री. जम्नादास मेहता यांनीं प्रदर्शित केलें. डेमोक्रॅटिक स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर यांनीं तर गोलमेज परिषदेला सादर केलेल्या आपल्या पत्रकांत या निर्णयाबद्दल खालील स्पष्ट निषेध केला होता:—

"सरकारनें जातीय निर्णय देण्याची जी गंभीर जबाबदारी आपल्या अंगावर घेतली आहे तीमुळे पार्लमेंटांत कायदा करून जे सुसंघटित राज्यतंत्र उभें करण्याचा त्यांचा उद्देश आहे त्याविषयी 'मूले कुठारः' अशीच स्थिति झालेली आहे..."

"जातीय प्रश्नावर हिंदुस्थानांतील दोन प्रमुख समाजांचें ऐकमत्य होऊं शकलें नाही या सबबीवर ब्रिटिश पार्लमेंटच्या हातून हिंदी लोकांना कांहीं जबाबदारीचे हक्क मिळण्याबद्दलच्या हिंदी राष्ट्राच्या आकांक्षा अमान्य करून त्या मतभेदाचा गैरफायदा घेण्यांत येत आहे. या गोष्टीचा हिंदु आणि शीख या समाजांना मोठा खेद वाटतो....."

"या जातीय निर्णयामुळें कोणत्याहि कायदेमंडळांत सरकारच्या कारभारावर लोकमताचे नियंत्रण ठेवणें दुष्कर होणार आहे. या निर्णयामुळें जातीय गट पाडून सरकारला त्यांच्यांत वैमनस्य कायम राखतां येईल. सरकारला मुखलेप करण्याच्या ज्या अनेक संधि असतात त्यांचा फायदा घेऊन राष्ट्रीय ऐक्याचा नाश तेव्हांच करतां येईल. आणि या निर्णयाच्या जोरावर राजकीय वर्चस्वाच्या पक्षोपपक्षांतील आंदोलनावर त्यांना संपूर्ण ताबा ठेवतां आल्यामुळें नेहमीच राजकारणाचा कौल त्यांच्या मर्जीप्रमाणें पडत राहील यांत मुळींच शंका नाहीं."

तात्पर्य, आपण जो नवा अखिल भारतीय राष्ट्रीय पक्ष काढणार त्याच तऱ्हेचा व मतांचा हा असा डेमोक्रॅटिक स्वराज्य पक्ष आधीपासूनच अस्तित्वांत असतांना त्याकडे दुर्लक्ष करून, त्याहून कोणत्याहि बाबतीत भिन्न नाहीं अशा उद्देशांकरितां, आणखी एक नवा पक्ष काढण्यांत स्वारस्य तरी कोणतें ? आपल्याला वाटेल तर त्याच पूर्वीच्या नांवानें अखिल भारतीय पक्ष म्हणनहि आपण बनवं शकतां. आपण म्हणतां तेच कार्य करणारा एक पक्ष आधीच अस्तित्वांत असतांना आपण त्याकडे दुर्लक्ष करून नवा पक्ष काढणार हीच तर महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाची आपल्याविरुद्ध तक्रार आहे. ते करीत आहेत त्याच कामाकरितां, परंतु केवळ नव्या नांवानें भिन्न भासणाऱ्या, आणि कोणत्याहि प्रकारें ज्या पक्षाजवळ अधिक सरस कार्यक्रम किंवा नवीन तत्त्वें नाहीत अशा नव्या पक्षाला, त्यांनीं येऊन मिळावें म्हणून त्यांना सांगणें हा आपला अपमान होतो असें त्यांस वाटलें तर त्यांत गैर असें काय आहे ?

" जातीयनिर्णयाविरुद्ध खुद्द असेंब्लींत मोहीम करण्यासाठीं तेथील जागा आपल्या पक्षाकरितां मिळविणें हेंच तुमच्या नव्या पक्षाचें उद्दिष्ट आहे. हें उघड असल्यामुळें त्याच्या सिद्धयर्थ आम्ही एक विधायक सूचना करूं इच्छितों. खरें पाहिलें तर पक्षाचें हें उद्दिष्ट सहजच वैयक्तिक उपक्रमानें साध्य होण्यासारखें आहे असें आमचें मत आहे. पुढच्या असेंब्लीच्या निवडणुकीकरितां उभ्या राहणाऱ्या लोकांचीं बहुतेक नांवें नजरेपुढें असल्यामुळें, त्या त्या गृहस्थांशीं चर्चा करून किंवा त्या त्या मतदारसंघांत साधारणपणें आपल्या मताला पाठिंबा आहे अशांच्या छोट्या परिषदा भरवून, हें काम होण्यासारखें आहे. शिवाय आपण उभयतांनीं व आपल्याच मताच्या आणखी कांहीं लोकांनीं प्रसंगोपात्त छोटे दौरेहि काढावेत. म्हणजे स्वतंत्र पक्षसंघटनेनें काँग्रेसच्या विरुद्ध वातावरण निर्माण करण्याचें कारण न पडतां अवश्य त्या गोष्टी सुलभतेनें पार पाडतां येतील व यशस्वी होतील.

" ह्या जातीय निर्णयाच्या बाबतींत सारासार विवेकामुळें, विरोधी असणारांच्या पार्लमेंटरी बोर्डानें मतस्वातंत्र्य देण्याबद्दल, सभासदांचें मन वळवून महात्मा गांधींना ही काँग्रेसची गळचेपी करणारी अडचण दूर करतां आली असती यांत शंका नाहीं. आणि उपोषणाच्या समाप्तीनंतर प्रस्तुत आपत्तीच्या परिमार्जनाचा उपाय शोधून काढण्याकडे ते आपलें लक्ष देतील अशीहि आम्हास

आशा आहे. ते होईल तेव्हां खरें. परंतु प्रस्तुत कलकत्ता येथें भरावयाच्या परिषदेला हजर राहण्याची ज्यांना आमंत्रणें गेलेलीं आहेत त्यांनीं या अनावृत्त पत्रांतील मुद्दे व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें केलेली विनंति आपल्यापुढें स्पष्ट करून मांडावी हे अत्यंत उचित व सयुक्तिक आहे. आपल्या महाराष्ट्रांतील सहविचारी मित्रांचीं आपल्या नव्या उपक्रमाबद्दल काय मतें आहेत हें आपल्याला कलकत्ता कॉन्फरन्सच्या पूर्वी किंवा त्याच वेळी कळावें म्हणूनच मुद्दाम हें अनावृत्त पत्र प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. त्याचा योग्य तो उपयोग होईल अशी आशा आहे. —न. चिं. केळकर.

तथापि मालवीय व अणे यांनीं आपला हट्ट सोडला नाहीं. कलकत्त्यास या कार्याकरितां भरणाऱ्या सभेला आम्ही जावें असा त्यांचा फार आग्रह पडला त्याप्रमाणें आम्ही कांही मंडळी निघालों. तथापि गांधीकडे फिरून एकवार प्रयत्न करून पहावा, आणि जातिनिर्णयाविरुद्ध मतप्रसार करण्याचा हक्क काँग्रेसकर्त्याकरितां मिळवावा, अशा विचारानें मी गांधीशीं तारेनें विचार-विनिमय केला. माझी तार अशी होती :—

Accept hearty felicitations upon your safe emergence from fast ordeal. Will you kindly immediately apply your mind to avert impending catastrophic conflict between leading staunch brother Congressmen on Communal Award issue ? May we suggest that it is not yet too late to avert crisis, if you could induce Working Committee and Parliamentary Board to allow freedom of opinion and vote to all Congress candidates both during election campaign and in the Assembly. Kindly wire your decision to me here and Mr. Aney, Calcutta Conference. —*Kelkar, Jamnadas Mehta.*

"उपासाच्या दिव्यांतून सुखरूप पार पडला याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करतों. जातीय निर्णयाबाबत कट्टया व अग्रेसर काँग्रेसवाल्यांतच होणारा भयंकर विरोध टाळण्याकडे आपण कृपा करून ताबडतोब लक्ष द्याल काय ? निवडणुकीच्या चळवळींत व असेंब्लींत काँग्रेसच्या उमेदवारांना मतप्रदर्शनाचें व मत नोंदण्याचें स्वातंत्र्य देण्याविषयीं वर्किंग कमिटीचें व पार्लमेंटरी बोर्डाचें मन आपण वळविलें

तर अजूनहि संकट टाळणें शक्य आहे, असें आम्ही सुचवूं का ? कृपा करून आपला निकाल येथें मला व कलकत्ता कॉन्फरन्समध्यें अपे यांस कळवा.

—केळकर, जम्नादास मेथा.

महात्मा गांधीकडून मला बुधवारीं सायंकाळीं खालील उत्तर आलें:—

Thanks felicitations. Only solution possible is to allow freedom speech vote grounds conscience. This was rejected. Wish you could induce acceptance. —*Gandhi.*

अभिनंदनाबद्दल आभारी आहे. सदसद्विवेकबुद्धीच्या आधारावर भाषण-स्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य देणें हाच तडजोडीचा शक्य मार्ग. पण तो फेटळण्यांत आला. याचा अवलंब करण्याविषयी आपण मन वळवावें अशी इच्छा आहे. —**गांधी.**

म. गांधींचें उत्तर आल्यानंतर गुरुवारी सकाळीं मी म. गांधीना खालील तार केली:—

Thanks your telegram. Interpretation rather doubtful to me. Does your telegram mean that on grounds of conscience at any rate full freedom of speech and vote at elections and in Assembly will be given not only to Malaviya and Aney but all Congress candidates and Congress members in Assembly? If so, or in any case, kindly send special messenger to meet me Wardha station on way Calcutta Friday morning Nagpur Mail with full expanded statement of your views on matter referred by me to you. —*Kelkar.*

आपल्या तारेबद्दल आभारी आहे. पण तारेचा अर्थ मला थोडा संशयास्पद वाटतो. निदान सदसद्विवेकबुद्धीच्या आधारावर निवडणुकींत व असेंब्लींत मत प्रदर्शित करण्याचें व मत नोंदण्याचें पूर्ण स्वातंत्र्य फक्त मालवीय व अणे यांसच नव्हे तर काँग्रेसच्या सर्व उमेदवारांना व काँग्रेसच्या असेंब्लींतील सर्व सभासदांनाहि मिळावयाचें असा आपल्या तारेचा अर्थ आहे काय ? तसें असेल तर, किंवा कोणत्याहि परिस्थितींत, कलकत्त्यास जातांना वाटेंत मला भेटण्यासाठीं शुक्रवारीं सकाळीं नागपूर मेलच्या वेळीं वर्धा स्टेशनवर मी आपणांस

विचारलेल्या प्रश्नांसंबंधीं आपल्या मताचा खुलासा करणारें पूर्ण व विस्तृत पत्रक देऊन मुद्दाम मनुष्य पाठवा. —केळकर

या तारेला उत्तर म्हणून वर्धा स्टेशनवर महात्माजींनीं आपलें म्हणणें लेखी कळविलें. त्यांत असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, "ज्यांना वर्किंग कमिटीचा ठराव व जातीय निर्णय सदसद्विवेकबुद्धीच्या दृष्टीनें मान्य नसेल त्यांनीं आपल्या उमेदवारीचे अर्ज पार्लमेंटरी बोर्डाकडे पाठवावें, व जर ते इतर दृष्टीनें इष्ट वाटतील तर तशी परवानगी दिली जाईल." केसरीचा बातमीदार लिहितो "या लिहिण्यांत किती खोल अर्थ, केवढा मुत्सद्दीपणा व किती खाचखळगे आहेत, व त्यामुळें समेट होणें कसें अशक्य होतें याची कल्पना वाचल्याबरोबर कोणासहि येणारी आहे. आश्चर्य हें कीं, या तारेचाहि लोकांनीं भलताच अर्थ केला! लोकशाही स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष या नात्यानें श्री. केळकर यांनीं, राष्ट्रीय सभेंतील तंटा मिटून पुनः एकवार समेट व्हावा, व महाराष्ट्रांतील समेटाची मोठी आवृत्ति निघावी, म्हणून केलेली ही खटपट इतिहासांत नमूद केली जाईल यांत शंका नाहीं. श्री. केळकर यांची ही वृत्ति व समेटाचे हे प्रयत्न महाराष्ट्रीयांनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत."

वर्धा स्टेशनवर महात्माजींचा निरोप घेऊन त्यांचे खास चिटणीस श्री. प्यारेलाल आले होते. त्यांनीं गांधीजींचा निरोप तोंडीहि सांगितला. मी व श्री. प्यारेलाल यांच्यामध्यें जे संभाषण झालें त्यावरून गांधीजींचीं मतें अमूकच निश्चित आहेत असें कोणासच म्हणतां आलें नाहीं. पण खुद्द श्री. प्यारेलाल यांचें गांधीजींच्या प्रभावळींतील स्थान व त्यांचा स्वतःचाहि अधिकार पाहतां पुष्कळ गोष्टीवर या भाषणांत प्रकाश पडला यांत शंका नाहीं. या संभाषणाचा तात्पर्यार्थ हा होता कीं, "असेंब्लीमध्यें फार तर पांच-सहाजणासच जातीय निर्णयाबाबत मतस्वातंत्र्य दिलें जाईल. पार्लमेंटरी बोर्डातर्फे निवडल्या जाणाऱ्या हिंदूंपैकीं बहुसंख्यांक लोकांना जर असें मतस्वातंत्र्य दिलें तर वर्किंग कमिटीच्या ठरावावर हरताळ फासल्यासारखेंच होणार आहे. शिवाय, असें करणें म्हणजे वार्किंग कमिटीचा ठराव मागें घेण्यासारखेच असल्यानें अशी परवानगी देण्यापेक्षां तो परत घेणेंच अधिक श्रेयस्कर!" मी व श्री. प्यारेलाल यांच्या संभाषणांत जरी वरील शब्द नेमके बोलले गेले नव्हते, तरी त्यांच्या संभाषणाचें निश्चित तात्पर्य हें होतें. व पुढें म. गांधींनीं जीं पत्रकें काढलीं

त्यावरूनहि हीच गोष्ट स्पष्ट झाली. "म. गांधी हे प्रामाणिक मतस्वातंत्र्यास वाव देण्यास तयार आहेत. तेव्हा नवीन पक्ष उभारण्यांत पं. मालवीय यांनीं राष्ट्रीय सभेचा विद्रोह केला" वगैरे धूळ सरदार वल्लभभाईंच्या पासून तो साध्या राष्ट्रीय सभावाल्यांच्या मुलाखतींतून जी उडविली गेली तींत कितपत अर्थ होता हें यावरून दिसून येईल.

निवडणुकीची वेळ जवळ येऊं लागली त्याबरोबर जातीय निर्णयासंबंधाचा काँग्रेसवाल्यांतला मतभेद निघून जावा याकरितां आणखी जोरानें प्रयत्न करण्यांत आला. प्रयत्न म्हणजे जातीय निर्णयाचा निषेध व धिक्कार करणें तो कसा नाजुक रीतीनें करावा. यावर काँग्रेस पुढाऱ्यांची पुष्कळशीं बुद्धि खर्च झाली. एक प्रकारें तारेवर नाच करण्यांत आला. आणि काम असें नाजूक म्हणून जातीय निर्णयाचा निषेध धिक्कार करण्याची मोकळीक इतर कोणाला न देतां तो सर्व अधिकार या श्रेष्ठींनीं फक्त आपल्या हाती ठेवला! काँग्रेसला जातीय निर्णय मान्य होता असें कोणीच म्हणत नव्हता. परंतु येत्या निवडणुकींत काँग्रेसतर्फे मुसलमान उमेदवार कांहीं थोडे तरी मिळावें या हेतूनें, अन्सारी अबुल कलम अझाद यांच्या सारख्या वजनदार मुसलमान काँग्रेसवाल्यांचें मन न दुखेल इतक्या बेतानें निषेध चालूं होता. या तारेवरच्या कसरतींत जवाहरलाल नेहरू यांनी पुढें व्यक्तिशः भाग घेऊन अणे मालवीयांसारख्या राष्ट्रीय काँग्रेसवाल्यांचें समाधान व्हावें असा प्रयत्न केला. तो थोडाबहुत साधला. असा कीं जातीय निर्णयाच्या मुद्यावर स्वतंत्र निवडणुकी लढविण्याऐवजीं काँग्रेसशीं तह समेट समजूत करूनच निवडणुकी लढवाव्या असें अण्यासारख्यांनाहि नंतर वाटूं लागलें.

असो; समेटाच्या बाबतींत अशी निराशा झाल्यामुळें आम्ही तसेच पुढे कलकत्त्यास गेलों. तेथें सभा झाली. शरच्चंद्र बोस किंवा सुभाष बोस यांपैकी कोणी तेथें नव्हते. तथापि सभा चांगली होऊन नवा राष्ट्रीय पक्षहि स्थापन झाला. पण आम्ही त्या पक्षाच्या अधिकारी वर्गांत आमचीं नांवें घालण्यास कबूल झालों नाहीं. अणे यांची निराळ्या नांवानें एक नवा अखिल भारतीय स्वरूपाचा पक्ष स्थापण्याची हौस फिटली. पण पंडित मालवीयासारखा अनिश्चित मनाचा पुढारी स्वीकारणारांची जी गत कोणाचीहि नेहमीं होते तीच अणे यांच्या वांट्याला आली. म्हणजे या पक्षाचें पुढें कांहीं विशेष काम झालें नाहीं. जातीय निर्णयाविरुद्ध झगडण्याचें काम अणे यांना जातनिंच करावें लागलें. आणि त्या

कामांत आमच्या पक्षाची मदत त्यांना जितकी झाली तितकी इतर कोणाची झाली नाहीं. मी यानंतर वऱ्हाड नागपूरकडे व्याख्यानाचा दौरा काढला. आणि आमच्या पक्षाचा मतप्रसार अखंड सुरूंच होता. मात्र जातीय निर्णयाविरुद्ध कोणी बोलावयाचें नाहीं असा निर्बंधच काँग्रेसच्या अधिकाऱ्यांवर घालण्यांत आला.

यानंतर दिल्ली असेंब्लीच्या निवडणुकी झाल्या. त्यांत अणे हे निवडून आले. पण जातीय निर्णयाच्या बाबतींत मतस्वातंत्र्य मिळणार नाहीं म्हणून ते काँग्रेसच्या गटांत न बसतां स्वतंत्र पक्षाच्या म्हणजे जातीय निर्णयविरोधी गटांत बसले. पण जिनांची कारवाई आणि भुलाभाई देसाई यांचा अंगचोरपणा यामुळें जातीय निर्णयाचा निषेध असेंब्लींत होऊं शकला नाहीं.

निवडणुकींत काँग्रेसच्या बाजूला प्रचंड बहुमत पडणार हें निश्चित होतें. तथापि काँग्रेसेतर पक्षांनीं आपली जी काय थोडीबहुत शक्ति असेल ती खर्ची घालून निवडणुकी स्वतंत्रपणें स्वतःच्या नांवानें लढवाव्या की नाहीं हा महत्त्वाचा व अवघड प्रश्न उपस्थित झाला. पैकीं भाई परमानंदासारख्या तीव्र काँग्रेस विरोधी लोकांना हा प्रश्न नडण्यासारखा नव्हता. ते काँग्रेसचे चार आणेवाले प्राथमिक सभासदहि नाहींत. अडचण होती ती आमच्यासारख्या मध्यम ( ज्यांना टीकाकार 'अर्धवट' हें विशेषण लावीत) पक्षाच्या लोकांना होती. कारण, म्हटलें तर आम्ही काँग्रेसमध्यें आहों म्हणजे चार आणेवाले सभासद असून काँग्रेरा कीडवर सही करणारे आहों. पण म्हटलें तर आम्ही काँग्रेसमध्यें नाहीं, कारण कोणत्याच ( म्हणजे एखाद्या शहर विभागांतल्याहि) काँग्रेस कमिटींत आमचें बहुमत नाहीं किंवा कोणचीहि का. अधिकाराची जागा आमच्या हाती नाहीं. अशी कोणतीहि बाब नव्हती कीं तींत आमचा व काँग्रेसपक्षाचा आजवर, आजहि, उभा दावा नव्हता. पण काँग्रेसनें कौन्सिलप्रवेश मान्य केल्यावरोबर हा सर्व विरोध ढिला पडावा हें स्वाभाविक होतें. काँग्रेसनें विधायक कौन्सिलप्रवेशाला मान्यता दिल्यास आमचें भांडण संपलें असें जर आम्ही म्हणत होतों तर तें खरें करून दाखविण्याची वेळ आली नव्हती काय ?

मी हें प्रांजलपणें सांगतों कीं काँग्रेसनें कौन्सिलप्रवेश स्वीकारल्याचा मला इतका आनंद झाला की निवडणुकीचें सगळेंच्या सगळें रान काँग्रेसला मोकळें सोडावें असें माझें मत झालें होतें. जातीय निर्णयाविरुद्ध मत प्रदर्शित करण्याला वरिष्ठ कायदे-मंडळांत संधि किंवा स्थान असेल. पण प्रांतिक कायदे-मंडळांत तो प्रश्न उत्पन्न

होण्याचा संभव नव्हता. १९३४ च्या वरिष्ठ कायदे-मंडळाच्या निवडणुकींत शेठ वालचंद यांच्याकडून आम्ही असें लिहून घेतलें कीं "मी जातीय निर्णयाला विरोध करीन." तेव्हांच त्यांना आमच्या पक्षाचे उमेदवार उभे केले होते. पण प्रांतिक कायदेमंडळांत काँग्रेसला निश्चित बहुमत मिळाल्यास अधिकारग्रहणाचा मोह तिला सहजच होईल तो होणें मला इष्ट वाटत होतें. आणि तो मोह होण्याची संधि काँग्रेसला मिळवून द्यावी असें मला वाटे. माझें हें मत आमच्या पक्षांतील कांहीं लोकांना मान्य नव्हतें. म्हणून मी तें त्यावर लादण्याचा प्रयत्न केला नाहीं. मी पक्षाचा अध्यक्ष नव्हतोच, पण कार्यकारी मंडळाचाहि सभासद नव्हतो. अर्थात् मला सल्ला विचारतील तेवढा द्यावा इतकीच तटस्थ भूमिका मी या वेळीं ठेवली होती. पण माझी मतें निश्चित होती. तीं माझ्या पक्षांतील लोकांकरितां बदलण्यास मी तयार नव्हतों. यासंबंधीं असोशिएटेडच्या प्रतिनिधीनें घेतलेली माझी एक मुलाखतच याखालीं देतों त्यावरून माझें मत कळून येईल:—

"व्यापक राष्ट्रीयहितदृष्टीनें पाहतां, सर्व राष्ट्रीय मताभिमानी लोकांनीं या वेळीं, जे अराष्ट्रीय किंवा राष्ट्रविरोधी पक्ष असतील त्यांना एकजुटीनें तोंड द्यावें. आमच्या डेमोक्रॅटिक स्वराज्य पक्षासंबंधीं माझें म्हणणें असें कीं, ता. १ व २ ऑगस्ट रोजीं पुण्यास भरलेल्या टिळकसांप्रदायी लोकांच्या खाजगी सभेंत निवडणुकीच्या धोरणासंबंधानें माझा इतर कांहीं लोकांशी असलेला मतभेद प्रकट झाला. पण त्या मतभेदाचा अर्थ त्यांतल्या त्यांत अधिक व्यापक दृष्टीचें धोरण कोणतें इतक्यापुरताच होता. त्या पलीकडे कांहीं नाहीं. टिळक पुण्यतिथीच्या दिवशीं जाहीर व्याख्यानांत, व तसेच खाजगी संमेलनाच्या वेळींहि, मी माझें धोरण स्पष्टपणें सांगितलें ते असें:—मुंबई कायदेमंडळांत पुढील पांच वर्षांत, म्हणजे नव्या घटनाकारकीर्दीच्या पहिल्या पांच वर्षांत, कोणतें काम कसें होणार आहे याचा विचार करतां, आणि काँग्रेसवाल्यांचें तोंड अधिकारग्रहणाकडे होण्याचा संभव आहे हें लक्षांत घेतां (म्हणजे एक प्रकारें आमच्या पक्षाचेंच धोरण ते अनुसरणार असें झाल्यावर) काँग्रेसवाले व आमचा पक्ष यांच्यामध्यें समेट होणें अत्यंत इष्ट आहे. मग त्यांपैकीं तो कोणीहि कोणाशींहि करावा. म्हणजे एकानें समेटाचें बोलणें आधीं केलें, दुसऱ्यानें केलें नाहीं, असें कोणी म्हटल्यास कर्मापणाहि पत्करावा. या समेटाचा हेतु हाच कीं, आमच्या उभय पक्षांच्या भांडणांत अराष्ट्रीय वृत्तीचे किंवा प्रतिगामी वृत्तीचे लोक आपला फायदा करून

घेणार तो साधूं देऊं नये ! आमच्या भांडणांत अमुक पक्ष अधिक दोषी ठरला किंवा अमक्यानें स्वाभिमानाची अतिशयोक्ति करून समेट मोडला असें दिसून आलें, आणि अविचारानें भांडण उभें राहिलें तरी त्याचा परिणाम एकच होणार. पाणी गढूळ झालें म्हणजे मासे मारणाऱ्या धीवराचें सहजच फावतें !

" आतांपर्यंत समेटाचीं बोलणीं झालीं. त्यांतलीं कांहीं प्रसिद्धहि झालीं आहेत. तथापि, अजून कांहीं गोष्टी बोलण्याच्या राहिल्या आहेत. त्या म्हणजे समेट म्हणून कोणत्या पक्षाला किती जागा कोठें द्याव्या, त्या जागाकरितां कोण माणसें उभी करावीं इ. शिवाय पं. मालवीय यांच्या मोठ्या राष्ट्रीय पक्षाशीं आमचा महाराष्ट्रांतील पक्ष एक प्रकारें जोडून घेतलेला असल्यामुळें, काल-आज या एकंदर समेटाच्या धोरणाविषयीं पं. मालवीय व अणे हे बनारस येथें विचारविनियम करीत बसले आहेत. उघडच आहे की, समेटाचा हा प्रश्न मुख्य पक्ष किंवा शाखापक्ष यांना सारखाच महत्त्वाचा ठरतो. किंवा त्याची अडचण दोघांनाहि सारखीच भासते. इतकी कीं, कदाचित् प्रत्येक प्रांतांत शाखापक्षानें आपणाला योग्य वाटेल तसा समेट घडवून आणावा असा स्वतंत्र अधिकार मिळण्याचाहि संभव आहे. कारण स्थानिक अडचणी वरिष्ठांच्या लक्षांत सर्व येत नाहींत.

" कांही झालें तरी यापुढें पहिली गोष्ट म्हणजे आमच्या पक्षाचे अध्यक्ष म्हणून लो. ना. अणे यांनी प्रां. कॉं. कमिटीचे अध्यक्ष श्री. देव यांच्याशीं बसून अखेरचा विचारविनिमय केला पाहिजे. तसेंच, मुंबईस भरणारी ऑ. इं. कॉं. कमिटी, वर्किंग कमिटी, व पार्लमेंटरी बोर्ड यांच्या सभांत समेटाच्या धोरणाला अनुकूलता किती मिळते व त्यांचे ठराव काय होतात हेंहि पाहिलें पाहिजे. बनारसहून परत आल्यावर अणे हे मुंबईस येऊन कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाट करून उभयपक्षी समेट किती इष्ट आहे याविषयीं बोलणें करतील. त्यांत कॉं. पुढाऱ्यांनीं सामोपचाराचें धोरण ठेवलें तर मी व अणे असे दोघे मिळून आमच्या पक्षाला असा सल्ला देऊं कीं, व्यापक धोरणाच्या बद्धीनें थोडाबहुत स्वार्थत्याग करावा लागला, स्वाभिमान गिळावा लागला, तरी समेट घडवून आणावा; व दोनहि पक्षांचें बळ एकवटून तिऱ्हाइताशीं भांडावें. पण समजा, कॉंग्रेस पुढाऱ्यांना हें पटलें नाहीं, हें शहाणपण सुचलें नाहीं, तर पुण्यास भरलेल्या खाजगी संमेलनांत जे ठराव झाले तेच अखेर अंमलांत

आणावे लागतील. तथापि, या बाबतींतला अधिकार आमच्या पक्षाच्या सेंट्रल कमिटीकडे असल्यामुळें तिची सभा पुढेंमागें लवकरच भरून काय करावयाचें तें ठरविण्यांत येईल. पण तें करतांना मी व अणे यांनी प्रथम जें धोरण स्वीकारलें तें योग्य होतें—त्याला शेवटीं काँग्रेस पुढाऱ्यांकडून पाठबळ मिळालें नाहीं ही गोष्ट वेगळी—असाच बहुधा निर्णय होईल. एका टोंकास लो. स्व. पक्ष बरखास्त करणें व दुसऱ्या टोंकाला काँग्रेसशी वादाला उभे राहून प्रत्येक ठिकाणीं निवडणुकी लढविणें या दरम्यान किती तरी मोठा कार्यप्रदेश उरतो! असें असतां या दरम्यान कांहीं तडजोड न झाली तर उभयपक्षींहि सुविचाराचें दिवाळें निघालें असेंच म्हणावें लागेल!

"काँग्रेसचा सभासद असण्याची आमच्या पक्षाची अट फार जाचक आहे म्हणून ती काढून टाकावी असा ठराव पुण्याच्या खाजगी सभेत झाला हें खरें. तथापि, तडजोड होण्याच्या दृष्टीनें या मुद्द्याचा विचार निवडणुकीपलीकडे ढकलतां येण्यासारखा आहे. त्या मुद्द्याच्या चर्चेनें समेट बिघडविणें योग्य होणार नाहीं. एकदां निवडणुकी होऊन गेल्या म्हणजे फिरून पक्षोपन्यास किंवा पक्षसंघटना निराळ्या विधायक रीतीनें करावी असें कोणास वाटल्यास त्या कामाला भरपूर वेळ मिळणार आहे.

"तुम्ही दोघे स्वतः निवडणुकीला उभे राहणार कीं नाहीं?" या प्रश्नाचें उत्तर पुढीलप्रमाणें देतां येईलः—"अणे हे वाटल्यास मध्यप्रांताच्या कौन्सिलच्या निवडणुकीस उभे राहतील. ते मजपेक्षां वयानें कांहीं वर्षें लहान आहेत. पण मला ६५ वें वर्ष काल-परवांच लागलें. यामुळें कौन्सिलनिवडणुकीला उभें राहून पुढील पांच वर्षेपर्यंत सतत कामाचें जोखड खांद्यावर घेणें हा मला अविचार वाटतो. अजूनहि एक दोन वर्षें कदाचित मी कांहीं काम करूं शकेन. पण त्या काळांत मजपेक्षां लहान व अधिक कार्यक्षम अशा राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांना कौन्सिलप्रवेश करण्यास मी साहाय्य देऊं शकलों तर त्याचा उपयोग मी स्वतः कौन्सिलांत गेल्यापेक्षां अधिक असें मी समजतों.. अर्थात् मी निवडणुकीला उभा राहिलों असतां निवडून येईन कीं नाहीं याचा विचारच उद्भवत नाहीं. मात्र मी जर मुंबई विद्यापीठाच्या मतदारसंघाकरितां निवडणुकीला उभा राहिलों, तर मी हटकून पडेन अशाविषयीं माझे शत्रु देखील पैज लावून आपला पैसा गमावूं इच्छितील असें मला वाटत नाहीं."

या विषयीं मी बनारस येथें श्री. अणे यांना तार पाठविली ती अशी—

"पक्षाच्या सेंट्रल कमिटीनें आपला निर्णय देईपर्यंत कांहींच निश्चित ठरवितां येणार नाहीं. समेट घडून येणें अत्यंत इष्ट आहे. राष्ट्रीयाराष्ट्रीयांतील यादवीमुळें अराष्ट्रीय लोक कौन्सिलांत घुसतात ही गोष्ट अनिष्ट आहे. सन्मान्य समेट होण्याची आशा नष्ट झाली असें पक्षाचे अध्यक्ष या नात्यानें तुम्ही जाहीर कराल, तरच आपला पक्ष निवडणुकी लढवील. बनारसचें काम होतांच तुम्ही ताबडतोब मुंबईस यावें. तेथें तुम्हांस भेटून वाटाघाट करूं." —केळकर

हाच विषय जाहीर रीतीनें मी आपल्या सहीनिशी ता. २२ सप्टेंबर १९३६ च्या केसरींतून मांडला तो असाः—

" लोकशाही स्वराज्य पक्ष व राष्ट्रीय सभा यांचे संबंध हल्लीं बरेच गुंता-गुंतीचे झाले आहेत. त्या पक्षाच्या मुंबई सेंट्रल कमिटीच्या सभेंत बहुमत व अल्पमत अशा भेदानें कांहीं ठराव झाले. यामुळें त्या गुंतागुंतींत भरच पडली; आणि त्यानंतर आतां श्री. बापूजी अणे यांचा राजीनामाहि आला. कित्येकांना केसरीपत्र व ( टिळक–पर्स–फंड–ट्रस्टमें पांच हजार रुपये देऊन ) लोकशाही स्वराज्य पक्षाच्या वतीनें म्हणून निवडणुकीकरितां काढलेलें 'राष्ट्रमत' पत्र या एकाच पक्षांतील दोन पत्रांच्या धोरणांत विरोध आहेसें वाटूं लागलें. या सर्व गोष्टींना अनुलक्षून कांही स्नेही व हितचिंतक यांनीं मला गेल्या आठवड्यांत पत्रें लिहिलीं आणि कांहीं कांहीं गोष्टींविषयीं खुलासा विचारला. म्हणून असें वाटलें कीं, व्यक्तिशः पत्रें लिहीत बसण्यापेक्षां जाहीर रीतीनेंच कांहीं खुलासा केला तर त्याचा उपयोग होईल. 'उपयोग होईल' याचा अर्थ माझ्या स्नेह्यांनी पत्रें लिहिण्याचे व मी त्यांना उत्तरें लिहिण्याचे श्रम वांचतील. मात्र 'उपयोग होईल' याचा अर्थ माझ्या टीकाकारांचें समाधान होईल असा नव्हे. कारण मी कांहीं लिहिलें तरी त्यांतून त्यांना टीकेला खाद्य मिळणारच. असो.

खुलासा करतांना एकेक गोष्ट क्रमानें घेतों. आमच्या लोकशाही स्वराज्य-पक्षानें निवडणुकी स्वतंत्र लढवाव्या किंवा काँग्रेसशीं कांहीं तडजोड करून लढवाव्या या मुद्द्यावर मुंबईच्या सभेंत मी व श्री. बापूजी अणे, केसरी-कचेरीतील कांहीं स्नेही, तसेंच खानदेश वऱ्हाडमधील कांहीं स्नेही इत्यादिकांचीं मतें समेटाला अनुकूल अशीं पडलीं, उलट माझे मित्र रा. अण्णा-

साहेब भोपटकर, श्री. शेठ गुलाबचंद, रा. रामभाऊ राजवाडे, श्री. वालचंद कोठारी, श्री. फणसळकर इत्यादि मंडळींची मतें समेटाला प्रतिकूल पडलीं. आणि समेटाला अनुकूल सतरा व प्रतिकूल एकोणीस असा, अवघ्या दोन अधिक मतांनींच, निर्णय झाला. वरील नांवनिशी देण्यांत माझा हेतु इतकाच कीं हा मतभेद उभयपक्षीं प्रामाणिकपणाचा असून, आज पंधरा वर्षें एकत्र काम केलेल्या व एकमेकांत अत्यंत जिव्हाळा असलेल्या स्नेह्यांमध्यें पडला !

" मग असा मतभेद पडल्यावर माझ्या मताचा अभिमान मला असला तरी मी काय करणें योग्य ? रीतसर सभेंत रीतसर पास झालेला ठराव मी कां मान्य करूं नये ? उलट आमचें बहुमत झालें असतें आणि अल्पमतवाल्यांनीं तो अमान्य केला असता तर मी त्यांना शिस्त मोडली असें म्हटलें असतें की नाही ? मग मी तरी ती शिस्त कां सोडावी ? आतां मुंबईच्या ठरावाविरुद्ध आंतून कांहीं कारवाई करणें हें मताभिमानामुळें कोणाला सुचण्यासारखें होतें तरी ती गोष्ट करावयाची नाहीं असाच मी निश्चय केला. आज ते एकोणीस व आम्ही सतरा यांच्यांत मतभेद झाला असतांहि ते व आम्ही पूर्वीसारखेच स्नेह-ऋणानुबंधी राहिलों आहों, तसे तशी कारवाई केली असती तर राहिलों असतों कां ? म्हणून मी इकडे तर त्या ठरावाविरुद्ध कांहीं कारवाई केलीच नाहीं, पण उलट बनारसमध्यें पंडित मालवीय यांच्या अध्यक्षतेखालीं आमच्या मोठ्या काँ. रा. पक्षाची कार्यकारी मंडळाची सभा व्हावयाची होती, तिला उद्देशून श्री. अणे व पंडितजी यांना मी खाजगी पत्र लिहून कळविलें कीं, " मुंबईस झालेला ठराव वरचा हुकूम म्हणून बदलण्याचे तुम्ही करूं नये; आमचे आम्ही इकडे काय करणें योग्य तें सलोख्यानें करूं." आणि असाच ठराव बनारसच्या सभेंत झालाहि असता. पण केवळ बंगाल प्रांतांची विशेष अडचण म्हणून कांहीं गोष्टी बंगाली प्रतिनिधींनीं त्या सभेपुढें मांडल्या, त्यामुळेंच त्या सभेंत असा ठराव झाला कीं, " जातीय निर्णयाच्या प्रश्नाला अनुलक्षून काँ. रा. पक्षानें म्हणजे अर्थात् लो. स्व. पक्षानेंहि जरूर तेथें आपले उमेदवार उभे करून निवडणुकी लढवाव्या." परंतु माझ्या पत्रांतील दुसऱ्या एका सूचनेप्रमाणें त्या ठरावांत अशी पुरवणी घातली गेली कीं, " स्वतंत्र निवडणुकी लढविण्याचें ठरलें तरी स्थानिक परिस्थिति लक्षांत घेऊन अखेरपर्यंत शक्य तेथें काँग्रेस पक्षाशीं समेटहि करावा."

वरीलप्रमाणें ठराव झाल्यामुळें अल्पमतवाल्यांचें मत केसरींतून विशद करून मांडण्यांत येतें आणि बहुमतवाल्यांचें मत तितकेंच स्पष्ट करून बहुमतवाल्यांतर्फेचें ( नवीन पण प्रासंगिक ) वर्तमानपत्र 'राष्ट्रमत' यांतून मांडलें जात आहे. पण हीं दोन धोरणें वेगळीं दिसलीं म्हणून केसरीचे चालक व राष्ट्रमताचे चालक यांच्यांत व्यक्तिशः बेबनाव आहे असें कोणीहि जाणता मनुष्य समजणार नाहीं.

"सकृद्दर्शनीं असा एक मोठा चमत्कार घडला आहे कीं, आज पंधरा वर्षें काँग्रेसला विरोध करणारा अशी ज्याच्याविषयीं लोकांची समजूत तोच मी आज लो. स्व. पक्षानें स्वतंत्र निवडणुकी लढवूं नयेत असें म्हणत आहे. पण हा चमत्कार फक्त दिसण्यांत आहे, खरा नाहीं. त्याचें कारण असें. पंधरा वर्षें काँग्रेसला ज्या हेतूनें मी विरोध केला अगदीं बरोबर त्याच हेतूकरितां आम्ही स्वतंत्र निवडणुकी लढवूं नयेत, किंबहुना राष्ट्रीय सभेलाच सर्व रान मोकळें सोडावें, असेंहि मी आज म्हणतों. तो हेतु म्हणजे राष्ट्रीय सभेचें तोंड इतर राजकीय चळवळीबरोबर कौन्सिलप्रवेशाच्या चळवळीकडे वळावें हाच होय. तीन वर्षांपूर्वी मुंबईस लो. स्व. पक्षाची स्थापना झाली तेव्हां मी प्रास्ताविक भाषणांत स्पष्टच म्हणालों होतों कीं, काँग्रेसचें तोंड कौन्सिलप्रवेशाकडे वळण्याचें चिन्ह दिसत नाहीं म्हणून हा पक्ष काढावा लागत आहे. अर्थात् तें तोंड तिकडे वळलें म्हणजे हा पक्ष आपण मोडूनहि टाकूं. तर आतां काँग्रेस ही निवडणुकी लढविण्यास उत्साहानें कंबर बांधून तयार झाली आहे, या वेळीं तिला निवडणुकीच्या कामीं आम्ही मदतच करणें योग्य होईल ! पण अजूनहि तें इष्ट कार्य पुरें झालें नाहीं. कारण, अधिकारग्रहणाचा प्रश्न तिनें निवडणुकीच्या रागरंगावर अवलंबून ठेविला आहे ! तिचे पुष्कळ उमेदवार निवडून आले म्हणजे ती अधिकारग्रहणाला अनुकूल होईल. आणि मी व माझा पक्ष बोलून चालून अधिकारग्रहण व्हावें असें प्रतिपादणारे ! मग हें आमचें साध्य, म्हणजे आमच्या दृष्टीनें राष्ट्राचें हित, साधण्याकरितां लो. स्व. पक्षानें थोडा स्वार्थत्याग केला तरी काय हरकत ! त्यामुळें कदाचित् पक्षांतील निष्ठावंत अशा कांहीं थोड्या लायक व्यक्तींची हौस व उमेद खर्ची पडावयाची. पण त्यांची ती निष्ठा स्वतः निवडून आल्यापेक्षांहि आपल्या पक्षाचें हें उच्चतर ध्येय साधण्याला सहाय्यभूत होण्यानेंच कदाचित् अधिक प्रकट होणार नाहीं काय ! काँग्रेसचा घोडा कौन्सिलांतील पाणवठ्यावर जाऊन

उभा राहिलाच आहे. आतां त्यानें तोंड उघडून पाणी पिण्याला बहुमत मिळविण्याची काय ती अडचण उरली. ती आमच्या स्वार्थत्यागी प्रयत्नानें आम्हाला दूर करतां आली तर, काँग्रेसचा घोडा तोंड उघडून अधिकारग्रहणाचें पाणी पिण्याचा अधिक संभव नाहीं काय ? आणि शेवटीं सांगावयाचें तें हें कीं, ती गोष्ट घडली म्हणजे आम्ही पंधरा वर्षें जें कार्य केलें त्याची पूर्ण सांगता झाली असें नाहीं काय ? पंधरा वर्षांत मी, केसरी व आमचा पक्ष यांनीं कौन्सिलवाले, नोकरीवाले अशा शब्दांनीं ज्या शिव्या खाल्ल्या त्याचे पुरे परिमार्जन काँग्रेसच्या अधिकारग्रहणानें झालें असें मी तरी समजेन. दुष्ट बुद्धीनेंच बोलावयाचें तर 'आम्ही पुरा सूड उगवून घेतला' असेंहि आम्हाला म्हणतां येईल. पण आमच्या मते कौन्सिलप्रवेश व अधिकारग्रहण या गोष्टी जर चांगल्या म्हणजे राष्ट्रहिताच्याच आहेत, तर त्या घडवून आणण्याला 'सूड घेतला' हा वाईट शब्द तरी कां लावावा ! आमच्या स्वार्थत्यागानें आमच्या पक्षाचा तो भूषणास्पद नैतिक विजयच होईल !

"जो पक्ष स्थापण्याची मी जबाबदारी घेतली व ज्याचा मी अध्यक्ष होतों, त्या पक्षाचें अनहित किंवा त्याचा विश्वासघात मी अविचारानें किंवा जाणुनबुजन कसा करीन ? काँग्रेसशीं समेट करावा असें मी म्हणणें हें कित्येकांना खरोखरीच विपरीत वाटतें हें मला माहीत आहे. परंतु मी जो वर माझा हेतु सांगितला त्यांच्या अंतरंगांत जे मार्मिकपणे शिरतील त्यांना तो विपरीतपणा भासणार नाहीं अशी माझी खात्री आहे. आतां काँग्रेस पक्षाचा चढेलपणा मी काय ओळखत नाहीं ? त्यांच्यांतील कांहीं लोकांची मस्ती मला काय दिसत नाहीं ? त्यांच्या मतपरिवर्तनाचे हसूं मला काय पोट धरधरून येत नाहीं ? प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांपैकीं कांहींचा ढोंगीपणा मला काय लक्षांत येत नाहीं ? उद्यां हे कौन्सिलांत गेले म्हणजे यांचें चरित्र काय होणार हें काय माझ्या मनश्चक्षूंना दिसत नाहीं ? हें सर्व कांहीं होत आहे. पण अडण्याची संवय असणारा घोडा एकदां चालूं लागला म्हणजे प्रथम त्याला अरी लावून थोडा भरधांव पळवावा म्हणजे मग तो मामुली चालीवर चालूं लागतो. काँग्रेस आतां कौन्सिलप्रवेशाला व अधिकारग्रहणाला स्वतःच इतकी तत्पर झाली आहे कीं तिला कदाचित् या आमच्या टोचणीच्या मदतीची गरजहि उरलेली नसेल. पण या अशा अपूर्व प्रसंगीं लो. स्व. पक्षानें स्वतंत्र निवडणुकी लढवून काँग्रेस

तिकिटांवर जाणाऱ्या उमेदवारांची संख्या कमी करावी, हें पक्षाच्या दृष्टीनें स्वाभिमानशून्यतेचें दिसलें तरी वस्तुतः शहाणपणाचें व दूरदृष्टीचेच ठरेल.

"लो. स्व. पक्ष आज मोडून टाकला तरी मला त्यांत कांहीं वावगें वाटत नाहीं. तो काढण्याच्या वेळची जूट हल्लीं न राहिल्यानें तो मोडणें हें कदाचित् सयुक्तिकहि ठरेल. पुण्या-मुंबईच्या सभांतून हीं कारणें देऊन मी पक्ष मोडण्याची सूचनाहि केली होती. परंतु मुख्यतः जातीय निर्णयाच्या चळवळीकरितां तो पक्ष राहूं द्यावा असें कोणाला वाटले तरी त्याला माझी हरकत नाहीं. पण पक्षानें निवडणुकी लढवूं नये, फार तर कॉंग्रेसशीं तडजोड करून तिच्या तिकिटावर आपले उमेदवार उभे करावें, म्हणजे मग पक्ष मोडला किंवा राहिला दोन्ही सारखेच. तडजोडीचे प्रयत्न करतांना किती मानहानी होते याचा अनुभव मला नाहीं असें कोणी तिळमात्र समजूं नये. यामुळें स्वाभिमान आड येत असल्यास फार तर तडजोडीचें बोलणे करूं नये, पण पक्षातर्फे स्वतंत्र निवडणुकी लढवूं नये असेंहि मी म्हणेन.

"कॉंग्रेसला निवडणुकीचे रान मोकळें सोडल्यानें एक तर कॉंग्रेसला आपली मान्यता देशांत किती आहे याचा पक्का अंदाज लागेल. तिला जेथें बहुमत मिळणार नाही तेथें तिचें खरें आत्मस्वरूप पटून, तिला गर्वाचीं छत्रचामरें खालीं उतरून ठेवावी लागतील. बरें, तिला ज्या प्रांतांत बहुमत मिळेल तेथें अधिकारग्रहणाचा मोह तिला दुस्तर होईल. यापैकीं कोणतीहि गोष्ट घडली तरी ती इष्टच आहे.

"यानंतर आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची. मी नुकताच राष्ट्रीय सभेच्या स्वागतमंडळाचा सभासद झालों आहे. पण यांत मुंबई सभेंतील बहुमतवाल्यांच्या ठरावाविरुद्ध मी कांहींहि केलेलें नाहीं. किंबहुना या बहुमतवाल्यांपैकींहि कांहीं लोक स्वागत कमिटीचे सभासद होतील असें मला वाटतें. कारण अगदीं उघड आहे. निवडणुकीच्या बाबतींत लो. स्व. पक्ष कॉंग्रेसशीं झगडत राहिला तरी चाळीस वर्षांनीं महाराष्ट्रांत आलेलें कॉंग्रेसचें अधिवेशन यशस्वी व्हावें किंवा निदान चांगले पार पाडावें अशी इच्छा कॉंग्रेसमध्यें नसलेले लिबरल किंवा राष्ट्रीय ब्राह्मणेतर जर धरतात तर (१) राष्ट्रीय सभेला देशांतील प्रमुख राजकीय संस्था म्हणणारे व मानणारे, (२) तिच्या कायदेभंगाच्या चळवळींत कॉंग्रेसवाल्यांबरोबर भाग घेणारे, (३) आधीं राष्ट्रीय सभेचे सभासद व्हा

मग लो. स्व. पक्षाचे सभासद व्हा असे म्हणणारे, (४) आणि राष्ट्रीय सभेच्या संघटित मंडळांत शिरून शक्य तर ती काबीज करा म्हणणारे लो. स्व. पक्षांतील लोक, राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला स्वागत मंडळाचे सभासद होऊन हातभार कां लावणार नाहींत ? स्वतंत्रपणें निवडणुकी लढविण्याचें पुढारीपण आलेलें माझे मित्र रा. अण्णासाहेब भोपटकर हे सुद्धां जर स्वागत मंडळाचे सभासद आनंदानें होतील, तर काँग्रेसशीं तडजोड करून निवडणुकी लढवा असें म्हणणारे माझ्यासारखे लोक स्वागतमंडळाचे सभासद कां न होतील ?

" पण त्याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, मी स्वागतमंडळाचा सभासद झालों एवढ्यावरून लगेच काँग्रेसचें कार्य यशस्वी करून देण्याचा भार मी अंगावर घेतला असें भ्रमानें किंवा स्वार्थीपणानें जाणून बुजून कांहीं लोक भासवीत आहेत तें मात्र सर्वस्वीं खोटें आहे. काँग्रेस पुढाऱ्यांची आम्हा लो. स्वराज्य पक्षवाल्यांबद्दल काय भावना आहे व आमची त्यांतील कांहीं कार्यकर्त्यांविषयीं काय भावना आहे हें पक्कें माहीत असतां, आणि निवडणुकीचें भांडण दोन्ही पक्षांत मिटलेलें नसतां, आम्ही काँग्रेस अधिवेशनाला जी मदत करूं ती केवळ कर्तव्यबुद्धीनें करूं, हौसेनें तुटून पडून करणार नाहीं, हें कोणीहि साध्या तारतम्याचा माणूस सांगूं शकेल.

असो; इतका खुलासा बहुधा पुरे होईल असें मला वाटतें. पुढील महिन्यांत लो. स्व. पक्षाची वार्षिक सभा भरेल तेव्हां तेथें काय घडेल हें मी आज सांगूं शकत नाहीं. माझ्या पुरतें मात्र मी हें सांगतों कीं, वर उल्लेखिलेलीं माझीं मतें हींच त्या सभेपुढें मांडीन. मग पक्ष मोडणें किंवा टिकविणें, तो टिकविल्यास श्री. जम्नादास मेहता किंवा श्री. अण्णासाहेब भोपटकर यांची अध्यक्षांचे जागीं निवड करणें, निवडणुकी स्वतंत्र लढविणें किंवा समेटानें लढविणें, आणि 'राष्ट्रमत' पत्र पुढें चालविणें किंवा बंद करणें या गोष्टी सभेला जमलेले लोक बहुमतानें वाटेल तशा करतील. पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा मी गतवर्षीच दिला. आणि पक्षांतील लोकांशीं माझा स्नेहसंबंध कायम असला तरी त्या पक्षाचा मी आतां पुढारीहि नाहीं हें मुंबईतील सभेच्या ठरावानें अप्रत्यक्षपणें ठरविलेंच आहे ! पक्षाचें जें नवीन मंत्रिमंडळ बनेल तें त्याला योग्य वाटेल त्या रीतीनें पक्षाचें कार्य पुढें चालवील. "

—न. चिं केळकर

येथें हें सांगितलें पाहिजे कीं मला जरी काँग्रेसला निवडणुकींचें रान मोकळें सोडावेसें वाटत होतें तरी पक्षाभिमानाबरोबरच कांहीं कांहीं लोकांच्या व्यक्तिगत महात्वाकांक्षा उचंबळून येणें स्वाभाविकच होतें. दुसरीहि एक गोष्ट अशी कीं महाराष्ट्रांतील काँग्रेसचे अधिकारी समंजसपणे वागते, उन्मत्तपणें चढेलपणें न वागते, तर मी योजिलेला समेट सलोखा शक्य होऊन काँग्रेसला हवें तें मिळून आमच्या इकडील कांहीं लोकांची महत्वाकांक्षाहि सफळ झाली असती. वऱ्हाडांत लोकशाही पक्षाचे पुढारी व काँग्रेस यांजमध्यें महाराष्ट्राइतका बेबनाव नव्हता. त्यामुळें तिकडे समेटाची ही योजना यशस्वी होऊ शकली आणि रामराव देशमुखासारखा कट्टा लोकशाहीपक्षाचा अभिमानी गृहस्थ काँग्रेसच्या तिकिटावर निवडणुकीला उभा राहण्यास तयार झाला. पण महाराष्ट्रांत काँग्रेसपक्षाला स्वर्ग दोन बोटें उरलेला. समेटाचें बोलणें निघतांच म. प्रांतिक काँ. कमिटीचे सर्वाधिकारी यांनीं प्रथमच अशा कांहीं अपमानास्पद अटी घातल्या कीं, माझ्यासारख्या समेटवाल्यालाहि त्याचा राग आल्याविना राहणें शक्य नव्हतं. तात्पर्य, नेहमीं घडतें तेंच म्हणजे दोरी दोन्ही टोंकाला खेंचून ओढली जावी आणि मध्ये तुटावी तेंच येथेंहि घडलें. आमच्या पक्षांतली महत्वाकांक्षा थंड पाडण्यामुळें उत्पन्न होणारी नाराजी मी कशीहि सोसली असती. पण त्याच्या भरतीला प्रतिपक्षाची अपमानास्पद अरेरावी सोसण्यास मलाहि बरें वाटेना. तेव्हां " आतां काय व्हावयाचें तें होईल " असें म्हणून स्वस्थ बसलों.

असो. शेवटीं आत्मसमर्थनाचे व आत्मतुष्टीचे खालील उद्गार देऊन हें प्रकरण संपवितोः—

( १ ) "आम्हाला अभिमानपूर्वक इतकें तरी म्हणतां येईल कीं, आज सतत चवदा वर्षें ज्या तत्त्वाचें आम्ही प्रतिपादन करीत आलों त्याचाच अखेर म. गांधीजी यांनीं स्वीकार केला. त्यांनीं जें केलें तो कदाचित् आमच्या विरोधाचा परिणाम नसेल. कारण अखिल हिंदुस्थानांत एवढा प्रचंड लोकसमाज त्यांचा शब्द गुलामासारखा उचलून धरण्याला तयार असतां, आमचा विरोध त्यांना काय बाधणार ? किंवा ते त्याला खिजगणतींत तरी काय धरणार ? शेवटीं केलें तें अर्थात् त्यांचें त्यांनींच केलें असेल, कदाचित् अंतरंगांतील चार आवडत्या भक्तांच्या भिडेनें केलें असेल. पण वादळांतून वाट काढणाऱ्या जहाजाप्रमाणें स्वतः धक्के खात व उलथापालथ करीत करीत केलें ! आणि अशा जहाजांतील प्रवाशाप्रमाणेंच, त्यांच्या

अनुयायी वर्गाला उलथापालथीच्या यातना सोसाव्या लागल्या त्या इतक्या कीं बोलतां सोय नाहीं ! चमत्कार हा कीं, आगबोटीचा प्रवास संपून, आपल्या स्वतःच्या घरीं, साफ व टणक भुईवर अंथरुणावर डोळे उघडून बसलेल्या कित्येक प्रवाशांना जहाजांतली ती भोंवळ कांहीं काळ भोंवतच असते. त्याप्रमाणें कौन्सिल प्रवेशविरोधी कित्येक कट्टरब्रुव गांधीभक्तांच्या ओकाऱ्या अजून थांबल्या नाहींत; व मधूनमधून त्यांना गांधीजींच्या शामक शब्दांचें सात्विक चाटण द्यावें लागतें. सुदैवानें बनारस येथें काढलेल्या जाहीरपत्रिकेनें महात्माजींनीं या चाटणाची येवढी मोठी बरणी भरून ठेविली आहे की, ती लोकांना यापुढें बरीच वर्षें पुरेल ! कारण या पत्रकांत गांधीजींनीं कौन्सिल 'प्रवेशा'लाच नुसता आशीर्वाद दिला आहे असें नसून, कौन्सिल प्रवेशाची केवळ चळवळच नव्हे तर त्यांतील विधायक कार्यक्रम करण्याची मनोवृत्तीहि या देशांत यापुढें कायमचीच ठाणें देऊन बसण्याकरितां आली आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. भोळाशंकर संतुष्ट झाला म्हणजे तो बसावयाचें आसनहि देण्यास कमी करीत नाहीं, असें हें पत्रक वाचून प्रतिसहकारवादी म्हणतील ! आणि या पत्रकानें आमच्या शंकरानें भस्मासूर निर्माण केले असें कौन्सिलविरोधी कट्टर म्हणतील !

"विचारी विवेकशील मनुष्याला राजकारणांत आपलें धोरण यशस्वी ठरणें हा लौकिक ऐहिक मोक्षच होय; व त्याचा आनंद महात्माजींनींच महाराष्ट्राला अखेर मिळवून दिला हा केवढा योगायोग म्हणावयाचा ! खरोखरच या त्यांच्या कृतीनेंच, परवा कानपूर येथें गांधीजींनीं केलेल्या लो. टिळकांच्या स्तुतीचें जसें समर्थन होतें, तसें इतर कशानेंहि होत नाहीं. एखाद्याला मोठा म्हटलें तर त्याचें मोठेपण कशांत आहे अशी जिज्ञासा व चौकशी मन सहजच करतें. आणि लोकमान्यांच्या मोठेपणाचे लक्षण राजकारणांतील त्यांचें व्यावहारिक ज्ञान व व्यावहारिक शहाणपण हेंच होतें, असें उत्तर आतां देणें कोणालाहि प्राप्त नाहीं काय ?

"पण कोणी कांहीं म्हणो, हें पत्रक म्हणजे गांधीजींनीं तरी आपल्या मनानें वज्रलेपच लावला. प्रांजल मनाच्या मनुष्याचें नेहमीं असेंच असतें. तो वश झाला म्हणजे हवें तें हवें तितकें देतो. फार काय, कौन्सिलप्रवेशाचें समर्थन या पत्रकांत करतांना सामान्य कौन्सिलवादी मनुष्यावरहि गांधीजींनीं ताण केली आहे ! प्रांजल मनुष्याचें मन वाळूच्या घड्याळासारखें असतें. लंबकाचीं घड्याळें

उलटी करून ठेवलीं तर चालत नाहींत, पण बिचारें वाळूचें घड्याळ खालीं वर सारखेंच ! तें नुसतें उलटून ठेवलें म्हणजे सगळीच्या सगळी वाळू वरून खालीं बिनतक्रार घसरून पडावयाची. म्हणून प्रस्तुत प्रसंगीं गांधीजींचें हें घड्याळ उलटून ठेवण्यांत ज्याचा हात यशस्वी झाला असेल त्याला खरोखरच शतशः धन्यवाद द्यावे. कौन्सिलप्रवेशाला अनुकूल अशी कोणतीहि गोष्ट म्हणण्याची महात्माजींनीं आतां शिल्लक ठेवली नाहीं." ( ता. ७ ऑगस्ट १९३४. )

( २ ) "काँग्रेसच्या विजयांत दोषहि दिसून येत आहेत. बंदरांतील खोली वाढविण्याकरितां खणतीचें यंत्र चालू केलें म्हणजे तळचा गाळ वर येतो तशी राजकीय समाजाची स्थिति झाली आहे. एकदा खादीच्या रूपानें गांधीजींच्या गुलामगिरीचा पोषाख अंगावर चढविला म्हणजे शंभर खून आपल्याला माफ झाले असें कांहीं लोक समजूं लागले आहेत. सरकारी पदव्या पूर्वी आपल्या वक्षःस्थलावर बहुमानाच्या चांदव्यांप्रमाणें लटकवणाऱ्या अनेक काँग्रेसद्रोही लोकांनींच अकरा वाजून पंचावन्न मिनिटें झाल्यावर, निवडणुकीचा बारांचा ठोका साधण्याकरितां, आपल्या पदव्या टाकून शिंग मोडून काँग्रेसच्या कळपांत शिरण्याची बुद्धि स्वीकारली. जुन्या काळांतही लोक धर्मांतर करीत. पण या निवडणुकीच्या वेळीं झालेला मतपरिवर्तनाचा चमत्कार त्याहूनहि अधिक आश्चर्यकारक ठरला ! अनत्याचारित्वाचीहि तीच स्थिति. अजून ज्यांचीं नखें व दांत रक्तानें माखलेलें आहेत असें अत्याचारी लांडगे हळूच काँग्रेस कचेरीच्या बाहेरच्या दगडावर दांत आणि नखें पुसून मेंढ्यांच्या कळपांत धनगराची नजर चुकवून शिरले आहेत. आणि आतां उजव्या गालफडांत चपराक मारली तर डावा गाल पुढें करून काँग्रेसच्या अनत्याचारित्वाचा ते बहाणा करीत आहेत !! काँग्रेसच्या नांवाच्या वस्त्राखालीं किती पापें दडत आहेत हें महात्मा गांधीनींच कित्येक वेळां तरी जनतेच्यापुढें बोलून दाखविलें आहे; त्याचा आपण पुनरुच्चार करा कशाला ! तसेंच प्रधानमंडळें बनविली खरी पण त्यांनीं लोकशाही समुद्राचा खरा ठाव घेतला असें समजूं नका. गमतीची गोष्ट सांगतात की, कांहीं अज्ञानी लोकांना समुद्राचा ठाव घेण्याची इच्छा झाली तेव्हां त्यांनीं किनाऱ्यावरील घट्ट झालेले मिठाचे लठ्ठ लठ्ठ खडे गोळा केले, त्यांची एक बाहुली बनविली, तिच्या गळ्याला दोरी बांधली, दोरीचें टोंक कांठीला अडकविलें, आणि ती बाहुली समुद्रामध्यें बुडविली. कांहीं वेळानें वर काढून पाहतात तो बाहुली आहे कोठें ! मिठाची

बाहुली मीठाच्या समुद्रांत विरली व जिरली. हा दृष्टांत काँग्रेस मंत्रिमंडळांना फार चांगला लागू पडतो.

"कांही असो. महात्मा गांधींनीं काँग्रेसचें तोंड प्रतिसहकारितेकडे वळविले ही फार चांगली गोष्ट केली. दुसरा कोणताहि राजकीय पक्ष येवढी प्रचंड उलाढाल करूं शकला नसता. आणि फिरून मौज ही कीं गांधी व काँग्रेस यांचें संबंध काय आहेत हें एक गूढच होय. तत्त्वज्ञानांत असे भानगडीचे प्रश्न आढळतात. ईश्वर विश्वव्यापी समव्याप्त आहे कीं विश्व व्यापून दशांगुळें वर उरला आहे? कीं मूळ तो विश्वांत नाहींच आणि बाहेरून विश्वाची सूत्रें हलवितो? विश्व निर्माण झालें परस्पर योगायोगानें कीं, ईश्वराच्या मनाप्रमाणें त्यानें योजल्याप्रमाणें? त्यानें कायमची किल्ली देऊन जग सुरूं करून सोडून दिले आहे की तो मधून मधून त्या घड्याळाला किल्ली देतो? तशांतलाच यासंबंधांत प्रश्न सुचतो. पाहावें तर गांधींची घोषणा अशी की मी चार आणेवाला काँग्रेसचा सभासदहि नाहीं. आणि प्रत्यक्षांत पाहावें तर गांधी मजकूर लिहितात आणि जबाबदार काँग्रेस कमिटी त्यांचे फक्त शुद्धलेखन तपासतें! म्हणजे काना मात्रा नीटनेटकी करिते! असे अजब संबंध राखणें म्हणजे किती कौतुकाची गोष्ट आहे? तितकीच कौतुकाची गोष्ट ही की, असहकारितेची वावटळ उठविणाऱ्या गांधींनीं परत राष्ट्रीय सभेला प्रतिसहकारितेतच नेऊन घातली! गतवर्षी याच दिवसांत 'हरिजनां'त एक लेख लिहून गांधींनीं अधिकारग्रहणाची तरफदारी इतक्या शिताफीनें केली आहे की, मी किंवा माझा लोकशाही स्वराज्यपक्ष त्याहून अधिक तरफदारी काय करणार! कोणी थट्टेनें म्हणतात की, अशा उलट्यासुलट्या उड्या मारणें हें आगामी लोकशाहीचें चिन्ह आहे. होय; असेल बुवा; कारण चंचलता ही लोकशाही राज्यपद्धतीचें एक लक्षण असतें असें राजकारणवेत्ते म्हणतात खरें!

"कसेंहि असो, व्यावहारिक राजकारणांत नित्यनैमित्तिक हा भेद असतोच हें महात्मा गांधी व काँग्रेस यांनीं शेवटी कबूल केले हा मोठाच लाभ झाला. आम्ही नित्याप्रमाणें अनित्यालाहि योग्य वेळीं महत्व देणारे आहोत, परंतु नित्य कर्म सोडणारे नाहीं. पण मध्यंतरी काँग्रेस असा कांहीं बहाणा करून बसली कीं, अनित्य हेंच काय तें राजकारणाचें नित्य भांडवल. म्हणून कायदेभंग व कायदे-कौन्सिल-बहिष्कार सुरूं झाला; पण काँग्रेसला हें कळलें नाहीं कीं, अनित्याचा चाळा किंवा खेळ करणें म्हणजे नित्याला दगा देणें नव्हे! क्रिकेट मैदानावर

चेंडू फेकणारा बदलला तर कांहीं वेळां लाभ होतो. म्हणून तो बदलावा पण तसें न करतां कॅप्टनसाहेब आपले सगळे अकरा गडी घेऊन चेंडू फेकून देऊन 'पॅव्हेलियन'मध्यें जातील तर तो पराभवच गणला जाईल. वैराग्याची महती आहे पण ती गृहस्थाश्रमाच्या प्रतिसहकारी पार्श्वभूमीवरच खुलून दिसते. गर्भ-दरिद्री माणसानें वैराग्याचें सोंग कसें आणावयाचें ?

" लोकशाही पक्षाने मात्र १८ वर्षें आपलें धोरण सतत सारखें चालू ठेविलें होतें. १९२१ सालीं एक वर्षभर त्याच्या धोरणांत जी चाळवाचाळव दिसली तिचा स्वतः गांधींनींच खुलासा केला होता. त्यांनीं 'यंग इंडिया'मध्यें लिहिलें होतें कीं, " महाराष्ट्राचा असहकारितेवर विश्वास नाहीं. त्यानें एक वर्षभर तिचा स्वीकार केल्यासारखें दाखविलें आहे पण तें खरें नव्हे. राष्ट्रीय सभेवर निष्ठा प्रगट करण्यापुरतें होय. " मग अकोला परिषद झाली तींत आम्ही बंडाचें निशाण उघडच रोविलें. आणि कॉंग्रेसनें मात्र एका वर्षांत स्वराज्य मिळविण्याचें जाहीर करून स्वतःला हास्यास्पद करून घेतले ! आम्हाला 'देशद्रोही' म्हणून घेण्याची पाळी आली, पण आम्ही त्या शिव्यांना जुमानलें नाहीं. कायदेभंग-चौकशी-कमिटीपुढें मी ' अमृतसरला परत चला ' या अर्थाचीच साक्ष दिली. पुढें १९२३ सालीं तर नेहरू व दास यांच्यासह आम्ही कौन्सिल-प्रवेशवादी स्वराज्यपक्ष बनविला आणि फिरून १९२६ सालीं आम्ही अधिकारग्रहणाचें तत्त्व सिद्ध करण्याकरितां प्रतिसहकार पक्ष बनविला. तेच धोरण अजून आमचें कायम आहे. आमचें म्हणणें लोकांना पटलें होतें म्हणूनच १९२३ व २६ सालीं आम्हाला निवडणूक जिंकतां आली. आणि आज कॉंग्रेसच्या बाजूला बहु-मत अनुकल आहे हें मुख्यतः कौन्सिलप्रवेश व अधिकारग्रहण ह्या धोरणामुळेंच होय. पूर्वी गांधींनीं ' यंग इंडिया ' पत्रांत असें स्पष्ट लिहिलें होतें कीं, " एक असहकारिता तरी करावी, मात्र ती म्हणजे पूर्ण अनत्याचारी, आणि तें नसेल तर सरळ प्रतिसहकारिता. " आज कॉंग्रेसच्या धोरणांत अनत्याचारिता शिल्लक उरलेली नाहीं. तशीच असहकारिताहि ! मग उरली प्रतिसहकारिता. पण कॉंग्रे-सनें अजून तरी न लाजतां स्वतःला 'प्रतिसहकारितावादी' म्हणावें. म्हणजे आम्हांला कट्टरांकडून पूर्वी झालेल्या अन्यायाचें परिमार्जन झालें, शिव्या खाल्ल्याचा मोबदला मिळाला असें आम्ही उदार मनानें समजूं. अकरणात् मंदकरणं श्रेयः ! " ( ता. २ ऑगस्ट १९३८. )

काँग्रेसनें कौन्सिलप्रवेश करण्याचें ठरविल्यामुळें निवडणुकींतील यश तिच्या पदरांत पडावें हें क्रमप्राप्तच होतें. १गांधीची पुण्याई, २ श्रीमंत व्यापारीवर्गाचा पाठिंबा, ३ अखिल भारतीय आंदोलनानें एका प्रांतापासून दुसऱ्या प्रांताला मिळणारी उत्साहाची भेट व परतभेट, ४ स. १९३५ च्या कायद्यानें निदान प्रांतोप्रांतीं तरी राजकीय सत्ता स्वाधीन करून घेण्याचा आणि त्या योगानें काँग्रेस अधिक बळवान व सुदृढ करण्याचा संभव, ५ ग्रामीण जीवनांत सरकारी सत्तेच्या जाचानें पीडलेल्या लोकामध्यें काँग्रेस प्रधान मंडळाच्या हातून सवलती मिळण्याची आशा, ६ निवडणुकीच्या लगीन घाईत काँग्रेसच्या नांवानें मिरविणाऱ्या गुंडांना लहान मोठ्या चोऱ्या करण्यास सांपडण्याची अपेक्षा, ७ काँग्रेसचा पोषाख आणि तिच्या ब्रीदवाक्याचा उच्चार स्वीकारल्याबरोबर, पाण्यांत सर्वोच्यावर उसळून येणाऱ्या कॉर्कसारख्या पदार्थांना केवळ हलकेपणानें मिळणारा उन्नतीचा फायदा, ८ एकंदरीनें काँग्रेसच्या दृष्टींत झालेलें विधायक परिवर्तन आणि ९ तिची प्रचंड संघटना—या सर्व कारणामुळें लोकमताचा कांटा काँग्रेसकडे झुकणें अगदीं स्वाभाविक होतें.

कसेहि असो, सात प्रांतांतून काँग्रेसला लोकनियुक्त आमदारांचें इतकें बहुमत मिळालें की, त्याच्या बळावर तिला त्या प्रांतांतून प्रधानमंडळें बनवितां आलीं. आणि आज दीड वर्षभर हीं प्रधानमंडळें ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हातून सत्ता काढून घेऊन ती स्वतः वापरीत आहेत ही केवढी आनंदाची गोष्ट !

ता. १७ ऑगस्ट, १९३७ रोजीं काँग्रेस मंत्रिमंडळें आपलें सरकारी काम विधिमंडळांत रीतसर सुरूं करूं लागली हें पाहून ज्याला मनांतून खरोखर आनंद होत नसेल असा एकहि मनुष्य आढळणार नाहीं. याचें कारण हेंच कीं, जुन्या जुलुमी बेजबाबदार राजवटीचे दिवस संपून, जनतेच्या तुंबून राहिलेल्या राजकीय आकांक्षा अंशतः तरी सफळ होण्याच्या मार्गाला लागतील, अशी प्रत्येकाला उज्ज्वल आशा वाटूं लागली आहे.

नाहीं म्हणावयाला स्वतःला समाजसत्तावादी आणि क्रांतिकारक म्हणविणारे कांहीं लोक, काँग्रेसनें मंत्रिमंडळें बनविण्यास संमति दिली हें वाईट केलें असें भासवितात. परंतु निवडणुकीपूर्वी काँग्रेसपक्षानें प्रसिद्ध केलेल्या आपल्या उद्देशपत्रिकेंत जी घोषणा केली होती ती, अधिकारग्रहण करणार नाहीं अशी तर नव्हतीच, परंतु त्या वेळीं पडणाऱ्या पवित्र्यांची जी माहिती आपणा सर्वांना आहे

त्यावरून, काँग्रेसनें अधिकारपद घेणें हेंच न घेण्यापेक्षां अधिक अनुमानितां येत होतें. त्यावरून त्या वेळींहि खरा वारा कोणत्या दिशेनें वाहात होता हें दिसून येईलच. असें असतां समाजसत्तावाद्यांनीच निवडणुकींत काँग्रेसपक्षालाच मदत केली ना?

वास्तविक निवडणुकीचें निकाल होतांच राष्ट्रीयसभेनें मंत्रिमंडळें बनविण्याचें धोरण निःसंदेहपणें प्रगट करावयास पाहिजे होतें. परंतु तिनें तें चार महिने विनाकारण लांबविलें, आणि शंका-कुशंका उत्पन्न करून जनतेचें मन उद्विग्न व अस्वस्थ केलें. या शंकाकुशंकांतून काँग्रेसच्या पदरांत शेवटीं काय फळ पडलें याचा विचार करण्याचें आतां कारण नाहीं. पण प्रथम तरी असा देखावा निर्माण झाला होता कीं, एखाद्या सूर्यग्रहणाच्या दिवशीं सकाळीं सूर्य उगवावा आणि थोड्याच वेळांत केतूनें त्याचा ग्रास करावा. अशा वेळीं अभावितपणें अंधार पडल्यामुळें पशुपक्षी भांबावून जातात. तशीच अज्ञ जनतेची स्थिति झाली. जाणत्या लोकांना मात्र माहीत होतें कीं, सूर्यबिंबाचा हा ग्रास केवळ कांहीं काळपर्यंतच टिकणारा असतो. म्हणून कोणी स्थिर बुद्धीनें आपलें नित्य कार्य करीत होते, तर कोणी विनोदबुद्धीनें आपल्या ठिकाणी काँग्रेसच्या ढोंगाला हंसतहि होते.

राष्ट्रीयसभेच्या मंत्रिमंडळांनीं विधायक कार्यक्रम स्वीकारला तरी, एकंदरीनें नवी घटना सदोष आहे हा देश त्यांच्या मनांत जसा जाणवत आहे तसाच तो लोकशाही इत्यादि इतर राजकीय पक्षांच्याहि मनांत जाणवतच आहे. भेद इतकाच की, हा दंश जाणवत असतांहि, नव्या घटनेच्या कारणानेंच जी थोडीबहुत राजकीय सत्ता लोकांच्या हातीं येत आहे, तिचा त्वरित उपयोग करण्याच्या मार्गाला काँग्रेसनें लागावें असें लोकशाही पक्षाचें मत होतें. आणि काँग्रेसनें मात्र नसते आढेवेढे घेऊन कांहीं दिवस ओढूनताणून चंद्रबळ आणिलें. तरी पण लग्नाच्या यादींतील ठरावाप्रमाणें जुलमानें रुसवून बसविलेले जांवईबुवा शेवटीं जेवायला उठलेच!

पण जांवईबुवा जेवावयाला येऊन पाटावर बसल्यावर आतां तो मतभेद संपला. आतां काँग्रेस पक्षाचेंच काय, पण इतर सर्व पक्षांचेंहि असेंच मी तरी म्हणतो, मुख्य कार्य म्हटलें म्हणजे जांवईबुवांबरोबर पंगतीस बसण्याचा आधि-

कार असेल त्यांनीं पंक्तीला बसावें, आणि इतर कोणी असतील त्यांनीं दूर उभें राहून पंगतीच्या गमती पाहाव्या. ज्यांच्या अंगीं सहानुभवी सात्विक व खेळकर वृत्ति असते त्यांना ही पंगत पाहून स्वतःचें पोट भरल्याचाच आनंद लाभूं शकतो.

कोणताहि दृष्टान्त एकांगींच असतो. म्हणून एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेवावी. ती ही कीं, वरील दृष्टान्तांतून सुचणारी मेजवानीची कल्पना परमार्थानें घेऊं नये. मंत्रिमंडळाचा कारभार ही केवळ लाक्षणिक मेजवानी आहे, आणि तीहि दुर्दैवानें गरीबाच्या घरची आहे. कारण प्रांतिक कारभार ही केवळ मीठभाकर असून, खरें स्वादिष्ट व पौष्टिक अन्नाचें ताट जे दिल्लीच्या वरिष्ठ कारभाराचें तें तर अजून सर्वस्वीं पराधीनच आहे. ते लोकसत्तेच्या हातीं होईल त्या दिवशीं मेजवानीचा थाट खरा! आणि तें ज्या दिवशीं हातीं येईल त्या दिवशीं कदाचित् जांवईबुवा रुसण्याच्या भानगडींत न पडतां सरळ पाटावर बसतील! पण जांवईबुवाप्रमाणें हात आंखडून न जेवतां, उपोषणाचें पारणे फेडणाऱ्याप्रमाणें पक्वान्नावर ताव मारतील! मात्र मेजवानी गरीबाच्या घरची झाली तरी द्वादशीच्या दिवशीं पंचागांत एकादशी सांपडत नाहीं. किंवा ती तशी कोणी आपल्या रोजनिशीत लिहिली तर ती चुकूनच होईल.

प्रांतिक कारभार ही स्वतः तर नुसती मीठभाकरच आहे; पण हिंदुस्थानांत आज तरी सामान्य जनतेला मीठभाकरीशिवाय दुसरें काय मिळतें? म्हणून पुढें आलेलें मीठभाकरीचेंहि ताट लवंडून देण्यांत तिचें कल्याण नाहीं. पण मी हा जो विनयदृष्टीचा दृष्टान्त घेतला त्याचे समर्थन, गांधीजींनीं मंत्रिमंडळावर पगारादिकांच्या बाबतींत जें अपूर्व बंधन घातलें आहे त्यानेंहि होत आहे. मंत्रिमंडळाचा पगार पांचशें रुपयेच असावा कीं काय याविषयीं कदाचित् मतभेद होईल. आणि आतां तर मंत्रिमंडळाला खर्च-भत्ता इत्यादि गोष्टीकरितां कांहीं वेगळी रक्कम देण्याचें ठरत आहे. पण दूध न पिण्याची शपथ घेण्याच्या वेळीं माझ्या मनांत गाय किंवा शेळी नव्हती असें म्हणून, गांधीजींनीं ज्याप्रमाणें शपथेची व कृतीची एकवाक्यता केली, त्याप्रमाणें पगाराची रक्कम ठरविण्याच्या वेळीं भत्ता हा माझ्या मनांत नव्हता असे म्हणून ते याहि बाबतींत उदार मनानें एकवाक्यता करून परवानगी देतील! परंतु मुद्दा हा आहे कीं, पांचशें पगार आणि भत्ता मिळून देखील जी रक्कम होते ती तशीच आहे कीं, आपल्या अधिकाराच्या जागेला साजेसा खर्च करून मंत्रिव्यक्तीला त्यांतून कांहीं

बचत होणार नाहीं. या जागांचे पूर्वीचे पगार लक्षांत घेतां ही खरोखरच क्रांति म्हणतां येईल !

अशा रीतीनें आर्थिक लाभाचें आमिष अधिकारग्रहणांतून काढून टाकल्यानें त्यांतील मुख्य दोष निघून गेला आहे. कांहीं विषारी किंवा तीव्रगंध पदार्थांतून तो दोष काढून टाकल्यावर जें उरतें तें शुद्ध सात्विक गुणकारी औषधी तत्त्वच उरतें. तसेंच हेंहि झालें आहे. कारण खेर, मुनशी, गिल्डर, मावळणकर इत्यादि गृहस्थांनीं महालाभाचा आपला धंदा सोडून मंत्रिपद स्वीकारल्यामुळें, अधिकारग्रहण हें स्वार्थत्यागाच्या तीर्थानें पवित्र होत आहे.

एखाद्या नाटकगृहांत 'ट्रॅन्सफर सीन' म्हणजे त्वरित दृश्यांतर पाहिल्यानें प्रेक्षक जसा चकित होतो, तशीच जनताहि ती जुनी चिरपरिचित राजवटी आणि ही नवी राजवटी यांतील फरक पाहून चकित झाली आहे ! जुनें तें परक्याचें आणि नवें तें आपलें, या भावनेनेंच लोक प्रथम मोहून गेले आहेत. या नव्या राजवटीचा प्रारंभ लोकनियुक्त सभासद कूपर जम्नादास प्रभृतींनींच केला. त्यांची प्रधानपदीं नेमणूक गव्हर्नरनें आपल्या सत्तेनें केलेली होती हें खरें. तथापि, त्यांनीं खरा लोकहितसाधक असाच कार्यक्रम आंखला होता. आतां नवें मंत्रिमंडळ त्यांतील काय वाटेल तें घेवों आणि काय वाटेल तें टाकों. तें जें घेईल त्याला बहुमताचा पाठिंबा हटकून मिळण्याचा संभव दिसत आहेच. पण नवे मंत्रिमडळ स्वतःचे म्हणून करील तेहि प्रायः लोकहिताचेंच असणार. नव्या राजवटीबद्दल जनतेला आपलेपणा वाटावा अशा गोष्टी करण्याला तिनें सुरुवात केलीच आहे. आणि पुढील थोड्या दिवसांत आणखीहि तशाच अनेक गोष्टी घडून येतील यांत शंका नाहीं. यांतील कांही गोष्टी वरवरच्या आहेत. रयतेच्या प्रत्यक्ष आर्थिक हिताचा संबंध त्यांशीं पोचूं शकत नाहीं हें खरें. तथापि वारा कसा वाहतो हें दाखविणाऱ्या गवताच्या काडीइतका तरी त्यांचा उपयोग आहे हें खचित.

ता. १० जुलै, १९३७ रोजी गोखले हॉलमध्यें भरलेल्या परिषदेंत मी एक हृदयस्पर्शी दृश्य पाहिलें. कूपर व जम्नादास यांच्या हुकुमाने विनायकराव सावरकर यांची सुटका झाली होती. अशा पूर्वीच्या स्थानबद्ध 'कैद्या' ला कूपर यांनीं परिषदेंत सन्मानपूर्वक निमंत्रण केलें; आणि त्यांना आपल्या डाव्या हाताशीं बहु-

मानाच्या पहिल्या खुर्चीवर जागा दिली ! स्वतः कूपर यांनीं मजजवळ बोलून दाखविलें त्याप्रमाणें हा लोकसत्तेचाच विजय होय ! अशी गोष्ट पूर्वी कधीं तरी घडली असती काय ? राजद्रोहाची शिक्षा पुरी भोगून आल्यावर सरकारशीं सहकार्य करण्यास सिद्ध झालेले टिळक, आणि होमरूलची तात्पुरती चळवळ केलेल्या पण जन्मभर ब्रिटिश साम्राज्याचें अभीष्ट-चिंतन करणाऱ्या ॲनी बेझंटबाई, ही दोघें आपापल्या स्वराज्यसंघाचे अध्यक्ष म्हणून १९१९ सालीं पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढें कैफियती मांडण्याला गेलीं, तेव्हां 'आमच्यापुढें येऊं नका' असें कमिटीला म्हणतां आलें नाहीं तथापि, त्यांनीं आपापल्या कैफियती तोंडी मांडल्यावर कमिटीपैकी एकाहि भल्या गृहस्थानें त्यांना एकहि प्रश्न विचारला नाहीं ! बहाणा हा कीं, असल्या राजकीय पुढाऱ्यांशी समक्ष बोलणें म्हणजे सरकार पक्षाचा तो एक अपमान आहे. एवढा ताठा ! एवढी गुर्मी ! तें चित्र पाहा, आणि वर कूपर-जम्नादास व सावरकर यांच्यासंबंधाचें हें चित्र पाहा. म्हणजे सदोष अशाहि नव्या घटनेनें प्रस्थापित झालेल्या राजवटी-विषयीं जननेला विश्वास आणि आपलेपणा वाटावा यांत काय आश्चर्य ?

पूर्वी कूपर-जम्नादास कारकीर्दीत जे कांहीं थोडें शक्य होतें तें झालेच; पण आतां ना. खेर यांच्या मागें हुकमी अशा बहुमताचें पाठबळ असल्यामुळें त्यांना तर पुष्कळच गोष्टी अशा करतां येतील कीं, त्यामुळें मंत्रिमंडळाबद्दल वाटणारा आपलेपणा अधिकच दृढ व वृद्धिंगत होईल. अनेक राजबंदी बंधमुक्त झाले. वर्तमानपत्रांच्या जामिनक्या परत दिल्या. कायदेभंगाच्या चळवळीत बेकायदा ठरलेल्या संस्थांवरचा बहिष्कार निघून त्या आपलें कार्य करण्यास मोकळ्या झाल्या. अशा अनेक संस्थांची मालमिळकत त्यांच्या ताब्यांत परत देण्यांत आली. आक्षिप्त वाङ्मयांपैकीं बऱ्याचशा पुस्तकांवरचा बहिष्कार व जप्ती कांहीं उठली व कांहीं लवकरच उठेल. तुरुंगांत अद्यापि खितपत पडलेल्या उरल्या राजबंदींची चौकशी होऊन ते बहुधा बंधमुक्त होतील. धारवाडचे रा. ब. जोशी यांचें बंद केलेलें पेन्शन पुनः सुरू झालें. कामगारांचे संप त्यांतल्या त्यांत त्यांना अनुकूल अशा अटी मालकांना कबूल करावयाला लावून, मंत्रिमंडळांच्या प्रतिनिधिकडून संप मिटविण्यास सुरुवात झाली आहे. ज्या देसायांना कमिशनर गॅरेट यांनीं जबरदस्तीनें असि. कलेक्टरीचा राजीनामा देण्यास लावलें, तेच आज त्यांना स्टेशनवर सामोरे जाऊन सलाम करीत आहेत. आणि मनांत दांतओठ खाऊन कां होईना त्यांना

'सर'हि म्हणाले असतील ! विधिमंडळांत 'वंदे मातरम्' हें गीत गायिलें जाईल हें पूर्वी कोणाच्या स्वप्नीं तरी आलें असतें काय ? राष्ट्रीय निशाणाचा वाद अजून मिटलेला नाहीं; परंतु यूनियन जॅकच्या बरोबरीनें रास्त हक्क सांगणारा भांडखोर भाऊ त्याला मिळाला यांत संशय नाहीं. यापैकीं एक गोष्ट तरी पूर्वीच्या राजवटींत घडली असती काय ?

पण या सर्व गोष्टींना राजकीय देखाव्याचें स्वरूप आहे. म्हणून त्यांची किंमत भावनेच्या मापाने करावयाचें इतकेंच. ज्याला गांधीजी 'जेश्चर' म्हणतील तशा सदराखालीं पडणाऱ्या या गोष्टी आहेत. त्यांच्या योगानें लोकांना नव्या मंत्रिमंडळाकडून आपलें कल्याण होण्याचा फार संभव आहे असें वाटेल. पण खरें कल्याण आणखीहि वेगळें असून, तें पदरांत पडण्याला अवकाश व क्रमहि आहे. नदींत बुडूं घातलेल्या माणसाला, कांठावर उभा राहून कोणी आपणाला वांचविण्याची कांहीं तजवीज करीत आहे असें दिसलें तर धीर येतो हें खरें. परंतु त्यानें फेकलेली दोरी प्रत्यक्ष हाताला लागेपर्यंत त्याच्यावरचें प्राणसंकट दूर होत नाहीं. जनतेचें लक्ष आपणाकडे वेधण्याला हा प्रास्ताविक देखावा ठीक आहे. पण तिचें मूर्त स्वरूपाचें कांहीं हित व्हावयाचें तर, मंत्रिमंडळाकडून कांहीं विधायक कार्यक्रम पार पडला पाहिजे. शत्रूला भिवविण्याला आणि आपल्या सैन्याला धीर येण्याला लढाईत प्रथम दुरून तोफांची सरबत्ती करावी लागते. पण कोणतेंहि ठाणें हस्तगत व्हावयाचें तर पायदळानें चालत जाऊनच तें गांठावें लागतें.

म्हणून मला असें वाटतें कीं, यापुढें स्वतः मंत्रिमंडळच काय, पण त्याचे बाहेरचे मित्र आणि टीकाकार देखील, यांनीं आपलें बहुतेक लक्ष विधायक स्वरूपाच्या योजना व सूचना यांच्याकडेच द्यावयास पाहिजे. मंत्रिमंडळाच्या यशाकडे दुःखित पीडित रयत लोक, आणि त्याच्या अपयशाकडे जुन्या राजवटींतील प्रतिपक्षी, डोळे लावून बसले आहेत. पैकीं पहिल्याचें समाधान आणि दुसऱ्याची फजीति करण्याचा एकच मार्ग म्हणजे विधायक राजकीय सुधारणांचा कांहीं कार्यक्रम सिद्धीला नेणें हा होय.

मात्र हें घडून यावयाचें तर काँग्रेसनें आपलें विधायक धोरण कांहीं झालें तरी निश्चल ठेवावयाचें असा निश्चय केला पाहिजे. या दृष्टीनें पाहतां तीन वर्षांत दारूबंदी झालीच पाहिजे असें गांधीजींनीं 'हरिजन' पत्रांतील एका लेखांत

सुचविलें, तो आम्ही तरी शुभशकूनच समजतों. कारण या सूचनेचा गर्भित अर्थ मंत्रिमंडळें निदान तीन वर्षें टिकावीं असाच होत नाहीं काय ? आजपर्यंत जें बिघडलें तें सर्व काँग्रेसच्या अनिश्चित आणि डळमळीत चंचल धोरणानेंच बिघडलें. तशा धोरणाची बाधा प्रस्तुत मंत्रिमंडळांना होऊं नये अशी मागणी करण्यांत काय वावगें आहे ? होण्याच्या कामाच्या मानानें मंत्रिमंडळाला तीन काय पण पांच वर्षेंहि प्रथम सलग पाहिजेत. स्वाराला मजल गांठावयाची तर त्याची घोड्याच्या खोगिरावरची बैठक स्थिर पाहिजे. सर्कशींतल्या घोड्याच्या मोकळ्या पाठीवर चढून बसावें उतरावें अशा उड्या मारून चालावयाचें नाहीं. पूर्वानुभवावरून पुष्कळ लोकांना एक भीति ही वाटते कीं, राजकीय मानापमानाच्या भ्रामक कल्पनेनें काँग्रेसच्या घोडयाला बुजविणें सोपें झालें आहे. त्याला बेजबाबदार लोक तर बुंजवितातच, पण स्वतः त्याचा मालकहि वेळीं अवेळीं बुजवितो, चमकावतो, असें आढळून आलें आहे. तसें मात्र न व्हावें !

आतां इतर राजकीय पक्षासंबंधानेहि थोडें लिहावेसें वाटतें. ज्या पक्षांना काँग्रेसविरोधी असें नांव देण्यांत येतें ते खरोखर कायमचे काँग्रेसविरोधी नाहींत, कांहीं कार्यापुरते आहेत. हें कार्य म्हणजे काँग्रेसला अधिकारस्वीकार आणि विधायक कार्य यांच्या धोरणाकडे खेचून नेणें, आणि तें कार्य बरेंचसें होईपर्यंत तरी तिला तेथेंच थोपवून धरणें ! हें धोरण काँग्रेसने कायमचें स्वीकारलें असें जितकें अधिकाधिक दिसून येईल, तितक्या प्रमाणांत ' काँग्रेसविरोधी ' समजल्या जाणाऱ्या पक्षांचे कार्य कमी होईल, आणि त्यांचा विरोधहि कमी होईल. पण अजून काँग्रेसच्या धोरणासंबंधीं डळमळ वाटते ! निश्चितता वाटत नाहीं! म्हणूनच लोकशाही पक्षाचा राजीनामाहि दिलेले बापूजी अणे यांनीं अकोला येथें असें मत प्रकट केलें आहे कीं, या किंवा अशा एकाद्या पक्षाची अजून आवश्यकता आहे. तथापि, या पक्षाचें धोरण विधायक कार्याचेंच असल्यामुळें, काँग्रेसची प्रस्तुतची मनोवृत्ति टिकून राहील तोपर्यंत, या पक्षाला मुख्य कार्य म्हटलें म्हणजे आपला कार्यक्रम काँग्रेस मंत्रिमंडळाला सुचवीत किंवा जनतेसमोर तो मांडीत राहणें हें होय.

पूर्वी विरोध आणि शब्दाशब्दी झाली ती ठीकच होती. पण आतां चढाओढ लागावयाची तर विधायक कार्यक्रमाच्या स्वरूपाच्या, रयतदुःखनिवारणाच्या, जुन्या राजवटींतील घाण काढून टाकण्याच्या कामांत, आणि प्रत्यक्ष रेखीव आंकडे-

बंद सयुक्तिक सूचना अधिक कोण करतो यांत लागावी. उलट काँग्रेस पक्षानेंहि इतर पक्षांशीं वागण्याची आपली चढेलवृत्ति सोडून देऊन, त्यांचें सहकार्य स्वीकारण्याची, किंबहुना निमंत्रणपूर्वक त्यांचें स्वागत करण्याची तयारी दाखविली पाहिजे. विधिमंडळांत लोकहितकारक संवर्धक असें ज जें कांहीं कार्य प्रधानमंडळाकडून उपस्थित होईल त्याला आपला पक्ष पूर्णपणें पाठिंबा देईल असें जम्नादास मेथा व भोपटकर यांनी पूर्वीच जाहीर आश्वासन दिलें आहे तें योग्यच आहे, आणि त्याप्रमाणेंच घडून येईल याविषयीं मला बिलकुल शंका वाटत नाहीं. आतां स्पर्धा सुरूं व्हावी ती कार्यकारी बुद्धिबुद्धीमध्यें व्हावी, अपकारक बोचक भावनाभावनांमध्यें नको !

---

## ( ९ ) माझी कार्यनिवृत्ति

१९३२ सालीं माझा एकसष्टावा वाढदिवस झाला तेव्हांपासून सार्वजनिक कार्यांतून निवृत्त होण्याचें मी मनांतून ठरविलें होतें. तो बेत मी हळूहळू अमलांत आणू लागलों. केसरीची ज्युबिली आपल्या हातून झाली, टिळकाच्या हयातींत दहा वर्षें ( १९१०-२० ) केसरी चालविला व सांभाळला तसाच त्यांच्या मृत्युनंतरहि दहा वर्षें ( १९२०-३० ) तो चालविला व सांभाळला ही गोष्ट मला कृतकृत्यता वाटण्यासारखीच होती. शिवाय हाताखाली सहसंपादक वर्गांत अनेक लोक असल्यामुळें त्यांनाहि संपादकाचें जबाबदारीचें काम करण्याची संधि मिळावी हें योग्यच होतें. म्हणून १९३२ च्या पूर्वी पासूनच प्रथम ग. वि. केतकर नंतर वा. कृ. भावे व नंतर ज. स. करंदीकर यांचीं नांवें मी संपादकाचे जागीं घातलीं होतीं, आणि मी वरती देखरेख ठेवणारा संचालक मार्गदर्शक होऊन राहिलों होतों. करंदीकर वडील म्हणून त्यांचेंच नांव केतकरांपूर्वी घालावयाचें, पण तें स्वतः करंदीकर यांच्याच कांहीं विशेष कारणाकरितां तेव्हां केलें गेलें नाहीं. तथापि संपादक नसतांहि राजकीय परिस्थितीच्या गरजेमुळें, व केव्हां केव्हां निवळ हौसेमुळेंहि, मी अनेक वेळीं संपादकीय लेख लिहीत असें. धोरण समजावून सांगून दुसऱ्याकडून लेख लिहून घेण्यापेक्षां स्वतः लिहून टाकणें हेंच अधिक सोईचें असतें व मनासारखें होतें. आणि अग्रलेख लिहिण्याचा मला इतका सराव झाला होता कीं वेळ पडल्यास केव्हांहि तो लिहिण्याचें .संकट तर नव्हेंच, पण श्रमहि

वाटत नसत. तात्पर्य, माझ्या संपादकीय व संचालकीय कामांत वास्तविक फारच थोडें अंतर असें. पण केसरीचा संपादक होणें हा कोणालाहि एक मोठा मान असल्यामुळे, तो आपल्या मृत्यूनंतरच केवळ क्रमप्राप्त म्हणून दुसऱ्याला मिळण्यापेक्षां स्वतः आपण होऊन तो दुसऱ्याला देणे यांत अधिक भलेपणा आहे अशी माझी समजूत असल्यामुळें, मी गेल्या आठ वर्षांत कारणपरत्वें तो मान अनेकांना दिला.

अग्रलेख लिहिण्याचें काम मी आपणाकडे ठेवलें होतें तेव्हांहि केसरी कमींत-कमी बारा पानांचा व पुष्कळदां सोळा पानांचा निघत असल्यामुळें इतर लेख लिहिणें, इतरांकडून बाहेरून आलेले लेख निवडून ठाकठीक करून देणें, स्फुटें व प्रासंगिक लेख लिहिणें, बातमीपत्रांची छाननी करणें, तात्पर्य अशा अनेक रीतीनें केसरीचा मजकूर तयार करून ठरीव जागेत बसविणें, हें काम मेहनतीचें असल्यामुळें त्याला एखाद्या दुसऱ्या सहसंपादकाचें उपसंपादकाचें सहाय्य घ्यावेंच लागें. मग त्यालाच मुख्य संपादक केल्यास त्याच्यावर जबाबदारी अधिक पडेल, पण त्याबरोबरच ते काम करण्याला त्याच्या मनाला हौसहि अधिक वाटेल, आणि सकारण प्रसिद्धीला येण्याला त्याला मदत होईल, असें माझें मत असल्यामुळें हाताखालच्या लोकांपैकीं त्यांतल्या त्यांत वडील व लायक पाहून त्यांना मी वेळोवेळीं केसरीचें संपादक केले. जबाबदारी अंगावर पडल्यानेच मनुष्य कोणचेंहि काम चांगलें करण्यास शिकतो यांत शंकाच नाहीं. तसेच आपल्या श्रमानें झालेल्या कार्याचें श्रेय मुख्यतः आपणाला मिळावें ही आकांक्षा अगदीं स्वाभाविक होय. आणि हें मनांत ठेवून मी एरवीहि असें करीत असें कीं, एखाद्या मदतनीसानें विशेष परिश्रम करून हौसेनें लेख लिहिला असला व तो चांगला वठला असला, तर तो लेख त्यानें आपल्या नांवावर प्रसिद्ध करावा अशी त्याला परवानगी देत असे. इतकेंच नव्हें तर तो तसा प्रसिद्ध करण्याला उत्तेजनहि देत असें. फक्त अग्रलेख मात्र पत्रकर्त्याचा म्हणून निनांवी असावा हा संकेत मी संभाळीत असें.

असो. मी संचालक म्हणजे सर्वाधिकारी असल्यामुळें संपादक नसलों तरी केसरींत कोणत्या धोरणानें लेख लिहिले जावे याचें धोरण मला बहुधा संभाळतां येत असे. आणि प्रत्यक्ष लिहिण्याचे माझे स्वतःचे श्रमहि वांचत. निदान इतर सर्व जुळवाजुळव करणें प्रूफें मुद्रितें तपासणें यांचे श्रम तरी. मध्यंतरी राजकारणाच्या वादविवादांत थोडी ढिलाई मधून मधून येई, त्यावेळीं मी

अवांतर वाङ्मय प्रकार लिहिण्याकडे तो वेळ लावीत असे. उदाहरणार्थ, केसरींत कादंबरी प्रसिद्ध करावी कीं नाही हा एक प्रश्नच होता. कारण केसरीच्या वाचकवर्गांत एका बाजूनें नव्या मताची तरुण पिढी हळूहळू सामील होत जात असली तरी जुन्या परंपरेचा अभिमानी असाहि एक निश्चित वर्ग होताच. यामुळें केसरींत कादंबरी घालून एकाला खूष करावें तर दुसऱ्याला नाखूष करावें असा कार्याकार्यविरोध उत्पन्न होत असें वाटे. तथापि कादंबरी हा देखील निबंधाइतकाच वाङ्मयाचा उच्च व शिष्टसंमत प्रकार होऊं शकतो, आणि कादंबरीचा विषय भाषा व विचार एकंदरींनें केसरीच्या प्रतिष्ठित दर्जाला शोभेसे असतील तर, एखादी कादंबरीहि केसरींत घालण्यास हरकत नाही, निदान तो प्रयोग करून पहावा, अशा निश्चयानें मी 'नवलपूरचा संस्थानिक' ही सत्ताविस प्रकरणांची कादंबरी दर आठवड्यास एक संपूर्ण प्रकरण या नियमानें १९३४ सालीं सहा महिने केसरींत छापली. माझ्या या कादंबरीचा विषय ललित म्हणण्यापेक्षां प्रासंगिक म्हणजे संस्थानी राजकारणाचा होता. आणि त्यांत नायक नायिका व त्यांचें प्रेममीलन हें ललित वाङ्मयाचें एक अंग प्रकट झालें असलें तरी, त्याच्या वर्णनांत मी अत्यंत सावधगिरी बाळगून शृंगारविषयक अनिष्ट असा एक शब्दहि येऊं दिला नाहीं. यामुळें संस्थानी राजकारणाची चर्चा व मनरंजन हीं दोनहि बऱ्याच प्रमाणांत साधलीं असें वाटतें. असले नवे प्रयोग स्वतःच्या जबाबदारीवर मी यशस्वी केल्यास, माझ्या सहसंपादक उपसंपादक वर्गापैकीं कोणास पुढें त्या दृष्टीनें केसरीच्या चित्ताकर्षकत्वांत स्वतःची भर घालावीशी वाटल्यास, त्याला मार्ग मोकळा व्हावा हा यांत माझा हेतु होता. मात्र या खुल्या झालेल्या मार्गाचा उपयोग इतर कोणी अद्यापि फारसा करून घेतला नाही. कदाचित् पुढेंमागें तें घडून येईल.

वयानें व नोकरीच्या नियमानें मी १९३२ सालींच केसरीच्या कार्यापासून निवृत्त होण्याला, अर्थात् माझी इच्छा असल्यास, पात्र झालों होतों. वय पुरें साठ वर्षें व नोकरीचीं वर्षें पुरीं छत्तीस झाल्यावर मी निवृत्तिमार्गास लागणें स्वाभाविकच होतें. पण अजून काँग्रेसनें असहकारितेचा कौन्सिल बहिष्काराचा हट्ट न सोडल्यामुळें केसरीचें मुख्य कार्य शिल्लकच होतें असें मला वाटे. आणि 'लोकशाही स्वराज्य पक्षाची स्थापना' आणि 'कौन्सिल-बहिष्काराचा अंत' या गेल्या दोन प्रकरणांवरून माझी व माझ्या लेखणीची गरज टिळक पक्षाला अजून पुष्कळच होती हें दिसून

आलेंच असेल. १९३५मध्ये काँग्रेसनें कौन्सिलप्रवेश मान्य केला, तथापि अधिकार-ग्रहण म्हणजे प्रधानमंडळांची स्थापना करण्याविषयीं अजून काँग्रेसनें आपल्या भगतगणांना उघड निश्चित असा कौल दिला नव्हता. १९३६ सालीं तर काँग्रेसनें निवडणुकी प्रत्यक्ष जिंकल्या तरी अधिकारग्रहणाविषयी तिनें अनिश्चितपणा राखला होता. परंतु १९३७ च्या एप्रिलांत ज्या दिवशीं काँग्रेसचा कौन्सिल-प्रवेश सिद्ध झाला तोच दिवस माझ्या कार्यानिवृत्तीला सुमुहूर्त समजून मी प्रथम केसरीचें संचालकत्वहि सोडलें आणि केसरी संस्थे-कडील नोकरी कायमची सोडणार म्हणून जाहीर केलें. तथापि संस्थेच्या ट्रस्टी-चा अधिकार सोडण्याला ता. १ जून १९३७ ही तारीख मी ठरविली होती. यामुळें नव्या ट्रस्टीकडे लेखी राजीनामा पाठविण्यास ती तारीख यावी लागली. नव्या ट्रस्टींनी माझा राजीनामा मान्य करून प्रथम तीन महिने भरपगारी रजा नंतर पंधरा महिने निमपगारी रजा मंजूर केली, व ता. १ डिसेंबर १९३८ रोजीं माझा व केसरीसंस्थेचा सर्व संबंध सुटल्यामुळें माझा प्रॉ. फंड व ग्रॅच्युइटी यांची रक्कम मला द्यावी असा ठराव केला.

पण माझ्या सार्वजनिक कार्याचा व्याप जितका पगारी तितका बिन पगारी, जितका केसरी-संस्थेंत तितकाच त्या संस्थेबाहेर, असल्यामुळें हा इतर व्यापहि सोडल्याशिवाय खरी कार्य-निवृत्ति नाहीं, खरी विश्रांति नाही अशी वस्तुस्थिति असल्यामुळें हा इतर व्यापहि सोडून देण्याचें मी ठरविलें. आणि शुक्रवार ता. २ एप्रिलच्या केसरीच्या अंकांत खालीलप्रमाणें एतद्विषयक 'आत्मनिवेदना'चे म्हणून दोन शब्द मी लिहिलें :—

"केसरी-मराठा संस्था आणि व्यक्तिशः स्वतः मी यांचे अनेक ऋणानुबंधी आणि हितचिंतक यांना उद्देशून आज या स्थलीं जे दोन शब्द लिहीत आहे त्या-कडे त्यांनीं लक्ष देण्याची कृपा करावी अशी विनंति आहे.

"ता. १७ मार्च सन १८९६ रोजीं मी पुण्यास येऊन केसरी-मराठा संस्थेंत दाखल झालों. त्या माझ्या नोकरीला गेल्या ता. १७ मार्च १९३७ रोजीं एके-चाळीस वर्षे पुरीं झालीं. माझ्या वयालाहि लवकरच पासष्ट वर्षे पुरीं होत आहेत. माझी प्रकृति मूळची निरोगी व सुदृढ असल्यामुळें या एकेचाळीस वर्षांत मी केव्हां फारशी रजा घेतली नाहीं. परंतु आतां मनाला व शरीराला विश्रांतीची अपेक्षा वाटूं

लागली आहे. म्हणून ता. १ एप्रिल १९३७ पासून मी केसरी-मराठा संस्थेच्या नोकरीच्या सर्व कार्यांतून बंधमुक्त होत आहे.

"केसरी–मराठा संस्थेची नोकरी सोडली तरी इतर अनेक संस्थांशीं माझा संबंध आजवर निगडित असल्यामुळें, त्या संस्थांशीं असणारा संबंधहि सोडल्याविना मला हवी तशी पूर्ण विश्रांति वा स्वतंत्रता मिळणें शक्य नाहीं. म्हणून तेहि करण्याचें मी ठरविलें आहे. या संस्था आणि त्यांशीं असणारा माझा संबंध दर्शविण्याकरितां या खालीं ज्यांची यादी दिली आहे त्या संस्थांच्या कार्यापासूनहि ता. १ एप्रिल १९३७ पासून मी मनानें निवृत्त होत असून, त्या त्या संस्थांकडे मी आपला राजीनामा रीतसर पाठवीत आहे. आणि त्यांनीं तो स्वीकारावा अशी माझी विनंति आहे :—

| | |
|---|---|
| १ पुणें सार्वजनिक सभा— | अध्यक्ष |
| २ गीता धर्ममंडळ— | ,, |
| ३ शुद्ध-पंचांग मंडळ— | ,, |
| ४ वक्तृत्वोत्तेजक सभा— | ,, |
| ५ कॉमनवेल्थ विमा कंपनी— | ,, |
| ६ मर्चंटस् को. बंक— | ,, |
| ७ पैसाफंड मुख्य कमिटी— | ,, |
| ८ भारत इतिहास सं. मंडळ— | ,, |
| ९ महाराष्ट्र साहित्य परिषद— | ,, |
| १० मराठी ग्रंथसंग्रहालय— | ,, |
| ११ रायगड शिवाजी स्मारक मंडळ— | ,, |
| १२ देवघर स्मारक मंडळ— | ,, |
| १३ महाराष्ट्र शारदा मंदिर— | ,, |
| १४ भांडारकर इन्स्टिट्यूट रे. कौन्सिल— | ,, |
| १५ वृत्तव्यवसाय मंडळ— | ,, |
| १६ देवगड एज्युकेशन बोर्ड— | ,, |
| १७ ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ— | ,, |
| १८ नाश्यसंशोधन मंडळ— | ,, |
| १९ डेक्कन जिमखाना— | उपाध्यक्ष |

| | |
|---|---|
| २० महाराष्ट्र व्यायाम मंडळ— | उपाध्यक्ष |
| २१ महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ— | ,, |
| २२ लोकमान्य पुण्यतिथि मंडळ— | ट्रस्टी |
| २३ महाराष्ट्र निवास कलकत्ता— | ,, |
| २४ गोपाळ गायन समाज— | ,, |
| २५ टिळक स्मारक ( खासगी ) ट्रस्ट— | ,, |
| २६ ताराचंद रामनाथ हॉस्पिटल— | ,, |
| २७ श्रीशिवाजी मंदिर ट्रस्ट— | ,, |
| २८ रे इंडस्ट्रियल म्यूझियम— | ,, |
| २९ होमरूल टिळक स्मारक संस्था— | चिटणीस |
| ३० लो. टिळक डायमंड ज्युबिली फंड— | व्य. मं. सभासद |
| ३१ भोसले मिलिटरी स्कूल— | ,, |
| ३२ हिराबाग टाऊन हॉल कमिटी— | ,, |
| ३३ हिंदु लॉ रिसर्च सोसायटी— | ,, |
| ३४ वैदिक संशोधन मंडळ— | ,, |
| ३५ गोवर्धन मंडळ— | ,, |
| ३६ श्रद्धानंद स्मारक मंडळ दिल्ली— | ,, |
| ३७ डेक्कन एज्युकेशन सोसायटी— | ,, |
| ३८ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट— | ,, |
| ३९ अनाथ बालिकाश्रम— | ,, |
| ४० डेक्कन कॉलेज पुनरुज्जीवन मंडळ— | ,, |
| ४१ अ. भा. हिंदु महासभा— | ,, |
| ४२ संस्थान प्रजा परिषद— | ,, |
| ४३ स्वदेशी प्रचारक संघ— | ,, |
| ४४ तळेगांव धर्मार्थ हॉस्पिटल— | ,, |
| ४५ किंग एडवर्ड मेमोरियल हॉल— | ,, |
| ४६ महाराष्ट्र चित्रकार मंडळ— | सल्लागार मंडळ |
| ४७ मिरज विमा कंपनी— | ,, |

वरील यादीतून विस्मरणानें एखाद्या संस्थेचा उल्लेख राहिलेला असल्यास

तिचाहि समावेश यांतच होत आहे असें समजावें. (आणि खरोखर आणखी पांच-सहा संस्थांचीं नांवें यांतून सुटलीं असें माझ्या लक्षांत मागाहून आलेंहि.)

"वरील सर्व संस्थांतील काम सारख्याच तोलाचें किंवा जिकीरीचें असतें असें नाहीं. तथापि या सर्व संस्थांचें कार्य मला कर्तव्यतत्परतेनें करावयाचें तर त्याकरितां विवक्षित दिवस व वेळ यांचें बंधन जवळ जवळ सर्व वर्षभर मधून मधून पडतें. सभाच नसली तरी खासगी चर्चा, सल्लामसलत, चिठ्ठी-चपाटी, शिफारस-भलावणी हीं कामें असतातच. मिळून कार्याची भुणभुण मागें राहतेच. त्यामुळें जखडल्यासारखें वाटतें. आपल्या वेळेवर आपली सत्ता रहात नाहीं. त्यांतूनहि कांही कांहीं कार्यांत, मला स्वतःला भांडणें करावयाचीं नसलीं तरी इतरांची तोडावी लागतात त्याचा उपद्रव वाटतो. या अनेक संस्थांचे कार्य मी आजवर यथाशक्ति केलें आहे, म्हणून यापुढें तें सोडण्याचें मनांत आणल्यास त्यांनीं मला क्षमा करावी. हें विविध प्रकारचें कामकाज सोडून देण्यांत माझा राग कोणावरहि नाहीं. लोभ मनानें पूर्ववत् कायमच राहील.

"अशा प्रकारच्या कामकाजाच्या बंधनामुळें मनाला जो खरा मोकळेपणा असा वाटत नाही तो मिळावा, अशी इच्छा आतां फार जाणवूं लागली आहे हें मी प्रांजलपणें सांगतों. आणि येवढ्याचकरितां हें विविध प्रकारचें कार्य सोडून द्यावयाचा निश्चय मी केला आहे.

"केसरी-मराठा संस्थेसारख्या लो. टिळकांच्या संस्थेंत अखंड एकेचाळीस वर्षे काम करण्यास मला मिळालें हें मी माझें विशेष सुदैव समजतों. त्याचप्रमाणें वर उल्लेखिलेल्या अनेक संस्थांतून नित्यनैमित्तिक कार्य करण्याची संधि मिळाल्यामुळें मला सार्वजनिक जीवनाचें शिक्षण मिळालें, म्हणून ती संधि ज्यांनीं मला दिली त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानतों आणि त्या सर्वांची रजा घेतों.

"या एकेचाळीस वर्षांच्या सार्वजनिक कार्याच्या अवधींत माझ्या हातून कोणाचें बरें झालें असेल तर कोणाचें केव्हां कांहीं वाईटहि झालें असेल. विशेषतः केसरीमराठा संस्थेंतील संपादक व संचालक या नात्यानें मला जसा अनेकांचा लोभ संपादिता आला, तसाच अनेकांचा रागहि मी मजवर ओढवून घेतला असेल हें उघड आहे. तथापि मी बुद्धिपुरःसर कोणाचें अहित केलें असें मला वाटत नाहीं. तरी आता माझी विनंति हीच कीं, ज्यांचा मजवर लोभ असेल त्यांनीं तो तसाच

ठेवावा; आणि ज्यांना मी कोणत्याहि कारणानें अप्रिय झालों असेल त्यांनीं माझ्या अपराधाकरितां मला क्षमा करावी."


ता. १५ एप्रिल रोजीं मी व माझे सहकारी ट्रस्टी धोंडोपंत विद्वांस यांनीं केसरीत खालील पत्रक प्रसिद्ध केलें:—

"ता. १६ ऑगस्ट १९२० रोजीं आम्हा दोघांची नेमणूक केसरी संस्थेचे ट्रस्टी म्हणून झाली. तें काम आम्ही आजवर यथाशक्ति केलें. परंतु वयोमानामुळें तें काम यापुढें सोडावें अशी इच्छा झाल्यामुळें, आम्ही ता. १ जूनपासून हें काम सोडणार असून आम्हा दोघांच्या जागीं नवीन तीन ट्रस्टींची नेमणूक करण्याचें ठरविलें, व त्या आशयाचें रीतसर ट्रस्टडीड केले, आणि तें आज रोजीं रजिस्टर कचेरींत नोंदविलें.

आता आमची सप्रेम व सविनय विनंति अशी आहे कीं, १ रा. जनार्दन सखाराम करंदीकर, २ रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर आणि ३ रा. गजानन विश्वनाथ केतकर हे नवीन ट्रस्टी होणार असून, केसरी संस्थेच्या हितचिंतकांनीं आजपर्यंत आमच्या कामीं आम्हाला सहानुभूति दाखवून जसें सहाय्य केलें तसेंच तें यापुढें नवीन ट्रस्टींनाहि करावें."

—नरसिंह चिंतामण केळकर
—धोंडो वासुदेव विद्वांस

असो. केसरी संस्थेचा ट्रस्टी व त्याच संस्थेचा पगारी नोकर अशी माझी सजोड नातीं कां व कशी होतीं याचें विवेचन या ग्रंथात पूर्वी एके ठिकाणीं विषयपरत्वें मी केलेंच आहे. म्हणून पगारी नोकरी व ट्रस्टीचा अधिकार ही दोनहि मी एकदम सोडली. धोंडोपंत यांनीं फक्त ट्रस्टीची जागा सोडली. पण पगारी जागा सोडली नाहीं. कारण टिळकांनीं मृत्युपत्रांत असें लिहूनच ठेवलें होतें कीं धोंडोपंत यांना पगारी मॅनेजर म्हणून त्यांच्या तहाहयात ठेवा. आतां मीहि स्वतः ट्रस्टी असल्यामुळें मला झालें तरी पगारी नोकरीवरून कोण काढणार होतें ? तथापि मला इतर दृष्टीनेहि याकडे पाहावयाचें होतें. माझ्या वयाला पासष्ट वर्षे झालीं तरी वर्तमानपत्राच्या कामांत कोणाहि संपादक उपसंपादकाला हार न जाण्याइतकी शरीराची ताकद व बुद्धीची तरतरी मजमध्यें गतवर्षी होती, इतकेंच काय पण अजूनहि आहे असें मी म्हणू शकतों. तथापि संस्था या दृष्टीनें केसरीनें



१९३७ सालीं म्हैसूरकडील प्रवासांत मुंडाजे या गांवीं घेतलेलें छायाचित्र

( पृ. ८१६ )

नोकराला किती वयापर्यंत पगारी नोकरींत ठेवावें, किंवा त्याला ती जागा अडवू द्यावी, याला स्वाभाविक मर्यादा असलीच पाहिजे. आणि ट्रस्टी या नात्यानें मला स्वतःच हें उदाहरण घालून द्यावयाचें होतें म्हणून आपण होऊन मी पगारी नोकरी सोडली. स्वार्थालाहि मर्यादा असावी, आणि ती देखील स्वतःच आपण आपल्या हातानें स्वतःला घालून घ्यावी हेंच सर्वांत उत्तम. सरकारी नोकरींत मी असतों तर पंचावन वर्षें होतांच मला पेन्शन घ्यावें लागलें असतेंच कीं नाहीं ? मग वयाच्या पासष्टाव्या वर्षापर्यंत पगार घेतला हें काय थोडें झालें ?

पण केसरीच्या संपादकाची पगारी नोकरी व ट्रस्टीची जागा यांच्या महत्त्वांत फरक आहे. आणि मी पगारी नोकरी सोडली हें ठीक केलें असें वाटणाऱ्या कित्येकांना मी ट्रस्टीची जागा सोडली हे मात्र ठीक केलें नाहीं असें वाटलें. त्यांचें म्हणणें कीं इतर कोणाच्या हातीं केसरी संस्था असण्यापेक्षां माझ्या हातीं ती शक्य तितकें अधिक दिवस असलेली बरी. पण माझें स्वतःचें मत तसें नव्हतें. मला वाटें कीं आपण मेल्यावर हा अधिकार लोकांच्या हातीं जाण्यापेक्षां, आपण होऊन आपल्या हयातींतच तो त्यांच्या स्वाधीन करून तो ते कसा चालवितात हें पाहण्याचें सुख भोगावें यांत भूषण आहे. लोक मला ट्रस्टीची जागा सोडूं नका म्हणतात याचा अर्थ माझें या जागेचें पूर्वीचें काम चांगलें झालें इतकी शाबासकी मला पुरे झाली. मी जागा न सोडणें याचा अर्थ, निदान ध्वनि, तिचें काम करणारा माझ्याइतका चांगला दुसरा कोणी निघणार नाहीं असा होत नाहीं काय ? पण मी इतका गर्व किंवा अहंकार कां वाहावा ? बरें ट्रस्टीची जागा सोडणें यांत स्वार्थत्यागापेक्षां एका दृष्टीनें स्वार्थसाधनच अधिक होतें. कारण त्या जागेच्या जबाबदारींतून मुक्त होणें हें एक प्रकारें स्वार्थसाधनच नव्हे काय ? आतां वयपरत्वें दगदग कमी झालेली बरी. ट्रस्टीच्या जागेवर राहून लोकांची बहाली बडतर्फी करण्याचा अधिकार भोगावयाचा यांत असें काय मोठें ऐश्वर्य आहे ? ट्रस्टीची जागा सोडल्यावर केसरी संस्थेसंबंधीं निरुपाधिक प्रेम अनुभवावयास सांपडलें तर तोहि चांगल्यापैकीं प्रयोग होणार नाहीं काय ? माझ्या अधिकारत्यागाची वाट बघत केसरीचे कोणीहि लोक बसले नव्हते, मी तेथें कोणाच्या डोळ्यासमोर नको असें कोणासहि झालें नव्हतें, हें खरें. पण असें असतां व अनेक लोक नको नको म्हणत असतां मी अधिकार सोडून दुसऱ्यांना संधि देणें, हें उभयपक्षीं भूषणास्पद असें मला वाटलें. म्हणून मी ट्रस्टीचाहि अधिकार सोडला.

ता. ६ एप्रिल १९३७ च्या अंकांत केसरीनें मला निरोप देतांना खालील उद्गार काढले. ते माझ्याच मित्रांनी किंवा हाताखालच्या लेखकांनीं काढले असले तरी ते केवळ औपचारिक किंवा तोंडदेखले होते असें मी मानीत नाही.

केसरी म्हणतो—"श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांचें आत्मनिवेदन गेल्या अंकी प्रसिद्ध झालें ते सर्वांनीं वाचलेंच असेल. श्री. केळकर याच वेळी सार्वजनिक कार्यांतून निवृत्त होतील ही गोष्ट कोणाच्या ध्यानीमनीहि नसल्यामुळें ती वाचतांच त्यांजवर लोभ करणाऱ्या लक्षावधि महाराष्ट्रीयांच्या जिवास चुटपुट लागावी यांत नवल नाही. श्री. केळकरांचा सार्वजनिक संसार एकेचाळीस वर्षांचा आहे. हा संसार आटोपतांना त्यांच्या अंतःकरणास खेद न होता ते एक प्रकारें आतुर झाले आहेत, यावरून पूर्ण विश्रांति घेण्याची त्यांना किती आवश्यकता वाटत आहे याची कल्पना येते. स. १८९६ साली केळकर सार्वजनिक कार्य करण्याच्या अनिवार हौसेने पुण्यांत आले. त्यांना स्थान मिळाले केसरी मराठा संस्थेंत व लो. टिळकांच्या छत्राखालीं. टिळक ही त्या काळी महाराष्ट्रांतील वाढती शक्ति असून तिच्यांतून अनेक चळवळी उगम पावत होत्या व तिजकडे अनेक चळवळी जीवनार्थ धांव घेत होत्या. अशा केंद्रस्थानी तात्यासाहेब हे आपल्या भरज्वानींत चढी-कांचा भिडवून आखाड्यांत उतरणाऱ्या मल्लाप्रमाणें दंड थोपटून आले. त्यांना सार्वजनिक कार्याचा हव्यास होता. आणि बुद्धिमत्तेचें अधिष्ठान व कर्तृत्वाचें आदिपीठ असें पुणें शहर त्यांच्या पुढे काम वाढून ठेवण्यास सिद्ध होते. किंबहुना काम देण्यांत व काम करण्यांत या उभयतांची पैज लागली असून कोण कोणास हटवितो याविषयी ते परस्परांची परीक्षाच पहात होते.

लोकसेवेची विविध उपाधि मागें लावून घेणाऱ्या अंगीं थोडेथोडके गुण असून भागत नाही. किंबहुना गुणांचा गोडवेपणा जितका अधिक तितके चिकटणारे मुंगळेहि अधिक. उद्योगशीलता, कर्तव्यतत्परता, निरलसता, प्रसन्नता, सहनशीलता, सौजन्य, औदार्य, निरपेक्षपणा, सरलत्व व आस्था इत्यादि गुण तात्यासाहेबांच्या ठिकाणी इतक्या उत्कटत्वानें वसत आहेत कीं, लहानापासून थोरापर्यंत प्रत्येकाला त्यांना तसदी देण्याला संकोच वाटूं नये. ईश्वरानें त्यांस शरीरसामर्थ्य व बुद्धि यांची देणगी सढळ हातानें बहाल केली असल्यामुळें लोकसेवेंत पडणारे कष्ट त्यांनीं खुषीनें सोसले आहेत व बुद्धिवैभव जेथें तेथें प्रकट केलें आहे.

इंग्रजी व मराठी वृत्तपत्रव्यवसायाने त्यांच्या बुद्धीस ऐन विकासाच्या काळांत योग्य ती तालीम दिली. वृत्तपत्रसंपादक व्यासंगी असेल तर त्याच्याशीं लढत करण्याला नित्य नवे विषय समोर उभे रहातात. तशांतून त्याचा दम तितक्याने उखडण्याजोगा नसेल तर तो स्वतःच नवे विषय अभ्यासाकरितां उकरून काढतो. तात्यासाहेब या कोटीतील असल्यामुळें त्यांनी ज्यावर लिहिलें नाही असा एखादा विषय गेल्या चाळीस वर्षांत उरला आहे की नाहीं हाहि विषय संशोधन करण्याजोगाच आहे. यांतील कांही विषय त्यांनी आवडीनें अभ्यासिले असतील, कांही विषयांच्या अभ्यासाची त्यांजवर सक्ति झाली असेल, व कांही विषयांवर केवळ जिज्ञासेची खुमखुमी म्हणून त्यांनीं सक्ति केली असेल. तें कांहीहि असले तरी याचा परिणाम असा घडून आला की, हरएक सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला.

तात्यासाहेब हाडाने खरे साहित्यप्रेमी व कलावान आहेत. त्यांची बुद्धि साहित्य, संगीत, ललितकला व इतिहास यांत रमणारी आहे. लेखक या नात्यानें जगाच्या पुढे ते नाटके, इतिहास, चरित्रे लिहनच आले. पण वृत्तपत्रीय व्यासंगानें जो जो त्यांची बुद्धि विकसित होऊ लागली तो तो त्यांनी अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, राजशासनशास्त्र यांचाहि व्यासंग वाढवून त्यांजवर ग्रंथरचनाहि केली. गेल्या अंकांत त्यांनी सत्तेचाळीस संस्थांना राजीनामा देण्याचा संकल्प जाहीर केला आहे. त्यांतील कांही संस्था अशा आहेत की, त्यांच्याकडे संपादकीय व्यवसायांत तात्यासाहेब नसते तर त्यांनी त्याजकडे कदाचित् ढुंकूनहि पाहिले नसते. परतु या व्यवसायांत बुद्धीचे पोषण सर्वांगांनी झाल्यामुळे ते त्याचा कारभार लीलेनें पण अधिकारयुक्ततेनें करीत आले आहेत.

त्यांच्या बुद्धिसामर्थ्याला शरीरसामर्थ्याची उत्कृष्ठ जोड मिळाली असल्याचें वर सांगितलेच आहे. त्या योगाने त्यांचे बुद्धिवैभव शतपटीनी कार्यक्षम बनलें. आधुनिक सुशिक्षित वर्गांत शरीरसामर्थ्याची बहुमोल देणगी निदान महाराष्ट्रांत तरी फार थोड्यांच्याच वांट्यास येते. त्यामुळे कित्येक हिरे मातीमोल ठरून अंधारांत पडतात. पण तात्यासाहेब या बाबतीत दैववान होत. संपादक, सार्वजनिक कार्यकर्ता, व पुढारी या त्रिविध नात्यांनी त्यांना जी जी संधि लाभली तिचा भरपूर फायदा घेण्यास व त्यांच्या अनंत मुळ्यांमार्फत मिळणारा जीवनरस बुद्धीला मिळूं देण्यास ते यामुळेच समर्थ झाले. जहाल व मवाळ, सनातनी व सुधारक, नव-

मतवादी व पुराणमतवादी, कवि व तत्त्ववेत्ते, नाटककार व इतिहासकार, भाविक व टीकाकार अशा परस्परविरुद्ध दुकलींशी त्यांचा संबंध अनायासें आला असतां त्यांपैकी कोणासहि नाराज न करतां ते वागले व वागतात, याला कारण त्यांची सहृदयता व सहानुभूति हे गुण होत. अशांच्या विचारसरणीतील तत्त्व ते ग्रहण करून त्यांजवर ते छापहि ठेवूं शकतात याचें इंगित त्यांच्या या विशिष्ट गुणांतच सांपडतें.

हल्लीच्या काळांत दोन पिढ्यांमधील अंतर बारापंधरा वर्षांचें धरल्यास तात्यासाहेबांनी गेल्या एकेचाळीस वर्षांत तीनचार पिढ्या सहज पाहिल्या. विचार, आवडी, प्रवृत्ति व समजुती यांत दोन पिढ्यांमध्यें किती अंतर पडतें याचा अनुभव ज्याला त्याला पदोपदी येतच आहे. तात्यासाहेबांच्या देखत आतापर्यंत तीनचार पिढ्या झाल्या असें मानल्यास ते एकेचाळीस वर्षांपूर्वी पुण्यांत आले त्या वेळच्या पिढींत व चालू पिढीत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे हें उघड आहे. तरी ते तरुणांना हवेसे वाटतात, तरुण त्यांच्या सहवासांत रंगतात, व उलटपक्षी तात्यासाहेबहि तरुणांच्या सहवासांत रंगतात, याचा उलगडा सहृदयता सहानुभूति या गुणांचा हवाला दिल्यावांचून होणार नाही. पुण्यास गेली एकेचाळीस वर्षें ते आहेत. या दीर्घ कालांत त्यांनीं किती तरी संस्था स्थापल्या व कित्येक वाढीस लावल्या. पुणें म्युनिसिपालिटीत सामान्य सभासदापासून तो अध्यक्षापर्यंतची कामें पुष्कळ वर्षें केल्याने ते आबालवृद्धांच्या परिचयाचे झाले आहेत. त्यांत अनेक सभा संमेलनें उत्सव यांचा प्रसंगाप्रसंगांनी भर पडल्यामुळे त्यांची ओळख नाही, किंवा त्यांचें नांव माहीत नाही असा एकहि जाणता माणूस पुण्यास सांपडणार नाही; अथवा ते पुणेकरांना घरच्या वडीळ माणसाप्रमाणें वाटूं लागले आहेत याचें कारण त्यांनीं असंख्य लोकांवर विविध रूपांनी केलेले उपकार होत. त्यांची ही लोकप्रियता पुण्यांत किती खोलपर्यंत पोंहोचली आहे, व त्यांनी सहस्रावधि लोकांना परोपकारांनीं कसे ऋणी करून ठेवलें आहे, याचें उत्कृष्ट प्रत्यंतर पांच वर्षांपूर्वी त्यांचा एकसष्टावा वाढदिवस पुण्यांत एक महिनाभर सारखा गाजत साजरा होत होता यावरून आलेंच आहे.

सर्व जातींत व सर्व पक्षांत ते प्रिय व आदरणीय झाले आहेत हा त्यांचा विशेष होय. ही हातोटी महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांत फारच थोड्यांना साधली आहे. तिचें बीज शोधणें अतिशय बोधप्रद ठरेल. जात्यभिमानातीत व निरपेक्ष लोकसेवा

याच गुणांत तें बीज सांपडेल. कार्यकर्त्यांनी त्यांचे हे गुण उचलल्यास सार्वजनिक कामांतील व आयुष्यक्रमांतील किती तरी भांडणें वांचून त्यास निकोप व निरोगी स्वरूप प्राप्त होईल. ते स्वभावतः प्रगतिप्रिय आहेत, मग ती प्रगति सामाजिक असो, धार्मिक असो, औद्योगिक कीं साहित्यिक असो. यामुळें त्या त्या पंथांतील कार्यकर्त्यांस ते पसंत पडतात. अस्पृश्यतानिवारण, पुनर्विवाह, जातिभेद यासंबंधीची त्यांचीं मतें सुपरिचित आहेत व तीं सनातनी लोकांना तितकीशीं पसंत पडणारीहि नाहींत. तरीसुद्धां ते सनातन्यांच्या तीव्र रोषाला पात्र झाले नाहींत, याचें कारण त्यांच्या ठिकाणीं ब्राह्मण्याचा, हिंदुत्वाचा, व संस्कृतीचा अभिमान विवक्षित प्रमाणांत जागृत आहे हेच होय.

महाराष्ट्रांतील सर्व चळवळींना ते सारखाच पाठिंबा देत व जीवनरस पाजीत आले आहेत. राजकारणावर सर्व भर पडल्यानें महाराष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनास एकांगीपणा येण हे एके काळी अपरिहार्य होते असें क्षणभर मानलें तरी महाराष्ट्रासारख्या औद्योगिक व आर्थिक क्षेत्रांत इतरांच्या मानानें अत्यंत मागासलेल्या प्रांताला इतर अंगांची उपेक्षा करणें धोक्याचें होय याची जाणीव तात्यासाहेबांना होती. यामुळें त्यांनी आपले लक्ष तिकडे वळवून ती बाजू चांगलीच सावरून घेतली. पुण्यांतील सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापण्यांत व ऊर्जित दशेला आणण्यांत त्यांचेच बौद्धिक श्रम कारणीभूत झाले आहेत. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनीच्या मागून कॉमनवेल्थ विमा कंपनी पुण्यास निघण्याचें श्रेय पुष्कळ अंशी त्यांनांच द्यावें लागेल. महाराष्ट्र शुगर सिंडिकेटला त्यांनींच उचलून धरले. महाराष्ट्रांत तरी निदान राजकारणांत पुढाकार घेतलेल्या पुरुषांनी औद्योगिक क्षेत्राकडे इतकें लक्ष पुरविल्याचे उदाहरण दुसरें सांपडणार नाही.

साहित्य हा त्यांचा आत्मा आहे. ते नुसते साहित्यिक नसून विद्वान ग्रंथकार आहेत. त्यांची विद्वत्ताहि एकांगी नसून सर्वांगीण आहे. सार्वजनिक आयुष्यक्रमांतील असंख्य व्याप मागें लागले असतांहि वेळांत वेळ काढून त्यांचें प्रचलित विषयांबाहेरील वाचन, चिंतन, व लेखन यापैकी कांहीं ना कांहीं नित्य चाल असतें. किंबहुना त्यांचा तो जीवनाधार किंवा स्फूर्तिस्थानच आहे. त्यांतून जे किरण त्यांस मिळतात त्यावर त्यांचा नित्यक्रम प्रकाशमान होतो. राजकीय जीवित हे रुक्ष व खडकाळ वाटेवरून आदळत आपटत जाणाऱ्या खटाऱ्यासारखें

समजण्यास हरकत नाहीं. या प्रकारचा जीवनक्रम त्यांनीं चाळीस–एकेचाळीस वर्षें सतत चालविला आहे. तो उत्साहानें व प्रसन्न चित्तानें पार पाडण्यास साहित्यसेवा व ज्ञानलालसा यांतून मिळणाऱ्या शीतल तुषारांनींच त्यांस सामर्थ्यवान केलें आहे. इतर असंख्य अवधानें संभाळून त्यांनीं साहित्य क्षेत्रांत व विद्वत्तेत संपादलेलें स्थान स्पृहणीय नाही असे कोण म्हणेल ?

"तात्यासाहेबांनी मिळविलेल्या विशिष्ट प्रकारच्या पात्रतेमुळे त्यांना किती उपाधि सतत सोसाव्या लागत याचे प्रत्यंतर त्यांच्या खासगी भेटीसाठी घरी जाणारास सहज येते. सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंत त्यांची सल्लामसलत घेऊं इच्छिणारांची जा-ये एकसारखी सुरूं असते. भेटीस आलेल्यांना सल्ला देत असताच ते आपली इतर मानसिक अवधाने चालें ठेवतात. शहरांत ठिकठिकाणीं त्यांनी जे कार्यक्रम आंखलेले असतात ते उरकण्यासाठी अनेक योजना त्यांच्या डोक्यांत घालमेल करीत असतांना पाहून कल्पक मनुष्यास मोठ्या थोरल्या बोरी-बंदरासारख्या रेल्वे स्टेशनाची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. त्या स्टेशनावर बाहेरून दूरदूरच्या गाड्या येत असल्या तरी तेथून रवाना व्हावयाच्या गाडयांचें शंटिंग सुरूं असते, व प्लॅटफॉर्मच्या निरनिराळ्या भागांत गाडयांच्या जोडलेल्या माळा एंजिनाची वाट पाहत असतात. तात्यासाहेबांच्या मनःस्थितीचे शेजारी बसून निरीक्षण करणाराच्या मनश्चक्षुपुढें हेच दृश्य उभे राहतें.

सार्वजनिक कार्याची योग्यता मनुष्य कितीहि जाणत असला तरी वयोमानाप्रमाणें त्याचें शरीर थकावयाचे व मनालाहि या उपाधीचा त्रास सहन न होऊन ते विश्रांतीसाठीं उत्सुक व्हावयाचेंच. ही अवस्था गेलीं पांचसहा वर्षे तात्यासाहेबांवर चालून येत असून, आतां त्यांचे तिजपुढे चालेनासे झाल्यामुळेच त्यांनी सर्व सार्वजनिक संस्थांचा निरोप घेण्याचे ठरविले आहे यांत शंका नाही. त्यांना हवी असणारी विश्रांति सर्वांनीं त्यांस सुखाने उपभोगूं द्यावी. ते आतां कृतकार्य झाले आहेत, व कृतकृत्यतेचा मनास वाटणारा सात्विक आनंद चाखण्याचें भाग्य फार थोड्यांच्या वांट्यास येत असल्यामुळें ते भाग्य अनुभवण्यास त्यांना ईश्वरानें उदंड आयुष्य द्यावें असें आम्ही इच्छितों. पुण्याच्या व महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत तात्यासाहेबांच्या कर्मसंन्यासानें प्रचंड खिंड पडून तें जीवन ओकें व नीरस दिसेल, पण त्यास इलाज काय !"

केसरीचा अहेर घरचा म्हणून त्याचा मान पहिला. पण केसरीचें हें लिहिणें मला औपचारिक न वाटण्याचें एक कारण असें कीं, सर्व महाराष्ट्रभर माझ्या व्यवसाय बंधूंपैकीं शेंकडा नव्वदांनीं तरी अशाच अर्थाचे उद्गार माझ्या कार्यनिवृत्तीला उद्देशून काढलेले आढळले. या व्यवसायबंधूंत केवळ माझ्या मताचे व पक्षाचेच नव्हेत तर माझ्या प्रतिपक्षांतीलहि कांहीं वृतपत्रकर्ते आहेत. मला मिळालेलीं प्रशस्तिपत्रें अनाहूत अशींच आहेत. माझें सार्वजनिक कार्य सुरूं असतां यांपैकीं अनेकाशीं अनेक वेळा माझा मतभेद झालेला आहे. माझें धोरण पसंत न पडल्यामुळें त्यांतल्या कांहींनीं मजवर सडकून टीका केली आहे. कांहींनीं आपल्या स्वभावाप्रमाणें किंवा आखून घेतलेल्या धोरणानुसार माझी टवाळी कुचाळी करून दुरुत्तरेंहि दिलीं असतील. मी जन्मांत लोकांकडून कांही थोडथोडकी निंदा सोसली नाहीं. अर्थात् उलटपक्षी मी वादभूमींतून निघून जाण्याच्या वेळीं कोणी जर मजविषयी बरे उद्गार काढले तर त्याचें भूषण मी कां मान नये ? ज्यानें विषाचे घोटावर घोट घेतले त्याला शेवटी तरी अमृताचा घोट आपण होऊन पुढें आल्यास तो घेण्याचा हक्कच आहे. त्यांचा अव्हेर करण्याइतका मी फाजील विनयी किंवा साधु पुरुष नाहीं. निंदेच्या दृष्टीनें निंदेला जशी किंमत आहे तशी, किंबहुना त्यामुळें, स्तुतीलाहि आहे असेंच मी मानतो. स्तुति ही निंदेची प्रतियोगिनीच होय. मी विकाररहित जीवन्मुक्त नाही. प्रतिकूल लोकमताचें दुःख व अनुकूल लोकमताचें सुख मानणारा असा व्यवहारी मनुष्य मी आहे. आणि उलट प्रकारचा बहाणा करीन तर निवळ ढोंगी ठरेन. असो. वरील प्रमाणें पूर्ण विवेक करूनच मी खालील उतारे देत आहे :—

**दैनिक त्रिकाळ ( पुणें )** ता. ४ । ४ । ३७—श्री. केळकर यांची आजवर झालेली साहित्यविषयक कामगिरीदेखील इतकी थोर आहे कीं, सामान्यतः कोणचाहि विषय मनांत योजून त्यासंबंधी विचारपूर्वक लिहिणाऱ्या माणसाला अखेरीस असेंच कबूल करावें लागतें कीं, यांतला बराचसा भाग श्री. केळकर यांनीं पूर्वीच लोकांपुढें मांडलेला आहे. श्री. केळकर यांनी मराठीची भाषाशैली तर इतकी संपन्न बनवून ठेवलेली आहे कीं, मराठी भाषा हस्तगत करूं पाहणाऱ्या प्रत्येक इसमाला केळकरांच्या लेखांचीं पारायणें करणें भाग आहे. आजवरच्या या बहुमोल साहित्यविषयक कामगिरींत श्री. केळकर हे यापुढील काळांत कांहीं तरी अभिनव अशी भर टाकतील यांत आम्हाला मुळींच संशय वाटत

नाहीं. कारण श्री. केळकर यांना वयोमानामुळें शारीरिक क्षीणता आलेली असली तरी त्यांची बुद्धि नवे नवे प्रांत आक्रमण करण्याच्या कामीं अजूनहि कार्यक्षम आहे.

**विविधवृत्त** ( मुंबई ) ता. ४।४।३७—टिळकांच्या कारावासांत त्यांच्या केसरी व मराठा या दोन्ही संस्था सुरक्षित ठेवून लोकजागृतीचें व प्रचाराचें कार्य त्यांनीं एवढ्या कार्यक्षम रीतीने पार पाडलें कीं, टिळकांनीहि त्यांना त्याबद्दल धन्यवाद दिले. केळकरांच्या लेखणीचें सव्यसाचित्व व त्यांची सल्लामसलत यांचा बहुमोल उपयोग केसरी संस्थेला व टिळकांना झाला, आणि त्यामुळेंच कै. टिळकांच्या मागून टिळकांच्या राजकीय पीठाचे अधिपति या नात्यानें त्यांचें नेतृत्व महाराष्ट्रीय टिळक पक्षीयांनीं बिनतकार मान्य केलें. तथापि व्यक्ति या नात्याने जे स्वभावगुण गौरवास्पद ठरतात तेच गुण राजकारणासारख्या धकाधकीच्या मामल्यांत कमकुवतपणाचा दोष उत्पन्न करण्यास कारणीभूत होत असल्यामुळें, केळकरांच्या राजकारणाला त्यांच्या सौजन्यामुळें कणखरपणा चढला नाही. टिळकांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणांतील बुद्धिप्राधान्याचा लौकिक व परंपरा कायम ठेवण्यासाठीं सतत केलेला झगडा असेंच स्वरूप या राजकारणाला आलें. हा झगडा केळकर निकरानें झगडले व या झगड्यांत त्यांनीं आपलें स्वत्व कायम ठेविलें. लोकविग्रह होऊं नये म्हणून बदलत्या राजकारणाशीं मिळतें घेण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. पण या राजकारणाशीं ते कधीहि एकरूपता पावले नाहींत. आणि प्रसंग आला त्या त्या वेळीं उसळी मारून त्यांनी हिंदी राजकारणांतील बुवाशाहील सणसणीत थपडा लगाविल्या. परिस्थिति निर्माण करणें व परिस्थितीशीं झुंज खेळणें यांपैकीं कोणत्या तरी एका कार्याचें वाण सार्वजनिक कार्यकर्त्यांना स्वीकारावें लागतें. केळकरांच्या वांट्याला दुसऱ्या प्रकारचें वाण आलें व त्यासाठीं त्यांना निंदा, क्लेश, मनस्ताप या गोष्टी सहन कराव्या लागल्या.

**कुलाबा-समाचार** ( पेण ) ता. ३।४।३७—सर्व प्रकारच्या सार्वजनिक कार्यांतून याप्रमाणें निवृत्त झाल्याची जी घोषणा तात्यासाहेबांनीं केली आहे, ती ऐकून केवळ महाराष्ट्रीयांसच नव्हे तर इतर प्रांतांतील लोकांसहि वाईट वाटल्या खेरीज राहणार नाहीं. मनाला खरा मोकळेपणा मिळावा व शरीरालाहि विश्रांति लाभावी एवढ्यासाठींच श्री. तात्यासाहेब हे सार्वजनिक कार्यांतून निवृत्त होत आहेत असें 'केसरी'तील त्यांच्या आत्मनिवेदनाच्या दोन शब्दांवरून दिसतें.

तात्यासाहेबांच्या या सार्वजनिक कार्यनिवृत्तीमुळें महाराष्ट्राचें पुष्कळच नुकसान होणार आहे. परंतु नाइलाज म्हणून तें सहन करण्याखेरीज गत्यंतर नाहीं.

**राष्ट्रमत ( पुणें )** ता. ४।४।३७—एकेचाळीस वर्षेपर्यंत लोकसेवेचें अखंड व्रत आचरल्यावर महाराष्ट्राचें पुढारी श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं सेवानिवृत्त होण्याचें ठरविलें याबद्दल त्यांना कोणी दोष देणार नाहीं. आजमितीस ते वेगवेगळ्या अठरा संस्थांचे अध्यक्ष आहेत व इतर कित्येक संस्थांशीं त्यांचा कमीअधिक प्रमाणांत संबंध आहे. शिवाय केसरी व मराठा पत्राचे संचालक म्हणून त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी आहे ती वेगळीच. हें सर्व सांभाळून अवांतर लेखनाचा व वाचनाचा त्यांचा जो व्यासंग चालू असतो तो लक्षांत घेतला म्हणजे या थोर पुरुषाच्या बहुविध व्यवसायांची व अचाट बुद्धिवैभवाची कल्पना येते. वयाला जवळ जवळ पासष्ट वर्षें पुरीं झालीं असतां इतक्या जबाबदाऱ्या बिनबोभाटपणें सांभाळणें ही असामान्य गोष्ट होय. कै. महादेव गोविंद रानड्यांच्या नंतर तात्यासाहेबांच्या इतक्या विविध व्यासंगाची व विशाल बुद्धीची व्यक्ति महाराष्ट्रांतच काय पण सबंध हिंदुस्थानांतहि झाली नाहीं असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.

**ज्ञानप्रकाश ( पुणें )** ता. ३।४।३७—श्री. तात्यासाहेब केळकर यांचा सार्वजनिक कार्यकर्ते या नात्यानें महाराष्ट्रांतील विविध स्वरूपाच्या किती संस्थांशीं निकट संबंध आलेला होता, याचें प्रात्यक्षिक सुमारें पांच वर्षांपूर्वी श्री. तात्यासाहेबांच्या षष्ट्यब्दिपूर्तीचा जो अपूर्व सोहळा या पुण्यनगरींत झाला त्या वेळीं जनतेला पहावयास मिळालेलें आहे व त्याची स्मृति लोकांना अद्यापिहि आहे. गेल्या पांच वर्षांत श्री. तात्यासाहेबांच्या मार्गदर्शकत्वाखालीं व सल्लामसलतीनें आपला सार्वजनिक प्रपंच चालविणाऱ्या संस्थांची संख्या कमी तर झालेली नाहींच, पण ती बऱ्याच प्रमाणांत वाढलेली आहे असें म्हटलें तरी चालेल. श्री. तात्यासाहेब त्यांनीं संबंध ठेविलेल्या अनेक संस्थांवर त्यांचें अपत्यसदृश प्रेम असणें स्वाभाविक आहे. पण वृद्धापकाळीं संततिप्रेमाचेंहि नियमन करण्याची पाळी मनुष्यावर येते, व पारमार्थिक मनःस्वास्थ्यासाठीं तशा नियमनाची जरूरीहि असते. आणि म्हणूनच पुष्कळ लोक त्या दशेंत चतुर्थाश्रमाचा किंवा संन्यासाचा मार्ग पत्करतात. श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं काल परवापासून जी संस्था-

संबंधनियमनाची, किंवा एका अर्थानें राजसंन्यासाचीच म्हणा ना, जी घोषणा केली आहे, ती त्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याला सहाय्यक होवो अशी कोणीहि याप्रसंगीं सदिच्छा व्यक्त करील.

**स्वराज्य (मुंबई)** ता. ४।४।३७—श्री. तात्यासाहेब केळकर ही एक व्यक्ति नसून चालती बोलती संस्थाच आहे. पुण्यांतील सुमारें पन्नासापेक्षां जास्त संस्थांशी त्यांचा आतांपर्यंतच्या सार्वजनिक आयुष्यक्रमांत संबंध आला आहे. पुण्याच्या सार्वजनिक सभेचे तात्यासाहेब हे केवळ प्राण आहेत. अशा संस्थांची तात्यासाहेबांच्या या निश्चयामुळे फार हानि होणार आहे. राजकारणांत तात्यासाहेब व्यावहारिक व भावनात्मक दृष्टीचा मिलाफ करण्याचा प्रयत्न करूं लागल्यामुळे कीर्तियशोमंदिराच्या शिखरावर ते पोहोचूं शकले नाहीत हा त्यांचा दोष नव्हे. सुवर्ण-मध्याच्या पायी त्यांस बराच त्रास सहन करावा लागला व राजकीय क्षेत्रांत त्यांचा बराच कोंडमारा झाला. यामुळेच त्यांस काँग्रेसचा अध्यक्ष होण्याचा मान मिळाला नाहीं. परंतु काँग्रेसमधील मानाच्या जागेचा लोभ न धरतां अगर पुढाऱ्यांच्या रागालोभाची पर्वा न करतां, त्यांनी राजकीय मतें वेळोवेळी निःस्पृहपणें मांडली. आणि महाराष्ट्रांत टिळकांच्या मृत्यूनंतर दुफळी माजली नसती तर हिंदुस्थानच्या राजकारणास तात्यासाहेबांनी दुसरी दिशा दाखविली असती. पण भाऊबंदकींत सांपडून ते अयशस्वी ठरले. तरी पण 'केसरी' द्वारा कौन्सिलप्रवेशाचा कार्यक्रम लोकांवर ठसवून काँग्रेसलाहि तो कार्यक्रम अखेर मान्य करावा लागला हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

**टाइम्स (मुंबई)**—सार्वजनिक कार्याच्या क्षेत्रांतून निवृत्त होण्याचा श्री. न. चिं. केळकर यांचा निश्चय खेदजनक आहे. टिळकांच्या वेळेपासून सार्वजनिक व राजकीय जीवनांत केळकरांच्याइतकी कीर्ति दुसऱ्या कोणीहि मिळविली नाहीं. त्यांची लोकसेवा इतकी सर्वश्रुत आहे कीं, निजविषयी जास्त लिहावयास नकोच. कायदेमंडळाकडे काँग्रेस वळली ही गोष्ट त्यांस खास समाधानकारक वाटत असली पाहिजे. खरोखर कांहीं महिन्यांपूर्वीच काँग्रेसनें हा निश्चय स्पष्ट केला असता व अधिकारग्रहण करणार असें जाहीर केलें असतें, तर बहुशः केळकरांनीं लोकशाही स्वराज्य पक्षाचा एवढा प्रचार करण्याचेहि टाळले असतें.

**डॉन ( मुंबई )**—श्री. केळकरांचा संबंध निरनिराळ्या पन्नास सार्वजनिक संस्थांशीं आलेला आहे. परंतु विवादपटु राजकारणी व चमकदार मराठी वृत्तपत्रकार या नात्यानेंच त्यांची कीर्ति अधिक आहे. त्यांनी दुसऱ्यांस टीकेचे असंख्य टोले लगावले व दुसऱ्यांकडून स्वतःस आलेले सोसले. तथापि त्यांच्या बरोबरीच्या सहकाऱ्यांपेक्षां त्यांनींच अधिक विजयचिन्हे संपादन केली. केसरी, मराठा पत्रें या पदवीस त्यांनीच आणली. हिंदी वृत्तपत्राच्या इतिहासांत त्यांच्या नांवानें बरींच जागा निःसंशय व्यापली आहे. त्यांच्या लेखणीचा संचार विनोदी विषयांत असतो तसा गंभीर वाङ्मयांतहि असतो. त्यांची लेखननिर्मिति चालचलाऊ विषयांपासून शाश्वत विषयापर्यंत पसरलेली आहे. विवादप्रसंगीचे त्यांचे कांहीं वाङ्मय वाचतांना तर त्यांच्या उपरोधिक टीकापद्धतीनें अठराव्या शतकांतील अभिजात इंग्लिश वाङ्मयाची व विशेषतः डीन स्विफ्ट यांच्या वाङ्मयाची आठवण होते. विद्याव्यासंगी व अनुभवी राजकारणी अशा गृहस्थास अवश्य अशी शांतिपूर्ण विश्रांति ते आतां घेणार आहेत व या प्रसंगी त्यांचे मित्र व शत्रु दोघेहि त्यांच्याविषयी सद्भावना प्रकट करतील यांत संशय नाहीं.

**परीक्षक ( बेळगांव )** ता. ८।४।३७—केळकर म्हणजे केसरी आणि केसरी म्हणजे केळकर असेच सर्वत्र मानलें जातें. लोकमान्यांच्या निधनानंतर केळकरांचें मत म्हणजे महाराष्ट्राचे मत असेंच मानले जाऊं लागलें. यशापयशाच्या मापानें कोणाचीहि योग्यता ठरविणें चूकच होय. मनुष्याच्या हातांत एकच गोष्ट आहे. ती म्हणजे प्रामाणिक वागणूक, प्रामाणिक विचार, आचार आणि उपदेश. केळकरांच्या सार्वजनिक जीवनाचें तात्पर्य या गोष्टींत आहे असें आम्हास वाटतें.

**दीनबंधु ( पुणें )** ता. ९।४।३७—महाराष्ट्रांतील सार्वजनिक कार्यांशीं ज्यांचें जीवन गेली एकेचाळीस वर्षे इतकें निगडित झालें होतें त्या विभूतीनें एकाएकी असा कार्यसंन्यास घेतलेला पाहून जनतेस वाईट वाटेल यांत शंका नाहीं.

**प्रबोध ( धुळें )** ११।४।३७—केसरीचे संपादक, सुप्रसिद्ध साहित्तिक आणि कलावंत, राजकारणी पुढारी इत्यादि अनेक नात्यांनीं महाराष्ट्रांत त्यांचा दर्जा सर्वश्रेष्ठ असून त्यांची रिकामी होत असलेली जागा लवकर भरून निघण्याची आशा दिसत नाहीं. लो. टिळकांचे उजवे हात मानले जात असतांहि 'प्राग-

तिकां 'ना ते ल्या काळांतहि जवळचेच वाटावें हें त्यांच्या गोडव्या स्वभावाचे व एकांतिकपणा न स्वीकारितां सुवर्णमध्य गांठण्याच्या प्रवृत्तीचेंच द्योतक होय. कौन्सिल-बहिष्काराबाबत त्यांचे विचार त्यांनीं अप्रियता सोसूनहि १५ वर्षे निश्चयाने राष्ट्रापुढें मांडले, व शेवटी त्यांच्याच मार्गावर कॉंग्रेसला जावें लागलें ही गोष्ट प्रामाणिक इतिहासकारांना अवश्य मान्य करावी लागेल.

**संस्थानी स्वराज्य ( पुणें )**—श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं देशाची व महाराष्ट्राची जी विविधप्रकारें सेवा क्रमाक्रमानें वाढत्या प्रमाणांत केली आहे ती मोठीच आहे असें म्हणावें लागेल. ही सेवा त्यांना जी करतां आली व त्यांनीं आजचा मित्रमेळावा जो मिळविला आहे त्याचे श्रेय त्यांच्या सौजन्यासच दिलें पाहिजे. टिळक-पक्षीयांत अनेक कार्यकर्ते गेल्या पिढीत महाराष्ट्रांत झाले. परंतु श्री. तात्यासाहेब यांच्याप्रमाणें त्यांतील फारच थोड्यांच्या हातून देशकार्य झालें आहे असें म्हणावें लागतें, व त्याचें कारण त्यांचें स्वभाववैचित्र्य हे होय.

**ज्ञानोदय ( मुंबई )**—जो काम करतो त्याच्याचकडे कामाचे बोजे येतात. आळशी माणसाला एकच व एकाच तऱ्हेचें काम पुरवतें. अधिक कामें असलीं म्हणजे खऱ्या कर्तृत्ववान माणसाला तीं सारीं योग्य रीतीनें करतां येतात. हे विचार आज पुन्हा सुचण्याचें कारण एका प्रसिद्ध कर्मवीराचा कर्मसंन्यास !

तारीख १ एप्रिल १९३७ रोजीं महाराष्ट्राचे पुढारी श्री. न. चिं. केळकर यांनीं आपल्या अनेक तऱ्हेच्या लोकोपयोगी व सार्वजनिक कार्यांतून अंग काढून घेतलें. केळकरांचें नांव अजरामर राहील तें त्यांच्या वाङ्मयसेवेमुळें. ते पहिल्या प्रतीचे लेखक व मुत्सद्दी आहेत. मराठी भाषेचा विशेष अभ्यास करणारे लोक तर केळकरांच्या लेखांचा अधिक अभ्यास करतात. व्यक्ति या दृष्टीनेंहि पाहिल्यास त्यांच्याइतका लोकप्रिय महाराष्ट्रीय पुढारी दुसरा नाहीं.

**वैनतेय (सावंतवाडी)**—सार्वजनिक संस्थांतील जागा त्या केवळ मानाच्या होत असें न मानतां त्या स्थानांची जबाबदारी विवेकबुद्धीला स्मरून आत्यंतिक जिव्हाळ्यानें पार पाडण्याचा तात्यासाहेबांचा स्वभाव असल्यामुळें, जीं कामें उत्तरोत्तर स्वतःच्या हांतून होणें कठिण आहे त्यांची जबाबदारी अंगावर ठेवणें त्यांना अनुचित वाटलें. म्हणूनच त्यांनीं त्या संस्थांशीं असलेले अधिकृत संबंध सोडले. अर्थात् यांत संन्यास असलाच तर तो कार्याचा नसून सन्मानपदांचा आहे. सार्व-

जनिक कार्याचे व्याप कमी करून विश्रांतीची अपेक्षा करतांना तात्यासाहेबांना जें कृतकृत्यतेचें समाधान वाटत असेल, तेवढें फारच थोड्यांच्या नशिबीं असतें. गेलीं सतरा वर्षें राजकारणांत त्यांना प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें सतत धडपड करावी लागल्यामुळें, परप्रत्ययनेय आणि प्रवाहपतित अशा बहुजनसमाजाच्या मान्यतेस त्यांना पारखे व्हावें लागलें खरें. पण त्यांनीं अनेक वर्षांपूर्वी प्रतिपादिलेले राजकीय सिद्धांतच आज खरे ठरले आहेत हें कोणालाहि सहज दिसून येण्यासारखें आहे. 'कौन्सिलप्रवेश हराम' म्हणणाऱ्या काँग्रेसनें कायदेमंडळाच्या गेल्या निवडणुका लढविल्या याचें श्रेय तात्यासाहेबांना न देणारे न देवोत; पण त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा तो मोठाच विजय होय असें आम्ही मानतों.

**मातृभूमि** ( **अकोला** ) काँ. पक्षीय ता. ८।४।३७—ता. १ एप्रिल रोजीं महाराष्ट्रांतील एक अग्रगण्य पुढारी व विद्वानांचें मुकुटमणी श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं सार्वजनिक जीवनक्रमाचा संन्यास घेतल्याचें जाहीर केलें आहे.

केळकर सेवानिवृत्त झाल्यामुळें महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत एकदम सुनें सुनें वाटेल व त्यांच्या नेतृत्वाच्या अभावी कांहीं काळपर्यंत तरी अनेक संस्था पोरक्या होतील. त्यामुळें त्यांना निरोप देतांना शब्द आंतल्या आंत घोटाळतील. परंतु एकेचाळीस वर्षांच्या अविश्रांत परिश्रमानंतर आयुष्याच्या संध्याकालांत श्री. केळकर यांना निवांतपणा लाभला तर ते त्या विश्रब्धतेच्या काळांतहि इतरांनीं जन्म जन्म घालवून केलें नसेल इतकें साहित्यसेवेचें कार्य करतील अशी उमेद वाटते.

श्री. केळकर आज ४१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सार्वजनिक कार्यांतून निवृत्त होत आहेत तेव्हां प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या अंतःकरणांत कृतज्ञेची भावना उमटून जाईल याबद्दल आम्हास मुळींच शंका वाटत नाहीं. श्री. केळकरांच्या मताबद्दल किंवा धोरणाबद्दल कोणाचे कितीहि मतभेद असले, तरी श्री. केळकरांचें व्यक्तिमत्व इतकें थोर आहे कीं, त्यापुढें आदरानें मान नम्र करण्यांत कोणाहि गुणज्ञास धन्यताच वाटेल.

**शाहू** ( **सातारा** ) ता. ७।४।३७ —लो. टिळकांच्या पश्चात् गांधी—युग सुरू झालें, त्या वेळीं असहकारिता, सत्याग्रह, कायदेभंग यांच्या उठलेल्या वावटळीनें

गोंधळून न जातां वेळोवेळीं राष्ट्राला खऱ्या हिताचा इषारा देणें व लो. टिळकांच्या राजकीय तत्त्वज्ञानाची लोकांत जागृति कायम राखणें हीं फार महत्त्वाची कार्यें त्यांनीं केलीं. त्याचाच परिणाम म्हणजे आज सोळा वर्षांनंतर त्यांचींच तत्त्वें काँग्रेसनें अप्रत्यक्षरीत्या कबूल केलीं. याशिवाय त्यांनी मराठी वाङ्मयाची जी अनेकविध सेवा केली ती तर चिरस्मरणीय व मराठी भाषेस भूषणभूत अशीच आहे.

**उदय ( उमरावती )** ता. ६।४।३७—'केसरी-मराठा' संस्थेद्वारा श्री. केळकर यांनी महाराष्ट्राची केलेली सेवा अमूल्य आहे व निरनिराळ्या सार्वजनिक संस्थाद्वारा त्यांनी केलेले कार्य भरीव स्वरूपाचे आहे; व म्हणूनच हा महाराष्ट्राचा अष्टपैलू हिरा आज कार्यनिवृत्त होत आहे, याबद्दल महाराष्ट्राला हळहळ वाटत आहे.

**प्रजापक्ष** ता. ३।४।३७—महात्मा गांधीचें राजकारण सुरू झाल्यापासून तात्यासाहेबांनीं महाराष्ट्रास अंधश्रद्धेपासून वांचविलें व असल्या राजकारणापासून जनतेचें हित होणार नाही हे त्यांनी पहिल्या प्रथम लोकांस सांगितले. हे करीत असतांना त्यांनीं प्रतिपक्षीयांची टीकाहि मोठ्या औदार्यानें सहन केली. काँग्रेसचे राजकारण कसें चुकीचें आहे हे दाखवीत दाखवीत त्यांनीं अखेरीस काँग्रेसलाच आपल्या मार्गावर आणले. यांत त्यांच्या राजकारणपटुत्वाची साक्ष पटते. कौन्सिलप्रवेशावर कडकडीत बहिष्कार टाकणारी काँग्रेस अखेर दिवाणगिऱ्या घेण्यापर्यंत कशी तयार झाली हे ज्यांनी पाहिलें असेल त्यांना काँग्रेसच्या आणि प्रतिसहकार पक्षाच्या राजकारणांत काय फरक आहे हे सांगतां येईल. राजकारण असो, धर्मकारण असो, समाजकारण असो, शास्त्रीय विषय असो, अभिजात वाङ्मयांतील एखादा विषय असो, अशासारख्या कोणत्याहि विषयांवर तात्यासाहेबांची लेखणी तितक्याच प्रभावीपणानें चालत असे. आज त्यांनीं ज्या अनेक संस्थांच्या कारभारांतून अंग काढले आहे अशा ४०।५० संस्था त्यांच्या बहुमोल मार्गदर्शकत्वाला मुकल्या.

**विजय ( जळगांव )** कॉ. पक्षीय ता. ७।४।३७—महाराष्ट्रांत श्री. केळकरांइतकी शतावधानी, बुद्धिवादी व तितकीच भावनाप्रधान व्यक्ति क्वचितच आढळेल.

**विजय ( सांगली )**—काँग्रेसच्या धडाडीच्या पण वाहत्या ओघाच्या कार्यक्रमांत सतत पुढाकार न घेतल्याच्या वैगुण्याखेरीज दे. भ. नरसिंह चिंतामण

ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्यांत वैऱ्यासमुद्धा दूषण हुडकून काढतां येणार नाहीं. भावनाप्रधानपणा मागें ठेवून, बुद्धिप्रतिष्ठित राजकारणाचा अखंड मार्ग त्यांनीं चोखाळला. दे. भ. केळकर हे वाङ्मयक्षेत्रांत सम्राट शोभतात. सर्व विषयांचा ठाव घेणारी त्यांची बुद्धि विशाल व अष्टपैलू आहे. तात्यासाहेबांनीं निरानिराळ्या संस्थांचा राजीनामा देतांना जे उद्गार काढले तेच त्यांचें व्यक्तिमत्व दर्शवितात.

**तेज** ( कॉ. पक्षीय ) ता. ४-४-३७—सार्वजनिक आयुष्यांतील निरनिराळे बरेवाईट प्रसंग श्री. तात्यासाहेबांनी अनुभविले असून त्या अनुभवाचा फायदा त्यांनी दिलदारपणें अनेक संस्थांना दिलेला आहे. कोणत्याहि गोष्टीबाबत सल्ला विचारण्याम श्री. केळकरांच्याकडे कोणी गेल्यावर त्यांना त्यांनीं विन्मुख पाठविल्याचें उदाहरण आम्हास माहीत नाही. श्री. केळकरांसारखा अष्टपैलू पुढारी महाराष्ट्राला आतापर्यंत मिळालेला नाही. 'नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा मुर्ध्निस्थितिः' या सुभाषितप्रमाणे श्री. केळकर हे महाराष्ट्राचे नैसर्गिक पुढारी झाले आहेत आणि सार्वजनिक कार्यांतून त्यांनीं संन्यास घेण्याचे ठरविल्यामुळे महाराष्ट्राला पोरके वाटल्याखेरीज राहाणार नाहीं. साहित्यक्षेत्रांतील साहित्यचंद्र श्री. केळकरांचे स्थान पहिलें आहे.

**लोकसत्ता** ता. ११।४।३७—श्री. तात्यासाहेबांनीं 'केसरी-मराठा' संस्थेकरितां ४१ वर्षपर्यंत जिवापाड कष्ट करून त्यांना नमुनेदार बनविलेंच. पण निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या ४०-४१ संस्थांना आपल्या कर्तबगारीच्या जोरावर यशाच्या शिखरावर नेऊन बसविले आहे. लोकमान्यांच्या व्यवहारी व हुकमी राजकारणाच्या प्रचारासाठीं, निंदा, तिरस्कार व शिव्याशाप सहन करून त्यांनीं उदंड कष्ट सहन केले आहेत. तात्यासाहेबांची साहित्यसेवा तर असामान्य आहे यांत वादच नाहीं. त्यांची लेखणी सर्वस्पर्शी आहे, इतकेंच नव्हे तर त्या प्रांतांतून तिनें आपलें तेज वाचकांच्या पुरेपूर प्रत्ययास आणून दिलें आहे.

**प्रबोधचंद्रिका** ता. ५।४।३७—टिळकांसारखा नेता मंडालेस रवाना झाल्यावर तर केळकरांची खरी परीक्षा होती. त्यांच्या तेजस्वी राजकारणाचा वारसा घ्यायला त्या वेळीं हिंदुस्थानांत कोणीहि पुढें झाला नाहीं. सगळा देश निचेष्टित पडल्यासारखा झाला. अशा वेळीं केसरीच्या द्वारें केळकरांनीं विचार जागृतीचें

जी ज्योत तेवत ठेविली तिचें महत्त्व आम्हांस विशेष वाटतें. इतकेंच नव्हे तर राष्ट्राभिमानाच्या ज्योतींत जे साहित्याचे, ऐतिहासिक संशोधनाचे, चरित्रलेखनाचे व टीकावाङ्मयाचे निरनिराळे मोहक रंग हलक्या हातानें प्रज्वलित केले त्यामुळेंच केळकर, हे टिळकांच्या म्हणजेच पर्यायानें जनतेच्या, 'सत्त्वपरिक्षें'तून उत्तीर्ण झाले. हें केळकरांचें अनन्यसाधारण यश काळास कधींहि हिरावून घेतां येणार नाहीं.

**निःस्पृह** ( काँग्रेसपक्षीय )—श्री. केळकरांचीं मतें गेलीं सोळा वर्षें काँग्रेसशीं विशेष जुळतीं जरी नसलीं तरी पण त्यांच्यामुळे राजकारणांत विशेष रंग येत असे. त्यांच्या विरोधांत देखील एक प्रकारचें स्वारस्य असें. कारण विरोधी झाला तरी तो सच्चा असल्यावर त्याच्याशीं दोन हात खेळण्यांत गोडी होती. पण श्री. केळकरांच्या विरक्तीनें हा लाभ देखील आतां उरला नाहीं.

**निर्भीड ( मुंबई )** ता. ११।४।३७—कै. दे. भ. अच्युतरावजी कोल्हटकर यांनीं दहा वर्षांपूर्वी तात्यांसंबंधानें गुणवर्णनात्मक अशा ज्या चार ओळी लिहून ठेवल्या आहेत त्यांची सर इतरांच्या लिखाणाला येऊं शकत नाहीं. आपल्या 'चाबुकस्वार' च्या ता. २१।५।२७ च्या अंकांत तात्यासाहेब केळकरांसंबंधानें अच्युतरावजींनीं पुढीलप्रमाणें आपला त्रिकालाबाधित सिद्धान्त नमूद केलेला आहे:—बुद्धीची कुशाग्रता, व्यापकता, सुपूर्तता व चपलता या चारी गुणांनी तात्यांची तुलना कै. महादेव गोविंद रानडे यांच्याशींच करावी लागते. रानड्यांच्या वेळेपासून इतका बुद्धिमान पुरुष महाराष्ट्रांत झालाच नाहीं म्हटलें तरी चालेल. अनेक प्रसंगीं टिळकांपेक्षां केळकरांनीं सरस बुद्धिमत्ता दाखविलेली आहे. व्यासंगांत तर कोणापेक्षांहि ते खात्रीनें सरस आहेत.

अच्युतरावांनीं दुसऱ्या एका लेखांत तात्यांसंबंधानें लिहितांना परमेश्वराला उद्देशून पुढील वाक्य लिहिलेलें आढळतें. "परमेश्वरा! तूं नरसोपंत केळकरांसारखा निःपक्षपाती, निःस्पृह आणि न्यायनिर्वेद आहेस!" अच्युतरावांनीं लिहिलेलें हेहि वाक्य अत्यंत महत्त्वाचें आहे. तात्यांनीं कर्मसंन्यास घेतल्यावरसुद्धां त्यांच्या अंगांतील निःपक्षपातीपणाचा, न्यायीपणाचा, व निःस्पृहपणाचा गुण अजूनहि अनेक वर्षें हिंदु समाजाला व हिंदु राष्ट्राला उपयोगी पडण्यासारखा आहे. तात्यांच्या अंगांतील वरील गुण इतका निष्कलंक आहे कीं, महात्मा गांधी किंवा पं. जवाहरलाल नेहरू यांनीं सुद्धां नाकानें कांदे सोलण्याचें सोडून

देऊन राजकारणांतील अत्यंत अवघड अशा ब्रह्मगांठी सोडवितांना तात्यासाहेब केळकरांचीच सल्लामसलत घ्यावी !''

शेवटीं एक उतारा थोडासा नाखुषीनें देतों. कारण त्यांत माझी व खाडिलकर यांची तुलना केलेली आहे. पण तुलनेनें व साम्यभेद ज्ञानानेंच खरें गुणज्ञान होतें. शिवाय हा उतारा ज्यांच्या लेखांतला आहे ते रा. पर्वते पुण्यास मराठा-पत्राचे संपादक तीन वर्षें असतां, पुढें त्यांना तें पत्र सोडून जाण्यास एका अर्थानें मीच ट्रस्टी म्हणून कारणीभूत झालों. इतकेंच नव्हे तर मराठा-पत्रांत त्यांच्यावर मी टीकाहि केली होती. अर्थात् पर्वते यांच्याकडून मजविषयीं अनुकूल अभिप्रायाची अपेक्षा मी सहसा केली नसती. म्हणूनच त्रयस्थपणानें त्यांनीं तो दिला यामुळें त्याचें महत्त्व मी विशेष मानतों. 'चित्रा' वर्तमानपत्राच्या गेल्या दिवाळी अंकात पर्वते लिहितात :—

''याच सुमारास 'लोकमान्य' पत्र निघालें होतें आणि त्यांत कांहीं आर्थिक विषयावरील लेख मी लिहिले होते. श्री. कृष्णाजीपंत खाडिलकर त्यावेळीं संपादक होते. माझे चारपांच लेख प्रसिद्ध झाल्यावर त्यांना भेटावयास गेलों. लेखांची रीतसर पोच आलेली नव्हतीच पण गेल्यानंतरहि त्यांना लेखकाची कांहीं दखल होती असें दिसलें नाहीं. खाडिलकरांना साधी चालरीत देखील नाहीं असा माझा ग्रह झाला, व त्यांजविषयीं मला नाटककार व प्रभावी वर्तमानपत्रकार म्हणून किती तरी आदर असतांहि तो ग्रह अद्यापि कायमच आहे. पण एखादें कार्य हातीं घेतलें कीं त्याचा प्रचार करण्याला जो एक प्रकारचा आंधळेपणा लागतो व चिकित्सक बुद्धि असतांहि तिचा उपयोग न करण्याचा दृढनिश्चय लागतो तो त्यांच्या ठिकाणी नमुनेदार स्वरूपांत आहे. टिळक व गांधी या दोघांचेहि ते उत्तम साथीदार झाले याचें रहस्य त्यांच्या या गुणांत आहे. प्रत्यक्ष त्यांच्या हाताखाली काम करण्याचा योग मला कधींच आला नाहीं.

''खाडिलकरांची प्रथम भेट घेतली त्या सुमारास 'केसरी' व 'मराठा' पत्रांतहि मी लेख लिहिले होते. 'वॉशिंग्टन व जिनीव्हा' 'आयर्लंडची नवी राज्यघटना' व 'हिंदी नौकानयन' या विषयांवर त्यावेळीं लेख लिहिल्याचें चांगलें आठवतें. केळकर हेहि खाडिलकरांसारखेच असतील काय अशी शंका त्यावेळीं मनास कधीं कधीं शिवून जाई. पण होमरूलच्या चळवळींत बरेंच वेळां त्यास दुरून लक्षपूर्वक

अवलोकिलें होतें आणि त्यांचीं भाषणेंहि ऐकिलीं होतीं त्यावरून ती शंका आपोआप नाहींशी होई. पुढे श्री. जम्नादास मेहेता यांनीं 'राष्ट्रसेवक' नांवाचें एक पत्र काढलें व 'नॅशनॅलिस्ट प्रेस' म्हणून एक कंपनी त्यांनीं व जयकरांनीं रजिस्टर केली होती. एक इंग्रजी दैनिकहि चालविण्याचा त्यांचा विचार होता. 'राष्ट्रसेवक' व 'दि बाम्बे नॅशनॅलिस्ट' या दोनहि पत्रांवर काम करण्यासाठीं म्हणून मी त्यांच्याकडे राहिलें होतों. एक दिवस त्यांच्या घरींच कांहीं कामासाठीं गेलों असतां केळकर तेथें बसले होते. जम्नादास मेहेतांनीं सहज बोलतां बोलतां 'मि. पर्वते' असें मला म्हणतांच केळकरांनीं फार आस्थापूर्वक चौकशी केली आणि 'केसरी'तील लेखांची प्रशंसा केली. साहजिकच केळकरांना रीतभात आहे आणि अगत्य आहे असा माझा पक्का ग्रह झाला आणि पुढें त्यांचा अधिक परिचय झाल्यानंतर आणि 'मराठा' पत्राचा संपादक म्हणून त्यांच्या कचेरींत काम केल्यावर आणि तें सोडल्यावरहि माझें हें मत कायम आहे, कीं केळकरांसारखे, वागण्यासवरण्याला, वादसंवादाला किंबहुना त्यांच्या वयाला, ज्ञानाला, अनुभवाला आणि थोरवीला दाखविलींच पाहिजे ती अदबी दाखवून त्यांच्याशीं भांडावयाचें असलें तरीहि असे सोशिक व समंजस संपादक सांपडणें कठिण. म्हणण्याचा अर्थ असा कीं बहुधा इतर कोणीहि त्यांच्यापेक्षां खास वाईट रीतीनें वागेल. साधारणपणें त्यांच्याच वृत्तीचे श्री. अबदुल्ला ब्रेल्वी हे आहेत. केळकरांना दुसऱ्याच्या मतांविषयीं तिरस्कार कधींच नसतो; ब्रेल्वींचें तसेंच आहे."

असो; शेवटीं केसरी व मराठा संस्थेचे नवे ट्रस्टी यांनीं मला व धोंडोपंत विद्वांस यांना जें मानपत्र दिलें तें देतों.

॥ श्रीसमर्थ ॥

ते वंद्यास्ते कृतिनः श्लाघ्यं तेषां हि कार्यकौशलम् ॥
यैरुज्झितात्मकार्यं राष्ट्रार्थायैव क्लेशिता स्वतनूः ॥

केसरी-मराठा संस्थेचे कार्यनिवृत्त विश्वस्त यांस—

सन्मान्य महाशय,

केसरी-मराठा संस्थेचे नवे विश्वस्त आणि सदर संस्थेंतील समस्त अधिकारी व कामगार मंडळ अत्यंत आदरपूर्वक निवेदन करतों कीं, केसरी-मराठा संस्थेशीं

कार्यकारी विश्वस्त या नात्याचा आपला संबंध सोडून आपण कार्यनिवृत्त होत आहां हें पाहून आम्हा संस्थेंतील सर्व अधिकारी व कामगार वर्गास हळहळ वाटत आहे. लो. टिळक सन १९२० सालीं दिवंगत झाले. त्यांच्या हयातींतच आपण बहुत वर्षें केसरी-मराठा संस्थेची एकनिष्ठपणें अमोलिक सेवा केली. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर तर आपणावर जुन्या संबंधाच्या जोडीस विश्वस्त या नात्याची नवीन जोखीम येऊन ठेपली. बदललेल्या परिस्थितींत ही नवी जबाबदारी संभाळण्याचें काम अत्यंत नाजूक झालें होतें. तें पूर्णपणें ओळखून आपण ही जबाबदारी गेल्या सतरा वर्षांत यशस्वीपणें पार पाडली हें विदित करण्यास आम्हाला बहुत आनंद वाटतो.

संस्थेंतील कामगार वर्गाच्या पगाराचें नियम घालून देणें, पगाराची क्रमशः वाढ करणें, बोनस, प्रॉव्हिडंट फंड व ग्रॅच्यूइटी या रूपानें त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य मिळवून देणें इत्यादि सुखसोयी करून आपण या वर्गाचा संतोष राखला. आपली कामगार वर्गाशीं वागण्याची पद्धतिहि सौजन्यपूर्ण व औदार्ययुक्त होती. त्या योगानें सेव्यसेवक भावाची तिखट जाणीव आपण कोणास कधीहि होऊं दिली नाहीं. यामुळें आपण एकाच कुटुंबाचे घटक आहों असें वाटून सर्वांच्या चित्तांत संस्थे-विषयींचा आपलेपणा व संस्थेचा अभिमान वृद्धिंगत होत गेला.

आपल्या कारकीर्दीत संस्थेवर अनेक संकटें येऊन गेलीं. त्यांपैकीं कांहीं संकटें अशीं होतीं कीं, त्यांतून संस्था कशी पार पडेल याविषयीं मोठीच चिन्ता लागून राहिली होती. पण मनाचा खंबीरपणा व वृत्तीचा समतोलपणा कायम ठेवून अत्यंत चातुर्यानें व समयज्ञतेनें आपण तीं संकटें निवारली व संस्थेला सांप्रतचे स्थैर्याचे आणि भरभराटीचे दिवस आणून दिले आणि केसरी अर्ध-साप्ताहिक करून त्याची उपयुक्तता द्विगुणित केली याबद्दल आपणास जेवढे धन्य-द्यावे तेवढे थोडेच आहेत.

केसरी-मराठा संस्थेतील बहुतेक खात्यांना नवीन इमारती आणि ग्रंथालय, अभ्यागतभुवन, सभागृह यांची नवी जोड देऊन संस्थेला आपण नवेंच नमुनेदार स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. अशा साधनसंपन्नतेमुळें ही संस्था पुण्यासच काय पण साऱ्या महाराष्ट्रास ललामभूत अशी झाली आहे. हें महत्कार्य घडवून आण-ण्यास आपल्या अंगचे योजकता, चतुरस्रता, दूरदर्शित्व व संस्थेविषयींचा एकनिष्ठ अभिमान हेच गुण कारण झाले आहेत हें निर्विवाद होय.

सार्वजनिक, विशेषतः राजकीय स्वरूपाच्या, कार्यास द्रव्याची उणीव सदैव भासत असते. त्या उणीवीमुळें कितीतरी निकडीचीं व महत्त्वाचीं कामें अडून पडतात. ही सार्वजनिक कार्यांतील अडचण लक्षांत घेऊन आणि लो. टिळकांना जनतेच्या ऋणांतून मुक्त करण्याच्याहि सदुद्देशानें आपण संस्थेच्या साधन-सामुग्रींतून दूरदर्शीपणानें संचित केलेल्या निधींतून तीन लक्ष रुपयांचा लोकमान्य पर्सफंड निर्माण केला हे महाराष्ट्राच्या अर्वाचीन संस्थांच्या इतिहासांत अत्यंत अपूर्व व वाखाणण्याजोगे महत्कृत्य आपण केलें. या योगानें लोकमान्य टिळकांच्या आत्म्यास खरोखरच अत्यंत समाधान वाटलें असेल. सार्वजनिक कार्यांत आनृण्य संपादन्याची इतकी तीव्र उत्कटता आणि आनृण्यसंपादनांत भावी कार्यकर्त्यांच्या योगक्षेमाची तरतूद करण्याची कल्पक दीर्घदृष्टि क्वचितच पाह्यावयास सांपडते. संस्थेच्या कार्यांत कोणताहि उणेपणा येऊं न देतां आपण एवढा मोठा ट्रस्ट निर्माण केला व त्याचा उपयोग अखिल महाराष्ट्र कर्नाटक यांस करतां येईल अशी योजना निःस्वार्थबुद्धीनें केली याबद्दल आपणांस कितीहि धन्य-वाद दिले तरी ते अपुरेच पडणार आहेत. अशा रीतीनें ज्यांनीं तीन तपांहून अधिक काळ संस्थेचें पालन, पोषण व संवर्धन करून तिची उपयुक्तता वाढविली आणि कामगार वर्गास कुटुंबांतील घटकाप्रमाणें आत्मीयतेनें वागविले तें सन्मान्य विश्वस्त कार्यनिवृत्त होत असता आम्हांस किती हळहळ वाटत असेल तें शब्दानें सांगणें अशक्य आहे. केसरी–मराठा संस्थेचें कार्य करीत असतां आम्हास कें. लोकमान्य टिळकांचें पुण्यस्मरण हें सतत स्वकर्तव्य निष्ठापूर्वक बजावण्यास स्फूर्तिदायक होत असतेंच; पण आपण या संस्थेची जी आजपर्यंत एकनिष्ठपणें सेवा केली तीहि आम्हास मार्गदर्शक होईल अशी ग्वाही आमचें मन आम्हास देत आहे.

आपण संस्थेच्या सेवेंत आयुष्याचीं चाळीस-एकेचाळीस वर्षें घालविलीं आहेत. इतक्या दीर्घकालीन सेवेनंतर वृद्धपणीं विश्रांति घेण्याचा आपणास हक्क प्राप्त झाला आहे. ही विश्रांति आपणास उदंड काल सुखानें लाभो असें चिंतून हें मानपत्र अत्यंत विनम्र भावानें आदरपूर्वक आपणास अर्पण करतों.

मिती आषाढ कृ. ८ शके १८५९
पुणें ता. ३१ जुलै, १९३७

जनार्दन सखाराम् करंदीकर
लक्ष्मण बळवंत भोपटकर
गजानन विश्वनाथ केतकर

कोणत्याहि वर्तमानपत्राच्या कारभारांतील किंवा कार्यांतील यशापयश सर्वस्वी त्याच्या सांपत्तिक स्थितीवरून ठरविणें बरोबर होणार नाहीं. तथापि त्याची सांपत्तिक स्थिति ही त्या यशापयशाचें एक गमक मानता येतें. या दृष्टीनें पाहतां केसरी संस्थेच्या या कार्यांत मी यश मिळविलें असें म्हणता येईल. या स्थितीची तुलना करावयाची तर ती १९२० सालचे, म्हणजे मी केसरीचा ट्रस्टी झालो त्या वर्षाचे आंकडे आणि १९३७ सालचे म्हणजे मी केसरीच्या ट्रस्टीचें काम सोडलें त्या वर्षाचे आंकडे देऊन करितां येईल. १९२० सालचा आढावा पाहिल्यास त्या सालची सुरुवातीची शिल्लक सुमारें चाळीस हजार व त्या सालची ऐन जमा १ लक्ष ६९ हजार होती व ऐन खर्च १ लक्ष ३६ हजार होता. पुढील सालांत लो. टिळकांच्या मृत्युपत्रान्वयें अनेक रकमा अवांतर स्वरूपाच्या अशा जमा झाल्या तशाच अनेक रकमा खर्ची पडल्या, म्हणून त्यां सालचे आंकडे पाहतां ऐन जमा १ लक्ष ४५ हजार व ऐन खर्च १ लक्ष ५८ हजार असे होते. हेच आंकडे १९३७ सालचे घेतल्यास त्या सालची ऐन जमा २ लक्ष १० हजार असून ऐन खर्च १ लक्ष ९२ हजार झाला व ऐन नफा १७ हजार उरला. या सतरा वर्षांतील नफ्यांतून संस्थेचा वाढता खर्च वजा जाऊनहि १९३७ साल अखेरीस केसरीची सांपत्तिक स्थिति काय होती हें खाली दिलेल्या खातेवार शिलकांवरून लक्षांत येईल. हे आंकडे असेः—

| | |
|---|---|
| पर्सफंड | ३०००० रुपये |
| केसरी ट्रस्टची शिल्लक | १७०००० ,, |
| घसारा ठेव | ५५५०० ,, |
| प्रॉव्हिडेंट फंड ठेव | ७३००० ,, |
| स्थावर जंगम मिळकत | १८२२०० ,, |
| | ७८०७०० |

यां शिवाय या सतरा वर्षांत केसरीनें सार्वजनिक कार्याकरितां केलेला खर्च व दिलेल्या देणग्या यांची रक्कम कमींत कमी ५०-६० हजार इतकी सहज भरेल.

केसरी–मराठा मिळून एकच संस्था असली तरी तिच्या खऱ्या उत्पन्नाची बाब म्हटली म्हणजे केसरीपत्र हीच होय. 'मराठा' पत्र हें उत्पन्नाचें म्हणजे

'फायद्याचें' कलम आज पन्नास वर्षांत कधीहि नव्हतें. मग वेळोवेळीं संपादक कोणीहि असोत. निरनिराळे लेखक व कालमान यांना अनुसरून मराठ्याच्या वर्गणीच्या उत्पन्नांत वटघट कांही प्रमाणांत होत आली आहे; परंतु एकंदरीनें कोणत्याहि सालीं मराठा पत्राच्या जमाखर्चाचा वाजवी हिशेब केला असतां त्याजवर दरसाल कांही तरी रक्कम उलट केसरीच्या उत्पन्नांतूनच घालावी लागते. मात्र ती घालण्यांत हेतु हाच असतो की, मराठा पत्राची भाषा इंग्रजी असल्यामुळे त्याच्याद्वारें केसरीच्या धोरणाचा व मतांचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर व्हावा; व तसा तो यथाशक्ति गेल्या सत्तावन वर्षांत होत आलेला आहे. म्हणन संस्थेच्या जमाखर्चांतून, निदान जमेच्या बाजूला तरी, मराठा वर्तमानपत्र ही बाब वाचकांनी मनानें प्रथमपासूनच वगळून चालावे.

उरला केसरी. त्याच्या उत्पन्नाच्या मुख्य दोन बाबी. किंवहुना अवघ्या दोनच बाबी म्हटलें तरी चालेल. म्हणजे वर्गणीदारांची वर्गणी व जाहिराती वे उत्पत्र. केसरीला कोणी कधी देणगी उचलून देत नाही व केसरी घेतहि नाहीं. केसरी स्वतःच्या छापखान्यांत बाहेरचें छपाईचें कामहि करीत नाही. आपल्या फौडरीतील टाईपहि बाहेर विकीत नाही. मग अर्थात् कोणाची एजन्सी दलाली करीत नाहीच नाही. वर्गणीदार व जाहिरातदार हेच काय ते केसरीच्या उत्पन्नाचे मुख्य आधारस्तंभ. वर्गणीदार पोस्टेज देतात ते परस्पर पोस्टालाच जाते. यामुळे केसरीची वार्षिक 'निव्वळ' म्हणजे तीन रुपये वर्गणीची रक्कम जमा धरून, त्यासमोर वर्गणीदारांस मिळणाऱ्या पूर्वीच्या ५१ व हल्लींच्या १०२ अंकावर होणारा खर्च हिस्सेराशीने मांडला तर असें दिसून येईल की, निव्वळ वर्गणीच्या पैशांतून केसरीला बचत अशी फारच थोडी होते.

हल्लीं वर्षांतून केसरीचे १०२ अंक आम्ही केसरीच्या वर्गणीदारांना देतों. या प्रत्येक अंकाचीं पानें कमींत कमी १२ असतातच. पण प्रायः १६ हि असतात. नेहमींच्या एका अंकाची १२ पाने घेतलीं तरी त्यांच्या नुसत्या कागदाचें वजन ७ तोळे होतें. या मानानें १०२ अंकाच्या कागदाचें वजन ७१४ तोळे म्हणजे १८ पौंड भरतें. आणि दर पौंडास सुमारें २ आणे किंमत धरली तर १८ पौंडाला ३६ आणे म्हणजे २। रुपये तरी पडतात. अशा रीतीनें वर्गणीच्या ३ रुपयांपैकीं २। रुपये आम्ही वर्गणीदाराला कागदाच्याच रूपानें परत देतों. या १०२ अंकाचें फाइल कोणी नीट बांधून ठेवल्यास पुढें कालांतरानें वर्गणीदाराला

व त्याच्या पुढच्या पिढीला राजकारण व वाङ्मय यांच्या दृष्टीनें किती मौल्यवान माहिती ठेवीदाखल लाभेल हें सांगण्याचें कारण नाहीं. परंतु १०२ अंकांची नुसती रद्दी विकली तरी वर्गणीदाराला ८–१२ आणे येण्याला हरकत पडणार नाहीं. असो. वर्गणीदार आपल्या १०२ अंकांचे काय वाटेल तें करो. पण वरील हिशेबानें एवढी गोष्ट निश्चित ठरतें कीं वर्गणीच्या तीन रुपयांतून उरलेल्या १२ आण्यांत केसरी लिहून, छापून तयार होण्याच्या अनेक खात्यांचा सर्व खर्च करावा लागतो. हा हिशेब अशाप्रकारें स्पष्ट करून लिहिण्याचा हेतु इतकाच कीं, केसरी काढतांना उत्पादकांचा जो मूळ हेतु होता व पुढें जो लोकमान्य टिळकांनीं चालविला तो हेतु, म्हणजे केसरी वर्तमानपत्र शक्य तितक्या कमीं किंमतींत वाचकांना मिळावें हा हेतु, ट्रस्टच्या रूपानें केसरीची व्यवस्था आमच्या हातीं आल्यापासून, आम्हींहि अबाधित ठेवला आहे. इतकेंच नव्हें तर यथाशक्ति अधिक सफळहि केला आहे. कारण ता. १ ऑगस्ट १९२९ पर्यंत जेवढ्या म्हणजे ३ रुपये वर्गणींत वाचकांना आम्ही दर आठवड्यास फार तर १६ पानें मजकूर देत होतों तेथें सदर तारखेपासून आम्हीं दर आठवड्यास कमींत कमी २४ पानें इतका, व मधून मधून जास्तीहि पानें मजकूर वाचकांस देऊं लागलों आहों. १८८१ सालीं केसरीची वर्गणी १ रुपया होती व आज ३ रुपये आहे ही गोष्ट खरी असली तरी वाचकांना एकंदरीनें तेव्हांपेक्षां. तिपटीहून पुष्कळच अधिक मोबदला, व तोहि आठवड्यांतून एका ऐवजीं दोन हप्त्यांनीं म्हणजे सात दिवसाऐवजी ३–३॥ दिवसाच्या अंतराने, देत आहों. वाचकांना केसरी स्वस्त करण्याचा दुसराहि एक प्रकार संभवेल. तो असा कीं, 'केसरी साप्ताहिकच ठेवावा, पण केसरीची वर्गणी १॥ रुपया करावी, म्हणजे मूळचें ध्येय अधिक गाठल्यासारखें होईल!' पण ही विचारसरणी विपरीत असून, ती आम्हालाच काय पण शेंकडा ९९ वाचकांनाहि आतां पटणार नाहीं. वर्तमानपत्रांच्या प्रगतीचें सामान्य धोरण लक्षांत घेतलें असतां आठवड्यांतून दोन वेळां मिळणारा केसरी एक वेळ मिळाला तरी चालेल असें तर कोणी म्हणतच नाहीं. पण केसरी दैनिक करावा अशा सूचनाच आमच्याकडे पुष्कळ येतात. परंतु केसरी दैनिक केल्यास वाचकाला वार्षिक खर्च कमींत कमी किती येईल त्याचा हिशेब करतां, हा खर्च खेडेगांवांतील गरीब लोकांना झेपणार नाहीं. म्हणून केसरी दैनिक करण्याची कल्पना आम्ही अजून स्वीकारली नाहीं. याविषयीं केसरी अर्धसाप्ताहिक करतांना आम्ही जें म्हटलें होतें तेंच

म्हणणें आमचें आजहि कायम आहे. केसरी दैनिक करावयाचा झाल्यास त्याला लागणारीं सर्व साधनें ट्रस्टींच्या जवळ आहेत. एकहि कमी नाहीं. तथापि वरील विचारसरणीमुळेंच त्यानीं अद्यापि ती मजल मारलेली नाहीं.

केसरीच्या मुख्य उत्पन्नाचा भाग जाहिरातींचा असतो. आतां जाहिरातींना लागणारा कागद, छपाई, टपाल या नात्यानें होणारा खर्च जाहिरातीच्या उत्पन्नाच्या मानानें थोडा कमी असतो हें खरें. तथापि वर्गणीदारांप्रमाणें जाहिरातदारांनाहि मोबदला भरपूर मिळतोच. मात्र तो वेगळ्या स्वरूपानें मिळतो इतकेंच. वर्गणीदारांना मोबदला मिळतो तो बातमी व इतर वाचनीय मजकूर हा होय. आणि जाहिरातदारांना जो मोबदला मिळतो तो व्यापारी मालाची प्रसिद्धि हा होय. केसरीचा कोणताहि अंक सुमारें एक लक्ष वाचक तरी वाचतात असें मानण्यास हरकत नाहीं.

एक विशेष गोष्ट सांगावयाची ती ही कीं, वरील हिशोबांत केसरीची वर्गणी व जाहिरातीचें उत्पन्न या शिवाय बाहेरून अवांतर म्हणजे देणगी, मदत बक्षीस अशा कोणत्याहि स्वरूपाची एक पैहि केसरीकडे आज सत्तावन वर्षांत कोणाकडूनहि आलेली नाहीं.

केसरीच्या गुणदोषांची चर्चा अर्थातच तिऱ्हाइताकडून होणें योग्य. तथापि एक गोष्ट अशी आहे की, तिची माहिती बाहेरच्या लोकांना फारशी असण्याचा संभव नसतो. आणि तिच्याविषयी काढलेल्या यथार्थ उद्‌गारांत जर आत्मस्तुति किंवा प्रौढी यांची थोडीशी झाक उमटली तर ती क्षम्य मानतां येईल. ही गोष्ट म्हटली म्हणजे केसरी-मराठा संस्थेचा निर्लोभीपणा.

सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनीं आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकांत टिळक व केसरी यांच्यासंबंधानें पुष्कळ खोटीं विधानें केलीं आहेत. पण त्यांतल्यात्यांत खोटेपणांत व खोडसाळपणांत पहिला नंबर पटकावणारे जर एखादें विधान असेल तर तें लोकांकडून धाक दाखवून पैसे व वर्गण्या काढण्यासंबंधाचें होय. चिरोलसाहेबांना आपल्या देशांतील पुष्कळ वर्तमानपत्रांचा व हिंदुस्थानांतील कांहीं वर्तमानपत्रांचा अनुभव असेल. त्यावरून त्यांनी हें विधान अनुमान-धपक्यानें केलें असलें पाहिजे हें उघड आहे. पण केसरी-मराठा संस्थेचा निकट परिचय असणारा कोणताहि मनुष्य वरील आरोप खोटा असल्याचें कबूल करीलच करील.

हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रें सामान्यतः द्रव्यवश नसतात ही गोष्ट प्रसिद्ध व मान्य आहे. तथापि विलायतेप्रमाणें इकडेहि थोडथोडे अनुभव येतात, नाहीं असे नाहीं. कित्येक वर्तमानपत्रकार प्रत्यक्ष पैसा घेत नसतील. परंतु त्या पत्राच्या प्रती पुष्कळशा विनाकारण विकत घेणें व आपल्या कचेऱ्यांतून लोकांना फुकट वाचावयास देणें, त्यांच्याशीं संलग्न असलेल्या छापखान्याचीं बेसुमार बिलें भरून आपले रिपोर्ट वगैरे छापवून घेणें, व रिपोर्टाचें समालोचन वगैरे लिहविण्याकरितां दरबारखर्च करणें अशा निरनिराळ्या प्रकारांनीं कांहीं दरबारांतून कांहीं अँग्लो-इंडियन पत्रांना मदत होत असते असें लोक बोलतात. व तें खरेंहि असेल.

लो. टिळकांकरितां १८८२, १८९७, १९०८, १९१६ व १९१९ या सालीं जे कांहीं फंड उभारण्यांत आले त्यांची मूळ कल्पना, त्यांचा हेतु, त्यांच्या एकूण रकमा, त्यांचा विनियोग व त्यांची हल्लीची स्थिति व हिशेब या सर्व गोष्टी महाराष्ट्रांत लोकांना विदितच आहेत. पण येथें मुद्याची म्हणून सांगण्याची गोष्ट ही कीं यापैकीं कोणत्याहि फंडाचा उपयोग लो. टिळकांनीं व्यक्तिशः खासगी रीतीनें किंवा केसरीकडेहि केला नाहीं.

संस्थानासंबंधानें केसरी-मराठा पत्रांचें धोरण संस्थानिकांना अनुकूल म्हणजे होईल तितकें त्यांच्या हक्कांचें समर्थन करणारें व त्याकरितां सरकारवर टीका करणारे असेंच नेहमीं होतें. परंतु या दरबारांपासून या पत्रांनीं कधीं एका पैचाहि अभिलाष केला नाहीं. एवढेंच नव्हे तर हस्ते किंवा परहस्तें एक पैचाहि फायदा या दरबारांकडून केसरी-मराठा पत्रांना झालेला नाहीं. जेथें महाराष्ट्रांतील हरदास, कथेकरी, पुराणिक, ग्रंथप्रकाशक इत्यादिकांना या दरबारांतून हजारों रुपये आपापल्या कामाकरितां मिळवितां आले, तेथें केसरी-मराठा पत्रांच्या चालकांनीं आपल्या संस्थेला कांहीं मदत मिळविण्याची इच्छा धरली असती तर ती निष्फळ झाली असती असें नाहीं. परंतु या संस्थेच्या कोणत्याहि चालकांची आजपर्यंत तशी दृष्टि केव्हांहि नव्हती. केसरी-मराठ्यांच्या चालकांप्रमाणेंच या संस्थानिकांचाहि गुण घेतला पाहिजे. कारण सुदैवानें या संस्थानांच्या अधिपतींनींहि या चालकांना द्रव्याचें आमिष दाखवून आपलें काम करून घेण्याची बुद्धि कधीं ठेवली नाहीं, हा त्यांचाहि थोरपणाच होय !

केसरीवरील आपत्तीसंबंधानेंहि तीच गोष्ट. उदाहरणार्थ, १९०८ सालीं मराठ्यावर आणि १९२४ सालीं केसरीवर न्यायकोर्टाच्या बेअदबीचे खटले

होऊन दोन्हीस मिळून आठ-दहा हजार रुपये खर्च आला, केसरीला जामिनक्या भराव्या लागल्या, केसरी कचेरीतील कागदाला आग लागली, अशा प्रसंगी केसरीला लोकांनीं देणग्या देऊं केल्या असतांहि केसरीने त्या घेतल्या नाहींत. उलट कोणत्याहि सार्वजनिक आपत्तींच्या वेळी ज्या वर्गण्या झाल्या त्यांत केसरीनें आपला योग्य तो भाग उचलला आहे.

तात्पर्य केसरीनें सर्वस्वी निर्लोभीपणा राखून 'जोडुनिया धन उत्तम व्यवहारें। उदार विचारें वेंच करी' ही तुकारामाची उक्ति खरी करून दाखविली आहे. अशा प्रकारचा हा केसरीचा उत्कर्ष त्याच्या शत्रूंना पाहवूं नये हें स्वाभाविकच आहे. विशेषतः टिळक निवर्तल्यापासून त्यांची एकच अपेक्षा होती. ती ही कीं, आतां तरी केसरी बुडावा. टिळकांच्या हयातीत केळकर दहा वर्षे केसरीचे संपादक होते, तथापि त्याला तेव्हां टिळकांचाच आधार होता म्हणून तो चालला व उत्कर्ष पावला हे सरळच आहे. ते निवर्तल्यावरहि कांहीं दिवस लोकांनी केवळ टिळकांच्या स्मरणार्थ आपला उदार आश्रय चालूं ठेवला असेहि कोणास म्हणतां येण्यासारखे होते. कारण आकाशांतून तारका मूळ स्थानापासून भ्रष्ट व नष्ट झाल्या तरी त्यांचा पृथ्वीवरील प्रकाश कांहीं काळ टिकतोच. पण पुढें असहकारितेच्या धकाधकीचा मामला सुरू झाला तेव्हां टिळकांचा आधार तुटलेल्या केसरीच्या शत्रूंना सोन्याचीच संधि प्राप्त झाली असें वाटलें, व स्वतः त्यांनीहि त्याचा पाडाव करण्याला शक्य तितका हातभार लाविला. कोणी राजकारणांत केसरी मवाळ बनला असें म्हणून, कोणी त्याला म. गांधीचें शत्रुपद देऊन, कोणी तो खादीचा विरोधी असें म्हणून, कोणी प्रांतवार किंवा भाषावर विरोधी अभिमान जागृत करून, कोणी तो ब्राह्मणपक्षाचा असें ठरवून, तर कोणी उलटपक्षी तो सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करतो म्हणून—तात्पर्य, ज्याला जें कारण सुचलें तें त्यानें पुढें करून केसरीचा पाडाव करण्याचा प्रयत्न शिकस्तीनें केला. पण या खुळ्यांना हें कळेना कीं, एक अकालीं मेला तरी त्याचें उरलें आयुष्य दुसऱ्याला मिळत नाहीं! मग केसरी जाग्यावर जिवंत आहे तोंपर्यंत त्याचें आयुष्य इतर कोणाच्या भरतींत कसें पडणार! ज्याला त्याला आपल्या स्वतःच्या गुणाप्रमाणेंच या जगांत स्थान मिळतें. यामुळें केसरीची निंदा करकरून शिणून भागून ही मंडळी आतां हताश होऊन बसली आहेत!

केसरीचा खप कमी झाला, वर्गणीदार कमी झाले, अशा विविध–वार्ता कोणी व्यवसायबंधु उठवितो. केसरी अर्धसाप्ताहिक झाला तेव्हां तो मरणार, कारण दिवा मालवतांना मोठा होतो, असें अशुभ भविष्य वर्तवून कित्येक काशीकर पंडितांनी (म. रा. बोडस) आपल्या द्वेषाच्या लहरींचा उपशम केला. कोणी 'केसरी' या नांवानें सहज सुचणाऱ्या ब्रिचाऱ्या शब्दावर 'ग्राम्य' कोट्या करून स्वतःलाच लोकांकडून ग्राम्य ठरवून घेतले. स्वतःच्या शीलाला व संस्कृतीला शोभण्यासारखी कुरूप व वेडय चित्रें काढून कित्येक कुडबुड्या जोशांनी राजकारणांत नसती लुडबुड केली. पण त्यांच्या इच्छेप्रमाणें टिळकांच्या मृत्यूनंतर केसरी हा एक दोन वर्षांत मृत्युपंथाला लागावयाचा तो न लागतां, अर्जुन जिवंत आहे, नव्हे आपल्यापरी उत्कर्ष पावत आहे, शत्रूंच्या कबरेत लाथा घालीत आहे, व इतक्यानेंच न थांबतां अर्धसाप्ताहिक बनून साठाव्या वर्षांत पुढें पाऊल टाकीत आहे. याचे कारण, केसरीच्या शत्रूंचा द्वेष व मित्रांची सहानुभूति याच नुसत्या दोन शक्ती घेतल्या तरी, त्यांत ही दुसरी शक्तीच अधिक प्रभावी ठरली. मात्र या सर्वांना फिरून टिळकांच्या पुण्याईचा पाठिंबा मागें आधार देतच आहे हे होय.

असो; केसरीच्या या सुस्थितीला अनुरूप अशी इतर रीतीनेंहि मी व्यवस्था केली आहे. केसरीच्या कारखान्याला लागणाऱ्या अवश्य अशा सोईच्या इमारती बांधल्या, यंत्रें खरेदी केली, अतिथिगृह सजविले, नोकरांचे पगार व पगारवाढ ठरवून दिली, त्यांच्या प्रॉव्हिडंट फंडाची योजना केली, रजेचे व नोकरीचे नियम केले. थोडक्यांत सांगावयाचे तर केसरी कचेरीकडील नोकरी सामान्यतः सुखाची व्हावी, त्रासाची जिकीरीची होऊं नये अशी सर्व योजना मी केली आहे, व केसरीचा नोकरवर्ग ट्रस्टींवर संतुष्ट आहे असा माझा विश्वास आहे.

पुण्यांतील व पुण्याबाहेरील ज्या अनेक संस्थांचा राजीनामा मी दिला त्यापैकीं बहुतेकांनीं तो नामंजूर केला! कांहींनीं मंजूर केला केवळ तो माझ्या आग्रहानें व त्यांचा निरुपाय झाल्यामुळें. उलट कांहींनीं माझी पूर्वीच्याच जागीं व कांहींनीं तर बढतीच्या जागीं माझी निवडणूक करून, माझ्या राजीनाम्याचें वैयर्थ्य मला पटविलें. तथापि मी स्वतःची सोडवणूक अशा रीतीनें करून घेतली आहे कीं जरी कोणत्याहि एखाद्या संस्थेनें माझा राजीनामा मंजूर केला नाहीं, तरी यापुढें त्या संस्थेचें काम करण्याला मी स्वतःला पूर्वीप्रमाणें बांधला गेलों असें मी,

समजणार नाहीं व त्यांनींहि समजूं नये. आणि जर माझ्या हातून त्यांच्या कामीं हयगय झाली तर त्यांनीं मजवर कर्तव्यपराङ्मुखतेचा दोषारोप करूं नये. या अटीवर मी राजीनामा पटविण्याचा सत्याग्रह कांहीं कांहीं ठिकाणीं केला नाहीं. मात्र जेथें माझें मनच विटलें होतें तेथें मी राजीनामा परत घेतला नाहीं.

असो. पुण्यांतील 'महाराष्ट्र व्यायाम मंडळा'च्या उपाध्यक्षाच्या जागेचा मी राजीनामा दिला तेव्हां मंडळानें माझा थाटानें सत्कार केला. त्या प्रसंगीं मी जें उत्तरादाखल व आभारप्रदर्शक भाषण केलें त्यांत माझी खरी मनोवृत्ति प्रकट झाली होती म्हणून त्याचा सारांश येथें देतों. त्यावरून सार्वजनिक कार्य करण्यातलें माझें धोरण, आणि सार्वजनिक स्तुतीनिंदेसंबंधानें माझे विचार कळून येतील. ते भाषण असें :—

"आजचा हा समारंभ अशा पद्धतीनें होईल अशी मला मुळींच कल्पना नव्हती. उपाध्यक्षाच्या जागेचा राजीनामा तो काय आणि तो मंजूर करण्याकरितां एवढा सत्कार ! ही गोष्ट अपेक्षेपलीकडेच नव्हे तर प्रमाणाबाहेरहि झाली ! पण सूक्ष्म विचार करतां अशी शंका येते कीं, माझ्या भिडस्त स्वभावाचा हा प्रेमळ मूड घेतला जात आहे. किंवा निदान व्यायाम मंडळ संस्थेच्या जाहिरातीची ही कुशल कारवाई तरी असावी. माझ्या गळ्यांत येथें इतके हार घातले त्यापेक्षां बुधवारांतील फुलवाल्याच्या एका दुकानावर आजच्या दिवस माझ्या नांवाची पाटी लावली असती तर ! पण तसें केल्यानें व्यायाम मंडळ संस्थेच्या निरनिराळ्या दहावीस शाखांची जाहिरात कशी झाली असती ! पण असो. माझ्या सत्काराच्या निमित्तानें या संस्थेची जाहिरात किंवा प्रसिद्धी झाली तरी ती मला इष्टच आहे. कारण उपाध्यक्ष म्हणून मी तिचा संबंध सोडला तरी तिजविषयींचा माझ्या मनांतला ऋणानुबंध केव्हांहि कमी होणार नाहीं. कारण या संस्थेचे व माझे संबंध कसे आहेत हे श्री. दाम्ले यांनीं आपणास सविस्तर सांगितलेंच आहे.

"अशा समारंभांत बिघडतें तें इतकेंच कीं, लोक आपली स्तुति खऱ्या प्रेमभावानें करीत असले तरी ती समक्ष ऐकून घेणें ही फार नाजूक व अवघड गोष्ट होऊन बसते. जगांत मृत मनुष्य हाच एक असा कां असावा कीं आपली स्तुति आपल्याच कानांनीं ऐकून घेण्याचें संकट त्यावर न पडावें ! आतां मी या स्तुतीनें फुगून जाणार नाहीं हें वेगळें. कारण उद्यां कांहीं वर्तमानपत्रांतून

नेहमींची माझी निंदा वाचावी लागेल. ती वाचतांना मी आजची स्तुति ही त्या निंदेचें भंजक म्हणून समजेन. मला निंदेचे अपशब्द ऐकण्यावाचण्याची इतकी संवय नेहमींची होऊन गेली आहे कीं, प्रसंगविशेषीं आजच्या सारखे होणारें माझें गुणवर्णन आणि ती निंदा यांचा, मला जें थोडेसें गणित येतें त्यानें, मी अंशछेद पद्धतीनें संक्षेप घालतों. त्या गणितांतून जी थोडीशी निंदा किंवा स्तुति शिल्लक उरते ती मग सुसह्य होते. 'आपली स्तुति कोणी केलेली आवडत नाहीं' असें मी म्हणेन तर मी मनुष्य नाहीं असें कबूल करावें लागेल. पण मनुष्यत्वामध्येंच सारासार विचार व तारतम्य यांचाहि समावेश होतो. आणि माझ्या गुणाबरोबर माझ्या दोषांचें विज्ञान मला लोकांपेक्षांहि अधिक आहे असें मात्र मी आपणाला खात्रीने सांगतो. वेदांत शास्त्र किंवा तत्त्वज्ञान यांत सांगितलेले आत्मज्ञान मला नाहीं; पण स्वतः अंतर्मुख होऊन आपली खरी योग्यता आपण ओळखणें, किंवा आपले माप आपणच बरोबर घेणें, ही गोष्ट मात्र मी चांगली करूं शकतो. याचे प्रत्यंतरहि मी आतांच आपणाला आणून देतों. कसे तें पहा.

"प्रि. महाजनी यांनी टिळक हे महापुरुष पण असहिष्णु होते आणि मी सहिष्णु आहे, म्हणन तरुण पिढीनें माझा आदर्श डोळ्यापुढें ठेवण्याची शिफारस केली. पण सहिष्णुता, सात्विक वृत्ति, हा गुण दिसला तरी त्या वृत्तींत महत्कार्याला उपयोगी असा जो आवेश तो नसतो. हा गुणसंलग्न असा दोषच होय. म्हणून मी तरुण पिढीला उलट असेच सांगेन की, सहिष्णु आणि निवृत्त केळकर किंवा मरेपर्यंत कार्याची धुरा वाहणारे दि. ब. गोडबोले यांच्यापेक्षां, असहिष्णु परंतु पराक्रमी आणि उज्ज्वल त्यागी अशा लो. टिळकांचेंच उदाहरण आदर्शभूत म्हणून त्यांनी डोळ्यापुढें ठेवावें व गिरवावें. एका वक्त्यांनी माझ्या स्वार्थत्यागाची वाखाणणी केली. पण त्याचाहि खुलासा मला करणें आहे. ते म्हणाले त्याप्रमाणें मी साताऱ्यास वकिली करीत राहिलों असतों तर कोणी सांगावें काय खरोखर घडलें असतें तें ? कदाचित मी, क्रमानें कां होईना, पहिल्या पदवीला पोचून हजारो रुपये मिळवून बसलों असतों; किंवा वकिलीच्या धंद्यांत अयशस्वी होऊन दरिद्री राहिलों असतों. कारण बुद्धि असून वकिलीचा धंदा न चाललेले तेव्हांहि कांही वकील होते व आजहि सर्वत्र आहेत ! लो. टिळक, ना. गोखले, प्रो. कर्वे, रँ. परांजपे, रँ. महाजनी यांच्या सारख्या म्हणजे माझ्याहून बुद्धिमान माणसांनी केला तो स्वार्थत्याग

खरा. त्यागी माणसांची इतरांहि कांहीं ठळक उदाहरणें माझ्या डोळ्यापुढें अशी आहेत कीं, त्यांची चरणधूली उचलून आपल्या मस्तकावर ठेवावी ! माझ्या बरोबरीच्या आणि योग्यतेच्या कांहीं संपादकांना इतर प्रांतांत माझ्यापेक्षां दुप्पट-तिप्पट पगार आहे हें खरे. तसेच मी नोकरीचीं पहिलीं वीस-बावीस वर्षे केवळ शंभर रुपये पगारावर काढली हेंहि खरें. पण देवदयेनें केसरी-संस्थेंत मला कांहीं कमी पडलें नाहीं. माझा चरितार्थ ठीक चालला. मी नोकरी सोडतांना मला पगार होता तितका महाराष्ट्रांत किती संपादकांना किंवा प्रोफेसरांना आहे ? तात्पर्य, माझ्या स्वार्थत्यागाचें गुणवर्णन मी मुकाट्यानें स्वीकारूं शकत नाहीं. शिवाय निर्वाहाचा धंदा आणि आवडीचा व्यासंग यांची सतत जोड राहिल्यानें मला जन्मभर समाधान व आनंद हीं लाभलीं.

"मी अनेक संस्थाशी संबंध जोडला व आतां तो सोडला यासंबंधानें माझें गुणवर्णन करून खेद प्रगट करण्यांत आला. यांत मला सांगावयाचें हेंच कीं, सार्वजनिक काम शक्य तितकें करावें आणि उपयोगी पडावें याची मला प्रथम पासून हौस होती. आजहि एखादी संस्था अशी असेल कीं, तीत स्वार्थी चालकांनी आपल्या कामापुरता माझ्या नांवाचा फायदा करून घ्यावा, पण पडद्याआड माझी निंदा नालस्ती करून माझ्याविरुद्ध वागावें किंवा हे गेले तरी बरें असें जाणवावें. आणि हे जाणूनच मी ती सोडली असेन. पण एकंदरीनें ज्या संस्था मी सोडल्या त्यांना मी हवा होतों आणि मला तेथें काम करण्यांत प्रेम वाटे. मी कोणत्याहि संस्थेंत देवासारखा जाऊन बसतो असें वर्णन कांहीं विनोदी मित्र करतात, आणि म्हणतात 'केळकर, तुमच्यामध्यें पराक्रम नाहीं हो ! संस्थेंत जावें, भांडणें लावावीं, आणि संस्था मोडून बाहेर पडावें !' हा पराक्रम मजमध्यें नाहीं हें मी कबूल करतों.

"एका-दोघां वक्त्यांनीं माझ्याकडून झालेल्या केसरी मराठा संस्थेच्या सेवेचें वर्णन केलें. तें मात्र मी आनंदानें मान्य करितों. कारण त्या सेवेचा मला अभिमान वाटतो. एका प्रतिपक्षाने (रा. न. वि. गाडगीळ) एकदां असें म्हटलें कीं "टिळकांचें राजकारण महाराष्ट्राबाहेर गेलें आणि टिळकांचा पैसा केळकरांच्या हातीं आला." त्यालाहि प्रांजलपणाचें उत्तर येथेंच देतों. टिळकांच्या मृत्यूनंतर केसरी संस्था मजकडे आली तेव्हां जी रोकड प्रत्यक्ष हातीं आली, त्यापेक्षां टिळकांनीं मृत्युपत्रानें उत्पन्न केलेल्या आमच्या वरच्या आर्थिक जबाबदाऱ्याच अधिक होत्या. मजकडे आली ती

रोकड त्या मानानें मोठी नसून पैसा निर्माण करण्याची केसरीपत्र ही 'शक्ति' आली हें मात्र खरें. पण त्या शक्तीचा पहिला उपयोग मी टिळकांना सार्वजनिक कर्जातून मुक्त करण्याकरितां तीन लाख रुपयांचा 'पर्स फंड' निर्माण करून केला आणि सार्वजनिक कार्याची खर्चाची कायमची कांहीं सोय करून ठेवली. चिरोल केस हरल्यामुळें केसरी व गायकवाडवाडा लिलावाला निघण्याची वेळ होती. त्यावेळीं जनतेनें टिळकांना तीन लक्ष रुपये देऊन निर्भय केलें. तें कर्ज मी त्यांच्या मरणानंतर दहा वर्षांत फेडले याचा अभिमान मला कां वाटूं नये ? माझ्याकरितां फंडगुंड ही शिवी निर्माण करणारांनी स्वतःच लोकांना किती बुडविले याचा इतिहास पुष्कळांना माहीतच आहे. उलट मी सार्वजनिक अशा एका पैशाचाहि अपहार केला नाहीं हें जाहीर रीतीने सांगतों; व ज्या कोणास हें खोडून काढावयाचें असेल त्याला पुढें येण्याविषयी आव्हान देतों ! केसरी संस्थेसंबंधानेहि हे सांगतों कीं, तिच्या सर्व इतिहासांत पत्राची वर्गणी व जाहिरातींचें उत्पन्न याहून वेगळी एक पैहि तिला लाभलेली नाहीं.

"शेवटीं एक गोष्ट सांगावयाची. एका-दोघां वक्त्यांनीं मजवरील एका आक्षेपाचा परिहार स्नेहभावानें परस्पर केला. तो हा कीं, मी टिळकांचे जागीं आलों तथापि प्रतिटिळक झालों नाहीं. परंतु मला वाटतें या आक्षेपाचें निरसन मी तरी करण्याच्या भानगडींत पडणार नाहीं. कारण मजमध्यें जर टिळकांचे गुण नाहींत तर मी टिळक कसा होऊं शकेन ? तथापि प्रांजलपणानेंच खरें वाटतें तें बोलण्याचा प्रसंग आला म्हणून मी म्हणेन कीं मी प्रतिटिळक झालों नसेन, पण टिळकांच्या आणि माझ्यामध्यें महाराष्ट्रांत तरी दुसरा कोण येऊं शकला ? माझ्याहून अधिक लायक मनुष्य मिळता तर टिळकांनीं त्यालाच नसता कां माझ्या जागीं नेमला ? माझ्याखातर केसरीचें त्यांनीं नुकसान कां केलें असतें ? मला हेच म्हणावयाचें कीं, टिळक हे आकाशांत भरारी मारणारे गरुड होते. माझा पराक्रम फार तर एखाद्या चिमणीप्रमाणें झाडावर जाऊन बसण्याचा असेल. पण मी ज्या झाडावर बसलों तें झाड, टिळकांच्या मागें महाराष्ट्रांतले इतर पक्षी ज्या झाडावर जाऊन बसूं शकले त्यापेक्षां अधिक उंच आहे खास. मला माझ्या योग्यतेपेक्षां अधिक मान सन्मान मिळाले असें कोणी म्हटलें तर मी तें नाकबूल करणार नाहीं. मिळाले ते मला पुरे आहेत. पण या संबंधानेंहि एक गोष्ट सांगावीशी वाटतें. ती ही कीं, मला मिळालेल्या कोणत्याहि मानासंबंधाने मी स्वतः कधींच उचल किंवा खटपट केली नाहीं. ती सर्व प्रथम इतरांच्या इच्छेचीच कृपा असे. तसेंच एखादा मान मिळण्याकरितां

दुसऱ्या कोणाला मागें दडपून दाबून ठेवणें आणि त्याच्या संधीचा अपहार करणें ही गोष्टहि मी कधीं केली नाही.

"निंदेला उत्तर देतांना आत्मसमर्थन केलें तर आत्मप्रौढी होत नाहीं. टिळकांचा मी औरस वारस नाहीं, पण चौरस वारस खचित होतों. कारण, ( १ ) त्यांनीं मृत्युपत्रांत मलाच मुख्य आर्बिट्रेटर म्हणजे पंच नेमले ( २ ) त्यांच्या हयातींत त्यांनींच मला केसरीचा संपादक कायम करून ठेवला ( ३ ) त्यांच्या मुलांनीं माझीच नेमणूक ट्रस्टी म्हणून केली ( ४ ) मी बिकट प्रसंगी केसरी जगविला आणि वाढविलाहि ( ५ ) मीच टिळकांना मरणोत्तर निष्कर्जी केलें ( ६ ) आणि त्यांच्या राजकीय तत्त्वाची परंपरा मीच चालविली. मी अजातशत्रु आहे असें एका वक्त्यानें वर्णन केलें ते मात्र तितकेसें खरें नाहीं. मला शत्रु पुष्कळ झाले. पण एका ज्योतिषानें माझी पत्रिका पाहून पूर्वी मला असें लिहून दिलेलें मजजवळ आहे कीं, 'तुम्हाला प्रत्येक वेळीं एकेक नवा शत्रु उत्पन्न होईल. पण शेवटीं तुमचाच जय व्हावा असा तुमचा ग्रहयोग दिसतो.' हें भविष्य खरें आहे असें आजहि मला वाटूं लागलें आहे.

"आज झालेलीं भाषणें औपचारिक किंवा जुलमाचीं नव्हतीं. सर्व प्रांजलपणाचीं होतीं म्हणून मीहि अगदीं मोकळ्या मनानें बोललों."

असो; आतां माझ्या कार्यनिवृत्तीला अनुलक्षून मला आलेलीं कांहीं पत्रें देतोः—

"लोकमान्यांच्या पाठीमागें आपल्या योग्यतेचा पुरुष महाराष्ट्रांत नाहीं. वर्तमानपत्रकार, लेखक, राजकारणी पुरुष इत्यादि नात्यांनीं आपण जी अनेकविध सेवा केली तिचें मूल्य ठरविणें आज तरी अशक्य आहे. आपण परिणतप्रज्ञ व सर्वानुभवी आहां. आतां लेखन व्यवसाय आपल्या मनाप्रमाणें स्वतंत्रतेनें व निस्पृहपणें आपल्याला करतां येईल. या दृष्टीनें दोन कृति हातीं घेण्याविषयीं विनंति करतों. ( १ ) टिळकांच्या निधनानंतरचें भारतवर्षाचें स्थित्यंतर व पुढील दहावीस वर्षांत होणारें भवितव्य. ( २ ) दुसरी कृति H. G. Wells वगैरे लोक आत्मवृत्त लिहितात तशी आपल्या चरित्राची जर आपल्याला करतां आली तर तें मार्गदर्शक होईल. आत्मचरित्राचें तटस्थ वृत्तीनें निरीक्षण करणारा, महाराष्ट्रीय प्रसिद्ध पुरुषांत, आपणांइतका क्वचितच कोणी मला दिसतो." ( पी. व्ही. काणे, एम्. ए., एल्एल्. एम्., ॲडव्होकेट, मुंबई, आंग्रेवाडी. )

( ता. १।४।३७ ) आजच्या आत्मनिवेदनांतील मजकूर पाहून फार वाईट वाटलें. मला सकाळपर्यंत त्या गोष्टीची वार्ता नसल्यामुळें मनाची तयारीहि नव्हती. त्यामुळें अधिक ताण बसला. मी १९१५ च्या जूनमध्यें पुण्यास आलों. गेलीं बावीस वर्षें, कमी जास्त प्रमाणांत पण अत्यंत निकटचा संबंध आला. या अवधींत आपण केलेल्या अनेक उपकाराबद्दल मी ऋणी राहीन. प्रथम जास्त आपल्याच हाताखालीं काम केलें. त्याची स्मृति आहे व राहील. ( दा. वि. गोखले, पुणें. )

( ता. २।४।१९३७ )—केसरीमध्यें "आत्मनिवेदनाचे दोन शब्द" म्हणून आपण जो लेख लिहिलात तो वाचून मला आपल्याबद्दल—आपल्या कर्तृत्वाबद्दल—निरलसपणाबद्दल कौतुक वाटून गर्हिवर आला. तात्यासाहेब, आपला हिंदुस्थान जर स्वतंत्र असतां तर आपला गुणगौरव फार थोर पुरुष म्हणून करण्यांत आला असतां यांत शंका नाहीं. ( न. का. बापट, पुणें. )

( ता. ३।४।३७ ) आपल्या सेवा निवृत्तीमुळें आपला संबंध असलेल्या संस्थांना एक मोठा आधार कमी झाल्याचें तर वाटेलच, पण महाराष्ट्ररूपी महत्तर संस्थेस आपलें सहाय्य दुर्लभ झाल्यामुळे त्याची उणीव जाणवल्यावांचून रहाणार नाहीं. सार्वजनिक कार्य करतांना लोकांच्या लोभाप्रमाणें रागाचेंहि वांटेकरी व्हावें लागतें, हें आपलें म्हणणें खरें आहे. तरी पण वैचारिक मतभेदासाठीं आपलें कर्तृत्व कोणासहि दृष्टिआड करितां येण्यासारखें नाहीं. ( ल. का. किर्लोस्कर, किर्लोस्करवाडी. )

( ता. ४।४।३७ )—व्यक्तिशः राजकारणांत मतभेद असून, आणि प्रसंग विषेशीं ते सभ्य पण तीव्र भाषेंत दर्शविले गेले असतांनासुद्धां, आपल्या मनांत माझ्याबद्दल जें प्रेम व आपलेपणा आहे व जो आपण अनेक वेळां दाखविला आहे त्याबद्दल मी आपला आभारी आहे. याप्रसगीं मी एवढेंच सुचवूं इच्छितों कीं, मतभेदाच्या मामुली प्रसंगाव्यतिरिक्त जें जें आहे त्यासंबंधीं आपल्याबद्दलचा माझा आदर कांहींहि कमी झालेला नाहीं, व होणें शक्य नाहीं. आपल्या ह्या सर्व दृष्टींनीं योग्य वानप्रस्थाश्रमांत आपणांस पूर्ण आरोग्य व आनंद लाभो अशी मी आशा प्रदर्शित करिता. ( न. वि. गाडगीळ, दिल्ली. )

( ता. ५।४।३७ ) प्रथमपासून आज कैक वर्षें आपणावरील हक्क व पाठिंबा हा मजला व्यक्तिशः जितक्या प्रमाणांत विश्वासपूर्वक लाभला तितक्या प्रमाणांत

कोणाहि पुढाऱ्याचा लाभला नाहीं. त्यामुळें पदाधिकारित्वाचा आपण त्याग करण्याचा निश्चय केला तरी तोहि मला एक मोठा आधार तुटल्याप्रमाणें होणार आहे. पण आपण विश्रांतीच घेतां व ती आपणांस मिळावी हेंहि एका दृष्टीनें योग्य वाटतें. ( द. वा. पोतदार. पुणें. )

( ता. ६।४।३७ ) आपली सर्व–विषयव्यापिनी बुद्धि व हृदय हलवून सोडणारी लेखणी या जोडीनें जें कार्य केलें त्याचें यथार्थ मापन करण्याची अजून वेळ आली नाहीं. परंतु वादविवादाच्या झंझावातानें उठलेले धुळीचे लोट दूर निघून जातील व वातावरण निवळेल, तेव्हां आपल्या कर्तृत्वाची व बुद्धिमत्तेची छाप केवढ्या मोठ्या प्रमाणांत सर्व महाराष्ट्रीय चळवळीवर व विचारसरणीवर उमटलेली आहे हें पहावयास मिळेल. आपल्या व्यासंगी व लेखनाभिलाषी बुद्धीला या विश्रांतीच्या काळांत देखील खरोखर वाचनलेखनाचा नाद सोडून देऊन केवळ आराम करीत बसणें शक्य होईल कीं नाहीं, याची जबरदस्त शंका वाटते. अनेक तऱ्हेच्या प्रश्नांच्या विचारांत व विशदीकरणांतच तिला आराम वाटेल. तदितर स्थितीचा तिला खावीनें कंटाळा येईल. यामुळें आपली ही विश्रांति महाराष्ट्रीय वाङ्मयांत कांहीं भरीव व बहुमोल भर घातल्याशिवाय रहाणार नाहीं अशीहि एक अपेक्षा आपल्या असंख्य प्रशंसक हृदयांत उत्पन्न झाली आहे. सार्वजनिक कार्यांतील आपल्या सहकार्याचा लाभ इत्युत्तर मिळावयाचा नाहीं हा विचार एक प्रकारचा मानसिक उद्वेग उत्पन्न करतो. ( माधव श्रीहरि अणे, नवी दिल्ली. )

( ता. ६।४।३७ ) आपल्यासारखा थोर अंतःकरणाचा कार्यकर्ता यापुढें कित्येक वर्षें महाराष्ट्रास लाभेल असं वाटत नाहीं. आपली सार्वजनिक कार्यनिवृत्ति जाहीर करितांना आपण आपल्या साहाय्यकांच्या व विरोकांच्याबद्दल जी उदार मनोवृत्ति समभावें व्यक्त केली आहे ती वाचून तर माझें हृदयच भरून आलें. श्री. वालचंद हिराचंद यांच्या निवडणुकीच्या वेळीं ज्ञानप्रकाशांतून तुमच्याविरुद्ध स्वसमर्थनार्थ दोन शब्द लिहून तुमच्या अंतःकरणाला दुखविल्याचें मला पूर्णपणें स्मरतें. कदाचित् ही गोष्ट आपल्या स्मरणांतहि नसेल. पण आपल्या परिचयाच्या वेळेपासून मी ज्यांना अत्यंत मोठें समजतों त्या तुमच्याबद्दल मी दोन शब्द कठोर लिहिले ही गोष्ट माझ्या मनाला सारखी डांचत आहे, व त्या-

बद्दल आपली मनःपूर्वक क्षमा मागितल्यावांचून राहवत नसल्यामुळें या पत्रानें मी ती मागत आहे. ( बाबूलाल नानचंद मोतीवाले, पुणें.)

( 6-4-37 ) Your very presence is a source of inspiration and guidance to many people and institutions, and we earnestly pray to Providence to give you sound health and long and peaceful life. ( दिवेकर बंधु, सॉलिसीटर्स, मुंबई. )

( 7-4-37 )—While I have sometimes differed from you on public questions, I have always entertained a high regard for your honourable and public spirit, your readiness to see the point of view of your opponents, your general fairness of mind, and your high literary qualities. Although you have given up public life, one may expect, I hope, occasional pronouncements from you on public questions from a detached point of view. And in any case I hope that Marathi literature will be largely benefitted by your pen even in your days of rest.

I have often felt that by the cast of your mind you are more akin to the school of Ranade and Gokhale, than of Tilak. And though circumstances determined otherwise, I recognize that you have generally used your position as a moderating influence and acted as a meditator between these opposing schools. The retirement from active life of such an influence is regretted by all though, it must have come some time or other.

Over many years ago, I wrote an article on ' Sanyas in Public Life. ' I am glad you have set a good example for other public men who linger too long on the stage. One may feel that you could have probably stayed on usefully for five years more; but it was a matter for your own decision. Your retirement reminds me that my own, though I have not occupied as prominent a place in public life as yourself, is not far distant and I hope to follow your exam-

ple in very few years. ( र. पु. परांजपे, व्हाइसचान्सलर, लखनौ युनिव्हर्सिटी. )

( 12-4-37 ) I hope your retirement, therefore, is not due to ill-health, but only to your desire to have greater liberty for what you would like to do. You have done a mighty lot for our country during the last forty years, and have led a very strenuous life in various spheres of public activities. ( बॅ. एस्. सच्चिदानंद सिंह, पाटणा. )

( ता. १३।४।३७ ) राजकारणांतून कारणपरत्वें आपण अंग काढून घेतलें तरी गरजूंना सर्व प्रकारचें सहाय्य, विद्वांनाना तरुणांना आणि विद्यार्थ्यांना वाङ्मयरुपी खाद्य, आपणांकडून सतत मिळत जाईल अशी आशा आहे. आपण अनेकांना उपकृत करून ठेवले आहे. आवासचे कृ. ल. दातार यांस आपली वारंवार आठवण होते. त्यांच्या चिरंजीवांना आपण फार मोठी मदत केली आहे. आपली गुणग्राहकता सर्वविश्रुत आहे. माझ्या शिरावर तर आपल्या ऋणाचा मोठाच बोजा आहे. ( रा. ल. घरत, सासवने. )

( ता. १८।४।३७ ) लोकमान्यांची बुद्धिमत्ता अत्यंत प्रखर व सर्वव्यापक होती ही गोष्ट खरी, पण त्यावेळच्या परिस्थितीमुळें लोकमान्यांना सर्वच विषयांत आपली बुद्धिमत्ता सारखी उपयोगांत आणतां आली नाहीं. तात्यासाहेबांची शाबास खरी. कोणताहि विषय तात्यांच्या कक्षेतून सुटला असें झालें नाहीं. इतके व्याप संभाळण्यास त्यांस वेळ तरी कसा मिळतो कोणास ठाऊक ! त्यांच्याइतका सर्वव्यापी बुद्धिमान मनुष्य आढळणें विरळा. ( गोपाळ अनंत ओगले, नागपूर. )

( ता. १८-४-३७ ) प्रतिपक्षीयांकडून निंदेचा व अपशब्दांचा वर्षाव होत असतांहि, आपल्या तत्त्वांस आपण चिकटून राहिला व समत्व ढळूं दिलें नाहीं याबद्दल कोणाहि आपलें कौतुकच करील. कोणत्याहि परिस्थितींत मनाची शांति ढळूं न देतां एखाद्या प्रश्नाचा व्यापक बुद्धीनें विचार करून आपण नेहमीं योग्य तोच मार्ग दर्शवीत आला आहा. अलौकिक, स्थिर, व चिकित्सक बुद्धिमत्ता असल्याशिवाय ही गोष्ट साधणें शक्य नाहीं. आपला दीर्घोद्योग व व्यासंग लक्षांत घेतां आपण हा विश्रांतीचा काल ग्रंथलेखनांतच घालविणार यांत शंका नाहीं. या काळांत

आपणाकडून हिंदुधर्म व संस्कृति यावर उत्कृष्ट ग्रंथ निर्माण करण्यास आपणास समर्थ करावें अशी परमेश्वरचरणीं प्रार्थना करितों. ( नारायण बाळकृष्ण केळकर, धुळे. )

( ता. १९।४।३७ ) × × × परन्तु मनांत एक असमाधान शल्य सलत राहणार ते हेंच कीं, गेलीं सोळा सतरा वर्षे शुद्ध राष्ट्रीय हितबुद्धीनें, व्यक्तीविषयक मान्यतेची अगर महत्त्वाची परवां न करतां, अत्यंत प्रखर लोकनिंदा सहन करून-हि महात्मा गांधींच्या केवळ ध्येयवादी (त्यांच्या स्वतःपुरतें सत्य अहिंसा प्रधानहि परंतु अव्यवहारिक व ऐन वेळीं फलवंचित करणाऱ्या आततायी वर्गांत) असत्य ढोंग हिंसा अहंकार व एक प्रकारची Mental Slavery उत्पन्न करणाऱ्या राजकारणाशी आपण धैर्यानें व परिश्रमपूर्वक लढला, त्याचें फल पूर्णांशानें आपल्या पदरांत पडलें नाहीं व त्याच्या श्रेयाचा वांटा निर्विवादपणें आपणाला देण्यांत आला नाहीं. आज लोक काय वाटेल तें म्हणोत, उद्यां इतिहासकाराला निःपक्षपातबुद्धीनें असेंच म्हणावें लागेल कीं, "श्री. तात्यासाहेब केळकरांनींच धैर्यानें व यशस्वीपणें या परिस्थितीला तोंड दिलें. काँग्रेसच्या चळवळीचें लोंढ केवळ ध्येयवादाकडून ध्येयवादमिश्रित व्यावहारिक मार्गाकडे वळविलें." पण मनाला इतकेंच टोंचत रहातें कीं काँग्रेसनें आपला कार्यक्रम पूर्णपणें स्वीकारण्याच्या आंत आपण कार्यनिवृत्त होत आहां. पूर्णत्वानें व जाहीरपणें हे श्रेय आपणांकडे गेलें असतें म्हणजे निर्भेळ समाधान व आनंद वाटला असता. ( का. ना. धारप, प्रोफेसर, लॉ कॉलेज, मुंबई.)

( ता. २०।४।३७ ) एकाच शब्दांत आपल्याबद्दल आदर दाखवावयाचा तर आपण व्यवहाराच्या बाबतीत "कृतार्थ" झाला आहात. हें भाग्य महाराष्ट्रासच नव्हे तर हिंदुस्थानांतल्या फारच थोड्यांना लाभलें आहे. ( क्ष, नैनिताल, तारा कॉटेज.)

( ता. २२।५।३७ ) राजकारणाच्या दृष्टीनें अशा आणीबाणीच्या वेळीं, विशेषतः काँग्रेसनें राजकारणाचे धिंडवडे चालविले असतां, आपल्यासारख्या मोहऱ्यास महाराष्ट्रास मुकावें लागलें हा एक योगायोगच म्हणावयाचा. आपण आपल्या पराक्रमानें चांगलेंच यश मिळविलें आहे हें शत्रूदेखील कबूल करील. राजकारणाच्या भानगडींत आपण पडावयाचें नाहीं असें ठरविलेत तरी आपला वाङ्मयविलास सतत चालूं असावा. वाङ्मयाच्या प्रांतांत लीलेनें वावरणाऱ्या आपल्या लेखणीस राजकारणाच्या विषयासंबंधानें देखील आपण विश्रांति देऊं नये.

आपला लेख वाचणे ही आनंदाची गोष्ट होय. महाराष्ट्रीयांची ही हौस आपण शक्य तोंवर चौफेर पुरवावी. ( भास्कर बहिरो महाबळ, न्यायमंत्री, जमखंडी.)

—निरलसपणें व प्रामाणिकपणें विविध कार्यभाग वाहणारा सद्गृहस्थ महाराष्ट्रांत मला तरी दुसरा कोणी दिसत नाही. त्यामुळें महाराष्ट्रीय सार्वजनिक कार्यभागास गौणत्व येणार आहे. ( रंगाचार्य रट्टी, वांई. )

---

## ( १० ) उग्रबलोपासक चळवळ

जिला अत्याचारी चळवळ असें म्हणतात तिला उग्रबलोपासक राजकीय चळवळ असेंहि नांव देतां येईल. महाराष्ट्रांत या चळवळीचा जन्म १८९७ त झाला. म्हणून चाळीस वर्षांतील तिचें थोडेसें समालोचन करण्याचें योजिलें आहे.

पुण्यास रँडसाहेबाच्या खुनापासून व मुंबईस झालेल्या दंग्यापासून प्लेगची व्यवस्था कमी ग्रामाची होऊं लागली. विशेषतः पुण्यास कर्नल के व मेजर रीड या नांवांचे जे दोन लष्करी अधिकारी प्लेगच्या व्यवस्थेकरितां सरकारी मुखत्यार म्हणून नेमले गेले त्या दोघांनीहि जातांना पुष्कळच लोकप्रियता संपादिली. याचें कारण इतकेच की रँडसाहेब कोणाशी धड बोलतहि नसे. त्याऐवजी हे दोघे प्लेग-व्हॉलंटिअर लोकांच्या गळ्यांतहि वेळीं हात घालीत. रँडसाहेबांनी लोकांची मदत मागितली असती तर त्यांनाहि पुष्कळ स्वयंसेवक मिळाले असते. पण प्लेगच्या व्यवस्थेंत खासगी लोक घेतल्याने ढिलाई होते, काम बिघडतें, अशी समजूत त्यांनीं करून घेतली असल्यामुळें, कोणी कांहींहि सुचवावयास गेल्यास हा मनुष्य उगीच तक्रारखोर आहे असें रँडसाहेब घेऊन चालत. माझ्या त्यांच्याशीं आलेल्या संबंधांत त्यांच्या कपाळाची आठी कधीं निघालेली किंवा ते कोणाशीं मनमोकळे करून बोललेले मी पाहिले नाहींत. बरे, उलट हांजी हांजी-खोर लोकांचा त्यांच्याजवळ प्रवेश होता असेंहि नाहीं. कारण असे लोक कांहींतरी डाव साधतात, त्यांना आपलें काम करून घ्यावयाचें असतें, हेंहि रँडसाहेबाला माहीत होतें. मनुष्य सरळ, पण अधिकारी—तुसडेपणाचा नुसता कहर होता. आपल्या भोंवतीं लोक इतकें दुःखी कष्टी गांजलेले आहेत ही जाणीव त्यानें केव्हांहि प्रगट केली नाहीं. प्लेगसारखी आपत्ति आली म्हणजे लष्करी

कायद्याचा जुलूम केला तरच निभावेल असे त्याच्या मनानें घेतलेलें असल्यानें, शिस्तीच्या दडपणानें दया-माया सहानुभूति हे सगळे मनुष्याच्या अंतःकरणांतले गुण त्याच्या ठिकाणीं चिरडून गेले होते. यामुळें रँडसाहेबाचा खून होण्यापूर्वी पहाणाराला असें वाटें कीं हा गांवांत हिंडतो फिरतो, याच्यावर एखादा कोणी वैतागानें केव्हां हात टाकील याचा नेम नाहीं ! अखेर हात पडलाच. मात्र तो वैतागानें नाहीं. तर हृदयांत खोल घर करून राहिलेल्या रागानें !

अशा वेळींच राणीचा ज्युबिली उत्सव यावा हा एक अनिष्ट योगायोग होता. अधिकारी व्यक्तींचा दिमाख व साम्राज्याचा दिमाख दोन्हीहि लोकांना दुःसह वाटली. आणि प्लेग दुष्काळ अशा आपत्तींनीं गांजलेल्या लोकांच्या उध्वस्त मनोभूमिकेवर ज्युबिलीचे असले उत्सव-समारंभ पहावयास नकोत असें म्हणून जाणते लोकहि डोळे मिटून मनांत खंती घेत. पैकीं साम्राज्याचा दिमाख उतरविणें व्यक्तीच्या हातून कसें घडणार ? पण व्यक्तिशः एक अधिकारी मारला तर साम्राज्याचें नाक कापल्यासारखेंच झालें अशा समजुतीनें कांहीं माणसें रँडसाहेबाच्या खुनाला प्रवृत्त झालीं. आणि ज्युबिलीच्या रात्रीं गणेशखिंडीच्या डोंगरावर पेटणाऱ्या प्रचंड होळ्यांच्या उजेडानें आपण दृष्टीस पडूं नये म्हणून हे लोक आसपासच्या झाडाझुडपांत व मोऱ्यांच्या पुलाखालून दडून बसून आपलीं हत्यारें चांचपडत होते. गणेशखिंडीच्या बंगल्यांतून मेजवानीनंतर गाड्यामागून गाड्या येत असतां, म्हणजे त्यांची रांगच्या रांग लागली असतां, या लोकांना नेमकी रँडसाहेबाची गाडी न्याहाळतां यावी, धावत्या गाडीच्या मागें त्यांना चढतां यावें, व कोणी न पहाण्याइतका अवसर मिळून त्यांना पिस्तुलें नेम धरून व साधून उडवितां यावी, ही माणसाची कर्तबगारी म्हणण्यापेक्षां दैवानें मुद्दाम घडवून आणलेली घटना असेंच म्हणावेंसें वाटतें. कारण अलीकडील क्रांतिकारकांच्या अत्याचारांच्या युगांत नेमका हवा तो माणूस, विशेषतः गोरा अधिकारी, हल्ला करणाराला सांपडला असें क्वचितच घडलें असेल. करावयाला जावें एक, व्हावे भलतेंच, असेच प्रकार पांचपन्नास तरी घडल्याचीं उदाहरणें देतां येतील. कोठें वेळ चुकावी, कोठे गाडींत माणसाचा अदलाबदल व्हावी, कोठें कांहीं कारणानें घाताला योजलेला मनुष्य बाहेरच पडूं नये, कोठें गोळीचा किंवा बाँबचा नेम चुकावा, तर कोठें आयत्या वेळीं बाब उडूं नये किंवा पिस्तुल 'जॅम' होऊन जावें ( म्हणजे त्याचा घोडा उडूंच

नये) अशा गोष्टी झालेल्या आहेत. पण रँड साहेबाच्या खुनाच्या वेळीं सगळ्याच गोष्टींचे योग जमून आले याचें आश्चर्य वाटतें. आणि फिरून खून करणारे लोक अशा अचानक रीतीनें निसटून गेले व लोकांत मिसळून गेले कीं, त्यांना वहिमानें पकडल्यानंतर केवळ त्यांनीच आपल्या गुन्ह्यांच्या कबुल्या दिल्या म्हणूनच गुन्हा नाशाबीत म्हणता येईना. नाहींतर निव्वळ आनुमानिक पुराव्याची साखळी सहसा पुरी जुळलीच नसती.

रँडचा खून करणारे चाफेकर बंधु मी स्वतः पाहिले होते. त्यांचा बाप हा एक कथेकरी असून त्याचे एकदोघे मुलगे साथीला मागें उभे रहात. त्यांचें वास्तव्य कांहीं दिवस नागनाथाच्या पाराजवळच्या एका घरांत होते. एका शिवाजी उत्सवांतील त्याची कथा मी ऐकली आहे. एकवेळ दामोदर चाफेकर याला एका ठिकाणीं (तो एक कारखाना होता) मी पाहिला तेव्हां तो कुऱ्हाडी व परशूंचे फाळ हाताळीत होता. अर्थात यावेळीं त्याच्या मनांत आपण पुढें एखादे अचाट कृत्य करूं असें नसावें. मग तो व हीं हत्यारें यांचा संयोग पाहून माझ्यासारख्याच्या, म्हणजे त्याला क्वचित पाहणाऱ्या मनुष्याच्या, मनांत त्याच्याविषयीं अशी कल्पना कशी येईल! पण शेवटीं कोर्टाच्या पिंजऱ्यांत जेव्हां त्याला पाहिलें तेव्हां पूर्वीच्या प्रसंगाचें एकदम स्मरण झालें. असो. दामोदरच्या पाठीमागून बाळकृष्ण व बाळकृष्णाच्या मागून वासुदेव हे तिघेहि बंधु खुनाच्या आरोपांत सांपडून फांशी गेले हा योग इतका विलक्षण कीं तसा सर्व हिंदुस्थानांत आलेला कोणाच्या ऐकिवांत नसेल.

रँड व आयर्स्ट यांचे खून हे अशाप्रकारचे पहिलेच असल्यामुळें सरकारच्या मनावर त्यांचा विलक्षण परिणाम झाला. आणि ते तोंडानें जरी असें म्हणत असलें कीं "खुनाला भिऊन आम्ही प्लेगच्या व्यवस्थेचा जाच कमी केला नाहीं" तरी तें तितकेंच घ्यावयाचें. इंग्रज-सरकार मोठे उद्योगशील. दर प्लेगजंतूगणिक प्लेगजंतू हुडकून काढून मारण्याची त्यांची पहिली महत्त्वाकांक्षा पाहिली म्हणजे उद्योगावरील त्यांच्या विश्वासाची भीतिच वाटते! पण वर्ष-दीडवर्षांच्या अनुभवानंतर त्यांचे त्यांनाहि कळून येऊं लागलें कीं प्लेग-व्यवस्थेतील कांहीं कलमें निरर्थक आहेत. म्हणून त्यांचा अंमल त्यांनीं हळूहळू कमी केला. सरकारच्या मनानें दोन्हीं कारणें थोडथोडी खरीं. पण लोकांनीं मात्र पदराला पक्की गांठ मारून ठेवली कीं, बिचारे चाफेकर बंधु गेले परंतु त्यांनीं पुण्यां-

तल्याच काय पण पुण्याबाहेरच्या हजारों लोकांचा त्रास वांचविला ! कर्नल के व मेजर रीड हे अशा सफाईनें लोकांशीं वागूं लागले कीं जणूकांहीं रँडसाहेब म्हणून कोणी होता, त्याचा खून झाला व तो प्लेग-व्यवस्थेच्या जुलमामुळें झाला ही गोष्ट त्यांना माहीतहि नव्हती !

रँडसाहेबांचे खुनी उघडकीस आल्यापासून १८९९ च्या मे पर्यंत पुण्यांत प्लेगच्या धांदलींतच चाफेकर बंधूविषयीं सर्व शहर बोलत होते. रस्त्यांत बोलणारे कुजबुजून बोलत, कोणी दार लावून घेऊन बाहेर ऐकूं जाणार नाहीं अशा हलक्या आवाजानें बोलत. पण बोलल्याशिवाय रहात नसत. बायकामुलांच्या बोलण्यांतहि हा विषय असे. गुन्हेगार म्हणून कोणी लोक पोलिसकोर्टापुढें प्रत्यक्ष उभे करीपर्यंत लोकांना अर्थातच चाफेकरांची माहिती नव्हती. पण खुनाविषयीं ते फार जपून बोलत. कारण पोलिसतपास जारीनें सुरूं होता. आणि कोणी थट्टेनें किंवा भ्रमानें किंवा कल्पनेनें कांहीं निव्वळ बोललें तरी फरासखान्यावर फुकट खेपा घालण्याची पाळी यावयाची ही भीति ! गुप्त-पोलीसांचा अर्थात फार सुळसुळाट झाला होता; व भिंतीला कान असतात ही म्हण जणूं काय डोळ्यापुढें मोठ्या अक्षरांनीं लिहिलेली प्रतिक्षणीं दिसत असल्याप्रमाणें लोक तोंडाला पदर लावून बोलत. पुण्यांतील भांग्यामारुती, रामेश्वर, जोगेश्वरी, गवल्या मारुती, वगैरे ठिकाणचे अड्डे गप्पांकरितां प्रसिद्ध आहेत. परंतु दामोदर चाफेकराला पोलीस पकडीपर्यंत या अड्ड्यांच्याहि तोंडाला कुलुपें लागलीं होतीं. उलट पोलिसांच्या बाजूनेंहि हें म्हटलें पाहिजे कीं त्यांनीं कोरड्या वहिमावरून उगीच भलत्या सलत्या तरुण मुलांना नेऊन त्यांचा छळ केला नाहीं.

या गुन्ह्याच्या तपासावर सुप्रसिद्ध गुप्त पोलीस मि. ब्रुइन यांची नेमणूक झाली होती. पण एका विशेष प्रकारच्या गुन्हेगारांना जरी ते कर्दनकाळ होते तरी रँडसाहेबाच्या खुनाविषयीं कांहीं एक ठराविक कल्पना त्यांनीं मनाशीं प्रथमपासूनच केली असावी. म्हणून गुन्ह्याचा तपास जारीनें सुरूं होता तरी तो पुण्यांतील लोकांना फारसा जाणवला नाहीं.

चार तऱ्हेनें चार लोक बोलूं लागले. सरकारच्या डोळ्याकडे डोळा ठेवून पहाणारे लोक सभा भरवून, पत्रें लिहून, किंवा खासगी भेटी घेऊन अधिकाऱ्यांपुढें या खुनांचा अत्याचारांचा तीव्र निषेध करूं लागले. उलट कांहीं लोक

उघड फुशारक्या मारून म्हणूं लागले कीं "शाबास रे पुणें ! शाबास रे महाराष्ट्र ! या तरुणांनीं दाखविलेली वीरवृत्ति व केवळ पौराणिक नमुन्याचें धाडस अलीकडच्या काळांत सर्व हिंदुस्थानांत कोणीतरी केलें होतें काय" ? यावरून मग ब्राह्मण जातीची स्तुति आणि इतर प्रांतांतील लोकांची नादान म्हणून निंदा सुरूं झाली. ज्याला राजकारणाची थोडीशी बाजू आहे असे हे खून १८९७-९८-९९ या सालीं महाराष्ट्रांत झाले तसेच पुनः १९०९ च्या सुमारास घडून आले.

पण १८९७-९८ सालीं या कामीं महाराष्ट्राला गर्व किंवा प्रौढी मिरविण्याची जी जागा होती ती पुढे उरली नाही. कारण १९०७ पासून अत्याचारी स्वरूपाचे राजकीय गुन्हे बंगाल्यांतहि होऊं लागले. मद्रासेकडेहि कलेक्टर मि. ॲश यांचा खून झाला. व त्यानंतर हे चळवळीचे चक्र अलाहाबाद प्रांत पंजाब वगैरेकडे जें सरकलें ते अजून तेथेंच घोटाळत आहे, व कदाचित् हें चक्र उत्तर हिंदुस्थानांत कायमचें फिरत राहील असा संभव दिसतो.

स्वराज्य मिळाल्यानेहि ते थांबेल असें तरी कोणी म्हणावें ! कारण युरोप अमेरिका वगैरे खंडांतून स्वराज्य व स्वातंत्र्य ही राष्ट्रांच्या पदरांत पुरी पडलेलीं असतांहि तिकडे अत्याचार थांबलेले नाहींत. मनुष्य स्वभावाला शिक्षण हें मवाळ करतें असें म्हणतात. पण शेकडा नव्वद शंभर लोकांना शिक्षण मिळणाऱ्या देशांत आपलें मत दुसऱ्यावर लादण्याच्या कामीं युक्तिवादाबरोबर पिस्तुलाचा उपयोग सर्रास सुरूंच आहे. असो. सांगावयाचा मुद्दा हा कीं महाराष्ट्रांत हे पहिले पहिले खून झाले तेव्हां तरी हिंदुस्थानांतील इतर प्रांत महाराष्ट्राला अत्याचारी चळवळींत गुरूस्थानी मानीत होते, व महाराष्ट्रहि त्या गुरुत्वाच्या मानाची जाणीव असल्यासारखा स्वतःकडे पहात होता.

या संबंधानें बोलणारांचे दोन वर्ग वर सांगितले. पण महाराष्ट्राचा या कामीं खरी अडचण असणारा तिसरा एक वर्ग होता. तो वर्तमानपत्रकारांचा. त्यांनीं निषेध करावा तरी वाईट आणि ते स्वच्या मनानें सर्वस्वी निषेध करीत होते असेंहि नाहीं. बरें, उघड सर्वस्वी स्तुति करावी आणि "करणारानें ठीक केलें, असेंच करावयास पाहिजे होतें, छळाचा सूड उगवला, जुलमाचा बदला घेतला" असें म्हणावें तर राजद्रोहाचा व अत्याचारांना उत्तेजन देण्याचा गुन्हा म्हणून खटला व्हावयाचा. शिवाय वर्तमानपत्रकारांना सर्वस्वी तसें तरी कोठें वाटत होतें ! यामुळें त्यांना

दोन्ही बांजू बोलाव्या लागत. आणि या कशा बोलाव्या हीच एक प्रकारची करामत होऊन बसली होती.

पुढें झालेल्या बंगालच्या वगैरे चळवळींत अत्याचार घडत ते सहेतुक म्हणजे स्वराज्य संपादनाच्या उच्च हेतूनें होत असले तरी ज्यांवर अत्याचार घडत ते लोक बरेचसे निरपराधी असत. कांही कांही माफीच्या साक्षीदारांचे खून झाले तेथें हेतु उघड होता. परंतु हिंदी पोलीस अधिकाऱ्यांचे खूनहि बरेच झाले, व त्यासंबंधाने लोकांना असें वाटें कीं यांतील बरेच लोक केवळ हुकमाचे ताबेदार असतां मृत्युमुखीं पडले व त्यांना हुकम करणारे गोरे अधिकारी मात्र सुटले! पुढें पुढें तर या अत्याचारांना दरोड्याची जोड मिळाली; व त्यांत पैसा मिळविण्याच्या हेतुसंबंधाने जरी लोकांना कांही विशेष वाटलें नाहीं (कारण तो स्वराज्याच्या चळवळीत खर्च व्हावयाचा अशी समजूत) तरी दरोड्यांत निरपराधी माणसें अनेक हकनाक प्राणास मुकत, यापुरतीं तरी दरोडेखोरांना सहानुभूति नव्हती. जेथें रॉबिनहुडप्रमाणें केवळ गरिबांचा कैवार व गरीबांना ताप देणाऱ्या श्रीमंतांना शिक्षा असा कार्यक्रम असतो तेथें त्या चरित्राला एक प्रकारची अद्भुत रम्यता येते. परंतु जेथें निरपराधी मनुष्य विनाकारण दगावतो तेथें लोक त्या अत्याचाराचें समर्थन करूं शकत नाहीत.

मद्दाराष्ट्राचे उदाहरण घेतले तरी रँडसाहेबाचा खून व जॅक्सन साहेबांचा खून या दोहोंत लोकांच्या दृष्टीनें बराच फरक होता. रँडसाहेबाच्या खुनाबद्दल पापभीरु किंवा नेमस्त लोकहि म्हणत की, त्याने आपल्या छळवादीकर्माचें प्रायश्चित्त भोगले. पण जॅक्सनसाहेबानें असा कोणताच गुन्हा केला नव्हता. सिव्हिलियन लोक हे परकीय राज्याचें आधारस्तंभ, व जॅक्सनसाहेब हे त्यांतलेच एक ही गोष्ट खरी. तथापि हा गुन्हा प्रत्येक सिव्हिलियन रोज करीतच असतो, म्हणून प्रत्येक सिव्हिलियन हा मरणाच्या शिक्षेला पात्र होतो असें विधान जर कोणी केलें तर तें कोणासहि पटणार नाहीं. परकी राज्य उलथून पाडण्याचा हक्क हा नैतिक स्वरूपाचाच आहे असें म्हटलें तरी निरपराधी माणसांवर हात पडला असतां सहजच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, अशा कारणाकरितांहि असा माणूस मारणें ही अनीति नव्हे काय? प्रत्यक्ष युद्ध सुरूं असतां दुतर्फी पुष्कळच प्राणहानि होते. परंतु दोन्ही सैन्यांतील लोक संकर्णि रीतीनें एकमेकांना मारण्यासच उद्युक्त झालेले असतात. यामुळें युद्धांत केलेला वध हा कांहींसा आत्मसंरक्षणाच्या स्वरू-

पाचाहि असतो. शिवाय लांबून बंदुकीनें, मशिनगननें, किंवा तोफेनें संहार होतो तेव्हां मारणारा व मरणारा हे एकमेकांना पूर्वी माहीत नसतातच, पण एकमेकांना समोरासमोर दिसतहि नाहींत. यामुळें " नायं हंति न हन्यते " हे वचन एकप्रकारें सिद्ध होतें.

परंतु जॅक्सन साहेबासारख्याच्या खुनाचे कोणत्याच रीतीनें समर्थन करतां आलें नाहीं. यामुळे कान्हेरे प्रभृति लोकांचे हेतु किंवा त्यांचें शौर्य हें कितीहि वाखाणण्यासारखें असलें तरी त्यांच्यासंबंधानें लिहितां बोलतांना कोणीच कधी चांगला शब्द लावला नाहीं. या खुनाच्या कटांतील एक दोन मुलांची धैर्याची व निर्भयतेची वृत्ति तर येथपर्यंत गेली होती कीं, त्यांनीं पोलिस अधिकाऱ्यांना बसल्या बसल्या हाताचें रक्त काढून दाखविले व एकानें राकेलच्या तापलेल्या चिमणीवर खुशाल बोट ठेवलें ! परंतु त्यांचें धैर्य कितीहि असलें तरी त्यांनी केले तें कृत्य अपवादास्पद ठरलें. उलट दामोदर चाफेकरानें पुढें आपला कबुली जबाब परत घेतला व दयेच्या याचनेसाठीं हायकोर्टाकडे अर्जहि केला, तरी त्यानें केलें, तें सकारण केलें व लोकांकरितां सूड घेण्याचा निस्वार्थीपणा दाखविला, असेंच वर्णन त्याच्या कृत्याचें होऊन कमीपणाचा एकहि शब्द त्याजविषयी कोणी बोलले नाहीं.

असो. महाराष्ट्राला काय किंवा हिंदुस्थानाला काय ही अत्याचारमय राजकीय चळवळ तेव्हां नवीनच होती; व तिच्या ह्या लोकोत्तर उत्पादकांविषयीं काय म्हणावें काय न म्हणावें या विषयीं वर्तमानपत्रकारांचें मन गोंधळून गेल्यास त्यांत कांहीं नवल नव्हतें. पण त्या वेळीं ( १८९८ ) मराठ्यांत मी स्फुट लिहून चाफेकरबंधंची अगदीं उघडपणें स्तुति केली होती. म्हणून त्यांतील कांहीं वाक्यंच देतों. All the three brothers possessed extraordinary courage and bravery and used it for an unselfish but sentimental end and manfully bore the consequences, defying the very death to contempt and ridicule by their over-willing acceptance of it." हीं मराठ्यांतलीं माझीं वाक्यें उद्धृत करून लगेच टाइम्स ऑफ इंडियानें मोठा गवगवा केला, व अशी टीका केली कीं " ज्या लोकांच्या गळ्याभोंवतीं फासाचा दोरच पडला पाहिजे त्यांच्या गळ्यांत टिळकांच्या मराठापत्राच्या संपादकानें स्तुतिपुष्पांच्या माळाच घातल्या आहेत." त्यावर उलट मीहि

टीका केली कीं " तुरुंगांत असलेल्या बिचाऱ्या टिळकांचें नांव यांत ओढून काय होणार ! होय. आम्ही वाटेल तर पुनः स्पष्ट शब्दांनीं म्हणतो कीं हे लोक शूर व धैर्यशाली होते. हें आमचें मत प्रामाणिकपणाचें आहे. आणि टाइम्सनें आम्हाला कितीहि धमक्या दिल्या व भय घातलें तरी आमच्या वरील मताचें प्रतिपादन आम्ही पुनःच काय पण पुनः पुनःहि करूं. चाफेकरांबद्दल कोणालाहि करुणा व सहानुभूतिच वाटेल. मनुष्यस्वभाव हा कोठेंहि असाच आहे. चाफेकरबंधु हे कांहीं चोर किंवा खिसेकातरू नव्हते. त्यांनीं खून केले त्यांत स्वार्थबुद्धि मुळींच नव्हती. किंवा व्यक्तिशः त्यांना झालेल्या छळाबद्दल त्यांना सूड उगवावयाचा होता असेंहि नाहीं. ते शिपाईबाण्याचे होते व त्यांना लष्करांत नोकरी मिळती तर त्यांनीं देशाकरितां बहादुरी करून दाखविली असती. म्हणून त्यांना मिळणारी फांशीचीं शिक्षा ही, व्यक्तिशः त्यांचें भवितव्य आतां ठरलेलें असलें तरी, देशाच्या दृष्टीनें ती हानि आहे, तो अन्याय आहे."

पण पुण्यांतील आम्हां पत्रकारांवर टीका करणारे नुसते अँग्लोइंडियन संपादकच नव्हते तर मुंबईतील नेमस्त पक्षाचे पुढारीहि होते. या विषयावर काळ, केसरी, मराठा, या सर्वांनीं एकाच प्रकारची विचारसरणी स्वीकारली होती व एकाच प्रकारचे शब्द वापरले होते. हें पाहून फेरोजशहा मेथासारखे लोक चकित झाले व त्यांना रागहि आला. आम्ही लिहितों असं लिहून राजकारणाची घाण करीत आहों, व खुनासंबंधानें सहानुभूति प्रगट करणें म्हणजे तो राजद्रोहच होतो असें नेमस्त पुढाऱ्यांचें मत होतें. म्हणून फेरोजशहा मेथा यांनीं आम्हां पुण्यांतील वर्तमानपत्रकारांचे कान उपटण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण आमचे कान त्यांच्या हाताला न लागण्याइतके आखूड होते. राष्ट्रीय सभेचीं सूत्रें त्यांच्या हातीं असल्यामुळें त्यांनीं असाहि धाक घालून पाहिला कीं, " सरकार तुमचें काय करील न करील हें वेगळें, पण तुमच्या सारख्या लोकांना आम्ही राष्ट्रीय सभेंत येऊं देणार नाहीं. आमच्या हातीं या बहिष्काराचा दंड आहे, व त्याचा उपयोग करून आम्ही शिस्त राखूं. " आमच्यापैकीं शिवरामपंत परांजपे हे फेरोजशहा मेथा यांना फार दूर होते. त्यांची गांठ पडण्याचा संभव नव्हता. पण मेथा व टिळक यांचा परिचय, माझेंहि येणें-जाणें, भेटणें-बोलणें, त्यांच्या प्रभावळींतील लोकांशीं होत असे. आणि मराठापत्र इंग्रजींत असल्यामुळें ते वाचीत. म्हणून प्रथम माझ्यावर शिस्त धरावी व मग

माझ्याद्वारें काळकर्त्यांवर शिस्त धरावी असा त्यांचा उद्देश होता. पण तो फारसा साधला नाहीं. माझ्या एका भेटीनंतर फेरोजशहांकडे माझे मित्र ॲडव्होकेट सेटलूर हे एकदां गेले असतां मेथा त्यांना म्हणाले, " Mr. Kelkar argued with me very ably though of course I could not agree with him ".

बंगालच्या फाळणीच्या चळवळींतून प्रथम स्वदेशी बहिष्काराची आणि नंतर राजकीय अत्याचाराची कायमची चळवळ निघाली हें प्रसिद्ध आहे. फाळणी रद्द झाली, तथापि स्वदेशीची चळवळ अजून टिकून आहे. चळवळ या नात्यानें तिचें तीव्र स्वरूप जरी आतां उरलेलें नाहीं तरी तिचीं पाळें मुळें सर्व हिंदुस्थानभर लोकांच्या मनांत खोल गेलीं आहेत, आणि तिचे प्रत्यक्ष कार्य आपोआप त्यांच्या हातून यथाशक्ति होत आहे. उद्यां स्वराज्य मिळालें तरी 'स्वदेशी' टिकणारच. आज स्वतंत्र राष्ट्रामध्यें देखील स्वदेशांतील उद्योग धंदे वाढविणें, परावलंबित्व नाहींसें करणें, आणि परकी राष्ट्रांशी व्यापाराच्या कामीं सहकार्य केलें तरी या नाहीं त्या रीतीनें त्या सहकार्याचा उपयोग शेवटीं 'स्वदेशी'ला करून घेणें, असें धोरण सरकाराकडून राखलें जातें. पण राजकीय हिंसा किंवा अत्याचार या चळवळीचे तसें नाही. आधीं ही चळवळ स्वराज्य किंवा स्वदेशी यांच्या चळवळीसारखी उघड व संघटित स्वरूपांत करतां येत नाही. ती प्रायः व्यक्तिमात्रांकडून किंवा गुप्त मंडळांकडून होते. ती यशस्वी झाली किंवा अयशस्वी ठरली तरी तिचा सुगावा लागतांच सरकारी अधिकारी तिचा पिच्छा पुरवितात, आणि तींत सामील झालेल्या लोकांना भयंकर शिक्षा सोसाव्या लागतात. यामुळें हातावर शीर घेऊन बाहेर पडणारे, सर्व नाशाला मनानें सिद्ध झालेले, असे निश्चयी लोकच तींत पडतात. उलट हत्यारांचा खेळ हा अद्भुतरम्य असल्यामुळें भावनावश पण कच्च्या दिलाचे असेहि कांहीं अशा चळवळींत पडतात, आणि परिणाम भोगण्याची वेळ आली म्हणजे मात्र पस्तावतात!

ज्या राजकीय बंदीजनांच्या मुक्ततेकरितां राष्ट्रीय सभेनें गतवर्षी प्रचंड चळवळ केली त्यांतील पुष्कळसे या अत्याचारी चळवळीचे पुरस्कर्ते होते. म. गांधींच्या प्रेरणेनें राष्ट्रीय सभेनें आतां अनत्याचार व अहिंसा यांचें तत्त्व स्वीकारलें आहे. राष्ट्रीय सभेनें मंत्रिमंडळें बनविलेलीं असून स्वतःच तीं, या बंधमुक्ततेची खटपट, आपल्या शिरावर मोठी जबाबदारी घेऊन, करीत असल्यामुळें

वातावरण बदललें आहे. आणि बंधमुक्त झालेले बंदीजन अनत्याचारीत्वाचें तत्त्व स्वीकारूं लागले आहेत, किंवा निदान तसें म्हणूं लागले आहेत. तथापि स्वराज्य दूर आहे. तें पदरांत पडेपर्यंत साम्राज्यसरकारशीं अनेक झगडे करावे लागतील. आणि तीव्र स्वरूपाची राष्ट्रीय चळवळ सुरूं झाली म्हणजे उग्रबलोपासनेचें तत्त्व फिरून आपलें डोकें वर काढण्याचा संभव आहे. पाशवी शक्तीशिवाय साम्राज्यसरकाराजवळ आतां दुसरें कांहीं साधन साम्राज्य टिकविण्याला उरलेलें नाही. साम काम देईनासा झाला तर त्यांचा दंड पुढें सरसावणारच. तूर्त तरी अत्याचाराची चळवळ कांहीं काळ थांबेल असें वाटतें. पण या चळवळीच्या आठवणी अद्यापि इतक्या ताज्या आहेत, कीं झालें गेलें विसरून गेलें असें म्हणण्याला पुष्कळ काळ लोटला पाहिजे.

टिळकांना स्वराज्याच्या चळवळीत सर्व प्रकारची बलोपासना मान्य होती असा बाहेर सर्वत्र समज होता आणि तो खराहि होता. अत्याचारापासून होणाऱ्या परिणामांना राजकीय दृष्ट्या फारसें सद्यः फल नाहीं हें ते जाणत. तथापि 'साधनानां अनेकता' हे जसें हिंदुधर्माचें लक्षण ते मानीत असत, त्याचप्रमाणे राजकीय चळवळींचेंहि. यामुळें कोणी तरुणानें स्वार्थत्यागाची अंतिम सीमा गांठण्याचें मनांत आणल्यास ते त्याला उत्तेजन देत नसत पण त्याचप्रमाणे निवृत्त करण्याच्याहि खटाटोपांत पडत नसत. कारण अशीं कामें स्वयंस्फूर्तीनेंच होणारीं असतात. आणि ही स्फूर्ति जशी कोणी मुद्दाम करून प्रदीप्त होत नाहीं त्याप्रमाणें ती कोणीहि प्रतिकूल उपदेश करून ती हटवून धरतां येत नाही. आधीं कोणी टिळकांना मी नक्की अमुक करूं कीं अमुक करूं नको असें विचारावयाला येत नसे. अशांचा त्यांच्याशीं विचारविनिमय व्हावयाचा तो निरपेक्ष तात्विकच व्हावयाचा. कोठें कांही घडलें तर मग त्याची बातमी त्यांना दुरून कर्णोपकर्णी यावयाची. आणि अशा बाबतींतलें प्रत्यक्ष ज्ञान मोठें अडचणीचें असतें हें त्यांना माहीत असल्यामुळे, कधीं कशा संबंधानें कांहीं माहिती काढावयाची तर ते ती आडपडदा ठेवून कानोसा घेऊन काढीत. या कडक धोरणासंबंधानें प्रगट रीतीनें त्यांचीं मतें समजणें अशक्य असल्यानें, त्यांची पसंती नापसंती ही कोणालाहि केवळ आपल्या मनानें उगाच कांहींतरी अंदाजानें ठरवावी लागे. मात्र सर्व प्रकारचे लोक त्यांना येऊन भेटत आणि त्यांनींहि कोणाच्या भेटीला कधीं नाहीं म्हटलें नाहीं. महाराष्ट्रांत अनेक लोक बाँब तयार करण्याची विद्या शिकले होते. त्यांचे आचार्य-

पद पां. म. बापट यांना दिलें पाहिजे. १९०८ च्या प्रारंभीं अरविंद घोष पुण्यास आले तेव्हां कांहीं महाराष्ट्रीय तरुणांनीं त्यांना प्रत्यक्ष बाँब करून उडवून दाखविले होते.

मी टिळकांच्या नित्य परिवारांतला म्हणून माझीहि गांठ भेट अशा लोकांशीं पडे. त्यांपैकीं कांहीं माझ्याशीं मन मोकळें करून बोलत तर कांहीं मुख्य मुद्यासंबंधानें मुळींच न बोलतां जसे कांहीं आपण पुणें पाहण्याला व टिळकांचें दर्शन घेण्याला आलों असा बहाणा करीत. मला वाटतें, अशा लोकांची माझी गांठ प्रथम १९०७ सालीं पडली. उत्तर हिंदुस्थानचा एक पाहुणा होतीलाल वर्मा टिळकांकडे आला. त्याला पर्वती दाखवून आणा म्हणून टिळकांनीं मला सांगितलें. मी त्याला घेऊन गेलों. तेव्हां संभाषणाच्या ओघांत, मला विश्वासांत घेऊन, त्यानें युरोपांतून आपण बाँब करण्याची कृति शिकून आलो आहो, ती कृति फारशी कठिण नाहीं, युरोपांत हें ज्ञान सर्वसामान्य आहे, तथापि त्याचा उपयोग विशेष प्रसंगींच करण्यांत येतो, इत्यादि अनेक प्रकारची मनोरंजक हकीकत सांगितली. परंतु मला त्यानें या चळवळीविषयीं आपलें मत विचारलें नाहीं व मी होऊन त्याला तें सांगितलें नाहीं. अशा विचाराच्या पुण्यांतील लोकांना माझीं मतें परस्पर कळून चुकली असल्यामुळें त्यांपैकींहि कोणी अशा विषयासंबंधानें माझ्याशीं चर्चा करीत नसत. त्यांना रहस्यांत घेणारे आमच्यातले इतर कांहीं होते. पण ते स्वतः मात्र भित्रे व अंगचोर होते. माझीं मतें जहाल नाहींत या माझ्या दुर्लौकिकाचा उपयोग या कामीं तरी मला बराच झाला. माझ्याविषयीं तुच्छतेची भावना धरणारे लोक जालीम अशा उपायांविषयीं माझ्याशीं चर्चा कशाला करतील ! ते मला इतर व्यवहारापुरता स्नेही मानीत. परंतु अशा राजकारणांत संल्लामसलत घेण्याला निरुपयोगी असा समजत. आणि तें बरोबरच होतें. कारण त्यांनीं माझा सल्ला विचारल्यास तो त्यांच्या मताच्या उलट पडणार हें त्यांना माहीत होतें.

स्वार्थत्याग ही बाबच अशी आहे कीं ज्याला स्वार्थत्याग करावयाचा असेल त्यानें स्वयंस्फूर्तीनें व आपल्या जबाबदारीवर करावा. अशा बाबतींत कोणी कोणाचा सल्ला घेऊं नये. कोणी देऊंहि नये ! ज्याला स्वार्थत्याग करावयाचा त्यानें तो स्वतःच्या हिमतीवर करावा; परिणामाचे धनी आपण या बुद्धीनें करावा. स्वार्थत्याग हा ज्याचा त्यानें करावयाचा असतो. जें करावयाचें तें ज्याचें त्यानें

आपल्या जबाबदारीवर, आजूबाजूस न पाहतां, पुढील परिणामांबद्दल कुरकूर न करतां आणि तें सुद्धां स्वतःला वाटलें म्हणून करावें. लोकांनीं सांगितला म्हणून स्वार्थत्याग करूं नये. अशा रीतीनें स्वार्थत्याग करणाराला एकान्तांत असतांना स्वतःच्या समाधानाचें तरी सुख मिळेल. स्वतःच्या मनाचें बक्षीस हेंच खरें बक्षीस होय.

जी गोष्ट करण्याला आपण स्वतः तयार नाहीं ती लोकांना करावयास सांगण्याचें पातक किंवा धाडस मी कधींच केलें नाहीं. विशेषतः ज्या गोष्टी केल्यामुळें अलौकिक स्वार्थत्याग करावा लागेल, विशेष आपत्तींचे प्रसंग ओढवतील, मोठे खटले शिक्षा होतील, त्या प्रत्यक्ष करण्यास न सांगण्याविषयीं किंबहुना दुरूनहि त्याचा उपदेश न करण्याविषयीं, मी सावधगिरी ठेवीत असे. ज्यानें त्याने आपला स्वभाव आपलें सामर्थ्य आणि आपली परिस्थिति पाहूनच वागावें, आणि आपण जें करूं त्याचें परिणाम आपले आपणच भोगण्यास सिद्ध असावें, त्यांत दुसऱ्यावर भार टाकूं नये दुसऱ्यास दोष देऊं नये, असें माझें कायमचे मत असें. यामुळें दुसऱ्या कोणी कांहीं लोकोत्तर असें केलें असतां त्याचे गुण मी मोकळ्या मनानें घेई व धैर्याच्या दृष्टीनें त्याला मजहून श्रेष्ठ मानीत असें. तथापि आपण बाजूला राहून त्याला भरीला घालणें योग्य नाहीं असें मला वाटे. उलट कांहीं तरी अचाट किंवा अचरटपणानें काम करणारा मनुष्य दिसला, आढळला तर त्याच्याशीं वाद करून त्याचें मन वळविण्याचा प्रयत्नहि मी फारसा कधीं केला नाही. कारण स्वभाव हा दुरतिक्रम असतो. यामुळें अत्याचारप्रिय माणसें व मी यांची संगत सोबत खेळीमेळी घडत असली तरी, हा मुद्याचा विषय जसा कांहीं त्यांच्या माझ्या मनांत नाहीं अशा समजुतीनें त्यांचा माझा व्यवहार चाले. माझ्याभोंवतीं वावरणारीं माणसें काय उद्योग करितात याची चौकशी मी करीत नसे. आपण आपलें काम करावें, मग आपला सोबती सांगाती कांहीं करो ! लोकांच्या संसर्गानें आपल्यावर नसते आरोप येतील या संशयानें आपलें मन मी कधींहि ग्रस्त करीत नसे. ज्याला कर नाहीं त्याला डर नाहीं असा माझा स्थूल आत्मविश्वास असे. आणि हा माझा आत्मविश्वास अखेरपर्यंत टिकला व फळाला आला.

अत्याचारी विचारांची लाट ओसरून गेल्यावर अशा लाटेंत पूर्वी वाहवून गेलेल्या अनेक तरुणांनीं पुढें आत्मनिरीक्षण केलें. तेव्हां आपण अविचार केला होता हें त्यांचें त्यांनाच कळून आलें. आणि आपणावर त्या अविचाराच्या अवधींत

कोणतीं संकटें आलीं कोणतीं कशीं टळलीं याची माहिती कित्येकांनीं अगदीं मोकळ्या मनानें मला सांगितली आहे. कांहींनीं असें सांगितलें कीं, "त्यावेळीं आम्ही तुम्हाला नेभळट शिळपट असें मानून तुमचा मनांतून तिरस्कार करीत होतों. कित्येक वेळां तुमच्याशीं बोलत असतां आमच्या खिशांत पिस्तुलेंहि असत. पण हा आमचा खेळ फार दिवस टिकला नाहीं. आणि आम्हीं आमचीं जहाल मतें अमलांत आणण्यासारखें कांहीं धाडसहि पण करूं शकलों नाहीं." नाशिकास जॅक्सन साहेबाचा खून होण्यापूर्वी महाराष्ट्रांत पिस्तुलांचें एक पेंव फुटलें होतें ही गोष्ट आतां प्रसिद्धच आहे. परंतु नाशिकाशिवाय बाहेर एकाहि ठिकाणीं या पिस्तुलांचा उपयोग झाला नाहीं. त्यांचा पत्तामुद्दा लागल्यानें पुढें तीं बहुतेक जप्त झालीं. कांहीं मुलांना हत्यारांच्या कायद्याखालीं शिक्षा भोगाव्या लागल्या. एक दोन पिस्तुलेंच नापत्ता किंवा नष्ट करण्यांत आलीं. आणि सावरकरांच्या खटल्यानंतर अत्याचारी चळवळीचा महाराष्ट्रांत बीमोड झाला. त्यापुढें लाहोर येथील खुनाकरितां राजगुरु हा पुण्याचा मुलगा फांशी गेला. आणि फर्ग्युसन कॉलेजच्या लायब्ररींत वासुदेव गोगटे याचा हॉटसन साहेबाचा खून करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरून त्याला आठ वर्षाची शिक्षा झाली. पण हे व्यक्तिविषयक प्रयत्न होते. ती संघटित चळवळ नव्हती.

धाडसीं तरुण मुलें जशी कांहीं अचरटपणें वटवट करणारी असतात, त्याप्रमाणेंच कांहीं मनाची खंबीर आंतल्या गांठीची असतात. तीं आपले धाडसी विचार गुप्त ठेवतात. अशा प्रकारचाच राजगुरु हा मुलगा असावा. कारण त्याने कोणत्याहि सभेत कांहीं भाग घेतलेला मला आठवत नाहीं. पुण्यांतील कोणत्याहि प्रमुख पुढाऱ्यांशी त्यानें आपले खरे विचार सांगून कधीं विचारविनियम केला नसेल. त्याचा फोटो पुढें वर्तमानपत्रांत छापला तेव्हां या मुलाला मी केव्हां तरी ओझरतें पाहिलें असावें यापेक्षां त्याची मला अधिक माहिती किंवा आठवण स्मरली नाहीं. तीच गोष्ट वासुदेव गोगटे याची. त्याचा बाप कै. बळवंतराव गोगटे हे मिरज हायस्कुलांत मला तीन वर्षें मास्तर होते. कांही दिवस ते व आम्ही एकाच वाड्यांत राहत अगदी. या पूर्वऋणानुबंधाच्या स्मरणानें वासुदेव हा पुण्यास केव्हां केव्हां मला येऊन भेटत असे, आणि वडीलकीच्या नात्यानें माझी सल्ला मसलत विचारी. हॉटसन साहेबावर त्यानें ज्या दिवशीं कॉलेजांत पिस्तुल झाडलें त्याच्या आदल्याच दिवशीं तो मला नेहमींप्रमाणें येऊन भेटला आणि अभ्यास-

विषयांची चर्चा करून गेला. ही गोष्ट पुढें पोलिसांना कळल्यावर सिटी पोलीस इन्स्पेक्टर मि. कोठावाला हे मजकडे आले. त्यांना मी सर्व हकीकत सरळ सांगितली. मला कोणतीच गोष्ट छपवून ठेवण्याचें कारण नव्हतें. माझी मतें त्या इन्स्पेक्टराला चांगलीं माहीत असल्याकारणानें त्यानें वासुदेवाच्या व माझ्या भाषणांत हॉटसन साहेबाचें नांव निघालें होतें काय असा प्रश्नहि विचारला नाहीं. वासुदेव मला भेटला तेव्हां त्याच्या मनांत उद्यांचे विचार घोळत असावे, आणि न जाणो त्यावेळीं त्यांच्या खिशांत पिस्तुलहि असेल !

वर दर्शविल्या प्रकारच्या अनेक प्रसंगांतून मला जावे लागलें तथापि मी अत्याचारांना उत्तेजन देणारांपैकीं आहे असा पोलिसांना कधींच संशय नव्हता. माझ्या सारख्या प्रमुख पुढाऱ्याचा वाटेल त्या प्रकारच्या मनुष्याशीं संबंध यावयाचा, तथापि A man is known by the company he keeps, ही म्हण मला लागू करतां येत नाहीं हें जाणण्याइतकी तारतम्य बुद्धि त्यांच्यामध्यें होती. मीहि आत्मविश्वासानें निर्भयतेनें वागत असे. तथापि पहिल्या पहिल्या वर्षांत पोलीस खोटे रिपोर्ट करण्यास चुकले नाहीत. अशा गुप्त रिपोर्टांचा पडताळा पाहणें कठिण असतें. बेजबाबदार रीतीनें ते वाटेल तसे रिपोर्ट करीत. निदान असा एक खोटा रिपोर्ट मजविरूद्ध करण्यांत आला होता. तो असा कीं, मी मिरज येथें कांही कामाला गेलो असतां डॉ. भडभडे व मी असे मिळून कृष्णानदीच्या घाटावर गेलों आणि आम्ही तेथील दगडी बुरुजावर एक बाँब उडवून पाहिला ! या रिपोर्टाला काय आधार असेल याचें मला अजून आश्चर्य वाटतें. हा रिपोर्ट ब्रिटिश पोलीसांनी केला होता व तो पुढे कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटाकडून चौकशीला निघाला तेव्हां मिरजेच्या पोलीसांनी तो खोटा पाडला म्हणतात. शिवाय गुप्तपोलीस खात्याकडून पुण्यास मजकडे चौकशी झाली तेव्हां मीहि तारखा वगैरेचा पुरावा देऊन तो खोटा आहे हें दाखवून दिलें. अरविंद घोष पुण्यास आले तेव्हां त्यांना पुण्याच्या कांहीं तरुणांनी बाँब करून उडवून दाखविला तो पाहण्यास हजर असलेल्या लोकांत मी होतों असाहि एक रिपोर्ट झाला होता. तो माझ्यापुरता तरी खोटा होता हें मी सांगूं शकतों. मी साऱ्या जन्मांत एकच बाँब उडालेला पाहिला, तो १९२९ च्या एप्रिलमध्यें दिल्ली येथील असेंब्लीच्या सभागृहांत.

असो. असले खोटे रिपोर्ट माझ्यासंबंधानें मधून मधून होत, तथापि पुढें नाशिकचा खटला निकालांत निघून गेल्यावर पोलीस खात्याची खात्री झाली कीं बाँब

करणारे व पिस्तुलें बाळगणारे कांहीं लोक माझ्या संगतींत जवळून किंवा दुरून येत असले तरी मी त्यांच्याशीं सहमत नसतों. याचें एक प्रत्यंतर एकदां मला मुंबई सरकारचे एक कौन्सिलर नामदार मॉरिसन यांच्याकडूनच प्रत्यक्ष मिळालें. मॉरिसनसाहेबांना कांहीं कारणानें पुणें मुक्कामी मी भेटावयास गेलो असतां त्यांनीं माझा खटला उकरून काढला. ते रागावले व मीहि रागावून बोलूं लागलों. त्या भेटींतली हकीकत निराळ्या अनुसंधानानें मी 'मराठे व इंग्रज' या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांत दिली आहे. प्रस्तुत इतकेंच सांगावयाचें की, मॉरिसनसाहेब मला म्हणाले, "केळकर, तुमच्यांवर सरकारानें अगदी करून बारीक नजर ठेवली आहे. तुमचा संबंध अत्याचारी प्रवर्तक लोकांशी असल्याचे अद्यापि सरकारच्या नजरेला पडलेले नाहीं. पण संभाळा, तसा प्रकार यत्किंचित् कोठें केव्हां आंढळून आला तर तुम्ही व तुमचा केसरी यांच्या काळजात आम्ही आपली कट्यार खुपसल्याशिवाय राहणार नाहीं!" ही कट्यार अर्थात् कायद्याचीच. तथापि मॉरिसनसाहेबांनीं मूठ वळूनें हातें उचलूनें प्रत्यक्ष कट्यार खुपसण्याचें नाट्य करण्यांत कसूर केली नाहीं. या कट्यारीतून त्यां विकट काळांत मी स्वतः वांचलो आणि केसरीलाहि वांचविलें. 'भित्र्या माणसाचा पराक्रम' असें यांला कोणी विरोधाभासात्मिक नांव दिलें तर तें यथार्थच ठरेल. पण गुण व दोष यांचे स्वरूप असें मिश्रच असतें.

सर्व प्रकारच्या त्यागांमध्यें प्राणत्याग म्हणजे आत्मसमर्पण हा त्याग अत्यंत श्रेष्ठ ठरतो, याचें कारण उघडच आहे. तें हें की प्राणाहूनें अधिक प्रिय अशी दुसरी वस्तु जगांत नाहीं. हा त्याग सती आपल्या पतिप्रेमाकरितां करिते, तर देशभक्तीनें प्रेरित झालेले हुतात्मे स्वदेशाच्या प्रेमाकरितां करितात. आणि हा त्याग करण्याला प्रवृत्त झालेल्या लोकांचे हेतु नैतिक दृष्ट्या अत्यंत उच्च मानावे लागतात. कारण निःस्वार्थीपणा हाच नीतीचा आत्मा होय. आतां अशा हुतात्म्यांच्या कृत्यांना व्यावहारिक शहाणपणाची कसोटी लागत नाही किंवा त्यांच्या कृत्यांची परीक्षा केवळ परिणामांच्या दृष्टीनें करून त्यांना बरें वाईट म्हणतां येत नाहीं. तथापि अनाचार (निष्क्रियता) आणि अत्याचार (बेसुमार कृत्य) यांच्यामधला सुवर्ण-बिंदु छेडणारे लो. टिळकांसारखे व्यवहारचतुर मुत्सद्दी, आणि केवळ अहिंसेला नीतिसिंहासनावर बसविणारे म. गांधीसारखे सत्यसंशोधक दोघेहि हुतात्म्यासंबंधानें सारखेच हळहळतात.

या मध्यबिंदूचा छेद करण्याचें धोरण टिळकांनीं नेहमीं जागृत ठेविलें होतें. व्यापक दृष्टीच्या मनुष्याला असेंच करावें लागतें. व्यष्टिप्रमाणें समष्टीवरहि त्याची दृष्टि असते. प्रसिद्ध इंग्रजी म्हणीविरुद्ध, समग्र वृक्षारण्य ( Wood ) व व्यक्तिशः वृक्ष या दोनहि गोष्टी टिळकांना एकसमयावच्छेदेंकरून दिसत होत्या. सर्वांना शक्य किंवा सुलभ काय आहे हे पाहून व्यक्तिमात्रावरचीं बंधनें त्यांनीं मनाशीं ठरविलीं होतीं. शिस्त किंवा अटक चांगली; पण तिलाहि मर्यादा आहे; व त्या मर्यादेचें उल्लंघन झालें असतां लोकांकडून रोकडा अपमानच आपल्या पदरीं पडेल हें ते पूर्णपणें ओळखीत होते. 'प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत्' या न्यायानें, एखाद्या चाणाक्ष पित्याप्रमाणें, स्वराज्याच्या चळवळीतील सहकारी लोकांशीं ते वागत. स्वराज्याच्या कार्याला ज्याला जे देतां यईल ते समाधानाने घेण्याला त्यांचा हात नेहमी पुढें असे. जगाची म्हणजे मनुष्य स्वभावाची रचना त्रिगुणात्मक आहे हे गीताशास्त्री टिळक कधींहि विसरणें शक्य नव्हतें. ते सामान्यतः राजसवृत्तीचे असले तरी, केव्हां तामस तर केव्हां सात्विक असे स्वतः असल्याचें त्यांचे त्यांनाच जर कबूल करावें लागलें असतें, तर नुसत्या सात्विक भावनेचा जुलूम त्यांनीं जनतेवर कसा चालविला असता ? त्रिगुणात्मकतेमुळें एकच मनुष्य निरनिराळ्या वेळीं निरनिराळा दिसूं शकतो. 'एक्स्ट्रिमिस्ट' हें टिळकांचें विशेषण जगत्प्रसिद्ध आहे. पण विलायतेत त्यांनी 'मॉडरेट' म्हणवून घेतलें; व १९०७।८ च्या चळवळीत कित्येक तीक्ष्ण भावनेच्या आपल्याच अनुयायांकडून त्यांनीं 'टिळक मूर्ख आहेत, त्यांना खरें राजकारणच कळत नाहीं' असें म्हणवून घेतलें ! या दोनहि गोष्टी प्रसिद्ध आहेत. टिळकांना कांही लोक ( व्हायोलन्ट ) अत्याचारी मानीत हें चिरोलसाहेबांच्या आरोपावरून उघड होतें. पण हे दूषण मानूनच टिळकांनीं चिरोलवर फिर्याद केली. उलट त्यांना सोळा आणे अनत्याचारित्वच सर्वकाल मान्य होतें म्हणावें तर, सन १९०७।८ च्या चळवळींत त्यांनी सभा भरवून बंगाल्यांतील किंवा इतरत्र बाँबगोळे फेकणारांचा कधीं निषेध केला नाहीं.

टिळकांनीं सुखासुखी कोणासच अत्याचाराचा उपदेश केला नसता; पण आयाबहिणींवर जुलूम झाले असतां अत्याचारास कोणी प्रवृत्त झाल्यास त्याचाहि त्यांनीं हात धरला नसता. याचेंच नांव मी म्हणतों खऱ्या मध्यबिंदूचा छेद. हेंच कार्याकार्य-विषयक व्यावहारिक खरें शहाणपण व राजकारण. याच कारणामुळें

जनतेंतले सर्व प्रकारचे लोक टिळकांच्या संग्रहीं होते व उलट सर्व प्रकारचे लोकहि टिळकांना आपले मानून अतिशय चाहत.

गांधी अहिंसेचा उपदेश करणारे, तथापि त्यांनी देखील भगतसिंग सुखदेव यासारख्या क्रांतिकारकांविषयीं सहानुभूति बाळगून त्यांच्या फाशीच्या शिक्षा रद्द होण्याची खटपट केली. केसरीचा बातमीदार याविषयीं ता. ७ एप्रिल १९३१ च्या अंकांत लिहितोः—

"कित्येकांची अशी गैरसमजूत होती कीं, या तीनहि वीर पुरुषांचे प्राण वांचविण्याचा निश्चय महात्मा गांधीनी केला असता तर त्यांचे प्राण वांचले असते; तो निश्चय त्यांनी केला नाहीं व म्हणून त्यांना मृत्यु आला व याला अप्रत्यक्ष कारण महात्माजी झाले. या समजुतीनें कराची जवळच्या मालीर स्टेशनवर गांधीना काळ्या फुलांचे हार घालण्यांत आले व त्यांचा निषेध केला गेला हें सर्वांस ठाऊक आहेच. परंतु महात्माजीनी तेथेंच आपण शक्य ते प्रयत्न केले असें स्पष्ट सांगितले. वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना कराचीस मुलाखत देतांना एका गृहस्थांनी त्यांना या बाबतींत प्रश्न विचारला असतां गांधीजींनी सगदगद होऊन सांगितलें कीं, " भगतसिंग वगैरेचा प्राण वांचविण्याकरितां मी माझा प्राण दिल्यास ते वांचतील असें असते तर मी माझ्या प्राणाचें बलिदान देईन असा माझा निश्चय होता, व तो मी अमलांत आणला असता." कराचीस ता. २७ मार्चला त्यांचे जे सार्वजनिक व्याख्यान झाले त्यांतहि त्यांनीं या प्रकरणाबद्दल बोलतांना सांगितलें कीं, " तुम्ही मजवर फार रागावलात यांत आश्चर्य नाहीं. तसे करण्याचा तुम्हाला हक्कच आहे. पण राग करून भगतसिंग परत येणार नाहींत. कोणत्याहि मनुष्याला जितकें करतां येणें शक्य आहे तितकें मी केलें. बावीस तारखेला जेव्हां मला कळलें कीं, दुसऱ्या दिवशीं शेवटची भेट घेण्याकरितां त्यांच्या वडिलांना बोलावले आहे, तेव्हां मी रात्रौ व्हाइसरॉय यांना पत्र लिहावयास घेतलें. पहाटे एक वाजतां उठून ईश्वराचें नामस्मरण करून त्याची प्रार्थना केली, पत्र पुरें केलें व पाठवून दिलें. त्याचा उपयोग झाला नाहीं हा माझा दोष नव्हे. "

महात्मा गांधी व व्हाइसरॉय यांच्यामध्यें भगतसिंगाच्या बाबत काय संभाषण झालें हें कळणें तूर्त तरी अशक्य आहे असें लिहून 'हिंदुस्थान टाइम्स'चा एक

सन्मान्य विश्वसनीय बातमीदार ह्या पत्राला लिहितो कीं, "एका पुढाऱ्यानें मला सांगितलें कीं, भगतसिंग वगैरे तरुण जर प्रत्यक्ष त्यांचे मुलगे असते तरी त्यांच्याकरितां गांधीजींनीं केलें यापेक्षां अधिक कांहीं केलें नसतें." भगतसिंगासंबंधानें हा बातमीदार लिहितोः—"भगतसिंग वगैरे हुतात्मे सिंहासारखे शूर होते यांत शंकाच नाहीं. परंतु भगतसिंग हे धार्मिक वृत्तीचे तरुण होते. त्यांच्याबरोबरच लाहोरच्या सेंट्रल जेलमध्यें असणाऱ्या एका कैदी सद्गृहस्थांनीं कांहीं हकीकत पाठविली आहे. ती बरीच उद्बोधक आहे. ते म्हणतात, "खटल्याचा निकाल होण्यापूर्वी भगतसिंग आपल्या आप्तेष्टांच्या भेटीकरितां तुरुंगाच्या ऑफिसांत जात. एके दिवशीं मी व ते एकदमच ऑफिसकडे गेलों व त्या दिवशीं कांहीं कारणानें त्यांच्याशीं बोलण्याची मला संधिहि मिळाली. मी त्यांना विचारलें कीं, 'खटल्याच्या निकालासंबंधी तुम्हांला काय वाटतें?' माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना भगतसिंग म्हणाले, 'मला फांशी देणार ह्याची मला खात्री आहे. मी मृत्यूला भीत नाहीं. किंबहुना लढाईत सांपडलेला वीर या नात्यानें मला वीराप्रमाणें गोळ्या घालून मारा असें मी म्हणत आहे, तरी मला हे लोक फांशीच देणार अशी माझी खात्री आहे. उलट त्यामुळें मी थोडा क्षुब्धच झालों आहे.' वरील शब्द ऐकतांच माझी जिज्ञासा जागृत झाली व 'क्षुब्ध!' असें प्रश्नवाचक उद्गार माझ्या तोंडांतून निघाले. भगतसिंग म्हणाले, 'होय. तुम्हाला माहीतच आहे कीं, दूर असलेला एखादा परदेश पाहण्याकरितां निघालेल्या तरुणांच्या मनाची स्थिति जशी असते त्याप्रमाणें मला वाटत आहे. ह्या जगांत काय आहे हें मी थोड्याफार प्रमाणांत पाहिलें आहे. आतां परलोकांत काय मौजा आहेत ह्या तरी पाहूं द्या. ह्या प्रश्नाकडे आपण मी म्हणता या दृष्टीनें पहा, म्हणजे माझ्या मनाची स्थिति तुमच्या लक्षांत येईल. फांसावरून पळून जावें हा आमच्या कटाचा केव्हांहि उद्देश नव्हता. हा राजकीय खून आहे व तो करणारे क्रांतिकारक राजकीय लोक आहेत. नुसते स्वार्थाकरितां खून दरवडे घालणारे 'मलंगी' नव्हत हें लोकांच्या लक्षांत यावयास पाहिजे होते. म्हणूनच आम्ही मागून जाहीर पत्रकें लावलीं. आम्ही कैदी झालों हेंच बरें झालें. कारण आतां सर्व गोष्टी उजेडांत येतील.

"आमच्या धोरणासंबंधीं आम्हास इतकेंच म्हणावयाचें कीं, लोकांच्या इच्छा तृप्त व्हाव्या, व त्यासुद्धां सरकाराविरुद्ध त्यांचीं जीं गाऱ्हाणीं असतील त्या बाबतींत सूड घ्यावा व त्या योगे लोकांची सहानुभूति मिळवावी. आमच्या मतें क्रांतिकारकांचें तत्त्वज्ञान व कल्पना लोकांच्या गळीं उतरावयाच्या असतील तर त्या फांसावर शौर्यानें चढणाऱ्या वीरांच्या तोंडून निघाल्या पाहिजेत. तरच त्यांत तेज आहे, वायफळ गप्पांत नाहीं. सरकाराशी प्रत्यक्ष लढाई करूनच आमच्या संघाचा निश्चित कार्यक्रम ठरवितां येईल असें आमचें मत आहे."

मात्र नवजवान पक्षांतील तरुण लोकांकरितां म्हणून भगतसिंगांनीं एक कैफियत लिहिली आहे. तींत तडजोड केव्हांहि करूं नये असें म्हणणाऱ्यांचें मत त्यांनीं खोडून काढलें आहे. तडजोड करावी लागते. ती करणें योग्य आहे असें त्यांनीं रशियाच्या इतिहासांतील अनेक उदाहरणांनीं सिद्ध केलें आहे. पण त्यांचें म्हणणें हें कीं, तडजोड करतांना आपलें सामर्थ्य आपण वाढवूं असा भरंवसा असेल तरच तडजोड करावी, एरवीं नाहीं. या लिखाणाच्या शेवटीं ते म्हणतात "या बाबतींतील माझ्या मतामुळें पुष्कळ गैरसमज होण्यासारखा आहे. माझें वर्तन जहाल क्रांतिवाद्यासारखें आहे. पण मी खुनी पक्षाचा नाही. मी उघड उघड क्रांतिवादी आहे. माझीं मतें तुरुंगांत आल्यावर बदललीं नाहींत. मी पूर्वीइतकाच उत्साही आहे. पण केवळ धाकदपटशानें सर्व कामें होणार नाहींत. इतर मुत्सद्दीपणा पाहिजे. नुसता बाँब टाकल्यानें उपयोग होणार नाहींच, पण कदाचित् नुकसानहि होईल."

म. गांधी व लॉर्ड आयर्विन यांच्यांत तात्पुरती तडजोड झाल्यानंतर सुखदेवांनीं गांधींना लिहिलेल्या पत्राचा पुढील भाग लाला लजपतराय यांनीं सुरूं केलेल्या लाहोरच्या 'पीपल' पत्रांत छापला आहे. सुखदेव या पत्रांत म्हणतात :—

"आपण तडजोड यशस्वी रीतीनें घडवून आणल्यानंतर जाहीर रीतीनें क्रांतिकारकांना अशी विनंति केली आहे कीं, त्यांनीं कांहीं दिवसपर्यंत तरी आपली चळवळ बंद ठेवावी व अनत्याचाराच्या तत्त्वांचा जय होण्यास क्षेत्र मोकळें करून द्यावें. खरोखर चळवळ मागें घेणें हें तत्त्वांच्या अगर भावनांच्या दृष्टीनें योग्य नाहीं. परिस्थिति तशी आली तरच पुढाऱ्यांनीं चळवळी मागें घ्याव्या.

"सलोख्याचीं व तडजोडीचीं भाषणें करतांना आपण सांगितलें आहे कीं, ही तडजोड आहे, शेवटचा तह नव्हे. आपण मागतां त्या सर्व सुधारणा मिळाल्या

तरी शेवटचा तह असें त्यांस म्हणतां येणार नाही. शिवाय लाहोरचा ठराव आहे; त्यांत स्वातंत्र्य मिळेपर्यंत युद्ध चालावयाचें असें ठरलें आहे. याचा स्पष्ट अर्थ असाच कीं, पुढील युद्धाकरितां अधिक सामर्थ्य उत्पन्न करण्याकरितां आपण विश्रांति घेत आहों. आमच्या पक्षाचें नांवच 'हिंदुस्थान सोशॉलिस्ट रिपाब्लिकन पार्टी' असें आहे. आम्हांला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे. समाजसत्ता-वादाच्या तत्त्वाप्रमाणें समाजरचना झाली पाहिजे व हें काम अर्धवटपणें होत नसतें. परंतु आम्ही आमचें धोरण पालटूं. क्रांतिवाद्यांच्या रीति बदलतात. कधीं उघड कधीं गुप्त. कधीं नुसती चळवळ तर कधीं प्राण देणें व घेणें. अशीं त्यांचीं स्वरूपें असतात. कांहीं विशेष परिस्थितींत आम्ही आमची चळवळ मागें घेऊं. पण तुम्ही कोणतीहि अशी कल्पना पुढें मांडली नाही. नुसत्या शब्दांनीं भावनांना हालवून विनंत्या करण्याचा उपयोग क्रांतिकारकांच्या बाबतींत होत नाहीं."

सरकारानें टिळकांना अत्याचारांना उत्तेजन देण्यासारखे लेख लिहिल्याच्या आरोपावरून शिक्षा देऊन ६ वर्षे काळेपाण्यावर पाठविले, तथापि पुढें ५-६ वर्षांत म्हणजे टिळकांच्या गैरहजेरींत हिंदुस्थानांत ज्या गोष्टी घडून आल्या, त्या लक्षांत घेतां टिळक मार्गातून बाजूला गेले तरी अस्वस्थता व अत्याचार या दोन्ही गोष्टी महाराष्ट्रांतच नव्हे तर इतर अनेक प्रांतांत सुरूं होत्या. सरकारची बेजबाबदार राज्यपद्धति, अधिकाऱ्यांची जुलुमाकडे प्रवृत्ति, लोकमताविषयीं बेगुमानपणा व प्रजेला स्वराज्याचे अधिकार देण्याची कुचराई, हींच कारणें असंतोषाच्या व अत्याचाराच्या मुळाशीं होतीं. सरकारला चळवळ्या लोकांची चळवळ दिसत होती, पण स्वतःच आपण या चळवळीला किती जबाबदार आहों याची जाणीव त्यांना नव्हती. आणि असली तरी शहामृग पक्षाप्रमाणें वाळूंत डोकें खुपसून, आपणाला जग दिसत नाहीं असा बहाणा सरकारनें चालविला होता. राज्यकारभारांत सुधारणा केल्यानें, लोकांना राज्यकारभाराची गोडी लावल्यानें, त्यांना अधिकार व जबाबदारी ही दोन्ही दिल्यानें असंतोष आपोआपच हटतो ही गोष्ट त्यांना पुढें कळून आली; पण तीच गोष्ट आधी दहा वर्षें कळती तर पुष्कळ अनर्थ टळले असते. महायुद्ध झालें तरी तो एक अत्याचारच होता; पण फार मोठ्या प्रमाणावर अत्याचार इतकेच काय ते. जर्मनीनें निरपराधी बेलजमवर स्वारी केली, फ्रान्ससारख्या बलाढ्य राष्ट्रावर प्राणसंकट ओढवलें, व युरोपांतील लहानसहान राष्ट्रांचें स्वातंत्र्य संपुष्टात

आलें; यामुळें प्रजास्वातंत्र्याची किंमत सरकारला कळली. पण या गोष्टीचें मर्म आधींच ओळखून व स्वातंत्र्य नसल्यानें हिंदुस्थानचे लोकाहि मनांतून कसे अस्वस्थ झाले आहेत याची थोडीशी कल्पना आणून जर त्यांनीं मोर्ले यांच्या सुधारणांची किडकिडीत करांगुली लोकापुढें न करतां आपल्या पांची बोटांचा हात स्नेहभावानें हिंदी लोकांच्या हातीं देण्याकरितां पुढें धरला असता, तर सरकार व हिंदी प्रजा या दोघांनाहि सुख लागले असते. दहा वर्षांनी पुढे केलेली गोष्ट आधी वेळींच करण्याला जी कल्पनाशक्ति लागते ती सरकारजवळ नसल्यानें, व प्राणावरच बेतेल तेव्हां प्रगतीचें पाऊल पुढें टाकण्याची धातुक संवय त्यांना असल्यानें, त्यांनी वेळींच जी हालचाल करावयास पाहिजे ती केली नाहीं, यांत हिंदी प्रजेकडे काय दोष ? अत्याचारांसारख्या गोष्टीनी आपली निराशा व्यक्त करणें हिंदी प्रजेला भाग पडलें, हा स्वतः सरकारचाच दोष नव्हे काय ?

" अत्याचार होत असले तरी आम्ही सुधारणा करण्याला मागें घेणार नाहीं " हे लॉर्ड हार्डींज यांचे बोल शहाणपणाचे व मुत्सद्दीपणाचे होते यांत शंका नाहीं; पण अत्याचाराशिवाय आम्ही जागे होत नाही, अशीहि कबुली खरोखर वरील शब्दावरोबरच द्यावयाला पाहिजे होती. उदाहरणार्थ, बंगालची फाळणी रद्द करणें ही गोष्ट साधी होती. यांत सरकारचे कांही खर्च होत नव्हतें. पण लॉर्ड मोर्ले यांनी फाळणीला वज्रलेपाचे स्वरूप दिल्यानें पुढे ओढवला तो अनर्थ लोकमताला मान देऊन आधीच फाळणी रद्द केली असती तर वांचला नसता काय ? आणि हा उघडा हिशेब सरळ असूनहि तो वेळेवर लक्षांत न घेऊन, उलट अत्याचारांची जबाबदारी योग्य मार्ग दर्शविणाऱ्या पुढाऱ्यांवरच सरकारनें टाकण्याचा प्रयत्न केला हा केवळ दुहेरी अन्याय होय ! पण सरकार व प्रजा यांच्या दरम्यान न्याय व अन्याय कोणाचा हे ठरविणारीं न्यायपीठें जगांत असत नाहींत. आणि हा न्याय देण्याचा ज्याचा अधिकार, तो परमेश्वर स्तब्ध बसून राज्यकर्ते व प्रजा यांच्या चुरशीच्या सामन्याचा खेळ पहात असतो म्हणूनच जगांत असले अन्याय होतात हे उघड आहे.

हिंदुस्थानांत चाललेल्या या खेळामध्यें दोन्ही बाजूंचे गडी अर्थातच तुल्यबल नव्हते. गरीब बिचारे निःशस्त्र प्रजाजन, ते सशस्त्र अशा साम्राज्याधिष्ठित सरकारशीं किती व कसे झगडणार ! यःकश्चित किड्यावर पाऊल पडलें तर तोहि उलटून चावतो म्हणतात. त्याप्रमाणें हिंदी प्रजेंतील निरनिराळ्या वर्गांत जे तेजस्वी

स्वार्थत्यागी व धैर्यशील लोक होते, त्यांनीं निर्वाणपदावर उभे राहून आपला राष्ट्रीय स्वाभिमान जगाला दाखविला, एवढी तरी गोष्ट कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. अशा लोकांत विद्वानांप्रमाणें अविद्वान सामील झाले, किंबहुना विद्वानापेक्षां अविद्वानच अधिक उत्साही व तेजस्वी ठरले. अशा लोकांत प्रौढ व वृद्ध यांच्याप्रमाणें तरुण पिढीहि आली,—किंबहुना प्रौढ व वृद्ध यांच्यापेक्षां तरुणच अधिक तेजस्वी ठरले. या दोन्ही गोष्टी स्वाभाविकच होत. कारण शिक्षण व वयोमान यांच्यायोगानें तेजावर एक प्रकारची झांपड पडते, व धडाडीचीं टोकें घासून निघाल्याप्रमाणें बोथट बनतात. पण ही गोष्ट हिंदुस्थानांतच घडली असें नाहीं तर जगांतील कोणत्याहि राष्ट्रामध्ये हाच अनुभव आलेला आहे.

रौलेट कमिटीनें आपल्या रिपोर्टाच्या अखेर या काळांत तीव्र स्वरूपाच्या राजकीय गुन्हेगारींत सांपडलेल्या, व ज्यांना प्रत्यक्ष शिक्षा झाल्या अशा, लोकांची एक जंत्री दिली आहे. ती बंगालपुरतीच आहे तरी बोधप्रद असून सर्व हिंदुस्थानाकरितां उपलक्षणात्मक मानता येईल. या जंत्रींत या लोकांचें वय, जात, धंदा वगैरे तपशील दिलेला आढळतो. तीवरून असें दिसतें कीं, १९०७ ते १९१७ या १० वर्षांत अशा गुन्हेगारांत शिक्षा झालेल्या किंवा मेलेल्या लोकांपैकीं १५ वर्षाच्या आंतील २१, २० वर्षाच्या आंतील ४८, २५ वर्षाच्या आंतील ७६, ३० वर्षाच्या आंतील २९, ३५ वर्षाच्या आंतील १०, ४० वर्षाच्या आंतील ९, ४५ वर्षाच्या वरचा १ असे इसम होते. यावरून या गुन्हेगारीचा मोसम मुख्यतः २५ वर्षापर्यंतच होता हे दिसून येईल. एकंदर १८६ लोकांपैकीं १२४ लोक १६ व २५ यामधील वयांचे निघाले, व तीस वर्षाच्या वरचे अवघे २० निघाले. यावरून काय अनुमान निघतें हें सांगावयालाच हवे काय ? जातीच्या दृष्टीनें असें आढळतें कीं वरील संख्येपैकीं ६५ ब्राह्मण, ८७ कायस्थ व १३ वैश्य जातीचे होते. बाकी सर्व इतर जातीचे. पैकीं पहिल्या तीन या बंगाल्यांतील मुख्य पुढारलेल्या जाती होत. महाराष्ट्रांत जशी ब्राह्मण जात चळवळींत पुढारी, तशी बंगाल्यामध्यें कायस्थ लोकांची जात पुढारी असल्याचे पूर्वीपासून प्रसिद्ध आहे व त्याचा अनुभव याहि बाबतींत आला. कायस्थांच्या खालोखाल ब्राह्मण वर्ग पुढें आला. यावरून राजद्रोही म्हणजे राष्ट्रीय भावनेची चळवळ करणारे लोक केवळ चित्पावन नसून इतरहि होते व असूं शकत हे दिसून येईल.

धंद्यांच्या दृष्टीनें पहातां तर ही जंत्री विशेष बोधप्रद आहे. कारण यावरून असें दिसून येतें कीं वरील संख्येपैकी ४८ विद्यार्थी, १६ शिक्षक, १९ जमीनदार २३ व्यापार उदीम करणारे, व बिनधंद्याचे असे २४ लोक होते. विद्यार्थ्यांची संख्या सर्वांत मोठी यावरून व १६ ते २५ वयांतील लोक १२४ होते यावरून, असे अनुमान उघडच निघतें कीं राष्ट्रीय भावना प्रदीप्त होण्याला व हातून त्या भावनेला अनुसरून कांहीं प्रत्यक्ष कार्य होण्याला विद्यार्थी हेच स्वतःची पात्रता सर्वांत अधिक सिद्ध करितात ! हे वय स्फूर्तिदायक असते पण अविचारीहि असतें; यामुळें या वयांतील थोडेबहुत शिक्षण मिळवून राष्ट्रबुद्धि विकसित झालेल्या मुलांच्या हातून धडाडीचीं कृत्यें होतात, व धडाडी म्हटली म्हणजे तिच्यापाठीमागें थोडा अविचारहि असतो हें वेगळें सांगावयास नको. अर्थात या वयांतील लोकांवर एका बाजूनें सरकारचा, व दुसऱ्या बाजूनें राष्ट्रीय पुढाऱ्यांचा डोळा असतो. पण तो निरनिराळ्या कारणांनी. केवळ राष्ट्रभावनेच्या दृष्टीनें पाहिलें असतां, स्वार्थत्यागाची तयारी हेंच मुख्य प्रमाण किंवा माप ठरतें. मग तो स्वार्थत्याग कोणत्याहि खात्यातला असो. तुरुंगांत जाण्यापेक्षां इतर प्रकारचा स्वार्थत्याग नसतो असें नाहीं. तुरुंगांत जाण्याची तयारी याचा अर्थ आपल्या कृत्याचे परिणाम भोगण्याची तयारी असा असल्यामुळें, नैतिकदृष्ट्या इतर स्वार्थत्यागाइतकीच याहि स्वार्थत्यागाची किंमत ठरते. अनुभवाप्रमाणें विचार, विचाराप्रमाणें संकल्प व संकल्पाप्रमाणें योजना व तयारी हा क्रम लक्षांत घेतला असतां, राष्ट्रीय चळवळीच्या या ७–८ वर्षांत तरुण मुलांनी आपापल्यापरीनें कार्यकुशलता व योजकता बरीच दाखविली होती याविषयी मात्र कोणासहि कबुली द्यावी लागेल. पराधीन स्थितींत महत्वाकांक्षेचा मोठा घांस घेणें हा कोणाहि तिऱ्हाइताला पोरखेळच वाटणार; पण चळवळीच्या दिवसांत वृद्धांनीं ज्याप्रमाणें तरुणांच्या बंडखोरीला व अत्याचाराला पोरखेळ म्हटले, त्याप्रमाणें या तरुणांनींहि साम्राज्याच्या सिंहासनावर बसलेल्या राज्यकर्त्यांपासून स्वराज्याची योजना किंवा मागणी करण्याकरितां होणाऱ्या सनदशीर चळवळीच्या पुढाऱ्यांचे उद्योग हे पोरखेळच मानले.

रौलेट कमिटीनें या काळांतील एकंदर गुन्हेगारीचा हेतु दंडेलीनें हिंदुस्थानांतून इंग्रज सरकारला घालवून देण्याचा होता असा सरसकट शेरा मारला आहे. या हेतूच्या पोटांत साधनवैचित्र्यामुळें खुनापासून चोरीपर्यंत अनेक प्रकारची गुन्हेगारी आली, तथापि हेतु तोच व एकच, याविषयीं कमिटीनें ना-

कबुली दिलेली नाहीं. कमिटीच्या रिपोर्टाच्या ४ थ्या व ५ व्या भागांत गुप्त-मंडळ्या व त्यांचे उद्योग त्यांचीं जीं विविध वर्णनें दिलीं आहेत तीं वाचलीं असतां उद्योग, धाडस, कल्पकता, चातुर्य, कलाकौशल्य हे गुण प्रकट झालेले दिसतात. या चळवळींत चोऱ्या झाल्या, दरोडे घातले गेले, हत्यारें चोरण्यांत आलीं, परदेशाहूनहि हत्यारें आणविण्यांत आलीं, हत्यारांचें शिक्षण देण्याचे वर्ग काढण्यांत आले, गुप्त मंडळ्या स्थापन करण्यांत आल्या, मंडळाच्या उज्ज्वल उद्देशपत्रिका लिहिल्या गेल्या, शिस्तीचे नियम बांधले गेले, जाहीरनामे प्रसिद्ध झाले, शत्रूंना व मित्रांना खलिते लिहिले गेले, 'सहकारी' तिजोऱ्या स्थापल्या गेल्या, कारभाराचे हुकूम सुटले, राज्यशासनाचा मायना तयार झाला, गुप्त न्यायकोर्टें स्थापलीं गेलीं, गुन्हेगारीच्या चौकशा झाल्या, शिक्षा फर्माविण्यांत व बजाविण्यांत आल्या, गुप्त बातमीचे टपाल, तारायंत्र, तसेंच कही व रसद पोचविण्याचे मार्ग आंखले गेले, बाँब-गोळ्याचे 'तोफखाने' चालविण्यांत आले, सेनापति उपसेनापति नेमण्यांत आले, गुप्त हेरांची योजना झाली—तात्पर्य, राष्ट्राराष्ट्रांमध्ये युद्ध सुरू असतां जे प्रकार अवश्य असतात किंवा केले जातात ते सर्व या तरुण लोकांनी केले. यांत बुद्धि प्रतिभा वगैरे अनेक गुण बऱ्याच प्रमाणावर खर्ची पडले होतें; पण युद्ध यशस्वी होण्यासारखी स्थिति नसल्यामुळें कोणत्याहि अयशस्वी चळवळीच्या वांट्याला जो उपहास ठेवलेला असतो तो याहि चळवळीचा आला. या चळवळींत पडलेले शेंकडा शंभर लोक सद्-गुणी किंवा शुद्ध बुद्धिचे होते असे कोणीहि मानले नाहीं. तथापि इतर गुन्हेगारांपेक्षां या गुन्हेगारीचा प्रकार वेगळा होता याविषयी सरकारलाच कबुली द्यावी लागली. या लोकांना स्फूर्ति कोणाकोणापासून मिळाली याविषयीं रौलेट कमिटीनें चिकित्सा केली आहे. त्यांत 'युगांतर' वर्तमानपत्रापासून तो भगवद्गीतेपर्यंत, व टिळक अरविंद घोष यांच्यापासून शिवाजीपर्यंत सर्वांचीं नांवें घेण्यांत आलीं होतीं. बंगाल्यांत विवेकानंद रामकृष्ण परमहंस वगैरेचीं नांवें प्रांतीय वैशिष्ट्याची म्हणून नमूद झाली होतीं. एका दृष्टीनें राष्ट्रीय स्फूर्तीच्या उगमाचा हा निर्देश खरा मानावा लागतो; पण तो इतक्या अर्थानेच कीं जसा सर्व प्रकारच्या तेजाचा व उष्णतेचा उगम सूर्य व अग्नि हा होय. पाकसिद्धी करणारा अग्नि, तसाच घरें जाळणाराहि अग्नीच असतो. आणि जीवमात्र चैतन्याने अंकुरित होण्याला जसा सूर्यकिरण उपयोगी पडतो, तसेच विशेष कांचेंतून सूर्यकिरण पाडले असता तो घातक अग्नीचें काम करतो. गुन्हेगारींत सांपडलेल्या लोकांनीं वर सांगितलेलीं मोठमोठीं

नांवें गुरुस्थानीं म्हणून घेतलीं यांतहि शंका नाहीं; पण गुरूनें निर्विकल्पक ज्ञान कोणतें दिलें व शिष्यानें कोणत्या समजुतीनें कोणत्या सविकल्पक कार्याकडे त्याचा उपयोग केला हा प्रश्न निराळा. मात्र या चळवळींत झालेल्या अत्याचाराकरितां सरकारनें टिळकांसारख्या लोकांना जबाबदार धरून शिक्षा दिल्या तरी हें दूषण खोटें होतें; व कोणाला मंडाले येथें पाठवून तर कोणाला आपल्या पायानें पांदेचरी-ला घालवून बाजूला केले तरी चळवळ थांबली नाहीं व थांबणेंहि शक्य नव्हतें.

या उग्रबलोपासक किंवा क्रांतिकारक चळवळीसंबंधानें माझीं मतें काय आहेत याचें दिग्दर्शन वर झालेंच आहे. अशी चळवळ करणाराविषयीं मी केव्हांहि अनादर दर्शविला नाहीं. इतर कार्यांत त्यांच्याशीं संबंध सहवास सहकारिता उप-स्थित झाली तर ती टाळली नाही. उलट त्यांच्याशीं स्नेहभावानें वागलों व शक्य ती मदतच केली. या विषयासंबंधानें कांहीं पत्रें देतों.—

( ता. २८।१।१९३० ) लाहोरच्या कटांतील आरोपींनी अन्नसत्याग्रह केल्यामुळें आणि यतींद्रनाथ दास यांच्या बलिदानामुळें अनेक प्रांतांत जेल चौकशी कमिटी नेमणें सरकारास भाग पडलें. कांहीं जुजबी सूचना या कमिटीनें केल्या, पण सरकार हा प्रश्न पुनः अंगाबाहेर टाकीत आहे म्हणून लाहोर खटल्यांतील आरोपींनीं पुनः अन्नत्याग करावयाचे ठरविले आहे. होम मेंबरशी चर्चा करून तुम्ही या प्रश्नाचा कांहीं निकाल लाऊन घेईपर्यंत तरी त्यांनी अन्नसत्याग्रह करूं नये अशी मी त्यांना सल्ला दिली आहे. तरी होममेंबरला लिहिणें भेटणें बोलणें, अगर असेंब्लींत प्रश्न विचारणें, वगैरे तुम्हाला जो मार्ग योग्य दिसेल तो पत्करून तुम्ही हा प्रश्न तांतडीनें हातीं घ्यावा. कारण शिक्षा झालेल्या किंवा अंडर ट्रायल म्हणून कच्च्या कैदेत असलेल्या कैद्यांची स्थिति फारच शोचनीय झाली आहे. दुसरा गोष्ट हद्दपार झालेल्याविषयीं. हिंदुस्थानाबाहेर किती तरी देशभक्त खित-पत पडले आहेत कीं, त्यांना हिंदुस्थानांत परत येतां येत नाहीं. १९०७ सालीं प्रसिद्धीस आलेले ( भगतसिंगाचे चुलते ) अजितसिंग यांची प्रकृति आणि आर्थिक स्थिति सध्या फार ग्वालावली आहे तरी या लोकाविषयीहि तुम्ही प्रयत्न कराल अशी आशा आहे. ( डॉ. सत्यपाल, लाहोर. )

( ता. १२।२।१९३० ) कृपा करून पुण्याला तार करून आम्हाला मराठी इंग्रजी डिक्शनऱ्या पाठवा. रानडे आपटे व मोल्सवर्थ यापैकीं जी चांगली

मिळण्यासारखी असेल ती धाडा. आम्हाला १९२४ व २५ सालचे असेंब्लीचे रिपोर्टहि लागतील. ( एस्. ए. डांगे, मिरत जेल. )

( ता. १५।२।१९३० ) आमच्या खटल्याच्या उपयोगाकरितां मी व इतर आरोपींनी सरकारकडे कांहीं पुस्तकांची मागणी केली आहे. ती हातीं येईपर्यंत इतरांच्या मदतीवरच अवलंबून राहावें लागणार. आम्हाला तुमच्याकडून रेल्वे-बोर्डाचा या व गेल्या वर्षाचा रिपोर्ट, तेलाच्या खाणीसंबंधीं टॅरिफ-बोर्डाचा, तसेंच खरकपूर रेल्वे सत्याग्रहासंबंधी चमनलाल यांनीं असेंब्लींत केलेल्या भाषणाची प्रत पाहिजे आहे. आम्हाला ज्या ज्या वस्तु लागतील त्या आम्ही तुम्हांपाशीं मागत जाऊं ! तुम्हाला मात्र त्या पाठविण्यास भुर्दंड पडेल. पण त्याला मजजवळ सध्य कांहींच उत्तर नाहीं. ( एस्. ए. डांगे, मिरत जेल. )

( ता. २६।६।१९३० ) माझ्या पत्रानुसार तुम्ही केसरींत एक स्फुट लिहून मिरत आरोपीच्या बचावाकरितां लोकांनी मदत करावी व पैसे येथें डिफेन्स कमिटीकडे पाठवावें अशी सूचना केली त्याबद्दल आभारी आहे. सेंटूल डिफेन्स कमिटीचे तुम्ही एक सभासद असून या कामीं विशेष लक्ष पुरविलें आहे. (एस्. ए. डांगे, मिरत जेल.)

( ता. २९।२।३१ ) आमचे येथे ( मिरत येथील कोर्टांत ) आलां तेव्हां मंडळींची गर्दी असल्यामुळे इतक्यादेखत उघडपणे मानलेले आभार औपचारिक दिसतील म्हणून ते तेव्हां मानले नाहींत. शिवाय तुमच्यासारख्या वडील माणसापुढें मी आभारप्रदर्शन करणें हें अमर्यादेचें वाटून मी तेव्हां मनांत ते शब्द आवरले. परंतु आतां हें पत्र लिहून कळवितों की तुम्ही मला जी निरनिराळ्या प्रकारें पुष्कळ मदत केली तिजबद्दल आभार मानावे तेवढे थोडेच होतील. तुम्ही गेल्यानंतर मी आपल्या बायकोला तार केली आणि सरदारगृहांत तुमची गांठ घेऊन तुम्ही दिलेली पुस्तकें कागदपत्रें वगैरे तुम्हांला परत देण्याविषयीं कळविलें आहे. तुम्ही दिलेल्या रकमेपैकीं तीस रुपये XXXXयांना दिले. कालचक्राचा तडाका आणि विध्वंसाचें कार्य यांतूनहि निभावून जाऊन तुरुंगांतून सुटून तुम्हाला येऊन भेटेन अशी मला बळकट आशा वाटते. ( एस्. ए. डांगे, मिरत जेल. )

( ता. १९।४।३१ ) रा. रा. डांगे यांस—तुमचें पत्र पोंचलें. तुमचा खटला बेसुमार लांबून तुम्ही सुमारें २॥ वर्षें कच्च्या कैदेंत आहा हें पाहून फार वाईट

वाटलें. कांहीं अमेरिकन कम्यूनिस्ट व क्रांतिकारक यांचे खटले सात सात वर्षे लांबल्याचीं उदाहरणें आहेत. पण हिंदुस्थानांत इतकी वर्षे लांबलेला खटला हा तुमचाच पहिला असे म्हटले पाहिजे. कैद टळत नाही म्हणून कसा तरी हा काळ कंठला पाहिजे. ध्येयवादी मनानें तुम्ही ज्या हालअपेष्टा सोशीत आहा त्याबद्दल मला फार कौतुक वाटते. हिंदुस्थानांत समाजसत्तावाद कितपत श्रेयस्कर होईल याबद्दल माझा तुमच्याशी मतभेद आहे. तथापि अभ्यासपूर्वक या विषयांत शिरून आपल्या मताची कांस धरण्यांत व त्याकरितां हाल सोसण्यांत तुम्ही जी चिकाटी व धैर्य दाखविलें तीं कौतुकास्पद आहे. डॉ. मुंजे हे हिंदी तरुणांच्या लष्करी शिक्षणाकरितां आणि लष्करी नोकरांच्या हिंदीकरणाकरितां खटपट करतात याचें स्वारस्य तुमच्या लक्षांत नीटसें आलेलें दिसत नाही. हिंदुस्थानांत बेकारी नाहींशी करतां आली तर ती डॉ. मुंजे यांना नको असे नाही. पण हिंदुस्थानला स्वतःचे हिंदी सैन्य नको अशी जर तुमची कल्पना असेल तर ती मात्र डॉ. मुंजे यांना कधीहि पटणार नाही. सोव्हिएट रशियाला स्वतःच्या सत्तेचें अस्तित्व राखण्यास जर सैन्याची गरज नको असे होत नाहीं तर, रशियानें बेकारीचा प्रश्न सोडविला आहे हें गैरलाग म्हणणे पुढे करण्यांत अर्थ काय ? हिंदुस्थानचें रक्षण हिंदुस्थानच्या सुपुत्रांनींच करावें, व हिंदुस्थानला पूर्ण स्वराज्य ताबडतोब मिळावें या दोन गोष्टींबद्दल तरी तुमचा आमचा मतभेद असेलसें वाटत नाहीं ! तथापि, भावी राज्यघटनेचें स्वरूप समाजसत्तावादाचें असावें अगर दुसऱ्या कोणत्या वादाचें असावें याची, स्वराज्य मिळविण्यापूर्वी, आजच चर्चा करीत बसण्याचें स्वारस्य कोणतें ? एकच एक व्यक्ति किंवा व्यक्तिसंघ यांच्यापेक्षां समाज हा अधिकारानें केव्हांहि मोठा आहे, व आपणांस कोणती कशा प्रकाराची राज्य-घटना हवी हें समाजानें स्वातंत्र्य मिळाल्यावर हवें तसें ठरवावें ! असो, आज तुमच्या बाबतीत माझें पाहणें इतकेंच कीं, सेशन जज्जाकडून तुम्हाला योग्य न्याय मिळावा, व तुम्हाला शिक्षा झाली तरी सुद्धां ती भोगल्यावर पुनः देशकार्य करण्याला तुम्ही परत यावें अशी मी आशा करितों.

" मृत्यूच्या दारांत गेलेले कांहीं देशभक्त त्यांच्या सुदैवानें पुनः लोकांत येऊन देशकार्य करण्याची त्यांना संधि मिळाली अशी कांहीं उदाहरणें मी पाहिली आहेत. देव करो आणि तुमच्याहि बाबतींत तसेंच घडो. तुम्ही स्वतःची स्वतंत्रता नष्ट होऊन तिकडे हालअपेष्टा भोगीत असतां, आम्ही लोक इकडे

मोकळे आहो ही गोष्ट मनाला डांचल्याशिवाय रहात नाहीं. असेंहि मनांत येतें कीं, आम्हा तुरुंगाबाहेर रहाणाऱ्या मंडळींच्या आयुष्यांतील कांहीं वर्षे काढून घेऊन, तुरुंगांत हाल कंठीत असलेल्या लोकांचे जीवन जर सुखी करतां येण्याची युक्ति परमेश्वर काढील तर किती बरें होईल !

" रा. निमकर यांच्याकडून पत्र येऊन एखादे वेळीं तुमच्या खटल्याची हकीकत कळते.

" ज्युबिलीनिमित्त केसरीचा मोठा बडेजाव आम्ही केला असेल अशी तुमची कल्पना दिसते. पण तसें कांही एक नव्हते. नित्यक्रमांतील एक अवश्य कर्तव्य म्हणून येणारी ती गोष्ट होती. केसरीला ५० वर्षे पुरी झालीं, आणि तीं पुरी झालेली पाहण्याला मी जगलों हीच गोष्ट माझ्या दृष्टीनें विशेष होय. पण हा समारंभ करतांनाहि भोंवताली सरकारच्या दडपशाहीमुळें जी अशांतता निर्माण झाली होती, ती पाहून मात्र मन अस्वस्थ झालें होतें यांत शंका नाहीं. केसरी-प्रबोध ग्रंथाची प्रत आज पाठविली आहे. तुमचेकडे असलेलीं पुस्तकें खटला संपल्यावर सावकाश इकडे पाठवून द्यावी. त्यांची घाई नाहीं." ( न. चिं. केळकर.)

---

## ( ११ ) न्यायकोर्टाशीं ऋणानुबंध

न्यायकोर्टाशीं माझा संबंध वकील या नात्यानें जितका आला त्यापेक्षां पक्षकार या नात्यानें अधिक आला ! साताऱ्यास मी अवघी नऊ महिनेच वकिली केली; व त्या अवधींत मला सुमारें तीन-चारशें रुपये प्राप्तिहि झाली. तथापि घरीं कचेरी म्हणून नाहीं व कारकून तर नाहींच नाहीं. मिळाले त्यांतलें बरेचसें काम फौजदारी स्वरूपाचें होतें. एक सेशन केसहि मिळाली, पण खुनाच्या खटल्यांत ज्याला वकील देण्याची ऐपत नाहीं असा आरोपी असला म्हणजे सरकार आपल्या खर्चानें त्याला वकील देते तसली ! वकील फी रोजीं दहा रुपयेच असल्यामुळें हें वकीलपत्र म्हणजे नव्या तरुण व विशेष काम नसलेल्या वकिलालाच वर्णीदाखल मिळतें. नवीन बी. ए. झालेल्या मुलाला ज्याप्रमाणें युनिव्हर्सिटीच्या परीक्षांचे प्रसंगीं सुपरवायझरशिप मिळते त्यांतलाच हा प्रकार असतो.

मी अगदीं अल्पवयांत एल्एल्. बी. होऊन वकिली करूं लागलों यामुळें माझें कौतुक जे अनेक लोक करीत त्यांतलेच एक सातारा येथील डिस्ट्रिक्ट जज्जाचे शिरस्तेदार हे होते. त्यांनीं हें वकीलपत्र मला दिलें. खुनाचा मुकदमा आणि दोन दिवसांत मिळून वीस रुपये प्राप्ति असा तो त्यावेळीं मोठेपणाचा प्रकार होता. आरोपी एक खालच्या जातींतील बाई असून तिला मुकदम्यांतील माहिती विचारली तर धडपणें सांगताहि येत नव्हती. आणि मी वकिलहि तसाच नवा कोरा! मुकदम्यांत बचाव करण्यासारखी स्थितीच नव्हती. बाईचा जवळ जवळ कबुलीजबाबच होता. तथापि कांहीं साक्षीपुरावा झाला, व वयाच्या तेविसाव्या वर्षी खुनी मुकदम्यांत साक्षीदाराची उलट तपासणी करण्याचा मान मला मिळाला! या नऊ महिन्यांत मी दोन दिवाणी अपिलें असिस्टंट जज्जापुढें चालविलीं. पैकीं अपेलंटतर्फे ज्या अपिलांत होतों त्यांत यश आलें नाहीं व रेस्पॉडन्टतर्फे ज्यांत होतों त्यांत यश आलें! अर्थात हें पन्नास टक्के यश व पन्नास टक्के अपयश ही गोष्ट अपीलांच्या कामीं होणारी नेहमींचीच घडली. पण मला पक्के स्मरतें की यापैकी एका अपिलांत विरुद्ध पक्षाला पुढारलेल्या वकिलांपैकीं एक गृहस्थ काका कुबेर नांवाचे होते, त्यांनीं काम संपल्यावर मला सांगितलें कीं, "तुम्ही खरोखरच अपील चांगलें चालविलें."

मी साताऱ्यासच वकिली करीत राहिलों असतों तर आज जुन्यांतला जुना एक वकील म्हणून असावयाचा. आणि सामान्य रीत्या घरदार बांधून चार पैसे अधिक बाळगून मी राहिलों असतों असा संभव होता. परंतु मी वकील व्हावें हा योग नव्हता. पुण्यास आल्यावरहि वर्तमानपत्राचें काम संभाळून वकिली करतां आली तर पहावी असा थोडासा प्रयत्न मी केला, पण तो फारसा साधला नाहीं. कारण दोन ठिकाणीं लक्ष व त्यांतूनहि वर्तमानपत्राकडे अधिक लक्ष. यामुळें वकिलीच्या कचेरीत जितकी बैठक पाहिजे तितकी नाही. कोर्टातून वावरणें नाहीं. मिळून वकिलीचा बस बसण्याला ज्या गोष्टी अवश्य त्या नव्हत्या. तथापि मॅजिस्ट्रेट कोर्टात कांहीं मुकदमे मला मिळाले. त्यांत गोंदवलेकर महाराजांचें एक वकीलपत्र होतें! तसेंच शेतकी ॲक्टाप्रमाणें नेमलेल्या फिरत्या स्पेशल जज्जापुढें चालविण्याची कांही कामें मिळालीं. अर्ज वगैरे लिहून देण्याचे बरेंच कामहि मधून मधून मला मिळत असें. पुढें कोर्टात जाण्याचें मी अजिबात सोडून दिलें. पण अर्ज वगैरे लिहिण्याचें काम मधून मधून सात आठ वर्षें करीत असें; व त्या कामांत घरबैठी

प्राप्तिहि कांहीं होत असे. पण १९१० पासून, म्हणजे मी केसरीचा कायम संपादक झाल्यापासून, वकिली तर नाहींच पण अर्ज कैफियती लिहून देण्याचें कामहि थांबविलें.

बिनपगारीं वकीलपत्रेंहि माझीं अनेक दाखल झालीं, तीं बहुतेक ताईमहाराज केस प्रकरणीं. औरंगाबाद व उमरावती येथील कमिशनपुढें मी टिळकांच्या बरोबर त्यांचा वकील म्हणून होतों; व अनेक साक्षीदारांच्या जबान्या मी घेतल्या. क्लेमंटसाहेब, स्पेशल मॅजिस्ट्रेट, यांच्या कोर्टांत दादासाहेब करंदीकरांच्या बरोबर माझींहि वकीलपत्र दाखल होतें.

केवळ टिळकांचा एक दुय्यम प्रतीचा मदतनीस व वेळीं पुढें करण्याला व किरकोळ काम उरकण्याला लागणारा एक वकील इतकाच मी होतों. तरी पण या नात्यानेंहि काम करण्यांत माझा इतका वेळ गेला कीं तेवढ्या वेळांत माझे दोन तीन ग्रंथ लिहून झाले असते !

१९०१ साली ताईमहाराज प्रकरणाला सुरुवात झाली. या प्रकरणाचा सविस्तर वृत्तांत मी टिळकांच्या पुरता टिळक–चरित्र खंड २ यांत दिला आहे. येथें फक्त माझ्यापुरती हकीकत सांगतो. एके दिवशी धोंडोपंत येऊन सांगूं लागले की, 'उद्यांपासून तुम्हांला दादांच्या बरोबर डिस्ट्रिक्ट कोर्टांत यावयाला पाहिजे. त्याप्रमाणें कामाची व्यवस्था करीत जा.' कारण विचारतां असें समजलें कीं, "कै. बाबामहाराजांच्या टिळक-प्रभृति ट्रस्टींना डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून मिळालेलें प्रोबेट व मुक्त्यार पत्र रद्द करण्याचा अर्ज ताईमहाराजांनीं केला त्याची चौकशी सुरूं आहे; आणि पक्षकार या नात्याने टिळकांची जबानी होत असून टिळकांच्यावर कांहीं कांहीं गुन्हे केल्याची तोहमत आणण्याचा विचार डिस्ट्रिक्ट जज्ज मि. ॲस्टन यांचा उघड दिसूं लागला आहे. स्वतः टिळक कोर्टांत हजर असतात पण ते पिंजऱ्यांतील साक्षीदार म्हणून. डिस्ट्रिक्ट कोर्टातील वकील रा. वाकनीस यांना टिळकांतर्फे वकीलपत्र दिलें आहे. पण आपला कोणीतरी माणूस जबान्या टिपून घेण्याला किंवा वकिलाला इतर रीतीने मदत करण्याला असावा हें बरें." ही मदत करतां यावी म्हणून दुसरें दिवशीं माझें एक वकीलपत्रहि दाखल करण्यांत आलें.

तेव्हांपासून इकडे 'मराठा'पत्राचें काम संभाळून रोज कोर्टांत राहणें हेंहि माझें एक काम होऊन बसलें, व तें पुढें मधून मधून पण दोन तीन वर्षे टिकलें.

टिळकांच्या उलट तपासणीला ( आणि या उलट तपासणींत ताई-महाराजांच्या वकिलापेक्षां ॲस्टनसाहेबच अधिक करून भाग घेत होते ) जसजसा रंग चढूं लागला तसतसे त्याला दिवाणीपेक्षां फौजदारी खटल्याचेंच स्वरूप अधिक येत चालले. अशा वेळीं बाकीचे वकिलांनीं टिळकांना धीर द्यावयाचा तो सोडून "हें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाही" असें म्हणून भीतीनें त्यांनीं स्वतःच इतके हातपाय गाळलें कीं, त्यांचें वकीलपत्र रद्द करून दुसरा वकील टिळकांना द्यावा लागला ! शेवटीं शेवटीं ॲस्टन साहेबांची वर्तणूक इतकी अपमानास्पद होऊं लागली कीं, टिळकांची जबानी संपल्यानंतर पुढे त्यांच्या कोर्टात हजरहि राहूं नये असें सर्वानुमतें ठरलें; व सर्व पुरावा संपल्यानंतर टिळक व इतर ट्रस्टी यांच्यातर्फे जी समारोपादाखल तकार सांगावयाची त्याचें काम टिळकांनी मला सांगितलें. टिळकांनीं अर्थात् सविस्तर टिपण करून दिलेंच होतें, व त्यावरून मी तोंडीं तकार तास दीड-तास सांगितली.

पुढें स्पेशल मॅजिस्ट्रेट क्लेमंट्ससाहेब यांच्यापुढें सुमारें दीड वर्ष फौजदारी खटला चालला. त्यांत माझें वकीलपत्र दाखल होतेंच; व टिळकांतर्फेचा पुरावा सुरू असतां रा. करंदीकर वकील मधून मधून आयत्यावेळी न आल्यानें साक्षीदार तपासण्याचें काम मला करावें लागलें.

ॲस्टन साहेबांच्या प्रतिकूल निकालानंतर टिळकांवर मॅजिस्ट्रेटी काम सुरू झालें. तेव्हां पुष्कळ लोकांना असें वाटे की हरप्रयत्नानें कांहीं तरी समेट करून हें प्रकरण मिटवावे. कारण दिसण्यांत खासगी स्वरूपाचा फौजदारी खटला दिसला, तरी दुसऱ्या बाजूला सरकारची मदत सर्वस्वी होती. आणि खोटी साक्ष देणें, खोटे कागद करणें, असल्या गुन्ह्याकरितां टिळकांना शिक्षा झाली तर ती बेअब्रू विशेष प्रकारची म्हणून ती टाळावी असें सर्वांना सहजच वाटे. या प्रयत्नांत माझ्या हातून भोळेपणानें एक गोष्ट होऊन गेली तिची मला अजून आठवण येते.

माझे मित्र विनायकराव रानडे, एल्एल्. बी., व काका गोखले हायकोर्ट वकील, हे कांहीं अंशीं ताईमहाराजांचे पक्षपाती असें गणले गेले होते. वास्तविक ताईमहाराजांपेक्षां टिळकांविषयीच त्यांची आदरबुद्धि अधिक. पण ते ताईमहाराजांच्या शेजारीं रहात असल्यामुळें त्यांचा पक्षपात शेजारधर्माचा म्हणून सहज होता. हे दोघे स्नेही एकदां मजकडे येऊन म्हणाले कीं "आम्ही स्वतः औरंगाबादेकडे जाऊन

प्रकरणाचा तपास करून मनाची खात्री करून घेऊन येणार आहों, व आम्ही खात्री होऊन आलो म्हणजे फौजदारी काम थांबविण्यांत शक्य तितकी मदत टिळकांना करूं.'' टिळकांच्या बाजूला खरेपणा असल्यामुळें मला ही गोष्ट बरी वाटली; व टिळकांना न विचारतां मी या दोघांच्या नांवें प्रो. जोगळेकर यांजकडे ओळखीचें व कांही अंशीं भलावणीचें पत्र दिलें. परंतु हे दोघे तिकडे गेल्यावर कज्जांतील साक्षीदारापर्यंत पोंचण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां प्रो. जोगळेकर यांना संशय आला, व त्यांनीं माझें पत्र आपल्या पत्रांत घालून टिळकांच्याकडे पाठविलें. तें पाहातांच टिळकांना सहजच फार राग आला. माझ्या पत्राचे परिणाम कदाचित् कोठवर जाऊं शकले असते याचीहि कल्पना त्यांनीं मला आणून दिल्यावर, मी केलें तें चांगल्या हेतूनें केलें असलें तरी वस्तुतः अविचाराचें व भोळेपणाचें होय अशी माझी खात्री पटली. त्याबद्दल मला फार वाईट वाटलें; व लगेच मी टिळकांची क्षमाहि मागितली. पण टिळकांनाहि माझा खरा हेतु लक्षांत आला होता म्हणून त्यांनींहि पुढें माझ्यासंबंधानें या प्रकरणांत कोणताहि अविश्वास दाखविला नाही. आणि वर सांगितल्याप्रमाणें माझें वकीलपत्र दाखल करून औरंगाबाद व उमरावती येथील कमिशनचें कांहीं काम मजकडून करून घेतलें.

वकील या नात्यानें माझा न्यायकोर्टाशीं जो संबंध आला त्याचा आढावा हा इतकाच. पण पक्षकार या नात्याने न्यायकोर्टाशीं माझा संबंध गेल्या पस्तीस चाळीस वर्षांत मधून मधून येतच गेला. सन १९०३ सालीं मी गायआळींतील घर विकत घेतलें त्याबरोबर कोर्टातील थोडेसें भांडणच विकत घेतलें असें झालें. कारण मला घराच्या कांहीं भागाचा ताबा घेण्याला मामलेदारी व दिवाणी कोर्टांत फिर्यादी कराव्या लागल्या. आणि उलट चालू वहिवाटीला हरकत केली या खोट्या सबबीवर मजवर आकसानें फौजदारी फिर्यादहि झाली. या वेळीं क्रॉससाहेब हे सिटी मॅजिस्ट्रेट होते. खटला आठ वेळ पुकारला गेला पण चालला नाहीं; व प्रत्यक्ष निघाला तेव्हां दहा मिनिटांत तो संपून मी निर्दोषीहि ठरलों. परंतु आरोपी म्हणून सातआठ वेळां कोर्टांत खेपा घालाव्या लागल्या.

खासगी बेअब्रूच्या फिर्यादी मजवर दोन तीन वेळां झाल्या. अर्थात त्या केसरीतील मजकुराबद्दल. एकदां बाईचे भाऊशास्त्री लेले यांच्याबरोबर एका अगम्य-प्रकरणांत मजवर फिर्याद झाली. पण कोर्टांत हजर न राहाण्याची मला

परवानगी मिळून माझ्या गैरहजेरींतच मला निर्दोषी म्हणून सोडून देण्यांत आले.

एका बेअब्रूच्या फिर्यादींत मात्र मजवर चार्ज ठेवून नंतर मला निर्दोषी ठरवून सोडून देण्यांत आले. ही फिर्याद केवळ चुरशीची होती. त्यावेळीं मी म्युनिसिपालिटीचा व्हाइस-प्रेसिडेंट होतों, व निवडणुकीच्या याद्या कमिटीनें अगदीं वाईट केल्या असा गिल्ला करून किर्लोस्कर थिएटरांत डॉ. गर्दे यांच्या अध्यक्षतेखालीं एक जाहीर सभा भरली. तिला मी "उपद्याप" असें केसरींत म्हटलें. त्यावरून डॉ. भिडे या नांवाच्या एका गृहस्थांनीं मजवर सिटी मॅजिस्ट्रेट मि. वाच्छा यांच्यापुढें बेअब्रूची फिर्याद केली. या फिर्यादीतील माझें काम मीच चालविलें. उलट बाजूचे वकील कै. लक्ष्मणराव आपटे हे होते. पण अखेर केसरीनें लिहिले यांत खोटें किंवा बेअब्रूकारक कांहीं नव्हते असें ठरवून मॅजिस्ट्रेट यांनीं मला सोडून दिलें.

परंतु खासगी लोकांच्या बेअब्रूच्या फिर्यादींत मला जें यश आलें तें न्यायकोर्टाच्या बेअदबीच्या सरकारी प्रकरणांत आलें नाहीं. यांतील पहिला खटला १९०८ सालीं मजवर झाला. न्यायमूर्ति दावर यांनीं टिळकांना शिक्षा देतांना जे कांहीं अपमानकारक उद्गार काढले त्यावर, व अर्थात सहा वर्षांच्या काळे पाण्याच्या शिक्षेवरहि, रागावून मी न्यायमूर्ति दावर यांच्यावर 'मराठ्यां'त खरपूस तोडमुख घेतलें. तो लेख खरोखरच इतका चांगला वठला होता कीं खुद्द नामदार शास्त्री यांनीं तो वाचून असे उद्गार काढले कीं "यांतला एक शब्दहि बदलणें म्हणजे तें पाप करण्यासारखें होईल!" पण त्या पुण्याचा मला अपकारच झाला. कारण चौदा दिवस कैद, शेवटी माफी, व भरीला बाराशें रुपये दंड, इतकीं प्रायश्चित्तें मला त्या पुण्याकरितां घ्यावी लागलीं. माझा खटला न्या. स्कॉट व न्या. बॅचलर यांच्यापुढें निघाला. आरोपीनें ऑफिडेविट प्रथमच करावयाचें असतें त्यांत मी माफी मागावी असें पुष्कळांचें म्हणणें होतें. परंतु माफी मागणें म्हणजे "खरें म्हणून वाटलें तें लिहिण्याचा अभिमान गमाविल्यासारखा होतो. म्हणून माफी मागूं नये" हें माझें, व मजप्रमाणें मत असणाऱ्या इतर कांहीं लेखांचें, म्हणणें प्रभावी होऊन मी बिनमाफीची कैफियत दिली.

माझ्यातर्फे बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांनीं काम चालविलें. खटल्याची सुनावणी दोन वेळां होऊन दुसऱ्या खेपेस कोर्टानें मला दोषी ठरविलें व चौदा दिवसांची

कैद, बाराशें रुपये दंड, व चौदा दिवसानंतरहि योग्य शब्दांनीं माफी मागेपर्यंत बिनमुदतीची कैद, अशी शिक्षा फर्माविली. बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांनीं मनांत थोडीशी आशा ठेवून कोर्टाला विचारलें कीं, शिक्षा दिवाणी तुरुंगांतच भोगावयाची ना ? पण न्यायमूर्तीनीं ती गोष्ट नामंजूर करून शिक्षा फौजदारी गुन्हेगारांच्या तुरुंगांतच भोगावयाची असें स्पष्ट सांगितलें. माझा अंदाज मला सुमारें सहा महिन्यांची शिक्षा होईल असा होता, व कांहीं मित्रमंडळींना मी तसें लिहिलेहि होतें. अर्थात चौदा दिवसावर निभावलें ही मोठीच गोष्ट झाली असें प्रथम वाटलें. पण माफी मागेपर्यंत फिरून कैद अशीहि बिनमुदतीची शिक्षा असल्यामुळें तो आनंद फुकट गेल्यासारखा झाला. शिक्षा झाली तरी चार सहा महिन्यांपलीकडे होणार नाही असें दिसत होतें तरी, " निकाल ऐकण्याला पुढें या, " असें जेव्हां कोर्टाने मला हटकलें तेव्हां कोर्टापुढें उभे राहून शिक्षा फर्मावलेली ऐकण्याचा अनुभव काय असतो, त्याची थोडीशी चुणूक त्यावेळीं समजली.

माझा अनुभव असा कीं, शिक्षेची जी भीति आधीं कल्पनेनें असते ती प्रत्यक्ष न्यायासनापुढें मनुष्य उभा राहिला म्हणजे त्याला तितकी राहात नाहीं. वाघाच्या कल्पनेची भीति एरवीं वाटते तितकी वाघ अवचित समोर आला तर मनुष्याला वाटत नसावी. कारण भीति वाटण्याला मन मोकळेंच नसतें. तें उपायचिंतनाकडे लागतें. जी गोष्ट टाळतां येईल तिची तेथपर्यंत भीति. पण टाळण्याचा प्रयत्न संपला म्हणजे भीतीहि आपोआप संपते. याचा अनुभव इतर रीतीनें मला यापूर्वीहि आला होता. १८९७ साली टिळकांवर खटला होऊन शिक्षा झाली व मी केसरी–मराठ्याचा संपादक झालों, तेव्हां सहजच एखाद्या रिकाम्या वेळीं मनांत कल्पना येई कीं, मीहि चुकून राजद्रोहाच्या कायद्याच्या तडाख्यांत सांपडलों तर कसें होईल ? पण ही जी भीति रिकाम्या वेळी वाटे ती प्रत्यक्ष लेख लिहिण्याला बसलों असतां वाटत नसे, व तेव्हां ती कोठच्या कोठेंच निघून जाई असा माझा तरी अनुभव आहे.

तसेंच १९०८ सालीं टिळकांवर ' केसरीं 'तील लेखांकरितां खटला झाला, त्याबरोबर ' मराठ्या'वर म्हणजे माझ्यावरहि खटला होणार अशी बोलवा होती. आणि ती मी इतकी खरी मानून चाललों होतों कीं, टिळकांना मुंबईस पकडल्यावर दुसरें दिवशीं पोलीस अधिकारी गायकवाडवाड्याची झडती घेण्याकरितां आले, तेव्हां घरचा कोणी जबाबदार मनुष्य हजर पाहिजे म्हणून

मला तेथें जावें लागलें. आणि मी तेथें गेल्यावर मला अटक होणार अशी एक-प्रकारची मनाला खात्री वाटत असल्यानें मी तिकडे गेलों तो स्नान करून, कपडे बदलून, जानव्याच्या किल्ल्या काढून घरांत बायकोजवळ देऊन व दोन प्रहरीं मी घरीं परत न आलों तर शोध घ्या " असें घरच्या मंडळींना सांगूनच गायक-वाडवाड्यांत गेलों. मजवर वॉरंटच नव्हतें म्हणून मला अटक झाली नाहीं. परंतु अटक होणार अशी मनाला खात्री वाटत असल्यामुळें एरवीं जी भीति कल्पनेनें वाटे ती गायकवाडवाड्यांत जातांना किंवा गेल्यावर मला मुळींच वाटली नाहीं.

असो. न्या. स्कॉट यांनीं निकाल सांगतांच एक युरोपियन पोलीस सार्जेंट येऊन माझ्या मागें उभा राहिला. त्याच्याबरोबर हायकोर्टच्या तळमजल्यावरील शेरीफ व कॉरोनर यांच्या ऑफिसांत मला नेण्यांत आले. टिळकांच्या खटल्याच्या मानानें माझा हा खटला म्हणजे नगाऱ्या-पुढें टिमकी इतक्याहि दर्जाचा नव्हता. परंतु टिळकांच्या खटल्यांतूनच व त्याच्या पाठोपाठ हा खटला उपस्थित झाल्यामुळें, हायकोर्टांत त्या दिवशीं माझ्या खटल्याचाच पुकारा व बोलबाला चालू होता व अखेर काय निकाल होतो याकडे सर्वांचें लक्ष होतें. कॉरोनरच्या कचेरींत नेऊन बसविल्यावर, तेथील मुख्य अधि-काऱ्याला मी कोण हें कळल्यामुळे, व माझी रवानगी तुरुंगाकडे होत आहे असें पाहून, त्यानें मला चहा आणून दिला. नंतर सार्जेंटनें गाडी आणली. तींतून आम्ही डोंगरीच्या तुरुंगांत गेलो. मला दाखल करून घेण्याचे बहुतेक सर्व विधि झाले. मात्र लंगोटी लावून झडती घेतात तशी घेतली नाहीं, व कपडेहि बदल-ण्यास सांगितलें नाहीं. मला दाखल करून घेण्याची वेळ सुमारें चार वाजण्याची होती व माझें संध्याकाळचें जेवणहि व्हावयाचेंच होतें. म्हणून माझ्या वांटणीचें भरपूर अन्नाचें ताट आलें तें घेतलें पण मी थोडेसेंच जेवलों. किंबहुना तुरुंगांत असेपर्यंत शक्य तितकें थोडें जेवूनच रहावें असें मला वाटलें. कारण तुरुंगांत संध्याकाळानंतर बहिर्दिशेला जाण्याचा मोठा त्रास असतो. तो टाळण्याचा मी निश्चय केला होता.

जेवणास लोखंडाची थाळी व पाणी पिण्याला लोखंडाचें पंचपात्र हीं दोनच भांडीं मला दिलेलीं असून, प्रथम चार दोन दिवस मीच तीं बाहेर नेऊन आपल्या हातानें धाशींत असे. आणि शेण लागावें लागूं नये व अन्नहि जागेवर पडूं नये, म्हणून एक शीतहि खालीं पडूं न देतां मोठ्या काळजीपूर्वक जेवण

करीत असे ! तेल, कांदा, तिखट यांचा कंटाळा नाहीं, किंबहुना ते आवडीचे पदार्थ; यामुळें आमटी भाजीची अडचण वाटली नाहीं. ती अस्वच्छ असल्याची शंका मनांत येई, किंवा दाताखालीं संशयास्पद पदार्थ सांपडे, तेव्हां मात्र कचरून जाऊन मी पुढें हातच थांबवी. पहिले चार-पांच दिवस नुसती डाळ भाकरी खाऊन गेले. त्यानंतर जेलर मला आपण होऊन सकाळ संध्याकाळ पावशेर दूध, त्यांत चिमूटभर साखर टाकून, देऊं लागला. तात्पर्य, केवळ उपाशी नव्हे पण कमी खाऊन रहाण्याची मनांतील योजनाच असल्यामुळें मला तुरुंगवासांत अन्नाच्या दृष्टीनें विशेष त्रास झाला नाहीं.

एक कांबळें अंथरायला व एक पांघरावयाला अशीं दोनच मिळालीं. आणि मला तर उशीची संवय असल्यामुळें, दुसरें कांबळें दुमडून त्याची उशी करावी लागल्यानें फक्त सदऱ्यावरच पांघरुणाचें काम भागवावें लागें. पण ते दिवस मुंबईतील आक्टोबरचे, यामुळें तीहि अडचण वाटली नाहीं. खरा त्रास झाला तो पहिले दोन दिवस कोडलेल्या जागेंत निजण्याचा व त्यांतूनहि ढेकणांचा. पहिल्या दिवशीं 'सेल'मध्यें कोंडून ठेवल्यानंतर, चारपायीवर एक कांबळें पसरून व दुसरें उशाला घेऊन मी निजलों व लवकरच मला झोप लागली. परंतु डोंगरीच्या तुरुंगाची इमारत अगदीं जुनाट असल्यामुळें सर्व खोली खालवर ढेकणांनीं भरून गेलेली होती. राती दहा वाजण्याच्या सुमाराला खालचे ढेकूण बाजेवर चढले व वरच्यांनीं जुनाट किलचांतून खालीं उड्या घातल्या. हळू हळू कांबळ्याचें अंथरूणच हलूं लागल्याचा भास होऊं लागला व सगळ्या अंगाला टांचण्या टोंचल्या सारख्याहि होऊं लागलें. दिवाबत्ती नव्हतीच व असती तरी काय उपयोग ? तात्पर्य, मला खाटेवर उठून बसावें लागलें व बसल्या बसल्या मिळेल ती झोंप घेऊन सर्व रात्र काढावी लागली.

आदल्या दिवसाच्या जाग्रणामुळें दुसरे दिवशीं दिवसा मला झोंप येऊं लागली. आणि संध्याकाळ होतांच कालच्या आठवणीनें पोटांत गोळा उभा राहिला. पण अर्थात तीहि रात्र तशीच काढावी लागली. तेव्हां तिसरें दिवशीं मी वॉर्डरकडून जेलरला बोलाविलें, व मला सिव्हिल सर्जन ( जेल सुपरिंटेंडेंट ) पुढें उभें करा म्हणून सांगितलें. त्यावेळीं सर्जन कॅप्टन बॅरी हा होता. पुण्याच्या जेलच्या अमदानींत तो अधिकारी असून, म्युनिसिपालिटीवर व तिच्या सगळ्या सभासदांवर

त्यानें सडकून टीका करून सरकारकडे रिपोर्ट केला होता. अर्थात हा दुष्ट मनुष्य राजद्रोही पुणेकर ब्राह्मणाची तक्रार कसची ऐकतो असें वाटलें. पण मी सर्व हकीकत सांगितल्यानें त्याला खरी कल्पना आली, व दोन दिवसांच्या जाग्रणांनीं माझी अवस्था काय झाली हें त्याला माझ्या तोंडावरून व डोळ्यावरून सहजच दिसण्यासारखें होतें. तेव्हां त्यानें जेलरला सांगितलें कीं यांना आजपासून व्हरांड्यांत निजूं द्या. त्यामुळें एकामध्यें आयतीच दोन कामें झालीं. व्हरांडा गज लावून बंद केला होता तरी वरचा भाग उघडा होता. यामुळें नवी चारपायी व नवी कांबळी घेऊन निजतां आल्यावर, मला तिसरें दिवसांपासून झोप मिळूं लागली व या कैदेचे खरे कष्ट दोन तीन दिवसांतच संपले.

वार्डर लोक सुजाण होते. त्यांनीं इतर कैदी मजपासून बरेच दूर ठेवले, व माझ्या निम्या व्हरांड्यांत कोणी येऊं नये असेंहि केलें. पुढें पुढें तर मी तोटीखालीं बसून स्नान केल्यावर 'धोत्रें तशीच पडूं देत जा' असें त्यांनीं मला सांगितलें, व कोणाकडून तरी तीं धुवून घेऊन ते घड्या घालून हळूच मला आणून देत. बहिर्दिशेला जाण्यासंबंधानें तर त्यांचा मला चांगलाच उपयोग झाला. तो असा की सकाळीं साडेसात आठाचे सुमारास इतर कैद्यांचे प्रातर्विधि आटपले, व पाणी फिनाइल टाकून जागा स्वच्छ झाल्या, म्हणजे वॉर्डर मजकडे मनुष्य पाठवी. आणि तेथें गर्दी होऊं नये म्हणून दाराशी दूर एखादा मनुष्यहि उभा करी या चौंदा दिवसांत खाण्यापिण्यासुद्धां सर्वच गोष्टींचा इतका नियम बसून गेला होता कीं त्या चौंदाहि दिवसांत, दिवसांतून एकाहून अधिक वेळां मला बहिर्दिशेला जावें लागलें नाहीं! या स्वच्छतेच्या मुख्य एकदोन गोष्टींत माझा स्वभाव जरासा जिकीर करणारा असल्यामुळें, तुरुंगाचा प्रसंग असतां मला खरी अडचण जेवणाखाणाची वाटत नाहीं. तें कसलेंहि चालूं शकेल, पण अस्वच्छतेची जिकीर किंबहुना भीतिच मनाला वाटते. १९३०–३२ च्या कायदेभंगाच्या चळवळींत राजकीय कैद्यांना खाणें पिणें चमचमीत मिळत असे आणि बरोबरचे स्नेहीसोबती पुष्कळ. अर्थात् तुरुंगाची भीति कसली! पण ती चळवळच असमर्थनीय आहे असे वाटे म्हणून मी खरखरमुंडेपणा करून कसेहि करून पण तुरुंगांत जाऊन बसलेच पाहिजे अशी आकांक्षा बाळगली नाहीं.

असो. अशा रीतीनें तुरुंगांतील व्यवस्था बिनत्रासाची झाली होती, चौथ्या पांचव्या दिवशीं सॉलिसिटरचे कारकून काका महाजनी यांनीं, मी मागितल्यावरून, शेक्सपियरच्या नाटकांचा एक समग्र ग्रंथ आणून दिला होता. मग वेळ जाण्याचीहि काळजी राहिली नाहीं. सकाळीं आठ साडेआठ वाजल्यापासून वाचण्याला सुरुवात करावी ती संध्याकाळचें पांच वाजतांचें जेवण होईपर्यंत. यामुळें उरलेल्या नऊ दिवसांत शेक्सपियरचीं बरींच नाटकें मी वाचून काढलीं. आणि एकान्तवासाचा आमच्यासारख्या कैद्यांना जो एरवीं सहजच त्रास वाटावयाचा तो मला वाटला नाही. शिक्षा चौदा दिवसांची व खोलीतील तक्तपोशीला चौदाच कड्या असा गमतीचा मेळहि बसल्यामुळें, माझें तें एक पंचांगच होऊन राहिलें. आणि या कामीं लहानपणीं वाचलेल्या रॉबिन्सन क्रूसोच्या गोष्टीची मला वरचेवर आठवण येऊन हसूंहि येई. मुख्य जेलर पारशी होता व असिस्टंट जेलर मद्रासी होता. तो दिवसांतून दोन वेळ, निदान संध्याकाळीं तरी एक वेळ, माझ्या कोठडीच्या गजाशीं बाहेर उभा राहून उभ्या उभ्या खुशाली विचारून जाई. अशा रीतीनें एकानें गजांच्या कठड्याबाहेरून व एकानें आतून बोलण्याची वेळ आली म्हणजे, प्राणिसंग्रहालयांतील पिंजऱ्यांत कोंडलेल्या प्राण्यांची आठवण होई व आत्मौपम्यबुद्धीनें त्यांना काय वाटत असेल याची मी कल्पना करी. पण ही तुलनाहि वस्तुतः बरोबर नव्हती. कारण प्राणीसंग्रहालयांतील कैद्यांना बुद्धीच नसल्यामुळें एका स्वातंत्र्याशिवाय त्यांना बाकी सर्व सुखच. पण कैदेंतील मनुष्याला एकान्तवास हाच दुःखप्रद होतो म्हणून साध्या कैदेची शिक्षा झालेले लोकहि मुद्दाम होऊन काम मागून घेतात असा अनुभव आहे. पण मला तर खुद्द शेक्सपियरसारखा जोडीदार संभाषण करण्याला मिळालेला. मग मला दुःख कसलें ? आणि खरोखरच या नऊ दिवसांत जितक्या एकाग्रतेनें माझें वाचन झालें तितकें साऱ्या जन्मांतहि क्वचितच झालें असेल असें मला वाटतें.

शिक्षेचे चौदा दिवस संपण्याच्या सुमारास एक प्रश्न मात्र उपस्थित झाला. तो हा की, हायकोर्टाला माफी लिहून देईपर्यंत मला कैदेंत ठेवावें असा हुकूम असल्यामुळें चौदा दिवस संपण्याच्या सुमारास माफी लिहून देऊन मोकळें व्हावें किंवा हट्टानें माफी लिहून न देतां तुरुंगवास लांबवावा ? या खटल्यांत मला चार सहा महिने तरी शिक्षा होईल असा माझाच अंदाज असल्याचें मी वर लिहिलें आहे. यामुळें कोर्ट मला निश्चित

अशी चार सहा महिने शिक्षा देतें तर ती मी आनंदानें सोसली असती. पण "लेखी माफी पटेपर्यंत तुरुंग" या शब्दांचा बाण कोर्टाच्या तोंडून गेला तो कसा परत येणार ! या निकालावर अपील नाहीं. मी चार सहा महिनेच काय पण वर्ष दोन वर्षेंहि हट्टानें राहिलों, तरीहि कोर्ट कांहीं मला आपण होऊन मोकळे करणार नाहीं. माझ्याविषयीं सहानुभूति न वाटतां उलट "हा मनुष्यच हट्टी आहे, तेव्हां त्यानें हट्टाचें फळ खुशाल भोगावें" असा शेरा मजवर पडला असता. पण जी अडचण मला तुरुंगांत तीच अडचण बाहेर मजविषयीं काळजी बाळगणाऱ्या मित्रमंडळींनाहि परस्पर वाटतच होती. यामुळें मला माफी लिहून देणें वाईट वाटूं नये म्हणून त्यांनीं केसरींत चार प्रमुख लोकांच्या सह्यांनीं एक पत्र घातलें, व लेखी माफी देऊन मोकळे होणें हेच या स्थितीत श्रेयस्कर आहे असा सल्ला मी न विचारतांच त्यांनीं मला जाहीर रीतीनें दिला. यामुळें माझें काम सुलभ झालें. त्याप्रमाणें सॉलिसिटरचा कारकून येऊन त्यानें मजकडून माफी लिहून नेली, व ती चौदाव्या दिवशीं कोर्टाला पटवून मला कैदेतून सोडण्याचा हुकूम घेतला.

सुटकेच्या दिवशीं सकाळीं पारशी सुपरिंटेंडेंट यानें तुरुंगाच्या आवारांतील आपल्या घरांत मला बोलावून नेलें, व पुढें एक दोन तासांनी माझी सुटका होणार म्हणून इतर कामें बाजूला ठेवून तो माझ्याशी गोष्टी बोलत बसला. या वेळीं जेलच्या अधिकाऱ्याचें नातें सुटल्यामुळें त्यानेंहि न्यायमूर्ति दावर यांना टिळकांना अपमानास्पद शब्द बोलल्याबद्दल बरीच नांवें ठेवलीं; व मला म्हणाला "आम्ही लोक सरकारी नोकर झालों म्हणून तुम्ही लोक काय खटपटी करीत आहा याचे मर्म न कळण्याइतके मूर्ख किंवा अप्रबुद्ध नाहीं. म्हणून तुम्ही कैदी व आम्ही अधिकारी असें नातें वरून असलें व संभाळावेंहि लागलें तरी तुम्हा लोकांविषयीं वाटणारा आदरभाव कसा जाईल !" असो. त्यानें मला टेबलाशीं बसवून घरांतून चहा व फराळाचेंहि आणून दिलें; व "तुमच्याबरोबर चहा घेतल्यानें माझा सन्मानच होत आहे असें मला वाटतें" असें तोहि भला माणूस म्हणाला.

त्यावेळीं आम्ही पुष्कळ गोष्टी बोललों त्यांत एक गोष्ट त्यानें सांगितलेली मोठ्या गमतीची असून अजून आठवते म्हणून ती सांगतों. पोषाखावरून गोष्ट निघाली. तो म्हणाला "मी व माझा मुलगा असे दोघेजण एके दिवशीं ग्रँटरोड

स्टेशनवर गेलों. माझा मुलग्या नीटनेटका पोषाख करणारा असे. मी अगदीं साधा पोषाख केलेला. त्याच्या डोक्यावर साहेबी हॅट होती. मी एक नुसती पारशी स्कल-कॅप घातली होती. स्टेशनच्या फाटकाशीं गेलों तों तिकिट कलेक्टरानें माझ्या मुलाला प्लॅटफॉर्म तिकीट हातीं नसताहि आंत जाऊं दिले. आणि मी गेलों तों मला अडविलें. तेव्हां मी त्याला म्हटलें "मला तूं जाऊं देत नाहींस. आणि त्या पुढच्या मनुष्याला तूं जाऊं दिलस. आम्ही कोणीच प्लॅटफॉर्म तिकीट काढलेलें नाहीं. मग हे कसें ?" तिकिट-कलेक्टर म्हणाला, "तो पुढें गेलेला गृहस्थ जंटल्मन आहे." तेव्हां मी हंसून म्हणालों " पण मी तर त्याचा बाप आहे." तेव्हां तिकिट-कलेक्टर थोडा ओशाळला. तात्पर्य, या इंग्रजी राज्यांत पोषाखाचा महिमा असा आहे. तुम्ही लोक देशाकरितां झटणारे आहां. पण तुमचा पोषाख हा असा साधा. तेव्हां तुमची खरी योग्यता कळावयाला कोणालाहि थोडा वेळ लागणारच."

असो. अशा रीतीनें इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर त्यानें मला शेकहँड करून गाडींत नेऊन बसविलें. मी मुंबईहून त्याच दिवशीं दोन प्रहरीं मित्रमंडळीबरोबर पुण्यास आलों. वाटेंत कल्याण वगैरे स्टेशनावर मित्र-मंडळींनीं भेटून सत्कार केला. पुण्यास आल्यावर ऐकलें कीं वासुदेवराव जोशी खाडिलकर वगैरे लोकांनीं मी हायकोर्टाला माफी लिहून दिली याबद्दल नाकें मुरडून टीका केली ! त्यांचें म्हणणे मी आणखी पांचसहा महिने माफी न देतां तुरुंगांत राहिलों असतों तर कोर्टानें मला आपोआप सोडून दिलेच असतें. पण ही विचारसरणी त्या पांच-चार लोकांपुरतीच होती. माफीच्या प्रायश्चित्ताशिवाय या प्रकरणांतून सुटका नव्हती असें इतर बहुतेक लोकांचे म्हणणें होतें व त्यांपैकीं कित्येकांनीं मला तसें कळविलेंहि.

असो. यानंतरचा मजवरचा खटला म्हणजे १९२० सालीं बोर-खळ प्रकरणांतून उत्पन्न झालेला. सार्वजनिक सभेचे चिटणीस व कार्य-कर्ते रा. सदाशिव विनायक बापट यांचा हा गांव. लो. टिळक वारल्यावर तेथील टिळकभक्तांनीं असें ठरविलें की, गांवालगत कृष्णाकांठच्या देवळांत टिळकांच्या पादुका माझ्या हस्तें स्थापन कराव्या. या योजनेप्रमाणें बरीच तयारी होऊन आम्हाला निमंत्रणें आलीं ती स्वीकारलीं, व त्याप्रमाणें आम्ही सभेला गेलों. साताऱ्याहूनहि नानासाहेब आगाशे सोमण वगैरे मंडळी आली

होती. मात्र न बोलावलेली अशीहि कांहीं मंडळी आली होती ! ते सत्यसमाज पंथाचे लोक ! सातारा जिल्हा हा या वेळीं ब्राह्मणेतर चळवळीचें मुख्य केंद्र बनून राहिला होता. आणि टिळकांच्या पादुका बसविण्याचा हा समारंभ हाणून पाडावा असें ठरवून त्या पक्षाचे बरेच लोक मारामारी करण्याच्या तयारीनें आले होते. सभेच्या चालकांना किंवा आम्हा कोणालाहि या बनावाची कल्पना नव्हती. पण सभेंत बरेंचसे शेमलेवाले ठिकठिकाणीं जागा अडवून बसले होते; व त्यांची मुद्राच सांगत होती कीं, हे कांहींतरी कलागत करणार. सभेचें अध्यक्षस्थान मला दिल्यावर माझें भाषण झालें व इतर कांहीं भाषणें सुरू होतीं. इतक्यांत कोणा एका वक्त्याच्या कांहीं एका शब्दाचें निमित्त करून त्यांनी दंग्याला एकदम सुरुवात केली.

आमच्याहि लोकांचा जमाव कमी नव्हता. तथापि दारू एकदम पेटावी त्याप्रमाणें सर्व सभेंत दंगल झाली. आणि कोणा मराठ्यानें कोणा ब्राह्मणावर हात टाकावा याचा आधीं जसा कांहीं कट व्हावा याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं एकाच वेळीं मारामारी जुंपली. हातांतील काठ्यांचा तर उपयोग सुरू झालाच. पण बाहेर छकडे सोडून उभे केले होते त्यांच्या करळ्याहि लोकांनीं उपसून घेतल्या. प्लॅटफॉर्मवर आमच्याकडे विचारे नांवाचा एक सत्यशोधक व त्याबरोबर दुसरा एक असे धाऊन आले. परंतु ते प्लॅटफॉर्म चढत असतांच त्यांना इतर लोकांनी पुढून ढकलून देऊन मागें पाडले, व प्लॅटफॉर्मच्या मागच्या बाजूला लहानशीं इमारत होती त्यांत प्लॅटफॉर्मवरील आम्हा प्रमुख लोकांना नेण्यांत आले. सभेला पोलिसहि कांही आले होते. परंतु पुष्कळसें काम ब्राह्मण तरुणांनींच केलें व कांहीं वेळानें दंगा मोडून शांतता झाली. मारामारींत अनेक लोकांना लागलें. रक्तें निघालीं. याहून विशेष कांही झालें नाहीं. पादुकांचा समारंभ अजून व्हावयाचाच होता. तेव्हां येथें फिरून दंगा कदाचित् होईल या भीतीनें आमच्याकडील सर्व मंडळीं सज्ज होऊन घाटावर देवळाकडे गेली, व मग पोलीसहि तिकडील वाटेवर उभे राहून त्यांनीं गर्दी थोपवून धरली. फिरून मारामारी होणार अशी भीति क्षणोक्षणीं वाटत होती; तथापि दंगेखोर सत्यसमाजिष्टांची संख्या एकंदरींत थोडी होती म्हणून याहून विशेष कांहीं झालें नाहीं. मी पटांगणावरील सभेंत भाषण करून पादुका बसविल्या. बिन्हाडीं आल्यावर अगदीं संध्याकाळ झाली, व पूर्वसंकेताप्रमाणें गाड्या जुंपून परत साताऱ्याकडे

निघावें असा आमचा विचार होता. पण तसें निघालों तर वाटेंत जमाव होऊन हल्ला होण्याची भीति वाटत असल्यामुळें बोरखळकरांनीं आम्हांला जाऊं दिलें नाहीं आणि आमचा मुक्काम रात्रीं देवळांत करवून त्यांनीं बंदोबस्ताला रात्रभर माणसें ठेवलीं. पण वाटेंत ब्राह्मण मंडळींवर हल्ला करण्याची भीति इतर रीतींनें खरी ठरली. कारण बोरखळाहून लिंबगोव्याकडे एका गाडींत बसून कांहीं ब्राह्मण मंडळी गेली त्यांच्यावर निम्म्या वाटेंत हल्ला झाला, व त्यांना सत्यसमाजिष्टांनीं इतकें बेदम मारलें कीं त्यांची रवानगी साताऱ्याच्या इस्पितळांत करावी लागली !

वरील हकिकतीवरून खटला कोणावर झाला तर तो या सत्यसमाजिष्टांवरच व्हावयास पाहिजे होता. पण पोलिसांनीं तेथे कोणाला पकडले नाहीं, व इतर कोणा सत्यसमाजिष्टांवर व्यक्तिशः फिर्यादी दिल्या नाहींत. तरी अस्वलाआधी आपणच किंकाळी फोडावी या न्यायानें प्लॅटफॉर्मवर धाऊन येणारे सत्यशोधकी गुंड रा. विचारे यांनींच मी व इतर सहासात लोकांवर सातारच्या सिटी-मॅजिस्ट्रेटपुढें मारामारीची फिर्याद केली. आमच्यापैकी कांहींवर प्रत्यक्ष मारामारीचा आरोप असून, मी व आणखी दोघे तिघे यांच्यावर मारामारीस चिथावणी दिल्याचा आरोप होता. मारामारीची खरी हकीकत साताऱ्यास सर्वांना आधींच ठाऊक झालेली असल्यामुळें चोरांच्या या उलट्या बोंबांचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें ! आम्ही निर्दोषी ठरून सुटूं अशी आमची खात्रीच होती. परंतु एकदां न्यायकोर्ट म्हटले म्हणजे त्यांतले सगळे विधि यथासांग पार पडावे लागतात. तसे येथेंहि झालें. फिर्यादीचा पुरावा होऊन आमच्यावर चार्ज ठेवण्यांत आले. परंतु नंतर फिर्यादीतर्फेच्या साक्षीदारांच्या उलट तपासण्या झाल्या. त्यांत सर्व हंसण्यासारख्या मौजाच होत्या. अदमासाप्रमाणें शेवटीं मॅजिस्ट्रेट मि. फणसे यांनीं आम्हा सर्वांना सोडून दिलें. अशा रीतीनें चंद्रदर्शनामुळें चोरीचा आळ यावा त्याप्रमाणें मजवर गर्दी-मारामारी केल्याचा खटला झाला तो एक नमुनाच होय.

या नंतरचा खटला १९२४ सालीं फिरून मजवर हायकोर्टाच्या बदनामीचा व बेअब्रू केल्याचा झाला. त्याची अगदीं थोडक्यांत हकीकत अशी आहे. पुण्यानजीक लोहगांव येथें कांहीं सोजीर शिकारीला गेले असतां तेथील गांवकऱ्यांची व त्यांची बाचाबाच झाली. तींत वॉकर नांवाच्या शिपायानें

बंदुकीला हात घातला आणि तींतून गोळी सुटून ती एका मनुष्याला लागली व त्यामुळें तो मरण पावला. सोल्जर वॉकरवर रीतिप्रमाणें खटला होऊन तो पुणें येथील सेशन कोर्टांत निघाला. पण युरोपियन ज्यूरर हे इनसाफास बसलेले असल्यामुळें त्यांनीं आरोपी निर्दोषी आहे असा निकाल दिला! सेशन कोर्टातील न्यायाधीश मि. वाइल्ड यांना मात्र हा निकाल मान्य झाला नाहीं. त्यांच्या मतें सदोष मनुष्यवधाचा आरोप न झाला तरी निष्काळजीपणानें हयगयीनें बंदुकीस हात घालून गोळी उडविण्याचा आरोप तरी ज्यूरीनें शाबीत धरावयास पाहिजे होता. म्हणून त्यांनीं खटल्याचे कागद वर हायकोर्टाकडे पाठविले. त्याची सुनावणी सर न्यायाधीश मॅक्लाऊड व न्यायमूर्ति फॉसेट यांच्यापुढें झाली. पण त्यांनींहि वॉकर याला निर्दोषी म्हणून सोडून दिलें. या निकालावर टीका करतांना केसरीतील लेखकानें असें म्हटलें कीं, "हा खटला काळ्यागोऱ्यांचा असून गोऱ्या माणसाचें पारडें जड ठरावें व काळ्या माणसाचें हलकें ठरावें यांत काय आश्चर्य? असल्या खोट्या ताजव्यानें पदरांत पडणाऱ्या न्यायावरहि आमचे कांहीं लोक संतुष्ट असतात. ब्राह्मण स्मृतिकार पक्षपाती म्हणून स्मृतिग्रंथ जाळणारांनीं आतां हा न्याय पाहून लोहगांव येथें एक स्तंभ उभारावा व त्यावर या खटल्याची हकीकत कोरून ठेवावी."

ता. ६ मे १९२४ च्या अंकात हा मजकूर प्रसिद्ध झाला. त्यावर सरकारी कारवाई होऊन सरकारी वकील रा. पाटकर यांनीं १ जुलै रोजी फिर्याद दिली, व माझा खटला ७ ऑगस्ट रोजी सर न्यायाधीश सर ॲबरसन मार्टिन व न्यायमूर्ति किंकेड यांच्यापुढें निघाला. त्या व दुसऱ्या दिवशी कांहीं वेळ खटला चालून मला कोर्टानें दोषी ठरविलें व ५००० रु. दंड व २०० रु. कोर्टखर्च मिळून ५२०० रु. दंड केला. हें वर्ष लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मी निवडून गेल्याचें पहिलेंच होतें. त्या आधी आम्ही कायदे कौन्सिलच्या प्रश्नावर काँग्रेस विरुद्ध बंड करून दास व नेहरू यांच्याबरोबर कौन्सिल पार्टींत समाविष्ट होऊन निवडणुकी जोरांत जिंकल्या होत्या. यामुळें या खटल्याला एक प्रकारें महत्व आलें होतें. पण हायकोर्टाच्या बदनामीचा हा मजबरचा दुसरा खटला असल्यामुळें निकाल काय होणार याचें आगाऊ धोरण सहजच बांधतां येण्यासारखें होतें. यामुळें मी प्रथमच एक गोष्ट मनाशीं ठरवून ठेवली कीं या खटल्यांत वकील बॅरिस्टर म्हणून कोणी द्यावयाचा नाहीं. तर खटला स्वतः चालवावयाचा. वकील बॅरिस्टर दिल्यास खर्च बराच लागणार व ती दंडांत

आणखी भर पडणार. पण तो खर्चहि केला तरी वकील बॅरिस्टर हे पक्षकार सुटावा, किंवा निदान त्याला शिक्षा दंड वगैरे होईल तितका कमी व्हावा या दृष्टीनें गुळमुळीत गोडगोड बोलतात. ते तसे बोलले तरीहि हरकत नाहीं, परंतु त्या भरांत आपल्या पक्षकाराला थोडीबहुत नांवें ठेवून सोडवून घेतां आले तर तसें करणें हेंहि ते आपलें कर्तव्य समजतात. पूर्वी भालाकार भोपटकर यांच्यावर खटला झाला तेव्हां त्यांचे बॅरिस्टर मि. दावर यांनीं त्यांचा बचाव करतांना जवळ जवळ असेंच म्हटलें कीं "हें काय बोलून चालून एकाद्या भंगटासारखे लिहिलेले आहे. ते केवळ संपादक महाशयाचे कल्पनाचित्र. खरा प्रकार नव्हे. म्हणून कोर्टानें तें मनावर न घेतां आरोपीला सौम्यपणानेंच वागविलें पाहिजे." याचा अर्थ इतकाच कीं, "आमचा अशील मूर्ख आहे. त्यानें भलतेंच कांहीं तरी लिहिलें आहे. त्याकरतां त्याला शिक्षा ही होणारच. पण द्यायची ती थोडी द्या म्हणजे झालें."

या उदाहरणावरून मी बोध घेऊन मुद्दाम असें ठरविलें कीं, हल्लींचा केसरींतील लेख पहिल्या १९०८च्या खटल्यांतील लेखाइतका वाईट खचित नाहीं; लोहगांवचा माणूस मेला आणि बंदुक उडविणारा सोजीर बॉकर निर्दोषी ठरून सुटला ही गोष्ट केसरीकाराच्या बचावाला बरीच उपयोगी पडण्यासारखी आहे; कारण युरोपियन आरोपींना युरोपियन ज्यूरी हटकून मिळते व असल्या खटल्यांत ज्यूरी नेहमीं आरोपीला सोडून देते हा अन्याय सुप्रसिद्ध असल्यामुळें, केसरीच्या टीकेला फार भयंकर असें स्वरूप येऊं शकत नाहीं. अर्थात् मुद्रणस्वातंत्र्याचा व सत्याच्या अभिमानाचा हा प्रश्न असल्यामुळें, या कामीं वकील जे बोलेल त्यापेक्षां संपादक वर्गाचा प्रतिनिधि असे नाते लावून मला या कामीं जरासें ताठरपणानें बोलतां येईल याचाहि फायदा घ्यावा. आणि याहूनहि निर्णायक कारण असें कीं, खटल्यांत शिक्षा व्हावयाचीच तर आपला खटला आपणच हवा तसा चालविण्याचे श्रेय तरी एकवेळ कां घेऊं नये ?

कोर्टाच्या बेअदबीच्या खटल्यांत आरोपीनें स्वतः बोलणें बरें नव्हे असें म्हणून कांहीं मित्रमंडळींनीं माझा हा बेत चुकीचा आहे असें मला सांगून पाहिले. परंतु माझा विचार ठरला तो कायमचाच होता. अशा खटल्यांत प्रतिवादीनें स्वतः खटला चालविल्यास अधिक मोकळेपणानें किंवा अधिक भावनेनें तरी बोलतां येतें. वकील हा कायद्याचे आधार दाखवील. परंतु अशा खटल्यांत कायद्याच्या आधा-

रांचा फारसा उपयोग नसतो. कारण त्यांतील गुन्हा अपमानाचा म्हणजे मानीव भावनेचा. तेथें कायद्याचे आधार काय करणार ! " आम्हांला वाटतें कीं, आमचा अपमान झाला ! " असें कोर्टानें एकदां म्हटलें म्हणजे " अहो तुमचा खरोखर अपमान झाला नाहीं, तुम्हाला उगाच तसें वाटतें, असे आरोपीनें म्हणून काय लाभ होणार ! साध्या व्यवहारांत जें घडत तेंच येथें घडतें. पण साऱ्या व्यवहारांत शिक्षा करण्याचा अधिकार नसतो तो मात्र येथें असतो. साध्या व्यवहारांत एखाद्या मनुष्यानें मनानें असें घेतलें कीं, माझा अपमान झाला तर दुसरा सहजच म्हणतो कीं, " बरें बुवा, माझ्या मनांत अपमान करण्याचें नव्हतें. पण तुम्हाला तसें वाटत असेल तर मी तुमची माफी मागतों कसा." न्यायकोर्टाची अपेक्षा देखील हीच असते. त्यानें नोटीस काढली म्हणजे अपमान झाला असे ठरविलें असेंच समजावयाचें. मग प्रतिवादीला जाबादाखल जे ॲफिडेविट करण्याची संधि मिळते त्यांत त्यानें माफी मागून मग पुढे काय बोलावयाचें तें सर्व बोलावें; पुढें बोलावयाचें म्हणजे माफी घेऊन सोडा किंवा शिक्षाच द्यावयाची तर फार थोडी द्या असें इकडून तिकडून म्हणावयाचें; व गुन्ह्याचा दोष शक्य तितुका कमी करावयाचा. पण प्रतिवादीनें माफी मागितली म्हणून ती दिलीच पाहिजे असाहि नियम नाहीं. तात्पर्य, " मी रागावलों आहे. अगदी रागावून बसलों आहे. माझा राग कसा काढतां तो काढा " असें म्हणण्यासारखें या न्यायकोर्टाच्या बेअदबीच्या खटल्यांचें स्वरूप असतें.

मी स्वतः खटला चालविण्याचें ठरविलें तरी रा. भोपटकर यांच्या सांगण्यावरून हायकोर्टातील कोणी वकील उपाध्या हवा म्हणून दि. ब. शिंगणे यांना वकीलपत्र दिलें. मात्र त्यांना असें सांगितलें कीं, "खटला माझा मीच चालविणार आहे. तुम्ही मला इतर काय मदत करावयाची ती करा." खटला उभा राहिला तेव्हां प्रथम माझ्या जबाबाचें ॲफिडेविट मी दाखल केलें. त्यांत मी लेखाची सर्व जबाबदारी आपल्या अंगावर घेतली. परंतु माफीचा शब्द काढला नाहीं. हें पाहून निकाल काय द्यावयाचा हें न्यायाधीशांनीं बहुधा मनाशीं प्रारंभींच ठरविलें असेल. अशा प्रकारचा माझ्यावरचा हा खटला पहिला नसून दुसरा आहे; पहिल्या खटल्यांत मला शिक्षा झाली होती; व त्याहि खटल्यांत मी पहिल्या जबाबांत माफी मागितली नव्हती; या सर्व गोष्टी उभयतां न्यायमूर्तींच्या ध्यानांत होत्याच यांत शंका नाहीं. कारण माझ्या पहिल्या खटल्याचा वृत्तांत

मुंबई हायकोर्टाच्या लॉ रिपोर्टांत समग्र दिलेलाच आहे. अर्थात् या दुसऱ्या खटल्यांतील माझें ॲफिडेविट बिनमाफीचे आलें असें पहातांच न्यायमूर्तींची चर्या एकदम बदललेली दिसली.

खटला सुनावणीला सुरुवात होतांच रा. शिंगणे यांनीं आपलें वकीलपत्र रद्द करावें अशी कोर्टाला विनंति केली. ती कोर्टानें तेव्हांच मान्य केली. खटल्याला सुरुवात झाल्यावर कांही वेळ ते मजजवळ बसले व नंतर उठून गेले. वकीलपत्र रद्द करण्यासंबंधानें मी प्रारंभींच कोर्टाचा खुलासा केला व सांगितलें कीं, "मी वकील देत नाही याचा अर्थ, तो आळसतेनें देत नाहीं किंवा वकीलवर्गाबद्दल माझा अनादर आहे म्हणून देत नाही, असें नव्हे, तर अशा खटल्यांत ज्याचा तोच कोर्टापुढें उभा राहून आपलें म्हणणें प्रांजलपणें मांडलें म्हणजे तें एकंदरीनें बरें असतें म्हणून." यावर कोर्ट म्हणालें कीं, "या बाबतींत गैरसमज होण्याचें कारण नाही. ज्याचा खटला त्याला चालविण्याचा अधिकारच आहे. शिंगण्यांचें वकीलपत्र असतें तर कायद्याच्या मुद्याची चर्चा करण्यांत आम्हाला थोडी त्यांची मदत झाली असती इतकेंच." माझ्या ॲफिडेविटांत मी इतके कबूलच केलें होतें की, हायकोर्टाच्या मनांत पक्षपात बुद्धि उत्पन्न झाली. पण ती नकळत झाली असेल. जाणून बुजून त्यांनीं पक्षपात केलेला नाही. तेव्हा पक्षपात झालाच पण तो जाणूनबुजून झाला कीं, अजाणता झाला इतकाच काय तो थोडा प्रश्न उरला. पण मी अरतून परतून कितीहि बोललों तरी "तुमचें हे म्हणणें तरी योग्य कसें ते दाखवा" असें मार्टेन-साहेब मला विचारीत. त्याला मी काय उत्तर देणार? तथापि मी आधीं माझें 'आर्ग्युमेंट' लिहून काढून त्याची एक प्रत सरकारी वकिलाला व एक प्रत खुद्द न्यायाधिशांना दिली होती. माझा हेतु हा कीं, माझी सर्व लेखी तक्रार कागदपत्रांत दाखल व्हावी. कारण कोर्टांत वकिलीचा सराव नसल्याने माझी लेखी तक्रार जितकी समर्पक बठेल तितकी तोंडी बठणार नाहीं. म्हणून लेखी तक्रार दाखल करावी व त्यांतलीच कांहीं तोंडानें सांगावी, म्हणजे प्रश्नोत्तराला वाव राहील.

पण मार्टेनसाहेबांनीं मला सांगितलें कीं, तुमची लेखी तक्रार सर्वच्या सर्व दाखल करून घेतां येत नाहीं. कारण त्यांत लागू व गैरलागू अशा गोष्टींची पुष्कळ भेसळ झाली आहे. अर्थात् असें झाल्यामुळें तीच लेखी तक्रार थोडथोडी तोंडानें वाचीत जाणें किंवा भाषण करून त्यांतील मुद्दे सांगणें असे दोन मार्ग

उरले. पण मी पहिला मार्ग सोडून दुसरा पत्करला. तारीख ७ रोजी सुमारें एक तास व तारीख ८ रोजी सुमारें दोन अडीच तास काम चाललें. हायकोर्टाच्या न्यायाधीशांशीं वादविवाद करावयाचा. तेव्हां तें कसें काय साधतें हा एक प्रश्नच होता. पण मनाचा निश्चय असल्यामुळें ती गोष्ट पार पडली. कोर्टाचा अपमान झाला असें न्यायमूर्ति मनाशीं ठरवून बसल्यावर आणि माफी न मागितल्यावर खटल्यांतील लेखाचें समर्थन करीत बसणें हें विस्तवाशीं खेळण्यासारखें होतें. त्यांतून मी अपरिचित. पण मी तास दोन तास बोलून आपलें म्हणणें बहुतेक योजले होते तसें मांडूं शकलों. वास्तविक लेखांतील शब्द पदोपदीं अडणारेच होते. यामुळें आलटून पालटून येऊन ठरल्या ठिकाणीं नडावें लागे. "काळ्याचें एक पारडें व गोऱ्याचें एक पारडें अशी दोन कमजास्त वजनाचीं पारडीं ज्या ताजव्याला लावलीं आहेत, असल्या ताजव्यांतून आमच्या पदरांत न्याय पडावयाचा. तेव्हां पारडें कोणीकडे झुकावयाचें व न्याय कोणच्या प्रकारचा पदरांत पडावयाचा हे दिसतच आहे." असा मुख्यतः केसरीच्या लिहिण्याचा झोक. तेव्हां पक्षपाताचा आरोप मी केला नाहीं असें म्हणून कसें चालणार? तेव्हां त्यांतल्यां त्यांत अजाणता पक्षपात इतकेंच दर्शविण्याचा माझा हेतु होता असें म्हणण्याचा मी प्रयत्न करीत होतों. पण हें करीत असतांच या देशांत काळ्यागोऱ्यांमध्यें जाणूनबुजून पक्षपात करण्यांत येतो असले थोरामोठ्यांचे व प्रसिद्ध आधारहि देत होतो. यामुळें जखम फिरून खाजवावी व फिरून फुंकर घालावा असें स्वरूप हळूहळू माझ्या भाषणाला येत होतें. (१) लॉर्ड कर्झन यांनी काळ्यागोऱ्यांत भेद केल्याबद्दल लान्सर पलटणीला शिक्षा करविली. (२) युरोपियन लोकांवर खटला झाला म्हणजे त्यांना तेवढी युरोपियन लोकांची ज्यूरी मिळते. (३) हिंदी लोकांवर खटला झाला तर हिंदी माणसांचीच ज्यूरी मला या असें म्हणण्याचा अधिकार हिंदी माणसाला नसतो. (४) काळ्यागोऱ्यांतील भेदभाव दर्शविणारे कायदे काढून कसे टाकतां येतील याचा विचार करण्याकरितां खुद्द असेंब्लीतच ठराव येऊन कमिटी नेमली तेव्हां काळ्यागोऱ्यांत भेद नाहीं असें म्हणण्यांत अर्थ आहे! (५) इंग्रज न्यायाधीश झाले तरी तीं माणसेंच आहेत. म्हणून सहज माणसाच्या हातून न जाणतां होणारा पक्षपात न्यायकोर्टाच्या हातून होणें शक्य आहे, व केसरीनें तसें म्हटलें तर तो मोठासा गुन्हा होऊं नये, असें मी परोपरीने आलटून पालटून सांगितलें.

कोर्टाचें व मी मिळून लेखाचें भाषांतर अथपासून इतिपर्यंत वाचले. मधून मधून न्यायमूर्ति मला प्रश्न करीत त्याचें मधून मधून मी उत्तर देई असा क्रम चालूं होता. शेवटीं माझ्या समारोपांत मी म्हटलें:—

" माझ्या लेखांत मिथ्या विधान नाहीं ही पहिली गोष्ट. त्या विधानावरून पुढें मी अनुमानें काढलीं तीं युक्तिसिद्ध आहेत, चुकीचीं नाहींत ही दुसरी गोष्ट. इतकें झाल्यावर मग त्या विधानांतून काय ध्वनि निघतो हें पहाण्याचें काम माझें नाहीं; व न्यायमूर्तींना अप्रामाणिकपणाचा आरोप लावण्याचा ध्वनि त्यांतून निघाला तरी, मी म्हणतों, तो माझा अप्रामाणिकपणा ठरत नाहीं. माझ्या अप्रामाणिकपणाचा आरोप काय तो सरकारी वकिलांनीं प्रत्यक्षपणें सिद्ध केला पाहिजे. काल कोर्टाच्या बेअदबीच्या तत्त्वासंबंधाने जे उतारे वाचण्यांत आले ते मला अमान्य नाहींत. वर्तमानत्रकारांचें स्वातंत्र्य झालें तरी तें इतर कोणाहि व्यक्तीच्या किंवा अधिकाऱ्याच्या स्वातंत्र्याहून अधिक नाहीं. जो तो आपल्या हक्कमर्यादेपुरतां स्वतंत्र असतो एकानें दुसऱ्यावर अतिक्रमण करूं नये. पण सामान्य मनुष्यावर जी टीका केल्याने बेअब्रूचा गुन्हा घडत नाहीं ती टीका न्यायाधीशावर केल्यानेंहि बेअब्रूचा गुन्हा घडत नाही. न्यायाधीश लोकांनीं सामान्य समंजस माणसाप्रमाणें वागण्यास व टीका करून घेण्यास मनाची तयारी ठेविली तरच कोर्टाविषयीं खरी आदरबुद्धि व त्यांच्या न्यायकार्यावर लोकांचा विश्वास बसेल. सामान्य मनुष्याचे सामान्य दोष न्यायाधीशांतहि असतात असें मानणें गैर नाहीं; व टीकाकारांच्या टीकेपेक्षां आपल्या चुकीच्या निकालांनींच आपण हा विश्वास ढळण्यास अधिक कारणीभूत होतों हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. ज्यावर मी टीका केली त्या निकालाइतका चुकीचा, सर्वस्वी अयोग्य, असा निकाल देऊन, वरती लोकांचा विश्वास ढळूं नये म्हणून बेअदबीचा खटला करण्यांत येतो, त्यानें काय साधणार! लोकांचा विश्वास ढळला तो निकाल ऐकून परस्परच ढळला. मी या बाबतींत टीका करून फक्त लोकमत प्रगट केलें. आतां मी वर्तमानपत्रकार नसतो तरीहि या निकालाविषयीं हेंच बोललों असतों; मात्र तें खासगी संभाषणांत बोललों असतों. पण लोकमताला वाचा फोडण्याकरितांच वर्तमानपत्राचा जन्म आहे. मनुष्य मेला तो विसरून गेला, आणि ज्याची गोळी लागली तो सुटून गेला ! मृताच्या कुटुंबाला नुकसानभरपाई तरी मिळावी. पण तें काम म्हणे वरिष्ठ सरकारचें ! मेलेला मनुष्य हा मुंबईसरकारचा प्रजाजन नव्हता काय !

"सेशन्स जज्जाच्या शिफारशीप्रमाणें वॉकर यानें केवळ अविचार व बेसावधगिरी केल्याचा गुन्हा शाबीत धरून थोडी कां होईना पण हायकोर्टानें त्याला शिक्षा दिली असती तर लोकांचें थोडेबहुत समाधान झालें असतें. वॉकर फांसावरच चढला पाहिजे अशी मागणी कोणीच केली नाही व नसती. पण ज्यूरीनें त्यावर कोणताहि गुन्हा शाबीत नाहीं, तो सर्वस्वी निर्दोषी आहे, असे ठरवून सोडून दिले होंहि लोकांना पटलें नाहीं. ज्यूरीच्या निकालाचा हा अडथळा मार्गांत नसता तर स्वतः हायकोर्टाने वॉकरला थोडीतरी शिक्षा दिली असती असा माझा भरंवसा आहे. तीच गोष्ट ज्यूरीचा निकाल पुढें असतांहि त्यांनी केली असती, तर हलक्या पारड्यांत पासंगापुरतें वजन घालून त्यांनी ताजव्याचा खोटेपणा काढून टाकला असें झालें असतें. तें करण्याला जी एक न्यायबुद्धीची आंतून उठावणी लागते ती येथें दिसली नाहीं इतकाच हायकोर्टाला मी येथें दोष दिला. हें ज्यामुळें घडलें तो पक्षपात अजाणता होता. स्वजातीचा पक्षपात खरा होता तो ज्यूरीच्या निकालांत, असा माझा लिहिण्याचा आशय होता. सेशन्स जज्जाच्या व मॅजिस्ट्रेटच्या निकालानें आठदहा ठळक प्रश्न हायकोर्टाच्या डोळ्यापुढे उभें राहण्यासारखे होते. व त्यांची उत्तरें समर्पक देऊन मग त्यांना असा निकाल दिला असतां तर कोणी असें लिहिलें नसतें. माझ्या अहेतुक शब्दांचा स्वाभाविक परिणाम म्हणून तो मला भोंवावा, आणि हायकोर्टाच्या हयगयीच्या कृत्याचा परिणाम त्याला कां भोंवूं नये?

"शेवटीं मी माझें म्हणणें फिरून एकदां स्पष्ट करतों. ते असें:—माझ्या लेखापैकीं वराचसा भाग म्हणजे विद्यमान न्यायपद्धतीवरील माझी टीका रास्त हक्काची आहे. जाणत्या पक्षपाताचा आरोप मी केला नाही हे प्रतिज्ञेवर सांगतों; नेणत्या पक्षपाताचा आरोप केला हे मी प्रतिज्ञालेखांतच कबूल केलें आहे. तें माझें मत कायम आहे व बदलणें शक्य नाहीं. असलें मत प्रगट करणें यानेंहि बेअदबी होते म्हणून ते प्रगट करण्याची मला परवानगी नाही म्हणाल, तर आपण न्यायबुद्धीनें या प्रकरणी जी शिक्षा योग्य म्हणून ठरवून द्याल ती मी आनंदानें सोशीन. कारण जन्मभर जें काम मी खुषीनें पत्करलें व केलें—म्हणजे लोकमत दिसतें तें माझ्या बुद्धीप्रमाणें वर्तमानपत्रें वगैरेतून प्रगट करण—तें करण्याच्या अनुषंगांत अशा तऱ्हेची जोखीम असणारच हें मला पूर्णपणें माहीत आहे. तथापि ही गोष्टदेखील कोर्टाचा अधिकार जुमानूं नये, किंवा घडलेल्या कृत्यांत पुनः आग्रहानें भर टाकावी, या बुद्धीनें केली नाही.

न्यायकोर्टाचा अधिकार व कर्तव्य हीं दोनहि उच्च दर्जाचीं असल्यानें त्यांना लोकांनीं योग्य तो मान दिला पाहिजे हें मी जाणतों. परंतु लोकमतप्रदर्शक वर्तमानपत्रकार या नात्यानें मला ही टीका करावी लागली, व या नात्यानें वर्तमानपत्रकारालाहि कांहीं विशेष हक्क असतात ते न्यायपीठापुढें व जनतेपुढें यावे एवढाच माझ्या भाषणांतील मुख्य हेतु आहे."

मला जो डिफेन्स द्यावयाचा तो मी दिला. पण यापुढें एक गोष्ट महत्त्वाची उरली होती व तिच्या संबंधानं मात्र काय बोलावयाचें हें मी मनाशीं पक्कें ठरवून ठेवलें होतें. ती गोष्ट अशी. डिफेन्स कितीहि दिला तरी कोर्ट मला दोषी ठरविणार हें निश्चित; व प्रारंभीं माफी मागावी तीहि मी मागितली नाहीं. तेव्हां पुष्कळसा दंड तर होणार. मग त्याच्या जोडीला पूर्वीसारखी ऐनजिनसी शिक्षा कैदेची होते कीं नाहीं पहावें. पण झाली तर तीहि सोसतां येईल. दंड केसरी ऑफिस भरणार व शिक्षा दिल्यास मी तुरुंगांत जाऊन बसणार याविषयीं दोघांचीहि तयारी होती. पण फिरून पूर्वीप्रमाणें लेखी माफी मागण्याची शिक्षाहि दिली, व ती देईपर्यंत तुरुंगांत ठेवावें असा कोर्टानें हुकूम दिला, तर काय करावें? माफीच मागावयाची तर ती प्रथमच मागितलेली बरी, कारण मग नुसती शिक्षाच उरते. पण माफी चुकविण हें हटकून हातचें नसल्यामुळ 'माफी मागाल तरच सोडूं' असें कोर्टानें म्हटलें तर मग काय करावें?

तात्पर्य, हें माफी-प्रकरण माझ्या हातचें नव्हतें. पण एक गोष्ट हातची होती ती अशी की, माफी मागण्याचाच प्रसंग पुढे आला तर आधींच आपण होऊन त्या माफीची किंमत कमी करून टाकावी. म्हणजे मग ती मागितली काय, न मागितली काय, दोन्ही सारखीच! म्हणून मुख्य मुद्यासंबंधाने भाषणें झाल्यावर मी या माझ्या शिक्षेचा मुद्दा घेऊन त्यावर कोर्टाला स्पष्ट सांगितलें कीं, "कोर्टानें मला वाटेल तितकी दंडाची किंवा ऐनजिनसी शिक्षा करावी. मान्य ती निश्चित असावी. पण माफी मागेपर्यंत कैद असें अनिश्चत स्वरूप त्याला ठेवूं नये. सक्तीनें घेतलेल्या माफीला कांहींच किंमत रहात नाहीं! कोणी ती मनापासून मागितली तरच तिचें स्वारस्य! मी ती या खटल्यांत मागितली नाहीं. पुढें कोर्टाच्या हुकुमानें ती मागावी लागली तर सक्तीची ठरेल, मनापासूनची नव्हे. म्हणून कोर्टानें या गोष्टीचा विचार करावा. मी कोर्टाचा अपमान केला तर कोर्टानें मला शिक्षा दिली. मिळून फिटास फींट झाली! मग माफीचा प्रश्न उरत नाहीं व तसा तो न उरावा हें चांगलें.

इतर कोणत्याहि फौजदारी कायद्यांत माफीचा हा प्रश्न उद्भवत नाहीं. होईल ती शिक्षा भोगल्यानें त्या गुन्ह्याच्या पापाची निष्कृति झाली असेंच समजण्यांत येतें. कित्येक गुन्हे सत्याग्रहाच्या स्वरूपाचे असूं शकतील. म्हणजे सत्याग्रही मनुष्यानें केलेले कृत्य हा गुन्हा ठरला तरी त्याकरितां माफी मागा असे कायदा सांगत नाही, व सत्याग्रही मनुष्य ती मागणारहि नाहीं. मी कांहीं सत्याग्रही नव्हे. म्हणजे मी लिहिलें तें बरोबर असें वाटत असले तरी त्याकरितां जन्मभर तुरुंगांत बसण्यास तयार नाहीं. जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा असली तरी तिला वीस वर्षांची मुदत जास्तींत जास्त आहे असे समजतात. पण कोर्टाच्या बेअदबीच्या गुन्ह्याबद्दल, आरोपीनें माफी न मागिल्यास, कोर्टाच्या मर्जीला वाटेल तितके दिवस त्याला तुरुंगांत ठेवतां येते.

"There is only one point and that is about the punishment. In cases of contempt of Court, the theory seems to be that it is an offence which can be purged by nothing but an apology. This is somewhat unfair. It is against the general principle of all other penal law, which assumes that the offence, whatever it may be, should be, or could be purged by undergoing a definite penalty. I would submit therefore that a definite penalty is something that can reconcile the dignity of courts as well as the conscience and self-respect of accused persons. It leaves a fair margin for discrimination and adjustment for the views of both parties to a contempt of Court Case. And it saves the extraordinary powers of the High Court from the odium of being a remnant of the anachronic absolutism of divine regal authority" etc.

म्हणजे या प्रकारच्या कैदेची मुदत जन्मठेपेच्या काळेपाण्याच्या मुदतीहून अधिक झाली म्हणावयाची. तात्पर्य, शिक्षा देण्याचा अधिकार जसा कोर्टाचा तसाच शिक्षा भोगण्यास तयार झाल्यावर माफी न मागतां सुटण्याचा अधिकार आरोपीला असला पाहिजे !"

अशा प्रकारची तक्रार मी सांगत असतां मात्र मार्टेनसाहेबांनीं मला कोठें अडविलें नाहीं. निमूटपणें ती सर्व ऐकून घेतली. असो. अखेर सरकारी

वकिलांनीं थोडेंसें भाषण केल्याबरोबर उभयता न्यायमूर्तींनीं एकामागून एक आपले निकाल तोंडीं सांगितले. मार्टेनसाहेब यांनीं आपल्या निकालांत असें म्हटलें कीं, "हल्लीचे दिवस जातिद्वेषाचे आहेत. तेव्हां अशा दिवसांत न्यायाधिशांवर जातिद्वेषाच्या भावनेनें होणारे हल्ले थांबविलेच पाहिजेत. केळकरांनीं तीन तास चालविलेलें भाषण आम्ही ऐकलें. पण त्यांत गैरलागू अशा गोष्टी बऱ्याच होत्या. असा गुन्हा करण्याची केळकरांची ही दुसरी खेप आहे. पण पूर्वीचा खटला झाल्याला सुमारें सोळा वर्षें झालीं, आणि पूर्वीच्या खटल्यांतील लेखांप्रमाणें हल्लींच्या खटल्यांत केळकरांनीं न्यायाधिशाच्या व्यक्तीवर हल्ला केलेला नाहीं, म्हणून आम्ही फक्त पांच हजार रुपये दंड व दोनशें रुपये कोर्ट-खर्च मिळून ५२०० रुपये दंड करितों."

किंकेडसाहेबांनीं आपल्या निकालांत म्हटलें कीं, "या खटल्यांत केळकरांनीं सर्वस्वी बेगुमानपणाची वृत्ति स्वीकारलेली दिसते. मी पुण्यास पुष्कळ वर्षें न्यायाधीश होतों. त्या वेळीं टिळकांनीं केसरी चालविलेला होता. त्याची मला माहिती आहे. केसरीपत्राइतका विस्तृत वाचकवर्ग दुसऱ्या कोणत्याहि वर्तमानपत्राला नाहीं. निदान वीस हजार लोकांनीं तरी केळकरांचा लेख वाचलेला असेल; व त्या लेखांत न्यायकोर्टावर ताशेरा झाडलेला आहे. तसेंच त्यांचा हा दुसरा गुन्हा आहे म्हणून मीहि मार्टेनसाहेबांनी जी शिक्षा दिली तिला अनुमोदन देतों."

खटल्याच्या पहिल्या दिवशीं कोर्टांत गर्दी नव्हती. पण दुसरें दिवशीं बरीच झाली; व खटल्याच्या निकालाची बातमी सर्व मुंबई शहरभर संध्याकाळपर्यंत पसरली. कोर्टातून बाहेर पडतांच अनेक स्नेह्यांनीं शाबासकी दिली. मारवाडी विद्यालयांत जाहीर सभा भरवून माझें अभिनंदन केलें. अनेक भाषणें झालीं. आणि नंतर त्या आठवड्यांत निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून जें लोकमत प्रकट झालें त्यावरून या कामीं मला सर्व प्रांतांतील लोकमताची सहानुभूति होती हें तर दिसलेंच; पण वकील न देतांना स्वतःच खटला चालविण्याचा मी आग्रह धरला त्याचेंहि चीज झालें. तें असें कीं, मी या खटल्यांत केवळ स्वतःचा बचाव करीत होतों असें नाहीं, तर एकंदरीनें वर्तमानपत्रांच्या हक्कांबद्दल मी आपल्या भाषणांत भांडत होतों या गोष्टीचा अनेकांनीं गौरवपर उल्लेख केला. हें खालीं दिलेल्या कांहीं थोड्या उताऱ्यांवरून लक्षांत येईल.

**मुंबईची जाहीर सभा**—रविवार, ता. १० ऑगस्ट रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां मारवाडी विद्यालयांत मुंबईच्या नॅशनल युनियनतर्फे जाहीर सभा भरली होती. सभा भरविण्याची कल्पना प्रथमच रविवारीं सकाळीं जाहीर झाली. तरी सभेच्या आधीं सुमारें २ तास विद्यालयाचा दिवाणखाना भरून जाऊन, तेथें सभा करणें अशक्य म्हणून बाहेरच्या पटांगणांत ती भरवावी लागली. तरीहि सर्व जागा भरून खिडक्या, कठडे, भिंती, आसपासच्या इमारती यांतून प्रेक्षक बसले होते; व श्रोतृसमुदायाच्या निम्म्याहून अधिक गर्दी स्थलसंकोचामुळें परत गेली. प्रारंभीं श्री. अण्णासाहेब नेने यांनी सूचना केल्यावरून 'इंडियन सोशल रिफार्मर'चे संपादक श्री. नटराजन् यांनीं अध्यक्ष या नात्यानें पुढीलप्रमाणें भाषण केलें.

"श्री. न. चि. केळकर ह्यांनी हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांच्या सांप्रदायाची जी सेवा केली आहे तिजबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याकरितां आजची सभा भरविण्यांत आली आहे. श्री. मंडलिक ह्यांनीं मला अध्यक्ष होण्याबद्दल विनंति केली ती मान्य करूं नये असें प्रथम माझ्या मनांत आलें. ह्याचें कारण असें कीं, सार्वजनिक कार्यांत श्री. केळकर ह्यांच्याशीं अधिक निकट संबंध आलेले गृहस्थ अनेक आहेत, त्यांपैकीं कोणास आजच्या प्रसंगी अध्यक्षस्थान देण्यांत आलें असतें तर अशा अध्यक्षाच्या भाषणांत केळकरांच्या प्रत्यक्ष ओळखीचा, आणि त्यांच्या कामगिरीबद्दल अधिकारयुक्त असा, उल्लेख स्वाभाविकच आला असता. परंतु वर्तमानपत्रकार ह्या नात्यानें मी आज अध्यक्ष व्हावयास पाहिजे असें जेव्हां मला मागाहून सांगण्यांत आलें तेव्हां मात्र ती गोष्ट मी ताबडतोब कबूल केली. कारण केळकर आणि मी हे वर्तमानपत्राच्या ज्या युगाचे किंवा मनूचे प्रतिनिधि आहोत तो मनु पालटत चालला आहे. लो. टिळकांच्या उलाढालीच्या कारकीर्दीतील अनेक महत्त्वाच्या प्रसंगावर केळकर ह्यांनीं आपल्या 'मराठा' ह्या इंग्रजी पत्रांतून वेळोवेळीं जे अनेक लेख लिहिले आहेत, त्यांचा संग्रह मद्रासच्या गणेशन् कंपनीनें प्रसिद्ध केला आहे तो मी सध्यां वाचीत आहे. तो वाचीत असतां श्री. केळकर ह्यांनीं वरील लेखांतून आपल्या नांवाचा उल्लेख एकाच ठिकाणीं केला आहे हें पाहून त्यांच्या विनयशीलतेची साक्ष मला पटली. तो उल्लेख केळकर ह्यांनीं लोकमान्यांच्या ज्युबिलीवरील आपल्या लेखांत केला आहे. १८९६ च्या मार्च महिन्यांत लोकमान्य टिळक

त्यांनीं केळकर यांना आपणास येऊन मिळण्याविषयीं लिहिले. त्या पत्रांत लोकमान्य म्हणतात, " मला तुम्ही माझ्या शेवटच्या दिवसांत नोकर म्हणून नव्हे तर मित्र म्हणून हवे आहा. हे दिवस कदाचित् माझ्या आयुष्याचे शेवटचेहि असतील. " ह्या पुस्तकानें माझ्या मतें श्री. केळकर व लो. टिळक ह्यां व्यक्तींचें अंतरंग आपणास पहावयास मिळेल.

" श्री. केळकर हे आज २८ वर्षें वर्तमानपत्राचा धंदा करीत आहेत. ह्या धंद्यांत माझीहि तितकींच वर्षें गेलीं आहेत. आमच्यासारख्या वर्तमानपत्रकर्त्यांचा मनु जात चालला आहे हें मी केळकर ह्यांस प्रारंभीच सांगितलें आहे. त्या मनूस काय नांव द्यावें ह्याबद्दल मला नेमका शब्द सांपडत नाहीं. तथापि सध्यांच्या वर्तमानपत्रकारांस धंदेवाइकांचा मनु म्हटलें तर आमच्या मनूस मिशनऱ्यांचा मनु म्हणतां येईल. अशा माणसांस वर्तमानपत्रांचा एरवीं उपयोग नाहीं व वर्तमानपत्रांना अशा माणसांचा इतर उपयोग नाहीं; उपयोग असलाच तर तो एवढाच की, त्यांना आपला आत्मप्रत्यय वर्तमानपत्रांतून मांडावयास मिळतो. लो. टिळक ह्यांचे वर्णन कितीहि पानांतून केलें तरी त्याला, लोकमान्यांनी केळकरांस लिहिलेल्या पत्रांत जें वर्णन उमटलं आहे त्याची सर येणार नाहीं. माणसाच्या अंतरंगाचा ठाव काढण्याची केवढी विलक्षण शक्ति लोकमान्यांत होती हें त्या पत्रावरून चटकन लक्षांत येते. लोकमान्यांचे जिवलग स्नेही ह्या नात्यानें केळकरांचें नांव पुढील पिढ्या घेतील हा माझाच एकट्याचा ग्रह आहे असें नव्हे; तर लोकमान्यांचें व केळकर ह्यांचें निरीक्षण करण्याचा प्रसंग ज्यास अनेकवार आला असेल त्यांचाहि झाला असेल. मात्र केळकरांस लोकमान्यांविषयी फार आदर होता तरी देखील त्यांनीं आपली सदसद्विवेकबुद्धि त्यांच्या स्वाधीन केली नव्हती. उदारमतवादीपणा आणि स्वतंत्र विचार धारणी ह्याबद्दल केळकरांविषयीं त्यांच्या प्रतिपक्षासहि आदरभाव वाटतो. मी 'मराठा' पत्र कित्येक वर्षे वाचीत आहे आणि त्यांतील मतें जितक्या वेळां मला पसंत पडली तितक्याच इतर वेळां तीं नापसंतहि वाटलीं. पण एक गोष्ट मला पटली ती ही कीं, त्यांतील मतें व भावना हे जिवंत प्रवाह असून इतर माणसांच्या कल्पनांच्या त्या निव्वळ नकला नाहींत.

" श्री. केळकर हे लोकमान्यांचे परम योग्य सहकारी होत, आणि हा मान हिंदी वर्तमानपत्रकार ह्या दृष्टीनें कोणासहि अत्यंत मोठा होय. त्या

प्रस्थात पुढाऱ्याचा चतुर्थ स्मृतिदिन गेल्या आठवड्यांत साऱ्या देशभर मोठ्या उत्साहानें पाळण्यांत आला, त्या पुढाऱ्याचीं खरीं मतें जर कोणाच्या तोंडून ऐकावयास मिळतील तर तीं केळकरांच्या तोंडूनच होत अशी देशाची खातरी झाली आहे. संपादकाच्या खुर्चीवरून ते आतां असेंब्लींतील पदावर चढले आहेत. त्या नवीन क्षेत्रांतहि त्यांचें तेज चांगलें पडो असें मी इच्छितों.

"हायकोर्टाच्या एका निकालावर केसरींत कांही टीका येऊन त्यामुळें कोर्टाची बदनामी झाली अशा गुन्ह्याबद्दल केळकरांस जबर दंड झाला आहे.

"कोर्टाच्या बेअदबीबद्दल झालेला ५००० रुपयांचा दंड प्रमाणाबाहेर फाजील आहे हें स्पष्टच आहे. आमची वर्तमानपत्रें कसल्या अडचणीतून मार्ग काढीत आहेत, त्यांस माणसांची पैशाची आणि इतर साहित्यांची किती आवश्यकता आहे, हें लक्षांत घेऊन अशा दंडाच ओझें श्री. केळकर आणि केसरी पत्र त्यांस सोसावयास लावूं नये असें मला वाटतें. केसरींत ज्या प्रकारचें मत व्यक्त झालें तें हायकोर्टाची नालस्ती करण्याचा बुद्धिपरस्सर प्रयत्न नसून, ब्रिटिश न्यायपद्धतीविषयीं लोकमत काय आहे त्याचे निदर्शन होय असे सर्वांनीं मानलें पाहिजे."

यानंतर श्री. मुकुंदराव जयकर बॅरिस्टर यांचें विस्तृत भाषण झालें. ते म्हणाले, "न. चिं. केळकर यांना मी फार दिवसांपासून जाणतों व त्यांच्या अनेक गुणविशेषांबद्दल मला फारच प्रेम आणि कौतुक वाटतें. केळकर यांची विनयसंपन्नता खरोखरच फार नांवाजण्यासारखी आहे. लोकदृष्टीला मागेंच रहावयाचें, पण आपलें कर्तव्य चोख व निर्भय रीतीनें करावयाचें अशी त्यांची रीत आहे. मी त्यांना प्रथम १९०४ सालीं पाहिलें व तेव्हांपासून त्यांचा माझा परिचय व प्रेमभाव हा वृद्धिंगतच होत गेला. टिळकांच्या भोंवतीं त्या वेळीं जी दहाबारा मंडळी होती त्यांत ते एखाद्या शाळेंतल्या मुलासारखे व आपल्या गुरुबद्दल अत्यंत आदरभाव बाळगणारे असे दिसले. टिळकांच्या देखत काय किंवा इतर कोठें काय, अद्वातद्वा लिहिण्याची व भाषण करण्याची त्यांस कधींच संवय नव्हती. शब्द मोजके, माफक, अर्थपूर्ण व अदबीनें लिहावें किंवा बोलावें कसें हें केळकरांपासून शिकावें. त्यांचें ज्ञान, व्यासंग व बहुश्रुतपणा फारच थोड्यांच्या अंगीं असेल. आजकाल

अठ्ठावीस वर्षें केसरी-मराठा पत्राचें काम ते अत्यंत जबाबदारीनें व चातुर्यानें संभाळीत आहेत. पण भपकेबाजपणा, आचरटपणा, बढाईखोरपणा किंवा बकवा ते कधीं करीत नाहींत. असेब्लीचे ते सभासद आहेत. आणि त्यांनीं आतां-पर्यंत भाषणें अशीं एकदोनच केलीं. पण पडद्याआड त्यांचा सल्ला, पोक्तपणा व ज्ञान यांजा फायदा लोकपक्षाला किती होतो याची कोणाला अटकळहि नसेल. असो. आज त्यांजवर झालेल्या खटल्यांत त्यांना दंड झाला यांत आश्चर्य असें कांहींच नाही. मुळांत कायदाच सदोष तेथें जज्ज काय करतील ? सर अँबरसन मार्टेन यांना मी हायकोर्टांत काम करणारा एक बॅरिस्टर या नात्यानें चांगलें जाणतों. पण त्यांनी देखील या खटल्यांत दंडाची शिक्षा दिली यावरून एकच गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, केसरी-मराठ्याचा केळकरांसारखा अत्यंत जबाबदार संपादक काय परिस्थितींत, काय धोरणानें, कशा भाषेंत लिहितो हें जाणण्याची न्यायाधीशांची पात्रताच नाहीं. आफ्रिकेंत किंवा चीनमध्यें आपल्यापैकीं कोणाला न्यायाधीश नेमून जर एखाद्या नीग्रो किंवा चिनी वर्तमान-पत्रकाराचा खटला आपणांपुढें आला तर आपण त्याचें म्हणणें समजल्याशिवाय त्याला योग्य न्याय कसा देणार ! केळकरांचा गुन्हा कांहींच नाहीं. आपल्या आजच्या अध्यक्षांसारखे न्यायाधीश जर असते तर प्रस्तुत खटल्याचा काय निकाल झाला असता हे पाहा. नटराजन् यांनीं सांगितल्याप्रमाणें केळकरांना झालेला दंड आपणां सर्वांना झालेला आहे तो आपणच सर्वांनीं भरला पाहिजे. "

जम्नादास मेथा यांचें भाषण—जयकरांनंतर श्री. जम्नादास मेथा यांनीं भाषण केलें. ते म्हणाले, " केळकरांविषयीं जयकरांनी सांगितलें त्यांपेक्षां अधिक कांहीं सांगावयाचें नाहीं. केळकर परवां मजकडे जेवावयास आले होते. तेव्हां मी त्यांना म्हटलें, ' तुमची आतां लवकरच तुरुंगांत रवानगी होईल. ' यावर त्यांनीं मला विनोदानें एका म्हाताऱ्या बाईची व वाघाची गोष्ट सांगितली. त्या गोष्टीतल्या वाघाची उपमा कांहीं केळकरांना झालेल्या दंडाला देतां येत नाहीं. पण तो कोल्हा देखील आपणच नाहींसा केला पाहिजे. "

डॉ. वेलकर म्हणाले, " तात्यासाहेबांचें गुणवर्णन करावें तितकें थोडेंच होईल. हिंदी वर्तमानपत्रकार या नात्याच्या त्यांच्या कर्तबगारीचें स्थान अत्यंत उच्च आहे. आजकालच्या गढूळ परिस्थितींत उत्तम मार्गापासून राष्ट्राला विन्मुख होऊं न देतां त्यांनीं गेल्या तीस वर्षांत केलेली सेवा बहुमोल आहे. "

सरोजिनीबाईंचें भाषण—सरोजिनीबाई नायडू आपल्या भाषणांत म्हणाल्या, " या खटल्यांत केळकरांनी जी धडाडी आणि जें धैर्य दाखविलें, व जें लोकसेवेचें थोर काम बजावलें त्याबद्दल त्यांचें अभिनंदन मी मोठ्या आनंदानें करतें. केळकर यांनीं लोकमान्यांची परंपरा व धोरण हीं अखंड राखिली. टिळक व गांधी यांच्यांत लोकधुरीण म्हणून पसंत कोणाला करावें असें मला विचारल तर मी टिळकांनाच पसंत करीन. पण लोकांनीं साधुत्व व श्रद्धा कोणाकडून शिकावी तर ती सावरमतीच्या महात्म्यापासून असेंहि मी म्हणेन. गांधींनीं देखील केळकरांचे गुण फार घेतले आहेत. केळकरांचें मराठी फार सुंदर आहे. मला तें समजतें, पण बोलतां येत नाही. तथापि केळकरांचें इंग्रजीहि कांहीं कमी सुंदर नाहीं. विलायतेस व येथेंहि मी त्याचा पुष्कळ अनुभव घेतला आहे. शोधक, विवेचक, व भेदक बुद्धिमत्व उत्कृष्ट व जरूर त्याच शब्दांची योजना त्यांच्यासारखी फार थोडक्यांना साधेल. विलायतेत मि. नेव्हिन्सन हे मजजवळ केळकरांविषयीं कौतुकपूर्ण भाषेनें बोलले. तसेच लेबरपार्टीच्या किंवा सरकारी व बिनसरकारी ज्या ज्या गृहस्थांशी भाषणप्रसंगांत केळकरांचा उल्लेख कारणपरत्वे आला त्यां त्या वेळी केळकरांच्या विनयशील कर्तृत्वासंबंधानें त्यांनीहि मजजवळ प्रशंसापर उद्गार काढल्याचें स्मरतें. माझे व त्यांचे कांहीं मतभेद आहेत. पण त्यांची विद्वत्ता, रसिकता व धैर्य यांबद्दल माझा आदर केवळ निरतिशय आहे."

डॉ. सावरकर यांचें भाषण—डॉ. नारायणराव सावरकर म्हणाले, " आजचा प्रसंग मला असें सांगत आहे कीं, ज्या केसरीनें केव्हांहि केवळ लोकपक्षाचीच बाजू उत्तम रीतिनें लोकमान्यांच्या वेळीं त्याचप्रमाणें हल्लीहि, सिंहासारखें शौर्य व धैर्य दाखवूनच मांडली, त्याला तुझा अल्प नजराणा देणें हें तुझें कर्तव्य आहे व ते मी बजावीत आहे तरवारीच्या धारेनें डोक्यावर लिंबू मारावें तशी केळकरांची भाषा असते. त्यांचे माझे कितीहि मोठे मतभेद असतें तरी या कामीं ते मला अडवूं शकले नसते, मग माझे मतभेद तर किरकोळच आहेत. केळकरांनीं माझा हा आदरपूर्वक दिलेला नजराणा स्वीकारावा."

नरीमन यांचें भाषण—नरीमन यांनीं असें सांगितलें कीं, " तात्या साहेबांची कीर्ति या खटल्यामुळें अधिकच वाढेल. नोकरशाहीशीं भांडून भांडूनच आपल्याला सत्ता हस्तगत केली पाहिजे. नोकरशाही आपल्याच हातें

सत्ता ठेवण्याकरितां कशी खटपट करते हें बंगालसरकारच्या उदाहरणावरून लक्षांत घ्या, व खिशांत हात घालून केसरीचा दंड भरण्याच्या उद्योगाला लागा."

यानंतर नटराजन् यांनीं मला बोलण्याची विनंति केल्यावरून मी म्हणालोः— "आतांपर्यंत अनेक वक्त्यांनीं माझ्यासंबंधानें जे उद्गार काढले त्याबद्दल मी त्यांचा किती ऋणी आहे हें सांगतां येत नाहीं. अशा प्रकारचा खटला प्रथम सोळा वर्षांपूर्वी मजवर झाला. तेव्हां मला १२०० रुपये दंड व चौदा दिवसांची शिक्षा झाली होती. या सोळा वर्षांची एकदम बढती देऊन हायकोर्टानें काल बाराशेंचे ५२०० रुपये दंड केला. कैदेच्या शिक्षेंतहि अशीच बढती होईल असा स्वतः माझा व इतरांचाहि अंदाज होता. गेला बाजार सहा-आठ महिने इतकी तरी निश्चित शिक्षा होईल असें आम्ही सर्व घेऊन चाललो होतों, व तींच गोष्ट माझे मित्र जम्नादास मेथा यांनी निराळ्या रीतीनें सांगितली.

"जम्नादासांनीं गुरुवारीं रात्रीं आम्हा मंडळींना जेवण्यास निमंत्रण दिलें तें 'केळकर घेऊन अगर केळकर वगळून' असेंच दिलें होतें! पण त्या दिवशी खटल्याचा निकाल झाला नाही म्हणून मी त्यांजकडे जेवायला गेलों. ते म्हणाले, 'तुम्ही जेवायला येऊं शकतां कीं नाही याची काल शंकाच होती.' मी म्हणालो, 'तुमच्या घरची मेजवानी झोडल्याशिवाय कांहीं मी तुरुंगांत जात नाहीं खास!' आणि हरप्रसंगी त्यांना मी व्यवहारांतलें मराठी शिकवीत असतों, त्याप्रमाणें या वेळीं मी त्यांना म्हणालों, "जम्नादास मी तुम्हाला एक मराठी गोष्ट सांगतों लक्षांत ठेवा. एक म्हातारी बाई आपल्या लेकीच्या घरी चालली होती. तिला वाटेंत रानांत वाघ भेटला. तो म्हणाला, 'म्हातारबाई, म्हातारबाई, मी तुला खातो.' पण ती बाई भोळी होती. तिला वाघाचा स्वभाव काय माहीत? ती म्हणाली, 'वाघोबा! वाघोबा! आज मला खाऊं नको. लेकीच्या घरीं जाते. तूपरोटी खाते, घट्टीमुट्टी होते, मग मला खा!' (हंशाच हंशा.) शिशुवाङ्मयांतील ही गोष्ट मी एरवीं तुम्हांला सांगितली नसती. पण जम्नादास यांनीं इंग्रजीत तिचा उल्लेख केला, व तिचें खरें स्वारस्य तुम्हांला कळावें म्हणूनच ती मराठींत सांगितली. गोष्टीचा मुद्दा इतकाच, कैदेच्या शिक्षेच्या बाबतींत सोळा वर्षांनीं माझी बढती व्हावी असा माझा व सर्वांचा जो अंदाज होता तो मात्र फसला. कदाचित् माझें वय ५०।५२ वर्षांवर आहे म्हणून न्यायमूर्तींनीं मला

कैदेची शिक्षा दिली नसेल. कदाचित् सरकारला आज पैशाची अधिक जरूरीहि असेल ! कारण एका दिवसांत माझे ५२०० व विनोदपत्राचे १८०० मिळून ७००० रुपयांची रक्कम सरकारनें मिळविली ! केसरीचा दंड लोकांनीं भरावा असे उदार उद्‌गार कित्येकांनी येथें काढले त्याबद्दल मी फार आभारी आहे. पण तो दंड केसरीनें कालच भरून टाकला. या दंडाच्या बाबतीत विनोदपत्राच्या मुद्रकाला मात्र उगाच कडकपणें वागविण्यांत आलें. त्या बिचाऱ्याचा लेखाशीं काय संबंध ? शिवाय त्यानें माफी मागितली होती, व ती स्वीकारण्याबद्दल सरकारी वकिलांनींहि शिफारस केली होती. म्हणून लोकांना या कडक शिक्षांची चीड आली असेल तर प्रथम या बिचाऱ्या मुद्रकाचा दंड भरण्याला त्याला लोकांनीं मदत करावी. विनोद पत्रांत मजविषयी कसे लेख येतात हें आपणांस माहीत आहेच. पण न्यायकोर्टाच्या अशा या दडपशाहीनें तें पत्र बुडावें हें मला पसंत नाहीं. म्हणून आपण कोणी त्याला मदत केली तर बरें होईल. कारण अशानें त्याच्यांतील दोष निघून जाऊन तें आपल्या पक्षालाहि कदाचित् मिळेल.

" असो. कोर्टाच्या बेअदबीच्या गुन्हा कशा प्रकारचा आहे हें आतां आपल्या लक्षांत आलेच असेल. कोर्टानें खटला भरला की, माफीशिवाय आरोपीला सुटकाच नाहीं, अशी कोर्टानें आपली समज़त करून घेतलेली दिसते. म्हणूनच जुलमानें माफी घेणें किती अप्रशस्त आहे, हें मी परवां कोर्टास सागितलें. चोरानें खिडींत गांठून लिहून घेतलेली पावती, आणि न्यायकोर्टानें जन्मभर तुरुंगांत ठेवण्याचा धाक दाखवून सक्तीनें मिळविलेली माफी, यांत कांहींच फरक नाहीं. पण आरोपीनें माफी न मागितली तर त्याला जन्मभर कैदेंत ठेवण्याचा अधिकार कोठला, याची उपपत्ति लक्षांत आणा म्हणजे या चमत्काराचे खरें मर्म कळून येईल. ती उपपत्ति म्हणजे न्यायमूर्ति हे अमर्यादित राजसत्तेचे प्रतिनिधि होत, ही होय. पण राजसत्तेचा विलायतेंत खेळखंडोबा कसा चाललेला आहे हें लक्षांत आलें म्हणजे राजसत्तेच्या या प्रतिनिधींच्या बहाण्याची मौज वाटते. बर्कनें सर्व जन्मांत एकच कोटी केली असें म्हणतात; व ती कोटी अशी कीं, ' व्हॉट इज मॅजेस्टी बट ए जेस्ट व्हेन शॉर्न ऑफ इट्स एक्स्टर्नल्स ! ' 'मॅजेस्टी' या इंग्रजी शब्दाच्या अक्षरांतील बाह्यांगें गेलीं म्हणजे बाकी निव्वळ ' ए जेस्ट ' म्हणजे 'थट्टा 'च उरतें ! विलायतेंत राजसत्तेचीं बहुतेक अंगें नष्ट होऊन राजा हा आतां निव्वळ

पार्लमेंटच्या हातांतील बाहुलें झाला आहे. अशा राजाच्या बळावर, आणि विलायतेंतील 'कॉमन लॉ' इकडे लावून, न्यायमूर्ति जर वाटेल त्याला, माफी मागत नाहीं म्हणून आपल्या मर्जीस वाटेल तितके दिवस म्हणजे जन्मच्या जन्म, कैदेंत ठेवूं म्हणतील तर तें कोण ऐकून घेईल ? निदान त्याला कोण हंसल्या-खेरीज राहील ?

"गुन्ह्याला निश्चित शिक्षा असली म्हणजे स्वाभिमानी मनुष्य माफीची याचना सहसा करणार नाहीं. कोर्टानें केलेली त्याची 'कन्व्हिक्शन' म्हणजे आरोपशाबिती, आणि आरोपीच्या स्वतःच्या 'कन्व्हिक्शनस्' म्हणजे त्याची नैष्ठिक मतें यांना एकत्र नांदण्यास जागा तरी मिळेल. जन्मठेप काळेपाणी दिलें तरी तें वीस वर्षांत संपतें; आणि कोर्टाच्या बेअदबीसारख्या फुसक्या गुन्ह्या ला मात्र अमर्यादित शिक्षा ! पण ही स्थिति अशी आहे खरी. अर्थात तिजविरुद्ध आपण लढलें पाहिजे. विलायतेंत वर्तमानपत्रकारांनीं किती जबर झगडा केला हें इकडे पुष्कळांना माहीत नाहीं. सर अर्स्किन मेचें पुस्तक वाचा म्हणजे कळन येईल. एकेका वर्षांत दोनदोनशें वर्तमानपत्रांवर खटले ! पण लोकमताच्या सहानु-भूतीच्या आधारावर वर्तमानपत्रें हीं भांडणें भांडलीं. सरकारी शिपायांनीं अपराधी वर्तमानपत्रकाराला खोड्यांत घालण्यास नेलें म्हणजे त्याच्याबरोबर लोक जात, व खोड्याजवळ एक वधस्तंभ पुरून त्यावर राजचिन्हें व न्यायचिन्हें उभी करून तीं समारंभानें जाळीत. अर्थात लोकमत दाखविण्याचा तो एक ग्राम्य प्रकार होय. पण लोक आपलें मत प्रगट केल्याशिवाय रहात नसत इकडे आपणालाहि हें स्वातंत्र्य निराळ्या रीतीनें पण अद्यापि प्रस्थापित करावयाचे आहे. हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीची घटना कायद्याच्या रूपानें आतां थोडीबहुत तरी निश्चित झाली आहे. पण वर्तमानपत्रांच्या बाबतीत ज्यूरी वगैरेचा कांहींएक अधिकार आपणास नसल्यानें आपण सर्वस्वी पराधीन आहों. पण हें स्वातंत्र्य मिळवावयाचें तर तें जोराच्या प्रयत्नाशिवाय मिळणार नाहीं. या बाबतींत इमर्सन नामक तत्त्वज्ञाचें एक वाक्य आपणाला सांगतों. 'ए रिव्हर मेक्स इट्स् ओन बेड' म्हणजे 'नदी आपलें पात्र आपणच निर्माण करतें' नदीला तिचें पात्र दुसरा कोणी निर्माण करून देत नाहीं. तिच्या अंगांत जोर असेल तर त्या प्रमाणानें तिला लहान अगर मोठें पात्र लाभतें. जमीन भुसभुशीत मिळाली तर नर्मदा नदी आपलें पात्र अर्धा मैल रुंद खणतें, पण वाटेंत विंध्याद्रीसारखा पर्वत

आला तरी ती त्यांतून आपला मार्ग काढल्याशिवाय रहात नाहीं; मात्र खडक कठिण म्हणून येथें ती लहान पात्रावर आपलें समाधान करून घेतें. परंतु पात्र लहान म्हणून तिचें पाणी वाहून जाण्याचें रहात नाहीं, तर उलट इतर ठिकाणांपेक्षां अधिक जोरानें व खळखळीनें वाहात असतें.

"मला या विषयावर अधिक बोलण्याची इच्छा नाहीं. सर्व वर्तमानपत्रकारांना त्यांच्या धंद्याच्या अनुषंगानें अशी जोखीम पत्करावीच लागते. पण मी माझ्या धंद्याची नसती प्रौढी मिरवूं इच्छित नाहीं. असा कोणता धंदा आहे कीं, त्याची म्हणून विशेष जोखीम नाहीं ? गवंडी चार-चार मजल्यापर्यंत परांचीवर बसून भिंती बांधतो. मग जन्मभर हा धंदा करणाऱ्या गवंड्याच्या मनांत केव्हां कधींच असें आलें नसेल काय कीं, आपण उंचावरून पडूं व आपणास दुखापत होईल व ती सोसावी लागेल ! त्याच रीतीनें गेल्या तीस वर्षांत ज्या ज्या संपादकांनीं आपल्या नांवाचें डिक्लेरेशन करून वर्तमानपत्रें, विशेषतः राष्ट्रीय पक्षाच्या धोरणाचीं पत्रें चालविलीं, त्यांना आपणावर तरी राजद्रोहाचा किंवा इतर खटला होऊन आपणास तुरुंगांत जावें लागेल अशी कल्पना असणारच. ही कल्पना डोळ्यापुढें असतांहि जो तें काम करतो त्याला तितक्यापुरतेंहि धैर्य नाहीं असें म्हणणें किंवा मानणें हें स्वतः म्हणणाऱ्याच्या किंवा तसें मानणाराच्या मूर्खपणाचेंच निदर्शक ठरेल ! टिळकांसारखे मनोधैर्याचे अर्थात् थोडेच सांपडणार. परंतु आपल्या धंद्याला लागणारें सामान्य प्रतीचें धैर्य हें ज्याला त्याला असतेंच. आतां धैर्य दाखविण्याचा अलीकडचा एक मार्ग निघाला आहे; तो अनुसरावयाचा म्हटला म्हणजे कोणीकडून तरी तुरुंगांत जावें म्हणून मुद्दामच कांहीतरी लिहून तुरुंगवास ओढवून घेणें. पण वर्तमानपत्रकार हा कायद्याच्या दृष्टीनें प्रवाहपतित असतो, त्याला केव्हां शिक्षा भोगावी लागेल याचा नेम नसतो, येवढेंच मनांत बाळगून जेव्हां तो प्रसंग येईल तेव्हां तो आनंदानें स्वीकारणें हा दुसरा मार्ग होय. असो. आपण सर्वांनीं मजविषयीं सहानुभूति दाखविली तिजबद्दल मी आपले आभार मानून आपलें भाषण पुरें करतो."

**पुण्याची जाहीर सभा**—ता. १५ रोजीं सायंकाळीं श्रीशिवाजीमंदिरांत श्री. भास्कर बळवंत भोपटकर यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरली होती. आपल्या प्रास्ताविक भाषणांत अध्यक्ष म्हणाले, "गेलीं दोनतीन वर्षें देशांत भाळीभिळींचें जें खूळ पसरलें होतें त्यास श्री. तात्यासाहेब बळी न पडतां त्यांनीं

हायकोर्ट लढविलें व 'कर्मण्येवाधिकारस्ते' ही लोकमान्यांची परंपरा त्यांनीं अबाधित राखिली याबद्दल त्यांचें आपण अभिनंदन करीत आहो."

यानंतर **ल. ब. भोपटकर** यांनीं आपल्या भाषणास सुरुवात करतांना लोहगांवच्या खटल्याची सविस्तर हकीकत सांगून त्यांतून केसरीवरील खटला कसा निघाला याची माहिती सांगितली. नंतर ते म्हणालेः—

"खटला चालवितांना तात्यासाहेबांनीं वृत्तपत्रकारांची बाजू मोठ्या बाणेदारपणानें पुढें मांडली. त्यांनीं हायकोर्टास स्पष्ट बजावलें कीं, हायकोर्टाचे न्यायाधीश हेहि माणसेंच असतात. हायकोर्ट हे सर्वगुणसंपन्न समजावयाचें कीं काय, या प्रश्नाचा आपणास केव्हांतरी निर्णय करून घ्यावा लागेल.

"सन १९२१ साली असहकारिता सुरू झाली. त्या वेळीं खटल्यांत बचाव करावयाचा नाहीं असें एक धोरण राष्ट्रांत उत्पन्न झालें. परंतु हे धोरण आत्मघातकीपणाचें आहे असें महाराष्ट्रानें तेव्हांच दे. तात्यासाहेबांच्या नेतृत्वाखाली स्पष्टपणें प्रतिपादन केलें, व त्यांनी हल्लीं स्वीकारलेलें बचावाचें धोरण लोकमान्यांच्या धडाडीला अनुरूप असेंच होतें. राजकीय खटला ज्याचा त्यानें स्वतःच चालवावा ही गोष्ट नेहमींच इष्ट असते व त्यास अनुसरून केळकर यांनीं उत्कृष्ट काम केलें. वर्तमानपत्रकर्ते व सरकार यांमधील हा झगडा या दृष्टीनें त्यांनी खटला झुंजवला. लोकमान्यांचा पाठीमागें सर्व बाबतीत श्रेष्ठ कोण असें मला कोणी विचारल्यास मी तात्यासाहेबांच्याकडेच बोट दाखवीन. विद्वत्ता व उत्कृष्ट लेखन या बाबतींत तर त्यांच्या तोडीचे संपादक विरळा. विष्णुशास्त्रीबुवांच्या मागें महाराष्ट्र भाषेला सौंदर्ययुक्त अशी त्यांनींच बनविली, लोकमान्यांची परंपरा उत्कृष्टपणें चालविली, व त्यामुळें ते महाराष्ट्रास ललामभूत झाले आहेत."

यानंतर **न. वि. गाडगीळ** म्हणाले, "वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य कमी करण्याचा सरकारचा कटाक्ष उघड दिसतो. परंतु हें धर्मयुद्ध खास नव्हें. एक इंग्रजी ग्रंथकार म्हणतो, 'मला वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य द्या म्हणजे मी देश स्वतंत्र करतों,' असें महत्त्वाचें हें स्वातंत्र्य आहे. न्यायपद्धतींतच पक्षपातित्व आहे हा मूळ तंट्याचा मुद्दा आहे; व श्री. तात्यासाहेब यांनीं न्यायमूर्तीशीं समानतेची पूर्ण जाणीव ठेवून आपलें काम चालविलें. इतक्या निर्भीडपणें एखाद्या नामांकित वकिलालाहि काम चालवितां आलें नसतें. ऐन वेळीं केळकरांनीं उदात्त प्रसंगाला

उदात्तपणें तोंड देऊन स्वतःची सरशी केली असे मुंबईचे एक वकीलच मजजवळ म्हणाले, व तें सर्वथैव योग्य व लोकमान्यांच्या परंपरेला धरूनच होतें."

याप्रमाणें भाषणें झाल्यावर मी आभार मानतांना म्हणालों—

"आपण प्रेमानें माझा माझ्या योग्यतेहून अधिक गुणगौरव केला त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. मजवर हा खटला यदृच्छेनें झाला; तो अमक्यातमक्यानें आकसानें केला असें मी म्हणत नाहीं. आम्हा वर्तमानपत्रकारांचें जीवित म्हणजे एक प्रकारें वनवासच आहे. कायद्याच्या रानावनांत खटल्यांचे विंचू, इंगळ्या, साप वावरत असतां आम्हीहि त्यांच्यामध्येंच वावरत असतो, व आपल्या अकलेप्रमाणें सावधगिरीचे बूट-जोडेहि पायांत घालीत असतो. पण अशाहि स्थितींत साप विंचू हे क्वचित् दंश करणारच. मी १९१० फेब्रुवारीपासून आजतागायत सुमारें १३॥ वर्षे केसरीचा संपादक आहे. या अवधींत मजवर एकच खटला झाला ही गोष्ट मी सुदैवाची समजतों. हीं वर्षें प्रेस ॲक्टाच्या व महायुद्धादि इतर कारणांनीं कशा प्रकारचीं होतीं हें आपण जाणतांच.

"खटला झाला असतां माझा मीच बचाव करणें ही गोष्ट अगदीं स्वाभाविक अशीच होती. त्यांत मी विशेष असें कांहीं केलें नाहीं. मी या कामी अयोग्य अभिमान धरला नव्हता पण योग्य अभिमानहि टाकला नव्हता. स्वतः मी एल्एल्. बी. आहे व त्या धंद्यांत असतों तर वकिली केलीच असती. माझे सहकारी वकील लोक वकिली करतात तें पाहून मलाहि या वेळीं एक वेळ वकिली करण्याची हौस आली असेंहि क्षणभर मानलें तरी त्यांत वावगें तें काय ? खेळ पहात शेजारी बसणारा मनुष्य एखादे वेळीं स्वतः हातांत डाव घेऊन खेळणारच. शिवाय या कामी माझ्या धंद्यानें मला वकील-पत्र दिलें आहे असेंहि मनांत वाटूं लागलें. तथापि धंदेवाईक वकिलांपेक्षां मी खटला चांगला चालवीन अशी अहंकारबुद्धि मी धरली नव्हती. स्वतः काम चालविण्यांत थोडासा तोटाच आहे हें मी जाणत होतों. पण सार्वजनिक दृष्टीनें त्यांत तितका नफाहि होतो. परकी राज्यांत जितक्या रीतीनें व प्रसंगीं आपल्यांतील सुशिक्षित लोक गुणानें, कर्तृत्वानें, व बुद्धीनें साहेबलोकांची बरोबरी करून दाखवितील तितका जनतेला आत्मविश्वास व हिंमत अधिक येईल. हायकोर्ट जज्ज झाले म्हणून काय झालें ? आपण त्यांच्याहून स्वतःला कमी मानण्याचें कारण नाहीं, व हायकोर्ट जज्जांशीं बरोबरीच्या नात्यानें वागल्याचा हा प्रसंग साधावा म्हणूनच मी स्वतः काम चालविलें.

"हा खटला हें माझ्या धंद्यांतील अवश्य नसलें तरी आनुषंगिक जोखीम होतें. पण समाजांतील असा कोणता धंदा आहे कीं, ज्यांत त्याच्या अनुषंगानें येणारें जोखीम नाहीं ? म्हणून इतर कोणाहि धंदेवाल्यापेक्षां या खटल्यांत अधिक धैर्य मी दाखविलें असे मला वाटत नाहीं. पण जनता ही आम्हा वर्तमानपत्रकारांच्या धंद्यासंबंधानें विशेष उदार असल्यामुळें मी सांभाळलेल्या जोखिमेपेक्षां किंवा मला झालेल्या दुखापतीपेक्षां मला जनतेनें सहानुभूतीच्या रूपानें अधिकच नुकसानभरपाई दिली. या नव्या औद्योगिक मनंत मोठमोठ्या कारखान्यांतून मजुरांना झालेली दुखापत कारखानदारांनीं आपल्या खर्चानें भरून द्यावी अशी सक्ति करणारा 'वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्ट' करण्यांत आला आहे. सार्वजनिक हिताच्या मोठ्या कारखान्यांतील मीहि एक लहानसा मजूर आहे; आणि जनतेवर असा कायदा कोणी लादलेला नसतां तिनें माझ्या दुखापतीबद्दल प्रेमानें सगळें नुकसान भरून दिलें हें तिचे केवढें औदार्य म्हणावें ? मी हा खटला असा चालवून लोकमान्यांची बाजू राखली असे सांगण्यांत आलें. परंतु टिळकांचा खरी परंपरा राखणे कोणालाहि अशक्य आहे. कालिदासानें रघुवंशांत "प्रवर्तितो दीप इव प्रदीपात्" या उपमेनें परंपरा राखण्याची खरी कल्पना व्यक्त केली आहे. एका दिव्याला लावून दुसरा दिवा पेटविला तर दोघांच्या तेजांत फरक कांहींच नसतो. त्या समान तेजानें एकाचे कार्य दुसऱ्यानें करणें यांचेंच नांव खरी परंपरा राखणें. हें माझ्या हातून घडलें नाही व घडणें शक्यहि नाहीं. कदाचित् दिवा मालविल्यावर अंधार पडतो तेव्हां एखादी काडी पेटवून पायापुरती वाट दिसेल इतका प्रकाश पाडणें अशासारखे कांहीं काम कदाचित् माझ्या हातून गेल्या चार वर्षांत झालें असेल. तथापि टिळकांच्या सांप्रदायांतील इतर लोकांनीहि ते काम आपापल्या परीनें केलेच आहे."

यानंतर समारोपादाखल भाषण करतांना अध्यक्ष **भा. ब. भोपटकर** म्हणाले, "तात्यासाहेब माझे राजकीय गुरुबंधु आहेत. आनंदवनभुवनांत सतत गुरगुरणारा आमचा गुरु होता ! "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" हें तत्त्व टिळकांनीं तुरुंगाच्या दारांत एक पाऊल असतां प्रतिपादन केलें व खुद्द तुरुंगांत कर्मयोग लिहिला ! अशा गुरूंचे श्री. तात्यासाहेब पट्टशिष्य आहेत व आम्ही मठ शिष्य आहों ! लोकमान्यांची परंपरा त्यांनीं निर्विवादपणें उत्कृष्ट अशी चालविली. परंतु त्यांच्यांत एक दुर्गुण आहे. तो म्हणजे तुरुंगांत न गेल्याचा ! पण त्यांस

कोणी तुरुंगांत घालीतच नाहीं तर ते तरी काय करणार ! तुरुंगांत बावळटाप्रमाणें न जातां कोर्ट लढविणें ही लोकमान्यांची शिकवण होती. त्याप्रमाणें तात्यासाहेबांनीहि ओळीशीं ओळ झुंजविली. लोकमान्यांची परंपरा त्यांनीं सर्वतोपरि उत्तम प्रकारें चालविली. लोकमान्यांच्या परंपरेप्रमाणें राष्ट्राचा गाडा त्यांनीं चालविला व मार्गांत उजेड राखला याबद्दल आपणा सर्वांतर्फे मी त्यांचें अभिनंदन करतों."

कल्याण बेळगांव इत्यादि ठिकाणींहि अभिनंदनाच्या जाहीर सभा झाल्या.

असो; या खटल्यानंतर मी पुनः कोर्टांत गेलों तो एका दिवाणी दाव्यांत वादी म्हणून. तो दावा खुद्द केसरी ट्रस्ट संबंधाचा असून, लो. टिळकांच्या दोघां मुलांवर मी ट्रस्टी या नात्यानें दिवाणी फिर्याद करून कोर्टाकडून त्यांजविरुद्ध कांहीं कांहीं ताकिदी मागितल्या होत्या. या दाव्याची हकीगत सारांशानें पूर्वी थोडीशी आलेलीच आहे. म्हणून मी ती पुनः येथें देत नाही. येथें इतकेंच म्हणतों कीं, हा अप्रिय वाद आम्हाला दहा वर्षें तर पुरून उरलाच, पण एवढ्यानें तरी तो संपेल कीं नाहीं याविषयी शंकाच वाटत होती. पण तो न संपला तर अवश्य ते आमचेंहि कर्तव्य करण्यास आम्ही तयारी ठेवली होती.

पण या वादाचे जे भूत मुंबई हायकोर्टांत न्यायमूर्ति पाटकर व ब्रमफील्ड यांच्या कोर्टांत गाडलें गेलें तेच त्याच इमारतीच्या दुसऱ्या एका खोलीत न्या. तय्यबजी यांच्या कोर्टांत १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत पुनः उभें राहिलें. मात्र यावेळीं माझा संबंध वादी किंवा प्रतिवादी असा नसून साक्षीदार या नात्याचा होता. पण योगायोग असा कीं, खरे प्रतिवादी बाजूसच राहून मी व माझे सहकारी ट्रस्टी रा. धोंडोपंत विद्वांस हेच जसे कांहीं प्रतिवादी असा त्या दाव्याला रंग चढला; व वादी वकीलानें आम्हाला बेभरंवशी साक्षीदार असें ठरविण्याचा बहाणा करीत केसरी ट्रस्ट व टिळकपुत्र यांच्यांतील भांडणांतले बहुतेक मुद्दे पुनः उकरून काढले! आणि दैवयोगानें न्यायाधीशहि असेच मिळाले कीं, त्यांनी या सर्व मुद्यांचा पसारा आपल्यापुढील—वास्तविक संकुचित मर्यादेच्या दाव्यांत—पुराव्याच्या रूपानें येऊं दिला. या दाव्यांत टिळकपुत्र हे वादी व कै. रा. अण्णासाहेब नेने हे प्रतिवादी होते. तय्यबजी यांच्या कोर्टांत वादी टिळक यांच्यासारखा निकाल झाला. परंतु तो हायकोर्टांतच अपील बेंचर सर न्यायाधीश व न्या. रांगणेकर यांच्यापुढें निघाला तेव्हां तो फिरविला गेला. पण फिरविला गेला म्हणण्यापेक्षा

उभयपक्षांच्या संमतीनें निकालांत गेला. पण ही तडजोड पुष्कळशी प्रतिवादी नेने यांना अनुकूल अशी होती. मी पक्षकार नव्हतों तथापि ॲडव्होकेट जनरल यांनीं मला तडजोड सुचविण्याकरितां निमंत्रण केलें होतें.

१९२१ सालीं मी कायदा मोडून दारूबंदीचें पिकेटिंग दोनदां केलें. दोनहि खटल्यांत मला दंड झाला. त्याप्रमाणें सोन्या मारुती सत्याग्रह प्रकरणीं मी कायदेभंग केला व खटला होऊन मला पंचवीस रुपये दंड झाला. पण पुढें कायद्याच्या मुद्यावर मी हायकोर्टाकडे अपील केलें. त्यांत ती शिक्षा रद्द होऊन दंडहि परत मिळाला.

हीं वरील कांहीं उदाहरणें प्रत्यक्ष झालेल्या आणखी खटल्यासंबंधाचीं म्हणून दिलीं आहेत. पण मी त्यांना महत्त्व देत नाहीं. कारण अशा खटल्यांत सहसा दंडापलीकडे मजल जात नाहीं. पण १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळींत मी दोनतीनदां कायदेभंग केला ते प्रसंग मात्र असे किरकोळ म्हणतां येत नाहींत. कारण त्या वेळीं तुरुंगवासाची शिक्षा हा सामान्य नियमच होता. आणि प्रत्येक प्रसंगी या कायदेभंगाच्या कृत्याचें पर्यवसान खटल्यांत व तुरुंगवासांत होणार अशी साधार अपेक्षाहि होती. हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं, तुरुंगवासाच्या भीतिमुळें मी कॉंग्रेसच्या चळवळींविरुद्ध होतों हें म्हणणे निखालस खोटें आहे. त्याला माझीं तात्त्विक कारणें होतीं. मग तीं कारणें कोणी वाटल्यास खुशाल चुक म्हणो. दुसरें पक्षीं मी हें सांगतों कीं, गांधी राज्यांतील चळवळींत तुरुंगवास हा तुरुंगांतील सौम्यपणाच्या सवलतीच्या वागवणुकीमुळें एक नुसता खेळ, एक मवाळ हुल्लड, ठरत होती. तुरुंगांतील कैदी म्हणविणारांना तेव्हां काय काय सुखसोयी भोगावयास मिळत हें कोणास सांगितलें तर खरेंहि वाटणार नाही. सावरकर टिळक यांचा तुरुंगवास आनंदानें भोगण्याइतकें धैर्य कदाचित् मजमध्यें नसेल. पण गांधी राज्यांतील अनेक प्रतिष्ठित लोकांच्या तुरुंगवासविषयक धैर्याची बरोबरी करणारा मी आहे हें बढाई न करतां आणि विनय न सोडतां मला खचित सांगतां येईल. कीर्तीला हापापून तुरुंगांत मुद्दाम जाणारा मी नव्हतों; पण नियत कार्यक्रमांत तुरुंगवास प्राप्त झाला तर त्याला भिणाराहि मी नव्हतों असें मला वाटतें. १९२४ सालीं हायकोर्टापुढें मी केलेल्या ठणठणीत भाषणापलीकडे जाऊन दुसरा पुरावा याविषयीं द्यायला नको.

असो. आतां या प्रकरणीं मला आलेलीं अभिनंदनाचीं कांहीं पत्रें देतोः—

( ता. ११।८।२४ ) केसरीवरील खटल्याचा निकाल ऐकून आश्चर्य व दुःख वाटले. तुम्हाला झालेला दंड व शिक्षा फार जबर आहे. तुम्हाला माझी पूर्ण सहानुभूति आहे व केसरीला या प्रसंगी मदत करण्यास कर्नाटकातर्फे सार्वजनिक फंड उभारण्याचीहि माझी तयारी आहे. तरी तुमचें काय मत आहे तें कळवावें. ( दत्तात्रय व्यं. बेळवी, हायकोर्ट वकील, बेळगांव. )

( ता. १२।८।१९२४ )—मुंबई हायकोर्टाने वर्तमानपत्राच्या वतीनें तुम्ही मोठ्या निधड्या छातीने झगडा केलात आणि त्यांत शिक्षेचा धोका देखील सहन केलात याबद्दल तुमचें अभिनंदन करतों. केसरीला झालेला दंड लोक सार्वजनिकपणें भरून देतील अशी आशा आहे. क्रॉनिकलला पुण्याहून बातमीपत्र पाठविण्यासारखा मनुष्य तिकडे आहे काय ? ( स. अ. ब्रेलवी, संपादक, बॉंबे क्रॉनिकल.)

( ता. २३।८।१९२४ )—वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याकरितां तुम्ही फार धैर्यानें हायकोर्टाशीं भांडलात याबद्दल तुमचे मी अतिशय मनःपूर्वक अभिनंदन करतों. तुमच्याप्रमाणेंच असे उदारधी संपादक वर्तमानपत्राच्या क्षेत्रांत आणखी असते तर काय बहार झाली असती ! लो. टिळकांचे तुम्ही सच्चे शिष्य आहात असे तुम्ही दाखविलेत. या द्वाड नोकरशाहीमुळें खरें बोलण्याची देखील चोरी झाली आहे असा पदोपदी अनुभव येतो. तुमच्या दंडाच्या रकमेला माझी लहानशी वर्गणी म्हणून रु. ३० पाठवीत आहे. (लाला दुर्गाचंद कसावली, पंजाब.)

( ता. १२।९।१९२४ ) कोर्टाच्या बेअदबीच्या खटल्यांत हायकोर्ट आरोपीला बिनमुदत शिक्षा देऊं शकते याबद्दल तुम्ही हायकोर्टांत केलेल्या भाषणाची प्रत पाठविल्याम आम्ही त्याचा सारांश 'बॉम्बे लॉ जर्नल'मध्यें घालूं. त्याबद्दल एखादा सुरेखसा लेखहि शक्य झाल्यास लिहीन म्हणतों. ( बाळ गंगाधर खेर, सॉलिसिटर, संपादक, लॉ जर्नल, व आजचे कॉंग्रेसचे प्रधानमंत्रि, मुंबई. )

.....असला दंड करण्यानें केळकर व केसरी यांचें कितीसें नुकसान होणार ! दंड पचनी पाडून पुनः ते डोकें वरच काढणार ! केळकरांनीं जो निर्भय धैर्याचा झगडा केला त्याबद्दल वृत्तपत्रकार व सार्वजनिक कार्यांत लक्ष घालणारे इतर लोक यांजकडून त्यांचें अभिनंदनच होणें रास्त आहे. केसरी हा आधींच मोठा वजनदार आहे. हल्लींच्या निकालानें त्याचें वजन उलट वाढेलच." ( म. गांधी, यंग इंडिया. )

## ( १२ ) कांहीं 'बड्या' लोकांशीं आलेला संबंध

१९०८ पासून मुंबईच्या प्रत्येक गव्हर्नराची व माझी कांहीं कांहीं प्रसंगानें गांठ पडली होती. टिळकांच्या खटल्यानंतर मी मुंबईस टिळक केसचें पुस्तक छापवीत होतों. तेव्हां सर जॉर्ज सिडेनहॅम यांनीं हरि नारायण आपटे यांच्यापाशीं अशी चौकशी केली कीं, " मला केळकरांना भेटावयाचें आहे. ते भेटीला येतील कीं नाहीं ? " त्यावर आपटे यांनीं " बोलावल्यास अवश्य येतील " असें सांगून माझ्या भेटीचा दिवसहि परस्पर ठरविला व मला कळविलें. तेव्हां मला पुण्यास जाऊन त्यांची गांठ घेणें प्राप्तच झालें. या पहिल्या भेटीत ते माझ्याशीं सामोपचाराने बोलले व मला इतकेंच म्हणाले कीं, " अत्याचाराचे प्रवर्तन व जातीजातींतील कलह एवढें वगळून तुम्ही निर्भीडपणानें लिहीत जा. हा गव्हर्नर वाईट आहे, तो असे असें करतो, असें व्यक्तिशः मला उद्देशूनहि तुम्ही लिहिले तरी मी त्याचा राग मानणार नाहीं;" व त्यांनीं शेवटीं सांगितलें कीं, " दरवर्षी एकवार तुम्ही मला अवश्य भेटावें अशी माझी इच्छा आहे. कारण विचारविनिमय हा सर्वांनाच फायदेशीर असतो."

यानंतर १९०९ च्या अखेर मी कायदेकौन्सिलच्या निवडणुकीला उभा राहिलो. माझे प्रतिपक्षी हरिभाऊ आपटे व धुळ्याचे गरुड हे होते. निवडणुकीला म्हणजे उमेदवाराकडून मतपत्रिका कमिशनरकडे येण्यास सुरुवातहि झाली होती. इतक्यांत कौन्सिल-निवडणुकीच्या नवीन नियमाचा फायदा घेऊन सरकारी गॅझेटचा जादा अंक काढून गव्हर्नरसाहेबांनीं मला " कौन्सिलांत शिरण्यास अपात्र " ( म्हणजे राजकीय पूर्ववृत्त मतें वगैरे लक्षांत घेतां अनिष्ट ) असें जाहीर केलें. यावर अपील वगैरे कांहीं नव्हतें. आणि गॅझेटांत माझ्यावरचा हा शेरा प्रसिद्ध झाल्याबरोबर निवडणुकींतून माझें नांव आपोआप रद्द झालें. हे घडवून आणल्याबद्दल हरिभाऊ आपटे यांच्यावर लोकांनीं सहजच संशय घेतला. तो खरा नव्हता. परंतु त्याचा परिणाम होऊन अखेर गरुड हे निवडून आले. पुण्याच्या डेक्कन सभेमध्यें नामदार गोखले यांनीं हा विषय घेऊन, सरकारच्या या कृत्याचा म्हणजे मला अपात्र ठरविण्याचा निषेध केला. नियमांचा हा दुरुपयोग झाला असें त्यांनीं स्वतः सहीवर प्रसिद्ध केलें; व त्यांनीं होऊनच मला सांगितलें कीं, " गव्हर्नरांनीं तुम्हास दरवर्षी भेटीस येत जा म्हणून जें सांगितलें आहे त्याचा फायदा घेऊन

त्यांना मुद्दाम भेटा, व निवडणुकीच्या बाबतीतील तुमची तक्रार मांडा. म्हणजे पुढील निवडणुकीच्या वेळी तरी तुमच्यावरील शेरा निघून जाईल व तुम्हाला उभे रहातां येईल."

त्याप्रमाणें भेटीची परवानगी मागून मी सिडेनहॅमसाहेबास जाऊन भेटलों व असें विचारलें कीं, "मला तुम्ही अपात्र ठरविण्याचें कारण काय ? मुंबई कौन्सिलमध्यें बसण्याला मी खरोखरच नालायक आहे म्हणजे माझी तितकी किंमत नाहीं असें आपणाला वाटतें काय ?" तेव्हां ते हंसत म्हणाले, "मि. केळकर ! कौन्सिलांत जाऊन काम करण्याची पात्रताच म्हणाल तर, जे कित्येक लोक तेथें जाऊन बसतात त्यापेक्षां तुम्ही कितीतरी अधिक लायक आहा हे मी जाणतों. पण तुम्हाला अपात्र ठरविण्याचें कारण तुम्ही हायकोर्टाची बदनामी केली व त्याकरितां तुम्हाला दंड व कैदेची शिक्षा झालेली आहे. हाच तुमच्या अपात्रतेचा अर्थ होय. तथापि, नियमांतच अशी सवलत आहे की, एकदां अपात्रता जाहीर केली तरी ती कदाचित् पुढें निघूं शकते. म्हणून पुढें पाहूं."

हायकोर्टच्या बदनामीचा व शिक्षेचा हा मुद्दा अवचित पुढें आल्यानें, व तो मताचा प्रश्न असल्यामुळें, मी विशेष कांही बोलूं शकलों नाहीं. पण यानंतर केसरी-मराठ्यांचा पांच हजारांचा जामीन घेतल्यावर माझी व सिडेनहॅमसाहेबांची गांठ पडली तेव्हां ते होऊन मला म्हणाले की, "सरकारानें तुमच्या पत्रांचा जामीन घेतला याबद्दल तुमची तक्रार असेलच." त्यावर मी म्हणालों "तक्रार असली तरी करून काय उपयोग ! पुऱ्या दोन दिवसाचीहि मुदत न देतां पांच हजार रुपयांचा जामीन सरकारानें मागितला. यावरून त्याच्या मनांत काय होते हें दिसूनच आलें. शिवाय ज्या लेखाबद्दल म्हणून जामीन मागितला त्यांतला एक लेख तीस वर्षांपूर्वीचा प्रो. आगरकरांच्या लेखांतील उतारा होता, व दुसरें तर केवळ तुरुंगांतून परत आलेल्या एका गृहस्थाचें केसरीला लिहिलेलें पत्र होतें. माझ्या स्वतःच्या अशा कोणत्याहि लेखाबद्दल जामीन मागितलेला नाहीं. हें असें कां ?" या प्रश्नाचें उत्तर न देतां त्यांनीं उडवाउडवी केली व "हें प्रकरण पोलिटिकल खात्याकडून परस्पर झालें. मला त्याची विशेष माहिती नाहीं" असें सांगून त्यांनीं भागविलें. आणि मग प्रतिष्ठितपणानें मला असा उपदेश केला कीं, "जामीन घेतला म्हणून तुम्हाला भिण्याचें काय कारण ? तुम्ही सरकारच्या कृत्यावर टीका करतां त्याप्रमाणें त्यांनीं

केलेल्या चांगल्या गोष्टीबद्दल त्यांना बरेहि म्हणावें म्हणजे झालें. वर्तमानपत्रकर्त्यांनें न्यायाधीशासारखें वागलें पाहिजे."

तेव्हां मी म्हणालो "माफ करा, पण वर्तमानपत्रकाराच्या कर्तव्यासंबंधीं माझें मत आपल्या मताशीं जुळत नाहीं. मला एक तरी वर्तमानपत्र आपण असें दाखवूं शकाल काय कीं, ज्याला स्वतःचा पक्ष म्हणून नाहीं व जे न्यायाधीशाप्रमाणें कांटेतोल लिहितें?" पण याहिपुढें जाऊन मी म्हणालों कीं, "न्यायाधीश होण्याचा मान वर्तमानपत्रांनींच तेवढा कां घ्यावा? सरकारनें या बाबतीत स्वतः आपणच उदाहरण कां घालून देऊं नये?" तेव्हां गव्हर्नरसाहेब म्हणाले, "आम्ही तसें करीतच असतों." मी म्हणालो, "गेल्या एकदोन वर्षांत सरकारनें राजद्रोह वगैरेकरितां इतके लोक तुरुंगांत घातले त्यांपैकीं कांही तरी सच्चे, सन्मान्य, व केवळ देशभक्तीमुळें आपत्तींत आलेले होते कीं नाही? मग त्यांना तुम्ही जशी शिक्षा केली त्याप्रमाणें त्यांच्या गुणवर्णनपर दोन शब्द तुम्ही एखाद्या भाषणांत केव्हां तरी आणावे की नाहीं? म्हणजे न्यायाधीशपणा झाला! आणि सरकारनें असें उदाहरण स्वतःच घालून दिले म्हणजे आम्हीहि सरकाराबद्दल लिहितांना वाईटाबद्दल वाईट तसेच चांगल्याबद्दल चांगलें म्हणत जाऊं. आमचे काय गेलें?" या उत्तराने सिडेनहॅमसाहेब थोड्े अडल्यासारखें होऊन विषय थट्टेवारी नेण्याचा प्रयत्न करून म्हणाले "वा! वा! अशा राजद्रोही लोकांबद्दल आम्ही हात वर करून असें म्हणावें वाटतें की, "अहो, हे पहा हे भले सच्चे लोक देशभक्त आहेत! पण राजद्रोह केला म्हणून आम्ही त्यांना शिक्षा केली." तेव्हां मीहि म्हणालों कीं, "हें करणें जर सरकारला अवघड वाटतें, तर सरकारनें कांही बरें केलें तरी त्याला बरें म्हणणें हें आम्हा वर्तमानपत्रकर्त्यांनाहि अवघड कां वाटूं नये! आम्ही तरी हात वर करून असें म्हणावें काय कीं, "पहा हो, हें सरकार किती चांगलें आहे. पण ही केली एवढीच गोष्ट त्यांनीं वाईट केली!"

अशा रीतीनें गव्हर्नरसाहेबांनीं मला उपदेश करण्याचा आव घातला तो मोडून निघाला. त्यानंतर पुढच्या वर्षी मी त्यांना आपण होऊन भेटण्याला गेलोंच नाहीं. पण शहर म्युनिसिपालिटीच्या सगळ्या सभासदांची व सिडेनहॅमसाहेबांची एकदां कांहीं निमित्तानें सरकारी मुलाखत झाली; तेव्हां बाकीच्यांशीं शेकहँड करून मजजवळ आल्यावर क्षणभर थांबून ते मला म्हणाले,

"मला वर्षांतून एकदां तरी भेटावयाचें हा करार तुम्ही मोडला. तो कां!" मी म्हणालों, "तुम्हाला भेटून सांगण्याचें असें मजपाशीं विशेष कांहीं नसतें. मग तुमच्यासारख्या, कामाच्या गडबडींत असणाऱ्या, अधिकाऱ्याचा उगाच वेळ कां घ्या?" तेव्हां ते म्हणाले, "वेळ उगाच जात नाहीं. विचारविनिमय करण्यानें त्याचा मोबदला मिळतोच. तरी आतां प्रायव्हेट सेक्रेटरीला लिहून दिवस ठरवून भेटीला या." मग त्याप्रमाणें मी गेलों.

अशा रीतीनें सिडेनहॅमसाहेबांनीं आपण होऊन भेटीची इच्छा प्रगट करण्याचा परिपाठ माझ्याशी ठेवला होता. त्यानंतर लॉर्ड लाईड यांनीं, ते गव्हर्नरच्या जागेवर येताच, शनवारवाड्यांतील बागेच्या योजनेसंबंधानें मला मुद्दाम भेटीस बोलावले होते. यांची माझी दुसऱ्यांदा गांठ झाली तेव्हां एक गोष्ट घडली. लॉईडसाहेबांना फार बोलण्याची संवय होती; व भेटीस आलेल्या माणसाशीं संभाषणाच्या रीतीनें न बोलतां ते आपणच एकमारखे बोलत रहात. त्याचा मला थोडा राग आला, व मी त्यांना स्पष्ट म्हणालों की "आपण इतका वेळ बोललात तर आतां मला पांच मिनिटें तरी मध्यें अडथळा न करतां बोलूं द्याल कीं नाही?" हें ऐकून लॉईडसाहेब किंचित् आश्चर्यचकित झाल्यासारखे वाटले. कारण असें बोलणें ऐकून घेण्याची त्यांना संवय नसावी.

बोलण्याचालण्याला चांगले असे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन व विल्सन. या दोघांच्याहि माझ्या एक-दोन वेळ गांठी पडल्या होता. लॉर्ड विलिंग्डन यांच्या कारकीर्दीत मी पुणें शहर म्युनिसिपालिटीचा प्रेसिडेंट प्रथम झालो. तेव्हां त्यांनीं मला आपण होऊन कळविलें की 'तुम्ही औपचारिक रीत्या अर्ज केल्यास कौन्सिल निवडणुकीच्या बाबतीत १९०९ सालीं जो अपात्रतेचा छाप तुमच्यावर सरकारानें घातला आहे तो काढून टाकला जाईल'; व त्याप्रमाणें घडलेहि.

१९३३ सालीं गोलमेज परिषदेहून परत आल्यावर दिल्लीहून व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांजकडून इतरांप्रमाणें मला भेटीचें निमंत्रण आलें. त्याप्रमाणें गेल्यावर प्रथम गो. मे. परिषदेच्या गप्पागोष्टी झाल्या. शेवटीं निघतांना लॉर्ड विलिंग्डन यांनीं मला सहज म्हणून प्रश्न केला त्यावरून खालील आशयाचें संभाषण झालें:—

'काय केळकर, ब्राह्मणेतर चळवळ कशी काय आहे!'

'त्या एकंदर चळवळीचा वृत्तांत मजपेक्षां आपणालाच अधिक ठाऊक असणार !'

'तो कसा ?'

'मुंबई इलाख्यांत ही चळवळ सुरूं झाली ती तुमच्या गव्हर्नरी अमदानींत. येथून पुढें तुम्ही मद्रासेस गेला तेथें तर ही चळवळ अधिक जोरांत होती.'

'तें मला माहीत आहे; पण तुमच्या महाराष्ट्रांतील चळवळीसंबंधानें विचारलें.'

'ती आतां थोडी थंडावली आहे असें म्हणतां येईल.'

'ब्राह्मणेतरांना ती पटत नाहींशी झाली म्हणून ?'

'नाही. चळवळीचा खरा हेतु समाजांतील मानाच्या अधिकाराच्या मोठ्या पगाराच्या जागा ब्राह्मणेतरांना हव्या होत्या. त्या आतां त्यांना बहुतेक मिळाल्या आहेत. उदाहरणार्थ--लोकलबोर्ड, म्युनिसपालिट्या या संस्था बहुतेक त्यांच्या हातीं गेल्या आहेत. तशीच प्रांतिक कायदे कौन्सिलेंहि. "दाह्याभावात् न खेदात् ज्वलन इव वने शाम्यति क्रोधवन्हिः" असें एक संस्कृत वचन आहे. त्याचें भाषांतर करून सांगतो. "The forest fire becomes extinguished eventually, not because it feels tired or sorry, but because there remains in the end nothing to burn or consume" तसें ब्राह्मणेत्तर चळवळीचें झालें आहे.'

येवढ्यावर व्हाइसरॉयांनी वास्तविक थांबावें. पण किंचित् हंसून मिस्किलपणानें ते मला म्हणाले--

'ते ठीक आहे म्हणा. पण या चळवळीनें ब्राह्मणवर्गाचा पाडाव झाला म्हणून तुम्हाला वाईट वाटतें की नाहीं ?'

या खोंचदार प्रश्नाचा रोख ओळखून त्याची धार परतवावी या विचारानें मीहि ठासून म्हणालों,

'छेः मुळींच नाहीं.'

तेव्हां आश्चर्य दर्शवून ते म्हणाले, 'मोठें आश्चर्य आहे म्हणावयाचें. मनुष्यस्वभावाविरुद्ध तुम्ही बोलत आहा नव्हे काय ?'

मी म्हणालों, 'स्वभावाला संस्कृतीनें योग्य वळण मिळतें. आमच्या धर्म-ग्रंथांत ब्राह्मणब्राह्मणेतरांविषयी काय योजना आहे आपणाला माहीत आहे काय ?'

'नाही. मला सांगा ना.'

'आमच्या धर्मसंस्कृतीचें तत्त्वच असें आहे कीं, राजसत्ता, राजकीय सत्ता, लष्करी सत्ता ही क्षत्रियांच्या हातींच असावी. राजेपण हा क्षत्रियांचाच अधिकार !'

'आणि मग ब्राह्मणांनी काय टांचा घाशीत बसावें वाटतें ?'

'वः ! ते काय म्हणून ? ब्राह्मणाचा अधिकार व मान त्याहून मोठा.''

'तो कोणता' ?

'राजाचा गुरु होण्याचा. राजा सिंहासनावर बसो. पण गुरु उपस्थित झाला म्हणजे राजानें त्याला उत्थापन द्यावें लागतें. क्षत्रिय राजा ब्राह्मण गुरूच्या पाया पडतो. सल्लामसलतीची याचना करतो. गुरुहि अल्पसंतुष्ट अयाचित वृत्तीचा असल्यामुळें त्याचें थोडक्यांत भागतें व ते थोडें त्याला सहज मिळतें. विद्या व ज्ञान यांचा उपयोग निःस्वार्थीपणें केला तर तिला राजसत्तेहून अधिक मान आहे. मग मला सांगा की, ब्राह्मणेतर चळवळीचें वैषम्य ब्राह्मण कां मानील !'

लॉर्ड विलिंग्डन यांनीं मजकडून अशा उत्तराची अपेक्षा खचित केली नव्हती. म्हणून त्यांनीं हा विषय थट्टेवारी घालविला. ते माझ्या गळ्यांत हात घालून दाराकडे जातांना म्हणाले, 'केळकर, तुम्ही धूर्त लबाड आहात.'

मी म्हणालों 'पण जसा प्रश्न तसें उत्तर !'

सर विल्सन यांची माझी दोन वेळां गांठ पडली, तशीच सर फ्रेड्रिक साईक्स यांची. विल्सन साहेबांनी डे. व्ह. ट्रॅ. सोसायटीचे समारंभाचे वेळीं भा. इ. मंडळास भेट दिली तेव्हां त्यांनी केसरींतील माझ्या भाषाशैलीची स्तुति केल्याचें प्रसिद्धच आहे. एका प्रसंगीं शिक्षण विषयक सुधारणांची चर्चा करण्याकरितां, दुसऱ्या एका प्रसंगीं राऊंड टेबलचें आमंत्रण देऊन राजकारणाची चर्चा करण्याकरितां, सर फ्रेडरिक साईक्स यांजकडून मला बोलवण्यांत आलें होतें. लॉर्ड ब्रेबन यांनीं मला भेटीला बोलावलें त्या वेळीं थोडी मौज झाली. १९३२ सालीं मी गोलमेज परिषदेला गेलों तेव्हां अध्यक्षाच्या मागें बसणाऱ्या पार्लमेंटरी अधिकाऱ्यांच्या ओळींत लॉर्ड ब्रेबर्न हे केव्हां केव्हां येऊन बसत. मी गोलमेज परिषदेचा सदस्य म्हणून बसलेला होतों, यामुळें ते मला

ओळखीत. पण माझी त्यांची समक्ष भेट लंडनला कधीं झाली नव्हती. गणेश-खिंडींत त्यांना भेटण्याला मी गेलों तेव्हां, बसावयाच्या दिवाणखान्याचें दार आपल्या हातानें त्यांनींच उघडून, मी आंत गेल्यावर लावून घेतलें. मग ते होऊन म्हणाले, "तुम्ही मला ओळखीत नसाल पण मी तुम्हाला ओळखतों'. मी म्हणालो 'तें कसें?' ते म्हणाले, 'गोलमेज परिषदेच्या जागेंत मी बसत असें आणि केव्हां केव्हां तेथील दारें व खिडक्या आपल्या हातांनीं उघडीत असें. तेव्हां तुम्ही परिषदेचे सभासद म्हणून बसत असां!' या आठवणीची मला मौज वाटली, आणि मी कांहीं तरी उत्तर द्यावें म्हणून हंसून म्हणालों " आणि आज इथें झालें तरी आपण माझ्याकरितां दरवाजा उघडण्याझांकण्याचे श्रम करून मला मान दिलातच की! मात्र तिथलें इथलें नातें वेगळें हो! तिथे तुम्ही नोकर होतां. इथे यजमान म्हणून तोच शिष्टाचार तुम्हाला पाळावा लागला इतकेंच."

हल्लीचे गव्हर्नर सर रॉ. लमले यांची माझी गांठ मुंबईस रामनारायण रुइया कॉलेज उघडण्याच्या वेळीं पडली. या कॉलेजच्या सोसायटीचा चेअरमन म्हणून मी स्वागताध्यक्ष होतों. पहिलें हस्तांदोलन होतांना गव्हर्नर म्हणाले 'कसें काय आहे? मी तुमच्या विषयी बरेंच ऐकलें आहे.' मी म्हणालों 'आभारी आहे. आपणाविषयीं मला तसें उलट म्हणतां येत नाहीं याचें वाईट वाटतें'. पण क्षणभरानें माझ्या शिष्टाचाराच्या म्हणून बोललेल्या वाक्यांचा अर्थ चांगलासा नव्हता हे माझ्या लक्षांत आलें. आपणाकडे कमीपणा म्हणून ध्यायला गेलो तो मोठेपणा घेतल्यासारखेंच झाले नव्हे कां?

व्हाइसरॉयांपैकीं लॉर्ड आयर्विन यांची माझी प्रथम गांठ पडली तोहि प्रकार अकल्पितच. म्हणजे असा. मी सहा वर्षे दिल्लीच्या असेंब्लीचा सभासद होतो. पण या अवधींत कधींहि, गव्हर्मेंट हाऊसमध्यें जाऊन 'व्हिजिटर'च्या बुकांत भेटीला गेल्याबद्दल नांव लिहून ठेवतात तें लिहिलें नाहीं. गव्हर्मेंट हाऊसचा शिरस्ता असा आहे की, व्हिजिटर बुकांत नांव नोंदण्यास गेल्याशिवाय कोणालाहि फराळ, जेवण, गार्डन् पार्टी यांचें आमंत्रण जावयाचें नाहीं. आणि मला या निमंत्रणांचा कंटाळाच असे. पण लॉर्ड आयर्विन हें येऊन दाखल झाल्यावर थोड्याच दिवसांत मला त्यांजकडून भोजनाचें आमंत्रण आलें. अर्थात् गव्हर्मेंट हाऊसचा हा नियम मोडूनच हें निमंत्रण आलें होतें हें उघड आहे. तरी प्रथम मी जावें न जावें या विचारांत होतों. पण शेवटीं जयकर अणे वगैरे मंडळींनीं " तुम्ही जाण्यानें

कांहीं बिघडत नाहीं, तुम्ही व्हिजिटर बुकांत नांव नोंदल्याशिवायहि बोलावतात तर जावें; राजकीय दृष्टया आपल्या पक्षाचा झाला तर त्यांत थोडा फायदाच होईल " असें सांगितलें.

त्याप्रमाणें मी गेलों. भोजनोत्तर संभाषणास निवडक लोक बोलावतात त्यांत मला बोलाविलें तेव्हां लॉर्ड आयर्विन हे प्रथमच मला म्हणाले " मी मुंबईस आल्यापासून तुमच्याविषयीं अनेक लोकांकडून बरेंच ऐकलें आहे म्हणून आज तुम्हाला मुद्दाम बोलाविलें. " नंतर रीतीप्रमाणें दहा मिनिटें जबाबदारीच्या राज्य-कारभारावर बोलणें झालें. त्यांत त्यांचा शांत स्वभाव व सभ्यपणाचें बोलणें यांची थोडीशी प्रचीति मला आली. पण त्यानंतरहि आजवर मी स्वतः कधीं गव्हर्मेंट हाऊसमध्यें गेलों नाही व व्हिजिटर बुकांत नांव नोंदलें नाहीं.

मला कोणी नेमस्त किंवा मवाळ हें निंदाव्यंजक विशेषण लावलें तरी त्यालाहि एक गोष्ट कबूल करावी लागेल कीं, साहेबलोकांशींच काय पण स्वजनतेतल्याहि आपल्याहून मोठ्या वरिष्ठ लोकांशीं मी कधीं लघळपणा केला नाहीं. मी भित्रा नाहीं पण भिडस्त आहे. तसेच सरकारी किंवा अधिकारी इंग्रज किंवा संस्थानिक यांच्याकडे केव्हांहि स्वार्थाची याचना केली नाही. हें देखील प्रेक्षकाला परस्पर कळून येई. यामुळें माझ्यामध्यें नेमस्तपणा असला तर तो स्वार्थी नसून केवळ बुद्धीचा धर्म किंवा स्वाभाविक गुण इतकेंच तो म्हणूं शकला असता. याचें एक स्वतंत्र प्रत्यंतर एकदां अकल्पित रीतीनें मला मिळाले. मी असेंब्लीतील स्वराज्य पक्षाचा सभासद १९२४।२५ या सालीं होतों. १९२६ सालीं आम्ही प्रतियोगी सहकारिता ( रिस्पॉंसिव्हिस्ट ) पक्ष काढला नंतर १९२७ ते १९२९ या सालीं मी नव्या नॅशनलिस्ट पक्षांत सामील झालों. पहिल्या पक्षाच्या मानानें हा दुसरा पक्ष नेमस्त किंवा मवाळ अशी कांहींची समजूत होती. पहिल्या स्वराज्य पक्षांपैकीं एक गृहस्थ पंडित द्वारकाप्रसाद मिश्र ( पूर्वी जबलपूर भागाचे असेंब्लीतील सभासद आणि आज नागपूरच्या मंत्रिमंडळांतील एक मंत्री ) एका वर्षी उन्हाळ्यांत पुण्यास आले तेव्हां ते माझ्या भेटीला आले. सहज बोलण्यावरून बोलणें निघालें व त्यांत दोन पक्षाची तुलना निघाली. तेव्हां ते म्हणाले " राजकीय पक्ष हें निव्वळ औपचारिक सामुदायिक नांव आहे. पण व्यक्तींचे गुणधर्म व स्वभाव स्वतंत्रच असतात, आणि त्यांचा व या पक्षांच्या नांवाचा पूर्ण मेळ बसतोच असें नाहीं. पुष्कळ लोक सोईकरितांहि एखाद्या पक्षांत शिरतात." मी म्हणालों, " मीहि सोईकरिता

स्वार्थाकरितां स्वराज्यपक्ष सोडून नॅशॅनलिस्ट पक्षांत गेलों असें म्हणतां कीं काय ! " ते म्हणाले " छे-छे ! तुम्ही तर उघड व दणदणीत भांडण करून केवळ आपल्या मताकरितां नवा पक्ष काढला हें प्रसिद्धच आहे. मी म्हटलें तें उलट आमच्या स्वराज्यपक्षांत येऊन मिळालेल्या कांहीं लोकांसंबंधानें. ते कांहीं एकप्रकारचा स्वार्थ मनांत धरून आलेले आहेत, व आपल्या पक्षाच्या सामुदायिक सामर्थ्याचा उपयोग स्वतःचा स्वार्थ, खासगी देखील, साधण्याकडे कसा करून घेतात हें मी नित्य पहात आहे. याच्या उलट तुम्ही नॅशनॅलिस्ट पक्षांतले येवढ्यानेंच नेमस्त ! पण आज दोन वर्षे मी लहानसा सभासद म्हणून, अगदीं सगळ्यांत मागच्या पण उंचांत उंच बांकावरून, न्याहाळून लक्ष देऊन पाहत आहे. आणि तुमच्यापेक्षां वेगळ्या पक्षांतला असलों तरी मी होऊन तुम्हाला सांगतों कीं, सगळ्या असेंब्लींत बिनसरकारी सभासदांच्या वर्गांत, इतर एक-दोन लोकांबरोबर, तुम्हींच एक सभासद मला असे दिसला कीं, ज्यानें केव्हांहि साहेब लोकांशीं सलगी दाखविली नाहीं, किंवा त्यांजकडे आपण होऊन जाऊन शेकहँडकरून गुडमॉर्निंग म्हटलें नाहीं. आमच्या पक्षांतले स्वराजिस्ट म्हणविणारे कांहीं लोक काय काय चाळे करतात, कसकशी संधानें बांधतात, व कशा निरनिराळ्या निमित्तानें साहेब लोकांच्या अंतःकरणांत स्थान मिळविण्याचा प्रयत्न करतात हें मी पाहिलेलें आहे, म्हणूनच म्हणतो कीं सामुदायिक राजकीय पक्ष व त्यांतल्या व्यक्ति यांच्या गुणधर्माचा व स्वभावाचा तंतोतंत मेळ बसतोच असे नाहीं. "

पंडित द्वारकाप्रसाद मिश्र बोललें ते सर्वस्वी खरें असेच होतें. कारण असेंब्लीत मी आपण होऊन साहेबलोकांच्याकडे जाऊन त्यांच्याशीं बोलत बसलों असें कधींहि झालें नाहीं. कारणपरत्वें तेच उठून मजकडे येत व बोलत. साहेब व अधिकारी यांनाच असें करणें परवडतें व शोभतेंहि !

असो; प्रसंग पडल्यास मी इंग्रज अधिकाऱ्यांनाहि कसें तोडून टाकून वागवीत होतों, किंवा पत्रें लिहूं शकत होतों, याचें एक नमुनेदार उदाहरण म्हणून पुण्याचे कलेक्टर मि. ट्रॉटमन यांना लिहिलेलें पत्र देतोः—

(पुणें, २७ जून, १९३७) मे. जिल्हा कलेक्टर व डि. मॅ. यांस—वि. वि. आपलें तारीख २५ चें पत्र पोंचलें. त्यांत सोन्या मारुतीच्या देवळासंबंधीं जो तंटा हल्लीं आहे तो कांहीं तडजोडीनें मिटणें शक्य आहे कीं काय याविषयीं चर्चा

करण्याकरितां आपण मला निमंत्रण केलें आहे. पण उत्तरीं मी कळवितों कीं, मी तुम्हांला भेटण्यास येऊं शकत नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें. पण त्याची माझीं कारणें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः—

या देवळाच्या ट्रस्टीमंडळांपैकीं मी नाहीं आणि तडजोडीसंबंधानें कोणत्याहि प्रकारच्या सूचना स्वतः करणें किंवा दुसऱ्या कोणी केल्यास त्यांची चर्चा करणें याविषयीं मला अधिकार नाहीं. तुम्हाला जर खरोखरच असें वाटत होतें कीं पुण्यांतील केवळ एक खासगी नागरिक या नात्यानें या प्रकरणीं माझ्याशीं चर्चा करण्याचा कांहीं उपयोग आहे, तर तुम्ही यंदाचा हा हुकूम काढून प्रकरण इतक्या हातघाईवर आणण्यापूर्वी मला निमंत्रण करावयास पाहिजे होतें.

पण आतां तसला तो हुकूम तुम्ही काढला, मी तो तोडला, मला अटक झाली, मजवर खटला भरला गेला, मला दंड झाला, आणि मी तो भरला. अशा रीतीनें आतांपर्यंत तुमची माझी सर्व फिटास फीट झाली आहे ! मग तुम्हाला येऊन भेटण्याबाबत मी तुमचें काय लागतों ? मला तुमची भेट घेण्याचें कारण नाहीं.

पण आतां या पत्रानें तुम्हाला प्रांजलपणें हें सांगण्याची परवानगी घेतोंच कीं तुमचा हुकूम अत्यंत अविचारीपणाचा आणि जुलमी होता. आणि देवळाच्या आंतील घंटा वाजविण्यापुरता तर तो हास्यास्पदहि होता !

गतवर्षी ह्या बाबतींत तुम्ही हिंदुसमाजाच्या हक्कावर आक्रमण केलें, आणि केवळ मेहरबानी म्हणून उत्सवाच्या एका दिवसांत फक्त कांहीं थोडे तासपर्यंत पूजाविधि करण्याची सवलत दिलींत. देवळाच्या बिचाऱ्या ट्रस्टींनीं मुकाट्यानें तेंहि कबूल केलें. पण अगदीं आयत्यावेळीं तोहि हुकूम तुम्ही परत घेतला ! म्हणजे ही दिलेली सवलतहि काढून घेतली ! आतां या विषयीं कदाचित् कोणी म्हणेल कीं, एकदम अकल्पित रीतीनें दंगा सुरू झाल्यामुळें तुम्हांला ही गोष्ट करावी लागली. पण मनाची अशी समजूत करून घेतांनाहि ही गोष्ट उरतेच कीं, तुम्ही स्वतः दिलेला हुकूम अमलांत येण्याकरितां जो भरपूर पोलिस-बंदोबस्त हवा तो ठेवणें हें तुमचें कर्तव्य असतां तुम्ही तो ठेविला नाहीं हा तुमचाच दोष होय.

बरें. त्यानंतर आतां संबंध एक वर्ष गेलें. रीतीप्रमाणें यंदाहि मे महिन्यांत देवळाच्या ट्रस्टींकडून सवाद्य पूजेच्या परवानगीची मागणी करण्याचा अर्ज येणा-

रच हें माहीत असतां, या अवधींत त्याचा पूर्वविचार तुम्ही काय केला ? अखेर-पर्यंत त्यांना कांहीं एक सुगावा लागूं न देतां तुम्ही झुलविलेंत. आणि शेवटच्या क्षणीं हुकूम काढलात त्यानें तुम्ही गतवर्षीच्या तुमच्या अन्यायावरहि मात केलीत. कारण गतवर्षी सवाद्य पूजा करण्याची एक दिवसापुरती तरी परवानगी दिली होतीत, तीहि यंदा काढून घेतलीत ! अशी निदान एक दिवसाची परवानगी देणें हें जर गतवर्षी रास्त होतें तर यंदाच तें अयोग्य कसें ठरलें ? शिवाय गतवर्षी आयत्या वेळीं दंगा अचानकपणें उद्भवला ही सबब तरी तुम्हाला सांगतां येण्या-सारखी होती. पण यंदा तीहि स्थिति नव्हती. कारण गतवर्षीचा अनुभव लक्षांत घेऊन यंदा दंगा होईल तर त्याचा बंदोबस्त आगाऊ विचारपूर्वक करण्याला तुम्हाला भरपूर वेळ होता. आणि बंदोबस्ताला तुमच्याजवळ भरपूर साधनें होतीं.

अशी स्थिति असतां यंदाहि ही परवानगी देऊं नये असें तुम्हाला वाटलें म्हणजे मग यापुढे केव्हांहि ती परवानगी देऊं नये असेंच तुम्हाला वाटणार असें सरळ अनुमान निघत नाही काय ? यंदा मंदिरांतील छोटी घंटा वाजविण्यास प्रतिबंध केला तो हास्यास्पद होता ही गोष्ट तुमच्या नजरेला आली. आणि लोक असें बोलतात की, तेवढ्यापुरता प्रतिबंध काढून घेतल्यानें जर सत्याग्रह थांबविला जाण्याचा प्रयत्न यशस्वी होण्याचा संभव असेल तर करून पाहावा असें तुमच्या मनांत मध्यंतरीं एकदां आलें होते. पण तसेहि कांहीं न घडतां तुम्ही अखेरपर्यंत तो हुकूम जारी ठेवला, खटले भरण्याचा तडाखा चालविला, आणि लोकांना शिक्षा देण्यापर्यंत मजल नेलीत. असें करून तुम्ही स्वाभिमानी सत्याग्रह्यांकडून सुमारें दोन हजार रुपये उकळले. या कृत्यामुळें सरकाराचा पोलिस बंदोबस्त ठेवण्याला जो थोडा अधिक खर्च लागला असेल तो तुम्ही परस्पर वसूल केला याबद्दल सरकारचें जमाबंदी खातें तुमचें फार आभारी झालें असेल ! पण असें करण्यानें तुम्ही हिंदुसमाजाच्या अपमानाच्या जखमेवर अन्यायाचें मीठ चोळलेंत असेंच होत नाहीं काय ? आतां असा विचार आपण करूं कीं, देवळाच्या ट्रस्टींना सवाद्य पूजा करण्याचा हक्क एक आहे तरी किंवा नाहीं तरी. दोघांपैकीं एक घेऊन चाललेंच पाहिजे. हा हक्क त्यांना नाहीं असें ठरलें तर पुढचें सर्व बोलणेंच खुंटलें. आणि गतवर्षी तुम्ही जी मेहेरबानगीची थोडीशीं झुळूक दाखविलीत तीहि निष्कारणच होती म्हणावयाची. पण दुसरें पक्षीं ट्रस्टींना हा हक्क आहे असें ठरलें तर तो हक्क बजावूं देण्याविषयीं योग्य ती सर्व तजवीज सरकारनें

स्वतः अंगावर घेऊन सरळपणें पार पाडली पाहिजे. तसें न करतां 'तडजोडी'चें नांव करून त्या खोड्यांत ट्रस्टींना अडकवूं पहाणें हें योग्य होणार नाहीं. या तडजोडींना मी खोडा म्हणतों याचें कारण असें कीं, तडजोडीचाच विचार म्हटला म्हणजे त्यांत उभयपक्षीं कांहीं देणें घेणें सोडणें हें आहेच. आणि दुर्दैवानें हल्लीं असे चमत्कारिक दिवस हिंदूंना आले आहेत कीं, अशा कोणत्याहि देवघेवींत बिचाऱ्या हिंदूंच्या हक्काचाच तेवढा कान एक तसूभर जादा छाटला जावा! म्हणून मी म्हणतों कीं, तुम्ही ही तडजोडीची म्हणून वाटाघाट काय काढली ? आणि तडजोड करून ठरविण्यासारखें तरी त्यांत काय आहे ? हिंदु व मुसलमान यांच्या परस्पर विरोधी हक्कांचें भांडण आणि त्यापासून उत्पन्न होणारा प्रश्न, हा सरकारापुढें आजच पहिल्यांदाच आणि फक्त पुण्यासच उद्भवला आहे काय ? अशा प्रकारचीं उदाहरणें व हा प्रश्न सोडविल्याचे दाखले सरकारच्या दप्तरीं काय थोडे आहेत ? मग ते विचारांत घेऊन सरकारानें स्वतःच स्वतंत्र असा निर्णय कां देऊं नये ? वादांतील मशिदीजवळून किंवा आसपास इतर हरप्रकारचीं वाद्यें वाजतात, आवाज, गोगाट होतात. त्यांतील कांहीं स्वतः मुसलमानहि करीत असतील. हे सर्व मशिदीच्या मुसलमानांना चालतें. पण बिचाऱ्या हिंदूंनीं एक दिवस आपल्या त्या देवळाजवळ सवाद्य पूजेचा आपला हक्क सांगितला तर तो तेवढा मुसलमानांना निषिद्ध व असह्य कां वाटावा ? आणि तो आग्रह सरकारनें कां चालू द्यावा ? मुसलमानांतील कोणी चार गुंड दंगा माजविण्याचे मनांत आणितात. एवढ्याचकरितां पुण्यांतील सार्वजनिक रस्त्यावर हिंदूंना वाद्यें वाजविण्याची कायमची बंदी व्हावी ही योग्य आहे काय ? मग हिंदूंनी आपले कायदेशीर हक्क तरी कसे बजवावयाचे ? आणि आपल्या संग्रही बंदोबस्ताचीं भरपूर साधनें असतां सरकारनें हिंदूंच्या ह्या हक्कांना प्रतिबंध करावा यावरून सरकारांत कोणी तरी मुसलमानांचे पक्षपाती आहेत, किंवा सरकारांत कोणी चार मुसलमान गुंडांना भिण्याइतके नादान आहेत असें कोणी म्हटलें तर काय हरकत ? वर उलट हिंदुसमाज पहा. त्यांतील कोणी सरकाराला पुण्यांतच काय पण या इलाख्यांत कोठेहि अशा बिकट अडचणींत कधी घातलें आहे काय ! कायदा करून शांततेनें वागण्याचें हेंच बक्षीस हिंदूंना मिळावें काय ?

मी तुम्हाला हें सर्व लिहिलें यावद्दल तुम्ही मला माफ करा. पण कांहीं सरकारी अधिकाऱ्यांचें धोरण असें पक्षपाती अन्यायी आणि केवळ इभ्रतीला बळी

पडणारें आहे असें ज्याला प्रामाणिकपणें वाटत असेल त्या कोणीहि मी लिहिलें याहून कमी लिहिणे शक्य नाहीं. शेवटीं मला असें म्हणावयाचें आहे कीं, सरकाराला या प्रकरणीं जर कांहीं तडजोड करूनच हा प्रश्न सोडवावा असें वाटत असेल, तर निदान त्यांनीं ही तडजोड तुमच्यावर तरी सोपवूंच नये. कारण तुमचें वर्तन या प्रकरणीं बहुशः पक्षपाताचें झालें आहे आणि हल्लींचा हा बखेडा तुमच्या अविचारामुळेंच उत्पन्न झालेला आहे यांत शंका नाहीं. —( न. चिं. केळकर. )

ज्याप्रमाणें मोठमोठ्या युरोपियन अधिकाऱ्यांशीं त्याचप्रमाणें संस्थानिकांशी वागण्याचें धोरण मा ठेवलें होतें; व त्यासंबंधीं पहिला नियम हा कीं, अशा लोकांपैकीं कोणासहि व्यक्तिशः म्हणजे स्वतःकरितां आपण होऊन जाऊन भेटावयाचें नाहीं, तर त्यांनीं कोणी बोलावणें पाठविलें तरच भेटावयाचें. यामध्यें कोणत्याहि प्रकार त्यांच्याविषयी तिरस्कारबुद्धि होती असे नव्हे; तर मोठ्या लोकांना आपण होऊन भेटण्यांत आपल्याच स्वाभिमानाला धक्का बसतो, व इतरानांहि तो सहजच लघळपणा किंवा खोटा लाघवीपणा असा वाटतो. कामाशिवाय गेल्यास हवापाण्याच्या गोष्टी बोलावयाच्या त्यांत अर्थ काय ! व नसता भलेपणा देऊन त्यांच्याशीं बोलणें म्हणजे एक प्रकारचा तोंडपुजेपणा होतो. शिवाय आपला पेशा पडला टीकाकाराचा. त्यामुळें प्रसंगोपात्त मी अशा बहुतेक लोकांवर टीका केलेली असणार. मग सार्वजनिक टीकेचा दोष घालविण्याकरितां जर असा खाजगी प्रयत्न करावयाचा तर आधीं ही टीका करावीच कशाला ! टीकाकाराचें कटु व्रत पत्करलें तर मोठ्या लोकांशीं फटकून वागण्याची व त्यांची अवकृपा न जुमानण्याची तयारी असावी लागते, व ती मी नेहमीं ठेवली होती. आमच्या वर्तमानपत्राच्या धंद्यांत अस पुष्कळ ठिकाणीं आढळून आलें आहे कीं, संपादकांस लांचलुचपत देऊन आपल्याविषयीं किंवा आपल्या संस्थानाविषयीं स्तुति करवून घेण्याची संस्थानिकांना इच्छा असते; व स्वार्थाच्या मोहाला बळी पडून व स्वतःकरितां देणग्या न घेतल्या तरी आपले छापखानें वर्तमानपत्रे यांच्याकरितां त्या घेऊन ते संस्थानिकांचें उद्दिष्ट साधून देतात. विलायतेंत हा मार्ग अगदींच प्रतिष्ठित मानला गेला नसला तरी लोक त्याच्याकडे कानाडोळा करतात. आणि हिंदुस्थानांत त्या गोष्टीचें अनुकरण पुष्कळ वर्तमानपत्रांनीं केलें आहे. मुंबई क्रॉनिकल, मुंबई टाईम्स, मुंबईचा इंडियन डेली हेरल्ड, अशा पत्रांनीं संस्थानिकांना खूष करून व त्यांचे स्तुतिपाठक बनून, किंवा त्यांची वकिली करून, पुष्कळ पैसा मिळविला आहे.

पूर्वी मद्रासच्या हिंदूला विजयनगरमच्या राजानें बरीच मोठी देणगी दिली होती. आणि बंगाल्यांतील वर्तमानपत्रांनीं तर या कामीं कांहीच विधिनिषेध ठेवलेला नाहीं. एका राजानें किंवा जमीनदारानें एक वर्तमानपत्र आपल्या काखेंत मारावें, दुसऱ्यानें दुसरें, असा क्रम आज पन्नास पाऊणशें वर्षें चालू आहे. अलीकडेच तो थोडा थांबला आहे. याचें कारण वर्तमानपत्रें अधिक जहाल व स्वातंत्र्यप्रिय होत चालली असून, ती इंग्रज सरकारप्रमाणें हळूहळू राजे जमीनदार तालुकदार यांच्याहि जीवांवर उठूं लागली आहेत. आणि जो पैशाचा पाठपुरावा अशा लोकांकडून होण्याचा थांबला तो सामान्य जनतेकडून कसाबसा पुरा पडत आहे. नाभाच्या महाराजांकडून ××× साहेबांनी आपल्या पत्राकरितां हजारो रुपये उपटले ही गोष्ट प्रसिद्ध आहे. क्रॉनिकल पत्राला फेरोजशहा मेथा यांच्या पुढाकारामुळें लाख दोन लाख रुपयांची वर्गणी प्रथमच जमली, व पुढेहि त्याला अनेक श्रीमंत लोकांनीं देणग्या दिल्या. आतां यांत वावगें असें तेव्हां कांहीच नव्हतें, कारण देणगी निरपेक्ष व घेणारा स्वतंत्र अशी स्थिति तेथ होती. पण दुसऱ्या एका पत्राच्या संपादकांनी नाभाच्या महाराजाचें श्राद्ध पैसे खाऊन विकत घेतले ही गोष्ट प्रसिद्ध असल्यामुळें विशेषतः नाभाच्या महाराजांची योग्यता लोकांना पुरी माहीत असल्यामुळें, या व्यवहाराला सहजच वाईट स्वरूप आलें; व संपादक साहेबांची जी थोडीबहुत किंमत आधीं होती ती आणखीहि पुष्कळ उतरली. सुदैवानें माझा ज्या वर्तमानपत्राशी, ज्या संस्थेशीं, व ज्या पुढाऱ्यांशीं आजन्म संबंध राहिला त्याची पूर्वपीठिका व परंपरा सर्वस्वी निस्पृहतेची असल्यामुळें माझ्या स्वभावाला अनुकूल अशीच परिस्थिति मला प्राप्त झाली. याबद्दल मला नेहमीं आनंद वाटे.

टिळक व केसरी हे इतक्या निस्पृहतेनें जन्मभर वागले कीं, राजेरजवाडे संस्थानिक, जहागिरदार, इनामदार यांच्या एका पैचेंहि ओशाळे ते कधीं राहिले नाहींत. सुदैवानें केसरीची सांपत्तिक स्थिति प्रथमपासून बरी, पुढें पुढें तर चांगलीच होती. यामुळें केसरीला कोणाच्या पैशाची अपेक्षा करण्याचें कारण नव्हतें. शिवाय केसरी व टिळक यांच्याभोंवतीं एक प्रकारें इंग्रजांसंबंधानें राजद्रोहाचें वातावरण जमून राहिलेलें असल्यामुळें, राजेरजवाडे वगैरे लोकांना केसरीशीं संबंध ठेवणें सोईपेक्षां गैरसोईचेंच अधिक वाटण्यासारखें होतें. ही या कामीं एक प्रकारची मदतच होती! टिळकांच्या मृत्यूनंतर केसरीसंबंधानें विद्वेषाचें वातावरण पूर्वीइतकें राहिलें नाहीं, म्हणजे ज्या टिळकांना जिवंतपणीं जे लोक अस्पृश्य मानीत त्या

टिळकांचे ते लोक पुढें उघडपणें गुणाहि घेऊं लागले. तशांतच संस्थानी स्वराज्याची चळवळ १९२०-२१ पासून विशेष सुरूं झाली, व टिळकांपेक्षांहि एकप्रकारें मी त्या चळवळींत अधिक पडलों. पण या चळवळींत संस्थानें व संस्थानिक हे जगवूनच सुधारावे हें तत्त्व मी नेहमीं प्रतिपादित असल्यामुळें, संस्थानी प्रजा व संस्थानिक या दोहोंचाहि निरपेक्ष निःस्वार्थी स्नेह व विश्वास मला थोडाबहुत संपादितां आला.

केसरीचा संपादक व वरिष्ठ कायदेमंडळाचा सभासद वगैरे नात्यांनीं माझी योग्यता कोणत्याहि संस्थानाच्या दिवाणाच्या योग्यतेहून कमी नव्हती. यामुळें संस्थानिक लोक माझ्याशीं आदरबुद्धीनें वागत. आणि माझ्याशीं संबंध ठेवीत. तथापि या संबंधांतहि मी केसरी संस्थेची पूर्वपरंपरा, म्हणजे निस्पृहता व मतस्वातंत्र्याचें धोरण, ठेवीत असल्यामुळें मी निःपक्षपाती व स्वतंत्र टीकाकार आहे असें संस्थानिक व त्यांचे प्रजाजन या दोघांनाहि कळून चुकलें होतें.

नाहीं म्हणावयाला एक प्रसंग खोट्या अपवादाचा पण अनिष्ट असा चुकून येणार होता पण तो अखेर मीच टाळला. नाभाचे महाराज हे पदच्युत झाल्यानंतर त्यांनीं प्रमुख देशी वर्तमानपत्रे आपल्यातर्फे लिहिण्यास मिळावी अशी जोराची खटपट चालविली व ती अनेक ठिकाणीं यशस्वी झाली. त्याचप्रमाणें केसरी-मराठ्याचेंहि सहाय्य आपणास मिळावें अशी इच्छा धरून त्यांनीं दिल्लीस मला एकदां भेटीला व एकदां भोजनाला बोलाविलें होतें. १९२५ सालीं कानपुरास राष्ट्रीय सभेला मी गेलो तेव्हां महाराजांनीं आपले एकदोन हस्तंक मजकडे मुद्दाम पाठविले; व डेहराडून येथें मी महाराजांच्या भेटीला जावें असा फार आग्रह केला. नाभाचे महाराज इतर दृष्टीनें मोठे चांगलेसे होते असें नाहीं. पण इंग्रज सरकारशीं वागतांना त्यांनीं दाखविलेला बाणेदारपणा प्रसिद्ध होता. आणि त्यांतल्या त्यांत आम्हाला त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटण्याचें विशेष कारण असें कीं, टिळक वारल्यानंतर त्यांच्या संबंधानें स्पष्ट गुणग्राहक व स्तुतिपर असें भाषण या एकाच्याच संस्थानिकानें जाहीरपणें करण्याचें धैर्य दाखविलें होतें. यामुळें महाराजांना जाऊन भेटावें व त्यांच्या निमंत्रणाचा आदर करावा असें वाटून मी दिवसहि ठरविला. परंतु दरम्यान मी लखनौ येथें माझे मित्र व टिळकांचे जामात डॉ. साने यांना भेटावयास गेलों. तेथें बोलण्यांत या

गोष्टी सहज निघाल्या. तेव्हां त्यांनीं मला असा सल्ला दिला कीं, नाभाच्या महाराजाबद्दल तुम्हाला सहानुभूति वाटत असली तरी समक्ष त्यांच्या भेटीला जाऊं नका. आणि असें कां म्हणून विचारतां ते म्हणाले कीं, " वर्तमानपत्रांना लांचलुचपत देऊन वश करून लिहिवण्याविषयींची महाराजांची अपकीर्ति तुमच्या दक्षिणेंत फारशी नसेल, परंतु इकडे उत्तर हिंदुस्थानांत ती फार आहे. प्रसंगविशेषीं आजवर तुम्ही महाराजाविषयीं लिहिलें असेल तेवढें पुरें. आणि त्याला आज किंमतहि आहे. पण तुम्ही महाराजांना भेटावयास गेला कीं, तुम्ही त्यांच्या लांचलुचपतीला बळी पडला असा खोटा कां होईना पण अपवाद सुरू होईल. तुम्हास त्यांच्या मदतीमुळें अडलेलें नाहीं, व त्यांनीं मदत देऊं केली तरी तुम्ही ती स्वीकारणार नाहीं हें मला पूर्ण माहीत आहे. तथापि, त्या महाराजांचा संबंध आला कीं, कोणावरहि अपवाद हटकून यावयाचा. तेव्हां त्यांना न भेटणें हा उत्तम मार्ग. एरवीं, पैसा तर नाहींच पण नसता अपवाद अंगाशीं चिकटावयाचा." मला ही गोष्ट फार पटली व मी तिकडे येऊं शकत नाहीं अशी डेहराडून येथें महाराजांच्या हस्तकाला तार करून मी पुण्यास आलों.

संस्थानिकांशीं वागण्यांत अशा रीतीनें मी नुसती निस्पृहताच ठेवली असें नाहीं तर स्पष्टवक्तेपणाहि ठेवला. त्याचा एक प्रकार व प्रसंग सांगण्यासारखा आहे म्हणून सांगतों. १९२१ सालीं असहकारितेच्या चळवळीचा ऐन जोर होता तेव्हांच प्रिन्स ऑफ् वेल्स् हे हिंदुस्थानांत येण्याचा योग घडून आला हें प्रसिद्धच आहे. या योगांत फिरून योग असा कीं, पुण्यास शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या पायाचा दगड प्रिन्स ऑफ् वेल्स् यांच्या हातून घालावा असें या स्मारकाच्या चळवळीचे पुढारी कोल्हापूरचे छत्रपति महाराज व ग्वाल्हेरचे अधिपति माधवराव महाराज शिंदे यांनीं ठरविलें. पुण्यांतील समारंभाचा दिवस ठरला. पण त्याजबरोबर या समारंभावर बहिष्कार घालावा असें पुण्यांतील लोकांचेहि ठरलें. अर्थात् हा बहिष्कार शिवाजी महाराजांच्या स्मारकावर नसून, तें ज्यांच्या हातून सुरूं होणार त्या विलायती युवराजावरच तो बहिष्कार होता. अशा रीतीनें, समारंभ भरदार दिसावा म्हणून शनवार वाड्यापुढें गर्दी जमविण्याची एका अंगानें खटपट सुरूं होती तर या समारंभाच्या वेळीं तिकडे सरकारी अधिकारी व त्यांचे हस्तक याखेरीज एक चिटपाखरूंहि फिरकूं देऊं नये अशी दुसरीकडे आमची चळवळ सुरूं होती. या चळवळीला बराच रंग व जोर आलेला उघड

दिसत होता. स्मारकाच्या पुढाऱ्यांपैकीं कोल्हापूरकर महाराज हे निरुपयोगी व कंसरीचे उघड प्रतिपक्षी. पण ग्वाल्हेरच्या माधवरावमहाराजांची स्थिति व योग्यता वेगळी होती. म्हणून त्यांना अशी कल्पना सुचली कीं, या बहिष्काराच्या चळवळीचा पुण्यांतला एक प्रमुख पुढारी म्हणून मला भेटीला बोलवावें व माझी समजूत घालून शक्य तर बहिष्कार उठवावा. अर्थात् आळशावर गंगा लोटण्याचा प्रसंग आला ! समारंभाच्या आदल्या दिवशीं मी घरीं लिहीत बसलों असतां ग्वाल्हेरचे सेनापति जनरल राजवाडे हे अवचित मजकडे आले. त्यांची माझी थोडी ओळखें होती. पण त्यांनी मला भेट देण्याचा अर्थाअर्थी संबंध नव्हता, यामुळें ते कां आले याची कल्पना चालेना. त्यांनीं प्रथम कुशल प्रश्न केले, व मग हळूच मला म्हणाले की, "माधवराव महाराजांची तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे तरी तुम्ही त्यांच्या भेटीला याल कां ? येत असाल तर दोन प्रहरीं मोटार पाठवितों." मी म्हणालों "महाराजांचीच इच्छा असेल तर मी भेटीला कां न येईन ! तरी मोटार अवश्य पाठवा." पण भेटीला कां बोलावतात याची मात्र कल्पना नव्हती. असो. ठरल्याप्रमाणें मी गेलों. महाराजांनींहि मोठ्या आदरपूर्वक माझें स्वागत केलें व आम्ही एकटेच दीडतास बोलत बसलों होतों. प्रथम त्यांनीं एरवींच्या गोष्टी काढल्या. ते म्हणाले "माझी व इकडील पुढाऱ्यांची कधी भेट होत नाहीं, पण मी कोल्हापूरकरांप्रमाणें ब्राह्मणद्वेष्टा नाहीं. मी पुण्यास येतों तेव्हां नेहमीं एक तरी ब्राह्मण-भोजन घालून दक्षणा बांटून परत जातो. माझे सर्व कुलाचार ब्राह्मणांच्या हातून होतात. स्वतः मी नित्य पहाटे उठून स्नान करून पूजा अर्चा करतों, व पार्थिव पूजा केल्याशिवाय अन्नग्रहण करीत नाहीं. माझ्या पोषाखावरून मला लोक हा सुधारला, इंग्रज बनला, असे म्हणत असतील. पण ही सुधारणा सर्व वरकरणी आहे." इतकें बोलून ते पुढें म्हणाले कीं "आपल्यांतलें चांगलें असेल तें ठेवावें पण साहेबांचेंहि चांगलें असेल तें घ्यावें. त्यांचा हा पोषाख मला सोईचा वाटतो; व राज्यकारभाराची मला हौस असल्यामुळें तो मला देशी विदेशी लोकांशीं वागतांना सारखाच उपयोगी पडतो. साहेब लोकांचे कांहीं गुण राज्यकर्ते या नात्यानें घेण्यासारखे आहेत ते आपण अवश्य घ्यावें. मात्र त्यांच्या आहारीं जाऊं नये व त्यांना भिऊं नये म्हणजे झालें." हें सर्व बोलणें चांगलेंच होतें. पण मला सत्तरादाखल काय म्हणावें याचा विचार करतां किंचित् कुत्सितपणा सुचला. ग्वाल्हेर संस्थानानें केसरीपत्रावर निष्कारण बहिष्कार घातला ही गोष्ट माझ्या मनांत

डांचत होती; व त्याचा सूड आतां हळूच घ्यावा अशी स्फूर्ति झाली. म्हणून मी म्हणालों " संस्थानिकांनी इंग्रज सरकारच्या आहारीं जाऊं नये हें नुसतें म्हणणें झालें. पण वस्तुस्थिति तशी नसते ! "

" ती कशी ? "

" मी उदाहरण देईन. आपण मात्र रागावूं नये."

" ठीक आहे. राग कशाचा ? खुशाल बोला. "

" आपल्याच ग्वाल्हेर संस्थानांत माझ्या केसरी वर्तमानपत्राला आपण बंदी केली आहे हें आपणाला माहीत आहे ना ? "

" होय, माहीत आहे. पण त्याचें येथें काय ? "

" येथें इतकेंच की त्या पत्राला खुद्द ब्रिटिश हिंदुस्थानांत बंदी नाही. तेथें तें पत्र इंग्रज सरकार चालूं देतें. पण आपण मात्र त्याला बंदी करतां ! हें ब्रिटिश सरकारच्या आहारीं जाणें इतकेंच नव्हे तर त्यांच्याहि पलीकडे जाणें नव्हे काय ? मुंबईचा गव्हर्नर जें मुंबई इलाख्यांत करीत नाहीं तें रेसिडेंटच्या हुकुमानें आपण येथें करतां ! "

" त्यांच्या हुकमावरून बंदी केली हें कशावरून ? "

" त्या हुकुमापूर्वी बंदी केली नव्हती यावरून."

" पण केसरीला बंदी करावी असें आम्हांलाच वाटलें असेल तर ? "

" वाटलें असतें तर आधींच केली असतींत ना ! बरें, बंदी करण्यासारखें केसरींत काय असतें ? "

" केसरींतील राजकीय विषयावरील लेख आमच्या राज्यांतील प्रजेला व परिस्थितीला मानवण्यासारखे नसतात."

" ब्रिटिश सरकाराविरुद्ध आम्ही टीका केली तर त्यांत आपलें काय गेलें ! संस्थानाविरुद्ध तर आम्ही लिहीत नाहीं ना ! या ग्वाल्हेरच्या प्रजेंत आपणाविषयीं बेदिली उत्पन्न करण्यासारखा लिहिलेला एकहि लेख आपणास केसरींत दाखवितां येणार नाहीं अशी माझी खात्री आहे. पण राजकीय विषय सोडून दिला तरी, केसरींत धर्म सामाजिक सुधारणा वाङ्मय इतिहास शास्त्रीय चर्चा

इत्यादि उपयुक्त विषय येतात त्यांना, आपल्या राज्यांतील महाराष्ट्रीय प्रजेला, विनाकारण मुकावें लागतें त्याची वाट काय ! सुदैवानें आपण महाराष्ट्रीय राजे आहां व दूरच्याहि मुलुखांत आपली मराठी मातृभाषा असणारी बरीच प्रजा आहे ! "

" तुमच्या अवांतर गोष्टींना हरकत घेण्याचें कारण नाहीं. पण राजकारण व या अवांतर गोष्टी या एकाच पत्रांत एकाच अंकांत असतात त्या वेगळ्या कशा कराव्या ? आणि त्या वेगळ्या करतां येत नाहींत म्हणून सर्वांलाच बंदी करावी लागते. तीं दोन वेगवेगळीं करा व मग विचारा. "

" आपण मजवर हा बिनतोड डाव टाकला खरा. वर्तमानपत्र असें कापून फाड़न पाठवितां विकतां येत नाहीं खरें ! एकूण एकाचा स्पर्श दुसऱ्याला असा बाधक होतो म्हणावयाचा ना ? "

या नंतर महाराजांनीं हा विषय बदलला व थोड्या वेळानें ते त्यांच्या मनांतील भेटीच्या मुद्यावर आले. ते म्हणाले, " केळकर, आज तुम्हांला बोलावण्याचें कारण पुण्यांत तुम्ही घातलेला शिवाजी माहराजांच्या स्मारकावरचा बहिष्कार. तो तुम्ही कां उठवूं नये ? "

मी म्हणालों, "आधीं हा बहिष्कार शिवाजी महाराजांच्या स्मारकावर नाहीं, व तो मी घातलेला नाहीं. बहिष्कार प्रिन्स ऑफ् वेल्स् पुण्यास येतात त्यांच्यावर आहे, व तो घालावा अशी राष्ट्रीय सभेची आज्ञा आहे. मग पुण्यांत तो उठविण्याचा अधिकार मला कोठून येणार ! हा स्थानिक बहिष्कार शहर काँग्रेस कमिटीनें घातलेला आहे. "

" पण तुम्हीच पहा हें योग्य आहे कां ते ! कधीं नव्हे तें शिवाजी महाराजांचें स्मारक होतें. तें तुमच्या या पुण्यांत होतें; व विलायतचा राजपुत्र त्याचा पाया घालणार. असें असतां पुण्याच्या नागरिकांनीं समारंभावर बहिष्कार घालावा हेंच कां शिवाजी महाराजांवरील त्यांचें प्रेम ! "

" पुन्हा एकवार थोडें कडू बोलावें लागत आहे त्याची क्षमा करा. पण मी असें विचारतों, शिवाजी तोच व शिंदे महाराज तेच. मग " कधीं नव्हें तें " आजच स्मारक करण्याची इच्छा आपल्याला कां झाली ! प्रिन्स ऑफ् वेल्स् येतो म्हणूनच ना ! मग यांत शिवाजी महाराजांचा बहुमान तो काय झाला ! प्रिन्स ऑफ् वेल्स्चा झाला खरा ! शिवाजी महाराजांचा अपमान आम्ही कसा करूं ?

आणि हें खरें कीं खोटें याचें प्रत्यंतर पहाण्याला आपण उद्याच्या दिवस पुण्यास रहा. प्रिन्स ऑफ् वेल्स् पुण्यांतून जाऊं द्या. मग आपणालाच दिसेल कीं सगळा गांव स्मारकाच्या दर्शनाला येईल, व आपल्यालाहि मुजरा करावयास येईल. पण—पण—आज नाहीं !"

"पण प्रिन्स ऑफ् वेल्स् व शिवाजी स्मारक हीं लोकांनीं मनानें वेगवेगळीं पृथक् कां मानूं नये ?"

"ती पृथक् करतां येत नाहींत म्हणून ! आतांच नाहीं कां आपण मला सांगितलें कीं केसरीतील वाङ्मय धर्म इत्यादि विषय त्यांतील राजकारणापासून वेगळे करतां येत नाहींत म्हणून आपण केसरीवर बहिष्कार घातला व बंदी केली ! तीच गोष्ट शिवाजी महाराजांचें स्मारक व प्रिन्स ऑफ् वेल्स् यांच्या जोडीची झाली आहे त्याला काय करावें ?"

हा माझा ठोका बरोबर बसला. महाराजांनीं कृत्रिम हास्य केलें. पण चादांत डाव आपल्यावर परतला असें वाटून त्यांचा चेहरा किंचित् गोरामोरा झाला. थोड्या वेळानें पानसुपारीचें तबक आलें, व मजकरितां मोटार दाराजवळ बोलावण्यांत आली. केसरीवरील बंदी पुढेंहि कांहीं वर्षें उठली नाहीं. महाराज भेटल्यावर मी कौन्सिलला अर्ज केला व मग कांहीं दिवसांनीं बंदी उठली. पण योग असा कीं माधवराव महाराज शिंदे यांजकडे मी जन्मांत एकदांच गेलों. तो त्यांच्याच बोलण्यावरून, व त्यांच्याच मोटारींतून. पण आयत्या वेळीं वर सांगितल्याप्रमाणें विषय निघाला व खटका उडाला. महाराज म्हणून मी त्यांची कांहीं पर्वा केली नाहीं.

तसेंच बिकानेरच्या महाराजांनीं एकदां मुंबईस मला गाडी पाठवून आपल्या समुद्रकांठच्या बंगल्यांत मुद्दाम भेटीस बोलावून नेलें. त्या पूर्वी नुकत्याच मुंबईस भरलेल्या संस्थान-प्रजापरिषदेचा मी अध्यक्ष होतों. आणि परिषदेंत बिकानेर-मधील तेव्हांच्या दडपशाहीचा विषय चर्चेंत खूपच रंगला होता. महाराजांनीं हाच विषय चर्चेला घेऊन आपल्या तर्फेचें म्हणणें मला खूप तपशीलवार सांगितलें. बरेच कागदपत्रहि दाखविले. आणि शेवटीं बिकानेर संस्थानला भेट देण्याविषयीं निमंत्रण केलें. मी होय ना कांहींच उत्तर दर्शवीना. तेव्हां ते म्हणाले, "तुम्ही माझे पाहुणे म्हणून आला तरी माझे गुलाम नाहीं. तुम्हाला रहाण्याला स्वतंत्र जागा

देईन. स्वतंत्र मोटार देईन. ती घेऊन तुम्ही वाटेल तिकडे माझ्या राज्यांत हिंडा व वाटेल त्याच्या गांठीभेटी घ्या व होईल तें मत बनवा. तुमच्यासारख्या लोकांनीं एकदां माझें संस्थान पाहावें एवढीच इच्छा."

मग मी अगदींच नकार न देतां म्हणालों, 'उन्हाळा टाळून चांगल्या हवेच्या दिवसांत केव्हांतरी येतां आलें तर कळवीन' महाराजांनीं पुढील फेब्रुवारी सुचविला. मी होय म्हटलें. पण बिकानेरला जाण्याचा बेत रहितच केला. एक तर प्रवासाचा कंटाळा. दुसरें असें कीं, त्यानंतर सर प्रभाशंकर पट्टणी हे एकदां पुण्यास आल्यावेळीं मजकडे जेवावयास आले होते. तेव्हां दोन तास गप्पागोष्टी झाल्या. त्यांत बिकानेरचें नांव निघालें तेव्हां पट्टणी यांनीं बिकानेरच्या स्थितीचें इतकें प्रतिकूल वर्णन केलें, इतकी थट्टाहि केली, कीं मी बिकानेरची खेप टाळली हें बरें केलें असेंच मला वाटलें.

श्री. सयाजीराव महाराज यांची अनेक वेळां गांठ पडली आहे. ब्रिटिश व संस्थानी राजकारणाच्याहि विषयावर त्यांच्याशीं मनमोकळेपणानें बोलणें झालें आहे. श्री. तुकोजीराव महाराजांची गांठ एकदांच १९१७ सालच्या इंदूर येथील साहित्य संमेलनाच्या वेळीं पडली. ग्वाल्हेरचे नूतन अधिपति यांचीहि भेट झाली आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील बहुतेक संस्थानिकांचा व माझा ऋणानुबंध आहे. त्यांच्याशीं प्रजापक्षातर्फे बोलण्याचा प्रसंग आल्यास मी आपलें मतें अगदीं मोकळ्या मनानें सांगतों. गतवर्षी म्हैसुरास सरकारी निमंत्रणावरून गेलों ती हकीकत, व महाराज व दिवाणसाहेब, यांच्याशीं झालेल्या संवादांची हकीकत मी त्या वेळीं केसरींत दिलीच होती.

---

## ( १३ ) मी व सामाजिक सुधारणा

मनुष्य हा प्रायः अद्भुतरसाचा भोक्ता असतो. मला कृत्रिम स्वरूपाची अतिशयोक्ति आवडत नसली तरी खरा अद्भुत रस आवडतो. आणि समाजाच्या चालीरीति व मनःस्थिति यांच्यामध्यें जे कालांतरानें फरक पडतात ते खरोखरच अद्भुत रसाचीं उदाहरणें म्हणून देतां येण्याइतके अकल्पित असतात. एखाद्या भूकंपानें एका रात्रींत स्थळाच्या ठिकाणीं जल व जलाच्या ठिकाणीं स्थळ अशी स्थित्यंतरें होतात. अगदीं तशींच समाजाच्या स्थितींत होत नाहींत हें खरें; तथापि

पंचपन्नास वर्षांचा काळ हा समाजाच्या आयुष्यांतला एक दिवस किंवा एक रात्र असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. आणि मी माझ्या आठवणीच्या पन्नास वर्षांत जीं सामाजिक स्थित्यंतरें पाहिलीं तीं भूकंपानें होणाऱ्या स्थित्यंतराइतकींच मला आश्चर्यकारक वाटतात. मी या पन्नास वर्षांचीं रोजनिशी ठेवली असती व पानापुढें पान चाळीत या स्थित्यंतराचा क्रम पाहिला असता, तर हीं स्थित्यंतरें कदाचित् मला इतकीं आश्चर्यकारक वाटतीं ना ! त्यांच्या मंदक्रमांत अद्भुतपणा लोपून गेला असता. पण एका टोंकाला पन्नास वर्षांपूर्वीचा तो काळ व दुसऱ्या टोंकाला पन्नास वर्षांनंतरचा हा काळ यांतील समाजस्थिति लक्षांत घेतली म्हणजे खरोखरच धरणीकंपाच्या देखाव्याचा भास होतो !

माझ्या धार्मिक मतांचें समालोचन मी करतों तेव्हां मला असें वाटतें कीं अगदीं लहानपणापासून आतांपर्यंत माझ्या धर्मविषयक मतांमध्यें फारसा फरक झालेला नाहीं. धर्म या विषयाचें माझें तात्विक ज्ञान लहानपणीं होतें त्यापेक्षां आतां तें वाचनानें व विचारानें पुष्कळच अधिक वाढलें आहे हें खरें. पण त्याचा अर्थ इतकाच कीं त्या विषयाची जी चर्चा जशी मला पूर्वी करतां आली नसती ती तशी मी हल्लींच्या प्रौढ बुद्धीनें करूं शकेन. परंतु ही धर्माची फक्त बौद्धिक बाजू झाली. धार्मिक प्रवृत्ति म्हणून जी म्हणतात ती अर्थातच ही नव्हे. धार्मिक प्रवृत्ति याचा अर्थ स्थूलपणें श्रद्धाळूपणा, नियमनिष्ठतेची आवड व संवय, असाच केला पाहिजे. आणि त्या दृष्टीनें पहातां आज काय किंवा लहानपणी काय मी आहे तेथेंच होतों असें म्हणू शकतो. मी देखील लहानपणीं संध्या देवपूजा वगैरे करीत होतों. घरचा वैश्वदेव करीत होतो. प्रीव्हियस परीक्षा होईपर्यंत गुरुचरित्र वाचीत होतों. आणि जानवी मंतरण्याचा मंत्र, सौर, रुद्र, हे मी आमच्या उपाध्यायाजवळ म्हटले होते. परंतु या सर्व गोष्टी जवळ जवळ घरच्या वळणामुळेच मी करीत होतों. त्यापासून विशेष कांहीं पुण्य लागेल अशा कल्पनेनें त्या करीत नव्हतों. उलट आज पाहिलें तरी मी संध्या वैश्वदेव करीत नाहीं, पण घरीं असलों म्हणजे स्नान केल्यावर भोजनाच्या आधीं चार दोन मिनिटेंच कां होईना परंतु देवापुढें बसून फुलें वाहतों व डोळे मिटून क्षणभर एकाग्र होण्याचा प्रयत्न करतों. माझी श्रावणी सहसा चुकत नाहीं. श्राद्धपक्ष मी नियमानें करतों. आणि घरीं रामनवमीच्या दिवशीं पूजा, वेदपठण, वसंतपूजा या गोष्टी वडिलांची आठवण ठेवून हौसेनें करतों. पण आज या गोष्टी मी करतों त्या त्यापासून पुण्य लागेल

म्हणजे पारलौकिक कांहीं लाभ होईल अशा श्रद्धेनें करीत नाहीं. तर ज्याला सकृद्दर्शनीं धार्मिक आचाराचीं कृत्यें म्हणतां येईल त्या या माझ्या गोष्टी सामान्यपणें सामाजिक व्यवहारांतल्या अशाच होऊन बसल्या आहेत.


सामाजिक व्यवहारांत स्वच्छता, शुचिर्भूतता ठेवणें, तोंडांतून अपशब्द न काढणें, रीतीचा-चालीचा पोशाख पेहराव करणें, व समाजांतील ज्या निरनिराळ्या लोकांशीं संबंध येतो त्यांच्याशीं सभ्यपणे दाक्षिण्यवृत्तीनें वागणें या गोष्टी करण्यांत 'पारलौकिक' दृष्टि जितकी असूं शकेल तितकीच माझ्या वरील धर्मकृत्यांत असूं शकेल ! हें समीकरणादाखल मी बोललों; पण खरा अर्थ यांत पारलौकिक कल्याणाची बाजू मुळींच नाहीं हाच. आमच्या घराण्यांत पूर्वी कोण किती धर्मनिष्ठ होऊन गेले असतील हें कांहीं सांगतां येत नाहीं. जी कांहीं माहिती जुन्या पिढ्यांची मिळाली आहे तिजवरून त्यांचा मुख्य धंदा शेतीचा, व कांहींना 'भट' हें नांव लावल्यावरून कांहीं थोडा भिक्षुकीचा किंवा जोशीपणाचा वगैरे असूं शकेल. पण भटपणा किंवा जोशीपणा हा एक धंदाच होय. म्हणून खऱ्या धार्मिक प्रवृत्तींत तें जमेस धरतां येत नाहीं.

माझे चुलत आजे आबा हे स्नानसंध्याशील होते. पण त्याहिपेक्षां माझे वडील व मातोश्री हीं सर्वांत अधिक धार्मिक प्रवृत्तीचीं माणसें होतीं. माझ्या वडिलांचा पेशा कारकुनी होता. ते संस्कृत शिकले नव्हते, शास्त्र पढले नव्हते. परंतु केवळ श्रद्धाबुद्धीनें ते स्नानसंध्यादि गृहयज्ञ यथासांग करीत. इतकेंच नव्हे तर रामाचे ते एकनिष्ठ उपासक असत; आणि पोथीपुस्तक वाचण्याचा त्यांना पुष्कळच नाद होता. आई निरक्षर होती. तिला पोथीपुस्तकहि वाचतां येत नव्हते. परंतु धर्मश्रद्धेत ती वडिलांच्या बरोबरीनें होती. या बाबतींत माझ्या साक्षर कुटुंबानें हें जुनें वळण तंतोतंत पूर्वीसारखें ठेवलेलें आहे. इतकेंच नव्हे तर तिला पोथीपुस्तक वाचतां येत असल्यामुळें, व पुराण कीर्तनाचा नाद मातोश्रींइतका असल्यामुळें, धार्मिक आचारांत तिचा जेवढा वेळ जातो तितका कदाचित् मातोश्रींचाहि जात नसेल. आणि या जुन्या नव्या पिढीच्या धर्मश्रद्धाळू लोकांच्यामुळेंच आमच्या घरीं धार्मिक आचाराचें वळण पूर्वीपासून आतांपर्यंत एकाच दिशेनें व एकसारखें चालूं राहिलेलें आहे. या कारणानें तात्त्विक विचारांच्या दृष्टीनें आम्हाला जितके लोक सुधारकांत गणतात तितके लोक घरीं चालू राहिलेल्या धार्मिक नित्य-

नैमित्तिक आचारामुळें जुन्या पद्धतीचेंहि म्हणतात. पण याचें श्रेय आम्हा नव्या दोन पिढींतिल पुरुषवर्गाकडे नसून स्त्रीवर्गाकडेच आहे असें म्हणावें लागेल.

लहानपणींहि वर सांगितल्याप्रमाणें मी स्नान संध्या करीत असलों तरी त्यांत श्रद्धाळूपणाचा भाग मुळींच नव्हता. भुतांखेतांवर लहानपणीहि माझा विश्वास नसे; व स्वतः पुराण कीर्तन ऐकण्याचा मोठा नादी होतों तरी देवादिकांच्या गोष्टींवर शब्दप्रामाण्यानें मी कधींहि विश्वास ठेवला नाहीं. मला तो इतिहासाचाच एक भाग असे वाटे. पुराणादिकांत अद्भुतरम्य गोष्टी ऐकावयाला मिळतात म्हणून त्यांची गोडी वाटे. आणि कीर्तनांत वक्तृत्व, रसिकपणा, गायन, इत्यादि गोष्टीच मला चित्ताकर्षक वाटत. घरीं सोवळें नेसून जेवावयास बसण्याचा परिपाठ दहा वीस वर्षांपूर्वीपर्यंत होता. परंतु तो सहजासहजीं पाळण्याचा शिष्टाचार इतकेंच त्यावद्दल वाटे. याची परीक्षा एकदां सहज झाली. इंग्रजी सहाव्या इयत्तेंत असतांना मी दिवाळीकरितां मोडनिंब्यास गेलों. तेव्हां वाटेंत बंधूंकडे डेक्कन कॉलेजांत एक जेवण पडलें. त्या दिवशी ओवळ्यानें जेवावयास बसण्याचा पहिला प्रसंग आला; व मी खरा धर्मनिष्ठ असतों तर मुकटा मिळवून किंवा ओलें वाळवून नेसून बसलो असतों. पण तसें तर कांहीं केलेंच नाहीं. पण ओवळ्यानें जेवावयास बसतांना मोठासा धक्काहि मनाला बसला नाहीं असें स्मरतें. पुढें त्याच डेक्कन कॉलेजांत १८९१ सालीं होतों तेव्हांहि कांहीं दिवस मी सोवळें नेसून जेवावयास बसें. पण त्याचें कारण आमच्या क्लबांतील पुष्कळ लोक, हट्टानेंच सोवळें नेसून बसत. त्याला 'सोवळ्यांचा क्लब' असें नांवच मिळालें होतें. पण मीचसा काय रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हेहि सोवळें नेसून जेवावयास बसत, हे कोणी वाचलें ऐकलें म्हणजे आज त्याला कितीतरी आश्चर्य वाटेल! तात्पर्य, पुण्यापापाचा कांहीं विचार मनांत नसतां धार्मिक या सदराखालीं पडणारीं कृत्यें मी पूर्वी करीत होतों व आज करतोंहि. पण तीं व्यक्तिदृष्ट्या पारलौकिक लाभाच्या हेतूनें मुळींच नसून, त्यावरून समाजांत आपण कोणत्या सांस्कृतिक पद्धतीनें वागावें याविषयीच्या माझ्या मतांचेंच फक्त अनुमान त्यावरून होऊं शकेल.

पण त्यांतल्या त्यांत समाजाला न दुखविण्यापेक्षांहि घरच्या मंडळींना म्हणजे पूर्वी वडील-मातोश्रींना व हल्लीं कुटुंबाला वाईट वाटूं देऊं नये हेंच माझें मुख्य धोरण असतें. मी करतों या धर्मकृत्यांत कांहीं बौद्धिक अप्रामाणिकपणा आहे असें मात्र मला मुळींच वाटत नाहीं. इतकाच माझ्या व इतर कांहीं लोकांत फरक



१९३८ सालच्या डिसेंबरांत घेतलेले केळकर कुटुंबीयांचें छायाचित्र

( पृ. ९४४ )

असेल. कांहीं कांहीं निष्ठावंत सुधारक असे पहातों कीं त्यांना अशा प्रकारचें आचरण करणें म्हणजे तो अप्रामाणिकपणा वाटतो. पण धार्मिक स्वरूपाच्या कृत्यांतहि माझी पारलौकिक कल्पना नसून केवळ सामाजिक कल्पनाच आहे असें म्हटल्यावर अप्रामाणिकपणा उरतो असें मला वाटत नाहीं. आतां ही गोष्ट खरी कीं, मी वयांत येण्यापूर्वी माझे वडील मातोश्री निवर्तलेली असती, किंवा मी विधुर असतों, किंवा माझ्या कुटुंबाची वृत्ति धार्मिक आचारविचारांत आहे तितकी सात्विक आग्रहाची नसती, तर कदाचित् हल्लींच्यापैकी कांहीं धार्मिक कृत्यें मी केलीं नसतीं. परंतु त्याचा अर्थ इतकाच कीं, सामाजिक किंवा कौटुंबिक वर्तनांत दुसऱ्याचें मन संभाळणें किंवा न दुखविणें याविषयीं हल्लीं आहे त्यापेक्षां कांहीं वेगळ्या प्रकारची परिस्थिति माझी असती तर, तिला अनुसरून योग्य असें मी वागलों असतों. आणि या गोष्टी एका बाजूनें जशा धार्मिक प्रवृत्ति नसणाऱ्या आम्हाला दुसऱ्याकरितां कराव्याशा वाटतात, तशाच धार्मिक प्रवृत्तींच्या माणसांनाहि त्याच विवेकामुळें नवीन लोकांना सोईच्या सवलती द्याव्या असेहि वाटतें.

उदाहरणार्थ, माझे श्राद्धपक्ष मुलानीं उद्यां न केलें या कल्पनेनें मला मुळींच वाईट वाटणार नाहीं. आणि मी पूर्वी १९१९ सालीं विलायतेस जातांना मृत्युपत्रांत असें स्पष्ट लिहिलेंहि होतें कीं, मुलांनीं माझे श्राद्धपक्ष न केलें तरी चालेल. याच्या उलट माझ्या वडिलांनीहि आम्हा त्रिवर्ग बंधूंना असें सांगितलें होतें कीं "तुम्ही जरी काशीयात्रा वगैरे केलीत तरी गयेला आमच्याकरितां पिण्डदान करण्याचें कारण नाहीं." याचें मर्म असें होतें. धार्मिक समजल्या जाणाऱ्या या कृत्यावर आमची श्रद्धा नाहीं हें जसें त्यांना माहीत होतें, तसेंच त्या क्षेत्रीं पूर्वी स्वतः ते गेले असतां त्यांना जो अनुभव आला तो इतका उद्वेगकारक होता कीं, त्यांची असेल नसेल ती श्रद्धा त्या विधिपुरती तरी त्या अनुभवानें घालविली. ते गयेला गेले व भाविकपणानें शक्त्यनुसार दक्षणा देण्याचें गयावळाला त्यांनीं कबूल केलें. पण त्या मूर्खानें फुलाच्या माळेनें जे त्यांचे एकदां हात बांधले ते कांहीं केल्या तो सोडीच ना; व बेसुमार दक्षणा मागूं लागला. तेव्हां वडिलांची धर्मश्रद्धा कसोटीला लागण्याचा प्रसंग आला. त्यांनीं अखेर विनवण्या करून व कांहीं थोडी अधिक दक्षणा देऊन माळेंतून हात कसेतरी सोडवून घेतले. पण परत आल्यावर ते म्हणत कीं, "गयावळाचा लोभीपणा पाहून फुलांची माळ ताडकन् तोडून टाकावी असेंहि एकवेळ मनाला वाटलें!" आणि याला उद्देशूनच

त्यांनीं आम्हाला सांगितलें कीं, "आम्ही आमच्या वडिलांकरितां पिण्डदान केले तेंच पुरें. तुम्हाला मात्र आमच्या पिण्डदानाची पावती आम्ही उभयतांनीं दिली आहे. आमच्यावरील प्रेमामुळेंहि तुम्ही तें करूं नये."

या गोष्टीवरूनहि धार्मिक आचाराच्या खऱ्या हेतूसंबंधानें वर जें सांगितलें तेंच सिद्ध होऊं पहातें. म्हणजे आमच्यापेक्षां आमची वरची पिढी जरी अधिक "धर्मनिष्ठ" होती तरी, ते देखील कांहीं गोष्टी पारलौकिक लाभापेक्षांहि त्यांच्या पिढीला व काळाला साजेल अशा सामाजिक धोरणानेच करीत होते. म्हणजे त्यांना ही गोष्ट कळत होती कीं, त्यांच्या पिढीचा मनुष्य गयेला गेला असतां त्यानें पिंडदान केले नाहीं असे प्रगट झाल्यानें जितका कमीपणा लोकदृष्टीनें त्यांना आला असता तितका पुढच्या पिढीला येणें शक्य नाहीं.

त्यांच्या आमच्या पिढींत फरक पडण्याचें आणखी एक कारण असें कीं, अभ्यासाचें व वाचनाचें आमचें क्षेत्र अधिक. ज्याला विज्ञान किंवा वस्तुज्ञान असें म्हणतां येईल तें आमचें पुष्कळच वाढलें आहे. यामुळें कार्यकारण विवेकाची आमची दृष्टि त्यांच्याहून अधिक खोल; व ही दृष्टि ज्या मानानें अधिक खोल असते, त्या मानानें लौकिकांत जिला श्रद्धा असें म्हणतात तीहि कमी असते. पण श्रद्धा ही कांहीं एकच स्वरूपाची नसते. आणि ती परिस्थितिप्रमाणें बदलूंहि शकते. श्रद्धान्वित मनानें केलेल्या गोष्टीपासून होणारें मनाचें समाधान किंवा सुखशांति तीच; पण एकाला ज्या गोष्टी केल्यापासून हें समाधान मिळेल त्याच गोष्टी केल्यापासून दुसऱ्याला तेंच समाधान मिळेल असें नाहीं. तें निराळ्या गोष्टी करूनहि मिळेल.

धर्माचीं मुख्य तीन अंगें (१) परमात्मस्वरूपाचा विचार, (२) आत्मस्वरूपाचा विचार आणि (३) परमात्मा व जीवात्मा यांचा संबंध काय असेल या विषयींचा विचार. परमात्मा व जीवात्मा यांचें स्वरूप ओळखणें याचें नांव ज्ञान. पण तें ज्ञान हा बुद्धीचाच विषय होय. आणि तें कितीहि खोल व सप्रमाण झालें तरी जीवात्म्यानें परमात्म्याशीं कोणता संबंध मानावा याचें उत्तर निव्वळ बौद्धिक ज्ञानानें मिळूं शकत नाही. तें उत्तर आत्मानुभवानेंच मिळतें आणि आत्मानुभव याचा अर्थ, योगानें उत्पन्न होणारी समाधि अथवा व्यवहार करीत असतांहि, गीतेंत सांगितल्याप्रमाणें, कर्मफलाची आसक्ति न धरतां प्रतिष्ठितप्रज्ञ किंवा जीवन्मुक्त यासारखें आचरण करणें याहून दुसरा नाहीं. आतां योगारूढ स्थिति ही

प्रत्यक्ष व्यवहार करणाऱ्या मनुष्यांत उघड दिसून येणारी नाहीं. पण स्थितप्रज्ञ हा देखील योगाखेरीज इतर रीतींनें जागती समाधि लावूं शकतो. ती समाधि शुद्ध आनंदापासून मिळते; व हा आनंद व्यवहारांतील माणसाला अनेक रीतींनें मिळूं शकतो. कोणाला तो सगुण उपासनेचे विधि करीत बसण्यांत लाभतो. कोणाला जपजाप्य किंवा नामसंकीर्तन करण्यांत लाभतो. कोणाला धार्मिक स्वरूपाचें वाचन करीत असतां लाभतो. कोणाला ज्यास धार्मिक वाङ्मय असें म्हणतां येणार नाहीं, पण जें उच्च दर्जाचें प्रतिभासंपन्न काव्यात्मक किंवा तत्त्वज्ञानात्मक वाङ्मय असें म्हणतां येतें, तें वाचण्यांत व लिहिण्यांत लाभतो. कोणाला भौतिक शास्त्राच्या विचारांत व संशोधनांत गढून गेल्यानें लाभतो. कोणाला शुद्ध कलोपासनेनें लाभतो. कोणाला निस्स्वार्थी परोपकारी कामांत गढून गेल्यानें लाभतो. तात्पर्य, या निरनिराळ्या मार्गांनीं मिळणाऱ्या आनंदाचें उत्कट स्वरूप ही एक समाधीच होय. आणि ती निर्विकल्प नसून सविकल्प असली तरी, व अगदीं जागतेपणी तिचा अनुभव मनुष्य घेत असला तरी, ती स्थितप्रज्ञतेइतकीच नमुनेदार किंवा उत्तम स्थिति होय. म्हणून वरीलपैकीं किंवा त्यासारख्या इतर कोणत्याहि प्रकारानें श्रद्धानन्द प्राप्त करून घेणारा मनुष्य खरोखर धर्मनिष्ठच म्हटला पाहिजे.

ही गोष्ट लक्षांत न घेतां केवळ परंपरागत पद्धतीचें धर्माचरण न करणाराचर सामान्य लोक नास्तिकपणाचा आरोप करतात. पण खरा नास्तिक असा मनुष्य क्वचितच आढळेल. कारण दृश्य कारणामागें कारण, फिरून त्या कारणामागें कारण, अशा रीतींनें कारणपरंपरेची सांखळी लागलेली आहे, व ती ज्ञानाच्या किंवा बुद्धीच्या टप्प्यापलीकडे जाऊं शकते हें ज्याला कळत नाहीं, किंवा हें जो कबूल करीत नाहीं, असा मनुष्य बहुधा विराळाच. वास्तविक ब्रह्मज्ञानाची उपासना फार थोडक्यांत संपणारी असते; पण विज्ञानाची उपासना मात्र मनुष्याची कधींहि संपणारी नाहीं. जीवात्मा व परमात्मा हे अन्तिम स्थितींत एकरूप आहेत हा 'सिद्धांत' बुद्धिगम्य असून त्याची प्रचीति ही गोष्ट बहुधा एकच व ठराविक आहे. परंतु तीच गोष्ट विज्ञानाच्या अभ्यासांत शेंकडो माणसांना शेंकडो निरनिराळ्या रीतींनीं करतां येते. विज्ञानाच्या संशोधनांत कोणत्याहि बाजूनें शिरलें तरी सर्वान्तर्यामी मूलाधार अशी एकच शक्ति आहे हें निरनिराळ्या मार्गांनीं अनुभवितां येतें. विज्ञानाचा उपासक हा ज्ञानाच्या उपासकाइतकाच आस्तिक्य बुद्धीचा असतो. आणि व्यवहाराच्या दृष्टीनें पाहिलें तर ज्ञान-विज्ञानांतून व्यवहारांत शिरण्याचा जो

एक पूल असतो तो नीतिमार्ग हा होय, व या नीतिमार्गाचींहि लक्षणें अनेक प्रकारचीं आहेत. तात्पर्य, नास्तिक म्हणणें ही एकप्रकारें अविचारानें दिलेली शिवी ठरत असून, जुन्या परंपरेला यत्किंचित् सोडून वागणाऱ्या मनुष्याच्या नशिबी ती शिवी खाण्याचे असमर्थनीय अन्याय्य असे पुष्कळ प्रसंग येतात.

वर जो विचार मी कांहींसा विस्तारानें सांगितला तो सुजाण व समंजस अशा जुन्या पद्धतीच्या लोकांनाहि पटूं शकतो, हें मी अनेक लोकांसंबंधानें पाहिलें आहे; व खुद्द माझे वडीलहि त्यांपैकीच एक होते. स्वतः ते जरी जुन्या मताचे अभिमानी व जुन्या रूढ सांप्रदायाचे अनुयायी असले तरी त्यांना हें आमच्या संगतीत दिसून येई की, तुकाराम रामदास यांचें ग्रंथ वाचणें हें जर धर्माचरणांत मोडूं शकतें, तर त्या दर्जाचें इतर वाङ्मयहि नव्या पिढीतील कांहीं लोक नित्य वाचणारे व त्याचे मनन करणारे असतात तेव्हां ते वाचनहि धर्माचरणच मानलें पाहिजे. इंग्रजी शिकणारांचें इतकेंच झालें की त्यांच्या वाङ्मय वाचनाचें क्षेत्र वाढले; पण त्यामुळें त्यांची खरी धर्मबुद्धि कमी होण्याचें कांही कारण नाहीं. आपल्या हिंदु पद्धतीच्या वेदान्ताची कमजास्त बरोबरी करणारे इतर भाषेंतहि अध्यात्मिक तत्वज्ञान असूं शकतें. कारण आत्मा हा जसा जगांत एकट्या हिंदूलाच दिलेला नाहीं, त्याप्रमाणें बुद्धि व अध्यात्मिक भावना ही देखील एकट्या हिंदूलाच दिलेली नाही. अर्थात् देश, भाषा, सामाजिक चालीरीति या निरनिराळ्या झाल्या तरीहि आस्तिक्य बुद्धि व धार्मिक वृत्ति यांची जात कोठेहि एकाच दर्जाची असणार ही गोष्ट माझे वडील कबूल करीत. केवळ इंग्रजी शिकला म्हणून मनुष्य नास्तिक होतो ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. इंग्रजी न शिकलेल्या, किंबहुना कोणत्याहि शिक्षणाचा दोषी ( ! ) स्पर्श न झालेल्या, लोकांतहि अधार्मिक पापात्मे आढळतात, त्याचप्रमाणे अगदीं इंग्रजी शिकलेल्या व वरून थेट इंग्रजी पोषाख पेहराव करणाऱ्या लोकांमध्येहि सात्विक धर्मशील वृत्तीचे—किंबहुना आपल्या घरांत आल्यावर जुन्या पद्धतीचे—धर्माचरण करणारे लोक आढळतात ही गोष्ट माझे वडील प्रांजलपणें कबूल करीत असत. धार्मिकपणाची कांहीं रूढ कल्पना संस्कारानें व संवयीनें बनत असल्यानें, मी दिवसांतून तास अर्धा तास कांहीं स्नानसंध्या कांहीं जप-जाप्य करण्यांत घालविला असता तर त्यांना अधिक बरें वाटलें असतें ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. पण आमची एकंदर

वागणूक पाहून व आमच्या कामाचा व्याप पाहून ते आपल्या मनानेच आम्हाला पुष्कळशी सूट देत असत.

उलट आम्हीहि घरीं हिंदुपद्धतीनें करण्याचे संस्कार, विधि, नित्यनैमित्तिक कर्मे करीत होतों. त्यांत कंटाळा किंवा हयगय फारशी दाखविली नाहीं. आणि एवढ्यानेहि त्यांचें बहुधा समाधान होत असे. वडिलांच्या हयातींत एक दोन प्रसंग मात्र असे आले की तेथे केवळ "तुमच्या समाधानाकरितां अमुक एक गोष्ट करतो, माझा त्या गोष्टीवर विश्वास आहे म्हणून करीत नाही," असे त्यांना मला सांगावे लागलें. रावबहादूर वामनराव कोल्हटकर यांना त्यांच्या पुनर्विवाहित पत्नीपासून झालेल्या मुलीचा विवाह सन १९०५ साली रा. घारपुरे यांजबरोबर मळेकरांच्या वाड्यांत झाला. त्याच्या पानसुपारीला मी गेलों होतों. ही गोष्ट वडिलांना माहीत होती. पण त्या गोष्टीला त्यांनीं प्रथम कोणचीहि हरकत घेतली नाहीं. परंतु पुढें पुण्यांतील एका वर्तमानपत्रांत पानसुपारीला गेलेल्या गृहस्थांत माझे नांव 'प्रसिद्ध' झाले; व पूर्वी पंचहौद मिशनमध्यें चहा घेतल्याबद्दल पुण्यांतील बेचाळीस ब्राह्मणांवर ग्रामण्य झालें तसाच कांहीं प्रकार पुनः होणार असें चिन्ह दिसूं लागलें. याच सुमारास रामनवमी आली. नित्याप्रमाणें आमच्या घरीं ब्राह्मणांचें म्हणणें वसंतपूजा करण्याचें ठरून आमचे उपाध्ये कृष्णभट जोगळेकर यांनी बारा-चौदा ब्राह्मणांना आमंत्रणे दिलीं व घरीं येऊन वसंतपूजेची सर्व तयारी केली. परंतु इतक्यांत एकदम ब्राह्मण मंडळीनी कट करून ठरविलें कीं, मी पुनर्विवाहित गृहस्थाच्या घरीं पानसुपारीला गेलो त्याअर्थी प्रायश्चित घेईपर्यंत मजवर बहिष्कार घालावयाचा, व माझ्या घरी कोणतेहि धर्मकृत्य करावयास यावयाचें नाही. वसंतपूजेची वेळ टळून तास दीडतास झाला तरी ब्राह्मण येईनात. तेव्हां हें प्रकरण काय आहे अशी उपाध्याने चौकशी केली. तेव्हां त्याला या बहिष्काराची बातमी प्रथम लागली. ती ऐकून वडिलांना अतिशय वाईट वाटलें, व ते सचिंत होऊन देवापुढ बसले. त्यांना वाईट वाटलेलें पाहून मलाहि वाईट वाटलें. कारण रामनवमीच्या दिवशी होणारें वेदपठण घरींमाझ्या जन्मापासून कधी चुकलें नाहीं, ते माझ्यामुळे आज चुकलें ! अर्थात् त्यांना वाईट वाटण्याला मीच कारण-झालों. तेव्हां मी त्यांना म्हणालों कीं "मी फिरून यत्न करून पहातों. वेदपठणाला ब्राह्मण माझ्या इतर प्रयत्नानें आले तर बरेंच झालें. पण न आले तर उद्यां सकाळीं प्रायश्चित्त घेईन व संध्याकाळी वसंतपूजा व वेदपठण करवीन. आजचें

वेदपठण फार तर उद्यां होईल इतकेंच. पण त्याची तुम्हांला चिंता नको." मग उपाध्यायाच्या कानाशीं लागून मी सांगितलें कीं, "भटजी मागतील तितकी दक्षणा देण्याला मी तयार आहे. येतात कां पहा." तेव्हां त्यांनीं ती खटपट करून पाहिली. पण ब्राह्मण येईनात. तेव्हां दुसरें दिवशीं सकाळीं स्नानानंतर मी पंचगव्याचीं दोन आचमनें घेतलीं, एक जानवें मंत्रून घातलें, व उपाध्यायाला चार आणे दक्षणा दिली. अशा रीतीनें माझें प्रायश्चित्त झाल्याबरोबर संध्याकाळीं नित्याप्रमाणें वेदपठण व वसंतपूजा पार पडली व वडिलांना आनंद झाला. मग त्यांनीं सहज विनोदानें म्हटलें, "तात्या, हा एक प्रसंग टळला. पण तुझ्यावर असले प्रसंग पुनः येणार हे मला अगदीं उघड दिसतें. तेव्हां पुढचा विचार कसा?" तेव्हां मीहि त्यांना स्पष्टच सांगितलें कीं, "आतां करावयाचें काय तें ठरलेंच आहे. असल्या पानसुपारीचे निमंत्रण पुनः आलें तर पुनः जाईन. आणि पुनः असेंच प्रायश्चित्त घेईन. मी परवां पानसुपारीला गेलो तो जाणून बुजून गेलों. तें पाप असेल तर माझ्या हातून अजाणता झालेलें नव्हतें. हें माहीत असतां पंचगव्याचीं दोन आचमनें व संकल्पोच्चारपूर्वक चार आणे दक्षणा-दान येवढ्यानें जर वेदोनारायण मला पावन करून घेण्याची कृपा करतात तर आतां कसलीच अडचण उरली नाही!" या माझ्या युक्तिवादाला त्यांनी हरकत घेतली नाही. याचा अर्थ अशा पानसुपारीला जाणें हें कांहीं मोठें पाप आहे असें त्यांनाहि वाटत नव्हतें. तर ज्या समाजांत आपण वावरतो त्याला जी गोष्ट अजून पटत नसेल ती न करणें हा जरी उत्तम मार्ग असला तरी, ती करून सामान्य प्रायश्चित्त घेणें हाहि चालण्यासारखा एक मार्ग आहे अशी कबुली त्यांनीं दिली.

प्रायश्चित्ताहून अधिक महत्त्वाच्या विषयांतहि ते अशीच सारासार बुद्धि चालवीत. अर्थात् स्वतःच्या आचारांत फरक करण्याच्या बाबतींत नव्हे, तर पुढच्या पिढीला आचार विचारांची सवलत देण्याच्या कामीं. त्यांच्या दिवसांत महाराष्ट्रांत किंबहुना सर्व हिंदुस्थानांत अकालीं तरुण मुलें मृत्यु पावल्यामुळें हजारो बालविधवा झाल्या. ती गोष्ट एका प्रसंगानें घरीं आमच्या बोलण्यांत निघाली, व या अभागी अज्ञ मुलींचा जन्म कसा जावयाचा अशी चर्चा चालली. तेव्हां माझ्या वडीलांनीं प्रांजलपणें कबुली दिली कीं "हिंदुधर्म झाला तरी अशा बालविधवांना त्यानें पुनर्विवाहाची परवानगी देण्यांत पाप नाहीं." मात्र ते आणखी म्हणाले कीं, "यांतील योग्यायोग्य काय हें तात्त्विक विचारांत मी कबूल करीत असलो

तरी, उद्या कोणी अशा कामीं माझी लेखी संमति मागेल तर ती मी देणार नाहीं; पण इतर कोणी ती गोष्ट केली करविली तर मी त्याला नांवे ठेवणार नाहीं इतकेंच काय तें. हातून गोष्टी प्रत्यक्ष होण्याच्या संबंधानें दर पिढींतील सनातनी म्हणविणाऱ्या लोकांच्या आचरणाच्या कांहीं मर्यादा ठरून जातात. त्यांचें उल्लंघन त्यांच्या हातून होऊं शकत नाहीं. पण पुढील पिढीची मर्यादा आमच्यापेक्षां चार पावलें पुढें जाईल; व तितकें पुढें जातांना जुन्या मर्यादांचें उल्लंघन झालें तर तें अयोग्य ठरणार नाहीं. "

त्यावेळीं म्हणजे १९०६ च्या पूर्वी अस्पृश्यतानिवारण वगैरे गोष्टींना आज आलें आहे इतकें महत्व आलेलें नव्हतें. पण मला असें वाटतें कीं, सार्वजनिक स्थळीं व प्रसंगीं अस्पृश्यता मानण्याचें कारण नाहीं असा तात्विक निर्णय माझ्या वडिलांनींहि दिला असता. कारण, त्यांच्या हातून आगगाडीचा प्रवास घडण्याचें प्रसंग येत. पण आगगाडींतून उतरल्याबरोबर स्नान करण्याची त्यांचीहि वहिवाट हळू हळू बंद पडत चालली होती.

आमच्या कुटुंबांत ब्राह्मण पोटजातीसंबंधानें नवी रूढि पाडण्याचा प्रसंग त्यांच्या मृत्यूनंतर चार पांच वर्षांनीं आला. तो पूर्वीच येता तर त्यांनीं काय मत दिलें असतें हें निश्चितपणें सांगवत नाहीं. मात्र तें सांगावयाचें तर त्याला एक गमक आहे. तें असें कीं जो प्रसंग वडिलांच्या हयातींत आला नाहीं तो मातोश्रीच्या हयातींत आला. आणि तो प्रसंग म्हणजे माझ्या मुलीच्या विवाहाचा. तो असा. सातारा येथील डॉ. कुशाभाऊ देशपांडे यांच्या घराचा व आमच्या घराचा ऋणानुबंध १८९० पासूनचा—म्हणजे माझे वडील बंधु नाना हे साताऱ्यास नोकरीवर गेले तेव्हांपासूनचा—होता. ते व आम्ही साताऱ्यास पुष्कळ वर्षे एका आळींत व कांहीं वर्षे तर अगदीं शेजारीं शेजारीं राहात होतों. यामुळें त्यांच्या घरच्या रहाणीचा आम्हाला अन्तर्बाह्य चांगलाच परिचय असे. तो असा कीं देशपांडे मंडळी देशस्थ असतांहि, स्वच्छता टापटीप, गृहव्यवस्था, लहानथोरांची वागणूक, इत्यादि गोष्टींत त्यांची अस्सल कोंकणस्थावर ताण असे. आणि वरवरच्या कांहीं बाबतींत त्यांचीं मतें सुधारकी पद्धतीचीं दिसलीं तरी नित्यनैमित्तिक अशा सर्व धार्मिक विषयांत त्यांचा आचार अगदीं सनातनी कर्मठ लोकांसारखा होता. आम्ही सातारा सोडून पुण्यास आलों तरी त्यांचा आमचा ऋणानुबंध तुटला नव्हता. पुढें १९१० च्या सुमारास त्यांच्या दोघां मुलग्यांचीं लग्नें करण्याची वेळ आली तेव्हां

स्वतः डॉ. कुशाभाऊ व त्यांचे वडील बंधु, पेन्शनर डेप्युटी कलेक्टर रावबहादुर नानासाहेब देशपांडे, यांना आमची आठवण झाली. आणि जमल्यास आमच्या घराण्याशीं विवाहसंबंधानें नवें नातें जोडावें अशी इच्छा त्यांना होऊन त्यांनीं मला आपला विचार कळविला. मला स्वतःला त्यांचें घराणें व खुद्द लग्न होणारा मुलगा हीं निरपवाद अशीं वाटत होतीं. किंबहुना स्थळाच्या दृष्टीनेंहि हें स्थळ चांगलें व जमल्यास हातचें घालवूं नये असें वाटण्यासारखें होतें. ब्राह्मणांच्या पोटजातीमध्ये विवाहसंबंध घडण्यास हरकत नाहीं, किंबहुना ते घडून येण्यास सर्रास सुरुवात झाली पाहिजे, अशाच मताचा मी होतों. आणि ही गोष्ट माहीत असल्यामुळेंच समानमनोधर्म जाणून देशपांडेबधूंनी मला वरील सूचना केली. अर्थात् माझ्यापुरते होय म्हणण्याला मला कांहींच आडकाठी नव्हती. पण नवीं मतें असलीं तरी समाजाप्रमाणें घरच्या कुटुंबांतील माणसांवरहि तीं जुलुमानें लादूं नयेत असें माझें धोरण असल्यामुळें, मी त्यांना सांगितलें कीं आमची मातोश्री या गोष्टीला संमति देईल तर ही गोष्ट आपण आनंदानें करूं. पण ही गोष्ट इतकी नाजूक होती कीं, देशपांडे हे पुण्यास मातोश्रीला नेहमींप्रमाणें भेटून गेले तरी ती त्यांना स्वतःला काढवली नाहीं. मुलाच्या बापानें मुलीला मागणी घालणें ही गोष्ट आपणांमध्यें कशीशीच वाटणार हें एक. पण ती विशेष अडचणीची नव्हती. खरी अडचण देशस्थकोंकणस्थांचा विवाह समाजांत रूढ नसलेला आपण करणार याविषयींची होती. म्हणून ती गोष्ट ते मजवरच सोंपवून साताऱ्यास परत गेले.

पुढें ही गोष्ट भीत भीत मी आई जवळ काढली; व तिला शेवटीं सरळ सवाल असा टाकला कीं "देशस्थ-कोंकणस्थ यांजमध्ये रूढ नसलेला विवाहसंबंध आपण करणार या एका गोष्टी शिवाय दुसरें कोणचेंहि यांत न्यून किंवा वावगें नाहीं. परस्पर सर्व दृष्टींनीं आम्ही अनुरूपच आहोंत. तेव्हां जी रूढि नाहीं ती आपण कशी प्रथम पाडावी एवढ्याकरितांच देशपांडे बंधूंची ही सूचना आपण अमान्य करावी काय!" तेव्हां प्रथम मातोश्रीनें "या कामीं खरें शास्त्र विरुद्ध आहे कीं काय!" असा प्रश्न मला केला; व "तें नाहीं" असें मी निश्चयात्मक सांगितल्यावर विचाराकरितां एक दिवस तिनें मागून घेतला. त्या दिवसांत माझी आई व माझें कुटुंब या दोघींनीं आपसांत या गोष्टीचा विचार केला. आणि दोघीहि सर्वस्वी सनातनी मताच्याच होत्या. तथापि दुसरें दिवशीं त्यांनीं आपण होऊन मला सांगितलें कीं,

"या विवाहाला आमची हरकत नाहीं. रूढि नाहीं एवढ्याकरितां आपण ही गोष्ट सोडून देण्याचें कारण नाहीं." अर्थात इतर सर्व बाजूंनीं हा विवाह श्रेयस्कर असें दिसून आलें म्हणूनच त्यांनीं ही संमति दिली ही गोष्ट अगदीं खरी. आणि इतर कोणत्याहि दृष्टीनें हा विवाह श्रेयस्कर नाहीं असें मला वाटलें असतें तर, केवळ या सुधारणेचा भोक्ता म्हणून ती घडवून आणण्याकरितां एरवींचें न्यून किंवा गौणत्व मी तरी कां पत्करले असते? कारण मुलीचें कल्याण ही तर गोष्ट पहिली. ती साधत असेल तरच मग हें करावयाचें. म्हणजे सुधारणा घडवून आणण्याकरितां हें लग्न मला करावयाचें नसून, तें केल्यानें सुधारकी आचरण होते—रूढ नसलेली गोष्ट आपण प्रथम रूढ करतो—या दोषामुळें मात्र तें मोडावयास मी तयार नव्हतों. पण शिकल्या सवरलेल्या, नवीन मताच्या, व सामाजिक रूढि मोडण्याची जबाबदारी पत्करण्याच्या स्थितींत असणाऱ्या, माझी ही गोष्ट झाली. आई व माझें कुटुंब यांची स्थिति तशी नव्हती. आणि म्हणूनच त्यांनीं संमति दिली यांत माझ्यापेक्षांहि त्यांनींच धैर्य अधिक दाखविलें असें म्हणणें प्राप्त होतें. मी ही गोष्ट करीन तर चार लोक मला बरेंच म्हणतील; किंबहुना माझ्याशी सहानुभूति प्रगट करून माझी वाहवाहि करतील. पण व्यवहारांत मातोश्री व कुटुंब यांचा नित्य ज्या वर्गांतील लोकांशीं संबंध यावयाचा, ते म्हणजे जुन्या मताच्या अशिक्षित शेजारणी व नात्यागोत्याच्या बायका किंवा ऋणानुबंधी भट भिक्षुक वगैरे अशांकडून नांवें ठेवून घेण्याचाच प्रसंग त्यांना होता. पण त्यांत त्यांनी मानसिक धैर्य दाखविलें व आपला विवेक कसोटीला उतरविला.

पुढें आम्ही साताऱ्यास लग्नाला गेलों तेव्हां इकडे पुण्यांतील आमच्या उपाध्याला घेरून ब्रह्मवृंदांनीं मजवर ग्रामण्य उभें करण्याचा विचार केला. पण केळकर हे केसरीचे संपादक आहेत, व केसरी हें सनातनी पक्षाचें मुखपत्र आहे, तेव्हां केळकरांनीं केलें हे सशास्त्र असलेंच पाहिजे, अशी कल्पना कांहींनीं चालविली. पण इतर कांहींनीं पुण्यांतील शास्त्रीलोकांचें मतच घेतलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, धर्मशास्त्रांत ब्राह्मण हा एकच अखंड वर्ण मानला असून त्यांत कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, हा भेद कोठेंच मानलेला किंवा उल्लेखिलेलाहि नाहीं. यामुळें ग्रामण्याची गोष्ट निघाली तशीच ती संपलीहि. आणि आम्ही पुण्यास परत आल्यावर आमच्या उपाध्यांनीं ही सर्व हकीकत आम्हाला हंसत हंसत सांगितली,

तेव्हां मातोश्री व कुटुंब यांना आपण केलें तें अयोग्य केलें नाहीं अशी खात्री स्वतंत्र रीतीनें पटल्यामुळें फार आनंद झाला. आम्ही केली ही गोष्ट बरी नाहीं असें प्रत्यक्ष अप्रत्यक्ष म्हणणारे सुशिक्षित लोकांपैकींच कांहीं निघाले ! पण ते कांहीं ग्रामण्य करणारे नव्हते; व त्यांच्या नापसंतीला आम्ही जुमानलेंहि नसतें. मुद्याची गोष्ट इतकीच की मी खरोखर कोणत्याहि प्रकारें जुलूम त्रागा किंवा आग्रहहि न करतां, घरच्या दोघी सनातनी मताच्या जबाबदार स्त्रियांनीं या सामाजिक सुधारणेला आनंदानें संमति दिली. यावरून या वेळच्या सामाजिक स्थितीचें जसें दिग्दर्शन होतें, तसेंच कोणाचें मन न दुखवितां सामाजिक व धार्मिक बाबतींत मनुष्य वागला असतां त्याला योग्य ती सुधारणा घडवून आणण्याला फारशी हरकत पडत नाहीं हेहि सिद्ध झालें.

असो. अस्पृश्यतानिवारणसंबंधानें व अनिष्ट जात्यभिमानासंबंधानें माझीं मतें प्रसिद्धच आहेत. तथापि, या विषयीं कांही मुद्देसूद हकीकत व पत्रें देतों—

ता. ५ फेब्रुवारी १९३३ रोजी महात्मा गांधी यांनीं येरवडा सेंट्रल जेल मधून मला खालील पत्र पाठविलें :—

" मला माझ्या अस्पृश्यतेविरुद्ध काढलेल्या मोहिमेंत तुमची सक्रिय मदत अवश्य हवी ती किती व कोणत्या तऱ्हेनें देतां येईल तें तुमचें तुम्ही ठरवा. ही भिक्षा मी पदर पसरून मागत आहे. ती घालाच. तुम्हास सवड सांपडेल तेव्हां मला आगाऊ कळवून भेटावयास या. बुधवार, गुरुवार व रविवार खेरीज केव्हांहि आलात तरी चालेल. लोकरच 'हरिजन' नांवाचें इंग्रजी साप्ताहिक काढीत आहे. दर आठवड्यास बुधवार व गुरुवारचे सर्व दिवस त्या कामांत जातील व रविवार जेल अधिकाऱ्यांना गैरसोयीचा आहे. 'हरिजन'करितां तुमचा संदेश पाठविलात तर फार बरे होईल. लंडनच्या प्रवासानें तुमची प्रकृति सुधारली आहे असें कळतें."

महात्मा गांधी यांच्या बोलावण्यावरून पुढील मंगळवारीं मी येरवड्याच्या तुरुंगांत महात्माजींची गांठ घेतली. उभयतांचें सुमारें दीड तास संभाषण झालें. त्यांत मंदिरप्रवेशाच्या बिलासंबंधानें सर्व बाजूंनीं मोकळ्या मनानें चर्चा झाली. मंदिर-प्रवेशासंबंधानें मी आपली तडजोडीची योजना महात्माजींपुढें मांडली. महात्माजींनीं ही योजना आपणास मान्य असल्याचें सांगितलें. आणि सनातनी लोक ती मान्य करीत असतील तर त्या योजनेनें ( फक्त आंबेडकरादि लोक

वगळून ) सनातनी व प्रागतिक यांचें एकमत होऊन हा प्रश्न सुटेल असेंहि महात्माजींनीं सांगितलें. उलट सार्वजनिक मंदिरांचे ट्रस्टी व मॅनेजर, आपलेंच मत चालवून व लोकमत धिःकारून, अस्पृश्यांना मुळींच मंदिरप्रवेश करूं देणार नाहीं असें म्हणतील तरच त्यांना योग्य मार्गावर आणण्याकरितां कायद्याची मदत घेणें योग्य होईल असें मी आपलें मत सांगितलें. माझी तडजोडीची योजना अशी आहे. ( १ ) देवळाचें जें गर्भागार म्हणजे अंतर्गृह म्हणून असतें त्यांत अस्पृश्यच काय पण स्पृश्यांनाहि प्रवेश करूं देऊं नये. ( २ ) या अंतर्गृहांतील सर्व व्यवस्था व प्रत्यक्ष देवपूजा ही फक्त नियोजित पुजाऱ्यानेंच करावी, व इतरांना फलपुष्प नैवेद्यादि भोग मूर्तीला वाहावयाचे असतील तर ते पुजाऱ्याच्या हाती देऊन त्याजकडून ते वाहवावे. ( ३ ) अंतर्गृहाबाहेर सोईच्या अशा ठिकाणीं एक मर्यादेची खूण उभारण्यांत यावी, आणि स्पृश्य किंवा अस्पृश्य यांनी येथूनच देवदर्शन घ्यावें. यानंतर इतर, पण अर्थात् तुरुंगांत म्हणून राजकारणाशीं संबंध नसलेल्या, अनेक विषयांवर महात्माजींशी माझें संभाषण होऊन ही मुलाखत संपली.

या मुलाखतीनंतर अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशासंबंधीची आपली तडजोड मांडतांना म. गांधी यांनीं ता. ४ मार्चच्या 'हरिजना'मध्यें पुढील विचार प्रदर्शित केले:—

" मंदिरप्रवेशाच्या प्रश्नासंबंधी विचारविनिमय करण्यासाठीं माझी भेट घेण्याची मी न. चिं. केळकर यांना विनंति केली होती; आणि ती मान्य करून माझी भेट घेण्याचें सौजन्य त्यांनीं दाखविलें. मंदिरप्रवेशाच्या बिलासंबंधी त्यांचें काय मत आहे हें जाणण्याची मला उत्कंठा होती. त्यांनीं मला असें सांगितलें की, मंदिरप्रवेशासारखे जे प्रश्न कायद्यानें सोडविण्यासारखे आहेत, ते पुढेंमागें कायदेमंडळांत आणल्याशिवाय गत्यंतर नाहीं. मग त्या प्रश्नाचें स्वरूप धार्मिक असलें तरी कायदेमंडळाशिवाय दुसरा मार्ग नाहीं असे मी पुष्कळ वर्षें मानीत आलों आहे.

" असें फर्माविण्यांत आलें आहे कीं, सार्वजनिक हिंदु देवळांचे निधिप ( ट्रस्टी ) यांनीं हरिजनांना देवळांत येण्याला मज्जाव केलाच पाहिजे. हा कायदा केवळ्याहि लोकमताला मोडून काढतां येणार नाहीं. नवीन कायदा करावा अशी मागणी लोकमताला करतां येईल. पण मंदिरप्रवेशाची परवानगी देणारा कायदा लोकमत स्वतः निर्माण करूं शकणार नाहीं.

"श्री. केळकर यांना श्री. रंगा आय्यर यांनीं आणलेल्या बिलाची जरूरी मान्य असली तरी, अस्पृश्यांचें मंदिरांत प्रत्यक्ष पाऊल पडावयाचें तें सलोख्याच्या तडजोडीनंतरच पडेल असें त्यांचें मत आहे. स्पृश्य हिंदूंना मंदिरप्रवेशाबाबत ज्या अटी लागू असतील नेमक्या त्याच अटींवर हरिजनांनाहि प्रवेश मिळावा, या विषयीं श्री. केळकर हे निःशंक आहेत. पण हरिजनांना अंतर्गृहांत प्रवेश देण्याला लोकमत तयार झालेलें नाहीं असें त्यांना वाटतें. हें जर खरे असेल तर, हरिजनांना प्राप्त न होणाऱ्या हक्कांवर स्पृश्य हिंदूंनीं पाणी सोडावें म्हणून, श्री. केळकर यांची योजना अशी कीं, सर्व सार्वजनिक देवळामध्यें सर्वसामान्य अशी एक मर्यादा घालावी. तिच्या पलीकडे कोणीहि जाऊं नये. फक्त प्रत्यक्ष पूजाविधि करणाऱ्या माणसाला परवानगी असावी. याचा अर्थ असा कीं, ज्या देवळांत सध्या स्पृश्य हिंदु गाभाऱ्यांत प्रवेश करतात व मूर्तीला स्पर्श करतात, त्या देवळांत स्पृश्य लोक हरिजनांना आपल्याबरोबर वरील हक्कांचा उपभोग घेऊं देत नसले तर स्पृश्यांनीच मूर्तिस्पर्शादिक आपल्या चालू हक्कांचा त्याग केला पाहिजे. ही तडजोड प्रामाणिकपणें अमलांत येईल तर तिला माझा कांहींहि विरोध नाहीं असें मी सांगितलें. आपल्या घरांतील अप्रशस्त असा हा कलह त्वरित संपुष्टांत यावा, याहून अधिक आनंद मला दुसऱ्या कशानेंहि होणार नाहीं."

अस्पृश्य समाजाचे एक पुढारी रा. गणपत नारायण कांबळे यांनीं 'दलित-बंधु' पत्राच्या २८।८।३२ च्या अंकांत माझ्या अस्पृश्यतानिवारणाच्या धोरणा-संबंधानें खालील उद्गार काढले आहेतः—

"लोकमान्य टिळक व दे. भ. केळकरांची थोरवी यांतच आहे कीं त्यांनीं सुधारकी थाटाचा, सरकारी साच्याचा, मानभावीपणाचा व अव्यवहार्य सल्ला अस्पृश्योद्धाराच्या बाबतींत कधींहि दिलेला नाहीं. या बाबतींतील लोकमान्यांचें जाहीर मत त्यांच्या आठवणींत प्रसिद्ध झाले आहे. सांगलीच्या महारवाडयांतील भाषणांत लोकमान्यांनीं सर्व जातींच्या अस्पृश्यांना आपापले धंदे सुधारण्याची आग्रहाची विनंति केलेली आहे.

"धार्मिक बाबतींत गणपतीच्या मिरवणुकींत चर्मकार सभेचा गणपति आघाडीला गायकवाड्यांतील गणपतिबरोबर घेऊन स्वकीयपणेंच लोकमान्यांनीं

आपलें मत व्यक्त केलेलें आहे. रोटीव्यवहाराच्या बाबतींत भरमसाट मत त्यांनी कधींच दिलें नाहीं.

"दे. भ. केळकरांनीं लोकमान्यांची परंपरा या बाबतींतहि तंतोतंत कायमची राखली आहे. पर्वती सत्याग्रहाचे वेळीं अस्पृश्यांच्या मागणींचा न्यायीपणा त्यांनीं कबूल करून ब्राह्मणांनाहि गाभाऱ्यांत जाण्याचा आपला हक्क सोडण्याची विनंति केली होती. त्यांनीं सुचविलेला हाच उपाय शेवटीं अवलंबावा लागेल असेंच हिंदुसमाजाची नाडी जाणणारा प्रत्येकजण म्हणेल. अस्पृश्य समाजाला आंत घेणारीं कांहीं देवळें निघतील. पण बहुसंख्यांक देवळांच्या बाबतींत केळकरांचाच तोडगा अवलंबावा लागेल.

"अस्पृश्यतानिवारण्याचें कार्य महाराष्ट्रांत दे. भ. भोपटकर व श्री. माटे मास्तराच्या सहाय्यानें दे. भ. केळकरांनीं जितकें परिणामकारकपणें केलें आहे तितकें डिप्रेस्ड क्लासेस मिशन, समाज समतासंघ किंवा बहिष्कृत हितकारिणी सभेनेंहि केलेलें नाहीं. मग सुधाकारांनीं केलेलें नाहीं हें सांगावयास नकोच. सुधारकांनीं आपला चवचालपणा तेवढा तृप्त करून घेतला असेल एवढेंच.

"हिंदुमहासभेचे प्रमुख पुढारी व ब्राह्मण समाजाचे घटक या नात्यानें दे. भ. तात्यासाहेबांवर विशेष जबाबदारी आहे, व त्या जबाबदारीची जाणीव ठेऊनच ते अस्पृश्योद्धाराचें कार्य करीत आहेत. ते ज्या तऱ्हेनें हें कार्य करतील त्या तऱ्हेनेंच अस्पृश्योद्धार व हिंदु समाजाचें हित होईल."

पण अस्पृश्योद्धार चळवळीचे सन्मान्य पुढारी रा. विठ्ठल रामजी शिंदे यांनीं जें खालील पत्र लिहिलें त्यामुळें ब्राह्मणेतरांनीं मला शिव्यांची जी लाखोली वाहिली तिची भरपाई झाली असें मी मानतों. तें पत्र असें:—

प्रिय नरसोपंत यांस:—सा. न. वि. वि. श्री. ल. ब. भोपटकर यांचें छापील आमंत्रण 'केसरी-प्रबोध' आपल्यास अर्पण करण्याच्या समारंभास येणेंचें आतांच पोंचलें. पाडव्याचे दिवशीं सायंकाळीं आंबेगांव पेठ्यांत घोडेगांवीं शेतकरी संघाचें उद्घाटन करण्यास मला जावे लागेल. म्हणून आपल्या समारंभास येणें होणार नाहीं याचें वाईट वाटतें. तरी केसरीविषयीं पुन्हां एकदां मला स्वतःला प्रांजलपणें काय वाटतें तें या पत्रांत लिहिल्याशिवाय राहवत नाहीं.

गेल्या शुक्रवारचा व आज मंगळवारचा असे केसरीचे अग्रलेख मी समग्र वाचले. प्रत्येक अक्षर त्यातले मला इतकें आवडलें कीं जणूं ते माझ्या हृदयाच्या

मुळांतूनच निघालें होतें. शुक्रवारचा लेखाचा समतोलपणा आणि आजच्या लेखाची गहनदृष्टि ही दोन्ही कोणत्याहि कसलेल्या संपादकास अत्यंत नमुनेदार खात्रीनें आहेत. तुमच्या कट्टया शत्रूसहि हे दोन लेख मान डोलवावयाला लावतील. प्रस्तुत समेटामुळे माझें स्वतःचे मन फार दुखलें आहे. तसे मी ता. ७ मार्चच्या शनवारवाड्यापुढील जाहीर सभेत उघड बोलूनहि दाखविलें. त्या आठवड्यांत मला जी दुःस्वप्नें पडत होतीं त्यांचे यथातथ्य शब्दचित्र केसरीच्या अग्रलेखांत आज उठावदार पाहून मला आश्चर्य वाटलें. मी केसरी सांप्रदायाचा मुळींच अनुयायी नाहीं. पण मी कोणत्याच सांप्रदयाचा अनुयायी नाहीं ! तरी पण केसरींतील लेखांचा चहाता आहे म्हणून तर माझ्या चहाची विशेष किंमत नाहीं काय ? कृपाकरून माझें हें पत्र केसरीच्या लेखकांस व रा. ल. ब. भोपटकरांस आणि सर्व संबंधीजनांस दाखवाच. म्हणजे मी समारंभास येऊ न शकल्याबद्दल ते सर्व मला क्षमा करतील.

प्रिय नरसोपंत—चालू 'रत्नाकरांतील' रा. दिवेकरांचा तुमच्या विषयींचा लेख मी वाचला. तोहि मला फार आवडला. तुमच्या चरित्राचें व चारित्र्याचें रहस्य प्रत्यक्ष तुम्हाला तरी इतके सुरेख वठवितां येईल कां हो ! मी पुष्कळवेळां तुम्हांवर जाहीररीतीनें स्तुतिनिंदेचे आघात केले आहेत. तथापि महाराष्ट्रीय पुढारी या नात्यानें माझ्या नजरेंत तुमची जी नैतिक उंची भरली आहे तिच्यांतील एक तिळहि कमी झालेली नाही. म्हणूनच दिवेकरांचा लेख मला आवडला. जसे केसरीस तसेंच तुम्हा स्वतःस दीर्घायुष्य लाभो आणि महाराष्ट्र-कार्य तुम्हांकडून व तुमच्या अनुयायांकडून चिरकाल घडो अशी अत्यंत नम्र व सहज प्रार्थना आहे.

हें पत्र प्रसिद्धीच्या दृष्टीनें मुळींच लिहिलें नाहीं. तरी पण तुमच्या सांप्रदायाला हें प्रसिद्ध करण्यापासून कांहीं लाभ होत असेल म्हणून तुम्ही मला न विचारतां प्रसिद्ध कराल तरी त्यांतील एक अक्षरहि परत घेण्यास मी तयार नाहीं. हें लिहिण्याचे कारण मी हें पत्र अगदीं निर्व्याज हेतूनें लिहिलें आहे. मग तें मला कसें लपविता येईल !

पुन्हाः आपलें शुभ चिंतून रजा घेतों.

तुमचा नम्र

विठ्ठल रामजी शिंदे

वेताळ पेठ,
१७मार्च १९३१, पुणें.

याच्या उलट प्रकार पहा. डॉ. आंबेडकर यांना आम्ही खालील कांहीं मंडळींनीं पुढीलप्रमाणें पत्र पाठाविलें. पण त्याला एकदोन ओळींचेंहि उत्तर आलें नाहीं.

"येवले येथील परिषदेंत आपण हिंदुधर्म त्याग करणार असें जाहीर केलें तें ऐकून अनेक कारणांनीं आम्हास वाईट वाटलें. आपल्या भावनांची तीव्रता आम्ही जाणतो. तथापि आपण धर्मांतर केल्यानें हिंदु समाजाचेंच काय, पण विशेषतः आपण ज्या समाजाचें एक पुढारी आहा त्याचें तर त्यांतल्या त्यांत अतिशय नुकसान होईल असें आम्हास वाटत. आम्ही कांहीं लोक अस्पृश्यता-निवारणासंबंधानें व मागासलेल्या ज्ञातींच्या उन्नतीसंबंधानें यथामति यथाशक्ति खटपट करतो त्याबद्दल आपणास काय वाटत असेल ते वाटो. तथापि ही इष्ट सुधारणा लवकरच बऱ्याच प्रमाणांत घडून येईल अशी आम्हाला आशा वाटते. कार्य मोठें आहे त्या मानानें अद्यापि जागृति कमी आहे. परंतु तें कार्य घडून येण्याविषयीं सुशिक्षितांतील बहुजनसमाज प्रामाणिकपणें प्रयत्न करीत आहे ही गोष्ट आपणाला दिसून येत असेल. आशा वाटते कीं, तुम्ही आम्ही व तुमच्या आमच्या सारख्या विचारांच्या इतर लोकांनीं असाच प्रयत्न करीत राहिल्यास इष्ट सिद्धि लवकरच होईल. पण ते कसेहि मानले तरी आपल्या धर्मांतरानें या कार्याची हानी होईल. उलट आपण करीत आहा तसेच आणखी प्रयत्न करीत राहिल्यास या नाहीं तर पुढच्या पिढींत तरी बरेचसें दृश्य-फल दिसूं लागेल असें आम्हाला वाटतें. आपणाला योग्य वाटेल ते करण्यास आपण स्वतंत्र व समर्थ आहा. परंतु एकंदर समाजाचा व या विशिष्ट प्रश्नाचा विचार करतां आम्हाला जें काय वाटतें तें आपणास कळविलें आहे. आपण न विचारतां आम्ही आपलें मत आपल्या नजरेस घातलें ही गोष्ट गैर झाली असें आपणास वाटत असल्यास त्याची आपण क्षमा करावी."

आपले

न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, श्री. म. माटे.

असो. सुधारक व सनातनी यांच्यामध्यें कोठेंतरी बसणारा मी तो तिन्हा-इतांना कसा दिसत होतो याविषयीं दोन तीन अभिप्राय देतों. त्यांतील एक हौशी

सुधारकाचा, एक विवेचक सुधारकाचा, व एक सनातनी सुधारकाचा आहे. हौशी सुधारक कै. वाग्भट देशपांडे 'रत्नाकरां'त लिहितात :—

" केळकरांचा जन्म आतापर्यंत टिळकपक्षीय राजकारणांत गेला असला तरी त्यांची सामाजिक बाबतींतील प्रगमनशील मतें पाहून आश्चर्य वाटण्याचें वास्तविक कांहींच कारण नाहीं. कारण आपल्या एका लेखांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, " आपल्या देशावर हल्लीं मतस्वातंत्र्याच्या कल्पनेची भरती आली आहे हें जर खरें असलें, तर त्या भरतीच्या लाटा जशा राजकीय प्रदेशांत, त्याचप्रमाणें सामाजिक व धार्मिक प्रदेशांतहि पसराव्यात, हें स्वाभाविक आहे. समुद्राला भरती आली म्हणजे मग समुद्राशीं संबंध असलेल्या सर्व खाड्या, नद्या, नाले यांच्यामधून एकसारखेंच पाणी फुगतें. त्याचप्रमाणें समान हक्क व स्वतंत्र बुद्धि यांची भावना मनांत एकदां जागृत झाली म्हणजे मग ती अमुक एका बाजूलाच वळावी, दुसऱ्या बाजूला मात्र वळूं नये, अशी अपेक्षा करणें व्यर्थ होय. " केळकरांची ही मीमांसा अगदी स्तुत्य आहे यांत शंका नाहीं. राजकीय बाबतीत प्रगतीचा हव्यास असलेला मनुष्य सामाजिक बाबतीतमुद्धां तितकाच प्रागतिक असला पाहिजे ही गोष्ट टिळकांच्या काळीं शक्य झाली नाहीं, हा केवळ तत्कालीन परिस्थितीचा दोष होय. पण खोट्या भावनेस बळी न पडतां प्रगमनशीलतेची आवड केळकरांनीं कोणत्याहि एका विशिष्ट बाबतींतच केंद्रीभूत न करतां, राष्ट्रास उपयुक्त अशा हरएक बाबतींत त्यांनी तीच प्रगमनशीलता दाखविली आणि आचरली हेंच केळकरांचें वैशिष्ट्य होय. "

सनातनी सुधारक प्रो. शं. दा. पेंडसे हे 'वागीश्वरी'त लिहितातः— " हिंदुस्थानांतील हिंदुराजकारणी लोकांमध्ये अशी एक जाति आहे कीं तिला धर्माचें मोठें वावडें आहे. धर्माचें नांव काढलें कीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या धर्माच्या अनुयायांमध्यें फूट पडेल अशी त्यांना भीति वाटते व त्यामुळें हिंदुधर्म व हिंदुजाति यांची सर्वत्र पायमल्ली होत असतांनाहि तिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्याची या राजकारणी लोकांची प्रवृत्ति असते. श्रीयुत तात्यासाहेब केळकर हे राजकारणी आहेत. पण त्यांची जाति वर सांगितलेल्या राजकारणी लोकांच्या जातीपेक्षां भिन्न आहे. हिंदुस्थानांत लो. टिळकांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या राष्ट्रीय पक्षाचें वैशिष्ट्यच असें आहे कीं, या पक्षां-

तील लोक जसे देशनिष्ठ असतात तसेच धर्मनिष्ठहि असतात, व या दोहोंमध्यें कांहीं विरोध आहे अशा रीतीची गैरसमजूत त्यांनीं कधींच करून घेतली नाहीं. हिंदुसंस्कृति व तदंतर्गत धर्म आणि तत्त्वज्ञान यासंबंधा लोकमान्यांचा व्यासंग इतका गाढ होता कीं राजकारणापेक्षांहि या गोष्टी त्यांना प्रिय असत. कारण या दीर्घव्यासंगामुळें त्या संस्कृतीचें व तिच्या तत्त्वज्ञानाचें श्रेष्ठत्व त्यांना पूर्ण पटलें होतें. या तत्त्वज्ञानाच्या पायावरच त्यांनीं आपल्या राजकारणाची उभारणी केल्यामुळें हा पाया भक्कम राहील अशी त्यांनीं नेहमीच काळजी घेतली. या थोर संस्कृतीचें श्रेष्ठत्व सर्वांना पटवून देण्याचा उद्योग त्यांनीं आजन्म केला व तिची पायमल्ली होऊं न देण्याची सदैव दक्षता बाळगिली. त्यांची परंपरा श्रीयुत केळकर यांनीं अखंड पुढें चालविली आहे. ''

विवेचक सुधारक रा. वि. स. खांडेकर दिलेला अभिप्राय इतका समर्पक आहे की तसा आत्मनिरीक्षणानें स्वतः माझा मलाहि लिहितां आला नसता. मला तो फार यथार्थ वाटला म्हणून जशाचा तसा सर्व देतों :—

'' गेल्या अर्ध शतकांतील महाराष्ट्रांतील प्रमुख समाजसुधारकांची गणना करण्याचा प्रस्तुत लेखकावर एकदां प्रसंग आला. त्या यादींत 'श्री'काराच्या जवळ तर नाहींच पण 'इत्यलम्'च्या आसपाससुद्धां केळकरांचें नांव नव्हतें. आगरकर रानड्यांसारख्या सांमाजिक सुधारणेचा मतप्रचार करणाऱ्यां मंडळींत नाहीं तर नाहीं, पण हरिभाऊ आपटे कोल्हटकर-केशवसुत-गडकरीप्रभृति सुधारक वाङ्मयसेवकांत तरी केळकरांचें नांव समाविष्ट होण्याला वास्तविक हरकत नव्हती. पण—कारण कांहींहि असो—केळकर हें नांव उच्चारल्याबरोबर सामाजिक सुधारणेची आठवण होत नाहीं हें मात्र खरें. जलशांत गायला बसलेल्या प्रत्येक गायकाचें व्यक्तित्व प्रेक्षकांच्या अंतःकरणांत उमटतें, पण त्यांच्या गाण्याची सांथ करणाऱ्या व प्रसंगीं त्यांना सांभाळून घेणाऱ्या तब्बलजीकडे मात्र बहुधा कुणाचें लक्ष जात नाहीं. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत केळकरांची थोडीफार अशीच स्थिति झाली आहे.

'' 'पुनर्विवाहासंबंधीं सारासार विचार' 'विशिष्ट विवाहाचा कायदा' 'हीन-जाति व त्यांची उन्नति' 'हुंड्यावर बहिष्कार' इत्यादि केळकरांचे लेख नुसते चाळून पाहिले तरी ते अंतर्यामीं सुधारक आहेत असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. सामाजिक सुधारणेकडे पाहण्याची त्यांची दृष्टि टिळकांप्रमाणें उदासीन अगर परांजपे—खाडिलकरांप्रमाणें उपहासात्मक नाहीं. रूढि, आचार, संस्कृति वगैरे-

समाजमंदिराच्या आधारस्तंभांवर अविचारानें ते कुणालाहि कुऱ्हाड चालवूं देणार नाहींत. पण हे आधारस्तंभ पोकळ झाल्यानंतरहि त्यांना धक्कासुद्धां लावतां उपयोगी नाहीं असा अट्टाहासहि ते धरणार नाहींत. केसरीचे संपादक व टिळकांचे सहाध्यक असूनहि सामाजिक सुधारणेविषयीं आपली सहानुभूति स्पष्टपणे व्यक्त करण्याला त्यांनीं कधीहि कमी केलें नाहीं ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे.

"कृतीच्या दृष्टीनें पाहिलें तर सुधारणावादी म्हणून गाजलेल्या अनेक लेखकांइतकी केळकरांची सुधारणाविषयक सहानुभूति कांहीं निष्क्रिय नाहीं. रानडे अगर हरिभाऊ आपटे यांची द्वितीय विवाहाच्या वेळीं काय त्रेधा झाली ती त्यांचीं चरित्रें वाचणारांना सांगायला नकोच. 'सुदाम्याच्या पोह्यां'त व नाटकांत सामाजिक सुधारणेचे वकीलपत्र घेणाऱ्या कोल्हटकरांनीं सुद्धां कृतीच्या दृष्टीनें केळकरांपेक्षां कांहीं विशेष कार्य केलें आहे असें नाहीं. गडकऱ्यांची तर गोष्टच बोलायला नको ! त्यांच्या खासगी आयुष्यांत जर त्यांनीं कांहीं सामाजिक निर्बंधाचें उल्लंघन केलें असेल तर तें फक्त अस्पृश्यांनीं शिवलेल्या खाण्यापिण्याच्याच बाबतींत ! उलट स्त्रीशिक्षण, पोटजातींतील लग्नें, इत्यादि सुधारणा केळकरांनीं गाजावाजा न करतां केल्या आहेत. असें असून त्यांचें नांव सुधारकांच्या यादींत मात्र सहसा पडत नाहीं. असें कां व्हावें ?

"या प्रश्नाचीं अनेक उत्तरें आहेत. केळकर सामाजिक सुधारक आहेत खरे. पण त्यांच्या सुधारणाविषयक मतांचा संचार त्यांच्या कांहीं निबंधांपलीकडे गेलेला नाहीं. त्यांच्या सहा नाटकांपैकीं एकहि सामाजिक नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांच्या गोष्टी अगर कविता यांच्यावरहि सामाजिक सुधारणेची छाया पडलेली आढळून येत नाहीं. तत्त्वप्रतिपादनाच्या तळघरांत कलाविलासाच्या गुलाबांची कुंडी ठेवणें हें दोहोंनाहि विघातक आहे असें त्यांचें मत असेल. पण एवढें खरें कीं हरिभाऊ प्रभृति लेखकांनीं आपल्या प्रमुख ललितकृतींत सामाजिक सुधारणेला जसें स्थान दिलें आहे तसें केळकरांनीं कुठेंच दिलेलें नाहीं.

"दुसरें कारण केळकरांच्या एकंदर लिखाणाशीं तुलना करतां त्यांचें सुधारणाविषयक लेखन अत्यंत अल्प आहे हें होय. हिमालयाच्या पायथ्याशीं उभें राहणाऱ्या मनुष्याचें लक्ष त्याच्या शृंगांकडेच जातें. मधल्या लहान-सहान टेंकड्या त्यावेळीं त्याला अगदीं क्षुद्र वाटतात. केळकरांच्या वाङ्मयांत सामाजिक सुधारणेची हींच स्थिति झाली आहे.

"तिसरें कारण आणि हेंच सर्वांत मोठें कारण आहे. वामनरावजी जोशी यांनीं आपल्या लेखांत तें उल्लेखिलेलेंच आहे. 'केळकर पुनर्विवाह घटस्फोट वगैरे सुधारणांना संमति देतात ती गौण पक्ष म्हणून. असली संमति म्हणजे मान्यतेचें रूप घेतलेला विरोधच होय.' हा केळकरांच्या सामाजिक मतांवरील सर्वांत मोठा आक्षेप आहे असें म्हणायला हरकत नाहीं.

"या आक्षेपाविषयीं विचार करतांना केळकरांचा एक स्वभावविशेष अवश्य लक्षांत घेतला पाहिजे. इंग्रजी क्रमिक पुस्तकांतून एका बाजूनें सोन्याची व दुसऱ्या बाजूनें चांदीची असलेली ढाल दोन सरदारांच्या द्वंद्व-युद्धाला कारणीभूत होते अशा अर्थाची एक गोष्ट असते. दोन बाजूंनीं येणाऱ्या या सरदारापैकीं प्रत्येकाला ढालीची एकच बाजू दिसते; व ढाल सोन्याची कीं चांदीची या विषयीं वादविवाद होऊन त्याचा निकाल लावण्याकरितां ते तरवारी उपसतात. केळकर या सरदारांपैकीं एक असते तर हें प्रकरण हात-घाईवर कधीच आलें नसतें. प्रतिपक्षाचें म्हणणें ऐकतांच त्यांनीं तरवार उपसण्या-ऐवजीं दोन पाउलें पुढें टाकून त्या ढालीची दुसरी बाजू पाहिली असती. आणि 'तुमचें म्हणणें अक्षरशः खरें आहे, ढालीची माझी बाजूहि कांहीं कमी प्रेक्षणीय नाही' असें म्हणत म्हणत दुसऱ्या हटवादी गृहस्थाला आपल्या बाजूला आणलें असतें.

"त्यांच्या या विचारशील स्वभावाचें प्रत्यंतर पहावयाचें असेल तर त्यांचा 'हुंड्यावरील बहिष्कार' हा सामाजिक लेख पहावा. बंगाल्यांत ख्रेहलतेनें हुंड्याच्या पायीं स्वतःला जाळून घेतलें त्यावेळीं त्यांनीं हा लेख लिहिला. अर्थात दुसरा कुणी लेखक असता तर यावेळीं लेखणींतून अग्नीच्या संसर्गानें तापलेल्या शब्दावांचून दुसरें कांहींहि बाहेर पडलें नसतें. पण केळकरांनी या लेखांत हुंड्याचे अनर्थ वर्णन केले असले तरी वस्तुस्थितीचा त्यांना विसर पडलेला नाहीं. ते म्हणतात 'मुलीच्या आईबापांची कींव वाटते खरी; पण त्यांतील कित्येक असे खमंग असतात कीं, त्यांचें वेळीं अवेळीं नाक दाबून तोंड उघडलें तरच ठीक. त्यांना जर भोळा व सज्जन व्याही भेटेल, आणि 'देण्याघेण्याच्या गोष्टी या ज्याच्या त्याच्या मोठेपणाच्या आहेत' पोटचा गोळा देईल तो सोन्याच्या तोळ्याला मागें घेणार नाहीं' असें तत्त्वज्ञान लढवील तर, त्याला ते गोता दिल्याशिवाय कधीहि रहावयाचे नाहींत. आणि 'नुसती हळकुंड बांधून

मुलगी दिली, अन्-दूध-भात जेवायला घातला ' ही जी केवळ म्हण आहे ती अक्षरशः खरी केल्याशिवाय ते सोडणार नाहींत. हुंड्याला मागणीचें व करारांचें जें कित्येक वेळां स्वरूप येतें तें अशा आईबापांच्या उदाहरणामुळेंच.

" मुलींच्या आईबापांतहि सारेच कांहीं धुतलेले तांदुळ नसतात, त्यांतहि असायचे तितके उडीद असतात, असें केळकरांनीं म्हटलें म्हणून त्यांनीं हुंड्याचें समर्थन केलें असें म्हणणें योग्य होईल काय ? केळकरांना आयुष्यांत फार दिवस वकिली चालवावी लागली नाहीं हें खरें; पण वकीलापेक्षांहि ते यशस्वी न्यायाधीश झाले असते यांत संशय नाहीं. सामाजिक सुधारणेंप्रमाणें राजकारणांतहि ते सुवर्णमध्याचा पुरस्कार करणारेच आहेत. पण त्यांचे टीकाकार त्यांतल्या 'सुवर्णा'कडे लक्ष न देतां ' मध्या ' वरच तुटून पडतात.

" प्रो. वामनरावजींनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाचा याच दृष्टीनें विचार केला पाहिजे. पुनर्विवाह-घटस्फोटादि सुधारणांना केळकरांनीं गौणपक्ष म्हणून दिलेली संमति, आणि घरी जावयाला निघालेल्या विद्यार्थिनीला प्रथम न जाण्याचा उपदेश करून नंतर शिक्षकानें जाण्याकरितां दिलेली संमति, यांत प्रो. वामनरावजींना कांहींच फरक वाटत नाहीं. विद्यार्थिनीचें घरीं जाण्याचे कारण ज्या मानानें महत्त्वाचें असेल त्या मानानेंच शिक्षकानें आपल्या संमतीचें स्वरूप ठरविणें इष्ट नाहीं काय ? आई आजारी असल्यामुळें घरीं जाण्याची परवानगी मागणारी विद्यार्थिनी, आणि शेजारघरच्या हळदीकुंकवांत रमण्यागमण्याकरितां रजा मागणारी विद्यार्थिनी, यांत दोन ध्रुवांचें अंतर नाहीं काय ? पुनर्विवाह-घटस्फोटादि विषयांचा विचार करतांना व्यक्ति आपल्या डोळ्यांपुढें कधीच उभी नसते.

" सामाजिक परिस्थिति व आत्मौपम्यावर अधिष्ठित झालेली नीति यांचा कुणीकडून तरी मेळ बसावा एवढीच सुधारणावादी मनुष्याची इच्छा असते. प्रो. वामनराव जोशी म्हणतात तशा विशिष्ट परिस्थितींत पुनर्विवाह हा प्रथमविवाहाइतका—आणि घटस्फोट विवाहग्रंथीप्रमाणेंच—न्याय्य व म्हणूनच पवित्र आहे हें केळकर देखील कबूल करतील. पण केळकरांच्या लेखनांत नेहमीं सामान्य परिस्थितीचाच विचार केलेला असतो हें विसरून चालणार नाहीं.

"या बाबतींत आणखीहि एक मुद्दा महत्त्वाचा आहे. केळकरांचा सामाजिक लेखनाचा काळ लक्षांत घेतां ( मतिविकार नाटकावरील टीका वगैरे

बहुतेक लेख २०–२५ वर्षांपूर्वीचे आहेत) पुनर्विवाहासारख्या गोष्टींचा गौणपक्ष म्हणून उल्लेख होणें अस्वाभाविक नाहीं. सामाजिक सुधारणेचा कैवार घेणारे एवढे मोठे कोल्हटकर! पण त्यांनींसुद्धां एके ठिकाणीं जिला विरक्त स्थितींत आयुष्य कंठितां येत नाहीं तिनेच पुनर्विवाह करावा असें म्हटलें आहे असें वाटतें. गडकऱ्यांनीं तर प्रेमासाठीं तळमळणारी बालविधवा लीला निर्माण करून प्रेक्षकांना जितकें रडविलें तितकेंच बालपतिमूर्तीच्या चिंतनांत रममाण होणाऱ्या सुशिलेचें चित्र काढून त्यांनीं पतिनिष्ठेचें माहात्म्य पटविलें! खरंच, हा उदाहरणें देण्याची तरी काय जरूरी होती? म्हणतात ना, मनगटावर घड्याळ, अन् वेळ विचारी बाळ! खुद्द वामनरावजींची रागिणी तरी काय आहे? वैधव्यांत तिच्या मनांत परपुरुषाचा विचार येतो; पण तो तिला, वामनरावजींना, अगर टीकाकार कोल्हटकरांना कुणालाच आवडत नाहीं. तर्कदृष्ट्या पाहिलें तर रागिणीच्या पुनर्विवाहांत गौण असं काय आहे? कोल्हटकर, केळकर, जोशी, गडकरी या सर्वांवर परंपरागत सामाजिक संस्काराचा पगडा इतका जबरदस्त आहे कीं ध्येय या दृष्टीनें कां होईना विधवेनें अविवाहित राहणें चांगलें असें सुचविल्याशिवाय त्यांना राहवत नाहीं.

" सामाजिक लेखकांच्या मतांवरील हा संस्कारांचा पगडा इष्ट कां अनिष्ट ही चर्चा येथें अप्रस्तुत आहे. जी गोष्ट करूनहि कोल्हटकर–गडकरी–जोशी सुधारणावादी राहूं शकतात, तीच गोष्ट केळकरांनीं केल्याबरोबर त्यांना 'प्रच्छन्न पुराणमतवादी' ही बदवी बहाल करणें न्याय्य होईल काय? एकादशीमाहात्म्य सगळेंच गातात; मग ज्यांना उपास होत नसेल त्यांनींच तांदूळ भाजून खावे असें एखाद्यानें म्हटलें तर त्यांत बिघडले कोठें? भाजलेल्या तांदुळांबरोबर तळलेलीं कांद्याचीं भजीं खायलासुद्धां सध्यांची पिढी तयार झाली आहे ही गोष्ट खरी! पण तिचीं मतें केळकरांच्या लेखनांत आढळत नाहींत म्हणून त्यांना दोष देणें म्हणजे हिंदु स्त्रिया युरोपियन बायकांप्रमाणें केशकर्तनाचा पुरस्कार करीत नाहींत म्हणून त्यांना बोल लावण्यासारखेंच होईल.

" केळकरांच्या लेखनाचें स्वरूप प्रायः लढाऊ नाहींच. शिवाय सामाजिक सुधारणेच्या बाबतींत त्यांनीं विशेष लेखन केलें आहे असेंहि नाहीं. यामुळें सुधारणाप्रवर्तक आगरकर अगर सुधारणासंवर्धक कोल्हटकर-आपटे या लेखकांबरोबर त्यांचें नांव निघत नाहीं यांत आश्चर्य नाहीं. पण लेखनांत व कृतींत

त्यांनीं सामाजिक सुधारणेचा सामान्यतः पुरस्कारच केलेला आहे. ते सामाजिक सुधारणेचे वकील नसले तरी तिच्या बाजूचे महत्त्वाचे साक्षीदार आहेत. त्यांनीं शांतपणानें साक्ष दिली अगर प्रतिपक्षाची बाजू विचारपूर्वक पाहिली म्हणून त्यांची साक्ष अनुकूल होण्यापेक्षां प्रतिकूलच झाली असें ठरविणें निःसंशय अन्यायाचें होईल."

---

## ( १४ ) आत्मनिरीक्षण

स्वतःचें मूल्यमापन स्वतःच करणे यासारखी कठिण गोष्ट दुसरी नाहीं. कारण आत्मप्रीतीमुळें माप झुकतें जाईल तें आपल्याच बाजूला जावयाचें हें ठरलेलेंच आहे. तथापि असा प्रयत्न प्रत्येकानें एखादे वेळीं तरी करून पाहण्यासारखा असतो. मला एकदां एक स्नेही म्हणाला " केळकर, शेंकडो लोक तुमची स्तुति करतात तर शेकडो लोक तुमची निंदा करतात. मग तुम्ही स्वतः तुमची योग्यता काय समजतां ?" त्याला मी म्हणालों " जे कोणी माझ्याहून श्रेष्ठ आहेत त्यांच्या तुलनेने मी हीन आहे. आणि जे कोणी माझ्याहून हीन आहेत त्यांच्या तुलनेनें मी श्रेष्ठ आहे." तो म्हणाला "छेः, हे तर निव्वळ उडवाउडवीचे उत्तर झालें. तुम्ही तुमच्याहून श्रेष्ठ कोणाला मानतां आणि हीन कोणाला मानतां हें मला कसें कळणार" ? तेव्हां मी म्हणालों "प्रथम स्थूलमानानें हें सांगतो की माझ्या कोणत्याहि निंदकापेक्षां मी श्रेष्ठ आहे." तो म्हणाला "कारण ?" मी म्हणालों "कारण, माझ्याहून जे श्रेष्ठ आहेत असें मी समजतों ते माझी निंदा करतांना सहसा आढळत नाहीत. जे माझ्याहून हीन आहेत तेच माझी निंदा करतात. निंदा हा असूयेचा परिणाम असतो. माझ्या योग्यतेला जे चढूं शकत नाहींत तेच मला निंदेनें खाली ओढून आपल्या योग्यतेला आणूं पहातात. माझ्याहून श्रेष्ठ आहेत ते कोणाची निंदा करीत असतील तर त्यांना जें आपल्याहून श्रेष्ठ वाटत असतील त्यांची."

तरीहि माझ्या स्नेह्याचें समाधान झालें नाहीं. तेव्हां मी मोकळ्या मनानें त्याच्याशीं बोललों तेंच येथें देतो. मी म्हणालों "मी केव्हांहि स्वतःकडे पाहतों तो इतरांच्या तुलनेनें नाहीं. तर स्वतः माझ्या तुलनेनें ! लौकिक काय किंवा यश काय, जें मला मिळालें तें खरोखर माझ्या आत्मगुणापेक्षां अधिक मिळालें असें मला वाटतें. अर्थात मी पूर्णपणें आत्मसंतुष्ट आहे. आहे याहून अधिक योग्यता,

मला लाभली नसेल तर तो लोकांचा दोष नाहीं, माझा आहे असें मी मानतों. कारण मी एक सामान्य बुद्धीचा सामान्य कर्तृत्वाचा मनुष्य आहे. दहा सहस्रांत एक अशी माझी योग्यता लोकोत्तर नाहीं. कदाचित् सहस्रांत एक इतकी असेल. ज्यांना शिक्षण लाभलें नाहीं त्यांना बुद्धि किंवा कर्तृत्व नसतें असें मी समजत नाहीं. शिक्षणानें खोटा लौकिक मिळवून देण्याची सोय केली आहे इतकेंच. शिक्षितांतहि माझी योग्यता ठरवावयाची तर त्याला उत्तम प्रमाण आहे. तें असें कीं, मी विद्यापीठाच्या सहा परीक्षा दिल्या त्यांत वरच्या प्रतीचा मान मला केव्हांच मिळाला नाहीं. कधीं एकहि मोठें बक्षीस मिळालें नाहीं. इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत शाळेंत माझा नंबर पहिला दुसरा असे व नेहमीं शिष्यवृत्ती मिळे. परंतु विद्यापीठाच्या पहिल्याच परीक्षेंत परीक्षेच्या कसोटीनें माझ्याहून बुद्धिमान असे चारशें विद्यार्थी आहेत असें आढळून आलें. मी प्रत्येक परीक्षा पहिल्याच वेळीं पास झालों असे सहापैकीं पांचदां घडलें. तथापि सामान्य बुद्धिमत्तेपेक्षां अधिक कांहीं यामुळें दर्शविले जात नाहीं. पुढें मी वकील झालों असतां तरी त्यांत मला पहिल्या प्रतीचें यश मिळालें नसतें. मी चिकित्सक आहे तरी उत्तम वकीलाच्या बुद्धींत जो बारकावा लागतो तो माझ्या बुद्धींत नाहीं. शिवाय यशस्वी वकील होण्यास जी तडफ, जे व्यवहार चातुर्य, जो हट्टवादीपणा, अंगीं लागतो तो मजमध्यें नाहीं. त्यांतल्या त्यांत अव्वल दावे चालविण्यापेक्षां मी अपीलें अधिक चांगली चालविलीं असतीं, आणि अपीलापेक्षां मी न्यायासनावरून द्यावयाचे निर्णय अधिक चांगले दिले असते. वकीलींत मी उपाशी मेलों नसतों. पण अण्णा भोपटकर मजविषयीं जें म्हणतात कीं, " केळकरांनीं वकिली केली असती तर लाखो रुपये मिळविले असते " तेंहि खरें वाटत नाहीं.

मला न्यायदानाचें काम लाभलें नाहीं, आणि वकिलीचा धंदा सुटून मी संपादकीय धंद्यांत पडूं शकलों, यानें मात्र माझ्या नैसर्गिक गुणांना अधिक वाव मिळाला. संपादक या नात्यानें मी बराच यशस्वी झालों. तथापि हिंदुस्थानांत मजहून अधिक चागले असे किती तरी संपादक होऊन गेले. मतप्रतिपादनाच्या दृष्टीनें टिळक, भावना-चैतन्याच्या दृष्टीनें अरविंद बाबू, बोचक कुत्सितपणाच्या दृष्टीनें मोतीलाल घोस, हुल्लड उठविण्याच्या दृष्टीनें अच्युतराव कोल्हटकर, ईंग्रजी भाषेच्या दृष्टीनें नटराजन्, माहितीच्या दृष्टीनें सी. वायू. चिंतामणी, आवेशाच्या दृष्टीनें खाडिलकर, बहुरंगीपणाच्या दृष्टीनें विविधवृत्तकार, असे अनेक संपादक होऊन गेले. माझें

वैशिष्ट्य असेल तर भाषा सजवून लिहिण्यांत, आणि त्याहून सारासार चिकित्सेनें खऱ्या व्यवहारी मनुष्यास आपलेसें करण्यांत होतें. एकांतिक मतें नाहींत म्हणून धडाडी नाहीं, ध्येयनिष्ठा असली तरी तिच्या मर्यादा पाहण्याकडे दृष्टि, स्वपक्ष समर्थन असलें तरी प्रतिपक्षाच्या अंगचे गुण घेण्याची फाजिल न्यायबुद्धि, इत्यादि अनेक गुणमिश्रित दोष माझ्यामध्यें होते. परंतु कोणत्याहि सत्कार्याला निर्विकार बुद्धीनें शक्य तितकें प्रोत्साहन देणें हा एक मोठा गुण मजमध्यें होता. धान्दात व जाणून बुजून अन्याय असा मी क्वचितच करीं. जातिद्वेष मी सहसा केला नाहीं. यामुळें संपादक या नात्यानें मला शत्रूपेक्षां मित्रच अधिक मिळाले. शिवाय सतत पंचवीस वर्षें केसरीसारख्या श्रेष्ठ वर्तमानपत्राचा संपादकीय अधिकार हातीं राहिल्यानें, माझ्या बुद्धीच्या व भावनांच्या सर्व बाजू प्रगट करण्याला मला विस्तृत वाव मिळाला.

राजकीय चळवळींच्या दृष्टीनें तर माझ्यापेक्षां श्रेष्ठ असे पुढारी किती तरी झाले व आहेत. कोणच्याहि चळवळीकडे मी स्वतः तींत किती क्लेश सोसूं शकेन किती स्वार्थत्याग करूं शकेन या व्यावहारिक पण आत्मौपम्य दृष्टीनें प्रथम पाहतों. परिणामाविषयीं सावध्यपणाची दृष्टि असली म्हणजे मनुष्य एकांतिक मतें बेछूट प्रतिपादीत नाहीं. आपण जें करणार नाहीं तें लोकांना करावयाला सांगणें माझ्या जिवावर येतें. त्यामुळें ध्येयवादित्वांत मी कमी पडतों. जे आपल्या स्वार्थत्यागाला किंवा दुःखपात्रतेला मर्यादा ठेवीत नाहींत ते सहजच पुढारी बनतात, आणि अशांच्या विषयीं मला अत्यंत आदर वाटतो. देशाचें पाऊल पुढें पडलं तें अशाच पुढाऱ्यांच्या हातून. पण उलट आपली कुवत न पाहतां, स्वतःची स्वार्थत्यागाची तयारी नसतां, दुसऱ्याला मात्र घोडयावर घालणारे असेहि पुढारी जे अनेक असतात त्यांच्या विषयीं मला अत्यंत तिटकारा वाटतो. दुसऱ्याचें घर जाळून त्याच्या प्रकाशानें आपला चेहरा उज्वल करणारे 'देशभक्त' मी पुष्कळ पाहिले आहेत! आणि आपण स्वतः मागें पडलों तरी चालेल, पण हें परघाताचें पाप आपल्या हातून घडूं नये अशीच माझी नेहमीं इच्छा असे. तसेंच मतांच्या अप्रामाणिकपणाबद्दल मला फार राग येतो. पुढारी म्हणविणारे पुष्कळ मी असे पाहिले आहेत कीं, स्वतःचीं खरीं मतें तशीं नसतां, दुसऱ्यांच्या मतांना लोकांकडून मान मिळतो व कीर्ति लाभते म्हणून तीं मतें आपलींहि आहेत असें भासवून प्रतिपादणारे. जो कोण कांहीं ओजस्वी भावनेचें बोलेल त्याच्या पलीकडे जाऊन त्याहिपेक्षां अधिक प्रखर व ओजस्वी असें बोलण्याचा मोह अनेक पुढाऱ्यां-

ना होतो, आणि खरा प्रसंग आला म्हणजे मग मात्र पळवाट शोधून अंग चोरून ते निघून जातात हा अनुभवहि कांहीं थोडा नाहीं. अशांच्या वर्गांत जाऊन बसण्यापेक्षां आपल्याला कीर्ति लाभली नाहीं, आपण मागे पडलों असे लोकांनीं म्हटलें, तरी चालेल. पण स्वतःला पचेल व पश्चाताप न होईल तितकेंच करावें, आणि प्रामाणिकपणाने वाटेल तेंच बोलावें, असा माझा स्वभाव असल्यामुळें मी शर्यतींतल्या घोड्यांप्रमाणें राजकारणाच्या रंगणांत धावलों नाहीं. तथापि हेहि प्रांजलपणानें सांगितलें पाहिजे कीं पहिल्या प्रतीच्या राजकीय पुढाऱ्यांना जें बुद्धिबळ, जी स्वार्थत्यागपात्रता, आणि जी परिश्रमशीलता लागते ती मजजवळ नव्हती. मला राजकारणांत मिळाला याहून अधिक मान मिळाला नाहीं या विषयीं माझ्या मित्रांनाच माझ्यापेक्षां अधिक वाईट वाटतें. पण त्यांना माझे खरे दोष माझ्या इतके माहीत नसतात. मी 'महत्वाकांक्षी' नाहीं हें खरें आहे. पण त्या शब्दाला वाईटाबरोबर चांगला असाहि एक अर्थ असतोच कीं नाहीं ?

पण केव्हां केव्हां माझ्या खऱ्या योग्यतेचें मोजमाप माझ्या प्रतिपक्षीयांच्या निंदेतूनच प्रगट झालें आहे. याचें एक गमतीचें उदाहरण १९३२ च्या आगष्टांत घडलें. त्या महिन्यांत माझ्या एकसष्ठाव्या वाढदिवसाचा समारंभ माझ्या मित्रांनीं फारच मोठ्या प्रमाणावर केला. प्रायः असें मराठी वर्तमानपत्र किंवा मासिक नव्हतें कीं, ज्यानें माझा गौरव करण्याकरितां आपला विशेषांक काढून सजविला नाहीं. पांचपन्नास संस्थांनीं माझा सत्कार समारंभ केला. अभिनंदनें मानपत्रें अहेर यांचा मजवर वर्षाव झाला. अनेकांनीं गौरवपर लेख लिहिलेला 'केळकर-ग्रंथ' लागोपाठ निघालेल्या तीन आवृत्त्या मिळून पांच हजार पंधरा दिवसांत खपला ! फार काय पण मुंबईच्या 'विविधवृत्त' कारांनीहि माझ्याविषयीं एक लहानसें प्रशस्तिपर स्फुट लिहिले इतकें सांगितलें म्हणजे पुरें ! आणि अच्युतराव कोल्हटकर 'संदेश' चालविण्यास जिवंत असते तर त्यांनींहि, त्यांच्या पद्धतीनें कां होईना, मजविषयीं खऱ्या मनाचे चार उद्गार काढून मला धन्यवाद दिला असता. कारण ज्यांनीं सतत सोळा वर्षे मला निखाऱ्यांवर भाजून खाल्लें त्या अच्युतरावांच्या आंतल्या मनाच्या एका कोपऱ्यांत माझ्याविषयीं खरी आदरबुद्धि होती हें मला पक्कें ठाऊक आहे. पण पुण्यांत निघणारें 'लोक शिक्षण' असें होतें कीं त्याला यीं सर्व प्रकाराचा अत्यंत विषाद वाटला. आणि आपल्या ऑगस्टच्या अंकांत त्यानें 'टिळकभक्त' हें नांव धारण करणाऱ्या एका लेखकाचा लेख छापून माझ्या योग्यायोग्यतेची

निर्भीडपणें छाननी केली. म्हणून या लेखांत माझ्याविषयीं काय लिहिलें आहे तें आधीं देतों, आणि त्या लिहिण्यांतूनच मला अनुकूल असे पडसाद काय उठले हें सांगतों.

हा लेखक म्हणतोः—"केळकरांचे जे तुलनात्मक गुणगौरव करण्यांत आले ते तरी कितपत यथार्थ आहे ? चिपळूकरांचा दणदणीत देशाभिमान व तिखटपणा केळकरांमध्यें नाहीं. रानड्यांच्या प्रमाणें सर्व संग्राहकतेचा आरोप त्यांच्या ठायीं संभवत असला तरी त्यांच्या स्वभावाची गंभीरता व खोल तात्विक दृष्टि केळकरांमध्यें नाही. गोखल्यांचा नेमस्तपणा अंगी भरपूर आहे, पण त्यांचे अर्थशास्त्र नैपुण्य व राजकीय एकाग्रता नाहीं. केवळ साहित्यदृष्ट्या विचार केला तरी केळकरांना टिळक तांबे प्रभृति प्रसिद्ध आधुनिक कवींचा दर्जा नाही. हरिभाऊ आपट्याप्रमाणे एकहि सुरेख कादंबरी त्यांनी अद्यापि लिहिलेली नाहीं. इतकेंच नव्हे तर भावनाव्यक्त अशा चटकदार लघुकथाहि त्यांस अजून लिहितां आल्या नाहीत. उडतीं बागडतीं अनेक नाटकें त्यांनी रचिली असलीं तरी उदात्त प्रसंगांच्या अभावीं खाडिलकरांच्या नाटकांप्रमाणें तीं लोकमान्य झालीं नाहीत. इतिहास प्रबंधांत वैद्य-राजवाड्यांची सखोल विद्वत्ता व उच्च प्रतिभा नाही. वक्तृत्वांत शिवरामपंतांची सर नाहीं. तसेच स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत पंचवीस वर्षें वावरूनहि लक्ष्मणराव आपट्यांची चमक त्यांनी दाखविली नाही ! शिक्षणकार्यांत कर्वे–विजापूरकरांची चिकाटी नाही. सामाजिक सुधारणेत आगरकरांची उत्कटता नाहीं. धर्मकारणांत मुंजांची आक्रमशक्ति नाही. राजकारणी तत्वदृष्टींत अण्यांची पात्रता नाही. मग त्यांच्या ठायीं गांधीचा अतुल ध्येयनिष्ठ-त्याग आणि टिळकांचा लोकोत्तर धैर्यशाली पराक्रम नाही हें काय सांगावयास पाहिजे ?"

हा 'टिळकभक्त' पुढें लिहितो, "केळकरांच्या अंगीं गुणोत्कटता आढळत नाही याचें कारण त्यांची ध्येयशून्य दृष्टि, महत्त्वाकांक्षारहित चंचल मन, आणि स्वाध्यप्रिय प्रकृति. केळकर टिळकांना येऊन मिळाले ते उत्कट देशभक्तीमुळें नव्हे तर लिहिण्याची फार हौस म्हणून. टिळकांना एक मदतनीस संपादक हवा होता तो त्यांना तेव्हां बऱ्यापैकीं मिळाला इतकेंच. केळकरांच्या चिटणीशी व संपादकीय कोशांतून दोन तपांच्या सहवासानें निष्ठावंत सांप्रदायिक निघाला नाहीं. टिळकांच्या उत्तुंग वटवृक्षाशेजारीं केळकरांचें मोगऱ्याचें रोप लावलें गेलें. केळकरांना कोणत्याहि एका विषयांत सर्वश्रेष्ठ अधिकार प्राप्त न झाल्यामुळें ते

अठरा धान्यांचें कडबोळें बनलें आहेत. केळकरांचें राजकारण आणि साहित्य-सेवा यांचा प्रवाह आरामशीरपणें चालला आहे. त्यांना धकाधकीचा मामला नको. टिळकांच्या लढाऊ पक्षाचें नेतृत्व पत्करण्याला केळकर असमर्थ असल्या-मुळेंच तो पक्ष मागें पडला. केळकरांची मूळ प्रकृति साहित्याची असून राज-कारण ही त्याची विकृति आहे. केळकरांचें आचरण कर्मयोग्याचें नसल्याकारणानें टिळकराजकारणाला गांधीराजकारणाशी टक्कर देतां आली नाहीं."

पण आणखी एक मासलेवाईक उतारा देण्यासारखा आहे. तो कोल्हापूर येथील 'सत्यवादी' पत्रांतील आहे. माझ्या वाढदिवसाच्या निमित्तानें झालेल्या स्तुतीनें जर मला अजीर्ण झालें असते तर सत्यवादीचा हा उतारा त्या अजीर्णाला चांगलाच उतारा झाला असता! तो उतारा असाः—

"किळसवाणा-केळकर-वाढदिवस—(लेखकः—माधव गणेश बेकनाळकर. प्रस्तुतचा लेख आमच्या एका ब्राह्मण मित्रांनीं लिहिला असून तो आम्ही या खाली देत आहों. —सं. सत्यवादी.)

"गेल्या आठवड्यांत चित्पावन समाजाकडून केळकरांचा जो अवास्तव उदो-उदो करण्यांत आला त्याने 'तात्या' विषयी लोकांमध्यें चुकीने राहिलेला 'कांहींसा' आदर आपोआपच नष्ट होत चालला आहे. केळकर हे एक साहित्य सेवक या नात्यानें त्यांचा थोडासा सत्कार होईल अशी बऱ्याच प्रामाणिक लोकांची समज़त होती. पण बेडकाचा बैल होऊं पाहणाऱ्याची जी एक गोष्ट सांगतात, त्या गोष्टी-प्रमाणें केळकरांच्या अंध व स्वार्थसाधु चहात्याकडून त्यांना तट्ट फुगविण्यांत येत आहे. बाकी या प्रसंगीं मी एवढी इच्छा करितों कीं, बैल होऊं पाहणाऱ्या बेडका-प्रमाणें केळकरांची अवस्था होऊं नये!

"वास्तविक आज हिंदुस्थान देश संकट परंपरेच्या गर्तेत सांपडला आहे. जगद्मान्य महात्मा गांधीजी, तरुणांचे पंचप्राण पं. जवाहिरलाल नेहरू, स्फूर्ती-किरण सरदार वल्लभभाई पटेल वगैरे हजारों देशभक्त व देशसेविका, देशाच्या बंध-विमोचनार्थ, तुरुंगवासांतील खडतर हाल उपभोगीत आहेत. त्यांतच मॅक्डोनाल्ड साहेबांनीं जातिविषयक निर्णय जाहीर करून हिंदुस्थानच्या राजकीय शक्तीला त्यांनीं एकप्रकारचें आव्हानच केलें आहे. अराष्ट्रीय वृत्तीचे माथेफिरू मुसलमान, हिंदुस्थान देशाला हिरव्या निशाणाखालीं आणण्याची भाषा बोलूं लागले आहेत.

आणि अशा आणीबाणीच्या वेळीं राष्ट्र केसरीवर आरूढ झाल्याची घमेंड मारणारे केळकर, आपल्या वाढदिवसाचीं पक्वान्नें झोडीत व अहेराच्या राशी लुटीत मजा मारूं लागले आहेत. हें दृश्य शिवरायाच्या तेजस्वी महाराष्ट्राला कसें सहन होईल ! तेजस्वी महाराष्ट्र यापुढें केळकरांना देशद्रोही केळकरच म्हणणार !

" राष्ट्रीय संकटाला घरचें संकट समजण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. म्हणूनच शिवबाचा सेनापति तानाजी हा आपल्या एकुलत्या एक मुलाच्या लग्न सोहळ्यांत गुंग असतां, सिंहगडावरील संकटाची त्याला वर्दी मिळतांच ' आधीं सिंहगडाचे लग्न आणि नंतर मुलाचे'.....अशी वीरोचित गर्जना करून तो सिंहगडावर चालून गेला. आणि केळकर ! अरेरे ! ! तो बाजीरावाच्या वळणावर गेला. पुण्यास शत्रूंचा चौफेर गराडा पडला असतांना बाजीरावाला आषकबाजीचा व लाडू जिलब्याचा मोह सुटला नाही. केळकरहि आज त्याच मोहांत सांपडले आहेत.

"आज टिळक हयात असते आणि हिंदुस्थान देशांत स्वातंत्र्याप्रीत्यर्थ असें होमकुंड पेटून राहिलें असतें, तर टिळकांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून त्या होमकुंडांत उडी घेतली असती.

" पण हाय ! तेरड्याप्रमाणें दिवसांतून तेरा वेळां रंग पालटणारे केळकर, फंडगुंडांची टोळी जमवून जनतेचा पैसा फस्त करणारे केळकर, गुरुमाऊलीच्या (टिळकांच्या) मुलाच्या आत्महत्येला कारणीभूत होणारे केळकर, जगद्वंद्य महात्मा गांधीजींवर शिंतोडे उडविण्यांत धन्यता मानणारे केळकर, टिळकांनीं ज्या छत्रपति घराण्याबद्दल शेवटपर्यंत आदरभाव व्यक्त केला, त्याच छत्रपति घराण्यावर टिळकांच्या पश्चात् बेशरमपणें लाथा झाडणारे केळकर, लक्षावधि मूक जनतेच्या हक्काची पायमल्ली करणारे केळकर, म्हणजे नीतिमत्ता, देशसेवा, प्रामाणिकपणा व बंधुभाव इत्यादि महत्तम गुणांची फारकत झालेले केळकर, टिळकांची परंपरा चालविण्यास समर्थ कसे होणार ! आणि शिखंड्याप्रमाणें नेकजात काँग्रेस पुढाऱ्यांवर कितीहि बशिंड्यांच्या लाखोल्या वाहिल्या तरी त्यांना काँग्रेसचें अध्यक्षपद तरी कसें मिळणार !

" कर्तबगार मनुष्याच्या पाठीमागें मान धांवत जातो, तर नादान मनुष्य मानाच्या पाठीमागें कुत्र्यासारखा धांवत असतो. केळकर आज असेंच मानाच्या पाठीमागें लागले आहेत. कारण हा वाढदिवस समारंभ घडवून आणण्याची

त्यांचीच योजना आहे (!) या योजनेमुळें बिचाऱ्या पुण्यांतील चांभारांनासुद्धां हा समारंभ साजरा करून केळकरांना 'मुत्नाळी जोडा' अर्पण करावा लागला.

"शेवटीं पुढारी होण्याला केळकर सर्वस्वी नालायक कसे आहेत हें दाखवून हा लांबलेला लेख पुरा करतो. केळकर मागें कोल्हापुरास आले. त्यांनीं राजाराम कॉलेजांत 'अंडें' खाल्ले. त्यानंतर विद्यापीठांत त्यांचें व्याख्यान झालें. तेथें त्यांना हार मिळाला नाहीं. एवढ्यावर स्वारी गरम झाली, आणि हा अपमान झाला असें समजून त्यांनीं तेथून पलायन केलें. महाराष्ट्रीय राजकीय गुरु (!) ची हीच कां रीत ! अशा नादान मनुष्याचा उदोउदो करून पुण्याचे चित्पावन काय साधणार ! "

मजवरची टीका या लेखांतून मी उतरून घेतली यांचें कारण माझ्या एकसष्ठाव्या वाढदिवसाच्या समारंभाला ही एक-दोनच गालबोटें लागलीं ! 'लोकशिक्षणां'तील टीका करणारानें टीका करण्यांत चातुर्य दाखविलें, पण आपलें नांव गुप्त ठेवण्यांत त्यानें भ्याडपणाच दाखविला. यःकश्चित् माझ्यासारख्या एका व्यक्तीवर उघड टीका करण्याचें धैर्य ज्याला नाहीं, तो स्वतः राजकीय रणसंग्रामांत धैर्याची मशाल पाजळणारा कितीसा असेल याची कल्पना कोणालाहि करतां येईल. आतां हा समारंभ करणाऱ्या माझ्या मित्रांना किंवा मलाहि तो भ्याला नसेल. पण त्या प्रसंगीं मला अनुकूल असें प्रचंड लोकमत आणि वातावरण जें निर्माण झालें त्याला तरी हा 'नांवचोर' भ्याला हें उघड ठरतें ! 'टिळकभक्त' हें भ्रामक नांव धारण करूनच त्याला आपल्या संरक्षणार्थ एक नकली ढाल धरावी लागली. स्वतःची किंमत तो मनांत बहुधा ओळखून असावा. पण 'टिळकभक्त' हें नांव धारण करण्यांत जो त्याचा हेतु—म्हणजे हा टिळकांचा एक अभिमानी टीका करीत आहे म्हणून ती टीका यथार्थ आहे असें लोकांना वाटावें—तो मात्र साधूं शकला नाहीं. कारण माझा एवढा समारंभ करण्यांत माझ्या मित्रांची चूक झाली असें क्षणभर मानलें तथापि ते झाले तरी काय टिळकांचे वैरी होते ! तेहि टिळकभक्तच ! माझ्या प्रेमापेक्षां टिळकांचें प्रेम त्यांना केव्हांहि खचित अधिक होतें. टिळकप्रेमाला किंवा टिळकाभिमानाला अशा समारंभानें उणेपणा येतो असें त्यांना वाटलें असतें तर ते हा समारंभ करतेच ना ! उलट टिळकसांप्रदाय जो थोडा तरी मी उरूं दिला, त्या विषयींचा आनंद त्यांनीं या समारंभाचा प्रसंग साधून प्रगट केला असेंच निश्चित ठरतें.

प्रथम एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे ती ही कीं, जर माझा समारंभ १९३२ च्या कायदेभंगाच्या ऐन प्रसंगीं न होता, तर कदाचित् या लेखकाला ही टीका करण्याची स्फूर्ति झाली नसती. तसेंच हा समारंभ झाला याहून फार लहान प्रमाणावर झाला असता तरीहि त्यानें कदाचित् त्याची उपेक्षा केली असती. पण हा प्रसंगयोग आणि समारंभाचें हें प्रमाण या दोनहि गोष्टी माझ्या हातच्या नव्हत्या. १९३२ सालींच माझ्या बयाचीं साठ वर्षें पुरीं झालीं त्याला माझा काय उपाय ? हा योग ठीक नाहीं असें जाणून माझी मीच या उत्सवाला अत्यंत निकराची हरकत घेतली होती. पण ती यशाला गेली नाहीं. मी सांगतो कीं, हेच निर्भेळ सत्य असून ज्यांना या समारंभाच्या योजनेची खरी अंतस्थ माहिती आहे त्यांना तें पूर्णपणें विदित आहे. 'माझ्या हस्तकांकडून मी हा समारंभ करविला किंवा त्याला मुळांत मी हरकत केली नाहीं ' हें म्हणणारा केवळ द्वेषबुद्धीनें निखालस खोटें बोलत आहे असें मी ठासून सांगतों. गांधी व इतर काँग्रेसपुढारी पुण्यास येतात व त्यांचे सत्कार समारंभ होतात ते करणारे त्यांचे अनुयायीच असतात. पण त्यांना ' हस्तक ' म्हणणें अश्लाघ्य होईल. तसेंच हे पुढारी असले समारंभ त्यांच्याकडून करवितात हें म्हणणें त्याहून अधिक अश्लाघ्य होय. हें समारंभ अनुयायांच्या आत्मस्फूर्तीनेंच होतात आणि माझा समारंभहि तसाच झाला. मी इतर कसाहि असेन किंवा नसेन. पण आपल्या तोंडासमोर पाजळावयाच्या मशालीला फडकीं गुंडाळणारा, किंवा त्यांवर चोरून तेल ओतणारा, असा मी कधींच नव्हतों हें मलाच काय पण इतर पुष्कळांना चांगलें माहीत आहे.

आतां हा समारंभ इतक्या मोठ्या प्रमाणावर झाला याचें खरें कारण हेंच कीं, माझ्या अल्पशक्तीप्रमाणें ज्यांचा ज्यांचा कांहीं उपयोग मजकडून झाला किंवा ज्यांचें मत मजविषयीं खरोखरच चांगलें होतें त्यांना, हा मनुष्यजन्मांत येणारा एकच सुप्रसंग असतो म्हणून, मजविषयींची कृतज्ञता व गुणग्राहकता प्रगट करावी असें वाटणें स्वाभाविक होतें. मी स्वभावानें खत्रूड नाहीं, मी कोणाच विघात तर करीतच नाहीं पण झाला तर उपकार किंवा उपयोगच करितों, ही गोष्ट ' टिळकभक्ता'मारख्या माझ्या शत्रूलाहि स्वीकारावी लागेल. मी गेल्या एप्रिल महिन्यांत किती संस्थांचा राजीनामा देऊन संबंध सोडला हें प्रसिद्धच आहे. अर्थात अशाच पुष्कळ संस्थांनीं व व्यक्तींनीं या समारंभाची संधि मजवर प्रत्युपकार करण्याकरितां साधली म्हणूनच त्याला असें मोठें स्वरूप आलें. माझ्याविषयीं यावेळीं

"महाराष्ट्रीयांच्या प्रेमादर समुद्राला तुफान भरती आली होती. गुणगानांच्या मंजूळ वाद्यांचा कल्लोळ, अभिनंदनाच्या व मानपत्रांच्या रूपानें उधळलेल्या गुलालयुक्त मंगलाक्षतांमुळें दशदिशांस आलेला धूसरपणा, वाक्सुमनांचा वर्षाव व आशीर्वादादि जयघोष"—अशा विद्वेषगर्भ पण उज्ज्वल शब्दांनीं या समारंभाचें वर्णन करणारानें एका दृष्टीनें वस्तुवर्णन करून 'मी केळकरांच्या स्तुतींत भर टाकतों आहे' हें तरी लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें. हें थोडें तरी वस्तुवर्णन नसेल तर हा लबाड खोटें कां बोलतो ! आणि तें वस्तुवर्णन असेल तर त्यानें मणगटें चावून टांचा घासून काय उपयोग ! त्याला स्वतःला हा समारंभ अप्रिय असेल. पण तो तसा झाला खरा ! आणि त्याला काडीइतकाहि प्रतिकार झाला नाहीं. पुण्याला तो खरोखर आवडला नसता तर तो उधळून लावायला किंवा बेरंग करायला कोणी नको म्हटलें होतें !

असो. टिळकभक्तानें केलेली टीका मी अमान्य करीत नाही. पण तींत मला लावलेलीं विशेषणें पुष्कळशी अकरणरूपी म्हणजे 'नीगेटिव्ह' आहेत. उलट स्वरूपाचे प्रत्यक्ष असे 'पॉझिटिव्ह' दोष त्याला मुळींच दाखवितां आले नाहींत. "केळकर आहेत त्या पेक्षां अधिक चांगले असावयास पाहिजे होते" ही टीका पोचट ठरते ! तशा प्रकारची टीका कोणावरहि करतां येईल. प्रश्न असा आहे कीं टिळकांना सर्व प्रांतांत मान्यता होती याचा अर्थ त्यांचा सांप्रदाय सर्व प्रांतांत होता; मग महाराष्ट्राबाहेर त्यांचा कट्टा अभिमान धरून गांधींच्या धोरणाला हाणून पाडण्याला मजहून दुसरा कोणी पुढें कां आला नाहीं ? आणि महारांष्ट्रातहि ? महाराष्ट्रांतील परांजपे खाडिलकर वैद्य यांनीं तें काम कां करूं नव्हतें ? ते तर 'टिळकभक्ता'च्या मताप्रमाणें केळकरांपेक्षांहि अधिक कट्टे निष्ठावंत टिळकाभिमानी ना ! पण अवघ्या एकदोन वर्षांतच ते टिळकांचें निशाण पळवून नेऊन गांधीच्या गोटांत कां शिरले ? टिळकांचा पाठीराखेपणा गेल्यानंतर केळकरांच्या हातीं राहिलेल्या निर्जीव केसरीला नामोहरम करायला त्यांना कोणी हरकत केली होती ? गुरुपालट केलेल्या या टिळकभक्तांनीं केलें तेच योग्य असेल, तर टिळकांचा सांप्रदाय महाराष्ट्रांत बुडाला या 'टिळकभक्ता'च्या ओरडींत काय अर्थ ? टिळकांचा सांप्रदाय उरला नाहीं ही जर या 'टिळकभक्त' म्हणविणाराची प्रामाणिक तक्रार असेल तर वरील गृहस्थांनीं केलेला हा गुरुद्रोह होता असें टिळकभक्ताला वाटावें, व तसें वाटत असल्यास त्यांनाहि त्यानें केळकरांबरोबर शेलापागोटें द्यावयास पाहिजे होतें. पण एकट्या केळकरांवरच त्याचा रोष !

टिळक सांप्रदाय निस्तेज झाला तो एकट्या महाराष्ट्रांत झाला असता तर गोष्ट वेगळी. पण तो महाराष्ट्रापेक्षांहि इतर प्रांतांत अधिक नष्ट झाला. याला मौजेचें प्रत्यंतर हेंच कीं, कट्टर काँग्रेसवाले गांधींचे पाय मागें ओढण्याचें पाप केल्याचा दोष मुख्यतः महाराष्ट्रालाच देतात. मग हें खरें कीं 'टिळकभक्त' म्हणतों तें खरें ! दोनहि एकदम खरीं असूंच शकत नाहींत. माझ्या हातीं केसरी होता म्हणून टिळक सांप्रदाय टिकविण्याची जबाबदारी माझ्यावर होती हें मी ओळखून होतों. म्हणूनच मी असहकारितेच्या आहारीं गेलों नाहीं. पहिल्या दिवसापासून गतवर्षीपर्यंत मी टिळक सांप्रदाय टिकविण्याचाच प्रयत्न लेखांनीं व भाषणांनीं केला, त्याकरितां लोकांची अप्रीति सोसली, काँग्रेसनिष्ठांच्या शिव्या खाल्या. टिळक सांप्रदायाला बेइमान होऊन, केसरीला व मला आपली प्रतिष्ठाच वाढवावयाची असती तर तो मार्ग याहून कितीतरी अधिक सोपा होता. केसरीवर हातरहाटाचें ध्वजचिन्ह लाविलें असतें, केसरी कचेरींतल्या नोकरांवर खादीच्या पोषाखाची सक्ति केली असती, स्वतः गांधी टोपी घातली असती, आणि अहिंसा सत्य यांचा अप्रामाणिकपणें पण मोठ्यानें पुकारा केला असता, म्हणजे केसरीची लोकप्रियता टिकून राहिली असती ! मला स्वतःला लोकांच्या डोळ्यापुढें चमकत राहतां आलें असतें ! मी बहुधा काँग्रेसचा अध्यक्षहि होऊन गेलों असतों. तथापि गांधीचे चेले म्हणून जे कित्येक महाराष्ट्रीय पुढारी बनले त्यापेक्षां मी कोणत्याहि बाबतींत उणा नाही असें मात्र मला वाटतें. आणि मी जो निदान लोकप्रियतेचा स्वार्थत्याग केला तो शक्य तितका टिळक सांप्रदाय टिकावा म्हणूनच !

असो. 'टिळकभक्तां'च्या डोळ्यांत सलणारा जो माझा समारंभ माझ्या मित्रमंडळींनीं इतक्या थाटानें केला त्याचें एक खरें व विशेष कारण असें होतें कीं, 'टिळकभक्ता'प्रमाणें माझी निंदा करणारीं अनेक तोंडें व लेखण्या महाराष्ट्रांत लवलवत होत्या, म्हणून माझ्या मित्रांना हें दाखवावयाचें होतें कीं हें माझे निंदक म्हणजेच कांहीं महाराष्ट्रीय जग नव्हे. माझ्या मूठभर 'हस्तकां'नीं समारंभाची उठावणी केली असें घेऊन चाललें तरी, ज्या शेंपन्नास संस्थांनीं व व्यक्तींनीं माझा सत्कार केला ते सर्व माझे हस्तकच होते काय ? बरें, मला महाराष्ट्रांत इतके 'हस्तक' खरोखरच होते तर मग मला महाराष्ट्राचें पाठबळ नव्हतें असें कसें म्हणतां येईल ! कट्टर काँग्रेसवाल्यांना जो प्रिय झाला तोच खरा 'लोकप्रिय' असें काय म्हणून मानावयाचें ? काँग्रेसच्या बाजूला जितके लोक तितके लोक संख्येनें माझ्या बाजूला नसतील.

परंतु माझा सत्कार करणारांमध्यें सामान्य काँग्रेसवाल्यापेक्षां सुशिक्षित, शिष्ट, समाजांत मान्यता पावणारे असे अनेक लोक होते असें खचित म्हणतां येईल. 'केळकर-ग्रंथ' कोणी चाळला तर त्याला हें तेव्हांच दिसून येईल. माझ्या मित्रांना माझा हा समारंभ थाटानें करण्याचा एक प्रकारचा हिसाळच आला म्हणाना ! ते म्हणत "काँग्रेसवाल्यांच्या निंदेला हें आमचें प्रत्युत्तर जितकें खणखणीत देतां येईल तितकें आम्ही देणार. मग केळकरांना न पटणारी अतिशयोक्तीहि त्यांत थोडी झाली तरी हरकत नाहीं. काँग्रेसवाल्यांच्या तोंडच्या फुंकरानें उडून जाण्याइतका हलका पाला पाचोळा अजून केळकर व केसरी हे झाले नाहींत. आमच्या समारंभाचें यश हेंच केळकरांच्या निंदकांना रोखठोक उत्तर !"

असो. माझ्याविरुद्ध 'टिळकभक्ता'ला काय म्हणायचें होतें ते वर सांगितलेंच. आतां त्याच्या निंदेतूनहि काय निष्पन्न होतें हें पाहूं. पुराव्याच्या शास्त्रांत असा एक नियम आहे कीं, स्वतःच्या हितविरुद्ध किंवा प्रतिकूल असें जो कोणतेंहि विधान कोणी करितो तें केवळ त्याचमुळे पुराव्याला ग्राह्य ठरतें. म्हणून 'टिळकभक्ता'च्या लेखांत मला अनुकूल काय काय विधानें त्यानें कळत न कळत केलीं आहेत तीं खालीं देतों. तो म्हणतो, "केळकरांच्या वाङ्मय मोहिनीनें महाराष्ट्राची बुद्धि बधिर झाली होती." ठीक ! एका सबंध प्रांतांची बुद्धि बधीर करण्याइतकी शक्ति माझ्या लेखणींत होती असें निंदकानें कबूल करणें हा माझ्या लेखणीचा विजयच मी कां मानूं नये ? एवढ्या गौरवानेंहि माझी योग्यता एका अंगापुरती बरीच श्रेष्ठ दर्जाची ठरते.

"केळकरांनीं महाराष्ट्र शारदेचें सुवर्ण मंदिर बांधलें, तिला आपल्या काव्यनिर्झरिणीच्या जलानें अभ्यंग स्नान घातलें, साहित्याच्या ताण्यानें व राजकारणाच्या बाण्यानें ठासून विणलेलें महावस्त्र नेसविलें, कालिदास ज्ञानेश्वरांच्याप्रमाणें सुंदर उपमापुष्पांनीं भूषविलें, ललित नाट्यालंकारांनीं मंडित केलें, रागमाला चढविल्या, इतिहास चरित्रादि धूपदीप उजळला, व उपमापुष्पांवर बागडणाऱ्या विनोद फुलपाखरांनीं संकलित केलेल्या साहित्यमकरंदाचा महानैवद्य अर्पण केला असें मोठें सोज्वल वर्णन एखाद्या केळकरभक्त रसिकास करतां येईल हें आम्ही जाणतों" असें हा निंदक म्हणतो. तर मीहि म्हणतों कीं असें वर्णन करणारा जरी एक सहृदयभक्त मला लाभला, तरी एखाद्या 'टिळकभक्त' निंदकाला संक्षेप

देण्याला तें पुरें आहे. 'टिळकभक्ता'ला तरी अधिक प्रातिनिधिक स्वरूप आहे कशा-वरून ? तोहि या भक्ताप्रमाणें एकच व्यक्ति !

"आपल्या बुद्धिचापल्यानें व लेखनकौशल्यानें केळकरांनीं टिळकांच्या राजकारणी चिटणीशीचें व संपादकीय काम रीतसर पार पाडलें" असें सर्टिफिकीट हा 'टिळकभक्त', त्याला इतर कोणती मुरड न घालतां, मला देतो. तेवढ्यावर मी संतुष्ट आहे. टिळकांना माझ्या इतका योग्य राजकारणी चिटणीस, आणि केवळ आपला आत्मा असें टिळकांनीं मानलेल्या केसरीचा संपादक, होण्याला दुसरा कोणी महाराष्ट्रीय शिष्य मिळाला नाहीं हें या सर्टिफिकीटानेंच सिद्ध होतें. माझ्या जागीं दुसरा कोणी आधिक लायख सहाय्यक टिळकांना मिळाला असता तर तो न नेमण्याला टिळकांचे हात कोणी धरले नव्हते ! किंवा मी त्यांना तसें न करण्याला एखाद्या करारानें बांधून घेतलें नव्हतें ! टिळक हे आपल्या कार्यसिद्धीवर लक्ष देणारे दक्ष होते, आणि कार्य सिद्ध होण्यासारखा मी त्यांना वाटलों, ही माझी मूकप्रशस्ति काय थोडी झाली ? माझी भीड टिळकांना न मोडवावी असें काय कारण होतें ? माझी तुलना करितांना जर टिळकांचा मोठेपणा जमेस धरावयाचा तर त्यांच्याकडून माझी निवड होण्याच्या बाबतींतहि तो मोठेपणा जमेस कां न धरावयाचा ? मला निवडून घेण्यांत टिळकांनीं चूक केली असें या निंदकानें कोठेंहि सुचविलें नाहीं, आणि तसें सुचविण्याची त्याची छातीच होणार नाहीं. टिळकांच्या योजनेला दूषण देणारा हा स्वतःच मूर्खांत निघावयाचा हें त्याला ठाऊक आहे खचित. बरें, माझी ही नेमणूक फसगतीनें किंवा विशेष नडीमुळें टिळकांनीं कांहीं वेळ थोडी तात्पुरती केली होती असेंहि नाहीं. १८९७ पासून १९२० पर्यंत तीन निरनिराळ्या वेळीं माझी नेमणूक केसरीचा संपादक म्हणून स्वतः टिळकांनीं केली. आणि केसरी हें राजकारणाच्या चळवळीचें मुख्य साधन म्हणून त्यांनीं मानलें होतें हें तर जगप्रसिद्ध आहे. मग राजकारणाच्याहि दृष्टीनें निदान केसरी चालविण्याला मी योग्य व समर्थ आहे असें वाटल्याशिवायच कां त्यांनीं तसें केलें असेल ? या बाबतींत माझी जी कोणतीहि निंदा ती अप्रत्यक्ष टिळकांचीच निंदा होणार नाहीं काय ? टिळक हे व्यक्तीचे अभिमानी होते कीं ध्येयाचे ? मग मजकडून त्यांच्या ध्येयाला बाध येण्याची शंका त्यांना असती तर त्यांनीं माझा मुलाहिजा धरला असता काय ? इतकें कशाला, पुढच्याच पानांतील या निंदकाची कबूली पहा. तो लिहितो, "इतर अनुयायांपेक्षां केळकर हे संपादकीय व चिटणीशी गुणांत श्रेष्ठ म्हणून

त्यांस टिळकांची गादी मिळाली" होय. इतकें तरी कबूल ना! मग मी जें माझ्या निंदकांना उत्तर देण्याकरितां, पण तसें उत्तर देण्यापुरतेंच, म्हणत असतों कीं, स्वतः टिळकांच्या मानानें मी केरकचरा असेन पण टिळकांच्या व माझ्या-मध्यें महाराष्ट्रांतला दुसरा कोणीहि येऊं शकला नाहीं हें खरें कीं खोटें! इतरां-च्या अंगीं माझ्यापेक्षां अधिक योग्यता असती तर त्यांनीं काय दुसरें वर्तमानपत्र काढलें नसतें! आणि काढूनहि झालींच कीं! त्यांनीं टिळकांची परंपरा व सांप्र-दाय टिकविण्यांत काय दिवे लावले! काय प्रकाश पाडला! शेवटीं हा निंदक समारोपादाखल म्हणतो "केळकरांनीं केसरी-मराठा संस्थेची सांगड तरती ठेवली आहे." पुष्कळ झालें मला! "इतर टिळकशिष्य असहकारितेच्या महापुरांत वाहवून गेले असतां केळकरांनीं टिळकांच्या राजकारणाचा स्फुल्लिंग जीवंत ठेवला" असें हा निंदकहि म्हणतो! बस्स, इतकें पुष्कळ झालें मला!

मी स्वास्थ्यप्रिय आहे असा एक आक्षेप या छद्मी 'टिळक भक्ता'नें मजवर घेतला आहे त्याचेंहि उत्तर असें. मी मनानें शांतताप्रिय आहे ही गोष्ट खरी आहे. मला कोणत्याहि गोष्टींत दंगल धांदल बाचाबाची गोंधळ हाणामारी आवडत नाहीं. यामुळें साध्या गर्दीदाटीच्या सभांनाहि मी कंटाळतों. मला स्वस्थपणानें झालेली चर्चा व विचारविनिमयच आवडतो. मी स्वास्थ्यप्रिय असलों तरी त्याचा अर्थ मी भिला आहे असा फार तर होईल. पण उद्योगाचा कंटाळा असा मात्र नव्हे. कारण घरबसल्या किंवा शांततेचें वातावरण असलेल्या जागेंत सभांतूनहि दहादहा बाराबारा तास मी काम करूं शकलों. मी दौऱ्यांची दगदगहि पुष्कळ वर्षे सोसलीं आहे. पण व्यर्थ धुमाकुळाचे प्रसंग मात्र मला आवडत नाहींत. 'स्वास्थ्यप्रिय' हा शब्द 'आळशी' या अर्थानें लेखकानें वापरला असल्यास तो सर्वस्वी चुकीचा आहे. मी आळशी असतों तर माझ्या हातून इतकें वाङ्मय लिहून झालेंच नसतें. आणि बहुतेक वाङ्मय केसरी-मराठा पत्राचें व संस्थेचें काम आणि इतर दगदगीचे व्यवसाय संभाळून उरल्या फावल्या वेळेंतच लिहिलेलें आहे. माझ्या बरोबरीच्या लोकांपेक्षां माझ्यामध्यें कामाचा उरक हा गुण तरी अधिक आहे असें मी विनयानें पण अभिमानानें म्हणूं शकेन. इतक्या निरनिराळ्या संस्थांचे उद्योग व कार्यें मी केलीं तीं मी खरोखरच 'स्वास्थ्यप्रिय' असतों तर माझ्या हातून पार पडलीं नसतीं. मला स्वास्थ्य आवडतें याचा अर्थ जें निष्कारण असें अस्वास्थ्य असतें तें मला आवडत नाहीं. दिवसभर घालमेल वटवट हालचाल करणारीं पण हातून

प्रत्यक्ष विधायक कार्य काडीचेंहि न होणारीं किती तरी माणसें मी नित्य पाहतों.

बरें. स्वास्थ्य हा शब्द सांपत्तिकस्थितीच्या दृष्टीनें योजिलेला असेल तर त्याला-हि माझें उत्तर असें. सर्वस्वी स्वावलंबी जीवन हें माझें ध्येय आहे. आणि केसरी-सारख्या संपन्न संस्थेकडेच मला जन्मभर नोकरी मिळाल्यानें योग्य ते श्रम करून कुटुंबनिर्वाहाला अवश्य तें द्रव्यसाधन मला मिळवितां आलें. सर्व जन्म निष्कर्जी अनृणी असा मला काढतां आला. अशाप्रकारचें स्वास्थ्य सर्वथा स्पृहणीयच नव्हे काय ? पण स्वास्थ्याकरितां मी कोणत्याहि जबाबदाऱ्या टाळल्या नाहींत किंवा कर्तव्यच्युत झालों नाहीं. अस्थिर बुद्धीनें भांडणतंटे करून हातच्या नोकऱ्या घालवाव्या, कर्जवाम करावें, लोकांना बुडवावें, परावलंबी व्हावे, सार्वजनिक द्रव्य-निधि मिळेल त्यावर स्वतःला पोसावें, उणें पडल्यास लोकांत दैन्य मिरवावें, अशा जीवनक्रमांत अद्भुतपणाचें 'रोमान्स' असतें ते मजमध्यें पाहावयास सांपडले नसेल. पण घरी मोठा प्रपंच असतां मी नोकरीची पहिली वीस बावीस वर्षे केवळ शंभर रुपये पगारावर काढली ! आणि तेव्हां प्रॉव्हिडंट फंड इत्यादि कांहीं अवांतर तजवीज नसतां, दैव कसेतरी म्हातारपणी किंवा सेवामुक्त झाल्यावर निभवून नेईल या आशेवर बावीस चोवीस वर्षे काम केलें, त्यांत खरोखर मनः-स्वास्थ्य मला कितपत लाभलें असेल ? बरे पुढें माझें इतर ग्रंथ वाङ्मय द्रव्यदृष्ट्या हात देऊं लागलें, व पगारहि वाढला, तेव्हां मी दहा हजार रुपयांची सार्वजनिक देणगी एकसष्ट्याव्या वाढदिवसादिवशी दिली. माझ्या अवांतर देणग्या वर्गण्यांचीहि रक्कम सुमारें चारपांच हजारांपर्यंत जाईल. मोटार घेतली ती वयाच्या त्रेसष्ट्याव्या वर्षी ! मी श्रीमंती थाटानें कधीच राहिलों नाही. आणि म. गांधीच्या एक वेळच्या आहाराला जितका खर्च येतो असें सांगतात तितका कांहीं माझ्या दोन जेवणाला येत नाहीं खास ! बरोबरीच्या अशा कोणत्या ठळक पुढाऱ्याच्या तुलनेनें मी स्वास्थ्य भोगलें तें या निंदकानें बेलाशक सांगावें.

माझी योग्यता कमी ठरविण्याला या 'टिळकभक्ता'ला रानडे टिळक गांधी गोखले यांचीं नांवें घेऊन मी एकेका विशिष्ट बाबतींत त्यांच्या सारखा नाहीं असें म्हणावें लागले यांतच निवाडा झालाना ! मी तरी कुठें कधीं म्हटलें आहे की मी या श्रेष्ठ लोकांसारखा आहे म्हणून ? पण माझ्या निंदकाला माझी तुलना करण्याला ही पहिल्या प्रतीचीं नांवें पणाला लावावी लागली यांतच मी माझा मोठेपणा समजतों. शिवाय या लेखकाच्या नकारार्थी वर्णनपद्धतींत गुप्त हेत्वाभास असून

त्याची बाजू या पद्धतीनें त्याच्यावर सहज उलटवितां येण्यासारखी आहे. कसें तें पहा. रानड्यांनीं गोखल्यासारखा स्वार्थत्याग केला नाहीं. गोखल्यांनी राजवाड्यांसारखे इतिहास लिहिले नाहींत आणि हे म्हणे इतिहासाचे प्रोफेसर ! गोखल्यांनीं टिळकांसारखी धडाडी कोठें दाखविली ? टिळकांना गोखल्यासारखें इंग्रजी वक्तृत्व नव्हते ! तात्पर्य, कोणांत काय होतें हें न पाहतां दुसऱ्या एखाद्या सारखें काय नव्हतें हेंच पाहत गेल्यास कोणालाहि श्रेष्ठपदावरून खालीं ओढतां येईल ! हरिभाऊ आपटे तरी रवीद्रनाथ टागोरासारखे तत्वज्ञानी कोठें होते ? राजवाड्यांना खाडिलकरांसारखी नाटकें कोठें लिहितां येत होती ? चिंतामणराव वैद्यांना खाडिलकरांसारखे ललित वाङ्मय कोठें लिहितां येत होतें ! ठरलें कीं नाहीं हे सगळे त्या त्या दृष्टीनें नादान ! एवढेच काय ! मीहि धटेंने म्हणूं शकेन की वरचे हे सगळे माझ्याहिपेक्षां एका दृष्टीनें कनिष्ठ ठरतात. त्यांच्या बुद्धीला माझ्या बुद्धीप्रमाणें चौरसपणा कोठें होता ! ते एखाद्या मुख्या विषयांत फर्स्टक्लासांत आले असतील. पण सर्व विषयांत दुसऱ्या वर्गाचे मार्क मिळवून एकंदर बेरजेच्या दृष्टीनें त्यांच्या इतकीच माझी बेरीज भरली असे कां म्हणूं नये ? वट ( टोटल ) बेरीज हा एक स्वतंत्र विषय मानला तर तेवढ्यापुरता मलाहि वरचा क्लासच मिळेल.

'लोकशिक्षणां'तील या लेखकानें या चर्चेंत इतरांचीं नावें घेतली म्हणूनच मला हेंहि अप्रिय काम करावें लागलें, आणि उदाहरणार्थ म्हणून मला असें म्हणावें लागतें की माझे 'तोतयाचें बंड' हे नाटक घेतलें तर खाडिलकरांच्या कोणत्याहि नाटकाच्या बरोबरीचें तें ठरेल. चिंतामणरावांना माझ्यासारखें सुश्लिष्ट वाङ्मय मुळींच लिहितां आलें नाहीं. हरिभाऊ आपट्यापेक्षां मी अधिक चांगला निबंधकार होतों हें कोणीहि मान्य करील. तसेंच राजकारणाचें ज्ञानहि. आणि हटवादानें बोलावयाचेंच झाले तर मी म्हणेन कीं साहित्याचार्य किंवा साहित्यसम्राट ही पदवी लोकांनीं मलाच दिली. ती वरील तिघाचौघांपैकीं कोणालाहि दिली नव्हती. आणि एकसष्ठाव्या वाढदिवसाचा असा समारंभ लोकांनीं टिळकानंतर माझा एकट्याचाच केला. तोंडीस तोड म्हणून ईर्षेनें दुसऱ्या एकाचा करण्याचे मुंबईस माझ्या कांहीं प्रतिपक्षांनीं मनांत आणले होतें. पण त्याचा बोजवारा कसा झाला हें प्रसिद्धच आहे ! लोकमत हे एका गोष्टी पुरतें जमेस धरून दुसऱ्या गोष्टी पुरतें सोडतां येत नाहीं. साहित्याच्याहि बाबतींत मला उणेपणा आणण्याकरितां याच 'लोकशिक्षणा'च्या आक्टोबरच्या अंकांत राजाराम बापू देसाई यांनीं "केळकर व भाषादूषण" या मथळ्याखालीं

माझ्या कांहीं कांहीं लेखांतील नमुनेदार चुका कानामात्रा स्वल्पविराम येथपर्यंत दाखविल्या आहेत. पण प्रस्तावनेंत 'लोकशिक्षणा'च्या याच साथीदारांना म्हणावें लागलें कीं "केळकरांनीं आपल्या लेखनाच्या अमूल्य गुणांनीं व विविधतेनें मराठी वाचकांना इतकें मोहित करून टाकलें आहे कीं त्यांनीं स्वयंप्रेरणेनें 'साहित्याचार्य' ही अनन्य सामान्य पदवी त्यांना अर्पिली आहे. मीहि त्यांच्या साहित्याचा चाहता आहे." साहित्याच्याहि बाबतींत आपटे, वैद्य, राजवाडे, खाडिलकर यांना पुढें आणून मला हीन प्रतीचा ठरविणाऱ्या 'टिळकभक्ता'ला देसाई यांचा हा दाखला सादर करून, त्यानें केवळ आपल्या द्वेषबुद्धीचें प्रदर्शन करतांना स्वतःचें पाय मोडून घेतले असें मी कां म्हणूं नये?

'लोकशिक्षणां'तील लेख इतक्यावर सोडून देऊं. सार्वजनिक मनुष्याला कीर्तिप्रमाणें अपकीर्तिहि लाभते. स्तुतिप्रमाणें निंदाहि त्याच्या पदरी पडते. दोन्हीहि कांहीं अंशी सकारण तर कांहीं अंशी निष्कारण असतात. प्रथम प्रथम या दोहोंचा त्याच्या मनावर स्वाभाविक परिणाम घडतो. स्तुतीनें तो फुगून जातो. उलट निंदेनें तो दुःखी होतो. आणि या स्तुति-निंदेवरच आपलें सुखदुःख अवलंबून ठेवण्याइतका जर तो परप्रत्ययनेय व परावलंबी असेल, तर प्रतिक्षणीं उलटसुलट आंदोलन पावणाऱ्या तारेवर बसल्याप्रमाणें त्याचें जीवन अस्थिर होईल. लोकमताचा विचार करण्यांतच त्याचें मन सर्वस्वी गुंतून जाऊन स्वतंत्र असें कोणतेंहि काम त्याच्या हातून ध्येयनिष्ठेनें होणार नाही. पण तोच किंचित् विवेकी व आत्मनिष्ठ असेल तर लवकरच त्याला हें कळून येईल कीं सकारणापेक्षां निष्कारण स्तुतिनिंदाच जगांत फार. म्हणून अशा स्तुतिनिंदेला फारशी किंमत किंवा महत्त्व देण्याचें कारण नाहीं. "या स्तुतिनिंदेनें दर्शविले जाणारे मनुष्यत्वाचे दोन प्रकार उघड उघड परस्पर विरोधी, आणि मी एकच मनुष्य या दोन्ही-विरोधी प्रकारांचा कसा असूं शकेन!" हा विचार त्याच्या मनांत उदित होतो. आणि शेवटीं मी कसा आहे हें माझें मलाच माहीत आहे तें खरें अशी आत्मनिरीक्षणाची दृष्टि त्याला प्राप्त होते.

माझी आई कौतुकानें लोकांना सांगत असे कीं, "लहानपणीं आमच्या तात्याला मुडदुसाचा रोग झाला होता. तेव्हां कोणी शेजारणीनें सांगितल्यावरून त्याला मी खेटरांनीं जोखलें!" मुडदुसाचा रोग झालेलें मूल अगदीं रोडकें हडकुळें असतें; आणि मला 'जोखलें' म्हणजे तराजूच्या एका पारड्यांत मला बसवून दुसऱ्या

पारड्यांत जुने नवे चामडी जोडे घालून माझें भारंभार वजन केलें. मुडदुसाच्या रोगावरील या औषधाचा उल्लेख ग्रामवैद्यकाच्याहि एखाद्या जुन्या हस्तलिखित बाडांत सांपडेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. पण माझ्या प्रेमळ आईनें भाविकपणाच्या भरांत हें औषध किंवा हा तोडगा करून पाहिला होता ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. मग त्या खेटरांचें किंवा माझें वजन किती भरलें हें कांहीं बिचाऱ्या आईच्या स्मरणांत राहिलेलें नव्हतें. पण येथें ती गोष्ट सांगण्याचें कारण इतकेंच कीं मोठेपणीं लोकप्रियतेचा किंवा कीर्तीचा रोग मला जडला, तेव्हांहि मनानें मधून मधून माझा मीच हा तोडगा लाक्षणिक अर्थाच्या खेटरांनीं करीत असें.

माझी आई माझ्या लोकप्रियतेचा चढउतार पाहण्यास जगली नाहीं. लोकप्रियतेच्या शिखरावर मी असतांनाच ती वारली. पुढील स्थित्यंतर पाहून तिला बरें वाटलें नसतें तर मी तिला म्हटलें असतें "आई, लहानपणीं 'मुडदुसा'च्या रोगांत तूं मला खेटरानीं जोखून बरें केलेस. हल्लीं राजकारणाच्या 'धुडगुसा'च्या रोगानें मी हडकुळा रोडका झालों आहे. पण सुदैवानें या आजारांत मला खेटरांनीं जोखण्याचें काम आतां तुला करावें लागत नाहीं. तें काम कांहीं लोक म्हणजे माझे निंदक व प्रतिपक्षी परस्परच करीत आहे. ते तुझे श्रम वांचलेच कीं नाहीं ! आणि खरोखरच सार्वजनिक जीवनातला एक न्यायच असा आहे कीं, पुण्यांचे हार ज्याच्या गळ्यांत पडले त्यानें एखादे वेळीं एखादी खेटरांची ( खऱ्याहि खेटरांची ) माळ गळ्यांत पडली तर नाराज कां व्हावें !" माझी आई आणखी जगती तरी माझ्या लोकप्रियतेंतील चढउतार मला जाणवला तितका तिला जाणवला नसता. मात्र खेटरांनीं जोखण्याची कल्पना मी तेव्हां सांगितली असती तर तिला हंसूच कोसळलें असतें.

असो; स्वतःला न लाभलीं तर त्या लोकप्रियतेचीं द्राक्षें आंबट, आणि लाभलीं तर मात्र तीं द्राक्षें गोड असें मी कधींहि मानलें नाहीं. लोकप्रियता ही खरोखरच मोठी मोहनीय व लोभनीय वस्तु आहे. ती मिळाली तर नको कोणाला ! पण आपणाला लोकांनीं चांगलें म्हटलें तेव्हां ते शहाणे, आणि वाईट म्हटलें तेव्हां ते वेडे अप्रबुद्ध, हा दुहेरी आपमतलबी न्याय काय कामाचा ! लोकमत हा एक आरसा आहे. आपलें तोंड स्वच्छ व प्रसन्न असलें तर तो तसें दाखवितो, घाणेरडें अमंगळ झालें तर तेंहि तसेंच दाखवितो. स्वतः आरशाचा गुण पालटत नाहीं. तो

कायम असतो. जो फरक पडतो तो फक्त आपल्या तोंडांत. आतां आरसा रूप आहे तसे दाखवीत असला तरी कार्यकारणभावाची चिकित्सा त्याला करितां येत नाहीं. म्हणून आपणच वाटल्यास स्वतःला आरशापेक्षां श्रेष्ठ समजावें, आणि ती चिकित्सा करून वाटेल तो बोध घ्यावा किंवा समाधान करून घ्यावें. आपण केर काढीत असतां त्यांतला थोडा तोंडावर बसून तोंड घाण होतें. आंघोळ करीत असतां म्हणजे अंग स्वच्छ करीत असतां तोंडाला साबण लागून चेहरा विद्रूप दिसतो. दांत स्वच्छ करीत असतां तोंडाला राखुंडी फासली जाते. अशा स्थितींत आरशांत तोंड पाहण्याची मिजास भोगूं नये म्हणजे झालें! पण प्रतिबिंब पाडण्याचा गुण आरशांत खरा आहे हें नाकबूल करण्यांत काय अर्थ?

"लोकप्रियता हा सार्वजनिक चारित्र्याचा आत्मा आहे व ती ज्याला लाभली नाहीं त्याचें सार्वजनिक चारित्र्य अल्पमोल असलें पाहिजे" असें सकृद्दर्शनीं वाटतें. एका अर्थानें तें बरोबरहि आहे. कारण सार्वजनिक चारित्र्य म्हटलें म्हणजे त्याचा जनतेशीं संबंध येतो. म्हणून तुमचें चारित्र्य पाहून जनता तुमच्यावर जो छाप मारील तीच तुमची खरी योग्यता असें म्हटलें तर त्यांत फारसें वावगें नाहीं. पण ती योग्यता जनतेपुरता जो क्षणिक संबंध येतो तितक्यापुरतीच मानली पाहिजे. ज्याला सार्वजनिक चारित्र्य असें यथार्थतेनें म्हणतां येईल असें आचरण व कार्य हें जनतेच्या डोळ्याआडहि पुष्कळ वेळां होत असतें व होऊं शकतें. म्हणून या छापाशिवायहि मनुष्याच्या चारित्र्याची स्वतंत्र अशी कांहीं किंमत असूं शकते. अर्थशास्त्रांतहि 'किंमत' या शब्दाला दोन अर्थ असतात. एक बाजारांत देण्याघेण्याच्या बाबतींतील म्हणजे चलनी नाण्यानें मोजण्याची किंमत. पण दुसरी किंमत सर्वस्वी वस्तुगुणनिष्ठ अशी असते. सोनें रुपे इत्यादि पदार्थ घेतले तर जगांतील मागणी कमीजास्त होईल त्याप्रमाणें त्यांची चलनी नाण्यानें मोजण्याची किंमत कमीजास्त होऊं शकेल. पण सोन्यारुप्याचें वजनमाप, त्यांची घनता, त्यांचें तेज, त्यांची शुद्धता, आम्ललवणादि द्रवांनीं दूषित न होण्याचा त्यांचा धर्म, हे त्यांचे स्वतःसिद्ध गुण सर्वदा कायमच असतात. त्याचप्रमाणें लोकसेवकांचीहि गोष्ट समजावी. त्यांच्या कृत्यांवर जनतेनें मारलेला नापसंतीचा छाप कित्येक वेळां न्याय्य असतो, पण कित्येक वेळां तो अन्यायाचाहि असूं शकतो. लोकमतांत अशी अनिश्चितता असण्याचें कारण जनतेच्या स्वभावाचा चंचलपणा हेंहि असूं शकतं. जनता ही ज्याअर्थी हजारों व्यक्तींची मिळून बनते, त्याअर्थी एका

व्यक्तीच्या अंगीं जे गुणदोष ते जनतेच्या अंगांत हजारोंपटीनें अधिक समुदित होतात हा सरळ हिशेब आहे. ती तुम्हाला क्षणांत आपल्या मनःसिंहासनावर राजपद देऊन बसवील, तर दुसरे वेळीं ती तुम्हाला एकदम राजाचा रंक करील. जनतेच्या स्वभाव-चांचल्यांत तिच्या सामुदायिक अज्ञानाचींहि भर पडते. आणि एकदां तुमच्याविरुद्ध जनतेची मुसंडी वळली म्हणजे मग तुम्ही युक्तिवादानें तिला आपली बाजू कितीहि समजावून सांगण्याचा प्रयत्न करा तो सिद्धीस जावयाचाच नाहीं. आणि सर्वांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, जनता ही चंचल स्वभावाची व तात्पुरत्या लहरीला सर्वस्वी वश होणारी असल्यामुळें, कृतज्ञता हा काय पदार्थ असतो हें तिला फारसें माहीत नसतें.

प्रत्येक देशाच्या इतिहासांत जनतेच्या ह्या स्वभावदोषांचीं उदाहरणें आढळतात. ख्रिस्त व सॉक्रेटीस यांची शिकवणच लोकांना कधीं पसंत पडली नाहीं यामुळें एकाला क्रुसावर चढावें लागलें, व दुसऱ्याला विषप्राशनानें मृत्यूची शिक्षा भोगावी लागली. पण ग्रीक इतिहासांत ॲरिस्टॅडिस् याचें तर उदाहरण असें आहे कीं, त्यानें आपले अधिकार नेहमीं न्यायानें बजावले; आणि याकरितां लोकांनीं त्याला 'न्यायी ॲरिस्टॅडिस्' अशी पदवी दिली; पण तिच्याच पुनः पुनरुच्चाराचें वैषम्य वाटून त्यांनीं त्याला विनाकारण हद्दपारीची शिक्षा दिली! रोमन इतिहासांत पॉंपे व जुलियस सीझर या लोकपक्षपाती लोकांना शेवटीं अपघातानें मरण आलें. दोन्ही आपापल्या परीनें देशभक्त दिग्विजयी वीर. दोघांनीहि परदेश जिंकून रोमन साम्राज्याला जोडून त्याची कीर्ति वाढविली. दोघेहि पॅट्रिशियन म्हणजे वरिष्ठ सामाजिक वर्गांतले असतांहि त्यांनीं कनिष्ठ वर्गांतील लोकांचें हित पाहिलें व तें साधण्यासारखे कायदे करून घेतले. पण अखेर पॉंपेला देशत्याग करून परदेशांत मारेकऱ्याच्या हातून मरावे लागलें. आणि सीझरचा तर खून, ज्या लोकसभेच्या आवारांत त्यानें आपला अनियंत्रित अधिकार गाजविला व सर्वांना दरारा उत्पन्न केला, त्याच आवारांत त्याच्याच लगत्याच्या लोकांनीं केला. इंग्लंडचें उदाहरण घेतलें तर ज्या ड्यूक ऑफ वेलिंग्टननें वॉटर्लूची लढाई जिंकून नेपोलियन बोनापार्टला सेंट हेलिना बेटावर कैदेंत कायमचा मरेपर्यंत डांबून टाकला, त्या वेलिंग्टनचा मुक्त्य प्रधानकीचा कारभार पसंत न पडल्यामुळें लोकांनीं त्याच्या घराचीं तावदानें फोडलीं! लॉईड जॉर्ज हा कारकीर्दीच्या प्रारंभीं बोअर लोकांशीं इंग्रजांनीं युद्ध करण्याविरुद्ध होता म्हणून जाहीरसभांतून त्याला अनेक वेळां कुजकेपणा

अंड्या बटाट्यांचा मार खावा लागला, व कपडे फाटलेला असा त्याला पोलिसांना उचलून नेऊन सुरक्षित स्थळी ठेवावा लागला. तोच लॉईड जॉर्ज पुढें किती तरी वर्षे इंग्लंडचा मुख्य प्रधान होता; व महायुद्धांत जर्मनीचा पाडाव केल्यावर जर्मन बादशहाला कैद करून न्यायासनापुढें ओढून चौकशी करून त्याला शिक्षा करीन अशी त्यानें घोषणा केली तेव्हां प्रत्यक्ष स्वर्ग ठेंगणें होऊन त्याच्या डोक्याला येऊन भिडलें असा लोकांना भास झाला! पण आज लॉईड जॉर्जची स्थिति अशी आहे की मुख्य प्रधानकी तर राहोच, पण प्रधानमंडळांतील एक साधा प्रधान म्हणून कोणी त्याला समाविष्ट करून घेण्याची आशा उरलेली नाही. आणि आपल्या पार्टीच्या इनमीन साडेतीन सभासदांचा अध्यक्ष म्हणून मिरवावे, आणि लेबर पार्टीला मधून मधून फुसकी दमदाटी देत आपण जिवंत असल्याचा बहाणा करावा, अशी त्याची स्थिति होऊन गेली आहे!

पण लॉर्ड हाल्डेन याच्या आत्मचरित्रांतील जी एक हकीकत मी कांहीं दिवसापूर्वी वाचली, ती तर या मुद्यावर अत्यंत बोधप्रद अशी वाटल्यामुळें, किंचित् पाल्हाळ झाला तरी त्याचा दोष सोसून मी ती हकीकत मुद्दाम येथें देत आहे. लॉई हाल्डेन हा प्रख्यात तत्वज्ञानी लिबरल पक्षापैकीं एक मोठा पुढारी होता. युद्धखात्याचा प्रधान व मुख्य अधिकारी असतां जर्मनीच्या लष्करी खात्याचें अनुकरण करून भावी जर्मनयुद्धांत आपण तयार कसे राहूं याविषयीं त्यानें उत्कृष्ट लष्करी योजना करून पार्लमेंटकडून ती मान्य करून घेतली होती. पण १९१४ साली जर्मनीशीं युद्धाचा प्रसंग येतांच सर्व गाडें बदललें; व त्याचे गुण तेच अवगुण झाले. हाल्डेन हा जर्मनीचा मित्र व चहाता हे त्याच्या वर्णनाचे एरवीं भूषणास्पद ठरणारे शब्दच त्याचे वैरी झाले. लोकमत त्याच्या विरुद्ध बिथरलें तें इतकें कीं, प्रधानमंडळांतून आपण होऊन राजीनामा द्यावा हेंच बरें असें वाटून मुख्यप्रधान ॲस्क्विथ हे नको नको म्हणत असतां त्यानें राजीनामा दिला. तथापि लोकमताची त्याच्या मागची वावटळ थांबली नाहीं. रस्त्यांतून फिरणें त्याला अशक्य झालें. "हा पहा जर्मनीचा मित्र" असें म्हणून लोक त्याजकडे बोटें दाखवीत; व त्या बोटांचे चाकू किंवा सुऱ्या केव्हां होतील, आणि लोकनिंदेच्या फुटाण्याप्रमाणें उडणाऱ्या शब्दांऐवजीं पिस्तुलांतून झाडलेल्या गोळ्या आपल्या अंगांत केव्हां शिरतील याचा नेम नाहीं, असें

त्याला वाटूं लागले. अशा स्थितींत महायुद्ध सुरूं असतां जवळ जवळ तीन वर्षें हाल्डेन याला अज्ञातवासांत काढावीं लागलीं.

पण पुढें एके दिवशीं आणखी चमत्कार झाला तो असा. महायुद्धांत जय संपादून सेनापति सर डग्लस हेग हा सैन्यासह लंडनला परत आला त्या दिवशीं सर्व शहर आनंदाच्या दंगलींत गढून गेलें होतें, व त्यांतच अग्रभागीं राजा असलेली अशी एक मोठी मिरवणूक निघाली. या वेळीं हाल्डेन हा आपल्या वकिलीच्या कचेरींतील एका अंधाऱ्या खोलीत खिन्न मनानें विचारमग्न होऊन पडला होता. इतक्यांत त्याचा एक नोकर घाईघाईनें वर येऊन म्हणाला, 'धनीसाहेब, तुम्हाकडे लष्करी अधिकाऱ्यासारखा दिसणारा कोणी एक मनुष्य भेटण्याला आला आहे. पण त्याला नांव विचारले तर सांगत नाहीं म्हणतो.' तेव्हां हाल्डेन याला प्रश्न पडला कीं, या मनुष्याला आपणाकडे वर येऊं द्यावें कीं नाहीं? त्याच्या नोकरालाहि वाटे कीं, गेले कांहीं दिवस धन्याच्या वाईटावर असलेले लोक निरनिराळ्या मिषांनीं धन्याची भेट घेऊं म्हणतात, पण स्कॉटलंड यार्डच्या गुप्त पोलिसांच्या सूचनेवरून अशा लोकांना भेटूं न देण्याची सावधगिरी आजवर ठेवली तशीच आजहि ठेवावी. तथापि हाल्डेन यानें आलेल्या मनुष्याला भेटण्याचा निश्चय करून त्याला वर पाठवून दे म्हणून नोकाराला सांगितलें. तरी पण नोकरानें त्याला वर जाऊं दिलें नाहीं. नोकरानें वर न सोडलेला हा मनुष्य दुसरा तिसरा कोणी नसून खुद्द सेनापति सर डग्लस हेग हाच होता! राजाबरोबर निघालेली त्याची मिरवणूक संपतांच तो मुद्दाम वाकडी वाट करून हाल्डेन याला भेटण्याला आला होता. पण तो रिक्तहस्तानें आला नव्हता. त्यानें रणांगणावरून प्रधानमंडळाकडे पाठविलेल्या आपल्या पत्रांचें (रिपोर्टांचें) छापील पुस्तक बरोबर आणलें होतें व त्याच्या पहिल्या कोऱ्या पानावर सही करून त्यानें हा मजकूर त्यावर लिहिला—" हें पुस्तक मी व्हायकाउंट लॉर्ड हाल्डेन यांना प्रेमादरानें अर्पण करीत आहे. त्यांच्या इतका कल्पक दूरदर्शी व देशाभिमानी युद्धमंत्रि इंग्लंडला आजवर लाभला नाहीं. युरोपखंडांत युद्ध सुरूं झालें असतां आपल्या सैन्याची तयारी कशी उत्कृष्ट असावी, हें त्यानें योजून अमलांत आणले. इंग्लंडचें आर्मी-कौन्सिल उलट बोले, पार्लमेंटनेंहि फारशी अनुकूलता दाखविली नाहीं, असें असतां त्यानें मोठया चिकाटीनें आपल्या आवडत्या योजना अंमलांत आणल्या. त्या योजना शेवटीं या युद्धांत यशस्वी ठरल्या;

व त्यामुळेंच आमच्या सैन्याला जय मिळाला. ही जाणीव असल्यामुळें मन कृतज्ञतेने भरून येते. तेव्हां हा छापील पत्रग्रंथ मी लॉर्ड हाल्डेन यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाला अर्पण करूं ?" इतके लिहून ठेवून सेनापति हेग हा पुस्तक तेथेंच टेबलावर ठेवून तोंड फिरवून तडक खाली निघून गेला. हाल्डेन याने त्याला थांबवून घेण्याचा प्रयत्न केला. पण तो बहुधा गर्हिवरला असावा, त्याच्यानें बोलवेना, म्हणून तो निघून गेला असावा. या हकीकतीवरून, प्रतिपक्षाचा मित्र म्हणून हाल्डेन याला यःकश्चित् माणसांनीं राष्ट्राच्या शत्रूंत गणावें व रस्त्यांत त्याजवर हत्यार चालविण्याची इच्छा धरावी ही गोष्ट एकीकडे, आणि जर्मनयुद्ध जिंकून परत आलेल्या राष्ट्रसेनापतीनें स्वतः पायानें चालत जाऊन बसल्या ठिकाणी हाल्डेन याचा कृतज्ञतापूर्वक वरील प्रमाणे आदर करावा ही गोष्ट दुसरीकडे, अशा परस्पर जोडून लावून पाहिल्या म्हणजे जनतेच्या अज्ञानाचें आणि कृतघ्नपणाचें व चंचल मनाचें जे वर्णन वर केले आहे तें यथार्थ आहे असे कोणीहि म्हणेल.

आपल्या इकडील जुनें उदाहरण 'मुद्राराक्षसां'तील अमात्य राक्षस याचे. नंद वधानंतर नंदांचा राजनिष्ठ अमात्य मागें उरला तेव्हां त्या अनुभवी कर्तबगार इमानी मुत्सद्याला आपल्या पक्षाला हरप्रयत्नाने मिळवून घेऊन चंद्रगुप्त राजाच्या प्रधान-पदावर स्थापून मग आपण बाजूस व्हावें असा आर्य चाणक्य याचा सात्विक प्रयत्न होता. अमात्य राक्षसाला हें कसें आवडणार ? पण त्या झटापटीत राक्षस हा सर्व बाजूंनीं फजित पावला तेव्हां काय स्थिति होती ? 'यत्रैषा मेघनीला चरति गजघटा राक्षसः तत्र यायात्' अशा रीतीनें प्रत्येक महत्त्वाच्या राजकारण प्रसंगी अपरिहार्य ठरणारा अमात्य राक्षस शेवटीं हतबल व निष्प्रभ होऊन त्याला एखाद्या चोरासारखे तोंड लपवून 'जीर्णोद्यानकमेव तस्कर इव त्रासात् विशामि द्रुतं' असें म्हणून जवनिकेत अंतर्धान पावावें लागले.

पण उदाहरणें मोठ्यांची काय लहानांचीं काय, बोधप्रदेतेच्या दृष्टीनें सगळीं सारखींच असें म्हणतां येणार नाहीं काय ? राष्ट्रीयसभा व गांधी-सांप्रदाय अशा झगझगीत पार्श्वभूमि लाभल्यामुळें ज्यांच्या मुखाभोंवतीं दिव्य तेजोवलयें झळकत होतीं असा जनतेला भास होत होता, पण ती पार्श्वभूमि जातांच ज्यांचीं तोंडें कोळशासारखीं काळीं ठिक्कर पडलीं, अशा 'लोकप्रिय' (!) पुढाऱ्यांचीं कांहीं उदाहरणें अलीकडे अगदीं ताज्या अनुभवांत तुम्हा आम्हाला पहावयाला

सांपडलीच कीं नाहीं ? वीर नरीमन डॉ. खरे यांचीं उदाहरणें लोकप्रियतेच्या चंचल विलासाविषयीं नमुनेदार बोधप्रद ठरतील नव्हे काय ?

राजकीय बाबतींत अथवा धार्मिक सामाजिक बाबतींत ज्या मनुष्यांचीं मतें मध्यममार्गी, किंवा ज्यांना नेमस्त म्हणतात तशीं असतात त्यांना कोणत्याहि समाजांत नांव कीर्ति किंवा प्रमुखता मिळणें कठिण असते. हा सकृद्दर्शनीं तोटासा दिसतो. परंतु तो तोटा ऐनजिनसी असें मानण्याचें कारण नाहीं. नांव कीर्ति प्रसिद्धी मिळावी हींच ज्याची जन्माला येऊन इच्छा असेल त्यांची गोष्ट वेगळी. पण ती लाभण्याकरितां अप्रामाणिक मतें स्वीकारणे व बोलून दाखविणें यापेक्षां इतर चांगले मार्ग नाहींत असें नाहीं. मत कोणचेंहि असलें तरी, म्हणजे नेमस्त असलें तरी, निःस्वार्थीपणाने मेहनतीनें कष्ट सोसून व देशहिताची दृष्टि ठेवून त्याचा प्रसार मनुष्यानें केल्यास त्यालाहि थोडेंबहुत नांव किंवा कीर्ति मिळण्याचा संभव आहे. अप्रामाणिक मतांनी कीर्ति मिळविण्याची हांव धरण्यापेक्षां प्रामाणिक कृतीनें कीर्ति मिळेल ती स्वीकारण्याची व तिजवर संतुष्ट राहण्याची मनुष्याची तयारी असेल तर ते त्यातल्या त्यांत अधिक बरें. एकांतिक मतें बनविणें व वेळों अवेळीं त्यांचा बेगुमानपणें प्रसार करणें या उपद्व्यापानें मनुष्याला प्रसिद्धि मिळते खरी. पण नुसतें नांव लोकांच्या तोंडीं राहणें ही खरी कीर्ति नव्हे; व मनुष्य सात्विक व प्रामाणिक असेल तर निव्वळ प्रसिद्धीची म्हणजे कुकीर्तीची चाड त्याला असणार नाही.

सूत्ररूप ठसकेदार चटकदार अशीं स्वतः माझीं दोन वर्णने मी वाचलीं आहेत. एकानें असें म्हटलें आहे कीं, "केळकरांना महाराष्ट्राच्या राजकारणांत पहिल्या पंक्तीत बसवील तो मूर्ख, आणि त्याना साहित्यकारणांत दुसरा नंबर देईल तो मूर्ख." पण मला वाटतें की माझ्या दर्जाचे असे नंबर लावण्यांत चूक घडल्यानें कोणाच्याहि पदरीं मूर्खपणा येऊं नये म्हणून माझा मीच म्हणेन की, कोणत्याहि क्षेत्रांत पहिल्या पंक्तीला बसण्याची माझी योग्यताच नाही. कदाचित् दुसऱ्या पंक्तींत कोठेंतरी खालीं वर बसण्याची असेल. पण तीहि जागा न देतां मला तिसऱ्या पंक्तीत कोणी ढकललें तरी त्याला माझी तक्रार नाही. कारण स्वतःची योग्यता अजमावण्याची माझी दृष्टि स्वतंत्र आहे; व इतरांनीं वेळेल्या चुकीच्या वर्गवारीनें ती चलित होण्याचा संभव नाही. स्वतः विषयींच्या स्वतःच्या कल्पनेनें व अंदाजानें जे

समाधान लाभतें, तें दुसऱ्याच्या प्रतिकूल किंवा अनकूलहि वर्णनानें लाभत नाहीं. परकर्तृक वर्णनाला साक्षीचें महत्त्व आहे पण निवाड्याचें नाहीं.

दुसऱ्या एका गृहस्थानें माझें वर्णन केलें तें असें कीं, "केळकरांना स्वपक्षांत मित्र नाहीं व प्रतिपक्षांत शत्रू नाहीं." विरोधाभासाचें हें एक उत्कृष्ट उदाहरण होईल. इंग्रजींत याला Epigram चाटूक्ति म्हणतात. चटकदारपणा हा त्यांतील गुण असतो पण अयथार्थता हा दोष असतो. माझीं मतें एकांतिक नसतात यामुळें माझ्या पक्षांतील कांहीं लोकांना मी आवडत नसतों, आणि माझ्यामध्यें पक्षांधता व प्रतिपक्षद्वेष कमी, यामुळें मला बरे म्हणणारे कांहीं लोक प्रतिपक्षीयांत निघतात. पण खरें पाहता, असा उलटसुलट विपरीत अनुभव देण्यासारखे लोक एकंदरीनें कमीच असतात. टिळकांनंतर राष्ट्रीय पक्षाच्या पुढारीपणाचा अधिकार, तो मी सोडीपर्यंत, मजकडे होता ही गोष्ट स्वपक्षांत मला मित्र नसते तर घडलीच नसती. पुढाऱ्याला अध्यक्षाला खासगीरीतीनें, तोंडाला पदर लावून, नांवें ठेवणारे किंवा वेळीं त्याचे पाय गुप्तरीतीनें ओढणारे कुरतडणारे असे कांहीं अनुयायी सभासद किंवा अस्तनींतील निखारे वा विंचू कोणत्याहि पक्षांत असतात तसे ते कांहीं थोडे माझ्या पक्षांत असल्याची जाणीव मला होती. पण माझ्या पक्षांत मला कोणीहि मित्र नव्हता ही केवळ विरोधाभासाकरितां रचलेली म्हणून अक्षम्य अतिशयोक्ति ठरेल. तीच गोष्ट प्रतिपक्षांत मला शत्रू नव्हता या म्हणण्याची देखील समजावी. शिवाय माझे निंदक हेच माझे प्रतिपक्षी नव्हते काय! तेच माझे शत्रू नव्हते काय! हे निंदक मजवर निंदेच्या तरवारीचे वार करतांना टिळकभक्तींची ढाल आपल्या बचावाकरितां पुढें करीत असत. पण अशांना माझ्या पक्षांत कधींहि मानाची किंवा अधिकाराची जागा मिळाली नाहीं. यावरून ते व्यक्तिशः माझें शत्रुत्व करणारे म्हणवीत असले तरी माझ्या एकंदर पक्षानें त्यांना माझ्या पक्षाचे शत्रूच मानले. अच्युतराव कोल्हटकर, माधवराव बोडस, डॉ. केतकर हीं माझ्या वरील विधानांचीं उत्तम उदाहरणें होत. आणि टिळक हयात असतांना तरी कोल्हटकर बोडस यांनीं प्रसंगविशेषीं स्वतः टिळकांची निंदा करण्याचें कोठें सोडलें!

असो. सत्याप्रमाणें यश हेहि अनेकांगीं असतें आणि या मुळेंच तें पूर्णपणें कोणाच्याहि पदरांत पडत नाहीं. एका तत्वज्ञाचें एक वचन या ठिकाणीं सांगावेंसें वाटतें. तो म्हणतो—

—Complete Success is a hard task-master, just because it is so difficult to live up to. Partial success and causes of failure provide better instruction to an imperfect world—"पूर्णांशानें यश मिळविणें हें फार कठिण आहे. कारण तें मिळालेसें वाटतें तोंच ऱ्हास पावूं लागतें. अपूर्णांशानें मिळणारें यश किंवा जय, आणि त्याबरोबरच उरलें यश पदरांत न पडण्याचीं किंवा पराजयाचीं कारणें, या गोष्टी मनुष्यानें लक्षांत घेतल्या, त्यांचा खोल विचार केला, तर त्या मात्र अधिक बोधप्रद होऊं शकतात. कारण जगांत पूर्णत्व हें कशांतच आढळत नाहीं." ब्राउनिंग कवि म्हणतो, 'Man never is but wholly hopes to be'. मनुष्यानें पूर्णत्वाचें ध्येय डोळ्यापुढें ठेवावेंच, व तें मिळविण्याची आशाहि करावी. पण शेवटीं मरतांना ती आशाच तेवढी बरोबर घेऊन त्याला जावें लागेल ! जगद्वंद्य अशा आणि जगाच्या दृष्टीनें कृतकृत्य अशाहि थोरांत थोर पुरुषांनीं आपण अवतार असलों तरी पूर्णावतार नव्हतों, अंशावतारच होतो, हें मान्य केलें असतें.

मनुष्य स्वभावाचे मुख्यतः तीन प्रकार असतात १ आज्ञाकारक २ आज्ञाधारक ३ स्वातंत्र्यप्रिय. आज्ञाकारक स्वभावाचे लोक नेहमीं हरप्रयत्नानें इतर सर्वांना आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करितात. श्रेष्ठ कनिष्ठ भाव हा त्यांच्या पांचवीला पुजलेला असतो आणि ते स्वतःची गणना नेहमीं श्रेष्ठांत करितात. पुरुषच काय पण स्त्रियाहि आज्ञाकारक स्वभावाच्या असूं शकतात. दुसरा प्रकार आज्ञाधारकांचा. अशा लोकांना स्वतःची बुद्धि चालविण्याची पात्रता नसते किंवा तो उद्योग करण्याचा त्यांना कंटाळा असतो. दुसऱ्याच्या मताला भलेपणा देण्याचें औदार्य त्यांच्यामध्यें असतें, त्याबरोबरच कांहीं चुकलें बिघडलें तर त्याची जबाबदारी, त्याचा दोष, दुसऱ्यावर टाकून देतां आल्यानें जें समाधान व स्वास्थ्य लाभतें त्याचेहि ते भोक्ते असतात. स्त्रियांमध्यें आज्ञाधारकता हा गुण सामान्यतः पुरुषांपेक्षां अधिक आढळतो. तथापि भोळ्या स्वभावाचे श्रद्धाळू लोक गुरूच्या किंवा पुढाऱ्याच्या नादीं एकदां लागले म्हणजे मग ते आज्ञाधारकपणांत स्त्रियांवरहि ताण करतात ! पण तिसऱ्या प्रकारचे म्हणजे स्वातंत्र्यप्रिय लोक जसे दुसऱ्या कोणावर आपली जुलमी आज्ञा लादणार नाहींत तसे स्वतःहि दुसऱ्या कोणाच्या जुलमी आज्ञेला मान वाकविणार नाहींत. त्यांच्या मनांत आत्मौपम्याचें तत्त्व बिंबलेलें असल्यामुळें ते आपल्या स्वातंत्र्यप्रेमा इतकाच

दुसऱ्याच्या स्वातंत्र्यप्रेमाला मान देतात. दुसऱ्यांनीं आपलें म्हणणें मान्य केल्यास अर्थातच त्यांना आनंद वाटतो, पण त्यांना आपलें म्हणणें युक्तिवादानें पटलें व म्हणूनच त्यांनीं तें मान्य केलें अशी त्यांची खात्री झाली तर ! आपलें म्हणणें दुसऱ्या कोणास पटलें नाहीं तर त्यानें तें खुशाल अवमानावें, पण त्या अवमान्यतेचे रास्त व न्याय्य परिणाम भोगण्यास तयार व्हावें, इतकीच अपेक्षा ते करतील. आणि तसें झालें म्हणजे ते विशिष्ट मतभेदाचें प्रकरण विसरून जाऊन त्या इतराशीं सख्य करतील. आज्ञाकारक लोक मात्र आपली आज्ञा उल्लंघणारावरचा राग केव्हांहि कमी करणार नाहींत व झाली गोष्ट विसरून जाणार नाहींत.

आज्ञाकारक व आज्ञाधारक यांची ही गोष्ट झाली. पण स्वातंत्र्यप्रिय लोकांचें काय ! याचें उत्तर हेंच कीं त्यांनाहि इच्छा असल्यास आपलें स्वातंत्र्यप्रेम टिकवितां सिद्धीस नेतां येतें. मात्र त्याची किंमत देऊन ! आणि ही किंमत म्हणजे हुकमी सत्तेचा अभिलाष सोडणें, किंवा प्रसंगविशेषीं बाजूला पडण्याची, मागील बांकावर बसण्याची, मनाची तयारी करणें ही होय. आज्ञाकारकांचा डाव साधला तर ते सत्ताधीश होतातच. आज्ञाधारकांनाहि सत्तेचा अंश लाभतो पण केवळ पुढाऱ्याच्या अंगभूत म्हणून, पुढाऱ्याचे गुलाम म्हणून. स्वातंत्र्यप्रिय हे कोणाचे धनि किंवा कोणाचे गुलाम राहूं इच्छित नाहींत. अभिलाष न धरतां त्यांना इतरांवर सत्ता मिळाली तरी ती मर्यादित असते. आणि सत्ताधारित्व हीच कीर्ति असा आजच्या जगाचा अनुभव आहे. सत्ताधारी होऊन ती हाताखालच्या लोकांवर गाजवावी हें एक ध्येय आहे, व तें सफल होण्यातच ज्यांना कृतकृत्यता वाटते असा एक वर्ग असतो. त्याचप्रमाणें आपल्या परिसरांत येणाऱ्या सर्व प्रकारच्या लोकांशीं शक्य तितकें वरोबरीच्या नात्यानें वागून, केवळ सौजन्य व विचारसामर्थ्य यांच्या बळावर त्यांजकडून मिळेल ती मान्यता मिळविणें व त्यांतच आनंद मानणें हें दुसरें ध्येय मानणाऱ्या लोकांचाहि एक वर्ग असतो. या प्रत्येक वर्गाच्या वांट्याला जसे कांहीं गुण तसे कांहीं दोष आलेले असतात. मी या दुसऱ्या वर्गातला आहे असें मला वाटतें. मी सत्ताभिलाषी असतों तर गांधींच्या धोरणाला विरोध केला नसता, किंवा केसरी ट्रस्टीचा अधिकार आपण होऊन सोडला नसता !